वरील मंत्रानें दान द्यावें. याप्रमाणें विधि केला असतां, अतिसारापासून मोकळा हो व व्याध जाऊन दीर्घायुषी होतो.

तिसरे प्रकारचा कर्मविपाक.

स्त्रीहंताचातिसारीस्यादश्वत्थान्रोपयेद्दश ॥
दद्याच्चशर्करावेनुंभोजयेच्चशतंद्विजान् ॥

अर्थ–स्त्रीहत्या करणारा अतिसारी होतो. त्याणें दाहा पिंपळ लावावे. शर्करावेनूचें दान करावें. व शंभर ब्राह्मणाकडून भोजन करवावें. हें शर्करावेनुदान राजयक्ष्मप्रकरणीं सांगितलें आहे.

रक्तातिसारी चिकित्सा.

दावाग्निदायकश्चैवरक्तातीसारवान्भवेत् ॥
तेनोदपानंकर्तव्यंरोपणीयस्तथावटः ॥

अर्थ–जो अरण्याला वणवा लावितो, तो रक्तातिसारी होतो. त्याणें पाणपोई इत्यादि उदक दान करावें; व वटवृक्ष लावावे, ह्मणजे तेणेंकरून अतिसार जाईल.

अतिसारनिदान.

गुर्वतिस्निग्धतीक्ष्णोष्णद्रव्यस्थूलातिशीतलैः ॥ विरुद्धाध्यशनाजीर्णैर्विषमैश्चातिभोजनैः ॥ स्नेहाद्यैरतियुक्तैश्चमिथ्यायुक्तैर्विषैर्भयैः ॥ शोकदुष्टांबुमद्यातिपानैःसात्म्यर्तुपर्ययैः ॥ जलाभिरमणैर्वेगविघातैः कृमिदोषतः ॥ नृणांभवत्यतीसारोलक्षणंतस्यवक्ष्यते ॥

अर्थ–जड, स्निग्ध, तिखट, उष्ण, पातळ, भरड व शीतल, यांचें अतिसेवन, आणि देश, काल व संयाग यांशीं विरुद्ध ह्मणजे जसे गर्जरदेशीं मरीच्यादि भक्ष देशविरुद्ध, वसंतकळीं मधुरकपान कालविरुद्ध, क्षीरमत्स्यादिसंयोग संयोगविरुद्ध व जेवणावर जेवण, अजीर्ण, भोजनाचा काळ चुकऊन उणे अधिक खाणें, स्नेहाधिकद्रव्यांचें अतिपान, विरुद्धफल देणारे हीनाधिक योग, विष,भय, शोक यांपासून, व वाईट पाणी व मद्य, यांच्या अतिपानापासून, ऋतुविपरीत भक्षण, पाण्यांत डुंबणें, मळमूत्रवेगाचा निरोध व जंतु यांपासून अतिसार होतो. त्याचें लक्षण सांगतो.

संप्राप्ति.

संशाम्यापांधातुरग्निंप्रवृद्धोवर्चोमिश्रोवायुनाधःप्रणुन्नः ॥
सरत्यतीवातिसारंतमाहुर्व्याधिंघोरंषड्विधंतंवदंति ॥

अर्थ–शरीरांतील द्रवरूपधातुपासून व अतिवाढून अग्नीला शांत करितो, आणि

मळाशीं मिश्रित होऊन वायूनें अपानमार्गानें वारंवार स्रवू लागतो. त्याला अतिसार म्हणतात. तो घोर व्याधि साहा प्रकारचा आहे.

षट्प्रकार.

एकैकशःसर्वशश्चापिदोषैःशोकेनान्यःषष्ठआमेनयुक्तः ॥
केचित्त्वाहुर्नैकरूपप्रकाराइत्येवंतंकाशिराजोह्यवादीत् ॥

अर्थ—वातातिसार, पित्तातिसार, कफातिसार, सन्निपातातिसार, शोकातिसार व आमातिसार, असे साहा प्रकारचे अतिसार होतात. व सातवा द्वंद्वज अतिसार विद्वानांस मान्य आहे. वरील श्लोकांत ही द्वंद्वज अतिसार निष्पन्न होतो. व अन्यग्रंथीं यावर चिकित्सा आढळत्ये, व काशिराजाचें ही याप्रमाणें अनेक अतिसार आहेत असें मत आहे.

पूर्वरूप.

हृन्नाभिपायूदरकुक्षितोदगात्रावसादानिलसन्निरोधाः ॥
विट्संगआध्मानमथाविपाकोभविष्यतस्तस्यपुरःसराणि ॥

अर्थ—हृदय, बेंबि, गुद, पोट व कुशी यांचा शूळ, आंग गळणें, वाताचा निरोध, मळावरोध, पोट फुगणें व अपक्व अन्न पोटांत राहाणें हीं अतिसार पुढें होणार असला तर लक्षणें होतात.

अतिसारपूर्वरूपचिकित्सा.

हितंलंघनमेवादौपूर्ववत्तेनपाचनं ॥ षडंगयूपंरुक्त्वावापिपासादिषु योजयेत् ॥ मुद्गयूपंरसंतक्रंधान्यजीरकसंयुतं ॥ षडंगयूपमित्याहुःसैंधवेनसमन्वितं ॥ अग्निसंदीपनंप्रोक्तंग्रहणीदोषनाशनं ॥ अरोचके ज्वरेचैवश्रेष्ठमेतत्प्रवाहिके ॥

अर्थ—अतिसारीरोग्याला पूर्वीं लंघन हितकारक आहे. तें लंघन पाचन करितें; नंतर षडंगयूष ताहान इत्यादि उपद्रव असतां द्यावा; किंवा मुगांचा यूष, रस, ताक, धने, जिरें व सैंधव यांला षडंगयूष म्हणतात. हा अग्निसंदीपन, ग्रहणीचा नाशक व अरोचक ज्वर व प्रवाहिका यांवर श्रेष्ठ आहे.

बिल्वादिषडंगयूष.

बिल्वंचधान्यंचसजीरकंचपाठाचशुंठीतिलसंयुताच ॥
पिष्टापडंगःसहितोनराणांयूपस्त्वतीसारहरःप्रदिष्टः ॥

अर्थ—बेलफळ, धनें, जिरें, पाडळमूळ, सुंठ व तीळ यांच्या चूर्णाचा यूष करावा. या षडंगयूषाच्या प्राशनानें अतिसार नाश पावतो.

यवागू.

तृष्णापनयनीलघ्वीदीपनीबस्तिशोधिनी ॥ विरेकेचातिसारे
चयवागूःसर्वदाहिता ॥

अर्थ—यवागू—तृष्णानाशक, लघु, दीपनी, बस्तिशोधनी, रेचक, आणि अति०। यांवर सर्वदाहितकारक आहे.

औषधाला वर्ज्य.

नस्तंभयेदतीसारमपक्वंवृध्दिमागतं ॥
विनाक्षीणस्यवृध्दस्यगर्भिण्याबालकस्यच ॥

अर्थ—क्षीण, बाळ, वृध्द व गर्भिणी, यांला जाहालेल्या अतिसारावांचून, अपक्व व वाढलेल्या अतिसारावर स्तंभन देऊं नये.

अतिसारावर लंघन.

तस्यादौलंघनंप्रोक्तंज्ञात्वादेहबलाबलं ॥ पाचनंचविधातव्यंन्यूपणाद्यंभिषग्वरैः ॥ नपित्तेनविनासोपिजायतेशृणुपुत्रक ॥ तस्यनोलंघनंप्रोक्तंज्वरजेचातिसारके ॥ तस्यादौलंघनंचैवमन्येवानैवलंघनं ॥ तस्माद्देयंकषायंतुपाचनंभोजनेनच ॥

अर्थ—देहशक्ति पाहून अतिसारावर प्रथम लंघन करावें; नंतर न्यूपणादिकांचें पाचन द्यावें. कोणी वैद्य पुत्रास बोलतो, पुत्रा अतिसार हा पित्तावांचून होत नाहीं. याकरितां पित्ताधिक अतिसारावर लंघन करूं नये. तसेंच ज्वरातिसारावर ही लंघन करूं नये. तर त्याला पाचनकषाय भोजनाबरोबर द्यावा.

यवान्यादि दीपन.

यवानीनागरोशीरधानिकाबिल्वमुस्तकं ॥
द्विपर्णिकापचेत्त्रैतद्दीपनंपाचनंस्मृतं ॥

अर्थ—ओंवा, सुंठ, वाळा, धने, बेलफळ, नागरमोथा, डाय व डवळा यांचा काढा दीपन व पाचन आहे.

अतिसारप्रक्रिया.

अतिसारेज्वरेचैवरक्तपित्तेदृगामये ॥
आदौनप्रतिकुर्वीतव्याधिवेगोहिदुस्तरः ॥

अर्थ—अतिसार, ज्वर, रक्तपित्त, नेत्ररोग, इतक्यांचे ठायीं प्रथमतः प्रतीकार करू नयें. कारण व्याधीचा वेग कठीण आहे. तो कमी झाला ह्मणजे उपचार करावा.

दुसरा प्रकार.

आमपक्कक्रियाहित्वानातिसारेक्रियाहिता ॥
अतःसर्वातिसारेषुज्ञेयंपक्कामलक्षणम् ॥

अर्थ–आम पक्क करण्याची क्रिया सोडून दुसरी अतिसारावर क्रिया हितावह नाहीं. या साठीं, सर्वातिसारांचे ठायीं आम पक्क आहे किंवा नाहीं. हें पाहावें.

तिसरा प्रकार.

आमेविलंघनंशस्तमादौपाचनमेवच ॥
कार्यंवानशनस्यांतेप्रद्रवंलघुभोजनम् ॥

अर्थ–आमातिसाराचे ठायीं पूर्वी लंघन आणि पाचन प्रशस्त आहे, अथवा लंघना नंतर पातळ लघु असें भोजन करावें.

धान्यपंचक पाचन.

धान्यवालकविल्वाब्दनागरैःसाधितंजलं ॥ आमशूलहरंग्राहिभेदि
दीपनपाचनं ॥ पित्तेधान्यचतुष्कंतुशुंठीत्यागाद्ददंतिहि ॥

अर्थ–धणें, वाळा, बेलफळ, नागरमोथा व सुंठ यांचा काढा आमशूलनाशक, ग्राही, रेचक, दीपन, आणि पाचन असा आहे. व पित्तावर सुंठीवांचून धान्यचतुष्क द्यावा.

धातक्यादिमोदक.

धातकीविश्वपाषाणमालूरमजमोदकं ॥
मुस्तंमोचरसंचुक्रंसर्वातीसारशांतये ॥

अर्थ–धायटीचीं फुलें, सुंठ, हाताजोडीपाषाणभेद, वेलफळ, अजमोदा, नागरमोथे, सांवरीचा चीक व चुका यांचा मोदक सर्वातिसारनाशक आहे.

कुटजाष्टककाढा.

कुटजवाळविषाघनधातुकीकुसुमदाडिमलोध्रमथोवृकी ॥ क्वथनमे
भिरिदंमधुनायुतंविमलमोचरसेनसमाहितं ॥ पीयमानंमहातीव्रम
तिसारंसदाहकं ॥ रक्तशूलामरोगंचनिहंतिकुटजाष्टकं ॥

अर्थ–कुडयाची साल, वाळवेल, अतिविष, नागरमोथे, धायटीचीं फुलें, दाळिंब, लोध्र, आणि पाहाडमूळ यांचा काढा मध व सांवरीचा चीक घालून द्यावा. तो महान् तीव्र दाहयुक्त अतिसार, रक्तशूल, आमव्याधि, यांचा नाश करितो.

वातातिसारनिदान.

अरुणंफेनिलंरूक्षमल्पमल्पंमुहुर्मुहुः ॥
शकृदामंसरुक्शब्दंमारुतेनातिसार्यते ॥

अर्थ—वायूच्या योगानें आरक्तवर्ण, फेनयुक्त, रुक्ष व अपरिपक्व असा मळ पोटांत वारंवार गुरगुरून आपानद्वारावाटे थोडा थोडा पडतो तो वातातिसार होय.

पूतिकादिकाढा.

पूतिकंमागधीशुंठीवलाधान्यंहरीतकी ॥
पक्त्वांबुनापिबेत्सायंवातातीसारशांतये ॥

अर्थ—करंज, पिंपळी, सुंठ, चिकणा, धने, हरीतकी यांचा काढा सायंकाळीं घेतला तर आम व वातातिसार यांला शमवितो.

पथ्यादिकाढा.

पथ्यादारुवचाशुंठीमुस्ताचातिविषामृता ॥
क्वाथएषांहरेत्पीतोवातातीसारमुल्बणं ॥

अर्थ—हिरडे, देवदार, वेखंड, सुंठ, नागरमोथा, अतिविष व गुळवेल, यांचा काढा दुर्धर वातातिसाराचा नाश करितो.

वचादिकाढा.

वचाचातिविषामुस्तंबीजानिकुटजस्यच ॥
श्रेष्ठःकषायएतेषांवातातीसारशांतये ॥

अर्थ—वेखंड, अतिविष, नागरमोथे व इंद्रजव यांचा काढा वातातिसारनाश करितो.

सुवर्चलादिकाढा.

सुवर्चलंवचाहिंगुहैमज्योतिविषासमं ॥
वातातीसारहृत्प्रोक्तंसकटुत्रयमंभसा ॥

अर्थ—पादेलोण, वेखंड, हिंग, किराइत, चित्रक, अतिविष, सुंठ, मिरीं व पिंपळी यांचा काढा, वातातीसारनाशक आहे.

कपित्थाष्टकचूर्ण.

अष्टौभागाःकपित्थस्यषड्भागाशर्करामता ॥ दाडिमंतिंत्तिडीकंचश्रीफलंधातकीतथा ॥ अजमोदाचपिप्पल्यःप्रत्येकंस्युस्त्रिभागिकाः ॥ मरीचंजीरकंधान्यंग्रंथिकंवालकंतथा ॥ सौवर्चलंयवानीचचातुर्जातंसचित्रकं ॥ नागरंचैकभागाःस्युःप्रत्येकंसूक्ष्मचूर्णिताः ॥ कपित्थाष्टकसंज्ञंस्याच्चूर्णमेतज्जलामयान् ॥ निहंतिग्रहणीरोगानतिसारंव्यपोहति ॥

अर्थ—आठ भाग कवठ, साहा भाग साकर व डाळिंब, चिंच, बेलफल, धायटीचीं फुलें, अजमोदा व पिंपळी हीं प्रत्येकी तीन तीन भाग व मिरीं, जिरे, धने, पिंपळीमूळ,

वाळा, सैंधव, ओंवा, दालचिनी, तमालपत्र, एलची, नागकेशर, चित्रक आणि सुंठ हीं प्रत्येकीं एकेक भाग, यांची चूर्णे एकत्र करावीं. याला कपित्थाष्टक चूर्ण ह्मणतात. हें संपूर्ण जलसंबंधिरोग, ग्रहणी आणि अतिसार यांचा नाश करील.

लाई चूर्ण.

चित्रकंत्रिफलाव्योपंविडंगंजीरकद्वयं ॥ भल्लातकंयवानीचहिंगुलव णपंचकं ॥ गृहधूमंवचाकुष्ठंघनमभ्रंचगंधकं ॥ क्षारत्रयंचाजमोदापा रदंगजपिप्पली ॥ एतेपांचूर्णितंयावत्तावच्छक्राशनस्यच ॥ अभ्य र्कलाइकांप्राप्तयोगिनींकामरूपिणीं ॥ विडालपदमात्रंतुभक्षयेदस्यगुं डकं ॥ मंदाग्निकासदुर्नामप्लीहपांडुचिरज्वरान् ॥ प्रमेहशोथविष्टंभसं ग्रहग्रहणीहरः ॥ सर्वातीसारशमनःसर्वशूलनिवारणः ॥ आमवातग जोच्छेदःसूतिकातंकनाशनः ॥ नैतस्मिन्व्याधयःसंतिवातपित्तकफो द्भवाः ॥ काष्ठमप्युदरेतस्यभक्षणाद्यातिजीर्णतां ॥ वायेनचव्यवायंच स्नानंपिशितभोजनं ॥ कांजिकाम्लंसदापथ्यंदग्धमीनंतथादधि ॥ त स्मादसौसदासेव्योगुडकोलाइकाकृतिः ॥

अर्थ–चित्रक, त्रिफळा, सुंठ, मिरीं, पिंपळी वावडिंग, जिरें, शाहाजिरें, बिबवे, ओंवा, हिंग, मीठ, टांकणखार, सैंधव, बिडलोण, संचळ, घरासा, वेखंड, कोष्ठ, नागरमोथा, अभ्रक, गंधक, जवखार, सज्जीखार, टांकणखार, अजमोदा, पारा, वांझकर्टोली, गजपिंपळी, यांचें चूर्ण व सर्वचूर्णासमान इंद्रजव घेऊन चूर्ण करावें. तें सूर्योदयीं दोन तोळे घ्यावें, ह्मणजे मंदाग्नि, खोकला, अर्श, प्लीहा, पांडु, अरुचि, ज्वर, प्रमेह, सूज, विष्टंभ, संग्रहणी, सर्वातिसार, शूल, आमवात, सूतिकारोग, त्रिदोषोत्पव्याधि, हीं नाश पावतात. हें चूर्ण घेणारानें लांकडें भक्षण केलीं तरी पचन होतात. याला पथ्य नाहीं. मैथुन, स्नान, मांस, हे पदार्थ वर्ज नाहींत. याला पथ्याला. आंबटकांजी, भाजलेले मासे, दहीं भक्षण करावें, आणि लाइकाकृति गोळा घ्यावा.

कुटजचूर्ण.

इंद्रजमेघमदाकुसुमंश्रीलोध्रमहौषधमोचरसानां ॥
चूर्णमिदंगुडतक्रनिपीतंहंत्यचिरादतिसारमुदारम् ॥

अर्थ–इंद्रजव, नागरमोथा, धायटीचीं फुलें, बेलफळ, लोध्र, सुंठ, आणि सांवरीचा चीक, यांचें चूर्ण गूळ व ताक यांशीं घ्यावें, ह्मणजे तें मोठ्या ही अतिसाराचा नाश करितें.

शुंठीचूर्ण.

कल्याणिकांचनलतालिलितांगयष्टितांबूलशालिलपनेममवाक्शृणुत्वं ॥
शुंठीमदाकुसुममोचरसाजमोदातक्रान्विताःप्रशमयंत्यतिसारमुग्रं ॥

अर्थ–सुंठ, धायटीचीं फुलें, सांवरीचा चीक व ओंवा यांचें चूर्ण ताकाशीं घ्यावें ह्मणजे उग्रअतिसाराचा नाश होतो.

वृहल्लवंगादिक चूर्ण.

लवंगमेलातजपत्रजोत्पलमुशीरमांसीतगरंसवालकं ॥ कंकोलकृष्णागरुनागकेसरंजातीफलंचंदनजातिपत्रिका ॥ द्व्यजाजिसत्र्यूषणपुष्करंसठीफलत्रिकंकुष्टविडंगचित्रकं ॥ तालीसपत्रंसुरदारुधान्यकंयवानियष्टीखदिराम्लवेतसं ॥ तुंगाजमोदाघनसारमभ्रकंशृंगीविषाग्रंथिकमग्निमंथकं ॥ प्रियंगुमुस्तातिविषाशतावरीसत्वंगुडूच्यास्त्रिवृतादुरालभा ॥ समानिसर्वैश्चम्मासिताभवेद्वृहल्लवंगाद्यमिदंनिगद्यते ॥ सायंप्रगेखादतिकर्षसंमितंभवंतिदेहेबलवीर्यपुष्टयः ॥ प्रमेहकासारुचियक्ष्मणीतथाक्षयास्रदाहंग्रहणींत्रिदोषनुत् ॥ हिक्कातिसारप्रदरंगलग्रहंनिहंतिपांडुस्वरभंगमश्मरीं ॥

अर्थ–लवंगा, एलची, तमालपत्र, कमलकंद, वाळा, जटामांसी, तगर, काळा वाळा, कंकोळ, कृष्णागरु, नागकेशर, जायफळ, चंदन, जायपत्री, जिरें, शहाजिरें, सुंठ, मिरीं, पिंपळी, पुष्करमूळ, कचोरा, हरडा, बेहेडा, आवळकाठी, कोष्ठ, वावडिंग, चित्रकमूळ, तालीसपत्र, देवदार, धने, ओंवा, ज्येष्ठीमध, खैर, आम्लवेतस, वंशलोचन, किरमाणी ओंवा, कापूर, अभ्रकभस्म, कांकडशिंगी, काळें अतिविष, पिंपळमूळ, टाकळी, सांवें, नागरमोथे, श्वेत अतिविष, शतावरी, गुडूचीसत्व, निशोत्तर व धमासा हीं सर्व समभाग. व या सर्वचूर्णाबरोबर साकर घालून तें एकत्र मिळवावें. याला वृहल्लवंगादि चूर्ण ह्मणतात. हें एक कर्ष सायंकाळीं व प्रातःकाळीं द्यावें, ह्मणजे देहाला बल, व वीर्य, आणि पुष्टि याला देतें. व मेह, खोकला, अरुचि, राजयक्ष्मा, पीनस, क्षय, रक्तदाह, संग्रहणी, सन्निपात, उचकी, अतिसार, ओंळणी, गलग्रह, पांडुरोग, स्वरभंग, आणि अश्मरी यांचा नाश करितें.

विजयायोग.

मधुनाविजयाभवरजोनिशिलीढंमधुनासुभर्जितं ॥
अतिसारमनिद्रतांहरेद्ग्रहणींवैदहनस्यमंदतां ॥

अर्थ—रात्रीं भांगेंत भाजलेलें चूर्ण मधाशीं द्यावें. ह्मणजे अतिसार, निद्रानाश, संग्रहणी, आणि अग्निमांद्य यांचा नाश करितें.

कुटजावलेह

क्षुण्णंकुटजमूलस्यचूर्णंतोयार्मणेपचेत् ॥ क्काथेपादावशेषेस्मिन्लेहेपूतेपुनःपचेत् ॥ सौवर्चलयवक्षारबिडसैंधवपैप्पलं ॥ पाठाचेंद्रयवाजाजीचूर्णंदत्वापलद्वयं ॥ लिह्याद्बदरमात्रंतुनच्छीतंमधुसंयुतं ॥ पक्कापक्कमतीसारंनानावर्णसवेदनं ॥ दुर्वारंग्रहणीरोगंजयेच्चैतत्प्रवाहिकं

अर्थ—कुड्याचा पाळांची साल, बारीक कुटून १०२४ तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करून गाळून घ्यावा; व त्यांत संचळ, यवक्षार, बिडलोण, सैंधव, पिंपळी, पाडळमूळ, इंद्रजव, व जिरें यांचें चूर्ण दोन पळें घालून थंड जाहाल्यावर तो कुटजावलेह बोराएवढा मधाशीं द्यावा. ह्मणजे पक्क, अपक्क, नानावर्ण, वेदनायुक्त असा अतिसार, व दुर्वारग्रहणीरोग, व प्रवाहिका, यांचा नाश करितो.

दुसरा कुटजावलेह.

क्काथोवत्सकजोनितांतविमलैःपादावशेषःस्थितोमुस्ताक्षीरविडंगबीजरुचकंसिंधूद्भवंधातकी ॥ कृष्णाचेतिविचूर्णितंसममिदंसंपाचयेत्पावकेयावत्सद्धनतांप्रयात्यतितरांशीतेमधुक्षेपणं ॥ कृत्वावत्सकलेहएपशमयेत्कृच्छ्रातिसारंरुचंदुर्नामग्रहणीभगंदरगदान्श्वासप्रमेहानपि ॥

अर्थ—कुड्याचा सालीचा चतुर्थांश काढा करून त्यांत नागरमोथा, दुध, वावडिंग, पादेलोण, सैंधव, धायटीचीं फुलें, व पिंपळी यांचें चूर्ण समभाग घालून अग्नीवर दाट होई. पर्यंत पचऊन थंड झाल्यावर त्यांत मध घालून अनुपानाशीं द्यावा. ह्मणजे हा कुटजावलेह अतिसार, मूळव्याध, संग्रहणी, भगंदर, श्वास, व मेह यांचा नाश करितो.

कुटजपुटपाक.

तत्कालंकृष्णकुटजत्वचंतंडुलवारिणा ॥ पिष्ट्वाचतुःपलमितांजंबूपल्लववेष्टितां ॥ सूत्रेणबद्धांगोधूमपिष्टेनपरिवेष्टितां ॥ लिप्त्वाचघनपंकेनगोमयैर्वह्निनादहेत् ॥ अंगारवर्णांचमृदंदृष्ट्वावन्हेःसमुद्धरेत् ॥ ततोरसंगृहीत्वाचशीतंक्षौद्रयुतंपिबेत् ॥ जयेत्सर्वानतीसारान्दुस्तरान्सुचिरोत्थितान् ॥

अर्थ—काळ्या कुड्याची ओली साल १६ तोळे घेऊन तांदूळांचें धुणांत वांटावी; नंतर गोळा करून बाहेरून जांबळीचा पानानीं वेष्टून सुतानें बांधून त्यावर कणकीचा लेप करावा. त्यावर दाट चिखल लिपावा. आणी तो गोळा गोवऱ्यांचे अग्नींत माती

लाल होईपर्यंत पचवावा; नंतर त्याचा रस काढून तो निवाल्यावर मध घालून द्यावा; म्हणजे तो फार दिवसांचा अतिसाराचा नाश करील.

तंदुलजल.

कंडितंतंडुलपलंजलेष्टगुणितेक्षिपेत् ॥
भावयित्वाजलंग्राह्यंदेयंसर्वत्रकर्मसु ॥

अर्थ—चांगले कांडलेले तांदूळ ३६ तोळे घेऊन आठ पट पाण्यांत धुवावे; आणि तें पाणी सर्वत्र योगांत योजावें.

मृतसंजीवनरस.

शुद्धसूतंसमंगंधंसूतपादंविपंक्षिपेत् ॥ सर्वतुल्यंमृतंचाभ्रंमर्द्यंधत्तूरजै द्रवैः ॥ सर्पाक्ष्याश्चद्रवैर्यामंकषायेणाथभावयेत् ॥ धानकदातिविषा मुस्ताशुंठीवालकजीरकं ॥ यवानीधातकीविल्वंपाठापथ्याकणान्वि ता ॥ कुटजस्यत्वचंबीजंकपित्थंदाडिमीवला ॥ प्रत्येकंकर्पमात्रंस्या त्कल्कितंक्वथितंजलैः ॥ कल्काच्चतुर्गुणंतोयंक्वाथंपादावशेषितं ॥ अने नत्रिदिनंभाव्यंपूर्वोक्तमार्दितंरसं ॥ रुध्वातद्वालुकायंत्रेक्षणंमृद्वग्निना पचेत् ॥ मृतसंजीवनोनामरसोगुंजाचतुष्टयं ॥ दातव्यमनुपानेनअसा ध्यमपिसाधयेत् ॥ नागरातिविषामुस्तादेवदारुवचाकणा ॥ यवानी धान्यकंवालकुटजस्यत्वचाभया ॥ धातुकींद्रयवापाठाविल्वमोचरसं समं ॥ चूर्णितंमधुनालेह्यमनुपानंसुखावहं ॥

अर्थ—शुद्धपारा, व गंधक समभाग, व चतुर्थांश वचनाग, आणि सर्वांचे समान अभ्रकभस्म हीं सर्व एकत्र करून त्यांचा धोत्र्याच्या रसांत खल करावा; नंतर मुंगुस वेलीचा रस किंवा काढा याची एक प्रहर भावना द्यावी; आणि धायटीचीं फुलें, अतिविष, नागरमोथा, सुंठ वाळा, जिरें, ओंवा, जव, बेलफळ, पाहाडमूळ, हरीतकी, पिंपळी, कुडयाचीसाल, इंद्रजव, कवठ, डाळींब व चिकणा हीं प्रत्येक कर्ष प्रमाण घेऊन त्यांचा कल्क, किंवा काढा करणे झाल्यास कल्काचे चौपट पाणी घालोन त्याचा चतुर्थांश काढा घेऊन त्याणें त्यापूर्वोक्त औषधाला तीनदिवस भावना द्यावी; नंतर पणतींत भरून मातकापड करून सुकवून वालुकायंत्रांत एक क्षण पचन करावा. याला मृतसंजीवन रस ह्मणतात. हा चार गुंजा अनुपानशीं द्यावा. ह्मणजे असाध्य रोगाचा ही नाश करितो. हा रस सुंठ; अतिविष, नागरमोथे, देवदार, वेखंड, पिंपळी ओंवा, धनें, वाळा, कुडयाची साल, हरीतकी, धायटीपुष्पें, इंद्रजव, पाहाडमूळ, बेलफळ, व मोचरस यांचें चूर्ण व मध यांशीं घ्यावा. हे अनुपान सुखावह आहे.

कारुण्यसागर.

रसभस्मद्विधागंधंतस्माद्विघ्नंमृताभ्रकं ॥ दिनंसक्रबुतैलेनपिष्ट्वाया मंविपाचयेत् ॥ रसंमार्कवमूलोत्थेनिर्यासेसंविमर्यच ॥ त्रिक्षारंपं चलवणंविपंव्योपाग्निजीरके ॥ सचित्रकैःसमानांशैर्युक्तःकारुण्यसाग रः ॥ मापद्वयंप्रयुंजीतरसःस्यादतिसारके ॥ सज्वरेविज्वरेवाथसशू लेशोणितोद्भवे ॥ निरामेशोथयुक्तेवाग्रहण्यांसानुपानकः ॥ अनुपा नंविनाह्येपकार्यसिद्धिकरिष्यति ॥

अर्थ—एक भाग पारदभस्म, दोन भाग गंधक व चार भाग अभ्रकभस्म हीं एकत्र करुन एरंडतैलाशीं एक दिवस खलून एक प्रहर पचन करावी; नंतर माक्याच्या मुळां चा रसांत त्याला खलावा; आणि जवखार, सज्जीखार, टांकणखार, लवण, सैंधव, बिडलोण, संचळ, बचनाग, सुंठ, मिरीं, पिंपळी, केशर, जिरें, व चित्रक यांचें समभाग चूर्ण मिळवावें; ह्मणजे याला कारुण्यसागर ह्मणतात. हा अतिसारावर दोन मासे· द्यावा. हा सज्वर किंवा विज्वर, व सशूल असा रक्तातिसार, किंवा शोथयुक्त अतिसार, संग्रहणी, यावर अनुपानाशीं द्यावा. अथवा हा अनुपानावांचून ही कार्यसिद्धिकरणारा आहे.

कुंकुमवटी.

कीटनिष्ठीवनेघृष्टंनागफेनंसकुंकुमं ॥ तंडुलप्रमितंदत्तंआतिसारानि पूदनं ॥ इदंमयागुरोर्लब्धंनंतुशास्त्राद्भिषग्वराः ॥ भवतामुपकाराय गुरोस्तत्वंप्रकाशितं ॥

अर्थ—मेण, अफु, व केशर हे पदार्थ एकत्र खलोन तांदुळभार चूर्ण द्यावें. तें अति· साराचा नाश करितें. हें गुरूपासून समजलें, शास्त्रांत मिळालें नाहीं; परंतु सर्वोपकारा करितां गुरुचें तत्व ह्मणून सांगीतलें.

कपित्थादि पेया.

कपित्थबिल्वचांगेरीतक्रदाडिमसाधिता ॥
ग्राहिणीपाचनीपेयावातेवापंचमूलिका ॥

अर्थ—कवठ, बेलफळ, चुका, ताक, व दाळिंब यांणीं केलेली पेया (पेज) ग्राहिणी, व पाचनी, अशी आहे; किंवा वाताधिक्यावर पंचमूळानीं केलेली पेया द्यावी.

पंचमूलबलादि पेया.

पंचमूलीबलाविश्वाधान्यकोत्पलबिल्वजा ॥
वातातिसारिणेदेयासूक्तेनाम्यतमेनच ॥

अर्थ–पंचमूळें, चिकणा, सुंठ, धने, कमळ, बेलफळ, याहीं केलेली पेया. वातातिसार नाशक आहे. किंवा ही सूकाशीं किंवा दुसऱ्या यागाशीं द्यावी.

मसुराद्यघृत.

मसूराणांपलशतंजलद्रोणेविपाचयेत् ॥ पादशेषंशृतंनीत्वादत्वाबिल्वपलाष्टकं ॥ घृतप्रस्थंपचेत्तेनसर्वातीसारनाशनं ॥ ग्रहणींभिन्नविट्कंचनाशयेच्चप्रवाहिकां ॥

अर्थ–चारशे तोळे मसुरा घेऊन दाहाशें चोवीस तोळे पाणी घालोन पचन करावें. आणि तोचतुर्थांश काढा गाळून घ्यावा. नंतर बेलफळाचे चूर्ण ३२ तोळे, आणि तूप ६४ तोळे घालोन करावें. तें तूप सर्व अतिसार, ग्रहणी, भिन्नविट्कता, व प्रवाहिका, यांचा नाश करितें.

लोकनाथरस.

रसभस्मभागमेकंचत्वारःशुद्धगंधकं ॥ पिष्ट्वावराटिकामूलंटंकणेननिरुध्यच ॥ भांडेरुध्वापुटेपाच्यंस्वांगशीतंविचूर्णयेत् ॥ लोकनाथोरसोनाम्नाक्षौद्रेगुंजाचतुष्टयं ॥ नागरातिविषामुस्तादेवदारुवचान्वितं ॥ कषायमनुपानंस्याद्वातातीसारनाशनं ॥ क्षीरिण्यावाकषायेणयोगवाहंनियोजयेत् ॥

अर्थ–पारदभस्म एक भाग, व शुद्ध गंधक चार भाग, हे एकत्र खलून त्या कज्जलीनें कवड्या भराव्या. आणि त्या कवड्यांचीं तोंडे टांकणखारानें बंद करावीं; आणि शरावांत घालोन मातकापड करून गजपुट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर काढून खल क॰ काचपात्रांत भरून ठेवावा. याचें नाव लोकनाथरस, हा चार गुंजा मधाशीं द्यावा. कि॰ सुंठ, अतिविष, नागरमोथा, देवदारु, वेखंड, यांच्या काढ्याशीं, अथवा क्षीरिणी॰ काढ्याशीं, किंवा योगवाहक अनुपाशीं द्यावें; ह्मणजे तो वातातिसाराचा नाश करि॰

महारस.

भस्मसूतस्यतीक्ष्णस्यमरिचाज्यंसमंसमं ॥ स्नुक्क्षीरकाकमाचीभ्यांमर्दयेद्याममात्रकं ॥ निरुध्यभूधरेपाच्यंदिनैकेनमहारसं ॥ निष्कार्धंमाव॰ च्चानुपाययेद्दधिसंयुतं ॥ सर्पाक्षिकर्षमात्रंतुपीत्वावातातिसारनुत् ॥

अर्थ–पारदभस्म, तिख्याचें भस्म, मिऱ्यें, व तूप, हे पदार्थ समभाग घेऊ॰ निवडुंग, कावळी यांच्या रसाशीं एक प्रहर खलावें. नंतर शरावांत घालोन अ॰ करून एक दिवस भूधरयंत्राने पचन करावें. ह्मणजे हामहारस सिद्ध होतो, मासा अनुपानाशीं द्यावा; आणि मागून दहीं व सर्पाक्षी मिळून दाहा मासे प्रा॰ ण्या करितां द्यावें. ह्मणजे तो वातातिसाराचा नाश करितो.

द्वितीय महारस.

शुद्धसूतंसमंगंधंमरिचंटंकणंकणा ॥ स्वर्णबीजंसमंमर्घंभृंगिद्रावैर्दि
नार्धकं ॥ सूततुल्योरसोयोज्योरसःकनकसुंदरः ॥ योज्योगुंजाद्वयंहं
तिवातातिसारमद्भुतं ॥ दध्यन्नंदापयेत्पथ्यमाज्यंवाथगवांदधि ॥

अर्थ–शुद्ध पारा, शुद्ध गंधक, मिऱ्यें, टांकणखार, पिंपळी व धोतऱ्याचें बीज, हे पदार्थ समभाग घेऊन माक्याच्या रसांत अर्धा दिवस खल करावा. याचें नांव कनकसुंदर. हा दोन गुंजा द्यावा; ह्मणजे अद्भुतवातातिसाराचा नाश करितो. याला पथ्य गाईचें किंवा शेळीचें दहीं, आणि भात द्यावा.

वातातिसारावर भाज्या.

फंजीशाल्मलिरक्ताक्षीकपित्थंदाडिमान्यथ ॥ श्लेष्माटोवदरीवाथक्षी
रिणीवाकुचीतिवा ॥ तर्कारीवावळीचैपांवालपत्राणिवापुनः ॥ पक्का
निव्यंजनार्थाययोजयेदतिसारिणां ॥

अर्थ–फांज, सावरी, गुग्गुळ, कंवठ, दाळिंब, भोंकरें, बोरें, क्षीरिणी, बावच्या, टाकळी व बाबुळ यांचे कोंवळे पानाची किंवा जून पानाची भाजी यथायोग्य करून द्यावी. ती वातातिसारावर हितकारक आहे.

पित्तातिसारनिदान.

पित्तात्पीतंनीलमालोहितंवातृष्णामूर्छादाहपाकोपपन्नं ॥

अर्थ–पित्तापासून पिंवळा, निळा, किंवा थोडासा तांबडा, मळ होतो, आणि ताहान, भोंवळ, सर्वांगाचा दाह व गुदाचे ठिकाणीं पुरळ हीं लक्षणें होतात

पित्तातिसारचिकित्साक्रम व पेया.

आमान्वितमतीसारंपैत्तिकंलंघनैर्जयेत् ॥ लंघितस्ययथासात्म्यंयवा
गूमंडतर्पणैः ॥ शृतंचंदनमुस्ताभ्यांपटोलादीप्यनागरैः ॥ पेयामम्ला
मतक्रांवापाचनींग्राहिणींपिबेत् ॥

अर्थ–जो आमयुक्त पित्तातिसार त्याला लंघनानें जिंकावा, व लंघन केल्यावर यथासात्म्य यवागू, मंड, तृप्तिकर पदार्थ, आणि चंदन, मोथे, कडुपडवळ, जिरें व सुंठ, यांचा काढा द्यावा; आणि आंबट, ताका वांचून, पाचनी व ग्राहक अशी पेज द्यावी.

पित्तातिसारावर पाणी व अन्न.

धान्योदीच्यशृतंतोयंतृष्णादाहातिसारवान् ॥
ताभ्यामेवसपाठाभ्यांसिद्धमाहारमाचरेत् ॥

अर्थ–धने व वाळा, यांचा काढा दाह, तृषा व अतिसार यांचे निवारणार्थ पाण्याच्या ऐवजीं द्यावा; आणि धने, वाळा व पाहडमूळ, यांचे काढ्यांत सिद्ध केलेलें अन्न द्यावें.

मधुकादियोग.

मधुकंकट्फलंलोध्रंदाडिमस्यफलत्वचौ ॥
पित्तातिसारेमध्वक्तंपाययेत्तंदुलांबुना ॥

अर्थ–ज्येष्ठीमध, कायफळ, लोध्र, डाळिंबाची साल व फळें, ह्यांचे चूर्ण किंवा कल्क तांदुळांच्या धुवणाशीं मध घालोन द्यावा; ह्मणजे तो योग पित्तातिसारनाशक होतो.

शुंठयादिकाढा.

शुंठीसुवर्चलाहिंगुरभयेंद्रयवामतः ॥
पित्तातिसारस्तत्काथोनिपीतोमधुनासह ॥

अर्थ–सुंठ, ब्राह्मी, हिंग, हरीतकी व इंद्रजव, यांच्या काढ्यांत मध घालून द्यावा. हा पित्तातिसारनाशक आहे.

बिल्वादिकाढा.

बिल्वशक्रयवांभोदवालकातिविषाकृत: ॥
कषायोहंत्यतीसारंसामंपित्तसमुद्भवं ॥

अर्थ–बेलफळ, इंद्रजव, नागरमोथा, वाळा व अतिविष यांचा काढा आमसहित पित्तातिसाराचा नाश करितो.

कट्फलादिकाढा.

कट्फलातिविषांभोदवत्सकनागरान्वितं ॥
शृतंपित्तातिसारघ्नंदातव्यंमधुसंयुतं ॥

अर्थ–कायफळ, अतिविष, नागरमोथे, कुड्याची साल, सुंठ यांचा काढा मध घालोन द्यावा, तो पित्तातिसाराचा नाश करील.

मधुयष्ट्यादिकाढा.

मधुयष्टिःसितालोध्रमुत्पलंसमभागतः ॥
मधुक्षीरयुतंपीतंरक्तपित्तातिसाराजित् ॥

अर्थ–ज्येष्ठमध, लोध्र, कमळकंद व साकर, हीं समभाग घेऊन, काढा करून त्यांत मध व दूध घालून द्यावा, ह्मणजे रक्तपित्तातिसाराचा नाश करील.

समंगादिचूर्ण.

समंगाधातकीपुष्पंबिल्वंसौवर्चलंबिडं ॥ सक्षौद्रंदाडिमंचैवपीतंतंदुल
वारिणा ॥ चूर्णंपित्तातिसारघ्नंशूलंचाशुनियच्छति ॥

अर्थ–चिकणा, धायटीची फुलें, बेलफळ, पादेलोण, बिडलोण, डाळिंबाची साल, यांचें चूर्ण तांदुळांचे धुवणाबरोबर मध घालून प्यावें; ह्मणजे पित्तातिसार व शूल यांचा नाश करितें.

अतिविषादियोग.

सक्षौद्रातिविषापिष्टावत्सकस्यफलंत्वचं ॥
तंदुलोदकसंयुक्तंपेयंपित्तातिसारनुत् ॥

अर्थ–अतिविष, कुडयाची साल व इंद्रजव यांचें चूर्ण तांदुळाच्या धुवणाशीं मध घालून द्यावें. तें पित्तातिसाराचा नाश करितें.

जंब्वादिचूर्ण.

जंबूचूतफलस्यास्थिद्राक्षापथ्याचपिप्पली ॥ खर्जूरंशाल्मलीछल्लीउदुं
बरसवल्कलं ॥ एतच्चूर्णसमंश्लक्ष्णंमधुनासहभक्षितं ॥ रक्तपित्तोद्भवंशी
घ्रंहंत्यतीसारमुल्बणं ॥

अर्थ–जांबूळ व आंबा यांची आंठी, द्राक्षें, हरीतकी, पिंपळी, खजूर, सांवरीची साल, भवरसाली व उंबर, लोध्र, यांचे समभाग चूर्ण मधाशीं द्यावें; ह्मणजे तें रक्त व पित्त यांपासून झालेल्या अतिसाराचा शीघ्र नाश करितें.

लोकेश्वररस.

रसस्यभस्मनाहेमपादांशंमारितंक्षिपेत् ॥ उभयोर्द्विगुणंगंधंमर्दयेच्चित्रकां
बुना ॥ पूर्णावराटिकातेनटंकणेननिरोधयेत् ॥ मृत्तिकाचूर्णलिप्तेतुभांडेक्षि
प्त्वानिरुध्यच ॥ शुष्कंगजपुटेपक्त्वाग्राह्यंसुशीतलं ॥ रसोलोकेश्वरोना
मचूर्णंगुंजाचतुष्टयं ॥ मधुनासहदातव्यंसर्वातीसारनाशनं ॥ बालंबिल्वं
गुडंतैलंपिप्पलीनागरंसमं ॥ लेहयेन्मधुनासार्धमनुपानंसुखावहं ॥

अर्थ–पाऱ्याचें भस्म एक तोळा, स्वर्णभस्म पाव तोळा व गंधक अडीच तोळे यांचा चित्रकाच्या रसांत खल करून तें कवडयांत भरावें; आणि त्यांचें तोंड टांकणखारानें बंद करावें. नंतर त्या कवडया बोळक्यांत भरून मातकापड करून सुकऊन गजपुट द्यावें. थंड झाल्यावर काढावें; आणि खलून चूर्ण करावें. याला लोकेश्वर रस ह्मणतात. हा चार गुंजा मधाशीं दिला असतां, सर्व अतिसारांचा नाश करितो. याला अनुपान कोंवळें बेलफळ, गुळ, तेल, पिंपळी व सुंठ यांचें चूर्ण मधाशीं द्यावें.

दुसरा प्रकार.

लोकनाथोरसोप्यत्रक्षौद्रैर्गुंजाचतुष्टयं ॥
दातव्यश्चापिवेञ्चानुपेपितंतंडुलोदकं ॥

अर्थ—पित्तातिसारावर मधाशीं लोकनाथरस चार गुंजा द्यावा; आणि मागून तांदुळांचे धुवण प्यावयास द्यावें.

वत्सकादि घृत.

पलंवत्सकसंसिद्धंचतुर्गुणजलेघृतं ॥
पित्तातिसारेभिषजादेयंदीपनपाचनं ॥

अर्थ—चार तोळे तूप कुडयाचे सालीच्या सोळा तोळे काढ्यांत सिद्ध करावें. तें पित्तातिसारावर दीपन व पाचन आहे.

कफातिसारनिदान.

शुक्लंसांद्रंसकफंश्लेष्मयुक्तंविस्रंशीतंल्हष्टरोमामनुष्यः ॥

अर्थ—कफातिसारांमध्यें पांढरा, घट्ट, कफमिश्रित, आमगंधि आणि थंड, असा मळ पडतो; व त्या मनुष्याचे आंगावर रोमांच उभे राहातात.

कफातिसारचिकित्साक्रम.

श्लेष्मातिसारेप्रथमंहितंलंघनपाचनं ॥
योज्यश्चामातिसारघ्नोयथोक्तोदीपनोगणः ॥

अर्थ—कफातिसारावर प्रथम लंघन व पाचन हितकारक होतें; व आमातिसारनाशक जो दीपनगण सांगितला तो योजावा.

नतुसंग्रहणंदद्यात्पूर्वमामातिसारिणां ॥
दोषोह्यादौवर्धमानोजनयेत्यामयान्वहून् ॥

अर्थ—आमातिसारावर पूर्वी बंदाचें औषध देऊं नये, कारण प्रथमतः बंदाचें औषधानें आम बंद झाला; ह्मणजे दोष वाढून बहुत रोग उत्पन्न करतो.

डिंभजःस्थाविरोवापिवातपित्तात्मकश्चयः ॥ क्षीणधातुवलार्तस्यवहु
दोषोतिविश्रुतः ॥ आमोपिस्तंभनीयःस्यात्पाचनान्मरणंभवेत् ॥

अर्थ—लहान मुलास, वृद्धास, किंवा धातुक्षीणास झालेला आम फार वाढला असतां, तो पित्तयुक्त आहे; तर स्तंभनकरण्यास योग्य आहे. त्याचें पाचन केलें असतां, तो मरणप्रद होतो.

पथ्यादिकाढा.

पथ्याग्निकटुकापाठावचामुस्तकवत्सकैः ॥
सनागरैर्जयेत्क्काथःकल्कोवाश्लैष्मिकांसुतिं ॥

अर्थ–हिरडे, चित्रक, कुटकी, पाहाडमूळ, वेखंड, नागरमोथे, इंद्रजव व सुंठ इत्यांचा काढा किंवा कल्क, कफातिसाराचा नाशक आहे.

क्रमिशत्र्वादिकाढा.

क्रमिशत्रुवचाविल्वपेशीधान्याककट्फलं ॥
एषांक्वाथंभिषग्दद्यादतीसारेबलासजे ॥

अर्थ–वावडिंग, वेखंड, बेलफळाचा गीर, धने व कायफळ यांचा काढा वैद्याने कफापासून झालेल्या अतिसारावर द्यावा.

पूतिकादिकल्क.

पूतिकव्योषविल्वाग्निपाठादाडिमहिंगुभिः ॥
योजयेत्सत्कृतैःपेष्यैःश्लेष्मातीसारपीडितम् ॥

अर्थ–करंज, सुंठ, मिरीं, पिंपळी, बेलफळ, चित्रक, पाहाडमूळ, डाळिंब व हिंग हे पदार्थ वांटून त्यांचा कल्क द्यावा. त्याणें श्लेष्मातिसार नाश पावतो.

गोकंटकादिकाढा.

गोकंटकंगुहोव्याघ्रीकषायंसुश्रितंपिबेत् ॥
आमश्लेष्मातिसारघ्नंदीपनंपाचनंपरं ॥

अर्थ–गोखरु, कांग व रिंगणी यांचा काढा प्राशनार्थ द्यावा; ह्मणजे तो श्लेष्मातिसारनाश करितो. व तो दीपन व पाचन असा आहे.

चव्यादिकाढा.

चव्यंसातिविषाकुष्ठंबालविल्वंसनागरं ॥
वत्सकत्वक्फलंपथ्याछर्दिश्लेष्मातिसारनुत् ॥

अर्थ–चवक, अतिविष, कोष्ठ, वाळवेल, सुंठ, कुड्याची साल, इंद्रजव व हरीतकी. यांचा काढा वांति व कफज अतिसार यांचा नाशक आहे.

कणादिचूर्ण.

पाठावचात्रिकटुकंकुष्ठंकटुकरोहिणी ॥
उष्णांबुनाविनिघ्नंतिश्लेष्मातीसारमुल्बणं ॥

अर्थ–पाहाडमूळ, वेखंड, सुंठ, मिरें, पिंपळी, कोष्ठ व कटुकी यांचें चूर्ण ऊनपाण्याबरोबर प्यालें असतां, तें श्लेष्मातिसारनाशक आहे.

हिंग्वादिचूर्ण.

हिंगुसौवर्चलव्योषमभयातिविषावचा ॥
पीतमुष्णांबुनाचूर्णमेतत्श्लेष्मातिसारनुत् ॥

अर्थ हिंग, पादेलोण, सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, अतिविष व वेखंड यांचें चूर्ण ऊनपाण्यावरोवर प्यालें असतां, तें श्लेष्मातिसार दूर करणारें आहे.

वब्बूलादियोग.

वब्बूलपत्रंसंपिष्टंरात्रौजीरद्वयंहितं ॥
कर्षमात्रंभवेद्भक्ष्यंकफातीसारनाशनं ॥

अर्थ–बाभळीचीं पानें, जिरें व शाहाजिरें, हीं वांटून एक तोळा भक्षणार्थ रात्रीं द्यावीं, ह्मणजे कफातिसाराचा नाश होतो.

पथ्यादिचूर्ण.

पथ्यापाठावचाकुष्ठंचित्रकःकटुरोहिणी ॥
चूर्णमुष्णांभसापीतंश्लेष्मातीसारनाशनं ॥

अर्थ–हरीतकी, पाहाडमूळ, वेखंड, कोष्ट, चित्रक व कुटकी यांचें चूर्ण ऊनपाण्याशीं द्यावें. तें श्लेष्मातिसारनाशक आहे.

अभयादिचूर्ण.

अभयातिविषाहिंगुसौवर्चलकटुत्रयं ॥
एतच्चूर्णंसुतप्तांभःपीतंश्लेष्मातिसारजित् ॥

अर्थ–हरीतकी, अतिविष, हिंग, सौवर्चल, सुंठ, मिरीं व पिंपळी यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं द्यावें. तें श्लेष्मातिसारनाशक आहे.

पथ्यादिचूर्ण.

पथ्यासौवर्चलंहिंगुसैंधवातिविषावचा ॥
आमातिसारंसकफंपीतमुष्णांबुनाजयेत् ॥

अर्थ–बाळहिरडे, सौवर्चल, हिंग, सैंधव, अतिविष व वेखंड यांचें चूर्ण उष्णोदकाशीं प्यालें असतां, आमातिसार व कफ यांचा नाश करितें.

शुंठीपुटपाक.

महौषधंसुक्ष्मचूर्णंकृत्वातोयेनपेषयेत् ॥ ततस्तुगोलकंकृत्वालेपयेत्त दनंतरं ॥ वातारिशूलकल्केनश्रीपत्रैर्वेष्टयेत्तथा ॥ सूत्रबद्धंमृदालि

स्तंमृदुवन्हौविपाचयेत् ॥ सुस्निग्धंगोलकंततुस्फोटयित्वासमुद्धरेत् ॥ शीतीभूतंमधुयुतंखादेन्मापद्वयोन्मितं ॥ अथतक्रेणगव्येनसहदेयंप लेनच ॥ योगोयंकफवातोत्थदुष्टातीसारनाशनः ॥ शोफकासहरः कांतिकृष्णवर्त्मविवर्धनः ॥

अर्थ—सुंठीचें बारीक चूर्ण करून पाण्याशीं मळावें, त्याचा गोळा करून त्यावर एरंडाच्या कल्काचा थलक द्यावा; नंतर वेलाच्या पानानीं वेष्टून सुतानें बांधून वर मातीचा थलक देऊन मंदाग्नीनें भाजावा; नंतर फोडून थंड झाल्यावर दोन मासे चूर्ण, गाईच्या चारतोळे ताकाशीं द्यावें. हा योग कफ व वायु यांपासून झालेले दुष्ट अतिसार, सूज व खोकला यांचा नाश करितो; आणि कांति व अग्नि यानां वाढवितो.

त्रिदोषातिसारनिदान.

वराहस्नेहमांसांबुसदृशंसर्वरूपिणं ॥
कृच्छ्रसाध्यमतीसारंविद्याद्दोपत्रयोद्भवं ॥

अर्थ—डुकराच्या वसेसारिखा, मांस धुतलेल्या पाण्यासारिखा व वातादि सर्व अतिसारांच्या लक्षणानीं युक्त जो अतिसार तो त्रिदोष जाणावा. तो कष्टसाध्य आहे.

कुटजावलेह.

कुटजस्यत्वचःक्राथोवस्त्रपूतोघनीकृतः ॥ सलीढोतिविपायुक्तःस्या त्त्रिदोपातिसारनुत् ॥ इच्छंत्यत्राष्टमांशेनक्राथादतिविपारजः ॥ प्र क्षिपेद्वाचतुर्थांशमितिकेचिद्वदंतिहि ॥

अर्थ कुडयाच्या सालीचा काढा करून गाळून घ्यावा; आणि त्यांत अतिविषाचें चूर्ण घालून पुनः पचवून दाट करावा; आणि त्याचें चाटण द्यावें; ह्मणजे त्रिदोषज अतिसार नाश पावतो. यांत कोणी अतिविष अष्टमांश घालावें असें ह्मणतात; व कोणी चातुर्थांश घालावें ह्मणून सांगतात.

समंगादिकाढा.

समंगातिविपामुस्ताविश्वन्हीवेरधातुकी ॥
कुटजत्वक्फलंबिल्वंक्राथःसर्वातिसारनुत् ॥

अर्थ—चिकणा, अतिविष, नागरमोथे, सुंठ, वाळा, धायटीचीं फुलें, कुडयाची साल, इंद्रजव व वेलफळ यांचा काढा. सर्व अतिसारांचा नाशक आहे.

पंचमूलीवलादिकाढा.

पंचमूलीवलाविल्वगुडूचीमुस्तनागरैः ॥ पाठाभूनिंबबर्हिष्ठकुटजत्व

कूफलैःशृतं ॥ सर्वजंहंत्यतीसारंज्वरंचापितथावमिं ॥ सशूलोपद्रवं श्वासंकासंवापिसुदुस्तरं ॥

अर्थ—पंचमूळें, चिकणा, बेलफळ, गुळवेल, नागरमोथे, सुंठ, पाहाडमूळ, किराइत, वाळा, कुडयाची साल, इंद्रजव, यांचा काढा त्रिदोषातिसार, ज्वर, वांति, शूल, श्वास, व खोकला यांचा नाश करितो.

पंचमूलयोजना.

पंचमूल्यत्रसामान्यापित्तेयोज्याकनीयसी ॥
वातेपुनर्वलासेचसायोज्यामहतीमता ॥

अर्थ—पित्तावर लघुपंचमूळ योजावें, आणि वायु व कफ यांवर बृहत्पंचमूळ योजावें.

कुटजपुटपाक.

अवेदनंसुसंपक्कंदीप्ताग्नेःसुचिरोत्थितं ॥ नानावर्णमतीसारंपुटपाकैरुपाचरेत् ॥ स्निग्धंघनंकुटजवल्कलजंत्वजग्धमादायतत्क्षणमतीवचपेपयित्वा ॥ जंवूपलाशदलतंदुलतोयसिक्तंवद्धंकुशेनचबहिर्घनपंकलिप्तं ॥सुस्विन्नपिष्टमपिपिंडिरसंगृहित्वाक्षौद्रेणयुक्तमतिसारवतेप्रदद्यात् ॥ कृष्णात्रिपुत्रमतपूजितएपयोगःसर्वातिसारहरणेस्वयमेवराजा ॥

अर्थ—शूलावांचून, पक्क,दीप्ताग्नीचा, अनेकवर्णांनीं युक्त, अशा अतिसारावर पुटपाक योजावा. कुडयाची ओली साल आणून तत्काळ वांटून व तांदळांचें धुवण घालून गोळा करावा; आणि जांबळीच्या पानांनीं वेष्टण करून सुतानें बांधावें; आणि त्यावर दाट चिखलाचा लेप करावा. नंतर मंदाग्नीनें भाजून काढावा. त्याचा रस मध घालोन अतिसारी रोग्याला द्यावा. हा योग सर्वातिसाराचा नाश करितो. असें कृष्णनामक अत्रिपुत्रानें सांगितलें आहे.

सूतादिवटी.

मृतंसूतंमृतंस्वर्णंमृतंताम्रंसमंसमं ॥ तुल्यंचखादिरंसारंतथामोचरसं क्षिपेत् ॥ द्रवैःशाल्मलिमूलोत्थैर्मर्दयेत्प्रहरद्वयं ॥ चणमात्रांवटींकृत्वा खादेज्जीरकसंयुतां ॥ त्रिदोषाढ्यमतीसारंसज्वरंनाशयेद्ध्रुवं ॥

अर्थ—पारदभस्म, सुवर्णभस्म, ताम्रभस्म हीं तीन समभाग आणि या तिहींचे बरोबर खदिरसार, आणि मोचरस, घेऊन सांवरीचे मुळांचा रस काढून त्या रसांत दोन प्रहर खलून चण्याइतक्या गोळ्या करून त्यांतून जिऱ्याबरोबर एक एक खावी, ह्मणजे ती त्रिदोषापासून झालेल्या अतिसाराची निश्चयें करून शांति करील.

चतुःसमागुटी.

अभयानागरंमुस्तंगुडेनसहयोजितं ॥ चतुःसमेयंगुटिकात्रिदोषघ्नीप्र
कीर्त्तिता ॥ आमातिसारमानाहसविबंधंविपूचिकां ॥ कृमीनरोच
कंहन्याद्दीपयत्याशुचानलं ॥

अर्थ—हिरडे, सुंठ, नागरमोथे व गुळ यांचे समभाग औषधांची गोळी करून खावी; ह्मणजे ती त्रिदोष, आमातिसार, आनाह, विबंध व विपूचिका यांची नाशक आहे.

तृप्तिसागररस.

रसभस्मचभागैकंरसाद्द्विगुणगंधकं ॥ गंधकाद्द्विगुणंचाभ्रंनिश्चंद्रंमर्द
येत्ततः ॥ दिनैकंकटुतैलेनरुध्वाचुल्यांविपाचयेत् ॥ यामैकंवालुका
यंत्रेसमुध्धृत्यविमर्दयेत् ॥ हयमारकमूलोत्थरसैर्यामंनिरुध्यच ॥ पूर्व
वत्पाचयेच्चुल्यांसमादायविमिश्रयेत् ॥ त्रिक्षारंपंचलवणंनिष्कांशिद्दय
जीरकैः ॥ विडंगेनचतत्तुल्यंयुक्तोयंतृप्तिसागरः ॥ भक्षयेन्माषमात्रं
चसान्निपातातिसारजित् ॥ सज्वरांग्रहणींहंतिह्यनुपानंविनारसः ॥

अर्थ—पारदभस्म एक भाग, गंधक दोन भाग, अभ्रक चार भाग हे पदार्थ एकत्र करून व त्यांचा मोहऱ्यांचे तेलांत एक दिवस खल करावा; नंतर कुपींत भरून मुख बंद करून एक प्रहर वालुकायंत्रांत पचन करावा; नंतर कणेरीच्या मुळाच्या रसामध्यें जव-खार, सज्जीखार, टंकणखार, मीठ, टांकणखार, सैंधव, बिडलोण व संचळ, हे व चि-त्रक, जिरें, शाहाजिरें, वावडिंग, यांचें चूर्ण तीन तीन मासे त्यांत मिळवावें; याला तृप्ति सागर ह्मणतात. हा एक मासा द्यावा; ह्मणजे सान्निपात, अतिसार, ज्वर, आणि संग्रहणी यांचा अनुपानावांचून नाश करितो.

आनंदभैरवी.

मूलंकटुकरोहिण्याविल्वमज्जागुडूचिका ॥ दध्नापिष्ट्वापिबे
च्चानुवटीचानंदभैरवी ॥ सन्निपातातिसारघ्नीपथ्यमूलाचपूर्ववत् ॥

अर्थ—कुटकी, बेलफळाचा मगज व गुळवेल, यांचें चूर्ण दह्याशीं द्यावें; ह्मणजे सन्नि-पातातिसार नाश होतो. याला आनंदभैरवी ह्मणतात. ह्यावर पथ्यादि पूर्ववत् द्यावें.

शोकभयातिसारनिदान.

तैस्तैर्भावैःशोचतोल्पाशनस्यबाष्पोष्मावैवन्हिमाविश्यजंतोः ॥ कोष्ठं
गत्वाक्षोभयेत्तस्यरक्तंतच्चाधस्तात्काकणंतीप्रकाशं ॥ निर्गच्छेद्वैविड्विमि

श्रंह्यविड्वानिगैंधवागंधवद्वातिसारः ॥ शोकोत्पन्नोदुश्चिकित्स्योति मात्ररोगोवैद्यैःकष्टएपप्रदिष्टः॥

अर्थ–ज्याचें धन व बंधु इत्यादिकांचा नाश होऊन अतिभीति झाली; आणि त्यामुळेंच त्याचें अन्न तुटलें, त्याचे नेत्रांतील उदकादि व देहावरील कांत्यादि तेज हीं अंतःप्रवण होऊन कोठयांत शिरून जठराग्नीला व्याकूळ करून रक्ताला क्षोभवितात. मग तें रक्त अपानद्वारा स्रवूं लागतें. त्याचा रंग गुंजे सारिखा असतो. तें रक्त कधीं कधीं मलमिश्रित किंवा एकाकीं गंधरहित किंवा सगंध असें असतें. त्याला शोकातिसार ह्मणतात. हा कष्ट साध्य आहे. यावर वैद्यानीं बहुशः चिकित्सा करूं नये. कांतर शोक नष्ट जहाल्या वांचून हा अतिसार बरा होणें कठीण.

चिकित्सा.

भयशोकसमुद्भूतौज्ञेयौवातातिसारवत् ॥
तयोर्वातहरीकार्याहर्षणाश्वासनैःक्रिया ॥

अर्थ–भय व शोक यांपासून झालेले अतिसार वातातिसारासारिखे समजावे. व त्यांला हर्षकारक पदार्थ अथवा उमेद देणें, यांणीं अशी वातनाशकक्रिया करावी.

पृश्निपर्ण्यादिकाढा.

पृश्निपर्णीबलाबिल्वधान्यकोत्पलनागरैः ॥ विडंगातिविषामु स्तादारुपाठाकलिंगकैः ॥ मरिचेनसमायुक्तंशोकातीसारनाशनं ॥

अर्थ–सालवण, चिकणा, बेलफळ, धने, कोष्ठ, सुंठ, वावडिंग, अतिविष, नागरमोथे, दारुहळद, पहाडमूळ व कुडयाची साल, यांचा काढा, मिरीं घालोन घ्यावा. तो शोकाति साराचा नाश करितो.

आमातिसारनिदान.

अन्नाजीर्णात्प्रद्रुताःक्षोभयंतःकोष्ठंदोषाधातुसंघान्मलाश्च ॥
नानावर्णनैकशःसारयंतीशूलोपेतंपष्ठमेनंवदंति ॥

अर्थ–अन्नाच्या अजीर्णानें वातादिक दोष स्वस्थानापासून उठून सर्व उदराला दूषित करित होत्सातें सगळ्या पोटांत फिरूं लागतात; नंतर रसादि सप्त धातु, आणि पुरीषादि मळ यातें अनेकवर्णानीं व अनेकप्रकारानीं अपानद्वारा शूलयुक्त थोडथोडा मल बाहेर काढितात. त्याला आमातिसार ह्मणतात. तो साहावा जाणावा.

आमातिसारीं चिकित्साक्रम.

आमपक्वक्रमंहित्वानातिसारेक्रियाहिता ॥
अतोतिसारेसर्वस्मिन्नामंपक्वंचलक्षयेत् ॥

अर्थ—आमपचन झाल्यावांचून अतिसारावर औषध हितकारक होत नाहीं. याकरितां सर्वातिसारांमध्यें आम पचन झाला किंवा नाहीं तें पाहावें.

आमेपिलंघनंशस्तमादौपाचनमेवच ॥
कार्यंवानशनस्यांतेसद्रवंलघुभोजनं ॥

अर्थ—आमातिसारांत लंघन व पाचन करावें; किंवा लंघनांतीं द्रवरूप लघु भोजन करावें

लंघनमेकमुस्कानान्यदस्तीहभेषजंबलिनां ॥
समुदीर्णदोषनिचयंशमयतितत्पाचयत्येव ॥

अर्थ—बलवान आमातिसाऱ्याला लंघनावांचून दुसरें औषध नाहीं. लंघन हें वाढले ल्या दोषानां शमवितें, व पाचन करितें.

ननुसंग्रहणंदद्यात्पूर्वमामातिसारिणां ॥ दोषोह्यादौवर्धमानोजनयत्या मयान्बहून् ॥ शोफपांड्वामयप्लीहकुष्ठगुल्मोदरज्वरान् ॥ दंडकालस काध्मानग्रहण्यर्शोगदांस्तथा ॥ डिंभस्थःस्थविरस्थश्चवातपित्तात्मक श्चयः ॥ क्षीणधातुबलस्यापिबहुदोषोतिविश्रुतः ॥ आमोनस्तंभनीयः स्यात्पाचनान्मरणंभवेत् ॥ अतिसारेज्वरेचैवयस्तुपित्तेदृगामये ॥ आ दौनप्रतिकुर्याद्वाव्याधिवेगोहिदुस्तरः ॥

अर्थ—आमातिसारीरोग्याला पूर्वीं मलबंधक औषध देऊं नये. वर्धमान आमरूप दोष. सूज, पांडु, प्लीहा, कुष्ठ, गुल्म, उदर, ज्वर, दंडक, अलसक, आध्मान, संग्रहणी, मुळव्याध इत्यादि अनेक रोगानां उत्पन्न करितो; आणि बालक व म्हातारा यांच्या व वात पित्तात्मक, आणि धातुक्षीण, बलक्षीण, यांच्या अनेक दोषयुक्त आमाचें स्तंभन करूं नये. स्तंभन केलें असतां, मरण येतें; आणि अतिसार, ज्वर, पित्त, नेत्ररोग व कफ. यांवर प्रथमच उपचार करूं नये. कां तर व्याधींचा वेग दुःसह आहे ह्मणून.

धान्यकादिकाढा पाचन व दीपन.

धान्यनागरजःक्काथःपाचनोदीपनस्तथा ॥
एरंडमूलयुक्तश्चजयेदामानिलव्यथां ॥

अर्थ—धने व सुंठ, या दोन औषधांचा काढा प्याला असतां. दीपन व पाचन करितो व त्याकाढ्यांत एरंडमूळ घालोन घेतला तर आमवायूंचा नाश करितो.

अभयाविरेचन.

स्तोकंस्तोकंविबद्धंवासशूलंयोतिसार्यते ॥
अभयापिप्पलीकल्कैःसुखोष्णैस्तंविरेचयेत् ।

अर्थ–थोडा किंवा बहूत शूलयुक्त असा अतिसार होतो, त्याला हरीतकी व पिंपळी, यांच्या कल्काचें रेचन द्यावें.

विडंगादिरेचन.

दीप्ताग्निर्बहुदोषोयोविवद्धमतिसार्यते ॥
विडंगत्रिफलाकृष्णाकषायैस्तंविरेचयेत् ॥

अर्थ–दीप्ताग्निपुरुषाला बहुत दोषयुक्त व गांठळ असा अतिसार होतो, त्याला वावडिंग. त्रिफला व पिंपळी यांच्या काढ्याने रेच करवावे.

क्षुधिताचा अतिसार.

क्षुत्क्षामस्यविरेकेनुपेयांयुंज्याद्विचक्षणः ॥
भेषजैर्मारुतघ्नैश्चदीपनीयैश्चकल्पितां ॥

अर्थ–क्षुधेनें पीडित होऊन अतिसार आहे, तर त्याला वातनाशक, दीपन, अशा औषधानीं केलेली पेज पाजावी.

देवदारुजलपान.

योतिवद्धंप्रभूतंचपुरीषमतिसार्यते ॥ तस्यादौवमनंयोज्यंपश्चाल्लंघन मेवच ॥ देवदारुवचाकुष्ठंनागरातिविषाभया ॥ सर्वाजीर्णप्रशमनं पेयमेतैःशृतंपयः ॥

अर्थ–ज्याला अतिगांठळ आणि बहूत मळ होतो, त्याला प्रथम वमन, मग लंघन, नंतर देवदारु, वेखंड, कोष्ठ, सुंठ, अतिविष व हरीतकी यांमध्यें दूध तापवून द्यावें. तें अजीर्णनाश करितें.

चित्रकादिकाढा.

चित्रकंपिप्पलीमूलंवचाकटुकरोहिणी ॥ पाठावत्सकबीजानिहरीत क्योमहौषधं ॥ एतदामसमुत्थानमतिसारंसवेदनं ॥ कफात्मकंसपित्तं चसवातंहंतिवैध्रुवं ॥

अर्थ–चित्रकमूळ, पिंपळीचें मूळ, वेखंड, कुटकी, पाहाडमूळ, इंद्रजव, हरीतकी व सुंठ यांचा काढा आमातिसार, कफातिसार, पित्तातिसार, आणि वातातिसार यांचा नाश करितो.

विश्वादियोग.

विश्वाभयाघनवचानिविषासुराव्हाक्काथोथविश्वजलदातिविषाशृतोवा ॥
आमातिसारशमनःकथितःकषायोशुंठिघनाप्रतिविषामृतवल्लिजोवा ॥

अर्थ–सुंठ, हरीतकी, नागरमोथे, वेखंड, अतिविष व देवदार यांचा; किंवा सुंठ, नागरमोथे व अतिविष यांचा; किंवा सुंठ, नागरमोथे, अतिविष व गुळवेल यांचा काढा आमातिसारनाशक आहे.

पथ्यादिकाढा.

पथ्यादारुवचामुस्तैर्नागरातिविषान्वितैः ॥
आमातिसारनाशायक्काथमेभिःपिबेन्नरः ॥

अर्थ–हरीतकी, दारुहळद, वेखंड, नागरमोथा व अतिविष यांचा काढा द्यावा; ह्मणजे आमातिसारनाश करितो.

एरंडादिरस.

एरंडरंससंपिष्टंपक्कमामंचनागरं ॥
आमातिसारशूलघ्नंदीपनंपाचनंपरं ॥

अर्थ–एरंडाचे रसांत सुंठ भाजलेली व नुसती एकत्र वाटावी; आणि द्यावी, ह्मणजे आमातिसार, शूल याचां नाश करित्ये. व दीपन, आणि पाचनही आहे.

शुंठ्यादिचूर्ण.

शुंठीप्रतिविषाहिंगुमुस्ताकुटजचित्रकैः ॥
चूर्णमुष्णांबुनापीतमामातीसारनाशनं ॥

अर्थ–सुंठ, अतिविष. हिंग भाजून, नागरमोथे, इंद्रजव व चित्रक, या ६ औषधांचें चूर्ण करून चूर्णाचें चौपट ऊनपाण्यांत घेतले असतां, आमातिसार दूर होतो.

दुसरें हरीतक्यादिचूर्ण.

हरीतकीप्रतिविषासिंधुसौवर्चलंवचा ॥ हिंगुचेतिकृतंचूर्णंपिबेदुष्णेनवारिणा ॥ आमातिसारशमनंग्राहिचातिप्रबोधनं ॥

अर्थ–बाळहिरडे, अतिविष, सैंधव, पादेलोण, वेखंड व भाजला हिंग या साहा औषधांचें चूर्ण करून ऊन पाण्यांत घेतलें असतां, आमातिसार दूर होतो. व मळाचा अवष्टंभ होऊन अग्नि प्रदीप्त होतो.

शुंठीपुटपाक.

चूर्णंकिंचित्घृताभ्यक्तंशुंठ्याएरंडजैर्दलैः ॥ वेष्टितंपुटपाकेनविपचेन्मंदवन्हिना ॥ ततउध्धृत्यतच्चूर्णंग्राह्यंप्रातःसितासमम् ॥ तेनयांतिशमंपीडाह्यागतीसारसंभवाः ॥ कुक्षिशूलामशूलघ्नंविबंधाध्मानसाराजित् ॥

अर्थ—सुंठीचें चूर्ण, तुपाचें मोहन लाऊन एरंडाचे पानांत गुंडाळून शेण व माती लाऊन फोपाटयांत भाजावें; आणि साखरेबरोबर प्रातःकाळीं खावें; ह्मणजे आमातिसार दूर होतो. व तत्संबंधी सर्व पीडा नाश पावतात; आणि कुक्षिशूल, आमशूल, मलबद्धता, पोटाची फुगवटी व अतिसार यांचा नाश करितें.

दुसरें शुंठ्यादिचूर्ण.

शुंठीजीरसैंधवहिंगुजातिबीजंतद्वत्साहकारंप्रशस्तं ॥ ज्ञेयंसद्भिःसाव रूढंसबिल्वंमार्कंडयावाशोधितंसूक्ष्मचूर्णं ॥ दध्नाचवटिकांकुर्याच्चितैव सहलेहयेत् ॥ आमातिसारंमांद्यंचअरुचिंहंतितत्क्षणात् ॥

अर्थ—सुंठ, जिरें, सैंधव, हिंग, जायफळ, आंब्याची आंठी, बेलफळ, वडाचे पारंबे व भुईतरवड, यांचें बारीक वस्त्रगाळ चूर्ण घेऊन त्याची दह्यांत गोळी करावी. व दह्यांशींच भक्षण करावी; ह्मणजे तत्क्षणीं आमातिसार, अग्निमांद्य आणि अरुचि यांचा नाश करितें

तिसरें शुंठ्यादिचूर्ण.

सत्वाशुंठयोपर्णंभृंगीसमांशंसूक्ष्मचूर्णकं ॥ यथासात्म्यंसेवनीयंशीत तोयानुपानतः ॥ सशूलमामदोषंचनाशमायातिसत्वरं ॥ दध्योदनं पथ्यमात्रमुचितंरोगशांतये ॥

अर्थ—सत्वासुंठ, मिरीं, भांग, याचे समभाग औषधींचें चूर्ण सोसेल तितकें थंडपाण्याशीं घ्यावें; ह्मणजे शूल, आमातिसार हे लौकर नाश पावतात, यावर दहीं भात पथ्य द्यावें.

साखरुंडचूर्ण.

जयाखंडसाखरुंडजीरकंदधिमिश्रितं ॥
आमातिसाररक्तंचहंतिवेगेनकौतुकं ॥

अर्थ—भांग, साकर, साखरुंड, जिरे व दहीं हे पदार्थ एकत्र करून घ्यावें; ह्मणजे ते आमातिसार व रक्तातिसार यांनां फारजलद नाश करितात. हें कौतुक आहे.

यवान्यादिकाढा.

यवानीनागरोशीरधनिकातिविषाघनैः ॥
बालबिल्वाद्रिपर्णीभिर्दीपनंपाचनंभवेत् ॥

अर्थ—ओंवा, सुंठ, वाळा, धनें, अतिविष, नागरमोथे, बाळबेल, डाय व डीला यांचा काढा दीपन व पाचन आहे.

कलिंगादिकाढा.

कलिंगातिविषाहिंगुपथ्यासौवर्चलंवचा ॥
शूलस्तंबविबंधघ्नंपेयंदीपनपाचनं ॥

अर्थ—कुडयाची साल, अतिविष, हिंग, हिरडे, संचळ व वेखंड यांचा काढा शूल व विट्बंध यांचा नाशक व दीपन आणि पाचन आहे.

त्रिकंटादियवकांजी.

त्रिकंटकैरंडबिल्वैःसाधितंयावकांजिकं ॥
आमातिसारशूलानिजयेत्क्षौद्रान्विताशिवा ॥

अर्थ—गोखरू, एरंडमूळ, बेलफळ, हे पदार्थ घालून यवांची कांजी करावी. ती आमातिसार, शूल, यांचा नाश करितये; किंवा मध आणि हरीतकी द्यावी.

शोषावर र्हीबेरादिकाढा.

र्हीबेरशृंगवेराभ्यांमुस्तापर्पटकेनच ॥
मुस्तोदीच्यशृतंतोयंदेयंवापिपिपासिते ॥

अर्थ—वाळा, आलें, नागरमोथा, भद्रमोथा व काळा वाळा यांचा काढा ताहानेवर द्यावा.

त्र्यूषणादि चूर्ण.

त्र्यूषणातिविषाहिंगुवचासौवर्चलाभया ॥
पीतोष्णेनांभसादद्यादामातीसारमुत्तमं ॥

अर्थ—सुंठ, मिरीं, पिंपळी, अतिविष, हिंग, वेखंड, संचळ व हरीतकी यांचें चूर्ण ऊनपाण्याबरोबर द्यावें; ह्मणजे मोठया ही आमातिसाराचा नाश करील.

पाठादि चूर्ण.

पाठाहिंग्वाजमोदोग्रापंचकोलाब्दजंरजः ॥
उष्णांबुपीतंसरुजंजयत्यामंससैंधवं ॥

अर्थ—पाहाडमूळ, हिंग, अजमोदा, वेखंड, पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, सुंठ व नागरमोथा यांचे चूर्ण ऊनपाण्याशीं सैंधवयुक्त प्राशन केलें असतां, पीडेसुद्धां आमाचा नाश करितें.

पयमुस्तायोग.

पयसिक्काथ्यमुस्तानांविंशतिस्त्रिगुणांभसि ॥
क्षीरावशेषंतत्पीतंहंत्यामंशूलमेवच ॥

अर्थ—दूध एक भाग, पाणी तीन भाग व नागरमोथे यांत एकत्र करून आटऊन दूध शेष राहील तें प्यावें; ह्मणजे आम व शूल, यांचा नाश करितें.

आमपक्वातिसारलक्षण.

संसृष्टमेभिर्दोषैस्तुन्यस्तमप्स्ववसीदति ॥ पुरीषंभृशदुर्गंधिपिच्छिलंचामसंज्ञितं ॥ एतान्येवंतुलिंगानिविपरीतानियस्यवै ॥ लाघवंचविशेषेणतस्यपक्वंविनिर्दिशेत् ॥

अर्थ—मागें सांगितलेल्या वातादिक अतिसारांच्या लक्षणानीं युक्त असें पुरीष पाण्यांत पडलें असतां, आम जड आहे. यास्तव बुडतें. व तें फार दुर्गंधयुक्त व बुळबुळीत असतें. त्याला आमसंज्ञा आहे. याच्या विपरीत ज्याचीं लक्षणें असतात; आणि शरीराला विशेषानें लाघव असतें. त्याचें पुरीष पक्व झालें असें समजावें.

असाध्यलक्षण.

पक्वजांववसंकाशंयकृत्पिंडनिभंतनु ॥ घृततैलवसामज्जावेसवारपयोदधि ॥ मांसधावनतोयाभंकृष्णंनीलारुणप्रभं ॥ मेचकंकर्बुरंस्निग्धंचंद्रिकोपगतंघनं ॥ कुणपंमस्तुलिंगाभंदुर्गंधंकुथितंबहु ॥ तृष्णादाहारुचिश्वासहिक्कापार्श्वास्थिशूलिनं ॥ संमूर्छारतिसंमोहयुक्तंपक्ववलीगुदं ॥ प्रलापयुक्तंचभिषग्वर्जयेदतिसारिणं ॥

अर्थ—पिकलेल्या जांभळाच्या रंगासारिखा, काळजाच्या रंगाचा व तूप, तेल, वसा, मज्जा यासारिखा वेसवाराच्या पाण्यासारिखा, दह्यांसारिखा, मांस धुतलेल्या पाण्याच्या रंगासारिखा, काजळाप्रमाणें काळा, निळ्या व शेंदरी रंगाचा, मृदंगाच्या शाईसारिखा, नानाप्रकारच्या रंगाचा, तुळतुळीत, मोराच्या पिसावर जसे नानाप्रकारचे रंग दिसतात. तसा, घट्ट, मुर्द्याचा दुर्गंधाचा, मस्तकांतील मेदासारिखा, दुर्गंधयुक्त, कुजक्या घाणीचा, पुष्कळ, असा मळ पडतो; आणि रोग्याला तृषा, दाह, अन्नद्वेष, दमा, उचकी, बरगड्यांचा हाडांत दुखणें, मनाला मोह, अस्वस्थपणा, हीं लक्षणें होतात; आणि त्याच्या गुदाच्या वळ्या पिकतात. व बडबडतो, अशा रोग्याला वैद्यानीं सोडावें.

दुसरें असाध्यलक्षण.

असंवृतगुदंक्षीणंदुराध्मानमुपद्रुतं ॥
गुदेपक्वेगतोष्माणमतिसारिणमुत्सृजेत् ॥

अर्थ—ज्याचे गुद मिटत नाहीं, असा क्षीण झालेला, अत्यंत आध्मानानें युक्त सूज, इत्यादि उपद्रवानीं व्याप्त व गुदावर बारीक बारीक फोड येऊन चिघळणें, व ज्याचा शरीरांत उबारा नाहींसा झाला, किंवा जठराग्नि शांत जाहला, अशा अतिसारी रोग्याला वैद्यानें सोडावा

अतिसाराचे उपद्रव.

शोथंशूलंज्वरंतृष्णांश्वासंकासमरोचकं ॥
छर्दिमूर्छांचहिक्कांचदृष्ट्वातीसारिणंत्यजेत् ॥

अर्थ—सूज, शूल, ज्वर, तृष्णा, श्वास, खोकला, अन्नद्वेष, वांति, मूर्छा, उचकी, हीं लक्षणें झालीं असतां, अतिसाररोग्याला सोडावा.

असाध्यलक्षण

श्वासशूलपिपासार्तंक्षीणंज्वरनिपीडित ॥
विशेषेणनरंवृद्धमतिसारोविनाशयेत् ॥

अर्थ—श्वास, शूल, तहान व ज्वर यानें पीडिलेला; क्षीण आणि वृद्ध असा असेल; तर त्याचा अतिसार नाश करील.

लोध्रादि चूर्ण.

सलोध्रंधातकीबिल्वंमुस्तामास्थिकलिंगकं ॥
पिबेन्माहिपतक्रेणपक्वातीसारनाशनं ॥

अर्थ—लोध्र, धायटीफुलें, बेलफळ, नागरमोथे, आंब्याची कोय, व कुडयाची साल, यांचें चूर्ण महिषीच्या ताकांत घ्यावें, म्हणजे पक्कातिसाराचा नाश होतो.

पद्मादि चूर्ण.

पद्मंसमंगामधुकंबिल्वजंतुशलाटुच ॥
पिबेत्तंडुलतोयेनसक्षौद्रमगदंकरं ॥

अर्थ—पद्मकाष्ट, मंजिष्ठा, जेष्ठमध, बेलफळ, हिरवें व कोवळें, उंबर हीं सर्व एकत्र वांटून त्यांत तांदुळाचें धुवण व मध घालून घ्यावें. हें चांगलें औषध निरोगकर आहे.

कुटजादिचूर्ण.

कुटजातिविषाचूर्णमधुनासहलेहितं ॥
चिरोत्थितमतिसारंपक्वंपित्तास्रजंजयेत् ॥

अर्थ—कुडयाची साल, व अतिविष, यांचें चूर्ण मधाशीं घेतलें असतां; फारादिवसांचा अपक्व अतिसार व पित्तरक्त यांचा नाश करितें.

अंबष्टादिगण.

अंबष्टाधातकीलोध्रसमंगापद्मकेसरं ॥
मधुकाम्रंलुबिल्वंचपक्वातिसारहागणः ॥

अर्थ—पाहाडमूळ, धायटीफुलें, लोध, मंजिष्ठा, कमूळकेसर, मधुकाष्ठ, दिंडा, व हिरवें बेलफळ यांचें चूर्ण किंवा काढा पक्कातिसाराचा नाशक आहे.

समंगादिचत्वारिचूर्ण.

समंगाधातकीपुष्पंमंजिष्ठालोध्रएवच ॥ शाल्मलीवेष्टकोलोध्रंदाड मद्रुफलत्वचौ ॥ आम्रास्थिमध्यंलोध्रंचबिल्वमध्यंप्रियंगुच ॥ मधु कंशृगवेरंचदार्घिवृंतत्वगेवच ॥ चत्वारएतेयोगाश्चपक्वातिसारना शनाः ॥ तेयोगाउपयोज्यावैसुक्षौद्रास्तंडुलांबुना ॥

अर्थ—लाजाळू, धायटीफूल, मंजिष्ठा, व लोध; किंवा मोचरस, लोध्र, डाळिंब, व डाळिंबसाल; अथवा आंब्याची कोय, लोध्र, बेलफळाचा मगज, व वाघांटी; किंवा ज्येष्ठीमध,, आलें, दिंडा, व दालचिनी, हे चार योग तांदुळांचें धुवण व मध यांशीं दिलें असतां, पक्कातिसाराचा नाश करितात.

कंचटादिचूर्ण.

कंचटजंबूदाडिमशृंगाटकपत्रबिल्ववर्हिष्टं ॥
जलधरनागरसहितंगंगामपिवेगवाहिनींरुंध्यात् ॥

अर्थ—गजपिंपळी, जांबूळ, डाळिंब, शिंगाड्याचीं पानें, बेलफळ, वर्हिष्ट, नागरमोथा, व सुंठ यांचें चूर्ण प्रवाहरूप गंगेचाही रोध करील, मग अतिसाराची काय कथा.

अंकोटकल्क.

अंकोटमूलकल्कस्तंदुलपयसासमाक्षिकःपीतः ॥
सेतुरिववारिवेगंझटितिनिरुंध्यादतीसारं ॥

अर्थ—आंकोटांच्या मुळांचा कल्क, तांदळांचे धुवण व मध एकत्र करून घेतलीं असतां, जसा नदीवेगाला बांध बंद करितो, तसा अतिसाराला हा योग बंद करील.

मोचरसादिचूर्ण.

मोचरसमुस्तानागरपाठारलुधातुकीकुसुमैः ॥
चूर्णमथितसमेतंरुतद्धिगंगाप्रवाहमपि ॥

अर्थ—सावरीचा चीक, नागरमोथे, सुंठ, पाहाडमूळ, दिंडा व धायटीचीं फुलें यांचें चूर्ण मठ्ठ्याशीं घेतलें असतां, प्रवाहरूप गंगेचाही रोध करील.

मुस्तादिचूर्ण.

मुस्तमोचरसलोध्रधातुकिपुष्पबिल्वगिरिकोटजैःफलैः ॥
चूर्णितंसगुडतक्रसेवितंनिम्नगाजलरयोपिरुध्यते ॥

अर्थ—नागरमोथा, मोचरस, लोध, धायटीचीं फुलें, बेलफळ इंद्रजव. यांचें चूर्ण ताक व गूळ यांशीं घेतलें असतां, नदीवेगाचाही रोध करील, मग अतिसाराची काय कथा.

विश्वादिवटी.

विश्वजीरकसिंधूत्थहिंगुजातिफलानिच ॥ साम्रास्थिशंखखंडंचदध्ना
म्लेनप्रपेषयेत् ॥ ईपदंगारकैर्भ्रष्टावटिकाकर्षसंमिता ॥ पक्वापक्वम
तीसारंसशूलंग्रहणीगदं ॥ चिरोत्थमचिरोत्थंचनाशयेन्नात्रसंशयः ॥

अर्थ—सुंठ, जिरें, सैंधव, हिंग, जायफळ, आंब्याची कोय, शंखाचे तुकडे, हें आंबट दह्याशीं घोटावें; आणि निखाऱ्यावर किंचित् भाजून एक तोळा गोळी द्यावी. ही पक्वातिसार, अपक्वातिसार, शूल, संग्रहणी, हे रोग फार दिवसांचे किंवा ताजे असले तरी त्यांचा नाश करील.

वटप्ररोहयोग.

वटप्ररोहंसंपिष्टाश्लक्ष्णंतंडुलवारिणा ॥
तंपिबेत्तक्रसंयुक्तंअतिसारप्रशांतये ॥

अर्थ—तांदुळांचे धुवणांत वडाचे पारंबे वांटून ताक घालून अतिसारनाशनार्थ प्राशन करावें.

कुटजावलेह.

कुटजत्वक्तुलामार्द्रांद्रोणाद्भिश्चपचेद्भिषक् ॥ पादशेषंशृतंनीत्वावस्त्र
पूतंपुनःपचेत् ॥ लज्जालुधातुकीबिल्वंपाठामोचरसस्तथा ॥ मुस्तंप्रति
विषांचैवचूर्णमेषांपलंपलं ॥ निक्षिप्यप्रपचेत्तावद्यावद्दर्वीप्रलेपनं ॥
जलेनछागदुग्धेनपीतोमंडेनवाजयेत् ॥ घोरान्सर्वानतीसारान्नाना
वर्णान्सवेदनान् ॥ असृग्दरंसमस्तंचतथार्शांसिप्रवाहिकां ॥

अर्थ—ओली कुड्याची साल चारशें तोळे व पाणी दाहाशें चोवीस तोळे घेऊन त्यांत चतुर्थांश काढा करून गाळून घ्यावा नंतर त्यांत लाजाळूचा कांदा, धायटीचीं फुलें, बेलफळ, पाहाडमूळ, सांवरीचा चीक, नागरमोथे, अतिविष, यांचीं चार चार तोळे चूर्ण घालोनि पुनःअग्नीवर जों पर्यंत पळीला चिकटून राही तों पर्यंत पचन करावा; नंतर जलाशीं, शेळीच्या दुग्धाशीं, मंडाशीं द्यावा. म्हणजे घोर व नानावर्ण सर्व अतिसार, शूल, रक्तप्रदर, मूळव्याध आणि प्रवाहिका, यांचा नाश करितो.

राळयोग.

चिरोत्थितमतीसारंरालोहन्यात्सितायुतः ॥

अर्थ—राळ साकरेशीं घेतली असतां; फार दिवसाच्या अतिसाराचा नाश करील.

नाभीक्षिपर्णीय.

कृत्वालवालंमुदृढंपिष्टैरामलकैर्भिषक् ॥ आर्द्रकस्वरसेनाशु पूरयेन्नाभिमंडलं ॥ नदीवेगोपमंघोरंप्रवृद्धंदुर्जरंनृणां ॥ वृद्धातिसारमजयंनाशयत्येषयोगराट् ॥

अर्थ–रोग्याचा नाभीभोवतें आवळकाठीचा चूर्णाचें अळें करून त्यात आल्याचा रस ओतावा; आणि रोग्याला तसाच चार घटीका राहूंद्यावा; ह्मणजे नदीवेगासारखा घोर वाढलेला दुर्जय अशा अतिसाराचा हा योगराज नाश करितो.

पाठादियोग.

पाठापिष्टाचगोदध्नातथामध्यत्वगाम्रजा ॥
अतिसारंव्यथांदाहयुक्तंहंत्युदरेधृता ॥

अर्थ–पाहाडमूळ. किंवा आंब्याची अंतर्साल. दह्यांशीं वांटून घेतली दाह, व अतिसार, यांचा नाश करिते.

जातीफलादियोग.

जातीफलंनागरसर्जकेनीखर्जूफलंभिन्नमिदंचनिरयं ॥ योज्यंद्विनिष्कंचकरीषजातादरण्यजाद्भस्मसमंचसर्वैः ॥ निष्कार्धमात्रंभिषजाप्रयोज्यंद्विवारमेतच्छुभतंदुलोदकैः ॥ जीर्णातिसारेरुधिरामयुक्तेहितःसशूलेबहुवेगयुक्त ॥

अर्थ–जायफळ, सुंठ, राळ, केनी, व खजूर ही प्रत्येकी साहामासे; आणि सर्वचूर्णाचे समान रानशेणीचो राख, हें सर्व एकत्र करून दीडमासा तांदळाचे धुवणाशी दुवेळ द्यावे; ह्मणजे जीर्णातिसार, रक्तातिसार, आमातिसार,व शूल यांवर हें चूर्ण हितकारक आहे.

रक्तातिसार निदान.

पित्तकृंतियदात्यर्थंद्रव्याण्यश्नातिपैत्तिके ॥
तदोपजायतेभीक्ष्णंरक्तातीसारउल्वणः ॥

अर्थ–पित्तातिसार झाहाला असतां; किंवा व्हावयाचा असतां; जर पित्तकरणारीं द्रव्यें पुष्कळ आणि निरंतर भक्षण केलीं, तर मोठा उग्र रक्तातिसार उत्पन्न होतो. त्याचा तांबड्या व काळ्या वगैरे रंगांनीं वातादिक दोष जाणावा. कोणी असें ह्मणेल, की रक्तनहि अतिसार आहे; तो सातवा ह्मटला तर षट्त्वसंख्येला बाध येईल; ह्मणून हा पैत्तिकाचाच एक अवस्थाभेद आहे असें मानावें.

यष्ट्यादिकाढा.

यष्टीमधुसितालोध्रंमधुकंनीलमुत्पलं ॥
अजाक्षीरेणक्वथितंरक्तातिसारशांतये ॥

अर्थ—ज्येष्ठमध, साकर, लोध्र, गोहाळे व नीलकमल, यांचा शेळीच्या दुधांत काढा करून यावा; ह्मणजे रक्तातीसार शांत होतो.

कुटजादि काढा.

कुटजातिविषामुस्तावालकंलोध्रचंदनं ॥ धातुकीदाडिमंपाठाका थंक्षौद्रयुतंपिबेत् ॥ दाहेरक्तेचशूलेचआमरोगेचदुस्तरे ॥ कुटजाष्ट मिदंख्यातंसर्वातीसारनाशनं ॥

अर्थ—कुडयाची साल, अतिविष, नागरमोथे, वाळा, रक्तचंदन, धायटीची फुलें, व पाहाडमूळ, यांचा काढा मध घालून प्यावा; ह्मणजे दाह, रक्तशूल, आम, आणि सर्वातिसार, यांचा नाश करितो, याला कुटजाष्टक ह्मणतात.

वत्सकादि काढा.

सवत्सकःसातिविषःसबिल्वःसोदीच्यमुस्तश्चकृतःकषायः ॥
सामेसशूलेचसशोणितेचचिरप्रवृत्तेपिहितोतिसारे ॥

अर्थ—कुडयाची साल, अतिविष, बेलफळ, वाळा व नागरमोथा यांचा काढा आमसंबंधी शूल, रक्तातिसार व फारदिवसांचा अतिसार यांवर हितकारक आहे.

तंदुलजलयोग.

लघुचेतकीजीरकेसमेमृदुभृष्टेचसुचूर्णितेपीते ॥
गृहतंदुलवारिणामतोतिसृतिघ्नइतिप्रसिद्धयोगः ॥

अर्थ—बाळहर्डी व जिरें समभाग घेऊन थोडें भाजून त्याचें चूर्ण करून तांदळाच धुवणाशीं घावें; ह्मणजे तें अतिसाराचा नाश करितें. हा सिद्धयोग सांगीतला आहे.

डाळिंबादि काढा.

अयिकंदुकतिंदुकस्तनेप्रमदारूपमदापहारिणि ॥
रुधिरातिसृतौकषायकःसमधुदाडिमवत्सकत्वचः ॥

अर्थ—डाळिंबसाल व कुडयाची साल यांचा काढा मध घालोन यावा; ह्मणजे रक्तातिसाराचा नाश होतो.

चंदनादि योग.

चंदनंविमलतंदुलांबुनासंयुतंमधुयुतंसितायुतं ॥
तृड्विखंडनमसृग्विखंडनंखंडनंप्रचुरदाहमोहयोः ॥

अर्थ—तांदळांचें धुवणांत चंदन उगाळून त्यांत मध व साकर घालोन यावा; ह्मणजे तृषा, रक्तातिसार, दाह, आणि मोह यांचा नाश करितो.

ऱ्हीवेरादि काढा.

ऱ्हीवेरातिविषामुस्ताबिल्वधान्यकवत्सकं ॥ समंगाधातकीलोध्रंवि
श्वंदीपनपाचनं ॥ हंत्यरोचकपिच्छामविबंधंचातिवेदनं ॥ सशोणि
तमतीसारंसज्वरंवाथविज्वरं ॥

अर्थ—वाळा, अतिविष, नागरमोथे, बेलफळ, धने, कुडयाची साल, मंजिष्ठा, धायटीची फुलें, लोध्र, आणि सुंठ यांचा काढा द्यावा. हा दीपन व पाचन आहे. व अरुचि, आम, विट्‌बंध, शूल, रक्तातिसार, सज्वर किंवा विज्वर अतिसार यांचा नाश करितो.

बिल्वादि योग.

बिल्वंछागपयःसिद्धंसितामोचरसान्वितं ॥
कलिंगचूर्णसंयुक्तंरक्तातीसारनाशनं ॥

अर्थ—बेलफळ मेंढीचे दुधांत पचन करावें; आणि तें साकर, सांवरीचा डीक, कुडयाचें सालीचें चूर्ण घालोन द्यावें; ह्मणजे रक्तातिसाराचा नाश करितें.

कलिंगयवपट्क.

सहरीतकीप्रतिविषारुचकंसहिंगुसकलिंगयुतं ॥
इतिनत्कलिंगयवपट्कमिदंरुधिरातिसारगदशूलहरं ॥

अर्थ—हरीतकी, अतिविष, सैंचळ, हिंग, कुडयाची साल व यव यांचा काढा किंवा चूर्ण रक्तातिसार, शूल, यांचा नाश करितें. याला कलिंगयवपट्क ह्मणतात.

कुटजक्षीर.

निःक्वाथ्यमूलममलंगिरिमल्लिकायाःसम्यक्पलंद्वितयमंबुचतुःशरावे ॥
नत्पादशेषसलिलंखलुशोषणीयंक्षीरेपलद्वयमितेकुशलैरजायाः ॥ प्रक्षिप्य
मानकानष्टौमधुनस्तत्रशनिले ॥ रक्तातिसारीतत्पीत्वानैरुजत्वमवाप्नुयात् ॥

अर्थ—कुडयाच्या पाळाची साल आठ तोळे घेऊन एकशे तोळे पाण्यांत, काढा करून चतुर्थांश उतरून घ्यावा; आणि पुनः चुलीवर ठेऊन आठ तोळे शेळीचें दूध घालोन आटवावा. आटल्यावर उतरून शीत झाल्यावर त्यांत आठ मासे मध घालावा; आणि प्रातःकाळी द्यावा; ह्मणजे रक्तातिसाऱ्याला लौकर निरोगी करितो.

रसांजनादिचूर्ण.

रसांजनंसातिविषंकुटजस्यफलत्वचं ॥ धातकीशृंगवेरंचपिबे
त्तंदुलवारिणा ॥ क्षौद्रेणयुक्तंनुदतिरक्तातीसारमुल्बणं ॥

अर्थ—रसांजन, अतिविष, इंद्रजव, कुडयाची साल, धायटीचे फूल व सुंठ, हीं औषधें धुवणाशीं वाटून मध घालोन घेतली असतां, रक्तातीसार दूर होतो.

कुटजावलेह.

कुटजस्यपलंग्राह्यमष्टभागजलेभृतं ॥ तथैवाद्भिःपचेद्भूयोदाडिमोदक संयुतं ॥ कुटजक्काथतुल्योऽत्रदाडिमस्यरसोमतः ॥ यावज्जरसिकाभासं भृतंतमुपकल्पयेत् ॥ तस्यार्धकर्षतक्रेणपिबेद्रक्तातिसारवान् ॥ अव श्यंमरणीयोपिनमृत्योर्यातिगोचरं ॥

अर्थ—कुड्याची साल चार तोळे घेऊन आठपट पाण्यांत अष्टमांश काढा करावा; आणि कुड्याचा काढ्या इतका डाळिंबाचा रस घालोन पुनः पचवावा. तो दाट जाह्यावर थंड करून ताहा मासे ताकाबरोबर रक्तातिसाऱ्याला द्यावा; ह्मणजे अवश्य मरणारा ही रोगी वांचतो.

सल्लक्यादिस्वरस.

सल्लकीवदरीजंबूप्रियाल्वाम्रार्जुनत्वचः ॥
पीताःक्षीरेणमध्वाढ्याःपृथक्शोणितनाशनाः ॥

अर्थ—हरपररेवडी, बोर, जांबूळ, चारोळी, आंबा व अर्जुन इतके झाडांतून कोणा एकाची साल दूधांत वाटून मध घालोन प्यालें असतां, रक्तातीसारनाशक आहे.

जंब्वादिआंगरस.

जंब्वाम्रामलकीनांचपल्लवोत्थोरसोजयेत् ॥
मध्वाज्यक्षीरसंयुक्तोरक्तातीसारमुल्वणम् ॥

अर्थ—जांभूळ, आंबा व आवळी या तिहींच्या पानाचें आंगरसांत मध, तूप व दूध मेळनून प्यालें असतां, महान् रक्तातीसार दूर होतो.

गुडाबिल्वयोग.

गुडेनखादयेद्बिल्वंरक्तातीसारनाशनं ॥
आमशूलविबंधघ्नंकुक्षिरोगविनाशनं ॥

अर्थ—गुळाबरोबर बेलफळ खावें; ह्मणजे रक्तातीसार, आम, शूल, अवष्टंभ, कुक्षिरोग यांचा नाश होतो.

शतावरीकल्क.

पीत्वाशतावरीकल्कंपयसाक्षीरभुग्जयेत् ॥
रक्तातिसारंपीत्वावातथासिद्धंघृतंनरः ॥

अर्थ–शतावरीच्या मुळ्या वाटून दुधाबरोबर प्याव्या; आणि दूध भात खावा; ह्मणजे रक्तातीसार दूर होईल. अथवा शतावरीचे रसांत तूप घालोन रस आटवून ,तसं सिद्ध झालेलें तूप प्यावें.

तिलादिकल्क.

कल्कस्तिलानांकृष्णानांशार्करांढ्यश्चभागिकः ॥
आजेनपयसापीतःसद्योरक्तंनियच्छति ॥

अर्थ–काळे तीळ वाटलेले एक भाग, साखर दोन भाग, शेळीचें दूध चार भाग, याप्रमाणें एकत्र करून प्यावें; ह्मणजे रक्त बंद होतें.

नवनीतावलेह.

गोदुग्धंनवनीतंतुमधुनासितयासह ॥
लीढंरक्तातिसारेपुग्राहिकंपरमंमतं ॥

अर्थ–गाईच्या दुधाचें लोणी काढून त्यांत मध व खडीसाकर घालोन खावें; ह्मणजे रक्तातिसाराला बंद करितें.

शाल्मलिपुष्पयोग.

शाल्मलेरार्द्रपुष्पाणिपुटपाककृतानिच ॥ संकुटयोलूखलेतस्यगृण्हीयात्पयसिश्रिते ॥ गृहीत्वाचपलंतस्यत्रिपलंघृततैलयोः ॥ युक्तंमधुककल्केनमाक्षिकत्रिपलेनच ॥ युक्तस्तुवपुपोदद्याद्बस्तौप्रत्यागतेरसे ॥ भोजयेत्पयसावापिपित्तातीसारपीडितं ॥

अर्थ–सांवरीचीं ओलीं फुलें घेऊन पुटपाकविधीनें पचवून खाहिनांत कुटून तापलेल्या दुधांत रस एक पळ काढून घ्यावा; व त्यांत घृत व तेल बारा तोळे व ज्येष्टीमधाचा कल्क बारा तोळे, मध बारा तोळे हीं एकत्र करून द्यावीं. हा रस बस्तीमध्यें आला ह्मणजे दूध भात भोजनार्थ द्यावा.

गुदपाक.

विरेकैर्बहुभिर्यस्यगुदंपित्तेनदह्यते ॥
पच्यतेवातयोःकार्यंसेकप्रक्षालनादिकं ॥

अर्थ· ज्याचें फार शौच होऊन गुद पित्तानें जळजळतें, किंवा पिकतें, त्यांला सेचन किंवा प्रक्षालन करावें.

पटोलादिकाढा गुदक्षालनार्थ.

पटोलयष्टिमधुकक्काथेनाशिशिरेणहि ॥
गुदप्रक्षालनंकार्यंतेनैवगुदसेचनं ॥

अर्थ—कडुपडवळ, ज्येष्ठीमध व मोहाची साल यांचा थंड काढा करून त्याणें गुद प्रक्षालन व सेचन करावें.

गुदक्षालनार्थ जल.

दाहेपाकेहितंछागीदुग्धंसक्षौद्रशर्करं ॥

गुदस्यक्षालनेसेकेयुक्तंपानेचभोजने ॥

अर्थ—गुदाचा दाह, किंवा पाक झाला असतां, शेळीच्या दुधांत मध व साकर घालोन त्याणें गुदक्षालन, सेचन, पान आणि भोजन, करावें.

चांगेरीघृत.

गुदनिःसरणेशस्तंचांगेरीघृतमुत्तमं ॥ अतिप्रवृत्यामहतीभवे

यदिगुदव्यथा ॥ स्विन्नमूषकमांसेनतथासंस्वेदयेद्गुदं ॥

अर्थ—गुदभ्रंश झाला असतां, चांगेरीघृत उत्तम आहे; व आंग फार बाहेर येऊन मोठी पीडा होऊं लागली तर उंदराचें मांस शिजवून त्याणें गुद शेकावें.

मूषकमांसस्वेद.

स्वेदोथमूषिकामांसैस्तद्रसामृक्षणंतथा ॥ शंबूकमांसंसुस्विन्नंसतै

ललवणान्वितं ॥ ईषद्रस्तेनचाभ्यक्तंस्वेदयेत्तेनयत्नतः ॥ गुदभ्रंशम

शेषेणनाशयेत्क्षिप्रमेवच ॥

अर्थ—गुदभ्रंश झाला असतां, उंदराचे मांसाचा वाफारा द्यावा; व वर बांधावें. तसेंच बारीक शंखाचें मांस शिजवून त्यांत तेल व मीठ घालोन गुदाला तेल लावून त्या मांसानें शेक द्यावा; ह्मणजे निःशेष लौकर बरा होतो.

गोधूमचूर्णस्वेद.

अथगोधूमचूर्णस्यस्विन्नितस्यतुवारिणा ॥

साज्यस्यगोलंकृत्वामृदुसंस्वेदयेद्गुदं ॥

अर्थ—गव्हांची कणीक पाण्यांत भिजवून तूप घालोन गोळा करून भाजावा; आणि तो गोळा कढत आहे तों त्याणें गुद शेकावें.

गुदांत प्रवेशन.

गुदभ्रंशेगुदंस्नेहैरभ्यज्यांतःप्रवेशयेत् ॥ प्रविष्टंस्वेदयेन्मंदंमूषकस्या

मिषेणहि ॥ गुदभ्रंशाभिधोव्याधिःप्रणश्यतिनसंशयः ॥

अर्थ—गुदभ्रंश झाला असतां, त्याला तेल लावून आंत लोटावें; नंतर उंदराच्या मांसानें हळू हळू शेकावें; ह्मणजे हा व्याधि नाश पावतो. यांत संशय नाहीं.

चांगेरीघृत.

चांगेरीकोलदध्यम्लक्षारनागरसंयुतं ॥
घृतंविपक्कंपातव्यंप्रणश्यतिनसंशयः ॥

अर्थ–चुका, बोरें, दहिं, लिंबू, यवक्षार व सुंठ, यांचे काढ्यांत तूप घालोन पचन करून सिद्ध करावें. तें घृत प्राशनार्थ दिलें असतां, गुदभ्रंशाचा नाश होतो, यांत संशय नाहीं.

कमळपत्रभक्षण.

कोमलंपद्मिनीपत्रंयःखादेच्छर्करान्वितं ॥
एतन्निश्चित्यनिर्दिष्टंनतस्यगुदनिर्गमः ॥

अर्थ–कोंवळीं कमळाचीं पानें साकरेशीं जो भक्षण करितो; त्याचें गुद कधींही बाहेर येणार नाहीं हें निश्चयें सांगितलें आहे.

ज्वरातिसारचिकित्साक्रम.

ज्वरातिसारयोरुक्तंभेषजंयत्पृथक्पृथक् ॥ नतन्मीलितयोःकार्यमन्यो न्यंवर्धयेद्यतः ॥ अतस्तौप्रतिकुर्वीतविशेषोक्तचिकित्सितैः ॥

अर्थ–ज्वर व अतिसार यांना जीं निरनिराळीं औषधें सांगितलीं तीं एकत्र करून ज्वरातिसारावर उपचार करूं नये. जर औषधें मिळवून दिलीं तर, परस्परांनां वाढवितात. या करितां ज्वरातिसारावर विशेषानें जी क्रिया सांगेल तीच करावी.

उत्पलषष्ठिक.

लंघनमुभयोरुक्तंमीलितकार्येविशेषतस्तदनु ॥
उत्पलषष्टिकसिद्धंलाजकमंडादिकंपेयं ॥

अर्थ–ज्वर व अतिसार या दोषांवर लंघन सांगितलें. तें लंघन ज्वरातिसारावर विशेषेंकरून करावें; नंतर कमळकंद व साटकीचे तांदूळ यांच्या लाह्यांचा मंड द्यावा.

दाडिमावलेह.

दाडिंबादिरसप्रस्थंचतुःप्रस्थेजलेपचेत् ॥ चतुर्भागकषायेस्मिन्शर्क राप्रस्थमेवच ॥ नागरंपिप्पलीमूलंकणाधान्यकदीप्यकं ॥ जातीपत्र मरीचंजीरकंकरकंतुगा ॥ विजयानिंबपत्रंचसमंगावत्सशाल्मली ॥ अरलातिविषापाठालवंगंचपृथक्पलं ॥ घृतस्यमधुनःप्रस्थंसर्वंले हंविपाचयेत् ॥ दाडिंबलेहकंनामज्वरातीसारनाशनं ॥

अर्थ–डाळिंबाचा रस एक शेर, पाणी पांच शेर यांचा चतुर्थांश काढा करून त्यांत साकर एकशेर व सुंठ, पिंपळी मूळ, पिंपळी, धने, ओवा, जायपत्री, काथिपदा, मिरें,

वंशलोचन, भांग, निंबाचीं पानें, लाजाळूकंद, कुडयाची साल, सांवरी, टेंटू, अतिविष, पाहाडमूळ व लवंगा हीं प्रत्येक चार चार तोळे व तूप, मध, केशर, हीं सर्वत्र एकत्र करून लेह सिद्ध करावा. त्याला कुटजावलेह ह्मणतात. हा ज्वरातिसाराचा नाश करितो.

कणादिकाढा.

कणाकरेणुजलदक्काथोमधुसितायुतः ॥
पीतोज्वरातिसारस्यतृष्णावम्योश्चनाशनः ॥

अर्थ–पिंपळी, गजपिंपळी व नागरमोथे यांचा काढा मध व साकर घालून प्यावा; ह्मणजे अतिसार, तृष्णा व वांति, यांचा नाश करितो.

पाठादिकाढा.

पाठेंद्रयवभूनिंबमुस्तपर्पटकःशृतः ॥
जयत्याममतीसारंज्वरंचसमहौषधं ॥

अर्थ–पाहाडमूळ, इंद्रजव, किराइत, नागरमोथे, पित्तपापडा, आणि सुंठ, यांचा काढा आमातिसार व ज्वर यांचा नाश करितो.

नागरादिकाढा.

नागरातिविषामुस्ताभूनिंबामृतवत्सकैः ॥
सर्वज्वरहरःक्काथःसर्वातिसारनाशनः ॥

अर्थ-सुंठ, अतिविष, नागरमोथे, किराइत, गुळवेल व कुडयाची साल यांचा काढा संपूर्ण ज्वर व संपूर्ण अतिसार, यांचा नाशक आहे.

कलिंगादिकाढा.

कलिंगातिविषाशुंठीकिरानांबुयवासकं ॥
ज्वरातिसारसंतापंनाशयेदविकल्पतः ॥

अर्थ–कुड्याची साल, अतिविष, सुंठ, किराइत, वाळा आणि धमासा यांचा काढा ज्वरातिसारसंबंधी संताप यांचा निःसंशय नाश करील.

गुडूच्यादिकाढा.

गुडूच्यतिविषाधान्यशुंठीबिल्वाब्दवालकैः ॥ पाठाकुटजभूनिंबचंदनो शीरपर्पटैः ॥ पिबेत्कषायंसक्षौद्रंज्वरातीसारशांतये ॥ हृल्लासारोचक च्छर्दिपिपासादाहनाशनं ॥

अर्थ–गुळवेल, अतिविष, धने, सुंठ, बेलफळ, नागरमोथा, वाळा, पाहाडमूळ, कुडयाची साल, किराइत, रक्तचंदन, काळा वाळा व पित्तपापडा, यांचा काढा मध घालून प्यावा; ह्मणजे ज्वरातिसार, हल्लास, अरोचक, वांति, ताहान व दाह यांचा नाश करितो.

वत्सकादि दोन काढे.

वत्सकस्यफलंदारुरोहिणीगजपिप्पली ॥ श्वदंष्ट्रापिप्पलीधान्यबिल्वपाठायवानिका ॥ द्वावप्येताविमौयोगौश्लोकार्धेनावभाषितौ ॥ ज्वरातिसारशमनौविशेषाद्दाहनाशनौ ॥

अर्थ-इंद्रजव, देवदार, कुटकी, गजपिंपळी यांचा; किंवा गोखरू, पिंपळी, धने, बेलफळ, पाहाडमूळ व ओवा, यांचा काढा ज्वरातिसार, आणि विशेषानें दाह यांचा नाश करितो.

उशीरादिकाढा.

उशीरंवालकंमुस्तंधान्यकंबिल्वमेवच ॥ समंगाधातकीलोध्रंविश्वंदीपनपाचनं ॥ हंत्यरोचकपिच्छामंविबंधमतिवेदनं ॥ सशोणितमतीसारं सज्वरंवाथविज्वरं ॥

अर्थ-वाळा, काळा वाळा, नागरमोथे, धने, बेलफळ, मंजिष्ठ, धायटीचीं फुलें, लोध्र व सुंठ याचा काढा दीपन व पाचन आहे. व अरुचि, आमातिसार, विट्बंध, शूल, रक्तातिसार, आणि ज्वर यांचा नाश करितो. हा काढा ज्वररहित अतिसारावर ही चालतो

बिल्वादिकाढा.

बिल्ववालकभूनिंबगुडुचीधान्यनागरैः ॥
कुटजाब्दामृताक्काथोज्वरातीसारशूलनुत् ॥

अर्थ-बेलफळ, वाळा, किराइत, गुळवेल, धने, सुंठ, कुडयाची साल, नागरमोथा आणि आवळकाठी, यांचा काढा ज्वरातिसार व शूल यांचा नाशक आहे.

पंचमूलादिकाढा.

पंचाग्निवृक्यब्दबलेंद्रबीजत्वक्सेव्यतिक्तामृतविश्वबिल्वैः ॥
ज्वरातिसारान्सवमीन्सकासान्सश्वासशूलान्शमयेत्कषायः ॥

अर्थ-पंचमुळें, रिंगणी, नागरमोथा, चिकणा, कुडयाची साल, इंद्रजव, वाळा, कुटकी, गुळवेल, सुंठ, बेलफळ यांचा काढा ज्वरातिसार, वांति, खोकला, श्वास आणि शूल यानांशमवलि

अरल्वादिकाढा.

अरल्वतिविषामुस्ताशुंठीबिल्वंसदाडिमं ॥
सर्वज्वरहरःक्काथोसर्वातिसारनाशनः ॥

अर्थ-टिंटा, अतिविष, नागरमोथा, सुंठ, बेलफळ, आणि डाळिंब, यांचा काढा संपूर्ण ज्वर व संपूर्ण अतिसार यांचा नाश करितो.

उत्पलादिचूर्ण.

उत्पलंदाडिमत्वचंसंचूर्ण्यपद्मकेसरं ॥
पिबेत्तंदुलतोयेनज्वरातीसारनाशनं ॥

अर्थ—कोष्ठकोळिंजन, डाळिंबाची साल व कमळाचे केसर हे वाटून तांदळांचे धुवणाशीं घ्यावें; म्हणजे ज्वरातिसार नाश पावतो.

व्योषादिचूर्ण.

व्योषंवत्सकबीजानिनिंबभूनिंबमार्कवं ॥ चित्रकंरोहिणीपाठादार्वीअतिविषासमं ॥ श्लक्ष्णचूर्णीकृतानेतान्तत्तुल्यांवत्सकत्वचं ॥ सर्वमेकत्रसंयोज्यपिबेत्तंदुलवारिणा ॥ सक्षौद्रंवालिहेदेवंपाचनंग्राहिभेषजं ॥ तृष्णारुचिप्रशमनंज्वरातीसारनाशनं ॥ कामलाग्रहणीरोगान्गुल्मंप्लीहानमेवच ॥ श्वयथुंपांडुरोगंचप्रमेहंचविनाशयेत् ॥

अर्थ—सुंठ, मिरीं, पिंपळी, इंद्रजव, कडुनिंब, किराइत, माका, चित्रक, कुटकी, पाहाडमूळ, दारुहळद, अतिविष, यांची समान भाग चूर्णे व सर्वचूर्णाबरोबर कुडयाचे सालीचे चूर्ण हीं सर्व एकत्र करून तांदळांचे धुवणाशीं किंवा मधाशीं द्यावें. हें पाचन व ग्राहक आहे. व तृषा, अरुचि, ज्वरातिसार, कावीळ, संग्रहणी, गुल्म, प्लीहा, सूज, पांडुरोग व प्रमेह यांचा नाश करितें.

इसबगोलयोग.

इसबगोलइतिप्रथितंजनेहरतितज्ज्वरभाजमनिसृतिं ॥
अनुभवाल्लिखितंनतुशास्त्रतोभवतुतद्भिषजामुपयोगिकं ॥

अर्थ—जाला लोकामध्यें इसबगोल म्हणतात. तो ज्वरातिसारनाशक आहे. हे आपल्या अनुभवानें लिहितों. हें शास्त्रतः लिहित नाहीं, हे वैद्यांचे उपयोगार्थ होवो.

लाजमंड.

उत्पलषष्टिकसिद्धंलाजकमंडादिकंपेयं ॥

अर्थ—कमळ, साठकीभाताच्या लाह्यांच्या मंडांत, कमलकंदाचे चूर्ण घालून. द्यावें, तें उत्तम आहे.

पृश्निपर्ण्यादिपेया.

पृश्निपर्णीबलाबिल्वानागरोत्पलधान्यकैः ॥
ज्वरातिसारीपेयांवापिबेत्साम्लांशृतांनरः ॥

अर्थ–पिठवण, चिकणा, बेलफळ, सुंठ, कमळ व धने, यांची आंबट, पक्क केलेली पेज ज्वरातिसाऱ्यानें प्राशन करावी.

धातक्यादिपेया.

धातकीक्काथसंसिद्धाविश्वभेषजकल्पिता ॥
दाडिमाम्लयुतापेयाज्वरातीसारशूलिनां ॥

अर्थ–धायटीच्या फुलांचा काढा, सुंठीचा कल्क व डाळिंबाचा रस, यांणीं तयार केलेली पेज ज्वरातिसारामधील शूलावर हितकर आहे.

विजयायोग.

एरंडबिल्वयवगोक्षुरकारनालैःस्विन्नांलिहंतिविजयांमधुनान्वितांये ॥
तेषांप्रणाशमुपयांत्युदरामयास्तुसर्वेसशूलविषमज्वरकासहिक्काः ॥

अर्थ–एरंडमूळ, बेलफळ, यव, गोखरू, यांच्या पर्जेत भांग किंवा मोचरस मधुयुक्त सेवन करणाराचे संपूर्ण उदररोग, संपूर्ण शूल, विषमज्वर, खोकला व उचकी, हे उपद्रव नाश पावतात.

पंचामृतपर्पटीरस.

सूतायसीचताम्राभ्रसमंद्विगुणगंधकं ॥ लोहपात्रेबादराग्नौमृदुपाको भवेद्रसः। लेपयेत्कदलीपत्रेकर्तव्यारसपर्पटी ॥ पंचामृतापर्पटीचरसो बन्हिप्रदीपनः ॥ ज्वरातिसारकासघ्नीकामलापांडुमेहजित् ॥अनुपा नंमलेबद्धेज्वरेजीर्णेजमूत्रकं ॥ पलंपथ्यंतुतैलाम्लवर्ज्यमन्यच्चयुक्तितः ॥

अर्थ–पारा, लोहभस्म, ताम्रभस्म व अभ्रकभस्म, हीं समान आणि गंधक दोन भाग, लोहपात्रामध्यें बोरीचे काष्ठामीनें मंद पचवून रस झाला म्हणजे केळीच्या पानावर ही रसपर्पटी, किंवा पंचामृतपर्पटी ओतावी. ही पर्पटी अग्निदीपक आहे; आणि ज्वरातिसार, खोकला, काविळ, पांडुरोग व मेह यांचा नाश करिते. हीं मलावष्टंभ झाला असतां, किंवा जीर्णज्वर असतां शेळीच्या चार तोळे मुतांत द्यावी. हिला पथ्य तेल व आंबट वर्ज्य करावें. बाकीचें युक्तीनें जाणावें.

दरदादिपुटपाक.

दरदश्चैकभागोहिसार्धभागोहिफेनकः ॥ अर्धभागोभवेट्टंकःपिष्टिकां चप्रलेपयेत् ॥ जातीफलंचविन्यस्यसर्वंचपुटपाचितं ॥ मुद्गमात्रंपिबे न्नित्यंपयसाचगवांहितं ॥ ज्वरातिसारेमांद्येचनिद्रानाशेरुचौतथा ॥ योजयेद्भिषजानित्यंबलपुष्टिकरंपरं ॥

अर्थ—हिंगूळ एक भाग, अफु दीड भाग, टांकणखार अर्धा भाग व जायफळ हीं सर्व एकत्र करून पुट द्यावें; आणि मुगा येवढें गाईचे दुधाशीं द्यावें; ह्मणजे ज्वरातिसार, अग्निमांद्य, निद्रानाश, अरुचि यांवर योजावें; आणि हें औषध बल व पुष्टि यांला देणारें आहे.

दुग्धयोग.

विबद्धवातोविट्शूलपरीतःसप्रवाहिकः ॥ सरक्तपित्तश्चपयः
पिबेत्तृष्णासमन्वितः ॥ यथामृतंतथाक्षीरमतिसारेपुपूजितम् ॥
सरक्तोत्थेपुतत्पेयमपांभागेपुसंस्कृतम् ॥

अर्थ—निमें पाणी व निमें दूध एकत्र करून दुग्ध शेष राही तों कढवावें; आणि तें पोटांत वायु धरला व शूळ, प्रवाहिका, रक्तपित्त व ताहान यांवर योजावें. हें जसें अमृत तसेंच हें दूध आहे. हें सर्वरक्तविकारावर योजावें.

कट्फलादिचूर्ण.

कट्फलंमधुकंलोध्रत्वग्दाडिमफलस्यच ॥
सतंदुलजलंचूर्णंवातपित्तातिसारनुत् ॥

अर्थ—कायफळ, ज्येष्ठीमध, लोध्र व डाळिंबाची साल यांचें चूर्ण तांदळाचें धुवणाशीं घ्यावें.

पित्तकफातिसारनिदान.

द्विदोपलक्षणैर्विद्यादतिसारंद्विदोपजं ॥
तेपांचिकित्साप्रोक्तैवविशिष्टाचनिगद्यते ॥

अर्थ—दोन दोषांच्या लक्षणानीं द्विदोषज अतिसार जाणावा. त्या द्विदोषजांची चिकित्सा सांगितली; परंतु विशेष चिकित्सा सांगतो.

मुस्तादिकाढा.

मुस्तासातिविपामूर्वावचाचकुटजःसमाः ॥
एपांकपायःसक्षौद्रःपित्तश्लेष्मातिसारहृत् ॥

अर्थ—नागरमोथे, अतिविष, मोरवेल, वेखंड व कुडयाची साल, यांचा काढा. मधुयुक्त सेवनानें पित्तश्लेष्मातिसाराचा नाश करितो.

समंगादिकाढा.

समंगाधातुकीबिल्वमम्बास्थ्यंभोजकेसरं ॥ बिल्वंमोचरसंलोध्रं
कुटजस्यफलत्वचौ ॥ पिबेत्तंदुलतोयेनकपायंकल्कमेवच ॥
श्लेष्मपित्तातिसारघ्नंरक्तंवाथनियच्छति ॥

अर्थ–चिकणामूळ, धायटीचीं फुलें, बेलफळ, आंब्याची आंठी, कमळकेसर, अथवा बेलफळ, सांवरीचा चोक, लोध्र, कुड्याची साल व इंद्रजव यांचा काढा किंवा चूर्ण तांदळांचे धुवणाशीं द्यावें; ह्मणजे श्लेष्मपित्तातिसार व रक्तातिसार यांचा नाश होतो.

वातकफातिसारनिदान.

रसैःस्वादुकटुप्रायैरुभौवातकफौनृणाम् ॥ कुरुतस्तावतीसाररौद्रौव न्हिंनिहत्यच ॥ द्रवंसफेनंपुरिषंतस्त्वतोह्यामगंधिकं ॥ सशब्दंवेदना वच्चतत्रसंपरिपच्यते ॥ नित्यंगुडगुडावंतंतंद्रामूर्छाभ्रमक्लमैः ॥ प्रस क्तसक्थिकट्यूरुजानुपृष्ठास्थिशूलिनः ॥

अर्थ–गोड व तिखट, हे रस फार भक्षण केले असतां, ते दोन्ही वातकफाला कोपवितात; आणि अग्नीला शांत करून अतिसार उत्पन्न करितात. तो द्रवरूप, फेनयुक्त, आमगंधि, सशब्द व शूल, आम, गुडगुडशब्दयुक्त असतो. व झांपड, मूर्छा, भ्रम, ग्लानि, आणि मांड्या, कमर, गुडघे, ढोंपर व पाठ या मध्यें शूल यांणीं युक्त असतो.

वातकफातिसारीं अन्न.

धान्यपंचकसंसिद्धोधान्यविश्वकृतोथवा ॥
आहारोभेषजायोज्योवातश्लेष्मातिसारिणे ॥

अर्थ–वातश्लेष्मातिसारीरोग्याला धान्यपंचकाचे काढ्यांत, किंवा धने व सुंठ, यांच्या काढ्यांत सिद्ध केलेला आहार वैद्यानें योजावा.

चित्रकादि काढा.

चित्रकातिविषामुस्तंवलाबिल्वंसनागरं ॥
वत्सकत्वक्फलंपथ्यावातश्लेष्मातिसारनुत् ॥

अर्थ–चित्रकमूळ, अतिविष, नागरमोथे, चिकणामूळ, बेलफळ, सुंठ, इंद्रजव, कुड्याची साल व बाळहरीतकी यांचा काढा वातश्लेष्मातिसारनाशक आहे.

उपचारक्रम.

वातातिसारेयच्चोक्तंपाचनंग्राहिभेषजं ॥
तदत्रापिचयुंजीतसपित्तकफमारुते ॥

अर्थ–जे वातातिसारावर उपाय सांगितले. ते किंवा पाचन, बंदेज अशीं औषधें. आणि अन्नें हीं सर्व पित्त, वात व कफ यानीं युक्त अतिसारावर योजावीं.

बिल्वादिकाढा.

बिल्वचूतास्थिनिर्यूहःपीतःसक्षौद्रशर्करः ॥
निहन्याच्छर्द्यतीसारंवैश्वानरइवाहुतिं ॥

अर्थ—बेलफळ, आंब्याच्या बांठीचा रस, साकर व मध घालोन घेतला असतां, वांति व अतिसार, यांचा नाश करितो. जसा अग्नि सर्वत्राचा नाशकरितो.

प्रियंग्वादिकाढा.

प्रियंग्वंजनमुस्ताख्यंपाययेत्तुयथाबलं ॥
तृष्णातिसारछर्दिघ्नंसक्षौद्रंतंदुलांबुना ॥

अर्थ—गव्हला, शेवगा व नागरमोथे यांचे चूर्ण किंवा कल्क तांदुळांचे धुवणाशीं मध घालोन बलाबल पाहून द्यावा. तो तृषा, अतिसार व वांति यांचा नाश करितो.

आम्रादिकाढा.

आम्रास्थिमध्यंमालूरफलक्काथःसमाक्षिकः ॥
शर्करासहितोहन्याच्छर्द्यतीसारमुल्बणं ॥

अर्थ—आंब्याच्या आंठीचा मगज व बेलफळ, यांचा काढा मध व साकर घालोन द्यावा. हा मोठया ही ओकारीसहित अतिसाराचा नाश करितो.

मुद्गकषाय.

कषायोभ्रष्टमुद्गनांसलाजमधुशर्करः॥
निहन्याच्छर्दतीसारंतृष्णांदाहंज्वरंभ्रमं ॥

अर्थ—भाजलेल्या मुगांचा काढा, लाह्या, मध व साकर घालोन द्यावा; ह्मणजे छर्दि, अतिसार, तृषा, दाह, ज्वर व भ्रम, यांचा नाश करितो.

पटोलादिकाढा.

पटोलयवधान्याकक्काथःपीतःसुशीतलः ॥
शर्करामधुसंयुक्तश्छर्द्यतीसारनाशनः ॥

अर्थ—कडुपडवळ, इंद्रजव व धने यांचा काढा थंड करून मध व साकर घालून प्यावा; ह्मणजे तो छर्द्यतीसारनाशक आहे.

जंब्वादिकाढा.

जंब्वाम्रपल्लवोशीरंवटशृंगावरोहकं ॥ रसःक्काथोथवाचूर्णंक्षौद्रेणस हयोजितं ॥ छर्दिज्वरमतीसारंमूर्छांतृष्णांचदुर्जयां ॥ नियच्छत्यचि राद्धंतिस्रुतिंवानेकहेतुकां ॥

अर्थ—जांभूळ व आंबा या दोघांचे पल्लव, वाळा, वडाच्यापारंब्या व शिंगाडे यांचा काढा अथवा चूर्ण, अथवा रस, मधाशीं सेवन केला असतां, ओकारी, ज्वर, अतिसार मूर्छा व तृषा, हीं दुर्जय जरीं असलीं तरीं त्यांचा नाशक आहे; आणि अनेकप्रकारचा अतिसार याचा नाशक आहे.

पुरीषातिसारावर.

दीप्ताग्निभिःपुरीषंयत्सार्यतेफेनिलंशकृत् ॥
सर्पिर्वेत्फाणितंशुंठीदधितैलंपयोघृतं ॥

अर्थ—दीप्ताग्निपुरुषाला फेनयुक्त व मळमिश्रित ढाळ होतात. त्याणें राव, सुंठ, दहीं, तेल, दूध, तूप, हे पदार्थ प्राशन करावे.

पुरीषक्षयावर.

बलाविश्वशृतंक्षीरंगुडतैलानुयोजितं ॥
दीप्ताग्निंपाययेत्प्रातःसुखदंवर्चसःक्षये ॥

अर्थ—दीप्ताग्निपुरुषाला मलक्षय झाला असतां, त्याला चिकणा, सुंठ, यांच्या योगानें तापविलेलें दूध, तेल व गूळ घालून प्रातःकाळीं पाजावें; म्हणजे सुखकारक होतें

दुसरा प्रकार.

रंभाखंडंरुचिकरंसघृतंदधिमिश्रितं ॥
खादेत्सेवेच्चमृद्वन्नंतथितंशकृतक्षये ॥

अर्थ—केळयाचीं खंडें तूप व दहीं यांत पचऊन भक्षावीं; आणि मृदु अन्न भक्षावें. ते पुरीषक्षयावर फार हितकर होय.

शोफातिसारीं देवदार्व्यादिकाढा.

सदेवदारुःसविषःसपाठःसजंतुशत्रुःसघनःसतीक्ष्णः ॥
सवत्सकःक्वाथउदाहृतोसौशोफातिसारांबुधिकुंभजन्मा ॥

अर्थ—देवदार, अतिविष, पाहाडमूळ, वावडिंग, नागरमोथा, मिरे, कुडा, यांचा काढा शोफातिसार हाच समुद्र याला अगस्तीऋषीसारखा आहे.

विडंगादिकाढा.

विडंगातिविषामुस्तादारुपाठाकलिंगकं ॥
मरीचेनसमायुक्तंशोथातीसारनाशनं ॥

अर्थ—वावडिंग, अतिविष, नागरमोथा, देवदारु, पाहाडमूळ, कुडा व मिरें, यांचा काढा; शोथातीसारनाशक आहे.

किरातादिकाढा.

किराताब्दामृताविश्वचंदनोशीरवत्सकैः ॥
शोथातीसारशमनंविशेषाज्ज्वरनाशनं ॥

अर्थ—किराइत, नागरमोथा, गुळवेल, सुंठ, चंदन, वाळा व कुडा यांचा काढा शोथातीसार आणि विशेषेकरून ज्वर यांचा नाशक आहे.

पाठादिकाढा.

पाठाविपावत्सकमेघदारुविडंगकामोचरसैःकषायं ॥
कृतंप्रभातेप्रपिबेद्रदातिशोफातिसारार्णववाडवाग्निः ॥

अर्थ—पाहाडमूळ, अतिविष, कुड्याची साल, नागरमोथा, दारुहळद, वावडिंग व मोचरस यांचा काढा प्रातःकाळीं प्राशन केला असतां,तो शोफातिसारसमुद्राला,वाडवाग्निसारखाआहे.

शोथघ्न्यादिकाढा.

शोथघ्नींद्रयवापाठाविडंगातिविषाघनाः ॥
क्वथित्वासोपणाःपीताःशोथातीसारनाशनाः ॥

अर्थ—पुनर्नवा, इंद्रजव, पाहाडमूळ, वावडिंग, अतिविष व नागरमोथा, यांचा काढा सुंठ, मिरीं व पिंपळी-यांचें चूर्ण घालोन घेतल्यानें शोथातिसार नाश पावतो.

भस्मातिसारनिदान.

कोष्ठाग्निःशीतपवनेनपच्यतेनव रितृषार्तःसमयेनपिबतिजंतुः ॥
शैथिल्यस्निग्धसदृशंद्रवमामयुक्तंभस्मातिसारकगदःखलुएषदिष्टः ॥

अर्थ—शीतवायूनें युक्त कोष्ठाग्नि आहाराला चांगला पचवीत नाहीं. व तृषा लागली असतां, वेळेवर पाणी पीत नाहीं. त्याला शिथिल, चिकण, द्रवरूप व आमयुक्त असा भस्मा शौचाला होतो. तो भस्मातिसार सांगितला आहे.

शाल्मलिचूर्ण.

शाल्मलीशुष्कनिर्यासयवानीधातकीशिफा ॥ तिलासर्जरसःस
पिंलोध्रंसमविचित्रितं ॥तद्भक्षणमतीसारंनिहंतिभस्मरापहं ॥

अर्थ—मोचरस, ओंवा, धायटीचीं मुळें, तिळ, राळ व लोध्र, यांचें चूर्ण तुपाशीं खाणें म्हणजे तें भस्मातिसाराचा नाश करितें.

हिंग्वादिजलयोग.

हिंगुशुंठीविडंगंचसौवर्चलसमन्वितं ॥
कर्षयुग्ममितंतोयंभक्षितंभस्मरापहं ॥

अर्थ–हिंग, सुंठ, वावडिंग व सैंचळ यांचें चूर्ण दोन तोळे पाण्याशीं द्यावें; म्हणजे तें भक्ष्यातिसाराचा नाश करितें.

रोहिण्यादिपाचन.

रोहिण्यतिविषापाठावचाकुष्ठसमुद्भवः ॥
क्वाथःपीतोनिहंत्येवसर्वातिसारजांरुजं ॥

अर्थ–कुटकी, अतिविष, पाहाडमूळ, वेखंड व कोष्ट यांचा काढा प्याला असतां, सर्वातिसारनाश करील.

ऱ्हीवेरादि काढा.

ऱ्हीवेरधातकीलोध्रपाठालज्जालुवत्सकैः ॥ धान्यकातिविषामुस्तगुडूचीबिल्वनागरैः ॥ कृतःकषायःशमयेदतिसारंचिरोत्थितं ॥ अरोचकामशूलास्रज्वरघ्नःपाचनःस्मृतः ॥

अर्थ–वाळा, धायटीफूल, लोध्र, पाहाडमूळ, लाजाळू, कुडयाचें पाळ, धने, अतिविष, नागरमोथे, गरुडवेल, कोंवळें वेलफळ व सुंठ, या बारा औषधांचा काढा प्याला असतां, फारदिवसांचा अतिसार, अरुचि, आमशूल व ज्वर यांला दूर करितो; तसाच वेलाची साल व मोठ्या आंब्याची साल यांचा काढा करून त्यांत मध व साकर घालोन घेतला असतां, सर्व अतिसार जातात, असें ग्रंथांतरीं आहे.

धातक्यादिकाढा बाळांचे सर्वातिसारावर.

धातकीबिल्वलोध्राणिवालकंगजपिप्पली ॥ एभिःकृतंशृतंशीतंशिशुभ्यःक्षौद्रसंयुतं ॥ प्रदद्यादवलेहंवासर्वातिसारशांतये ॥

अर्थ–धायटीफूल, कोंवळें वेलफळ, लोध्र, वाळा व गजपिंपळी या पांच औषधांचा काढा करून थंड जाहाल्यावर त्यांत मध मेळवून द्यावा; अथवा चाटण करून द्यावें त्याणें बाळकांचे सर्व अतिसार जातात.

आनंदभैरवरस.

दरदंवत्सनाभंचमरिचंटंकणंकणा ॥ चूर्णयेत्समभागेनरसोह्यानंदभैरवः ॥ गुंजैकंवाद्विगुंजंवाबलंज्ञात्वाप्रयोजयेत् ॥ मधुनालेहयेच्चानुकुटजस्यफलंत्वचं ॥ चूर्णितंकर्षमात्रंतुत्रिदोषोत्थातिसारनुत् ॥ दध्यन्नंदापयेत्पथ्यंगवाज्यंतक्रमेवच ॥ पिपासायांजलंशीतंविजयाचाहितानिशि ॥

अर्थ–हिंगूळ, शुद्धकेलेला वचनाग, मिऱ्यें, टांकणखार, व पिंपळी, हीं पांच औषधें समभाग घेऊन सान्यांचा एकाजागीं खलं करून बारीक चूर्ण करावें. याला आनंदभै-

रव असें ह्मणतात. हा आनंदभैरव रस इंद्रजव व कुडेसाल हीं दोन्हीं एक कर्षप्रमाण घेऊन चूर्ण करून त्याशीं रोगाचे बलाबल पाहून एक गुंजाप्रमाण अथवा दोन गुंजा प्रमाण मधांत घ्यावा. तेणेंकरून त्रिदोषापासून जाहाला जो अतिसार तो दूर होतो; आणि पथ्याला गाईचें दहीं, भात, अथवा तूपभात अथवा ताकभात घ्यावा. व ताहान लागली असतां, थंड पाणी घ्यावें, व रात्रीस थोडी भांग शुद्ध करून घ्यावी. ती भांग अतिसारी यास हितकारक होते, असे जाणावें.

आनंदरस.

जातीफलंसैंधवहिंगुलंचवराटशुंठीविषहेमबीजम् ॥ सपिप्पलींकंवटिकांचकुर्याद्गुंजाप्रमाणांजठरामयघ्नीं ॥ निहंतिवातंकफशूलमात्रमामातिसारंग्रहणीविकारम् ॥ निहंतिशुष्कंसितयासमेतंरसोयमानंद इतिप्रदिष्टः ॥

अर्थ—जायफळ, सैंधव, हिंगूळ, कवडीचें भस्म, सुंठ, बचनाग, धोत्र्याचें बीं, पिंपळी हीं सर्व एकत्र खलून गुंजभार गोळी, साखरे बरोबर खावी; ह्मणजे पोटांतील रोग, वात, कफ, शूळ, आमातिसार, संग्रहणी व योनिरोग यांचा नाश करील. याला आनंदरस असें ह्मणतात.

दाडिमाष्टक.

कर्षोन्मितातुगोक्षीरीचातुर्जातंत्रिकार्षिकम् ॥ यवानीधान्यकाजाजीग्रंथीव्योषपलांशकम् ॥ पलानिदाडिमान्यष्टौसितायांश्चैकतःकृतं ॥ गुणैःकपित्थाष्टकवच्चूर्णंतद्दाडिमाष्टकं ॥

अर्थ—वंशलोचन एक तोळा, दालचिनी, तमालपत्र, वेलांचे दाणे, नागकेशर मिळून तीन तोळे, ओंवा. धने, जिरे, पिंपळमूळ, सुंठ, मिरें, पिंपळी मिळून चार तोळे, डाळिंबें बत्तीस तोळे, साखर बत्तीस तोळे, सर्व एकत्र करून चूर्ण करावें. त्याला दाडिमाष्टक चूर्ण असें ह्मणतात. गुणानीं कपित्थाष्टकासारखें आहे.

लघुगंगाधरचूर्ण.

मुस्तमिंद्रयवंविल्वंलोध्रंमोचरसंतथा ॥ धातकींचूर्णयेत्तक्रगुडाभ्यांपाययेत्सुधीः ॥ सर्वातिसारशमनंन्यरुणद्धिप्रवाहिकां ॥ लघुगंगाधरंनामचूर्णंसंग्राहकंपरं ॥

अर्थ—नागरमोथे, इंद्रजव, कोंवळें बेलफळ, लोध्र, मोचरस व धायटीफूल या साहा औषधांचें चूर्ण करून ताकांत गूळ मेळवून त्यांत तें चूर्ण टाकून घ्यावें. तेणेकरून

...म्वाहिका म्हणजे पातळ भसा हगतो, तें बंद होतें. या चूर्णाला लघु गंगाधरचूर्ण असें म्हणावें. व हें चूर्ण मलाचा अवष्टंभ करणारें चांगलें आहे, असें जाणावें.

वृद्धगंगाधरचूर्ण.

मुस्तारलुकशुंठीभिर्धातकीलोध्रवालकैः ॥ बिल्वमोचरसाभ्यांचपाठें द्रयववत्सकैः ॥ आम्रबीजंप्रतिविषालज्जालुरितिचूर्णितं ॥ क्षौद्रतं दुलपानीयैःपीतैर्यातिप्रवाहिका ॥ सर्वातिसारग्रहणीप्रशमंयातिवे गतः ॥ वृद्धगंगाधरंचूर्णंसरिद्वेगविबंधकं ॥

अर्थ—नागरमोथे, टेंटू, सुंठ, धायटीफुलें, लोध्र, वाळा, कोंवळें बेलफळ, मोचरस, पाहाडमूळ, इंद्रजव, कुडेसाल, आंब्याची कोय, अतिविष व लाजेरी, या १४ औषधांचें चूर्ण तांदुळाचें धुणांत मध मेळवून घ्यावें. तेणेंकरून प्रवाहिका म्हणजे पातळ हगवण लागते ती दूर होत्ये. सारे अतिसार व संग्रहणी लवकर दूर होतात. या चूर्णाला वृद्ध गंगाधर चूर्ण असें म्हणतात. हें चूर्ण अतिसाराचा वेग नदीचे वेगासारखा असला तरी त्याला थांबवितो.

अजमोदादिचूर्ण.

अजमोदामोचरसंसशृंगवेरंसधातकीकुसुमं ॥
गोदधिमंथितयुक्तंगंगामपिवाहिनींरुध्यात् ॥

अर्थ—अजमोदा, मोचरस, आलें व धायटीफुलें या चार औषधांचें चूर्ण पाण्यावांचून घुसळलेल्या गाईचे दह्यांत घोळून घ्यावें. तेणेंकरून गंगेचे प्रवाहासारखा प्रवाह ज्या अतिसाराचा आहे, तोही बंद होतो.

वृहदाडिमाष्टक.

दाडिमस्यफलान्यष्टौशर्करायाःपलाष्टकं ॥ पिप्पलीपिप्पलीमूलं यवानीमरिचंतथा ॥ धान्यकंजीरकंशुंठीप्रत्येकंपलसंमितं ॥ कर्षमा त्रातुगोक्षीरीत्वक्पत्रैलाश्चकेसरं ॥ प्रत्येकंकोलमात्राःस्युस्तच्चूर्णंदाडि माष्टकं ॥ अतिसारंक्षयंगुल्मंग्रहणींचगलग्रहं ॥ मंदाग्निंपीनसंकासं चूर्णमेतद्व्यपोहति ॥

अर्थ—डाळिंबसाल आठ पळें, साकर आठ पळें, पिंपळी, पिंपमूळ, अजमोदा, मिरें, धने, जिरें व सुंट, हीं सात औषधें एक एक पळ व वंशलोचन एक कर्ष, दालचिनी, तमालपत्र, विलायची व नागकेशर, हीं चार औषधें कोल कोल प्रमाण घ्यावीं. मग सारीं

औषधें कुटून चूर्ण करावें. याला मोठें दाडिमाष्टक असें ह्मणतात. हें चूर्ण घेतलें असतां, अतिसार, क्षय, गुल्म, संग्रहणी, कंठरोग, अग्निमांद्य, पडसें व कास, हीं दूर होतात.

धातक्यादि चूर्ण.

श्रीधातकीमोचरसाब्दलोध्रकलिंगविश्वौषधचूर्णमेतत् ॥
पेयंगुणाढ्यंगुडतक्रयुक्तंगाढंत्वतीसारकनाशकंच ॥

अर्थ—वाळवेल, धायटीफूल, मोचरस, नागरमोथा, लोध्र, कुडयाची साल व सुंठ यांचें चूर्ण गुळ व ताक यांशीं घ्यावें; ह्मणजे अतिसारनाश होतो.

भल्लातादिचूर्ण.

भल्लातानांद्विखंडानांद्वेपलेभर्जितेक्षिपेत् ॥ शुंठ्याःपलंतुचेतक्याःपलार्धं सुमनापलं ॥ कर्षंमेथीवेल्लजीराःसर्षपाःकोलमात्रतः ॥ ततोयवान्यर्ध, पलंपिप्पलीरामठौषणं ॥ विडंसैंधवजीरंचकिर्माणिसंज्ञिकंतथा ॥ कर्ष प्रमाणंविज्ञेयंवैद्यविद्याविशारदैः ॥ सर्वमेकत्रसंचूर्ण्ययथासात्म्यंतुभक्ष येत् ॥ दध्नासहतथाखादेत्सर्वातीसारनाशनं ॥

अर्थ—बिबवे दुखंड करून भाजलेले आठ तोळे, सुंठ चार तोळे, हरीतकी दोन तोळे, गहूं चार तोळे, मेथी, मिरीं व जिरें हीं कर्ष व शिरस दोन मासे, ओंवा दोन तोळे आणि पिंपळी, हिंग, चित्रक, बिडलोण, सैंधव, जिरें व किर्माणि ओंवा हीं प्रत्येकीं एकेक तोळा. या प्रमाणें सर्व एकत्र करून सोसेल त्या मानानें दह्यांशीं खावें. तें सर्वातिसाराचा नाश करितें.

लघुलाईचूर्ण.

सूतंगंधंत्रिकटुकंदीप्यकंजीरकद्वयं ॥ सौवर्चलंसैंधवंचरामठं बिडमेवच ॥ शक्राव्हस्यचचूर्णंतुचूर्णतुल्यंप्रदापयेत् ॥ संग्रहं शूलमानाहंहन्यान्नानातिसारकं ॥

अर्थ—पारा, गंधक, सुंठ, मिरीं, पिंपळी, ओंवा, जिरें, शहाजिरें, संचळ, सैंधव, हिंग व बिडलोण हीं समभाग आणि या सर्वांबरोबर कुडयाच्या सालीचें चूर्ण. हीं सर्व एकत्र करावीं. याला लघुलाईचूर्ण ह्मणतात. हे संग्रहणी, शूल, आनाह वायु, आणि नाना प्रकारचे अतिसार यांचा नाश करितें.

यवान्यादिचूर्ण.

यवानीपिप्पलीमूलचतुर्जातकनागरैः ॥ मरीचाग्निजलाजाजीधान्य सौवर्चलैःसमैः ॥ वृक्षाम्लधातुकीकृष्णाबिल्वदाडिमदीप्यकैः ॥ त्रिगु

णे:षड्गुणार्सितैःकपित्थाष्टगुणीकृतैः ॥ चूर्णोतिसारग्रहणीक्षयगुल्मा न्गलामयान् ॥ कासश्वासारुचीहिक्कांकपित्थाष्टमिदंजयेत् ॥

अर्थ—ओंवा, पिंपळीमूळ, दालचिनी, तमालपत्र, एलची, नागकेशर, सुंठ, मिरीं चित्रक, वाळा, जिरें, धने व संचळ हीं समभाग आणि आंबसोल, धावशीचीं फुलें, पिंपळी, वेलफळ, डाळिंब व पिवळे जिरें हीं तिप्पट, साकर साहापट, आणि कवठें आठपट, यांचें चूर्ण एकत्र करावें, याला कपित्थाष्टक ह्मणतात. हे अतिसार, ग्रहणी, क्षय, गुल्म, गलरोग, खोकला, श्वास, अरुचि व उचकी यांचा नाश करितें.

वत्सकादिघृत.

वत्सकस्यचबीजानिदार्व्याश्चैवत्वगुत्तमा ॥ पिप्पलीशृंगवेरंच लाक्षाकटुकरोहिणी ॥ षड्भिरेतैर्घृतंसिद्धंपेयंमंडविमिश्रितं ॥

अर्थ—इंद्रजव, दारुहळद, पिंपळी, सुंठ, लाख व कुटकी, ह्या साहा औषधांनीं घृत सिद्ध करून मंडावरोबर घ्यावें; ह्मणजे अतीसार शमतो.

विल्वतैल.

तुलांसंकुट्यविल्वस्यपचेत्पादावशेषितं ॥ सक्षीरंसाधयेत्तैलंश्लक्ष्णपिष्टैरिमैःसमैः ॥ विल्वंसधातुकीकुष्ठंशुंठीरास्नापुनर्नवा ॥ देवदारु वचामुस्तालोध्रमोचरसान्वितं ॥ एतन्मृद्वग्निनापक्कंग्रहण्यर्शोतिसार नुत् ॥ विल्वतैलमितिख्यातमत्रिपुत्रेणभाषितं ॥ ग्रहण्यर्शोविकारेये स्नेहाःसमुपदर्शिताः ॥ प्रयोज्यास्तेतिसारेपित्रयाणांतुल्यहेतुना ॥

अर्थ—बेलफळें १०० तोळे कुटून त्याचा चतुर्थांश काढा करावा, त्यांत दूध व तेल हीं घालोन नंतर बेलफळ, धायटीचीं फुलें, कोष्ठ, सुंठ, रास्ना, पुनर्नवा, देवदार, वेखंड, मोथे, लोध्र व सांवरीचा चीक, यांचे कल्क घालावे; आणि तें तेल शेष राही पर्यंत पचन करावें. हे विल्वतैल अत्रिपुत्रानें सांगितलें, हें संग्रहणी, मुळव्याध, आणि अतिसार यांवर योजावें. व जे संग्रहणी व अर्श यांवर सांगितलेले उपचार ते तिघांस ही सारखे हेतु आहेत, याकरितां ते सर्व अतिसारावर योजावे.

शंखोदररस.

सुतभस्मबलीलोहंविषंत्रिकटुकंसमं ॥ पिष्ट्वानिंबुजतोयेनशंखेसर्वंचतुर्गुणे ॥ क्षिप्त्वामृद्ंशुकैर्लिप्त्वाभांडेगजपुटेपचेत् ॥ शीतेचप्राग्विषं क्षिप्त्वावल्लमात्रंप्रयोजयेत् ॥ जातीफलंचविजयामधुनातिसृतौददेत् ॥ ग्रहण्यांचित्रकार्द्रांबुविजयाविश्वभेषजं ॥ पृथक्देयंसमधुनामरि

चैश्वघृतान्वितं ॥ वन्हिमांद्यक्षयेतद्वदुदरात्यनिलामये ॥ पथ्यंदध्ना चतक्रेणक्षीरशाकैश्चसंयुतं ॥

अर्थ-पारदभस्म, गंधक, लोह, बचनाग, सुंठ, मिरीं व पिंपळी हीं समभाग लिंबाच्या रसांत खलून चौपट शंखामध्यें भरावें; आणि मातकापड करून भांड्यांत घालोन गजपुट द्यावें. थंड झाल्यानर त्यांत एक भाग वचनाग मिळवावा. व भरून ठेवावें; आणि वालमात्र जायफळ, भांग व मध यांशीं अतिसार व संग्रहणी यांवर द्यावा. व चित्रक, आलें, वाळा, भांग व सुंठ, मिरीं, याचें चूर्ण, तूप व मध यांशीं अग्निमांद्य, क्षय, उदर व वायु यांवर द्यावें; आणि पथ्याला दहीं, ताक, दूध व शाक हे पदार्थ द्यावे.

मूलिकाबंध.

रक्तसूत्रैःकटौबध्वासर्पाक्षीवाटयमूलकैः ॥
स्नुह्यावासहदेव्यावामूलंस्यादतिसारजित् ॥

अर्थ-तांबड्या सुतानें कमरेंत गुळवेल, वला, निवडुंग किंवा सहदेवी यांचें मूळ बांधावें; ह्मणजे तें अतिसाराचा नाश करितें.

दाडिमीवटी.

शुंठीजातीफलंचाहिफेनंकद्विगुणंभवेत् ॥ अपक्वंदाडिमीबीजंसर्वंतुल्यंप्रदापयेत् ॥ अपक्वदाडिमीबीजकोशेक्षिप्त्वामृदंलिपेत् ॥ पुटपाकविधानेनपक्त्वाकोशसमन्वितं ॥ पिष्ट्वाकल्कंविधायाथगुटिकाः संप्रकल्पयेत् ॥ बादरास्थिप्रमाणेनतक्रेणसहदापयेत् ॥ पक्वातिसारशमनीदाडिमीवटिकामता ॥

अर्थ-सुंठ व जायफळ यांचें दुप्पट अफू आणि त्यांच्या समान हिरव्या डाळिंबाचे दाणे अपक्वडाळिंबांत घालून मातकापड करून पुटपाक विधीनें पाक करून वाटून कल्क करून बोराचे बी एवढ्या मोठ्या गोळ्या करून ताकाबरोबर, एकेक द्यावी. तीं पक्वातिसाराचा नाश करील.

बव्वूल्यादिआंगरस.

स्थूलबब्बूलिकापत्ररसःपानाद्व्यपोहति ॥
सर्वातिसारान्श्योनाककुटजत्वक्रसोथवा ॥

अर्थ-निःकंटक थोर बाभळीचे पानांचा आंगरस प्याला असतां, सारे अतिसार दूर होतात; किंवा टेंटूचे सालीचा अंगरस, अथवा कुड्याचे सालीचा अंगरस यांतील कोणताही आंगरस घेतला असतां; सारे अतिसार दूर होतात.

न्यग्रोधादिपुटपाक.

न्यग्रोधादेश्वकल्केनपूरयेद्बौरतित्तिरैः ॥ निरंत्रमुदरंसम्यक्पुटपाके

नतत्पचेत् ॥ तत्कल्कःस्वरसःक्षौद्रयुक्तःसर्वातिसारनुत् ॥

अर्थ—वड, उंबर, पिंपळ, पायरी व जलवेतस यांच्या सालीचें चूर्ण करून पाण्यांत वाटून कल्क करून, तो कल्क पांढरे तित्तिरपक्षी यांचे पोटांमध्यें भरून, पूर्वी पुटपाकाची कृति सांगीतली आहे, त्या रितीनें कृति करून अग्नि द्यावा; नंतर तो तित्तीर बाहेर काढून त्याचे उदरांत कल्क असतो, त्याचा रस काढून त्यांत मध मेळवून प्यालें असतां, सारे अतिसार दूर होतात.

अहिफेनयोग.

अहिफेनंसुसंभृष्टंखर्परेमृदुवन्हिना ॥

पक्वातिसारशमनंभेषजंनास्त्यतःपरं ॥

अर्थ—खापरांत मंदाग्नीवर अफू भाजून द्यावी. यासारिखें पक्वातिसार शमविणारें दुसरें औषध नाहीं.

मुक्ताभस्मयोग.

मुक्ताभस्मेतिनामेदंदोषंदृष्ट्वाप्रदापयेत् ॥ गुंजार्धमेकगुंजंवाक

र्पूरेणसुवासितं ॥ जातीफलादिसंयुक्तंरहस्यंपरमंमतं ॥

अर्थ—मोत्याचें भस्म दोष पाहून गुंज, अर्धगुंज किंवा दीड गुंज कापुराचा वास लाऊन जायफळादिकांबरोबर द्यावें. हें अतिसारावर परम रहस्य आहे.

जातीफलादिवटी.

जातीफलंचखर्जूरमहिफेनंतथैवच ॥ समभागानिसर्वाणिना

गवल्लीरसेनच ॥ वल्लमात्रावटीकार्यादेयातक्रानुपानतः ॥

अतिसारंजयेद्धोरंवैश्वानरइवाहुतिं ॥

अर्थ—जायफळ, खारीक व अफू, हे पदार्थ समभाग घेऊन पानवेलीच्या रसांत वाल एवढी गोळी करून ताकाशीं द्यावी; ह्मणजे ती घोररूपअतिसाराचा नाश करित्ये. जसा अग्नि आहुतीचा नाश करितो तशी.

मरीचादिवटी.

मरीचंखर्परंनागफेनंतंदुलतज्जलैः ॥ मर्धंतंदुलतोयेनगुटीस

र्वातिसारजित् ॥ जीरकंविजयाबिल्वंनागफेनंसमांशकं ॥ द

धिनीरेणसाकार्यागुटीसर्वातिसारजित् ॥

अर्थ--मिरीं, कलवापरी व अफु हे पदार्थ तांदुळांचे धुवणाशीं घोटावे. त्याची गोळी खावी. ती सर्व अतिसारांचा नाश करिते; अथवा जिरे, भांग, बेलफळ व अफीम हे पदार्थ समभाग घेऊन दह्याचे निवळीशीं वाटून त्याची गोळी करावी. ही गोळी सर्वअतिसारांचा नाश करिते.

अंकोलकल्क.

अंकोलमूलकल्कश्चसक्षौद्रस्तंदुलांवुना ॥
अतिसारहरःप्रोक्तस्तथाविषहरःस्मृतः ॥

अर्थ--अंकोलवृक्षाच्या मुळ्या वाटून कल्क करून त्यांत मध मेळवून तांदुळांच्या धुणांत प्यालें असतां, अतिसार दूर होतो; व बचनागादिक विष व सर्पादिकांचीं विषें दूर होतात.

कपित्थकल्क.

मध्यंलीढ्वाकपित्थस्यसव्योपक्षौद्रशर्करम् ॥
कट्फलंमधुयुक्तंवामुच्यतेजठरामयात् ॥

अर्थ--कवठाचा गीर, सुंठ, मिरें, पिपळी व मध, साकर, हीं एकत्र करून खावीं; अथवा कायफळ मधाबरोबर खावें; ह्मणजे पोटांतला रोग जातो.

आर्द्रकुटजावलेह.

कुटजत्वक्तुलामार्द्रांद्रोणनीरेविपाचयेत् ॥ पादशेषंशृतंनीत्वाचूर्णा न्येतानिदापयेत् ॥ लज्जालुर्धातकीबिल्वंपाठामोचरसस्तथा ॥ मुस्तंप्रतिविषाचैवप्रत्येकंस्यात्पलंपलं ॥ ततस्तुविपचेद्भूतोयावद्दर्वी प्रलेपनं ॥ जलेनछागदुग्धेनपीतोमंडेनवाजयेत् ॥ सर्वातिसारान्घो रांस्तुनानावर्णान्सवेदनान् ॥ असृक्दरंसमस्तंचसर्वांशांसिप्रवाहिकां ॥

अर्थ--कुडयाची साल ओली एक तुला प्रमाण आणून थोडी कुटून त्यांत पाणी एक द्रोण प्रमाण घालून चवथाई पाणी राही तों पर्यंत काढा करून गाळून घ्यावा; नंतर लाजेरी, धायटीफूल, कोंवळें बेलफळ, पाहाडमूळ, मोचरस, नागरमोथे व अतिविष हीं सात औषधें पळ पळ प्रमाण घेऊन चूर्ण करून त्या काढ्यांत टाकुन फिरून लोखंडाचे पळीला लेप लागे अता कढवून घण करावा. मग हा लेप पाण्यांत अथवा शेळीचे दुधांत किंवा मंडांत घ्यावा. तेणें करून वेदनायुक्त व नीलपीतादिक नानाप्रकारचे वर्ण ज्या अतिसारामध्यें आहेत, व घोररूप असे संपूर्ण अतिसार दूर होतात, व स्त्रियांस संपूर्ण प्रकारची धुपणी लागते ती व संपूर्ण मुळव्याधि व प्रवाहिकारोग ह्मणून अतिसाराचा भेद आहे तो. हे सारे रोग दूर होतात.

दाडिंवपुटपाक.

पुटपाकेनविपचेत्सपक्वंदाडिमीफलं ॥
तद्रसोमधुसंयुक्तःसर्वातिसारनाशनः ॥

अर्थ–पिकलेलें दाळिंब आणून, पूर्वी सांगितली जी पुटपाकाची कृति त्या रितीनें कृति करून अग्नि द्यावा; नतर ते दाळिंब बाहेर काढून पिळून रस काढून त्यांत मध मेळवून प्यालें असतां, सारे अतिसार दूर होतात.

जातीफलादिपुटपाक.

जातीफलंसर्वफेनंटंकंगंधकजीरके ॥ ऐतानिसमभागानिबा
लदाडिमबीजकैः ॥ पेषयेत्तेनकल्केनपूरयेद्दाडिमीफलम् ॥
अंगारेतत्रगोधूमचूर्णेनालेपितंपचेत् ॥ अतिसारस्तंभनंस्या
त्परंदीपनपाचनम् ॥

अर्थ–जायफळ, अफू, टाकणखार, गंधक व जिरें, हीं समभाग, आणि यांच्या बरोबर कोंवळ्या डाळिंबाच्या बिया घेऊन एकत्र खलून तो कल्क ह्मणजे खललेला गोळा डाळिंबांत भरून बाहेरून कणीक लावून निखाऱ्यांत भाजावें; ह्मणजे तें अतिसाराचें स्तंभन करणारें, दीपन, पाचन असें होतें. शक्ति पाहून वाल किंवा दोन वाल द्यावें.

मोचरसादिपुटपाक.

समोचसारंसहनागफेनंसजातिसस्यंपुटपाकयोगात् ॥
निहंतिमालूरफलंनराणांसर्वातिसारंह्यनुभूतमेतत् ॥

अर्थ–कांटेसांवरीचा डीक, अफू, जायफळ व बेलफळाचा गीर एकत्र करून माहाळुं-गांत भरून पुटपाक करावा. तो सर्वातीसारनाशक हें अनुभूत आहे.

प्रवाहिकासंप्राप्ति.

वायुःप्रवृद्धोनिचितंवलासंनुदत्यधस्तादहिताशनस्य ॥
प्रवाहतोल्पंवहुशोमलाक्तंप्रवाहिकांतांप्रवदंतितद्ज्ञाः ॥

अर्थ–शरीरांत वायु कुपित होऊन अपथ्यपदार्थ भक्षणार पुरुषाचे शरीरांत संचित जो कफ, त्यातें मळमिश्रित असा अपानद्वारावाटे प्रवाहणेंकरून बाहेर टाकितो, त्या रोगाला वैद्य प्रवाहिका ह्मणतात.

प्रवाहिकावातकृतासशूलापित्तात्सदाहासकफाकफाच्च ॥
सशोणिताशोणितसंभवाच्चताःस्नेहरूक्षप्रभवामतास्तु ॥

अर्थ–वातजन्यप्रवाहिकेचे ठायीं शूल असतो, पित्ताधिक प्रवाहिका दाहयुक्त असत्ये, व कफजन्यप्रवाहिका कफयुक्त असत्ये. रक्तसंभव जी प्रवाहिका ती रक्तयुक्त असत्ये. या सर्व प्रवाहिका प्रायः स्नेह व रूक्ष अशा पदार्थांच्या सेवनेंकरून होतात, असें जाणावें.

प्रवाहिकालक्षणादि.

तासामतीसारवदादिशेच्चलिंगंक्रमंचामविपक्वतांच ॥

अर्थ—त्याप्रवाहिकांचीं सर्व लक्षणें व चिकित्साक्रम व आमाचा विपाक इत्यादिक अतिसाराप्रमाणें जाणावीं.

अतिसारनिवृत्तिलक्षण.

यस्योच्चारंविनामूत्रंसम्यग्वायुश्चगच्छति ॥

दीप्ताग्नेर्लघुकोष्ठस्यास्थितस्तस्योदरामयः ॥

अर्थ—ज्या अतिसाऱ्याला शौचावांचून मुतावास होतें, अपानवायु चांगला सरतो, जठराग्नि प्रदीप्त होतो, व पोट ही हलकें होतें, त्यापुरुषाचा अतिसार निवृत्त जाहाला असें समजावें.

वालविल्वकल्क.

कल्कःस्याद्वालविल्वानांतिलकल्कश्चतत्समः ॥

दध्नःसारोम्लस्नेहाढ्योहन्याद्वैतत्प्रवाहिकां ॥

अर्थ—कोंवळ्या वेलफळांचा कल्क व त्याचे समान तिलकल्क, दह्यांची सायी व स्नेहयुक्त आंबट, हीं एकत्र करून भक्षण केलीं असतां, प्रवाहिकेचा नाश करील.

मुद्गयूषादि.

मुद्गयूपरसंतक्रंधान्यजीरकसंयुतं ॥ तत्षड्गुणमितिप्रोक्तंसैंधवेनसमन्वितं ॥ अग्निसंदीपनंप्रोक्तंग्रहणीदोपनाशनं ॥ अरोचकंज्वरंचैवश्रेष्ठमेतत्प्रवाहिके ॥

अर्थ—मुगांचा यूप, रस, ताक, धने, जिरें, आणि सैंधव यांच्या यूषाला षड्गुण यूप ह्मणतात. हा अग्निदीपन आहे. ग्रहणी, अरुचि, ज्वर आणि प्रवाहिका यांवर उत्तम आहे.

वालविल्वादियोग.

वालविल्वंगुडंतैलंपीतंवामारिचोद्भवं ॥

त्र्यहात्प्रवाहिकांहन्याच्चिरकालानुबंधिनीं ॥

अर्थ—बाळवेल व मिरीं यांचा काढा गुळ व तेल घालून ध्यावा. तो तीन दिवसांत दिवसांच्या ही प्रवाहिकेचा नाश करितो.

विल्वपेश्यादिकाढा.

विल्वपेशीगुडलोध्रंतैलंमरिचसंयुतं ॥

लिह्यात्प्रवाहिकाक्रांतःसत्वरंसुखमाप्नुयात्

अर्थ—बेलाच्या पाळांचे तंतु, गुळ, लोध्र, तेल व मिरीं हे पदार्थ समभाग चूर्ण करून चाटावे; ह्मणजे प्रवाहिकीरोग्याला सुख होईल.

धातक्यादियोग.

धातुकीबदरीपत्रंकपित्थरसमाक्षिकं ॥

सलोध्रमेकतोदध्नापिबेन्निर्वाहिकार्दितः ॥

अर्थ—धायटीचीं फुलें, बोरीच्या पाल्याचा अथवा कवठांचा रस, मध व लोध्र, हे पदार्थ दह्यामध्यें कालवून प्रवाहिकीरोग्यानें प्यावें.

मुस्तावत्सकादियोग.

मुस्तावत्सकबीजंमोचरसोबिल्वधातुकीलोध्रं ॥

भृगुमथितसंप्रयुक्तंगंगामपिप्रवाहिकांरुंध्यात् ॥

अर्थ—नागरमोथा, इंद्रजव, मोचरस, बेलफळ, धायटीफूल व लोध्र, हे पदार्थ एकत्र करून रवीनें थोडें मंथन केलेल्या दह्याबरोबर घेतलें असतां, तें प्रवाहरूप गंगेला ही रोधील.

तैलादियोग.

तैलंसर्पिर्दधिक्षौद्रंविषाविश्वंसफाणितं ॥

सर्वमालोड्यपातव्यंसद्योनिर्वाहिकंहरेत् ॥

अर्थ—तेल, तूप, दहीं, मध, अतिविष, सुंठ आणि राब, हीं एकत्र करून प्यावीं; ह्मणजे प्रवाहिकेला जिंकितात.

त्र्यूषणादिघृत.

त्र्यूषणात्रिफलाचैवचित्रकोगजपिप्पली ॥ बिल्वकर्कटिका हिंस्राविडंगंसनिदिग्धिकं ॥ घृतप्रस्थंपचेदेभिर्गवांमूत्रेचतुर्गुणे ॥ तत्प्रयोगंपिबेत्कोलंहन्यात्तेनप्रवाहिकां ॥

जो रोगाला अर्थ—सुंठ, मिरीं, पिंपळी, त्रिफळा, चित्रकमूळ, गजपिंपळी, बेलफळ, कांकडशिंगी, मांसी, वावडिंग व रिंगणी, यांचा काढा एक भाग व गोमुत्र चार भाग यांमध्यें तोळे तूप सिद्ध करावें. तें सहा मास घेतलें असतां, प्रवाहिका नाश पावत्ये.

मुस्तादिगुटी.

मुस्तंमोचरसंलोध्रंधातुकीबिल्वकौटजं ॥ अहिफेनरसंगंधंसूक्ष्मचूर्णानिकारयेत् ॥ वल्लमात्रमिदंखादेत्गुडतक्रसमन्वितं ॥ अतिसारेप्रवाहिचग्रहण्यांचविशेषतः ॥

अर्थ–नागरमोथे, मोचरस, लोध्र, धायटीचीं फुलें, बेलफळ, इंद्रजव, अफु, पारा व गंधक, हे एकत्र करून वालभर गुळ व ताक यांशीं अतिसार व प्रवाहिका यांवर विशेषानें द्यावें, व संग्रहणीवर ही द्यावें.

पथ्य.

वमनंलंघनंनिद्रापुराणाःशालिषष्टिकाः॥विलेपीलाजमंडश्चमसूररसतुवरीरसः ॥ शशोवैलावहरिणकपिंजलभवारसाः ॥सर्वक्षुद्रझषाशृंगी डिंडिशीमधुरालिका॥तैलच्छागघृतंक्षीरंदधितक्रंगवामपि ॥ दधिजंवापयोजंवानवनीतंगवांजयेत् ॥ नवरंभाफलंपुष्पंक्षौद्रंजंबुफलानिच॥ भव्यंसहार्द्रकंविश्वंशालूकंचविकंकतं ॥ कपित्थंबदरंबिल्वंतिंदुकंदाडिमद्वयं ॥ तालंवटफलंवापिचांगेरीविजयाकणा ॥ जातीफलमफेनंचजीरकंगिरिमल्लिका ॥ कुस्तुंबरुमहानिंबकषायःसकलोरसः ॥ अन्नपानानिसर्वाणिदीपनानिलघूनिच॥ नाभेर्द्व्यंगुलतोधस्ताच्छस्त्रेणार्धेंदुवद्दहेत् ॥ तथावंशास्थिमूलेपिपथ्यवर्गोतिसारिणां ॥

अर्थ–वांति, लंघन, निद्रा, जुने साटकीभाताचे तांदूळ, आटवल, लाह्याचा मंड, मसुरा, तुरी यांचा रस, व ससा, लावा, हरीण, कपिंजलपक्षी, यांचे रस, बारकेजातीचे मासे व शृंगी जातीचे मासे, घेंडशीचें फळ, मध, राळ, तेल, बकरीचे व गाईचें तूप, दूध, दहिं, ताक, व गाईचे दह्यानें किंवा दुधाचें लोणी, नवें केळफुल, मध, जांबळें, करंबळ, आलें, सुंठ, कमळकंद, वेखाळ, कवट, बोर, बेलफळ, टेंभुर्णी, घेंडशी, खाटें व गोडें डाळिंब, व वड यांची फळें, चुका, भांग, पिंपळी, जायफळ, अफीण, जिरें, कुडा व धणे, कडवा निंब, संपूर्ण तुरटपदार्थ व दीपन लघु अशीं अन्नें व पान आणि बेंबच्याखालीं व वर दोन अंगळावर अर्धचंद्राकार डाग व माकडहाडाचे खालीं अर्धचंद्राकार डाग, हा अतिसारी रोग्याला पथ्य वर्ग सांगीतला.

पाणी.

दशांशंषोडशांशंवाशतांशंवाशृतंजलं ॥ सुशीतंपाचनंग्राहीलघुदीपनंदोषनाशनं ॥ यथायथाशृततोयंज्वरातिसारिणेभवेत् ॥ दीपनंपाचनंग्राहीआरोग्यंचतथातथा ॥

अर्थ–दशांश, षोडशांश, किंवा शतांश तापवून थंडकेलेलें पाणी ग्राहक, दीपन आणि अशेषदोषनाशक असें होतें. व जसें जसें तापविलेलें पाणी तसें तसें गुणकारक व आरोग्य देणारें होतें.

अतीसारास अपथ्य.

स्नानावगाहमभ्यंगगुरुस्निग्धान्नभोजनं ॥ व्यायाममग्निसंतापम
तिसारीविवर्जयेत् ॥ नवान्नोष्णंगुरुस्निग्धंभोजनंनहितंनवं ॥ व्या
याममैथुनंचिंतामतिसारीविवर्जयेत् ॥ स्वेदोंजनंरुधिरमोक्षणमंबुपा
नंस्नानंव्यवायमपिजागरधूमनस्यं ॥ अभ्यंजनंपललवेगविधारणंच
रुक्षाण्यसात्म्यशयनंचविरुद्धमन्नं ॥ गोधूममापभववास्तुककाकमा
चीनिष्पावकंचमधुशिग्रुरसालपूरं ॥ कूष्मांडतुंबिवदरंगुरुचान्नपानं
जांबूलमिक्षुगुडमद्यमुपोदिकाच ॥ द्राक्षाम्लवेतसफलंलशुनंचधात्री
दुष्टांबुमस्तुग्रहवारिचनारिकेलं॥ संस्नेहनंमृगमदाखिलपत्रशाकाक्षा
रंरसानिसकलानिपुनर्नवाच॥ उर्वारुकंलवणमाम्लमपिप्रकोपंवर्ज्यो
तिसारगदपीडितमानवेषु ॥

अर्थ—स्नान, अवगाहन, अभ्यंग, जड व स्निग्ध असें भोजन, व्यायाम, अग्निसंताप, नवान्न, उष्ण, गुरु, स्निग्ध, अपथ्यपदार्थ, व्यायाम, मैथुन, चिंता, घाम काढणें, अंजन, रक्त काढणें, उदक पिणें, स्नान, स्त्रीगमन, जागरण, धूमपान, नस्य, अभ्यंजन, मांस, वेगधारण व रूक्ष; आणि असात्म्य असें भोजन, विरुद्धाशन, गहूं, उडीद, चाकवत, कावळीची भाजी, पावटे, मध, शेवगा, आंबा, खापरपोळी, पुरणपोळी, कोहळा, पांढरा भोपळा, बोर, जडान्न, किंवा जडपदार्थांचें प्राशन, भिंडा, ऊंस, गूळ, मद्य, मयाळेची भाजी, द्राक्षें, आम्लवेतसाचें फळ, लसूण, आंवळी, बिघडलेलें पाणी, मस्तु, घरांतील शिळ पाणी, नारळ, स्नेहन, कस्तुरी, संपूर्ण पत्रशाक, क्षार, संपूर्ण रसमूपपदार्थ, पुनर्नवा, कांकडी, मीठ, आंबट पदार्थ; आणि कोप हा अतिसारी रोग्यानें वर्ज करावा.

संग्रहणी, कर्मविपाक.

अनन्यगतिकांभार्यामदुष्टांकारणंविना ॥
परित्यजतियःसोपिग्रहणीरोगवान्भवेत् ॥

अर्थ—जो दुष्टपुरुष अनन्यगतिक, व पवित्र अशा स्त्रीला कारणावांचून टाकितो, त्या संग्रहणी रोग होतो.

संग्रहणीशांति.

शिवसंकल्पसूक्तस्यजपस्यात्तत्रशांतये ॥ अष्टोत्तरसहस्रंहिहि

रण्यंचतथामधु ॥ दद्याद्वित्तानुसारेणसौरमंत्रजपस्तथा ॥ धे
नुंसलक्षणांदद्याद्वस्त्राभरणसंयुतां ॥ पयस्विनींगुणोपेतांब्राह्म
णायकुटुंबिने ॥ वत्साभरणसंयुक्तांवस्त्रेणाभरणेनच ॥

अर्थ—त्या पातकाच्या शांति करितां शिवसंकल्पसूक्ताचा एक हजार आठ जप करावा; व ब्राह्मणाला सुवर्ण व मध हें द्रव्यानुसार द्यावें. तसाच सौरमंत्राचाही जप करावा. व सलक्षण व वस्त्राभरणानीयुक्त असें गोदान कुटुंबी व विद्वान्ब्राह्मणास द्यावें; व त्या गाईच्या वत्सांला ही वस्त्रें आभरणें घालावीं.

दंभ.

नाभेर्द्व्यंगुलकादधोर्ध्वशशिवद्वंशास्थिमूलेतथा ॥
दाहःप्रज्वलितायसस्यकथितोदंभोग्रहण्यातुरे ॥

अर्थ—ग्रहणीरोगाकरितां नाभीवर दोन अंगुळावर व खाली दोन अंगुळावर अर्धचंद्राकार; आणि तसाच वंशास्थिमूळाचेठायीं लोखंड तापवून डाग द्यावा.

दुसरा प्रकार.

दंभंताम्रशलाकयाग्रहणिकांलोहस्यवास्वर्णयादेयंनाभिरधस्थ्यं
गुलमितंबस्तिद्वयोर्मध्यगं ॥ पूयस्रावमपथ्यमेवविहितंपेयंजलंशी
तलंवातोत्थामपिपित्तजामपिचिराद्वंगाद्वलासादिकं ॥

अर्थ—संग्रहणीवर ताम्र, लोह किंवा सुवर्ण याच्या शलाकेनें नाभीचे खाली दोन अंगुळांवर व वर दोन अंगुळांवर नाभी व बस्ती यांमध्यें डाग द्यावा; आणि पूयस्राव होईल असें पथ्य करावें; आणि थंड पाणी प्यावें; ह्मणजे वातपित्तकफात्मक फारादिवसांची संग्रहणी नाश पावते.

गुदरोगकर्मविपाक.

सुरालयेजलेवापिसकृत्द्वेपंकरोतियः ॥ गुदरोगोभवेत्तस्यपाप न्व
रूपःसुदारुणः ॥ मासंसुरार्चनेनैवगोदानाद्वितयेनच ॥ प्रा
जापत्येनचैकेनशाम्यंतिगुदजारुजः ॥

अर्थ—देवालय किंवा उदक यांचा जो नाश करितो, त्या पापानें तो गुदरोगी होतो; त्याणें एक मासपर्यंत देवपूजा, दोन गोदानें; आणि प्रायश्चित्तार्थ एक प्राजापत्य ह्मणजे गुदसंबंधिरोग शांत होतो.

संग्रहणीनिदान.

अतिसारेनिवृत्तेपिमंदाग्नेरहिताशिनः ॥
भूयःसंदूपितोवन्हिर्ग्रहणीमपिदूपयेत् ॥

अर्थ—अतितारापासून मुक्त जाहला; ह्मणजे जठराग्नि मंद असतां, वारंवार अपथ्य भोजन घडलें; तर वारंवार अग्नि दूषित होऊन ग्रहणीस दूषित करितो.

ग्रहणीस्थान.

पष्ठीपित्तधरानामयाकलांपरिकीर्तिता ॥
पक्कामाशयमध्यस्थाग्रहणीसाप्रकीर्तिता॥

अर्थ—पक्काशय व आमाशय यांमध्यें पित्तास धारणकरणारी जी साहावी कला तिला. संग्रहणी असें ह्मणतात.

ग्रहणीची संप्राप्ति व लक्षण.

एकैकशःसर्वशश्चदोषैरत्यर्थमूर्छितैः ॥ सादुष्टावहुशोभुक्तमा मममेवविमुंचाति ॥ पक्कंवासहजंपूतिंमुहुर्वद्धंमुहुर्द्रवं ॥ ग्रह णीरोगमाहुस्तमायुर्वेदविदोजनाः ॥

अर्थ—प्रत्येक दोष अथवा सर्व दोष दुष्ट होऊन ग्रहणी दूषित होत्ये; आणि जेंजें खावें तें तें पक्क किंवा अपक्क मुरडा होऊन दुर्गंधयुक्त केव्हां केव्हां पातळ पातळ अशा मळाला वारंवार सोडित्ये, त्या रोगाला आयुर्वेद जाणणार ग्रहणी असें ह्मणतात.

संग्रहणीचें पूर्वरूप.

पूर्वरूपंतुतस्येदंतृष्णालस्यंवलक्षयः ॥
विदाहोन्नस्यपाकश्चचिरात्कायस्यगौरवं ॥

अर्थ—तृषा, आळस, वलक्षय, भक्षण केल्यानंतर पोटांत जळजळणें, अन्नाचा फार [illegible]कालानें पाक होणें, आणि आंगाला जडपणा हें ग्रहणीचें पूर्वरूप होय.

वातिकग्रहणीचें कारण.

कटुतिक्तकपायातिरूक्षसंदुष्टभोजनैः ॥ प्रमितानशनात्यध्ववे गनिग्रहमैथुनैः ॥ मारुतःकुपितोवन्हिंसंछाद्यकुरुतेगदान् ॥

अर्थ—तिखट, कडु, तुरट, अत्यंत रूक्ष, अत्यंत शिळें वगैरे, विरुद्ध भोजन, अत्यंत अल्प [illegible]पोषण, अतिमार्गगमन, मलमूत्रादि कोंडून धरणें व अतिमैथुन इत्यादि कार[illegible] कोपित होऊन अग्नीला दूषित करून संग्रहणीला उत्पन्न करितो.

वातिकग्रहणीचें रूप.

तस्यान्नंपच्यतेदुःखंशुक्तपाकंखरांगता ॥ कंठास्यशोषःक्षुत्तृष्णातिमिरंकर्णयोःस्वनः ॥ पार्श्वोरुवंक्षणग्रीवारुगभीक्ष्णंविषूचिका ॥ हृत्पीडाकार्श्यदौर्बल्यंवैरस्यंपरिकर्तिका ॥ गृध्दिःसर्वरसानांचमनसःसदनंतथा ॥ जीर्णेजीर्यतिचाध्मानंभुक्तेस्वास्थ्यमुपैतिच ॥ सवातगुल्महृद्रोगप्लीहाशंकीचमानवः ॥ चिराद्दुःखंद्रवंशुष्कंतन्वामंशब्दफेनवत् ॥ पुनःपुनःसृजेद्वर्चःकासश्वासार्दितोनिलात् ॥

अर्थ—मोठ्यादुःखानें अन्न पचन, अन्नाचा आंबट पाक, आंग खरखरीत, गळा व तोंड यांना कोरड, भूक, ताहान, डोळ्यापुढें आंधारी, कानांत शब्द, कुशी, मांड्या, आडसंधी व मान, यानां पीडा, अजीर्णांत पोटामध्यें वारंवार सुया टोंचल्या सारखें गारण. उरांत दुखणें, कृशपणा, दुर्बलता व तोंडाला पचनचीनपणा, गुदाला कातरल्यासारिखी पीडा, सर्वरसभक्षणाची इच्छा, मनाला ग्लानि व अन्न जिरल्यानंतर किंवा जिरत असतां, पोट फुगणें, कांहीं भक्षण केलें असतां, स्वस्थ वाटणें आणि वातगुल्म, हृद्रोग, किंवा प्लीहा, झाला यांची शंका, आणि फार वेळानें, मोठ्याकष्टानें, केव्हां पातळ केव्हां शुष्क द्रवरूप, फेनयुक्त, सशब्द असा आमयुक्त मळ वारंवार होतो; आणि खोकला येतो व दमा लागतो. त्यास वातसंग्रहणी म्हणतात.

शुंठीघृत.

घृतंनागरकल्केनसिद्धंवातानुलोमनं ॥
ग्रहणीपांडुरोगघ्नंप्लीहकासज्वरापहं ॥

अर्थ—सुंठीच्या कल्कांत तूप घालून अग्नीवर सिद्ध करावें. तें तूप वाताचे अनुलोमन करतें; व ग्रहणी, पांडुरोग, प्लीहा, कास व ज्वर यांचा नाश करितें.

पंचमूलघृत.

पंचमूलाभयाव्योपपिप्पलीमूलसैंधवैः ॥ रास्नाक्षारद्वयाजाजीविडंगसटिभिर्घृतं ॥ पक्वेनमातुलुंगस्यस्वरसेनार्द्रकस्यच ॥ शुष्कमूलककोलांबुचुक्रिकादाडिमस्यच ॥ तक्रमस्तुसुरामंडसौवीरकतुषोदकैः ॥ कांजिकेनचतत्पक्त्वापीतमग्निकरंपरं ॥ शूलगुल्मोदरानाहकार्श्यानिलगदापहं ॥

अर्थ—पंचमूळें, बाळहर्डी, सुंठ, मिरीं, पिंपळी, पिंपळीमूळ, सैंधव, रास्ना, सज्जि जवखार, जिरें, वावडिंग व कचोरा या औषधांच्या कल्कांत घृत सिद्ध करून त्यांत पिकलेल्या माहलुंगाचा रस, आल्याचा रस, सुकलेल्या मुळ्यांचा क्वा

बोरांचा काढा, चुकयाचा रस, डाळिंबाचा रस, ताक, दह्यांवरील साय, सुरा, जवांची पेज, तुषांचा काढा व कांजी या प्रत्येकांत सिद्ध करावें. तें अग्निकारक, शूल, गुल्म, उदर, मलबद्धता, रुक्षता व वातरोग यांचें नाशक आहे.

संग्रहणीचिकित्साक्रम.

ग्रहणीमाश्रितंदोषमजीर्णवदुपाचरेत् ॥ लंघनैर्दीपनीयैश्चसदातीसार भेषजैः ॥ दोषंसामंनिरामंचविद्यादत्रातिसारवत् ॥ अतिसारोक्तवि धिनातस्यचामंविपाचयेत् ॥ पेयादिपटुलघ्वन्नंपंचकोलादिभिर्युतं ॥ दीपनानिचतक्रंचग्रहण्यांयोजयेद्भिषक् ॥

अर्थ—ग्रहणीदोषावर अजीर्णाप्रमाणें उपचार करावा. लंघन, दीपन आणि अतिसारावर उक्त असें औषध द्यावें. अतिसाराप्रमाणेंच दोष आमसहित किंवा आमरहित हे पूर्वी पहावे; आणि अतिसारावर उक्त विधि त्या विधिनें आम पाचन करावा, पेया इत्यादि, क्षार, पंचकोलादिकें करून युक्त असें लघु अन्न सेवन करावें. दीपन पदार्थ व तक्र ह्यांची योजना वैद्यानीं करावी.

तक्रसेवन.

दुःसाध्योग्रहणीरोगोभेषजैर्नैवशाम्यति ॥ सहस्रशोपिविहितैर्विनात क्रस्यसेवनात् ॥ दोषधातुबलापेक्षीग्रहण्यांतक्रमापिबेत् ॥

अर्थ—संग्रहणीरोग दुःसाध्य आहे. तो सहस्र औषधें घेतलीं तत्रापि शांत होत नाहीं. या करितां दोष, धातु, आणि बल यांच्या इच्छेसाठी तक्रसेवन करावें. तक्रसेवना वांचून तो ग्रहणीरोग शांत होणार नाहीं.

वातसंग्रहणीचिकित्साक्रम.

ज्ञात्वातुपरिपक्वंचवातजंग्रहणीगदं ॥
दीपनैर्भेषजैःपक्वैःसर्पिभिःसमुपाचरेत् ॥

अर्थ—परिपक्ववातग्रहणीची परिक्षा करून त्याला दीपन औषधें व घृतें यांणीं उपचार करावे.

शालिपर्ण्यादिकाढा.

शालिपर्णीबलाबिल्वधान्यशुंठीकृतःशृतः ॥
आध्मानशूलसहितांवातजांग्रहणींजयेत् ॥

चिकणामूळ, कोंवळें बेलफळ, धने व सुंठ, या पांच औषधांचा असतां, पोटफुगी व शूल यां सहवर्तमान वातसंग्रहणीला दूर करितो.

तक्रसेवन.

ग्रहणीरोगिणांतक्रंसंग्राहिलघुदीपनं ॥ सेवनीयंसदागव्यंत्रिदोषश मनंहितं ॥ तक्रंचमधुरंशुंठीचूर्णयुक्तंपिबेत्सदा ॥ शनैःशनैर्हरेदन्नत क्रंनुपरिवर्धयेत् ॥ तक्रमेवयथाहारोभवेदन्नविवर्जितः ॥ तक्रसात्म्यं यथाकुर्यान्नैवान्नंतत्रभक्षयेत् ॥ बुभुक्षायांपिपासायांपिबेत्तक्रंसनाग रं ॥ मौनंचकुर्याद्बहुशोनकुर्याद्बहुभाषणं ॥ नकुर्यान्मैथुनंतक्रपानेक्रो धंविवर्जयेत् ॥ एवंयःसेवतेतक्रंग्रहणीतस्यनश्यति ॥ शीघ्रमेवनसं देहःश्रीर्यथानृतकारिणः ॥

अर्थ—संग्रहणीरोग्याला ताक द्यावें. तें ग्राहक, लघु व दीपन आहे. गाईचें ताक त्रिदोषनाशक व हितकारक आहे, तें सुंठीचें चूर्ण घालून प्यावें; आणि अन्न हळू हळू कमी करावें; व ताक वाढवीत जावें, इतकें कीं ताकच अन्नावांचून आहार होईल. अन्न खाऊं नये. भूक व तहान लागली असतां, सुंठीचें चूर्ण घालून ताक प्यावें. व बहुधा मौन धरावें. फार भाषण करूं नये. व तक्रपान करणाराने मैथुन व क्रोध हे वर्जावे. या प्रमाणें तक्र सेवन केलें असतां; शीघ्र संग्रहणीरोग नाश पावतो.

दुसरा प्रकार.

वातेम्लंसैंधवोपेतंपित्तेस्वादुसशर्करं ॥ पिबेत्तक्रंकफेचापिक्षा रत्रिकटुसंयुतं ॥ हिंगुजीरयुतंघोलंसैंधवेनावधूलितं ॥ ग्रह ण्यर्शोतिसारघ्नंभवेद्वातहरंपरं ॥

अर्थ—वातसंग्रहणीवर आंबट ताक, सैंधव घालून द्यावें. पित्तसंग्रहणीवर गोड ताक, साकर घालून द्यावें. कफसंग्रहणीवर क्षार व त्रिकटु घालून द्यावें; आणि हिंग, जिरें व सैंधव याणी युक्त केवळ दहीं घुसळलेलें ताक द्यावें; तें संग्रहणी, अर्श, अतिसार, आणि वायु यांचा नाश करितें.

मधुपक्कहरीतकी.

हरीतकीनांचशतंदोलायंत्रेशनैःपचेत् ॥ सुस्विन्नंगोमयेनीरेसंमृष्टंवा पुनस्ततः ॥ पश्चात्क्षुद्रशलाकाभिश्छिद्रितंतत्समंततः ॥ शतंपलानां मधुनोवस्त्रपूतंविनिःक्षिपेत् ॥ स्निग्धभांडेविनिःक्षिप्यक्षौद्रंदेयंतथात था ॥ यथायथाहिमधुनोजलत्वंयातिनिश्चितं ॥ पुनर्देयंमधुतथाया वन्नायातिविक्रियां ॥ निष्ठत्येवंतथापथ्याकषायगुणवर्जिता ॥ पिप्प

लीमरिचंशुंठीलवंगंवंशलोचनं ॥ प्रत्येकंकर्षमात्रंहिचूर्णितंतत्रनिःक्षिपेत् ॥ मधुपक्वाभिधापथ्याबलवर्णाग्निदीपनी ॥ एकैकांभक्षयेत्प्रातःसर्वरोगनिवारिणीम् ॥ दुष्टवातंसंग्रहंचतथामंदुष्टशोणितं ॥ जीर्णज्वरंप्रतिश्यायंव्रणंविस्फोटकंतथा ॥ वातशूलंसंग्रहणींसरुजांनाशयत्यपि ॥

अर्थ—शंभर हिरडे दोलायंत्रांत गाईचे शेणाच्या पाण्यात मउ होत पर्यंत शिजवावे; नंतर सभोंवति त्याला बारीक छिद्रें पाडावीं; नंतर १०० तोळे मध तुपानें रावलेल्या मडक्यांत घालून त्यांत ते हिरडे घालावे; नंतर पुनःपुनः मध घालावा. जोंपर्यंत मधाचे पाणि न होतां जसाचे तसाच राहिल. असें केल्यानें त्या हिरड्यानां तुरटपणा नाहींसा होतो; नंतर त्यांत सुंठ, मिरें, पिंपळी, लवंगा, वंशलोचन, हीं प्रत्येक तोळा प्रमाणे चूर्ण करून घालावीं. ह्याला मधुपक्वनामक पथ्या असें ह्मणतात. ही हरीतकी बळदेणारी, वर्णकर, अग्निदीपक, अशी आहे दररोज प्रातःकाळीं एक एक भक्षण करावी. तेणेंकरून दुष्टवात, संग्रहणी, आमांश, दुष्टरक्त, जीर्णज्वर, पडसें, व्रण, विस्फोट, वातशूळ व सशूळ संग्रहणी, इत्यादि सर्वरोगांचा नाश करील.

मुद्गयूप.

मुद्गयूपरसंतक्रंधान्यजीरकसंयुतं ॥
सैंधवेनान्वितंदद्यात्षडयूपमितिकीर्तितं ॥

अर्थ—मुगांचा यूष, मुगांचा रस, ताक, धने व जिरें यांचा यूष सैंधव घालून द्यावा. ह्याला षड्यूष असें ह्मणतात.

कपित्थादियवागू.

कपित्थबिल्वचांगेरीतक्रदाडिमसाधिता ॥
यवागूःपाचयत्यामंशकृत्संवर्तयत्यपि ॥

अर्थ—कंवठ, बेल, चुका व डाळिंब, यांची ताकामध्यें यवागू करावी. ती आमाला पचवित्ये. आणि मलाचें सारण करित्ये.

पित्तसंग्रहणीनिदान.

कट्वजीर्णविदाह्यम्लक्षाराद्यैःपित्तमुल्वणं ॥ आप्लावयद्धंत्यनलंजलंतप्तमिवानलं ॥ सोजीर्णंनीलपीताभंपीताभंसार्यतेद्रवं ॥ सधूमोद्गारहृत्कंठदाहारुचितृडर्दितः ॥

अर्थ—तिखट, अजीर्ण, वेळूचे कोंब इत्यादि विदाह कारक, आंबट, व क्षार, इत्यादि पदार्थांचा सेवनानें पित्त कोपून जसें उष्णोदक अग्नीला विझवितें त्याप्रमाणें तें पित्त-

जठराग्नीच्या उष्ण्याला शमवितें. व शरीर पिवळें होऊन अपक्व, निळा, पिंवळा, द्रवरूप असा मळ होतो, व सधूम ढेकर येतात, ज्वर व मळा, यांमध्यें दाह, अरुचि, ताहान, याणीं रोगी पिडित होतो.

चंदनादि घृत.

चंदनंपद्मकोशीरपाठामूर्वाकटुत्रयं ॥ षड्ग्रंथासारिवास्फोतासप्तपर्णी
परूषकं ॥ पटोलोदुंबराश्वत्थवटप्लक्षकपित्थकं ॥ कटुकारोहिणीमु
स्तनिंबंचद्विपलांशकं ॥ द्रोणेंभसिक्षिपेत्पादशेषेप्रस्थंघृतंपचेत् ॥ किरा
ततिक्तेंद्रयववीरामागधिकोत्पलैः ॥ कल्कैरक्षसमैःपेयंतत्पित्तग्रहणीगदे ॥

अर्थ—चंदन, पद्मकाष्ठ, वाळा, पाहाडमूळ, गोरवेल, सुंठ, मिरें, पिंपळी, वेखंड, उपळसरी, गोकर्णी, सातविण, फालसा, कडुपडवळ, उंबर, पिंपळ, वड, पायरी, कवठ, कटुकी, हरीतकी, नागरमोथे व कडुलिंब हीं सर्व प्रत्येकीं आठ आठ तोळे घेऊन १०२४ तोळे पाण्यांत घालून काढावीं. चतुर्थांश शेष उरलें ह्मणजे ६४ तोळे तूप घालून; पुनः चुलीवर ठेऊन त्यांत किराइत, इंद्रजव, काकोली, पिंपळी, कमळ, यांचा एक एक तोळा कल्क घालून सिद्ध करावें. तें घृत शक्तिप्रमाणें घ्यावें; ह्मणजे पित्तसंग्रहणीचें नाशक आहे.

तिक्तादिकाढा.

तिक्तामहौषधरसांजनधातुकीभिःपथ्येंद्रबीजघनकौटजभंगुराभिः ॥
क्वाथोहरेद्बहुविधंग्रहणीविकारंपित्तोद्भवंसगुदशूलमतिप्रवृद्धं ॥

अर्थ—कुटकी, सुंठ, रसांजन, धायटीचीं फुलें, हरीतकी, इंद्रजव, नागरमोथे, कुड्याची साल, आणि श्वेत अतिविष यांचा काढा अनेकप्रकारची संग्रहणी, गुदशूळ, आणि पित्तसंग्रहणी यांचा नाश करितो.

श्रीफलादिकल्क.

श्रीफलशलाटुकल्कोनागरचूर्णेनमिश्रितःसगुडः ॥
ग्रहणीगदमत्युग्रंतक्रभुजातुशीलितोजयति ॥

अर्थ—कोंवळ्या बेलफळाच्या कल्कांत सुंठीचें चूर्ण व गूळ घालून द्यावा; आणि ताकभात पथ्याला द्यावा; ह्मणजे संग्रहणीचा नाश करितो.

नागरादि चूर्ण.

नागरातिविषामुस्ताधातकीसरसांजनं ॥ वत्सकत्वक्फलंबिल्वंपाठा
तिक्तकरोहिणी ॥ पिबेत्समांशकंचूर्णंसक्षौद्रंतंदुलांबुना ॥ पित्तजेग्र
हणीदोषेरक्तंयश्चोपवेश्यते ॥ अर्शांसिगुदशूलंजयेच्चैवप्रवाहिकां॥
नागराद्यमिदंचूर्णंकृष्णात्रेयेणभाषितं ॥

अर्थ—सुंठ, अतिविष, नागरमोथे, धायटीचीं फुलें, रसांजन, कुडयाची साल, इंद्रजव, बेलफळ, पाहाडमूळ, किराइत व कुटकी यां समभाग औषधांचें चूर्ण तांदुळांचे धुवणाशीं मध घालोन द्यावें. तें पित्तसंग्रहणी, रक्तसंग्रहणी, अर्श, हृद्रोग, गुदरोग, शूल व प्रवाहिका यांचा नाश करितें. हें नागरादिचूर्ण कृष्णात्रेयानें सांगितलें आहे.

यवान्यादिचूर्ण.

यवानीपिप्पलीमूलंचातुर्जातकनागरैः ॥ धातुकीतितिणीकृष्णावाल कश्चैकभागिकः ॥ सितापट्भागसंयुक्तंसर्वंचूर्णंप्रकल्पयेत् ॥ कर्षैकं भक्षयेन्नित्यमजाक्षीरंपिबेदनु ॥ नाशयेत्ग्रहणीरोगंपित्तोत्थंसप्रवाहिकं ॥

अर्थ—ओंवा, पिंपळीमूळ, चातुर्जात, सुंठ, धायटीफुलें, चिंच, पिंपळी, आणि वाळा हीं एकेक तोळा व साकर साहा भाग या सर्वांचें चूर्ण करून रोज एक तोळा घ्यावें. वर शेळीचें दूध प्यावें; ह्मणजे संग्रहणी, पित्तसंग्रहणी व प्रवाहिका यांचा नाश करितें.

चंदनादिकाढा.

चंदनंपद्मकोशीरपाठामूर्वाकुटंनटं ॥ सौराष्ट्र्यतिविषापत्रत्वगेलादेवदारुच ॥ मरिचंचूर्णयेत्तुल्यंमधुनालेहयेदनु ॥ अजाक्षीरंजलार्धेन क्वाथ्यदुग्धावशेषकं ॥ पिबेत्पित्तहरंरात्रौक्षीरिणीशाकमाचरेत् ॥ दध्यन्नंदापयेत्पथ्यंदुग्धैर्वालाजमंडकं ॥

अर्थ—चंदन, पद्मकाष्ठ, वाळा, पाहाडमूळ, मोरवेल, टेंटू, सोरटी माती, अतिविष, तमालपत्र, दालचिनी, इलाची, देवदार व मिरीं यांचें चूर्ण मधाशीं द्यावें; आणि मागून शेळीचें दूधांत निमें पाणी घालोन त्याचा दूध शेष राहील असा काढा करून तो पित्तहारक असा रात्रीं प्यावा. खिरणीची भाजी पथ्याला द्यावी, व दहींभात अथवा लाह्यांचा मंड द्यावा.

रसांजनादिचूर्ण.

रसांजनंप्रतिविषावत्सकस्यफलत्वचौ ॥ नागरंधातकीचैतत्सक्षौद्रंतंदुलांबुना ॥ पित्तग्रहणिदोषार्शरक्तपित्तातिसारनुत् ॥

अर्थ—रसांजन, अतिविष, इंद्रजव, कुडयाची साल, सुंठ व धायटीचें फूल ह्यांचें चूर्ण तांदुळांचे धुवणांत मध घालोन घेतलें असतां, पित्त, ग्रहणिदोष, अर्श, रक्तपित्त, आणि पित्तातिसार यांचें नाशक आहे.

भूनिंबादिपुटपाक.

भूनिंबरोहिणीपथ्यापटोलंनिंबपर्पटं ॥ तुल्यमहिषिमूत्रेणमर्द्यं मंतःपुटेदहेत् ॥ कर्षैकंलेहयेदाज्यैर्वन्हिदीपनमुत्तमं ॥ दीपनंवहुपित्तस्याप्तिक्तंमधुरसंयुतं ॥

अर्थ–किराइत, कुटकी, हरीतकी, कडुपडवळ, कडूनिंब व पित्तपापडा घेऊन महिषीच्या मुतांत वाटून पुटपाकानें भाजून तें एक कर्ष तुपाशीं द्या अग्नीचें दीपन करितें; व पित्ताधिकावर घेणें तर कुटकी व मध याशीं घ्यावें.

आम्रादियोग.

आम्रास्थिविश्वागोशृंगावत्सश्चाम्ररसेनतु ॥ मर्दयेत्रिदिनंस
म्यक्सितयासहयोजयेत् ॥ तस्यपित्तोद्भवांहंतिग्रहणीरोगका
रिणीं ॥ ज्वरातिसारंतीव्रंचरक्तस्रावंसशूलनुत् ॥

अर्थ–आंब्याची आंठी, सुंठ, बाभूळ व कुडा हे पदार्थ आंब्याचा रसांत तीन दिवस खलून तें साकरेशीं द्यावें; ह्मणजे पित्तसंग्रहणी, ज्वरातिसार, रक्तस्राव आणि शूळ यांचा नाश करितें.

आम्रादिपेया.

आम्रमाम्रातकंजंबूत्वक्कषायेपचेद्भिपक् ॥
यवागूंशालिभिर्युक्तांभुक्त्वातांग्रहणींजयेत् ॥

अर्थ–आंबा, आंबाडा व जांबूळ यांच्या झाडाच्या साळीचा काढा त्यात साळीच्या तांदुळांची आंबील शिजवून खावी; ह्मणजे संग्रहणी दूर होईल.

कफसंग्रहणीनिदान.

गुर्वतिस्निग्धशीतादिभोजनादतिभोजनात् ॥ भुक्तमात्रस्यचस्वप्ना
द्धंत्यग्निंकुपितःकफः ॥ तस्यान्नंपच्यतेदुःखंत्हृल्लासच्छर्द्यरोचकाः ॥
आस्योपदेहमाधुर्यकासष्ठीवनपीनसाः ॥ त्हृदयंमन्यतेस्तब्धमुदरंस्ति
मितंगुरु ॥ दुष्टोमधुरमुद्गारःसदनंस्त्रीष्वहर्षणं ॥ भिन्नामश्लेष्मसंसृ
ष्टगुरुवर्चःप्रवर्तनं ॥ अकृशस्यापिदौर्बल्यमालस्यंचकफात्मके ॥

अर्थ–जड, स्निग्ध, शीत, मधुर असें भोजन; किंवा अतिभोजन व भोजनोत्तर लागलीच निद्रा, यांमुळें कफकोप होतो, तेणेकरून त्या रोग्याचें भक्षित अन्न कष्टानें पचन होतें; आणि मळमळ, वांति, अरुचि, तोंडाला कफाचा चिकटा व गोडपणा, खोकल्यावाटे कफ पडणें, पडसें, ह्रदयाला स्तब्धता, पोट स्तब्ध व जड होतें, विकार युक्त व मधुर असा ढेंकर येतो, अग्निमांद्य होतें, स्त्रीसंभोगाविषयीं इच्छा होत नाहीं; आणि पातळ, आम व कफ, यानीं युक्त व जड असा मळ होतो, व कृश नसतां दुर्बळपणा, आणि आळस, हीं कफसंग्रहणीचीं लक्षणें जाणावीं.

सट्यादिचूर्ण.

सठीव्योषाभयाक्षारौग्रंथिकंबीजपूरकं ॥
लवणाम्लांबुनापेयंश्लैष्मिकेग्रहणीगदे ॥

अर्थ–कचोरा, सुंठ, मिर्यें, पिंपळी, हरीतकी, जवखार, सज्जीखार, पिंपळमूळ, व माहाळुंग यांचे चूर्ण सैंधव आणि लिंबाचा रस यांचे बरोबर घ्यावें; ह्मणजे तें कफसंग्रहणीनाशक आहे.

रास्नादिचूर्ण.

रास्नापथ्यासठीव्योपंद्वौक्षारौलवणानिच ॥ ग्रंथिकंमातुलुंगंचसम
मेकत्रचूर्णयेत् ॥ पिवेदुष्णेनतोयेनश्लैष्मिकेग्रहणीगदे ॥

अर्थ–रास्ना, हरीतकी, कचोरा, सुंठ, मिरें, पिंपळी, जवखार, सज्जीखार, सैंधव, सचेंळ, बिडलोण, पिंपळमूळ व माहाळुंग याचें चूर्ण ऊनपाण्यावरोबर घ्यावें; ह्मणजे तें कफसंग्रहणीचा नाश करितें.

पथ्यादितक्रयोग.

पथ्याकणानागरवन्हिचूर्णंतक्रेणपीतंग्रहणीगदघ्नं ॥
तक्रेणहन्यात्किलकेवलंवाशुंठीकणाभ्यांग्रहणींसशूलां ॥

अर्थ–हरीतकी, पिंपळी, सुंठ व चित्रक यांचे चूर्ण ताकाशीं घ्यावें; ह्मणजे सशूळ संग्रहणी व कफसंग्रहणी यांचा नाश करितें; किंवा केवळ सुंठ व पिंपळीचें चूर्ण ताकांतून घ्यावें; ह्मणजे संग्रहणीचा नाश करितें.

चतुर्भद्रादिकाढा.

गुडूच्यतिविपाशुंठीमुस्तैःक्वाथःकृतोजयेत् ॥
आमानुपक्कांग्रहणींग्राहीदीपनपाचनः ॥

अर्थ–गुळवेल, अतिविष, सुंठ आणि नागरमोथे यांचा काढा घेतला असतां, आमसंग्रहणीचा नाश करितो. व ग्राहक, अग्निदीपक व पाचन असा आहे.

कठिणमलचिकित्सा.

कृच्छ्रेणकाठिणत्वेनयःपुरीपंविमुंचति ॥
सघृतंलवणंतस्यपाययेत्क्लेशशांतये ॥

अर्थ–ज्याला कष्टानें आणि कठीण असा मळ होतो, त्याला तुपांत लवण घालून पाजावें; ह्मणजे त्या दुःखापासून मुक्त होतो.

विडंगादियोग.

विडंयवानीविष्टंभेपिबेदुष्णेनवारिणा ॥

अर्थ—वावडिंग व ओवा यांचें चूर्ण ऊनपाण्याशी प्राशन करावें; ह्मणजे विष्टंभनाश होतो.

वातश्लेष्मसंग्रहणी.

वातश्लेष्माधिकेयोज्याकुटजाद्यवलेहिका ॥ पर्पटीरसगुंजा ष्टौलिहेन्मध्वाज्यकेनवा ॥ सहिंगुजीरकंव्योषंनिष्कार्धंभक्षये दनु ॥ ग्रहणींकफवातोत्थांशमयेत्तक्रभोजने ॥

अर्थ—वातकफाधिकसंग्रहणीवर—कुटजावलेह योजावा; किंवा पर्पटीरस आठ गुंजा मध व तूप यांशीं द्यावा; आणि मागून हिंग, जिरें, सुंठ, मिरीं व पिंपळी, यांचें चूर्ण दोन मासे द्यावें; आणि ताकभात जेवावा; ह्मणजे कफवातजनितसंग्रहणीचा नाश होतो.

कर्चूरादिचूर्ण.

कर्चूरोलवणंपंचरास्नाव्यूष्णंहरीतकी ॥ सर्जिक्षारंयवक्षारंमातुलुं गंसमंसमं ॥ चूर्णमुष्णांबुनापेयंवलवर्णाग्निवर्धनं ॥ श्लेष्मिकंग्र हणीदोषंसवातंचविनाशयेत् ॥

अर्थ—कचोरा, पंचलवणें, रास्ना, सुंठ, मिरीं, पिंपळी, हरीतकी, साजेखार, यवखार व माहाळुंग हीं समभाग घेऊन यांचे चूर्ण ऊन पाण्याशीं प्यावें; ह्मणजे बल, वर्ण व अग्नि यांना वाढवितें; आणि कफवातसंग्रहणीचा नाश करितें.

तालीसादिवटी.

तालीसपत्रचविकामरिचानांपलंपलं ॥ कृष्णातन्मूलयोर्द्वेद्वेपलेशुंठीपल त्रयं ॥ चातुर्जातमुशीरंचकर्षांशंसूक्ष्मचूर्णितं ॥ चूर्णस्यत्रिगुणेनैवगुडेन वटिकाकृता ॥ भक्षयेत्तुपलार्धंचवातश्लेष्मोत्थितेगदे ॥ उत्कटांग्रहणीं छर्दिंकासंश्वासंज्वरारुची ॥ शोफगुल्मोदरंपांडुंतालीसाद्येननाशयेत् ॥

अर्थ—तालीसपत्र, चवक, मिरें हीं चार चार तोळे, पिंपळी व पिंपळमूळ हीं आठ आठ तोळे, सुंठ बारा तोळे, आणि चातुर्जात व वाळा हें एकेक तोळा यां सर्वांचे चूर्ण आणि चूर्णाचें तिप्पट गूळ यांत दोन तोळ्याची गोळी करावी; ती भक्षण केली असतां, कष्टतरसंग्रहणी, ओकारी, खोकला; दमा, ज्वर, अरुचि, सूज, गुल्म, उदर व पांडु यांचा नाश करिते. हिला तालीसादि वटी ह्मणावी.

कफपित्तसंग्रहणीवर रसादिवटिका.

शुद्धसूतंत्रिभागगंधंजंबीरैर्मर्दयेद्दिनं ॥ सर्वांशंनीवशंखंकमरीचिमधुसं
युतं ॥ निष्ककेननिहंत्याशुग्रहणींकफपित्तजां ॥

अर्थ—शुद्ध पारा एक भाग व गंधक तीन भाग यांची कज्जली करून त्यांत सर्वां-
शीं जिवंत क्षुद्रशंख घालून जंबीररसांत एक दिवस मर्दन करावा; आणि मिरीं व मध
यांशीं च्यार मासे द्यावी, ह्मणजे कफपित्तजग्रहणीचा नाश होतो.

मुसल्यादियोग.

मुसलींपेषयेत्तक्रेअथवातंडुलोदकैः ॥
कर्षैकंयोजयेच्चानुपथ्यंतक्रौदनंहितं ॥

अर्थ—मुसळी ताकांत किंवा तांदळांचे धुवणांत वाटून एक तोळा द्यावी, व पथ्या-
ला ताकभात द्यावा; ह्मणजे हें ग्रहणीनाशक आहे.

वातपित्तसंग्रहणीवर मुंड्यादिगुटिका.

मुंडीशतावरीमुस्तावान्हरीदुग्धिकामृता ॥ यष्टिकंसैंधवंतुल्यंसूक्ष्मचू
र्णंप्रकल्पयेत् ॥ चूर्णस्यद्विगुणंयोज्याविजयामृदुभर्जिता ॥ घृतस्नि
ग्धेपचेद्भांडेदुग्धंदशगुणंगवां ॥ यावत्पिंडत्वमापन्नातावन्मृद्वग्निना
पचेत् ॥ पिंडतुल्यंतुसत्क्षौद्रंमिश्रीनिष्कत्रयंत्रयं ॥ भक्षयेद्विजयेदेवद्वं
द्वजग्रहणीगदं ॥ पित्तवातेश्लेष्मपित्तेसम्यक्पित्तेचयोजयेत् ॥

अर्थ—मुंडी, शतावरी, नागरमोथा, कुहिलीचें बीज, दुधी, गुळवेल, ज्येष्ठमध व सैंधव
यांचें बारीक चूर्ण करून चूर्णाच्या दुप्पट भाजलेली भांग घालून तुपाच्या भांड्यांत गाई-
चें दसपट दूध मंदाग्नीनें पचन करावें. गोळा होऊं लागला, ह्मणजे त्या गोळ्याइतका मध
घालावा; आणि त्यांतून एक तोळा तीनताळें साकरेशीं भक्षण करावा; ह्मणजे द्वंद्वज
संग्रहणी, पित्तवात, श्लेष्मपित्त व पित्त यांचा नाश करितो.

सन्निपातग्रहणीनिदानलक्षण.

पृथक्वातादिनिर्दिष्टहेतुलिंगसमान्विते ॥
त्रिदोषंनिर्दिशेदेनंतस्यवक्ष्यामिलक्षणं ॥

अर्थ—वातादिसंग्रहणीचीं जी निदानें आणि लक्षणें सांगितलीं. तीं सर्व ज्या संग्र
हणीचे ठायीं झालीं, तिला सन्निपातग्रहणीरोग ह्मणतात. त्याचीं लक्षणें पुढें सांगतो.

आमंबहुसपैच्छिल्यंसशब्दंमंदवेदनं ॥
पक्षान्मासाद्दशाहाद्वानित्यंचापिविमुंचति ॥

अर्थ—त्रिदोषग्रहणीरोग अपक्व, बहुत चिकट, मंदवेदना, आणि शब्द यांहीं करून युक्त अशा मळाला पंधरा दिवसांनीं, किंवा मासांनीं, अथवा दाहावे दिवशीं, किंवा नित्य अपानद्वारा सोडितो.

असाध्यलक्षण.

दिवाप्रकोपोभवतिरात्रौशांतिंव्रजत्यपि ॥
दुर्विज्ञेयादुर्निवाराचिरकालानुबंधिनी ॥

अर्थ—जी ग्रहणी दिवसास प्रकुपित होत्ये; आणि रात्रिचे ठायीं यत्किंचित शांत होत्ये. ती अत्यंत दुर्ज्ञेय आणि दुर्निवार व बहुत काळ राहाणारी अशी जाणावी.

घटीयंत्रग्रहणीलक्षण.

प्रसुप्तिःपार्श्वयोःशूलंतथाजलघटीध्वनिः ॥
तंवदंतिघटीयंत्रमसाध्यंग्रहणीगदं ॥

अर्थ—ज्या ग्रहणीचे ठायीं आंगास चिमटा घेतला असतां, कळत नाहीं, असें बधिर होतें, व दोहींकुशींत शूल होतो, पोटांत गुडगुड भडभड असा शब्द होतो; त्या व्याधी-ला घटीयंत्रग्रहणी ह्मणतात; ती ग्रहणी असाध्य जाणावी.

लिंगैरसाध्योग्रहणीविकारोयैस्तैरतीसारगदोनिषिध्येत् ॥
वृद्धस्यनूनंग्रहणीविकारोहत्वातनुंनोविनिवर्ततेच ॥

अर्थ—ज्या लक्षणें करून अतिसार असाध्य होतो. तीं लक्षणें ज्या ग्रहणीचे ठायीं झालीं-तीही ग्रहणी असाध्य जाणावी; व वृद्धमनुष्यास ग्रहणीविकार झाला असतां, मारल्या वांचून सोडित नाहीं.

अतीसारस्यरिष्टानिग्रहण्यामपिलक्षयेत् ॥

अर्थ—अतिसाराचे जे उपद्रव ते प्रायः ग्रहणीचे ठाईं होतात. असे समजावें.

ज्वालालिंगरस.

शुद्धसूतंमृतंस्वर्णंमरिचंतुत्थकंसमं ॥ ज्वालामुख्याग्निजैर्द्रवैर्जलंमंदं विपाचयेत् ॥ दिनैकंमर्दयेत्खल्वेगुंजामात्रंचभक्षयेत् ॥ ज्वालालिंग रसोनामत्रिदोषेयोजयेत्सदा ॥ कर्षैकंवन्हिमूलंतुतक्रेपिष्ट्वापिबेदनु ॥ तक्रारिष्टयुतंपथ्यंशाल्यन्नंभक्षयेत्सदा ॥

अर्थ—शुद्ध पारा, सुवर्णभस्म, मिरीं व मोरचूत हें समभाग घेउन भाटत्रांवळ व चित्रक यांच्या रसांत मंदाग्निर पचन करावें; नंतर एक दिवस खल करावा, यांनून

एक गुंज त्रिदोषावर द्यावा. मागून चित्रक मूळ ताकांत वांटून तें एक तोळा ताक पिण्यास द्यावें; आणि पथ्याला ताकभात, मद्य हे द्यावें.

ग्रहणीकपाटरस.

तारमौक्तिकहेमानिसाराश्चैककभागिकाः ॥ द्विभागोगंधकःसूतस्त्रिभागोमर्दयेद्भिपक् ॥ कपित्थस्वरसैर्गाढंमृगशृंगेतुतत्क्षिपेत् ॥ पुटेन्मध्यपुटेनैवततउद्धृत्यमर्दयेत् ॥ चलारसैःसप्तवेलमपामार्गरसैस्त्रिधा ॥ माषमात्रंरसोदेयोमधुनामरिचैस्तथा ॥ हन्यात्सर्वानतीसारान्ग्रहणींसर्वजामपि ॥ कपाटोग्रहणीरोगेरसोयंवन्हिदीपनः ॥

अर्थ—रौप्यभस्म, मौक्तिकभस्म, सुवर्णभस्म, कांत, हीं एकेक तोळा; व गंधक दोन भाग व पारा तीनभाग एकत्र करून कवठाच्या रसांत खलोन, हरणाच्या शिंगांत भरून मध्यम पुट द्यावें; शीत झाल्यावर काढून चिकण्याच्या रसाच्या सात भावना द्यावा; आणि आघाडयाच्या रसाच्या तीन भावना द्याव्या; ह्मणजे ग्रहणीकपाट रस होतो. हा रस एक मासा मध व मिऱ्याचें चूर्ण यांशीं द्यावा; ह्मणजे संपूर्ण अतिसार व सन्निपातात्मकसंग्रहणी यांचा नाश करितो; व अग्निदीपन करितो.

दुसरा प्रकार.

रसेनगंधातिविषाभयाभ्रंदशत्रयंमोचरसंवचाच ॥
जयाचजंबीररसेनपिष्टःपिंडीकृतःस्याद्ग्रहणीकपाटः ॥

अर्थ—पारा, गंधक, अतिविष, हरीतकी व अभ्रकभस्म हीं प्रत्येकीं दाहा भाग; आणि मोचरस, वेखंड व भांग ही प्रत्येकीं तीन तीन भाग एकत्र करून लिंबाच्या रसांत गोळी करावी. याला ग्रहणीकपाट रस ह्मणतात.

तिसरा प्रकार.

शुद्धैःकर्कवराटकैर्गणनयाभल्लातकान्तत्समान्स्रोतान्वब्बुलकंटकैर्लघुपुटैस्तस्यांत्रिभागस्यच ॥ लेलीतेनसमंविचूर्ण्यजययासप्तानुभाव्यांशिवप्रोक्तोयंग्रहणीकपाटकरसस्त्रिवल्लकःस्वौषधैः ॥

अर्थ—चांगल्या पांढऱ्या दहिंकवडया घेऊन त्यांचे संख्ये इतके बिब्बे घ्यावे; आणि त्यांनां बाभळीच्या कांटयानें टोंचून लघुपुटानें तेल काढून तें चतुर्थांश व गंधक कवडयावरावर हीं सर्व एकत्र खलावीं; आणि त्यास भांगेचीं सात पुटें द्यावीं. हा ग्रहणीकपाट शिवानें सांगितला हा अनुपानाशीं तीन वाल द्यावा.

वज्रकपाटरस.

मृतसूताभ्रकंगंधंयवक्षारंसटंकणं ॥ अग्निमंथंवचांकुर्यात्सूततुल्या निमान्सुधीः ॥ ततोजयंतीजंबीरभृंगद्रावैर्विमर्दयेत् ॥ त्रिवासरंततो गोलंकृत्वासंशोष्यसाधयेत् ॥ लोहपात्रेशरावेचदत्वोपरिचमुद्रयेत् ॥ अधोवन्हिंशनैःकुर्यात्यामार्धंततउद्धरेत् ॥ रसतुल्याप्रतिविषादद्या न्मोचरसस्तथा ॥ कपित्थविजयाद्रावैर्भावयेत्सप्तधापृथक् ॥ धातकी द्रयवामुस्तालोध्रबिल्वगुडूचिका ॥ एतैर्द्रवैर्भावयित्वावल्लैकैकंतुशो षयेत् ॥ रसंवज्रकपाटाख्यंमाषैकंमधुनालिहेत् ॥ वन्हिशुंठीविडंवि ल्वंलवणंचूर्णयेत्समं ॥ पिबेदुष्णांबुनाचानुसर्वजांग्रहणींहरेत् ॥

अर्थ—पारदभस्म, अभ्रकभस्म, गंधक, जवखार, टांकणखार, टाकळी व वेखंड हीं समभाग चूर्णे घेऊन त्यांला भांग, लिंबु व माका यांच्या रसांत तीन दिवस मर्दन करावें; नंतर त्याचा गोळा करून सुकवून लोहपात्र किंवा शराव यांमध्यें ठेऊन मुद्रा करावी; आणि अग्नीवर चार घटका पचवून उतरून घ्यावा; नंतर पाऱ्या इतकें अतिविष व मोच· रस हे घालोन त्याला कंवठ. व भांग यांच्या रसाच्या सात भावना द्याव्या; आणि धायटी, इंद्रजव, नागरमोथा, लोध्र, वेल व गुळवेल, यांच्या काढयानें किंवा रसानें एकेक भावना द्यावी; वालप्रमाण गोळी बांधावी; ह्मणजे वज्रकपाट रस तयार होतो. हा एक-मासा रस मधाशीं द्यावा; आणि मागून चित्रक, सुंठ, वावडिंग, बेलफळ, व मीठ याचें समभाग चूर्ण ऊनपाण्याशीं प्यावयास द्यावें; ह्मणजे सन्निपातसंग्रहणीचा नाश करितो.

ग्रहणिकामदवारणसिंह.

सुरभिपारदहिंगुलचित्रकान्गगनभ्रष्टसुटंकणजातिकान् ॥ कनकवी जमथोतिविषाकटुत्रयहरीतकिभस्मसुदीप्यकान् ॥ गरलबिल्वकलिं गकपित्थकाननलदमोचकदाडिमधातकी ॥ जलदशाल्मलिपिच्छयुता न्समान्कनकसाम्यमफेनमिदंदृढं ॥ कनकपत्ररसैःपरिमर्दयेन्मरिचमा नवटीमधुसंयुता ॥ विनिहरेद्ग्रहणीगदमुत्कटंज्वरयुतामसतींचविषू चिकां ॥ अग्निमांद्यमक्षशूलविबंधंगुल्मशूलमथपांडुममंदं ॥ सरुचि राममतीवसमुत्कटंग्रहणिकामदवारणसिंहः ॥

अर्थ—शुद्ध पारा, हिंगुळ, चित्रक, अभ्रक, टांकणखार भाजलेला, धोत्र्याचें बीज, अतिविष, सुंठ, मिरीं, पिंपळी, बाळहिरडे, माळशेणीची राख, ओंवा, वचनाग, बिल्वफळ, इंद्रजव, कंवठ, वाळा, सांवरीचा चीक, डाळिंब, धायटीचें फूल, नागरमोथा, सांवरीचीं

फुलें व धोत्र्याच्या समान अफू हीं सर्व घेऊन धोत्र्याचे पानाच्या रसांत मर्दन करून मिऱ्याएवढी गोळी मधाबरोबर द्यावी. ती ज्वरयुक्तग्रहणी, दुष्ट विषूचिका, अग्निमांद्य, शूल, अनेक गुल्म, तीव्र पांडुरोग व रक्तस्रावी आम यांचा नाश करिते. यास्तव याला ग्रहणिकामदवारणसिंह ह्मणतात.

पारदादिवटी.

पारदंगंधकंतारममृतंचानुशुल्बकं ॥ त्रिफलात्रिसुगंधीचचित्र
कोशीररेणुकाः ॥ रजनीद्वयसंयुक्तंसंपेष्यवटकीकृतं ॥ ग्रहण्य
ष्टविधंशूलंशोथातीसारनाशनं ॥

अर्थ—पारा, गंधक, रुप्यभस्म, वचनाग, ताम्रभस्म, त्रिफळा, त्रिसुगंध, चित्रक, वाळा, पित्तपापडा, हळद व दारुहळद हीं सर्व एकत्र करून घोटावीं; आणि त्याची गोळी करावी. ती संग्रहणी, आठ प्रकारचा शूळ, सूज व अतिसार यांचा नाश करिते.

सर्जीक्षारादियोग.

सर्जिकायवशक्रंवाविजयातिविषासमं ॥ दीप्यकंपारदंगंधंनिं
बुनीरेणभावयेत् ॥ माषार्धमधुनादेयंसितयावाघृतान्वितं ॥
अनुदद्यात्ग्रहण्यार्तिज्वरातीसारशांतये ॥ सशूलशोथसहि
तांग्रहण्यार्तिंप्रणाशयेत् ॥

अर्थ—सर्जक्षार, जवखार, भांग, अतिविष, ओंवा, पारा व गंधक हे समान एकत्र करून त्याला लिंबाच्या रसाची भावना द्यावी; हीं चार गुंजा मधाशीं द्यावीं. मागून साकर तूप द्यावें, तो योग संग्रहणी, व ज्वर, अतिसार, शूल व सूज, यांणीयुक्त संग्रहणी याचा नाश करितो

वराटादियोग.

दग्ध्वावराटकान्पीतान्त्र्यूषणंटंकणंविषं ॥ गंधकंशुद्धसूतंच
समंजंबीरजैर्द्रवैः ॥ मर्दयेत्भक्षयेत्माषंमरीचाज्यंलिहेदनु ॥
निहंतिग्रहणीरोगान्पथ्यंतक्रौदनंहितं ॥

अर्थ—पिंवळ्या कवड्या घेऊन भाजाव्या; आणि त्यांबरोबर सुंठ, मिरीं, पिंपळी, टांकणखार, वचनाग, गंधक, आणि पारा हे समभाग घेऊन त्यांचा लिंबाच्या रसांत खल करावा. त्यांतून एक मासा रस मिऱ्यें व तूप यांशीं द्यावा. पथ्य ताक भात द्यावा; तो संग्रहणीचा नाश करितो, व ज्वरप्रकरणामध्ये व्याघ्रिगजकेसरी रस सांगितला आहे, तोही द्यावा.

सुवर्णरसपर्पटी.

शुद्धसूतंपलमितंतुर्यांशंस्वर्णसंयुतं ॥ मर्दयेन्निंबुनीरेणयावदेकत्वमा

मुयात् ॥ प्रक्षाल्योष्णांबुनापश्चात्पलमात्रेसुगंधके ॥ द्रुतेलोहमयेपा त्रेबादरानलयोगतः ॥ प्रक्षिप्यचालयेल्लौहामदंमंदंविलोक्यच ॥ ततःपाकंविदित्वातुरंभापत्रेविनिःक्षिपेत् ॥ गोमयस्थेतदुपरिरंभापत्रे णयंत्रयेत् ॥ शीतंतच्चूर्णितंगुंजाक्रमवृध्यानिषेवयेत् ॥ माषमात्रंभवे यावत्तोमात्रांनवर्धयेत् ॥ सक्षौद्रेणोषणेनैवलेहयेद्विपगुत्तमः ॥ ग्रह णींहंतिशोपंचसुवर्णरसपर्पटी ॥ सद्योबलकरीशुक्रवर्धनीवन्हिदीप नी ॥ क्षयकासश्वासमेहशूलातीसारपांडुनुत् ॥

अर्थ—शुद्ध पारा ४ तोळे व सुवर्ण १ तोळा एकत्र करून लिंबाच्या रसांत मर्दन करावीं. एकरूप झाल्यावर धुवून च्यार तोळे शुद्ध गंधक लोहपात्रांत बोरीच्या अग्नीवर पातळ करून त्यांत तो स्वर्ण पारा टाकून लोखंडाच्या पळीनें मंद मंद चाळवून पक्व झाल्यावर शेणाच्या खळींत केळीचें पान ठेऊन त्यावर ओतावा; आणि दुसरें केळीचें पान वर घालून वर शेण टाकावें; शीत झाल्यावर काढून घ्यावा. ही एक गुंजेपासून क्रमानें साहा गुंजा पावेतों मध व त्रिकटु यांशा घेत जावी; ह्मणजे संग्रहणी, शोष, क्षय, खोकला, दमा, मेह, शूल, अतिसार व पांडुरोग यांचा नाश करित्ये, व ही सुवर्णरसप- र्पटी तात्काळ बळ, शुक्र व अग्नि यानां वाढवित्ये.

पर्पटी.

शुद्धपारदगंधाभ्यांकृतापर्पटिकानृणां ॥
निहंतिग्रहणींक्षौद्रयुक्तांपथ्यभुजांभृशं ॥

अर्थ—शुद्धपारा व गंधक यांच्या कज्जलीची पर्पटी करून ती मधाशीं द्यावी. ती संग्रह- णीचा नाश करित्ये. हीवर पथ्य करावें.

ग्रहणीगजकेसरी रस.

गंधंपारदमभ्रकंचदरदंलोहंचजातीफलंबिल्वंमोचरसंविषंअतिविषं व्योषंतथाधातकी ॥ भ्रष्टामप्यभयांकपित्थजलदौदीप्यानलौदाडि मंटंकाह्वस्मकलिंगकात्कनकजंबीजंचयक्षेक्षणं ॥ एतत्तुर्यगफेनमेत दखिलंसंमर्द्यसंचूर्णयेद्धत्तूरच्छदजैरसैःसुमतिमान्कुर्यान्मरीचाकृतिं ॥ दत्तासाग्रहणीगदंसरुधिरंसामंसशूलंचिरातीसारंविनिहंतिजूर्तिस हितांतीव्रांविषूचीमपि ॥ साध्यासाध्यमपिस्वयंपरिहरेदुक्तानुपाने रपिनाम्नातुग्रहणीमतंगजमदध्वंस्येपकंठीरवः ॥

अर्थ—गंधक, पारा, अभ्रकभस्म, हिंगुळ, लोह, जायफळ, बेलफळ, मोचरस, बचनाग, अतिविष, सुंठ, मिरीं, पिंपळी, धायटीफुलें, भाजलेली हरीतकी, कवठ, नागरमोथा, ओंवा, चित्रक, डाळिंब, कुडयाच्या साली्ची राख १ तोळा, धोतऱ्याचें बीं व सागरगोटा हीं समभाग व अफीण चार भाग, हीं सर्व एकत्र करून धोतऱ्याच्या पाल्याच्या रसांत निंम्या एवढी गोळी करावी. ती दिली असतां, संग्रहणी, रक्त, आव, शूल, फारदिवसांचा अतिसार, ज्वर, तरळ, आणि साध्यासाध्य संग्रहणी यांचा नाश करिते याला ग्रहणीगजकेसरी रस ह्मणतात.

अग्निसूनुरस.

भागोदग्धकपर्दकस्यचतथाशंखस्यभागद्वयंभागोगंधकसूतयोर्मिलित योःपिष्टामरीचादपि ॥ भागस्यात्रितयंनियोज्यसकलंनिंबूरसेचूर्णितं नाम्नावन्हिसुतोरसोयमचिरान्मांद्यंजयेद्दारुणं ॥- घृतेनखंडैःसहभक्षि तोसौक्षीणान्नरानाशुसमीकरोति ॥ समागधीचूर्णघृतेनलीढोनरःप्रमु चेद्ग्रहणीविकारात् ॥ शोपज्वरारोचकशूलगुल्मान्पांडूदरार्शोग्रह णीविकारान् ॥ तक्रानुपानोजयतिप्रमेहान्युक्त्याप्रयुक्तोग्निसुतोरसेंद्रः ॥

अर्थ—कवडीभस्म १ भाग, शंखभस्म २ भाग, गंधक व पारा मिळून एक भाग व मिऱ्याचें चूर्ण तीन भाग हीं सर्व एकत्र करून त्यांचा निंबाच्या रसांत खल करावा. हा अग्निसूतरस. युक्तीनें तूप साकरेशी घेतला असतां, बहुत दिवसाचें अग्निमांद्य क्षीणता यांचा नाश करितो, व पिंपळीचें चूर्ण व तूप यांशी संग्रहणीविकार व ताका-शीं शोष, ज्वर, अरोचक, शूल, गुल्म, पांडू, उदर, अर्श, संग्रहणी, यांचा नाश करितो, हा प्रमेहावर युक्तीनें द्यावा; ह्मणजे त्यांचा नाश करितो.

ग्रहणीकपाट रस.

पारदाद्द्विगुणोगंधस्ताभ्यांतुल्यंकटुत्रयं ॥ अजाजिटंकणंधान्यंहिंगुजी रयवानिकाः ॥ प्रत्येकंद्विगुणंसूताद्वराटचकंचचतुर्गुणं ॥ सर्वेषांचसमाज्ञे यादग्धासुशुभ्रैर्वराटिका ॥ सर्वमेकीकृतंचूर्णंगापद्वयमितंततः ॥ तक्रेणालो डयमतिमान्भक्षयेत्सततंनरः ॥ ग्रहणीकपाटोह्येपहितःस्याद्ग्रहणीगदे ॥

अर्थ—पारा एक भाग, गंधक दोन भाग, त्रिकटु तीन भाग जिरें, टांकणखार, धने हिंग, जिरे व ओंवा हीं प्रत्येक पाऱ्याच्या दुप्पट; आणि पादेलोण पाऱ्याच्या चौपट व या सर्वांबरोबर कवडीचें भस्म हीं संपूर्ण एकत्र खलावीं; ह्मणजे ग्रहणीकपाट झाला. यातून दोन मासे ताकाशीं भक्षण करावा. हा संग्रहणीचा नाश करितो.

सूतादिगुटी.

सूतकंगंधकंलोहंविषंचित्रकपत्रकं ॥ विडंगरेणुकामुस्तमेलाग्रंथिककेसरं ॥ फलत्रिकंत्रिकटुकंशुल्वभस्मंतथैवच ॥ एतानिसमभागानिदीयतेद्विगुणोगुडः ॥ कासेश्वासेक्षयेगुल्मेप्रमेहेविषमज्वरे ॥ लूतायांग्रहणींमांद्येशूलेपार्श्वामयेतथा ॥ हस्तपादादिरोगेषुगुटिकेयंप्रशस्यते ॥

अर्थ–पारा, गंधक, लोह, बचनाग, चित्रकमूळ, तमालपत्र, वावडिंग, पित्तपापडा, नागरमोथा, एला, पिंपळमूळ, नाकेशर, त्रिफळा, त्रिकटु व ताम्रभस्म हीं समभाग, आणि गूळ दोन भाग यांची गोळी खोकला, दमा, क्षय, गुल्म, प्रमेह, विषमज्वर, लूता, संग्रहणी, अग्निमांद्य, शूल, कुक्षिरोग; आणि हातपायांचे रोग यांवर द्यावी: ही फार प्रशस्त आहे.

कणादिलेह.

कणानागरपाठाभिस्त्रिवर्गद्वितयेनच ॥ बिल्वचंदनव्हीबेरैःसर्वातिसारनुन्मतः ॥ सर्वोपद्रवसंयुक्तामपिहंतिप्रवाहिकां ॥ नानेनसदृशोलेहोविद्यतेग्रहणीहरः ॥

अर्थ–पिंपळी, सुंठ, पाहाडमूळ, त्रिफळा, त्रिकटु, बेलफळ, चंदन व वाळा यांचा लेह करावा. तो संपूर्ण उपद्रवयुक्त संग्रहणी व प्रवाहिका यांचा नाश करितो. याविषयीं दुसरा प्रयोग उत्तम नाहीं.

अभ्रकादिवटी.

रसंगंधंविषंव्योषंटंकणंलोहभस्मकं ॥ अजमोदाहिफेनंचसर्वतुल्यंमृताभ्रकं ॥ चित्रकत्वक्कषायेणमर्दयेद्याममात्रकं ॥ मरीचाभांवटींकृत्वाखादेदेकांजयेदसौ ॥ चतुर्विधांचग्रहणींरहस्यंतदिदंस्मृतं ॥

अर्थ–पारा, गंधक, बचनाग, सुंठ, मिरीं, पिंपळी, टांकणखार, लोहभस्म, अजमोदा, व अफीम हीं समभाग व सर्वांसमान अभ्रकभस्म हे पदार्थ चित्रक व दालचिनी यांच्या काढ्यांत एक प्रहर खलावे; आणि मिऱ्या एवढी गोळी बांधावी. वेळेस एकेक खातजावी; ह्मणजे चार प्रकारचे संग्रहणीचा नाश करित्ये. हें गुह्य सांगीतलें.

सूतराज.

रसगंधाभ्रकाणांचभागानेकद्विकाष्टकान् ॥ संचूर्ण्यसर्वरोगेषु युंज्याद्वल्लचतुष्टयं ॥ ग्रहणीक्षयगुल्मार्शोमेहधातुगतज्वरान् ॥ निहंतिसूतराजोयंमंडलस्यचसेवनात् ॥

अर्थ–पारा १ भाग, गंधक २ भाग, अभ्रकभस्म ८ भाग, याप्रमाणें मिळवून तो चार वाल सर्व रोगांवर एक मंडल पर्यंत द्यावा. हा सूतराज संग्रहणी, क्षय, गुल्म, अर्श मेह व धातुगतज्वर यांचा नाश करितो.

पूर्णचंद्ररसेंद्र.

सूतंगंधंचाश्वगंधागुडूचीयष्टीतापैर्मर्दयेदेकघस्रं ॥ क्षुद्रंशंखंमौक्तिकं लोहकिट्टंभस्मीभूतंसूततुल्यंतुदद्यात् ॥ भूकूष्मांडैस्तद्वादसंरसंविमर्द्य गोलंकृत्वाभूधरेतंपुटेच्च ॥ चूर्णंकृत्वानागवल्लीरसेनदद्यादेतंमर्दयित्वैकयामं ॥ मध्वाज्याभ्यांपूर्णचंद्रोरसेंद्रःपुष्टिंवीर्यंदीपनंचैवकुर्यात् ॥ प्रायोयोज्यःपित्तरोगेग्रहण्यामर्शोरोगेपित्तजेघोलयुक्तं ॥ स्त्रीणांतापे शाल्मलीनीरयुक्तंयोज्यंचाज्यंवाशताव्हाविपक्वं ॥

अर्थ–पारा. गंधक, यानां अश्वगंध, गुळवेल व ज्येष्ठमध, यांचे काढयांत एक दिवस घोटून नंतर क्षुद्रशंख, मौक्तिक व मंडूर यांचां भस्म पारदाबरोबर घालावीं; नंतर भुयकोहळ्याच्या रसांत एक दिवस खलून त्याचा गोळा करून भूधरयंत्रांत पचवावा. शीत झाल्यावर बारीक करून नागवेलीच्या रसांत एक प्रहर खलावा; ह्मणजे हा पूर्ण चंद्ररसेंद्र झाला हा तूप व मध यांशीं घेतला असतां, व पुष्टि, वीर्य, यांतें देतो, व अग्निदीपन करितो. हा प्रायः पित्तरोग. पित्तसंग्रहणी, पित्तज मुळव्याध, यांवर घोलाशीं द्यावा; व स्त्रियांच्या संतापावर शेंवरीच्या रसाशीं द्यावा. किंवा शताव्हाघृतावरोबर द्यावा.

चित्रांबररस.

शुद्धसूतंमृतंचाभ्रंगंधकंमर्दयेत्समं ॥ लोहपात्रेघृताभ्यक्तेक्षणंमृद्वाग्नि नापचेत् ॥ चालयेल्लोहदंडेनअवतार्यविभावयेत् ॥ त्रिदिनंजीरककाथैर्माषैकंभक्षयेत्सदा ॥ ग्रहणीशांतिमायातिसर्वोपद्रवसंयुता ॥ रसश्चित्रांबरोनामग्रहणीग्रहदन्मतः ॥ शमयेदनुपानेनआमशूलंप्रवाहिकं

अर्थ–शुद्ध पारा व गंधक, यांची कज्जली व अभ्रकभस्म, हे पदार्थ लोखंडीत तुपावर मंदाग्नीनें शिजवावे; आणि लोखंडाच्या दंडानें घोटावें; नंतर उतरून तीन दिवस जिऱ्याच्या काढयाची भावना द्यावी; ह्मणजे चित्रांबर रस झाला हा अनुपानाशीं एक मासा द्यावा तो संपूर्ण उपद्रवांनीं युक्त अशी संग्रहणी, आमशूल आणि प्रवाहिका यांचा नाश करितो.

अगस्तिसूतराजरस.

रसबलिसमभागंतुल्यहिंगूलयुक्तंद्विगुणकनकबीजंनागफेनेनतुल्यं ॥ सकलविहितचूर्णंभावयेद्भृंगनीरैर्ग्रहणिजलधिशोषेसूतराजोह्यगस्तिः ॥

त्रिकटुकमधुयुक्तोसर्ववांतिंचशूलंकफपवनविकारंवन्हिमांद्यंचनिद्रां ॥
घृतमरिचयुतोयंगुंजमात्रःप्रवाहिंहरतिषडतिसारान्जीरजाजीफलेन ॥

अर्थ–पारा, गंधक व हिंगूळ हीं तोळा तोळा, धोत्र्याचें बीज व अफू हीं दोन दोन तोळे एकत्र करून त्यास माक्याचे रसाची भावना द्यावी. हा अगस्तिसुतराज सुंठ, मिरीं, पिंपळी व मध या अनुपानानें एक गुंज द्यावा; ह्मणजे वांति, शूल, कफवातसंबंधी विकार, अग्निमांद्य व निद्रा यांचा नाश करितो. व सहाप्रकारच्या अतिसारावर जिरें व जायफळ यांबरोबर द्यावा.

कनकसुंदर रस.

हिंगुलंमरिचंगंधंपिप्पलींटंकणंविषं ॥ कनकस्यचबीजानिसमांशं विजयाद्रवैः ॥ मर्दयेद्याममात्रंतुचणमात्रावटीकृता ॥भक्षणाद्ग्रहणींहंतिरसःकनकसुंदरः ॥ अग्निमांद्यंज्वरंतीव्रमतिसारंचनाशयेत् ॥ दध्यन्नंदापयेत्पथ्यंतथातक्रोदनंचरेत् ॥

अर्थ–हिंगूळ, मिरें, गंधक, पिंपळी, टांकणखार, बचनाग व धोत्र्यांचें बीं, सर्व समांश घेऊन भांगेच्या काढ्यांत प्रहरभर खल करावा; आणि हरभऱ्या एवढी गोळी खावी; ह्मणजे संग्रहणी, अग्निमांद्य, ज्वर व अतिसार यांचा नाश होतो. याला दहींभात किंवा ताकभात हें पथ्य आहे. याला कनकसुंदर रस असें ह्मणतात.

क्षारताम्र रस.

शंखक्षारार्कभूतिंचवराटंलोहभस्मकं ॥ अयोमलंयवक्षारंटंकणक्षारमेवच ॥ त्रिकटुसैंधवंतुल्यंभृंगतोयेनमर्दयेत् ॥ आटरूषरसैर्मर्द्यमार्द्रकस्वरसेनच ॥ चणमात्रांवटींकृत्वारसोयंक्षारताम्रकः ॥ श्वासेकासेप्रतिश्यायेपुराणज्वरपीडिते ॥ मंदाग्नौग्रहणीदोषेत्वनुपानंयथोचितं ॥ सेवयेत्सप्तरात्रेणनाशयेन्नात्रसंशयः ॥ चिरकालानुबंधेचसेवयेन्मंडलावधि ॥ तत्तद्याधिहितंपथ्यंनियमेनसमाचरेत् ॥

अर्थ–शंखभस्म, जवखार, ताम्रभस्म, कवडीभस्म, लोहभस्म, मंडूर, यवखार, टाकणखार, सुंठ, मिरें, पिंपळी, सैंधव, हीं सर्व समभाग घेऊन माक्याचा रस, अडुळशाचा रस व आल्याचा रस, यांच्या निरनिराळ्या भावना द्याव्या; आणि हरभऱ्या येवढी गोळी करावी. हा क्षारताम्ररस श्वास, कास, पडसें, जीर्णज्वर, मंदाग्नि व ग्रहणीदोष यांवर यथोक्त अनुपान योजून द्यावा. सात दिवसांत हा गुण करितो. हा चिरकालाचे व्याधींवर मंडल पर्यंत घ्यावा. व त्या त्या व्याधीचें पथ्य करावें.

चित्रकादिगुटी.

चित्रकंपिप्पलीमूलंद्वौक्षारौलवणानिच ॥ व्योपंहिंग्वजमोदं
चचव्यमेकत्रचूर्णयेत् ॥ गुटिकामातुलिंगस्यदाडिमस्यरसेन
वा ॥ कृताविपाचयत्यामंदीपयत्याशुचानलं ॥

अर्थ–चित्रक, पिंपळमूळ, सज्जीखार, जवखार, मीठ, सैंधेलोण, पादेलोण, सुंठ, मिरें, पिंपळी, हिंग, ओंवा व चवक, हीं एकत्र कुटून महाळुंगाचे किंवा डाळिंबाचे रसांत गोळ्या करून शक्त्यनुसारें करून खाव्या; ह्मणजे आमाचें पाचन आणि मंदाग्नीचें दीपन होईल.

शंबूक योग.

दग्धंशंबूकसिंधूत्थंतुल्यंक्षौद्रेणलेहयेत् ॥
निष्कैकैकंनिहंत्याशुग्रहणीरोगमुत्कटं ॥

अर्थ–शंखभस्म व सैंधव समभाग करून तीन मासे मधाशीं द्यावें; ह्मणजे मोटा ही ग्रहणीरोग नाश पावतो.

कांकायनगुटी.

पथ्यापंचपलान्येकमजाज्यामरिचस्यच ॥ पिप्पलीपिप्पलीमूलंचव्य
चित्रकनागरैः ॥ पलाभिवृद्धैःक्रमशोयवक्षारंपलद्वयं ॥ भल्लातकप
लान्यष्टौसूरणोद्विगुणोमतः ॥ द्विगुणेनगुडेनैषावटिकाचाक्षसंमिता ॥
एकैकांभक्षयेत्प्रातस्तक्रमम्लंपिबेदनु ॥ वन्हिसंदीपयत्याशुग्रहणीपां
डुरोगजित् ॥ कांकायनेनशिष्येभ्यःशस्त्रक्षाराग्निभिर्विना ॥ कथिता
गुटिकाचैषागुदजानांविनाशिका ॥

अर्थ–हरीतकी २० तोळे, व जिरें, मिरीं, पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, सुंठ, हीं प्रत्येक चार चार तोळे वृद्धीने घ्यावीं; आणि यवखार ८ तोळे, बिबवे ३२ तोळे, सुरण ६४ तोळे व गूळ सर्व चूर्णाच्या दुप्पट घालोन त्याची १ तोळ्याची गोळी करावी; आणि प्रातःकाळीं एकेक द्यावी. मागून आंबट ताक पिण्यास द्यावें; ह्मणजे अग्निदीपन करित्ये. व संग्रहणी व पांडुरोग, यांचा नाश करित्ये. ही गुटी कांकायनानें आपल्या शिष्यांला शस्त्रकर्म, क्षारकर्म, यां वाचून मुळव्याध व गुदरोग नाश करण्याकरितां सांगितली.

महाकल्याणकगुड.

पिप्पलीपिप्पलीमूलंचित्रकंगजपिप्पली ॥ धान्याकंचविडंगानियवा
नीमरिचानिच ॥ त्रिफलाचाजमोदाचनलिनीजीरकस्तथा ॥ सैंधवं

रोमकंचापिसामुद्रंरुचकंविडं ॥ आरग्वधश्चत्वक्पत्रंसूक्ष्मैलाचोपकुंचिका ॥ शुंठीशक्रयवाश्चैवप्रत्येकंकर्पसंमितं ॥ मृद्धिकायापलान्यत्रचत्वारिकथितानिहि ॥ त्रिवृचायाःपलान्यष्टौगुडस्यार्धतुलांतथा ॥ तिलतैलंपलान्यष्टौचामलक्यारसस्यतु ॥ प्रस्थत्रयमिदंसर्वंशनैर्मृद्वग्निनापचेत् ॥ उदुंबरंचामलकंवादरंवायथाफलं ॥ तावन्मात्रमिदंखादेद्भक्षयेद्वायथाबलं ॥ निखिलान्ग्रहणीरोगान्प्रमेहांश्चैकविंशतिं ॥ उरोघातंप्रतिश्यायंदौर्बल्यंवन्हिसंक्षयं ॥ ज्वरानपिहरेत्सर्वान्कुर्यात्कांतिंमतिंस्वरं ॥ यथाबलंवर्धितासारक्तपित्तंचविड्ग्रहं ॥ धातुक्षीणवयःक्षीणस्त्रीपुक्षीणःक्षयीचयः ॥ तेभ्योहितश्चवंध्यायैमहाकल्याणकोगुडः ॥

अर्थ–पिंपळी, पिंपळीमूळ, चित्रक, गजपिंपळी, धने, वावडिंग, ओंवा, मिऱ्यें, त्रिफला, अजमोदा, कमळकंद, जिरें, सैंधव, सांबारमीठ, मीठ, पादेलोण, बिडलोण, वाहव्याचा मगज, दालचिनी, तमालपत्र, बारीक एलची, एलची, सुंठ, इंद्रजव, हीं प्रत्येकी एकेक तोळा व काळीं द्राक्षें १६ तोळे, तेड ३२ तोळे, गूळ २०० तोळे, तिळाचे तेल ३२ तोळे व आवळ्यांचा रस ६४ तोळे, हीं संपूर्ण एकत्र करून मंदाग्निवर पचन करावीं त्यांतून उंबर, आंवळा, किंवा बोर, या एवढी बल पाहून गोळी खावी; ह्मणजे संपूर्ण ग्रहणीरोग, वीस प्रमेह, उरोघात, पडसें, दुर्बलता, अग्निमांद्य व संपूर्णज्वर, यांचा नाश करितें. ही थोडी थोडी यथाबल वाढविली असतां. रक्तपित्त, विड्बंध, धातुक्षीण, वयःक्षीण, स्त्रीक्षीण, क्षय, यांवर हितकारक आहे. व महाकल्याण गुड वंध्येला हितकारक आहे.

कूष्मांडगुड.

कूष्मांडानांसुपक्कानांस्विन्नानांनिष्कलत्वचां ॥ सर्पिःप्रस्थेपलशतंताम्रपात्रेशनैःपचेत् ॥ पिप्पलीपिप्पलीमूलंचित्रकंगजपिप्पली ॥ धान्यकानिविडंगानिनागरंमरिचानिच ॥ त्रिफलाचाजमोदाचकलिंगाजाजिसैंधवं ॥ एकैकस्यपलंचैकंत्रिवृतोष्टौपलानिच ॥ तैलस्यचपलान्यष्टौगुडात्पंचदशैवतु ॥ आमलकरसंचात्रप्रस्थत्रयमुदीरितं ॥ तावत्पाकंप्रकुर्वीतमृदुनावन्हिनाभिषक् ॥ यावद्दर्वीप्रलेपःस्यात्तदैनमवतारयेत् ॥ औदुंबरंचामलकंबदरंवायथाबलं ॥ तावन्मात्रमिदंखादेद्भक्षयेद्वायथाबलं ॥ अनेनैवविधानेनप्रयुक्तश्चदिनेदिने ॥ निहंति

ग्रहणीरोगान्कुष्टमर्शोभगंदरं ॥ ज्वरमानाहहृद्रोगगुल्मोदरविषुचिकाः॥ कामलांपांडुरोगंचप्रमेहांश्चैकविंशतीन् ॥ वातशोणितवीसर्पदद्रुयक्ष्महलीमकान्॥ वातपित्तकफान्सर्वान्कुष्ठान्सर्वान्समाहरेत् ॥ व्याधिक्षीणावयःक्षीणास्त्रिषुक्षीणाश्चयेनराः ॥ तेभ्योहितोगुडोयंस्याद्वंध्यानामपिपुत्रदः ॥ वृष्योबल्योबृंहणश्चवयःसंस्थापनःपरः ॥

अर्थ—चांगले पिकलेले व सोलून शिजविलेले कोहाळ्याचे तुकडे ४०० तोळे, ६४ तोळे तुपावर ताम्रपात्रामध्यें मंदाग्नीवर पचन करावे; नंतर पिंपळी, पिंपळीमूळ, चित्रक, गजपिंपळी, धने, वावडिंग, सुंठ, मिरीं, त्रिफळा, अजमोदा, कुड्याची साल, जिरें व सैंधव, ही प्रत्येकीं चार चार तोळे; आणि तेल ३२ तोळे व तेल ३२ तोळे, गूळ ६० तोळे व आवळीचा रस १९२ तोळे, एकत्र करून मंदाग्नीवर पळीला चिकटे तोंपर्यंत कढवून उतरावें; आणि त्यांतून उंबर, आवळा किंवा बोर या इतकें वल पाहून द्यावें. याप्रमाणें नित्य देत गेलें असतां, संग्रहणीरोग, कुष्ठ, मुळव्याध, भगंदर, ज्वर, आनाह, हृद्रोग, गुल्म, उदर, विषूची, कावीळ, पांडुरोग, एकवीस प्रमेह, वातरक्त, खरूज, क्षय, हलीमक, वात, पित्त, कफ, संपूर्ण कुठें, यांवर व रोगानें क्षीण, वयानें क्षीण, स्त्रीसंभोगानें क्षीण, यांवर हा हितकारक आहे; आणि वंध्यानां पुत्र देणारा, वृष्य, बलकारक, पौष्टिक, आणि वयःस्थापक असा आहे.

कल्याणगुड.

पाठाधान्ययवान्यजाजिहपुषाचव्याग्निसिंधूद्भवैःसश्रेयस्यजमोदकोटरिपुभिःकृत्वाजटासंयुतैः॥ सव्योषैःसफलत्रिकैःसत्रुटिभिस्त्वक्पत्रजैरौषधैःप्रत्येकंपलिकैःसुतैलकुडवैःसार्धत्रिवृन्मुष्टिभिः ॥ सर्वैरामलकीरसस्यतुलयासार्धंतुलार्धंगुडःसंपाच्योभिषजावलेहवदयंप्राग्भोजनाद्भक्ष्यते ॥ येकेचिद्ग्रहणीगदाःसुगुदजाःकासाःसशोपामयाःसश्वासश्वयथुश्चिरोदररुजःकल्याणकस्तान्जयेत् ॥

अर्थ—आवळ्याचा रस तोळे ४०० व गूळ तोळे २०० या दोहोंचा पाक करून त्यांत पाहाडमूळ, धने, ओंवा, जिरें, शेरणी, चवक, चित्रक, सैंधव, गजपिंपळी, अजमोदा, वावडिंगें, पिंपळमूळ, सुंठ, मिरे, पिंपळी, हिरडे, बेहेडे, आवळकाठी, एलची, दालचिनी, तमालपत्र, हीं औषधें चार चार तोळे घालून नंतर १६ तोळे तेल आणि निशोत्तर ४ तोळे घालून सर्व एकत्र करून अवलेहासारिखा होई पर्यंत पचन करावा; आणि भोजनापूर्वी एक तोळा भक्षण करावा. ह्याला कल्याणगुड असें ह्मणतात. हा संग्रहणी, मुळव्याध, श्वास, कास, शोष, सूज व उदर, यांचा नाशक आहे.

शुंठ्यादिकाढा.

शुंठींसमुस्तातिविषांगुडूचींपिबेज्जलेनक्वथितांसमांशां ॥
मंदानलत्वेसततामवातिसामानुबंधेग्रहणीगदेच ॥

अर्थ—सुंठ, नागरमोथा, अतिविष व गुळवेल, यांचा काढा मंदाग्नि, आमवात व आमसहित संग्रहणी यांचा नाशक आहे.

पुनर्नवादिकाढा.

पुनर्नवावह्निजवाणपुंखाविश्वाग्निपथ्याचिरबिल्वबिल्वैः ॥
कृतःकषायःशमयेदशेषान्दुर्नामगुल्मग्रहणीविकारान् ॥

अर्थ—घेटुळीचें मूळ, मिरें, उन्हाळी, सुंठ, चित्रकमूळ, बाळहिरडे, करंजसाल, बाळबेल यांचा काढा करून प्यावा; म्हणजे मुळव्याध व गुल्म, ग्रहणी या सर्वांस शांत करतो.

नागरादिकाढा.

नागरोशीरधनिकायवान्यतिविषाघना ॥
श्रीपर्णीचशृतंचैषांदीपनंपाचनंस्मृतं ॥

अर्थ—सुंठ, वाळा, धने, यवानी, अतिविष, नागरमोथे, साळवण, पिठवण यांचा काढा दीपन व पाचन आहे.

अतिविषादिकाढा.

अतिविषाघनवाल्कधातुकीकुटजदाडिमलोध्रमथोदकी ॥ विहितमे भिरिदंसलिलंपिबेद् ग्रहणिकाविजितःप्रसभंनरः ॥ सर्वज्वरहरंज्ञेयंग्र हणीवेगनाशनं ॥ अरोचमाग्द्यदलनंधातुवर्धनकारकं ॥

अर्थ—अतिविष, नागरमोथा, वाळा, धायटीफूल, कुडाची साल, लोध्र व पाहाडमूळ यांचा काढा प्यावा; म्हणजे संग्रहणी, सर्वज्वर, अरोचक व अग्निमांद्य यांचा नाश करितो. व धातूंची वृद्धि करितो.

भूनिंबादिचूर्ण.

भूनिंबकौटजकटुत्रिकमुस्ततिक्तःकर्षांशकाःसशिखिमूलपिचुद्वयाश्च ॥
त्वक्कौटजीपलचतुष्कमितांगुडांभःपीतंनृणामिहहरेद्गहणीविकारान् ॥

अर्थ—किराइत, इंद्रजव, सुंठ, मिरीं, पिंपळी, नागरमोथा व कुटकी ही एकेक, तोळा व चित्रकमूळ दोन तोळे, आणि कुडाची साल १६ तोळे- याचें चूर्ण एकत्र करून गुळाच्या पाण्याशीं प्राशनार्थ द्यावें, म्हणजे संग्रहणीजनितविकार नाश पावतात.

बिल्वादिदुग्ध.

बिल्वाब्दशक्रयववालकमोचसिद्धमाजंपयःपिबतियोदिवसत्रयंच ॥
सोतिप्रवृद्धचिरकद्ग्रहणीविकारंमासंसशोणितमसाध्यमपिक्षिणोति ॥

अर्थ—बेलफळ, नागरमोथे, इंद्रजव, वाळा व मोचरस हे घालून तापविलेलें शेळीचें दूध तीन दिवस जो प्राशन करितो, त्याचें संग्रहणीसंबंधी विकार नाश पावतो. व महिना घेतलें असतां, असाध्य दुष्ट रक्ताचा हीं नाश होतो.

व्योषादिचूर्ण.

व्योषंदीप्याजमोदाकृमिरिपुदहनंरामठंचाश्वगंधंसिंधूत्थंजीरकेद्वे
रुचककलयुतंधान्यकंतुल्यभागं ॥ भंगीचूर्णंलवंगंघृतमधुसहितं
शाणमात्रंचदद्याद्दीप्तिंपुष्टिंचकांतिंवलमपिकुरुतेनाशयेत्संग्रहाख्यं ॥

अर्थ—सुंठ, मिरीं, पिंपळी, ओंवा, अजमोदा, वावडिंग, चित्रक, हिंग, अस्कंद, सैंधव, जिरें, शहाजिरें, पादेलोण, बोरसाल, धने यांबराबर भांगेचें चूर्ण व लवंगाचें चूर्ण घालून एकत्र करावें. तें तीन मासे तूप व मध यांतून द्यावें; ह्मणजे तें दीप्ति, पुष्टि, कांति व बल यांतें करितें; व संग्रहणीचा नाश करितें.

तालिसादिचूर्ण.

तालीसोग्रनिशापटूषणनिशाविल्वाजमोदासठीचातुर्जातलवंगधातु
किविषाजातीफलंदीप्यकं ॥ पाठामोचरसाम्लपंचलवणाजातीद्वयं
वेल्लकंवृक्षाम्लाम्लवरापलाशतरुजंमांस्यर्बुदंवालकं ॥ ऐंद्रीत्वक्ससुव
र्चलाद्दढपदाकुष्ठंसमस्तैःसमंवल्यासर्वसमाजयाखिलसमामत्स्यंडि
कावासिता ॥ चूर्णोयंग्रहणीक्षयादिकसनश्वासारुचिप्लीहहृद्दुर्नामा
तिसृतिज्वरार्तिपवनस्थौल्यप्रमेहप्रणुत् ॥ तीव्रापस्मृतिपांडुगुल्मजठ
रश्लेष्मोत्थपित्तोद्भवोन्मादाध्मानविषूचिहंतिसकलंमासार्धसंसेवनात्
एवंतालिसयुक्तमेवविहितंचूर्णंसुसिद्धंभुविबालानांचविशेषतोहितक
रंसंस्पष्टवाणिप्रदं ॥ मांद्यध्वंसविधायकंविजयतेसर्वामयध्वंसकंपुष्ट्या
युर्वलकांतिधीस्मृतिमहामेधाविलासप्रदं

अर्थ—तालीसपत्र, वेखंड, हळद, सुंठ, मिरीं, पिंपळी, पिंपळमूळ, चित्रक, चवक, आंबेहळद, बेलफळ, अजमोदा, कचोरा, चातुर्जात, लवंग, धायटीफूल, अतिविष, जायफळें, ओंवा, पहाडमूळ, सांवरीचा चीक, आमसोल, पंचलवणें, जिरें, शाहाजिरें, वावडिंग,

आम्लवेतस, चिंच, त्रिफळा, पळसपापडी, जटामांसी, तरवड, वाळा, एलची, ब्राह्मी, जवस, गुयआंवळी व कोष्ट, हीं समभाग आणि सर्वांच्या बरोबर थोर चिकणा, त्या सर्वांच्या बरोबर हर्डी ती सुद्धां सर्वांच्या बरोबर खडीसाकर, हीं घालून चूर्ण करावें. तें १६ दिवस घेतलें असतां, संग्रहणी, क्षय, खोकला, दमा, अरुचि, प्लीहा, मुळव्याध, अतिसार, ज्वर, वायु, स्थूलता, प्रमेह, अपस्मार, पांडु, गुल्म, उदर, कफजव्याधि, पित्तजव्याधि, उन्माद, पोटफुगणें व विषूचिका, यांचा नाश करितें. या प्रमाणें हें तालिसादिचूर्ण या भूमीमध्यें सिद्ध आहे. व बालानां हें विशेषेंकरून उपयोगीं पडतें. हें नाचा देणारें आहे; व अग्निमांद्य, संपूर्ण रोग, यांचा नाश करितें; आणि पुष्टि, आयुष्य-बल, कांति, बुद्धि व स्मृति व धारणा यांतें देणारें आहे.

मसुरादियोग.

मसूरायाःकषायेणबिल्वगर्भंविपाचयेत् ॥
हंतिकुक्ष्यामयान्सर्वान्ग्रहणीपांडुकामलान् ॥

अर्थ—मसुरांच्या काढ्यांत बेलफळाचा मगज शिजवावा; आणि द्यावा. तो संपूर्ण कुक्षिरोग, संग्रहणी, पांडुरोग, आणि कामला यांचा नाश करितो.

दशमूलादिकाढा.

विश्वौषधस्यगर्भेणदशमूलजलंशृतं ॥
निहन्याच्छ्वयथुंग्रहणींसाममामयं ॥

अर्थ—दशमुळें, आणि सुंठ यांचा काढा सूज व आमसंग्रहणी, यांचा नाश करितो.

कुटजावलेह.

कुटजस्यतुलांदत्वाचतुर्द्रोणांभसापचेत् ॥ द्रोणशेषेरसेतस्मिन्पूतेगुड तुलार्धकं ॥ घृतंचटंकवत्तत्रक्षिप्त्वामृद्वग्निनापचेत् ॥ समंगाबिल्वक शिलाबिल्वार्धंचपुनर्नवा ॥ मुस्ताभल्लातकंचापिधातकीगजपिप्पली ॥ अंबष्टावालकंचैवद्वेबृहत्यौसचित्रकं ॥ सद्भार्गींपिप्पलीमूलंविडंगा निहरीतकी ॥ नागकेसरयष्टीकारलुकापत्रकंतथा ॥ विश्वाचेंद्रयवाः पाठासूक्ष्मैलाजीकरद्वयं ॥ जातिपत्रीजातिफलंलवंगंतगरंतथा ॥ शृ तोद्विपालिकैर्भागैर्लेहोयंसाधयेत्ततः ॥ तक्रेणवासुतक्रेणापथ्यंदेयंवि चक्षणैः ॥ अनेनग्रहणीरोगानतिसारान्सुदारुणान् ॥ रोगानीकवि घातायकुटजोलेहउच्यते ॥

अर्थ—४०० तोळे कुडयाची साल घेऊन तिच्या १६३८४ तोळे पाण्यांत चतुर्थांश

काढा करावा. तो गाळून त्यांत गूळ २०० तोळे, घृत एक टांक घालोन मंदाग्निवर आटवावा; आणि त्यांत लघु चिकणा, बेलफळ व शिलाजित हे दोन दोन तोळे, आणि पुनर्नवा, नागरमोथा, बिवा, धायटीचीं फुलें, गजपिंपळी, चुका, वाळा, रिंगणी, डोरली, चित्रकमूळ, आरंगमूळ, पिंपळीमूळ, वावडिंग, बाळहर्डी, नागकेशर, ज्येष्ठमध, दिंडा, तमालपत्र, सुंठ, इंद्रजव, पाहाडमूळ, बारीक वेलची, जिरें, शाहाजिरें, जायपत्री जायफळ, लवंग, आणि तगर यांचें चूर्ण आठ आठ तोळे घालोन लेह सिद्ध करावा. हा लेह ताकाशीं द्यावा; आणि पथ्यालाही ताक द्यावें; ह्मणजे संग्रहणी, कठीण ही अतिसार, आणि अनेक प्रकारचे रोग, यांचा नाश करितो. याला कुटजावलेह ह्मणतात.

द्राक्षासव.

मृद्विकायाःपलशतंचतुर्द्रोणांभसापचेत् ॥ द्रोणशेषेतुशीतेचपूतेतास्मि न्प्रदापयेत् ॥ द्विशतेक्षौद्रखंडाभ्यांधातक्याःप्रस्थमेवच ॥ कंकोलंच लवंगंचफलंजात्यास्तथैवच ॥ पलांशकानिमरिचंत्वगेलापत्रकेसरं ॥ पिप्पलीचित्रकंचव्यंपिप्पलीमूलरेणुकं ॥ घृतभांडस्थितमिदंचंदना गरुधूपितं ॥ कर्पूरवासितोह्येषग्रहणीदिपनःपरः ॥ अर्शसांनाशनः श्रेष्ठउदावर्तास्त्रगुल्मनुत् ॥ जठरंक्रुमिकुष्ठानिव्रणांश्वविविधांस्तथा ॥ अक्षिरोगशिरोरोगगलरोगविनाशनः ॥ ज्वरमाममहाव्याधिंपांडुरो गंसकामलं ॥ नाम्नाद्राक्षासवोह्येषबृंहणोबलवर्णकृत् ॥

अर्थ—४०० तोळे द्राक्षें घेऊन त्यांचा ८१९२ तोळे पाण्यांत चुतुर्यांश काढा करून गाळून घ्यावा; आणि थंड झाल्यावर त्यांत मध १०० तोळे, खडिसाकर १०० तोळे, आणि धायटीफुलें ६० तोळे, व कंकोळ, लवंग, जायफळ, मिरीं, दालचिनी, एलची, तमालपत्र, नागकेशर, पिंपळी, चवक, चित्रक, पिंपळीमूळ, पित्तपापडा हीं चार चार तोळे घालोन तें तुपाच्या भांड्यांत ठेऊन त्याला चंदन व अगरू यांचा धूप द्यावा. आंत कापूर घालोन वास लावावा. हा द्राक्षासव घेतला असतां, दीपन आहे; आणि संग्रहणी, अर्श, उदावर्त, गुल्म, उदर, कृमि, कुष्ठें, व्रण, नेत्ररोग, शिरोरोग, गळरोग, ज्वर, आम, माहाव्याधि, पांडुरोग व काविळ यांचा नाश करण्याविषयीं श्रेष्ठ आहे.

बिल्वाग्निघृत.

बिल्वाग्निचव्यार्द्रकशृंगवेरक्काथेनकल्केनचसिद्धमाज्यं ॥
सच्छागदुग्धंग्रहणीगदोत्थंशोफाग्निसादारुचिनुद्वरंतत् ॥

अर्थ—बेलफळ, चित्रक, चवक, आलें व सुंठ यांचा काढा; आणि कल्क व शेळीचें दूध यांचें सिद्ध केलेलें घृत संग्रहणीरोग, सूज, अग्निमांद्य व अरुचि यांचा नाश करण्याविषयीं श्रेष्ठ आहे.

चित्रकघृत.

चित्रकक्काथकल्काभ्यांग्रहणीघ्नंशृतंहविः ॥
गुल्मशोथोदरप्लीहशूलार्शोघ्नंप्रदीपनं ॥

अर्थ–चित्रकाचा काढा, आणि कल्क यांच्याशीं सिद्ध केलेलें तूप घेतलें असतां, गुल्म, सूज, उदर, प्लीहा, शूल, आणि मुळव्याध यांचा नाश करितें. व तें दीपन ही आहे.

चांगेरीघृत.

पाठागोक्षुरकंशुंठीपिप्पलीचूर्णयेत्समं ॥ सर्वेषांषोडशगुणैस्तोयैःक्वाथंप्रकारयेत् ॥ पादशेषंवस्त्रपूतमादायैतत्समंघृतं ॥ घृतांशंचांगेरीद्रावंत्रयाणांत्रिगुणंदधि ॥ गंडारीपिप्पलीमूलंत्र्यूषणंचव्यचित्रकं ॥ प्रत्येकंद्विफलंचूर्णीक्षिप्त्वासर्वंविचूर्णयेत् ॥ मृद्वग्निनाघृतंयावत्तत्तमवतारयेत् ॥ योजयेद्भोजनेपानेग्रहण्यामतिसारके ॥ अग्निसंदीपनंरुच्यंचांगेरीघृतमुत्तमं ॥

अर्थ–पाहाडमूळ, गोखरु, सुंठ व पिंपळी यांचें समान चूर्ण घेऊन त्याचा सोळा पट पाण्यांत चतुर्थांश काढा करावा, तो गाळून घ्यावा; आणि त्यांत काढ्याच्या सम-भाग तूप घालावें. तुपाइतका चुक्याचा रस, आणि ह्या तिघांच्या तिप्पट दहीं व रक्त कांचन, पिंपळीमूळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, चवक, चित्रकमूळ, प्रत्येकाचा ८ तोळे कल्क घालोन सर्व एकत्र करून मंदाग्नीवर पाचन करावें. घृत सिद्ध झालें ह्मणजे उतरून घ्यावें. तें भोजनांत, किंवा प्राशनाला द्यावें; ह्मणजे हें उत्तम चांगेरीघृत संग्रहणी व अतिसार यांचा नाश करितें; आणि अग्निदीपन व रुचिकारक आहे.

दाडिमाष्टक.

पलद्वयंदाडिमस्यत्वगोपस्यचपलद्वयं ॥ त्रिगंधस्यपलंचैकंखंडस्याष्टपलानिच ॥ सर्वमेकीकृतंचूर्णंप्रशस्तंदाडिमाष्टकं ॥
दीपनंरुचिदंकंठ्यंसंग्राह्यंग्रहणीहरं ॥

अर्थ–डाळिंब, सुंठ, मिरीं, पिंपळी, हीं आठ आठ तोळे, त्रिजात ४ तोळे व खडिसाकर ३२ तोळे या सर्वांचें एकत्र चूर्ण करावें. याला दाडिमाष्टक ह्मणतात. हें दीपन, रुचिकर, कंठाला हितावह व ग्राहक आहे; आणि संग्रहणीचा नाश करितें.

दुसरा प्रकार.

दाडिमस्यपलान्यष्टौपलंसौगंधिकस्यच ॥ अजाजीनांपलंचार्धपलार्धंधान्यकस्यच ॥ पृथक्पलांशकान्भागान्त्रिकटुग्रंथिकस्यच ॥

त्वक्क्षीरीवालकंचैवदद्यात्कर्षसमंभिषक् ॥ शर्करायापलान्यष्टौत

दैकस्थंविचूर्णयेत् ॥ आमातिसारशमनंकासहृत्पार्श्वशूलनुत् ॥

हृद्रोगमरुचिंगुल्मंग्रहणीमग्निमार्दवं ॥

अर्थ–डाळिंब ३२ तोळे, त्रिसुगंध ४ तोळे, जिरें २ तोळे, धने २ तोळे, त्रिकटु १२ तोळे, पिंपळमूळ ४ तोळे व दालचिनी, वंशलोचन आणि वाळा हीं एकेक तोळा आणि खडिसाकर ३२ तोळे घेऊन हीं सर्व चूर्णें एकत्र करावीं; ह्मणजे हें दाडिमाष्टक आमातिसार, खोकला व हृदय, पार्श्व यांची व्यथा, आणि हृद्रोग, अरुचि, गुल्म, संग्रहणी व अग्निमांद्य यांचा नाश करितें.

लाई चूर्ण.

कर्षंगंधकमर्धपारदमुभेकुर्याच्छुभांकज्जलीमक्षंत्र्यूषणतश्चपंच

लवणंसार्धंचकर्षंपृथक् ॥ भ्रष्टंहिंगुचजीरकद्वययुतंसर्वार्धभं

गायुतंखादेट्टंकमितंप्रवृत्तिगदवान्तक्रस्याविल्वेनच ॥

अर्थ–गंधक १ भाग व पारा अर्धा भाग यांची कज्जली व सुंठ, मिरीं पिंपळी, हीं मिळून १ तोळा, पंचलवणें प्रत्येक दीड तोळा, व भाजलेला हिंग. जिरें, शाहाजिरे हीं १ तोळा वसंपूर्णांच्या निमी भाग यांची सर्व चूर्णें एकत्र करावीं; आणि त्यांतून एक तोळा चूर्ण. ४ तोळे ताकाशीं खावें; ह्मणजे संग्रहणी जाते.

मुस्तादि चूर्ण.

मुस्तकातिविषाविल्वकुटजंसूक्ष्मचूर्णितं ॥

मधुनाचसमालीढंग्रहणींसर्वजांहरेत् ॥

अर्थ–नागरमोथा, अतिविष, बेलफळ व इंद्रजव यांचे चूर्ण मधाशीं खावें. हें सन्निपात व संग्रहणी यांचें नाशक आहे.

लवंगादि चूर्णः

लवंगकंकोलमुशीरचंदनंनतासनीलोत्पलकृष्णजीरकं ॥ एलासकृ

ष्णागरुभृंगकेसरंकणासविश्वानलदंसहांबुना ॥ कर्पूरजातीफलवंश

रोचनासिद्धार्थभागाःसहसूक्ष्मचूर्णितं ॥ सरोचनंतर्पणमग्निदीपनंवल

प्रदंवृष्यतमंत्रिदोषनुत् ॥ अर्शोत्रिवंभ्रंतमकंगलग्रहंसकासहिक्कारु

चियक्ष्मपीनसं॥ग्रहण्यतीसारमथासृजक्षयंप्रमेहगुल्मांश्चनिहंतिसत्वरं॥

अर्थ–लवंगा, कंकोळ, वाळा, चंदन, तगर, निळें कमळ, काळे जिरें, एलची, पिंपळी, अगरु, माका, नागकेशर, पिंपळी, सुंठ, जटामांसी, काळा वाळा, कापूर, जायफळ,

वंशलोचन व मोहऱ्या हीं समभाग घेऊन त्यांचें चूर्ण करावें. तें रोचन, तृप्तिदायक, अग्नि दीपक, बल्य, वृष्य आहे; आणि त्रिदोष, अर्श, मलबद्धता, तमक, गलग्रह, खोकला, उचकी, अरुचि, क्षय, पडसें, संग्रहणी, अतिसार, रक्तक्षय, प्रमेह, आणि गुल्म, यांचा नाश करितें.

पाठादिचूर्ण.

पाठाविषाकुटजवृक्षफलत्वगब्दतिक्तामदारसजनागरबिल्वचूर्णं ॥
सक्षौद्रतंदुलजलंग्रहणीप्रवाहिरक्तप्रवाहगुदरुग्गुदजेषुदद्यात् ॥

अर्थ—पाहाडमूळ, अतिविष, इंद्रजव, कुडयाची सालें, नागरमोथे, कुटकी, धायटीपुष्प, रसांजन, सुंठ, बेलफळ यांचें चूर्ण तांदळांचें धुवण व मध यांशीं संग्रहणी, प्रवाहिका, गुदरोग व मुळव्याध यांवर द्यावें.

तक्रसेवन.

ग्रहणीरोगिणांतक्रंदीपनंग्राहिलाघवात् ॥
पथ्यमम्लमपाकीचरक्तपित्तप्रकोपनं ॥

अर्थ—संग्रहणीरोग्याला ताक दीपन, ग्राहक व लघु असें आहे, तें पथ्यकारक होय व आंबट ताक असलें तर तें अपाकी, आणि रक्तपित्त यांना कोपविणारें आहे.

महाळुंगादितक्रयोग.

अरुचौमातुलिंगस्यकेसरंसार्द्रसैंधवं ॥
दद्याद्भोजनकालेतुप्रातस्तक्रंचरोगिणे ॥

अर्थ—संग्रहणीरोगामध्यें अरुचि झाली असतां, माहाळुंगाचे केसर, आलें व सैंधव हे भोजनकाळीं द्यावें; आणि प्रातःकाळीं ताक पाजावें.

चित्रकादितक्रयोग.

दहनाजमोदसैंधवनागरमरिचंपिबाम्लतक्रेण ॥
सप्ताहादग्निबलंग्रहण्यतिसारशूलघ्नं ॥

अर्थ—चित्रक, अजमोदा, सैंधव, सुंठ व मिरीं हे पदार्थ आंबट ताकाशीं वाटून प्यावें; ह्मणजे सात दिवसांत अग्निदीपन करून संग्रहणी, अतिसार, आणि शूळ यांचा नाश करितें.

योगांतर.

त्रिकंसेतक्रस्यद्विकुडवपटोःपथ्यरभयाःपचेत्प्रस्थःसार्धघृततिल
जविश्वाग्निकुडवैः ॥ समावाप्याजाजीमरिचचपलादीप्यक
पलैर्लिहेन्नान्यंवह्निंद्रढयतिविकारांश्चजयति ॥

अर्थ–७६८ तोळे ताकांत मीठ ३२ . तोळे व हरीतकी ६
वें; नंतर त्यांत तूप, तिळ, सुंठ व चित्रक हीं प्रत्येकीं १६ तोळे -
ओंवा, ही प्रत्येकी ४तोळे घालून लेह सिद्ध करावा; आणि खावा.
आणि विकारांचा नाश करितो.

शंखवटी.

चिंचाक्षारपलंपटुत्रयपलंनिंबूरसेकल्कितंतस्मिन्शंख
कन्निर्वाप्यशीर्णावधि ॥ हिंगुव्योपपलंरसामृतबलिंनिः
शकान्बध्वाशंखवटीक्षयेग्रहणिकारुक्पंक्तिशूलादिपु ॥

अर्थ–चिंचेचा क्षार ४ तोळे, सैंधव, बिडलोण, संचल, हीं चार च
लिंबाच्या रसांत कल्क करून त्यांत चार तोळे शंख तापवून विझवावा.
विझवावा. याप्रमाणे शंख झिरे तोंपर्यंत करून नंतर हिंग, सुंठ, मिरें, ।
बचनाग, गंधक, हे चार चार मासे घालून त्याची गोळी बांधावी. ती क्षय
पक्तिशूल, यांचा नाश करित्ये.

जातीफलादितक्र.

जातीफलौषधशिवाविडहिंगुजीरगंधद्विशोमिथितकल्किनराजिका
अंगारभर्जितमरिष्टकपिष्टकंचतक्रेगकोलमितमामगदग्रहण्यां ॥

अर्थ– जायफळ, सुंठ, आवळकाठी, वावडिंग, हिंग, जिरें, हीं समभाग ५
२ भाग व मठ्यांत वाटलेली मोहरी व लसूण हीं सर्व एकत्र करून त्या त
हिंग भाजून ठिकरी द्यावी; आणि तें ताक चार मासे द्यावें; ह्मणजे आमसंग्रहणी दूर

वार्ताकगुटी.

चतुःपलंसुधाकांडंत्रिपलंलवणत्रयं ॥ वार्ताकाःकुडवंचार्कमूलाद्बिल्वे
तथानलात् ॥ दग्ध्वाद्रवेणवार्ताकैर्गुटिकाभोजनोत्तरं ॥ भुक्ताभुक्तंप
चेच्चाशुनाशयेद्ग्रहणीगदं ॥ कासंश्वासंतथार्शांसिविपूचीचहृदामयं ॥

अर्थ–१६तोळे निवडुंगाचें कांडें व सैंधव, बिडलोण, काचलोण, हे १२ तोळे आणि
वांगीं १६ तोळे, रुईचीं मुळें ८ तोळे, चित्रकमूळ ८ तोळे. हे सर्व एकत्र करून वांग्यां
च्या रसांत भाजावें; आणि त्याची गोळी भोजनोत्तर भक्षण करावी; ह्मणजे भक्षण
केलल अन्न लौकर पचन होतें; आणि संग्रहणी, खोकला, दमा, मुळव्याध, तरळ,
आणि हृद्रोग, यांचा नाश करित्ये.

भल्लातकक्षार.

भल्लातकंत्रिकटुकंत्रिफलालवणत्रयं ॥ अंतर्धूमंद्विपलकंगोपु

रीपाग्निनादहेत् ॥ सक्षारःसर्पिषापीतोभोज्येवाथविचूर्णितः॥
हृद्रोगपांडुग्रहणीगुल्मोदावर्त्तशूलनुत् ॥

अर्थ–बिबवे, सुंठ, मिरीं, पिंपळी, हरडा, बेहडा, आवळकाठी, सैदेलोण, पादेलोण, संचळ व ग्रहधूम हे आठ तोळे घेऊन गोवऱ्यांच्या अग्नींत जाळावें. त्याचा क्षार तुपाशीं घ्यावा अथवा भोजनांत खावा; ह्मणजे हृद्रोग, पांडुरोग, संग्रहणी, गुल्म, उदावर्त, शूल, यांचा नाश करील.

चव्यकादिचूर्ण.

चूर्णंचव्यकचित्रश्रीविश्वभेषजनिर्मितं ॥
तक्रेणसहितंहंतिग्रहणींदुःखकारिणीं ॥

अर्थ–चवक, चित्रक, बेलफळ व सुंठ यांचें चूर्ण ताकाबरोबर खावें; ह्मणजे फार दुष्टसंग्रहणीचा नाश करील.

रुचकादिचूर्ण.

रुचकाग्निमरीचानांचूर्णंतक्रेणसेवितं ॥
ग्रहण्युदरगुल्मार्शःक्षुन्मांद्यप्लीहनाशनं ॥

अर्थ–पादेलोण, चित्रक व मिरें यांचें चूर्ण ताकाबरोबर सेवन करावें; ह्मणजे संग्रहणी, उदर, गुल्म, मुळव्याध, अग्निमांद्य, पाथरी यांचें नाशक आहे.

कपित्थाष्टकचूर्ण.

अष्टौभागाःकपित्थस्यषड्भागाशर्करामता ॥ दाडिमंतिंतिडीकंचश्री फलंधातकीतथा ॥ अजमोदाचपिप्पल्यःप्रत्येकंस्युस्त्रिभागिकाः ॥ मरिचंजीरकंधान्यंग्रथिकंवाल्कंतथा ॥ सौवर्चलंयवानीचचातुर्जातंस चित्रकं ॥ नागरंचैकभागाःस्युःप्रत्येकंसूक्ष्मचूर्णितं ॥ कपित्थाष्टक संज्ञंस्याच्चूर्णमेतद्गलामयान् ॥ अतिसारंक्षयंगुल्मंग्रहणींचव्यपोहति ॥

अर्थ–कवठ आठ भाग व साखर आठ भाग, आणि डाळिंबसाल, चिंचेची साल, कोवळें बेलफळ, धायटीफुलें, अजमोदा व पिंपळी हीं साहा औषधें तीन तीन भाग व मिऱ्यें, जिरें, धने, पिंपळमूळ, वाळा, संचळ, अजमोदा, दालचिनी, विलायची, तमालपत्र, नागकेशर, चित्रक, सुंठ, हीं १३ औषधें एक एक भाग घ्यावीं. मग सारीं औषधांचें बारीक चूर्ण करावें. या चूर्णाला कपित्थाष्टक चूर्ण असें ह्मणतात. हें कपित्थाष्टक चूर्ण घेतलें असतां, कंठाचे रोग व अतिसार, क्षय, गुल्म व संग्रहणी हे रोग दूर होतात.

लाहीचूर्ण दुसरें.

त्रिजातकत्र्यौषवरारसेंद्रगंधाजमोदाभिशिवेल्लरात्र्यः ॥ बिल्वानल

जाजिलवंगधान्यगजोपकुल्यामधुकंपट्टानि ॥ हिंगुःकुबेराव्हयमोचमा रीक्षारीजयासर्वचतुर्थभागा ॥ इदंहिचूर्णंविनिहंतितूर्णप्रसूतिकासंग्रह णीविकारं ॥ समस्तरोगांतकमग्निकारिभ्राजिष्णुनाकारिसुतक्रपीतं ॥ इमंप्रयोगंवहुधानुभूतंचकारधात्रीकिलकापिलाही ॥

अर्थ—दालचिनी, तमालपत्र, वेला, सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडे, ब्याहडे, आवळकाठी, पारा, गंधक, अजमोदा, वडिशेप, वावडिंग, हळद, वाळेवल, चित्रकमूळ, जिरें, लवंग, धनें, गजपिंपळी, ज्येष्टमध, पंचलवण, भाजलेला हिंग, सागरगोट्याचो मज्जा, सांवरीचा डीक, सज्जिखार, जवखार, सर्वांचें चौंपट शुद्ध केलेली भांग यांचें बारीक चूर्ण करावें; नंतर ते ताकांत घ्यावें; ह्मणजे संग्रहणीरोग, सूतिकारोग, अग्निमांद्य इत्यादिक सर्वरोगांस हितावह होतें. हा प्रयोग कोणीएक लाहीनामक दाईनें बहुतवेळ अनुभव घेऊन केला आहे. ह्मणून यास लाहीचूर्ण असें ह्मणतात.

जातिफलादिचूर्ण ग्रहण्यादिकांवर.

जातीफललवंगैलापत्रत्वङ्नागकेसरैः ॥ कर्पूरचंदनतिलैस्त्वक्क्षीरी नागरामलैः ॥ तालीसपिप्पलीपथ्यास्थूलजीरकचित्रकैः ॥ शुंठीविडं गमरिचैःसमभागेनचूर्णितैः ॥ यावंत्येतानिसर्वाणिकुर्याद्भंगांचताव तीं ॥ सर्वचूर्णसमादेयाशर्कराचभिषग्वरैः ॥ कर्षमात्रंततःखादेन्मधु नाप्लावितंसुधीः ॥ अस्यप्रभावाद्ग्रहणीकासश्वासारुचिक्षयाः ॥ वा तश्लेष्मप्रतिश्यायाःप्रशमंयांतिवेगतः ॥

अर्थ—जायफळ, लवंगा, विलायची, तमालपत्र, दालचिनी, नागकेशर, कापूर, श्वेतचंदन, काळे तीळ, वंशलोचन, तगर, आवळकाठी, तालिसपत्र, पिंपळी हिरडे, काळे जिरें, चित्रक, सुंठ, वावडिंग व मिऱ्यें, हीं वीस औषधें समभाग घ्यावीं, व या औषधांचे समभाग भांग शोधून घ्यावी. मग साऱ्यांचें चूर्ण करून त्या चूर्णाचे समभाग साकर घेऊन त्यांत मेळवावी. मग तें चूर्ण एक कर्ष प्रमाण मधांत घेतलें असतां, संग्रहणी, कास, श्वास, अरुचि, क्षय, वातकफाचा विकार व पडसें हे रोग लवकर दूर होतात.

वेलफलादिचूर्ण.

श्रीघनवालकमोचकशक्रंचूर्णमजापयसापरिपेयं ॥ हंतिचतद्ग्रहणीभयमाशुसामगदंरुधिरेणविमिश्रं ॥

अर्थ—वेलफळ, नागरमोथे, वाळा, मोचरस व इंद्रजव, यांचें चूर्ण शेळीच्या दुधाशीं घ्यावें. तें संग्रहणी व आंवरक्त, यांचा नाश करितें.

दुसरें जातीफलादिचूर्ण.

जातीफलाग्निहिमवेल्लतिलेंदुजीरवंशीत्रिकत्रयमनक्षमिभोनतंच ॥
तालीसदेवकुसुमेअपिचूर्णमेपांद्विःशर्करंचसमगंजमिदंग्रहण्यां ॥

अर्थ—जायफळ, चित्रक, वाळा, वावडिंग, तिळ, कापूर, जिरें, वंशलोचन, त्रिसुगंध, बेहड्याशिवाय त्रिफळा, त्रिकटु, गजपिंपळी, तगर, ताळिसपत्र व लवंग यांचें समभाग चूर्ण व चूर्णाच्या दुप्पट साकर घालून द्यावें. हें चूर्ण संग्रहणीचें नाशक आहे.

पथ्य.

निद्राच्छर्दनलंघनंचिरभवायःशाल्यःषष्टिकामंडोलाजकृतोमसूरतुवरीमुद्गप्रभूनारसाः ॥ निःशेषंत्दनसारमेवदधिजंगोक्षीरजातंगवांछागंवानवनीतमेवविमलंतद्रत्पयःसंभवं ॥ छागल्याजपयोदधीनितिलजं तैलंसुरामाक्षिकंशालूकंलकुचंचदाडिमयुगंनव्यानिभव्यानिच ॥ रंभायाः कुसुमंफलंचतरुणंविल्वंचशृंगाटकंचांगेरीविजयाकपित्थकुटजाजातीकसेरूणिच ॥ न्यग्रोधस्यफलंचतक्रममलंजातीफलंजांववंधान्याकानिचतिंदुकानिचमहानिंबोरुणाफेनवत् ॥ क्रव्यालांवुशशैणतित्तिररसाःक्षुद्राझपासर्वशोडिंडीशोमधुरालिकाचखालिपाःसर्वःकषायोरसः

अर्थ—निद्रा, ओकारी, लंघन, जुन्या साठ्या साळी, लाह्यांचा मंड व मसुरा, तुरी, मूग यांचे रस, व निःशेष लोणी काढिलेले ताक, गाईचें, शेळीचें व मेंढीचें दूध, लोणी, दहीं, व तिळांचें तेल, मद्य, मध, कमळकंद, फणस, खाटे व गोड डाळिंब, केळफूल, जून केळें, बेलफळ, शिंगाडे, चुका, भांग, कंवठ, कुडा, जिरें, कचरा, वडाचीं फळें, चांगलें ताक, जायफळ, जांबूळ, धने, टेंभुर्णी, घेडशी, कुचला, महानिंब, अरुणा, अफीम, मांस, पांढरा भोपळा, ससा, हरण, तित्तिरपक्षी यांचे रस, संपूर्ण बारीक जातीचे मासे, घेंडसेंफळ, साळोंखी, कोकिळा, बिळांत राहाणाराचें मास, संपूर्ण तुरट पदार्थ हे संग्रहणीवर पथ्यकारक आहे.

अपथ्य.

रक्तस्रुतिंजागरमंबुपानंस्नानंस्त्रियंवेगविनिग्रहश्च ॥ नस्यांजनंस्वेदनधूपपानंश्रमंविरुद्धांजनमातपंच ॥ गोधूमनिष्पावकलायमाषयवारकंछत्रकराजमाषाः ॥ उपोदकीवास्तुककाकमाचीकूष्मांडतुंबीमधुशिग्रुकंदान् ॥ तांबूलमिक्षुंवदरंरसालउर्वारुकंपूगफलंरसानां ॥ धान्याम्लंसौवीरतुषोदकानिदुग्धंगुडंमस्तुचनारिकेलं ॥ पुनर्नवाबार्हतबैल्व

कानिसर्वाणिशाकानिचपत्रवंति ॥ दुष्टांगगोवारिकुरंगनाभीक्षाररंस
मस्तानिसराणिचापि ॥ द्राक्षामथाम्लंलवणंरसंचगुर्वन्नपानंसकलंच
पर्ग ॥ वैद्यश्चिकित्सेद्ग्रहणीविकारंविवर्जयेत्संततमप्रमत्तः ॥

अर्थ–रक्तस्राव, जागरण, उदकपान, स्नान, स्त्री, वेगधारण, नस्य, अंजन, घाम, धूमपान, श्रम, विरुद्धान्न, अंजन, निवर, गहूं, पावटे, वाटाणे, उडीद, यव, अळंवे, चवळया, मशाळ, चाकवत, कावळी, कोहळा, पांढरा भोंपळा, गोड शेवगा, कंद, तांबूल, ऊंस, बोर, आंबा, काकडी, सुपारी, रसामध्यें पानाम्ल, सौवीर, तुषोदक, दूध, गूळ, दह्यांची निवळी, नारळ, पुनर्नवा, ररगणी, वेळफळ, संपूर्ण पान्यांच्या भाज्या, दुखणेकरिगाईचे दूध, कस्तूरि, क्षार, संपूर्ण सारकद्रव्यें, द्राक्षे, आंबट, मीठ, हे रस जडान्न, पान सुपारी, हे पदार्थ ग्रहणी रोग्याला देऊं नये.

सुखसाध्यलक्षण.

वाह्यायांतुवलौजातान्येकदोषोल्वणानिच ॥
अर्शांसिसुखसाध्यानिनचिरोत्पतितानिच ॥

अर्थ–बाहेरल्यावळीवर झालेले एकदोषोल्वण व जांत एक वर्ष जाहालें नाहीं, असे मोड सुखसाध्य होतात.

कृच्छ्रसाध्यलक्षण.

द्वंद्वजानिद्वितीयायांवलौयान्याश्रितानिच ॥
कृच्छ्रसाध्यानिनान्याहुःपरिसंवत्सराणिच ॥

अर्थ–दोन दोषांपासून झालेले व जे दसऱ्यावळीवर असणारे व ज्यांला एक वर्ष लोटलें आहे; असे मुळव्याधीचे मोड कृच्छ्रसाध्य होतात; आणि जे बाह्यवळीवर असूनही दोषोल्वण असतील, आणि एक दोषोल्वण एकावळीवर जाहाले असतील, तेही कृच्छ्रसाध्य होत.

असाध्यलक्षणें.

सहजानित्रिदोषाणियानिचाभ्यंतरावलिं ॥
जायंतेर्शांसिसंश्रित्यतान्यसाध्यानिनिर्दिशेत् ॥

अर्थ–सहज ह्मणजे जन्माबरोबर झालेले, त्रिदोषज व आंतल्या वळीवर झालेले, ते सर्व असाध्य जाणावे.

याप्यलक्षण.

शेषत्वादायुषस्तानिचतुष्पादसमन्विते ॥
याप्यंतेदीप्तकालाग्नेःप्रत्याख्येयान्यतोन्यथा ॥

अर्थ—असाध्य मुळव्याध जरी असली; तरी रोग्याचें आयुष्य बाकी असलें, आणि तो चतुष्पाद संपत्तियुक्त असेल, व वैद्य, औषध, परिचारक, आणि रोगी हे जसे असावे तसे असतील तर, व रोग्याचा अग्नि प्रदीप्त असला तर, याप्य ह्मणजे शम पावत्ये. या विपरीत असेल तर रोगी असाध्य जाणावा.

उपद्रवानें असाध्यत्व.

हस्तेपादेगुदेनाभ्यांमुखेवृषणयोस्तथा ॥
शोथोहृत्पार्श्वशूलश्चतस्यासाध्योर्शसोहितः ॥

अर्थ—हात, पाय, नाभि, गुद व मुख यांवर सूज येत्ये, व हृदय, पार्श्वभाग दुखतात; तो रोगी असाध्य जाणावा.

दुसरीं असाध्यलक्षणें.

हृत्पार्श्वशूलसंमोहश्छर्दिरंगस्यरुग्ज्वरः ॥
तृष्णागुदस्यपाकश्चनिहन्युर्गुदजातुरं ॥

अर्थ—हृदय, पार्श्वशूल, इंद्रियें, आणि मन यांचा मोह, ओकारी, अंगांत शूल, ज्वर, तृषा, गुदाचा पाक व गुदावर पिंवळे फोड, हीं लक्षणें झालीं; ह्मणजे रोगी असाध्य जाणावा.

तृष्णारोचकशूलार्तमतिप्रस्रुतशोणितं ॥
शोथातीसारसंयुक्तमर्शांसिक्षपयंतिहि ॥

अर्थ—तृषा, अरुचि व शूल यानी पीडलेला व ज्याचें रक्त फार स्रवलें; आणि सूज व अतिसार याणी युक्त अशा रोग्याचा अर्शरोग नाश करितो.

मेढ्रादिष्वपिवक्ष्यंतेयथास्वंनाभिजान्यपि ॥
गंडूपदास्यरूपाणिपिच्छिलानिमृदूनिच ॥

अर्थ—शिश्न, आदिशब्दानें नाक व कान इत्यादिकांचे ठायीं दोषभेदेंकरून अंकुर होतात; व नाभीला ही अर्श होतात. त्याचे मोड गांडूळाच्या तोंडासारिखे गुळगुळीत आणि मृदु असे असतात.

चामखीळ याची संप्राप्ति.

व्यानोगृहीत्वाश्लेष्माणंकरोत्यर्शस्त्वचोवहिः ॥
कीलोपमंस्थिरखरंचर्मकीलंतुतद्विदुः ॥

अर्थ—व्यानवायु कफाला घेऊन त्वचेवर खिळ्यासारिखा घट्ट व खरखरीत असा मोड उत्पन्न करितो. त्याला चामखीळ ह्मणतात.

वातादिभेदानें त्याचें लक्षण.

वातेनतोदपारुष्येपित्तादसितरक्तता ॥
श्लेष्मणास्निग्धताचास्यग्रथितत्वंसवर्णता ॥

अर्थ—वायूनें त्यांत सुई टोंचल्या सारिखी पीडा, आणि कर्कशपणा. पित्तानें त्याचा रंग काळा व तांबडा आणि कफानें त्याला तुळतुळीतपणा, गांठाळलेला, आणि त्वचे सारिखा वर्ण असतो.

द्वंद्वजार्शकारण.

हेतुलक्षणसंसर्गाद्विद्याद्द्वंद्वोल्वणानिच ॥

अर्थ—दोन दोन दोषांचीं कारणें, आणि लक्षणें मिळालीं तर द्वंद्वार्श आहे असें जाणावें.

दोषकोपानें अर्शोरोग.

पंचात्मामारुतःपित्तंकफोगुदवलित्रये ॥ सर्वएवप्रकुप्यंतिगु
दजानांसमुद्भवे ॥ तस्मादर्शांसिदुःखानिबहुव्याधिकराणिच ॥
सर्वदेहोपतापीनिप्रायःकृच्छ्रतमानिच ॥

अर्थ—गुदाच्या तीन्ही वळींवर मुळव्याधीचे मोड उत्पन्न झाले असतां, पांचप्रकारचा वायु, पांच प्रकारचें पित्त, आणि पांच प्रकारचा कफ हे सर्वच दोष कोप पावतात; ह्मणजे प्राण, अपान, समान, उदान; आणि व्यान हे पांच प्रकारचे वायु. हृदय, गुद, नाभी, कंठ, आणि सर्व शरीर हीं अनुक्रमानें त्यांचीं स्थानें होत. तसेंच आलोचक, रंजक, साधक, पाचक व भ्राजक असे पित्ताचे पांच भेद. त्यांचीं स्थानें आलोचन नेत्रांत, रंजक यकृत् व प्लीहा यांमध्यें, साधक हृदयामध्यें, पाचक पक्वाशय व आमाशय यामध्यें, भ्राजक त्वचेमध्यें राहातें. तसा कफही अवलंबक, क्लेदक, बोधक, तर्पक व श्लेषक या पांच भेदानें क्रमेंकरून हृदय, आमाशय, जिव्हा, मस्तक, आणि संधि. या पांच ठिकाणीं राहातो. याप्रमाणें सर्व दोष आपआपल्या पांच दोषानीं कोपतात. ह्मणून हा अर्शरोग फार दुःखदायक, बहुत प्रकारच्या व्याधि, उदर व अग्निमांद्य इत्यादि उपद्रव करणारा, सर्वदेहाला क्लेशदायक, आणि बहुतकरून कृच्छ्रसाध्य असा होतो.

असाध्यलक्षण.

दोषत्रयाणिसहजानिवलौतथांतर्जातानिहंतिगुदजानिपृथूदरस्य ॥ पा
दस्यहस्तगुदजाभ्युदरांडकोशशूनस्यपार्श्वहृदयव्यथितस्यपुंसः ॥ हृ
त्पार्श्वशूलवमनज्वरमोहतृष्णापाकोगुदेश्वितनुतारुचिरंगभंगः ॥ यस्या
स्तियातियमधामगुदांकुरोध्यंशूनोदराक्षिकरपादगुदांडशोफः ॥ तृष्णा
शूलहृदिश्वासशोपातीसारसंयुतं ॥ अतिनिःसृतरक्तंचनिहन्युर्गुदजानरं ॥

अर्थ—जे अर्श त्रिदोषात्मक, किंवा शरीरावरोवरच उत्पन्न झालेले व आंतल्या वळी-चे व ज्याचें पोट मोठें झालें त्याचे, आणि पाय, हात, गुद, पोट व आंड यांला सूज, व पार्श्व आणि हृदय यामध्यें शूल, वांति, ज्वर, मोह, तृषा, गुदाचा पाक, अग्निमांद्य, अरुचि व अंगनाश ह्या लक्षणानीं युक्त जो रोगी तो मरतो; आणि ज्या मुळव्याधीमध्यें आंध्य व पोट, नेत्र, पाय, हात, गुद, आंड यांचे ठाईं सूज, ताहान, हृदयांत शूल, श्वास, शोप, अतिसार, आणि ज्याला फार रक्त पडतें, त्याला ती मुळव्याध मारिते.

अर्शास पथ्य.

विरेचनंलेपनरक्तमोक्षंक्षाराग्निशस्त्रंचरितंचकर्म ॥ पुरातनालोहितशाल
यश्चसपष्टिकाश्चापिजवाकुलित्थाः ॥ पटोलधत्तूररसोनवन्हिपुनर्नवासूर
णवास्तुकानि ॥ जीवंतिकादंतशठासुरावंशुंठीर्वयस्यानवनीततक्रं ॥
कंकोलधात्रीरुचकंकपित्थमोष्ट्राणिमूत्राज्यपयांसिचापि ॥ भल्लातकंसर्प
पजंचतैलंगोमूत्रसौवीरतुपोदकानि ॥ गोधाखुलोमानिखरोष्ट्रलोमश्वा
वित्कुलिंगानथधौतकौशाः ॥ तरक्षवासाश्चमृगालिकाकायेत्यल्पमांस
प्रसहाश्चतेपि ॥ वातापहंयच्चयदग्निकारितदन्नपानंहितमर्शसेभ्यः ॥

अर्थ—विरेचन, लेपन, रक्तकाढणें, क्षार, अग्नि व शस्त्र यांचे उपचार; जुनें साठकें भात, साठकी यव, कुलित्थ, पडवळ, धोतरा, लसूण, चित्रक, पुनर्नवा, सूरण, चाकवत, गुळवेल, कचोठ, सुराव (आनंद करणारे शब्द) सुंठ, हरितकी, लोणी, ताक, कंको-ळ, आंवळें, पादेलोण, कवठ, उंटाचे मूत, तूप, दूध, विवबे, शिरसेल, गोमूत्र, सौवीर, तुपोदक व घोरपड व उंदीराचे केश व गाढव व उंट यांची लोंकर, साळशीत, कुलिंग, रुपें, वानर, तरस, अडुळसा, मृग, भ्रमर, कावळा व जे अल्पमांस, गृध्र, उलूक, घार, वाज, चाप, भास, कुकुर, वातनाशक व अग्निकारक असे अन्न व पान हें अर्शरोग्याला हितकारक आहे.

अपथ्य.

अनूपमामिषंमत्स्यंपिण्याकंदधिपिष्टकं ॥ मापान्करीरंनिष्पावतंदु
लानुंव्युपोदिका ॥ पक्वाम्रशालुकंसर्वंविष्टंभीणिगुरूणिच ॥ आत
पंजलपानानिवमनंवस्तिकर्मच ॥ विरुद्धानिचसर्वाणिमारुतंपूर्वदि
ग्भवं ॥ वेगावरोधःस्त्रीपृष्ठयानमुत्कटकासनं ॥ यथास्वंदोषलंचा
न्नमर्शसांपरिवर्जयेत् ॥

अर्थ—आनूपदेशीं राहणारे जीवाचे मांस, मासे, पेंड, दहीं, पीठ, उडीद, वेळूचा

कोंब, पावटे, पांढरा भोपळा, थोर मयाळ, पिकलेला आंबा, कमळकंद, संपूर्णविटभकारक व जडपदार्थ, निवर, जलपान, वमन, बस्तिकर्म, स्निग्धपदार्थ, पूर्वेचा वारा, मलमूत्रादिवेगांचा अवरोध, स्त्रीसंग, पृष्टयान, उकिडवें बसणें, दोषांला उत्पन्न करणारें अन्न, हे पदार्थ अर्शरोग्यानें वर्जावे.

रक्तार्श व चामखीळ यांवर.

यत्पथ्यंयदपथ्यंचवक्ष्यतेरक्तपित्तिनां ॥ रक्तार्शोरोगिणांतत्तुदेयांविद्या द्विशेपतः ॥पानंयानंदिवास्वप्नंगुर्वन्नमतिभोजनं ॥ व्यायामंकलहं चैवतीक्ष्णंक्षारविधिंत्यजेत् ॥ यद्युक्तमर्शसामादौभेषजंपथ्यमेवच ॥ तदेवचर्मकीलानांकार्यंदोषादिभेदतः ॥

अर्थ–जें पथ्य किंवा अपथ्य रक्तपित्तीरोग्यानां सांगेल, तें रक्तार्शरोग्याला विशेष करून द्यावें; व पान, यान, दिवसास झोंप, जडान्न, अतिभोजन, व्यायाम, कलह, खारट, आणि जें वर अर्शव्याधीला पथ्य सांगितलें तें औषध; असें चामखिळांवर पथ्य द्यावें.

अर्शरोगीं कर्मविपाक.

दत्वाथवेतनंयोध्येत्यादायापिचवेतनं ॥
अध्यापयेज्जुहुयाज्जपेद्वार्शोयुतोभवेत् ॥

अर्थ–जो वेतन देऊन अध्ययन करितो, किंवा वेतन घेऊन अध्ययन सांगतो, किंवा हवन अथवा जप करितो; तो अर्शोरोगी होतो.

सामान्यार्शोनिदान.

पृथक्दोषैःसमस्तैश्चशोणितात्सहजानिच ॥
अर्शांसिषट्प्रकाराणिविद्यात्गुदवलित्रये ॥

अर्थ–वात, पित्त, कफ, सन्निपात, रक्तज व सहज अशी साहाप्रकारची मुळव्याध गुदाचा ठायीं त्रिवळींतून कोणत्याही वळीला होत्ये.

अर्शाची संप्राप्ति व रूप.

दोषास्त्वङ्‌मांसमेदांसिसंदूष्यविविधाकृतीन् ॥
मांसांकुरानपानादौकुर्वंत्यर्शांसितान्जगुः ॥

अर्थ–वातादिदोष कुपित होऊन, त्वचा, मांस व मेद यांत दूषित करून नानाप्रकारचे मांसांकुर गुदादिकाचे ठायीं उत्पन्न करितात, त्याला अर्श ह्मणतात.

अर्शाचें पूर्वरूप.

विष्टंभोंगस्यदौर्वल्यंकुक्षेराटोपएवच ॥ कार्श्यमुद्गारवाहुल्यं सक्थिसादोल्पविट्कता ॥ ग्रहणीदोषपांड्वर्तेराशंकाचोदरस्यच ॥ पूर्वरूपाणिनिर्दिष्टान्यर्शसामभिवृध्दये ॥

अर्थ—मळाचा प्रतिबंध, शरीराला दुर्बलता, कुक्षिमध्यें गुडगुडणें, कृशपणा, फार ढेंकर, पायांच्या पोटऱ्या गळणें, मळ जाहाल्यास थोडा होणें व ग्रहणी, पांडु व उदर जहालें आहे असें वाटणें, इत्यादि लक्षणें अर्शरोग होणार असला ह्मणजे होतात.

चिकित्साप्रक्रिया.

अर्शोतिसारग्रहणीविकाराःप्रायेणचान्योन्यनिदानभूताः ॥
सन्नेनलेसंतिनसंतिदीप्तेरक्षेदतस्तेपुविशेषतोग्निं ॥

अर्थ—अर्श, अतिसार व संग्रहणी हे विकार प्रायः अन्योन्याच्या आश्रयानें होतात. न हे अग्नि प्रदीप्त असतां होत नाहींत. मंद झाला ह्मणजे होतात. याकरितां याविकारामध्यें विशेषेंकरून अग्नीचें संरक्षण करावें.

चिकित्साप्रकार.

दुर्नाम्नांसाधनोपायोचतुर्धापरिकीर्तितः ॥
भेषजक्षारशस्त्राग्निसाध्यत्वंयाप्यमुच्यते ॥

अर्थ—अर्शरोग साध्य होण्याविषयीं औषध, क्षार, शस्त्र, आणि अग्नि असे च्यार उपाय आहेत. त्याणि बरा होतो, तो साध्य व इतर असाध्य.

अर्शसामौषधैःक्षारैःशस्त्रेणचयथाग्निना ॥
चिकित्सास्याच्चतुर्धैवंमुख्यंतत्रौषधंविधिः ॥

अर्थ—अर्शरोगाला औषध, क्षार, शस्त्र, आणि अग्नि याप्रमाणें चिकित्सा आहे; परंतु त्यामध्यें औषध मुख्य आहे.

चिकित्साक्रम.

शस्त्रैर्वाथजलौकाभिःप्रोच्छूनकाठिनार्शसः ॥
शोणितंसंचितंदृष्ट्वाहरेत्प्राज्ञःपुनःपुन. ॥

अर्थ—शस्त्रानें किंवा जळवानीं सुजलेले काठिण असे जे मोड, त्यांचें संचित झालेलें रक्त वारंवार काढावें.

यद्वायोरनुलोमस्यायदग्निवलवृधये ॥
अन्नपानौषधंसर्वंतत्सेव्यंनित्यमर्शसः ॥

अर्थ—अर्शरोगावर जें वायूला अनुलोमन करितें; व जें अग्नीला वाढवितें, असें अन्न, पान व औषधसेवन करावें.

स्नेहस्वेदादयोवातेपित्तेपुरेचनादयः ॥ कफेवांत्यादयोर्शस्सुमिश्रे

मिश्राप्रतिक्रिया ॥ पित्तवद्रक्तजेकार्यःप्रतीकारोर्शसिध्रुवम् ॥

अर्थ—स्नेह व घाम हे वायूला व पित्ताला रेच होत; आणि कफाला वांति, तसेच मिश्र दोषांवर मिश्रप्रतीकार करावे; आणि रक्तजअर्शाला पित्तासारिखे उपचार करावे.

अर्शांसिभिन्नवर्चांसिवातातिसारवद्विशेत् ॥

उदावर्तविधानेनगाढविट्कान्युपाचरेत् ॥

अर्थ—ज्या अर्शांमध्ये रेच व शौच इत्यादि होतात, त्यावर वातातिसारासारखी; आणि गाढविट्क अर्शांवर उदावर्तासारिखी औषधक्रिया करावी.

गुदजान्शोणितवहान्पित्तशोणितनाशनैः ॥

योगैरूपाचरेत्तत्तुविड्बंधेतुप्रशस्यते ॥

अर्थ—रक्त वाहणाऱ्या मुळव्याधीवर रक्तपित्तनाशक उपचार, आणि विड्बंध असेल तर विड्बंधावरील उपचार करावे.

वातार्शनिदान.

कषायकटुतिक्तानिरूक्षशीतलघूनिच ॥ प्रमिताल्पाशनंतीक्ष्णं

मद्यंमैथुनसेवनं ॥ लंघनंदेशकालौचशीतौव्यायामकर्मच ॥

शोकोवातातपस्पर्शोहेतुर्वातार्शसांमतः ॥

अर्थ—तुरट, कडु, तिखट, रूक्ष, शीत, लघु, मोजकें व अति अल्प भोजन व तीक्ष्ण, मद्य, मैथुन, लंघन, थंडदेश व थंडकाल, अतिव्यायाम, शोक, वायु, निवर याचा स्पर्श इत्यादिक वातार्शाचे हेतु जाणावे.

वातार्शलक्षण.

गुदांकुरावह्वनिलाःशुष्काश्चिमिचिमान्विताः ॥ म्लानाःश्यावारु

णास्तब्धाविशदाःपुरुषाःखराः ॥ मिथोविसदृशावक्रास्तीक्ष्णाविस्फु

टितानना: ॥ बिंबीकर्कंधुखर्जूरकार्पासीफलसन्निभाः ॥ केचित्कदं

बपुष्पाभाःकेचित्सिद्धार्थकोपमाः ॥ शिरःपार्श्वांसकट्यूरुवंक्षणाभ्य

धिकव्यथाः ॥ क्षवथूद्गाराविष्टंभहृद्ग्रहारोचकप्रदाः ॥ कासश्वासा

ग्निवैषम्यकर्णनादभ्रमावहाः ॥ तैरार्तोग्रथितंस्तोकंसशब्दंसप्रवाहि

कं ॥ स्रक्फेनपिच्छानुगतंविबद्धमुपवेश्यते ॥ कृष्णत्वङ्नखविण्मूत्रनेत्रवक्त्रंचजायते ॥ गुल्मप्लीहोदराष्ठीलासंभवस्ततएवच ॥

अर्थ—वातात्मक गुदांतील मोड, अर्श, स्रावरहित, चिमचिम वेदनायुक्त, निर्जीव, श्याम व अरुणवर्ण, ताठर, बुळबुळीत नसणारे, कर्कश, खर्खरीत, एकसारिखे नसणार, वाकडे, तिकडे, बारीक अग्राचे, कित्येकांचा तोंडे भंगलेली व आकृतीनें तोंडली, बोर, खजूर, किंवा कापूस यांच्या फळासारखे व कित्तीएक कळंबाच्या फुलासारिखे व कांहीं शिरसा सारिखे बारीक, असे असतात; त्यामुळें मस्तक, बरगडया, खांदे, कंबर, मांडया, व आडसंधि यांत टणका लागतो; व शिंका, ढेकर, मलावरोध, हृदय ओढल्यासारिखी वेदना, अरुचि, हीं होतात. व खोकला, दमा, अन्नाचें केव्हां पचन होतें केव्हां होत नाहीं, कानामध्यें नाद व भ्रम हीं लक्षणें होतात. अशा अर्शानीं पीडित मनुष्याला गांठळ, थोडा सशब्द व टणका, फेण, चिकटा यांणीं युक्त अल्प अल्प असा मळ होतो, व त्याची त्वचा, नखें, मळ, मूत्र, डोळे, आणि, तोंड कांहीं काळसर होतात; आणि गुल्म, प्लीहा, उदरें, अष्ठीला ह्मणून वातग्रंथि, यांची उत्पत्ति या अर्शापासूनच होत्ये.

अर्कपत्रक्षार.

तरुणान्यर्कपत्राणिपंचैवलवणानिच ॥ युक्तानितैलेनाम्लेनदह्येत्क्षारश्चयुक्तितः ॥ उष्णोदकेनमद्यैर्वापीतोवातार्शसांहितः ॥

अर्थ—जून पिकलेलीं रुईचीं पानें व पंच लवणें हीं, तेल व आंबट यांचे बरोबर जाळून त्याचा क्षार युक्तीनें काढून ऊन पाण्याशीं किंवा मद्य यांशीं प्याला असतां, अर्श रोग्याला हितकारक आहे.

विडंगादिचूर्णलेह.

विडंगंत्रिफलाव्यूपंत्रिसिताचोपकर्णिका ॥ कंपिल्लंनलिनीचूर्णंतुल्यक्षौद्रंलिहेदनु ॥ गुडेनसितयावाथवातोत्थानर्शसान्जयेत् ॥

अर्थ—वावडिंग, त्रिफळा, त्र्यूपण, साकर, मूषकर्णिका, निशोत्तर, पवारी यांचें चूर्ण मधाशीं किंवा गूळ व साकर यांशीं घ्यावें; ह्मणजे वातोत्पन्न अर्श नाश पावतात.

लवणादिमट्ठा.

लवणोत्तमवन्हिकलिंगयुतंविडबिल्वमहापिचुमंदयुतं ॥
पीतंसप्तदिनंमथितंलुलितंयदिमर्दितुमिच्छसिवायुरुजं ॥

अर्थ—सैंधव, चित्रक, इंद्रजव, बिडलोण, बेलफळ व कडुनिंब यांचें चूर्ण घालून सात दिवस मट्ठा प्यावा; ह्मणजे वातसंबंधि अर्शपीडा नाश पावत्ये.

मरीचादिचूर्ण.

मरीचीपिप्पलीकुष्ठंसैंधवंजीरनागरं ॥ वचाहिंगुविडंगानिपथ्यावन्ह्य जमोदकं ॥ एतेषांकारयेच्चूर्णंचूर्णस्यद्विगुणंगुडं ॥ खादेत्कर्षमितंचा पिपिबेदुष्णजलंततः ॥ सर्वाण्यर्शांसिनश्यंतिवातजानिविशेषतः ॥

अर्थ—मिरीं, पिंपळी, कोष्टकोलिंजन, सैंधव, जिरें, सुंठ, वेखंड, हिंग, वावडिंग, हरीतकी, चित्रक व ओंवा यांचें चूर्ण करून चूर्णाच्या द्विगुण गुड घालावा; आणि तोळाभर खावें, व मागून ऊनपाणी प्यावें; ह्मणजे संपूर्ण अर्श नाश पावतात; व विशेषानें वातार्श नाश पावतात.

सूरणमोदक.

शुष्कात्सूरणकंदतोयमिलितंव्योषंतथाचित्रकंश्रेष्ठाजीरकरामठंसमलवं दीप्याजमोदान्वितं ॥ सर्वस्यांघ्रिकसिंधुजंपरिभवेन्निंबूद्रवैर्वासरंसिद्धःसू रणमोदकोगदहरःश्रेष्ठोभवेत्प्राणिनां ॥ शूलंसंग्रहणीगदंत्वतिसृतिंदुष्टां प्रवाहींजयेद्दीप्ताग्निंकुरुतेबलंवितनुतेगुल्मप्रणाशंतथा ॥ अर्शांस्युद्धतमा रुतामयहरोबालेचवृद्धेहितोगार्भिण्यांचनशस्यतेननिपुणैर्नोरक्तपित्तेपिच ॥

अर्थ—जुन्या सुकलेल्या सुरणाचा रस घेऊन त्यांत मिरीं, पिंपळी, सुंठ, चित्रक, श्रेष्ठ जिरें, हिंग, ओंवा, अजमोदा हीं समभाग, व संपूर्णांचा चवथा हिस्सा सैंधव घालोन सुकवावें; नंतर. लिंबाचे रसाची भावना एक दिवस द्यावी; ह्मणजे हा सूरणमोदक सिद्ध झाला. हा प्राण्याचे व्याधिनाश करण्या विषयीं श्रेष्ठ व शूल, संग्रहणी, अतिसार, प्रवाहिका, गुल्म, अर्श व वायूचा प्रकोप यांचा नाश करितो; आणि अग्नि प्रदीप्त करितो; व बळ देतो. हा सूरणमोदक निपुण वैद्यानीं गर्भिणी, रक्तपित्ती यानां देऊं नये.

वाहुशालगुड.

इंद्रवारुणिकामुस्तंशुंठीदंतीहरीतकी ॥ त्रिवृत्सटीविडंगानिगोक्षी रश्चित्रकस्तथा ॥ तेजोव्हाचद्विकर्षाणिपृथक्द्रव्याणिकारयेत् ॥ सूरण स्यपलान्यष्टौवृध्दादारुचतुष्पलं ॥ चतुःपलंस्यात्भल्लातःक्काथयेत्सर्व मेकतः ॥ जलद्रोणेचतुर्थांशंगृण्हीयात्क्काथमुत्तमं ॥ क्काथद्रव्यात्त्रि गुणितंगुडंक्षिप्त्वापुनःपचेत् ॥ सम्यक्पक्कंचविज्ञात्वाचूर्णमेतत्प्रदाप येत् ॥ चित्रकंत्रिवृतादंतीतेजोव्हापलिकापृथक् ॥ पृथक्त्रिपलिकाः कार्याव्योषैलामरिचत्वचः ॥ निक्षिपेन्मधुशीतेचतस्मिन्प्रस्थप्रमाणि

तं ॥ एवंसिद्धोभवेत्श्रीमान्बाहुशालगुडःशुभः ॥ जयेदर्शांसिसर्वा
णिगुल्मंवातोदरंतथा ॥ आमवातंप्रतिश्यायंग्रहणीक्षयपीनसान् ॥ ह
लीमकंपांडुरोगंप्रमेहंचरसायनं ॥

अर्थ—कडुवृंदावन, नागरमोथे, सुंठ, दांतीमूळ, वाळहर्तकी, निशोत्तर, कचोरा, वावडिंग, गोखरू, चित्रक, तेजबळ, हीं अकरा औषधें दोन कर्ष घ्यावीं. व सूरण आठ पळें व वरधारा चार पळें व विडगे चार पळें घ्यावें. मग हीं सारीं औषधें कुटून त्यांत दोन द्रोण प्रमाण पाणी घालोन चवथाई पाणी राही तोंपर्यंत काढा करून भाग्या औषधांचे तिप्पट गूळ घालोन फिरून कढवून पाक करावा. त्यांत चूर्ण टाकावयाचे तें येणें-प्रमाणें. चित्रक, निशोत्तर, दांतीमूळ, तेजबळ, हीं पांच औषधें एक एक पळ प्रमाण घ्यावीं. मग साऱ्या मूळव्याधि दूर होतात. गुल्म, वातोदर, वायूनें अंग जखडून राहातें तें व पडसें, संग्रहणी, पीनस, हलीमक, पांडुरोग, परमा हे रोग दूर होतात. व हा बाहुशालगुंड रसायन आहे, असें जाणावें.

पित्तार्शहेतु.

कट्वम्ललवणोष्णानिव्यायामाग्न्यातपश्रमाः ॥ देशकालाव
शिशिरौक्रोधोमद्यमसूयनं ॥ विदाहितीक्ष्णमुष्णंचसर्वंपाना
न्नभोजनं ॥ पित्तोल्बणानांविज्ञेयःप्रकोपेहेतुरर्शसां ॥

अर्थ—तिखट, आंबट, खारट, व उष्ण इत्यादिकांचें सेवन, व्यायाम, अग्नि व ऊन याचें सेवन, आणि उष्णदेश, उष्णकाळ, क्रोध, मद्य, दुसऱ्याच्या उत्कर्षाचें असहन, व विदाहि, तीक्ष्ण, उष्ण असें पान व अन्न इत्यादिक पित्तार्शाचे हेतु जाणावे.

पित्तार्शलक्षण.

पित्तोत्तरानीलमुखारक्तपीतासितप्रभाः ॥ तन्वस्रस्राविणोविस्रास्त
नवोमृदवःश्लथाः ॥ शुकजिव्हायकृत्खंडजलौकावक्त्रसन्निभाः ॥
दाहपाकज्वरस्वेदतृण्मूर्छारुचिमोहदाः ॥ सोष्माणोद्रवनीलोष्णपी
तरक्तामवर्चसः ॥ यवमध्याहरित्पीतहारिद्रत्वङ्नखादयः ॥

अर्थ—पित्ताधिक मूळव्याधीचे मोड निळया अग्राचें, त्याचा रंग तांबडा, पिंवळा, अथवा काळा असतो. त्यांतून पातळ रक्ताचा स्राव होतो, व त्यानां अंतूस घाण येत्ये, ते बारिक, कोमल व शिथिल असतात; व त्यांचा आकार पोपटाची जीभ, काळीज, व जळवांची तोंडें यासारिखे असतात. त्यांणीं दाह, गुदपाक, ज्वर, घाम, तहान, मूर्छा, अरुचि व मोह हीं होतात. व त्यांचा स्पर्श उष्ण असतो. त्यामुळें पातळ, नीळ, वर्ण, उष्ण, पीत, किंवा रक्तवर्ण, आमयुक्त असा मळ होतो. व ते अंकुर जवासारिखे

मध्ये मोठे असतात; आणि त्या रोग्याची त्वचा, नखें व नेत्र इत्यादि हिरवे, पिंवळे, किंवा हळदिवे होतात-

तिलादिचूर्ण.

चूर्णंतिलानांसितयासमेतंहैमान्नबीजंगजकेसरंच ॥
लिहेन्नरोयोनहितस्यदुष्टान्यर्शांसिपित्तप्रभवाणिजातु ॥

अर्थ–तिळांचें चूर्ण, लाल राताळूंबीज व नागकेशर यांचे चूर्ण साकरेशीं खावें; ह्मणजे त्याला पित्तार्श कधींही होणार नाहीत.

तिलादि व कुटजादि काढे.

तिलभल्लातकक्काथमनुपित्तार्तिनासुखी ॥ सक्षौद्रःकुटजःक्काथोनित्यं रात्रौचपाययेत् ॥ पथ्यंमुद्गरसैर्देयंशालितंडुलसंयुतं ॥

अर्थ–तिळ व बिबवे यांचा काढा किंवा इंद्रजवांचा काढा मध घालोन द्यावा; आणि पथ्याला मुगांचें काट, आणि भात द्यावा; ह्मणजे पित्तार्श नाश पावतात.

भल्लातामृत.

गुडूचीलांगलीशृंगीमुंडीगुंजाचकेतकी ॥ पण्णांपत्ररसैर्मर्द्यंवा लभल्लातवर्जिकं ॥ दिनैकंमर्दयेद्गाढंनिष्कार्धंभक्षयेत्सदा ॥
भल्लातामृतयोगोयंसर्वार्शांन्पित्तजान्जयेत् ॥

अर्थ–गुळवेल, कळलावी, कांकडाशिंगी, मुंडी, गुंज व केतकी या साहा वनस्पतींच्या रसांत कोवळीं बिब्याचीं फळें एकादिवस खूब घोटावीं. त्यांतून चार मासे रोज भक्षण करावीं. हा भल्लातामृतयोग संपूर्ण पित्तज अर्शांचा नाश करितो.

धत्तूरादिचूर्ण.

धत्तूरस्यफलंपक्कंपिप्पलीनागराभया ॥ बालकंगुडसंयुक्तंभक्ष्यं गुंजाष्टकंनिशि ॥ सितामध्वाज्यकर्षैकंपिबेत्पित्तार्शसांजये ॥

अर्थ–धोतऱ्याचें पिकलेलें फळ, पिंपळी, सुंठ, हरीतकी व वाळा यांचें चूर्ण रात्रीं आठ गुंजा तोळाभर तूप, साकर व मध यांत घ्यावें; ह्मणजे पित्तार्श शांत होतो.

भल्लातकादिमोदक.

भल्लातकंतिलंपथ्याचूर्णंगुडसमन्वितं ॥
मोदकोभक्षयेत्कर्षंमासात्पित्तार्शसांजये ॥

अर्थ–बिबवे, तिळ व हरीतकी यांचें चूर्णाची गुळाशीं एक तोळा गोळी करून दररोज एक महिना घ्यावी; ह्मणजे पित्तार्श शांत होतात.

बोलवद्ध रस.

गुडूचिकासत्वसमंरसेंद्रंगंधंसमांशंनिखिलेनवर्बरः ॥ विमर्दयेच्छा
ल्मलिकाभवाद्भिःस्याद्बोलवद्धोमधुयुक्त्रिमापः ॥ रक्तार्शसांनाशकृ
देपमूतःपित्तार्शसांपित्तजविद्रधेश्च ॥ रक्तप्रमेहस्यखुडस्यचापिस्त्री
णांप्रवाहस्यभगंदरस्य ॥

अर्थ–गुडूचीसत्व, पारा व गंधक हीं समान व निष्पट रक्तबोळ हीं एकत्र करून त्यांना सांवरीच्या सालीच्या रसांत खल करावा. हा बोलबद्ध रस तीन मासे प्रमाण मधाशीं सेविला असतां, रक्तार्श, पित्तार्श, पित्तविद्रधि, रक्तप्रमेह, रक्तपित्त, आणि स्त्रियांचें रक्तप्रदर व भगंदर यांचा नाश करितो.

लोहादिमोदक.

मृतलोहमिंद्रयवंशुंठीभल्लातचित्रकं ॥ बिल्वमज्जाविडंगानिपथ्या
तुल्यंविचूर्णयेत् ॥ सर्वतुल्योगुडोयोज्यःकर्षभुक्त्वार्शसांजये ॥

अर्थ–लोहभस्म, इंद्रजव, सुंठ, बिब्बे, चित्रक, बेलफळाचा मगज, वावडिंग व बाळहिर्डा हीं समान चूर्ण एकत्र करून सर्व चूर्णांबरोबर गूळ घालावा. त्यांतून दोहा मासे अर्शरोग जाण्याकरितां भक्षण करावें.

तीक्ष्णमुख रस.

मृतसूताभ्रलोहार्कतीक्ष्णंमुंडंचगंधकं ॥ मंडूरंचसमंताप्यंमर्द्यकन्याद्र
वैर्दिनं ॥ अंधमूषागतंपाच्यंत्रिदिनंतुपवन्हिना ॥ चूर्णितंसितया
माषंखादेत्पित्तार्शसांजये ॥ रसस्तीक्ष्णमुखोनामस्यनुयोज्यंमधुत्रयं ॥

अर्थ–पारदभस्म, अभ्रकभस्म, लोहभस्म, ताम्र, कांत, मुंडलोह, गंधक, मंडूर, आणि ताप्य या सर्वांचीं समभाग भस्में घेऊन एकदिवस कोरफळाच्या रसांत खलून नंतर मुसांत घालून तीन दिवस तुषाग्नि द्यावा. शीत झाल्यावर त्यांतून एक मासाभार साखरेशीं द्यावा. हा तीक्ष्णमुख रस घेतल्यावर मागून मधुत्रय प्राशन करावें; म्हणजे पित्तार्श शांत होतात.

कफार्शनिदान.

मधुरस्निग्धशीतानिलवणाम्लगुरूणिच ॥ अव्यायामादिवा
स्वप्नशय्यासनसुखेरतिः ॥ प्राग्वातसेवाशीतौचदेशकालावचिं
तनं ॥ श्लैष्मिकाणांसमुद्दिष्टमेतत्कारणमर्शसां ॥

अर्थ—मधुर, स्निग्ध, शीतळ, लवण, आंबट व गुरु इत्यादिकांचें सेवन, व्यायाम न करणें, दिवा निद्रा, शय्या आणि आसन यांचा ठायीं सुखेंकरून बसणें, व पूर्वेकडील वायूचें सेवन, शीतळ देश व काळ, कांहीं चिंतन करीत उगीच आळशासारखें बसणें इत्यादिक कफार्शाचीं कारणें जाणावीं.

कफजअर्शाचें लक्षण.

श्लेष्मोल्बणामहामूलाघनामंदरुजःसिताः ॥ उत्सन्नोपचिताःस्निग्धा स्तब्धावृत्तगुरुस्थिराः ॥ पिच्छिलास्तिमिताःश्लक्ष्णाःकंड्वाढ्याःस्पर्श नप्रियाः ॥ वंक्षणानाहिनःपायुबस्तिनाभिविकर्षिणः ॥ सश्वासकास हृल्लासप्रसेकारुचिपीनसाः ॥ मेहकृच्छ्रशिरोजाड्यशिशिरज्वरका रिणः ॥ क्लैब्याग्निमार्दवच्छर्दिरामप्रायविकारदाः ॥ वसाभसकफ प्राज्यपुरीषाःसप्रवाहिकाः ॥ नस्रवंतिनभिद्यंतेपांडुस्निग्धत्वगादयः ॥

अर्थ—कफात्मक अर्शाचे मोड खोल धातूंप्रत जाणारे, कठीण, मंदपीडाकरणारे, पांढरे, लांब लांब, तुळतुळीत, ताठर, वाटोळे, गुदाला जडवाटणारे, स्थिर, बुळबुळीत, ओलसर, मण्याप्रमाणें गुळगुळीत, कंडूकरणारे, स्पर्शानें सुख वाटणारे, नेपती व फणस, यांच्या आंठोसारिखे व गाईच्या आंचळा सारिखे, आडसंधीला जखडणारे, गुद, बस्ति, आणि नाभि यानां ओढल्या सारिखे, दमा, खोकला, मळमळ, लालास्राव अरुचि, आणि पडसें, तसेच मेह, मूत्रकृच्छ्र, मस्तकाला जडता, शीतज्वर व नपुंसकत्व,, अग्निमांद्य, वांति, आणि आमबहुल रोग (आमातिसारादिक) यानां करणारे, आणि चर्बी व कफ यांणी मिश्रीत असा पुष्कळ मळ पाडणारे, प्रवाहिका उत्पन्न करणारे व त्यांपासून क्लेद व रक्तादिक कांहीं स्रवत नाहीं; आणि ते बळकट पिळले असतां, ही फुटत नाहींत. त्यांच्या योगानें त्वचा, नखें, नेत्र आदिकरून पांढरे व तुळतुळीत होतात.

कफार्शचिकित्सा.

श्लेष्मार्शसोगुदेपार्श्वेरक्तमोक्षोजलूकया ॥
कृत्वाचार्करसैर्लेपंदाहंवात्रापिशस्यते ॥

अर्थ—श्लेष्मार्शावर, गुदाचे व पार्श्वभागाचें जळवानीं रक्त काढावें; आणि रुई च्या रसांत औषधांचा लेप करावा, अथवा डाग ही द्यावा तो प्रशस्त आहे.

सामान्यचिकित्सा.

सुरणंकासमर्दंचशिग्रुवार्ताकवालुकं ॥ सुपक्कंयोजयेच्छाकंपथ्यंगोधू मतंडुलं ॥ कुसुंभमृदुपत्राणिआरनालेनपेषयेत् ॥ भक्षयेच्छाकवच्छो

त्वैस्वयमग्निरसस्तथा ॥ निष्कत्रयंत्र्यंनित्यंगुंजंवानंदभैरवं ॥ काक तुंडीद्रवापूरादेवदाल्याश्चबीजकं ॥ सगुडंगुदलेपेनशूलरोगहरंपरं ॥

अर्थ—सुरण, काशिवदा, शेवगा, वांगे व वालुक यांची शाक शिजऊन खावी. पथ्याला गहूं व तंडुळ खावे, व कुमुव्याची मृदु पानें कांजींत वाटून शाकेसारिखीं भक्षावीं; आणि स्वयमग्निरस चार मासे किंवा एक गुंज आनंदभैरव द्यावा; आणि कावळीच्या रसांत देवडांगरीचें बीज व गूळ वाटून त्याणें गुदाला लेप करावा; ह्मणजे टणका शांत होतो

अर्शभेद ललित.

गुदद्वारात्पृष्ठदेशेजायंतेपांडुरांकुराः ॥ ललितास्तेविशुष्यंतेशूलरोगस्यलक्षणं ॥ श्लेष्मार्शसामयंभेदोहन्याल्लेपरसायनैः ॥

अर्थ—गुदद्वाराच्या मार्गे पांढरे अर्शासारिखे अंकुर येतात, त्यांला ललित ह्मणतात. हे सुकले असतां, शूल रोग होतो. हा भेद श्लेष्मार्शालाच आहे. ह्या लेपानीं, किंवा रसायनानीं शांत करावा.

देवदाल्यादिलेप.

देवदाल्याश्चबीजानिसैंधवेनसुचूर्णितं ॥
आरनालेनलेपोयंशूलरोगनिवृत्तये ॥

अर्थ—देवडांगरीचें बीज व सैंधव यांचें चूर्ण कांजींत वाटून लेप केला असतां, शूलरोग जातो.

कांचनीलेप.

कांचनीकुसुमंचूर्णंलोहचूर्णमनःशिला ॥ गजपिप्पलिसंतोयै र्लेपोह्यर्शोनिपातकः ॥ पूर्ववन्निःक्षिपेद्गुह्येक्लिप्त्वानागस्यालिकं ॥ घृतसैंधवसंयुक्तकटुविड्बंधनाशनं ॥

अर्थ—हळद व लवंग, यांचें चूर्ण लोह, मनशीळ व गजपिंपळी हीं एकत्र पाण्यांत वाटून लेप करावा; ह्मणजे तो, अर्शाला पाडितो; किंवा पूर्वी सांगितल्या प्रमाणें गुदामध्यें शिशाच्या नळीनें घृत व सैंधवयुक्त असा कटुपदार्थांचा काढा सोडावा; ह्मणजे विट्बंध नाश पावतो.

सूरणादिलेप.

सूरणंरजनीवन्हिटंकणंगुडमिश्रितं ॥
पिष्टारनालकैर्लेपोहंत्यर्शांसिमहांत्यपि ॥

अर्थ—सुरण, हळद, चित्रक, टांकणखार व गूळ हे एकत्र वाटून कांजीतून गुदाला लेप करावा; ह्मणजे अर्शांचे मोठे ही मोड नाश पावतात.

कटुतुंबीलेप.

आरनालेनसंपिष्टासजीवकटुतुंबिका ॥
सगुडाहंतिलेपेनअर्शांसिमूलतोध्रुवं ॥

अर्थ–ओली कडु भोंपळी कांजींत वाटून त्यांत गूळ घालून गुदाला लेप द्यावा; ह्मणजे गुळव्याध मुळापासून गळून पडतो.

पीलुतैलवर्ति.

पीलुतैलेनसंलिप्तावर्तिकागुदमध्यगा ॥
पातयत्यर्शसांसिद्धंनवलीवेदनात्कचित् ॥

अर्थ–कांकडा करून तो अक्रोडाच्या तेलांत बुडवून गुदांत घालून ठेवावा; ह्मणजे अर्शकंद पाडील. कधींहीं वलीला वेदना होणार नाहींत.

दंत्यासव.

दशमूलाग्निदंतीनांप्रत्येकंचपलपलं ॥ जलद्रोणेततःक्काथ्यंपादशेषंसमुद्धरेत् ॥ गुडैलातुपलैकंतुशीतभूतंविमिश्रयेत् ॥ घृतभांडेस्थितंपक्षंयथाशक्तिपिबेत्ततः ॥ अयंदंत्यासवःख्यातःशमनेचार्शसांकिल ॥ ग्रहणींपांडुरोगंचसर्वव्याधिहरंपरं ॥

अर्थ–दशमुळें, चित्रक व दांती यांची मुळें चार चार तोळे घेऊन त्यांचा २०४८ तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करून गाळून घ्यावा. थंड झाल्यावर त्यांत गूळ व एलची हे चार चार तोळे घालून तुपाच्या भांड्यांत पंधरा दिवस ठेवावा. हा दंत्यासव शक्ति पाहून द्यावा; ह्मणजे अर्शरोग, संग्रहणी, पांडुरोग; आणि सर्व व्याधि यांचा नाश करितो.

पथ्यादिगुड.

द्वात्रिंशत्पलपथ्यानांतदर्धामलकीफलं ॥ कपित्थंस्याद्दशपलंविशालापलपंचकं ॥ विडंगंपिप्पलीलोध्रंमरिचंसैंधवालुकं ॥ द्विपलांशंतुप्रत्येकंजलंद्रोणचतुष्टयं ॥ क्काथंपादावशेषंतुशीतीभूतेक्षिपेद्गुडं ॥ पलानांद्विशतंचैवधातुकीपलपंचकं ॥ घृतभांडेस्थितेतस्मिन्यथाशक्तिपिबेत्ततः ॥ अर्शांसिग्रहणीपांडुहृद्रोगप्लीहगुल्मनुत् ॥ मंदाग्निंचोदरंशोथंकुष्टघ्नंपरमौषधं ॥

अर्थ–हरीतकी १२८ तोळे, आवळकाठी ६४ कंवठ ४० इंद्रावण २० आणि वावडिंग, पिंपळी, लोध्र, मिरीं, सैंधव, अळूचें फळ, हीं प्रत्येक ८ तोळे याप्रमाणें

घेऊन २०४८ तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करून गाळून घ्यावा. निवाल्यावर त्यांत ८०० तोळे गूळ व धायटीचें फूल २० तोळें घालोन ठेवावा. हा यथाशक्ति प्राशन करावा; ह्मणजे मुळव्याध, संग्रहणी, पांडुरोग, हृद्रोग, प्लीहा, गुल्म, मंदाग्नि, उदर, सूज व कुष्ठें यांचा नाश करितो.

भल्लातकहरीतकी.

भल्लातकहरीतक्यौपाठाकटुकरोहिणी ॥ यवानीजाजिकुष्ठंचचित्रकोतिविपावचा ॥ कचोरंपौष्करंमूलंहिंगुइंद्रयवंतथा ॥ शुंठीसौवर्चलं तुल्यंगवांमूत्रेणपेषयेत् ॥ छायाशुष्काचवटिकामापमात्रंचभक्षयेत् ॥ पिबेदुष्णोदकंपश्चात्कफोत्थानार्शसांजये ॥

अर्थ–बिबवे, बाळहर्डी, पाडळ, कुटकी, ओंवा, जिरें, कोष्ठ, चित्रक, अतिविष, वेखंड, कचोरा, पुष्करमूळ, हिंग, इंद्रजव, सुंठ व संचळ हीं सर्व समभाग घेऊन गोंई-च्या मुतांत वाटावीं; आणि छायेमध्यें सुकवून एक माशाची गोळी भक्षण करावी; आणि मागून ऊन पाणी प्यावें; ह्मणजे कफार्श नाश पावतात.

लांगल्यादिमोदक.

लांगलींद्रयवाकृष्णावन्ह्यपामार्गतंडुलाः॥ भूनिंबसैंधवंतुल्यं सर्वस्यद्विगुणंगुडं ॥ भक्षयेत्कर्षमात्रंतुश्लेष्मोद्भूतार्शसांजये ॥

अर्थ–कळलावी, इंद्रजव, पिंपळी, चित्रकमूळ, आघाडयाचे तांदूळ, किराइत व सैंधव हीं सर्व समभाग घेऊन सर्वचूर्णाच्या दुप्पट गुळ घालावा; आणि यांतून दाहा मासे घ्यावा. हा लांगल्यादिमोदक श्लेष्मार्शाचा नाश करितो.

पथ्यादिमोदक.

पथ्याशुंठीकणावन्हीप्रत्येकंचूर्णयेत्पलं ॥ त्वगेलापत्रकंचाथ प्रत्येकंकर्पमात्रकं ॥ गुडंदशपलंयोज्यंकर्पंभुक्त्वार्शसांजये ॥

अर्थ–हरीतकी, सुंठ, पिंपळी व चित्रक या प्रत्येकाचें चार तोळे चूर्ण व दालचिनी, एलची व तमालपत्र हां प्रत्येक एक तोळा व गूळ ४० तोळे हीं सर्व एकत्र करून त्यांची १० माशाची गोळी घ्यावी. ही अर्शांचा नाश करित्ये.

यवान्यादिमोदक.

यवान्यक्षभयाजाजीपिप्पलींचूर्णयेत्समं ॥ चूर्णाद्गुडंद्विधायोज्यंकर्पंभुक्त्वार्शसांजये ॥

अर्थ–ओंवा, बेहेडे, हरीतकी, जिरें आणि पिंपळी यांची समभाग चूर्णें घेऊन एकत्र

करावीं. व सर्वचूर्णाचा दुप्पट गूळ घालोन त्यांतून दाहा मासे द्यावा; ह्मणजे अर्शाचा नाश करितो.

भल्लातकादिलेप.

भल्लातकगजास्थीनिदंतीनिंबकपोतविट् ॥
गुडसौराष्ट्र्यमृतजैर्लेपःश्लेष्मार्शसांजये ॥

अर्थ—बिब्बे, हत्तीचीं हाडें व दांती, निंब, कवड्याची विष्ठा, गूळ, तुरटी, आणि वचनाग यांचा लेप कफार्शनाशक आहे.

शृंगवेरक्काथ.

कफजेशृंगवेरस्यक्काथोनित्योपयौगिकः ॥

अर्थ—कफजअर्शावर आल्याचा काढा रोज उपयोगाचा आहे.

रक्तार्शनिदान.

रक्तोल्बणागुदेकीलापित्ताकृतिसमन्विताः ॥ वटप्ररोहसदृशागुंजा विद्रुमसन्निभाः ॥ तेत्यर्थंदुष्टमुष्णंचगाढविट्कप्रपीडिताः ॥ स्रवं तिसहसारक्तंतस्यचातिप्रवृत्तितः ॥ भेकाभःपीड्यतेदुःखैःशोणितक्ष यसंभवैः ॥ हीनवर्णबलोत्साहोहतौजःकलुषेंद्रियः ॥ विट्श्यावंक ठिनंरूक्षमधोवायुर्नगच्छति ॥

अर्थ—रक्तविकारेंकरून खिळ्यासारिखे मांसांकुर गुदाचे ठायीं उत्पन्न होतात. त्याचीं सर्व लक्षणें पित्तार्शाच्या लक्षणांसारिखीं होतात, व ते आकृतीनें वडाचे पारंब्यासारिखे व वर्णानें गुंज व पोंवळ्यासारिखे असतात; आणि अत्यंत दुष्ट, उष्ण व खड्यासारिखा कठीण अशा मळानें फार पीडा पावतात, व या अर्शाचे ठायीं रक्ताची वृद्धि फार होत्ये. तेणें करून ते अंकुर अकस्मात रक्त स्रवों लागतात, व तो रोगी रुधिरक्षयजन्यदुःखानें पीडित होऊन बेडकासारिखा पिंवळट वर्ण व निस्तेज होतो; आणि वर्ण, बळ, उत्साह व तेज यांणीं हीन, इंद्रियांना ग्लानि व कृष्णवर्ण, कठीण व रुक्ष असा मळ, अपानवायूचा प्रतिबंध हीं लक्षणें होतात.

वातादियुक्तरक्तार्शलक्षण.

तनुचारुणवर्णंचफेनिलंचासृगर्शसां ॥ कट्यूरुगुदशूलंचदौर्बल्यंयदिचा धिकं ॥ तत्रानुबंधोवातस्यहेतुर्यदिचरूक्षणं ॥ शिथिलंश्वेतपित्तंचविट् स्निग्धंगुरुशीतलं॥ यद्यर्शसांघनंचासृक्तंतुमत्पांडुपिच्छलं॥ गुदंसपिच्छं स्तिमितंगुरुस्निग्धंचकारणं॥ श्लेष्मानुबंधोविज्ञेयस्तत्ररक्तार्शसांबुधैः ॥

अर्थ—ज्या अर्शाचें रुधिर पातळ, फेनयुक्त आणि फार आरक्तवर्ण असें असतें; व कटी, गुद व मांड्या यांस शूळ असतो; व फार दौर्बल्य येतें, व ज्याचा हेतु रुक्ष असतो. त्या रक्तार्शाचे ठायीं वातसंबंध जाणावा. व ज्या अर्शाचेठायीं, मळ शिथिल, श्वेत, पीतवर्ण व गुरु असून थंड असा असतो; आणि अर्शसंबंधि रुधिर दाट असून तंतुयुक्त, पांडुवर्ण व बुळबुळीत असतें, व गुद हीं बुळबुळीत व स्तिमित असतें; आणि ज्याचा हेतु गुरु किंवा स्निग्ध असतो, त्या रक्तार्शाचे ठायीं कफसंबंध जाणावा.

सामान्यचिकित्सा.

स्वयमग्निरसोप्यत्रभक्षयेदर्शसांजये ॥
सितामध्वाज्यकर्षकमनुपानंपिबेत्सदा ॥

अर्थ—रक्तार्शावर स्वयमग्निरस द्यावा; आणि मागून साकर, तूप व मध मिळून एक तोळा प्राशनार्थ द्यावें; ह्मणजे अर्शनाश होतो.

अश्वगंधादिधूप.

अश्वगंधोथनिर्गुंडीबृहतीपिप्पलीफलं ॥
धूपोयंस्पर्शमात्रेणह्यर्शसांशमनेह्यलं ॥

अर्थ—अश्वगंध, निर्गुंडी, रिंगणी व पिंपळी यांची धुरी अर्शाला लागतांच बरे होतात.

अर्कमूलादिधूप.

अर्कमूलंशमीपत्रंनृकेशाःसर्पकंचुकी ॥
मार्जारचर्मचाज्यंचगुदधूपोर्शसांहितः ॥

अर्थ—रुयीचीं मुळें, शमीचीं पानें, मनुष्याचे केश, सर्पाची मेंग, मांजराचें चामडें, आणि तूप या सर्वांचा धूप गुदाला दिला असतां, हितकारक आहे.

पिपीलिकातैल.

पिपीलीमदनंबिल्वंवचायष्टिकचूरकं ॥ शताव्हापुष्करंकुष्ठंचित्रकं देवदारुकं ॥ तुल्यांशंकारयेत्कल्कंकल्काचैलंचतुर्गुणं ॥ तैलात्क्षीरंद्विधायोज्यंपचेत्तैलावशेपकं ॥ अर्शसांवातयुक्तानांतत्श्रेष्ठमनुवासनं ॥ पिपील्यादिमिदंख्यातंलेपनेमर्दनेहितं ॥

अर्थ—मुंग्या, गेळफळ, बेलफळ, वेखंड, ज्येष्ठमध, कचोरा, शतावरी, पुष्करमूळ, कोष्ट, चित्रकमूळ व देवदार हीं सर्व समभाग घेऊन त्यांचा कल्क करावा; आणि कल्कापेक्षां तेल चौपट आणि तैलाच्या दुप्पट दूध हीं सर्व एकत्र करून तेल शेप राहीतों कढवावें. तें वातार्शाला अनुवासनाविषयीं चांगलें आहे.

विषमुष्टिचूर्ण.

विषमुष्टिभवंबीजंषड्वासप्ताष्टवापिच ॥ चूर्णितंससितंभक्ष्यंरक्ताशों विनिवारणं ॥ महाप्रमेहशमनंत्वग्दोषक्रमिनाशनं ॥

अर्थ–कुचल्याच्या साहा, सात, किंवा आठ बियांचें चूर्ण करून बलाबल पाहून थोड-थोडें साकरेंतून द्यावें. तें रक्तार्श, महामेह, त्वग्दोष, आणि कृमि यांचा नाश करितें.

नवनीतादियोग.

नवनीततिलाभ्यासात्केसरनवनीतशर्कराभ्यासात् ॥
दधिरसमथिताभ्यासाद्गुदजाःशाम्यंतिरक्तवाहाश्च ॥

अर्थ–लोणी, तीळ किंवा नागकेशर, लोणी, साकर अथवा दह्याची निवळी, मट्ठा यांचे निरंतर सेवन केलें असतां, रक्तवाहणाऱ्या मुळव्याधीला शमिवतात.

भल्लातकामृत.

भल्लातकचतुःषष्टिपलंदुग्धंचतत्समं ॥ दुग्धाच्चतुर्गुणंवारिपाच्यंदुग्धावशेषकं ॥ दुग्धतुल्यंघृतंयोज्यंघृतपादंसितांक्षिपेत् ॥ मधुधात्रीसितातुल्यंसिताधर्मभयारजः ॥ मृतलोहंगुडूचाचप्रत्येकमभयार्धकं ॥ क्षिपेत्स्निग्धघटेसर्वं धान्यराशौनिवेशयेत् ॥ सप्ताहादुद्धृतंतस्मादेनिष्कत्रयंत्रयं ॥ भल्लातकामृतंनामहंतिरक्तार्शसांकिल ॥ क्षारतीक्ष्णंनभोक्तव्यंतैलाभ्यंगंचवर्जयेत् ॥

अर्थ–बिब्बे २५६ तोळे व तितकेंच दूध, व दुधापेक्षां चौपट पाणी, आणि दुधाइतके तूप घालून दूध शेष राही तों पचन करावें; आणि तुपाच्या चतुर्थांश साकर, मध, आवळकाठी व साकरेच्या निमें हरीतकीचें चूर्ण, हरीतकीच्या निमें लोहभस्म व गुळवेलीचें सत्व घालून तुपानें राबलेल्या भांड्यांत भरून धान्यराशीमध्यें सातदिवस ठेऊन नंतर काढून त्यांतून एक तोळा द्यावें; हें भल्लातकामृतनामक औषध रक्तार्शाचा नाश करितें, यावर खारट व तिखट खाऊं नये; व तैलाभ्यंग ही करूं नये.

सिल्हरस.

द्वात्रिंशत्पलकंचाज्यंछागदुग्धंतथादधि ॥ छागमांसरसश्चैवदाडिमस्य फलद्रवं ॥ प्रत्येकंघृततुल्यांशंभांडेचूर्णमिदंक्षिपेत् ॥ आम्राडंत्र्यूषणंमुस्तंमज्जाबिल्वकपित्थयोः ॥ तिंतिणीधातुकीपुष्पंरक्तचंदनचंदनं ॥ उशीरंवालकंलोध्रंप्रियंगुंपद्मकेसरं ॥ मंजिष्ठावदरीचव्यंत्वगेलापद्मकंवला ॥ यष्टिमोचरसंचैवउत्पलंप्रतिकर्षकं ॥ सर्वमेकीकृतंपाच्यंया

ध्माज्यावशेषकं ॥ योजयेदर्शसांहंतृग्रहणीकृच्छ्रपांडुषु ॥ ज्वरस्रावम
तीसारंकटिशूलंचनाशयेत् ॥ इदंसिद्धघृतंनामरक्तपित्तार्शसांहितं ॥

अर्थ—१२८ तोळे तूप व शेळीचें दूध, दहीं, बोकडाचे मांसाचा रस व डाळिंबाचा रस हीं सर्व तुपाबरोबर; आंबाडे, सुंठ, मिरीं, पिंपळी, नागरमोथे, बेलफळाचा मगज, कंव-ठाचा मगज, चिंच, धायटीपुष्प, रक्तचंदन, चंदन, वाळा, काळावाळा, लोध्र, राळे, प-द्मकेशर, मांजिष्ठ, बोरें, चवक, दालचिनी, एला, पद्मकाष्ठ, चिकणा, ज्येष्ठमध, सांवरी-चा डींक व कोष्ठ हीं प्रत्येक तोळा तोळा घेऊन एकत्र करून तूप शेष राही तोंपर्यंत पचन करावें. तें तूप मूळव्याध, संग्रहणी, मूत्रकृच्छ्र, पांडुरोग, ज्वर, कटिशूल, आणि पित्तार्श यांचा नाश करितें. याला सिद्धघृत असें नाव आहे.

शिवरस.

सूतवैक्रांतशुल्वाभ्रंकांतभस्मसगंधकं ॥ तुल्यांशंमर्दयेच्चादौदा
डिमोत्थैरसैस्तथा ॥ भक्षयेन्मापमेकंतुहंत्यर्शांसिशिवोरसः ॥

अर्थ—पारा, वैक्रांतमणी, तावें, अभ्रक व कांत यांचीं भस्में व गंधक हीं सर्व सम-भाग घेऊन डाळिंबाच्या रसांत त्यांचा खल करावा. यांतून एक मासा द्यावा; ह्मणजे हा शिवरस अर्शरोगचा नाश करितो.

अपामार्गबीजादिचूर्ण.

अपामार्गस्यबीजानिवन्हिशुंठीहरीतकी ॥ मुस्ताभूनिंबतुल्यांशं
सर्वतुल्यंगुडंभवेत् ॥ कर्षैकंभक्षयेच्चानुजीर्णेतक्रभोजनं ॥

अर्थ—आघाड्याचें बीं, चित्रक, सुंठ, हरीतकी, नागरमोथे व किराइत हीं सर्व सम-भाग घेऊन त्यांचें चूर्ण करावें; व सर्व चूर्णाच्या समान गूळ घालावा; आणि त्यांतून एक तोळा द्यावें. हें औषध जिरल्यावर ताकभात पथ्याला द्यावा.

लोहामृतरस.

संग्राह्यमृतलोहस्यपलान्यष्टादशानिच ॥ त्रिकटुत्रिफलादार्वीवन्हि
मुस्तादुरालभा ॥ किराततिक्तकोनिंबपटोलकटुकामृता ॥ देवदारु
विडंगानिपर्पटंप्रतिकर्षकं ॥ मध्वाज्याभ्यांलिहेत्कर्षमर्शांसिग्रहणीं
जयेत् ॥ वातपित्तकफरक्तंनाशयेद्रोगसंचयं ॥ ख्यातोलोहामृतोना
मदेहदार्ढ्यकरःपरः ॥

अर्थ—लोहभस्म ७२ तोळे, व त्रिकटु, त्रिफला, दारुहळद, चित्रक, नागरमोथे, धमासा, किराइत, कडुनिंब, कडुपडवळ, कुटकी, गुळवेल, देवदार, वावडिंग व पित्तपापडा

हीं प्रत्येक तोळा तोळा घेऊन सर्व चूर्ण व लोह एकत्र करून त्यांतून एक तोळा मध व तूप यांशीं द्यावा; ह्मणजे अर्शरोग, संग्रहणी, वात, पित्त, कफ, रक्त, आणि अनेक रोग यांचा नाश करितो; व हा लोहामृतनामक रस, देहाला दृढ करण्याविषयीं उत्तम आहे.

विश्वीपत्रादिलेप.

विंवाश्वायरजैःपत्रैर्हितंलेपनमर्शसां ॥

अर्थ सुंठ व देवदाराचीं पानें एकत्र वाटून त्याणें अर्शाला लेप केला असतां, हित होतें.

ज्योतिष्कबीजलेप.

ज्योतिष्कबीजकल्केनलेपोरक्तार्शसांहितः ॥

अर्थ–मालकांगोणीचें बीं वाटून लेप करावा; ह्मणजे रक्तापासून झालेली मुळव्याध दूर होते.

गुंजाकूष्मांडलेप.

गुंजाकूष्मांडबीजंचसूरणेनचवर्तिकां ॥

लेपयेच्छाययाशुष्कागुदगाह्यर्शसांजये ॥

अर्थ–गुंजा, कोंहळ्याच्या बिया, आणि सुरण, हे एकत्र वाटून त्या कल्कानें फडक्याला लेप करून तो छायेंत सुकवून त्याची वात करून ती गुदांत घालावी; ह्मणजे अर्शनाश होतो.

कनकार्णव रस.

नवंधात्रीभवंचूर्णपलानांशतमात्रकं ॥ विडंगंमरिचंपाठाचव्यंचित्रक वालकं ॥ मंजिष्ठापिप्पलीमूलंलोध्रंपूगफलंतथा ॥ प्रत्येकंपलमात्रं स्यात्पिप्पलीगजपिप्पली ॥ कुष्ठदारुनिशामुस्ताशताव्हासारिवाद्व यं ॥ इंद्रवारुणिकामूलंचूर्णमर्धपलोन्मितं ॥ चत्वारिनागपुष्पस्यप लानिचूर्णयेत्ततः ॥ चूर्णादष्टगुणंतोयंक्वाथंपादावशेषकं ॥ आदायव स्त्रपूतंतुतुल्यंद्राक्षारसःकृतः ॥ सितापलशतंयोज्याक्षौद्रंचपलषोडशं ॥ घृताक्तेनिक्षिपेद्भांडेशर्करागुडधूपिते ॥ त्वगेलागंधपत्राणिउशीरंनाग केसरं ॥ वाल्कंकुमुकंचूर्णप्रतिकर्षंचनिःक्षिपेत् ॥ मुखंरुध्वास्थितंपक्षं ख्यातोयंकनकार्णवः ॥ यथेष्टंपाययेत्द्रव्यंदीपकःसर्वरोगहा ॥ अर्शां सिग्रहणींपांडूंश्वयथुंचविनाशयेत् ॥

अर्थ–नव्या आवळकठीचें चूर्ण ४०० तोळे, आणि वावडिंग, मिरीं, पाहाडमूळ, चवक, चित्रकमूळ, वाळा, मंजिठ, पिंपळीमूळ, लोध्र व सुपारी हीं प्रत्येकीं ४ तोळे;

व पिंपळी, गजपिंपळीचें मूळ हीं प्रत्येकीं २ तोळे, नाकेशर १६ तोळे, हीं सर्व एकत्र कुटून चूर्णाच्या आठपट पाणीं घालोन चतुर्थांश काढा गाळून घ्यावा; आणि त्या काढ्या इतका द्राक्षारस व ४०० तोळे साखर व मध ६४ तोळे, हीं सर्व एके जागीं करून तुपाच्या भांड्याला साखर गूळ यांचा धूर देऊन त्यांत भरावीं; आणि त्यांत दालचिनी, एलची, तमालपत्र, वाळा, नाकेशर, काळावाळा व सुपारी, या प्रत्येकाचें तोळा तोळा चूर्ण आंत घालून तोंड बंद करून पंधरा दिवस तसेंच ठेवावें. याला कनकार्णव ह्मणतात. यावर यथेष्ट भक्षण करावें. हा दीपक आहे, व सर्व रोग, अर्श, संग्रहणी, पांडुरोग, आणि सूज यांचा नाश करितो.

योगराजगुग्गुलु.

कणागजकणावन्हिविडंगेंद्रयवायवैः ॥ कटुकापिप्पलीमूलंभार्गीपाठाजमोदकं ॥ मूर्वाशुंठीहिंगुचव्यंसमंसर्वांशगुग्गुलुः ॥ चूर्णयेन्मधुनाखादेत्कर्षांशंयोगराजकं ॥ रक्तवातार्शसोगुल्मग्रहणीपांडुजिद्भवेत् ॥

अर्थ–पिंपळी, गजपिंपळी, चित्रक, वावडिंग, इंद्रजव, धमासा, कुटकी, पिंपळीमूळ, भारंगमूळ, पाहाडमूळ, ओंवा, मोरवेल, सुंठ, हिंग, चवक आणि या सर्वांबरोबर गुग्गुळ हीं सर्व एकत्र करून त्यांतून मधाशीं एक तोळा द्यावा; ह्मणजे रक्तार्श, वातार्श, गुल्म, संग्रहणी, आणि पांडुरोग यांचा नाश करितो. याला योगराज ह्मणतात.

राल.

रालचूर्णस्यतैलेनसार्षपेणयुतस्यच ॥
धूपदानेनयुक्तयार्शोरक्तस्रावोनिवर्तते ॥

अर्थ–राळेचें चूर्ण व शिरसेल एकत्र करून धूप दिलाअसतां, अर्श व रक्तस्राव बंद होतो.

कर्पूरधूप.

रक्तौघशांतयेदेयंगुदेकर्पूरधूपनं ॥

अर्थ–कापुराचा धूप गुदाला द्यावा; ह्मणजे रक्ताची शांति करितो.

पयसादियूष.

पयसाशृतेनयूपैःसतिलमुद्गाढकिमसूराणां ॥
ओदनमद्यादम्लैर्मधुरैरीपत्सुगंधैश्च ॥

अर्थ–तिळ, गुळ, तुरी, आणि मसूरा यांचा काढा किंवा यूष यांत किंचित् आंबट घालून मधुर करून व सुगंध लावून त्याशीं भात भक्षण करावा.

कालकलांतकवटी.

शुद्धसूतंमृतंवंगंतालंसिंधूत्थलांगली ॥ पलंतूरीपलैकैकंलसूनंचचतुः
पलं ॥ कारवल्याद्रवैर्मर्द्यदिनैकंवटकीकृतं ॥ गुंजामात्रंसदाखादेद्गु
दद्वारेचतांक्षिपेत् ॥ रक्तवातकफोत्थानामर्शसांशमयेद्ध्रुवं ॥ वटीका
लकलांतेयमनुपानंचकथ्यते ॥ भल्लातत्रिफलादंतीवन्हिचूर्णसमंसमं ॥
सैंधवंसर्वतुल्यंस्याद्भर्जयेत्खर्परेचिरं ॥ मृद्वग्निनाभवेत्सिद्धंकर्षैतक्रैःपिबेदनु

अर्थ–पारा, वंगभस्म, हरताळ, सैंधव, कळलावी व तुरी, हीं चार तोळे, व लसूण १६ तोळे एकत्र करून कारेतीच्या रसांत एक दिवस खल करावा; आणि यांतून एक गुंज भक्षण करावा; व गुदांत ही एक गुंज घालावा; ह्मणजे रक्तवात व कफ यांपासून झालेल्या अर्शांचा शीघ्र नाश करील. या कालकलांतकवटीला अनुपान सांगतों. तें बिबवे, त्रिफळा, जेपाळ, चित्रक, आणि सैंधव हीं समभाग घेऊन यांचे चूर्ण खापरांत मंदाग्नीनें भाजावें; आणि तें ताकांतून एक तोळा प्यावें.

अपामार्गादिकल्क.

अपामार्गस्यबीजानांकल्कस्तंदुलवारिणा ॥
पीतोरक्तार्शसांनाशंकुरुतेनास्तिसंशयः

अर्थ–आघाड्याचें बीं तांदुळाचें धुणांत वाटून प्यावें; ह्मणजे रक्तार्शांचा नाश करितो.

पद्मकेसर योग.

सपद्मकेसरक्षौद्रनवनीतंनवंलिहन् ॥
सितकेसरसंयुक्तंरक्तार्शीसुसुखीभवेत् ॥

अर्थ–कमळाचे केशर, मध, नवें लोणी, साकर व नागकेशर हीं सर्व समभाग घेऊन गोळी करून खावी. रक्तार्शावर प्रशस्त आहे.

समंगादिदुग्ध.

समंगोत्पलमोचाव्हतिरीटतिलचंदनैः ॥
सिद्धंछागीपयोदद्याद्गुदजेशोणितात्मके ॥

अर्थ–लाजाळू, कमळ, मोचरस, लोध्र, तिळ व चंदन इतक्यानीं सिद्ध केलेले शेळीचें दूध रक्तार्शावर प्यावें.

रक्तार्शावर काढा.

चंदनकिराततिक्तकधन्वयवासाःसनागराःक्वथिताः ॥
रक्तार्शसांप्रशमनादार्वीत्वगुशीरनिंबाश्च ॥

अर्थ–चंदन, किराइत, कुटकी, धमासा, सुंठ, दारुहळद, दालचिनी, वाळा व कडुनिंब, यांचा काढा रक्तार्शशामक आहे.

द्राक्षादियोग.

द्राक्षाहरिद्रामधुकंमंजिष्ठानीलमुत्पलं ॥
अजाक्षीरेणसंपीतंरक्तजार्शोविनाशनं ॥

अर्थ–द्राक्षे, हळद, मधुकाष्ठ, मांजिष्ठ व निळें कमळ, यांचा कल्क शेळीच्या दुधाशीं प्यावा; ह्मणजे तो रक्तार्शाचा नाश करितो.

त्रिकट्वादियोग.

त्रिकटुत्रिफलादंतीवन्हिभल्लातसैंधवं ॥ सुवर्चलंचसामुद्रंलवणंघृततैलकं ॥ छागमज्जावसामूत्रंगोमूत्रंनरमूत्रकं ॥ महिषीगर्दभाश्वानामेषांमूत्रैर्दिनत्रयं ॥ भावयेच्छोषयेत्तंचरुध्वागजपुटेपचेत् ॥ निष्कद्वयंपिबेदाज्यैरक्तवातार्शसांजये ॥ क्षीरैर्मांसरसैर्भोज्यंशूलगुल्मंचनाशयेत् ॥

अर्थ–त्रिकटु, त्रिफळा, जेपाळ, चित्रक, बिबवे, सैंधव, सोरा, मीठ, तूप, तेल व बकऱ्याची मज्जा, चर्बी व मूत; आणि गाई, मनुष्य, महिषी, गाढव व घोडा यांची मुतें यामध्यें तीन दिवस ठेऊन सुकवून शरावांत घालून गजपुट द्यावें. थंड झाल्यावर काढून ८ मासे औषध तुपाशीं द्यावें; ह्मणजे रक्तार्श व वातार्श यांची शांति होत्ये. यावर दूध व मांसरस हें भोजनांत पथ्याला द्यावें. हा त्रिकट्वादियोग शूल व गुल्म यांचा नाश करितो.

विड्बंध.

नागेननलिकांकृत्वाघृतसैंधवलेपितां ॥
गुदद्वारेक्षिपेन्नित्यंमलरोधप्रशांतये ॥

अर्थ–शिशाची नळी करून तिला सैंधव व तूप लाऊन ती रोज गुदांत घालावी; ह्मणजे मळरोधाची शांति होत्ये.

रक्तस्राव.

धूपनेलेपनेभ्यंगेप्रस्रवंतिगुदांकुराः ॥
सपित्तदुष्टंरुधिरंततःसंपद्यतेसुखं ॥

अर्थ–मुळव्याधीचे मोड धूपानें, लेपानें, किंवा अभ्यंगानें पित्तासहवर्तमान नासलेलें रक्त स्रवतात, तेणें करून सुख होतें.

दुसरा प्रकार.

विबंधेर्शसिचोत्सिकेकंडूमद्रक्तवाहिनि ॥
जलौकापातनादन्यःप्रयोगोनास्तिकश्चन ॥

अर्थ–विड्बंध कराणाऱ्या, आसमंतात कंडू करणाऱ्या व रक्त वाहणाऱ्या अशा अर्शावर जळवानीं रक्त काढल्या वांचून दुसरा उपाय नाहीं.

सक्तुपिंडीबंधन.

नेनेवसुखमाप्नोतिमुच्यतेस्वेदपिंडिका ॥
घृततैलाक्तसक्तूनांपिंडिकांबंधयेद्गुदे ॥

अर्थ–सातूचे पोटीस करून त्याची पिंडी करून तिला तेल किंवा तूप लाऊन ती गुदावर बांधावी; ह्मणजे अर्शांतून घाम स्रवून जातो; आणि सुख होतें.

नासार्शचिकित्सा.

नासानाभिसमुत्थेतुतथामेढ्राक्षिकर्णयोः ॥
क्रियामर्शस्सुकुर्वीततत्रतत्रयथोदितां ॥

अर्थ–नाक, बेंबी, शिश्न नेत्र व कान यांमध्यें अर्श झाला असतां; त्या त्या जागीं उचितक्रिया असेल ती करावी

रजनीचूर्णयोग.

भावितंरजनीचूर्णंस्नुहिक्षीरेःपुनःपुनः ॥
बंधयेत्सुदृढंसूत्रंछिनत्यर्शोभगंदरं ॥

अर्थ–हळद व निवडुंगाचा चीक यांत वारंवार सूत भिजवून वाळवावें. त्याणें अर्शाचे मोड बांधावे; ह्मणजे ते तुटून पडतात. याप्रमाणे भगंदराला ही बांधावें. तें त्याचा ही नाश करितें.

चामखीळ.

चर्मकीलंतुसंस्विद्यदह्यःक्षारेणचाग्निना ॥

अर्थ–चामखीळ शेकून त्याला क्षारानें किंवा अग्नीनें भाजावा.

दुग्धिकादिघृत.

दुग्धिकाकंटकारीभ्यांकल्कंक्षीरैश्चतुर्गुणं ॥ कल्कतुल्यंघृतंयोज्यंघृत
शेषंविपाचयेत् ॥ भोजनेलेपनेपानेजयेच्छिद्रार्शसांकिल ॥

अर्थ–दुग्धी व रिंगणी यांचा कल्क व त्याच्या चौपट दूध; आणि कल्काइतकें तूप

घालून तूप शेष राही तों पर्यंत कढवून तें तूप काढून घ्यावें. तें भोजनामध्यें प्राशनास द्यावें; व अर्शाला लावावें; ह्मणजे त्यांचा नाश करितें.

व्योपादिमोदक.

गुडव्योपवरावेल्लतिलारुष्कारचित्रकैः ॥
अर्शांसिहंतिगुटिकात्वग्विकारंचशीलिता ॥

अर्थ–गुळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, हरडा, बेहडा, आवळकठी, मिरीं, तिळ, बिबवे व चित्रक यांचे चूर्णाची गुळाशीं गोळी करावी; आणि द्यावी. ती मुळव्याध, आणि त्वग्विकार यांचा नाश करित्ये.

गुडचतुष्क.

गुडेनशुंठीमथवोपकुल्यांपथ्यांतृतीयामथदाडिमंच ॥
आमेष्वजीर्णेषुगुदामयेषुवर्चोविबंधेषुचनित्यमद्यात् ॥

अर्थ–सुंठ, पिंपळी, हरीतकी, आणि डाळिंब, हे चार पदार्थ क्रमानें गुळाशीं नित्य द्यावें; ह्मणजे आम, अजीर्ण, मुळव्याध, आणि मलबद्धता यांचा नाश करितात.

कार्पासमज्जागुटी.

कार्पासमज्जालशुनंस्वर्जिकाक्षारहिंगुकं ॥
घृतेनकोलमात्राहिगुटिकार्शोविनाशिनी ॥

अर्थ–कापसाचे बीजांचा मगज, लसुण, साजेखार व हिंग हीं एकत्र खलून त्यांची बोराएवढी तुपाशीं गोळी करून द्यावी; ह्मणजे ती अर्शरोगाचा नाश करित्ये.

त्रिफलादिगुटिका.

त्रिफलापंचलवणंकुष्ठंकटुकरोहिणी ॥ देवदारुविडंगानिपिचुमंदफलानिच ॥ बलाचातिबलाचैवद्विहरिद्रासुवर्चला ॥ एतत्संभृतसंभारंकरंजत्वग्रसेनतु ॥ पिष्ट्वाचगुटिकांकृत्वाबादरास्थिसमांबुधः ॥ एकैकांतांसमुद्धृत्यरोगेरोगेपृथक्पृथक् ॥ अर्शांसिहंतितक्रेणगुल्मानम्लेननिर्हरेत् ॥ उष्णेनवारिणापीताशांतमग्निंप्रदीपयेत् ॥ जंतुजुष्टातुयोगेनत्वग्दोषखदिरांबुना ॥ मूत्रकृच्छ्रंतुतोयेनदद्रोगंतैलसंयुता ॥ इंद्रस्वरससंयुक्तासर्वज्वरविनाशिनी ॥ मातुलुंगरसेनाथसद्यःशूलहरीस्मृता ॥ कपित्थतिंदुकानांतुरसेनसहमिश्रिता ॥ विषाणिहंतिसर्वाणिपानाशनप्रयोगतः ॥ गोशकेंद्रसमायुक्ताहन्यात्कुष्ठानिसर्वशः ॥

शामाकषायसहिताजलोदरविनाशिनी ॥ भक्तच्छन्दंहिजयातिभुक्तस्योपरियोजिता ॥ अक्षरोगेपुसर्वेपुमधुनाघृष्यतांजयेत् ॥ लेपमात्रेण नारीणांसद्यःप्रदरनाशिनी ॥ व्यवहारेतथाद्यूतेसंग्रामेमृगयादिपु ॥ समालभ्यवरोप्येनांक्षिप्रंविजयमाप्नुयात् ॥

अर्थ—हरडा, वेहडा, आवळकाठी, पंचलवणे, कोष्ठ, कुटकी, देवदार, वावडिंग, निंबोळ्या, चिकणा, चिकणाभेद, हळद, दारुहळद व साजेखार हे सर्व पदार्थ एकत्र मिळवून करंजाचे सालीच्या रसांत घोटून बोराच्या आंठी एवढी गोळी करावी, ती एकेक गोळी अनुपानाशीं अनेकरोगावर द्यावी. ती अशी अर्शावर ताकाशीं, गुल्मावर निंवृच्या रसाशीं, मंदाग्नीवर ऊनपाण्याशी, ज्वरावर वावडिंगाच्या काढ्याशीं, लग्दोपावर खैराच्या काढ्याशीं, मूत्रकृच्छ्रावर पाण्याशीं, हृद्रोगावर तेलाशीं, संपूर्णज्वरावर कुड्याच्या स्वरसाशीं, शूलावर महाळुंगाच्या रसाशीं, संपूर्णविषावर कवट व टेंभुरणी यांच्या रसाशीं व सर्वकुष्ठावर इद्रगोपकृमीबरोबर, जलोदरावर पिंपळीच्या काढ्याशीं द्यावी; व भोजन जिरण्याकरितां भोजनोत्तर घ्यावी; व संपूर्ण नेत्ररोगांवर मधाशीं अंजन करावें; आणि स्त्रियांचे प्रदरावर लेप दिल्याने गुण करित्ये; व ह्या गुटिकेला स्पर्श करुन गेलें असतां, व्यवहार, द्यूत, युद्ध व शिकार यांचे ठायीं विजयी होतो.

गुग्गुलादिवटी.

गुग्गुलंलशुनंनिंववीजंरामठनागरैः ॥
गुटीशीतोदकेनोक्ताअर्शान्हंतिचतत्क्षणात् ॥

अर्थ—गुग्गुळ, लसूण, निंबोळ्या, हिंग, व सुंठ यांची गोळी शीतोदकाशीं द्यावी; ह्मणजे तत्काळ अर्शांचा नाश करित्ये.

चंद्रप्रभावटी.

मृतलोहंपलद्वंद्वंलोहांशंशुद्धगुग्गुलुः ॥ द्वयोस्तुल्यासितायोज्यात्रिभिस्तुल्यंशिलाजतु ॥ तवक्षीरपलैकंतुअन्याकर्षांशकाःशृणु ॥ विडंगंत्रिफलात्र्यूपंभूनिंबगजपिप्पली ॥ द्विनिशापिप्पलीमूलंदेवदारुसुवर्चलं ॥ सैंधवंधनिकाताप्यंकचोरोतिविषावृता ॥ ताप्यंसज्जीयवक्षारंवचामुस्तासपत्रकं ॥ दंतीएलासूक्ष्मचूर्णमधुनागुटिकाकृता ॥ कर्षमात्रासदाखादेन्नाम्नाचंद्रप्रभावटी ॥ सर्वार्शांसिनिहंत्याशुपांडुरोगंभगंदरं ॥ कृच्छ्रान्मेहान्क्षयंकासंनानारोगहरापरं ॥

अर्थ—लोहभस्म ८ तोळे, शुद्ध गुग्गुळ ८ तोळे, साकर १६ तोळे, शिलाजित ३२ तोळे, तबाकिर ४ तोळे, आणि वावडिंग, त्रिफला, त्र्यूषण, किराइत, गजपिंपळी, हळद, दारुहळद, पिंपळीमूळ, देवदार, सौवर्चल, सैंधव, धने, स्वर्णमाक्षिक, कचोरा, अतिविष, सोनें, सज्जिखार, यवक्षार, वेखंड, नागरमोथे, तमालपत्र, दांती व एलची हीं प्रत्येक एक तोळा. या सर्वांचें चूर्ण एकत्र करून मधाशीं गोळी, १० माशाची करावी. ही चंद्रप्रभावटी संपूर्ण प्रकारची मुळव्याध, पांडुरोग, भगंदर, मूत्रकृच्छ्र, प्रमेह, क्षय व खोकला अशा अनेक रोगाचा नाश करित्ये.

सूरणपुटपाक.

सौरणंकंदमादायपुटपाकेनपाचयेत् ॥
सतैलगुडसंयुक्तोरसश्चाशोविकारनुत् ॥

अर्थ—सुरणाचा कांदा पुटपाकेंकरून पक्व करावा; आणि शिरसाचें तेल, गूळ यांचे बरोबर खावा; ह्मणजे गुळव्याधीचा विकार दूर करील.

चित्रकादिदधि.

त्वचंचित्रकमूलस्यपिष्टाकुंभंप्रलेपयेत् ॥
तक्रंवादधिवातत्रजातमर्शोहरंपिबेत् ॥

अर्थ—चित्रकाचे मुळाची साल कुटून त्याचा लेप मडक्याला आंतून करावा; आणि त्यात दहीं किंवा तक्र ठेऊन मुळव्याध झाली असेल त्याणे प्यावें; ह्मणजे मुळव्याध जाईल.

कांचन्यादिविषयोग.

कांचनीविषपाषाणंयवक्षारंचहिंगुलं ॥ जलेपिष्टान्यसेद्गुह्येए
वंकुर्याद्दिनत्रयं ॥ क्षीरस्वेदंतथाकुर्यात्क्षीराहारीघृतौदनं ॥
अर्शरोगंनिहंत्याशुसिद्धयोगउदाहृतः ॥

अर्थ—हळद, सोमल, जवखार, हिंगूळ हे पाण्यांत वाटून गोळी करून गुदांत ठेवावी, आणि दुधाची वाफ गुदास द्यावी; दूध प्यावें, तूपभात खावा. याप्रमाणें तीन दिवस केलें असतां; गुळव्याधीचा नाश होतो, हा सिद्धयोग सांगितला आहे.

वृद्धादारुमोदक.

वृद्धादारुकभल्लातशुंठीचूर्णेनपोषितः ॥
मोदकःसगुडोहन्यात्षड्विधार्शःकृतारुजः ॥

अर्थ—वरधारा, भिलावा, सुंठ, हीं तीन औषधें समान घेऊन चूर्ण करून त्यांत त्याचे दुप्पट गुळ घालून गोळ्या करून घ्याव्या; तेणेंकरून साहा प्रकारची मूळव्याध दूर होते

सूरणवटक.

शुष्कसूरणचूर्णस्यभागान्द्वात्रिंशदाहरेत् ॥ भागान्षोडशचि
त्रस्यशुंठ्याभागचतुष्टयं ॥ द्वौभागौमरिचस्यापिसर्वाण्येक
त्रकारयेत् ॥ गुडेनपिंडिकांकुर्यादर्शसांनाशिनींपरां ॥

अर्थ–सुरण वाळवून चूर्ण करून ते बत्तीस भाग, चित्रक १६ भाग, सुंठ चार भाग, मिऱ्यें दोन भाग घ्यावीं. मग सारीं औषधें चूर्ण करून त्यांत गूळ साऱ्या औषधांचे दुप्प-ट घालून गोळ्या करून घ्याव्या, तेणेंकरून साहा प्रकारची मुळव्याध दूर होते.

वृहत्सूरणवटक.

सूरणोवृद्धदारुश्चभागैःषोडशभिःपृथक् ॥ मुसलीचित्रकौज्ञेयावष्टभा
गमितौपृथक् ॥ शिवाबिभीतकौधात्रीविडंगंनागरंकणा ॥ भल्लातः
पिप्पलीमूलंतालीसंचपृथक्पृथक् ॥ चतुर्भागप्रमाणानित्वगेलामरिचं
तथा ॥ द्विभागमात्राणिपृथक्ततस्त्वेकत्रचूर्णयेत् ॥ द्विगुणेनगुडेनाथ
वटकान्कारयेद्बुधः ॥ प्रबलाग्निकराऐतेतथाशौनाशनाःपराः ॥ ग्रहणीं
वातकफजांश्वासंकासंक्षयामयं ॥ प्लीहानंश्लीपदंशोफंहिक्कांमेहंभगंद
रं ॥ निहन्युःपलितंवृष्यास्तथामेध्यारसायनाः ॥

अर्थ–सुरण १६ भाग, वरधारा १६ भाग, मुसळी ८ भाग, चित्रक ८ भाग, हिर-डे, बेहेडे, आवळकाठी, वावडिंग, सुंठ, पिंपळी, भिलावां, पिंपळीमूळ, तालीसपत्र, हीं नऊ औषधें चार चार भाग व दालचिनी, विलायची, मिऱ्यें हीं तीन औषधें दोन दोन भाग घ्यावीं, मग सारीं औषधें कुटून चूर्ण करून त्याचे दुप्पट त्यांत गूळ घालून गोळ्या करून घ्याव्या. तेणेंकरून अग्नि प्रदीप्त होतो. मुळव्याध व वातकफापासून उ त्पन्न झाली जी संग्रहणी ती व श्वास, कास, क्षय, पोटांत डावेकडे कवळूरोग होतो तो, श्लीपदरोग, सूज, उचकी, परमा, भगंदर, जेणेंकरून पांढरे केश होतात तो, व पलित-रोग हे सारे रोग दूर होतात, व ह्या गोळ्या स्त्रीगमनाविषयीं इच्छा देतात, व बुद्धि देतात, व शरीराची जरा दूर करितात.

कोशातकीघर्षण.

कोशातकीरजोघर्षान्निपतंतिगुदोद्भवाः ॥

अर्थ–कडुदोडक्याचे चूर्ण मोडानां घासावें; ह्मणजे गुदांकुर गळून पडतात.

निशादिलेप.

निशाकोशातकीचूर्णंस्नुक्पयःसैंधवान्वितं ॥
गोमूत्रेणसमायुक्तोलेपोदुर्नामनाशनः ॥

अर्थ–हळद व कडुदोडकी यांचे चूर्ण, निवडुंगाचा चीक व सैंधव हीं एकत्र वाटून त्यांचा गोमूत्राशीं लेप करावा; ह्मणजे मुळव्याधीचा नाश होतो.

दुसरा निशादि व अर्कमूलादिलेप.

निशाकोशातकीलेपोसर्वदुर्नामनाशनः ॥
अर्कपत्रंशिग्रुमूलंलेपनंहितमर्शसां ॥

अर्थ–हळद व कडुदोडकी, यांचा किंवा रुईची पानें व शेवग्याच्या मुळ्या यांचा लेप करावा. तो अर्शव्याधीवर हितकारक आहे.

निंबादिलेप.

निंबाश्वत्थस्यपत्राणांलेपोदुर्नामनाशनः ॥
आरनालेनवाहन्यात्सगुडाकटुतुंबिका ॥

अर्थ–कडुनिंबाचा पाला व पिंपळाचा पाला एकत्र वाटून लेप करावा, अथवा कडव्या पांढऱ्या भोंपळ्याचीं पानें व गुळ कांजीत वाटून त्याणे लेप करावा; ह्मणजे मुळव्याधीचा नाश करितो.

एरंडमूलादिस्वेद व पेंड.

एरंडमूलंसुरदारुरास्नायष्टीमधूकंमसृणंविचूर्ण्य ॥ पिष्टंयवानांचचतुर्गुणंस्यात्साध्यंहिवन्हौपयसासमस्तं ॥ स्वेदोपनाहौबहुतेनकुर्यादर्शांसिशूलानिलयंप्रयांति ॥

अर्थ–एरंडाचें मूळ, देवदार, रास्ना, ज्येष्टीमध व लोणीं एकत्र वाटून त्यांत चौपट यवांचें पीठ घालून दुधांत मळावें; आणि अग्नीवर भाकरीसारिखें भाजून त्याणें मोड शेकावे; किंवा वर बांधावी; ह्मणजे शूलासहवर्तमान अर्श नाश पावतात.

स्नुह्यादिलेप.

स्नुह्यग्निलांगलीदंतीमूलैर्लेपोर्शसांहितः ॥

अर्थ–निवडुंगाचा चीक, चित्रक, कळलावी, अथवा कुइली, दांतीमूळ, यांचा लेप मुळव्याधीवर हितकारक आहे.

कृष्णाशिरीपलेप.

कृष्णाशिरीपबीजार्कक्षीरैःसामरसैंधवैः ॥ हरिद्राऋक्षविड्गुंजागोमूत्रैःपिप्पलीयुतैः ॥ एतल्लेपत्रयंयोज्यंशीघ्रमर्शोविनाशनं ॥

अर्थ–जटामांसी, शिरीस, रुईचा चीक, सामराचें शिंग, सैंधव, हळद, आस्वलीची विष्ठा, गुंज, गोमूत्र, पिंपळी, हीं सर्व एकेजागी वाटून तीन वेळा लेप करावा; ह्मणजे मुळव्याधीचा लौकर नाश होईल.

अर्कादिलेप.

आर्कंपयःसुधाकांडंकटुकालाबुपल्लवाः ॥
करंजोवस्तमूत्रेणलेपनंश्रेष्ठमर्शसां ॥

अर्थ–रुईचा चिक, निवडुंगाचें कांडें, कुटकी, कडुभोपळ्याचे पल्लव, करंजाचें बी, बोकडाचें मूत यांचा लेप मुळव्याधीवर श्रेष्ठ आहे.

गुंजासूरणलेप.

गुंजासुरणकूष्मांडबीजैर्वर्तिस्तथागुणा ॥

अर्थ–गुंज, सुरण, कोहळ्याचें बी हीं पाण्यांत वाटून वस्त्राचे वातीनें लेप करावा, वात गुदांत ठेवावी; ह्मणजे मुळव्याधीचा नाश करील.

गौरीपापाणलेप.

गौरीपापाणकर्षैकंस्नुहिकांडेविनिःक्षिपेत् ॥ पाचयेत्पुटपाकेनततउत्धृत्ययत्नतः ॥ रेवाचिनीचकुष्ठंचकल्कीकृत्यत्रयंसमं लेपयेत्तेनअर्शांसिनिवार्यंतेनसंशयः ॥

अर्थ–सोमल, निवडुंगाचे कांड्यांमध्ये भरावा; आणि पुटपाकानें पक्व करावा; नंतर रेवाचिनी, कोष्टकोळिंजन तिन्ही समभाग घेऊन वाटून मुळव्याधीस लेप करावा; ह्मणजे मुळव्याध जाईल.

न्यग्रोधपत्रलेप.

दग्ध्वान्यग्रोधपत्राणितैलेनसहलेपयेत् ॥

अर्थ–वडाचीं पानें जाळून त्याची राख तेलांत खळून मुळव्याधीस लेप करावा; ह्मणजे मुळव्याध जाईल.

कटुतुंब्यादिलेप.

कटुतुंब्यास्तथादंत्याःशकृच्चकुक्कुटस्यच ॥ मुसल्याश्चाश्वगंधायाश्च

त्रकस्यचयत्नतः ॥ मूलैस्तुल्यैःकृतंचूर्णमर्कक्षीरेणभावयेत् ॥ स्नुहि क्षीरेणमतिमान्वारिणापरिपेषयेत् ॥ वस्त्रवर्त्यागुदंतेनसमालिप्यस मंततः ॥ गुदेवीनःक्षिपेद्यत्नात्प्रातःसायंचबुद्धिमान् ॥ वेदनाचभवेत्ती व्रावन्हिनास्वेदयेद्गुदं ॥ नोपशाम्येद्यदातेनतदाचैवोष्णवारिणा ॥ विनिवेश्यगुदंतिष्ठेद्वेदनाशमकारणात् ॥ अथाद्वृष्यमथान्नंचशिशिरं जलमापिबेत् ॥ गुदजानांविनाशार्थंसप्ताहंतुसमाहितः ॥ विधिमेनं प्रकुर्वीतगतशंकस्तुमानवः ॥

अर्थ—कडुभोपळयाचे पल्लव, दांतीमूळ, कोंबड्याची विष्ठा, सफेदमुसळी, आस्कंद, चित्रक, हीं समभाग घेऊन चूर्ण करून रुईचे चिकाची आणि निवडुंगाचे चिकाची भावना द्यावी; नंतर पाण्यांत वाटून वस्त्राचे वातीनें गुदास लेप करावा; आणि ती वात गुदामध्यें प्रातःकाळीं व सायंकाळीं घालावी.। वेदना फार होईल. यासाठीं गुदास शेक द्यावा, शेक घेऊन शांत न झाली तर ऊन पाण्यांत बसावें; आणि वृष्यान्नाचें भक्षण करावें; ह्मणजे मधुर, स्निग्ध, मनास हर्ष देणारें, पुष्टिप्रद असें अन्न खावें, थंड पाणी प्यावें. या प्रमाणें सात दिवस करावें; ह्मणजे मुळव्याधीचा नाश होईल.

देवदालीबीजलेप.

सिंधूत्थदेवदाल्याश्चबीजंकांजिकपेषितं ॥
गुदांकुरप्रलेपेनपातयेत्पर्वतानपि ॥

अर्थ—सैंधव व देवडांगरीचें बी हे कांजींत वाटून मुळव्याधीच्या तोंडास लेप करावा; ह्मणजे तें गळून पडतात; ह्या लेपानें पर्वतही पडतील.

चव्यादि घृत.

चव्यंत्रिकटुकंपाठाक्षाराःकुस्तुंबरूणिच ॥ यवानीपिप्पलीमूलमुभेच विडसैंधवे ॥ चित्रकंबिल्वमभयापिष्ट्वासर्पिर्विपाचयेत् ॥ सकृद्वाता नुलोमार्थंजातेदधिचतुर्गुणं ॥ प्रवाहिकागुदभ्रंशंमूत्रकृच्छ्रंपरिश्रवं ॥ गुदवंक्षणशूलंचघृतमेतद्व्यपोहति ॥

अर्थ—चवक, सुंठ, मिरीं, पिंपळी, पाहाडमूळ, सर्व क्षार, धने, ओंवा, पिंपळीमूळ, बिडलोण, सैंधव, चित्रक, बेलफळ व हरीतकी हे सर्व एकत्र वाटून त्यांच्या कल्कानें तूप सिद्ध करावें. तें वायूला अनुलोमन करणारें आहे; आणि चौपट दहीं घालून सिद्ध करावें, तें प्रवाहिका, गुदभ्रंश, मूत्रकृच्छ्र, गुदस्राव व गुद आणि आडसंधी, यांतील शूल यांचा नाश करितें.

शुंठीघृत.

त्रिंशत्पलानिशुंठीनांजलद्रोणेविपाचयेत् ॥ तेनपादावशेषेणकल्केनान्यंपचेद्घृतं ॥ दुर्नामश्वासकासघ्नंप्लीहपांड्वामयापहं ॥ विषमज्वरशांत्यर्थंतृष्णारोचकनाशनं ॥ शुंठीघृतमितिख्यातंकृष्णात्रेयेणपूजितं ॥ नागरेणजलेपक्वंबस्तिकुक्षिगदापहं ॥

अर्थ—१२० तोळे सुंठीचा २०४८ तोळे पाण्यांत काढा करून तो चतुर्थांश उतरून घ्यावा. त्यांत त्या औषधांच्या कल्कानें तें घृत पचन करावें. तें मुळव्याध, श्वास, खोकला, प्लीहा, पांडुरोग, विषमज्वर, ताहान व अरुचि यांचा नाश करितें. हें कृष्णात्रेयानें स्तुत्य असें शुंठीघृत आहे. हेंच आल्याच्या रसांत केलें असतां, बस्ति व कुक्षी यांच्या रोगांला शमवितें.

लघुचव्यादिघृत.

चव्यतिक्ताकलिंगानिशताव्हालवणानिच ॥
सर्पिरर्शोविकारघ्नंग्रहणीदीपनंपरं ॥

अर्थ—चवक, कुटकी, इंद्रजव, शतावरी व पंचलवणें या पदार्थांनीं सिद्ध केलेलें घृत मुळव्याध आणि संग्रहणी यांचा नाश व दीपन करण्याविषयीं उत्तम आहे.

ऱ्हीबेरघृत.

ऱ्हीबेरमुत्पलंलोध्रंसमंगाचव्यचंदनं ॥ यासाचातिविषाबिल्वंधातुकीदेवदारुच ॥ दार्वीत्वङ्नागरंमांसीमुस्ताक्षारोयवाग्रजः ॥ चित्रकश्चेतिपेष्याणिचांगेरीस्वरसेघृतं ॥ एकत्रसाधयेत्सर्वंतत्सर्पिःपरमौषधं ॥ अर्शोतिसारग्रहणीपांडुरोगेज्वरेरुचौ ॥ मूत्रकृछ्रेगुदभ्रंशेवस्त्यानाहप्रवाहिके ॥ पिच्छास्रावेर्शसांमूलेयोज्यमेतत्त्रिदोषत्दृत् ॥

अर्थ—वाळा, कोष्ठ, लोध्र, मंजिष्ठ, चवक, चंदन, धमासा, अतिविष, बेलफळ, धायटीचीं फुलें, देवदार, दारुहळद, दालचिनी, सुंठ, जटामांसी, नागरमोथा, यवखार व चित्रकमूळ, हे पदार्थ चुकाच्या रसांत वाटून त्या कल्का इतकें त्यांत तूप घालून सिद्ध करावें. तें चांगेरीघृत उत्तम औषध आहे. हें मुळव्याध, अतिसार, संग्रहणी, पांडुरोग, ज्वर, अरुचि, मूत्रकृछ्र, गुदभ्रंश, बस्ति, आनाह, प्रवाहिका, रक्तस्राव, मुळव्याधीचे मोड, आणि त्रिदोष यांवर प्रशस्त व त्रिदोषनाशकरणारें आहे.

रोहितारिष्ट.

रोहीतकतुलामेकांचतुर्द्रोणेजलेपचेत् ॥ पादशेषेरसेशीतेपूतेपलश

तद्वयं ॥ दद्यात्गुडस्यधातक्याःपलषोडशिकामताः ॥ पंचकोलंत्रि जातंचत्रिफलांचविनिःक्षिपेत् ॥ चूर्णयित्वापलांशेनततोभांडेनिधाप येत् ॥ मासादूर्ध्वंचपिवतांगुदजायांतिसंक्षयं ॥ ग्रहणीपांडुहृद्रोगप्लीहगुल्मोदराणिच ॥ कुष्ठशोफारुचिहरोरोहितारिष्टसंज्ञकः ॥

अर्थ—रक्तरोडा एक तुळा आणून थोडा थोडा कुटून त्यांत चार द्रोण पाणी घालोन चवथाई पाणी राही तोंपर्यंत काढा करून गाळून थंड जाहाल्यावर त्यांत गूळ दोनशें पळें व धायटीचीं फुलें सोळा पळें घालोन पंचकोल औषधें, त्रिजात औषधें व त्रिफळा हीं अकरा औषधें एक एक पळ प्रमाण घेऊन सार्‍यांचें चूर्ण करून त्या काढ्यांत मेळवून सारीं मडक्यांत घालोन त्याचे तोंडाला मुद्रा देऊन एक महिनापर्यंत ठेऊन नंतर मुद्रा काढावी. याला रोहितारिष्ट ह्मणतात. हा अरिष्ट पोटांत घ्यावा. येणेकरून मूळव्याध, संग्रहणी, पांडुरोग, हृद्रोग, पोटांत डावेकडे कवळरोग होतो तो, गुल्म, उदर, कुष्ठ, सूज, आंवढणें. हे रोग दूर होतात.

मधुपक्कहरीतकी.

कदंबनिंबचिंचानांत्वक्चूर्णंपलषोडशं ॥ अजागोमहिषीमूत्रंत्वक्षोडशगुणोत्तरं ॥ क्वाथयेत्पादशेषंतुशुद्धंकृत्वाविनिःक्षिपेत् ॥ अभयानां शतैकंतुक्वाथयेच्चकषायकं ॥ जीर्यतेह्यभयापश्चाद्भित्वाअंडंनिवारयेत् ॥ भृंगीसुवर्चलंचूर्णंतुल्यंतेनप्रपूरयेत् ॥ अभयांवेष्टयेत्सूत्रैर्मधुमध्येत्र्यहं क्षिपेत् ॥ नित्यंक्षौद्रसमंभक्ष्यात्रिदोषार्शप्रशांतये ॥

अर्थ—कळंब, कडुनिंब, चिंच यांच्या सालिचें चूर्ण ६४ तोळे, व शेळी, गाई, व हैस यांचें मूत. १००४ तोळे, यांचा चतुर्थांश काढा गाळून घ्यावा. यांत शंभर हरीतकी घालोन त्याचा काढा करावा; ह्मणजे हरीतकी मऊ होतात. त्या फोडून त्याची आंठी काढून टाकावी; आणि ह्या हरीतकीत भांग व साजेखार भरून सुतानें बांधाव्या; आणि तीन दिवस मधामध्यें टाकून ठेवाव्या; नंतर त्यांतून मधासहवर्तमान खात जाव्या; ह्मणजे त्रिदोषजनित अर्शांची शांति होते.

गोजिव्हादिकाढा.

गोजिव्हामूलमेकंद्विगुणबर्हिशिखामूलकस्तुंबराणामष्टांशेक्वाथतोयेमधुसिकतरजोमिश्रमंतेपिवेत्तत् ॥ तस्यार्शःपड्विधोपिहरतिगुदरुजःस्रावमामानुबंधंकीलंकंडुग्रहण्यांगुल्मभृतिभिषजामंडलात्पथ्यसेवी ॥

अर्थ—१भाग पाथरीचें मूळ, २ भाग मयूरशिखामूळ, व धने यांच्या अष्टमांश

काढयांत मद्य व साकर घालोन द्यावा; ह्मणजे साहा प्रकाचे अर्श, गुदरोग, गुदस्राव, आमांश, अर्शाचे मोड, कंडू, संग्रहणी व शूल यांचा नाश करितो. हा एक मंडल घेऊन पथ्य करावें.

कल्याणलवण.

भल्लातकानित्रिफलादंतीचित्रकमेवच ॥ समभागानिसर्वाणि सैंधवंद्विगुणंभवेत् ॥ कपालपुटसंपक्कंमृदुनागोमयाग्निना ॥ कल्याणनामलवणंश्रेष्ठमर्शोविकारिणां ॥

अर्थ—बिबवे, हरडा, बेहडा, आवळकाठी, दांतीमूळ, व चित्रकमूळ हीं सर्व समभाग आणि सैंधव दुप्पट हे सर्व एकत्र करून शरावांत घालोन मातकापड करून गोंवऱ्यांचा मंदाग्नि द्यावा. शीतझाल्यावर काढून द्यावें. हें कल्याणनामक लवण अर्शांवर श्रेष्ठ आहे.

तक्रादि योग.

सतक्रंलवणंदद्याद्वातवर्चोनुलोमनं ॥ नप्ररोहंतिगुदजाःपुनस्तक्रसमाहताः ॥ तक्राभ्यासोर्शसैःकार्योबलवर्णाग्निवृद्धये ॥ स्रोतस्सुतक्रशुद्धेषुसम्यक्फलतितद्रसः ॥ तनुपुष्टिस्तथातुष्टिर्बलंवर्णश्चजायते ॥ वातश्लेष्मविकाराणांशतंचविनिवर्तयेत् ॥

अर्थ—मिठांत ताक घालोन द्यावें. तें वायु व मळ यांला अनुलोमन करितें, व तक्राच्या योगानें नाश पावलेले गुदांकुर पुनः उत्पन्न होत नाहींत. बल, वर्ण, आणि अग्नि यांची वृद्धी व्हावी, ह्मणून अर्श रोग्याने ताकाचा अभ्यास ठेवावा, तक्राने नाडीमार्ग शुद्ध झाले; ह्मणजे शरीर पालनीयरस उत्तम प्रकारानें गमन करितो. तेणेंकरून शरीराला पुष्टि, संतोष, बल, आणि कांति हीं उत्पन्न होतात; आणि शेकडों वातकफविकारांचा नाश करील.

दुसरा प्रकार.

विट्विबंधेहितंतक्रंयवानीविश्वसंयुतं ॥ नप्ररोहंतिगुदजाःप्रायस्तक्रसमन्विताः ॥ यज्जातंगोरसक्षीराद्वन्हिमूलावचूर्णितान् ॥ पिबंस्तदेवतेनैवतक्रंभुज्यांकुराअपि ॥ त्रिवेदहरहस्तक्रंनिरन्नोवासकामतः ॥ सप्ताहंवादशाहंवामासार्धमासमेवच ॥ बलकालविकारज्ञोभिषक्तंचप्रयोजयेत् ॥ हरीतकींतक्रयुतांत्रिफलांवाप्रयोजयेत् ॥ चित्रकंहपुषाहिंगुदद्याद्वातक्रसंयुतं ॥ पंचकोलकयुक्तंवातक्रेणैवप्रदाप

येत् ॥ त्वचंचित्रकमूलस्यपिष्टाकुंभंप्रलेपयेत् ॥ तक्रंवादधिवातत्र जातमर्शोहरंपिबेत् ॥ तक्रेणार्शांसिनिघ्नंतिमुसलीकटुकान्विता ॥

अर्थ—विद्बंधावर आंवा व सुंठ घालून ताक प्यावें; ह्मणजे तक्रानें नाश पावलेले गुदांकुर पुनः येत नाहींत. जें गाईंच्या दुधापासून झालें ताक व त्यांत चित्रक मुळाचें चूर्ण घातलें, ह्मणजे केवळ त्या ताकानेंच अंकुर नाश पावतात. या करितां अन्नावांचून दररोज वारंवार ताक प्यावें. तें असें सात, दाहा, किंवा पंधरा दिवस अथवा महिनाभर बल व काल. विकार जाणण्याविषयीं कुशल वैद्यानें ताक योजावें; आणि ताकांतून हरीतकी किंवा त्रिफला द्यावी. किंवा चित्रक, हपुषा व हिंग, हे ताकांत घालून द्यावें. किंवा पंच कोलांचें चूर्ण ताकांतून द्यावें; अथवा चित्रक मूळाचा कल्कानें कुंभाला आंतून लेप करून त्यांत दूध विरजावें. तें दहीं किंवा ताक अर्शनाशक आहे. किंवा मुसळी व धुटकी यांचें चूर्ण घालून ताक द्यावें; ह्मणजे अर्श नाश पावतात.

अरलुत्वक्.

अरलुत्वक्वन्हिसुरेंद्रयवान्चिरबिल्वसुसैंधवशुंठियुतान् ॥
मथितेनपिबेद्यदिसप्तदिनमर्शांसिपतंतिसमूलानिबलात् ॥

अर्थ—टेंटूची साल, चित्रकमूळ, इंद्रजव, करंज, सैंधव, आणि सुंठ यांचें चूर्ण मठ्ठयांत घालून सात दिवस प्यावें; ह्मणजे मुळापासून अर्श गळून जातात.

शर्करासव.

दुरालभायाःप्रस्थस्यचित्रकस्यवृषस्यच ॥ पथ्यामलकयोश्चैवपाठायानागरस्यच ॥ दद्याद्द्विपलिकान्भागान्जलद्रोणेविपाचयेत्॥ पाद शेषेरसेपूतंसुशीतंशर्कराशतं ॥ दत्वाकुंभेदृढेस्थाप्यंमासार्धंघृतभाजनं प्रलिप्यपिप्पलीचव्यप्रियंगुमधुसर्पिषा ॥ तस्यमात्रांपिबेत्कालेशार्कर स्ययथाबलं ॥ अर्शांसिग्रहणीरोगमुदावर्तमरोचकं ॥ शकृन्मूत्रानि लोद्गारविबंधानलमार्दवं ॥ हृद्रोगंपांडुरोगंचसर्वरोगान्प्रणाशयेत् ॥

अर्थ—१ शेर धमासा व चित्रकमूळ, अडुळसा, हरीतकी, आवळकाठी, पाहाडमूळ, सुंठ, हीं प्रत्येकीं ८ तोळे. हीं सर्व २०४ तोळे पाण्यांत वाटून चतुर्थांश काढा करून घ्यावा. तो थंड झाल्यावर त्यांत ४०० तोळे साकर घालावी; आणि मोठ्या तुपानें रा पलेल्या भांड्यांत भरून पंधरा दिवस तसाच बंद करून ठेवावा, व त्या भांड्यास आंतून पिंपळी, चवक, कांग, मध व तूप हीं लावावीं; या आसवांतून प्रातः काळीं बल पाहून द्यावा; ह्मणजे मुळव्याध, संग्रहणी, उदावर्त व अरुचि यांचा नाश करितो. व मळ, मूत्र वायु, ढेंकर, अग्निमांद्य, हृद्रोग, पांडुरोग, व सर्वरोग यांचा नाश करितो.

द्राक्षासव.

द्राक्षापलशतंदत्वाचतुर्द्रोणांभसापचेत् ॥ द्रोणशेषेरसेतस्मिन्पूतशेषं प्रदापयेत् ॥ शर्करायास्तुलांदत्वातुल्यंमधुनस्तथा ॥ पलानिसप्तधातक्याःस्थापयेदाज्यभाजने ॥ जातीलवंगकंकोलंलवलीफलचंदनैः कृष्णान्त्रिगदितंयुक्त्याभागैरर्धपलांशकैः ॥ त्रिःसप्ताहात्भवेत्येवं तत्रमात्रांयथावलं ॥ नाम्नाद्राक्षासवोह्येषनाशयेद्गुदकीलकान् ॥ शोषारोचकहृद्रोगपांडुरक्तपित्तभगंदरान् ॥ गुल्मोदरकृमिग्रंथिक्षतशोषज्वरांतकृत् ॥ वातपित्तप्रशमनंशस्तंचवलवर्णकृत् ॥

अर्थ—द्राक्षे ४०० घेऊन ८१७२ तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करून गाळून घ्यावा. त्यांत साकर ४०० तोळे व मध ४०० तोळे व धायटीचे फूल ९८ तोळे घालून तुपानें रावलेल्या भांडयांत भरून त्यांत जायफळ, लवंग, कंकोल, हरपररेवडीची फळें व चंदन ही प्रत्येक दोन तोळे घालून एकवीस दिवस तसाच बंद करून ठेवावा; आण त्यांतून वल पाहून द्यावा. हा द्राक्षासव गुदांकुराचा नाश करितो. व शोष, अरुचि, हृद्रोग, पांडुरोग, रक्तपित्त, भगंदर, गुल्म, उदर, कृमि, ग्रंथि, क्षतक्षय, ज्वर व वातपित्त यांचाही नाश करितो, व बल आणि कांति यानां करितो.

सन्निपातार्शधूप.

गोधूमपिष्टंपलमेकंहिंगुशाणार्धभल्लातकवेदयुक्तः ॥
स्यात्धूपदानेगुदशूलनाशःस्यात्संन्निपातगुदतोद्भवानां ॥

अर्थ— कणीक तोळे ४ हिंग २ मासे व बिबवे ४ हीं एकत्र कुटुन गुदाला धुरी द्यावी; ह्मणजे गुदशूल व सान्निपातोद्भव अर्श नाश पावतात.

हपुषादितक्रारिष्ट.

हपुषांकुचिकाधान्यमजाजीकारवीसठी ॥ पिप्पलीपिप्पलीमूलंचित्रकोगजपिप्पली ॥ यवानीचाजमोदाचतच्चूर्णंतक्रसंयुतं ॥ मंदाम्लं कटुकंविद्वान्स्थापयेद्घृतभाजने ॥ व्यक्ताम्लंकटुकंजातंतक्रारिष्टं कटुप्रियं ॥ प्रपिवेन्मात्रयाकालेप्रातर्भोज्येतथातृषि ॥ दीपनंरोचनं वर्ण्यंकफवातानुलोमनं ॥ गुदश्ववथुकंड्वर्तिनाशनंवलवर्धनं ॥

अर्थ—थोर शेरणी, मेथी, धनें, जिरें, बडीशेप, कचोरा, पिंपळी, पिंपळीमूळ, चित्रक, गजपिंपळी, ओवा व अजमोदा, यांचे चूर्ण थोडे आंबट ताकाशी कालऊन तुपा-

च्या भांड्यांत ठेवावे. तें चांगले आंबट व तिखट झालें; ह्मणजे त्याला तक्रारिष्ट ह्मणतात. हा तिखट भक्षण करणाराला प्रिय आहे; हा थोडा प्रातःकाळी व भोजनकाळीं; आणि ताहान लागेल त्या वेळेस घ्यावा. हा दीपन, रुचिकारक, वर्ण चांगला करणारा व वायूला अनुलोमन करणारा आहे. हा गुदरोग, सूज व कंडू यांचा नाश करितो; व बळाला वाढवितो.

भर्जितहरीतकीयोग.

घृतसंभर्जितापथ्यापिप्पलीगुडसंयुता ॥
भक्षयेद्वात्रिवृद्धंतिभक्षिताचानुलोमनी ॥

अर्थ—हरीतकी तुपांत भाजून त्यांत पिंपळीचें चूर्ण व गुळ घालून खावी; किंवा निशोत्तर घालून खावी; ह्मणजे मलाचें अनुलोमन करिते.

पाहाडमूळयोग.

दुःस्पर्शकेनविल्वेनयवान्यानागरेणवा ॥
एकैकेनापिसंयुक्तापाठाहंत्यर्शसोरुजं ॥

अर्थ—धमासा, बेलफळ, ओंवा व सुंठ यांतून एकाशीं पाहाडमूळ मिळवून खावें; ह्मणजे अर्श विकारांचा नाश करितें.

सन्निपातिक आणि सहजअर्श.

सर्वैःसर्वात्मकान्याहुर्लक्षणैःसहजानिच ॥

अर्थ—सर्वदोषांचीं लक्षणें जा अर्शांचे ठायीं असतात, ते सन्निपातिक अर्श जाणावें, आणि उत्पत्तिकालाचीं लक्षणें जा अर्शाचे ठायीं असतात; ते सहज अर्श जाणावे.

द्वंद्वज, सन्निपातक व सहजअर्श.

हेतुलक्षणसंसर्गाद्विद्याद्वंद्वोल्वणानिच ॥
सर्वोहेतुस्त्रिदोषाणांसहजैर्लक्षणैःसमं ॥

अर्थ—वातादिकांचे हेतु आणि लक्षणें हीं दोघांची येकच जाहालीं असतां; द्वंद्वज अर्श जाणावे. आणि सर्वांचे हेत्वादिक एकत्र झालें असतां; सन्निपात अर्श जाणावे. व उत्पत्तिकालाबरोबर जीं लक्षणें असतात; तींहिंकरून सहज अर्श जाणावें.

अजीर्णहरमहोदधिवटी.

दंतीबीजमकल्मषंसदहनंशुंठीलवंगंसमंगंधंपारदटंकणंचमरिचंश्री
वृद्धदारूविषं ॥ खल्वेयामयुगंविमर्द्यविधिनादंतिद्रवैर्भावनादेयार्पं
चदशानुनिंबुकजलैस्त्रेधात्रिधाचित्रकैः ॥ त्रेयाचार्द्रकजैरसैःशुभधिया

सप्तैवचार्वेदितापश्चाच्छुष्ककलायसंमितवटीकार्याभिषक्सम्मता ॥ क्षुद्बोधंप्रकरोतिशूलशमनीजीर्णज्वरध्वंसिनीकासारोचकपांडुतोदरग दःसामामरुङ्नाशिनी ॥ वस्त्याटोपहलीमकामयहरीमंदाग्निसंदीप नीसिद्धेयंतुमहोदधिप्रकटितासर्वामयघ्नीसदा ॥

अर्थ–शुद्ध केलेलें जेपाळाचें बीज, चित्रक, सुंठ, लवंग, गंधक, पारा, टांकणखार, मिरीं, वृद्धदारु, बचनाग, हीं समभाग घेऊन खलांत दोन प्रहर विधिपूर्वक खल करून त्याला दांतीच्या रसाच्या पंधरा व लिंबाच्या रसाच्या तीन, चित्रकाच्या तीन, आल्याच्या रसाच्या सात, भावना देऊन सुक्या वाटाण्या एवढ्या गोळ्या कराव्या. त्यांतून एक द्यावी; ह्मणजे क्षुद्बोधाला करितें, व शूळ अजीर्ण, ज्वर, खोकला, अरुचि पांडुरोग, उदर, आमरोग, पोटांतील गुडगुडशब्द, हलीमक, मंदाग्नि, व सर्व रोग यांचा नाश करितें.

क्षुधासागरवटी.

त्रिकटुत्रिफलाचैवतथालवणपंचकं ॥ क्षारत्रयंरसोगंधोद्विभागंपूर्ववद्विषं ॥ आर्द्रकस्यरसेनैवगुंजाभावटकीकृता ॥ अजीर्णेद्विवटींखादे ल्लवंगैःपंचसप्तभिः ॥ क्षुधासागरनाम्न्येयंवटीसूर्येणनिर्मिता ॥

अर्थ–सुंठ, मिरीं, पिंपळी, हरडा, बेहेडा, आंवळकाठी, पंचलवणें, जवखार, साजेखार टांकणखार, पारा, गंधक, हीं समभाग व बचनाग, २ भाग हे सर्व एकत्र करून गुंजेएवढी गोळी करावी, ती अजीर्णावर पांच किंवा सात लवंगाशीं दोन गोळ्या घ्याव्या. हीक्षुधासागर नामकवटी सूर्यानें उत्पन्न केली.

अग्नितुंडवटी.

शुद्धसूतंविषंगंधमजमोदंफलत्रयं ॥ सर्जिक्षारंयवक्षारंवन्हिसैंधवजीरकं ॥ सौवर्चलंविडंगानिसामुद्रंत्र्यूषणंसमं ॥ विषमुष्टिःसर्वतुल्यंजंबीराम्लेनमर्दयेत् ॥ मरिचाभांवटींखादेदग्निमांद्यप्रशांतये ॥ पथ्यशुंठी गुडंचानुपलार्धंभक्षयेत्सदा ॥ अग्नितुंडावटीख्यातासर्वरोगकुलांतका ॥

अर्थ–शुद्ध पारा, बचनाग, गंधक, ओंवा, हरडा, बेहेडा, आंवळकाठी, साजेखार, यवखार, चित्रक, सैंधव, जिरें, पादेलोण, वावडिंग, मीठ, सुंठ, मिरीं व पिंपळी हीं समभाग व कुचल्याच्या बिया सर्व चूर्णाच्या समान, एकत्र करून जंबीराच्या रसांत खलून मिऱ्या एवढी गोळीकरून ती भक्षण करून वर हरीतकी, सुंठ, आणि गूळ मिळून दोन तोळे भक्षण करावें. ही अग्नितुंडवटी संपूर्ण रोगकुलाचा अंतक आहे.

क्षुद्बोधकरस.

व्योपसिंधूत्थबलिभिरेकद्वित्रिलवैस्मृतः ॥
निंबांबुमर्दितोगाढंनाम्नाक्षुद्बोधकोरसः ॥

अर्थ–सुंठ, मिरीं व पिंपळी हीं तीन मिळून एक भाग, सैंधव दोन भाग, गंधक तीन भाग याप्रमाणें औषधें घेऊन त्यांचा निंबूच्या रसांत खल करावा. याला क्षुद्बोधकरस ह्मणतात.

दुसराप्रकार.

टंकणकणामृतानांसहिंगुलानांसमोभागः ॥ मरिचस्यभागयुगुलंनिंबूनीरैर्वटीकार्या ॥ वटींकलायसदृशींमेकामेवसमश्नियात् ॥ सत्वरमजीर्णशांत्यैवन्हेर्वृध्यैकफध्वस्त्यै ॥

अर्थ–टांकणखार, पिंपळी, वचनाग व हिंगुळ हे समभाग व मिरीं २ भाग, यांचें चूर्ण एकत्र करून लिंबूच्या रसांत वाटाण्याएवढी गोळी करावी, त्यांतून अजीर्ण नाश करितां व अग्निच्या वृद्धीकरितां एक गोळी घ्यावी.

भस्मवटी.

रजीकृतंपंचपलंतुपाम्लेस्विन्नंशिवायुग्विषतिंदुबीजं ॥ हिंगुकृमिघ्नं त्रिपटुत्रिदीप्यंपलंपृथक्त्र्यूपणगंधयुक्तं ॥ चूर्णीकृतंनिंबुरसेनभाव्यंकोलास्थिमात्रावटिकाविधेया ॥ संसेविताहंतिनृणामजीर्णंत्द्रोगगुल्मं कृमिजांश्चरोगान् ॥ प्लीहाग्निमांद्यार्तितथामवातंशूलातिसारंग्रहणीरुजंच ॥ जलोदरार्शःकृमिजांश्चरोगान्हन्याद्बहून्वातकफोद्भवांश्च ॥

अर्थ–हरीतकी व कुचल्याच्या बिया, बारीक करून कोंडयाच्या आम्लामध्यें पचन करून नंतर हिंग, वावडिंग, सैंधव, बिडलोण, संचळ, ओंवा, अजमोद, खुरासनी ओंवा, सुंठ, मिरीं, पिंपळी, हीं प्रत्येकीं, चार चार तोळे घेऊन त्यांचें चूर्ण करून त्यांत मिळवून लिंबुरसाची भावना द्यावी; आणि बोराच्या आंठी एवढी गोळी करून द्यावी. ती अजीर्ण, त्द्रोग, गुल्म, कृमी, प्लीहा, अग्निमांद्य, आमवात, शूल, अतिसार, संग्रहणी, जलोदर, अर्श व कृमीपासून झालेल्या व वायु आणि कफ यांपासून झालेल्या बहुत व्याधीचा नाश करित्ये.

शंखवटी.

पलंचिंचाक्षारःपलपरिमितंपंचलवणंद्वयंसम्यक्पिष्टंभवतिलघुनिंबूफलरसैः ॥ ततस्तप्तंतस्मिन्पलपरिमितंशंखशकलंक्षिपेद्वारान्सप्तद्रव.

तितदनेनैवविधिना ॥ पलप्रमाणंकटुकत्रयंचतुलार्धमानेनचहिंगुभागः॥विषंपलद्वादशभागयुक्तंतावद्रसोगंधकएपचोक्तं॥वादरास्थिप्रमाणेनवटीमितस्यकारयेत्॥भक्षयेत्सर्वदासास्यात्सर्वाजीर्णप्रशांतये॥सर्वोदरेपुशूलेषुविषूच्यांविविधेपुच॥अग्निमांद्येपुगुल्मेपुसदाशंखवटीहिता॥

अर्थ–चिंचेचा क्षार ४ तोळे व पंचलवणे ४ तोळे यांचा खल करून तें लिंबाच्या रसांत घालून त्यांत चार तोळे शंखाचे तुकडे तापवून त्या रसांत सातवेळ विझवावे; ह्मणजे गळून जातात. त्यांत सुंठ, मिरीं व पिंपळी हीं चार तोळे, हिंग २ तोळे व बचनाग १२ तोळे, व गंधक १२ तोळे, घालून घोटून त्याची बोराच्या आंठीएवढी गोळी करून. ती खावी; ह्मणजे अजीर्ण, संपूर्ण उदरें, शूल, तरळ, अग्निमांद्य व गुल्म हे नाश पावतात, हिला क्षंखवटी ह्मणतात.

अग्निकुमाररस.

पारदंचविषंगंधंटंकणंसमभागतः ॥ मरीचादष्टभागास्युर्द्वौशंखकवराटयोः ॥ पक्कजंबीरजैर्गाढंरसैःसप्तविभावयेत् ॥ गुंजाद्वयमितोदेयोरसोह्यग्निकुमारकः ॥ समीरणसमुद्भूतमजीर्णंचविषूचिकां ॥ क्षणेनक्षपयत्येषक्षयरोगनिकृंतनः ॥

अर्थ–पारा, बचनाग, गंधक व टांकणखार, हे समभाग, मिरीं ८ भाग, शंखभस्म व कवड्याचें भस्म २ भाग याप्रमाणें एकत्र करून त्याला पिकलेल्या लिंबूच्या रसाच्या सात भावना द्याव्या, त्याची दोन गुंजा प्रमाणाची गोळी करुन द्यावी; ह्याला अग्निकुमार ह्मणतात; हा वायुपासून झालेलें अजीर्ण, तरळ, आणि क्षयरोग यांचा क्षणांत नाश करील.

दुसरा प्रकार.

रसेनगंधंसहटंकणेनसमंविषंयोज्यमतस्त्रिभागं ॥ कपर्दशंखावपिनेत्रभागौमरीचकंचाष्टगुणंविमर्द्य ॥ सुपक्कजंबीररसेनखल्वेशुद्धोभवत्यग्निकुमारकोयं ॥ अजीर्णवातंगुदगुल्मवातंविषूचिकाद्यंविनिहंतिसद्यः ॥

अर्थ–पारा, गंधक, टांकणखार हे समभाग व बचनाग ३ भाग, आणि कवड्या व शंख यांचे भस्म २ भाग वं मिरीं ८ भाग एकत्र करून लिंबूरसांत भावना द्यावी; ह्मणजे हा शुद्ध अग्निकुमार होतो. हा अजीर्ण, वायु व गुदवात, गुल्मवात, तरळ आदिकरून व्याधींचा नाश करितो.

तिसरा प्रकार.

टंकणंरसगंधौचसमभागंत्रयंविपात् ॥ कपर्दशंखौद्विलवौवसुभागंमरी

चकं ॥ दिनंजंभांभसापिष्ट्वानागवल्यार्द्रवन्हिना ॥ शिग्रुमूलेनलुंगेनभ
वेदग्निकुमारकः ॥ अजीर्णशूलमंदाग्निप्लीहपांड्वामयेपुच ॥ वातरोगेपुस
र्वेपुमूत्ररोगेपुवातजे ॥ कासेदुर्नाम्न्यतीसारेग्रहण्यांसन्निपातके ॥

अर्थ-टांकणखार, पारा व गंधक हे समभाग; वचनाग ३ भाग, कवड्या व शंख यांचे भस्म २ भाग, मिरीं ८ भाग, हीं एकत्र करून त्यांचा जांबरें, विड्याचीं पानें, चित्रक, शेवग्याचीं मुळें व महाळुंग, यांचा रसांत एकेक दिवस खल करावा. हा अग्निकुमार अजीर्ण, शूल, मंदाग्नि, प्लीहा, पांडुरोग, संपूर्ण वातरोग, मूत्ररोग, खोकला मुळव्याध, अतिसार, संग्रहणी, आणि सन्निपात यांचा नाश करितो.

चवथा प्रकार.

समानौगंधकरसौतदर्धंवत्सनाभकं ॥ रसस्यताम्रभस्मापिसमंचूर्ण्य
विमर्दयेत् ॥ हंसपादिरसेनाथकाचकुप्यांविनिक्षिपेत् ॥ वालुकायंत्र
विधिनात्रियामंपाचयेद्भिपक् ॥ रसार्धममृतंक्षिप्त्वापुनःसंचूर्ण्यमर्दयेत्
वन्हित्रिकटुसिंधूत्थयुक्तेनार्द्रकवारिणा ॥ गुंजामात्रंहिदातव्यंमंदाग्नौ
सन्निपातके ॥ धनुर्वातेप्यजीर्णेचशूलेचक्षयकासयोः ॥ अयमग्निकुमा
राख्योरसःस्यात्प्लीहगुल्मनुत् ॥

अर्थ—गंधक व पारा हे समभाग, व वचनाग अर्धाभाग, ताम्रभस्म एक भाग, हे पदार्थ एकत्र करून, हंसपादी रसानें खल करून सुकवून काच कुपीत भरून. वालुकायंत्रात तीन प्रहर पचन करावा. शीत झाल्यावर काढून त्यांत वचनाग अर्धाभाग, मिळवावा; नंतर सुंठ, मिरीं, पिंपळी व सैंधव यांच्या चूर्णाशीं एक गुंज प्रमाण मंदाग्नि, सन्निपात, धनुर्वात, अजीर्ण, शूल, क्षय व खोकला यांवर द्यावा. हा अग्निकुमाररस गुल्म व प्लीहा यांचा नाश करितो.

बृहत्क्रव्यादरस.

द्विपलंगंधकंशुद्धंद्रावयित्वाविनिक्षिपेत् ॥ पारदंपलमानंतुमृतशुल्वा
यसंपुनः ॥ ततोविचूर्ण्ययत्नेनलोहपात्रेविचक्षणः ॥ स्थापयेच्चरसंतत्र
पात्रंचोपरिनिक्षिपेत् ॥ वस्त्रपूतंततःकृत्वालोहपात्रेविनिक्षिपेत् ॥ प
लमानेनसंमिश्र्यपंचांगुलदलेक्षिपेत् ॥ मृद्वग्निनापचेत्तत्तुदर्व्यासंचा
लयेन्मुहुः॥ पत्रमात्रंरसंशुद्धंदद्याज्जंबीरकस्यतु ॥ संचूर्ण्यपंचकोलोत्थैः
कषायैःसाम्लवेतसैः ॥ भावनाःकिलदातव्याःपंचाशत्प्रमिताःपृथक् ॥

अष्टटंकणचूर्णचतुल्येनसहमेलयेत् ॥ तदर्धकृष्णलवणंमरिचंसर्वतुल्य कं ॥ सप्तधाभावयेत्पश्चाच्चणकक्षारवारिणा ॥ ततःसंशोष्यचैपश्चात्कूप्या श्चजठरेक्षिपेत् ॥ अत्यर्थगुरुमांसानिगुरुभोज्यान्यनेकशःभुक्त्वाचा कंठपर्यंतंचतुर्वल्लमितोनरः ॥ कट्वम्लतक्रसहितःपीतमात्रोहिपाचयेत् ॥ पुनर्भोजयतिक्षिप्रंकापुनर्मंदवान्हिता ॥ रसःक्रव्यादनामायंप्रोक्तोमंथान भैरवैः ॥ सिंहलक्षोणिपालस्यभूरिमांसप्रियस्यच ॥ पुनर्भोजनकाम स्यभैरवानंदयोगिना ॥ कुर्याद्दीपनमूर्ध्वजत्रुगदत्द्दत्कुष्ठामसंशोधनं स्कंधस्थौल्यनिवर्हणोगदहरःशूलार्तिमूलापहः ॥ गुल्मप्लीहविनाशको वहुरुजांविध्वंसनोवातत्द्दद्वातग्रंथिहरोमदापहरणोक्रव्यादनामारसः ॥

अर्थ—गंधक ८ तोळे घेऊन तो लोहपात्रांत पातळ करावा. त्यांत पारा, ताम्र, व लोह ही चार चार तोळे मिळवून नंतर बारिक करावा; आणि पुनः लोहपात्रांत घालून त्यावर दुसरे झांपण ठेवावें; आणि किंचित् पुनः पातळ करून सुकवून त्यावर गाळून पुनः लोहपात्रांत एरंडाच्या पानावर ठेऊन मंदाग्नीनें पचन करावा; आणि लोखंडाच्या पळीनें वारंवार चाळवावा; नंतर ४ तोळे लिंबूरस, व पंचकोलांचा काढा, आम्ल वेतस यांचा ५० पंनास भावना द्याव्या; नंतर त्या औषधांइतके भाजलेल्या टांकणखाराचें चूर्ण घालावें. व पादेलोण टांकणखाराच्या निमें व सर्व चूर्णाच्या समान मिऱ्यांचें चूर्ण घालून त्यास हरभऱ्याच्या आंबीच्या सात भावना द्याव्या; नंतर सुकवून कुपींत भरून ठेवावा. हा क्रव्यादरस अत्यंत जड भोजन, जड मांसें, आकंठ भक्षण करून त्यावर चार वाल तिखट, आंबट व ताक यांशीं घ्यावा; ह्मणजे पुनः भोजनाची इच्छा करितो. मग मंदाग्नीची काय कथा? हा क्रव्यादरस मंथानभैरवानीं वहुत मांस खाणाऱ्या, पुनः भोजनाची इच्छा करणाऱ्या, अशा सिंहल देशच्या राजाला सांगितला. हा अग्निदीपन करून गळ्यावरचे व्याधी, कुष्टें, आम, स्कंधाचा स्थुलता, शूल, गुल्म, प्लीहा, व अनेक व्याधी वातग्रंथी, आणि उन्माद यांचा नाश करितो.

क्रव्यादरस.

मस्तुनिंवुरसप्रस्थंतृतीयांशार्द्रकान्वितं ॥ वरांगेलापलंदेवपुष्पंपंचद शस्मृतं ॥ टंकणंवन्हिसहितंपलार्धंकटुकत्रयं ॥ वरंसार्धपलंसर्वंपि ष्टासंशोध्यवाससा ॥ रसःक्रव्यादसंज्ञोयंराजारामप्रकाशितः ॥

अर्थ—ताकाची निवळी, व लिंबूचा रस ६४ तोळे, व आल्याचा रस २१ तोळे, हरडा, बेहडा, आवळकाठी हीं १६ भाग, व एळा ४ तोळे, लवंगा ६९ तोळे, टांकण-

खार, चित्रक हे २ तोळे; सुंठ, मिरी, व पिंपळी, ही साहा साहा तोळे; या सर्वांचें चूर्ण करून वस्त्रावर गाळून घ्यावें. हा क्रव्यादरस राम राजानें सांगितला आहे.

वडवानळ चूर्ण.

रसेनगंधंद्विगुणंगृहीत्वातौनागवंगौरसतुल्यभागौ ॥
कृत्वासमंषोडशभागसंख्ययामरीचचूर्णंवडवानलस्य ॥

अर्थ—पारा, १ गंधक, २ व शिसें, वंग यांचें भस्म १ भाग, आणि मिरीं १६ भाग या सर्वांचें चूर्ण एकत्र करावें. याला वडवानल चूर्ण ह्मणतात.

अग्निदीपनीवटी.

गंधकंमरिचंशुंठीसैंधवंयवजंतवं ॥
निंबूरसेनवटिकाचणमात्राग्निदीपनी ॥

अर्थ—गंधक, मिरी, सुंठ, सैंधव, इद्रजव, व वावडिंग यांचीं चूर्णें एकत्र करून लिंबू रसांत खलोन चण्या एवढी गोळी करावी. ही अग्नि दीपक आहे.

अग्निकुमार.

पारदंशुद्धगंधंचविषंमार्गैस्त्रिभिःसमं ॥ कपर्दविषतुल्यांशंतत्तुल्यंस्व र्जिकाकणा ॥ शुंठीचाष्टगुणायुक्तामरिचंमेलयेद्बुधः ॥ मर्दयित्वाख ल्वेकृत्वायावत्साकज्जलप्रभा ॥ जंबीरनीरैर्दयाचभावनासप्तवैततः ॥ आर्द्रकस्यरसेनैवततःसिद्धंद्विगुंजकं ॥ रसश्चाग्निकुमारोयंआमसंचय जांरुजं ॥ अग्निमांद्यमजीर्णंचनाशयेत्कफत्द्धत्परः ॥

अर्थ—पारा, गंधक, व वचनाग, हे समभाग व कवड्याचें भस्म ३ भाग. साजे खार, टांकणखार, पिंपळी, हे १ भाग, सुंठ ८ भाग व मिरीं ८ भाग हीं सर्व खलांत घालून काजळासारिखें होत, तों खलून लिंबाचे रसाच्या सात भावना व आल्याच्या रसाच्या सात भावना देऊन त्यांतून दोन गुंजा द्यावा; हा अग्निकुमाररस आमाला शोषि तो; व अग्निमांद्य, अजीर्ण, आणि कफ यांचा नाश करितो.

लघुपानीयभक्तवटी.

रसोर्धभागिकस्तुल्याविडंगमरिचाभ्रकाः ॥ भक्तोदकेनसंम र्धंकुर्याद्गुंजासमागुटी ॥ भक्तोदकानुपानैश्चसेव्यावन्हिप्रदी पनी ॥ वार्यन्नभोजनंचात्रप्रयोगेसात्म्यमिष्यते ॥

अर्थ—पारा अर्धा भाग व वावडिंग, मिरीं, अभ्रक, हे प्रत्येक १ भाग. हे भाताच्या

पेजेत खलोन एक गुंजेची गोळी करावी, व भाताच्या पेजेशीं द्यावी; ह्मणजे अग्निदीपन करितें, यावर पथ्य नाहीं, परंतु सात्म्यभोजन करावें.

राजवल्लभरस.

रसनिष्कंगंधकैकंनिष्कमात्रप्रदीपनं ॥ सार्धपलंप्रदातव्यंचूलिकाल
वणंततः ॥ खल्वेनमर्दयेत्तत्तुसूक्ष्मवस्त्रेणगालयेत् ॥ माषमात्रंप्रदा
तव्योभुक्तमांसादिजारकः ॥ अजीर्णेपुत्रिदोषेपुदेयोयंराजवल्लभः ॥

अर्थ–पारा ४ मासे, गंधक १ तोळा, चित्रक ४ मासे, नवसागर ६ तोळे, हे सर्व खलोन वस्त्रावर गाळून त्यातून एक मासा हा राजवल्लभरस द्यावा; ह्मणजे मांसादिकानां जिरवितो, व अजीर्ण, त्रिदोष, यांवरही द्यावा.

लब्धानंदरस.

पारदंगंधकंलोहमभ्रकंविषमेवच ॥ समांशंमरिचंचाष्टौटंकणंचचतु
र्गुणं ॥ भृंगराजरसैःसप्तभावनाचाम्लदाडिमैः ॥ गुंजाद्वयंपर्णखंडैः
खादेत्सोयंनिहंतितान् ॥ वातश्लेष्मोद्भवान्रोगान्मंदाग्निग्रहणींज्व
रान् ॥ अरुचिंपांडुतांचैवजयेदचिरसेवनात् ॥

अर्थ–पारा, गंधक, लोहभस्म, अभ्रकभस्म, बचनाग, हे प्रत्येक समभाग, व मिरीं ८ भाग, टांकणखार ४ भाग, याप्रमाणे एकत्र करून त्याला माका व आंबट डाळिंब, यांचा सात सात भावना द्याव्या, आणि त्यातून दोनगुंजा विड्याच्या पानाशीं घ्यावा; ह्मणजे वायु, कफ, यांपासून झालेल्या व्याधी, मंदाग्नि, संग्रहणी, ज्वर अरुची, पांडु-रोग, यांचा शीघ्र नाश करितो.

महोदधिवटी.

एकैकंविषसूतंचजातिटंकद्विकंद्विकं ॥ कृष्णात्रिकंविश्वषट्
कंदग्धंकपर्दकंतथा ॥ देवपुष्पंवाणमितंसर्वंसंमर्दयेत्नतः ॥
महोदधिवटीनामनष्टमग्निंप्रदीपयेत् ॥

अर्थ–बचनाग, १ पारा, १ जायफळ, २ टांकणखार, २ पिंपळी, ३ सुंठ, ६ कव डीचें भस्म, ६ लवंगा, ५ भाग हे सर्व एकत्र खलावें, याला महोदधिवटी ह्मणतात. ही अग्नीला वाढवितें.

सूरण चूर्ण.

शर्करायुतसूरणकंदंगुंजाकेशरमेवतथान्यत् ॥
क्षौद्रयुतंनवनीतमथोवासूदनकारणमर्शसएव ॥

अर्थ-साकर, सुरणाचा कांदा, गुंजा व नाकेशर यांचें चूर्ण, मध, किंवा लोणी यांशीं द्यावें; ह्मणजे मुळव्याधीचा नाश करितें.

वैक्रांताख्यरस.

मृतसूताभ्रवैक्रांतकांतताम्रंसमंसमं ॥ सर्वतुल्येनगंधेनमर्द्यंभल्लातका चितं ॥ दिनैकंतद्रवैरेववटींकुर्याद्विगुंजकां ॥ भक्षयेद्गुदजान्हंतिद्वंद्वजंचत्रिदोपजं ॥ प्रत्यष्टमुसलीवन्हिभागाःकुष्ठस्यषोडश ॥ पिप्पली पिप्पलीमूलंक्षिपेद्भागद्वयंद्वयं ॥ चतुष्कंतुविडंगस्तुमरिचंकटुशुंठिका ॥ ब्रह्मदंडितथैकैकंचूर्णितंद्विगुणंगुडं ॥ कर्पांशंभक्षयेच्चानुह्यर्शोरोगप्रशांतये ॥ वैक्रांताख्योरसोनामसाध्यासाध्यार्शशांतये ॥

अर्थ-पारदभस्म, अभ्रकभस्म, वैक्रांत भस्म, कांतभस्म व ताम्रभस्म हीं समभाग; या सर्वांच्या समान गंधक आणि बिबवे हे घालून एक दिवस खल करावा; व बिबव्याच्या तेलांत गोळी दोन गुंजाची करावी. ती अनुपानाशीं द्यावी; आणि मुसली, चित्रक ८ भाग, कोष्ट १६ भाग, व पिंपळी २ भाग, पिंपळी मूळ २ भाग, व वावडिंग चार भाग व मिरीं कोथिंबीर, सुंठ, व ब्रह्मदंडी हीं प्रत्येकीं एकेक भाग यांचें चूर्ण करून त्याचे दुप्पट गुळ घालून त्याची गोळी तोळा प्रमाण करून ती मागून खाण्यास द्यावी, ह्मणजे मुळव्याधीची शांती होये. हा वैक्रांतरस साध्यासाध्य अर्शनाशनाविषयीं प्रशस्त आहे.

पर्पट्यादियोजना.

गोमूत्रेणसमंपीत्वागुंजाष्टौपर्पटीरसं ॥ ताम्रपर्पटिकातद्वत्गुडशुंठीभयान्विता ॥ भक्षयेदर्शसांशांत्यैअनुपानंचकथ्यते ॥ जीवंतिपुष्करंवन्हिबिल्वमज्जकचोरकं ॥ करवीरंयवक्षारंजाजिचूर्णंपलंपलं ॥ द्विपलं तिंत्तिणीचूर्णंलाजाचूर्णंचतुःपलं ॥ तिलतैलंघृतंचैवप्रत्येकंतुपलद्वयं ॥ भ्रष्टंसर्वंप्रयोक्तव्यंकर्पैकमनुपानकं ॥

अर्थ-पर्पटीरस आठ गुंजा गोमुत्राशीं द्यावा; किंवा ताम्रपर्पटी रस गुळ, सुंट व हरीतकी यांशीं द्यावा, त्याचें अनुपान सांगतों. जीवंती, पुष्करमूळ, चित्रक बेलफळाचा मगज, कचोरा, अर्जुनवृक्षाची साल, यवक्षार व जिरें यां प्रत्येकांचें चूर्ण ४ तोळे व चिंच ८ तोळे लाह्याचूर्ण १६ तोळे, व तिळांचें तेल व तूप हीं प्रत्येकीं ८ तोळे घेऊन सर्व भाजून त्यातून एक तोळा मागून भक्षणार्थ द्यावें.

कुटजावलेह.

कुटजत्वक्तुलांद्रोणेजलस्यविपचेत्सुधीः ॥ कषायंपादशेषंचगृण्हीं

याद्वस्त्रगालितं ॥ त्रिंशत्पलंगुडस्यात्रदत्वाचविपचेत्पुनः ॥ सांद्रत्व मागतंज्ञात्वाचूर्णानीमानिदापयेत् ॥ रसांजनंमोचरसंत्रिकटुंत्रिफलां तथा ॥ लज्जालुंचित्रकंपाठांबिल्वमिंद्रयवान्वचां ॥ भल्लातकंप्रतिवि षंविडंगानिचवालकं ॥ प्रत्येकंपलसंमानंघृतस्यकुडवंतथा ॥ सिद्ध शीतेततोदद्यान्मधुनःकुडवंतथा ॥ जयेदेषोवलेहस्तुसवर्ण्यर्शांसिवेग तः ॥ दुर्नामप्रभवान्रोगानतीसारमरोचकं ॥ ग्रहणींपांडुरोगंचरक्त पित्तंचकामलां ॥ आम्लपित्तंतथाशोफंकार्श्यंचैववाहिकां ॥ अनुपाने प्रयोक्तव्यमाजंतक्रंपयोदधि ॥ घृतंजलंवाजीर्णेचपथ्यभोजीभवेन्नरः ॥

अर्थ—कुडयाची साल एक तुला प्रमाण घेऊन थोडी कुटून त्यांत पाणी एक द्रोण प्रमाण घालून चवथाई पाणी राहीतोंपर्यंत काढा करून फडक्यांत गाळून त्यांत गूळ तीस पळ प्रमाण टाकून फिरून घण होई तोपर्यंत पाक करून नंतर त्यांत चूर्ण करून टाकावयाची औषधें येणेंप्रमाणे. रसांजन, मोचरस, सुंठ, मिऱ्ये, पिंपळी, हिरडा, बेहेडा, आंवळकाठी, लाजेरी, चित्रक, पाहाडमूळ, लहान बेलफळ, इंद्रजव, वेखंड, भिलावा, अतिविष, वावडिंग, वाळा, हीं १८ औषधें पळपळ प्रमाण घेऊन चूर्ण करून पाकांत टाकावीं. व तूप एक कुडवप्रमाण टाकून थंड झाल्यावर त्यांत मध एक कुडवप्रमाण मेंळवून मग हा अवलेह शेळीचे दुधांत अथवा ताकांत; किंवा दह्यांत, तुपांत; अथवा पाण्यांत घ्यावा. व अन्न जिरणीं पडलें असतां घ्यावा. व चांगलें पथ्य करावें. तेणेंकरून संपूर्ण मूळव्याधी लवकर दूर होतात. व दुष्ट नाम आहे ज्यांना असे भगंदरादिक रोग, अतिसार, आंवढणे संग्रहणा, पांडुरोग, रक्तपित्त, डोळ्यात कावीळ होते ती, आम्लपित्त, सूज, कृशता, प्रवाहिकारोग अतिसाराचा भेद आहे तो, हे रोग दूर होतात.

कूष्मांडावलेह.

युक्त्याकूष्मांडखंडानिसूरणंविपचेत्सुधीः ॥
अर्शांसिगुडवातानांमंदाग्निषुप्रयुज्यते ॥

अर्थ—कोहळ्याचे तुकडे, सुरण हे युक्तीनें पचन करावे; आणि ते द्यावे; ह्मणजे अर्श, खुडवात व मंदाग्नि यांचा नाश करितात.

भल्लातकावलेह.

सुपक्वभल्लातफलानिसम्यक्द्विधाकृतान्याढकसंमितानि ॥ विपाच्य तोयेनचतुर्गुणेनचतुर्थशेषेव्यपनीयतानि ॥ पुनःपचेत्क्षीरचतुर्गुणेन

घृतांशयुक्तेनघनंयथास्यात् ॥ शीतोपलाषोडशभिःपलैश्चविमर्दयेत्सं. स्थाप्यदिनानिसप्त ॥ ततःप्रयुंज्यानिवलेनमात्रांजयेद्विकारानखिलान्गुदोत्थान् ॥ कचान्सुनीलान्घनकुंचितान्सुपर्णदृष्टिंचशशांककांतिं ॥ जवाह्ययानांबलमुत्तमंचस्वरंमयूरस्यहुताशदीप्तिं ॥ स्त्रीवल्लभत्वंविविधंप्रभावंनीरोगतांद्विस्त्रिशतायुषंच ॥ नचान्नपानेपरिहारमस्तिनचातपेनाध्वनिमैथुनेच ॥ प्रयोगकालेसकलामयानांराजाधिराजाचरसायनानां ॥

अर्थ—चांगले पिकलेले व फोडलेले बिबवे १०२४ तोळे घेऊन ते ४०९६ तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करून तो गाळून घ्यावा. व त्यांत काढ्याच्या चौपट दूध व चतुर्थांश तूप घालून घण होई तोपर्यंत आटवून त्यांत खडी साकर ६४ तोळे घालून घोटून तसाच सात दिवस ठेवावा; नंतर अग्नि व बळ पाहून द्यावा; ह्मणजे संपूर्ण गुद रोगाचा नाश करितो; व केश काळे, दृष्टि गरुडासारिखी, कांति चंद्रासारिखी, वेग घोड्यासारिखा, उत्तम बळ, मोरासारिखा शब्द, अग्निसारिखी दीप्ति, आणि स्त्रियांना प्रिय निरोगी, व शंभराहून ज्याजती आयुष्य करितो. याला अन्नपान, ऊन व मैथुन यांची बंदी नाहीं. हा घेतला असतां, संपूर्ण रोगाचा नाश करितो; व संपूर्ण रसायनामध्यें राजाधिराज आहे.

स्नुहिक्षीरलेप.

स्नुहिक्षीरनिशालेपस्तथागोमूत्रकल्कितः ॥ योजितोगोभवक्षीरवन्हिमूलावचूर्णितं ॥ पिबंस्तदेवतेनैवभुंजानोगुदजांकुरान् ॥

अर्थ—निवडुंगाचा चीक, हळद, गोमूत्र यांचा लेप करावा, आणि गाईचे दुधाबरोबर चित्रकाचें चूर्ण खावें; याला पथ्य दूध भात जेवावा; ह्मणजे मुळव्याध बरी होईल.

कोकंबादिचूर्ण.

समूलपत्रकोकंबंपलद्वयमितंशुभं ॥ भल्लातफलमज्जायामरीचस्यपलंपलं ॥ एतच्चूर्णीकृतंसूक्ष्मंभक्षयेत्कर्षसंमितं ॥ अर्शांकुरान्निहंत्याशुसबाह्याभ्यंतरानपि ॥

अर्थ—कोकंबाचें पंचांग ह्मणजे मूळ, पानें, फळें यासहित झाड, ८० मासे, बिब्यांचा मगज (ह्मणजे गोडंब्या) ४० मासे व मिरें ४० मासे, यांचें चूर्ण कर्षप्रमाण ह्मणजे १० मासे खावें; ह्मणजे आंतले व बाहेरले मोड नाश पावतील.

समशर्करयोग.

शुंठीकणामरिचनागदलत्वगेलंचूर्णीकृतंक्रमविवर्धितमूर्ध्वमंत्यात् ॥
खादेदिदंसमसितंगुदजाग्निमांद्यगुल्मोदरश्वयथुपांडुगुदांकुरेषु ॥

अर्थ—६ भाग सुंठ, ५ पिंपळी, ४ मिरीं, ३ विड्याची पानें, २ दालचिनी व १ भाग एलची यांचे चूर्ण करावे, आणि चूर्णाचा समान साकर घालून द्यावें; ह्मणजे मुळव्याध, अग्निमांद्य, गुल्म, उदर, सूज, पांडुरोग, आणि गुदांकुर यांचा नाश करितें.

व्योषादिचूर्ण.

व्योषाढ्यरुष्करविडंगतिलाभयानांचूर्णंगुडेनसहितंसततंप्रयोज्यं ॥
दुर्नामशोफगरकुष्ठशकृद्विबंधमग्नेर्जयत्यबलतांक्रमिपांडुतांच ॥

अर्थ—सुंठ, मिरीं, पिंपळी, बिबवे, वावडिंग, तिळ व हरीतकी यांचे चूर्ण गुळाशीं द्यावें; ह्मणजे अर्श, सूज, विष, कोड, विट्‌बंध, अग्निमंदता, कृमि, आणि पांडुरोग यांचा नाश करितें.

करंजादिचूर्ण.

करंजशुंठींद्रयवारलूतासिंधूत्थवान्हिप्रतिमिश्रितानां ॥
तक्रेणचूर्णंपिवतोस्यनित्यंअर्शांसिरक्तेनपतंतिसार्धं ॥

अर्थ—करंज, सुंठ, इंद्रजव, दिंडा, सैंधव व चित्रक यांचें चूर्ण एकत्र करून तें ताकाशीं पिण्याकरितां द्यावें; ह्मणजे अर्श, आणि रक्तार्श हे गळून जातात.

विजयाचूर्ण.

त्रिकत्रयंवचाहिंगुपाठाक्षारौनिशाद्वयं ॥ चव्यतिक्ताकलिंगानिशताव्हालवणानिच ॥ ग्रंथिबिल्वाजमोदाचगणोष्टाविंशतिर्मतः ॥ एतानिसमभागानिसूक्ष्मचूर्णानिकारयेत् ॥ चूर्णंबिडालपदकंपिवेदुष्णेनवारिणा ॥ एरंडतैलसंयुक्तंलिह्याच्चूर्णमिदंनरः ॥ हन्यादर्शांसिसर्वाणिश्वासशोषभगंदरान् ॥ त्वच्छूलंपार्श्वशूलंचवातगुल्मंतथोदरं ॥ हिक्काश्वासंप्रमेहंचपांडुरोगंसकामलं ॥ आमवातमुदावर्तमंत्रवृद्धिंगुदक्रमीन् ॥ हन्याच्चग्रहणीरोगान्भिषग्भिर्यत्प्रकीर्तितः ॥ विजयानामचूर्णोयंसर्वव्याधिहरःपरः ॥ महाज्वरोपसृष्टानांभूतोपहतचेतसां ॥ अप्रजानांचनारीणांहितमेतद्भिषजं ॥

अर्थ–त्रिफळा, त्रिकटु, त्रिसुगंध, वेखंड, हिंग, पाहाडमूळ, क्षार दोनप्रकारचे, हळद, दारुहळद, चवक, कुटकी, इंद्रजव, शतावरी, पंचलवणं, पिंपळीमूळ, बेलफळ व अजमोदा हा अठावीस औषधांचा गण समभाग घेऊन त्याचें सूक्ष्म चूर्ण करुन १० मासे ऊन पाण्याशीं घ्यावें, किंवा एरंड तेलाशीं घ्यावें; ह्मणजे सर्व प्रकारचे अर्श, श्वास, शोष, भगंदर, ह्रदयांतील शूल, पार्श्वशूल, वातगुल्म, उदर, उचकी, श्वास, प्रमेह, पांडुरोग, कामला, आमवात, उदावर्त, अंत्रवृद्धि, मुळव्याध, कृमि व संग्रहणी यांचा नाश करितें. हें विजया चूर्ण सर्व व्याधिनाशक आहे, व माहाज्वर, भूतबाधा व वंध्यास्त्रीयानां हें औषध हितकारक आहे.

देवदाल्यादियोग.

देवदालिकषायेणशौचमाचरतांनृणां ॥
किंवातद्भिमसेवाभिःकुतःस्युर्गुदजांकुराः ॥

अर्थ–देवडांगरीच्या कषायानें गुदप्रक्षालन करीत गेलें असतां; किंवा देवडांगरीचा हिंग करून घेतला असतां; त्याला गुदांकुर होणारच नाहींत.

मरीचादिमोदक.

मरीचमहौषधचित्रकसूरणभागायथोत्तरंद्विगुणाः ॥
सर्वसमोगुडभागोसेव्योवैमोदकःप्रसिद्धफलः ॥

अर्थ–मिरीं, सुंठ, चित्रकमूळ व सुरण हीं प्रत्येकीं एकाहून दुप्पट घ्यावी; आणि सर्वांच्या चूर्णासमान गूळ घालून त्याचा मोदक द्यावा. हा अर्शावर प्रसिद्ध गुणकारी आहे.

प्राणदमोदक.

तालीसज्वलनोपणासचविकास्तुल्यंद्विभागाभवेत्कृष्णामूलसमन्वि
तात्रिपलिकाशुंठीचतुर्जातकं ॥ स्यान्मुष्टिप्रमितंगुडत्रिगुणितैरेभिः
कृतोमोदकोकासश्वासमदाग्निमांद्यगुदजप्लीहप्रमेहापहः ॥

अर्थ–तालीसपत्र, चित्रक, मिरीं व चवक हीं समभाग, पिंपळी दोनभाग व पिंपळीमूळ व सुंठ हीं बारा तोळें दालचिनी, तमालपत्र, एलची व नाकेशर हीं चार चार तोळे; व या सर्वांच्या तिप्पट गुळ घालून त्याचा मोदक द्यावा. हा खोकला, श्वास, मंदाग्नि, मुळव्याध, प्लीहा, आणि प्रमेह यांचा नाश करितो.

कांकायनीगुटी.

पथ्यादलस्यपलपंचकमेवमेकमेकंपलंचमरिचादपिजीरकस्य ॥ कृष्णा
तदुद्भवजटाचविकाग्निशुंठीकृष्णादिपंचकमिदंपलतःप्रवृद्धं ॥ पलाष्ट

भल्लातकसंप्रयुक्तंदारूकरुष्करपलाद्द्विगुणंप्रकल्प्याः॥स्याद्यावशूककुड
वार्धमतःसमस्तयोज्योगुडाद्द्विगुणिताद्वटकल्पिताश्च ॥ कांकायनेनमुनि
नावटकःकिलायमुक्तःप्रजाहितमेनगुदामयघ्नः ॥ क्षाराग्निशस्त्रपत
नैरपियेनसिद्धासिध्यंत्यनेनवटकेनगुदामयास्ते ॥

अर्थ–हिरडादळ २० तोळे व मिरीं, जिरें, पिंपळी, पिंपळीमूळ, चवक, चित्रक, सुंठ, हीं चार चार तोळे व बिबवे ३२ तोळे तेल्यादेवदार ६४ तोळे व जवखार ८ तोळे यासर्वांच्या दुप्पट गूळ घालून गोळी करून द्यावी. ही कांकायनानें सांगितली. ही गुदरोगनाशक आहे, आणि जे अर्श क्षार, अग्नि व शस्त्र यांणी बरे होत नाहींत, ते या गोळीनें बरें होतात.

सूरणमोदक.

चित्रकस्यपलंत्वेकंद्विपलंसूरणस्यच ॥ पलार्धंनागरस्यापिमरिचंको
लमात्रकं ॥ भल्लातककणामूलंविडंगंत्रिफलाकणा ॥ तालीससहिता
न्सर्वानक्षमात्रान्प्रयोजयेत् ॥ द्वेपलेवृद्धदारस्यतालमूलंपलंभवेत् ॥
त्वगेलामरिचांशेचसर्वानेकत्रचूर्णयेत् ॥ गुडेनमर्दयित्वातुद्विगुणेनेह
बुद्धिमान् ॥ मोदकःसूरणोनामअक्षमात्रःप्रमाणतः ॥ उपयुक्तोनिहं
त्याशुगुदकीलान्नसंशयः॥ अग्निवृद्धिकरःपुंसांसेव्यमानोमहागुणः ॥

अर्थ–चित्रकमूळ ४ तोळे, सुरण ८ तोळे, सुंठ २ तोळे, मिरीं ८ मासे, व बिबवे, पिंपळीमूळ, वावडिंग, त्रिफळा, पिंपळी व तालीसपत्र हीं प्रत्येकी एकेक तोळा; व वृद्धदारु ८ तोळे, तालमूल १ तोळा, दालचिनी व एलची हीं प्रत्येकीं ८ मासे, हीं सर्व एकत्र चूर्ण करावें; व सर्वचूर्णाच्या दुप्पट गूळ घालून त्याचा मोदक करावा; हा सूरणमोदक १ तोळा दिला असतां; तत्काळ मुळव्याधीचा नाश करितो; व घेत गेला असतां, अग्निवृद्धि करितो.

लघुसूरणमोदक.

कणामरीचविश्वाग्निसूरणैस्तुगुडैःक्रमात्
द्विगुणैर्मोदकोर्शोघ्नःपरःपाचनदीपनः ॥

अर्थ–पिंपळी, मिरीं, सुंठ, चित्रक व सुरण हीं समभाग; आणि मूळ दोनभाग, यांचा मोदक अर्शनाशक व दीपन आणि पाचन आहे.

अर्शकुठार.

संमर्द्यत्रतिसारितावहुरसौताभ्यांचगंधंसमंलांगल्यासितसूरणेनच

पृथक्कृत्वाचतावत्पचेत् ॥ गोलंज्वालमुपेतिभांडनिहितंचूल्यामथ
स्वौपधंसस्यादर्शकुठारकोस्रपवनार्शःपूर्वकव्याधिपु ॥

अर्थ–प्रतिसारिता; आणि बहुरस या दोघाचे बराबर गंधक घेऊन मर्दन करावे; नंतर कुहिली आणि पांढरा सुरण त्यांत मिळवून खलावें; नंतर गोळा करून भांड्यांत घालोन पेंढ होई तोंपर्यंत पक्क करावें, याला अर्शकुठार असे ह्मणतात. हा रक्तवात व मुळव्याध इत्यादिकाचे ठायीं प्रशस्त आहे.

अभ्रकहरीतकी.

मृताभ्रकपलंविंशन्मृतलोहस्यपंचकं ॥ गंधकस्यपलंपंचत्रिभिर्द्विगुण
माक्षिकं ॥ पथ्याशतपलंयोज्यंधात्रीपलशतद्वयं ॥ सर्वमेकत्रतच्चूर्णंजं
वीरैर्भावयेद्दिनं ॥ भृंगीपुनर्नवाद्रावैःपातालगरुडाकुलैः ॥ भल्लातवन्हि
कोरांटैर्हस्तशुंडीतुलांगली ॥ क्षीरिणीजलकुंभीचप्रत्येकंप्रत्यहंद्रवैः ॥
भावयेन्मर्दयेदित्थंमध्वाज्याभ्यांविलोलयेत् ॥ स्निग्धभांडेस्थितंखादे
न्नित्यंनिष्कद्वयंद्वयं ॥ सिद्धसावरयोगोत्थंत्रिदोषार्शांसिनाशयेत् ॥

अर्थ–अभ्रकभस्म ८० तोळे, गंधक २० तोळे व माक्षिक या तिघांचे दुप्पट व हरितकी ४०० तोळे, आवळकाठी ८०० तोळे, ह्या पदार्थांची सर्व एकत्र चूर्णं करून लिंबूरसांत एक दिवस घोटावीं; व माका, पुनर्नवा, पातालगरुडी, बिबव, चित्रक, कोरांटा, वृंदावन, कळलावी, दुधभोपळी व जलकुंभी या प्रत्येकाच्या रसात एकेक दिवस खलावीं. या प्रमाणे तयार झाल्यावर मध व तूप त्यांत मिळवून तुपाने राखलेल्या भांड्यांत ठेऊन त्यांतून १ तोळा खात जावें. हा सिद्धसावरयोग त्रिदोषजअर्शांचा नाश करितो.

मंत्र.

कंकरकुरंकरंतरकंताक्षिलतिरीयेराजकरंतरआरकासारकाजोजाणेइहमं
त्राताकेवसनहोयआरिसाजाणवुझप्रकटनकारिताकेसप्तकापलामाकिहत्या

अस्यमंत्रस्य प्रत्यहं जपंकुर्यात् अर्थ–या मंत्राचा रोज जप करावा.

सूरणपुटपाक.

मृल्लिप्तंसूरणंकंदंपक्त्वाग्नौपुटपाकवत् ॥
अद्यात्सतैललवणंदुर्नामविनिवृत्तये ॥

अर्थ–सुरणाच्या कांद्याला मातीचा लेप करून पुटपाकासारिखा भाजावा; आणि तो तेल व मीठ घालोन खावा; ह्मणजे मुळव्याध जाते.

कांशीसादितैल.

काशीसंलांगलीकुष्टंशुंठीकृष्णाचसैंधवं ॥ मनःशीलाश्वमारंचविडंगं चित्रकोवृषः ॥ दंतीकोशातकीबीजहेमाव्हाहरितालकः ॥ कल्कैःकर्ष मितैरेतैस्तैलप्रस्थंविपाचयेत्॥ सुधार्कपयसीदद्यात्पृथक्द्विपलसंमिते ॥ चतुर्गुणंगवांमूत्रंदत्वासम्यक्प्रसाधयेत् ॥ कथितंखरनादेनतैलमर्शो विनाशनं ॥ क्षारवत्पातयत्येतदर्शांस्यभ्यंगतोभृशं ॥ वलीर्नदूपय त्येतत्क्षारकर्मकरंस्मृतं ॥

अर्थ–हिराकशी, कळलावी, कोष्ठ, सुंठ, पिंपळी, सैंधव, मनशीळ, कण्हेर, वावडिंग, चित्रक, अडुळसा, दांतीमूळ, कडुदाडिक्याचें बीज, चोक व हरताळ हीं पंधरा औषधें कर्ष कर्ष प्रमाण घेऊन कल्क करुन तिळांचे तेल एक प्रस्थ प्रमाण घेऊन त्यांत तो कल्क टाकून व निवडुंगाचा चीक व रुईचा चीक हे दोन्ही दोन दोन पळें घेऊन त्या तैलांत टाकावे. व तेलाचे चौपट गाईचें मूत्र त्यांत टाकून ते तेल शेष राही तोपर्यंत पाक करुन तेल गाळून घ्यावें. हें तेल खरनादऋषीनीं सांगीतलें आहे, हे मुळव्याधीचे मोडास सोमलादिक क्षार लावितात. त्या प्रमाणें लावावें, तेणेंकरून क्षाराचे लेपाप्रमाणें गुदाचे आंत तीन वळी आहेत, त्याना उपद्रव नहोतां मोड गळून मूळव्याध दूर होते.

अजीर्ण.

मंदाग्निहर.

मंदोदराग्निर्भवतिसतिद्रव्येनवैयजेत् ॥
प्राजापत्यत्रयंकृत्वाभोजयेत्सशतंद्विजान् ॥

अर्थ–जवळ द्रव्य असतां जोपुरुष वैश्वदेवादि नित्य यजन करीत नाहीं, तो मंदाग्नि होतो; त्याणे तीन प्राजापत्यकृच्छ्र प्रायश्चित्त करुन शंभर ब्राह्मणाला भोजन द्यावें.

पाराशर.

गोमांसभक्षकोमंदजठराग्निर्भवेन्नरः ॥ प्राजापत्यंचरेत्कृच्छ्रमतिकृच्छ्रं तथैवच ॥ अग्निमंत्रंजपेन्नित्यंश्रीसूक्तंचाविचक्षणः ॥

अर्थ–जो मूर्ख गोमांस भक्षण करितो, तो मंदाग्नि होतो; त्याणे कृच्छ्रातिकृच्छ्र प्रायश्चित्त करुन अग्निरश्मीतिमंत्र व श्रीसूक्त यांचा जप करावा.

कर्मपाकसंग्रह

अकारणंगरंदत्वाप्रमारयतियःपुनः ॥ समंदाग्निर्भवेदेवमृतकल्पश्च जायते ॥ यतिरुद्रेणसूक्तेनचरुंचजुहुयाद्घृतं ॥ अष्टोत्तरयुतंसम्य क्तत्पापस्यापनुत्तये ॥ तामग्निवर्णामितिचजपेत्सूक्तंसहस्रकं ॥ भो जयेद्ब्राह्मणान्सम्यक्चत्वारिंशत्सुखीभवेत् ॥

अर्थ—जो कोणी कारणावांचून दुसऱ्याला विष घालतो; तो मंदाग्नि होतो. तो पुरुष या पृथ्वींत मेल्यासारिखा आहे. त्याणें यतिरुद्र या सूक्तानें चरु व घृत यांचा अष्टोतर-शत होम करावा; व तामग्निवर्णा० हें सूक्त सहस्रसंख्या जपावें; आणि चाळिस ब्राह्मणा-ला भोजन घालावें; ह्मणजे सुखी होतो.

विपूचिका, आलसिका निदान.

मंदस्तीक्ष्णोतिविषमःसमश्चेतिचतुर्विधः ॥

कफपित्तानिलाधिक्यात्तत्साम्याज्जाठरोनलः ॥

अर्थ—जठराग्नि कफाधिक्यानें मंद, पित्ताधिक्यानें तीक्ष्ण व वाताच्या आधिक्यानें वि-षम होतो; आणि तिघांच्या साम्येंकरून सम होतो. असा चौहोंप्रकारचा जठराग्नि जाणावा.

विपूच्यादिनिदान.

अजीर्णमामंविष्टब्धंविदग्धंचयदीरितं ॥

विपुच्यलसकौतस्माद्भवेच्चापिविलंबिका ॥

अर्थ—मळावरोध, आम व विदग्ध, असे तीन प्रकारचें अजीर्ण सांगितलें; त्या अजी-र्णाच्या निकोपापासून विपूची, अलसक; आणि विलंबिका हे व्याधि होतात.

चौहोंअग्नींचें कार्य सांगतो.

विषमोवातजान्रोगान्तीक्ष्णःपित्तनिमित्तजान् ॥

करोत्यग्निस्तथामंदोविकारान्कफसंभवान् ॥

अर्थ—विषमाग्नि वातापासून होणाऱ्या रोगास, तीक्ष्णाग्नि पित्तापासून होणाऱ्या रोगास व मंदाग्नि कफापासून होणाऱ्या रोगास उत्पन्न करितो.

समासमाग्नेरशितामात्रासम्यग्विपच्यते ॥ स्वल्पापिनैवमंदाग्नेर्विष माग्नेस्तुदेहिनः ॥ कदाचित्पच्यतेसम्यक्कदाचिन्नविपच्यते ॥ मा त्रातिमात्राप्यशितासुखंयस्यविपच्यते ॥ तीक्ष्णाग्निरितितंविद्यात्स माग्निःश्रेष्ठउच्यते ॥

अर्थ—समाग्नि पुरुषानें क्षुधेइतकें भोजन केलें असतां, चांगले पचतें. मंदाग्नीनें क्षुधेपेक्षां अल्पमात्र भोजन केलें तरी पचन होत नाहीं; आणि विषमाग्नीनें भक्षितअन्न केव्हां पचन होतें; केव्हां पचन होत नाहीं; आणि तीक्ष्णाग्निपुरुषानें अतिअन्न भक्षण केलें तरी सुखानें पचन होतें, या सर्व अग्नींत समाग्नि श्रेष्ठ आहे.

हिंग्वाष्टक चूर्ण.

त्रिकटुकमजमोदासैंधवंजीरकेद्वेसमचरणधृतानामष्टमोहिंगुभागः ॥
प्रथमकवलभोजीसर्पिषाचूर्णमेतज्जनयतिजठराग्निंवातगुल्मंनिहंति ॥

अर्थ—सुंठ, मिरें, पिंपळी, ओंवा, सैंधव, जिरें, शहाजिरें व हिंग, हीं समभाग घेऊन यांचें चूर्ण तूप लाऊन भोजनसमयीं पहिले घासाबरोबर खावें; ह्मणजे अग्नि प्रदीप्त होतो; आणि वातगुल्माचा नाश होतो.

विडंगादिचूर्ण.

विडंगभल्लातकचित्रकाभयाःसनागरास्तुल्यगुडेनसर्पिषा ॥
निहंतितेमंदहुताशनान्नराभवंतितेवाडवतुल्यवन्हयः ॥

अर्थ—वावडिंग, बिब्बा, चित्रक, हिरडा व सुंठ यांचे चूर्ण आणि त्यांचे बरोबर गूळ, तूप घालून खावें; ह्मणजे मंदाग्नीचा नाश होऊन वडवाग्निसारिखा त्याचा अग्नि होतो.

जिरकादिचूर्ण.

जरणरुचकशुंठीपिप्पलीतीक्ष्णवेल्लंसलवणमजमोदाहिंगुपथ्येतिकर्षं ॥
पृथगथपलमात्रास्यात्रिवृच्चूर्णमेषांजननमुदरवन्हेःपाचनंरोचनंच ॥

अर्थ—जिरें, सचळखार, सुंठ, पिंपळी, मिरें, वावडिंग, सैंधव, अजमोदा व हिंग हीं तोळा तोळा; आणि तेड ४ तोळे घेऊन एकत्र करून चूर्ण करून खावें. हें अग्नि प्रदीपणार, पाचक, रुचिकारक असें आहे.

वडवानळचूर्ण.

सैंधवंपिप्पलीमूलंपिप्पलीचव्यचित्रकं ॥ शुंठीहरीतकीचेतिक्रम
वृद्धानिचूर्णयेत् ॥ वडवानलनामैतच्चूर्णंस्यादग्निदीपनं ॥

अर्थ—सैंधव एक भाग, पिंपळमूळ दोन भाग, पिंपळी ३ भाग, चवक ४ भाग, चित्रक ५ भाग, सुंठ ६ भाग व बाळहिरडे ७ भाग घेऊन चूर्ण करावें. या चूर्णाला वडवानळचूर्ण असें ह्मणतात. हें चूर्ण घेतलें असतां, अग्नि प्रदीप्त होतो.

वन्हिनाशकरस.

जातीजातंत्रिकर्षंमरिचमपिपलंचार्धकर्षप्रमाणंगंधंसूतंलवंगंविषमि

दमखिलंचिंचिणीरसयुतोये ॥ पिष्टामापेकमात्रांवितरतिदहनंवन्हि

मांद्येचसद्योरोगानशूलानिलादीनूदहतिकृतगुणोवन्हिनामारसोयं ॥

अर्थ—जायपत्री तोळा १॥, जायफळ तोळा १॥, मिरें तोळे ४, गंधक ॥, पारा ॥, लवंग ॥, बचनाग अर्धा तोळा हीं सर्व बारिक करून त्याचा चिंचेच्या रसांत खल करावा; नंतर त्याच्या गोळ्या उडदा एवढ्या कराव्या त्या अनुपानांत योजून सकाळीं व संध्याकाळीं एक याप्रमाणें दिल्यास, अग्नि प्रदीप्त होऊन दुर्धर शूळ व वायु इत्यादि रोग दूर होतात.

कर्मविपाक.

अन्नहर्तात्वजीर्णान्नोभवेदस्यनुनिष्कृतिः॥ उपवासत्रयंकुर्या

त्प्राजापत्यमथापिवा ॥ जुहुयाच्चरुसर्पिर्भ्यामग्निरश्मीत्यृचा

मथ ॥ अष्टोत्तरसहस्रंहिजुहुयाच्चजपेत्तथा ॥

अर्थ—जो कोणी अन्नाची चोरी करितो, त्याला अजीर्ण होतें. त्याणें तीन उपवास करून तीन प्राजापत्य प्रायश्चित करावें; आणि अग्निरश्मी या मंत्रानें भात व तूप, यांचा अष्टोत्तर सहस्र होम करावा; आणि तसाच जप करावा.

दुसरा प्रकार.

परान्नविघ्नकरणादजीर्णमपिजायते ॥

लक्षहोमंप्रकुर्वीतप्रायश्चित्तंविधीयते ॥

अर्थ—दुसऱ्याच्या अन्नाला विघ्न केलें असतां; अजीर्णरोग प्राप्त होतो. त्याणें प्रायश्चित्तपूर्वक लक्ष होम करावा; म्हणजे त्याची शांति होते.

भस्मकनिदान.

नरेक्षीणकफेपित्तंकुपितंमारुतानुगं ॥ सोष्मणापाचकस्थानेबलमग्नेः

प्रयच्छति ॥ तदालब्धबलोदेहंरुक्षयेत्सानिलोनलः॥ अभिभूयपत्य

न्नंतैक्ष्ण्यादाशुमुहुर्मुहुः ॥ पक्वान्नंसततोधातूञ्शोणितादीन्पचत्यपि

ततोदौर्बल्यमातंकंमृत्युंचोपानयेत्परं ॥ भुक्तेन्नेलभतेशांतिंजीर्णमात्रे

प्रताम्यति ॥ तृट्कासदाहमोहाःस्युर्व्याधयोत्यग्निसंभवाः ॥

अर्थ—ज्या मनुष्याचा कफ क्षीण जाहाला; आणि वायु पित्ताला साह्य होऊन स्वस्थानींच अग्नीला अत्युग्र वाढवितो. तो लब्धबल अग्नि वायूच्या साहाय्यानें देहाला रुक्ष करितो; आणि आपल्या तीक्ष्णपणानें वारंवार भक्षित अन्नाला पचवितो. अन्नपाकानंतर रक्तादिक धातूंला पचन करितो, तेणेंकरून दुर्बळपणा, रोग, मृत्यु, यानां करितो; हा रोगी अ-

न खालें ह्मणजे स्वस्थ होतो; आणि जिरलें ह्मणजे व्याकूळ होतो; आणि अत्यग्नि वाढला असतां; तृषा, खोकला, दाह, मेह, हे व्याधि होतात.

भस्मकलक्षण.

कफेक्षीणेयदापित्तंस्वस्थानेमारुतानुगं ॥ तीव्रंप्रवर्धयेद्वन्हितदातंभस्म कंवदेत् ॥ तृड्दाहश्वासमूर्छादीन्कृत्वैवात्यग्निसंभवान् ॥ पक्वान्नमाशु धात्वादीन्संक्षिप्रंनाशयेत्ततु ॥ क्षणाद्भुक्तंभवेद्भस्मसरोगोभस्मकःस्मृतः ॥

अर्थ—शरीरामध्यें कफ क्षीण झाला असतां; जा काळीं वातानुबंधी पित्त स्वस्थानीच अग्नीला तीव्र वाढवितें; आणि अत्यग्नि कोपानें होणारे तृषा, दाह, मद व मूर्छा इत्यादि करितें; व ते अन्नाला शीघ्र पचन करुन जलदीनें रसादि धातूचा नाश करितें; व भक्षण केल्या पदार्थाच क्षणांत भस्म होतें. तेव्हां त्याला भस्मक ह्मणावा.

चिकित्साक्रम

तंभस्मकंगुरुस्निग्धसांद्रमंडहिमस्थिरैः
अन्नपानैर्नयेच्छांतिंपित्तघ्नैश्चविरेचनैः ॥

अर्थ—भस्मकरोगाला जड, स्निग्ध, अशीं अन्नें; व घट्ट पदार्थ, मंड, हिम, फार वेळानें पचन होणारीं अन्नें; व पाने, आणि पित्तनाशक उपचार, यांणीं शमवावा.

भस्मकचिकित्सा

कफेपूर्वंजितेपित्तेमारुतेचानलःसमः ॥
समधातोःपचत्यन्नंपुष्ट्यायुर्बलवर्धनः ॥

अर्थ—कफ, पित्त व वायु पूर्वी जिंकल्यावर समधातु मनुष्याचा अग्नि सम होऊन अन्न चांगले पचवून आयुष्यपुष्टि करणारा, आणि बल वाढविणारा होतो.

आहारंपचतिशिखीदोषानाहारवर्जितःपचति ॥
दोषक्षयेचधातून्धातुक्षेण्येतथाप्राणान् ॥

अर्थ—अग्नि पूर्वी आहार पचिवतो. आहाराचे अभावीं वातादि दोष पचिवतो; दोषांचा नाश झाल्यावर धातु पचिवतो; धातु क्षीण झाल्यावर प्राणाचा नाश करतो.

मुहुर्मुहुरजीर्णेपिभोज्यान्यस्योपहारयेत् ॥
निरिंधनोंतरंलब्ध्वायथैनंनविपादयेत् ॥

अर्थ—भस्मकरोग्याला अजीर्ण झालें, तरीं वारंवार भोजन द्यावें; नाहीं तर अग्नीला भक्षण न मिळल्यामुळे रोग्याचा नाश करील.

शमन.

अत्युद्धताग्निशांत्यैमाहिषदधिदुग्धसर्पींपि ॥
संसेवेतयवागूंसमधूच्छिष्टांससर्पिष्कां ॥

अर्थ–अति वाढलेला अग्नि महिषीचें दहीं, दूध व तूप यांचे सेवनानें, किंवा तूप व मेण घालून केलेली कांजी हिच्या सेवनानें शांत करावा.

विरेचन.

असकृत्पित्तहरणंपायसंप्रतिभोजनं ॥
श्यामात्रिवृद्धिपक्वंचपयोदद्याद्विरेचनं ॥

अर्थ–वारंवार पित्तनाश करावा, पायसाचें भोजन करावें, काळें व पांढरें निशोत्तर घालून आटलेलें दूध रेचनार्थ द्यावें; ह्मणजे भस्मक शांत होईल.

शास्त्रार्थ.

यत्किंचिन्मधुरंमेध्यंश्लेष्मलंगुरुभोजनं ॥
सर्वंतदत्यग्निहितंभुक्त्वाप्रस्वपनंदिवा ॥

अर्थ–मधुर, कफकारक, जड व शुद्ध, असें भोजन अत्यग्नीला हितकारक आहे; आणि दिवसास भोजनोत्तर निद्रा हि तशीच आहे.

कोलास्थियोग.

कोलास्थिमज्जकल्कस्तुपीतोवाप्युदकेनवै ॥
अचिराद्विनिहंत्येनंप्रयोगोभस्मकंनृणां ॥

अर्थ–बोराचे बींचा मधला मगज वाटून पाण्याबरोबर प्यावा; ह्मणजे तो मनुष्याचा भस्मकरोगाचा नाश करितो.

क्षीर.

नारीक्षीरेणसंपिष्ट्वापिबेदौदुंबरत्वचं ॥
ताभ्यांवापायसंसिद्धंपिबेदत्यग्निशांतये ॥

अर्थ–स्त्रियांचे दुधात उंबराची साल वांटून प्यावी, अथवा त्या दोहोंनी सिद्ध केलेलें पायस ह्मणजे (खीर) प्यावी, ती अत्यग्नीची नाशक आहे.

सिततंडुलसितकमलंछागक्षीरेणपायसंसिद्धं ॥
भुक्त्वाघृतेनपुरुषोद्वादशदिवसान्बुभुक्षितोनभवेत् ॥

अर्थ–पांढरे तांदूळ, पांढरें कमळ; आणि शेळीचे दूध, यांची खीर करून तूप घालून बारा दिवसपर्यंत दर रोज खावी, ती भस्मकनाशक आहे.

विदारीकल्क.

विदारीस्वरसंक्षीरेपचेदष्टगुणंघृतं ॥
माहिषंजीवनीयेनकल्केनात्यग्निनाशनं ॥

अर्थ–भुयकोहळ्याचा रस ८ भाग, दूध ११ भाग, म्हशीचें तूप १ भाग व जीवनीयगण, हरणवेल, ज्येष्ठमध, रानमूग, रानउडीद, मेदा, महामेदा, काकोली, क्षीरकाकोली, जीवक; आणि ऋषभक या औषधांचा कल्क १ भाग घालोन पचवून घृत सिद्ध करावें; तें अग्निनाशक आहे.

त्रिफलामुस्तविडंगैःकणयासितयासमैः ॥
स्यात्खरमंजिरिबीजैर्लेहोभस्मकनाशनः ॥

अर्थ–त्रिफळा, नागरमोथे, वावडिंग, पिंपळी, साकर व श्वेतआघाड्याचें बी याणी केलेला लेह भस्मकनाशक आहे.

अपामार्गादियोग.

अपामार्गस्यबीजानिपिष्टाक्षीरेणसाधयेत् ॥
तत्पायसंमहाघोरेभस्मकेसंप्रशस्यते ॥

अर्थ–आघाड्याचें बीज घेऊन तें सडून त्याची दुधांत खीर करावी, ती महाघोर भस्मकावर देण्यास उत्तम आहे.

कदलीफलयोग.

कदलीफलंसुपक्कंषट्पलंसुप्रभातेघृतसममाभिनित्यंभक्षयेन्मंडलंच ॥
हरतिसकलमग्नेस्तीव्रतांभस्मरोगंअनुभवितमिदंमुक्तमग्निमांद्यंकरोति ॥

अर्थ–एकेचाळीस दिवसपर्यंत प्रातःकाळीं २४ तोळे पिकलेली केळी तुपाशीं खावीं; म्हणजे तीं संपूर्ण अग्नीची तीव्रता व भस्मरोग यांचा नाश करितात; व अग्निमांद्य करितात. हे मीं अनुभविक सांगितलें.

अजीर्णाचे भेद.

आमंविदग्धंविष्टब्धंकफपित्तानिलैस्त्रिभिः ॥ अजीर्णंकेचिदि
च्छंतिचतुर्थंरसशेषतः ॥ अजीर्णंपंचमंकेचिन्निर्दोषंदिनपाकि
च ॥ वदंतिषष्ठंचाजीर्णंप्राकृतंप्रतिवासरं ॥

अर्थ–अजीर्णें साहाप्रकारचीं तीं कफ, पित्त, आणि वायु, या तीन दोषांनीं क्रमानें, आमाजीर्ण, विदग्धाजीर्ण, विष्टब्धाजीर्ण, अशीं तीन, व रसशेषानें होणारें तें चवथें, व

कोणाचे मतें पांचवें ग्रथमंचपंच ॥ अजीर्णवातंगुदगुल्मवातंवातप्रमेहंविप
हावें स्वभावतः प्रकृतिवशात् काकामलपांडुरोगंश्वासंचकासंचहरेत्प्रयुक्तं ॥
ग्रहाव्याविषयीं सुश्रुतामध्यें याम . जवखार, ओंवा, हिरडा, पिंपळी, सुंठ, हिंग व वावडिंग
शतपदंगच्छेद्वामपार्श्वेनसंविशेत् ॥ ला तूप लावावें; आणि भोजनसमयीं प्रथम पांच घांस
नान्नंसाधुतिष्ठतीति ॥ अर्थ—जेवल्यार ीर्ण,वात, गुदवात, गुल्मवात, वातप्रमेह, विषमवात,
मनःप्रिय अशा गंधादिविषयांचें स खोकला यांचा नाश करील.

अजीर्णा ऱ्यादियोग.

अत्यंबुपानाद्विषमाशनाच्चसंधा
पिसात्म्यंलघुचापिभुक्तमन्नंनपाकंभजतेनरस्य ॥ ईर्ष्याभयक्रो
धपरिक्षितेनलुब्धेनशुग्दैन्यनिपीडितेन ॥ प्रद्वेषयुक्तेनचसेव्य
मानमन्नंनसम्यक्परिपाकमेति ॥

अर्थ—फार उदकपान, अकालीं भोजन, मलमूत्रादिवेगाचा रोध न झोंपेचा विपर्यास या कारणानीं वेळेवर हितकारक, थोडें, असें भोजन केलें तरी चांगलें पचन होत नाहीं; व इर्ष्या, भय, कोप, लोभ, शोक, आणि भिकारपणा, या कारणानीं व द्वेषानें भक्षण केलेलें अन्न चांगलें पचन होत नाहीं.

आमाजीर्णलक्षण.

तत्रामेगुरुतोत्क्लेदःशोथोगंडाक्षिकूटगः ॥
उद्गारश्चयथाभुक्तमविदग्धःप्रवर्तते ॥

अर्थ—आमाजीर्णामध्यें अंगाला जडपणा, मळमळ, गाल व नेत्र, कूट यानां सूज; आणि जसें अन्न खावें तसा ढेंकर, हीं लक्षणें होतात.

वचादिवमन.

वचालवणतोयेनवांतिरामेप्रशस्यते ॥ धान्यनागरसिद्धंवातोयंदद्या
द्विचक्षणः ॥ आमाजीर्णप्रशमनंशूलघ्नंवस्तिशोधनं ॥

अर्थ—आमाजीर्णावर वेखंड व सैंधव यांचें चूर्ण उष्णपाण्याशीं खावें, तें वांतीविषयीं प्रशस्त आहे. नंतर धने व सुंठ यांचा काढा खावा; ह्मणजे आमाजीर्णाचा नाश व बस्तिशोधन होईल.

लवंगादि काढा.

लवंगपथ्ययोःक्वाथःसैंधवेनावधूलितः ॥
पीतःप्रशमयत्युग्रमजीर्णंरेचयत्यपि ॥

.ञ अजीर्णाचा नाश

विदारीकल्क.

विदारीस्वरसंक्षीरेपचेदष्टगुणंघृतं ॥

माहिषंजीवनीयेनकल्केनात्मभिन

अर्थ—भुयकोहळ्याचा रस ८ भाग, दूध ११ भाग! पामार्गकदलीपलाशाति
नीयगण, हरणवेल, ज्येष्ठमध, रानमूग, रानउडीद, म्भ.गाखिलंचतत् ॥ जलाढ
ली, जीवक; आणि ऋषभक या औषधांचा कल्कप्रसन्नांविनिःश्राव्यलवणंप्र
करावे; तें अग्नितनाशक आहे. ... र्णंकृतंपुनः ॥ यवानीजीरकव्योप

स्थूलजीरकाहिंगुभिः ॥ पृथगर्धपलैरेभिश्चूर्णितैस्तद्विमिश्रयेत् ॥ आ
र्द्रकस्वरसेनापिभावयेच्छोपयेत्पुनः ॥ शीतोदकेनतच्चूर्णंपिबेत्प्रातर्हि
मात्रया ॥ तस्मिन्जीर्णेन्नमश्नीयाद्यूपैर्जांगलजैरसैः ॥ ईषदम्लैःसल
णैःसुखोष्णैर्वन्हिदीपनैः ॥ एतेनाग्निश्चवर्धेतबलमारोग्यमेवच ॥ त
त्रानुपानंशस्तंहितक्रंवाभोजनेहितं ॥ मंदाग्न्यर्शोविकारेषुवातश्लेष्मा
मयेषुच॥ सर्वांगशोथरोगेषुशूलगुल्मोदरेषुच ॥ आमार्शशर्करायांतु
विण्मूत्रानिलरोगिषु ॥

अर्थ—निवडुंग, रुई, चित्रक, एरंड, मीठ, पुनर्नवा, तिल, आघाडा, केळ, पळस व चिंचेची साल, याना घेऊन जाळून त्याचें २९६ तोळे भस्म घेऊन १०२४ तोळें पाण्यांत घालून कढवावें. चतुर्थांश काढा राहिला ह्मणजे तो गाळून घ्यावा, त्यांत ६४ तोळे मीठ घालून पुनः कढवावा; ह्मणजे निर्धूम कठिण असा क्षार उत्पन्न होतो, तो घेऊन बारीक करून त्यांत ओंवा, जिरें, सुंठ, मिरीं, पिंपळी, जाडें जिरें व हिंग हे प्रत्येकीं दोन तोळे मिळवून त्याला आल्याच्या रसाची भावना देऊन सुकवावा. त्यांतून प्रातःकाळीं बळ पाहून थंड पाण्याशीं द्यावा; नंतर औषध जिरल्यावर आरण्यसंबंधी मांसाचे रस व यूष किंचित् आंबट व मीठ घालोन मंदोष्ण व अग्नीला प्रदीप्त करणारे असे द्यावे; ह्मणजे अग्नि, बल, आरोग्य, यांची वृद्धि होते. ह्या औषधावर मागुन ताक घ्यावें; किंवा भोजनकालीं द्यावें. मंदाग्नि, मूळव्याध, वायु, कफ, सर्वांगाला सूज येते ती व शूल, गुल्म, उदर, आम, अर्श, शर्करा, आणि मळ व मूत्रसंबंधी वायुरोग यांचा नाश होतो.

सामुद्रादि चूर्ण.

सामुद्रसौवर्चलसैंधवानांक्षारोयवानांचतथाजमोदा ॥ हरीतकीपिप्प
लिशृंगवेरंहिंगुर्विडंगंचसमानिकुर्यात् ॥ एतानिचूर्णानिघृतप्लुतानि

भुंजीतग्रासान्प्रथमंचपंच ॥ अजीर्णवातंगुदगुल्मवातंवातप्रमेहंविप
मंचवातं ॥ विपूचिकाकामलपांडुरोगंश्वासंचकासंचहरेत्प्रयुक्तं ॥

अर्थ—सुंठ, पादेलोण, सैंधव, जवखार, ओंवा, हिरडा, पिंपळी, सुंठ, हिंग व वावडिंग हीं समभाग घेऊन चूर्ण करून त्याला तूप लावावें; आणि भोजनसमयीं प्रथम पांच घास त्या चूर्णाबरोबर खावें; ह्मणजे अजीर्णवात, गुदवात, गुल्मवात, वातप्रमेह, विषमवात, विषूचिका, कावीळ, पांडुरोग, श्वास व खोकला यांचा नाश करील.

हरीतक्यादियोग.

हरीतकींतथाशुंठींभक्ष्यमाणागुडेनवा ॥
सैंधवेनयुतावास्यात्सातत्येनाग्निदीपनी ॥

अर्थ—हरीतकी किंवा सुंठ गुळाशीं किंवा सैंधवाशीं नित्य नेमानें भक्षण केली, तर अग्निदीपन करणारी आहे.

गुडादिचतुष्क आमाजीर्णादिकांवर.

गुडेनशुंठीमथवोपकुल्यांपथ्यांतृतीयामथदाडिमंवा ॥
आमेष्वजीर्णेपुगुदामयेषुवर्चोविबंधेपुचनित्यमद्यात् ॥

अर्थ—गुळाबरोबर सुंठ किंवा पिंपळी; अथवा हरीतकी, अथवा डाळिंब भक्षण करावें; ह्मणजे तें आमाजीर्ण, गुळव्याध, मलावष्टंभ, यांवर प्रशस्त आहे.

गुडाष्टक.

व्योपदंतीत्रिवृच्चित्रकृष्णामूलंविचूर्णितं ॥ तच्चूर्णंगुडसंमिश्रंभ
क्षयेत्प्रातरुत्थितः ॥ एतद्गुडाष्टकंनामवलवर्णाग्निवर्धनं ॥
शोथोदावर्तशूलघ्नंप्लीहपांड्वामयापहं ॥

अर्थ—सुंठ, मिरें, पिंपळी, दांतीमूळ, तेड, चित्रक व पिंपळमूळ यांचें चूर्ण गुळमिश्रित करून सकाळीं उठून खावें, याला गुडाष्टक ह्मणतात. हें बळ देणारें व अग्नि वाढविणारें आणि शोथ, उदावर्त, शूल, प्लीहा, पांडु, यांचें नाशक आहे.

पथ्यादिचूर्ण.

पथ्यापिप्पलिसंयुक्तंचूर्णंसौवर्चलंपिवेत् ॥ मस्तुनोष्णोदकेना
थमत्वादोपगतिंभिपक् ॥ चतुर्विधमजीर्णंचमंदानलमथारुचिं ॥
आध्मानंवातगुल्मंचशूलंचाशुविनाशयेत् ॥

अर्थ—हरीतकी व पिंपळी यांशींयुक्त संचळखाराचें चूर्ण अथवा दह्यांचे मंडाबरोबर संचळखार, अथवा ऊनपाण्याबरोबर जशी दोषांची गति असेल त्याप्रमाणें यांतून एक

द्यावें; ह्मणजे चारप्रकारचें अजीर्ण, मंदाग्नि, अरुचि, आध्मानवात, गुल्म व शूळ यांचा लवकर नाश करील.

वृहच्छंखवटी.

स्नुगर्कश्चिंचापामार्गरंभातिलपलाशजान् ॥ क्षारांश्चभिषगादद्यात्प्रत्येकंपलमात्रया ॥ लवणानिपृथक्पंचग्राह्याणिपलमात्रया ॥ सर्जिकाचयवक्षारंटंकणंत्रितयंपलं ॥ सर्वंत्रयोदशपलंसूक्ष्मंचूर्णंविधायतु ॥ निंबूफलरसेप्रस्थसंमितेतत्परिक्षिपेत् ॥ तत्रशंखस्यशकलंपलंवन्हौप्रताप्यतु ॥ वारान्निर्वापयेत्सप्तसर्वंद्रवतितद्यथा ॥ नागरंत्रिपलंग्राह्यंमरीचंचपलद्वयं ॥ पिप्पलीपलमानास्यात्पलार्धंभ्रष्टहिंगुनः ॥ ग्रंथिकंचित्रकंचापियवानीजीरकंतथा ॥ जातीफलंलवंगंचपृथक्कर्षद्वयोन्मितं ॥ रसोगंधोविषंचापिटंकणंचमनःशिला ॥ एतानिकर्षमात्राणिसर्वसंचूर्ण्यमिश्रयेत् ॥ शरावार्धेनचुक्रेणसन्नीयवटिकांचरेत् ॥ माषप्रमाणाःसावैचैवृहच्छंखवटीस्मृता ॥ सर्वाजीर्णप्रशमनीसर्वशूलनिवारिणी ॥ विपूच्यलसकादीनांसद्योभवतिनाशिनी ॥

अर्थ—निवडुंग, रुई, चिंच, आघाडा, केळ, तीळ व पळस इतक्यांचे क्षार चार चार तोळे; आणि मीठ, टाकणखार, सैंधव, बिडलोण व संचळ हीं प्रत्येक चार तोळे; सर्जिकाक्षार, जवखार, टांकणखार, हें तीन मिळून चार तोळे; एकंदर ५२ तोळे घेऊन बारीक चूर्ण करून ६४ तोळे लिंबाचे रसांत टाकून नंतर ४ तोळे शंखाचें तुकडे तावून त्यांत टाकावे. असे पुनः पुनः तावून सातवेळा टाकल्यावर ते त्यांत मिळून जातात; नंतर सुंठ १२ तोळे, मिरे ८ तोळे, पिंपळी ४ तोळे, भाजलेला हिंग २ तोळे, पिंपळमूळ, चित्रक, ओंवा, जिरें, जायफळ, लवंग, हीं प्रत्येकीं दोन तोळे, पारा, गंधक, बचनाग, टांकणखार व मनशीळ हीं प्रत्येकीं एकेक तोळा. याप्रमाणें घेऊन सर्व एकत्र करून १६ तोळे चुक्याचा रस घेऊन त्यांत खलून वडी करावी. त्यांतून एकमासाभर खावी; ह्मणजे अजीर्ण, शूल, विषूची, अलसक, ह्यांचा तत्काळ नाश करील. ह्याला वृहच्छंखवटी असें ह्मणतात.

लघुक्रव्यादरस.

पारदाद्द्विगुणंगंधमर्धांशंमृतलोहकं ॥ पिप्पलींपिप्पलींमूलमग्निशुंठींलवंगकं ॥ लोहसाम्यंपृथक्कुर्याद्रससाम्यंसुवर्चलं ॥ टंकणंमरिचंचापिगंधतुल्यंप्रदापयेत् ॥ एतद्धिचूर्ण्ययत्नेनभावयेत्सप्तधाम्लकैः ॥ ए

तद्रसायनंश्रेष्ठंमापमात्रंप्रदापयेत् ॥ तक्रेणकेवलेनांपिदद्या
द्भोजनपाचने ॥ क्षिप्रंतज्जीर्यतेभुक्तंदीपनंभवतिध्रुवं ॥ सर्वा
जीर्णप्रशमनंलघुक्रव्यादसंज्ञितं ॥

अर्थ—पारा एक भाग, गंधक दोन भाग, लोहभस्म पान्याच्या निमें व पिंपळी, पिंपळ मूळ, चित्रक, सुंठ, लवंग प्रत्येक २ भाग, पादेलोण, टांकणखार, मिरें, हीं सर्व प्रत्येक एक भाग, याप्रमाणें घेऊन एकत्र चूर्ण करून सातवेळा आंबट रसाच्या भावना द्याव्या; नंतर हा लघु क्रव्यादरस सिद्ध होतो. हा मासाभार ताकाबरोबर किंवा नुसताच भोज- नाचे पाचन होण्याविषई द्यावा; ह्मणजे लवकर भोजन जिरतें; आणि अग्नि प्रदीप्त होतो; आणि सर्वाजीर्णाचा नाश होतो.

विदग्धाजीर्णलक्षण.

विदग्धेभ्रमतृण्मूर्छापित्ताच्चविविधारुजः ॥
उद्गारश्चसधूमाम्लःस्वेदोदाहश्चजायते ॥

अर्थ—विदग्धाजीर्णामध्यें, भ्रम, तृषा व मूर्छा; व पित्तापासून दाह व तुंबडी लाग- ल्यासारिखी वेधना असें अनेक विकार, सधूम व आंबट असा ढेंकर, घाम, आणि दाह, हीं लक्षणें होतात.

विदग्धाजीर्णनिदान.

अन्नंविदग्धंचनरस्यशीघ्रंशीतांवुनावैपरिपाकमेति ॥
तदास्यशैत्येननिहंतिपित्तमाक्लेदिभावाच्चनयत्यधस्तात् ॥

अर्थ—मनुष्याचें विदग्ध अन्न थंड पाण्यानें निश्चयेकरून पचतें; आणि शैत्याचे योगा नें पित्त शमवितें; आणि आर्द्रपणामुळें अधोगति करतें.

निद्रानियम.

भोजनात्प्राक्दिवास्वापात्पाषाणोपिचजीर्यति ॥ भोजनांते
दिवास्वापाद्वातपित्तकफैःकृतं ॥ आलिप्यजठरंप्राज्ञोहिंगुत्र्यू
षणसैंधवैः ॥ दिवास्वापंप्रकुर्वीतसर्वाजीर्णप्रणाशनं ॥

अर्थ—प्रातःकाळीं भोजनाच्या पूर्वी निद्रा केली असतां, पाषाण जरी भक्षण केलें तरीं जिरतात. व भोजनानंतर निद्रा केली असतां; वात, पित्त व कफ हे कोपतात. याकरितां शाहाण्या मनुष्यानें हिंग, सुंठ, मिरीं, पिंपळी व सैंधव, यांणीं उदराला लेप करावा; नंतर निजावें; ह्मणजे संपूर्ण अजीर्णाचा नाश होतो.

दिवानिद्रा.

व्यायामप्रमदाध्ववाहनरतान्क्लिन्नानतीसारिणोशूलश्वासवतस्तृपाप

रिगताञ्हिक्कामरुत्पीडितान् ॥ क्षीणान्क्षीणकफान्शिशून्मदहतान्वृद्धांस्तथाजीर्णिनोरात्रौजागरितान्नरान्निरशनान्कामंदिवास्वापयेत् ॥

अर्थ–जे व्यायाम, स्त्री, मार्ग, वाहन, यांच्या सेवनानें थकलेले, अतिसारी, शूळ, श्वास, तहान, उचकी व वायु यांच्या विकाराचे व क्षीण, क्षीणकफ, बालक, मदानें व्याप्त, वृद्ध; अजीर्ण झालेला, रात्री जागलेला; उपवास केलेला यांला दिवसास यथेच्छ निजवावें.

विष्टब्धाजीर्णलक्षण.

विष्टब्धेशूलमाध्मानंविविधावातवेदनाः ॥
मलवाताप्रवृत्तिश्चस्तंभोमोहांगपीडनम् ॥

अर्थ–विष्टब्धाजीर्णामध्यें शूळ, पोटाला फुगवटी, अनेक वातसंबंधी पीडा, मळ व वायु यांचे गतीचा रोध, आंगाला ताठेपणा, मोह, आणि आमवातासारिख्या कळा, हीं लक्षणें होतात.

विष्टब्धाजीर्णशास्त्रार्थ.

विष्टब्धेस्वेदनंकार्यंपेयंचलवणोदकं ॥

अर्थ–विष्टब्धाजीर्णावर घाम काढावा; आणि मिठाचें पाणि प्यावें.

रसशेषाजीर्णलक्षण.

रसशेषेन्नविद्वेषोहृदयाशुद्धिगौरवे ॥

अर्थ–रसशेषअजीर्णामध्यें अन्नद्वेष, हृदयाला अस्वास्थ्य, आंगाला जडता, हीं होतात.

रसशेषाजीर्णशास्त्रार्थ.

रसशेषेदिवास्वापंलंघनंवातवर्जनं ॥ आलिप्यजठरंप्राज्ञोहिंगुत्र्यूपणसैंधवैः ॥ दिवास्वापंप्रकुर्वीतसर्वाजीर्णप्रणाशनं ॥

अर्थ–रसशेषअजीर्णावर दिवसास झोंप घ्यावी, लंघन करावें, वाऱ्यावर बसूंनये, व आणि हिंग, सुंठ, मिरें, पिंपळी व सैंधव यांचा पोटावर लेप करावा; आणि सर्वाजीर्णावर दिवसास झोंप प्रशस्त आहे.

अजीर्णहोण्याला कारण.

अनात्मवंतःपशुवद्भुंजंतेशनलोलुपाः ॥
रोगानीकस्यतेमूलमजीर्णंप्राप्नुवंतिहि ॥

अर्थ जे अविचारी, खाण्याचे लोभी, गुरासारिखें फार खातात, त्याला अनेकरोगांना कारणभूत असें अजीर्ण होतें.

अजीर्णाचें सामान्य लक्षण.

ग्लानिगौरवविष्टंभभ्रममारुतमूढता ॥
विबंधोतिप्रवृत्तिर्वासामान्याजीर्णलक्षणं ॥

अर्थ–ग्लानि, गौरव, विष्टंभ, भ्रम, अपानवायूचा प्रतिबंध व विबंध ह्मणजे मळमूत्राचा रोध, किंवा अप्रवृत्ति, इत्यादिक अजीर्णाचीं सामान्य लक्षणें जाणावीं.

अजीर्णाचे उपद्रव.

मूर्छाप्रलापोवमथुःप्रसेकःसदनंभ्रमः ॥
उपद्रवाभवंत्येतेमरणंचाप्यजीर्णतः ॥

अर्थ–अजीर्णापासून मूर्छा, बडबड, वांति, तोंडाला पाणी सुटणें, ग्लानि, आणि भ्रम हे उपद्रव होतात; किंवा मरण ही येतें.

स्वल्पंयदादोपविबंधमामंलीनंनतेजःपथमावृणोति ॥
भवत्यजीर्णेपिनदाबुभुक्षासामंदबुद्धिंविपवन्निहंति ॥

अर्थ–ज्या काळीं दोषयुक्त अल्प असें आमाजीर्ण अग्नीच्या मार्गाचा रोध करीत नाहीं. तेव्हां अजीर्णांत ही भोजनाची इच्छा होते. ती भोजनेच्छा अल्पबुद्धिपुरुषाला विषासारिखी मारिते.

प्रायेणाहारवैपम्यादजीर्णंजायतेनृणां ॥
तन्मूलोरोगसंघातस्तद्विघाताद्विनश्यति ॥

अर्थ–प्रायः आहाराचे न्यूनाधिकपणेकरून मनुष्यांस अजीर्ण होतें. त्या अजीर्णेकरून नानारोग होतात. तेणेंकरून रोग्याचा नाश होतो.

भास्करलवणचूर्ण.

पिप्पलीपिप्पलीमूलंधान्यकंकृष्णजीरकं ॥ सैंधवंचविडंचैवपत्रंतालीसकेसरान् ॥ एषांद्विपलिकान्भागान्पंचसौवर्चलस्यच ॥ मरीचाजाजिशुंठीनामेकैकस्यपलंपलं ॥ त्वगेलाचार्धभागास्यात्सामुद्रंकुडवद्वयं ॥ दाडिमात्कुडवंचैवद्विपलंचाम्लवेतसं ॥ एतच्चूर्णीकृतंश्लक्ष्णंगंधाढ्यममृतोपमं ॥ लवणंभास्करोनामभास्करेणविनिर्मितः ॥ जगतोस्यहितार्थायवातश्लेष्मामयापहः ॥ वातगुल्मंनिहंत्येपवातशूलानियानिच ॥ तक्रमस्तुसुरासिंधुयुक्तःकांजिकयोजितः ॥ मंदाग्निता

विनाशयैवशक्तोभवतिपावकः ॥ हृद्रोगमामदोषंचविविधान्युदराणिच ॥ अन्यानपिनिहंत्याशुरोगान्लवणभास्करः ॥

अर्थ-पिंपळी, पिंपळीमूळ, धने, काळे जिरे, सैंधव, बिडलोण, तालीसपत्र, नाकेसर हीं प्रत्येकीं ८ तोळे; संचळ १० तोळे; व मिर्ये, ओंवा व सुंठ हे प्रत्येकीं ४ तोळे; व दालचिनी व एलची २ तोळे; आणि मीठ ३२ तोळे व डाळिंबाचीसाल १६ तोळे, व आम्लवेतस ८ तोळे. यासर्वांचें चूर्ण एकत्र करावें; ह्मणजे लवणभास्करनामक चूर्ण होतें. हें उत्तम गंधयुक्त, अमृतासारिखें, जगत्रयाच्या हिताकरितां सूर्यानें उत्पन्न केलें; हें वायु, कफ, वातगुल्म व वातशूल यांचा नाश करितें; आणि हें ताक, ताकाची निवळी, मद्य, सैंधव, किंवा कांजी यांतून मंदाग्नीला द्यावें; ह्मणजे अग्निवृद्धि होते व हृद्रोग, आमदोष, संपूर्ण उदरें व इतर अनेक व्याधि यांचा नाश करितें.

अग्निमुखचूर्ण.

हिंगुभागोभवेदेकोवचाचद्विगुणाभवेत् ॥ पिप्पलीत्रिगुणाज्ञेयाशृंगवेरंचतुर्गुणं ॥ यवानिकापंचगुणाषड्गुणाचहरीतकी ॥ चित्रकंसप्तगुणितंकुष्ठंचाष्टगुणंभवेत् ॥ एतद्वातहरंचूर्णंपीतमात्रंप्रसन्नया ॥ पिबेद्दध्नामस्तुनावासुरयाकोष्णवारिणा ॥ उदावर्तमजीर्णंचप्लीहानमुदरंतथा ॥ अंगानियस्यशीर्यंतेविषंवायेनभक्षितं ॥ अर्शोहरोदीपनश्च शूलघ्नोगुल्मनाशनः ॥ कासंश्वासंनिहंत्याशुतथैवक्षयनाशनः ॥ चूर्णोह्यग्निमुखोनाम्नानकस्मिन्प्रतिहन्यते ॥

अर्थ-हिंग १ भाग, वेखंड २, पिंपळी ३, आलें ४, ओंवा ५, बाळहरीतकी ६, चित्रक ७. व कोठ ८ भाग. याप्रमाणें भाग मिळून चूर्ण करावें, तें मद्याशीं, दह्यांशीं किंवा दह्यांच्या निवळीशीं, सुरेशीं, किंवा ऊन पाण्याशीं द्यावें; ह्मणजे उदावर्त, अजीर्ण, प्लीहा, उदरें व अंग गळतें तें, किंवा भक्षितविष, मुळव्याध, शूल, गुल्म, खोकला, दमा, आणि क्षय यांचा नाश करितें; आणि हें अग्निमुख चूर्ण दीपन आहे.

वृद्धाग्निचूर्ण.

द्वौक्षारौचित्रकंपाठाकरंजोलवणानिच ॥ सूक्ष्मैलापत्रकंभार्गींकृमिघ्नंहिंगुपुष्करं ॥ शठीदार्वीत्रिवृन्मुस्तावचाचेंद्रयवास्तथा ॥ धात्रीजीरकवृक्षाम्लयवासाचोपकुंचिका ॥ आम्लवेतसमम्लीकादाडिमंस्तकटुत्रिकं ॥ भल्लातकाजमोदाचयवानीसुरदारुच ॥ आपश्चातिविषा

श्यामाहपुषारग्वधसमं ॥ तिलमुष्ककशिग्रूणांकोकिलाक्षपलाशयोः ॥ क्षीराणिलोहकिट्टंचतप्तंगोमूत्रभावितं ॥ समभागानिसर्वाणिसूक्ष्म चूर्णानिकारयेत् ॥ मातुलुंगरसेनैवभावयेत्तुदिनत्रयं ॥ दिनत्रयंतुसू क्तेनतथैवार्द्ररसेनच ॥ अत्यंताग्निकरंचूर्णंप्रदीप्ताग्निसमप्रभं ॥ उप युक्तंविधानेननाशयत्यचिराद्गदान् ॥ अजीर्णकमथोगुल्मंप्लीहानमु दराणिच ॥ ग्रहणींपांडुरोगांश्चश्वासंकासंचदारुणं ॥ प्रतिश्यायंक्ष यंशोफंविद्रधिंकफजंतथा ॥ जठराण्यंत्रवृद्धिंचअष्ठीलांवातशोणि तं ॥ प्रणुदत्युल्बणान्दोषान्नष्टमग्निंचदीपयेत् ॥ समस्तव्यंजनो पेतंभक्तंदत्वातुभोजयेत् ॥ दापयेदस्यचूर्णस्यविडालपदमात्रकं ॥ गोदोहमात्रंतत्सर्वंद्रवेपक्त्वातिसोष्मकं ॥ एषोह्यग्निमुखश्चूर्णश्चर्णरा जोनिगद्यते ॥ ब्रह्मणानिर्मितोह्येषअश्विभ्यांपरिकीर्तितः ॥

अर्थ–टंकणखार, यवखार, चित्रक, पाहाडमूळ, करंज, पंचलवणें, बारीकएलची, तमालपत्र, भारंगमूळ, वावडिंग, हिंग, पुष्करमूळ, कचोरा, दारुहळद, तेंड, नागरमोथे, वेखंड, इंद्रजव, आंवळकाठी, जिरें, आमसोल, धमासा, कलौंजी जिरें, आम्लवेतस, चिंच, डाळिंब, सुंठ, मिरीं, पिंपळी, चिबवे, अजमोद, ओंवा, देवदार, वाळा, अतिविष, पिंपळी, हपुषा व बाहव्याचा मगज, हीं समभाग; व तिळ, घंटापाटली वृक्ष, शेवगा, उंसाचें बीं, पळसपापडी, रुई इत्यादिकांचे चीक तापवून गोमूत्राच्या भावना दिलेला मंडूर, हीं सर्व समभाग एकत्र करून त्याला महाळुंगाच्या रसांत तीन दिवस भावना द्याव्या, व कांजीच्या आणि आल्याच्या रसाच्या तीन तीन भावना द्याव्या; हें चूर्ण अ ग्नीला अत्यंत वाढविणारें आहे. हे रोज घेत गेलें असतां थोडया दिवसांत व्याधि दूर करितें; आणि अजीर्ण, गुल्म, प्लीहा, उदरें, संग्रहणी, पांडुरोग, दमा, खोकला, पडसें, क्षय, शोष, कफजविद्रधि, अंत्रवृद्धि, अष्ठीला, वातरक्त, त्रिदोष, व नष्टाग्नी यांचा नाश करितें. यावर संपूर्ण पदार्थयुक्त भोजन द्यावें. याचें मान एक तोळा आहे, हें अग्निमुख चूर्ण संपूर्ण औषधांत श्रेष्ठ असें ब्रह्मदेवानें अश्विनीकुमाराला सांगितलें. हें द्रवरूप द्रव्या- मध्यें गाईचें दूध काढी तों पर्यंत कढवावें.

यावशूकादिचूर्ण.

सयावशूकनागरंशिवाजलंचसादरं ॥
निहंत्यजीर्णजंदरंवदामितेपुरंदरं ॥

अर्थ–यवक्षार, सुंठ, हरीतकी, यांचा काढा अजीर्णापासून होणाऱ्या भयाचा नाश करितो.

लघुचित्रकादिचूर्ण.

दहनाजमोदसैंधवनागरमरिचाम्लतक्रेण ॥
सप्ताहादग्निकरंयदर्शोनाशनंपरं ॥

अर्थ–चित्रक, अजमोदा, सैंधव, सुंठ व मिऱ्यें, यांचें चूर्ण आंबट ताकाशीं सातदिवस द्यावें; ह्मणजे अग्निवृद्धि करितें, व मुळव्याधीचा नाश करितें.

शुंठ्यादिचूर्ण.

यवक्षारान्वितंशुंठीचूर्णलीढंघृतान्वितं ॥
उष्णोदकेनवापीतंशुंठीचूर्णंक्षुधाकरं ॥

अर्थ–सुंठ व यवक्षार याचें चूर्ण एकत्र करून तुपांतून किंवा ऊन पाण्याशीं द्यावें; ह्मणजे क्षुधा उत्पन्न करितें.

कणाद्यचूर्ण.

कणासिंधुशिवावन्हिचूर्णमुष्णेनवारिणा ॥
पीतंप्रातःक्षुधांकुर्यात्पावकस्यापिदीपनं ॥

अर्थ–पिंपळी, सैंधव, हरीतकी व चित्रक यांचे चूर्ण ऊन पाण्याशीं प्रातःकाळीं द्यावें; ह्मणजे क्षुधा व अग्निवृद्धि यांना करितें.

कपित्थादियोग.

कपित्थतक्रचांगेरीमरिचाजाजिचित्रकैः ॥
कफवातहरोग्राहीवल्योदीपनपाचनः ॥

अर्थ–कवंठ, ताक, चुका, मिऱ्यें, जिरें व चित्रकमूळ यांचा योग कफवातहारक, ग्राहक, बलदेणारा, दीपन, आणि पाचन असा आहे.

ज्वालामुखचूर्ण.

हिंग्वाम्लवेतसकटुत्रिकचित्रकाणांकर्षाःपृथक्गुडपलंयवचूर्णकंच ॥
ज्वालामुखोयमनलस्यकरोतिदीप्तिंचाजीर्णमात्रशमनेहिकृशानुरेषः ॥

अर्थ–हिंग, आम्लवेतस, त्रिकटु, चित्रकमूळ, आणि यवक्षार हीं प्रत्येक एक तोळा, आणि त्यात गूळ चार तोळे, घालावा. याला ज्वालामुखचूर्ण ह्मणतात. हें अग्निवृद्धि करितें; आणि अजीर्णाचा नाश करितें.

व्योषादि चूर्ण.

व्योषैलाहिंगुभार्गीविडलवणयवक्षारपाठायवानीचिंचात्वग्भस्मच

व्यंदहनगजकणात्वक्पटुग्रंथ्यजाजी ॥ एतच्चूर्णंघृताढ्यंत्रिदिवस
मशनेहन्यतेरोगजालंविश्वंवैश्वानरोयंदहतिसरभसांकिंपुनर्भुक्तमन्नं ॥

अर्थ–सुंठ, मिरीं, पिंपळी, एलची, हिंग, भारंगमूळ, बिडलोण, यवक्षार, पाहाड-मूळ, ओंवा, चिंचेचे सालीचें भस्म, चवक, चित्रक, गजपिंपळी, दालचिनी, मीठ, पिंपळमूळ व जिरें यांचें चूर्ण तुपाशीं तीन दिवस द्यावें; ह्मणजे संपूर्णरोगजालाचा नाश करितें. मग भोजनाची काय कथा. याला वैश्वानर चूर्ण ह्मणतात.

शुंठ्यादि चूर्ण.

शुंठीबाणमिताकणार्णवमितादीप्यायवानीक्रमाद्भागानांत्रितयंद्वयंच
लवणंभागैःशिवातत्समा ॥ कोष्ठाटोपरुगामगुल्ममलरुट्छोलिंवरा
जोदितश्चूर्णोद्रीनपिभस्मसात्प्रकुरुतेकिंभोजनंभोजनाः ॥

अर्थ–सुंठ ५ पिंपळी ४ अजमोदा ३ ओंवा २ मीठ १ व हरीतकी १६ भाग ह्यांचें चूर्ण पोटांत गुडगुड शब्द होतो तो, आम गुल्म व मळ यांचा नाश करितें; व हें भस्म पर्व-ताचें ही भस्म करील; मग भोजनाची काय कथा.

विश्वादि चूर्ण.

विश्वकणोपणनागदलैश्चत्वक्त्रुटिभिर्विहितंक्रमवृद्धं ॥
चूर्णमिदंसमखंडमरोचश्वासगुदोद्भवगुल्मवमीषु ॥

अर्थ–सुंठ, पिंपळी, मिरीं, विड्याचीं पानें, दालचिनी व बारीक एलची हे पदार्थ क्रमवृद्धीनें घेऊन एकत्र करून त्या सर्व चूर्णासमान खडीसाकर घालून द्यावें; ह्मणजे अरुचि, दमा, मुळव्याध, गुल्म, आणि वांति यांचा नाश करितें.

चित्रकादि चूर्ण.

कृशानुश्चव्यंवामरिचमगधाहिंगुचपलाशठीदीप्योविश्वायव
जयुगुलंपंचलवणं ॥ समंबीजद्रावैर्लुलितमथवादाडिमरसैर्ज
येदामान्रोगान्ग्रहणिकफतांवन्हितनुतां ॥

अर्थ–चित्रक, चवक, मिरीं, पिंपळी, हिंग, गजपिंपळी, कचोरा, ओंवा, सुंठ, यव-क्षार, सैंधव पंच लवणें, हीं प्रत्येक समभाग घेऊन महाळुंगाच्या रसांत भिजवावीं; ह्मणजे आमरोग, संग्रहणी, कफ, वायु, आणि अग्निमांद्य यांचा नाश करितें.

विडलवणादि चूर्ण.

विडंचित्रकंजाजियुग्मंयवानीशिवात्र्यूपणंधान्यसौवर्चलंच ॥ त्वचाति

त्तिडीकाजमोदाम्लवेतंसमंयोज्यमेतत्समंचाविडंगं ॥ विडादिरोगदार कंगदार्तिनांचतारकंह्यनेनजीर्यतेधराकथंनजानतेनराः ॥

अर्थ–विडलोण, चित्रक, जिरें, शहाजिरें, आंवा, हरीतकी, सुंठ, मिरीं, पिंपळी, धने, पादेलोण, दालचिनी, चिंच, अजमोदा, आम्लवेतस व वावडिंग, ह्यांचें समभाग चूर्ण एकत्र करावें. तें विडादिचूर्ण, संपूर्णव्याधींचें नाशक आहे.

वडवानलचूर्ण.

शिवाकरंजचित्रकंकणाजटाकटुत्रिकं ॥
सशर्करंसमांशकंविदंहिवाडवाग्निकं ॥

अर्थ–हरीतकी, करंजाची साल, चित्रक, पिंपळीमुळ, सुंठ, मिरीं. पिंपळी आणि साकर यांचे समभाग चूर्ण एकत्र करावें. त्याला वडवाग्निचूर्ण असें ह्मणतात. हें अजीर्णावर पाचन आहे

पंचाग्निचूर्ण.

आम्लवेतसधनंजयवज्रीमोरटातदनुसूरणएगः ॥
पंचवन्हिजठरानलवृध्यैतक्रसाकमिदमाशुहिपेयं ॥

अर्थ–आम्लवेतस, अर्जुनसादडा, निवडुंग, मोरवेल व सुरण या पांचांचे चूर्ण ताकाशीं घ्यावें; ह्मणजे अग्निवृद्धि करितें.

विश्वभेषजचूर्ण.

विश्वभेषजंहिंगुटंकणंमागधींचसौवर्चलंत्विदं ॥
शिग्रुपादजैर्भावितंरसैःशूलनाशनंक्षुत्प्रबोधनं ॥

अर्थ–सुंठ, हिंग, टांकणखार, पिंपळी व पादेलोण यांचे चूर्णाला शेवग्याच्या मुळांचें रसाची भावना द्यावी; ह्मणजे तें शूलनाश करितें, व क्षुधा उत्पन्न करितें.

संजीवनीगुटी.

विडंगंनागरकृष्णापथ्यावन्हिविभीतकाः ॥ वचागुडूचभिल्लातंविषंचात्रप्रयोजयेत् ॥ एतानिसमभागानिगोमूत्रेणैवपेषयेत् ॥ गुंजाभांवटिकांकुर्याद्द्याद्दार्द्रकजैरसैः ॥ एकामजीर्णयुक्तस्यद्वेविपूच्यांप्रदापयेत् ॥ तिस्रोभुजंगदष्टस्यचतस्रःसन्निपातिनः ॥ गुटिकाजीवनीनाम्नासंजीवयतिमानवं ॥

अर्थ–वावडिंग, सुंठ, पिंपळी, हरीतकी, चित्रक, बेहेडे, वेखंड, गुळवेल, बिबवे

व अतिविष ही सर्व समभाग चूर्णे घेऊन त्यांचा गोमुत्रांत खल करावा; नंतर गुंजे एवढी गोळी करून ती आल्याच्या रसाशीं अजीर्णावर एक द्यावी; व विषूचीवर दोन, साप चावला असतां तीन, आणि सन्निपातावर चार द्याव्या. ही संजीवनीनामक गुटी मनुष्यांला संजीवन करित्ये.

धनंजयवटी.

जरिकंचित्रकंचव्यंसमुगंधंवचात्वचो ॥ एलाकर्पूरहपुपाकारवीनाग
केसरं ॥ पृथक्कर्षमितख्यातमितिकर्पार्धसंमितं ॥ यवानीपिप्पलीमू
लंस्वर्जिकाचहरीतकी ॥ जातीफललवंगंचपृथक्कर्षयुगंमतं ॥ धान्य
कंपत्रकंचापिकर्षत्रयमितंपृथक् ॥ कृष्णापलप्रमाणंस्यात्पलमानंतुरो
मकं ॥ मरिचानिचनःसप्तत्रिवृन्मलापलद्वयं ॥ पृथग्दशाक्षंसामुद्रंसैं
धवंनागरंतथा ॥ शरावसंमितंचुक्रंतदर्धंतिंतिणीफलं ॥ धनंजयवटीह्येषा
धनंजयविवर्धिनी ॥ जीर्णंचजरयत्याशुशूलमुन्मूलयेद्द्रुतं ॥ हरेद्विबं
धेनसममाध्मानंकर्पयत्यपि ॥ ग्रहण्यानिग्रहंकुर्याद्रचयेद्रुचिमुत्तमां ॥

अर्थ–जिरें, चित्रक, चवक, संचळ, वेखंड, दालचिनी, एलची, कापूर, हंसपादी अजगोदा, नागकेशर, हीं प्रत्येकीं १ तोळा; ओंवा, पिंपळीमूळ, सार्जेखार, हरीतकी, हीं प्रत्येक अर्धा तोळा; आणि जायफळ व लवंग, हीं दोन दोन तोळे; व धने, तमाल पत्र, हीं तीन तोळे, पिपळी व सांबरमीठ ४ तोळे, मिरीं ७ तोळे, तेड ८ तोळे, मीठ १० तोळे, सैंधव व सुंठ १० तोळे, व चुका ३२ तोळे व चिंच १६ तोळे, हीं सर्व चूर्णे एकत्र करून त्याची गोळी करून द्यावी. ती धनंजयवटी अग्नीला वाढवित्ये; व अजीर्णाला जिरवित्ये, व शूलाला उपटून काढित्ये, व विटूबंध, आध्मान व संग्रहणी यांचा नाश करित्ये; आणि रुचि उत्पन्न करित्ये.

शंखवटी.

चिंचाश्वत्थस्नुहिक्षारादपामार्गार्ककंतथा ॥ लवणंपंचसंगृह्यततोलव
णपंचकात् ॥ सैंधवाद्यान्समादायसर्वमेतत्पलद्वयं ॥ द्वौद्वौकर्पौपृथ
क्कार्यौतथाद्वौशंखचूर्णतः ॥ फलत्रयाच्चकर्षैकंद्विकर्षंतुलवंगकं ॥ एत
त्सर्वंसमासाद्यश्लक्ष्णचूर्णीकृतंशुभं ॥ भावयेदम्लयोगेनसप्तधाचप्रयत्न
तः ॥ रसःशंखवटीनामसेवितःसर्वरोगजित् ॥ गुंजामात्रमिमंखादेद्व
ह्नेर्दीपनपाचनं ॥ अजीर्णवातसंभूतंपित्तश्लेष्मभवंतथा ॥ विषूचींशू
लमानाहंहन्यादत्रनसंशयः ॥

अर्थ—चिंच, पिंपळ, निवडुंग, आघाडा, रुई, यांचे क्षार, पंच लवणें सैंधवादिक हीं प्रत्येकी ८ तोळे, शंखभस्म २ तोळे, त्रिफळा १ तोळा व लवंग २ तोळे, या संपूर्णांचें चूर्ण एकत्र करून त्याला निंबूच्या रसांत ७ भावना द्याव्या. हा शंखवटी रस १ गुंज सेवन केला असतां, संपूर्ण रोगांला जिंकितो, व दीपन व पाचन आहे; आणि अजीर्ण, वात, पित्त व कफ यांपासून झालेलें अजीर्ण. व विषूचिका, शूल व आनाहवायु यांचा नाशकरितो.

लवंगामृतवटी.

सर्वार्धंदेवपुष्पंमरिचमगधयोस्त्रि.स्त्रिकर्षंयवान्योरष्टावष्टाग्नितोपित्रिप
टुरथपलंग्रंथिकंसप्तकर्षं ॥ शुंठीपथ्यादशाक्षामलककलिफलाजाजिच
व्याघ्रपट्पट्सुत्रामप्रीतिपात्रंनखमितमखिलंचूर्णितंवस्त्रपूतं ॥ त्रिर्भा
व्यंचार्द्रकस्यद्रवमपिविधिवन्मापयुग्मप्रमाणावद्धाचुक्रेणसिद्धाप्रभव
तिगुटिकासौलवंगामृताख्या ॥ भुक्तायुक्तासकलसुखकरीदीप्तिमग्ने
र्विधत्तेवृष्यापुष्यावपुष्यामयनिचयत्दतिख्यातिपूर्णाविभाति ॥

अर्थ—मिरीं व पिंपळी हीं प्रत्येक ३ तोळे, ओंवा व चित्रक ८ तोळे, लवणत्रय ४ तोळे, पिंपळीमूळ ७ तोळे, सुंठ व हरीतकी १० तोळे, वेहेडे, आवळकाठी, विवळे, जिरें, व चवक हीं ६ तोळे, इंद्रजव २० तोळे, या सर्वांचें चूर्ण गाळून घेऊन एकत्र करावें; आणि सर्वचूर्णासमान लवंगाचें चूर्ण मिळवून त्याला आल्याच्या रसाच्या व चुक्याच्या रसाच्या तीन तीन भावना द्याव्या; आणि दोन माशांची गोळी करावी. ही लवंगामृताख्या वटी भक्षण केली असतां, अग्नि प्रदीप्त करिते, व वृष्य आणि संपूर्ण सुखें देणारी आहे; आणि रजसंबंधीं व्याधींचा नाश करिते.

व्योषादिगुटी.

त्रिकटुपिप्पलीमूलमेलालवणपंचकं ॥ द्विजीरधान्यकंनागके
सरंसारत्वक्समैः ॥ चुक्राव्हातिंतिडीकाद्रिलवणंमर्चचार्द्रकं ॥
निंबुनीरेणतद्भाव्यंरोगत्दद्वन्हिदीपनं ॥

अर्थ—सुंठ, मिरीं, पिंपळी, पिंपळमूळ, एलची, पंच लवणें, जिरें, शाहाजिरें, धनें, नाकेशर, कात, दालचिनी, चुका, चिंच व सैंधव हीं समभाग एकत्र करून त्याला आल्याच्या व निंबूच्या रसाच्या भावना द्याव्या, ही वटी रोगनाशक व अग्निदीपक आहे.

हरीतक्यादिवटी.

हरीतकीहरिहरतुल्यपड्गुणाचतुर्गुणाचतुरविशालपिप्पली ॥
चित्रकंवरदवरैकसैंधवंरसायनंकुरुनृपवटीवन्हिदीपनी ॥

अर्थ—बाळहरीतकी ६ भाग, व पिंपळी, आणि गजपिंपळी ४ भाग, चित्रक १ भाग, व सैंधव १ भाग, हीं सर्व एकत्र करावीं; ह्मणजे अग्नि प्रदीप्त करणारी अशी वटिका होत्ये. ही रसायन आहे.

तक्रहरीतकी.

तक्रेसुसंस्वेद्यशिवाशतानितद्बीजमुद्धृत्यचकौशलेन ॥ षडूषणंपंचप टूनिहिंगुक्षारावजाजीमजमोदकंच ॥ षडूषणादेस्त्रिवृदर्धभागंगणेनदे यंपटगालितस्य ॥ विभाव्यचुक्रेणरजांस्यमीपांक्षिपेच्छिवांबीजनिवास गर्भे ॥ समूह्यघर्मेपुविशोष्यतासांहरीतकीमन्यतमांनिषेवेत् ॥ अजीर्ण मंदानलजाठरामयान्समूलशूलग्रहणीगुदांकुरान् ॥ विबंधमानाहरुजो जयत्यसौसआमवातावमृताहरीतकी ॥

अर्थ—१०० हरीतकी घेऊन त्या ताकांत पचन कराव्या; व त्यांचे बीज काढून टाकावें; आणि पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रकमूळ, सुंठ, मिरीं, मीठ, टांकणखार, सैंधव, बिडलोण, संचळ, हिंग, यवक्षार, जिरें व अजमोद, हीं प्रत्येकीं १ तोळा; आणि निशोत्तर अर्धा तोळा, यां सर्वांची वस्त्रगाळ चूर्णें एकत्र करून त्याला चुक्याच्या रसाची भावना द्यावी; आणि तें पूर्वोक्त हरीतकींत भरून त्या उन्हांत ठेवून सुकवाव्या. त्यांतून एक हरीतकी खात जावी; ह्मणजे अजीर्ण, मंदाग्नि, उदररोग, शूल, संग्रहणी, मुळव्याध, विट्बंध, आनाह वायु, आणि आमवात यांचा नाश करित्ये. हिलाच अमृत हरीतकी ह्मणतात.

चित्रकगुड.

वन्हेर्द्विपंचमूलस्यक्वाथेपलशतद्वये ॥ अमृतायारसस्यैकंपूतेस्मिन्नभ याढकं ॥ पचेद्गुडतुलांदत्वायावदापाकलक्षणं ॥ अन्येद्युस्तुसुशी तेस्मिन्मधुनःकुडवद्वयं ॥ प्रत्येकंस्याद्यवक्षाराच्छुक्तिस्तस्मिन्रसाय ने ॥ उत्तमंकथितंपुंसामश्विभ्यामग्निवृद्धये ॥ जीर्येत्यपिचकाष्ठानि कासश्वासकृमिक्षयान् ॥ गुल्मोदरार्शःकुष्ठानिसांत्रवृद्धीनिहंतिच ॥ योगैःशतैरप्यजितान्ग्रहाज्जयतिपीनसान् ॥

अर्थ—चित्रक, आणि दशमुळें यांचा ८०० तोळे काढा व गुडूचीरस २९६ तोळे, व हरीतकी २९६ तोळे, आणि गूळ ४०० तोळे, घालून पाक होई इतकें कढवून त्यांत दुसरे दिवशीं ३२ तोळे मध व यवक्षार २ तोळे घालून सर्व एकत्र करावें. हा चित्रक गुड अश्विनीकुमारांनीं पुरुषाला अग्निवृद्धिकरितां उत्तम सांगितला आहे. हा भक्षण करू

न वर काष्ठें भक्षण केलीं तरी जिरतात; व दमा, खोकला, कृमि, क्षय, गुल्म, उदर, अर्श, सर्व कुष्ठें व अंत्रवृद्धि यांचा नाश करितो; आणि तीन दिवसांत पीनसरोगाला जिंकितो.

द्राक्षादियोग.

विदह्यतेयस्यतुभुक्तमात्रंदह्यंतिह्रत्कोष्टगतामलाश्च ॥
द्राक्षासितामाक्षिकसंप्रयुक्तांलीढ्वाभयांवासुखंलभेच्च ॥

अर्थ–जेवल्यावर पोटांत जळजळते, आणि कोष्ठ व ह्रदय, यांत आग होते. त्याणे द्राक्षें, साखर, मध, आणि हरीतकी, हीं भक्षण करावीं; म्हणजे सुख होईल.

यवागू.

चित्रकचविकानागरभागाभ्यधिकाम्रकैर्यवागूःस्यात् ॥
गुल्मानिलशूलहरीसचित्रदावन्हिजननीच ॥

अर्थ–चित्रक १ चवक २ व सुंठ ३ भाग घेऊन त्यांशीं यवागू सिद्ध करावी. ती गुल्म, वायु व शूल यांचा नाश करिते; व अग्नि प्रदीप्त करिते. ही यवागू आश्चर्य कारक आहे.

क्रव्यादकल्क.

एलालवंगमरिचंकृष्णाशुक्तिसमन्वितं ॥ चुक्रनागरसिंधूत्थ
शूकंलवणपंचकं ॥ एषांचूर्णंवस्त्रपूतंक्रव्यादोनातिरिच्यते ॥

अर्थ–एलची, लवंगा, मिरीं, शिंपोचें भस्म, चुका, सुंठ, सैंधव, भटोरा व पंच लवणें यांचें वस्त्रगाळ चूर्ण एकत्र करावें. तें क्रव्यादरसाबरोबर गुणकारी आहे.

क्षारयोग.

द्वौक्षारौटंकणंसूतंलवंगंलवणत्रयं ॥ पिप्पलीगंधकंशुंठीमरिचंपलसं
मितं ॥ कर्षमेकंविषंदत्वासूक्ष्मचूर्णानिकारयेत् ॥ अर्कदुग्धस्यदातव्या
भावनाःसप्तवासरं ॥ अंधमूषागजपुटेस्वांगशीतंसमुद्धरेत् ॥ ततोल
वंगमरिचंफटिकानांपलंपलं ॥ सर्वंसंमर्द्यसुदृढंदृढभांडेनिधापयेत् ॥
सोयंगुंजाद्वयंखादेद्भुक्तंद्रावयतिक्षणात् ॥ पुनर्भोजनवांछांचजनयेत्प्र
हरोपरि ॥ आममांसंद्रावयतिश्लेष्मरोगनिकृंतनः ॥

अर्थ–सज्जीखार व यवखार, टांकणखार, पारा, लवंगा, सैंधव, बीड, काचलोण, पिंपळी, गंधक, सुंठ व मिरीं हीं प्रत्येकीं चार चार तोळे व वचनाग १ तोळा यांचें बारीक चूर्ण करून त्याला रुईचे चिकाच्या ७ भावना द्याव्या; नंतर अंधमूषेंत घालून गजपुट द्यावें. शीत झाल्यावर काढून लवंग, मिरीं व फटकी यांचें चार चार

तोळे चूर्ण करून त्यांत मिळवावें; नंतर घोटून भांड्यांत भरून ठेवावें. तें दोन गुंजा घ्यावें; ह्मणजे क्षणांत भोजनाला जिरवितें; व पुनः भोजन करण्याची इच्छा उत्पन्न करितें; आणि हिरव्या मांसाला द्रववितें; व कफरोगाला शमवितें.

अग्निमुखरस.

सुतंगंधंविषंतुल्यंमर्दयेदार्द्रकद्रवैः ॥ अश्वत्थचिंचापामार्गक्षारक्षारौ चटंकणं ॥ जातीफलंलवंगंचत्रिकटुत्रिफलासमं ॥ शंखक्षारंपंचपटू कंहिंगुजीरंद्विभागकं ॥ मर्दयेदम्लयोगेनगुंजामात्रंवटीकृता ॥ पाचनीदीपनीसद्योजीर्णशूलविषूचिकाः ॥ हिक्कांगुल्मंचोदरंचनाशयें न्नात्रसंशयः ॥ रसेंद्रसंहितायाश्चनाम्नावन्हिमुखोरसः ॥

अर्थ–पारा, गंधक व वचनाग हे आल्याच्या रसांत खलून, नंतर पिंपळ, चिंच व आघाडा यांचे खार, यवखार, साजेखार, टांकणखार, जायफळ,लवंग, सुंठ, मिरीं, पिंपळी, हरडा, बेहेडा, आवळकाठी, शंखभस्म व जवखार, पुष्कर, सज्जीखार, पळस, तिळाची कांडी, यव यांचे क्षार, हिंग व जिरें हे दोन भाग, हे सर्व एकत्र करून आम्लयोगानें मर्दन करून गुंजे एवढी गोळी करून खावी, ती दिपन व पाचन आहे; आणि अजीर्ण, तरळ, उचकी, गुल्म व उदर यांचा नाश करिते. हिला रसेंद्रयुक्तना, वानें वन्हिमुख रस ह्मणतात.

अजीर्णारिरस.

शुद्धंसूतंगंधकंचपलमानंपृथक्पृथक् ॥ हरीतकीचद्विपलानागरस्त्रिपलः स्मृतः ॥ कृष्णाचमरिचंतद्वत्सिंधूत्थंत्रिपलंपृथक् ॥ चतुःपलाचविजया मर्दयेन्निंबुकद्रवैः ॥ पुटानिसप्तदेयानिघर्ममध्येपुनःपुनः ॥ अजीर्णारि रयंप्रोक्तःसद्योदीपनपाचनः ॥ भक्षयेद्द्विगुणंभक्ष्यंपाचयेद्रेचयेदपि ॥

अर्थ–शुद्ध पारा व गंधक हे चार चार तोळे व हरीतकी ८ तोळे. सुंठ १२ तोळे व पिंपळी, मिरीं, सैंधव, हीं प्रत्येकी बारा तोळे, व भांग १६ तोळे यांचे चूर्ण एकत्र करून उन्हांत लिंबूच्या रसाचीं सात पुटें द्यावीं. हा अजीर्णारिरस दीपन व पाचन आहे. हा भक्षण करून दुप्पट जेवावें; त्याला पचन करून रेचन ही करितो.

पाशुपतरस.

कर्षंसूतंद्विधागंधंत्रिभागंभस्मतीक्ष्णकं ॥ त्रिभिःसमंविषंयोज्यंचित्रक द्रवभावितं ॥ द्विधात्रिकटुकंयोज्यंलवंगैलातुतत्समें ॥ जातीफलंजा तिपत्रीचार्धभागमितंसमं ॥ तथार्धपंचलवणंस्नुह्यर्कौवापितिचिंणो ॥

अपामार्गाश्वत्थएपांलवणंचपलार्धकं ॥ टंकणंयावकक्षारंस्वर्जिकांहिंगुजीरकं ॥ हरीतकीसुतस्तुल्यामर्दयेदम्लयोगतः ॥ धूर्तबीजस्यभस्मंतुसर्वैसप्तमभागतः ॥ रसःपाशुपतोनामप्रोक्तःप्रत्ययकारकः ॥ गुंजामात्रावटीकार्यासर्वाजीर्णविनाशिनी ॥ तालमूलीतक्रयोगादुदरामयनाशिनी ॥ मोचरसेनातिसारंग्रहणींतक्रसैंधवैः ॥ शूलेनागरकंशरतंहिंगुसौवर्चलान्वितं ॥ अर्शस्सुतक्रेणहितापिप्पलीराजयक्ष्मणि ॥ वातरोगंनिहंत्याशुशुंठीसौवर्चलान्विता ॥ गुडूचीशर्करायोगात्पित्तरोगविनाशिनी ॥ पिप्पलीक्षौद्रयोगेनश्लेष्मरोगंनिकृंतति ॥ अतःपरतरानास्तिधन्वंतरमतेवटी ॥

अर्थ–पारा १ तोळा, गंधक २ तोळे व कांतभस्म ३ तोळे, या सर्वांसमान बचनाग घेऊन चित्रकाच्या रसांत खल करावा; आणि सुंठ, मिरीं व पिंपळी, हीं ९ भाग व लवंग, एलची २ भाग, जायफळ व जायपत्री, हीं एकेक भाग, पंचलवणें ५तोळे, व निवडुंग, रुई, चिंच, अघाडा व पिंपळ, यांचे क्षार प्रत्येकीं तोळे २ टांकणखार, यवक्षार, सर्जिक्षार, हिंग, जिरें व हरीतकी, हीं प्रत्येकीं एकेक तोळा घेऊन अम्लवर्गांत भावना देऊन त्यांत धोतऱ्याच्या बियांचें भस्म ७ भाग घालावें; आणि गुंजेची गोळी करावी. हा पाशुपतनामक रस सद्यः प्रत्यय करणारा आहे. हा संपूर्ण अजीर्णाचा नाश करितो. व तालमूल व ताक यांशीं उदरावर, अतिसारावर मोचरसाशीं, ग्रहणीवर ताक व सैंधव, यांशीं शूलावर सुंठ, हिंग, व पादेलोण यांशीं, अर्शावर ताकाशीं, क्षयावर पिंपळीशीं, वायूवर सुंठ व पादेलोण यांशीं, पित्तावर गुळवेल व साखर यांशीं, कफरोगावर पिंपळी व मध यांशीं द्यावा. ह्या पाशुपत रसाहून दुसरा धन्वंतरिमतें श्रेष्ठ रस नाहीं.

आदित्यरस.

दरदंचविषंगंधंत्रिकटुत्रिफलासमं ॥ जातीफलंलवंगंचलवणानिचपंचवै ॥ सर्वमेकीकृतंचूर्णमम्लयोगेनसप्तधा ॥ भावयित्वावटींकुर्याद्गुंजार्धप्रमितांबुधैः ॥ रसोह्यादित्यसंज्ञोयमजीर्णक्षयकारकः ॥ भुक्तमात्रंपाचयतिजठरानलदीपनः ॥

अर्थ–हिंगुळ, बचनाग, गंधक, सुंठ, मिरीं, पिंपळी, हरडा, बेहेडा, आवळकाठी, जायफळ, लवंग, वांगडखार, सैंधव, लवण, बिडलोण, संचळ, हीं संपूर्ण एकत्रकरून आम्लवर्गाच्या सात भावना द्याव्या; आणि अर्धेगुंजेची वटी करावी. हा आदित्यनामक रस अजीर्णनाशक आहे. व जें खावें तें पचवितो व अग्नि प्रदीप्त करितो.

हुताशनरस.

एकंचदिग्द्वादशभागमानंयोज्यंविषंटंकणमूषणंच ॥
हुताशनोनामहुताशनस्यकरोतिवृद्धिंकफवातहंता ॥

अर्थ—वचनाग १, टांकणखार ८, व मिरीं १२ भाग, हे एकत्र करून घोटावा. हा हुताशनरस अग्निवृद्धि करितो; आणि वायु व कफ यांचा नाश करितो.

अजीर्णकंटकरस.

शुद्धसूतविषगंधकंसमंतुल्यभागमरिचंचचूर्णितं ॥ मर्दयेत्तुबृहतीफल द्रवैरेकविंशतिविभावितंपुनः ॥ गुंजिकात्रयमिदंसुभक्षितंसद्यएवज ठराग्निवर्धनं ॥ एषकंटकरसोविषूचिकाजीर्णमारुतगदान्निहंतिच ॥

अर्थ—शुद्ध पारा, वचनाग व गंधक हे समभाग, व मिरीं तिहींचे समान घेऊन रिंगणीच्या रसाच्या २१ भावना द्याव्या; आणि तीन गुंजा द्यावा; ह्मणजे तो अग्नीची वृद्धि करितो; आणि हा कंटकरस तरळ, अजीर्ण व वायु यांचा नाश करितो.

रामबाणरस.

पारदामृतलवंगगंधकंभागयुग्ममरिचेनमिश्रितं ॥ तत्रजातिफलम र्धभागिकंतिंतिणीफलरसेनमर्दितं ॥ वन्हिमांद्यदशवक्त्रनाशनोराम बाणइतिविश्रुतोरसः ॥ संग्रहग्रहणिकुंभकर्णयोःसामवातखरदूषणंज येत् ॥ दीयतेतुचणकानुमानतःसद्यएवजठराग्निदीपनः ॥ रोचनोक फकुलांतकारकोश्वासकासवमिजंतुनाशनः ॥

अर्थ—पारा, वचनाग, लवंगा व गंधक हीं समभाग; व मिरीं २ भाग व जायफळ अर्धाभाग, एकत्र करून चिंचेच्या रसांत खल करावा. हा रामबाण रस चण्याएवढा द्यावा; ह्मणजे संग्रहणी, आमवात, मंदाग्नि, कफ, दमा, खोकला, वांति आणि कृमि, यांचा नाश करितो.

दुसरा प्रकार.

त्रिनिष्कंशुद्धनेपालंविषगंधेशटंकणं ॥ भृंगराजरसैःपिष्ट्वाभू योवटकसाधितः ॥ रामबाणरसःख्यातोद्विगुंजःश्लेष्मवातहा ॥ अजीर्णाध्मानावष्टंभशूलेषुश्वासकासयोः ॥

अर्थ—शुद्ध जेपाळ ४ मासे व वचनाग, गंधक व पारा हे एकेक मासा एकत्र करून माक्याच्या रसांत घोटावे, त्याची दोन गुंजेची गोळी करून द्यावी. ती कफ, वायु, अजीर्ण, आध्मान, विष्टंभ, शूल, दमा व खोकला, यांचा नाश करिते.

ज्वालानलरस.

एलात्वक्गगनपुष्पाणामन्नोत्तरविवर्धिताः ॥ मरीचांपिप्पलीशुंठीचनुः पंचषडुत्तरा ॥ द्रव्याण्येतानियावंतितावद्धिसितशर्करा ॥ चूर्णमेतत्प्रयोक्तव्यमग्निसंदीपनंपरं ॥ क्षारत्रयंसूतगंधौपंचकोलमिदंशुभं ॥ सर्वैस्तुल्या जयाभ्रष्टातदर्धशिग्रुजाजटा ॥ एतत्सर्वंजयाशिग्रुवन्हिमार्द्रकजैर्द्रवैः ॥ भावयेत्रिदिनंघर्मेततोलघुपुटेक्षिपेत् ॥ सप्तधार्द्रद्रवैर्घृष्टोरसोज्वालानलोभवेत् ॥ निष्कंचमधुनालिह्यानुपानंगुडनागरं ॥ हंत्यजीर्णमतीसारंग्रहणीमग्निमार्दवं ॥ श्लेष्मत्वल्लासवमनमालस्यमरुचिंजयेत् ॥

अर्थ—एलचीं १, दालचिनी २, अभ्रक भस्म ३, लवंगा ४, मिरीं ४, पिंपळी ५, सुंठ ६ भाग याप्रमाणें घेऊन सर्व चूर्णाचे समान पांढरी साकर घालोन तयार करावें. तें दिलें असतां, अग्नीला दिपन करितें.व तीन क्षार, पारा, गंधक, पिंपळी, पिंपळीमूळ, चवक, चित्रकमूळ, सुंठ, हे समभाग व सर्वचूर्णांसमान भाजलेली भांग व भांगेच्या निमे शेवग्याचें मूळ, ह्या सर्वांचीं चूर्णें एकत्र करून त्याला जया, शेवगा, चित्रक व आलें, यांच्या रसांत घालून उन्हात ठेवावें; नंतर त्याला लघुपुट द्यावें. शीत झाल्यावर आल्याच्या रसाच्या सात भावना द्याव्या. हा ज्वालानल रस ४ मासे मधाशीं द्यावा. व मागून सुंठ व गूळ भक्षणार्थ द्यावा; ह्मणजे अजीर्ण, अतिसार, संग्रहणी, मंदाग्नि, कफ, मळमळ, वांति, आळस आणि अरुचि, यांचा नाश करितो.

चिंतामणिरस.

रसंगंधमृतंशुल्वंमृतमभ्रंफलत्रिकं ॥ त्र्यूषणंजयपालंचसमंखल्वेविमर्दयेत् ॥ द्रोणपुष्पीरसंभाव्यंशुष्कंतद्वस्त्रगालितं ॥ चिंतामणिरसोह्येष अजीर्णेशंसतेसदा ॥ ज्वरमष्टविधंहंतिसर्वशूलहरःपरः ॥ गुंजैकंवा द्विगुंजंवाआमवातहरःपरः ॥

अर्थ—पारा, गंधक, ताम्रभस्म, अभ्रकभस्म, हरडा, बेहेडा, आवळकाठी, सुंठ, मिरीं, पिंपळी व जेपाल, हीं सर्व समभाग घेऊन कुंभ्याच्या रसांत खलोन सुकल्यावर वस्त्रावर गाळून घ्यावी. हा चिंतामणि रस. अजीर्णावर सांगितला आहे. हा आठ प्रकारचे ज्वर, संपूर्ण शूल, आणि अमवात, यांचा नाश करितो. याचें मान दोन गुंजा आहे.

पंचमूल्यादिघृत.

पंचमूल्याभयाव्योषपिप्पलीमूलसैंधवं ॥ रास्नाक्षारद्वयाजाजीविडंग

सटिभिर्घृतं ॥ युक्तेनमातुलिंगस्यस्वरसेनार्द्रकस्यच ॥ तक्रमस्तुसुरा मंडसौवीरकतुषोदकैः ॥ कांजिकेनतुयत्पक्कंपीतमग्निकरंस्मृतं ॥ गुल्म शूलोदरश्वासकासानिलकफापहं ॥

अर्थ-पंचमुळें, हरीतकी, सुंठ, मिरीं, पिंपळी, पिंपळीमूळ, सैंधव, रासना, यवखार, सैंधव, जिरें, वावडिंग, यांचा काढा करून तो तूप, महाळुंगाचा रस, आल्याचा रस, ताकाची निवळी, मद्य, गव्हाची कांजी, तुषांचा काढा व कांजी, यांत पचवावा; आणि घृत घ्यावें. तें पिण्याकरितां द्यावें; ह्मणजे अग्निवृद्धि करितें. व गुल्म, शूल, उदर, दमा, खोकला, वायु, आणि कफ, यांचा नाश करितें

दशमूलादिघृत.

मरिचंपिप्पलीमूलंनागरंपिप्पलीतथा ॥ भल्लातकयवानीचविडंगंग जपिप्पली ॥ हिंगुसौवर्चलंचैवअजाजीविडधान्यकं ॥ सामुद्रंसैंधवं क्षारंचित्रकंवचयासह ॥ एभिरर्धपलैर्भागैर्घृतप्रस्थंविपाचयेत् ॥ दश मूलरसेसिद्धंपयसाष्टगुणेनवा ॥ मंदाग्नेश्चहितंसिद्धंग्रहणीदोषनाशनं ॥ विष्टंभमामदौर्बल्यंप्लीहानमपिकर्षयेत् ॥ कासंश्वासंक्षयंवापिदुर्नामानं भगंदरं ॥ कफजान्हंतिरोगांश्चवातजान्क्रमिसंभवान् ॥ तान्सर्वान्ना शयत्याशुशुष्कंदावानलोयथा ॥

अर्थ-मिरीं, पिंपळीमूळ, सुंठ, पिंपळी, बिबवे, ओंवा, वावडिंग, गजपिंपळी, हिंग, संचळ, जिरें, बिडलोण, धने, मीठ, सैंधव, यवक्षार, चित्रक, वेखंड, हीं प्रत्येकीं २ तोळे घेऊन त्यांचा काढा करून तो तूप ६४ तोळे, दशमुळाचा रस, दूध, हे आठपट घालोन मंदाग्निवर सिद्ध करावें. तें संग्रहणी, विष्टंभ, आम, दुर्बळपणा, प्लीहा, श्वास, कास, क्षय, मुळव्याध, भगंदर, कफरोग, वातरोग, कृमिरोग, यांला जसा शुष्क अरण्याला अग्नि नाश करितो, तसें नाश करील.

धान्यादिघृत.

धान्यजीरकसंसिद्धंघृतमग्निविवर्धनं ॥
रोचनंदोषशमनंवातपित्तविनाशनं ॥

अर्थ-धने व जिरें यांच्या काढ्यांत घृत सिद्ध करावें. तें अग्निला वाढविणारें, रोचक व दोषनाशक, आहे. व वायु व पित्त यांचा नाश करितें.

अग्निघृत.

पिप्पलीपिप्पलीमूलंचित्रकंगजपिप्पली ॥ हिंगुचव्याजमोदाचपं चै

वलवणानिच ॥ द्वौक्षारौहपुषाचैवदद्याद्द्विपलोन्मिता ॥ दधिकांजिकसूक्तानिस्नेहमात्रसमानिच ॥ आर्द्रकस्वरसप्रस्थंघृतप्रस्थेविपाचयेत् ॥ एतदग्निघृतंनाममंदाग्नीनांप्रशस्यते ॥ अर्शसांनाशनंश्रेष्ठंतथा गुल्मोदरापहं ॥ नाशयेद्ग्रहणीदोषंश्वयथुंसभगंदरं ॥ येचबस्तिगतारोगायेचकुक्षिसमाश्रयाः ॥ सर्वांस्तान्नाशयत्याशुसूर्यस्तमइवोदितः ॥

अर्थ–पिंपळी, पिंपळीमूळ, चित्रक, गजपिंपळी, हिंग, चवक, अजमोदा, पंच लवणें, दोन क्षार, हपुषा, हीं प्रत्येक दोन तोळे. घेऊन त्यांचा काढा किंवा कल्क, दहीं, कांजिक, सूक्त, घृत; आणि आल्याचा रस हीं प्रत्येकीं ६४ तोळे एकत्र करून मंदाग्नीवर पचन करावीं; तें अग्निनामकघृत मंदाग्नीला प्रशस्त आहे. व अर्श, गुल्म, उदर, संग्रहणी, सूज, भगंदर, बस्ति; आणि कुक्षि, यांतील रोग या सर्वांचा नाश करितें. जसा सूर्योदय झाला असतां, अंधकाराचा नाश होतो तसा.

शार्दूलकांजिक.

पिप्पलींशृंगवेरंचदेवदारुसचित्रकं ॥ चवींसंबिल्वपेशींचअजमोदांहरीतकीं ॥ महौषधिंयवानींचधान्यकंमरिचंतथा ॥ जीरकंचापिनिहितंकांजिकंसाधयेद्भिषक् ॥ एषशार्दूलकोनामकांजिकोग्निबलप्रदः ॥ सिद्धार्थतैलसंभृष्टोदशरोगान्व्यपोहति ॥ कासंश्वासमतीसारंपांडुरोगंचकामलां ॥ आमंचगुल्मशूलंचवातशूलंसवेदनं ॥ अर्शांसिश्वयथुंचैवभुक्तपातंचशाश्वतं ॥ क्षीरपाकविधानेनकांजिकस्यापिसाधनं ॥

अर्थ–पिंपळी, आलें, देवदार, चित्रक, चवक, बेलाची पाळें, अजमोदा, हरीतकी, सुंठ, ओंवा, धनें, मिरीं व जिरें हे पदार्थ घालून कांजी सिद्ध करावी, तिचें नांव शार्दूल कांजिक. हिला मोहोऱ्यांच्या तेलाची फोडणी द्यावी; ह्मणजे खोकला, दमा, अतिसार, पांडुरोग, कावीळ, आंव, गुल्म, शूल, वातशूल, पोटदुखी, मुळव्याध, सूज, भुक्तपाति यांचा नाश करिते. ही कांजी क्षीरपाकासारिखी सिद्ध करावी.

विषूचिकादिसंप्राप्तिनिदान.

सूचीभिरिवगात्राणितुदन्संतिष्ठतेनिलः ॥
यत्राजीर्णेचसावैद्यैर्विषूचीतिनिगद्यते ॥

अर्थ–जा अजीर्णामध्यें वायूनें गात्रांत सूईनें टोचल्यासारिख्या पीडा होतात त्याला वैद्य विषूचिका ह्मणतात.

नतांपरिमिताहारालभंतेविविधागमाः ॥
मूढास्तामजितात्मानोलभंतेशनलोलुपाः ॥

अर्थ—जे वैद्यकशास्त्र वेत्ते पुरुष, आहारादि परिमित करतात, त्यांस विषूचिका होत नाहीं; आणि ज्यांचें अंतःकरण स्वाधीन नाहीं. खाण्याकरितां परम लुब्ध आणि मूर्ख त्यांला ही विषूचिका होत्ये, असें जाणावें.

विषूचिकेचें लक्षण.

मूर्छातिसारोवमथुःपिपासाशूलभ्रमोद्वेष्टनजृंभदाहाः ॥
वैवर्ण्यकंपौहृदयेरुजश्चभवंतितस्यांशिरसश्चभेदः ॥

अर्थ—मूर्छा, अतिसार, ओकारी, तृष्णा, शूल, भ्रम, उलासे, जांभया, दाह, निस्तेज-पणा, हृद्रोग, आणि मस्तकशूल इत्यादिक विषूचिकेचे उपद्रव जाणावे.

विलंबिका व अलसक यांची चिकित्सा.

विलंबिकालसकयोरूर्ध्वाधःशोधनंहितं ॥ नालेनफलवर्त्या
चतथाशोधनभेषजैः ॥ दंडायलसकेप्युचैरयमेवक्रियाक्रमः ॥

अर्थ—विलंबिका, अलसक, या दोघांस वांति व रेच हित, व फळवर्ती व शोधनऔष-धानीं हित. दंडालसकास ही हाच क्रियाक्रम जाणावा.

फलवर्तिवमिस्वेदंलंघनंचापतर्पणं ॥
विशेषादलसेकुर्याद्विषूच्यामतिसारवत् ॥

अर्थ—वस्त्रानें वात करून तिला रेचक औषधांत भिजवून गुदांत घालणें, वांति देणें घाम काढणें, लंघन, अतृप्त ठेवणें, हे प्रकार अलसावर विशेषानें करावे. बाकीचे अतिसा रोक्त उपचार करावे.

आलसकनिरुक्ति.

प्रयातिनोर्ध्वंनाधस्तादाहारोनविपच्यते ॥
आमाशयेलसीभूतस्तेनासौलसकोमतः ॥

अर्थ—जा व्याधीमध्यें वर व खालीं दोष नजातां, आणि आमांश याचा पाक नहोतां आमाशयामध्यें लसीसारखा होऊन राहतो. म्हणून त्याला लसक म्हणतात.

आलसक व दंडालसकलक्षण.

कुक्षिरानह्यतेत्यर्थंप्रताम्येत्परिकूजति ॥ निरुद्धोमारुतश्चैवकु

क्षावुपरिधावति ॥ वातवर्चोनिरोधश्चयस्यात्यर्थंभवेदपि ॥
तस्यालसकमाचष्टेतृष्णोद्गारौतुयस्यच ॥

अर्थ—ज्याची कूस अत्यंत फुगल्ये, मोह पावतो, कुंथतो, बंद झालेला वायु कुशींत वर येतो, मळ व मूत्र बंद होतात, ताहान लागल्ये व ढेंकरा येतात. हीं आलसकाचीं लक्षणें जाणावीं.

वायुःकंपभ्रमानाहशूलादीन्प्रकरोतिच ॥ पित्तंज्वरातिसारौचदाहादीन्स्वेदनानिच ॥ श्लेष्मांगगुरुताछर्दिर्वाक्संगष्ठीवनानिच ॥ लुब्धास्तेलसकेदोषाःछर्द्यतीसारवर्जिताः॥ कारकास्तत्रिशूलादेःस्रोतसःसन्निरोधकाः ॥ तिर्यग्गतास्तनुंस्तब्धादंडवत्स्तंभयंतिच ॥ सदंडालसकस्त्याज्यःशीघ्रंदेहविनाशकृत् ॥

अर्थ—जा आलसकामध्यें वायूनें कंप, भ्रम, पोटाला फुगवटी; आणि शूळ हे उपद्रव होतात; तो वातज, व ज्वर, अतिसार, दाह, आणि घाम ज्यांत होतात; तो पित्तज, आणि अंगाला जडता, ओकारी, शब्दाचा प्रतिबंध; आणि तोंडाला लाळ सुटणें हे ज्यांत होतात; तो कफज जाणावा. आलसकामध्यें वातादिदोष, वांति व अतिसार यांवांचून शूळादिक हीं उत्पन्न होतात, नाडीमार्गांचा रोध करितात, आणि तिर्यग्गति होऊन दंडासारिखा देहाला ताठवितात. त्याला दंडालसक ह्मणतात.

विलंबिकालक्षण.

दुष्टंचभुक्तंकफमारुताभ्यांप्रवर्ततेनोर्ध्वमधश्चयस्य ॥ विलंबिकांतांभृशदुश्चिकित्स्यामाचक्षतेशास्त्रविदःपुराणाः ॥

अर्थ—कफ; आणि वायू यांनीं भक्षिलेलें अन्न दुष्ट होऊन अधः ह्मणजे अपानद्वारावाटे मळरूपेंकरून निघत नाहीं, ऊर्ध्वगती होऊन तोंडावाटे निघतें. त्या रोगाला वैद्य विलंबिका ह्मणतात; ती अत्यंत दुःसाध्य जाणावी.

अजीर्णापासून झालेल्या आमाचें कार्य.

यत्रस्थमामंविरुजेत्तमेवदेशंविशेषेणविकारजातैः॥
दोषेणयेनावततंशरीरंतल्लक्षणैरामसमुद्भवैश्च ॥

अर्थ—शरीरांत ज्याठिकाणीं आम कोपला असेल ; आणि शरीरांत जे वातादिदोष वाढले असतील. त्यांच्या शूल, दाह व जडता इत्यादिलक्षणांनीं त्या स्थळीं वातादिदोष व आम यांणीं पीडा उत्पन्न होत्ये. यत्र या शब्दानें वातादिकांसारिखी सर्वशरीरांत ही आमप्रवृत्ती सुचविली.

विपूची आणि अलसक यांचे असाध्यलक्षण.

यःश्यावदंतोष्ठनखोल्पसंज्ञोवम्यर्दितोभ्यंतरयातनेत्रः ॥
क्षामस्वरःसर्वविमुक्तसंधिर्यायान्नरोसौपुनरागमाय ॥

अर्थ-ज्याचे दंत, ओंठ, नखें, काळसर जाहाली, आणि शक्ती फार क्षीण झाली, व ओंकारीनें फार पीडा झाली, आणि नेत्र खोल गेले, व स्वरही फार सूक्ष्म झाला, सर्वसंधी शिथिल झाल्या. इत्यादिलक्षणेंकरून युक्त जो रोगी तो असाध्य जाणावा.

जीर्णआहारलक्षण.

उद्गारशुद्धिरुत्साहोवेगोत्सर्गोयथोचितः ॥
लघुताक्षुत्पिपासाचजीर्णाहारस्यलक्षणं ॥

अर्थ-ढेंकर चांगली येणें, व जसा वेग यावा तसा येऊन शौचास चांगले होतें, आंग हलके वाटतें, क्षुधा, तृषा, यथास्थित लागतात. इत्यादिक अन्न पचन झाल्याची लक्षणें जाणावी.

विपूकेचेउपद्रव.

निद्रानाशोरतिःकंपोमूत्राघातोविसंज्ञता ॥
अमीउपद्रवाघोराविपूच्यांपंचदारुणाः ॥

अर्थ-निद्रानाश, अरति, कंप, मूत्रनिरोध, मूर्छा हे पांच उपद्रव विपूचिकेचे जाणावे.

विपूचिकाचिकित्सा.

विपूच्यामतिवृद्धायांपाष्ण्योर्दाहःप्रशस्यते ॥
गंधकंकुंकुमंवापिदद्यान्निंबुजलेनवा ॥

अर्थ-विपूची फार वाढली असतां; पायांला टांचाचे वर्ती डाग द्यावा, अथवा गंधक किंवा केंशर लिंबाचे रसांत पाजावें.

लशुनाद्य चूर्ण.

लशुनजीरकसैंधवसंचलंत्रिकटुरामठचूर्णमिदंसमं ॥
सपदिनिंबुरसेनविपूचिकांहरंतिभोरतिभोगविचक्षणे ॥

अर्थ-लसूण, जिरें, सैंधव, पादेलोण, सुंठ, मिरें, पिंपळी. व हिंग यांचे चूर्ण लिंबाचे रसांत कालवून खावें; ह्मणजे हे रतिभोगविचक्षणें विपूचिकेचा नाश करितें.

आपामार्गादियोग.

जलपीतमपामार्गमूलंहन्याद्विपूचिकां ॥
सतैलंकारवेल्यंवुविधुनोतिविपूचिकां ॥

अर्थ–आघाड्याचें मूळ पाण्यांत उगाळून प्यावें; किंवा कारलीचा रस तेलावरोबर प्यावा; ह्मणजे विषूचिका नाश पावते.

बालमूत्रादिकाढा.

बालमूत्रस्यनिःक्काथःपिप्पलीचूर्णसंयुतः ॥
विषूचीनाशनःश्रेष्ठोजठराग्निविवर्धनः ॥

अर्थ–लहान मुलाचे मुताचा काढा, पिंपळीचें चूर्ण घालून प्यावा; ह्मणजे विषूचिकानाशक आणि जठराग्निवर्द्धक आहे.

तक्रयोग.

तक्रेणयुक्तंयवचूर्णमुष्णंसक्षारमार्तिंजठरस्यहन्यात् ॥
स्वेदोघटैर्वाबहुवाष्पपूर्णैरुष्णैस्तथान्यैरपिपाणितापैः ॥

अर्थ–सातूचें चूर्ण ताक घालून उष्ण करून जवखार घालून प्यावें. तसेंच उष्ण पाण्याची वाफ, किंवा शेक, किंवा हात ओरपणें; हे उपचार विषूचिकानाशक आहेत.

बिल्वादिकाढा.

बिल्वनागरनिःक्काथोहन्याच्छर्दिविषूचिकां ॥
बिल्वनागरकैडर्यक्काथःस्यादधिकोगुणैः ॥

अर्थ–बेल व सुंठ यांचा काढा ओकारी, विषूचिका यांचा नाशक आहे; आणि बेल व सुंठ व कायफळ यांचा काढा त्यांचेपेक्षां अधिक गुणकारी आहे.

यवपिष्टलेप.

यवपिष्टयवक्षारलेपस्तक्रेणसंयुतः ॥
उष्णीकृतोहरेत्सद्योजठरार्तिंसुदुर्जयाम् ॥

अर्थ–जवांचें पीठ व यवखार, हे ताकांत कालवून कढवून त्याचा लेप करावा; ह्मणजे कसाही उदरशूल, असला तरी शांत होतो.

कुष्टादि लेप.

कुष्टसैंधवयोःकल्कंचुक्रतैलसमन्वितं ॥
विषूच्यांमर्दनंकोष्णंखल्लीशूलनिवारणं ॥

अर्थ–कोष्टकोळिंजन व सैंधव यांचें चूर्ण आंबसोलाचे तेलांत कालवून मंदोष्ण करून अंगास चोळावें; ह्मणजे विषूचिका आणि खल्लीशूल यांचें निवारण होतें.

साधारण लेप.

सरुग्वानद्धमुदरमम्लपिष्टैःप्रलेपयेत् ॥
दारुहैमवतीकुष्ठशताव्हाहिंगुसैंधवैः ॥

अर्थ–शूळयुक्त फुगलेलें पोटास आंवटरसांत दारुहळद, हिरडा, कोठ, शतावरी; हिंग व सैंधव वाटून लेप करावा.

लवंगादि चूर्ण.

शाणद्वयंस्याचुलवंगमेलाजातीफलंकोलसुनागफेनं ॥ मांष
प्रमाणंसकलंविचूर्ण्यशाणंकवोष्णेनजलेनपीतं ॥ विषूचिकांहं
तिसुदारुणांचशूलातिसारौवमथुःप्रसक्तः ॥

अर्थ– ८ मासे लवंगा, एलची व जायफळ, हीं अर्धतोळा, आणि अफीम १ मासा, या सर्वांचें चूर्ण एकत्र करून तें ऊनपाण्याशीं ॥ तोळा घावें; ह्मणजे दारुण तरळ, शूळ, अतिसार, आणि वांति यांचा नाश करितें.

पथ्यादि चूर्ण.

पथ्यावचाहिंगुकलिंगभृंगसौवर्चलैःसातिविषैःसचूर्ण्य ॥
सुखांबुपीतोविनिहंत्यजीर्णशूलंविषूचींकसनंचसद्यः ॥

अर्थ–हरीतकी, वेखंड, हिंग, कुडयाची साल, भाका, पादेलोण व अतिविष यांचें चूर्ण सोसेल तशा ऊनपाण्याशीं घावें; ह्मणजे अजीर्ण, शूल, तरळ, आणि खोकला, यांचा नाश करितें.

शंखद्राव.

लवणानितथाक्षाराःप्रत्येकंपंचभागिकाः ॥ कासीसंटंकणंतुत्थंगंधकं
निंबुकद्रवं ॥ तिलापामार्गजंक्षारंप्रत्येकंवेदभागिकं ॥ नवसागरसौ
राष्ट्रीसर्जिकानेत्रभागिकाः ॥ एतत्सर्वंसमालोड्यभाव्यंजंबीररैरतः ॥
सरंध्रेनलिकायंत्रेयामयुग्मंविपाचयेत् ॥ शंखद्रावोभवेदेषःसर्वदोष
निकृंतनः ॥ लोहपाषाणशंखानांद्रावकोयंनसंशयः ॥

अर्थ–पंच लवणें व सर्व क्षार हीं प्रत्येकीं ५ भाग; हिराकस, टांकणखार, मोरचूत, गंधक, लिंबाचा रस, तीळ, आघाडा, यांचे खार प्रत्येकीं ४ चार भाग; नवसागर, तुरटी व साजिखार हे प्रत्येकीं २ भाग. हीं सर्व एकत्र करून लिंबाचे रसांत खलावीं; नंतर नलिकायंत्रांत दोन प्रहर पचन करावीं; ह्मणजे हा शंखद्राव सिद्ध होतो. हा सर्व दोषांचा नाशक आणि लोखंड, दगड, शंख, यांचे पाणी करणारा आहे. यांत संशय नाहीं.

दालचिनीतैल.

त्वक्पत्ररास्नागरुशिग्रुकुष्ठैरम्लप्रपिष्टैःसवचाशताव्हैः ॥
उद्वर्तनंखल्लिविपूचिकाघ्नंतैलंविपक्वंचतदर्थकारि ॥

अर्थ–दालचिनी, तमालपत्र, रास्ना, अगर, शेवग्याचें मूळ, कोष्ठ, वेखंड व शतावरी हीं सर्व लिंबूरसांत वाटून आंगास लावावीं, किंवा यांचे तेल सिद्ध करून आंगास लावावें; ह्मणजे वायुरोग आणि तरळ, यांचा नाश करितें.

चुक्रतैल.

पलंचुक्रंकुष्ठंपिचुयुगमितंसैंधवकणातदर्धंप्रत्येकंकरतलमितंजातिफलकं ॥ कटुतैलंकिंचित्कुडवमितिमग्नावधिशतंतदेतच्चुक्राख्यंशमयति विपूचींचगदहं ॥ कुष्ठसैंधवयोःकल्कंचुक्रतैलसमन्वितं ॥ विपूच्यांमर्दनंकोष्णंखल्लीशूलनिवारणं ॥

अर्थ–चुका व कोष्ठ हीं चार तोळे, कोष्ठ दोन तोळे व सैंधव, पिंपळी हीं एकेक तोळा, जायफळ एक तोळा, गोहोऱ्यांचें तेल १६ तोळे, किंवा सर्व चूर्ण बुडे इतकें घालून तैल सिद्ध करावें. तें विषूचीचा नाश करितें; आणि कोष्ठ व सैंधव यांचा कल्क, व चुक्याचें तेल घालून विपूचीवर उष्ण करून मर्दन करावें. तें वायुरोग व शूल यांचें निवारण करितें.

अर्कादि तैल.

अर्कस्यचरसप्रस्थंप्रस्थंधत्तूरकस्यच ॥ श्वेतस्नुहिरसप्रस्थंप्रस्थंसौभांजनाद्रसात् ॥ कुष्ठसैंधवयोःकल्कंपलेद्वेद्वेप्रमाणतः ॥ तैलप्रस्थंकांजिकेनपचन्मृद्वग्निनासमं ॥ खल्लींविषूचिकांहंतिपक्षाघातंचगृध्रसीं ॥

अर्थ–रुईचा चीक ६४ तोळे, धोतऱ्याचा रस ६४ तोळे, पांढऱ्या निवडुंगाचा रस १६ तोळे, शेवग्याचा रस १६ तोळे, कोष्ठ व सैंधव, यांचा कल्क दोन दोन तोळे, तेल १६ तोळे, व कांजी १६ तोळे, घालून तेल पचन करावें. तें तेल खल्लीवात, विपूचिका, पक्षाघात, आणि गृध्रसी, यांचा नाश करितें.

तक्र.

विषूच्यामतिवृद्धायांतक्रंदधिसमंजलं ॥
नारिकेरांबुपेयांवाप्राणत्राणाययोजयेत् ॥

अर्थ–विपूची अति वाढली असतां; ताक किंवा दहीं, समभाग पाणी घालून द्यावें अथवा नारळाचे पाण्याने पेया करावी; आणि ती पाजावी; ह्मणजे प्राण रक्षण होईल.

पाणी.

पिपासायांतथोत्क्लेशेलवंगस्यांबुशस्यते ॥
जातीफलस्यवाशीतंशृतंभद्रघनस्यवा ॥

अर्थ—तृषा, किंवा उमासा यांवर लवंग किंवा जायफळ अथवा नागरमोथा यांचे पाणी तापवून निवालेलें द्यावें.

विलंबिका व अलसिका चि०

विलंबिकालसकयोरयमेवक्रियाक्रमः ॥
अतएवतयोरुक्तंपृथङ्-नैवचिकित्सितं ॥

अर्थ—विलंबिका; आणि अलसक यांवर विपूचिकेवरचाच उपचार युक्त आहे. यास्तव त्या दोघांवर निराळी चिकित्सा सांगीतली नाहीं.

हस्तिकर्णयोग.

हस्तिकर्णश्चदंतश्चपिप्पलीकंदसंयुता ॥
पीताकोष्णेनतोयेनक्षिप्रंहन्याद्विपूचिकां ॥

अर्थ—एरंडमूळ व थोर मुळा, पिंपळी; आणि कांदा हें ऊन पाण्यांत वाटून प्राशनार्थ द्यावें; ह्मणजे विपूचिकेचा नाश करितो.

निंबुरसयोग.

निंबरसंचिंचिणिकासमेतंविपूचिकाशोपहरंकफंच ॥
दुग्धेनपीतोयदिटंकणोसौप्रशाम्यतेयंवमनंनिरुध्यात् ॥

अर्थ—निंबाचे रसांत जुनी चिंच कुसकरून पाजावी; ह्मणजे विपूचिका, शोष व कफ यांचा नाश होतो; आणि दुधांत टाकणखार घालून पाजावा; ह्मणजे विपूचिका व ओकारी बंद होईल.

करंजादिकषाय.

करंजनिंबुशिखरीगुडूच्यर्जुनवत्सकः ॥
पीतःकषायोवमनात्घोरांहन्याद्विपूचिकां ॥

अर्थ—करंजसाल, लिंबाच्या काड्या, आघाड्याचे मूळ, गुळवेल, अर्जुनसादडा व कुडयाची साल यांचा काढा द्यावा; ह्मणजे वांतिकरून विपूचीला शमवितो.

उत्क्लेशलक्षण.

उत्क्लिश्यान्नंननिर्गच्छेत्प्रसेकष्ठीवनेरितं ॥
हृदयंपीड्यतेचास्यतमुत्क्लेशंविनिर्दिशेत् ॥

अर्थ—मळमळ व तोंडाला पाणी सुटून थुंका येऊन हृदय दुखूं लागतें; परंतु वांति होत नाहीं. त्याला उत्क्लेश ह्मणतात.

कटुत्रयरस.

कटुत्रिकंजीरकहिंगुसिंधूरसोनगंधंचसमंविमर्द्य ॥
निंबुद्रवेणाशुनिहंतितूर्णंविषूचिकांदुष्टविलंबिकांच ॥

अर्थ—सुंठ, मिरीं, पिंपळी, जिरें, हिंग, सैंधव, लसूण; आणि गंधक हे पदार्थ समभाग घेऊन वाटून त्यांचा कल्क लिंबूरसाशीं द्यावा; ह्मणजे तो दुष्ट तरळ; आणि विलंबिका यांचा नाश करितो.

व्योषादि अंजन.

व्योषंकरंजस्यफलंहरिद्रेमूलंसमावाप्यचमातुलुंग्याः ॥
छायाविशुष्कागुटिकाःकृतास्ताहन्युर्विपूचींनयनांजनेन ॥

अर्थ—सुंठ, मिरे, पिंपळी, करंजाची बी, दारुहळद, हळद व माहाळुंगीचें मूळ हीं सावलींत वाळवून कुटून गोळी करुन उगाळून अंजन करावें; ह्मणजे विषूचिकेचा नाश करील.

अपामार्गाद्यंजन.

अपामार्गस्यपत्राणिमरिचानिसमानिच ॥
अश्वस्यलालयापिष्टान्यंजनाद्धंतिसूचिकां ॥

अर्थ—आघाड्याचीं पानें; आणि मिऱ्यें, हीं समभाग घेऊन घोड्याचे लाळेत खलून अंजन केले असतां; विषूचिकेचा नाश होतो.

विल्वादि अंजनं.

विल्वस्यमूलंशिरसस्यमूलंफलंकरंजस्यनतंसुराव्हं ॥ फलत्रयंव्योष
निशाद्वयंचवस्तस्यमूत्रेणसुसूक्ष्मपिष्टं ॥ भुजंगलूतोदरवृश्चिकादिवि
षूचिकाजीर्णहरंज्वरघ्नं ॥

अर्थ—बेलाचे मूळ, शिरसाचे मूळ, करंजाच्या बिया, तगर, देवदार, हरडा, बेहडा, आवळकाठी, सुंठ, मिरीं, पिंपळी, हळद व दारुहळद हे समभाग घेऊन बकऱ्याच्या मुतांत खलावे; आणि त्याचें अंजन करावें; तें साप, लूता, विंचू, इत्यादिकांचीं विषें, वें उदर, तरळ, अजीर्ण; आणि ज्वर यांचा नाश करितें.

अजीर्णादिकांवर पथ्य.

श्लैष्मिकेवमनंपूर्वंपैत्तिकेमृदुरेचनं ॥ वातिकेस्वेदनंवाथयथावस्थंहि

तंचतत् ॥ नानाप्रकारव्यायामोदीपनानिलघूनिच ॥ बहुकालसमु
त्पन्नामुद्गलोहितशालयः ॥ विलेपीलाजमंडश्चमंडोमुद्गरसस्तथा ॥
एणोवर्हिःशशोलावःक्षुद्रमत्स्याश्चसर्वशः ॥ शालिंचशाकंवेत्राग्रंवा
स्तुकंवालमूलकं ॥ लसुनंवृद्धकूष्मांडनवीनंकदलीफलं ॥ सौभांजनं
पटोलंचवार्ताकंलदंवुजं ॥कर्कोटककारवेल्लंवार्हतंचमहार्द्रकं ॥ प्र
सारणांचचांगेरीतथैवसुविपण्णकं ॥ धात्रीफलंनागरंचदाडिमंयवप
र्पटाः ॥ आम्लवेतसजंवीरमातुलुंगानिमाक्षिकं ॥ नवनीतंघृतंतक्रं
सौवीरकतुपोदकं ॥ धान्याम्लंकटुतैलंचरामठंलवणार्द्रकं ॥ यवानी
मरिचंमेथीधान्यकंजीरकंदधि ॥ तांवूलंतप्तसलिलंकटुतिक्तोरसोपि
वा ॥ मंदानलेप्यजीर्णेचपथ्यमेतन्नृणांभवेत् ॥

अर्थ—मंदाग्नि, अजीर्ण, विपूचिका; आणि भस्मक हे जर श्लैष्मिक आहेत, तर पूर्वी वमन द्यावें; व पित्ताधिक आहेत, तर मृदु रेचक द्यावें; आणि वातजनित आहेत तर स्वेदन करावें, हे यथाकाळीं हितकारक आहे; आणि नानाप्रकारचा व्यायाम, दीपन, लघु व फार दिवसाचे तांबड्या भाताचे तांदुळ, आटवल, लाह्यांचा मंड, मंड, मुगांचा रस व हरण, मोर, ससा, लावा, बारीकजातीचे मासे, शालि, टाकळा, वंशाग्र, चाकवत, कोंवळा मुळा, लसुण, जुना कोहळा, ताजें केळें, शेवग्याच्या शेंगा, पडवळ, वांगें, कमळ, कांकडी, कारेतें, जांबूळ, आलें, लाजाळु, चुका, कुरडु, आवळे, सुंठ, डाळिंब, यव, पित्तपापडा, आम्लवेतस, जंबीर, माहाळुंग, मध, लोणी, तूप, ताक, कांजी, साळीच्या करलाचे पाणी, धान्य घालोन आंबट केलेले पाणी, तिखट, तेल, हिंग, लवण, ओवा, मिरीं, मेथी, धनें, जिरें, दहीं, विडा, तापलेलें पाणी, कडु व तिखट, असे रस मंदाग्नीवर व अजीर्णावर हे पदार्थ पथ्यकारक आहेत.

अपथ्य.

विरेचनानिविण्मूत्रवातवेगविधारणं ॥ अतिरिक्तांचाध्यशनंजागरंवि
षमाशनं ॥ रक्तस्रुतिंशिंविधान्यंमत्स्यमांसमुपोदिकं ॥ जलपानंच
विष्टंभंजांववंसर्वशालुकं ॥ कूर्चिकांमोरटंक्षीरंकिलाटंचप्रपानकं ॥
लालनंसस्यतद्बालस्नेहनंदुष्टवारिच ॥ विरुद्धासात्म्यपानानांविष्टं
भीनिगुरूणिच ॥ अग्निमांद्येप्यजीर्णेचसर्वाणिपरिवर्जयेत् ॥

अर्थ—रेच, मळ व मूत्र यांचे वेगाचें धारण, भोजनोत्तर लागलेच अतिरिक्त अन्न

भक्षण, जागरण, विषमाशन, रक्तस्राव, द्विदळ धान्ये, मांसे, वाळी, जलपान, विष्टंभ, जांभूळ, सर्वकमळाचे कंद, तांदूळ तुपांत भाजून दुधांत शिजविले ते, सातादिवसांचे गाईचे दूध, खर्वस, पनो, चारोळी, धान्ये, वाळा, स्नेहपदार्थ खराब पाणी, विरुद्ध व असात्म्य असे अन्न व पान, विष्टंभकारक द्रव्य: आणि जडपदार्थ हे अग्निमांद्य, अजीर्ण यांवर वर्ज करावे.

‡नित्यादित्यरस.

विषरविगगनायःसूतगंधंसमांशंसमहुतभुजद्रावैर्भावितंसप्तवारं ॥ प्रबलगुदजकीलंहंतिनित्योदितोसौमलहतिमलबंधेमाषमात्रःससर्पिः ॥

अर्थ–बचनाग, ताम्र, अभ्रक, लोह, पारा व गंधक हे समभाग; घेऊन त्यास चित्रकाच्या मुळांच्या रसाच्या सात सात भावना द्याव्या. हा नित्यादित्यरस मुळव्याध व मलबंध यांवर एकमासा तुपाशीं द्यावा. हा यांचा नाश करितो.

दुसरा प्रकार.

मृतसूताभ्रलोहार्कविषगंधंसमंसमं ॥ सर्वतुल्यांशंभल्लातफलमेकत्रचूर्णयेत् ॥ द्रवैःसूरणकंदोत्थैःखल्वेमर्द्यंदिनत्रयं ॥ माषमात्रंलिहेदाज्यै रसश्चार्शांसिनाशयेत् ॥ रसोनित्योदितोनामगुदोद्भवकुलांतकः ॥ हस्तेनाभौमुखेपादेगुदेवृषणयोस्तथा ॥ शोथोहृत्पार्श्वशूलंचयस्यासाध्यार्शसांहितः ॥ असाध्यस्यापिकर्तव्याचिकित्साशंकरोदिता ॥

अर्थ–पारदभस्म, अभ्रक, लोह, ताम्र, बचनाग व गंधक हे समभाग, सर्वांबरोबर बिबव्याचे चूर्ण एकत्र करून सुरणाच्या कंदाच्या रसांत तीन दिवस खल करावा. हा १ मासा तुपाशीं द्यावा. हा नित्योदितरस मुळव्याधीचा नाश करितो. व हात, पाय, नाभि, मुख, गुद व वृषण यांची सूज, आणि हृदय व पार्श्व यांचा शूळ; व असाध्य अर्श यांचा नाश करितो; आणि असाध्य अर्शाची चिकित्सा शंकरानें सांगितलेली करावी.

अर्शकुठार.

भागःशुद्धरसस्यभागयुगुलंगंधस्यलोहाभ्रयोःपट्बिल्वाग्निहव्युषणाभयरजोदंतीचभागैःपृथक् ॥ पंचस्युःस्फुटटंकणस्यचयवक्षारस्यसिंधूद्भवाभागाःपंचगवांजलेनुविमलेद्वात्रिंशदेतत्पचेत् ॥ स्नुक्दुग्धंचगवांजलावधिशनैःपिंडीकृतंतद्भवेद्द्वौमाषौगुदकीलकाननजटाच्छेदेकुठारोरसः ॥

---

‡ हा नित्यादित्यरसापासून भल्लातकलेहपर्यंत चिकित्सा अर्शाची आहे.

अर्थ--शुद्ध पारा १ भाग, शुद्ध गंधक २ भाग, लोह व अभ्रकभस्म ६ भाग, बेल-फळ, चित्रक, त्र्यूषण, हरीतकी व जेपाळ हे प्रत्येकी १ भाग; टाकणखार, यवक्षार, सैंधव हीं ५ भाग, हीं सर्व एकत्र करून गोमूत्र ३२ भाग घेऊन त्यांत पचन करावीं, व निवडुंगाचा चीक ३२ तोळे घालोन पुनः पचन करून त्याची दोन माशांची गोळी करून द्यावी. हा गुदांकुरांच्या शिखा छेदन करण्याविषयीं, कुऱ्हाडीसारिखा आहे.

षडाननरस.

वैक्रांतताम्राभ्रकगंधकानांरसस्यकांतस्यसमानभागं ॥
चूर्णंभवेत्तेनषडाननोयमर्शोविनाशायचवल्लमात्रं ॥

अर्थ--वैक्रांतमणी, ताम्र, अभ्रक, गंधक, पारा, कांत यांची भस्में समभाग एकत्र करावीं. हा षडाननरस अर्शनाशनाकरितां वालमात्र द्यावा.

पीयूषसिंधु.

शुद्धंसूतंषड्गुणंजीर्णगंधंकाचेपात्रेवालुकायंत्रयोगात् ॥ भस्मीकृत्वायोजयेत्तद्धेमतत्तुल्यांशंभस्मलोहाभ्रयोश्च ॥ सूतात्तुल्यंगंधकंमेलयित्वाखल्वेमर्द्यंभरणस्यद्रवेण ॥ दंतीमुंडीकाकमाचीहलाख्याभृंगार्कोग्निःसप्तमेवांरसेन ॥ क्षिप्त्वापश्चात्धान्यराशौत्रिघस्त्रंचूर्णीकृत्वामाषमात्रंददीत ॥ अर्शोरोगेदारुणेचग्रहण्यांशूलेपांडावाम्लपित्तेक्षयेच ॥ श्रेष्ठंक्षौद्रंचानुपानंप्रशस्तंरोगोक्तंवाभ्यापषट्कप्रयोगात् ॥ सर्वरोगायांविनाशंजरायांवैपीयूषंसेवनीयंप्रयत्नात् ॥ पथ्यंसात्म्यंचाम्लयोगादियोषिद्वर्ज्यंदेयंसर्वरोगप्रशांत्यै ॥ पुष्टिंकांतिंवीर्यवृद्धिंसदानंदेनायुक्तोमानवःसंलभेत ॥

अर्थ--शुद्ध पारा घेऊन त्याला वालुकायंत्रांत षड्गुण गंधक जारण करावें; आणि त्या पाऱ्याच्या समभाग सुवर्ण, लोहभस्म, अभ्रकभस्म व गंधक हे मिळवून त्याला सुरणाच्या रसांत, दांती, मुंडी, कावळी, गवा. माका, रुई व चित्रक यांच्या प्रत्येक रसांच्या सात भावना द्याव्या; नंतर गोळा करून तीन दिवस साळीचे राशांत पुरून ठेवावा; नंतर काढून त्यांतून १ मासा द्यावा. हा उग्र अर्शरोग, संग्रहणी, शूल, पांडु, आम्लपित्त व क्षय यांवर मधाशीं द्यावा; किंवा रोगोक्त अनुपानाशीं द्यावा. हा साहा मासे भक्षण केल्यानें संपूर्ण रोग व म्हातारपण नाश पावतें. याकरितां हा प्रयत्नानें सेवन करावा. यास आंबट व स्त्रीयांवांचून सात्म्य असें पथ्य द्यावें; ह्मणजे पुष्टि, कांति व वीर्यवृद्धि हीं प्राप्त होतात.

चक्रबंधरस.

दिनत्रयंगंधसमंरसेंद्रंविमर्दयेच्छुक्तवसुद्रवेण ॥ ताम्रस्यचक्रेणनिबध्य

वन्हिहरीतकीभृंगरसैर्विमर्द्य ॥ कटुत्रयेणापिददातिगुंजाद्वयंमरुत्पायुरुहप्रशांत्यै ॥ चक्रबंधरसोयंहिसर्वरोगोपकारकः ॥ एतैस्तुगंधकेनैकंपुटंचैवप्रदापयेत् ॥

अर्थ—पारा व गंधक हे श्वेत पुनर्नव्याच्या रसांत तीन दिवस खलावे. व त्यांत ताम्रभस्म घालोन खलावा; ह्मणजे चक्रासारिखा पारा बद्ध होतो; नंतर त्याला चित्रक, हरीतकी, माका, सुंठ, मिरीं व पिंपळी यांच्या रसांत मर्दन करून त्यांतून दोन गुंजा वातार्शाच्या नाशाविषयीं द्यावा. हा चक्रबंध रस सर्वरोगनाशक आहे. याला गंधकाशीं एक पुट द्यावें,

पर्पटीरस.

रसेंद्रगंधंसुदृढंविमर्द्यसर्पिर्युतंतद्द्विगुणंचबोलं ॥ तावत्क्षिपेल्लोहमये द्रवंस्यात्क्षिपेच्चरंभादलयुग्ममध्ये ॥ ततोरसःपर्पटिकाभिधानःसमस्त दुर्नामनिकृंतनःस्यात् ॥ संसेवितोवल्लचतुष्कमात्रःशोफातिसारंवमिरं गसादनं ॥ तृष्णाज्वरारोचकवन्हिमांद्यंगुदस्यपाकंल्हृदयेहिशूलं ॥

अर्थ—पारा व गंधक यांची कज्जली करून त्यांत तूप व बोळाचें चूर्ण दुप्पट घालोन तें सर्व लोहपात्रांत घालून अग्नीवर ठेऊन पातळ करावें; नंतर केळीच्या पानावर ओतून दुसरें पान वर ढांपण घालून त्यावर गाईचें शेण थापावें. हा पर्पटीरस चार वाल अनुपानाशीं द्यावा; ह्मणजे संपूर्णप्रकारच्या मुळव्याधी, सूज, अतिसार, वांति, आंगमोडे, ताहान, ज्वर, अरुचि, अग्निमांद्य, गदपाक, ह्रदयांतील शूल, संपूर्ण अर्शविकार आणि शूल यांचा नाश करितो.

भल्लातकलेह.

चित्रकंत्रिफलामुस्तंग्रंथिकंचविकामृता ॥ हस्तिपिप्पल्यपामार्गौदंडोत्पलकुठेरकः ॥ एषांचतुःपलान्भागान्जलद्रोणेविपाचयेत् ॥ भल्लातकसहस्रेद्वेछित्वातत्रैवदापयेत् ॥ तत्रपादावशेषेणलोहपात्रेपचेद्भिषक् ॥ तुलार्धंतीक्ष्णलोहस्यघृतस्यकुडवद्वयं ॥ त्र्यूषणंत्रिफलावन्हिसैंधवंबीडमौद्भिदं ॥ सौगंधिकविडंगानिपलिकांशानिकल्पयेत् ॥ कुडवंवृद्धदारोश्चतालमूल्यास्तथैवच ॥ सूरणस्यपलान्यष्टौचूर्णीकृत्वाविनिःक्षिपेत् ॥ सिद्धेशीतेप्रदातव्यंमधुनःकुडवद्वयं ॥ प्रातर्भोजनकालेवाततःखादेद्यथाबलं ॥ अर्शांसिग्रहणीदोषंपांडुरोगमरोचकं ॥ कृ

मिगुल्माश्मरीनाहान्शूलंचापिव्यपोहति ॥ भवेच्छुक्रोपमंचक्षुर्व
लीपलितनाशनं ॥ रसायनमिदंश्रेष्ठंसर्वरोगहरंपरं ॥

अर्थ–चित्रक, त्रिफळा, नागरमोथे, पिंपळीमूळ, चवक, गुळवेल, गजपिंपळी आघाड्याचीं मुळें, सहदेवीचीं मुळें व आजगला हें प्रत्येकीं १६ तोळे घेऊन २०४ तोळे पाण्यांत घालावें; आणि २००० बिबवे फोडून त्यांत टाकावे; आणि लोहपात्रामध्यें चतुर्थांश काढा करावा. त्यांत तिखयाचें भस्म २०० तोळे, तूप ३२ तोळे व त्रिकटु, त्रिफळा, चित्रक, सैंधव, बिडलोण, सोरा, संचळ व वावडिंग हीं प्रत्येकीं ४ तोळे, व वृद्धदारु १६ तोळे, तालमूळ १६ तोळे, व सुरण ३२ तोळे, या सर्वांचें चूर्ण करून त्यांत टाकावें; आणि अग्नीवर ठेउन घट्ट होईपर्यंत आटवावा. घट्ट आल्यावर उतरून थंड झाला म्हणजे त्यांत मध ३२ तोळे घालावा; म्हणजे सिद्ध झाला. हा प्रातःकाळीं किंवा भोजनाच्या वेळेस बळ पाहून द्यावा; म्हणजे मुळव्याध संग्रहणी, पांडुरोग, अरुचि, कृमि, गुल्म, अश्मरी, आनाह, आणि शूल यांचा नाश करील. व शुक्रासारिखे नेत्र करितो; व वली, आणि पलित यांचा नाश करितो. हा सर्वरोगनाशाविषयीं उत्तम रसायन आहे.

कृमिनिदान.

कृमयस्तुद्विधाप्रोक्ताबाह्याभ्यंतरभेदतः ॥ बहिर्मलकफासृ
ग्विट्जन्मभेदाच्चतुर्विधाः ॥ नामतोविंशतिविधाः

अर्थ–कृमि आंतील व बाहेरील या भेदानीं दोन जातीचे ;ते बाहेरचा मल, कफ, रक्त, आणि विष्ठा या कारणांनी चार प्रकारचे; परंतु नावांनीं वीस प्रकारचे.

बाह्यकृमि सांगतों.

बाह्यास्तत्रमलोद्भवाः ॥ तिलप्रमाणसंस्थानवर्णाःकेशांबराश्र
याः ॥ बहुपादाश्चसूक्ष्माश्चयूकालीक्षादिनामतः ॥ द्विधातेको
ठपिटिकाकंडूगंडान्प्रकुर्वते ॥

अर्थ–बाह्यकृमि मलोत्पन्न आहेत. ते वर्णानें काळे किंवा पांढरे व आकारानें तिळासारखे असतात. ते सूक्ष्म असून बहुपाद असतात. हे केश व वस्त्रें यांवर होतात. त्यानां उवा लिखा म्हणतात. त्या पासून गांधी, पुटकुळया, कंडू व गांठी हीं उत्पन्न होतात.

कृमीचें कारण.

अजीर्णभोजीमधुराम्लनित्योद्रवप्रियःपिष्टगुडोपभोक्ता ॥
व्यायमवर्जीचदिवाशयानोविरुद्धभुक्सन्लभतेकृमींश्च ॥

अर्थ–अजीर्ण झालें असतां, भोजन आणि नेहमीं गोड, आंबट, द्रवरूप, पीठ व गूळ यांचें भक्षण करणारा, निरुद्योगी, दिवसा निजणारा, आणि विरुद्ध पदार्थ भक्षण करणारा अशा पुरुषास कृमि होतात.

पुरीषकफरक्तजकृमिकारण.

माषपिष्टान्नलवणगुडशाकैःपुरीषजाः ॥ मांसमाषगुडक्षीरद

धिसुक्तैःकफोद्भवाः ॥ विरुद्धाजीर्णशाकाद्यैःशोणितोत्थाभवंतिहि ॥

अर्थ–उडीद, पिठाचें अन्न, खारट, गूळ आणि भाज्या या पासून पुरीषज (विष्ठोत्पन्न) कृमि होतात; व मांस, उडीद, गूळ, दूध, दहीं, आणि कांजी इत्यादि कारणानीं कफोत्पन्न कृमि होतात; आणि विरुद्ध व शाकादिक कच्चें अन्न इत्यादि पदार्थांनीं रक्तज कृमि होतात.

पोटांत कृमि झाल्याचें लक्षण.

ज्वरोविवर्णताशूलंहृद्रोगःसदनंभ्रमः ॥

भक्तद्वेषोतिसारश्चसंजातकृमिलक्षणं ॥

अर्थ–ज्वर, वर्णाचा बदल, शूल, उरात शूल, आंग गळणें, भ्रम, अन्नाचा द्वेष, आणि अतिसार हीं कृमि झाले असतां, लक्षणें होतात.

कफजकृमीचें लक्षण.

कफादामाशयेजातावृद्धाःसर्पंतिसर्वतः ॥ पृथुब्रध्ननिभाःकेचित्केचि

द्गंडूपदोपमाः ॥ रूढधान्यांकुराकारास्तनुदीर्घास्तथाणवः ॥ श्वेता

स्ताम्रावभासाश्चनामतःसप्तधातुते ॥ अंत्रादाउदरावेष्टाहृदयादाम

हारुजः ॥ चुरवोदर्भकुसुमाःसुगंधास्तेचकुर्वते ॥ हृल्लासमास्यस्रव

णमविपाकमरोचकं ॥ मूर्छाछर्दितृषानाहकार्श्यश्वयथुपीनसान् ॥

अर्थ–कफानें आमाशयांत कृमि उत्पन्न होऊन वाढतात; आणि ते चोहोंकडे फिरतात. त्यांत कित्येक रुंद वादीसारिखे व गेंडकीसारिखे, धान्याच्या अंकुरासारिखे, बारीक, लांब, सूक्ष्म, पांढरे व तांबूस रंगाचे असे कृमि होतात, त्यांचीं नावें अंत्राद, उदरावेष्ट, हृदयाद, महारुज, चुरु, दर्भकुसुम, आणि सुगंध असे सात प्रकारचे भेद आहेत. या नांवांत कांहीं नावें अन्वर्थक आहेत. हे कृमि झाले असतां; मळमळ, तोंडास पाणी सुटणें, अन्न पचन न होणें, अरुचि, मूर्छा, वांति, तहान, पोट फुगणें, शरीराला कृशपणा, सूज आणि पडसें हीं लक्षणें होतात.

रक्तजकृमीचें लक्षण.

रक्तवाहिशिरास्थानारक्तजातंतवोणवः ॥ अपादावृत्तताम्राश्च

सौक्ष्म्यात्केचिददर्शनाः ॥ केशादारोमविध्वंसारोमद्वीपाउदुंब

राः ॥ षट्तेकुष्ठैककर्माणःसहसौरसमातरः ॥

अर्थ—रक्त वाहणाऱ्या शिरांतील रक्तामध्यें होणारे कृमि सूक्ष्म; पादरहित, वाटोळे, तांबडे, व कित्येक फार बारीक ह्मणून न दिसणारे असे आहेत, त्यांचीं नावें केशाद, रोमविध्वंस, रोमद्वीप, उदुंबर, सौरस, आणि मातर अशीं आहेत. हे मुख्यत्वेंकरून कुष्ट उत्पन्न करितात.

पुरीषजकृमीचें लक्षण.

पक्वाशयेपुरीषोत्थाजायंतेधोविसर्पिणः ॥ प्रवृद्धाःस्युर्भवेयुश्चतेयदामा

शयोन्मुखाः ॥ तदास्योद्गारनिश्वासाविड्गंधानुविधायिनः ॥ पृथुवृ

त्ततनुस्थूलाःश्यावपीतसितासिताः ॥ तेपंचनाम्नाकृमयःककेरुकमके

रुकाः ॥ सौसुरादामलूनाश्चलेलिहाजनयंतिच ॥ विड्भेदशूलविष्टं

भकार्श्यपारुष्यपांडुताः ॥ रोमहर्षाग्निसदनगुदकंडूर्विमार्गगाः ॥

अर्थ—पक्वाशयामध्यें मळापासून झालेले कृमि गुदावाटे बाहेर पडतात, तेच आंत राहून वाढले असतां; आमाशयाकडे जातात. त्याकाळीं ढेंकरा व विष्ठेचा गंधीचे श्वासोश्वास येतात; ते कृमि जाड, वाटोळे, बारीक, मोठे व वर्णानें निळे, काळे, पिंवळे, पांढरे, असे असतात. त्यांचीं नावे ककेरुक, मकेरुक, सौसुराद, मलूद, आणि लेलिह अशीं पांच आहेत, हे होऊन अन्य आशयात गेले असतां; ढाळ, शूळ. पोटफुगणें, कृशपणा, खरखरीतपणा, निस्तेजपणा, रोमांच, अग्निमांद्य आणि गुदाला कंडू हीं लक्षणें होतात

कृमिचिकित्साप्रक्रिया.

कृमीणांविट्कफोत्थानामेतदुक्तंचिकित्सितं ॥

रक्तजानांतुसंहारंकुर्यात्कुष्ठचिकित्सया ॥

अर्थ—ही चिकित्सा जंतु व अभ्यंतर कृमि यांची सांगीतली; आणि रक्तजकृमीची चिकित्सा करणें तर कुष्ठासारिखी करावी.

तेषामन्यतमंवैद्योजिघांसुःस्निग्धमातुरं ॥ सुरसादिविपक्वेनसविषंवां

तआदिभिः ॥ विरेचयेत्तीक्ष्णतरैर्योगैरास्थापयेद्विच ॥

अर्थ—त्या आभ्यंतर किंवा बाह्यकृमीचा नाश करण्याविषयीं पूर्वी निगुंडी इत्यादिकांत सिद्ध केलें घृतादिकानीं रोग्याला स्निग्ध करून वांति देऊन नंतर तीक्ष्ण रेच किंवा पिचकारी इत्यादि क्रिया करावी,

पोळी.

शालिपिष्टंकणासिंधुविडंगंभोपनीत्वचैः ॥
सुपक्कापोलिकाजंतून्पातयेन्मधुभक्षिता ॥

अर्थ—तांदळाचें पीठ, पिंपळी, सैंधव, वावडिंग, हीं एकत्र करून त्याची भोपनीच्या रसाशीं भाकरी सिद्ध करावी; आणि ती मधाशीं खावी; ह्मणजे कृमीला पाडितें.

अन्न.

प्रत्यहंकटुकंतिक्तंभोजनंकफनाशनं ॥
कृमीणांनाशनंरुच्यमग्निसंदीपनंपरं ॥

अर्थ—कृमिरोग्यानें रोज तिखट, कडु, व कफ, कृमि यांचे नाशक आणि अग्निदीपक असें भोजन करावें.

पथ्याखुपर्णिकायुक्तागोधूमैश्चक्रमात्कृता ॥
सुपक्कापोलिकाजंतून्पातयेन्मधुभक्षिता ॥

अर्थ—हरीतकी, उंदिरकानी, गव्हाची कणीक, यांची पोळी भाजून ती मधाशीं भक्षण करावी; ह्मणजे जंतांनां पाडितें.

कृमिलेप.

पारदंमर्दयेन्निष्कंकृष्णधत्तूरकद्रवैः ॥ नागवल्लीद्रवैर्वाथवस्त्र
खंडंप्रलेपयेत् ॥ तद्वस्त्रंमस्तकेबध्वाधार्ययामत्रयंततः ॥ यू
काःपतंतिनिश्चेष्टाःपरीक्ष्यंनात्रसंशयः ॥

अर्थ—काळ्या धोतऱ्याच्या किंवा पानवेलीचे रसांत ३ मासे पारा खलावा; आणि त्याचा लहान वस्त्राला लेप करून तें वस्त्र मस्तकावर दोन प्रहर बांधून ठेवावें; ह्मणजे उवा मरून पडतात.

यवागू.

विडंगतंदुलव्योपशिग्रुभिमरिचंनतं ॥
तक्रसिद्धायवागूःस्यात्कृमिघ्नीससुवर्चिका ॥

अर्थ—वावडिंग, तांदुळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, शेवग्याची साल, मिरीं, तगर, यांची ताकामध्यें यवागू साहापट पाणी घालोन पातळ भात करितात, तसी सिद्ध करून ह्यांत पादेलोण घालोन द्यावी; ह्मणजे ती कृमिनाश करितें.

त्रिवृतादिकल्क.

त्रिवृत्पलाशबीजंचपारसीकयवानिच ॥ कंपिल्लकंविडंगंचगु

डश्चसमभागिकः ॥ तक्रेणकल्कएतेषांकृमिकोटिगणापहः ॥

अर्थ—तेंड, पळसपापडी, चोरओंवा, कपिला, वावडिंग, यांचें चूर्ण व चूर्णासमान गुळ घेऊन त्याचा ताकांत कल्क करावा. तो कृमिच्या कोटिगणांचा नाश करील.

पलाशबीजरस व कल्क.

पलाशबीजस्वरसंपिबेन्माक्षिकसंयुतं ॥

पिबेत्तद्बीजकल्कंवातक्रेणकृमिनाशनं ॥

अर्थ—पळसाच्या बीजांचा स्वरस मधाशीं; किंवा पळसपापडिचा कल्क ताकाशीं द्यावा; ह्मणजे कृमींचा नाश करितो.

स्वरस.

पारिभद्रकपत्रोत्थरसंक्षौद्रयुतंपिबेत् ॥

रुबूकस्यरसंवापिधत्तूरस्यापिवारसं ॥

अर्थ—फडुलिंबाच्या पाल्याचा स्वरस व एरंड अथवा धोतरा यांचा रस मध घालून द्यावा.

तैल.

विडंगंचशिलयासिद्धंसुरभिजलेनकटुतैलं ॥

निखिलान्नयतिविनाशंलीक्षासहितादिनैर्यूकाः ॥

अर्थ वावडिंग, मनशीळ, यांचा कल्क व गोमूत्र, यांत शिरसेल घालोन सिद्ध करावें. तें एक दिवसांत लिखा व उवा यांचा नाश करितें.

विडंगादितैल.

विडंगगोमूत्रमनःशिलानांसुगंधिकाभिःपरिपाचितंयत् ॥

तैलंभवेत्सर्पपसंभवंचयूकासुलीक्षासुहितंहिसद्यः ॥

अर्थ—वावडिंग, गोमूत्र, मनशीळ, आणि काळी निर्गुड यांच्या कल्कानें शिरसाचें तेल पचन करावें, तें उवा व लिखा, यानां तात्काळ मारितें.

धत्तूरपत्रतैल.

धत्तूरपत्रकल्केनतद्रसेनैवपाचितं ॥

तैलमभ्यंगमात्रेणयूकानाशयतिक्षणात् ॥

अर्थ—धोतऱ्याच्या पानांचा कल्क किंवा रस यांत तेल घालोन सिद्ध क लावावें; ह्मणजे क्षणांत उवांचा नाश करितें.

दाडिमादिकाढा.

दाडिमत्वक्कृतःक्वाथस्तिलतैलेनसंयुतः ॥
त्रिदिनात्पातयत्येवकोष्टतःक्रमिजालकं ॥

अर्थ—डाळिंबाच्या सालीचा काढा करून त्यांत तिळांचें तेल घालून द्यावा; तीन दिवसांत कृमिला कोठ्यांतून पाडितो.

निंबसनादिकाढा.

निंबमनस्त्रिफलाकुटजोवचात्रिकटुकंखदिरंत्रिवृतायुतं ॥
मुनिदिनंहिगवांसलिलेनचसृतमिदंक्रमिनाशकरंपिबेत् ॥

अर्थ—कडुनिंब, हरडा, बेहेडा, आवळकाठी, कुड्याची साल, सुंठ, मिरीं, पिंपळ खैराची साल व तेड यांचा गाईच्या मुतात काढा करून द्यावा; ह्मणजे तो सात दिव त कृमींचा नाश करितो.

विडंगादिकाढा.

विडंगशृतपानीयंविडंगेनावधूलितं ॥
पीतंक्रमिहरंदृष्टंक्रमिजातान्प्रदापयेत् ॥

अर्थ—वावडिंगाच्या काढ्यांत वावडिंगाचे चूर्ण घालोन प्यावा; ह्मणजे तो कृमींचा ना श करितो.

मुस्तादिकाढा.

मुस्ताखुपर्णीफलदारुशिग्रुक्वाथःसकृष्णाक्रमिशत्रुकल्कः ॥
मार्गद्वयेनापिचिरप्रवृत्तान्क्रमीन्निहन्यात्क्रमिजाश्चरोगान् ॥

अर्थ—नागरमोथा, उंदीरकानी, इंद्रजव, देवदारु व शेवगा यांचा काढा पिंपळी आणि वावडिंग यांचें चूर्ण घालोन प्यावा; ह्मणजे दोन्ही द्वारानीं फार दिनस पडणा जरी जंत असले. तरी त्यांचा, आणि त्यां पासून झालेले रोग यांचा नाश होतो.

खदिरादिकाढा.

खदिरःकुटजःपिचुमंदवचात्रिकटुत्रिफलात्रिवृतासहितं ॥
पशुमूत्रयुतंपिबसप्तदिनंक्रमिकोटिशतान्यपिहंत्यचिरात् ॥

अर्थ—खैर, कुडा, कडुनिंब, वेखंड, सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहेडा, आवळकाठ व तेड यांचें चूर्ण किंवा क़ाढा गोमूत्रांत घालोन सात दिवस प्यावा; ह्मणजे कोट्या धि कृमि असले, तरी लौकर नाश पावतील.

रस.

हिंगुलःकर्षमानःस्याद्दंतिबीजंतदर्धकं ॥ अर्कक्षीरेणसंमर्द्यदापयेद्भाव
नादश ॥ माषमात्रंप्रदातव्यमर्कमूलरसंपुनः ॥ प्रपिबेद्धिंगुसंयुक्तं
कृमिजालनिपातनं ॥

अर्थ—हिंगुळ १ तोळा व जेपाळ ६ मासे यांचें चूर्ण करून त्यास रुईच्या चिकाच्या १० भावना द्याव्या. त्यांतून एक मासा औषध रुईच्या मुळांचा रस आणि हिंग यांबरोबर द्यावें; ह्मणजे कृमि पडतात.

पारदादियोग.

शुद्धसूतमिंद्रयवमजमोदमनःशिला ॥ पलाशबीजतुल्यांशंदेवदा
ल्याद्रवैर्दिनं ॥ मर्दयेद्भक्षयेन्निष्कंमूषपर्णिकषायकं ॥ सितायुक्तंपि
बेच्चानुकृमिपातोभवत्यलं ॥

अर्थ—शुद्धपारा, इंद्रजव, ओंवा, मनशीळ व पळसपापडी, यांची समभाग चूर्णें घेऊन त्यांला देवडांगरीच्या रसांत एकदिवस खलावें, त्यांतून ४ मासे औषध उंदिर-कानीच्या काढ्यांत साकर घालून द्यावें; ह्मणजे कृमि पडतात.

कृमिकुठार.

कर्पूरंचाष्टभागंचकुटजश्चैकभागकः ॥ तत्समानंत्रायमाणमजमोदा
विडंगकं ॥ हिंगूलंविषभागंचतत्समानंचकेसरं ॥ सर्वैस्तुल्यंचसंमर्द्यभृं
गराजरसैस्तथा ॥ पलाशबीजसंमिश्रंउंदरीरसभावितं ॥ ब्राह्मीरसंत
तोदत्वासिध्येत्कृमिकुठारकः ॥वल्लमात्रांवटींकुर्याद्द्याद्धेमसमन्वितां ॥
कुर्यात्कृमिविनाशंचएवंसप्तविधंदृढं ॥

अर्थ—कापूर ८ भाग, कुड्याची साल, त्रायमाण, ओंवा, वावडिंग, हिंगुळ, बचनाग, केशर व पळसपापडी हीं सर्व एकेक भाग एकत्र करून त्याला माका, उंदिरकानी व ब्राह्मी, यांचा रसाचा भावना द्याव्या. हा कृमि कुठार एकवाल धोतऱ्याशीं द्यावा; ह्मणजे सर्व प्रकारचा कृमीचा नाश करितो.

कृमीमुद्गरस.

क्रमेणवृद्धंरसगंधकाजमोदाविडंगंविषमुष्टिकाच ॥ पलाशबीजस्यच
चूर्णमस्यनिष्कप्रमाणंमधुनावलीढं ॥ पिबेत्कषायंघनजंतदूर्ध्वंरसोप्र
युक्तःकृमिमुद्गराख्यः ॥

अर्थ—पाराभाग १, गंधक २, अजमोदा ३, वावडिंग ४, वकाणालिंव ५ व पळसपापडि ६ भाग यांचे चूर्ण एक तोळा अथवा शक्तिप्रमाणे मधाबरोबर चाटावें; नंतर नागरमोथ्याचा काढा प्यावा, याला कृमिमुद्गररस ह्मणतात.

विडंगादिचूर्ण.

विडंगासिंधूद्भवहिंगुपथ्याकंपिल्लसौवर्चलपिप्पलीनां ॥
चूर्णंकवोष्णोदकसंगृहीतंकृमीन्निहंत्याशुदहेद्भ्रमिंच ॥

अर्थ—वावडिंग, सैंधव, हिंग, हरीतकी, कपिला, पादेलोण, आणि पिंपळी यांचें चूर्ण कोमटपाण्याशीं द्यावें; ह्मणजे तें कृमि, आणि वांति यांचा नाश करितें.

दुसरा प्रकार.

विडंगानांतुचूर्णंचकर्षार्धंकर्षमेवच ॥
मधुनासहितंलिह्यात्कृमिकोटिनिवृत्तये ॥

अर्थ—वावडिंगाचें चूर्ण तोळा किंवा साहामासे घेऊन मधाशीं द्यावें; ह्मणजे तें कृमींच्या समुदायाचा नाश करितें.

पारसिकयवानीचूर्ण.

पारसिकांयवानींतुपर्णेनसहभक्षयेत् ॥
कृमिजालंनिहंत्याशुपीतोनिंवरसोथवा ॥

अर्थ—चोरओवा विड्याच्या पानांतून खावा; किंवा कडुनिंबाचा रस प्यावा; ह्मणजे कृमींचा नाश होतो.

निंबादिचूर्ण.

निंवाजमोदाजंतुघ्नंब्रह्मवीजंसचोरकं ॥
सहिंगुकंसमगुडंसद्योजंतुविनाशनं ॥

अर्थ—कडुनिंब, ओंवा, वावडिंग, चोरओंवा व हिंग यांचें चूर्ण समभाग गुळाशीं द्यावें; ह्मणजे कृमिनाश करितें.

विडंगव्योषसंयुक्तंभक्तमंडंपिबेन्नरः ॥
दीपनंकृमिनाशायजठराग्निविवृद्धये ॥

अर्थ—वावडिंग, सुंठ, मिरीं व पिंपळी, यांचें चूर्ण घालून भाताची पेज प्यावी; ह्मणजे ती दीपन आहे, आणि कृमिनाश करून जठराग्नीला वाढवितें.

त्रिफलाद्यघृत.

फलत्रयंवचादंतीत्रिवृत्कंपिल्लकैःसमैः ॥

सिद्धंसर्पिर्गवांमूत्रेपीतंचकृमिनाशनं ॥

अर्थ–हरडा, बेहेडा, आवळकाठी, वेखंड, दांतीचें बीज, तेड, कपिला व गोमूत्र, यांच्या कल्काशीं घृत पाचन करावें. तें प्राशन केलें असतां, कृमींचा नाश होतो.

विडंगघृत.

त्रिफलायास्त्रयःप्रस्था विडंगंप्रस्थमेवच ॥ दीपनंदशमूलंचलाभतः समुपाहरेत् ॥ पादशेषेजलद्रोणेपूतेसर्पिर्विपाचयेत् ॥ प्रस्थोन्मितंसिंधुयुतंतत्परंकृमिनाशनं ॥ विडंगघृतमेतत्तुलेह्यंशर्करयासह ॥ सर्वान्कृमीन्प्रणुदतिवज्रंमुक्तमिवासुरान् ॥

अर्थ–त्रिफला १९२ तोळे, वावडिंग ६४ तोळे, दीपनीयगण व दशमुळें यांतून मिळतील तीं औषधें घेऊन त्यांचा २०४८ तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करून त्यांत ६४ तोळे तूप व सैंधव घालून घृत सिद्ध करावें; तें विडंग घालून घृत साकरेशीं द्यावें; ह्मणजे कृमींचा नाश करितें.

सारनालयोग.

सारनालाखुपर्णीवातक्रंपालाशबीजयुक् ॥
हिंग्वाजमोदातक्रंवाकृमिरोगंविनाशयेत् ॥

अर्थ–कांजीतून, उंदीरकानी, व ताकांतून, पळसपापडी, किंवा ताकांतून हिंग व ओवा, हीं कृमिरोगनाशक आहेत.

भल्लातकयोग.

भल्लातकंवादध्नाचचिंचाम्लेनहरेत्कृमीन् ॥

अर्थ–बिबा दह्यांबरोबर किंवा चिंचेबरोबर खावा; ह्मणजे तो कृमिनाश करील.

विडंगादियोग.

विडंगंपारिभद्राम्रंब्रह्मबीजंपृथक्पृथक् ॥
मधुनाकृमिनाशायनिंबंवाहिंगुसंयुतं ॥

अर्थ–वावडिंग, अथवा कडुलिंबाची पानें, किंवा पळसपापडी, मधाबरोबर खावी; ह्मणजे कृमिनाश होतो; अथवा लिंबाची पानें हिंगाबरोबर खावीं.

पलाशबीजयोग.

पलाशबीजंवल्लैकंस्नुहिक्षीरेणजंतुजित् ॥

अर्थ–पळसपापडी निवडुंगाचे रसाबरोबर खावी; ह्मणजे जंत मरतील.

खुरासनीओंव्याचा कल्क.

पारसीयवानीपीतापर्युषितवारिणाप्रातः ॥
गुडपूर्वाकृमिजालंकोष्ठगतंपातयत्याशु ॥

अर्थ—खुरासनीओंवा शिळ्यापाण्यांत वाटून त्यांत गूळ घालून द्यावा; ह्मणजे कोष्ठगत कृमिजालाला पाडवितो.

निशोत्तरादियोग.

भंडींपिष्टारनालेनगोमूत्रेणातिमुक्तकः ॥
कुनटीकटुतैलेनयोग्यायूकापहास्त्रयः ॥

अर्थ—पांढरें निशोत्तर कांजीशीं, किंवा टेंभुरणी गोमुत्राशीं, अथवा मनशीळ शिरसांचे तेलाशीं. हे तिनी योग उवानाशक आहे.

पिप्पल्याद्यचूर्ण.

पिप्पलीपिप्पलीमूलंसैंधवंकृष्णजीरकं ॥ चव्यंचित्रकतालीसपत्रकंनागकेसरं ॥ एषांद्विपलिकान्भागान्पंचसौवर्चलस्यच ॥ मरिचाजाजिशुंठीनामेकैकस्यपलंपलं ॥ दाडिमात्कुडवंचैवद्विदलंचाम्लवेतसात् ॥ सर्वमेकत्रसंयुक्तंयोजयेत्कुशलोभिषक् ॥ पिप्पल्यादिरितिख्यातंनष्टवन्हेश्चदीपनं ॥ अर्शांसिग्रहणींगुल्मसुदरंसभंगदरं ॥ कृमिकंडूरुचिहरंसुरयोष्णोदकेनवा ॥ नातःपरंतरंकिंचिदामशोथनिषूदनं ॥

अर्थ—पिपळी, पिंपळीमूळ, सैंधव, शाहाजिरें, चवक, चित्रकमूळ, तालीसपत्र, नागकेशर, हीं प्रत्येकीं ८ तोळे, पादेलोण ९ तोळे, व मिरें, जिरें, सुंठ, हीं चार चार तोळे; डाळिंब १६ तोळे, आम्लवेतस ८ तोळे हीं संपूर्ण एकत्र करून कुशल वैद्यानें हें पिप्पल्यादि चूर्ण द्यावें. हें मंदाग्निला दीपन करितें; व अर्श, संग्रहणी, गुल्म, उदर, भगंदर, कृमि, कंडू, अरुचि, यांवर मद्याशीं किंवा ऊन पाण्याशीं द्यावें; याहून दुसरें आम व सूज यांचा नाश करणारें औषध नाहीं.

आखुपर्ण्यादिचूर्ण.

आखुपर्णदिलैःपिष्टैःपिष्टकेनचपूपकान् ॥
भुक्त्वासौवीरकंचानुपिबेत्कृमिहरंपरम् ॥

अर्थ—उंदीरकानीचीं पानें कुटून चूर्ण करून त्यांत पीठ मिश्र करून त्याचे घारगे करून खावे; आणि वरतीं सातूचे कांजी प्यावी; ह्मणजे कृमींचा नाश होतो.

सुवर्चिकादिचूर्ण.

सुवर्चिकारामठपत्रिकाव्हाविडंगवाल्हीककणाग्निविश्वा ॥
यवानिकाग्रंथिकभद्रमुस्तातक्रेणचूर्णंकृमिकोटिहारि ॥

अर्थ—सज्जीखार, हिंग, जायपत्री, वावडिंग, केशर, पिंपळी, चित्रक, सुंठ, ओवा, पिंपळमूळ व नागरमोथा यांचें चूर्ण ताकाबरोबर घ्यावें; ह्मणजे कोट्यावधि कृमींचा नाश होईल.

निंबादिचूर्ण.

निंबुवत्सकविडंगसंयुतंरामठेनसहजंतुनाशनम् ॥
निंबपत्रमजमोदकान्वितंचूर्णमेवमधुनाप्रशस्यते ॥

अर्थ—लिंब, कुडा, वावडिंग व हिंग यांचें चूर्ण जंतनाशक आहे; आणि लिंबाचीं पानें ओंवा यांचें चूर्ण मधाबरोबर खावें; ह्मणजे तेंहीं जंतनाशक आहे.

उवा इत्यादिकांवर तैल.

चित्रकंदंतिनीमूलंकोशातकिसमन्वितं ॥
कल्कंपिष्ट्वापचेत्तैलंकेशशत्रुविनाशनं ॥

अर्थ—चित्रक, दंतीमूळ, दाडकी, यांचा कल्क घालून जें तेल काढावें, तें उवा व लिखा यांचें नाशक आहे.

विडंगादितैल.

सविडंगजतुशिलयासिद्धंसुरभेर्जलेनकटुतैलं ॥
निखिलानयातिविनाशंलिक्षासहिताश्चवैयूकाः ॥

अर्थ—वावडिंग, शिलाजित, आणि गोमूत्र यांत शिरसाचें तेल सिद्ध करावें, तें लिखा, उवा यांचा नाश करितें.

कपिलाचूर्ण.

कांपिल्यचूर्णकर्पार्धंगुडेनसहभावितं ॥
पातयेत्तुकृमीन्सर्वानुदरस्थान्नसंशयः ॥

अर्थ—कपिलाचूर्ण अर्धा तोळा, गुळाबरोबर भक्षिलें असतां, पोटांतले संपूर्ण कृमि पडतील; यांत संशय नाहीं.

निंबादिरस.

निंबपत्रसमुद्भूतंरसंक्षौद्रयुतंपिबेत् ॥

धत्तूरपत्रजंवापिकृमिनाशनमुत्तमं ॥

अर्थ—कडुलिंबाच्या पाल्याचा रस अथवा धोत्र्याचे पाल्याचा रस मध घालून प्यावा; ह्मणजे तो कृमींचा नाश करितो.

हरीतकीचूर्ण.

हरीतकीचैवतथाहरिद्रासौवर्चलंचैवसमंविचूर्णितं ॥
इंद्रवारुणिजलेनभावितंकाटसंघविनिवारणंपरं ॥

अर्थ—हरीतकी, हळद व पादेलोण हीं समभाग घेऊन चूर्ण करून त्यास कंवडळीचे काढ्याची भावना द्यावी; हें चूर्ण कृमिसमुदायाचें नाशक आहे.

सावित्रवटक.

पलंकपापलेद्वेचकार्ष्णायसपलद्वयं ॥ पथ्यामृताक्षधात्रीणांपृथगेकैकशःपलं ॥ पूतीकचव्यव्योषाग्निकारवीकृमिनाशनैः ॥ चूर्णितैरर्धपलिकैस्तिलतैलंपलद्वयं ॥ त्रिफलायारसप्रस्थेखंडप्रस्थयुगंभवेत् ॥ दार्वीप्रलेपात्पाकश्चचातुर्जातकसंयुतं ॥ सावित्रवटकाह्येतेयथाग्निबलभक्षिताः ॥ कृमिकोष्ठाग्निदौर्बल्यशोथगुल्मोदरव्रणान् ॥ कामलापांडुरोगार्शोभगंदरगदव्रणान् ॥ निहंत्येतद्धिसंसिद्धंवयस्थैर्यबलप्रदं ॥ वायुमेहप्रशमनाश्चक्षुषःप्रीतिवर्धनाः ॥ भवंत्यतिस्निग्धभुजोवातातपनिषेविणः ॥

अर्थ-पळसाचें बीज ८ तोळे, लोहभस्म ८तोळे हरीतकी, गुळवेल, वेहडा, आवळकाठी, हीं प्रत्येकीं ४ चार तोळे व घाणेरा करंज, चवक, सुंट, मिरीं, पिंपळी, चित्रक, ओंवा, वावडिंग, हीं २ तोळे व तिळांचे तेल ८ तोळे, त्रिफळ्याचा काढा किंवा रस १६ तोळे व खडिसाकर ३२तोळे हीं एकत्र करून पळीला चिकटे तों पर्यंत कढवावें. व त्यांत चातुर्जात (दालचिनी, तमालपत्र, एलची, नागकेशर) हीं घालोन तें एकत्र केलें असतां, त्याला सावित्रवटक ह्मणतात. हा अग्नि व बल पाहून द्यावा; ह्मणजे कृमि, अग्निमांद्य, दुर्बलता, सूज, उदर, व्रण, कावीळ, पांडुरोग, अर्श, भगंदर, यांचा नाश करितो, व वय, बल, आणि स्थैर्य, यांना करितो, व गुद व मेह यांचा नाश करितो, व नेत्रांना हितावह असा आहे व यांवर स्निग्ध भोजन आणि वायु व ऊन यांचे सेवन करावें.

विशालादिधूप.

विशालायाःफलंपक्वंतप्तलोहोपरिक्षिपेत् ॥
तद्धूमोदंतलग्नश्चेत्कीटानांपातनःपरः ॥

अर्थ—कडुवृंदावनाचें पिकलेलें फळ तापलेल्या लोखंडावर टाकून त्याचा धूर दांतास द्यावा, तो उत्कृष्ट कृमि पाडणारा आहे.

अष्टसुगंधधूप.

लाक्षाभल्लातकश्चश्रीवासःश्वेतापराजिता ॥ अर्जुनस्यफलंपुष्पं विडंगंसर्जगुग्गुलुः ॥ एभिःकृतेनधूपेनश्याम्यंतिनिहितेग्रहे ॥ भुजंगमूपकादंशाघुणामशकमत्कुणाः ॥

अर्थ—लाख, बिबवे, धूप, पांढऱ्या विष्णुक्रांताची मुळी, अर्जुनाचें फल व फुलें, वावडिंग राळ व गुग्गुळ यांचा धूप करून घरांत ठेविला असतां, साप, उंदिर, माशा, बारीक कीट, आणि ढेंकूण, यांचा नाश करितो.

ककुभादिधूप.

ककुभकुसुमविडंगंलांगलीभल्लातकंतथोशीरं ॥ श्रीवेष्टकंसर्जरसंचंदनमथकुष्टमष्टमंदद्यात् ॥ एपसुगंधोधूपःसत्कृमीनां विनाशकःप्रोक्तः ॥ तथासमत्कुणानांशिरसिचगात्रेषुयूकानां ॥

अर्थ—अर्जुनवृक्षाचीं फुलें, वावडिंग, पिठवण, बिबवा, वाळा, सुरूच्या डीक, राळ, चंदन, कोठ, यांचा धूप एकवेळ घेतला असतां, कृमिनाशक आहे, व हा धूप शय्येला दिला असतां, ढेंकूण उवा ही मरतील.

कृमीवर पथ्य.

आस्थापनंकायशिरोविरेचनंधूपःकफघ्नानिशरीरशोधनं ॥ चिरंतनावैणवरक्तशालयःपटोलवेत्राग्ररसोनवास्तुकं ॥ हुताशमंदारदलानि सर्पपानवीनमोचंवृहतीफलान्यपि ॥ तिक्तानिनालीचफलानिमौषिकंमापंविडंगंपिचुमंदपल्लवं ॥ तैलंतिलानामथसर्षपोद्भवंसौवीरमूक्तंचतुषोदकंमधु ॥ पचेलिमंतारमरुष्करंगवांमूत्रंचतांबूलसुरामृगंरजः ॥ औष्ट्राणिमूत्राज्यपयांसिरामठंक्षारोजमोदाखदिरश्चवत्सकं ॥ जंबीरनीरंसुपवीयवानिकासाराःसुराव्हागुरुशिंशिपोद्भवः ॥ तिक्तःकषायः कटुकोरसोयंवर्गोनराणांकृमिरोगिणांसुखः ॥

अर्थ—पिचकारी, शरीर व मस्तक यांचे रेच, धूम, कफनाशक पदार्थ, शरीराला शोधन, फारदिवसांचे वेळूचे बीज, तांबडे भात, पडवळ, वेताचें मूळ, लसूण, चाकवत, चित्रक, मंदाराचीं पानें, मोहऱ्या, जुन केळें, रिंगणी, कडुपदार्थ, नालीकफळें, मौषिक, उडीद,

वावडिंग, कडुनिंबाचा पाला, तिळ व सर्षप यांचे तेल; कांजी, दह्याची निवळी, तुपाचा काढा, मध, उडीद, रुपें, विबदा, गोमूत्र, विडा, मद्य, कस्तूरी, उंटाचें मूत, तूप, दूध, हिंग, क्षार, ओंवा, खेर, कुडा, लिंबूरस, कारळी, अजमोदा, देवदार व शिसवा याचा नार, व कडु, तुरट, तिखट, हे रस; इत्यादि कृमिरोगावर पथ्यवर्ग सांगीतला.

अपथ्य.

छर्दिंचतद्वेगविधारणंचविरुद्धपानाशनमन्हिनिद्रा ॥ द्रवंचपिष्टानि मजीर्णभोजनंघृतानिमापादधिपत्रशाकं ॥ मांसंपयोम्लंमधुरोरसश्चकृ मीन्जिघांसुःपरिवर्जयेत्तु ॥

अर्थ–वांति, वांतिवेगधारण, विरुद्ध अन्न व पान, दिवानिद्रा, द्रव पदार्थ, पिष्टान्न, अजीर्णावर भोजन, तूप, उडीद, दहीं, पालेभाज्या, मांस, दूध, आंबट, मधुर, हे रस कृमि झालेल्या रोग्यानें सोडावे.

दुसरा प्रकार.

शीतांबुमधुरक्षीरंदधिक्षारघृतादिकं ॥
सौवीरंपत्रशाकाश्चवर्जयेत्कृमिवान्नरः ॥

अर्थ–थंडपाणी, मधुर रस, क्षीर, दधि, मीठ, तूप, बोर व पालेभाज्या, हे ही पदार्थ कृमि झालेल्या रोग्यानें सोडावे.

पांडुरोग कर्मविपाक.

देवद्विजद्रव्यहारीपांडुरोगीभवेन्नरः ॥ कृच्छ्रातिकृच्छ्रेकुर्याच्चचां द्रायणमतंद्रितः ॥ कुर्यात्कूष्मांडहोमंचस्वर्णचंद्रेणवाससी ॥ ब्राह्मणेभ्योयथाशक्तिपांडुरोगस्यशांतये ॥

अर्थ–देव व ब्राह्मण यांचें द्रव्य हरण करणारा, पांडुरोगी होतो. त्याणें पांडुरोग नाशार्थ कृच्छ्र, अतिकृच्छ्र, चांद्रायण प्रायश्चित्त; किंवा कूष्मांडहोम; अथवा सुवर्णाचा चंद्र व वस्त्रें द्यावीं, व यथाशक्ति द्रव्य द्यावें; ह्मणजे रोगी पांडुरोगापासून मुक्त होतो.

शिरोवेदनासहितपांडुरोगहर.

अग्निष्टोमादिकर्माणिप्रक्रम्यनसमापयेत् ॥ सपांडुरोगीभवति

शिरोवेदनवांस्तथा ॥ कृच्छ्रातिकृच्छ्रेकुर्याच्चचांद्रायणमतंद्रितः ॥
शतंचभोजयेद्विप्रान्मिष्टान्नेनयथेप्सितं ॥

अर्थ—जो अग्निष्टोमादिकर्माला आरंभ करून समाप्तीस नेत नाहीं, तो कपालशूलयुक्त पांडुरोगी होतो, त्याणें कृच्छ्र, अतिकृच्छ्र, चांद्रायण प्रायश्चित्त, किंवा शंभर ब्राह्मणाला मिष्टान्नयुक्त व इच्छित भोजन द्यावें; ह्मणजे त्या व्याधीपासून तो मुक्त होतो.

पांडुरोगनिदान.

पांडुरोगाःस्मृताःपंचवातपित्तकफैस्त्रयः ॥
चतुर्थःसन्निपातेनपंचमोभक्षणान्मृदः ॥

अर्थ—पांडुरोग वात, पित्त, कफ, सन्निपात आणि मृत्तिकाभक्षणजन्य मिळून पांच प्रकारचा जाणावा.

निदानपूर्वकसंप्राप्ति.

व्यवायमम्लंलवणानिमद्यंमृदंदिवास्वप्नमतीवतीक्ष्णं ॥
निषेव्यमाणस्यविदूष्यरक्तंकुर्वंतिदोषास्त्वचिपांडुभावं ॥

अर्थ—मैथुन, आंबट, खारट, मद्य, मृत्तिका, दिवानिद्रा आणि अतितिखट यांचें अतिशय सेवन करणाऱ्या पुरुषाचे रक्तादिकांला वातादिदोष दूषित करून त्वचेचा ठाई पांढरेपणा उत्पन्न करितात.

पूर्वरूप.

त्वक्स्फोटनिष्ठीवनगात्रसादोमृद्भक्षणप्रेक्षणकूटशोथाः ॥
विण्मूत्रपीतत्वमथाविपाकेभविष्यतस्तस्यपुरःसराणि ॥

अर्थ—अंगावरची चामडी फुटल्ये, तोंडाला थुंका, आंगगळणें, मृत्तिकेचें भक्षण, नेत्रगोलांना सूज व मळ, मूत्र यांना पिवळेपणा, आणि भोजन केलेल्या अन्नाचा चांगला पाक नहोणें हीं लक्षणें पांडुरोग होण्याच्या पूर्वीं होतात.

पांडुरोगचिकित्सा.

साध्यंचपांडूवामयिनंसमीक्ष्यस्निग्धंघृतेनोर्ध्वमधश्चशुध्दं ॥ संपादयेत्क्षौद्रघृतप्रगाढैर्हरीतकीचूर्णमयप्रयोगैः ॥ पिबेद्घृतंवारजनीविपक्वंयत्त्रैफलंतैल्वकमेकमेव ॥ विरेचनद्रव्यकृतंपिबेद्वायोगांश्चवैरेचनिकान्घृतेन ॥ विधिःस्निग्धोत्रवातोत्थेतिक्तःशीतश्चपैत्तिके ॥ श्लैष्मिकेकटुरूक्षोष्णःकार्योमिश्रस्तुमिश्रजे ॥

अर्थ—पांडुरोगी साध्य आहे, असें पाहून-तूप पाजून स्निग्ध करावा; आणि रेच वमन देऊन शुद्ध करावा; नंतर मध, तूप व हरीतकी ज्या चूर्णांत पुष्कळ आहे; अ औषधांचा उपचार करावा, व हळद घालून कढवलेलें तूप प्यावें; किंवा त्रिफळा आ हिंगणबेट यांणि सिद्ध केलेलें तूप प्यावें; अथवा कांहीं एक औषधानीं रेचन सिद्ध करू घेत जावें; अथवा रेचक घृताबरोबर प्यावें; आतां सामान्य उपचार वातपांडुवर स्निग्ध पित्तपांडुवर कडु व शीत; आणि कफपांडुवर तिखट, रूक्ष, व उष्ण; आणि द्वंद्वजावर मिश्र, याप्रमाणे उपचार करावे.

वातपांडुनिदान.

त्वङ्मूत्रनयनादीनांरूक्षकृष्णारुणाभता ॥
वातपांड्वामयेकंपतोदानाहभ्रमादयः ॥

अर्थ—त्वचा, मूत्र, नयन यांस रूक्षपणा व कृष्णवर्णमिश्रित आरक्तपणा येतो; व कंप, तोद, पोटास बद्धता व भ्रम इत्यादिक वातपांडूचीं लक्षणें जाणावीं.

मंडूराद्यरिष्ट.

मंडूरस्यतुशुद्धस्यतुलार्धंपरिकीर्तितं ॥ तद्वल्लोहस्यपत्राणितिलोत्सेध प्रमाणतः ॥ पुराणगुडपंचाशत्कोलप्रस्थत्रयंतथा ॥ निकुंभचित्रका भ्यांचपलेद्वेद्वेसुचूर्णिते ॥ पिप्पलीनांविडंगानांकुडवंचपृथक्पृथक् ॥ त्रींश्चापित्रिफलाप्रस्थान्जलद्रोणेसमावपेत् ॥ अर्धमासस्थितोधान्येपे योरिष्टप्रमाणतः ॥ दोषानुभयतःसाध्यपांडुरोगंनियच्छति ॥ कृमीनर्शां सिकुष्ठंचकासंश्वासकफामयान् ॥ एषोरिष्टस्तुमंडूरःसर्वपांड्वामयापहः ॥

अर्थ—शुद्ध मंडूर, दोनशे तोळे, तितकेच लोखंडाचे पत्रे तिळाइतक्या जाडीचे, जुना गूळ, २९२ तोळे, जळवेत आणि चित्रक यांचे चूर्ण प्रत्येकीं ८ तोळे, पिंपळी आणि वावडिंग प्रत्येकीं १६ तोळे, हिरडे ६४ तोळे, बेहेडे ६४ तोळे व आवळकाठी ६४ तोळे, हीं सर्व औषधें १०२४ दहाशें चौवीस तोळे पाण्यात घालून पंध्रादिवस पर्यंत धान्यात ठेवावीं; नंतर अरिष्ट देण्याचें प्रमाण असेल त्याप्रमाणे द्यावा. तेणे करून तो दोहोंद्वारांनी दोष पाडून पांडुरोगाचा नाश करील. तसेंच कृमि, मुळव्याध, कुष्ठ, कास, श्वास व कफरोग यांचा हि नाश करील. याला अरिष्टमंडूर ह्मणतात. हा सर्वप्रकारचे पांडुरोगाचा नाशक आहे.

पित्तपांडुनिदान.

पीतमूत्रशकृन्नेत्रोदाहतृष्णाज्वरान्वितः ॥
भिन्नविट्कोतिपीताभःपित्तपांड्वामयीनरः ॥

अर्थ–पित्तपांडूमध्ये रोग्याचें मूत, मळ व नेत्र हे पिंवळे होतात. व आंगाचा दाह, ताहान व ज्वर यांणीं युक्त असतो, मळ पातळ होतो; आणि शरीर फार पिंवळें होतें.

आमलक्यवलेह.

रसमामलकानांतुसंशुद्धंयंत्रपीडितं ॥ द्रोणंपचेच्चमृद्वग्नौतत्रेमानिप्रदापयेत् ॥ चूर्णितंपिप्पलीप्रस्थंमधुकंद्विपलंतथा ॥ प्रस्थंगोस्तनिकायाश्चद्राक्षायाःकल्कपेषितं ॥ शृंगबेरपलेद्वेतुतुगाक्षिर्याःपलद्वयं ॥ तुलार्धंशर्करायाश्चघनीभूतंसमुद्धरेत् ॥ मधुप्रस्थसमायुक्तंलेहयेत्पलसंमितं ॥ हलीमकंकामलांचपांडुत्वंचापकर्षति ॥

अर्थ–आवळ्याचा रस स्वच्छ १०२४ तोळे शिजत ठेवावा; त्यांत पिंपळीचें चूर्ण ६४ तोळे, जेष्टीमध ८ तोळे, काळा द्राक्ष बिया काढून कुसकरून ६४ तोळे, सुंठ व वंशलोचन ८ तोळे व साकर २०० तोळे, इतके पदार्थ टाकून घट्ट झाल्यावर उतरावा; नंतर त्यांत ६४ तोळे मध घालून ठेवावा. तो ४ तोळे प्रमाणे खावा; ह्मणजे हलीमक, कामला व पांडुरोग हे जातील.

दुग्धयोग.

लोहपात्रस्थितंक्षीरंसप्ताहंपथ्यभोजनं ॥
पिबेत्पांड्वामयीशोषीग्रहणीदोषपीडितः ॥

अर्थ–लोखंडाचे पात्रांत तापवून ठेवलेले दूध सात दिवस प्यावें; आणि पथ्य करावें, व तेणेंकरून पांडुरोग, क्षय व संग्रहणी हे रोग दूर होतात.

कफपांडुनिदान

कफप्रसेकश्वयथुस्तंद्रालस्यातिगौरवैः ॥
पांडुरोगीकफाच्छुक्लैस्त्वङ्मूत्रनयनाननैः ॥

अर्थ–तोंडावाटे कफाचा स्राव, सूज, झांपड, आळस, जडपणा, आणि त्वचा, मूत, डोळे व तोंड यांना पांढरेपणा. या लक्षणानीं कफजपांडुरोग जाणावा.

दशमूलादिकाढा.

द्विपंचमूलीक्वथितंसविश्वंकफात्मकेपांडुगदेपिबेत्तत् ॥ ज्वरेतिसारेश्वयथौग्रहण्यांकासेरुचौकंठहृदामयेषु ॥

अर्थ–दशमुळें आणि सुंठ यांचा काढा कफयुक्त पांडुरोग, ज्वर, अतिसार, सूज संग्रहणी, खोकला, अरुचि, कंठरोग व हृद्रोग, यांच्या नाशार्थ प्यावा.

नागरादियोग.

नागरंलोहचूर्णंवाकृष्णांपथ्यामयोश्मजां ॥
गुग्गुलुंवाथमूत्रेणकफपांड्वामयीनरः ॥

अर्थ-सुंठ आणि लोहभस्म, अथवा पिंपळी, हिरडा, आणि लोह, शिळाजीत अथवा गुग्गुळ, गोमूत्र, इतके योग कफपांडूचे नाशक आहेत.

लोहभस्मयोग.

अतिशुद्धमयोभस्मसर्पिःक्षौद्रयुतंलिहेत् ॥
पांडुरोगस्यनाशायकामलानांचसर्वशः ॥

अर्थ-अत्युत्तम लोहभस्म, मध व तूप यांचे बरोबर द्यावें; म्हणजे तो पांडुरोग व कामला यांचा नाश करील.

मधुमंडूर.

गृहीत्वाभिषक्प्रस्थमंडूरभागंशृतेत्रैफलेमर्दयित्वाचयामं ॥ पुटेपाचयेद्यामयुग्मंकृशानौपुटानीहदेयानिचंद्राक्षिवारं ॥ तथाधेनुमूत्रेकुमारीरसेचविधेयश्चपंचामृतेयोगराजः ॥ भवेत्सिंधुनागैःपुटैःसिद्धिदोयमचिंत्यप्रभावश्चमंडूरएषः ॥ मधुमंडूरकएपकणामधुनाचिरपांडुगदंनुहेममितः ॥ जनकोरुधिरस्यनिहंतिपरंविविधार्तिहरस्त्वनुपानवलैः ॥

अर्थ-६४ तोळे लोहकीटाचें चूर्ण त्रिफळ्याचे काढ्यांत प्रहरभर खलून दोन प्रहर अग्निपुट द्यावें. याप्रमाणें एकवीस पुटें द्यावीं; नंतर गोमूत्र, कोरफडीचा रस, आणि पंचामृत यांच्या काढ्याची प्रत्येकीं एकवीस पुटें द्यावीं; ह्मणजे ८४ पुटानीं सर्व सिद्धि देणारा, अचिंत्यप्रभाव, असा हा मंडूर सिद्ध होतो. आतां पचामृत ह्मणजे सुंठ, सफेद मुसळी, गुळवेल, शतावरी व गोखरु या पांच औषधांस पंचामृत असें ह्मणतात. असा सिद्ध झालेला मधुमडूर, पिंपळी व मध, यां बरोबर साहा गुंजा सेवन केला तर पांडुरोगाचा लवकर नाश करील; आणि शरीरांत रक्त उत्पन्न करील आणखी अनुपान भेदेंकरून नानाप्रकारचे रोग दूर करील.

मंडूरवटक.

सुराब्ददार्वीकटुपट्कताप्यंवेल्लंवराचेतिसमांशचूर्णं ॥ मंडूरभागद्वयमष्टमूत्रेपक्त्वागवांतक्रसमंचदेयं ॥ कामलापांडुमेहार्शःशोफकुष्ठकफामयान् ॥ ऊरुस्तंभमजीर्णंचप्लीहानंनाशयेद्धिच ॥

अर्थ–देवदारु नागरमोथे, दारुहळद, सुंठ, मिरें, पिंपळी, चवक, चित्रक, पिंपळमूळ, सुवर्णमाक्षिक भस्म, वावडिंग व त्रिफळा हीं सर्व एक एक भाग; आणि मंडूर, भस्म दोन भाग घेऊन सर्वांचें चूर्ण एकत्र करून अष्टमूत्रांत अथवा गाईचे ताकांत घालून घ्यावें. तेणेंकरून कामला, पांडुरोग, मेह, अर्श, शोफ, कुष्ठ, कफरोग, उरुस्तंभ, अजीर्ण, प्लीहा, यांचा नाश होईल. अष्टमूत्रें ह्मणजे गाय, हैस, शेळी, मेंढी, गाढव घोडा, उंट व हत्ति, यांची मूत्रें होत.

मंडूरलवण.

कृत्वाग्निवर्णमलमायसंतुमूत्रेभिषिंचेद्बहुशोगवांच ॥ तत्रैवसिंधूत्थसमंविपाच्यंनिरुद्धधूमंचबिभीतकाग्नौ ॥ तक्रेणपीतंमधुनाथवापिबिभीतकाख्यंलवणंप्रयुक्तं ॥ पांड्वामयिभ्योहितमेतदस्मात्पांड्वामयघ्नंनहिकिंचिदन्यत् ॥

अर्थ–लोखंडाचें कीट अग्निप्रमाणें लाल तापवून गोमूत्रांत विझवावें. याप्रमाणें पुष्कळ वेळा करून नंतर सैंधव आणि तें लोहकीट गोमूत्रांत खलून धूर न जाईल असें बिव्याच्या अग्नीनें पचवावें. याला बिभीतकाख्यलवण असें ह्मणतात. हें ताकाबरोबर किंवा मधाबरोबर घ्यावें. पांडुरोगावर हितकारक आहे. यापेक्षा पांडुनाशक दुसरें औषध नाहीं.

सन्निपातपांडुनिदान.

सर्वान्नसेविनःसर्वेदुष्टादोषास्त्रिदोषजं ॥
लिंगैःकुर्वंतिदोषाणांपांडुरोगंसुदारुणं ॥

अर्थ–नानाप्रकारचें अपथ्यअन्नभक्षण करणाऱ्या पुरुषाचे शरीरांत वातादिदोष कुपित होऊन पूर्वोक्त वातादिकांच्या सर्व लक्षणांनीं युक्त व अतिभयंकर अशा पांडुरोगाला उत्पन्न करितात. तो सन्निपातपांडुरोग जाणावा.

पांडूचें असाध्य लक्षण.

ज्वरारोचकहृल्लासच्छर्दितृष्णाक्लमान्वितः ॥
पांडुरोगीत्रिभिर्दोषैस्त्याज्यःक्षीणहतेंद्रियः ॥

अर्थ–ज्वर, अरोचक, लालास्राव, ओकारी, तृष्णा व अनायासानें श्रम, यांणीं युक्त व जो अत्यंत क्षीण, आणि ज्याच्या इंद्रियांची स्वस्वविषय ग्रहणशक्ति नष्ट झाली. असा जो सन्निपातिक पांडुरोगी तो असाध्य जाणावा.

असाध्यलक्षण.

शूनाक्षिकूटगंडभ्रूःशूनपन्नाभिमेहनः ॥ कृमिकोष्ठोतिसार्यैतमलंचा

सृक्कफान्वितं ॥ पांडुरोगश्चिरोत्पन्नःखरीभूतोनसिध्यति ॥ कालप्रक र्षाच्छूनांगोयोवापीतानिपश्यति ॥ बद्धाल्पविट्सहरितंसकफंयोतिसा र्यते ॥ दीनःश्वेतादिदिग्धांगश्छर्दिमूर्छातृडर्दितः ॥

अर्थ—नेत्रगोल, गाल, भिंवई, पाय, बेंबी, आणि शिश्न यांला सूज; व कोठ्यांत कृमि होऊन रक्तकफयुक्त मळ होतो. हें लक्षण जेज्जटमतें सर्व पांडूमध्ये होतें, व इतरआचा. र्यमतें मृद्भक्षणजन्यपांडुरोगामध्यें मात्र हें लक्षण होतें. जो पांडु फारादिवसांवर उत्पन्न झाला व फार वाढला, व फारदिवस झाल्यामुळें सुजलेला व संपूर्ण पदार्थ पिवळे पाहातो, तो रोगी साध्य नव्हे. किंवा गांठळ, थोडा, पिवळा व कफयुक्त असा अतिसार; व ग्लान. व फटफटीत पांढरा झाला. ओकारी, मूर्छा व ताहान यांणीं पीडित पांडुरोगी बरा होत नाहीं.

दुसरा प्रकार.

सनास्त्यसृक्क्षयार्दीश्चपांडुश्वेतत्वमाप्नुयात् ॥ पांडुदंतनखोयस्तुपांडु नेत्रश्चयोभवेत् ॥ पांडुसंघातदर्शीचपांडुरोगीविनश्यति ॥

अर्थ—जा रोग्याचें रक्त उर्ध्वाधरमार्गांनीं जाऊन शरीर पांढरें निस्तेज होतें; आणि दंत, नख व नेत्र हे पांढरे निस्तेज होतात; आणि तो रोगी सर्व पदार्थ पांढरे पाहातो तो असाध्य जाणावा.

तिसरा प्रकार.

अंतेषुशूनंपरिहीनमध्यंम्लानंतथांतेपुन्चमध्यशूनं ॥ गुदेचशेफस्यथमुष्क योश्चशूनंप्रताम्यंतमसंज्ञकल्पं ॥ विवर्जयेत्पांडुकिनंयशोर्थीतथातिसार ज्वरपीडितंच ॥

अर्थ—जा पांडुरोगामध्यें रोग्याचे मध्यभागीं सूज न येतां हातपायांनां सूज आली, अथवा हातपायांना सूज नसून मध्यदेशीं सूज व ग्लानि आली; किंवा गुद, शिश्न व वृषण यानां सूज; अतिसार आणि ज्वर यांणीं अत्यंत क्लेश पावणारा व मृतप्राय असा पांडु-रोगी यशाची इच्छा करणाऱ्या वैद्यानें सोडावा.

त्रिफलादिलेह.

त्रिफलायास्त्रयोभागास्त्रयस्त्रिकटुकस्यच ॥ भागश्चित्रकमूलस्यविडं गानांतथैवच ॥ पंचाश्मजतुनोभागास्तथारूप्यमलस्यच ॥ शुद्धलो हस्यरजसोभागाश्चाष्टौप्रकल्पयेत् ॥ अष्टौभागासतापस्तुतत्सर्वंमधु संयुतं ॥ श्लक्ष्णचूर्णंसुसंस्थाप्यमायसेभाजनेशुभे ॥ उदुंबरसमांमात्रांत तःखादेद्यथाग्निना ॥ दिनेदिनेप्रयोक्तव्यंजीर्णेभोज्यंयथोचितं ॥ वर्ज

यित्वाकुलित्थांस्तुकाकमाचीकपोतकान् ॥ पांडुरोगंविषंकासंयक्ष्मा णंविषमज्वरं ॥ कुष्ठानिजठरंमेहंश्वासंशोफमरोचकं ॥ विशेषाच्च ह्यपस्मारंकामलानुदजानिच ॥

अर्थ–हरडा, बेहेडा, आवळकाठी, सुंठ, मिरीं, पिंपळी, चित्रकमूळ, वावडिंगें हीं एक भाग, व शिळाजित, रौप्यभस्म व मंडूर, हीं पांच भाग. शुद्ध लोह, सतापाचें बीं हीं आठ आठ भाग. या सर्वांचें चूर्ण मध घालोन तें सर्व लोखंडाच्या भांड्यांत भरून ठेऊन त्यांतून अग्निबळ पाहून एक तोळा पर्यंत प्रतिदिवशीं द्यावें. व जिरल्यावर यथायोग्य पथ्य द्यावें; परंतु कुळीथ, कावळी व कवडे हे वर्ज करावे; म्हणजे पांडुरोग, विष, खोकला, राजयक्ष्मा, विषमज्वर, कोड, उदर, प्रमेह, दमा, सूज, अरुचि, फेंपरें, कावीळ, आणि मुळव्याध, हे रोग नाश पावतात.

फलत्रिकादिकाढा.

फलत्रिकामृतावासातिक्ताभूनिंबनिंबजः ॥
क्वाथःक्षौद्रयुतोहन्यात्पांडुरोगंसकामलं ॥

अर्थ–हिरडा, बेहेडा, आवळकाठी, गुळवेल, अडुळसा, कुटकी, किराइत व कडु लिंब यांचा काढा मध घालोन प्यावा; म्हणजे पांडुरोग व कामला यांचा नाश करील.

पुनर्नवादिकाढा.

पुनर्नवानिंबपटोलशुंठीतिक्तामृतादार्व्यभयाकषायः ॥
सर्वांगशोफोदरपांडुरोगस्थौल्यप्रसेकोर्ध्वकफामयेषु ॥

अर्थ–घेंटोळी, कडुलिंब, कडु पडवळ, सुंठ, कुटकी, गुळवेल, दारुहळद व हिरडा यांचा काढा सर्वांगसूज, उदर, पांडु, स्थूलता, तोंडांत नेहमी खांकेरा येणें, व कफ रोग यांचा नाशक आहे.

वासादिकाढा.

वासामृतानिंबकिरातकट्वीकषायकोयंसमधुर्निपीतः ॥
सकामलंपांडुमथास्रपित्तंहन्याद्धलीमंचकफादिकान्गदान्

अर्थ–अडुळसा, गुळवेल, कडुनिंब, किराइत व कुटकी यांचा काढा मध व तूप घालोन द्यावा; म्हणजे कामला, पांडुरोग, रक्तपित्त, हलीमक, आणि कफादिकव्याधी यांचा नाश करितो.

दार्व्यादिवटक.

दार्वीत्वङ्माक्षिकोधातुग्रंथिकोदेवदारुच ॥ एषांद्विदलिकान्भागान्कृत्वाचूर्णंपृथक्पृथक् ॥ मंडूरंद्विगुणंचूर्णंशुद्धमंजनसन्निभं ॥ मूत्रेचाष्ट

गुणेपक्वत्वातस्मिंस्तत्प्रक्षिपेन्नरः ॥ उदुंबरसमान्कृत्वावटकांस्तान्यथा
ग्निच ॥ उपयुंजीततक्रेणजीर्णेसात्म्यंचभोजनं ॥ मंडूरवटकाह्येतेप्राणदाः
पांडुरोगिणः ॥ कुष्ठानिप्रवरंशोथमूरुस्तंभंकफामयान् ॥ अर्शांसिका
मलांमेहंप्लीहानंशमयंतिच ॥

अर्थ—दारुहळद, दालचिनी, माक्षिकभस्म, पिंपळीमूळ, देवदार, हीं आठ तोळे, व मंडूर १६ तोळे हीं सर्व एकत्र करुन आठपट मुतांत पचन करावीं; नंतर त्यांतून एक तोळयाचा वटक करुन तो अग्निबल पाहून द्यावा. त्यावर जुनें आणि सोसेल असें अन्न द्यावें. हा मंडूरवटक पांडुरोग्याला प्राणदायक होतो; आणि कोड, सूज, ऊरुस्तंभ, कफरोग, मुळव्याध, कामला, मेह व प्लीहा यांतें शमवितो.

किरातादिमंडूर.

किराततिक्तसुरदारुदार्वीमुस्तागुडूचीकटुकापटोलं ॥ दुरालभापर्प
टकंसनिंबाकटुत्रिकंवन्हिफलत्रिकंच ॥ फलंविडंगस्यसमांशकानिस
र्वैःसमंचूर्णमथायसंच ॥ सर्पिर्मधुभ्यांवटिकाविधेयातत्रानुपानाद्भिषजा
प्रयोज्या ॥ निहंतिपांडुंचहलीमकंचशोथंप्रमेहंग्रहणीरुजंच ॥ श्वासं
चकासंचसरक्तपित्तमर्शांस्यथोर्वोर्ग्रहमामवातं ॥ व्रणांश्चगुल्मान्कफ
विद्रधींश्चश्वित्रंचकुष्ठंसततप्रयोगात् ॥

अर्थ—किराइत, देवदार, दारुहळद, नागरमोथा, गुळवेल, कुटकी, कडुपडवळ, धमासा, पित्तपापडा, कडुनिंब सुंठ, मिरीं, पिंपळी, चित्रक, हरडा, बेहेडा, आंवळकाठी व वावडिंग, हे सर्व समभाग; व लोहभस्म सर्व चूर्णांच्या समान घेऊन त्याच्या मध व तूप यांत गोळ्या कराव्या; त्या अनुपानाशीं द्याव्या, ह्मणजे पांडुरोग. हलीमक, सूज, प्रमेह, संग्रहणी, दमा, खोकला, रक्तपित्त, मुळव्याध, ऊरुग्रह, आमवात, व्रण, गुल्म, कफ, विद्रधी, आणि श्वेतकोड, यांचा नाश करितात.

अयादिमोदक.

अयस्तिलत्र्यूषणकोलभागैःसर्वैःसमंमाक्षिकधातुचूर्णं ॥
तैर्मोदकःक्षौद्रयुतोहिभुक्तःपांड्वामयेदूरगतेपिशस्तः ॥

अर्थ—लोहभस्म, तीळ, सुंठ, मिरें, पिंपळी व बोरीचे फळाची साल हीं समभाग घेऊन यासर्वांचे बराबरीनें माक्षिक भस्म घालोन याची गोळी करुन मधाबरोबर खावी; ह्मणजे असाध्य देखील पांडुरोगी बरा होतो.

पांडुरिरस.

रसगंधाभ्रलोहैक्यंपांडुरिःपुटितंत्रिधा ॥
कुमार्यातुचतुर्वल्लंपांडुकामलपूर्वरुत् ॥

अर्थ—पारा, गंधक अभ्रकभस्म, लोहभस्म हीं एकत्र करून त्याला कोरफडीचे रसाच्या तीन भावना द्याव्या; ह्मणजे हा पांडुरिरस होतो, तो चार वाल प्रमाणे सेवन केला असतां; कामला व पांडु यांचा नाश करितो.

पुनर्नवादिवटक.

पुनर्नवात्रिवृद्व्योषविडंगंदारुचित्रकं ॥ कुष्ठंहरिद्रेत्रिफलादंतीचव्यंकलिंगकं ॥ कटुकापिप्पलीमूलंमुस्तंशृंगीचकारवी ॥ यवानीकट्फलंचेतिपृथक्पलमितंमतं ॥ मंडूरंद्विगुणंचूर्णगोमुत्रेष्टगुणेपचेत् ॥ गुडवद्वटकान्कृत्वातक्रेणालोडयतान्पिबेत् ॥ पुनर्नवादिमंडूरवटोश्विभ्यांविनिर्मितः ॥ पांडुरोगंपुराणंचकामलांचहलीमकं ॥ श्वासंकासंचयक्ष्माणंज्वरंशोथंतथोदरं ॥ शूलप्लीहप्रदध्मानमर्शांसिग्रहणींकृमीन् ॥ वातरक्तंचकुष्टंचसेवनान्नाशयेद्ध्रुवं ॥

अर्थ—पुनर्नवा, तेड, सुंठ, मिरीं, पिंपळी, वावडिंग, देवदार, चित्रक, कोष्ठ, हळद, दारुहळद, हरडा, बेहेडा, आवळकाठी, दांतीमूळ, चवक, कुड्याच्या बिया, कुटकी, पिंपळमूळ, नागरमोथा, कांकडशिंगी, बडीशेप, ओंवा, कायफळ, हीं प्रत्येकीं ४ तोळे आणि मंडूर ८ तोळे, एकत्र करून आठपट गोमूत्रांत पचन करावी; गुळास रिखा पाक झाला; ह्मणजे त्याच्या गोळ्या कराव्या. त्या ताकाशीं द्याव्या. हा पुनर्नवादिमंडूर अश्विनीकुमारांनीं जुनाट पांडुरोग, हलीमक, श्वास, कास, क्षय, ज्वर, सूज, उदर, शूल, प्लीहोदर, आध्मान, मुळव्याध, सग्रहणी, कृमि, वातरक्त व कोड यांच्या नाशाविषयीं उत्पन्न केला, याच्या सेवनानें पूर्वोक्त व्याधि नाश पावतात..

लोहासव पांडुरोगादिकांवर.

लोहचूर्णंत्रिकटुकंत्रिफलांचयवानिकां ॥ विडंगंमुस्तकंचित्रंचतुःसंख्यापलंपृथक् ॥ धातकीकुसुमानांतुप्रक्षिपेत्पलविंशतिः ॥ चूर्णीकृत्वाततःक्षौद्रंचतुःषष्टिपलंक्षिपेत् ॥ दद्यात्गुडेतुलांतत्रजलद्रोणद्वयंतथा ॥ घृतभांडेविनिःक्षिप्यानिदध्यान्मासमात्रकं ॥ लोहासवममुंमर्त्यः

पिवेदग्निकरंपरं ॥ पांडुश्वमधुगुल्मानिजठराण्यर्शांसिहंत ॥ कुष्ठंलीह
मयंकंडूकासंश्वासंभगंदरं ॥ अरोचकंचग्रहणींहृद्रोगंचविनाशयेत् ॥

अर्थ–लोहभस्म, सुंठ, मिऱ्यें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, अजमोदा, वावडिंग, नागरमोथे व चित्रक हीं अकरा औषधें चार चार पळें व धायटीफुलें सोळापळें घेऊन सांच्याचें चूर्ण करून. चौसष्ट पळें मध व एक तुळा गुळ एकत्र करून त्यांत तें चूर्ण टाकून दोन द्रोण पाणी त्यांत मेळवून तीं सारीं तुपाचे रावल्या मडक्यांत घालून त्याचे तोंडाला मुद्रा देऊन एक मास पर्यंत ठेऊन नंतर मुद्रा काढावी; याला लोहासव ह्मणतात, हा आसव पोटांत घ्यावा. तेणेंकरून जठराग्नि प्रदीप्त होतो, व पंडुरोग, सूज, पोटांत गुल्मे होतात तीं, मुळव्याध, कुष्ठ, पोटांत डावेकडे कवळरोग होतो तो, कंडू, श्वास, खोकला, भगंदर, अरोचक, संग्रहणी व हृद्रोग हे दूर होतात.

गोमूत्रलोह.

सप्तरात्रंगवांमूत्रेभावितंचायसोरजः ॥
पांडुरोगप्रशांत्यर्थंपयसाप्रपिबेन्नरः ॥

अर्थ–गोमूत्रांत सप्तरात्र लोह भिजत घालून ठेवावा; आणि तो दुधाशीं पंडुरोगावर घ्यावा.

गोमूत्रसिद्धमंडूर.

गोमूत्रसिद्धमंडूरचूर्णंसगुडमिश्रितं ॥
पांडुरोगःक्षयंयातिपक्तिशूलंचदारुणं ॥

अर्थ–मंडूर गोमूत्रात पचन करून तो गुळाशीं घ्यावा; ह्मणजे पंडुरोग आणि पक्तिशूळ हे नाश पावतात.

नवायसादिचूर्ण पांडुरोगादिकांवर.

चित्रकंत्रिफलामुस्तंविडंगंत्र्यूपणानिच ॥ समभागानिकार्याणि
नवभागाहतायसः ॥ एतदेकीकृतंचूर्णंमधुसर्पिर्युतंलिहेत् ॥
गोमूत्रमथवातक्रमनुपानेप्रशस्यते ॥ पांडुरोगंजयत्युग्रंत्रिदोषं
चभगंदरं ॥ शोथकुष्ठोदरार्शांसिमंदाग्निमरुचिंकृमीन् ॥

अर्थ–चित्रक, हिरडा, बेहडा, आवळकाठी, नागरमोथे, वावडिंग, सुंठ, मिऱ्यें व पिंपळी हीं नऊ औषधें समभाग घेऊन चूर्ण करून त्याचे समभाग लोहभस्म घेऊन चूर्णांत मिळवावें. मग तें चूर्ण मध व तूप एकत्र करून त्यांत घ्यावें; अथवा गोमूत्रांत किंवा गाईचे ताकांत घ्यावें. तेणेंकरून मोठा उग्र असा पंडुरोग दूर होतो; व त्रिदोष, भगंदर, सूज, कुष्ठ, उदररोग, मूळव्याध, अग्निमांद्य व जंतविकार हे नष्ट होतात.

दुसरें नवायसचूर्ण.

त्र्यूषणंत्रिफलामुस्ताविडंगंचित्रकंसमं ॥ नवायोरजसोभागास्तच्चू
र्णंमधुसर्पिषा ॥ भक्षयेत्पांडुहृद्रोगकुष्ठार्शःकामलापहं ॥ गोमूत्रेणपिबे
द्वातपांडुरोगंचनाशयेत् ॥ शोथहृद्रोगमुदरंकृमिकुष्ठंभगंदरं ॥ नाश
येदग्निमांद्यंचदुर्नामकमरोचकं ॥ आर्द्रकस्यरसेनापिलिह्यात्कफसमृ
द्धिमान् ॥ गुंजामेकांसमारभ्ययावत्स्युर्नवरक्तिकाः ॥ तावल्लोहंसमश्नी
याद्यथादोषबलंनरः ॥ नवायसमिदंचूर्णंनरोष्टादशरक्तिकाः ॥ प्रलिह्या
न्मधुसर्पिर्भ्यांपिबेत्तक्रेणवासह ॥

अर्थ—सुंठ, मिरीं, पिंपळी, हरडा, बेहेडा. आवळकठी, नागरमोथा, वावडिंग, चित्रक, हें समभाग; आणि लोह ९ भाग एकत्र करून त्यांतून मध व तूप यांशीं पांडुरोग, हृद्रोग, कोड, मूळव्याध, कावीळ; यांवर द्यावें. हें गोमूत्राशीं द्यावें; ह्मणजे वातपांडु, सूज, हृद्रोग, उदर, कृमि, कुष्ट, भगंदर, अग्निमांद्य, मूळव्याध व अरोचि हे रोग नाश पावतात, व आल्याच्या रसाशीं द्यावें; ह्मणजे कफ नाश पावतो, हे चूर्ण एकगुंजेपासून नऊ गुंजा पर्यंत द्यावें; किंवा अठरा गुंजापर्यंत मध व तूप, किंवा ताक यांशीं द्यावें

लोहादिचूर्ण जीर्णपांडुवर.

लोहंकटुत्रिकंकोलंतिलंवाचूर्णमंकोलमाक्षिकयुक्तं ॥
क्षौद्रयुतंचलतक्रमेवहिजीर्णनरेखिलपांडुगदेपि ॥

अर्थ—लोहभस्म, सुंठ, मिरीं, पिंपळी, कंकोळ, तिळ, माक्षिकभस्म यांचें चूर्ण तोळा मध, किंवा ताक यांशीं द्यावें; ह्मणजे फार दिवसांचा पांडुरोग नाश पावतो.

शिलाजितादियोग.

शिलाजतुक्षौद्रविडंगसर्पिर्लोहाभयाशर्करयासमक्षं ॥
आपूर्यतेदुर्बलदेहधारीत्रिपंचरात्रेणयथाशशांकः ॥

अर्थ—शिलाजित, मध, वावडिंग, तूप, हरीतकी, आणि साखर यांचीं समभाग चूर्णे करून द्यावीं; ह्मणजे पंधरा दिवसांत देह बलवान् होतो. जसा चंद्र पूर्ण होतो तसा.

मंडूरवज्रवटक.

पंचकोलंसमरिचंदेवदारुफलत्रिकं ॥ विडंगमुस्तायुक्ताश्चभागास्त्रिफ
लसंमिताः ॥ यावंत्येतानिचूर्णानिमंडूरंद्विगुणंततः ॥ पक्त्वाष्टगुणिते
मूत्रेतद्घनीभूतमुद्धरेत् ॥ ततोक्षमात्रान्वटकान्पिबेत्तक्रेणतक्रभुक् ।

पांडुरोगंजयेत्तद्वन्मंदाग्नित्वमरोचकं ॥ मंडूरवज्रवटकोरोगानीकप्रभेदनः ॥ अर्शांसिग्रहणीशोफमुरुस्तंभंहलीमकं ॥ कृमिप्लीहानमुदरंगलरोगंचनाशयेत् ॥

अर्थ—पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, सुंठ, मिरीं, देवदारु, हरडा, बेहेडा, आवळकाठी, वावडिंग व नागरमोथे हीं सर्व समभाग व मंडूर सर्वांच्या दुप्पट घेऊन सर्वांच्या आठपट गोमूत्र घालून पचन करून दाट झाल्यावर त्यांतून हा मंडूरवटक १ तोळा घेऊन ताकाशीं द्यावा; व ताक भात पथ्यास द्यावा; ह्मणजे पांडुरोग, अग्निमांद्य, अरुचि मुळव्याध, संग्रहणी, सूज, उरुस्तंभ, हलीमक, कृमि, प्लीहा, उदर, गलरोग, आणि अनेकरोग, यांचा नाश करितो.

हंसमंडूर.

मंडूरंचूर्णयेत्श्लक्ष्णंगोमूत्रेष्टगुणेपचेत् ॥ पंचकोलंदेवदारुमुस्तव्योपफलत्रयं ॥ विडंगंस्यात्प्रतिपलंपाकांतेचूर्णितंक्षिपेत् ॥ भक्षयेत्कर्षमात्रं चतक्रेतक्रंचभोजने ॥ पांडुंशोफंहलीमंचउरुस्तंभंचकामलां ॥ अर्शांसिहंतिनोचित्रंहंसमंडूरउच्यते ॥

अर्थ—मंडुरामध्यें आठपट गोमूत्र घालून त्याला पचन करावा. दाट झाल्यावर त्यांत पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, सुंठ, देवदारु, नागरमोथे, सुंठ, मिरीं, पिंपळी, हरडा, बेहेडा, आवळकाठी व वावडिंग या प्रत्येकाचें चार तोळे चूर्ण घालून त्याचा १तोळयाचा वटक करावा, तो ताकांतून द्यावा, व पथ्याला ताकभात घालावा; ह्मणजे पांडुरोग, सूज, हलीमक, उरुस्तंभ, कावीळ, आणि अर्श, यांचा नाश करितो. याला हंसमंडूर ह्मणतात.

सिद्धमंडूर.

मंडूरस्यपलान्यष्टौगोमूत्रेष्टगुणेपचेत् ॥ पुनर्नवात्रिवृत्शूंठीविडंगंदेवदारुकं ॥ द्विनिशापुष्करंवन्हिर्दंतीचव्यंफलत्रिकं ॥ कुटजस्यफलंतिक्तापिप्पलीमूलमुस्तकं ॥ विपंचप्रतिकर्षस्यचूर्णंकृत्वविनिक्षिपेत् ॥ मंडूरस्यचपाकांतेअक्षमात्रंवटीकृतं ॥ पांडुशोफोदरानाहशूलसत्कृमिगुल्मनुत् ॥ इत्येवंसिद्धमंडूरःसर्वरोगविनाशकृत् ॥

अर्थ—मंडूर ३२ तोळे आणि गोमूत्र २५६ तोळे एकत्र करून पचन करावें. दाट झाल्यावर त्यांत पुनर्नवा, निशोतर, सुंठ, मिरीं, पिंपळी, वावडिंग, देवदारु, हळद, दारुहळद, पुष्करमूळ, चित्रक, दंतिमूळ, चवक, हरडा, बेहेडा, आवळकाठी, इंद्रजव,

कुटकी, पिंपळीचें मूळ, नागरमोथे, अतिविष यां प्रत्येकाचें, तोळा चूर्ण घालोन मिळ-वावें. पाक झाला, ह्मणजे १ तोळ्याच्या वड्या बांधाव्या. हा सिद्धमंडूरवटक पांडुरोग, सूज, उदर, आनाह, शूल, कृमि, आणि गुल्म व सर्वरोग यांचा नाश करितो.

अमृतहरीतकी.

शतावरीभृंगराजपुनर्नवकुरंटकैः ॥ प्रतिसप्तपलंचूर्णंजलेक्काथ्यचतुर्गुणे ॥ पादशेषंकषायंतुवस्त्रपूतंसमाहरेत् ॥ हरीतकीपलंतस्मिन्पथ्याधिकशतत्रयं ॥ पाचयेद्विधिवच्चैवत्रिंशद्दुग्धपलंपचेत् ॥ भित्वानिवारयेदंडंतद्गर्भेसर्वमौषधं ॥ षट्पलंरसगंधौचशुद्धेपात्रेक्षणंपचेत् ॥ उत्तार्यचालयेत्तावद्यावत्कठिणतांव्रजेत् ॥ चूर्णयित्वामृतासत्वंपलंसप्तविमिश्रयेत् ॥ मधुनावटिकाकार्यापथ्याधिकशतत्रयं ॥ एकैकाह्यभयागर्भेक्षिप्त्वासूत्रेणबंधयेत् ॥ मधुभांडेक्षिपेत्पश्चादेकैकांभक्षयेद्दिनं ॥ शुष्कपांडुहरंसम्यगमृतायाहरीतकी ॥

अर्थ—शतावरी, माका, पुनर्नवा व कोरांटा या प्रत्येकाचें २८ तोळे चूर्ण घेऊन चतुर्गुण पाण्यात चतुर्थांश काढा करून गाळून घ्यावा, त्यांत हरीतकी १४४० तोळे घालोन त्यांत १२० तोळे दूध घालोन त्या शिजवाव्या. नंतर त्याफोडून त्याची आंठी काढून टाकावी; आणि पारा २४ तोळे, गंधक २४ तोळे पात्रांत क्षणमात्र पचन करावें, ते घट्ट झाले ह्मणजे; त्याचें चूर्ण करून त्यांत गुळवेलीचें सत्व २८ तोळे मिसळून मधांत ३६० गोळ्या कराव्या. त्या पूर्वी आंठी काढून टाकलेल्या हरीतकीत भरून सुताने बांधून त्या मधाच्या भांड्यांत घालोन ठेवाव्या. त्यांतून दररोज एक खात जावी; ह्मणजे ही अमृतहरीतकी शुष्कपांडूचा नाश करित्ये.

पंचकोलघृत.

पंचकोलंयवाग्रंचक्षीरंदध्नाघृतंपुनः ॥ समांशेनतुयोज्यानिभार्गीकुष्ठंचपौष्करं ॥ शतंतत्रहरीतक्याजलेनैवचतुर्गुणं ॥ क्काथंचैकत्रयोज्यांतेक्काथयेन्मृदुवन्हिना ॥ मृदुपाकघृतंसिद्धंपानेनस्येचबस्तिषु ॥ गुणाधिक्यंभवेन्नृणांपांडुरोगेहलीमके ॥ क्षयेचराजयक्ष्मेचशस्तमुक्तंभिषग्वरैः

अर्थ—पिंपळमूळ, चवक, चित्रक, सुंठ, यवांचीं कुसें, दूध, दहिं, तूप, भारंगमूळ, कोष्ठ, पुष्करमूळ हे समभाग ;आणि ३०० बाळहड्यां यांचा काढ्यांत तूप मंदाग्नीवर सिद्ध करावें, तें पान, नस्य, आणि बस्ति, यांच्याविषयीं योजावें, हें मनुष्यांला उत्तम गुणकारक. आहे. हें पांडुरोग, हलीमक, क्षय व राजयक्ष्म, यांवर देण्यास प्रशस्त आहे.

नर्नवोत्थैः ॥ पृथगग्निकृतंघनंविपाच्यंगुटिकागुंजमितानिजानुपानैः ॥ ज्वरपांडुतृषास्रपैत्यगुल्मक्षयकासस्वरमग्निसादमूर्छाः ॥ पवनादिषुदुस्तराष्टरोगान्सकलंपित्तहरंमदावृतंच ॥ बहुनाकिमसौयथार्थनामासकलव्याधिहरोमदेभसिंहः ॥

अर्थ—पारा, गंधक, हरडा, बेहेडा, आंवळकाठी, ताम्र, शंख, लवंग, अभ्रक, कांत, तिखें व मुंडलोह, यांचीं भस्में; व हिंगुळ व टांकणखार, हे समभाग; व या सर्वांच्या तिप्पट मंडूर, हीं सर्व गोमूत्रांत शोधून नंतर भाजून काढावीं; आणि हरडा, बेहेडा, आवळकाठी, माका व आलें यांच्या रसांत खलून सुकवावें; नंतर त्रिफला, गुडुची व कांटेशेवती यांच्या आठपट रसांच्या भावना देऊन त्याला पुनर्नव्याचा स्वरस घालोन दाट होईपर्यंत पचन करून एक गुंजेची गोळी करून ती रोगघ्नअनुपानाशीं द्यावी; ह्मणजे ज्वर, पांडु, तृषा, रक्तपित्त, गुल्मक्षय, कास, स्वरभंग, अग्निमांद्य, मूर्छा, वातव्याधि, आठ असाध्यव्याधि, पित्तव्याधि, यांचा नाश करितो. हा संपूर्णव्याधिगजनाशनाविषयीं सिंहासारिखा आहे.

त्रैलोक्यनाथरस.

पलानिचत्वारिरसस्यपंचगंधस्यसत्वस्यगुडूचिकायाः ॥ व्योषस्यचूर्णस्यसतालमूल्यासशाल्मलस्येहपलत्रयंस्यात् ॥ पृथक्पृथक्षड्गगनस्यचाष्टौलोहस्यसर्वंत्रिफलांजलेन ॥ घृष्टंचतुःषष्टिमितंतदर्धाःस्युर्भावनायार्द्रकजद्रवस्य ॥ शिग्रूत्थनीरेणचषोडशाष्टौतथानलोत्थागृहकन्यकायाः ॥ आर्द्रद्रवस्येतिरसोयमुक्तोपांडुक्षयश्वासगदार्तिहर्ता ॥ क्षौद्रेणवैशर्करयाघृतेनकर्षार्धमेतस्यभजेत्प्रयत्नात् ॥

अर्थ—पारा १६ तोळे, गंधक २० तोळे व गुळवेलीचे सत्व, सुंठ, मिरीं, पिंपळी, तालमुळी व सांवरीचा चीक हीं प्रत्येकीं १२ तोळे, अभ्रक २४ तोळे, लोह ३२ तोळे, हीं संपूर्ण एकत्र करून त्यांस त्रिफळ्याच्या काढ्याच्या ६४ भावना, आल्याच्या रसाच्या ३२, शेवग्याच्या रसाच्या १६, चित्रकरसाच्या ८, कुंवारकांड्याच्या ८, आल्याच्या रसाच्या ८ या प्रमाणें भावना देऊन त्यांतून मध, साकर व तूप, यांशीं ६ मासे द्यावा; ह्मणजे पांडु, क्षय व श्वास यांचा नाश करितो.

उदयभास्कर.

भागैकरसगंधकंद्विगुणितंशुल्वंचभागाष्टकंशैलेयास्त्रयतालकद्वयमिदंशुद्धंचखल्वेकृतं ॥ मर्द्यंव्योषजवेदभागसन्निभा

डयार्द्रकभृंगराजसहितंभाव्यंजयंतीरसैः ॥ प्रत्येकंदिनसप्तकंतुसुदृढं शोष्यंचसूर्यातपेयोज्यंगुंजमितंरसार्द्रसहितंव्योपेणसंमिश्रितं ॥ पांडू कामलरोगशोफदहनंसन्नेत्रिदोपेज्वरेमेहप्लीहजलोदरंग्रहणिकाकुष्ठं धनुर्वातजं ॥ पथ्यंपष्टिकतंदुलेनवनितंतक्रंचशाल्योदनंदेयंचोदयभास्करःक्षितितलेसर्वांधकारान्जयेत् ॥

अर्थ—पारा १, गंधक २, ताम्र ८, शिलाजित ३, हरताळ २, त्रिकटु ४, व वचनाग २ भाग, हीं सर्व एकत्र करून त्यांला निर्गुंड, आलें, माका, आणि टांकळा, या प्रत्येकांच्या रसांत सात सात दिवस मर्दन करावें; आणि उन्हांत सुकवावे. त्यांतून एक गुंज आल्याचा रस व त्रिकटु यांतून द्यावें; म्हणजे पांडुरोग, कावीळ, सूज, अग्निमांद्य, त्रिदोषजज्वर, मेह, प्लीहा, जलोदर, संग्रहणी, कोड, धनुर्वात, यांचा नाश करील. यावर पथ्याला साठकीच्या तांदळांचा भात, ताक आणि शाल्योदन द्यावें. हा उदयभास्कर संपूर्ण रोगरूप अंधकाराचा नाश करितो.

कामेश्वररस.

पलंसूतंपलंगंधंवन्हिपथ्यात्रयंत्रयं ॥ मुस्तैलापत्रकानांचमितंचार्धपलंपलं ॥ त्र्यूपणंपिप्पलीमूलंविपंचैवपलंपलं ॥ नागकेसरकंपैकंरेणुकार्धपलंतथा ॥ पुरातनगुडेनैवतुलार्धेनप्रपाचयेत् ॥ मर्दयेच्चार्द्रकद्रावैर्यामैकंतद्घृतेनच ॥ गुटिकावदराकाराकारयेद्भक्षयेत्सदा ॥ शोफपांडुहरःसोयंरसःकामेश्वरोह्ययं ॥

अर्थ—पारा व गंधक चार भाग, चित्रक व हरीतकी बारा भाग, नागरमोथे, एलची व पत्रज दोन दोन भाग, आणि त्रिकटु, पिंपळीमूळ व बचनाग चार चार भाग, नागकेसर १ व रेणुकबीज २, याप्रमाणें तोळेवार एकत्र करून जुना गूळ २०० तोळे घेऊन त्यांत पचन करून आल्याच्या रसांत १ प्रहर व गाईच्या तुपांत १ प्रहर मर्दन करून त्याची बोराएवढी गोळीकरून द्यावी. ती सूज व पांडुरोग, यांचा नाश करित्ये; हिला कामेश्वर रस ह्मणतात.

कालविध्वंसकरस.

शुद्धसूतंहेमतारंताम्रंतुल्यंविमर्दयेत् ॥ जंबीरनीरसंयुक्तमातपेशोपयेद्दिनं ॥ सर्वतुल्यंपुनःसूतंक्षिप्त्वापिष्टिंप्रकल्पयेत् ॥ आदायवंधयेद्वस्त्रे इष्टिकायंत्रगंपचेत् ॥ जंबीरैर्गंधकंपिष्ट्वाअधश्चोर्ध्वंचदापयेत् ॥ तुल्यंतुल्यंपुनर्देयंरुध्वालघुपुटेपचेत् ॥ षड्गुणेगंधकेजीर्णेतद्रसधृत्याविचूर्ण

येत् ॥ लोहभस्मसमांशंचदत्वामर्घेद्रवैर्दिनं ॥ कंटकार्याबृहत्याचत
थाग्निधमनद्रवैः ॥ प्रतिद्रावैर्दिनंमर्द्यपचेत्पंचभिरुत्पलैः ॥ एवंनवपुटं
देयंद्रवद्रावैस्त्रिधात्रिधा ॥ वन्ह्यर्कचिरविल्वानांद्रावैर्द्विर्द्विःपुटेपचेत् ॥
अंधमूषागतंपाच्यमादायाचूर्णयेत्पुनः ॥ दशांशेनविषंयोज्यंगुंजामा
त्रंप्रयोजयेत् ॥ कालविध्वंसकोनामरसःपांडुमयापहः ॥

अर्थ–शुद्ध पारा, सुवर्ण, रुपें व ताम्र हीं समभाग घेऊन जंबीरलिंबाच्या रसांत घालून खलून उन्हांत ठेऊन सुकवावीं; आणि या सर्वांच्या समभाग पुनः पारा घालून त्याची कज्जली करावी; आणी वस्त्रांत पोटली बांधावी; नंतर जंबीराच्या रसांत गंधक घोटून तो त्या पोटलीच्या समभाग वर खालीं देऊन इष्टिकेंत पचन करावी. याप्रमाणें समान गंधक देऊन षड्गुण गंधकजारण करावें; नंतर काढून चूर्ण करून त्याचे समान लोहभस्म घालून रिंगणी, डोरली व कडुनिंब यांच्या रसांत एकेक दिवस खलून पांच गोवऱ्यांचें पुट द्यावें; या प्रमाणें प्रत्येकांची तीन तीन अशीं नऊ पुटें झाल्यावर चित्रक, रुई व करंज यांच्या दोन दोन भावना द्याव्या; व प्रतिभावनेला अंधमूषेंत ठेऊन पचवावा. नंतर चूर्ण करून दशमांश बचनाग मिळवून त्यांतून गुंजामात्र द्यावा; ह्मणजे हा कालविध्वंसक रस पांडुरोगाचा नाश करितो.

पांडुरि.

रसगंधकलोहैकंपांडुरिःपुटितस्त्रिधा ॥
कुमार्याक्तश्चतुर्वल्लपांडुकामलपूर्वनुत् ॥

अर्थ–पारा, गंधक व लोह हीं समभाग घेऊन त्यांस कुमारीच्या रसाच्या तीन भावना देऊन प्रतिभावनेस गजपुट द्यावें; त्यांतून हा पांडुरिरस चार वाल द्यावा; ह्मणजे पांडुरोग व कामला यांचा नाश करितो.

पांडुसूदन.

रसंगंधंमृतंताम्रंजयपालंचगुग्गुलुं ॥ समांशमाज्यसंयुक्तंगुटि
कांकारयेन्मितां ॥ एकैकांप्रददेद्वैद्यःशोथपांडुपनुत्तये ॥ शीत
लंचजलंचाम्लंवर्जयेत्पांडुसूदने ॥

अर्थ–पारा, गंधक, ताम्रभस्म, जेपाळ व गुग्गुळ हे समभाग घेऊन त्यांची तुपांत गोळी करावी, ती एकेक अग्निबलपाहून द्यावी; ह्मणजे सूज, पांडुरोग, यांचा नाश करिते. हीवर थंडपाणी व आंबट रस हे वर्ज करावें. हिला पांडुसूदन ह्मणतात.

वंगेश्वर.

वंगसूतकयोःकृत्वासारणांकन्यकाद्रवैः ॥ संमर्द्यवटिकाःकृ

खापाचयेत्काचभाजने ॥ यावच्चंद्रनिभःशुभ्रोवंगेश्वरसमोगु
णैः ॥ पांडुप्रमेहदौर्वल्यकामलांतकनाशनः ॥

अर्थ—कथील व पारा हे एकत्र मिळवून कोरफडाच्या रसांत खलून काचेच्या भांड्यांत पचन करावें; ह्मणजे चंद्रासारिखा शुभ्रवर्ण व गुणानीं वंगेश्वरासारिखा; आणि पांडुरोग, प्रमेह, दुर्बलता व कावीळ यांचा नाश करणारा असा दुसरा वंगेश्वरच होतो.

पांडुनिग्रहरस.

अभ्रभस्मरसभस्मगंधकंलोहभस्ममुसलीविमर्दितं ॥ शाल्मलीरसततो
गुडूचिकाक्वाथकैश्वपरिमर्दितंदिनं ॥ भावयेत्त्रिफलयार्द्रकन्यकावन्हि
शिग्रुजरसैश्वसप्तधा ॥ जायतेहिभवजोविवर्जनंशोथपांडुनिवृत्तिदाय
कं ॥ वल्लयुग्मपरिमाणतस्त्विमंलेहयेच्चघृतमाक्षिकान्वितं ॥ पथ्यमात्रप
रिभाषितंपुराएतदेवपरिवर्जनंहितं ॥ शोथपांडुविनिवृत्तिदायकःसेवि
तस्तुयवचिंचिकाद्रवैः ॥ नागराग्निजयपालकैस्तुवावर्ज्यदुग्धपरिपक्व
सर्पिषा ॥ तक्रभक्तमिहभोजयेदतिस्निग्धमन्नमतिनूतनंत्यजेत् ॥

अर्थ—अभ्रकभस्म, पारदभस्म, गंधक, लोहभस्म आणि मुसळीचें चूर्ण हीं समभाग एकत्र करून त्याला सांवरीच्या रसांत व गुळवेलीचा काढा यांत एकेक दिवस खलून नंतर त्रिफळ्याचा काढा, आले, कुमारी, चित्रक, शेवग्याचा रस, यांच्या सात भावना द्याव्या; ह्मणजे तो पांडुनिग्रह रस होतो. हा दोन वाल मध व तूप यांशीं द्यावा; ह्मणजे सूज व पांडुरोग यांचा नाश करितो. यावर यव, चिंच, सुंठ, चित्रक, जेपाळ, आणि दूध तापवून त्यांत तूप घालून तें, अतिस्निग्धान्न, आणि अति नूतनान्न, हें वर्ज करावें. पथ्याला ताकभात द्यावा.

अनिलरस.

ताम्रभस्मरसभस्मगंधकंवत्सनाभमपितुल्यभागिकं ॥ वन्हितो
यपरिमर्दितंपचेद्यामपादमथमंदवन्हिना ॥ रक्तिकायुगलमा
नतोनिलःशोथपांडुघनपंकशोषिना ॥

अर्थ—ताम्रभस्म पारदभस्म, गंधक व बचनाग हे समभाग घेऊन ते चित्रकाच्या रसांत मंदाग्नीवर दोनघटिका घोटून दोन गुंजाची गोळी करून द्यावी; ह्मणजे हा अनिलरस सूज व पांडुरोग या चिखलाला शोषून टाकितो.

लोहसुंदर.

सूतभस्ममृतलोहगंधकौभागवर्धिनायदंविनिक्षिपेत् ॥ दीर्घनालदृढ

कूपिकोदरेमृत्स्नयाचपरिवेष्टितांक्षिपेत् ॥ चुल्लिकोपरिसुकूपिकामुखे प्रक्षिपेच्चवरशाल्मलिद्रवं ॥ त्रैफलंवसुगुडूचिकारसंपाचयेच्चमृदुवन्हिनादिनं ॥ स्वांगशीतलमिदंप्रगृह्यचत्र्यूपणार्द्रकरसेनभावयेत् ॥ लोहसुंदररसोयमीरितःशुष्कपांडुविनिवृत्तिदःपरः ॥

अर्थ—पारदभस्म १, लोहभस्म २ व गंधक ३ याप्रमाणें भाग मिळवून काचेच्या कुपींत भरून चुलीवर वालुकायंत्रांत एक दिवस मंदाग्नीनें पचन करावा. चुलीवर कुपी असतांच तींत सांवरीचा रस, त्रिफळयाचा काढा, वसूचा काढा व गुळवेलीचा रस, हे घालावे. पचन होऊन तयार झाल्यावर स्वांगशीत उतरून त्याला त्रिकटु व आल्याचा रस यांची भावना द्यावी, हा लोहसुंदररस शुष्कपांडूचा नाश करितो.

चंदनादितैल.

चंदनंसरलंदारुयष्ट्येलावालकंसठी ॥ नखशैलेयकंपक्त्वापद्मकंघनकेसरं ॥ कंकोलकंमुरामांसीशैलेयेद्वेहरीतकी ॥ त्वग्रेणुकाकिरातंचसारिवातिक्तकागरु ॥ नलिकावालकंद्राक्षाकषायंसुपरिशृतं ॥ तैलमस्तुतथालाक्षारसेनसमभागिकं ॥ मंदाग्नौपाचयेत्तैलंसिद्धंपानेषुवस्तिपु ॥ नस्येचाभ्यंजनेचैवयोजयेच्चभिषग्वरः ॥ हंतिपांडुंक्षयंकासंग्रहघ्नंबलवर्णकृत् ॥ मंदज्वरमपस्मारंकुष्ठपामाहरंपुनः ॥ करोतिबलपुष्टयौजोमेधाप्रज्ञाविवर्धनं ॥ रूपसौभाग्यदंप्रोक्तंसर्वभूतवशंकिरं ॥

अर्थ—चंदन, सरला, देवदार, दारुहळद, ज्येष्ठमध, एलची, वाळा, कचोरा, नखला, शिलाजित, पद्मकाष्ठ, नागरमोथे, नाकेशर, कंकोल, मोरवेल, मांसी, शिलाजित, दगडफूल, वाळहरडी, दालचिनी, रेणुकबीज, किराइत, उपरसाळ, कुटकी, कृष्णागरु, उतरिणी, वाळा व द्राक्षे यांचा काढा करून त्यांत तेल, ताकाची निवळी व लाखेचें शिरें, हीं समभाग, घालून मंदाग्नीवर तेल सिद्ध करावें, तें प्राशन, बस्तिकर्म, नस्य व आंगास लावणें यांविषयीं योजावें; ह्मणजे पांडुरोग, क्षय, खोकला, ग्रहबाधा, मंदज्वर, अपस्मार, कोड व खरूज यांचा नाश करितें; आणि बल, वर्ण, पुष्टि, तेज, बुद्धि, स्मृति, रूप, सौभाग्य, आणि सर्वभूतवशीकरण यांतें करितें.

मृत्तिकाभक्षणजपांडुनिदान.

मृत्तिकादनशीलस्यकुप्यत्यन्यतमोमलः ॥ कषयामारुतांपित्तमूपरामधुराकफं ॥ कोपयेन्मृद्रसादींश्चरौक्षाद्भुक्तंचरुक्षयेत् ॥ पूरयत्यविपक्वैवस्रोतांसिनिरुणद्ध्यपि ॥ इंद्रियाणांवलंहत्वाते

जोवीर्यौजसोतथा ॥ पांडुरोगंकरोत्याशुबलवर्णाग्निनाशनं ॥

अर्थ–मृत्तिकाभक्षण करणाराचे शरीरांत वातादिकांतून कोणता येखादा दोष कुपित होतो. अशाकीं; तुरट मृत्तिकेच्या भक्षणानें वायु; क्षारमृत्तिकेच्या भक्षणानें पित्त; आणि मधुर मृत्तिकेच्या भक्षणानें कफ कुपित होतो; आणि ती मृत्तिका रसादि सप्तधातूंला दूषित करत्ये; आणि आपल्या रुक्ष स्वभावानें जें जें भक्षावें त्यातें रुक्ष करितें; आणि ती मृत्तिका कोष्ठाश्रित होऊन जठराग्निनें पक्क न होतां रस वाहिनीशिरांमध्यें शिरून त्याला रोधित्ये, रसाचा प्रवाह होउं देत नाहीं; नंतर इंद्रियांची स्वस्वविषयग्राहकशक्ति, कांति, शरीरशक्ति व ओजस, ह्मणजे सर्व तेज याते नष्ट करून शरीरसामर्थ्य, वर्ण व जठराग्नि यांचा नाश करणारा अशा पांडूला त्वरित उत्पन्न करित्ये.

केशरादिकाढा.

तद्वत्केसरयष्ट्याव्हपिप्पलीसुरसाव्हयैः ॥

मृद्वेषणायतल्लोल्यैर्वितरेद्भावितांमृदं ॥

अर्थ–नागकेशर, जेष्टीमध, पिंपळी व निशोत्तर यांचा काढा करून त्याच्या भावना मातीला द्याव्या; नंतर ती मातीखाणारास द्यावी; ह्मणजे खाल्लेली माती पडून विकार दूर होतो.

घृत.

व्योषबिल्वद्विरजनीत्रिफलाद्विपुनर्नवा ॥ मुस्ताचायोरजःपाठाविडंगंदेवदारुच ॥ वृश्चिकालीचभार्गीचसक्षीरैस्तैर्घृतंशृतं ॥ सर्वान्प्रशमयत्याशुविकारान्मृत्तिकाकृतान् ॥

अर्थ–सुंठ, मिरें, पिंपळी, बेल, हळद, दारुहळद, हिरडा, बेहडा, आवळकाठी, पांढरी वसु, तांबडी वसु, नागरमोथा, लोहभस्म, पहाडमूळ, वावडिंग, देवदार, मेढशिंगी व दूध, इतक्यानीं सिद्ध केलेलें तूप मृत्तिकेपासून झालेल्या सर्व विकारांचा नाश करित्ये.

कामलाकर्मविपाक.

कामलीभक्तचोरःस्यात्तस्यवक्ष्यामिनिष्कृतिं ॥ कुर्याञ्चपक्षिराजानं विष्णोर्वाहनमुत्तमं ॥ सुवर्णेनयथाशक्त्यापक्षयोर्मौक्तिकद्वयं ॥ नासिकायांतथावज्रमुत्तरीयंचराजतं ॥ एवंकृत्वागरुत्मंतंघृतद्रोणोपरि न्यसेत् ॥ श्वेतवस्त्रेणसंवेष्टयश्वेतमाल्यैःसमर्चयेत् ॥ सर्वशास्त्रार्थतत्व

ज्ञोविष्णवोधर्मपाठकः ॥ ब्राह्मणस्त्वर्चितोभक्त्यायजमानेनशक्तितः ॥
उपचारैःषोडशभिर्द्विजमभ्यर्चयेत्तथा ॥

अर्थ—जो कोणी शिजलेल्या भाताची चोरी करितो, तो कामलारोगी होतो. त्याचें प्रायश्चित्त सांगतो. सोन्याचा गरुडपक्षी करून त्याच्या पाखांवर मोती, नाकावर हिरा, आणि त्याचें रुप्याचें वस्त्र असा गरुड करून (१०२४) तोळे तुपावर ठेऊन पांढरे वस्त्र प्रावरण घालून पांढऱ्या फुलानीं पूजा करावी; आणि संपूर्णशास्त्रांचें तत्वजाणणारा वैष्णव, धर्म व पाठ करणारा अशा ब्राह्मणाची यजमानानें यथाशक्ति षोडशोपचार पूजा करून त्याला तो दान द्यावा.

प्रतिमादान.

पीतांगःकामलारोगःकपालमुसलान्वितः ॥
पूजाविधानंत्वातंकोदेवतात्वमुदाह्रतः ॥

अर्थ—कामलारोग्यानें आतंकदेवाची प्रतिमा कांतीनें पिंवळी, हातांत कपाल व मुसल धारण करणारी अशी करून तिची पूजा करून ब्राह्मणास दान द्यावी.

कामलानिदान.

पांडुरोगीतुयोत्यर्थंपित्तलानिनिषेवते ॥
तस्यपित्तमसृङ्मांसंदग्ध्वारोगायकल्पते ॥

अर्थ—जो पांडुरोगी अत्यंत पित्तकारक पदार्थ भक्षितो, त्याचें पित्त शरीरांतील रक्त व मांस, यानां जाळून कामलानामक रोगाला उत्पन्न करितें; अथवा पांडूवांचून ही पित्तल पदार्थ भक्षिल्यानें कामला होत्ये, असें जाणावें.

लक्षण.

हारिद्रनेत्रःसुभृशंहारिद्रत्वङ्नखाननः ॥ रक्तपीतशकृन्मूत्रो
भेकवर्णोहतेंद्रियः ॥ दाहाविपाकोदौर्बल्यंसदनारुचिकर्षितः ॥
कामलाबहुपित्तैषाकोष्ठशाखाश्रयामता ॥

अर्थ—कामलारोग झाला असतां; मनुष्याचे नेत्र, त्वचा, नख, मुख, हीं अत्यंत हळदीसारखीं पिंवळीं होतात; आणि रक्तमिश्रित, पीतवर्ण, असें विष्ठा व मूत्र, होतें, व मनुष्याची इंद्रियशक्ति नष्ट होऊन वर्षाकाळींचे बेडकासारिखा पिंवळा होतो, व दाह, अजीर्ण, अशक्तपण, ग्लानि व अरुचि, याहींकरून पीडित होतो. हा कामलारोग पित्ताधिक आहे; व कोष्ट किंवा शाखा (रक्तादिधातु) यांच्या आश्रयानें होतो.

कामालाचिकित्साक्रम.

रेचनंकामलार्तस्यस्निग्धस्यादौप्रयोजयेत् ॥

ततःप्रशमनीकार्याक्रियावैद्येनजानता ॥

अर्थ–ज्ञाता वैद्य असेल त्याणें कामलेनें पीडित अशा मनुष्यास दूध, तूप का... स्निग्ध पाजून रेचन द्यावें; नंतर दोषशामक उपचार करावे.

नस्य व अंजन.

हिंगुवालोचनेन्यस्तंकामलोन्मूलनेक्षमं ॥

कामलार्तस्यचैरंडपिप्पल्योर्नावनांजने ॥

अर्थ–कामलेच्या नाशनाविषयीं हिंगाचें अंजन करावें; अथवा एरंडाचा रस व पिंपळीचे चूर्ण यांचे नस्य द्यावें.

जालिनीफलादिनस्य.

जालिनीफलमांस्मानंनस्यंवातंडुलांभसा ॥

जालिनीफलमध्यस्थंश्यामासर्षपनस्यतः ॥

अर्थ–कडुदोडकीच्या फळाचें तांदुळाच्या धुवणांत नस्य करावें; किंवा कडुदोडक्यांत पिंपळी व मोहऱ्या भरून ठेवाव्या; आणि त्या वाटून त्यांचे नस्य करावें.

कुमारिकंदनस्य.

किंवातोयेनसर्पिष्टःकुमारीकंदनस्यतः ॥

जायतेकामलापेतापित्तनेत्रांतकामला ॥

अर्थ–कोरफडाच्या कांद्याचा रस काढून त्यांत तूप घालून नस्य करावें; ह्मणजे काविळेने डोळे पिवळे झाले तत्रापि तिचा नाश होतो.

कामलेवर अन्न.

यवगोधूमशाल्यन्नंरसैर्जांगलजैःशुभैः ॥

मुद्गाढकीमसूराद्यैस्तयोर्भोजनमिष्यते ॥

अर्थ–सातु, गहूं व शाळी यांचे अन्न, अरण्यसंबंधि जें मांस त्याच्या रसानीं युक्त, किंवा मूग, मसुरा इत्यादिकानीं युक्त जे भोजन तें कामलावान् पांडुरोगी यानां असावें.

कामलेवर काढा.

त्रिफलावागुडुच्यावादार्व्यानिंबस्यवारसं ॥

प्रातर्मधुयुतंवैद्यःकामलार्ताययोजयेत् ॥

अर्थ–हिरडा, बेहेडा, आवळकाठी, यांचा काढा, किंवा गुळवेलीचा, किंवा दारुहळदीचा, किंवा कडुलिंबाचा काढा मध घालून प्रातःकाळीं वैद्याने कामलेनें पीडितास द्यावा-

पुनर्नवादिकाढा.

पुनर्नवानिंबपटोलतिक्ताविश्वाभयादारुनिशामृतानाम् ॥
कषायकःपांडुगदंनिहंतिसश्वासकासोदरशूलशोथम् ॥

अर्थ–पुनर्नवा, निंब, कडुपडवळ, काडेकिराइत, सुंठ, हिरडा, दारुहळद व गुळवेल यांचा काढा पांडुरोग, श्वास, कास, उदर, शूल व सूज, यांचा नाशक आहे.

त्रिफलादिकाढा.

त्रिफलानिंबकैराततिक्तावासामृताभवः ॥
क्वाथोमधुयुतोहंतिकामलांपांडुतामपि ॥

अर्थ–त्रिफळा, कडुलिंब, काडेकिराइत, कटुकी, अडुळसा, गुळवेल, यांचा काढा मध घालून प्यावा. तो कामला व पांडु यांचा नाशक आहे.

गोदुग्धपान.

अयेमनोज्ञकुंडलेस्फुरन्मुखेंदुमंडले ॥
गवांपयःसनागरंप्रियेनिहंतिकामलां ॥

अर्थ–अई सुंदरकुंडले, दैदीप्यमान नखरूप इंदुमंडले, सुंठीशीं युक्त गाईचें दूध कामळे-चा नाश करितें.

हरीतक्याद्यंजन.

हरीतकीचधात्रिकातथामनोज्ञगैरिका ॥
इतिप्रयोजितांजनंनिहंतिकामलाननं ॥

अर्थ–हरीतकी, वेखंड, आवळकाठी व सोनगेरू यांचें नस्य कामलेचा नाश करितें.

खरविट्स्वरस.

खरविड्दधिनासार्धंसम्यक्संमर्द्यपाययेत् ॥
महत्पित्तोद्भवंरोगंकामलांचप्रणश्यति ॥

अर्थ–गाढवाची लीद दह्याशीं वाटून तिचा रस काढून द्यावा, तो महान् पित्तापासून झालेल्या रोगाचा आणि कामिलीचा नाश करितो.

गुडूचीकल्क.

गुडूचीपत्रकल्कंवापिबेत्तक्रेणकामली ॥

अर्थ–गुळवेलीचे पानाचा कल्क ताकाबरोबर कामलीमनुष्यानें प्यावा.

धात्र्यादि चूर्ण.

धात्रीलोहरजोव्योषनिशाक्षौद्राज्यशर्कराः ॥
लीढानिवारयंत्याशुकामलामुद्धतामपि ॥

अर्थ—आवळकाठी, लोहभस्म, सुंठ, मिरीं, पिंपळी, हळद, मध, साकर, हीं घेत गेलीं असतां; मोठ्या वाढलेल्या कामलेचा नाश करितात.

अयोरजादि चूर्ण.

अयोरजोव्योषविडंगचूर्णंलिह्याद्धरिद्रात्रिफलान्वितंवा ॥
सशर्कराकामलिनांत्रिभंडीहितागवाक्षीसगुडाचशुंठी ॥

अर्थ—लोखंडाचें भस्म, सुंठ, मिरीं, पिंपळी, वावडिंग, हळद, हरडा, बेहडा, आवळकाठी, यांचें चूर्ण किंवा निशोत्तर, आणि साकर, अथवा वृंदावनाचा गीर, सुंठ, आणि गूळ, हे द्यावे; ह्मणजे कामलेवर हितावह होतात.

व्योषादि चूर्ण.

व्योषाग्नि वल्लत्रिफलामुस्तैस्तुल्यमयोरजः ॥ चूर्णितंतक्रमध्वाज्यंको
ष्णतोयोपयोजितं ॥ कामलापांडुहृद्रोगकुष्ठार्शोमेहनाशनं ॥

अर्थ—सुंठ, मिरीं, पिंपळी, चित्रक, मिरीं, हरडा, बेहडा, आवळकाठी, नागरमोथा, हे समभाग व लोहभस्म. एकत्र करून ते ताक, मध, तूप, किंवा कोमट पाणी यांशीं द्यावें; ह्मणजे कावीळ, पांडुरोग, हृद्रोग, कोड, मळव्याध, आणि मेह, यांचा नाश करितें.

अयोरजादियोग.

तुल्यमयोरजःपथ्याहरिद्राक्षौद्रसर्पिषा ॥
चूर्णितंकामलीलिह्याद्गुडक्षौद्रेणवाभया ॥

अर्थ—लोहभस्म, हरीतकी, हळद, यांचें चूर्ण मध व तूप यांशीं द्यावें; किंवा हरीतकी मधाशीं द्यावी; ह्मणजे कामला नाश पावत्ये.

अंजन.

अंजनंकामलार्तानांद्रोणपुष्पीरसंशुभं ॥
निशागैरिकधात्रीणांचूर्णंवासंप्रकल्पयेत् ॥

अर्थ—पांढरें गोकर्णीचा रस, किंवा दारुहळद, तुरटी व आवळकाठी यांचें अंजन कामलानाशक आहे.

नस्य.

वेणीफलरसःस्वच्छोनस्यतस्तस्यसादरं ॥

कामलाकामलोपेतायातिदूरंचसर्पिषा ॥

अर्थ-देवडांगरीचे फळाचा रस स्वच्छ काढून त्यांचे नस्य द्यावें; ह्मणजे कामला जाई ल, अथवा किंचिद्दोषानीं युक्त जी कामला ती तूप प्याले असतां जाईल.

लोहादिचूर्ण.

लोहचूर्णनिशायुग्मंत्रिफलाकटुरोहिणी ॥
प्रलिह्यमधुसर्पिर्भ्यांकामलार्तःसुखीभवेत् ॥

अर्थ-लोहभस्म, हळद, दारुहळद, हरडा, बेहडा, आवळकाठी व कुटकी यांचे चूर्ण मध व तूप याशीं द्यावें; ह्मणजे कामलारोगी बरा होतो.

एलादिचूर्ण.

एलाजीरकभूधात्रीसितागव्येनभावयेत् ॥
प्रातःसंसेवनंकुर्यात्कामलानाशनंपरं ॥

अर्थ-एलची, जिरें, भुयआवळी व साकर हीं दुधांत पचन करून प्रातःकाळी सेवन करावीं; ह्मणजे काविळीचा नाश होतो.

हरिद्राचूर्ण.

निशाचूर्णकर्षमितंदध्नःपलमितंतथा ॥
प्रातःसंसेवनंकुर्यात्कामलानाशनंपरं ॥

अर्थ-हळदीचे चूर्ण १ तोळा; आणि दहीं चार तोळे एकत्र करून प्रातःकाळीं सेवन करावें; ह्मणजे तें कामलेचा नाश करितें.

दार्व्यादिचूर्ण.

दार्वीसत्रिफलाव्योपविडंगानयसोरजः ॥
मधुसर्पिर्युतंलिह्यात्कामलापांडुरोगवान् ॥

अर्थ-दारुहळद, हरडा, बेहडा, आवळकाठी, सुंठ, मिरीं, पिंपळी; आणि लोह हें समभाग घेऊन मध व तूप याशीं. पांडुरोगी व कामली यानीं सेवन करावें.

घृत.

हरिद्रात्रिफलानिंबवलामधुकसाधितं ॥
सक्षीरंमाहिषंसर्पिःकामलापहमुत्तमं ॥

अर्थ-हळद, हिरडे, बेहडे, आवळकाठी, कडुनिंब, चिकणा; आणि जेष्ठीमध इतक्यांनीं सिद्ध केलेलें महिषीचें तूप महिषीचे दुधाबरोबर प्यावें; ह्मणजे कामला नाश करितें.

एरंडस्वरस.

वातारेश्वजटाद्रावंकर्षार्धंदुग्धमिश्रितं ॥ पाययेत्तुप्रतिदि
नमेवमेवदिनत्रयं ॥ घृतंदुग्धोदनंपथ्यंकुर्याद्विलवणंविना ॥
कामलांनाशयत्याशुवायुनाभ्रंहरेद्यथा ॥

अर्थ—एरंडाच्या कोवळया ढिन्या घेऊन त्यांचा रस साहा मासे व दूध तीन दि..
द्यावें; आणि तूप व दूध पथ्यास द्यावें. मीठ वर्ज करावें; ह्मणजे काविळीचा नाश होतो.

कटुकीयोग.

पिबेत्कवोष्णेनजलेनतिक्तांसशर्करांपाणितलप्रमाणां ॥
निहंतिदुष्टामपिकामलांसाहरीतकीवामधुनाप्रयुक्ता ॥

अर्थ—कोमटपाण्याशीं कुटकी; आणि साकर मिळून तोळाभर घ्यावी; किंवा मधा-
शीं हरीतकी द्यावी; ह्मणजे दुष्टकामलेचा नाश होतो.

कुंभकामलानिदान.

कालांतरात्खरीभूताकृच्छ्रास्यात्कुंभकामला ॥

अर्थ—कामलारोग आंगांत फारदिवस राहून विकोपास गेला, ह्मणजे तो कोठांत
उतरतो, त्याला कुंभकामला ह्मणतात.

कामलेचें असाध्य लक्षण.

कृष्णपीतशकृन्मूत्रोभृशंशूनश्चमानवः ॥
सरक्ताक्षिमुखच्छर्दिविण्मूत्रोयश्चताम्यति ॥

अर्थ—जा रोग्याचा मळ कृष्णवर्ण, आणि मूत्र पीतवर्ण, आणि सर्वांगाला फार
सूज आलेला, व डोळे, तोंड, ओकारी, विष्टा व मूत्र हीं रक्तवर्ण, व मोह पावतो, तो
असाध्य जाणावा.

दुसरा प्रकार.

दाहारुचितृडानाहतंद्रामोहसमन्वितः ॥
नष्टाग्निसंज्ञःक्षिप्रंहिकामलावान्विपद्यते ॥

अर्थ—जो कामलारोगी दाह, अरुचि, तृषा, पोटाला फुगारा, झांपड व मोह यांणीं
युक्त; आणि ज्याचा अग्नि व स्मृति ही नष्ट झाली; तो कुंभकामलारोगी नाश पावतो.

कुंभकामलेचें असाध्यलक्षण.

छर्द्यरोचकहृल्लासज्वरक्लमनिपीडितः ॥
नश्यतिश्वासकासार्तोविड्भेदीकुंभकामली ॥

अर्थ—वांति, अरुचि, मळमळ, ज्वर, ग्लानि, श्वास, खोकला, आणि अतिसार यांणीं क्षीण झालेला कुंभकामलारोगी नाश पावतो.

कुंभकामलाचिकित्साक्रम.

कुंभाख्यकामलायांतुहितःकामलिकोविधिः ॥

अर्थ—कुंभकामलेवर कामलेवरचे ही उपचार हितकारक आहेत.

शिलाजितयोग.

गोमूत्रेणपिबेत्कुंभकामलायांशिलाजतु ॥

अर्थ—गोमूत्रांत शिलाजीत प्यावें; ह्मणजे कुंभकामला नष्ट होत्ये.

मंडूर

दग्ध्वाक्षकाष्ठैर्मलमायसंतुगोमूत्रनिर्वापितमष्टवारान् ॥
विचूर्ण्यलीढंमधुनाचिरेणकुंभाव्हयंपांडुगदंनिहंति ॥

अर्थ—बेहेड्याच काष्ठानीं लोखंडाचें कीट जाळून गोमूत्रांत विझवावें. याप्रमाणे आठवेळा करून नंतर बारीक खलून दोन किंवा तीन गुंजा शक्तिप्रमाणे मधाबरोबर चाटावें; ह्मणजे तें कुंभकामलेचा लवकर नाश करील.

नस्यादियोग.

अर्कमूलंहरेन्नस्यात्कामलांतंदुलोदकैः ॥ एरंडमूलिकापीतामधुनाहंतिकामलां ॥ अपामार्गशिफापीतासतक्राकामलापहा ॥ विष्णुक्रांतशिफातक्रपीतावातद्विनाशिनी ॥ लांगलीपत्रचूर्णंवापिबेत्तक्रेणकामलीं ॥ गुडार्द्रकयुताहंतिकामलांत्रिफलाशिता ॥

अर्थ—कामलेवर रुईच्या मुळाचें तांदुळाचे धुवणाशीं नस्य करावें; एरंडाची मुळी मधाशीं प्राशनार्थ द्यावी; आघाड्याची मुळी ताकांत उगाळून प्यावी; विष्णुक्रांतेची मुळी ताकाशीं द्यावी; कळलावीच्या पाल्याचे चूर्ण ताकाशीं द्यावें; अथवा त्रिफळ्याचें चूर्ण, गुळ व आले एकत्र करून द्यावें; ह्मणजे कामला नाश पावत्ये.

पांडुरोगामध्यें केव्हां हलीमक होतो.

यदातुपांडुवर्णःस्याद्धरितश्यावपीतकः ॥ बलोत्साहक्षयस्तंद्रामंदाग्नित्वंमृदुज्वरः ॥ स्त्रीष्वहर्षोंगमर्दश्चश्वासस्तृष्णारुचिर्भ्रमः ॥ हलीमकंतदातस्यविंद्यादनिलपित्ततः ॥

अर्थ—ज्याकाळीं रोगी वर्णानें हळदिवा, निळा, किंवा पिवळा होतो; आणि ज्याचें बल व उत्साह हे नष्ट होतात, व झांपड, अग्निमांद्य, लघुज्वर, स्त्रीविषईं अप्रीति, आंग-

मोडे, श्वास, तृष्णा. अरुचि व भ्रम इत्यादिक उपद्रवानीं युक्त असतो, त्या रोगाला ह मक ह्मणतात. तो वातपित्तजन्य जाणावा.

पानकीलक्षण.

संतापोभिन्नवर्चस्त्वंबहिरंतश्चपीतता ॥
पांडुतानेत्ररोगश्चपानकीलक्षणंवदेत् ॥

अर्थ–पित्ताच्या स्वभावेंकरून शरीराचा दाह होतो, व विड्भेद होतो, शरीर पांडुवर्ण होतें, व अभिष्यंदादि नेत्ररोग होतात; हीं पानकीची लक्षणें जाणावीं.

हलीमकपरिभाषा.

पांडुरोगक्रियांसर्वांयोजयेच्चहलीमके ॥
कामलायांतुयादृष्टासापिकार्याभिषग्वरैः ॥

अर्थ–जे पांडुरोगावरचे उपचार व कामलेवरचे उपचार असे दोन उपचार वैद्यानीं हलीमकावर योजावे.

अयोभस्मयोग.

मारितस्यायसश्चूर्णमुस्ताचूर्णेनसंयुतं ॥
खदिरस्यकषायेणपिबेद्धन्तुंहलीमकं ॥

अर्थ–लोहभस्म; आणि नागरमोथ्याचें चूर्ण हीं एकत्र करून खैराच्या काढ्याबरोबर प्यावीं; ह्मणजे तें हलीमकनाशक आहे.

सितादिलेह.

सितातिक्तावलायष्टीत्रिफलारजनीयुगैः ॥
लेहंलिह्यात्समध्वाज्यंहलीमकनिवृत्तये ॥

अर्थ–साकर, कुटकी, चिकणा, जेष्ठीमध, त्रिफळा, हळद व दारुहळद, यांचा लेह मध व तूप घालून चाटावा; ह्मणजे हलीमकनिवृत्ति होईल.

अमृतादिघृत.

अमृतलतारसकल्कप्रसाधितंतुरगविद्विषःसर्पिः ॥
क्षीरैश्चतुर्गुणमेतद्धितंरैश्चहलीमकार्तेभ्यः ॥

अर्थ–गुळवेलीचा रस, अथवा कल्क यानी सिद्ध केलेले महिषीचें तूप त्याचें चौपट दुधांत घालून जो हलीमकानें पीडित असेल त्यास द्यावें.

गुडूचीस्वरसयोग.

गुडूचीस्वरसेसर्पिःसक्षीरंमाहिषंवृतं ॥

चतुर्गुणेनपयसापाययेत्तद्धलीमके ॥

अर्थ–गुळवेलीचा रस, तूप आणि दूध घालोन पाजावा; अथवा म्हैशीचें तूपांत चौपट दूध घालोन पाजावें; ह्मणजे हलीमकाचें निवारण होतें.

पांडु, कामला, कुंभकामला, हलीमक, यांवर पथ्य.

छर्दिर्विरेचनंजीर्णयवगोधूमशालयः ॥ मुद्गाढकीमसूराणांयुपाजांगलजारसाः ॥ पटोलंवृद्धकूष्मांडंतरुणंकदलीफलं ॥ जीवंतीक्षुरंमत्स्याक्षीगुडूचीतंदुलीयकं ॥ पुनर्नवाद्रोणपुष्पीवार्ताकंलशुनद्वयं ॥ पक्काम्रमभयाबिंबीशृंगीमत्स्योगवांजलं ॥ धात्रीतक्रंघृतंतैलंसौवीरकतुषोदकं ॥ नवनीतंगंधसारोहरिद्रानागकेसरं ॥ यवक्षारोलोहभस्म कषायाणिचकुंकुमं ॥ यथादोषमिदंपथ्यंपांडुरोगवतांभवेत् ॥

अर्थ–ओकारी, रेच, जुने यव, गहुं, भात, मुग, तुरी व मसुरा याचें यूष; अरण्यांतील प्राण्यांचें मांसरस, पडवळ, जुना कोहळा, जुने केळें, गुळवेल, काळा ऊस, मत्स्याक्षी, गुळवेल, तांदूळजा, पुनर्नवा, द्रोणपुष्पी, वांगें, कांदा, लसुण, पिका आंबा, हरीतकी, तोंडलें, शृंगीमासा, गोमूत्र, आंवळे, ताक, तूप, तेल व यव व गहूं यांची कांजी, कोंडयाचा काढा, नवनीत, गंधसार, हळद, नागकेसर, यवक्षार, लोहभस्म, तुरट पदार्थ व केशर हे पांडुरोग्याला दोष पाहून पथ्य योजावें.

अपथ्य.

रक्तस्रुतिर्धूमपानंवमिर्वेगविधारणं ॥ स्वेदनंमैथुनंशिंबीपत्रशाखाग्निरामठं ॥ माषांबुपानंपिण्याकंतांबूलंसर्षपंसुरा ॥ सर्वाण्यम्लानि दुष्टानिविरुद्धाध्यशनानिच ॥ गुर्वन्नंचविदाहीनिपांडुरोगवतांविषं ॥

अर्थ–रक्तस्राव, धूमपान, वांति, मलमूत्रादिकांच्या वेगाचें धारण, घाम, मैथुन, शेंगा व पाला यांची भाजी, चित्रक, हिंग, उडीद, उदकपान, पेंड, तांबूल, शिरस, मद्य, संपूर्ण आम्लवर्ग, दुष्टान्न, विरुद्धान्न, भोजनोत्तर लागलेंच भोजन, जड व विदाहि अशीं अन्नें, हीं पांडुरोग्याला अपथ्यें समजावीं.

पांडुरोगावर दंभ.

दाहश्चरणयोःसंधौनाभेर्द्व्यंगुलकादधः ॥
मस्तकेहस्तयोर्मूलेमध्येचस्तनकुक्षयोः ॥

अर्थ–पांडुरोग्याला दोहोंपायांचे संधीवर व बेंबीच्या खालीं दोन आंगळांवर, मस्तक; आणि स्तन व कुस यांमध्यें डाग द्यावा.

कामलेवर दंभ.

कामलेपुकरपृष्ठविभागेदंभयेद्रविशलाकयैव ॥
कूर्परार्धमितमध्यप्रदेशेद्रावितंद्रवतिनिश्चयेनरोगः ॥

अर्थ—कामलेवर हाताच्या मागल्या बाजूस कोपराचे खालीं मध्येंच कोपरापासून मनगटापर्यंत निमे भागावर तांब्याच्या पट्टीनें डाग द्यावा; आणि त्याला वाहूं द्यावा; म्हणजे निश्चयानें रोगशांति होते.

रक्तपित्तीं कर्मविपाक-

मद्यपोरक्तपित्तीस्यात्सदद्यात्सर्पिषाघटं ॥
मधुनोर्धघटंचैवसहिरण्यंविशुद्धये ॥

अर्थ—जो मनुष्य मद्यपान करितो, तो रक्तपित्ती होतो; त्याणें तुपाची घागर भरून त्याबरोबर मधाचा अर्धा घट भरून सहिरण्य दान द्यावा; म्हणजे तो त्यापासून मुक्त होतो.

ज्योतिःशास्त्राभिप्राय.

चंद्रक्षेत्रेयदाभौमोजायतेमनुजस्तदा ॥
रक्तपित्तेनदुर्नाम्नोनानाव्याधिसमाकुलः ॥

अर्थ—जन्मकाळीं चंद्राचे क्षेत्रीं भौम असतो, तो रक्तपित्त व अर्श अशा अनेक व्याधि उत्पन्न करितो.

दुसरा प्रकार.

रक्तपित्तंज्वरंदाहमग्निवाय्वोरुपद्रवं ॥ लभतेनात्रसंदेहश्चं
द्रमध्येयदाअजः ॥ भौममंत्रजपःकार्योहोमःखादिरजैस्तिलैः ॥
घृतेनचसमायुक्तंदानंरक्तवृषस्यच ॥

अर्थ—चंद्रामध्यें भौम आला असतां; रक्तपित्त, ज्वर, दाह, वायु, यांचा उपद्रव होतो. तन्नाशनार्थ मंगळाचा जप करावा; आणि खैराच्या समिधा, तिळ, तूप यांचा होम करावा. आणि लाल बैल दान द्यावा.

ज्योतिःशास्त्रोक्तचिकित्सा.

बिल्वचंदनबलाशणपुष्पैर्हिंगुलूकफलिनीबकुलैश्च ॥
स्नानमद्भिरिहमग्नियुनाभिर्भौमदोषविनिवारणमाशु ॥

अर्थ—वेल, चंदन, चिकणा, रानताग, हिंगुळ, काळा उंबर, व कुळीचीं फळें हे पदार्थ घालोन पाणी तापवून त्याणें रोग्यास स्नान घालावें; ह्मणजे चंद्रस्थानस्थित भौम-दोषाचा नाश होतो.

रक्तपित्तनिदान.

घर्मव्यायामशोकाध्वव्यवायैरतिसेवितैः ॥ तीक्ष्णोष्णक्षारलवणैरम्लैः कटुभिरेवच ॥ पित्तंविदग्धंस्वगुणैर्विदहत्याशुशोणितं ॥ ततःप्रवर्ततेरक्तमूर्ध्वंचाधोद्विधापिवा ॥ ऊर्ध्वंनासाक्षिकर्णास्यैर्मेढ्रयोनिगुदैरधः ॥ कुपितंरोमकूपैश्चसमस्तैस्तत्प्रवर्तते ॥

अर्थ—घाम, व्यायाम, शोक, मार्गातिक्रमण व मैथुन, इत्यादिकांच्या अतिसेवनेंकरून; व तीक्ष्ण, ऊष्ण, यवक्षारादिक्षार , लवण, आम्ल, तिखट यांच्या सेवनेंकरून पित्त कुपित होऊन आपले दाहादिक गुणानीं रक्ताला त्वरित जाळतें; नंतर तें रक्त ऊर्ध्वगति होऊन नाक, डोळे, कान व तोंड यावाटे बाहेर निघतें; आणि अधोगत होतें; तें शिस्न, योनी व गुद या द्वारानीं निघतें, व रोग प्राबल्यें करून अतिकुपित झालें असतां, सर्वरोमांचापासून ही निघूं लागतें.

पूर्वरूपलक्षण.

सदनंशीतकामित्वंकंठधूमायनंवमिः ॥
लोहगंधश्चनिःश्वासोभवत्यस्मिन्भविष्यति ॥

अर्थ—रक्तपित्त होणार असतां. शरीर म्लान होतें, शीत पदार्थ प्रिय वाटतात, कंठांतून सधूम व कर्पट ढेंकरा येतात, ओकारी सुटत्ये, श्वासोश्वासाला लोहाचा गंध येतो.

असाध्यलक्षण.

मांसप्रक्षालनाभंक्वथितमिवचयत्कर्दमांभोनिभंचमेदःपूयास्रकल्पंयकृदिवयदिवापक्वजंबूफलाभं ॥ यत्कृष्णंयच्चनीलंभृशमतिकुणपंयत्रचोक्ताविकारास्तद्वर्ज्यंरक्तपित्तंसुरपतिधनुषायच्चतुल्यंविभाति ॥

अर्थ—जा रक्तपित्ताचा वर्ण मांस धुतलेल्या पाण्यासारिखा; किंवा गढूळलेले पाण्यासारिखा अथवा मेद, पू, रक्त यांसारिखा व यकृतासारिखा, अथवा पिकलेल्या जांबळासारिखा. कृष्ण व नीलवर्ण होतो, व त्यास प्रेतासारिखा दुर्गंध येतो, व जा जा दोषाचे विकार सांगीतले, त्यांचे सारिखा वर्ण होतो, व इंद्रधनुष्यासारिखा नानाप्रकारचा होतो, त्या रक्तपित्तरोग्याला वैद्यानें सोडावें.

वातिकरक्तपित्तनिदान.

श्यावारुणंसफेनंचतनुरूक्षंचवातिकं ॥

अर्थ–वातयुक्तरक्तपित्ताचा कोप झाला असतां, रक्त काळें, अरुणवर्ण, फेन, पातळ, आणि रूक्ष असें होतें.

भोजन.

शालिषष्टिकनीवारचणमुद्गामसूरकाः ॥
श्यामाकाश्चप्रियंगुश्चभोजनंरक्तपित्तिनां ॥

अर्थ–तांदूळ साठेसाळीचे, नाचणी, वरी, हरभरे, मूग, मसुरा, सावे व राळे इतकीं धान्यें रक्तपित्तीमनुष्यास भोजनास योग्य आहेत.

रक्तपित्तशास्त्रार्थ.

अतिप्रवृद्धदोषस्यपूर्वंलोहितपित्तिनः ॥
अक्षीणबलमांसाग्नेःकर्तव्यमपतर्पणम् ॥

अर्थ–ज्याचा दोष फार वाढला; व बल, मांस आणि अग्नि क्षीण झाले नाहींत; त्याला उपाय करावा.

ऊर्ध्वगेरेचनंशस्तमधोगेवमनंहितम् ॥

अर्थ–ऊर्ध्व रक्त मार्गें असेल, तर रेचन द्यावें; आणि अधोगत असेल, तर वमन द्यावें.

पित्तासंशमयेन्नादौप्रवृत्तंबलिनःसुतं ॥
हृत्पांडुग्रहणीरोगप्लीहगुल्मोदरादिकृत् ॥

अर्थ–बळकट मनुष्याचें रक्तपित्त प्रथमतः शमवूं नये, जर होतांक्षणीच शमविलें, तर हृद्रोग, पांडु, संग्रहणी, प्लीहा, गुल्म व उदर हे रोग उत्पन्न होतात.

क्षीणमांसबलंबालंवृद्धंशोषानुबंधिनं ॥
अवाम्यमविरेच्यंचशमनीयैरुपाचरेत् ॥

अर्थ–ज्याचें मांस आणि बल क्षीण आहे, व जो बाल व वृद्ध व ज्यास शोषाचा उपद्रव आहे, व जो वमन किंवा विरेचनयोग्य नाहीं; अशा मनुष्याचा रक्तपित्तावर शामक औषधानीं उपचार करावा.

शालिपर्ण्यादिनासिद्धोपेयोयूपस्त्वधोगते ॥
रक्तातिसारहंताचयोज्योविधिरशेषतः ॥

अर्थ–अधेद्वारानें जाणाऱ्या रक्तपित्तावर साल्वण इत्यादि औषधांनीं सिद्ध केलेला यूष द्यावा; आणि रक्तातिसारावरचा सर्व उपचार करावा.

पयांसिशीतानिरसाश्चजांगलाःसतीनयूपाश्चसशालिषष्टिकाः ॥
हितानिचैतानिसरक्तपित्तेचान्यान्यपिस्युःकिलपित्तहानि ॥

अर्थ—रक्तपित्तावर थंड दूध, जंगलांतील मांसाचा रस, वाटाणे, साठ्यासाळींचा मंड, हितकारक आहे; आणि जेवढीं पित्तनाशक तेवढीं यावर हितकारक आहेत.

मसूरमुद्गचणकाःसमकुष्टाढकीफलाः ॥

प्रशस्ताःसूपयूपार्थेकल्पितारक्तपित्तिनां ॥

अर्थ—रक्तपित्तिमनुष्यास, मसूर, मूग, हरभरे, मठ व तुरी हे वरण किंवा मंड करण्याविषयीं प्रशस्त आहेत.

दाडिमामलकंबिल्वानम्लार्थेचापिदापयेत् .

अर्थ—रक्तपित्तिमनुष्याला आंबट देणे झाल्यास डाळिंब, आवळा, बेलफळ हीं द्यावीं.

पटोलनिंबवेत्राग्रप्लक्षवेतसपल्लवाः ॥

शाकार्थेशाककामानांतंडुलीयादयोहिताः ॥

अर्थ—रक्तपित्तिमनुष्यास भाजीची इच्छा झाल्यास पडवळ, आणि कडुलिंब, वेत, पायरी व जलवेत यांचे कोंब अथवा तांदुळजा इत्यादिकांच्या भाज्या हितकारक आहेत.

रक्तपित्तादिकांवर कामदेवघृत.

अश्वगंधातुलैकास्यात्तदर्धंगोक्षुरःस्मृतः ॥ बलामृताशालिपर्णीविदारीचशतावरी ॥ पुनर्नवाश्वत्थशुंठीकाश्मर्यास्तुफलान्यपि ॥ पद्मबीजंमाषबीजंदद्याद्दशपलंपृथक् ॥ चतुर्द्रोणांभसापक्त्वापादशेषंशृतंनयेत् ॥ जीवनीयगणःकुष्टंपद्मकंरक्तचंदनं ॥ पत्रकंपिप्पलीद्राक्षाकपिकच्छूफलंतथा ॥ नीलोत्पलंनागपुष्पंसारिवेद्वेबलेतथा ॥ पृथक्कर्षसमाभागाःशर्करायाःपलद्वयं ॥ रसश्चपौंड्रकेक्षूणामाढकैकंसमाहरेत्॥ घृतस्यचाढकंदत्वापाचयेन्मृदुनाग्निना ॥ घृतमेतन्निहंत्याशुरक्तपित्तमुरःक्षतं ॥ हलीमकंपांडुरोगंवर्णभेदंस्वरक्षयं ॥ वातरक्तंमूत्रकृच्छ्रंपार्श्वशूलंचकामलां ॥ शुक्रक्षयमुरोदाहंकार्श्यमोजःक्षयंतथा ॥ स्त्रीणांचैवाप्रजातानांगर्भदंशुक्रदंनृणां ॥ कामदेवघृतंनामत्दृष्यंबल्यंरसायनं ॥

अर्थ—आसंध एक तुळाप्रमाणें व त्याचे अर्धे गोखरूं घ्यावें. चिकणामूळ, गुळवेल, रानगांजा, विदारीकंद, शतावरी, पुनर्नवा, पिंपळमूळ, सुंठ, शिवणीचें फळ, कमळबीज, उडीद हीं अकरा औषधें दहा दहा पलप्रमाण घेऊन थोडीं थोडीं कुटून सारीं एकाजागीं करून त्यांत कल्क करून टाकावयाचीं औषधें येणेंप्रमाणें. ज्येष्ठमध, विदारी

कंद, आसंध, हरणवेल, ज्येष्टीमध, रानमुगी, रानउडीद, हीं जीवनीयगणाचीं औषधें जाणावीं. कोष्ठ, पद्मकाष्ठ, रक्तचंदन, तमालपत्र, पिंपळी, द्राक्षे, कवचबीज, निळें कमळ, रानकेशर, काळी उपळसरी, पांढरी उपळसरी, चक्रमेंड, नागवला, हीं वीस औषधें कर्ष कर्ष प्रमाण घेऊन कल्क करून काढयांत घालावा, व साखर दोन पळें घालावी, पांढऱ्या उसाचा रस, तूप हीं दोन्हीं एकेक अढक प्रमाण त्या काढयांत घालून हलक्या अग्नीनें तूप शेष राही तोंपर्यंत पाक करून नंतर तें तूप गाळून पोटांत घ्यावें; तेणेंकरून रक्तपित्त, उरक्षतरोग, पांडुरोगाचा भेद, हलीमक रोग, स्वरक्षय, वातरक्त, मूत्रकृच्छ्र, पाठीचा शूळ, डोळ्यांत काविळ होते ती, धातुक्षय, उरांत रोग होतो तो, शरीराचीकृशता, शरीराचे तेजाचा क्षय. हे सारे रोग दूर होतात. हें तूप ज्या स्त्रियांस मुलें होत नाहींत त्यांस मुलें देतें, व पुरुषांस धातु उत्पन्न करितें, हृदयास प्रियकर होतें, व बळ देतें, व हें तूप रसायन आहे, याला कामदेवघृत असें ह्मणतात.

दुर्वाद्यघृत.

दूर्वामुत्पलकिंजल्कमंजिष्ठाचैलवालुकं ॥ शिवालोध्रमुशीरंचमुस्ता
चंदनपद्मकैः ॥ विपचेत्कार्षिकैःकल्कैर्घृतप्रस्थंसुखाग्निना ॥ तंदुलां
बुमजाक्षीरंदत्वाचैवचतुर्गुणं ॥ तत्पानाद्वमतोरक्तंनावनान्नासिका
गतं ॥ कर्णाभ्यांयस्यगच्छेच्चतस्यकर्णौप्रपूरयेत् ॥ चक्षुसाविणिरक्ते
चपूरयेत्तेनचक्षुषी ॥ मेंढ्रपायुप्रवृत्तेषुवस्तिकर्मप्रकारयेत् ॥ रोमकूपेप
वृत्तेचतदभ्यंगेप्रयोजयेत् ॥ सर्वेपुरक्तपित्तेपुतस्माच्छ्रेष्ठमिदंघृतं ॥

अर्थ—दूर्वा, कमळाचे केशर, मंजिष्ठ, वाळा, हरीतकी, लोध्र, काळावाळा, नागरमोथा, चंदन व पद्मकाष्ट, ही प्रत्येकी तोळा तोळा घेऊन त्यांचा कल्क व तूप ६४ तोळे; व तांदळांचें धोण, शेळीचें दूध, हें चतुर्गुण घालोन मंदाग्नीवर पचन करून घृत सिद्ध करावें, तें प्राशन केलें असतां; रक्ताची वांती, नासारक्त; कर्णांतून जाणारें रक्त, नेत्रांतून जाणारें रक्त व पू व शिस्न, गुद, यांपासून जाणारें रक्त यांवर; व रोमकूपांतून जाणाऱ्या रक्तावर, अभ्यंग करावें, हें सर्वरक्तपित्तावर देण्यास श्रेष्ठ आहे.

शतावर्यादिपेय.

शतावरीबलारास्नाकाश्मर्यसपरूपकं ॥
पाययेद्रक्तपित्तघ्नंसद्यःशूलहरंपरं ॥

अर्थ—शतावरी, चिकणा, रास्ना, सिवन, आणि फालसा यांचा काढा प्राशन करावा; ह्मणजे रक्तपित्ताचा नाश करून शूलाचाही नाश करितो.

पैत्तिकरक्तपित्तनिदान.

रक्तपित्तंकषायाभंकृष्णंगोमूत्रसन्निभं ॥
मेचकागारधूमाभमंजनाभंचपैत्तिकं ॥

अर्थ—जें पित्ताश्रित रक्तपित्त तें काढ्यासारिखें, काळें, गोमूत्रासारिखें, काळेंसावळें, किंवा धूर, काजळ यांसारिखे असतें.

त्रिफलादिकाढा

त्रिफलाकृतमालभवंकथनंसितयामधुनामिलितंहरति ॥
ननुशोणितपित्तरुजंविविधांघनदाहकपित्तशूलहरं ॥

अर्थ—त्रिफळा व बाहावा यांचा काढा साकर व मध घालोन प्यावा, तो अनेकप्रकारचें रक्तपित्त, दाहा व पित्तशूल, यांचा नाशक आहे.

अतस्यादिकाढा.

अतसीकुसुमसमंगावटप्ररोहास्तृणांभसापीताः ॥
साधयंतिरक्तपित्तंयदिभुंक्तेमुद्गयूषेण ॥

अर्थ—जवसाचें फुलें, मंजिष्ठ, वडाच्या पारंब्या व रोहिसगवताच्या मुळ्या यांचा काढा प्यावा, व मुगांचे मंडाशीं भात खावा; ह्मणजे तो रक्तपित्ताचा नाश करील.

वासादिलेह.

वासकस्वरसैःपथ्यासप्तधापरिभाविता ॥
कृष्णावामधुनालीढारक्तपित्तंद्रुतंजयेत् ॥

अर्थ—आडुळशाचे रसाच्या सात भावना दिलेली हरीतकी सेवन केली, तर रक्तपित्त जिंकील; अथवा पिंपळी मधावरोबर चाटली असतां, तीही रक्तपित्तनाशक आहे.

कूष्मांडकावलेह रक्तपित्तादिकांवर.

निष्कुलीकृत्यकूष्मांडखंडंपलशतंपचेत् ॥ निःक्षिप्यद्वितुलंनीरमर्धांशिष्टंचगृह्यते ॥ तानिकूष्मांडखंडानिपीडयेत्दृढवाससा ॥ आतपेशोषयेत्किंचिच्छूलाग्रैर्बहुशोव्यधेत् ॥ क्षिप्त्वाताम्रकटाहेचदद्यादष्टपलंघृतं ॥ तेनांकिंचिद्भर्जयित्वापूर्वोक्तंतज्जलंक्षिपेत् ॥ खंडापलंशतंदत्वासर्वमेकत्रपाचयेत् ॥ सुपक्वेपिप्पलीशुंठीजीरकंद्विपलंपृथक् ॥ पृथक्पलार्धंधान्याकंपत्रैलामरिचत्वचं ॥ चूर्णीकृत्याक्षिपेत्तत्रघृतार्धंक्षौद्रमावहेत् ॥ खादेदग्निबलंदृष्ट्वारक्तपित्तीक्षयीज्वरी ॥ शोषस्तृषातम

श्छर्दिकासश्वासक्षतातुरः ॥ कूष्मांडकावलेहोयंबालवृद्धेपुयुज्यते ॥

उरःसंधानकृत्वृष्योबृंहणोबलकृन्मतः ॥

अर्थ—चांगला कोहळा जून आणून वरची साल काढून त्याचे बारीक बारीक तुकडे करून ते शंभर पळ प्रमाण वजन घेऊन त्यांत पाणी दोन तुळा प्रमाण घालून अर्धे पाणी राही, तों पावेतों काढा करून गाळून ठेवावा. मग त्या कोंहळ्याचे तुकडे वट्ट फडक्यांत घालून पिळून त्यांतील पाणी काढून मग त्या तुकड्यानां किंचित् उष्ण देऊन सुयांनीं बहुत बहुत छिद्रें पडत असें टोचून मग तांब्याचे भांड्यांत आटपळप्रमाण तूप घालून त्यांत ते तुकडे थोडे थोडे परतून मग पहिल्या कोंहळ्याचा काढा ठेविला आहे, तो त्यांत टाकून व साखर १०० पळप्रमाण वजन घेऊन त्या काढ्यांत घालून घण होई तोंपर्यंत पाक करावा, त्यांत चूर्ण करावयाचीं औषधें येणें प्रमाणें. पिंपळी, सुंठ, जिरें, हीं तीन औषधें दोन दोन पळें व धनें, तमालपत्र, विलायची, मिऱ्यें, दालचिनी, हीं पांच औषधें अर्ध अर्ध पळ प्रमाण घ्यावीं. मग साऱ्यांचें चूर्ण करून पाकांत टाकावें, व मध चार पळ प्रमाण त्यांत मिळवावी. याला कूष्मांडकावलेह ह्मणतात. हा लेह रोग्यानीं आपली शक्ति व अग्नीचें बळ पाहून घ्यावा, तेणेंकरून रक्तपित्त, क्षय, ज्वर, शोष, तहान, डोळ्यांपुढे अंधारी येते ती, ओकारी, श्वास, कास, उरःक्षत हे रोग दूर होतात, व हा अवलेह बाळकांस व वृद्धांस उपयोगी पडतो, व उरांत अन्नाचा रस येतो त्याला साधक होतो, व स्त्रीसंगाविषयीं इच्छा देतो, व धातूची वृद्धि करितो, व बळ देतो.

कफयुक्तरक्तपित्तनिदान.

सांद्रंसपांडुसस्नेहंपिच्छलंचकफात्मकं ॥

अर्थ—रक्तपित्तामध्यें कफाचे प्रावल्य असतां, रक्त दाट व किंचित पांडुरवर्ण, सस्नेह व कफमिश्रित असें होतें.

अभयाभक्षण.

अभयामधुसंयुक्तापाचनीदीपनीमता ॥

श्लेष्मार्णरक्तपित्तंचहंतिशूलातिसारजित् ॥

अर्थ—हरीतकी मधाबरोबर सेवन केली असता; पाचक, दीपक व कफ, रक्त व पित्त यांची नाशक व शूल अतिसार याते जिंकणारी अशी आहे.

कफवायूचे संबंधानें रक्ताचा प्रवर्तनमार्ग.

ऊर्ध्वगंवाकफसंसृटमधोगंमारुतानुगं ॥

अर्थ—कफयुक्त रक्तपित्त ऊर्ध्वगति होतें, व वातयुक्त रक्तपित्त अधोमार्गानें जातें.

आज्यपान.

शृतेनाज्येनपयसासुपिष्टंकुंकुमंपिबेत् ॥
ऊर्ध्वरक्तविनाशायतेनैवाज्येनभोजनं ॥

अर्थ—शेळीचे दुधांत केशर शिजवून प्यावें; आणि शेळीचे दुधाबरोबर भात खावा; ह्मणजे ऊर्ध्वरक्त बंद होतें.

ह्रीवेरादिजल.

ह्रीबेरचंदनोशीरंमुस्तपर्पटकैःशृतं ॥
केवलंशृतशीतंवादद्यात्तोयंपिपासिते ॥

अर्थ—वाळा, चंदन, काळा वाळा, नागरमोथा, पित्तपापडा, यांचा काढा किंवा यांचे चाहासारिखें पाणी उतरून ते थंड करून पिण्याकरितां द्यावें; ह्मणजे ताहान शमतें.

मृद्वीकादिगुटी.

लोहगंधनिभश्वासेउद्गारेरक्तगंधिनि ॥
मृद्वीकोपणमात्रातुखादेद्द्विगुणशर्करा ॥

अर्थ—रक्तपित्तानें श्वासोश्वास रक्तगंधि होतात, व ढेंकर ही रक्तगंधि येतात. त्यावर गोस्तनीद्राक्षें, गिरीं, यांचे दुप्पट साकर घालून गोळी करून भक्षण करावी.

पारावतादियूप.

पारावतकपोतांश्चलावान्रक्ताक्षवर्तकान् ॥ शशान्कपिंजलानेणान्ह
रिणान्कालपुच्छकान् ॥ रक्तपित्तहरान्विद्याद्रसंतेषांप्रयोजयेत् ॥

अर्थ—पारवा, कवडा, लावा, कबूतर व पांढरी टिटवी हे पक्षी; आणि ससा, भेकरें, चितळ व हरण हे पशु रक्तपित्तहारक आहेत; ह्मणून यांचा रस करून प्यावयास द्यावा.

घृतसैंधवयोग.

ईषदम्लाननम्लांश्चघृतभृष्टान्ससैंधवान् ॥
कफानुगेयूपशाकंदद्याद्वातानुगेरसं ॥

अर्थ—कफजरक्तपित्तावर किंचित आंबट किंवा गोड पदार्थ तुपांत भाजून सैंधव घालून द्यावे; किंवा यूष व शाका द्याव्या; तेंच वातानुबंध असेल, तर त्याला मांसरस द्यावे.

पथ्यजलपान.

पथ्यंसतीनयूपेणससितैर्लाजसक्तुभिः ॥
जलंखर्जूरमृद्वीकामधुकैःसपरूपकैः ॥

अर्थ–वाटाण्याचा यूष, लाह्या, सातु व साकर हे पथ्यास घ्यावें; आणि खजूर, द्राक्षें, ज्येष्टमध व फालसा यांचा काढा करून निवळून तें पाणी पिण्याकरितां घ्यावें.

द्वंद्वजसन्निपातरक्तपित्तनिदान.

संसृष्टलिंगंसंसर्गात्रिलिंगंसान्निपातिकं ॥

अर्थ–दोहों दोषांचीं लक्षणें असतां, द्वंद्वज रक्तपित्त जाणावें; व सर्वदोषांची लक्षणें असतां, सान्निपातिक जाणावें.

असाध्यरक्तपित्तलक्षण.

द्विमार्गंकफवाताभ्यामुभाभ्यामनुवर्तते ॥ ऊर्ध्वंसाध्यमधोयाप्यमसा
ध्यंयुगपद्गतं ॥ एकमार्गंबलवतोनातिवेगंनवोत्थितं ॥ रक्तपित्तंसुखे
कालेसाध्यंस्यान्निरुपद्रवं ॥ एकदोषानुगंसाध्यंद्विदोषंयाप्यमुच्यते ॥
यत्त्रिदोषमसाध्यंतन्मंदाग्नेर्नातिवेगवत् ॥

अर्थ–रक्तपित्त कफ व वात यांशीं युक्त असतां, ऊर्ध्वाधोमार्गानें बाहेर निघतें, त्यांत ऊर्ध्वमार्गानें जाणारें रक्तपित्त साध्य व अधोमार्गानें जाणारें दुःसाध्य आणि उभयगतिक असाध्य असें जाणावें; अथवा एकमार्गानें प्रवृत्त असून त्यांमध्यें वेदना मंद असतात, व जें नूतन उत्पन्न, व रोगी बलवान् आणि सुखकाळीं (हेमंतशिशिरादिक ऋतूंत) उत्पन्न होतें, तें सुखसाध्य; व एकदोषेंकरून युक्त जें रक्तपित्त तें सुखसाध्य, व द्विदोषज दुःसाध्य, आणि ज्यामध्यें त्रिदोषांचा संबंध असून मंदवेग व मंदाग्नि असें असतें, तें रक्तपित्त सर्वथा असाध्य जाणावें.

असाध्यलक्षण.

व्याधिभिःक्षीणदेहस्यवृद्धस्यानश्नतश्चयत् ॥

अर्थ–ज्याचें शरीर व्याधींनीं क्षीण, जो वृद्ध व उपास करणारा, अशाचें रक्तपित्त असाध्य जाणावें.

रक्तपित्ताचे उपद्रव.

दौर्बल्यंश्वासकासज्वरवमथुमदाःपांडुतादाहमूर्छाभुक्तेघोरोविदाहस्त्व
धृतिरपिसदाल्हृद्यतुल्याचपीडा ॥ तृष्णाकोष्ठस्यभेदःशिरसिचतपनंपू
तिनिष्ठीवनत्वंभक्तद्वेषाविपाकौविकृतिरपिभवेद्रक्तपित्तोपसर्गाः ॥

अर्थ–अशक्तपणा, श्वास, कास, ज्वर, वांति, उन्माद, पांढरेपणा, दाह, मूर्छा, भक्षिल्याअन्नाचा उग्र दाह, अधीरपणा व सुखकारकपीडा, तृषा, कोठगतमळाचा भेद व मस्तकाला नम्रता, थुंकयाला दुर्गंध, अन्नद्वेष, अजीर्ण, इत्यादिक रक्तपित्ताचे उपद्रव होत.

असाध्यलक्षण.

येनचोपहतंरक्तंरक्तपित्तेनमानवः ॥ पश्येद्दृष्टंवियच्चापितच्चा
साध्यमसंशयं ॥ लोहितंछर्दयेद्यस्तुबहुशोलोहितेक्षणः ॥ लो
हितोद्गारदर्शीचम्रियतेरक्तपैत्तिकः ॥

अर्थ—ज्याचें रक्तपित्तानें रक्त वाहून गेलें, व आकाश पडतेंसें पाहतो, तो निःसंशय. असाध्य; अथवा फार रक्ताची वांति, डोळे रक्तवर्ण, ढेंकर रक्तयुक्त; आणि पदार्थमात्र आरक्त पाहतो, तो रक्तपित्तरोगी मरण पावतो.

वृषादिस्वरस.

वृषपत्राणिनिष्पीड्यरसंसमधुशर्करम् ॥
अनेनप्रशमंयातिरक्तपित्तंसुदारुणम् ॥

अर्थ—अडुळशाचा रस, मध, साकर, एकत्र करून प्यावें; ह्मणजे भयंकर रक्तपित्त शांत होतें

मातुलिंग्यादि पेय.

मूलानिपुष्पाणिचमातुलिंग्याःसमंपिबेत्तंडुलधावनेन ॥
घ्राणप्रवृत्तेजलमाशुदेयंसशर्करंनासिकयोःपयोवा ॥

अर्थ—महाळुंगीचीं मुळे किंवा फुलें तांदुळाचे धुणांत वांटून प्यावीं; किंवा त्यांचा रस काढून त्यांत साकर किंवा दूध घालून नाकांत घालावा; ह्मणजे नाकांतील रक्त बंद होईल.

उदुंबरादियोग.

उदुंबराणिपक्वानिगुडेनमधुनापिवा ॥
उपभुक्तानिनिघ्नंतिनासारक्तंनृणांध्रुवं ॥

अर्थ—उंबराचीं पिकलेलीं फळं गुळाबरोबर किंवा मधाबरोबर खाल्लीं असतां, नाकांतून पडणारें रक्त बंद करतात.

अश्वत्थपत्रयोग.

अश्वत्थपत्राग्ररसात्षडंशोबोलोथतस्माद्द्विगुणंमधुस्यात् ॥
रक्तप्रवाहंत्हृदयस्थितंवावातोयथाभ्रंहरतेतथैव ॥

अर्थ—पिंपळाचे पानाच्या अग्राचा रस एक भाग आणि साहा भाग रक्तयाबोळ, त्याचे दुप्पट मध असें एकत्र करून प्यावें; ह्मणजे रक्ताचा प्रवाह किंवा ह्रदयांत सांचलेलें रक्त, वारा जसा मेघास दूर करितो याप्रमाणें दूर करि—

चित्रकचूर्णयोग.

जयेन्नासाश्रितंरक्तंलीढंवाऽग्नेद्रपावकम् ॥

अर्थ—मधावरोवर चित्रकचूर्ण चाटावें; ह्मणजे नाकांतील रक्त नाहिसें होतें.

गंधकादिप्राशन.

गंधंसूतंमाक्षिकंलोहचूर्णंसर्वंघृष्टंत्रैफलेनोदकेन ॥

लोहेपात्रेगोपयसाचधृत्वारात्रौदद्याद्रक्तपित्तप्रशांत्यै ॥

अर्थ—गंधक, पारा, माक्षिकभस्म, लोहभस्म, सर्व एकत्र करून लोखंडाचे पात्रांत त्रिफळ्याचे काढ्यानें खलावें; आणि गाईचे दुधावरोवर रात्रीं घ्यावें; ह्मणजे रक्तपित्त शांत होतें.

दुग्धादियोग.

पयःसिताढ्यंशृतशीतमाज्यंगव्यंपयोवाप्रसमीक्ष्यवन्हिं ॥ यष्टीमधूकार्जुनभावनीयंद्राक्षाथवागोक्षुरकैःशृतंवा ॥ द्राक्षयाफलिनीभिर्वावलयानागरेणवा ॥ श्वदंष्ट्राशतावर्यारक्तजित्साधितंपयः ॥

अर्थ—गाईचें किंवा शेळीचें दूध, ज्येष्ठीमध, मोह व सादडा यांशीं, किंवा द्राक्षे, चिकणा व गोखरूं यांशीं, किंवा द्राक्षे व गहुला यांशीं; अथवा चिकणा व सुंठ यांशीं, किंवा गोखरूं व शतावरी यांशीं तापवून शीत करून द्यावें; ह्मणजे तें रक्तपित्ताला शमवितें

वासास्वरस.

वासायांविद्यमानायामाशायांजीवितस्यच ॥

रक्तपित्तीक्षयीकासीकिमर्थमवसीदति ॥

अर्थ—भूमीवर अडुळसा आहे; आणि जीविताची इच्छा आहे तर; रक्तपित्ती, ज्वरी, खोकलेकरीपुरुषानीं कां क्लेश भोगावे.

लक्षादियोग.

क्षीरेणलाक्षामधुमिश्रितेनप्रपीयजीर्णेपयसानुमद्यं ॥

सद्योनिहन्याद्रुधिरंक्षतोत्थंकांतार्जुनानामथवापिकल्कः ॥

अर्थ—दुधांत लाक्षा व मध घालून प्यावें; तें जिरल्यावर. दुधांत मद्य घालून प्यावें; ह्मणजे तात्काळ क्षतापासून निघणारें रक्त बंद करील; किंवा लोहकांतभस्म अर्जुनवृक्षाच्या सालीचे चूर्णाशीं द्यावें, तें रक्तनाश करील.

मध्वादिपेय.

मध्वाटरूपकरसौयदितुल्यभागौकृत्वानरःपिबतिपुण्यतरःप्रभाते ॥

तद्रक्तपित्तमतिदारुणमप्यवश्यमाशुप्रशाम्यतिजलैरिववन्हिपुंजः ॥

अर्थ—मध व अडुळशाचा रस दोन्ही समभाग करून प्रातःकाळीं जर प्राशन करील, तर दारुण ही रक्तपित्त लवकर शांत होईल. जसें उदक अग्निराशीचा नाश करितें.

मधुकादिकल्क.

कल्कंमधूकत्रिफलार्जुनानांनिशिस्थितंलोहमयेसुपात्रे ॥

साज्यंविलिह्यात्तुपिबेत्सुशीतंसशर्करंछागपयःक्षतार्तः ॥

अर्थ—मधुकाष्ठ, हरडा, बेहडा, आवळकाठी व सादडा यांचा कल्क रात्रीं लोखंडाच्या भांड्यांत ठेंऊन प्रातःकाळीं तूप घालून खावा; व मागून शेळीचें दूध तापवून आंत साकर घालोन प्यावें; ह्मणजे रक्तपित्ताचा नाश होतो.

र्‍हीबेरादिकाढा.

र्‍हीबेरमुत्पलंधान्यंचंदनंयष्टिकामृता ॥ उशीरंचवृषश्चैषांक्काथःसमधुशर्करः ॥ पाययेत्तेनसद्योहिरक्तपित्तंप्रणश्यति ॥ रक्तपित्तंजयत्युग्रंतृष्णादाहंज्वरंतथा ॥

अर्थ—वाळा, कमळ, लोध्र, धने, रक्तचंदन, ज्येष्ठिमध, गुळवेल, काळा वाळा, अडुळसा यांचा काढा मध व साकर घालोन द्यावा; हा उग्र रक्तपित्त, तृषा, दाह, आणि ज्वर यांचा नाश करितो.

पद्मोत्पलादिकाढा.

पद्मोत्पलानांकिंजल्कःपृष्टिपर्णीप्रियंगुका ॥ वासापत्रसमुद्भूतोरसःसमधुशर्करः ॥ क्काथोवाहरतेपीतोरक्तपित्तंसुदारुणं ॥

अर्थ—पद्मे व कमळें यांचे केसर, पिठवण, राळे व अडुळशाचा पाला यांचा स्वरस किंवा काढा प्राशन केला असतां, अत्यंत कठिण ही रक्तपित्ताचा नाश होतो.

इक्ष्वादिकाढा.

इक्षूणांमध्यकांडानिसकंदंनीलमुत्पलं ॥ केसरंपुंडरीकस्यमोचंमधुककपद्मके ॥ वटप्ररोहशुंगाश्चद्राक्षाखर्जूरमेवच ॥ एतानिसमभागानिकपायमुपकल्पयेत् ॥ युपितंमधुसंयुक्तंकपायंशर्करान्वितं ॥ सप्रमेहंरक्तपीत्तंक्षिप्रमेतंनियच्छति ॥

अर्थ—उंसाचीं मधलीं पेरें, कंदासहवर्तमान निळें कमळ, पांढऱ्या कमळाचें केसर, मोचरस, ज्येष्टिमध, पद्मकाष्ट, वडाचे पारंबे, शुंग, द्राक्षें, व खजूर हे समभाग घेऊन त्यांचा

काढा करावा; आणि तो शिळा झाला, ह्मणजे त्यांत मध व साखर घालून घ्यावा; तो प्रमेह व रक्तपित्त यांचा नाश करितो.

चंदनादिकाढा.

चंदनेंद्रयवापाठाकटुकामुदुरालभा ॥ गुडूचीवालकंलोध्रंपि
प्पलीक्षौद्रसंयुतं ॥ कफान्वितंजयेद्रक्तंतृष्णाकासज्वरापहं ॥

अर्थ—चंदन, इंद्रजव, पाहाडमूळ, कुटकी, धमासा, गुळवेल, वाळा, लोध्र व पिंपळी यांचा काढा करून त्यांत मध घालून दिला असतां; तो कफ, रक्तपित्त, तृषा, कास, आणि ज्वर यांचा नाश करितो.

उशीरादिकाढा.

उशीरंचंदनंपाठाद्राक्षामधुकपिप्पली ॥
सक्षौद्रंपाययेत्क्वाथंरक्तपित्तहरंध्रुवं ॥

अर्थ—काळा वाळा, चंदन, पाडळ, द्राक्षे, ज्येष्टमध व पिंपळी यांचा काढा मध घालोन घ्यावा; ह्मणजे शीघ्र रक्तपित्ताचे हरण करितो.

अमृतादिकाढा.

अमृतामधुकंचैवखर्जूरंगजपिप्पली ॥
क्वाथःक्षौद्रयुतोह्येपरक्तपित्तविकारनुत् ॥

अर्थ गुळवेल, ज्येष्टमध, खजूर व गजपिंपळी यांचा काढा मध घालोन घेतला असतां; तो रक्तपित्तसंबंधि विकारांचा नाश करितो.

ऱ्हीवेरादिकाढा

ऱ्हीवेरधान्यकंशुंठीचंदनंमधुयष्टिका ॥ वृषोशीरयुतःक्वाथः
शर्करामधुयोजितः ॥ रक्तपित्तंजयत्युग्रंतृष्णांदाहज्वरंतथा ॥

अर्थ वाळा, धने, सुंठ, चंदन, जेष्टीमध, अडुळसा व काळावाळा यांचा काढा साखर व मध घालोन घ्यावा; ह्मणजे रक्तपित्त, तृषा, ज्वर हे दूर होतात.

मुद्गादिकाढा.

मुद्गाःसलाजाःसयवाःसकृष्णाःसोशीरमुस्ताःसहचंदनेन ॥
बलाजलैःपर्युषितःकषायःसरक्तपित्तंशमयत्युदीर्णं ॥

अर्थ—मूग, लाह्या, सातु, पिंपळी, वाळा, नागरमोथा, चंदन, चिकणा हा पूर्वदिवशीं भिजत घालून दुसरे दिवशीं काढा करून घ्यावा; ह्मणजे रक्तपित्त शांत होतें.

यष्ट्यादिकाढा.

यष्टीमधुसमायुक्तंक्षीरंसंक्वाथ्यशीतलं ॥
शर्करामधुसंमिश्रंरक्तपित्तापहंपिबेत् ॥

अर्थ–जेष्टीमध, दुध यांचा काढा करून थंड झाला; ह्मणजे त्यांत साकर व मध घालोन प्यावा; ह्मणजे तो रक्तपित्ताचा नाश करील.

पलाशकल्क व काढा.

पलाशकल्कःक्वाथोवासुशीतःशर्करान्वितः ॥
पिबेद्वामधुसर्पिर्भ्यांगवाश्वशकृतोरसं ॥

अर्थ–पळसाचीं फुलें वाटून त्यांत साकर घालोन प्यावीं; अथवा त्यांचा काढा करून त्यांत साकर घालोन प्यावा; अथवा गाईचे शेणाचा रस, अथवा घोड्याचे लेंड्याचा रस घालोन त्यांत मध व तूप घालोन प्यावा; ह्मणजे रक्त बंद होतें.

आटरूषादिकाढा.

आटरूषकनिर्यूहःप्रियंगूमृत्तिकांजने ॥
विनीयलोध्रंसक्षौद्रंरक्तपित्तहरंपिबेत् ॥

अर्थ–अडुळशाचा रस, सांने, तुरटी, रसांजन, लोध, यांचा काढा मध घालोन प्यावा; ह्मणजे रक्तपित्तनाश करितो.

वासादिकाढा.

वासाकषायोत्पलमृत्प्रियंगुलोध्रांजनांभोरुहकेसराणि ॥
पीत्वासिताक्षौद्रयुतानिजह्यात्पित्तासृजोवेगमुदीर्णमाशु ॥

अर्थ–अडुळसा, कमळ, तुरटी, सांने, लोध, रसांजन, कमळकेसर यांचा काढा साकर व मध घालून प्यावा; ह्मणजे रक्तपित्तनाश करील.

उशीरादिचूर्ण.

उशीरकालीयकलोध्रपद्मकंप्रियंगुकाकट्फलशंखगैरिकं ॥ पृथक्पृथक्चंदनतुल्यभागिकंसशर्करंतंदुलधावनप्लुतं ॥ सरक्तपित्तंतमकंपिपासांदाहंचपीतंशमयेद्धिसद्यः ॥

अर्थ–वाळा, दारुहळद, लोध, पद्मकाष्ठ, राळें, कायफळ, शंख व गेरू या सर्वांचें समभाग चूर्ण घेऊन ते साकर व तांदुळाचें धुवण यांशीं द्यावें; ह्मणजे रक्तपित्त, तमक, ताहान, आणि दाह, हे शमन होतात.

मृद्विकादिचूर्ण.

मृद्वीकाचंदनंलोध्रंप्रियंगुंचविचूर्णयेत् ॥ चूर्णमेतत्पिबेत्क्षौद्रवासार ससमन्वितं ॥ नासिकामुखपायुभ्योयोनिमेंढ्राच्चवेगतः ॥ रक्तपित्तं स्रवद्धंतिसिद्धयेसप्रयोगराट् ॥ यत्रशस्त्रक्षतेनैवरक्तंस्रवतिवेगतः ॥ न दप्यनेनचूर्णेनतिष्ठत्येवावचूर्णितं ॥ मेढ्रतोतिप्रवृत्तेस्तेवस्तिरुत्तरइष्यते ॥

अर्थ—द्राक्षें, चंदन, लोध्र व कुटकी यांचें चूर्ण करून तें मध व अडुळशाचा रस यांशीं घ्यावें; ह्मणजे नाक, तोंड, शिश्न, गुद व योनि यांपासून जाणारें रक्त, स्रवणारें रक्तपित्त, व्रणापासून निघणारें रक्त, यांला बंद करितें; किंवा शिश्नापासून रक्त वाहूं लागलें असतां, या औषधांचा उत्तर बस्ति करावा; ह्मणजे बंद होतें.

चंदनादिचूर्ण.

चंदनंनलदंलोध्रमुशीरंपद्मकेसरं ॥ नागपुष्पंचबिल्वंचभद्रमुस्तंसश र्करं ॥ ह्रीवेरंचैवपाठाचकुटजोत्पलमेवच ॥ शृंगवेरंसातिविषाधा तकीसरसांजना ॥ आम्रास्थिजंबुसारास्थितथापाचरसोंपच ॥ नी लोत्पलसमंगाच नैलादाडिमत्वचः ॥ चतुर्विंशतिरेतानिसमभा गानिकारयेत् ॥ तंडुलोदकसंयुक्तंमधुनासहयोजयेत् ॥ अतिसारान्त थाछर्दिंस्त्रीणांचापिरजोग्रहं ॥ प्रच्युतानांचगर्भाणांस्थापनंपरमिष्यते ॥ अश्विनोःसंमतोयोगोरक्तपित्तनिबर्हणः ॥

अर्थ—चंदन, जटामांसी, लोध्र, वाळा, कमळाचे केसर, नागकेशर, बेलफळ, भद्रमोथे, साकर, काळा वाळा, पाहाडमूळ, कुडयाच्या बिया, कमळ, सुंठ, अतिविष, धायटीचीं फुलें, रसांजन, आंब्याची कोय, जांबळीची आंठी, पाच, निळें कमळ, मंजिष्ट, एलची, डाळिंबाची साल, हेच वीस पदार्थ समभाग घेऊन चूर्ण करून तांदुळाच्या धुवणाशीं मध घालोन द्यावें; ह्मणजे संपूर्ण अतिसार, वांति, स्त्रियांचा विटाळ यांचा नाश करितें, व हा गर्भस्थापन करणारा आहे. हा योग रक्तपित्तनाशनाविषयीं अश्विनी कुमारांला मान्य आहे.

पत्रकादि चूर्ण.

पत्रत्वगेलानतचंदनानांश्यामाकशुंठीमधुकोत्पलानां ॥ स्यात्धात्रि वासाद्विगुणोत्तराणांचूर्णंसिताक्षौद्रसमन्वितानां ॥ खादेज्ज्वरेलोहि तरक्तपित्तेकासेक्षयेलोहितमूत्रकृच्छ्रे ॥ रक्तेतिनिष्ठीवतिगात्रसादेदा हेचसद्यःस्मृतिविभ्रमेच ॥ देहस्थितेतूर्ध्वगतेचवातेश्वासेसहिक्कास

त्हृदामयेषु ॥ मनोभितापेसततांगतापेयोन्यामयेसप्रदरेचरोगे ॥ र
क्तेतिमात्रंपतितंमुखाभ्यांगुदेथनासामुखमेढ्रयोनौ ॥ रक्तस्यपित्तस्य
विनाशनार्थंसूक्तंचाशिष्टेनमहद्गदघ्नं ॥

अर्थ—तमालपत्र १, दालचिनी ४, एलची ६, तगर ८, चंदन १०, सावे १२, सुंठ १४, ज्येष्ठीमध १६, कमळ १८, आवळकाठी २० व अडुळसा २२, या औषधांचें द्विगुणोत्तर भागाप्रमाणें चूर्ण एकत्र करून तें साकर व मध यांशीं द्यावें; ह्मणजे ज्वर, रक्तपित्त, खोकला, क्षय, रक्तकृच्छ्र, रक्ताची वांति, गात्रें गळतात तीं, स्मृतिनाश, ऊर्ध्ववात, दमा, खोकला, त्हृद्रोग, मनःसंताप, अंगताप, योनिरोग, प्रदररोग, मुख,गुद, नाक, शिश्न व योनि, यांपासून अतिरक्त जातें तें; आणि रक्तपित्त यांचा नाश करितें.

कर्पूरादि चूर्ण.

कर्पूरकंचकंकोलंजातिफलदलंसमं ॥ लवंगंस्यात्समरिचंकृष्णाशुंठी
विवृद्धितः ॥ चूर्णंसमसितंत्हृद्यंदीपनंवान्हिकारकं ॥ रक्तपित्तंप्रतिश्या
यंश्वासंकासमरोचकं ॥ त्हृद्रोगंचजयेच्छीघ्रमिंद्रारिमशनिर्यथा ॥

अर्थ—कापूर, कंकोळ, जायफळ, जायपत्री, लवंगा, मिऱ्यें, पिंपळी व सुंठ हे पदार्थ एकोत्तर वृद्धीनें घेऊन एकत्र करून त्या चूर्णाच्या समान साकर मिळवून द्यावें, तें त्हृद्य दीपन व अग्निकारक आहे; आणि रक्तपित्त, पडसें, दमा, खोकला, अरुचि व त्हृद्रोग यांचा नाश करितें; जसें वज्र इंद्राच्या शत्रूंचा नाश करितें तसें.

वासापुटपाक.

पिष्टानांवृषपत्राणांपुटपाकोरसोहिमः ॥
मधुयुक्तोजयेद्रक्तपित्तकासज्वरक्षयान् ॥

अर्थ—अडुळशाचीं पानें वाटून पुटपाकानें उकडून त्याचा रस काढून थंड जाल्यावर मध घालून द्यावा; ह्मणजे रक्तपित्त, खोकला, ज्वर, क्षय, यांचा नाश करितो.

एलादिगुटी रक्तपित्तादिकांवर.

एलापत्रत्वचोद्राक्षाःपिप्पल्यर्धपलंतथा ॥ शिलामधुकखर्जूरमृद्वीका
श्चपलोन्मिताः॥ संचूर्ण्यमधुनायुक्तांगुटिकांसंप्रकल्पयेत्॥ अक्षमात्रां
ततश्चैकांभक्षयेच्चादिनेतथा ॥ कासश्वासज्वरंहिक्कांछर्दिंमूर्छांमदंभ्रमं ॥
रक्तनिष्ठीवनंतृष्णांपार्श्वशूलमरोचकं ॥ शोषंप्लीहंमूढवातंस्वरभेदंक्षत
क्षयं ॥ गुटिकातर्पणीवृष्यारक्तपित्तंविनाशयेत् ॥

अर्थ—एलची, तमालपत्र, दालचिनी, द्राक्षें व पिंपळी हीं प्रत्येकीं दोन दोन तोळे;

शिलाजित, ज्येष्ठिमध, खजूर व द्राक्षें, हीं प्रत्येकी चार चार तोळे एकत्र चूर्ण करून मधाशीं गोळी कर्षाची करावी; त्यांतून एक दररोज खात जावी; ह्मणजे खोकला, श्वास, ज्वर, उचकी, वांति, मूर्छा, उन्मत्तता, भ्रम, तोंडांतून रक्त पडतें तें; दाहान, पार्श्वशूल, अरुचि, शोष, प्लीहा, मूढवात, स्वरभंग, क्षतक्षय, आणि रक्तपित्त, यांचा नाश करिते. व वृष्य, आणि तृप्ति देणारी अशी आहे.

हरीतक्यादिनस्य.

हरीतकीदाडिमपुष्पदूर्वालाक्षारसोनस्यविधानयोगात् ॥
निवारयत्येवचिरप्रवृत्तमप्याशुनासांतरशोणितौघम् ॥

अर्थ—हिरडा, डाळिंबीचें फूल, दूर्वांचा रस नांकांत घातला; ह्मणजे फार दिवस पडणारें जें नांकांतील रक्त तें बंद होईल.

मस्तकलेप.

नासाप्रवृत्तंरुधिरंघृतभ्रष्टंश्लक्ष्णंपिष्टमामलकं ॥
सेतुरिवरुधिरवेगंरुणद्धिमूर्ध्निप्रलेपतः ॥

अर्थ—आवळकाठी तुपावर भाजून तिचें बारीक चूर्ण करून मस्तकावर लेप करावा; ह्मणजे तो लेप नाकांतून रक्तपित्तानें रक्तस्राव होतो; त्याला बंद करितो.

कल्क व घृत.

शीतलामलककल्केनशतधौतघृतेनच ॥
मुंडयित्वाशिरोलेपःकरणीयःपुनःपुनः ॥

अर्थ—थंड अवळ्यांचा कल्क व शतधौत घृत यांचा मस्तकाचें मुंडन करून त्यावर थंड लेप वारंवार करावा.

नस्य.

नस्यंदाडिमपुष्पोत्थंरसोदूर्वाभवोथवा ॥ निवारयत्येवचिरंप्रवृत्तमित्या
शुनासांतरशोणितौघं ॥ आम्रास्थिजपलांडोर्वानसिकास्राचिरक्तजित् ॥
नासाप्रवृत्तेरुधिरेजलनस्यंप्रशस्यते ॥

अर्थ—डाळिंबाच्या फुलांच्या रसाचें; किंवा दूर्वांच्या रसाचें; अथवा आंब्याच्या कोइचें; अथवा कांद्याचा रसाचें किंवा पाण्याचें; नस्य द्यावें; ह्मणजे नासिकेंतून रक्तस्राव होतो, त्याला बंद करितें.

दुसरा प्रकार.

भृंगीगृहंतुक्षीरेणनारीणांनावनाज्जयेत् ॥

लोहंखदिरसारेणनासिकारक्तनाशनं ॥

अर्थ—कुमारीगाभीचें घर स्त्रियांचें दुधांत उगाळून नस्य करावें, व लोहभस्म आणि कात एकत्र मिळवून नस्य करावें; ह्मणजे रक्त बंद होतें.

आर्द्रकादिनस्य.

शृंगगैरिकयोःकल्कंधातक्यामधुकस्यच ॥
घ्राणस्रुतेसृजिप्रोक्तंयोपित्क्षीरेणनावनं ॥

अर्थ—आलें, तुरटी, धायटीचें फुल, जेष्ठीमध इतक्यांचें चूर्ण स्त्रियांचे दुधांत घालोन नस्य करावें; ह्मणजे नाकांतून पडणारें रक्त बंद होतें.

हरीतक्यादि नस्य.

अभयादाडिमीपुष्पंलांगलीपिष्टमंभसा ॥ नस्यतोहंतिनासा यारक्तस्रावमतिस्रुतं ॥ त्रिदिनंशर्कराक्षीरप्लुतंगोधूमचूर्णकं ॥ नासारक्तंवारयतिवेगतोवहमानकं ॥

अर्थ—हरीतकी, डाळिंबाचीं फुलें, कळलावी, हीं पाण्यांत वाटून त्यांचें नस्य करावें; किंवा साकर व दूध घालोन गव्हाचे पीठ खावें; ह्मणजे नासिकेंतून वाहणाऱ्या रक्ताच्या नाश होतो.

कूष्मांडकावलेह.

खंडकामलकेभ्यस्तुरसःप्रस्थद्वयोन्मितः ॥ खंडकूष्मांडमेकैकंसंस्वि द्यरसमाहरेत् ॥ अन्यत्रखंडकूष्मांडेसंमतःसकलोरसः ॥ पंचाशच्चपलं स्विन्नंकूष्मांडात्प्रस्थमाज्यतः ॥ पक्त्वापलशतंखंडंवासाक्काथाढकेपचे त् ॥ शिवाधात्रीफलंभार्गीत्रिसुगंधैश्चकार्षिकैः ॥ तालीसविश्वधान्याक मरिचैश्चपलांशकैः ॥ पिप्पलीकुडवंचैवमधुनासंप्रदापयेत् ॥ कासंश्वा संज्वरंहिक्कांरक्तपित्तंहलीमकं ॥ हृद्रोगमम्लपित्तंचपीनसंचव्यपोहति ॥

अर्थ—साकर व आवळ्यांचा रस प्रत्येकीं १२८ तोळे व कोहळ्याचे तुकडे वाफून त्यांचा रस २०० तोळे, तूप ६४ तोळे, शिजलेले कोहळ्याचे तुकडे ४०० तोळे, अडुळशाचा रस २५६ तोळे, काढयांत पचन करून दाट झाल्यावर हरीतकी, आवळकाठी, भारंगमूळ, तज, तमालपत्र व एलची हीं प्रत्येकीं तोळा तोळा व तालीसपत्र, सुंठ, धने व मिरीं, हीं प्रत्येकीं चार चार तोळे, आणि पिंपळी १६ तोळे व मध ३२ तोळे घालोन ठेवावा, त्यांतून अग्निबल पाहून द्यावा; ह्मणजे खोकला, दमा, ज्वर, उचकी, रक्तपित्त, हलीमक, हृद्रोग, आम्लपित्त, आणि पडसें यांचा नाश करितो.

दुसरा प्रकार.

पुराणंपीनमानीयकूष्मांडस्यफलंदृढं ॥ तद्बीजाधारवीजत्वक्शिराशून्यंचकारयेत् ॥ ततस्तस्यचखंडानिपचेज्जलतुलाद्वये ॥ तस्मिन्नीरार्धशिष्टेतुयत्नतःशीतलीकृतं ॥ तानिकूष्मांडखंडानिपीडयेत्दृढवाससा ॥ यत्नतस्तज्जलंनीत्वापुनःपाकायधारयेत् ॥ कूष्मांडंशोषयेद्धर्मेताम्रपात्रेततःक्षिपेत् ॥ क्षिप्त्वातत्रघृतप्रस्थंकूष्मांडंतेनभर्जयेत् ॥ मधुवर्णंतदालोक्यतज्जलंतत्रनिःक्षिपेत् ॥ सितायाश्चतुलांतत्रक्षिप्त्वातल्लेहवत्पचेत् ॥ सुपक्वेपिप्पलीशुंठीजीराणांद्विपलेपृथक् ॥ पृथक्पलार्धंधान्याकपत्रैलामरिचत्वचा ॥ चूर्णमेषांक्षिपेत्तत्रघृतार्धंक्षौद्रमाहरेत् ॥ क्षौद्राधिकासिताकेचित्क्षौद्रात्केचित्सितार्धकं ॥ द्राक्षार्धानिलवंगानिकर्षंकर्पूरकंक्षिपेत् ॥ तद्यथाग्निवलंखादेद्रक्तपित्तक्षतक्षयी ॥ कासश्वासीततश्छर्दितृष्णाज्वरनिपीडितः ॥ वृष्यंपुनर्नवकरंवलवर्णप्रसादनं ॥ उरःसंधानकरणंवृंहणंस्वरवोधनं ॥ अश्विभ्यांनिर्मितंश्रेष्ठंकूष्मांडकरसायनं ॥

अर्थ—जून व पुराणें कूष्मांडफळ घेऊन त्याची साल, बिया व गर इत्यादि काढून त्याचे तुकडे करावे, ते ८०० तोळे पाण्यांत अर्धें पाणी आटे तो शिजवून खाली उतरून गार झाल्यावर ते तुकडे वस्त्रांत बांधून पिळावे. तें पाणी पुनः चुलीवर ठेऊन तो कोहळयाचा चोथा सुकवून ६४ तोळे तूप टाकून त्यावर परतून लाल झाला ह्मणजे त्यापाण्यांत टाकून त्यात साकर ४०० तोळे घालोन त्याचा पाक करावा. तो पाक लेहासारिखा झाला ह्मणजे त्यांत पिंपळी, सुंठ व जिरे; हीं प्रत्येकीं ८ तोळे; व धने, तमालपत्र, एलची, मिरा, दालचिनी यांचे चूर्ण दोन दोन तोळें; व मध ३२ तोळे घालोन त्यांत साकर कोणाच्या मतें मधाहून जासती, कोणांच्या मते मधाहून निमी साकर या प्रमाणें घालावी, व १६ तोळे द्राक्षें, लवंग व कापूर एक तोळा घालावें; आणि घृतभांडात भरून ठेवावे. हें कूष्मांडकरसायन अग्निवळ पाहून द्यावे. तें रक्तपित्त, क्षतक्षय, खोकला, दमा, ओकारी, ताहान व ज्वर यांवर द्यावें. हें वृष्य व तारुण्यकारक, वल, वर्ण यानां करणारें, उरःक्षताचे संधान करणार, पौष्टिक, आणि स्वर चांगला करणारें आहे, हे अश्विनीकुमारानीं उत्पन्न केलं.

तिसरा प्रकार.

पुराणंपीनमानीयकूष्मांडस्यफलंदृढं ॥ तद्बीजाधारवीजत्वक्शिराशून्यंचकारयेत् ॥ ततोतिसूक्ष्मखंडानिकृत्वातस्यतुलांपचेत् ॥ गोदुग्ध

स्यतुलायुग्मेमंदाग्नौचालयेच्छनैः ॥ शर्करायास्तुलार्धंचगोघृतंप्रस्थ मात्रकं ॥ प्रस्थार्धंमाक्षिकंचापिकुडवंनारिकेरतः ॥ प्रियालफलम ज्जानांद्विपलंत्रिखुरीपलं ॥ क्षिपेदेकत्रविपचेल्लेहयेत्साधुसाधयेत् ॥ भिषग्भिपक्वत्वमालोक्यज्वलनादवतारयेत् ॥ काष्ठौषध्यःक्षिपेदेषां चूर्णतानिवदाम्यहं ॥ एकोक्षःशतपुष्पायाअथजीरोयवानिका ॥ गो क्षुरःक्षुरकःपथ्याकापिकच्छूफलानिच ॥ सप्तमीत्वक्सर्वेषामेषामक्षयु गंपृथक् ॥ धान्यकंपिप्पलीमुस्तमश्वगंधाशतावरी ॥ तालमूली नागवलावालकंपत्रकंशठी ॥ जातीफलंलवंगंचसूक्ष्मैलाबृहदेलि कान् ॥ शृंगाटकंपर्पटकंसर्वंपलमितंपृथक् ॥ चंदनंनागरंधात्रीफ लंचापिकसेरुकं ॥ प्रत्येकंपंचकर्षाणिचोत्तार्यैतानिनिःक्षिपेत् ॥ पल द्वयमुशीरस्यपलान्यष्टौवणानिच ॥ कूष्मांडस्यावलेहोयंभक्षितःपल मात्रकः ॥ किंवायथावन्हिबलंभुंजन्रोगान्विनाशयेत् ॥ रक्तपित्तंशी तपित्तमाम्लपित्तमरोचकं॥ वान्हिमांद्यंसदाहंचतृष्णाप्रदरमेवच ॥ र क्तार्शोपित्तजिच्छर्दिपांडुरोगंचकामलां ॥ उपदंशंविसर्पंचजीर्णंचवि षमज्वरं ॥ लेहोयंपरमोवृष्योबृंहणोबलवर्धनः ॥ स्थापनीयोविशेषे णभाजनेमृन्मयेनवे ॥

अर्थ—जून व पुष्ट कोहळयाचें फळ घेऊन सोलून बीज व गर इत्यादि काढून त्याचे फार बारीक तुकडे करावे. ते ४०० तोळे घेऊन ८०० तोळे दुधांत मंदाग्नी-ने चाळवून चाळवून शिजवावे. दाट होऊं लागले ह्मणजे साकर २०० तोळे, गाईचें तूप ६४ तोळे, मध ३२ तोळे, नारळ १६ तोळे, चारोळ्या ८ तोळे, व गोखरू ४ तोळे, एकत्र करून दाट चाटण्याजोगा झाला ह्मणजे उतरून त्यांत शेपू १ तोळा, व जिरें, ओंवा, गोखरू, तालिमखाना, हरीतकी, कवासकुहिरी, दालचिनी, हीं प्रत्येकीं दोन दोन तोळे; व धने, पिंपळी, नागरमोथा, अश्वगंध, शतावरी, तालमूली, नागबला, वाळा, पत्रज, कचोरा, जायफळ, लवंग, एलची बारकी व मोठी, शिंगाडे, पित्तपापडा, हीं प्रत्येकीं चार चार तोळे; व चंदन, सुंठ, आवळकाठी, नाकेशर, हीं प्रत्येकीं पांच पांच तोळे; वाळा दोन तोळे, व निरों ८ तोळे, याचीं चूर्णे तें खालीं उतरून मग टाकावीं; हा कूष्मांडकावलेह, चार तोळे भक्षण करावा. किंवा अग्निबल पाहून जास्त कमी द्यावा; ह्मणजे रक्तपित्त, शीतपित्त, आम्लपित्त, अरुचि, अग्निमांद्य, दाह, तृष्णा, प्रदर, रक्तार्श, पित्तजवांति, पांडुरोग, कावीळ, उपदंश, विसर्प, जीर्णज्वर, व विषमज्वर यांचा

नाश करितो, हा लेह अत्यंत वृष्य, पौष्टिक व बळ वाढविणारा असा आहे. हा मातीच्या कोऱ्या भांड्यांत घालून ठेवावा.

चौथा प्रकार.

कूष्मांडकस्यस्वरसंपलानांशतमात्रकं ॥ रसतुल्यंगवांक्षीरंधात्र्याश्चूर्णं पदाष्टकं ॥ मृद्वग्निनापचेत्तावद्यावद्भवतिपिंडवत् ॥ धात्रीतुल्यासिताय़ोज्यापलार्धंलेहयेदनु ॥ खंडकूष्मांडकंह्येतद्भुक्तमभ्यासतोहरेत् ॥ रक्तपित्तंह्यम्लपित्तंदाहंतृष्णांचकामलां ॥

अर्थ—कोहळ्याचा स्वरस ४०० तोळे, गाईचें दूध ४०० तोळे, आणि आवळकाठी-चें चूर्ण ३२ तोळे हीं सर्व मंदाग्नीवर पचन करून गोळा झाला; ह्मणजे त्यांत साकर ३२ तोळे घालून त्यांतून दोन तोळे भक्षण करीत जावा. हा खंडकूष्मांडलेह अभ्यासानें भक्षण केला असतां, रक्तपित्त, आम्लपित्त, दाह, तृषा, आणि कावीळ, यांचा नाश करितो

वासाखंड.

तुलामादायवासायाःपचेदष्टगुणेजले ॥ तेनपादावशेषेणपाचयेदाढकंभिषक् ॥ चूर्णानामभयानांतुखंडंशतपलंतथा ॥ शीतीभूतेतस्मिन्दध्यात्क्षौद्रस्याष्टौपलानिच ॥ वंशोद्भवाचचत्वारिपिप्पलीद्विपलंतथा ॥ चातुर्जातंपलंत्वेकंचूर्णितंतत्रदापयेत् ॥ रक्तपित्तंनिहंत्याशुकासश्वासंक्षतक्षयं ॥ विद्रधिंजाठरंगुल्मंतृष्णाल्हद्रोगपीनसान् ॥ पलार्धंभोजनंचास्ययथेष्टंतत्रभोजनं ॥

अर्थ—अडुळसा ४०० तोळे घेऊन ३२०० तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करून त्यांत हरीतकीचूर्ण १०२४ तोळे व खडिसाकर ४०० तोळे घालून पचन करून थंड झाल्यावर ३२ तोळे मध १६ तोळे वंशलोचन ८ तोळे पिंपळी, आणि चातुर्जात ४ तोळे या सर्वांचे चूर्ण करून त्यांत घालावें; आणि त्यांतून दोन तोळे हा वासाखंड घेत जावा; ह्मणजे रक्तपित्त, खोकला, दमा, क्षतक्षय, विद्रधि, उदर, गुल्म, तृषा, हृद्रोग व पीनस यांचा नाश करितो. यांवर यथेष्ट भोजन करावें.

उशीरासव रक्तपित्तादिकांवर.

उशीरंवालकंपद्मंकाश्मरीनीलमुत्पलं ॥ प्रियंगुपद्मकंलोध्रंमंजिष्ठाधन्वयासकः ॥ पाठाकिराततिक्तंचन्यग्रोधोदुंबरंसठी ॥ पर्पटंपुंडरीकंचपटोलंकोचनारकं ॥ जंबूशाल्मलिनिर्यासंप्रत्येकंपलसंमितान् ॥

भागान्सुचूर्णितान्कृत्वाद्राक्षायाःपलविंशतिः ॥ धातकींषोडशपलां जलद्रोणद्वयेक्षिपेत् ॥ शर्करायास्तुलांदत्वाक्षौद्रस्यैकतुलांतथा ॥ मासंचस्थापयेन्भांडेमांसीमरिचधूपिते ॥ उशीरासवइत्येषरक्तपित्तनिवारणः ॥ पांडुकुष्टप्रमेहार्शःकृमिकोशापहस्तथा ॥

अर्थ—वाळा, नेत्रवाळा, तांबडें कमळ, शिवण, निळें कमळ, वाघांटीचें मूळ अथवा राळे, पद्मकाष्ठ, लोध्र, मंजिष्ठ, धमासा, पाहाडमूळ, किराइत, कडुकी, वडाची साल, उंबराची साल, कचोरा, पित्तपापडा, पांढरें कमळ, आणि पटोल, कांचनवृक्षाची साल, जांभळीची साल, सांवरीचा डिंक, हीं वेवीस औषधें पळ पळ प्रमाण व द्राक्षें २० पळें, धायटीची फुलें १६ पळें घेऊन साऱ्यांचें चूर्ण करून दोन द्रोण प्रमाण पाणी घेऊन त्यांत तें चूर्ण व साकर एक तुळा प्रमाण मडक्यांत घालून जटामांसी व मिऱ्यें यांची धुरी देऊन त्यांत तीं सारीं औषधें घालून मडक्याचे तोंडाला मुद्रा देऊन एक महिना ठेऊन नंतर मुद्रा काढावी. याला उशीरासव ह्मणतात. हा आसव पोटांत घ्यावा. येणेंकरून रक्तपित्त, पांडुरोग, कुष्ट, परमा, मुळव्याध, जंतविकार, शोष, हे रोग दूर होतात.

वमन.

मुस्तेंद्रयवयष्ट्याव्हमदनाव्हंपयोमधु ॥
शिशिरंवमनंयोज्यंरक्तपित्तहरंपरं ॥

अर्थ—नागरमोथे, इंद्रजव, जेष्ठीमध, गेळफळ, दूध व मध हीं थंड गार करून वमन द्यावें; ह्मणजे तें रक्तपित्तनाशक आहे.

यष्ट्यादि वमन.

यष्टीमधुकसंयुक्तंसक्षौद्रंवमनंहितं ॥

अर्थ—जेष्ठीमध व मध यांचेंच वमन हितकारक आहे.

आरग्वधादि रेचन.

आरग्वधेनधात्र्यावात्रिवृतापथ्ययाथवा ॥
विरेचनंप्रयोक्तव्यंशर्करामाक्षिकोत्तरं ॥

अर्थ—बाहावा व आंवळकाठी, अथवा तेड व हिरडा, यांचा काढा करून त्यांत मध साखर घालून घ्यावा; ह्मणजे रेच होऊन रक्तपित्त बंद होतें.

विरेचन.

द्राक्षामधुककाश्मर्यःसितायुक्तंविरेचनं ॥

अर्थ—रक्तपित्तावर द्राक्षें, जेष्ठीमध, शिवण इतकीं औषधे साकरेबरोबर विरेचनार्थ द्यावीं.

आपतर्पण.

जलंखर्जूरमृद्वीकामधूकैःसपरूषकैः ॥
शृतंजलंप्रयोक्तव्यंतर्पणायसशर्करं ॥

अर्थ—वाळा, खजूर द्राक्षें, जेष्ठीमध, फालसा या औषधांच्या काढ्यांत साकर घालून द्यावा.

दुसरा प्रकार.

तर्पणंसघृतक्षौद्रंलाजाचूर्णैःप्रदापयेत् ॥
ऊर्ध्वगेरक्तपित्तेतत्कालेदेयंपिपासिने ॥

अर्थ—लाह्यांचे चूर्ण करून त्यांत तूप व मध हें एकत्र करून ऊर्ध्वगरक्तपित्तामध्यें तृषा लागल्यास प्राशनार्थ द्यावें.

पारावतशकृल्लेह.

सक्षौद्रंग्रंथितेरक्तेलिह्यात्पारावतंशकृत् ॥

अर्थ—शरीरांत रक्ताच्या गांठी वळल्या असतां, मधाबरोबर पारव्याची विष्ठा खावी.

केशरलेह.

अतिनिःसृतरक्तोवाक्षौद्रेणरुधिरंपिबेत् ॥

अर्थ—ज्याच्या अंगातून फार रक्त गेले त्याणें मधाबरोबर केशर खावें.

खदिरादिलेह.

खदिरस्यप्रियंगूनांकोविदारस्यशाल्मलेः ॥
पुष्पचूर्णानिमधुनालिह्याद्वारक्तपित्तनुत् ॥

अर्थ—खैर, राळे, कोरळ, सांवरी यांचे फुलांचें चूर्ण मधाबरोबर चाटावें; ह्मणजे रक्तपित्त दूर होते.

उदुंबरादिलेह.

पक्वोदुंबरकाश्मर्यपथ्याखर्जूरगोस्तनीः ॥
मधुनाघ्नंतिसंलीढारक्तपित्तंपृथक्पृथक् ॥

अर्थ—पिकलेलें उंबराचें फळ, शिवणीचें फळ, हिरडा, खजूर, मनका यांतून कोणतें एक फळ मधाबरोबर खाल्लें असतां, रक्तपित्तनाशक आहे.

खंडकाद्यवलेह.

शतावरीमुंडितकाबलामृतापलंत्वचःपुष्करमूलभार्ङ्गी ॥ वृषोवृहत्यौ

खदिरस्यमूलीपृथक्पृथक्पंचपलानिमात्रा ॥ पक्वंजलेद्रोणमितेष्ट
मांशंयावद्भवेच्छेपमथैवपूतं ॥ निमूर्छितस्यापिनिधायधीमान्पलानि
चद्वादशमाक्षिकस्य ॥ तथासुवर्णस्यचलोहजस्यविंद्याद्वितंखंडघृत
स्यतुल्यं ॥ देयंपलंपोडशकंविधिज्ञोविपाचयेल्लोहमयेकटाहे ॥ गुडे
नतुल्यंचयदाभवेत्तदातुगाविडंगंमगधाचशुंठी॥द्वेजीरकेकर्कटकंफल
त्रिकंधान्यंमरीचंसकणासकेसरं ॥ पलेनमात्राविदधीततत्पृथक्सुघ
ट्टितंचूर्णमिदंघृतेन ॥स्निग्धेकटाहेप्रणिधाययुंज्यात्कर्पप्रमाणंविदधीत
चूर्णं ॥ प्रभातकालेचसदुग्धपानंगुरूणिचान्नानिचभोजनानि ॥ रक्तं
सपित्तंसहसानिहंतिरक्तप्रवाहंचसरक्तशूलं ॥ रक्तातिसारंरुधिरप्रमेहं
तथैववस्तौविहितंनराणां ॥ भगंदरार्शःश्वयथुंनिहंतितथाम्लपित्तंकिल
राजरोगं ॥ विशेपतःकुष्ठयुजश्चगुल्मान्बलप्रदंवृष्यतमंप्रदिष्टं ॥ वा
तरक्तंप्रमेहंचशीतपित्तंवमिंकमीन् ॥ श्वयथुंपांडुरोगंचकुष्ठंप्लीहोदरंत
था ॥ आनाहोमूत्रसंस्रावमम्लपित्तंनिहंतिच ॥ चक्षुष्यंबृंहणंवृष्यंमांग
ल्यंप्रीतिवर्धनं ॥ आरोग्यपुत्रदंश्रेष्ठंकामाग्निबलवर्धनं ॥ श्रीकरं
लाघवकरंखंडकाद्यंप्रकीर्तितं ॥ छागंपारावतंमांसंतित्तिरंककराशशं ॥
कुरंगाःकृष्णसाराश्चमांसमेषांप्रयोजयेत् ॥ नारिकेलपयःपानंसुनिप
ण्णकवास्तुकं ॥ शुष्कमूलकजीवाख्यंपटोलंबृहतीफलं ॥ फलंवार्ता
कपक्काम्रंखर्जूरंस्वादुदाडिमं ॥ ककारपूर्वकंपंचमांसंचानूपसंभवं ॥
वर्जनीयंविशेपेणखंडकाद्यंसमश्नता ॥

अर्थ—शतावरी, मुंडितका, चिकणा व गुळवेल हीं ४ तोळे; व दालचीनी, पोखर-मूळ, भारंगमूळ, अडुळसा, रिंगणी, डोरली, खादिरमूळ, हीं प्रत्येकी ३० तोळे घेऊन त्यांचा १०२४ तोळे पाण्यांत अष्टमांश काढा करून गाळून घ्यावा, त्यांत ४८ तोळे स्वर्णमाक्षिकभस्म, ४८ तोळे सुवर्णभस्म, ४८ तोळे लोहभस्म, आणि साकर व तूप ६४ तोळे अशीं सर्व एकत्र करून त्यांचा लोहकढईंत पाक करावा. तो गुळा-सारिखा पाक झाला; ह्मणजे त्यांत वंशलोचन, वावडिंग, पिंपळी, सुंठ, जिरे, शाहाजिरे, कांकडीचें बी, हरडा, बेहडा, आंवळकाठी, धने, मिरीं,. पिंपळी, नाकेशर, हीं प्रत्येकीं चार चार तोळे घालोन संपूर्ण एकत्र करून तो खंडकाद्यवलेह स्निग्धभांड्यात ठेवावा, त्यांतून एक तोळा घ्यावा. वर दूध घ्यावें; आणि जडान्न भोजन करावें; ह्मणजे

रक्तपित्त, रक्तप्रवाह, रक्तशूल, रक्तातिसार, रक्तमेह, भगंदर, कुष्ठव्याध, सूज, आम्लपित्त, क्षय, कोड, गुल्म, वातरक्त, प्रमेह, शीतपित्त, वांति, कृमि, पांडुरोग, प्लीहा, उदर, आनाह, मूत्रकृच्छ्र, यां सर्वांचा नाश करितो, आणि चक्षुष्य, पौष्टिक, मांगल्य, प्रीति वाढवणारें, आरोग्य व पुत्र देणारें व काम, अग्नि, बल, श्री व लाघव, यांतें करितें. यावर बकरा, पारवा, तित्तिर, खेंकडे, ससा, हरण, काळवीट, यांचें मांस भक्षण करावें; आणि नारळ, दूध, कुरडु, चाकवत, सुखे मुळे, जीवंती, पडवळ, वांगें, वेलवांगें, पिके आंबे, खजूर, गोडें डाळिंब, ककारादि पांच जलस्थलजगंतूंचीं मांसें, हे पदार्थ खंडकाद्यवलेहभक्षण करणारानें विशेषें करून वर्ज करावें.

रक्तपित्तकुठाररस.

शुद्धपारदबलिप्रवालकंहेममाक्षिकभुजंगरंगकं ॥ मारितंसकलमेतदुत्तमं भावयेच्चविततंद्रवैस्त्रिशः ॥ चंदनस्यकमलस्यमालतीकोरकस्यवृषपल्लवस्यच ॥ धान्यवारणकणाशतावरीशाल्मलीवटजटामृतस्यच ॥ रक्तपित्तकुलकंडनाभिधोजायतेरसवरोस्रपित्तिनां ॥ प्राणदोमधुवृपद्रवैरयंसेवितस्तुवसुकृष्णलोमतः ॥ नास्त्यनेनसममत्रभूतलेभेषजंकिमपिरक्तपित्तिनां ॥

अर्थ—शुद्ध पारा, गंधक, प्रवाल, सुवर्णमाक्षिक, नाग, कथील, यांचीं भस्में समभाग एकत्र करून नंतर चंदन, कमळ, मोगरीचीं फुलें, अडुळसा, धने, गजपिंपळी, शतावरी, सांवर, वडाचे पारंबे, गुळवेल, या प्रत्येकांच्या रसाच्या तीन भावना द्याव्या. हा रक्तपित्तकुलकुठार रस एक मासा अडुळशाचा रस व मध यांशीं द्यावा; ह्मणजे रक्तपित्ताचा नाश करितो.

वासासुत.

आटरूपनवपल्लवद्रवंपालिकारसकभस्मवल्लकं ॥
कर्षसंमितमधुप्रयोजितंप्राश्यमश्यतिचरक्तपित्तकं ॥

अर्थ—अडुळशाच्या कोंवळ्या पान्याचा रस चार तोळे व पाऱ्याचें भस्म, एकत्र करून त्यांत मध घालून एक तोळा द्यावा; ह्मणजे रक्तपित्ताचा नाश होतो.

बोलपर्पटीरस.

सूतगंधकसुकज्जलिकायाःपर्पटीसमयुतासमभागं ॥ बोलचूर्णविहितंप्रतिवाप्यंस्याद्रसोयमसृगामयहारी ॥ वल्लयुग्मयुगलंप्रतिदेयंशर्करामधुयुतःकिलदत्तः ॥ रक्तपित्तगुदजस्रुतियोनिस्रावमाशुविनिवारयतीशः ॥

अर्थ-पारा व गंधक, यांची कज्जली, आणि बोळाचें चूर्ण हीं एकत्र करून तें लोह

पात्रांत तापवून गोमयावर केळीचें पान ठेवून त्यावर ओतून त्यावर केळीचें पान व शेण घालावें; ह्मणजे ही रक्तरोगनाश करणारी बोलपर्पटी होत्ये, ही दोन वाल साकर व मध यांशीं द्यावी; ह्मणजे रक्तपित्त, मुळव्याध, रक्तस्राव व योनिस्राव, यांचा नाश करित्ये.

सुधानिधिरस.

गंधंसूतंमाक्षिकंलोहचूर्णंसर्वंघृष्टंत्रैफलेनोदकेन ॥
लोहेपात्रेगोलिकासाचकृत्वारात्रौदद्याद्रक्तपित्तप्रशांत्यै ॥

अर्थ—गंधक, पारा, स्वर्णमाक्षिक व लोह हे सर्व समभाग घेऊन त्यांचा त्रिफळ्या-च्या काढ्यांत लोखंडाच्या भाड्यांत खल करून त्याची गोळी करावी, ती रक्तपित्त-नाशार्थ रात्रौं द्यावी.

आटरूषाद्यर्क.

आटरूपकमृद्वीकापथ्यार्कश्वसशर्करः ॥ वृषार्कोवासमधुकोरक्तपित्त निवारणः ॥ लोध्रप्रियंगुमृद्वीकाचंदनार्कोरसान्वितः ॥ वासायाःक्षौद्रसंयुक्तऊर्ध्वाधोरक्तपित्तहृत् ॥ अर्कोदाडिमपुष्पोत्थोमृद्वीकासंभवोपिवा ॥ पानात्तस्यहरेन्नासारक्तमाम्रास्थिजोपिवा ॥

अर्थ-अडुळसा, द्राक्षे व हरीतकी यांच्या अर्कांत साकर घालून द्यावा; किंवा अडुळ-सा व मधुकाष्ठ, यांचा अर्क द्यावा; किंवा लोध्र, राळे, द्राक्षे व चंदन यांच्या अर्कांत अडुळशाचा रस व मध घालोन द्यावा; अथवा डाळिंबाचीं फुलें व द्राक्षे यांचा अर्क द्यावा; किंवा आंब्याच्या कोईचा अर्क द्यावा; ह्मणजे वातरक्त नाश पावतें.

शतावरीघृत.

शतावरीदाडिमतिंतिडीकंकाकोलिकंवामधुकंविदारीं ॥ पिष्ट्वाचमूलं फलपूरकस्यपचेद्घृतंक्षीरचतुर्गुणंतत् ॥ कासज्वरोन्मादविबंधशूलं तद्रक्तपित्तंविविधंनिहंति ॥

अर्थ-शतावरी, डाळिंब, चिंच, कंकोळ, ज्येष्ठीमध, भुयकोहळा, आणि महाळुं-गाचें पंचांग घेऊन त्याचा कल्क करून त्यांत चौपट दूध घालोन त्यांत तूप सिद्ध करावें. तें खोकला, ज्वर, उन्माद, मलबद्धता, शूल, आणि अनेकप्रकारचें रक्तपित्त यांचा नाश करितें.

दूर्वादितैल.

दूर्वामधुकमंजिष्ठाद्राक्षेक्षुरसचंदनैः ॥ सारिवाघननकाव्हैस्तैलप्रस्थं

विपाचयेत् ॥ क्षीरंचतुर्गुणंदत्वासिद्धमभ्यंजनेहितं ॥ रक्तपित्तहरंह्येतद्बल्यंवातघ्नमुत्तमं ॥ दूर्वातैलमितिख्यातंसुवर्णकरणंमहत् ॥

अर्थ–दूर्वा, ज्येष्टीमध, मंजिष्टा, द्राक्षें, उसांचा रस, चंदन, पांढरी उपळसरी, नागरमोथा व हळद हीं समभाग घेऊन त्यांचे काढ्यांत ६४ तोळे गोडें तेल पचन करावें. त्यांत दूध चौपट घालोन कढऊन सिद्ध झालें, तें अंगाला लावण्यास हितकर आहे. हें रक्तपित्ताचा नाश करितें, व बळ देतें. हें उत्तम वातनाशक आहे. हें दूर्वातैल अंगकांति चांगली करितें.

दुसरा प्रकार.

दूर्वाभव्यफलंमाषकुलित्थौवंशपत्रिका ॥ जलस्थलोद्भवौकर्णमोचकौखरमंजरी ॥ दंडोत्पलस्यमूलंतुनिःक्वाथ्याष्टगुणेंभसि ॥ तत्पादशेषितंतैलंतुल्यंकृत्वाविपाचयेत् ॥ तत्तैलंप्रतिघर्षेणआनाहाख्यंगदंजयेत् ॥

अर्थ–दूर्वा, नीवाचें फळ, उडीद, कुळिथ, वंशजातिगवत, जलामध्यें व स्थलामध्यें होणारी मोचा, आघाडा व सहदेवीची मुळ हीं सर्व समभाग घेऊन औषधांचे आठपट पाणी टेऊन चतुर्थांश काढा उरवावा; आणि तो तितकेंच तेल घालून पुनः पचवावा. या तैलानें अभ्यंग केलें असतां, आनाहाख्य रोगाला दूर करितें.

रक्तपित्ताला पथ्य.

अधोगतेछर्दनमूर्ध्वनिर्गमेविरेचनंस्यादुभयत्रलंघनं ॥ पुरातनाःषष्टिकशालिकोद्रवाःप्रियंगुनीवारयवप्रसाधकाः ॥ मुद्गामसूराश्चणकास्तुवर्यौनकुष्टकाश्चाढकीवार्मिमत्स्याः ॥ शशःकपोतोहरिणैणलावःशरारिपारावतवर्तिकश्च ॥ वकाडरभ्रश्चसकालपुच्छाःकपिंजलाश्चापिकपायवर्गाः ॥ गवामजायाश्चपयोघृतंचघृतंमहिष्याःपनसंप्रियालं ॥ रंभाफलंकांचनतंदुलीयपटोलवेत्राग्रमहार्द्रकाणि ॥ पुराणकूष्मांडफलंचपथ्यंतालानितद्वीजजलानिवासा ॥ स्वादूनिचिल्लानिचदाडिमानिखर्जूरधात्रीमिशिनारिकेरं ॥ कसेरुशृंगाटकपौष्कराणिकपित्थशालूकपरूषकानि ॥ भूनिंवशाकंपिचुमंदपत्रंतुंबीकलिंगानिचलाजसक्तु ॥ द्राक्षासितामाक्षिकमिक्षवश्चशीतोदकंचोद्भिदवारिचापि ॥ सेकावगाहःशतधौतमर्पिरभ्यंगयोगःशिशिरःप्रदेशः ॥ हिमानिलश्चंदनमिंदु

पादाःकथाविचित्राश्चमनोनुकूलाः ॥ धाराग्रहंभूमिगृहंसुशीतंवैडू
र्यमुक्तामणिधारणंच ॥ रक्तोत्पलांभोरुहपत्रशय्याक्षौमांबरंचोपवनं
सुशीतं ॥ प्रियंगुकाचंदनरूषिकांतामालिंगितंचापिवरांगनानां ॥
पद्माकराणांसरितोद्गतानांचंद्रोदयानांहिमशीकराणां ॥ सुशीतलानां
गिरिनिर्झराणामतिप्रशस्तानिचकीर्तनानि ॥ प्रतीरनीरंहिमवालु
कानिमित्रंनृणांशोणितपित्तरोगे ॥

अर्थ—अधोगत रक्तपित्त झालें असतां, वमन द्यावें; व ऊर्ध्वगत झालें असतां, रेचक द्यावें; आणि दाहो मार्गांनीं जात असतां, लंघन करवावें; आणि जुने साटकी भाताचे तांदूळ, सावे, वर्या, यव, देवभात, मूग, मसुरा, चणे, तुरी व रानमूग हीं धान्यें; व गंडजाति व शूर्पाकार असे मत्स्य; आणि ससा, कवडा, हरिण, कृष्णसार, लावे, बगळा, पारवा, वनचटक, चक, मेंढा, भेकर, कपिंजलपक्षी व तुरटवर्ग; आणि गाईचें व शेळीचें तूप, दूध, आणि म्हशीचें तूप, पनस, चारोळी, केळें, कांचन, तांदुळजा, पडवळ, वेत्राग्र, मोठें आलें, जुना कोहळा, ताडफळ, ताडी, अडुळसा, गोड चिलीची भाजी, डाळिंब, खजूर, आवळकाठी, बडीशेप, नारळ, कचरा, शिंगाडे, पुष्करमूळ, कवीट, पद्मकंद, फालसा, किराईत, शाक, कडलिंबाची पानें, पांढरा भोपळा, कुडा, लाह्या, सातु, द्राक्षें, साकर, मध, ऊस, थंड पाणी, झऱ्याचें पाणी, जलाचें सिंचन, पाण्यांत बुड्या मारणे, शतधौतघृताचें अभ्यंग, शीतळ उटणें, थंड वारा, चंदन, चांदणें, विचित्र व मनाला चांगल्या अनकूल अशा गोष्टी, जलधारागृह, शीतळ भुयार वैडूर्य, मोत्य व रत्नें यांचें धारण; तांबडें कमळ, कमळपत्रांचा बिछाना, रेशमाचें वस्त्र, शीतळ बाग, सांवे, चंदनर्चीचतस्त्रियांचें आलिंगन, कमळें फुललेलीं तळें किंवा नदी; चंद्रोदय, चांदणें, शीतळझऱ्याचें पाणी, तीराचें पाणी व थंड वाळवंट, हीं रक्तपित्तरोगावर पथ्यकारक आहेत.

रक्तपित्तीं अपथ्य.

व्यायामाध्वनिषेवणंरविकरास्तीक्ष्णानिकर्माणिचस्रोतोवेगविधा
रणंचपलताहस्त्यश्वपानानिच ॥ स्वेदांबुप्रतिधूमपानसुरतक्रो
धःखलुस्याद्गुडोवार्ताकीतिलमाषसर्षपदधिक्षीराणिकौपंपयः ॥
ःतांबूलंललदंबुमद्यलशुनंशिंबीविरुद्धाशनंकट्वम्लंलवणंविदा
हिचगणस्त्याज्योस्रापित्तेनृणां ॥

अर्थ—व्यायाम, मार्गचालणें, सूर्यकिरण, उग्रकर्म, मलमूत्रादिवेगाचें धारण, चपलता, हत्ती व घोडे यांवर बसणें, घाम काढणें, धूमपान, मैथुन, क्रोध, वांगें, तीळ, उडीद,

मोहऱ्या, दहीं, दूध, विहिरीचें पाणी, तांबूल, सांचलेलें पाणी, मद्य, लसूण, शिंबीधान्य, दिवाशयन, तिखट, आंबट, मीठ व विदाहिगण हे पदार्थ रक्तपित्तीमनुष्यानें टाकावे.

क्षयावर कर्मविपाक.

ब्रह्महाक्षयरोगीस्यात्क्षयीस्यात्क्षेत्रमारणे ॥

अर्थ–ब्रह्महत्या, किंवा क्षेत्र, बाग, स्त्रिया इत्यादिकांचा नाश केला असतां, क्षयरोग होतो.

कदलीदान.

कारयेत्कदलींदिव्यांपत्रैःसर्वत्रसंयुतां ॥ फलपूगेनसंयुक्तांसुवर्णस्यपलेनतु ॥ यथाविभवतःकुर्याद्वस्त्रेणावेष्टयसूत्रकैः ॥ ब्राह्मणान्भोजयेच्चापिभक्षैर्नानाविधैःशुभैः ॥ होमंचकारयेत्तत्रपूर्ववद्ब्राह्मणेनच ॥ तस्मैतांकदलींदद्याद्वस्त्रालंकारपूर्विकां ॥ पूजितायदरिद्रायव्रतस्थायात्मवेदिने ॥ धर्मज्ञायातिदांतायमंत्रेणानेनतांक्षयी ॥ हिरण्यगर्भपुरुषपरात्परजगन्मय ॥ रंभादानेनदेवेशक्षयंक्षपयमेप्रभो ॥ पुण्याहवाचनंकार्यंब्राह्मणैर्वेदपारगैः ॥ शिष्टैरिष्टैर्बंधुभिश्चसहभोजनमाचरेत् ॥

अर्थ–क्षयरोग्याने–द्रव्यानुसार सुवर्णाची फलपत्रानीं युक्त कदली करून तिला वस्त्र गुंडाळून सूत्राने वेष्टन करावी. व नानाप्रकारची पक्वान्नें करून ब्राह्मणास भोजन घालावें, होम करावा; नंतर अलंकारपूर्वक ती केळ. दरिद्री, व्रतस्थ, आत्मज्ञ, धर्मज्ञ, व शांत अशा ब्राह्मणास पुढें लिहिलेल्या हिरण्यगर्भ इत्यादि मंत्राने पूजा करून दान द्यावी; पुण्याहवाचन करावें; नंतर उत्तम ब्राह्मण, इष्ट, बंधु, यांचे पंक्तीस भोजन करावें.

ब्रह्मचर्यादियोग.

ब्रह्मशास्त्राण्यविज्ञायप्रायश्चित्तंददातियः ॥ राजयक्ष्माभवेत्तस्यरोगोपीडातिदारुणा ॥ पूर्वोक्तेनविधानेनप्रदद्यात्प्रतिरूपकं ॥ राजयक्ष्माकृशतनुःशंखोपासिततर्जनिः ॥ दधात्त्रिनेत्रोदंष्ट्राभ्यांदष्टोहंहेतुमुद्यतः ॥

अर्थ–जो धर्मशास्त्र जाणल्यावांचून प्रायश्चित्त देतो, त्याला राजयक्ष्मा होतो. त्याची पीडा कठीण होते. त्याणे पूर्वीं सांगितलेल्या विधानाने क्षयरोगाची कृश, तर्जनीने शंख धरणारी, त्रिनेत्र, दाढानीं चावणारी व तारण्याकरितां येणारी अशी मूर्ति करून दान द्यावी

ज्योतिशास्त्राभिप्राय.

ब्रह्मचर्येणदानेनतपसादेवतार्चनैः ॥ सत्येनाचारयोगेनरविमंडलसे

वया ॥ वैद्यविप्रार्चनाच्चैवरोगराजोनिवर्तते ॥

अर्थ—ब्रह्मचर्य, दान, तप, देवपूजा, सत्य, आचारयोग, सूर्याची सेवा, वैद्य व ब्राह्मण यांची पूजा या योगानें क्षयरोग नाश पावतो.

दुसरा प्रकार.

कुष्ठकंडुविकारैश्चक्षयरोगभगंदरैः ॥

गजादिवाहनभयंभवेद्यइनगेबुधे ॥

अर्थ—जन्मकाळीं सूर्यक्षेत्रीं किंवा सूर्यसंयोगानें बुधग्रह पडेल; तर कुष्ठ, कंडु, क्षय भगंदर, किंवा गजादिक वाहनापासून भय प्राप्त होईल.

देवपूजादियोग.

चंद्रक्षेत्रेयदाचांद्रिर्जायतेयस्यजन्मनि ॥

सजातःक्षयरोगीस्यात्कुष्ठादीनिचपांडुता ॥

अर्थ—जन्मकाळीं चंद्र क्षेत्रामध्यें जर बुधाचा योग असेल; तर त्या लग्नावर उत्पन्न झालेला प्राणी क्षयरोगी होईल; किंवा कुष्ठ, पांडु, इत्यादिक रोग होतील.

शास्त्रार्थ.

नित्यंस्वदेवपूजाभक्तिर्भिषज्यदेवतागुरुषु ॥

छागरूमांसपयोश्नन्जीवतियक्ष्मीचिरंधृतिमान् ॥

अर्थ—नित्य देवाची पूजा व औषध, देवता; आणि गुरु, यांची भक्ति; आणि बकऱ्याचें मांस व दूध यांचें भक्षण या उपायानीं क्षयरोगी चिरकाल वाचतो.

उपद्रवान्स्वरवैकृतादीन्जयेद्यथाक्षिप्रसमीक्ष्यशास्त्रं ॥

त्यजेत्कुवैद्यंप्रतिपादितानिबुद्धेर्विरुद्धानिचभेषजानि ॥

अर्थ—क्षणामध्यें जा विकृति होतात, त्या शास्त्रांत सांगितल्या मार्गानें कुशल वैद्याकडून जिंकाव्या. कुवैद्याचें औषध घेऊं नये, व समजल्यावरविरुद्ध औषधें सेवन करूं नयेत.

गीतादिउपाय.

गीतवादित्रइष्टैश्चप्रियस्तुतिभिरेवच ॥

हर्षणाश्वासनैर्नित्यैर्गुरूणांसमुपासनैः ॥

अर्थ—गीत, वाद्य, इष्टपदार्थ, प्रिय अशा स्तुति, आणि आनंददायक पदार्थ, आश्वासनवाक्य, व नित्य गुरूंची उपासना, या उपायांनीं क्षय जिंकावा.

राजयक्ष्माक्षयनिदान.

वेगरोधात्क्षयाच्चैवसाहसाद्विषमाशनात् ॥
त्रिदोषोजायतेयक्ष्मागदोहेतुचतुष्टयात् ॥

अर्थ—वातादिकांचा व मलमूत्राचा वेगरोध, रसादि धातुक्षय, साहसकर्म, आणि विषप्राशन या चार कारणानीं त्रिदोषात्मक, क्षय (राजयक्ष्मा) व्याधि उत्पन्न होतो.

अनुलोम व प्रतिलोम क्षयाची संप्राप्ती.

कफप्रधानैर्दोषैस्तुरुद्धेषुरसवर्त्मसु ॥ अतिव्यवायिनोवापिक्षीणेरेत स्यनंतराः ॥ क्षीयंतेधातवःसर्वेततःशुष्यतिमानवः ॥ राज्ञश्चंद्रमसो यस्मादभूदेषकिलामयः ॥ तस्मात्तंराजयक्ष्मेतिकेचिदाहुर्मनीषिणः ॥

अर्थ—कफप्रधान वातादिदोषानीं रसवाहिनी सर्व शिरा रुद्ध जाहाल्या असतां, सर्व रस जागचे जागीं आटतात; नंतर अनुक्रमें करून रस, रक्त, मांस, इत्यादि सप्तधातु क्षीण होतात. हा अनुलोमक्षय जाणावा; आणि अतिमैथुन करणाऱ्या पुरुषाचें वीर्य, क्षीण जालें असतां वायूचा कोप होतो; आणि तत्समीपस्थ मज्जादि विलोमसर्वधातु क्षीण होतात, त्यामुळें मनुष्य शुष्क होतो. हा रोग औषधीचा राजा जो चंद्रमा त्यासही झाला, यास्तव याला राजयक्ष्मा ह्मणतात.

पूर्वरूप.

श्वासांगसादकफसंस्रवतालुशोषवम्यग्निसादमदपीनसकासनिद्राः ॥
शोषेभविष्यतिभवंतिसचापिजंतुःशुक्लेक्षणोभवतिमांसपरोरिरंसुः ॥
स्वप्नेषुकाकशुकशल्लकिनीलकंठगृध्रास्तथैवकपयःकृकलासकाश्च ॥
तंवाहयंतिसनदीर्विजलाश्चपश्येत्शुष्कांस्तरून्पवनधूमदवार्दितांश्च॥

अर्थ—श्वास, अंगग्लानि, तालुशोष, कफाचा स्राव, ओकारी, अग्निमांद्य, मद, पडसें, खोकला व निद्रा इत्यादिक क्षय उत्पन्न होण्यापूर्वीं लक्षणें होतात. रोग्याचे डोळ्यास पांढरेपणा, मांस भक्षणाची इच्छा, स्त्रीसहवर्तमान क्रीडेची इच्छा इत्यादि होतात; आणि स्वप्नामध्ये काक, शुक, साळशिंदरी, मयूर, गीध, वानर, व सर्डा इत्यादिकांवर बसलो आहें असे पाहतो. व नद्या शुष्क झाल्या, अरण्यांत शतावधी शुष्क वृक्ष दावाग्नीनें जळतात, व वायू आणि धूम ईहीं करून व्याप्त, आणि भोजनकाळीं अन्नांत केश व तृणें पडलीं आहेत असें स्वप्नांत पाहतो. इत्यादिक राजयक्ष्म्याचीं पूर्वरूपें जाणावीं.

क्षयाचें सामान्य त्रिरूपलक्षण.

अंसपार्श्वाभिसंतापःसंतापःकरपादयोः ॥
ज्वरःसर्वांगगश्चैवलक्षणंराजयक्ष्मणः ॥

अर्थ—अंस व पार्श्व यांचा संताप, व हातपायांची आग, आणि सर्वांगाला ज्वर हें राजयक्ष्माचें लक्षण जाणावें.

एकादशरूप, षड्रूप, आणि त्रिरूप क्षयाचें कारण.

स्वरभेदोनिलाच्छूलंसंकोचश्चांसपार्श्वयोः ॥ ज्वरोदाहोतिसारश्चपित्ताद्रक्तस्यचागमः ॥ शिरसःपरिपूर्णत्वमभक्तच्छंदएवच ॥ कासःकंठस्यचध्वंसोविज्ञेयःकफकोपतः ॥ एकादशभिरेतैर्वापड्भिर्वापिसमन्वितं ॥ कासातिसारपार्श्वार्तिस्वरभेदारुचिज्वरैः ॥ त्रिभिर्वापीडितंलिंगैर्ज्वरकासासृगामयैः ॥ जह्याच्छेपार्दितंजंतुमिच्छन्सुविपुलंयशः ॥

अर्थ—त्रिदोषोत्पन्नक्षयरोगामध्यें वातप्रधान असेल, तर स्वरभेद, खांदे आणि बरगडया यांत शूल व आंत ओढून धरल्या सारिखी पीडा होत्ये, व पित्ताधिकामध्ये ज्वर, दाह, अतिसार, आणि तोंडांतून रक्त पडणें इत्यादिक लक्षणें हातात; आणि कफाधिकामध्यें मस्तकाला जडत्व, अन्नद्वेष, खोकला, आणि स्वरभेद हीं लक्षणें होतात; या सर्व अकरा लक्षणानीं; अथवा खोकला, अतिसार, पार्श्वशूल, स्वरभेद, अरुचि, आणि ज्वर या साहा लक्षणानीं; किंवा ज्वर, खोकला, आणि रक्तविकार ह्या तीन लक्षणानीं युक्त जो क्षयरोगी तो यश इच्छिणाऱ्या वैद्यानें टाकावा.

पुनःअसाध्यलक्षण.

सर्वैरर्धैस्त्रिभिर्वापिलिंगैर्मांसबलक्षयैः ॥ युक्तोवर्ज्यश्चिकित्स्यैस्तुसर्वरूपस्ततोन्यथा ॥ महाशनंक्षीयमाणंअतीसारनिपीडितं ॥ शूनमुष्कोदरंचैवयक्ष्मिणंपरिवर्जयेत् ॥

अर्थ—ज्याचा मांस आणि बल यांचा क्षय झाला, आणि एकादश लक्षण, अथवा षड् लक्षण, अथवा त्रिलक्षण युक्त जो क्षयरोगी तो असाध्य जाणावा; आणि जो पुष्कळ अन्न खात असून क्षीण होणारा, अतिसारानें पिडित आणि ज्याचे उदरास व वृषणास सूज, असा क्षयरोगी वैद्यानें सोडावा.

साध्यलक्षण.

ज्वरानुबंधरहितंबलवंतंक्रियासहं ॥
उपक्रमेदात्मवंतंदीप्providedाग्निमकृशंनरं ॥

अर्थ–ज्या रोग्याला ज्वर नसून बलवान, चिकित्सा सहन करणारा, विचारवान, व ज्याचा अग्नी प्रदीप्त, आणि केवळ कृश नव्हे अशा रोग्याला उपचार करावे.

असाध्यलक्षण.

शुक्लाक्षमन्नद्वेष्टारंऊर्ध्वश्वासनिपीडितं ॥
कृच्छ्रेणबहुमेहंतंयक्ष्माहंतिचमानवं ॥

अर्थ–ज्या रोग्याचे नेत्र शुक्लवर्ण, अन्न द्वेष करणारा, ऊर्ध्व श्वासी, आणि कष्टानें फार मुतणारा, अशा रोग्याला क्षय मारितो.

क्षयहारकपदार्थ.

वृंताककारवेल्लंचतैलंबिल्वंचराजिकां ॥
मैथुनंचदिवानिद्रांक्षयीकोपंविवर्जयेत् ॥

अर्थ–वांगें, कारलें, तेल, बेलफळ, मोहऱ्या, मैथुन, दिवसास झोंप इतकीं क्षयी मनुष्यानें वर्ज करावीं.

सधान्ययवगोधूमामुद्गाश्चापिसदाहिताः ॥
स्त्रियश्चतुष्पदेश्रेष्ठाःपुमांसोविहगामताः ॥

अर्थ–धने, सातु, गहूं, मूग चार पायांचे जनावरामध्यें स्त्री जाती; आणि पक्षांत पुरुष जाती हे क्षयरोग्यास हितकारक आहेत.

छागंमांसंपयश्छागंसर्पिश्छागंसशर्करं ॥
छागोपसेवासततंछागमध्येतुयक्ष्मनुत् ॥

अर्थ–शेळीचें मांस, दूध, तूप साकर सहित, शेळ्यांची सेवा, व त्यांत बसणें, हें सर्व क्षयरोगनाशक आहे.

गीतवादित्रशब्दैश्चप्रियस्तुतिभिरेवच ॥ हर्षणाश्वासनैर्नित्यंगुरूणां समुपासनैः ॥ ब्रह्मचर्येणदानेनतपसादेवतार्चनैः ॥सत्येनाचारयोगेन रविमंडलसेवया ॥ वैद्यविप्रार्चनाच्चैवरोगराजोनिवर्तते ॥

अर्थ–गीत, वाद्य, घोष, प्रियस्तुति, हर्ष, आश्वासन, गुरुसेवा, ब्रह्मचर्य, दान, तप, देवतार्चन, सत्य, आचार, सूर्याची सेवा, वैद्य व ब्राह्मण यांची सेवा व पूजा केली; ह्मणजे राजयक्ष्मा निवृत्त होतो.

षडंगयूष.

द्रव्यतोद्विगुणंमांसंसर्वतोष्टगुणंजलं ॥
पादस्थंसंस्कृतंचाज्यंषडंगोयूषउच्यते ॥

अर्थ—औषधांपेक्षां मांस दुप्पट घ्यावें, व सर्वांच्या आठपट पाणी घालावें. चतुर्थांश आटल्यावर तूप घालावें; याला षडंग. यूष ह्मणतात.

ज्वरदाहीं क्रिया.

ज्वराणांशमनीयोयःपूर्वमुक्तोक्रियाविधिः ॥
क्षयिणांज्वरदाहेपुसमसर्वोपिप्रशस्यते ॥

अर्थ—जो पूर्वी ज्वरांच्या शमनार्थ क्रियेचा प्रकार सांगीतला, तो संपूर्ण क्षयामध्यें ज्वर व दाह इत्यादिकांवर योजावा.

वर्खभक्षणाचें माहात्म्य.

नवनीतसितामधुप्रयुक्तोवर्खोहेमभवःक्षयंक्षिणोति ॥
वितथःप्रभवेदयंप्रयोगोयदितन्मेशपथःसदाशिवस्य ॥

अर्थ—लोणी, खडीसाकर, मध, यांशीं सोन्याचा वर्ख सेवन केला असतां, क्षयाचा क्षय होतो. मी माझा उपास्य जो सदाशिव त्याचीच शपथ वाहून सांगतों कीं; हा प्रयोग कधीं व्यर्थ होणार नाहीं.

च्यवनप्राश्यावलेह.

पाटलारणिकाश्मर्यविल्वारलुकगोक्षुराः॥पर्ण्यौवृहत्यौपिप्पल्यःशृंगी द्राक्षामृताभयाः ॥ बलाभूम्यामलीवासाऋद्धिर्जीवंतिकासठी ॥ जीवकर्षभकोमुस्तंपौष्करंकाकनासिका॥ मुद्गपर्णीमापपर्णीविदारीचपुनर्नवा ॥ कांकोल्यौकमलंमेदेसूक्ष्मैलागरुचंदनं ॥ एकैकंपलसंमानं स्थूलचूर्णितमौषधं ॥ एकीकृत्यवृहत्पात्रेपंचामलशतानिच॥ पचेत् द्रोणजलेक्षिप्त्वाग्राह्यमष्टांशशेपितं॥ ततस्तुतान्यामलानिनिष्कुलीकृत्यवाससा ॥ दृढहस्तेनसंमर्द्यक्षिप्त्वातत्रततोघृतं ॥ पलसप्तमितंतोयं किंचित्भृष्ट्वाल्पवन्हिना॥ ततस्तत्रक्षिपेत्क्वाथंखंडंचार्धपलोन्मितं ॥ लेहवत्साधयित्वाचचूर्णानीमानिदापयेत् ॥ पिप्पलीद्विपलाज्ञेयातुगाक्षीरीचतुःपला॥ प्रत्येकंचात्रिशाणाःस्युस्त्वगेलापत्रकेशराः॥ ततस्त्वकीकृतेतस्मिन्क्षिपेत्क्षौद्रंचपट्पलं॥ इत्येवंच्यवनप्रोक्तंच्यवनप्राश्यसंज्ञिकं ॥ लेहंवन्हिबलंदृष्ट्वाखादेत्क्षीणोरसायनं॥ बालवृद्धक्षतक्षीणा नारीक्षीणाश्चशोषिणः ॥ हृद्रोगिणःस्वरक्षीणायेनरास्तेपुयुज्यते ॥

द्राक्षायष्टीशर्करापिप्पलीनांचत्वार्येतत्क्षौद्रयुक्तंक्षयेस्यात् ॥

अर्थ—वेलदोडे, तमालपत्र, नागकेशर, लवंग, यांचा एक भाग; खजूर दोन भाग, मनुका, जेष्टीमध, साकर, पिंपळी, यांचे भाग चार सर्व एकत्र करून चूर्ण करावें, आणि मधाबराबर खावें. हें क्षयावर प्रशस्त आहे.

अश्वगंधाचूर्ण.

अश्वगंधादशपलंतदर्धंनागरान्वितं ॥ तदर्धंकणसंयुक्तंमरीचंचचतुर्थकं ॥ चातुर्जातंवरांगंचभांर्गीतालीसपत्रकं ॥ कचोराजाजिकैटर्यमांसीकंकोलमुस्तकं ॥ रास्नाकटुकरोहिण्याजीवंतीकुष्ठकंतथा ॥ प्रायःकर्षमितंचूर्णंचूर्णेनसमशर्करा ॥ प्रातःकालेत्विदंचूर्णंजलेनोष्णेनसेवयेत् ॥ वातपित्तक्षयेचैवअजागोघृतसंयुतं ॥ श्लेष्मक्षयेक्षौद्रयुक्तंनवनीतेनमेहजित् ॥ शिरोभ्रमणपित्तार्तेगोक्षुरेणसमन्वितं ॥ क्षतक्षीणंचदेहंचविशेषबलवर्धनं ॥ मेदोदरंचमंदाग्निंकुक्षिशूलोदरापहं ॥ अनुपानविशेषेणसर्वरोगहरंपरं ॥

अर्थ—अश्वगंध चाळीस तोळे, सुंठ वीस तोळे, पिंपळी दाहा तोळे, मिर्‍ये चार तोळे व चातुर्जात, जाडी दालचिनी, भारंगमूळ, तालीसपत्र, कचोरा, ओंवा, कायफळ, जटामांसी, कंकोळ, नागरमोथे, रास्ना, कुटकी, जीवंती, कुष्ठ, हीं एकेक तोळा घेऊन चूर्ण करावीं. व सर्व चूर्णांबरोबर साकर घालावी. हें चूर्ण प्रातःकाळीं ऊन पाण्याशीं खावें. व वातक्षय, पितक्षय, यांवर शेळीच्या किंवा गाईच्या तुपाशीं खावें; व कफक्षयावर मधाशीं, मेहावर लोण्याशीं, शिरोभ्रमण व पितव्याधि यांवर गोखरूशीं खावें; हे विशेषानें क्षतक्षीण व क्षीणदेह, यांचें बलाची वृद्धि करितें; व मेद, उदर, मंदाग्नि, कुक्षिशूल, उदर, यांचा व सर्व रोगांचा नाश करितें.

द्राक्षादिचूर्ण.

द्राक्षालाजसितोपलंसमधुकंखर्जूरगोपीतुगाल्हीबेरामलकाब्दचंदननतंकंकोलजातीफलं ॥ चातुर्जातकणासधान्यकमिदंचूर्णंसमंशर्कराप्रातर्भक्षितमात्मकेनविधिनापित्तंसदाहंजयेत् ॥ मूर्छाछर्दिमरोचकंचशमयेत्कायस्यकांतिप्रदंपांडुकामिलरक्तपित्तमुदरंदाहज्वरारोचकं ॥ यक्ष्माणंरुधिरप्रमेहहरणंतयोनिदोषापहंरक्तार्शांत्रविवृध्दिविद्रधिहरंद्राक्षादिचूर्णोत्तमं ॥

अर्थ–द्राक्षे, लाक्षा, खडीसाकर, ज्येष्टीमध, खजूर, उपलसरी, वंशलोचन, वाळा, आवळकाठी, नागरमोथे, चंदन, तगर, ककोळ, जायफळ, दालचिनी, तमालपत्र, एलची, नागकेसर, पिंपळी व धनें, हीं समभाग व या सर्वांचें बरोबर साकर घालून हें चूर्ण प्रातःकाळीं सेवन केले असतां, पित्त, पित्तदाह, मूर्छा, ओकारी व अरुचि यांतें शमवितें; व शरीराला कांति देतें; आणि पांडु, कावीळ, रक्तपित्त, उदर, दाह, अरुचि, राजयक्ष्मा, रक्तमेह, योनिदोष, रक्तार्श, अंत्रवृध्दि, विद्रधि, यांचा नाश करितें. हें द्राक्षादि चूर्ण सर्वचूर्णांत उत्तम आहे.

यवादिचूर्ण.

यवगोधूमचूर्णंवाक्षीरसिद्धंघृतप्लुतं ॥
तत्कृत्वासर्पिषाक्षौद्रसिताकंक्षयशांतये ॥

अर्थ–यव व गहूं यांचें चूर्ण दुधांत शिजवून त्यांत तूप, मध व साकर घालून घ्यावें; ह्मणजे क्षयरोग शांत होतो.

कर्पूरादिचूर्ण.

कर्पूरंचोचकंकोलजातीफलदलैःसमैः॥ लवंगमांसीमरिचैःकृष्णाशुंठीविवर्धितैः ॥ चूर्णंसितासमंहृद्यंसदाहक्षयकासजित् ॥ वैवर्ण्यपीनसश्वासछर्दिकंठामयापहं॥ प्रयुक्तंचानुपानैर्वाभिषजद्वेषिणांहितं ॥

अर्थ–कापूर, दालचिनी, कंकोळ, जायफळ, पत्री, हीं समभाग व लवंगा १ जटामांसी, २ मिरीं, ३ पिंपळी, ४ सुंठ, ५ भाग याप्रमाणें घेऊन चूर्ण करून चूर्णा-बरोबर साकर घालून खावें. तें हितावह आहे, व दाह, क्षय, कास, वैवर्ण्य, पीनस, दमा, ओकारी व कंठरोग यावर अनुपानाशीं खावें. हें औषधाचा द्वेष करण्याऱ्या रोग्याला हितावह आहे.

त्रिकट्वादिचूर्ण.

त्रिकटुत्रिफलैलाभिर्जातिफललवंगकैः॥ नवभागोन्मितैरेतैःसमंतीक्ष्णंमृतंभवेत् ॥ संचूर्ण्यालोडयेत्क्षौद्रेनित्यंयःसेवतेनरः ॥ कासंश्वासंक्षयंमेहंपांडुरोगंभगंदरं ॥ ज्वरंमंदानलंशोथंसंमोहंग्रहणींजयेत् ॥

अर्थ–त्रिकटु, त्रिफला, वेलदोडे, जायफळ, लवंगा, यांच्या चूर्णांबरोबर पोलाद-भस्म घेऊन एकत्र करून दररोज मधाबरोबर खावें; ह्मणजे कास, श्वास, क्षय, मेह, पांडुरोग, भगंदर, ज्वर, मंदाग्नि, सूज, मोह, संग्रहणी, यांचा नाश करील.

शंखपोटलीरस.

रसंगंधंकंवोभंसितमपिकापर्दभासितंमरीचंभूचंद्रांवुधिरस

सहस्रांशुलविकं ॥ रसांद्र्यंशंटंकसकलमपिचूर्णीकृतामि
दंक्रमाषावन्निष्कंघृतसहितमयात्क्षयहरं ॥

अर्थ—पारा १, गंधक १, शंखभस्म ४, कवडीचें भस्म ६, मिरें १२ व टाकणखाराची लाही दीड. या भागाप्रमाणें यांचें बारीक चूर्ण करून नित्य गुंजारें मासाभर तुपाशीं भक्षावें; ह्मणजे क्षयाचें निवारण होतें.

शिलाजतुयोग.

फलत्रिकक्कायविशुद्धमादौसिद्धंगुडूच्यादशमूलसिद्धम् ॥
स्थिरादिकाकोल्यिगादिसिद्धंशिलाजतुस्यात्क्षयिपुप्रशस्तं ॥

अर्थ—हिरडा, बेहडा, आवळकाठी, यांचे काढ्यांत शिलाजीत बारीक करून पुरचुंडी बांधून शिजवून शुद्ध करून नंतर गुळवेलीचा काढा, दशमूलांचा काढा, स्थिरादि काढा कांकोल्यादि काढा यांच्या भावना देऊन सिद्ध केलेला शिलाजीत क्षयावर प्रशस्त. आहे.

पिप्पल्यासव क्षयादिकांवर.

पिप्पलींमरिचंचव्यंहरिद्राचित्रकोघनः ॥ विडंगंक्रमुकोलोध्रःपाठा
धात्र्यैलवालुकं ॥ उशीरंचंदनंकुष्ठंलवंगंतगरंतथा ॥ मांसीत्वगेला
पत्रंचप्रियंगुर्नागकेशरं ॥ एषामर्धपलान्भागान्सूक्ष्मचूर्णीकृतान्शुभा
न् ॥ जलद्रोणद्वयेक्षिह्वादद्यात्गुडतुलात्रयं ॥ पलानिदशधातक्या
द्राक्षापष्टिपलाभवेत् ॥ एतान्येकत्रसंयोज्यमृद्भांडेचविनिःक्षिपेत् ॥
ज्ञात्वागतरसंसर्वंपाययेदग्न्यपेक्षया ॥ क्षयंगुल्मोदरंकार्श्यंग्रहणींपां
डुतांतथा ॥ अर्शांसिनाशयेच्छीघ्रंपिप्पल्याद्यासवस्त्वयं ॥

अर्थ—पिंपळी, मिरें, चवक, हळद, चित्रक, नागरमोथे, वावडिंग, सुपारी, लोध्र, पाहाडमूळ, आवळकाठी, एलवालुक, पांढरा चंदन, कोष्ठ, लवंगा, तगर, जटामांसी, दाळचिनी, विलायची, तमालपत्र, वाघाटीचें मूळ, अथवा राळे, नागकेशर, हीं बेवीस औषधें पळ पळ प्रमाण घेऊन बारीक चूर्ण करून दोन द्रोण प्रमाण पाणी घेऊन त्यांत तें चूर्ण टाकून गूळ तीन तुला प्रमाण घेऊन त्यांत घालावा; व धायटीचीं फुलें दाहापळें, द्राक्षें साठ पळें, हीं दोन्हीं बारीक करून त्यांत मेळवून मडक्यांत घालून त्याचे तोंडाला मुद्रा देऊन मास पक्ष ठेऊन त्या औषधांचा चांगला रस जाला असें जाणून नंतर मुद्रा काढावी. याला पिप्पल्यासव ह्मणतात. हा आसव शक्तितारतम्य पाहून पोटांत द्यावा. येणेंकरून क्षयरोग, गुल्म, उदररोग, शरीराची कृशता, संग्रहणी, पांडुरोग व मूळव्याध हे रोग लवकर दूर होतात.

कृष्णाद्यवलेह.

कृष्णाद्राक्षासितालेहःक्षयहाक्षौद्रतैलवान् ॥
मधुसर्पिर्युतोवाश्वगंधाकृष्णासितोद्भवः ॥

अर्थ—पिंपळी, मनुका, साकर, मध व शिरसाचें तेल यांचा लेह क्षयनाशक आहे; व मध, आस्कंद, पिंपळी, साकर यांचा ही लेह क्षयनाशक आहे.

रास्नादिचूर्ण.

रास्नाकर्पूरतालीसभेकपर्णीशिलाजतु ॥ त्रिकटुत्रिफलामुस्ताविडंग
दहनाःसमाः ॥ चतुर्दशायसोभागास्तच्चूर्णमधुसर्पिषा ॥ लीढंकासं
ज्वरंश्वासंराजयक्ष्माणमेवच ॥ बलवर्णाग्निपुष्टिंचवर्धनंदोषनाशनं ॥

अर्थ—रास्ना, कापूर, तालीसपत्र, मंजिष्ठ, शिलाजित, त्रिकटु, त्रिफला, नागरमोथा, वावडिंग व चित्रक हीं सर्व समभाग आणि लोहभस्म १४ भाग, याप्रमाणें घेऊन सर्व एकत्र करून मध, तुपाबरोबर शक्तिप्रमाणें चाटावें: म्हणजे तें श्वास, कास, ज्वर, राजयक्ष्मा, यांचा नाश करितें. व बल, वर्ण, अग्नि यांना वाढवितें; व दोषांचा नाश करितें.

अगस्त्यहरीतकी क्षयादिकांवर.

हरीतकीशतंभद्रयवानामाढकंतथा ॥ पलानिदशमूलस्यविंशतिश्चनि
योजयेत् ॥ चित्रकःपिप्पलीमूलमपामार्गःशठीतथा ॥ कपिकच्छूःशं
खपुष्पीभार्गीचगजपिप्पली ॥ बलापुष्करमूलंचपृथक्द्विपलमात्रया ॥
पचेत्पंचाढकेनीरेयवैःस्विन्नैःशृतंनयेत् ॥ तत्राभयाशतंदद्यात्क्वाथेत
स्मिन्विचक्षणः ॥ सर्पिस्तैलाष्टपलकंक्षिपेत्गुडतुलांतथा ॥ पक्त्वाले
हत्वमानीयसिद्धेशीतेपृथक्पृथक् ॥ क्षौद्रंचपिप्पलीचूर्णदद्यात्कुडवमा
त्रया ॥ हरीतकीद्वयंखादेत्तेनलेहेननित्यशः ॥ क्षयंकासंज्वरंश्वासंहि
क्काशोरुचिपीनसान् ॥ ग्रहणीनाशयेदेषवलीपलितनाशनः ॥ बलवर्ण
करःपुंसामवलेहोरसायनः ॥ विहितोगस्त्यमुनिनासर्वरोगप्रणाशनः ॥

अर्थ—जव एक आढक प्रमाण वजन घेऊन थोडे कुटून त्यांत पाणी चौपट घालून चवथाई पाणी राही तों पर्यंत काढा करून गाळून ठेवावा. जव टाकून द्यावे. मग दश मुळांचीं औषधें १० तीं वीस पळ प्रमाण, चित्रक, पिंपळमूळ, अघाडा, कचोरा, कवचबीज, शंखपुष्पी, भारंगसाल, गजपिंपळी, चिकणामूळ, पोखरणीचें मूळ, हीं दाहा औषधें दोन दोन पळप्रमाण एकंदर वीस औषध याप्रमाणें घेऊन थोडीं थोडीं कुटून त्यांत पाणी पाच आढक प्रमाण घालून चवथाई पाणी राही तों पर्यंत काढा करून गाळून त्या ज-

यांचे काढ्यांत मिळवून त्यांत थोर थोर हिरडे शंभर घालून तूप व तिळांचें तेल, आठ आठ पळ प्रमाण व एक तुळा प्रमाण गूळ त्या काढ्यांत टाकून घण होई तों पावेतों पाक करून थंड जाहाल्यावर पिंपळीचें चूर्ण व मध हीं कुडव कुडव प्रमाण घेऊन पाकांत मेळवावीं. या प्रकारें हा अवलेह अगस्त्यऋषीनी सांगितला, ह्मणोन याला अगस्त्यहरीतकी ह्मणतात. यांतून रोग्यांनीं दोन हिरडे; लेहाबरोबर खावें; तेणेंकरून क्षय, कास, ज्वर, श्वास, उचकी मुळव्याध, आंवढणें, पीनसरोग नाकांत होतो तो व संग्रहणी हे रोग दूर होतात. अंगाला वळकुट्या पडतात त्या मोडोन केश पांढरे असतात, ते काळे होतात. बळ व कांति येते. हा अवलेह रसायन आहे. यापासून सारे रोग दूर होतात.

आटरूषादिकषाय.

आटरूषोशिरिपाश्वगंधश्चेतिपुनर्नवा ॥
एतैःक्वाथ्यपयःपीतंक्षयरोगविनाशनं ॥

अर्थ—अडुळसा, अश्वगंध, शिरसवृक्षाचें मूळ, रक्तबोळ, आणि पुनर्नवा यांचा काढा करून प्यावा; ह्मणजे क्षयरोगाचा नाश होतो.

अश्वत्थवल्कलादिलोह.

अश्वत्थवल्कलंचैवत्रिकटुर्लोहकिट्टकं ॥
गुडेनसहदातव्यंक्षयरोगविनाशनं ॥

अर्थ—पिंपळाची साल, सुंठ, मिरीं, पिंपळी, यांचें चूर्ण आणि मंडूर एकत्र करून गुळाशीं द्यावें; ह्मणजे क्षयरोगाचा नाश होतो.

ककुभाद्यचूर्ण.

ककुभत्वङ्नागबलाधात्रीवातारिबीजानां ॥
चूर्णमधुघृतयुक्तंसशिवंयक्ष्मादिकासहरं ॥

अर्थ—सांदडयाची साल, सुंठ, चिकणामूळ, आवळकाठी, आणि एरंडया यांचें चूर्ण तूप व मध घालून द्यावें; तें क्षयकासादिहारक आहे.

अश्वगंधाद्यचूर्ण.

अश्वगंधामृताभीरुदशमूलीबलाद्वयं ॥
पुष्करातिबलाघ्नंतिक्षयंक्षीररसाशिनः ॥

अर्थ अश्वगंध, गुळवेल, शतावरी, दशमुळें, बला, अतिबला, नागबला व पुष्करमूळ, यांचें चूर्ण द्यावें; आणि दुग्धादिक पथ्याला द्यावें; ह्मणजे क्षयाचा नाश होतो.

तालिसाद्यचूर्ण.

तालीसपत्रमरीचनागरंपिप्पलीतुगा ॥ यथोत्तरंभागवृध्यात्वगेलाचा

र्धभागिका ॥ पिप्पल्यष्टगुणाचात्रप्रदेयासितशर्करा ॥ कासश्वासारु

चिहरंतच्चूर्णंदीपनंपरं ॥ पांडुहृद्ग्रहणीदोषप्लीहशोषज्वरापहं ॥

अर्थ—तालीपत्र, मिरीं, सुंठ, पिंपळी व वंशलोचन हीं एकोत्तर वृद्धीनें घ्यावीं. व दालचिनी व एलची ह्या अर्धभाग, पिंपळी ८ भाग, आणि पांढरी साकर चूर्णासमान घालून द्यावें. तें खोकला, दमा, अरुचि, पांडु, हृद्रोग, संग्रहणी, प्लीहा, शोष, आणि ज्वर, यांचा नाश करितें; व उत्कृष्ट दीपन आहे.

नवनीतयोग.

शर्करामधुसंयुक्तंनवनीतंलिहेत्क्षयी ॥

क्षीराशीलभतेपुष्टिंमधुकुल्याज्यमाक्षिके ॥

अर्थ—साकर, मध, आणि लोणी हें द्यावें; किंवा दूध, मध व तूप, एकत्र करून द्यावें; ह्मणजे पुष्टि येत्ये.

सितोपलाचूर्ण.

सितोपलाषोडशस्यादष्टौस्याद्वंशरोचना ॥ पिप्पलीस्याच्चतुःकर्षाए

लास्याच्चद्विकर्षिका ॥ एककर्षाचत्वग्ग्राह्याचूर्णयेत्सर्वमेकतः ॥ शी

तोपलादिकंचूर्णंमधुसर्पिर्युतंलिहेत् ॥ कासश्वासक्षयहरंहस्तपादांगदा

हजित् ॥ मंदाग्निंसुप्तजिव्हत्वंपार्श्वशूलमरोचकं ॥ ज्वरमूर्ध्वगतंर

क्तंपित्तमाशुव्यपोहति ॥

अर्थ—खडीसाकर १६ तोळे, वंशलोचन ८ तोळे, पिंपळी ४ तोळे, एलची २ तोळे व दालचिनी १ तोळा, यासर्वांचें चूर्ण एकत्र करावें. त्याचें नाव शीतोपलादि चूर्ण हें मध व तूप यांशीं द्यावें; ह्मणजे खोकला, दमा, क्षय, आणि हात, पाय व आंग यांचा दाह, अग्निमांद्य, जिव्हेचें स्पर्शाज्ञान, पार्श्वशूल, अरुचि, ज्वर, ऊर्ध्वगत रक्तविकार, आणि पित्त, यांचा शीघ्रनाश करितें.

तवराजादि चूर्ण.

तवराजकणाद्राक्षाखर्जूरंमधुकंत्रुटी ॥ लवंगंपत्रकंचैवनाग

केसरनामतः ॥ मधुनाभक्षितंहंतिचूर्णमेषांहिनिश्चितं ॥ भ्रमं

दाहंशिरःपीडांक्षयरोगंनसंशयः ॥

अर्थ—साकर, पिंपळी, द्राक्षें, खारीक, ज्येष्ठीमध, बारकी एलची, लवंगा, तमालपत्र व नागकेशर यांचें चूर्ण मधाशीं द्यावें; ह्मणजे भ्रम, दाह, मस्तकशूल, आणि क्षयरोग यांचा नाश करितें.

अडुळसायोग.

आयुर्यदास्याद्दृश्व नराणांसरक्तपित्तश्वसनक्षयिणां ॥
मधुप्रयुक्तायशसाप्रतीतावासातदाकिंनकरिष्यतीयं ॥

अर्थ—जर रोग्याचें आयुष्य सबळ आहे, तर त्याचें रक्तपित्त, श्वास, क्षय, हे रोग अडुळसा मधाशीं घेतला असतां, कांहींच प्रचीति देत नाहीं काय?

द्राक्षादि चूर्ण.

द्राक्षाखर्जूरसर्पिर्भिःपिप्पल्याचसहस्मृतं ॥
सक्षौद्रंज्वरकासघ्नंश्वयथुंचप्रयोजयेत् ॥

अर्थ—द्राक्षें, खारीक, आणि पिंपळी, यांचें चूर्ण मध व तूप घालून तें ज्वर, खोकला व सूज यांवर द्यावें.

स्वर्णमाक्षिकादि चूर्ण.

मधुताप्यविडंगाश्मजतुलोहंघृतंमतं ॥
हंतियक्ष्माणमत्युग्रंसेव्यमानंहिताशिनः ॥

अर्थ—स्वर्णमाक्षिक, वावडिंग, शिलाजित, लोह, यांचीं एकत्र चूर्णें करून तें चूर्ण मध व तूप यांशीं द्यावें; आणि पथ्य करावें; ह्मणजे उग्रक्षयाचा नाश करितें.

शिलाजितादि चूर्ण.

शिलाजतुमधुव्योपताप्यलोहरजांसिच ॥
क्षीरयुग्लोहिनःश्वासःक्षयःक्षयमवाप्नुयात् ॥

अर्थ—शिलाजित. सुंठ, मिरीं, पिंपळी, स्वर्णमाक्षिक व कांतभस्म हे दूध, मध व साकर यांशीं द्यावें; ह्मणजे क्षय व श्वास यांचा नाश होतो.

लाक्षाकूष्मांडरस.

कूष्मांडकगिरोत्थेनरसेनपरिपेषितं ॥
लाक्षाकर्षद्वयंपीत्वाजयेद्रक्तक्षयंतथा ॥

अर्थ—कोहळ्याच्या गिराचा रस घेऊन त्यांत दोन तोळे लाखेचें चूर्ण घालून द्यावें; ह्मणजे रक्तक्षयाचा नाश करितें.

मार्कवादिचूर्ण.

द्वेपलेमार्कवंधात्रीमाक्षिकंसपुनर्नवा ॥ तुगास्पृक्काशालिपर्णीवासकं सदुरालभं ॥ चूर्णार्धेनसमंयोज्यंत्रिगंधंमरिचानिच ॥ तालिसंमगधा

चैवतदर्धेनशिलोद्भवं ॥ शिलाभेदंतदर्धेनसर्वंचैकत्रमिश्रयेत् ॥ समेनतिलचूर्णेनशर्कराचसमाहृता ॥ भक्षयित्वापयःपानंशस्यतेघृतमंयुतं ॥ तेनक्षयोराजयक्ष्माकामलाचविनश्यति ॥ अर्शाश्मरींजयत्याशुबलवीर्याधिकोभवेत् ॥ शाम्यंतिचमहारोगाःशुक्राढ्योजायतेनरः ॥

अर्थ—माका, आवळकाठी, स्वर्णमाक्षीक, पुनर्नवा, वंशलोचन, लाजाळूकंद, शालिपर्णी, अडुळसा व धमासा हे समभाग; व यां सर्वांचा निमे दालचिनी, तमालपत्र, एलची, मिऱ्यें, तालीसपत्र, पिंपळी; व यांचा निमें शिलाजित, पाषाणभेद, व यां सर्व चूर्णासमान तिळांचें चूर्ण, आणि साकर, हीं सर्व एकत्र करून चूर्ण करावें. तें भक्षण करून नंतर तूप घालोन दूध प्यावें; ह्मणजे क्षय, राजयक्ष्मा, कावीळ, मूळव्याध, अश्मरी, मूत्रकृच्छ्र व महारोग, यांचा नाश करितें; आणि रोग्याला बल येऊन धातु पुष्ट होतो.

बलादिचूर्ण.

बलाविदारीलघुपंचमूलीपंचैवक्षीरावृतत्वक्प्रयोज्या ॥ पुनर्नवामेघतुगाचभृंगःसंजीवनीयैर्मधुकैःसमांशैः ॥ अक्षप्रमाणानिचमानिकानिसर्वाणिचैतानिविचूर्णयित्वा ॥ विमिश्रयेत्तत्कणाशतानिपंचांशगोधूमयवाश्चपिष्ट्वा ॥ तुगासमांशंसिततंदुलानांपिष्टंसशृंगाटकामिश्रितंतु ॥ प्राक्चूर्णकाथेनवियोजनीयंसर्वांशकेनाप्ययवाप्रयोज्यं ॥ विभावयेच्चामलकीरसेनवारत्रयंगोपयसाविभाव्यं ॥ ततोस्यसर्वैःसमशर्करावाघृतेनचैवंपुनरेवभाव्यं ॥ तद्भक्षयेत्क्षौद्रयुतंपलार्धंजीर्णेचभोज्यंकटुकाम्लवर्ज्यं ॥ क्षीरंघृतंवाशितशर्करंवायवान्नगोधूमकशालिमद्यान् ॥ ज्ञात्वाग्निपाकंजठरेनरस्यदेवोयिधिज्ञैःक्षयरोगशांत्यै ॥

अर्थ—चिकणामूळ, भुयकोहळी, लघुपंचमूळ, वड, उंबर, पिंपळी, पायरी व नांदरुखी यांची साल; पुनर्नवा, नागरमोथा, वंशलोचन, माका, व जीवनीयगण, ज्येष्ठीमध हीं सर्व समभाग चूर्ण एकत्र करून त्या चूर्णाचा पांचवा हिस्सा गहूं व यव यांचें पीठ व वंशलोचनासमान तांदुळ व शिंगाडे यांचें पीठ. हीं सर्व चूर्णें एकत्र करून वरसांगितलीं जी चिकणमूळापासून ज्येष्ठीमधपर्यंत औषधें, तीं पुनः घेऊन त्यांच्या काढ्याची भावना चूर्णाला द्यावी; नंतर आवळीचे रसाच्या भवना ३, गाईच्या दुधाच्या ३ भावना व तुपाची १ भावना, देऊन सर्वचूर्णासमान साकर मिळवून तें अर्धा तोळा चूर्ण मधाशीं द्यावें, चार घटिका गेल्यावर तिखट व आंबट वर्जून दूध, तूप, साकर, गहूं, यव, भात व मद्य हें पथ्य द्यावें. याप्रमाणें अग्निबळ जाणून क्षयरोगाच्या नाशार्थ द्यावें.

जातीफलादिचूर्ण.

जातीफलंविडंगानिचित्रकंतगरंतिलाः ॥ तालीसंचंदनंशुंठीलवं
गमुपकुंचिका ॥ कर्पूरश्चाभयाधात्रीमरीचंपिप्पलीतुगा ॥ एषाम
क्षसमाभागाश्चातुर्जातकसंयुताः ॥ पलानिसप्तभंगायाःसितासर्वस
मामता ॥ चूर्णमेतत्क्षयंकासंश्वासंचग्रहणीगदं ॥ अरोचकंप्रति
श्यायंतथाचानलमंदतां॥एतान्रोगान्निहंत्येववृक्षानिंद्राशनिर्यथा॥

अर्थ-जायफळ, वावडिंग, चित्रकमूळ, तगर, तिळ, तालीसपत्र, चंदन, सुंठ, लवंग, एलची, कापूर, हरीतकी, आवळकाठी, मिरें, पिंपळी, वंशलोचन व चातुर्जात हीं प्रत्येक तोळा तोळा, व भांग सात तोळे व सर्वांसमान साकर एकत्र करून तें चूर्ण क्षय, खोकला, दमा, संग्रहणी, अरुचि, पडसें, आणि अग्निमांद्य, यांचा नाश करितें.

शिवगुटी.

त्रीन्वारान्प्रथमेशिलाजतुजलेभाव्यंभवेत्त्रैफलेनिःक्वाथेदशमूलजेथत
दनुच्छिन्नोद्भवायारसैः ॥ क्वाथेवालकजेपटोलसलिलेयष्टीकषायेपुन
र्गोमूत्रेथपयस्यथापिचगवामेपांकषायेततः ॥ द्राक्षाभीरुविदारिकाद्व
यपृथक्पर्णीस्थिरापौष्करैःपाठाकोटजकर्कटाख्यकटुकारास्नांबुदालं
बुदैः ॥ दंतीचित्रकचव्यवारुणकणावीराष्टवर्गौषधैरष्टौर्णैचरणस्थिते
पलमितैरेभिःपृथक्भावयेत् ॥ धात्रीमेषविषाणिकात्रिकटुकैरेभिःपृ
थक्पंचकैर्द्रव्यैश्चद्विपलोन्मितैरपिपलंचूर्णंविदारीभवं ॥ तालीसा
त्कुडवंचतुःपलमिहप्रक्षिप्यतेसर्पिषस्तैलस्यार्धपलंपलाष्टकमथक्षौद्रं
भिषग्योजयेत् ॥ तुल्यंपलैःषोडशभिःशितायास्त्वक्क्षीरिकापत्रक
केसरैश्च ॥ बिल्वांशकैस्त्वगृतुटिसंप्रयुक्तैरित्यक्षमात्रागुटिकाप्र
कल्प्या ॥ तासामेकतमांप्रयोज्यविधिवत्प्रातःपुमान्भोजनात्प्राग्वा
मुद्गदलांबुजांगलरसंशीतंशृतंवाजलं ॥ माक्षिकंमदिरामगुर्वशनभुक्
पीत्वापयोवागवांप्राप्नोत्यंगमनोभवःसुभवनंसंपन्नमानंदकृत् ॥ शो
फग्रंथिविबंधवेपथुवमिंपांडवामयंश्लीपदंप्लीहार्शःप्रदरंप्रमेहपिटिकांमेहा
श्मरींशर्करां ॥ त्हृद्रोगार्बुदवृद्धिविद्रधियकृद्योन्यामयःसानिलश्चोरु
स्तंभभगंदरज्वररुजस्तुणीप्रतूणीतथा॥ वातासृक्प्रबलंप्रवृद्धमुदरंकु

ष्ठंकिलासंक्रमीन्कासंश्वासमुरःक्षतक्षयमसृक्पित्तंसमानात्ययं ॥ उ न्मादंमदमप्यपस्मृतिमतिस्थौल्यंकृशत्वंतनोःमालस्यंचहलीमकंचश मयेन्मूत्रस्यकृछ्राणिच ॥ .

अर्थ—शुद्ध शिलाजीत घेऊन त्याला त्रिफळ्याच्या ३ भावना द्याव्या. दशमुळांचा काढा, गुळवेलीचा रस, वाळ्याचा काढा, कडुपडवळाचा रस, ज्येष्ठीमध, गोमूत्र, गाईचें दूध, द्राक्षें, शतावरी, भुयकोहळी, कोहळी, डाय, डौला, पुष्करमूळ, पाहाडमूळ, कुड्याचें पाळ, कांकडी, कुटकी, रास्ना, नागरमोथे, वाळा, दंतीमूल, चित्रकमूळ, चवक, गजपिंपळी, भुयआवळी, जीवक, ऋषभक, मेदा, महामेदा, ऋद्धि, वृद्धि, कांकोली, क्षीरकांकोली, हीं प्रत्येक चार तोळे औषधें घेऊन त्यांच्या पृथक् पृथक् भावना द्याव्या; नंतर यावळकाठी, मेषशृंगी, सुंठ, मिरीं, पिंपळी, हीं प्रत्येकीं ८ तोळे, भुयकोहळ्याचें चूर्ण ४ तोळे, तालीसपत्र १६ तोळे, तूप १६ तोळे, तेल २ तोळे, आणि मध ३२ तोळे आणि साकर ६४ तोळे व वंशलोचन, तमालपत्र, नागकेशर, दालचिनी. बारीक वेलची हीं चार चार तोळे घालून त्याची १ तोळयाची गोळी करावी. ती प्रातःकाळीं द्यावी; किंवा भोजनाच्या पूर्वीं द्यावी; आणि पथ्याला मुगांचें कढण, कुळथाचें कढण, जांगलमांसाचे रस, तापून थंड झालेलें पाणी, मध, मद्य, लघु अन्न व गाईचें दूध हे पदार्थ द्यावे; ह्मणजे कामाग्नि प्रदीप्त करित्ये; व सूज, ग्रंथि, विद्रधि, कफ, ग्लानि, पटु, श्लीपद, प्लीहा, अर्श, प्रदर, प्रमेहपिटिका, प्रमेह, मूत्राश्मरी, हृद्रोग, अर्बुद, अंडवृद्धि, विद्रधि, यकृत्, योनिरोग, वातरोग, ऊरुस्तंभ, भगंदर, ज्वर व तूणी व प्रतूणी वगैरे, वातरक्त, वाढलेला उदररोग, कुष्ट, किलासकुष्ठ, कृमि, कास, श्वास, उरःक्षत, क्षय, रक्तपित्त, उन्माद, मद, अपस्मार, अतिस्थूलता, अतिकृशता, आळस, हलीमक, मूत्रकृच्छ्र, वली व पलित यांचा नाश करित्ये.

लघुशिवगुटी.

कौटजंत्रिफलांनिंबंपटोलंघननागरैः ॥ भावितानिदशाहानिरसैर्द्वित्रि गुणानिच ॥ शिलाजतुपलान्यष्टौतावतीसितशर्करा ॥ त्वक्क्षीरीपि प्पलीधात्रीकर्कटाख्यापलोन्मिता ॥ निदिग्धीफलमूलाभ्यांपलंयुंज्या त्त्रिजातकान् ॥ मधुत्रिपलसंयुक्ताकुर्यादक्षसमागुटी ॥ दाडिमाम्ल पयःक्षीररसयूषमुरासवान् ॥ तान्भक्षयित्वानुपिबेन्निरन्नोहितभक्ष्यभा क् ॥ पांडुकुष्ठज्वरप्लीहतमकार्शोभगंदरं ॥ नाशयेन्मूत्रकृच्छ्राणिमूत्रस्था नविबंधनुत् ॥ यद्यत्रमेलितंयेनकांतलोहंतथाभ्रकं ॥ पलंपलंचमिलितं

तदास्याक्किमतःपरं ॥ तन्निदुःखप्रदंपांडुप्रमेहमपरिग्रहं ॥ राजरोगं चव्याधिंवर्जयेदितिकिमद्भुतं ॥

अर्थ—शुद्ध शिलाजतु ३२ तोळे घेऊन त्याचा कुडयाची साल, हरडा, बेहेडा, आवळकाठी, कडुनिंब, कडुपडवळ, नागरमोथे व सुंठ, यांच्या काढ्यांत एक महिना खल करावा. त्यांत खडीसाकर ३२ तोळे व वंशलोचन, पिंपळी, आवळकाठी, कर्टोली, हीं प्रत्येकीं चार चार तोळे, व पंचांगगिणी ४ तोळे व दालचिनी, तमालपत्र, एलची, आणि मध, हे १२ तोळे, यांचा खल करून त्याची १० माशांची गोळी करावी, ती भक्षण केल्यानंतर डाळिंबाचे सार, दूध, क्षीर, रस, यूष, मद्य, किंवा आसव यांतून कोणतें ही प्राशन करावें. व हित भोजन करावें; म्हणजे पांडु, कोड, ज्वर, प्लीहा, तमक, अर्श, भगंदर, मूत्रकृच्छ्र, मूत्रसंबंधी रोग व मूत्रबंध यांचा नाश करितें या गोळीमध्यें कोणी कांतलोह, आणि अभ्रक हे प्रत्येकीं चार चार तोळे मिळवितात. तेव्हां हिचे गुण काय वर्णावे. ही पांडु, सर्व मेह, क्षय, आणि अनेक व्याधि यांचा नाश करील यांत काय आश्चर्य आहे?

सूर्यप्रभागुटी.

दार्वीव्योपविडंगचित्रकवचापीताकरंजामृतादेवाव्हातिविपात्रिवृत्स कटुकाकुस्तंबरुःकारवी ॥ द्वौक्षारौलवणत्रयंगजकणाचव्यंतथारुष्करं तालीसंकणमूलपुष्करजटाभूनिंबसंज्ञैर्युतं ॥ भार्ङ्गीपद्मकजीरकोशकुट जोदंतीत्वचाभद्रकंसर्वंकर्षसमांशकंसुभिषजासूक्ष्मंचसंचूर्णितं ॥ तद्व त्पंचपलंवरागिरिजतुस्यात्पंचमुष्टिःपुरोलोहस्याद्विपलंपलद्वयमथोता प्यस्यसंमिश्रितं ॥ क्षिप्त्वापंचपलानिशुभ्रसिकतावश्यंपलंयोजितंत्वे कैकत्रिसुगंधवस्तुपलिकंक्षौद्रैर्घृतैर्लेहवन् ॥ एकीकृत्यसमांशमेवगुटि काकार्यासुवर्णान्विताप्ताचब्रह्ममुखांबुजप्रकटितासूर्यप्रभानामतः ॥ शोषंकासमुरःक्षतंसतमकंपांड्वामयंकामलंगुल्मंविद्रधिपार्श्वशूलमुदरं स्त्रीपुक्षयंचक्रमीन् ॥ कुष्ठार्शोविपमज्वरग्रहणिकानूत्रग्रहंनाशयेद्भुक्त्वै कांगुटिकांप्रहृष्टमनसायोज्यंयथेष्टाशनं ॥ नास्त्येतत्सममौषधंत्रिजग तिचक्रेहितंप्राणिनामुद्दामप्रमदामदाद्विपदराट्सिंहस्तुसूर्यप्रभा ॥

अर्थ—दारुहळद, सुंठ, मिरीं, पिंपळी, वावडिंग, चित्रक, वेखंड, हळद, करंज, गरुडवेल, देवदार, अतिविष, तेड, कुटकी, कोथिंबिर, ओंवा, यवखार, टांकणखार, सैंधव, बीडलोण, काचलोण, गजपिंपळी, चवक, बिबवे, तालीसपत्र, पिंपळीमूळ, पुष्करमूळ

किराइत, भारंगमूळ, पत्रकाठ, जिरें, जायफळ, कुडयाची साल, दांतीची साल, नागरमोथे, हीं प्रत्येकीं तोळा व त्रिफळा २० तोळे, शिलाजित २० तोळे, गुग्गुळ ८ तोळे व लोह २८ तोळे, सुवर्णमाक्षीक ८ तोळे, साकर २० तोळे व वंशलोचन दालचिनी, तमालपत्र, एलची, हीं सर्व चार चार तोळे अशीं एकत्र करून तूप व मध यांत भिजवून त्याची १ तोळा वजनाची गोळी करावी, ही ब्रह्मदेवानें सूर्यप्रभा या नावानें सांगितली, ही शोष, खोकला, उरःक्षत, तमक, पांडुरोग, कामला, गुल्म, विद्रधि, पार्श्वशूल, उदर, स्त्रियांचा क्षय, कृमिरोग, कोड, अर्श, विषमज्वर, संग्रहणी व मूत्ररोध यांचा नाश करिते. ही भक्षण केल्यावर यथेष्ट पथ्य करावें; या पृथ्वीतलांत सूर्यप्रभागुटीसारिखी दुसरी गोळी नाहीं.

गुडूच्यादिमोदक.

गुडूचींखंडशःकृत्वाकुट्टयित्वासुमर्दयेत् ॥ वस्त्रेणविधृतंतोयंस्रावयेत्तच्छनैःशनैः ॥ शुद्धशंखनिभंचूर्णमेतैःसंमिश्रयेद्भिषक् ॥ उशीरंवालकंपत्रंकुष्ठंधात्रींचमौसलीं ॥ एलांहरेणुकंद्राक्षांकुंकुमंनागकेसरं ॥ पद्मकंदंचकर्पूरंचंदनद्वयमिश्रितं ॥ व्योषंचमधुकंलाजाअश्वगंधःशतावरी ॥ गोक्षुरंमर्कटाख्यंचजातीतक्कोलचोरकं ॥ रसश्चवंगलोहैश्च संमिश्रंकारयेद्बुध ॥ एतानिसमभागानिद्विगुणाभूतशर्करा ॥ मत्स्यंडयाज्यमधूपेतंभक्षयेत्प्रातरुत्थितः ॥ क्षयंचरक्तपित्तंचपाददाहमसृग्दरं ॥ मूत्राघातंमूत्रकृच्छ्रंवातकुंडलिकांतथा ॥ निहन्याच्चप्रमेहांश्चसोमरोगंचदारुणं ॥ रसायनमिदंपुंसाममृतंचामृतांयथा ॥

अर्थ–गुळवेलीचे बारीक तुकडे करून ते कुटावे; नंतर चांगले मर्दन करून वस्त्रांत बांधून त्यांतून पाणी गळेल तें सुकून शुद्ध शंखासारिखें चूर्ण होईल तें (म्हणजे गुळवेलीचें सत्व) घेऊन त्यांत वाळा, पीवाळा, तमालपत्र, कोष्ठ, आवळकाठी, मुसळी, एलची, पित्तपापडा, द्राक्षें, केशर, नागकेशर, कमलकंद, कापूर, चंदन, रक्तचंदन, सुंठ, मिरीं, पिंपळी, ज्येष्ठमध, लाह्या, अश्वगंध, शतावरी, गोखरू, कुयलीच्या बिया, जायफळ, कंकोळ, चोरओवा, पारा, वंग व लोह हे संपूर्ण समभाग एकत्र करून त्यांत दुप्पट साकर मिळवावी, तें चूर्ण खडीसाकर, मध व तूप यांशीं प्रातःकाळीं भक्षण करावें; म्हणजे क्षय, रक्तपित्त, पाददाह, रक्तप्रदर, मूत्राघात, मूत्रकृच्छ्र, वातकुंडली, प्रमेह व सोमरोग यांचा नाश करितें. हें चूर्ण रसायन आहे. व देवांनां जसें अमृत तसें.

इक्ष्वादिमोदक.

उद्धटेक्षुरसःशीद्रंतुगाक्षीर्याश्चबुद्धिमान् ॥ प्रस्थंप्रस्थंपृथक्गृह्यशर्करा

र्धतुलातथा ॥ आत्मगुप्ताफलानांचकुडवंमरिचस्यच ॥ त्रिसुगंधंक
तायापंमंथानेनविमंथयेत् ॥ पलिकान्मोदकान्कृत्वास्थापयेद्भाजनेशु
भे ॥ एतद्द्विकालमेकंवाखादेदग्निबलंप्रति ॥ वटिकांनियताहारोब्रह्म
चारीजितेंद्रियः ॥ ग्रहण्यांयक्ष्मिणेमयश्चैकादशविधेतथा ॥ स्वरवर्णव
लौदार्यतुष्टिपुष्टिविवर्धनं ॥ आयुष्यंपौष्टिकंचाथभूतोपहतचेतसां ॥
व्याकुलीकृतदेहानांवृद्धानांक्षीणरेतसां ॥ वाजीकरणमप्येवंवंध्यानां
पुत्रदंपरं ॥ धनुस्त्रीमद्यभारैश्चखिन्नानांबलवर्धनं ॥ हृत्प्लीहग्रहणीदोष
मूत्रकृच्छ्रापतंत्रकं ॥ अपस्मारविषोन्मादनाशनंतद्रसायनं ॥

अर्थ—गुंजेची पाले, उंसाचा रस, मध, वंशलोचन, हीं प्रत्येकीं ६४ तोळे. व साकर २०० तोळे, आणि कुहिलीच्या बिया, मिरीं, दालचिनी, तमालपत्र, एलची, हीं प्रत्येकीं १६ तोळे घेऊन याचें चूर्ण करून त्यांत घालून रवीनें मंथन करून त्याचे चार तोळ्यां-चे मोदक करून भरून ठेवावे. त्यांतून दोन वेळ किंवा एक वेळस मोदक अग्निबळ पाहून खावा, यावर पथ्य चांगलें करावें; व जितेंद्रिय, ब्रह्मचर्य राहावें; ह्मणजे तो मोदक संग्र-हणी, एकादश प्रकारचा क्षय, यांचा नाश करितो; आणि जे वृद्ध. व्याकुळ झाले, व धातुक्षीण झाले त्यांना हे वाजीकरण आहे. व वंध्यांना पुत्र देतो; आणि युग्म, स्त्री. मद्य व भार याणीं श्रमलेल्या पुरुषांच्या बलाला वाढवितो; आणि हृद्रोग, प्लीहा, संग्रहणी, मूत्रकृच्छ्र, अपतंत्रक, अपस्मार, विष व उन्माद यांचा नाश करितो. हा रसायन आहे.

द्राक्षासव.

मृद्वीकायास्तुलार्धंतुद्विद्रोणेपांविपाचयेत् ॥ पादशेषेकषायेचपूतेशी
तेप्रदापयेत् ॥ गुडस्यद्वितुलभाविधातक्याघृतभाजने ॥ विडंगंफ
लिनीकृष्णात्वगेलापत्रकेसरं ॥ मरिचंचाभिषक्चूर्णंसम्यक्दत्वावि
चक्षणः ॥ क्षिपेच्चपलिकैर्भागैःस्थापयेच्चातपेदिने ॥ ततोयथाबलंपी
त्वाकासश्वासगलामयान् ॥ हंतियक्ष्माणगत्युग्रगुरःसंधानकारकं ॥
चतुर्थभागोद्राक्षायाधातकीमस्केचन ॥ प्रयच्छंतिततोवीर्यमेतस्यो
च्चैःप्रजायते ॥

अर्थ—द्राक्षें २०० तोळे घेऊन तीं ४०९६ तोळे पाण्यांत चतुर्थांश राही तों काढा करून गाळून घ्यावा. निवाल्यावर गूळ ८०० तोळे, धायटीच्या फुलाचें चूर्ण ८०० तोळे घालून तें सर्व तुपाच्या भांड्यांत भरून त्यांत वावडिंग त्रायमाण, पिंपळी, दालचिनी, एलची, तमालपत्र, नागकेशर व मिरीं या प्रत्येकाचें चार तोळे चूर्ण घालून दिवसास उ-

न्हांत ठेवावा. मासपक्ष गेल्यावर अग्निबळ पाहून द्यावा; ह्मणजे उग्र क्षयरोग व उरःक्षत यांचा नाश करितो. या आसवांत कोणी द्राक्षांचा चतुर्थांश धायटीफूल घालावें असें ह्मणतात. कारण याला अधिक वीर्य उत्पन्न होतें.

खर्जूरासव.

पंचप्रस्थंसमादायखर्जूरस्यविचक्षणः ॥ द्रोणांभसिपचेत्सम्यक्ततो त्तार्यचगालयेत् ॥ कुंभंसुधूपितंकृत्वाप्रक्षिपेत्तंरसंशुभं ॥ हपुपाताम्र पुष्पीचकषायंतत्रनिःक्षिपेत् ॥ द्वारंनिरुध्यमुद्दृढंनिक्षिपेद्वसुधातले॥ सप्तकद्वययोगेनसिद्धोयमासवोरसः ॥ रोगराजंतथाशोफंप्रमेहंपांडु कामलां ॥ ग्रहणींपंचगुल्मांश्चनाशयत्यतिवेगतः ॥

अर्थ–खजूर ३२० तोळे घेऊन २०४८ तोळे पाण्यांत चतुर्थांश कढवून उतरून गाळून घ्यावा; नंतर घागरीला उदादिकांची धुरी देऊन त्यांत तो काढा घालावा; नंतर थोर शेरणी व धायटीचीं फुलें यांचा काढा त्यांत घालून तोंड बंद करून ती घागर ज- मिनींत १४ दिवस पुरून ठेवावी; ह्मणजे हा खर्जूरासव तयार झाला. हा क्षय, सूज, प्रमेह, पांडुरोग, कावीळ, संग्रहणी, आणि पांच प्रकारचे गुल्म यांचा नाश करितो.

दशमूलासव.

दशमूलंतुलार्धंचपौष्करंचतदर्धकं ॥ हरीतकीनाप्रस्थार्धंधात्रीप्रस्थ द्वयंतथा ॥ चित्रकंपुष्करमितंचित्रकार्धंदुरालभा ॥ गुडूच्यादिःशत पलंविशालापलपंचकं ॥ खदिरस्यपलान्यष्टौतदर्धंबीजकंतथा ॥ मं जिष्ठामधुकंकुष्ठंकापित्थंदेवदारुच॥विडंगंचविकंलोध्रंभार्गंचाष्टकव र्गकं ॥ कृष्णाजाजीपिप्पलीचक्रमुकंपद्मकंसठी ॥ प्रियंगुसारिवा मांसीरेणुकानागकेसरं ॥ त्रिवृतारजनीरास्नामेषशृंगीपुनर्नवा ॥ शतावरींद्रयवामुस्ताद्विपलिकान्जले॥चतुर्गुणेपादशेषेद्राक्षापष्टि पलंक्षिपेत् ॥ त्रिंशत्पलानिधातुक्यागुडंपलचतुष्टयं॥ मधुद्वात्रिंशत्प लंचसर्वमेकत्रकारयेत् ॥ भांडेपुराणेस्निग्धेवामांसीमरिचधूपिते॥ पृ थक्द्विपलिकानेतान्पिप्पलीचंदनंजलं ॥ जातीफलंलवंगंचत्वगेला पत्रकेशरान् ॥ कर्पनात्रांचकस्तूरींदत्वापक्षंनिधापयेत्॥ कनकदुपलं चूर्णंक्षिपेन्निर्मलभावितं ॥ पक्षादूर्ध्वंपिबेचस्तुमात्रयाचयथाबलं॥ धा तुक्षयंजयत्येवकासंपंचविधंतथा॥ अर्शांसिषट्प्रकाराणितथाष्टावुदरा

णिच ॥ प्रमेहंचमहाव्याधिमरुचिंपांडुरुक्तथा ॥ सर्ववातांस्तथाशू
लंश्वासंछर्दिमसृग्दरं ॥ अष्टादशैवकुष्ठानिशोफंशूलंभगंदरं ॥ शर्क
रांचंमूत्रकृच्छ्रमश्मरींचविनाशयेत् ॥ कृशस्यपुष्टिंकुरुतेपुष्टस्यचमहा
वलं ॥ महावेगोमहातेजामहावीर्योविलोक्यते ॥ कामपुष्टिकरो
ह्मपवंध्यानांपुत्रदोभवेत् ॥

अर्थ–दशमुळें २०० तोळे, पुष्करमूळ १००, हरीतकी ८०, आवळकाठी १२८, चित्रकमूळ १००, धमासा ५०, गुडूच्यादि ४००, कडुवृंदावन २०, खदिरसार ३२, महाळुंग १६ तोळे, व मांजिष्ठ, ज्येष्ठमध, कोष्ठ, कायट, देवदार, वावडिंग, चवक, लोध, व जीवक, ऋषभक, मेद, महामेद, ऋद्धि, वृद्धि, कांकोली, क्षीरकांकोली, हीं चार चार तोळे; व पिंपळी, जिरें, गजपिंपळी, चिकणी सुपारी, पद्मकाष्ठ, कचोरा, राळे, कावळी, जटामांसी, पित्तपापडा, नाकेशर, तेड, हळद, रास्ना, मेषशृंगी, पुनर्नवा, शतावरी, इंद्रजव व नागरमोथा, हीं प्रत्येक ८ तोळे, याप्रमाणें सर्व औषधें घेऊन सर्वांच्या चौपट पाणी घालून चतुर्थांश काढा उतरून घ्यावा. त्यांत द्राक्ष २४० तोळे, धायटीफुलें १२० तोळे, गुळ १६ तोळे, मध १२८ तोळे, हे सर्व एकत्र करावे; आणि जुनी तुपाची घागर घेऊन तिला जटामांसी आणि मिरीं यांचा धूप देऊन तींत तें सर्व भरून त्यांत पिंपळी, चंदन, वाळा, जायफळ, लवंग, दालचिनी, एलची, तमालपत्र, नाकेशर, हीं प्रत्येकीं ८ तोळे; कस्तूरी १ तोळा, व धातन्याचें चार तोळे चूर्ण घालून पंधरा दिवस ठेवावा. नंतर अग्निबळ पाहून त्यांतून काढून घ्यावा. तो धातुक्षय, पांच प्रकारचा खोकला, साहा प्रकारची मुळव्याध, आठ प्रकारचीं उदरें, प्रमेह, महाव्याधि, अरुचि, पांडुरोग, संपूर्ण वातरोग, शूल, श्वास, वांति, रक्तप्रदर, अष्टादश कुष्ठें, मूत्रशर्करा, मूत्रकृच्छ्र, अश्मरी, यांचा नाश करितो. कृशाला पुष्टि देतो. व पुष्टाला बलवान् व महातेजस्वी, महावीर्यवान्, करितो, व काम, पुष्टि, यांला देतो व वंध्याना पुत्र देतो.

कुमारीपाक.

कुमारीकंदमादायपलंविंशतिसंख्यया ॥ चतुर्गुणंचगोदुग्धंपाचयेन्मंदव
न्हिना ॥ यावज्जीर्यतेदुग्धंतावत्पाचनकंकुरु ॥ छायाशुष्कंचकुर्वी
तचूर्णयेद्बुद्धिमान्भिषक् ॥ पिप्पलीमरिचंशुंठीप्रत्येकंचपलत्रयं ॥ जा
तीफलंजातिपत्रीलवंगंपलमेवच ॥ गोक्षुरंकर्कटीवीजंप्रत्येकंचपलंप
लं ॥ चातुर्जातपलंचैवचित्रकंचपलंतथा ॥ सर्वेषांसूक्ष्मचूर्णंचकारये
द्बुद्धिमान्भिषक् ॥ सितापलंचविंशत्यागोघृतंचपलंदश ॥ तत्समं
महिषीदुग्धंतत्सममंमधुमिश्रितं ॥ लोहपात्रेविनिःक्षिप्यपाचयेन्मृदुव

न्हिला ॥ चूर्णंनिःक्षिप्यदर्व्यासम्यग्विचालयेत् ॥ यावद्घृतंप्रदृ-
श्येततावत्पाचनकंकुरु ॥ कर्षमेकंलोहभस्मसुवर्णंतत्समंततः ॥ सिं
दूरंकर्षमेकंतुदापयेद्भिषगुत्तमः ॥ कोलप्रमाणवटकान्भक्षयेद्बुद्धिमा
न्नरः ॥ जीर्णज्वरंक्षयंकासंश्वाससंतापशूलनुत् ॥ अजीर्णमामवात
घ्नंप्रदरंपंचनाशनं ॥ स्त्रीणांवंध्यात्वहरणंपुत्रंचैवप्रसूयते ॥ अंडवृद्धि
हरंचैवस्त्रीणांरमयतेशतं ॥ इदंगोप्यमिदंगोप्यमश्विनीदेवनिर्मितं ॥

अर्थ–कुमारीकंद ८० तोळे व गाईचें दूध ३२० तोळे, अशीं एकत्र करून मंदा-ग्नीवर दूध सुके तों आटवून छायेंत वाळवून चूर्ण करावें; नंतर पिंपळी, मिरीं व सुंठ हीं प्रत्येकीं बारा तोळे; जायफळ, जायपत्री, लवंग, गोखरू, कांकडीचें बीज, चातुर्जात व चित्रक हीं चार तोळे. यांचें सूक्ष्म चूर्ण करून त्यांत मिसळावें. व साकर ८० तोळे व गाईचें तूप ४०, म्हशीचें दूध ४०, म मध हीं प्रत्येकीं ४० तोळे, घालून तीं सर्व लोखंडाच्या भांड्यांत भरून मंदाग्नीनें पचन करून त्यांत सर्व चूर्ण टाकून पळीनें चांगलीं परतावीं. जो पर्यंत तूप दिसूं लागे तों पर्यंत पचन करून त्यांत लोहभस्म, सोनें, रससिंदूर, हीं प्रत्येकीं १ तोळा घालून १ तोळ्याचा वटक करावा. तो जीर्णज्वर, क्षय, खोकला, दमा, संताप, शूल, अजीर्ण, आमवात व प्रदर यांचा नाश करितो. व स्त्रियांचें वंध्यात्व, पुरुषाचें अंडवृद्धि, यानां दूर करून शंभर स्त्रिया भोगण्याची शक्ति देतो. हा कुमारीपाक अश्विनीकुमारांनीं सांगितला. हा अति गोप्य आहे.

धात्रीपाक.

धात्रीफलानिपक्वानितीक्ष्णलोहेनवेधयेत् ॥ विश्वावरणपत्रैश्चफला
निरवेष्टयेद्दृढं ॥ ततोदुग्धेचसंस्वेद्यजलेचतदनंतरं ॥ मधुमध्येक्षिपे
द्भांडेस्थापयेद्दिनविंशतिः ॥ विनष्टंमधुसंत्यज्यमधुमध्येपुनःक्षिपेत् ॥
सिताधात्रीफलान्येवपेषयेत्क्षीरिणासह ॥ एलाचैवतुगाक्षीरीलोहंवं
गंतथैवच ॥ मेलयित्वाशुनक्षत्रेप्रातःकर्षमितंभजेत् ॥ वलेक्षीणेक्षये
चैवपथ्यंमधुरमाचरेत् ॥ प्रमेहंमूत्रकृच्छ्रंचनाशयेत्तत्क्षणादपि ॥ वी
र्यवृद्धिकरंचैववाजीकरणमुत्तमं ॥ कुष्ठंपित्तप्रकोपंचनाशयेन्नात्रसं
शयः ॥ एतेन्येपित्तजारोगाःशोणिताद्यास्तथैवच ॥ तेसर्वेप्रशमंया
तिधात्रीपाकस्यसेवनात् ॥

अर्थ–पिकलेले आवळे घेऊन ते सुयीनें टोंचावे; नंतर आल्याच्या पात्या पाण्यांत घालून शिजवावे, त्यांतून काढून पुनः दुधांत शिजवावे; नंतर पाण्यांत शिजवून ते मधा-

ने भरलेल्या भांड्यांत घालावें; आणि वीस दिवस ठेवावें; नंतर खराब झालेला मद्य टाकून पुनः दुसरा मद्य घालावा; व साकर, आवळकाठी, गजपिंपळी, एलची, वंशलोचन, लोहभस्म व वंगभस्म हें त्यांत घालून उत्तम दिवस पाहून प्रातःकाळीं १ तोळा बल- क्षय, क्षय, यांवर द्यावा; आणि मधुर पदार्थ पथ्याला द्यावे; ह्मणजे प्रमेह, मूत्रकृच्छ्र, कुष्ठ, पित्तप्रकोप, पित्तजन्य सर्वरोग व रक्तविकार हे नाश पावतात; आणि वीर्यवृद्धि करून उत्तम वाजीकरण करितो.

शतावरीपाक.

श्वेतपुष्पसहस्रंतुघृतप्रस्थेविपाचयेत् ॥ घृतेपक्वीकृतेतत्रनिःक्षिपेदौप धंभिषक् ॥ सितोपलाचतुष्कंचचातुर्जातंपलंपलं ॥ मृद्वीकाषट्पलं चैवक्षिप्त्वामधुपलाष्टकं ॥ धारामत्वंनवक्षीरंश्वेतजीरंपृथक्पृथक् ॥ नागंवंगंपलार्धंचसर्वमेकत्रकारयेत् ॥ कर्पूरंवल्लमात्रंचदत्वास्थाप्यमु कुंभके ॥ भक्षयेन्निष्कमात्रंतुप्रातरेवहितपथ्यभुक् ॥ जीर्णज्वरेक्षयेकासे अग्निमांद्येप्रमेहके ॥ दिनरात्रिज्वरेचैवशिरोरोगेप्रशस्यते ॥ प्रदररक्त जान्रोगान्कुष्ठार्शांसिचनाशयेत् ॥ नेत्ररोगान्सुदुष्टांश्चतथासर्वान्मुखे स्थितान् ॥ नाशयेन्नात्रसंदेहोमंडलस्यचसेवनात् ॥

अर्थ—पांढरे शतावरीचीं फळें हजार घेऊन तीं ६४ तोळे तुपांत परतावीं; नंतर खडीसाकर २५६ तोळे, चातुर्जात १६ तोळे, द्राक्षे २४ तोळे, मध ३२ तोळे, गुळवेलीचें सत्व तवकीर, पांढरें जिरें, नाग व वंग हीं प्रत्येकीं २ तोळे या प्रमाणें सर्व एकत्र करून वालभर कापूर आंत मिळवावा; आणि घागरींत भरून ठेवावा. त्यांतून अर्धा तोळा घेत जावा, पथ्य करावें; ह्मणजे जीर्णज्वर, क्षय, खोकला, अग्निमांद्य, प्रमेह, दिनज्वर, रात्रिज्वर, मस्तकरोग, रक्तप्रदर, रक्तजरोग, कोड, अर्श, नेत्ररोग व मुखरोग यांचा नाश करितो.

महाकनकसुंदररस.

रसगंधकनागाश्चरसकोमाक्षिकाभ्रके ॥ कांतविद्रुममुक्तानांवंगभस्म चतालकं ॥ भस्मकृत्वाप्रयत्नेनप्रत्येकंकर्षसंमितं ॥ सर्वतुल्यंशुद्धहे मभस्मकृत्वाप्रयोजयेत् ॥ मर्दयेत्त्रिदिनंसर्वंहंसपादीरसैर्भिषक् ॥ त तोवैगोलकान्कृत्वाकाचकुप्यांविनिःक्षिपेत् ॥ रुध्वातत्काचकूप्यांच सप्तवस्त्रेणवेष्टितं ॥ ततोवैसिकतायंत्रेत्रिदिनंचैकवन्हिना ॥ पश्चात्तं स्वांगशीतंचमर्दपूर्वौदितेरसे ॥ विनिःक्षिप्यकरंडेथसंपूज्यरसराजकं ॥

महाकनकसिंदूरोराजयक्ष्महरःपरः ॥ पांडुरोगंश्वासकासकामलाग्रहणी
गदान् ॥ कृमिशोफोदरावर्तगुल्ममेहगुदांकुरान् ॥ मंदाग्निच्छर्दिम
रुचिमामशूलहलीमकान् ॥ ज्वरान्द्वंद्वादिकान्सर्वान्सन्निपातांस्त्रयोद
श ॥पैत्तरोगमपस्मारंवातरोगान्विनिःक्षिपेत् ॥ रक्तपित्तप्रमेहांश्चस्त्रीणां
रक्तस्रुतिंतथा ॥ विंशतिश्लेष्मरोगांश्चमूत्ररोगंनिहंत्यसौ ॥ हेमवर्णश्चव
स्यश्चआयुःशुक्रविवर्धनः ॥ महाकनकसिंदूरःकाश्यपेनविनिर्मितः ॥

अर्थ–पारा, गंधक, नागभस्म, कलखापरी, माक्षीकभस्म, अभ्रकभस्म, कांत, पोंवळीं, मोत्यें, वंग व हरताळ यांचीं भस्में हीं समभाग एकत्र करून यांत या सर्वांच्या समभाग सुवर्णभस्म घालून हंसपादीच्या रसांत तीन दिवस घाटून गोळी करून ती काच कुपांत भरून तिला सात मात कापडें करून ती वालुकायंत्रांत तीन दिवस सांगीतल्या प्रमाणें अग्नि लाऊन पचन करावी. स्वांगशीत झाल्यावर काढून हंसपादीरसांत घोटून करंडयांत भरून ठेवावा. हा महाकनकसुंदररस राजयक्ष्मा, पांडुरोग, श्वास, कास, कावीळ, संग्रहणीरोग, कृमिरोग, सूज, उदर, उदावर्त, गुल्म, मेह, मुळव्याध, आममांद्य, वांति, अरुचि, आमशूल, हलीमक, सर्व ज्वर, द्वंद्वज्वर, तेरा सन्निपात, पित्तरोग, फेंपरें, वातरोग, रक्तपित्त, प्रमेह, स्त्रियांचें रक्तप्रदर, वीस प्रकारचे कफरोग व मूत्ररोग याचा नाश करितो; आणि शरीराचा सुवर्णासारिखा वर्ण करणारा व आयुष्य व धातु यानां वाढविणारा हा योग काश्यपानें सांगितला.

क्षयकेसरी रस.

नेत्रलोचनचंद्रेंदुप्रमाणंभागमाहरेत् ॥ वह्निजंफटकीमृष्टागर
लंनवसागरं ॥ चूर्णमेषांसितायुक्तंगुंजार्धंयोजयेद्भिषक् ॥ क्ष
यकेसरिनामायंरसःपरमदारुणः ॥

अर्थ–मिरीं २ फटकीची लाही २, वचनाग १ व नवसागर १ भाग यांचें चूर्ण साकरेशीं अर्धी गुंज द्यावें. हा क्षयकेसरिनामक रस क्षयावर अत्यंत उपयुक्त आहे.

शंखेश्वररस.

शंखस्यवलयंनिष्कंचतुर्निष्कंवराटिका ॥ कर्पार्धंनीलतुत्थंस्यात्सर्व
तुल्यंतुगंधकं ॥ गंधतुल्यंमृतंनागंनागतुल्यंमृतंरसं ॥ टंकणंरसतुल्यां
शंमर्दंपाच्यंमृगांकवत् ॥ राजरोगहरःसोयंनाम्नाशंखेश्वरोरसः ॥ प
ड्गुंजातुकणाक्षौद्रैःक्षयेवामरिचंघृतं ॥

अर्थ–शंखाचे तुकडे ॥· तोळा, कवडया २ दोन तोळे, मोरचूत ·॥· तोळा व या

सर्वांच्या समभाग गंधक, शिशाचें भस्म, पारदभस्म व टांकणखार हे प्रत्येकीं गंधका-समान एकत्र करून गजपुट द्यावें. यावर पथ्य मृगांकासारिखें करावें. हा शंखेश्वररस सांहा गंजा पिंपळी व मध किंवा मिरीं व तूप यांशीं द्यावा; ह्मणजे क्षयाचा नाश करितो

हररुद्ररस.

तीक्ष्णंशुल्वंनागतारंस्वर्णंचमारितंपृथक् ॥ एकद्वित्रिचतुःपंचक्रमषट् शुद्धसूतकं ॥ चांगेर्याश्चद्रवैर्मर्द्यंदिनैकंकृतगोलकं ॥ मृगांकवत्पचे त्स्थाल्यांवालुकाभिःप्रपूरितं ॥ उद्धृत्यचूर्णयेत्श्लक्ष्णंहररुद्रोरसोत्तमः ॥ मृगांकवत्क्षयंहंतितद्वन्मात्रानुपानकं ॥

अर्थ—तिखयाचें भस्म १, ताम्रभस्म २, शिशाचें भस्म ३, रौप्यभस्म ४, सुवर्णभस्म ५ व ६ भाग शुद्ध पारा, याप्रमाणें तोळेवार भस्में एकत्र करून चुक्याच्या रसांत एकदिवस घोटून त्याचा गोळा करावा; आणि मृगांकासारिखा वालुकायंत्रांत पचन करावा. शीत झाल्यावर घोटून बारीक करावा. हा हररुद्ररस मृगांकरसासारिखा क्षयाचा नाश करितो. याला अनुपान व पथ्य मृगांकासारिखेंच करावें.

नीलकंठरस.

विषंक्षुद्राउशीरंचहरिद्रागोपयोमधु ॥ कुटजस्यत्वचाचूर्णंसमांशं माषमात्रकं ॥ राजयक्ष्महरंखादेद्रसोयंनीलकंठकः ॥

अर्थ—वचनाग, रिंगणी, वाळा, हळद, कुडयाच्या सालीचें चूर्ण हें समभाग घेऊन त्यांचें चूर्ण मध व गाईचें दूध यांशीं एक मासा द्यावें; हा नीलकंठरस भक्षण केला असतां, क्षयनाशक आहे.

शंखगर्भपोटलीरस.

शंखनाभिर्गवांक्षीरैःपेषयेन्निष्कषोडश ॥ तेनमूषाप्रकर्तव्यातन्मध्येभस्म सूतकं ॥ निष्कार्धगंधकंत्रीणिचूर्णीकृत्यविनिःक्षिपेत् ॥ रुध्वातद्वेष्टयेद्व स्त्रेमृत्तिकांलेपयेद्बहिः ॥ शोष्यंगजपुटेपश्चान्मूषयासहचूर्णयेत् ॥ गुंजैक मनुपानैश्चक्षयंहंतिमृगांकवत् ॥ पोटलीशंखगर्भोयंयोजयेद्वातपित्तजित् ॥

अर्थ—शंखाची नाभी ८ तोळे घेऊन बारीक चूर्ण करून त्याची मूस करावी; तींत पाऱ्याचें भस्म घालून त्यावर दीड तोळा गंधकाचें चूर्ण करून वर घालावें; नंतर मुशीचे तोंड रोधून त्याच्या बाहेर मातकापड करावें; सुकल्यानंतर गजपुट देऊन शीत झाल्यावर काढून मुसेसहवर्तमान बारीक वाटावी; हा शंखगर्भपोटलीरस एक गुंज द्यावा; आणि पथ्य मृगांकासारिखें करावें; ह्मणजे क्षय, आणि वातपित्त यांचा नाश करितो.

हेमगर्भरस.

रसभस्मद्विनिष्कंतुनिष्कैकंस्वर्णभस्मकं ॥ शुद्धगंधकद्वौनिष्कौमर्दयेच्चित्रकद्रवैः ॥ द्वियामांतेविशोष्याथतेनपूर्यंवराटिका ॥ गोक्षीरेटंकणंपिष्ट्वातेनरोध्यवराटिका ॥ वराटीमृन्मयेभांडेरुध्वागजपुटेपचेत् ॥ स्वांगशीतेविचूर्ण्याथपोटलीहेमगर्भकः ॥ मृगांकवच्चतुर्गुंजाभक्षितोराजयक्ष्मनुत् ॥

अर्थ—पाऱ्याचें भस्म १ तोळा, अर्धा तोळा स्वर्णभस्म, शुद्ध गंधक १ तोळा, हे एकत्र करून चित्रकाच्या रसांत दोन प्रहर खलावें; नंतर सुकवून कवड्यांत भरून त्यावर गाईच्या दुधांत टांकणखार घोटून त्याणें कवड्यांची तोंडें बंद करून त्या कवड्या बोळक्यांत भरून बोळक्याचें तोंड बंद करून गजपुट द्यावें. आपोआप थंड झाल्यावर काढून घोटून बंद करून ठेवावा; याचें नाव हेमगर्भपोटली. हा चार गुंजा द्यावा. व पथ्य मृगांकासारिखें द्यावें; ह्मणजे तो क्षयाचा नाश करितो.

नागेश्वररस.

मृतसूतंमृतंनागंगंधकंतुत्थटंकणं ॥ प्रत्येकंकर्षनिष्कंस्यान्मृतशुल्वंद्विनिष्ककं ॥ शंखचूर्णंद्विनिष्कंस्यान्नवनिष्कंवराटिका ॥ पूरयेत्पूर्ववच्चूर्णंपुटयेल्लोकनाथवत् ॥ ततश्चार्कदलद्रावैर्मर्दरुध्वापुटेपचेत् ॥ आदायचूर्णयेत्श्लक्ष्णंतुल्यांशैर्मरिचैर्युतं ॥ चूर्णाच्चतुर्गुणंगंधमेकीकृत्यविचूर्णयेत् ॥ पंचमाषघृतैर्लेह्यमसाध्यंराजयक्ष्मजित ॥ शोफोदराशोग्रहणीज्वरंगुल्मंचनाशयेत् ॥

अर्थ—पारदभस्म, नागभस्म, गंधक, मोरचूत, टांकणखार, हे प्रत्येकीं दीड दीड तोळा, ताम्रभस्म व शंखभस्म हीं एकेक तोळा, कवड्या ४॥ तोळे, घेऊन पूर्वीं प्रमाण कवड्यांत भरून लोकनाथासारिखें पुट द्यावें; नंतर रुईच्या पानांच्या रसांत खलून गजपुट द्यावें. थंड झाल्यावर काढून समान मिर्यें घालोन बारीक खलून त्याच्या चौपट गंधक त्यांत मिसळावा; ह्मणजे हा नागेश्वर रस तयार होतो. हा पांच मासे घेऊन तुपाशीं द्यावा; ह्मणजे असाध्य क्षयरोग, सूज उदर, मूळव्याध, संग्रहणी, ज्वर, आणि गुल्म यांचा नाश करितो.

कालांतकरस.

कुर्याल्लोहमयींमूषामुन्नतांद्वादशांगुलां ॥ मर्दितंस्वर्णवागाहिग्रहकन्या

रसैरसं ॥ लशुनैर्याममात्रंचपिंडीकृत्वानिवेशयेत् ॥ कृत्वापूर्वोक्तमूपायांसूतपादंचगंधकं ॥ निर्गुंडीरससंपिष्टंतन्मूपायांविनिःक्षिपेत् ॥ आच्छाद्यलोहचक्रेणरुद्रयंत्रेणजारयेत् ॥ एवमष्टगुणेजीर्णेसमुत्धृत्य विचूर्णयेत् ॥ पंचगुंजामितंखादेदनुपानंमृगांकवत् ॥ अनंकालांतको नामरसोयंराजयक्ष्मजित् ॥

अर्थ—बारा आंगळें उंच लोखंडाची मूस करावी. त्यांत धोतरा, डुकरकंद, कुमारी, व लसूण, या प्रत्येकांत प्रहर प्रहर घोटलेला पारा गोळा करून त्या पूर्वोक्त मुसेंत चतुर्थांश गंधक निर्गुंडीच्या रसांत खलून त्या मुसेंत घालून त्यावर तो पारा ठेऊन वर गंधक ठेऊन लोखंडाचा पत्रा मुशीच्या तोंडावर लाऊन ती रुद्रयंत्रांत पचन करावी. या प्रमाणें आठपट गंधक जिरला ह्मणजे तो रस काढून घोटावा; आणि मृगांकादिकाच्या सारख्या अनुपानाशीं पांच गुंजा द्यावा. हा कालांतकनामक रस क्षयाचा नाश करितो.

चंद्रायतनरस.

शुद्धसूतसमंगंधंसूततुल्यंचसैंधवं ॥ शमीश्वेतदलाद्रावैर्मर्दितंगोलकीकृतं ॥ नागवल्लीदलव्योपैःपाच्यंपाचनयंत्रके ॥ दिनांतेऽर्ध्वलग्नंतुग्राह्यंभक्ष्यंत्रिगुंजकं ॥ पर्णखंडेनसंयुक्तंमासैकंराजयक्ष्मजित् ॥ रसश्चंद्रायतोनामह्यनुपानंमृगांकवत् ॥

अर्थ—शुद्ध पारा, शुद्ध गंधक व सैंधव हीं समभाग घेऊन पांढऱ्या शमीच्या पाल्याच्या रसांत घोटून गोळा करून तो सुंठ, मिरीं पिंपळी व पानवेलीचीं पानें यांशीं डमरू यन्त्रांत भरून तें एकदिवस चुलीवर ठेऊन खालीं अग्नि करावा. सायंकाळीं डमरूयंत्रांत वर लागलेला पारा घेऊन तो तीन गुंजा विड्याशीं एक महिनाभर द्यावा; याला अनुपान व पथ्य मृगांकासारिखें आहे.

प्राणनाथरस.

लोहभस्मपलैकंतुद्विपलंभृंगजद्रवैः ॥ वराभांर्गीभवंद्रावंपलैकैकंनियोजयेत् ॥ पलैकंत्रैफलेक्वाथेसर्वंभर्ज्यंचखर्परे ॥ लोहांशंमाक्षिकंशुद्धंमर्द्यंपर्वोदितैर्द्रवैः ॥ रुध्वात्रिभिःपुटैःपाच्यद्रवैर्मर्द्यंपुनःपुनः ॥ मृतंसूतं मृतवंगंनिष्कंनिष्कंविमिश्रयेत् ॥ द्वौनिष्कौशुद्धगंधस्यचतुर्निष्कावराटिका ॥ एकीकृत्यपुटेपाच्यंपूर्वलोहविमिश्रितं ॥ पूर्वोक्तैस्तुद्रवैर्मर्द्यंपुटेनैकेनपाचयेत् ॥ चूर्णयेन्मरिचंसप्ततूत्थटंकणयोर्दश ॥ मेलये

॥पृथङ्निष्कंप्राणनाथाह्वयोरसः ॥ भक्षयेन्निष्कपादार्धमसाध्यराज यक्ष्मनुत् ॥ शोफोदरार्शोग्रहणीज्वरगुल्महरंतथा ॥

अर्थ–लोहभस्म ४ तोळे घेऊन त्याला ८ तोळे माक्याच्या रसांत खलावें; नंतर गुळवेल व भारंगी यांचा काढा व त्रिफळ्याचा काढा चार चार तोळे, एकत्र करून अग्नीवर ठेऊन खापरांत भाजावा. व लोहाइतकें शुद्ध माक्षीक घालून पूर्वोक्तरसाशीं घोटावें; आणि पुट द्यावें. या प्रमाणें तीन पुटें द्यावीं; नंतर पारदभस्म व ताम्रभस्म हीं प्रत्येकीं सहा सहा मासे, शुद्ध गंधक १ तोळा, कवड्या चार तोळे, एकत्र करून त्याला पुट देऊन तें त्या लोहांत मिसळून पूर्वोक्त रसांच्या भावना देऊन पुनः एक पुट द्यावें: नंतर काढून त्यांत ३॥ तोळे मिर्ये, मोरचूत व टांकणखार पांच पांच तोळे त्यांत मिसळावें; ह्मणजे हा प्राणनाथरस तयार झाला. हा ६ गुंजा द्यावा; असाध्य क्षय सूज, उदर, मुळव्याध, संग्रहणी, ज्वर; आणि गुल्म यांचा नाश करितो.

सुवर्णपर्पटीरस.

शुद्धंसुवर्णदलमष्टगुणेनशुद्धसूतेनपिंडितमयोवसुभागभाजं ॥ गंधेद्रुतेदरदवन्हितुलोहपात्रेदत्वाविलोड्यलघुलोहशलाकयातत् ॥ मंदंनिरस्यसुरभीमलमंडलस्थरंभादलेतदुपरिप्रणिधायचान्यत् ॥ रंभादलंलघुनियंत्र्यतदाददीतशीतंसुवर्णरसपर्पटिकाभिधानं ॥ पित्तोल्वणेसासितयातुगयाथवातश्लेष्मोल्वणेकिलतुगामधुपिप्पलीभिः ॥ क्षीणेविरेकिणिचशोषिणिमंदवन्हौपांडौप्रमेहिणिचिरज्वरिणिग्रहण्यां ॥ वृद्धेशिशौसुखिनिराज्ञितदेवमार्यमेवस्वमेतदुदितंहितमामयघ्नं ॥

अर्थ–सोन्याचें वर्ख १ भाग, शुद्ध पारा ८ भाग व लोह ८ भाग, हीं सर्व एकत्र खलोन लोहपात्रांत गंधक तापवून त्यांत हिंगूळ १ व चित्रक १ यांसहवर्तमान पूर्वोक्त औषधें घालोन पळीच्या दांड्यानें ढवळून नंतर गोमयाचें मंडळ करून त्यांत केळीचें पात्र टेऊन त्यावर ते सर्व ओतून पुनः दुसरें केळीचें पान वर घालोन झांकावें. शीत-झाल्यावर काढून घ्यावें. याला सुवर्णपर्पटी ह्मणतात. ही पित्ताधिकव्याधीवर वंशलोचन व साकर यांशी व वातश्लेष्माधिकव्याधीवर वंशलोचन, मध व पिंपळी यांशीं घ्यावी; आणि ही क्षीणत्व, रेच झाले असतां, क्षयावर, अग्निमांद्य, पांडू, प्रमेह, ज्वर, संग्रहणी, वृद्ध, बाळक व राजा याला देण्यास योग्य. ही संपूर्ण रागाचा नाश करित्ये.

प्राणदा पर्पटी.

सूताभ्रायोहिवंगोपणविषमखिलांशेनगंधेनकृत्वाकोलाग्नौविद्रुतेनक्षण

ममलमिदंढालितंगोमयस्थे ॥ रंभापत्रेमुनान्येनचदृढपिहितंप्राणदाप र्पटीस्यात्पांडौरेकेग्रहण्यांज्वररुजिकसनेयक्ष्ममेहाग्निमांद्ये ॥ प्राणदा पर्पटीसैषाभाषिताशंभुनास्वयं ॥ तत्तद्रोगानुपानेनसर्वरोगविनाशिनी ॥

अर्थ—पारा, अभ्रक, लोह, वंग, मिरें व बचनाग, हीं समभाग व सर्वांबरोबर गंधक घेऊन लोहपात्रांत बोरीच्या काष्ठाच्या अग्नीवर पातळ करून त्यांत सर्व औषध घालोन गोमयमंडलांत केळीचें पान ठेऊन त्यावर ओतून दुसरें पान झांकण घालावें. शीत झालें ह्मणजे घ्यावें.या औषधास प्राणदा पर्पटी ह्मणतात. हीं पांडुरोग, रेच, ग्रहणी, ज्वर, अरुचि, कास, क्षय, मेह व अग्निमांद्य यांवर द्यावी. ही प्राणदा पर्पटी महादेवानें स्वतः सांगीतली. ही योग्य अनुपानाशीं दिली असतां, सर्वरोगांचा नाश करील,

कुमुदेश्वररस.

पारदंशोधितंगंधमभ्रकंचसमंसमं ॥ तदर्धंदरदंदद्यात्तदर्धंचमनःशिलां ॥ सर्वार्धंमृतलोहंचखल्वमध्येविनिःक्षिपेत् ॥ द्विःसप्तभावनादेया शतावर्यारसेनच ॥ततःसिद्धोभवत्येपकुमुदेश्वरसंज्ञकः॥ सितयामरिचे नाथगुंजाद्वित्रिप्रमाणतः॥ भक्षयेत्प्रातरुत्थायपूजयित्वेष्टदेवताः ॥ यक्ष्माणमुग्रंहंत्येववातपित्तकफामयान् ॥ ज्वरादीनखिलान्रोगान् यथादैत्यान्जनार्दनः ॥ सतताभ्यासयोगेनवलीपलितनाशनः ॥

अर्थ—शुद्ध पारा, शुद्ध गंधक व अभ्रकभस्म हीं समभाग; त्याचे निमा हिंगूळ, त्याचे निमा मनशीळ व सर्व औषधाचे निमें मृतलोह हीं सर्व खलांत घालोन शतावरीचे रसाच्या चवदा भावना द्याव्या; ह्मणजे हा कुमुदेश्वर सिद्ध झाला. हा साकर व मिरें यांबरोबर दोन किंवा तीन गुंजा प्रातःकाळीं इष्टदेवतेचें पूजन करून घ्यावा; ह्मणजे उग्र क्षय, वात, पित्त, कफरोग; आणि ज्वरादिक संपूर्ण रोगांचा नाश करितो. जसा विष्णु दैत्यास मारितो तसा, हा रस संपूर्ण रोगांचा नाश करितो. या रसाचे सतत सेवन केल्यानें वलीपलित नाश पावतें.

पंचामृताख्यरस.

भस्मीभूतसुवर्णतारदिनकृत्सूताभ्रसत्वैःक्रमात्संवृद्धैस्त्रितयंत्रयःक्रमिह रांभोदैर्युतःकट्फलैः ॥ निर्गुंडीदशमूलवन्हिरजनीव्योपार्द्रकैर्भावितो गोलंकृत्यविशेषतोनिगदितःपंचामृताख्योरसः ॥ नानेनसदृशःकोपिर सोस्तिभुवनत्रये ॥ निहंतिसकलान्रोगान्भवरोगमिवाच्युतः ॥ सर्वरो गहरःसूतस्तत्तद्रोगानुपानतः ॥ अयंपंचामृतोनृणांत्रिदशानामिवामृतं ॥

अर्थ—सुवर्णभस्म, रौप्यभस्म, ताम्रभस्म, पारदसत्व व अभ्रकसत्व हीं क्रमानें एकोत्तर वृद्धीनें घ्यावीं; व वावडिंग नागरमोथे, कायफळ हीं तीन तीन भाग एकत्र करून नंतर निर्गुंडी, दशमूळ, चित्रक, हळद, त्रिकटु व आलें यांचे रसाच्या भावना देऊन गोळा करावा; म्हणजे पंचामृताख्यरस होतो. या रसासारिखा त्रिभुवनांत दुसरा रस नाहीं. हा संपूर्णरोगांचा नाश करितो. जसा विष्णु जन्ममरणाचा नाश करितो. तसा हा संपूर्ण रोगांचा योग्य अनुपानानें नाश करितो. हा पंचामृतरस मनुष्याला अमृतप्रमाण आहे.

स्वयमग्निरस.

शुद्धसूतंद्विधागंधंकुर्यात्खल्वेनकज्जलीं ॥ तयोःसमंतीक्ष्णचूर्णमर्दयेत्कन्यकाद्रवैः ॥ द्वियामांतेकृतंगोलंताम्रपात्रेविनिःक्षिपेत् ॥ आच्छाद्यैरंडपत्रेणयामार्धेत्युष्णतांभवेत् ॥ धान्यराशौन्यसेत्पश्चादहोरात्रात्समुद्धरेत् ॥ संचूर्ण्यगालयेद्वस्त्रेसत्यंवारितरंभवेत् ॥ भावयेत्कन्यकाद्रावैःसप्तधाभृंगजैस्तथा ॥ काकमाचीकुरंटोत्थद्रवैर्मुंडयापुनर्नवैः ॥ सहदेव्यमृतानील्यानिर्गुंडयाश्चित्रजैस्तथा ॥ सप्तधातुपृथक्द्रावैर्भाव्यंशोष्यंतथातपे ॥ सिद्धयोगोह्ययंख्यातःसिद्धानांचमुखागतः ॥ अनुभूतोमयासत्यंसर्वरोगगणापहः ॥ स्वर्णादीन्मारयेदेवंचूर्णीकृत्यतुलोहवत् ॥ त्रिफलामधुसंयुक्तःसर्वरोगेषुयोजयेत् ॥ त्रिकटुत्रिफलैलाभिर्जातीफललवंगकैः ॥ नवभागोन्मितैरेतैःसमःपूर्वरसोभवेत् ॥ संचूर्ण्यलोडयेत्क्षौद्रैर्भक्ष्यंनिष्कद्वयंद्वये ॥ स्वयमग्निरसोनाम्नाक्षयकासनिकृंतनः ॥

अर्थ—शुद्ध पारा एकभाग व गंधक दोन भाग घेऊन दोहोंला एका जागीं खलून कज्जली करून त्याचे समभाग पोलादी लोहाचें चूर्ण घेऊन त्यांत मेळवून कोरफडाचे रसांत दोन प्रहर खलून त्याचा गोळा करून नंतर तांब्याचे ताम्हनांत तो गोळा ठेऊन त्याजवर सुरती एरंडाचीं पानें झांकण घालून चार घटकापर्यंत ठेवावा. तेणेंकरून तो गोळा फार उष्ण होतो. त्याला धान्याचे राशीमध्यें एक अहोरात्र पुरून ठेऊन दुसरे दिवशीं बाहेर काढावा, तो त्याचे भस्म होतें. त्याचा खल करून फडक्यांत गाळून पाण्यावर टाकिलें असतां, निश्चयें करून तरतें, यांत संशय नाहीं. मग त्या भस्माला खलांत घालून ज्या वनस्पतीचीं पुटें द्यावयाचीं त्या येणें प्रमाणें. कोरफडाचे रसांत खलून उन्हांत तापवून वाळल्यावर फिरून त्याच रसांत खलोन उन्हांत तापवून वाळवावें, याप्रमाणें सातपुटें कोरफडाचीं द्यावीं. तशींच माक्याचे रसाचीं व कांगणीचे रसाचीं, कोऱ्हांटयाचे रसाचीं व मुंडीचे रसाचीं व पुनर्नव्याचे रसाचीं व सहदेवी व गुळवेल, नीळी व निर्गुंडी व चित्रक यांचे रसाचीं पुटें वेगळीं वेगळीं सात वारीं तेणेंकरून हें

रसायन सिद्ध होतें, याला स्वयमग्निरस असें ह्मणतात. हा रस विख्यात आहे. महान् महान् सिद्ध पुरुषानीं सांगितला; यास्तव त्यां अनुभव घेऊन कथिला. हा स्वयमग्निरस सारे रोग दूर करण्याविषयीं त्रिफळेचें चूर्ण व मध या अनुपानाशीं दोन निष्क प्रमाण घ्यावा. तेणेंकरून सारे रोग दूर होतात. सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळ-काठी, विलायची, जायफळ, लवंग, हीं नऊ औषधें समभाग घेऊन चूर्ण करून त्याचे समभाग हा स्वयमग्निरस घेऊन दोन्हीं एकत्र करून मधींत मेळवून दोन निष्कप्रमाण घ्यावा. तेणें करून क्षयरोग व कासरोग हे जातात, व रसायनाचे रीतीनें स्वर्णादिक धातूंचें लोहासारखें चूर्ण करून भस्में करावीं. तीं होतात.

राजमृगांक.

रसभस्मत्रिभागंस्याद्भागैकंहेमभस्मकं ॥ मृततांम्रस्यभागैकंशिला गंधकतालकं ॥ प्रतिभागद्वयंशुद्धमेकीकृत्वाविचूर्णयेत् ॥ वराटान्पूर येत्तेनचाजाक्षीरेणटंकणं ॥ पिष्ट्वातेनमुखंरुध्वामृद्भांडेसन्निधापयेत् ॥ शुष्कंगजपुटेपाच्यंचूर्णयेत्स्वांगशीतलं ॥ रसोराजमृगांकोयंचतुर्गुंजः क्षयापहः ॥ एकोनत्रिंशन्मरिचैर्घृतेनसहभक्षयेत् ॥ दशानांपिप्पलीनां चचूर्णंदत्वाप्रदापयेत् ॥ क्षयेकासेज्वरेपांडौग्रहण्यांचातिसारके ॥

अर्थ—पाऱ्याचें भस्म ३, सुवर्ण भस्म १, ताम्र भस्म १ भाग व मनशीळ, गंधक, हरताळ हीं प्रत्येक २ भाग एकत्र खलोन कवड्यांत भरून नंतर शेळीचे दुधांत टांकणखार खलोन त्या कवड्यांची तोंडें टांकणखारानें बंद करावीं, शुष्क झाल्यावर मडक्यांत भरून तोंड बंद करून गजपुट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर खलवें, याला राजमृगांक ह्मणतात. एकुणतिस मिऱ्याचें चूर्ण, अथवा दहा पिंपळ्यांचें चूर्ण; आणि तूप यांचें बरोबर चार गुंजा खावा; ह्मणजे क्षय, खोकला, ज्वर, पांडु, ग्रहणी व अतिसार यांचा नाश करील.

दुसरा प्रकार.

रसेनतुल्यंकनकंतयोस्तुसाम्येनयुज्यान्नवमौक्तिकानि ॥ रसप्रमाणो बलिरग्निभागःक्षारश्चसर्वंतुषवारिणातु ॥ संमर्द्यवस्त्रेनुविधायगोलंदि नंपचेत्तंलवणेनपूर्णे ॥ भांडेमृगांकोयमतिप्रगल्भक्षयाग्निमांद्यग्रहणी गदेपु ॥ साज्योषणाभिर्मधुपिप्पलीभिर्वल्लोस्यदेयोनततोधिकस्तु ॥ प थ्यंहितंशीतलमेवयोज्यंत्याज्यंसदापित्तकरंविदाहि ॥

अर्थ—पारा, सुवर्ण, या दोहोंचे बरोबर मोतीं आणि, पाऱ्याचे समभाग गंधक, टांकणखार ३ भाग, या प्रमाणें घेऊन भाताचे कोंड्याच्या कषायानें खलून वस्त्रांत गोळी बांधून मडक्यांत खालीं वर मीठ घालून ती गोळी मध्यें ठेऊन गजपुट द्यावें;

ह्मणजे हा मृगांक मोठा प्रगल्भ होतो. हा क्षय, अग्निमांद्य, संग्रहणी, यांवर तूप, मिरपूड, अथवा मध, पिंपळी, याचे बरोबर वालभार द्यावा; अधिक देऊ नये. यावर शीतल पदार्थ पथ्यास द्यावे. पित्तकारक व उष्ण असे देऊ नये.

लोकेश्वर.

पलंकपर्दच्चूर्णस्यपलंपारदगंधयोः ॥ मापटंकणकस्यैकोजंबी
राद्भिर्विमर्दयेत् ॥ पुटेल्लोकेश्वरोनाम्नालोकनाथोयमुत्तमः ॥
क्षतेकष्टंरक्तपित्तमन्यरोगान्क्षयंजयेत् ॥ पुष्टिवीर्यप्रसादौजःकां·
तिलावण्यदःपरः ॥ कोस्तिलोकेश्वरादन्योनृणांशंभुमुखोद्गतात् ॥

अर्थ—कवडीभस्म, पारा व गंधक, हीं प्रत्येकीं ४ तोळे, टांकणखार एक मासा या प्रमाणें घेऊन लिंबाच्या रसांत खलावें, नंतर पुट द्यावें; ह्मणजे हा लोकेश्वररस होतो. याला लोकनाथ ही ह्मणतात. हा कष्टावाचून रक्तपित्त, क्षय; इत्यादि रोगनाश करील; आणि पुष्टि, वीर्याचा निर्दोषपणा, कांति, सुंदरपणा, यांप्रत करील. हा शंभुमुखापासून निघालेला लोकेश्वर, याहून दुसरा मनुष्यास सुख देणारा कोण आहे.

नवरत्नराजमृगांक.

सूतंगंधकहेमताररसकंवैक्रांतकांतायसंवंगंनागपविप्रवालविमलामा
णिक्यगारुत्मतं ॥ तार्क्ष्यंमौक्तिकपुष्परागजलजंवैडूर्यकंशुल्वकंशु
क्तिस्तालकमभ्रहिंगुलशिलागोमेदनीलंसमं ॥ गोक्षूरैःफणिवल्लिसिंह
वदनामुंडीकणाचित्रकैरिक्षुच्छिन्नरुहाहरप्रियजवाद्राक्षावरजिद्रवैः ॥
कंकोलैर्मदनागकेसरजलैर्माव्यंपृथक्सप्तधाभांडेसिंधुभृतेमृगांकवदयं
पाच्यःक्रमाग्नौदिनं ॥ भूयःप्राक्समुदात्दतैर्द्रववयैस्तंभावयेत्पूर्ववत्प
श्चात्तुल्यविभागशीतलरजःकस्तूरिकाभावना ॥ गौप्याद्गौप्यतरंरसाय
नमिदंश्रीशंकरेणोदितंगुंजासिंधुयुतःकणामधुयुतःशोफेसपांडूामये ॥
वातव्याधिमुपद्रवैश्चसहितंमेहांस्तथाविंशतिसंयोज्यस्तुहरीतकीगुडयु
तोवानासकेदुर्जये ॥ गंभीरेचगुडूचिसत्वचपलाक्षौद्रैस्तुसंयोजितश्चा
ध्मानारुचिशूलमांद्यकसनापस्मारवातोदरान् ॥ श्वासान्संग्रहणींहली
मकमथोसर्वज्वरान्नाशयेद्धातून्पुष्टयतिक्षयंक्षपयतिश्यामाशतंयौवनं ॥
प्रौढाटोपयुतंकरोतिसहसातारुण्यगर्वोज्झितंसिद्धोराजमृगांकएवजय
तिस्वस्यानुपानैर्गदान् ॥

अर्थ—पारा, गंधक, सुवर्णभस्म, रौप्यभस्म, कालखापरी, वैक्रांतभस्म, कांतलोहाचें भस्म, वंगभस्म, शिशाचें भस्म, हिऱ्याचें भस्म, प्रवालभस्म, विमलमण्याचें भस्म, माणिकभस्म, पाचेच्या मण्याचें भस्म, सुवर्णमाक्षिकभस्म, मौक्तिकभस्म, पुष्कराजभस्म, शंखभस्म, वैडूर्यभस्म, ताम्रभस्म, शिंपांचें भस्म, हरताळभस्म, अभ्रकभस्म, हिंगूळ, मनशीळ, गोमेदमण्याचें भस्म, नीलमण्याचें भस्म, हीं सर्वसमभाग घेऊन गोखरूं, नागवेल, अडुळसा, गोरखमुंडी, पिंपळी, चित्रक, ऊंस, गुळवेल, धोत्रा, भांग, द्राक्षे, शतावरी, कंकोळ, कस्तुरी, नागकेशर, यांचे रसाच्या अथवा ज्याचा रस न निघेल त्याच्या काढ्याच्या पृथक् पृथक् सात सात भावना द्याव्या. त्यांतून एकंदर १०५ भावना देऊन गोळा करून एकामडक्यांत सैंधव भरून त्यामध्यें तो गोळा ठेऊन क्रमानें मंदाग्नि, मध्याग्नि, तीक्ष्णाग्नि, देऊन मृगांकाप्रमाणें पचवावा; नंतर पुनः पुर्वी सांगितल्या प्रमाणें भावना द्याव्या; नंतर कापूर आणि कस्तुरी समभाग घेऊन यांची भावना द्यावी; ह्मणजे हा सिद्ध झाला, हा गुह्यापेक्षां अत्यंत गुह्य असा हा रस श्रीशंकरानें सांगितला. हा गुंजभार सैंधवाबरोबर सेवन केला, तर सूजनाशक; आणि मध व पिंपळी यांबरोबर पांडुरोग, आणि उपद्रवासहित वातरोग, वीस प्रकारचे मेह यांचा ही नाशक आहे, आणि हिरडा व गुळ यांचे बरोबर वातरक्तनाशक आहे; व आध्मान अरुचि, शूल, अग्निमांद्य, कास, अपस्मार, वातोदर, श्वास, संग्रहणी, हलीमक, ज्वर, क्षय, यांवर अनुपानसहित सेवन केला असतां, त्यांचा नाशक आहे, आणि धातुपुष्टीकरणारा, शंभर तरुणस्त्रियांचा गर्व दूरकरणारा, शक्ति देणारा आहे. ह्याला राजमृगांक ह्मणतात. हा योग्यअनुपानाशीं सर्व रोगाचा नाश करील.

मृगांकरस.

रसवलितपनीयंयोजयेत्तुल्यभागंतदनुयुगुलभागंमौक्तिकानांशुभानां ॥ यवजचरणभागंमर्दयेत्सर्वमेतद्दिनमपितुपवारागोलकंलब्धमात्रे ॥ विधायमुद्रांत्रिदधीचभांडेचुल्यांसमुद्रेलवणेनपूर्णे ॥ दिनंपचेच्चानुमृगांकनामाक्षयाग्निमांद्यग्रहणीविकारे ॥ योज्यःसदावह्निजसर्पिपावाकृष्णामधुभ्यांसततंत्रिगुंजः ॥ वर्ज्यंसदापित्तकरंहिवस्तुलोकेशवत्पथ्यविधिर्निरुक्तः ॥

अर्थ—पारा, गंधक व सोनें हीं समभाग, मौक्तिक २ भाग, यवक्षार ॥ भाग हीं एकत्र करून भाताच्या कोंड्याच्या काढ्यांत गोळा होई तों खलून गोळा करून मातकापड करून तो मिठानें भरलेल्या भांड्यांत ठेऊन वर मीठ घालून भांड्याचें तोंड बंद करून एक दिवस चुलीवर अग्नि द्यावा. शीत झाल्यावर काढून घ्यावा. हा मृगांकरस क्षय, अग्निमांद्य, संग्रहणी, यांवर मध व पिंपळी यांशीं तीन गुंजा द्यावा; आणि पित्तकारक वस्तु वर्ज्य कराव्या; व लोकनाथाप्रमाणें पथ्य द्यावें.

कनकसिंदूर.

रसःकनकमार्क्षिकः कनकमाक्षिकस्तालकः शिलारसकगंधकारससमाः सतुल्याइमे ॥ विमर्धपयसारवेःमकलमेतदस्योपारिद्रवैःप्रतिदिनंपृथक् तदितिभावयेद्बुद्धिमान् ॥ जंयामुनिकलिप्रियादहनभृंगवासोद्भवैर्विभाव्यचरसस्ततःसुदृढगोलकंस्वेदयेत् ॥ मृगांकवदथार्द्रकद्रवभरेणतंसप्तधाविमर्दचकटुत्रयांबुभिरयंक्षयस्यांतकृत् ॥ रसःकनकसिंदुरोभवतिसन्निपातेप्ययंसदार्द्रकरसैस्तथापवनगुल्मशूलादिहृत् ॥ सविश्वघृतयोजितःसकलमत्रपथ्यंहितंमृगांकवदथापरंकिमपिनैवयोज्यंक्वचित् ॥

अर्थ—पारा, सोनें, सुवर्णमाक्षिक, हरताळ, मनशिळ, कलखापरी, गंधक व मोरचूत हीं समभाग घेऊन पारा व गंधक यांची कज्जली करून सर्व औषधें एकत्र करून रुईचे चिकांत त्याचा खल करावा; नंतर शेवरी, हातगा, बेहेडा, चित्रक, माका व अडुळसा या प्रत्येकाचे रसांत एकेक दिवस खल करावा; नंतर गोळा करून भूधरयंत्रांत मृगांकासारखें पुट द्यावें; नंतर काढून आल्याच्या रसाच्या सात भावना द्याव्या; नंतर सुंठ, मिरीं व पिंपळीं यांच्या काढ्याच्या सात सात भावना द्याव्या. हा कनकसिंदूर क्षयरोगाचा नाश करितो. हा आल्याच्या रसाशीं सन्निपातावर द्यावा; आणि सुंठ व तूप याशीं वातव्याधीवर द्यावा. याला मृगांकासारिखें पथ्य करावें. त्याहून अधीक कांहीं भक्षण करूनये.

हेमाभ्रकरससिंदूर.

अभ्रकंरससिंदूरंमिश्रितंहेमभस्मना ॥ समभागंप्रकुर्वीतरसेनार्द्रकयोजितं ॥ क्षयंचक्षयपांडुंचक्षयकासचकुंभकं ॥ जयेन्मंडलपर्यंतंपूर्वकर्मविपाकवित् ॥

अर्थ—अभ्रकभस्म, रससिंदूर व सुवर्ण भस्म हीं समभाग घेऊन आल्याचे रसांत खलून दोन गुंजा सेवन करावीं; ह्मणजे क्षय, क्षयपांडु, कास, कुंभकामला यांतें जिंकील. कर्मविपाक जाणणारा असेल त्याणें मंडळपर्यंत घ्यावें.

सुवर्णभूपति.

शुद्धंसूतंसमंगंधंमृतशुल्वंतयोःसमं ॥ अभ्रलोहकयोर्भस्मकांतभस्मसुवर्णजं ॥ रजतंचविषंसम्यक्पृथक्सूतसमंभवेत् ॥ हंसपादीरसैर्मर्द्यंदिनमेकंवटीकृतं ॥ काचकूप्यांविनिःक्षिप्यमृदासंलेपयेद्बहिः ॥ शुष्कासावालुकायंत्रेशनैर्मृद्वग्निनापचेत् ॥ चतुर्गुंजमितंदेयंपिप्पल्यार्द्रद्रवे

णतु ॥ क्षयंत्रिदोषजंहंतिसन्निपातांस्त्रयोदश ॥ आमवातंधनुर्वातंशृं
खलावातमेवच ॥ आढयवातंपंगुवातंकफवाताग्निमांद्यनुत् ॥ कटी
वातंसर्वशूलंनाशयेन्नात्रसंशयः ॥ गुल्मशूलमुदावर्तंग्रहणीमतिदुस्त
रां ॥ प्रमेहमुदरंसर्वामश्मरींमूत्रविट्ग्रहं ॥ भगंदरंसर्वकुष्ठंविद्रधिंम
हर्तीतथा ॥ श्वासंकासमजीर्णंचज्वरमष्टविधंतथा ॥ कामलांपांडुरोगंच
शिरोरोगंचनाशयेत् ॥ अनुपानविशेषेणसर्वरोगान्विनाशयेत् ॥ यथा
सूर्योदयेनश्येत्तमःसर्वगतंतथा ॥ सर्वरोगविनाशायसर्वेषांस्वर्णभूपतिः ॥

अर्थ—पारा १, गंधक १, ताम्रभस्म २ व अभ्रक, लोह, कांत, सुवर्ण व रुपें या प्रत्येकाची भस्में १ भाग व बचनाग १ भाग याप्रमाणें घेऊन रक्तलाजाळूच्या रसांत एक दिवस खलोन गोळी करून कांचेच्या कुपींत भरून मातकापड करून शुष्क करून वालुका यंत्रांत मृदु अग्नि लावून पचन करावें. पिंपळी व आल्याचा रस. यांचे बरोबर चार गुंजा प्रमाणें द्यावा; म्हणजे त्रिदोष, क्षय, सन्निपात तेराप्रकारचे, आमवात, धनुर्वात, शृंखलावात, आढयवात, पंगुवात, कफवात, अग्निमांद्य, कटिवात, सर्वशूल, गुल्मशूल, उदावर्त, संग्रहणी, प्रमेह, उदर, सर्वाश्मरी, मूत्रकृच्छ्र, विड्ग्रह, भगंदर, सर्वकुष्ठ, मोठा विद्रधी, श्वास, कास, अजीर्ण, आठ प्रकारचा ज्वर, कामला पांडुरोग, शिरोरोग इत्यादि सर्व रोगास अनुपानविशेषेंकरून नाशाप्रत पावतील. जसा सूर्योदय झाला असतां; सर्व ठिकाणचा अंधकार नष्ट होतो, याप्रकारेंकरून हा स्वर्णभूपति सर्वांचा रोग नाशार्थ उत्पन्न झाला आहे.

लक्ष्मीविलासरस.

सुवर्णताराभ्रकताम्रवंगंत्रिलोहनागामृतमौक्तिकंच ॥ एतत्समंयज्वरस
स्यभस्मखल्वेकृतंस्यात्कनकज्जलीकं ॥ संमर्दयेन्माक्षिकसंप्रयुक्तंतच्छो
षयेद्धित्रिदिनंचघर्मे ॥ तत्कल्कमूषोदरमध्यगामीयत्नात्कृतंतार्क्ष्यपुटेन
पक्वं ॥ यामाष्टकंपावकमर्दितंचलक्ष्मीविलासोरसराजएषः ॥ क्षयेत्रि
दोषप्रभवेचपांडौसकामलासर्वसमीरणेषु ॥ शोकप्रतिश्यायविनष्टवी
र्यमूलामयंसर्वसशूलकुष्ठं ॥ हत्वाग्निमांद्यंक्षयसन्निपातंश्वासंचकासंच
हरेत्प्रयुक्तं ॥ तारुण्यलक्ष्मीप्रतिबोधनायश्रीमद्विलासोरसराजएषः ॥

अर्थ—सोनें, रुपें, अभ्रक, ताम्र, कथिल, वज्रलोह, शिसें, बचनाग, व मोतीं यांचीं भस्में समभाग आणि सर्वांचे बरोबर पाऱ्याचें भस्म घेऊन खलून तीं कज्जली मधामध्यें खलून शुष्क करावी; नंतर मुशींत घालून तार्क्ष्यपुट द्यावें; नंतर चित्रकाच्या काढयांत

आठ प्रहर खलावें; ह्मणजे हा लक्ष्मीविलासरस सिद्ध होतो. हा रसांचा राजा होय, हा त्रिदोषापासून झालेला क्षय, पांडु, कामला, सर्व वायु, सूज, पडसें, नष्टवीर्य, मुळव्याध शूल, कुष्ठ, अग्निमांद्य, संन्निपात, श्वास, व कास यांचा नाश करील. आणि तारुण्य, लक्ष्मी वाढविणारा, श्रीमंत लोकांस हा विलासच आहे असा होईल.

शिलाजत्वादिलोह.

शिलाजतुयुतंलोहंवल्लंतुविधिमारितं ॥
पथ्याशीसेवतेयस्तुसयक्ष्माणंव्यपोहति ॥

अर्थ–लोहभस्म दोनगुंजा शिलाजितावरोबर सेवन करून पथ्य केलें असतां; राजयक्ष्मा नाश पावतो.

पंचामृतरस.

भस्मसूताभ्रलोहानांशिलाजतुविषंसमं ॥ गुडूचीत्रिफलाक्काथसंकुलं गुग्गुलंतथा ॥ मृतनैपालताम्रंवामूततुल्यंनियोजयेत् ॥ एकीकृत्यद्वि गुंजंतुभक्षयेद्राजयक्ष्मनुत् ॥ पंचामृतोरसोनामह्यनुपानंचपूर्ववत् ॥

अर्थ–पारा, अभ्रक व लोह यांचीं भस्में, शिलाजित व वचनाग हे समभाग घेऊन वेहेडा व आवळकाठी यांत घोटून गुग्गुळ, व नेपाळी तांब्याचें भस्म, हे पाऱ्यासमान मिळवून घोटून त्यांतून दोनगुंजा अनुपानाशीं द्यावा; ह्मणजे हा पंचामृतरस राजयक्ष्म्याचा नाश करितो.

अमृतेश्वररस.

रसभस्मामृतासत्वंलोहंमधुघृतान्वितं ॥
अमृतेश्वरनामायंपड्गुंजाराजयक्ष्मजित् ॥

अर्थ–पारदभस्म, गुळवेलीचें सत्व व लोह हीं एकत्र करून मध व तूप यांशीं साहा गुंजा प्रमाण द्यावा, याला अमृतेश्वर ह्मणतात, हा क्षयनाशक आहे.

चिंतामणिरस.

रसेंद्रवैक्रांतकरौप्यताम्रसलोहमुक्ताफलगंधहेम्नां ॥ त्रिर्भावितंचार्द्र कमार्कवन्हिरसैरजागोपयसातथैव ॥ अर्शःक्षयंकासमरोचकंचजीर्णज्व रंपांडुमपिप्रमेहान् ॥ गुंजाप्रमाणंमधुमागधीभ्यांलीढंनिहन्याद्विषमंच वातं ॥ चिंतामणिरितिख्यातःपार्वत्यानिर्मितःस्वयं ॥

अर्थ–पारा, वैक्रांत, रुपें, तांबें, लोखंड, मोतीं, व सुवर्ण, यांचीं भस्में, व गंधक हीं समभाग घेऊन त्यास आलें, माका, व चित्रक, यांच्या रसाचा तिन तिन भावना; आणि

शेळी, गाय, यांच्या दुधाच्या तिन तिन भावना दिल्या; ह्मणजे चिंतामणिरस होतो. हा गुंजभार मध व पिंपळी यां बरोबर खावा; ह्मणजे मुळव्याध, क्षय, कास, अरोचक, अजीर्ण, ज्वर, पांडु व प्रमेह यांचा नाश करील. हा पूर्वी पार्वतीनें स्वतः निर्माण केला आहे.

दुसरा त्रैलोक्यचिंतामणि.

सूताभ्रस्वर्णताराद्रुणभिदुरशिलाताप्यगंधप्रवालायोमुक्ताशंखतालंव
रमिदमनलक्काथतःसप्तभाव्यं ॥ निर्गुंडीमूरणांभःपविरविपयसात्रिः
पृथग्भावयित्वाचापूर्वैतैर्वराटानथमिहिरपयष्टंकणालिप्तवक्त्रान् ॥ कृ
त्वाभांडेचरुध्वागजपुटजठरेयुक्तितस्तत्तुपक्त्वोद्धृत्यैतन्मर्दयित्वातद
खिलतुलितंसूतभस्मप्रदद्यात् ॥ वैक्रांतंसूततुर्यांशकमथमिलितंसप्तशः
शिग्रुमूलंत्वग्वाणस्तेनतुल्यंविपमनलवरंटंकणंचोपणंच ॥ पथ्याजाती
फलंचामरकुसुमकणानागरंवत्सनाभंतुर्यांशंमेलयित्वापृथगथदिवसंम
र्दयेल्लुंगतोयैः ॥ एपत्रैलोक्यचिंतामणिरखिलगदध्वांतविध्वंसहंसस्त
त्तद्रोगानुपानानुपसिकवलितःसार्धवल्लप्रमाणः ॥ वातव्याध्यामवात
ज्वरजठरकृमिश्वासशूलास्रवातासृक्पित्तक्षैण्यकासक्षयकफजगदोरः
क्षताजीर्णमेहे ॥ कुष्ठातीसारपांडुग्रहणिपुनमकेपुत्रणार्शःप्रकष्टेखांजेखं
जाढ्यवातेश्रुतिभगजगदेसर्वथैपप्रशस्तः ॥

अर्थ—पारा, अभ्रक, सुवर्ण, रुपे, माणिक, हिरा, मनशीळ, सुवर्णमाक्षिक, गंधक, प्रवाल, लोह, मोत्ये, शंख व हरताळ यांचीं भस्में, पारा व गंधक यांची कज्जली, हीं सर्व एकत्र करून त्यास चित्रकाचे काढ्याच्या सात भावना द्याव्या; नंतर निर्गुंडी, सुरण, यांचा रस, निवडुंग व रुई यांचा चीक, या प्रत्येकाच्या तीन तीन भावना द्याव्या; नंतर कवड्यांत भरून रुईच्या चिकांत टांकणखार खलून त्यानें त्या कवड्यांचीं तोंडें बंद करावीं; नंतर मडक्यांत भरून मुद्रा द्यावी; आणि गजपुट द्यावें. शीत झाल्यावर काढून खलावें; आणि सर्व चूर्णाचे समभाग पाऱ्याचें भस्म, तोरमल्लिचें भस्म पाऱ्याच्या चतुर्थांश, हीं सर्व एकत्र करून त्याचे सातपट शेवग्याच्या मुळांचें चूर्ण, पांच भाग दालचिनी व रक्तचंदन, चित्रक, टांकणखार, मिरें, हीं पाव पाव भाग, बाळहर्डी, जायफळ, लवंगा, पिंपळी, सुंठ व बचनाग हीं प्रत्येक चतुर्थांश मेळऊन नंतर त्याचा महाळुंगाचे रसांत एकदिवस खल करावा. हा त्रैलोक्यचिंतामणि संपूर्ण रोगरूपअंधकारनाश करण्याविषईं सूर्यासारिखा. हा रोगोक्त अनुपानाशीं तीन गुंजा घेतला असतां, संपूर्ण रोगांचा नाश करितो. हा वातव्याधि, आमवात, ज्वर उदर, कृमि, श्वास, शूल, रक्तवात, रक्तपित्त,

क्षीणता, कास, क्षय, कफरोग, उरःक्षत, अजीर्ण, मेह, कुष्ट, अतीसार, पांडु, ग्रहणी, तमकश्वास, व्रण, अर्श, पंगुवात, आढ्यवात, कर्णरोग व योनिरोग, यांवर प्रशस्त आहे.

वसंतकुसुमाकर.

प्रवालरसमौक्तिकाभ्रकमिदंचतुर्भागभाक्पृथक्पृथगथस्मृतेरजतहेम नीद्विशके ॥ अयोभुजगरंगकंत्रिलवकांविमर्द्याखिलंशुमेहानिविभाव येद्विपगियंधियासप्तशः ॥ द्रवैर्वृपनिशेक्षुजैःकमलमालतीपुष्पजैरसैः कदलिकंदजैर्मलयचंदनाद्युद्भवैः ॥ वसंतकुसुमाकरोरसपतिर्द्विवल्लोशि तःसमस्तगदद्दकृद्भवेत्किलनिजानुपानैरयं ॥ क्षिपेच्चसमधूपणैःक्षयगदेपु सर्वेष्वपिप्रमेहरजिरात्रिभिःसमधुशर्कराभिःसह ॥ सितामलयजद्र वैर्महतिरक्तपित्तेथवासितामधुसमन्वितैर्वृपभपल्लवानांद्रवैः ॥ त्रिजा तगरुचंदनैरपिचतुष्टिपुष्टिप्रदोमनोभवकरःपरोवमिपुशंखपुष्पीरसैः ॥ अर्मीहरसशर्करामधुभिरम्लपित्तामयेपरेपुचयथोचितंतनुगदेपुसंसेवयेत् ॥

अर्थ—प्रवाळ, पारा, मौक्तिक व अभ्रक हीं चार चार तोळे; रौप्यभस्म व सुवर्णभस्म हीं दोन दोन तोळे; लोह, सिसें व कथील यांचीं भस्में तीन तीन तोळे हीं सर्व एकत्र खलून अडुळशाचा रस, हळदीचा काढा, ऊसाचा रस, कमळ व मोगरी यांचे फुलांचा रस, केळीच्या कांद्याचा रस, कृष्णागरु व चंदन यांचा काढा; यां प्रत्येकाच्या त्यास सात सात भावना द्याव्या. हा वसंतकुसुमाकर दोन वाल रोगोक्त अनुपानाशीं घेतला ह्मणजे संपूर्णव्याधिनाश करितो. मध व मिरीं यां बरोबर क्षयावर द्यावा; प्रमेहावर हळदीचें चूर्ण व मध साकर यांशीं; चंदनाचा काढा व साकर यांशीं रक्तपित्तावर; किंवा साकर, मध, अडुळशाचा रस यांशीं द्यावा; व दालचिनी, तमालपत्र व वेलची यांचे चूर्णाशीं दिला असतां तुष्टि व पुष्टि, देऊन कामोद्दीपन करितो; आणि शंखाहुलीचे रसाशीं वांतीवर; शतावरीरस, साकर व मध यांशीं आम्लपित्तावर; व सर्वरोगांवर योग्यअनुपानाशीं सेवन करावा.

लोकेश्वरपोटली.

रसस्यभस्मवहिमपादांशेनप्रकल्पयेत् ॥ द्विगुणंगंधकंदत्वामर्दयेत्त्रि त्रकांबुना ॥ वराटकांश्चसंपूर्यटंकणेननिरुध्यच ॥ भांडेचूर्णप्रलिप्ते थशीघ्रंरुध्येत्तुमृन्मये ॥ शोपयित्वापुटेगर्तेरत्निमात्रेपराण्हके ॥ स्वां गशीतलमुत्धृत्यचूर्णयित्वाथविन्यसेत् ॥ एपलोकेश्वरोनामवीर्यपुष्टि विवर्धनः ॥ गुंजाचतुष्टयंखादेत्पिप्पलीमधुसंयुतः ॥ भक्षयेत्परयाभ

नयाल्लोकेशःसर्वदर्शनः ॥ अंगकार्श्येग्निमांद्येचकासेपित्तेरसःस्वयं ॥ मरिचैर्घृतसंयुक्तैःप्रदातव्योदिनत्रयं ॥ लवणंवर्जयेत्तत्रसाज्यंदधिच योजयेत् ॥ एकविंशद्दिनंयावन्मरिचंसघृतंपिबेत् ॥ पथ्यंमृगांकवत् ज्ञेयंशयीतोत्तानपादतः ॥ येशुष्काविषमाशनैःक्षयरुजाव्याप्ताश्च येकुष्ठिनोयेपांडुत्वहताःकुवैद्यविधिनायेशोषिणोदुर्भगाः ॥ येतप्तावि विधज्वरैर्भ्रममदोन्मादैःप्रमादंगतास्तेसर्वेविगतामयाह्यपरयास्युः पोटलीसेवया ॥

अर्थ—पारदभस्म ४, सुवर्ण भस्म १, व गंधक ८, याप्रमाणे भाग घेऊन त्यांस चित्रकाचे काढ्याशीं खलावं; नंतर कवड्यांत भरून कवड्यांची तोंडें रुईचे चिकांत टांकणखार खलून त्या टांकणखारानें बंद करावीं; नंतर मडक्याला चुना सारवून त्या मडक्यांत कवड्या भरून तोंड बंद करून सुमारें मुंडा हातभर खांच खणून त्यात तें मडकें ठेवून तिसऱ्ये प्रहरानंतर पुट देऊन भस्म करावें. थंड झाल्यावर काढून खलून ठेवावें. ह्याला लोकेश्वर रस असे ह्मणतात. हा मध व पिंपळी यां बरोबर चार गुंजा घेतला असतां, मोठ्या निष्ठेनें खाल्ला असतां; सर्व सुख दाखविणारा आहे. अंगाचा बारीकपणा, अग्निमांद्य, कास, पित्त, यांवर तूप व मिरपूड यां बरोबर तिन दिवस द्यावा, व मीठ वर्ज करावे. तूप व दहीं हें बरेंच खावें; आणि एकवीस दिवस होत तों पर्यंत तूप व मिरपुड खात असावी; आणि मृगांकाप्रमाणें पथ्य करावें. पाय उताणे करून निजावें; आणि जे कोणि विषमाशनानीं शुष्क, क्षयरोगानें व्याप्त, कुष्ठी, पांडुरोगी, कुत्सित वैद्यांच्या उपचारानें, शोषयुक्त, दुर्भग, नानाप्रकारचे ज्वरानीं तप्त, भ्रमी, उन्मादी. आणि वेडे, असे सर्व रोगी या लोकेश्वर पोटलीच्या सेवनेंकरून निरोगी होतील.

लोहरसायन क्षयादिकांस.

शुद्धंरसेंद्रंभागैकंद्विभागःशुद्धगंधकं ॥ क्षिपेत्कज्जलिकांकुर्यात्तत्रतीक्ष्णभवंरजः ॥ क्षिप्त्वाकज्जलिकातुल्यंप्रहरैकंविमर्दयेत् ॥ ततःसंजायतेतस्यसोष्णोधूमोद्गमोमहान् ॥ अत्यंतंपिंडितंकृत्वाताम्रपात्रेनिधाय च ॥ मध्येधान्येकराकस्यात्रिदिनंधारयेद्बुधः ॥ उद्धृत्यतस्मात्खल्वेचक्षिप्त्वाधनेनिधायच ॥ रसैःकुठारच्छिन्नायास्त्रिवेलंपरिभावयेत् ॥ संशोष्यधर्मकाथैश्चभावयेत्त्रिकटोस्त्रिधा ॥ लोहपात्रेततःक्षिप्त्वाभावयेत्त्रिफलाजलैः ॥ निर्गुंडीदाडिमत्वग्भिर्बिसभृंगकुरंटकैः ॥ पलाश

कदलीद्रावैर्बीजकस्यशृतेनवा ॥ नीलीकालंबुपाद्रावैर्बुब्बूलफलिकार
सैः ॥ त्रित्रिवेलंयथालाभंभावयेदेभिरौषधैः ॥ ततःप्रातर्लिहेत्क्षौद्रघृना
भ्यांकालमात्रकं ॥ पलमात्रंवरक्काथंपिवेदस्यानुमानकं ॥ मासत्रयं
शिलीतंस्याद्वलीपलितनाशनं ॥ मंदाग्निश्वासकासौचपांडुतांकफमा
रुतौ ॥ पिप्पलीमधुसंयुक्तंहन्यादेतन्नसंशयः ॥ वातास्नंमूत्रदोषांश्च
ग्रहणींतोयजांरुजं ॥ अंडवृद्धिंजयेदेतच्छिन्नासत्वमधुप्लुतं ॥ वलवर्णक
रंवृष्यमायुर्ष्यंपरमंस्मृतं ॥ कूष्मांडंतिलतैलंचमाषान्नंराजिकातथा ॥
मद्यमम्लरसंचैवत्यजेल्लोहस्यसेवकः ॥

अर्थ–शुद्ध पारा १ भाग, शुद्ध गंधक २ भाग, दोन्ही खलांत घालोन खलून कज्जली करून तिचे समभाग मिऱ्यांचे चूर्ण घेऊन त्या कज्जलींत घालून एक प्रहर पर्यंत खल करून नंतर कोरफडाचे रसांत तीन दिवसपर्यंत खल करावा; नंतर त्या औषधांतून गरम गरम मोठा धूर निघतो; नंतर त्याचा घट्ट गोळा करून तांब्याचे भांड्यांत ठेऊन साळीचे भातामध्ये तीन दिवस पुरून ठेवावा, चवथे दिवशीं तो गोळा बाहेर काढून खलांत घालून उन्हांत ठेऊन रानतुळशीचे रसाचीं पुटें तीन द्यावी; नंतर सुंठ, मिरें, पिंपळी यांचे वेगळे वेगळे काढे करून एकेकाचीं पुटें तीन तीन द्यावीं; नंतर अडुळसा, गुळवेल व चित्रक या तिहींचे रस वेगळे वेगळे काढून क्रमेंकरून एकेकाचीं पुटें तीन द्यावीं; नंतर ते रसायन लोखंडाचे कढईंत घालून त्याला दुसरें औषधाचीं पुटें द्यावयाचीं तीं औषधें येणेंप्रमाणें. हिरडा, बेहडा, आवळकाठी, निर्गुडी, डाळिंबसाल, कमळाचा देठ, माका, पिंवळा कोळिस्ना, पळस, केळीचा कांदा, बिवळा अथवा आसाणा, नीलपुष्पी, मुंडी, बाभळीचे शेंगाचा रस, या चवदा औषधांचे वेगळे वेगळे रस काढून क्रमेंकरून एकेकारसाचीं तीन तीन पुटें द्यावी. मग तें रसायन कोळप्रमाण मध व तूप एका जागीं करून त्यात घालून द्यावें. त्यावर लागलाच त्रिफळेचा काढा करून तो एकपळ प्रमाण घ्यावा. या प्रमाणें तीन महिने पर्यंत हे रसायन घेतले असतां, अंगाच्या वळकट्या मोडून पांढरे केशाचे काळे केश होतात; व मध पिंपळी बरोबर घेतले असतां अग्निमांद्य, श्वास, कास, पांडुरोग, कफवायु हे रोग दूर होतात; व गुळवेलीचे सत्वाबरोबर मधांत घेतले असतां, वातरक्त, मूत्रदोष, पाण्यापासून झाली जी संग्रहणी ती व अंडवृद्धि हे रोग दूर होतात. हे रसायन बळ कांति व स्त्रीगमनाविषयीं इच्छा देणारें व आयुष्याची वृद्धि करणारें आहे. असे जाणावे; व कोहळा, तिळाचें तेल, उडीद, मोहऱ्या, मद्य व आंबट पदार्थ हे सर्व वर्ज करावे.

रत्नगर्भपोटली.

रसंवज्रंहेमतारंनागंलोहंतथाभ्रकं ॥ तुल्यांशंमारितंयोज्यंमुक्तामाक्षिकविद्रुमं ॥ राजावर्तंचवैक्रांतंगोमेदंपुष्कराजकं ॥ शंखंचतुल्यतुल्यांशंसप्ताहंचित्रकद्रवैः ॥ मर्दयित्वाविचूर्ण्याथतेनापूर्यवराटकान् ॥ टंकणंरविदुग्धेनपिष्ट्वातन्मुखमालिपेत् ॥ मृद्भांडेतान्सुसंयत्न्यसम्यग्गजपुटेपचेत् ॥ आदायचूर्णयेत्सम्यङ्निर्गुंड्याःसप्तभावनाः ॥आर्द्रकस्यरसैःसप्तचित्रकस्यैकविंशति ॥द्रवैर्भाव्यंततःशुष्कंदेयंगुंजाचतुष्टयं ॥ क्षयरोगंनिहंत्याशुसत्यंशिवइवांधकं ॥ योजयेत्पिप्पलीक्षौद्रैःसघृतैर्मरिचैश्चवा ॥ पोटलीरत्नगर्भोयंसर्वरोगहरोमतः ॥

अर्थ—पारद, वज्र, सुवर्ण, रुपें, शिसें, लोखंड, अभ्रक, मोतीं, माक्षिक, पोंवळें, राजावर्त, वैक्रांत, गोमेद, पुष्कराज व शंख इतक्यांचीं भस्में समभाग घेऊन सातदिवस चित्रकाचा काढयांत खलून तें चूर्ण कवडयांत भरून रुईंचे चिकांत टांकणखार वांटून त्याणें कवडयांचीं तोंडें लिंपावीं; नंतर त्या कवडया मडक्यांत भरून तोंड बंद करून त्यास गजपट द्यावें; नंतर त्यांतून काढून चूर्ण करून त्यास निर्गुडीचा रसाच्या सात भावना, आल्याच्या रसाच्या सात भावना व चित्रकाचे काढ्याच्या एकवीस भावना देऊन शुष्क झाल्यावर खलून चार गुंजाप्रमाणें मध पिंपळी अथवा तूप व मिरपूड यांचा बरोबर द्यावा; ज्याप्रमाणें जसा सांबानें अंधक दैत्याचा नाश केला, त्याप्रमाणें हा रत्नगर्भ पोटली रस क्षयाचा नाश करील, व सर्व रोगांचा ही नाश करील.

हेमगर्भपोटलीरस कफक्षयादिकांस.

मृतात्पादप्रमाणेनहेम्नःपिष्टिंप्रकल्पयेत् ॥ तयोःस्याद्द्विगुणोगंधोमर्दयेत्कांचनारिणा ॥कृत्वागोलंक्षिपेन्मूषासंपुटेमुद्रयेत्ततः ॥ पचेद्भूधरयंत्रेणद्वासरत्रितयंबुधः ॥ ततउद्धृत्यतत्सर्वंदद्याद्गंधंचतत्समं ॥ मर्दयेदार्द्रकरसैश्चित्रकस्वरसेनच ॥ स्थूलपित्तवराटांश्चपूरयेत्तेनयुक्तितः ॥ एतस्मादौषधात्कुर्यादष्टमांशेनटंकणं ॥ टंकणार्धविषंदत्वापिष्ट्वासेहुंडदुग्धकैः ॥ मुद्रयेत्तेनकल्केनवराटानांमुखानिच ॥ भांडेचूर्णप्रलिप्तेथधृत्वामुद्रांप्रदापयेत् ॥ गर्तेहस्तोन्मितेधृत्वापुटेद्गजपुटेनच ॥ स्वांगशीतंरसंज्ञात्वाप्रदद्याल्लोकनाथवत् ॥ पथ्यंमृगांकवज्ज्ञेयंत्रिदिनंलवणंत्यजेत् ॥ यदाछर्दिर्भवेत्तस्यदद्याच्छिन्नाशृतंतदा ॥ मधुयुक्तंतथाश्ले

ष्मकोपेदद्यादगुडार्द्रकं ॥ विरेकेभर्जिताभंगाप्रदेयादधिसंयुता ॥ ज्वरेत्कासंक्षयंश्वासंग्रहणीमरुचिंतथा ॥ अग्निंचकुरुतेदीप्तंकफवातंनियच्छति ॥ हेमगर्भःपरोज्ञेयोरसःपोटलिकाभिधः ॥

अर्थ—शुद्धपारा एकभाग व त्याचे चवथा हिस्सा खल केलेला सोन्याचा चुरा व दोहोंच्या दुप्पट गंधक घेऊन तिन्हीं कंचनाचे रसांत खलोन त्याचा गोळा करून मातीचे शरावसंपुटांत घालोन कापडमातीकरून त्याला भूधरयंत्रांत पचवावा. मग थंड जाहाल्यावर बाहेर काढून त्याचे समभाग गंधक घेऊन दोहोंचा आल्याचे रसांत खल करून नंतर चित्रकाचे रसांत खल करावा. मग मोठ्या पिवळ्या कवड्या आणून त्यांत तें औषध युक्तीनें भरून साऱ्या औषधांचा आठवा हिस्सा टांकणखार, टांकणखाराचे निमे बचनाग घेऊन दोहोंचा निवडुंगाचे दुधांत खल करून त्या कवड्याचें तोंडाला त्याचे मुद्रा द्यावी; नंतर मडक्याचे बुडाला चुना सारऊन त्यांत त्या कवड्या ठेऊन मडक्याचे तोंडावर दुसरें मडकें उपडें घालून त्याचे संधीला कापडमाती करून हातभर खाडा खणून रानगोवऱ्यांचा गजपुट अग्नि द्यावा. थंड झाल्यावर बाहेर काढून त्यांतील औषध काढून घ्यावें. याला हेमगर्भपोटलीरस असें ह्मणतात. हा हेमगर्भ लोकनाथरसाचे रितीने द्यावा. पथ्य मृगांकरसायनासारखें करावें; व याहून विशेष पथ्य तीन दिवस अळवणी करावें. मग या औषधापासून ओकारी येऊं लागली; तर गुळवेलीचा काढा करून त्यांत मध घालून द्यावा. तेणेंकरून ओकारी दूर होते, व कफाचा प्रकोप जाहला असतां, गूळ व आलें एकाजागीं करून द्यावें. तेणेंकरून कफ दुर होतो; व ढाळ होऊं लागले असता भांग थोडी भाजून दह्यांत द्यावी, तेणेंकरून ढाळ बंद होतात. व या हेमगर्भपोटलीरसापासून खोकला, क्षय, श्वास, संग्रहणी व आंवढणें हे रोग दूर होतात, व अग्नि प्रदीप्त होतो, व कफवायूचा प्रकोप दूर होतो.

दुसरा प्रकार.

रसस्यभागाश्चत्वारस्तावंतःकनकस्यच ॥ तयोश्चापिष्टिकांकृत्वागंधोद्वादशभागिकः ॥ कुर्यात्कज्जलिकांतेषांमुक्ताभागाश्चषोडश ॥ चतुर्विंशच्चशंखस्यभागैकंटंकणस्यच ॥ एकत्रमर्दयेत्सर्वंपक्वनिंबूकजैरसैः ॥ कृत्वातेषांततोगोलंमूषासंपुटकेन्यसेत् ॥ मुद्रांदत्वाततोहस्तमात्रेगर्तेचगोमयैः ॥ पुटेद्गजपुटेनैवस्वांगशीतंसमुद्धरेत् ॥ पिष्ट्वागुंजाचतुर्मानंदद्याद्व्योषाज्यसंयुतं ॥ एकोनत्रिंशदुन्मानमरिचैःसहदीयते ॥ राजतेमृन्मयेपात्रेकाचजेवावलेहयेत् ॥ लोकनाथसमंपथ्यंकु

यांत्शुचितमांनसः ॥ कासेश्वासेक्षयेवातेकफग्रहणिकागदे ॥ अतिसारेप्रयोक्तव्यापोटलीहेमगर्भिका ॥

अर्थ–पारा चारभाग व सोन्याचें बारीक चूर्ण चारभाग घेऊन दोन्हीं एकाजागीं चांगलें पीठ होई तोंपर्यंत खलून पाऱ्याचे बारा भाग गंधक घेऊन त्यांत घालून तीहींचा खल करून कज्जली करावी; नंतर पाऱ्याचे सोळा भाग मोतीं, चोविस भाग शंख, एकभाग टांकणखार घेऊन त्या औषधांत गेळऊन पिकल्या निंबाचे रसांत खलून त्याचा गोळा करून मातीचे शरावसंपुटांत घालून त्याला कापडमाती करून त्यास गाईच्या शेणाच्या गोवऱ्यांचें गजपुट द्यावें. थंड जाहाल्यावर बाहेर काढून त्यांतील औषध घेऊन खलून ठेवावें. याला हेमगर्भपोटली असें ह्मणतात. हा हेमगर्भ चार गुंजा प्रमाण एकुणतीस मिऱ्यांचें चूर्णाशीं रुप्याचे पात्रांत अथवा मातीचे अथवा कांचेचे प्याल्यांत गाईचें तूप घालून द्यावा; व अंतःकरण स्वस्थ करून लोकनाथरसासारखें पथ्य करावें, तेणेंकरून श्वास, क्षयरोग, वातविकार, कफ व संग्रहणी अतिसार हे रोग दूर होतात.

लोकनाथरस क्षयादिकांस.

शुद्धोबुभुक्षितःसूतोभागद्वयमितोभवेत् ॥ तथागंधस्यभागौद्वौकुर्यात्कज्जलिकांतयोः ॥ सूताच्चतुर्गुणेष्वेवकपर्देषुविनिःक्षिपेत् ॥ भागैकंटंकणंदत्वागोक्षीरेणविमर्द्दयेत् ॥ तथाशंखस्यखंडानांभागानष्टौप्रकल्पयेत् ॥ क्षिपेत्सर्वंपुटस्यांतश्चूर्णलिप्तशरावयोः ॥ गर्तेहस्तोन्मितेधृत्वा पचेद्गजपुटेनच ॥ स्वांगशीतंसमुत्धृत्यपिष्ट्वातत्सर्वमेकतः ॥ षड्गुंजासंमितंचूर्णमेकोनत्रिंशदूषणैः ॥ घृतेनवातजेदद्यान्नवनीतेनपित्तजे ॥ क्षौद्रेणश्लेष्मजेदद्यादतीसारेक्षयेतथा ॥ अरुचौग्रहणीरोगेकार्श्येमंदानलेतथा ॥ कासेश्वासेपुगुल्मेपुलोकनाथोरसोहितः ॥ तस्योपरिघृतान्नंचभुंजीतकवलत्रयं ॥ मंचेक्षणैकमुत्तानःशयीतानुपधानके ॥ अनम्लमन्नंसघृतंभुंजीतमधुरंदधि ॥ प्रायेणजांगलंमांसंप्रदेयंघृतपाचितं ॥ सुदुग्धभक्तंदद्याच्चजातेग्नौसांध्यभोजने ॥ सघृतान्मुद्गवटकान्व्यंजनेष्वेवचारयेत् ॥ तिलामलककल्केनस्नापयेत्सर्पिपाथवा ॥ अभ्यंजयेत्सर्पिषाचस्नानंकोष्णोदकेनच ॥ क्वचित्तैलंनगृण्हीयान्नबिल्वंकारवेल्लकं ॥ वार्ताकंशफरींचिंचांत्यजेद्व्यायाममैथुनं ॥ मद्यंसंधानकंहिंगुशुंठीमाषान्मसूरकान् ॥ कूष्मांडराजिकांकापंकांजिकंचैवव

र्जयेत् ॥ त्यजेत्युक्तनिद्रांचकांस्यपात्रेचभोजनं ॥ ककारादियुतंसर्वं त्यजेच्छाकफलादिकं ॥ पथ्योयंलोकनाथस्तुशुभनक्षत्रवासरे ॥ पूर्णातिथौशुक्लपक्षजातेचंद्रबलेतथा ॥ पूजयित्वालोकनाथंकुमारीभोजयेत्ततः ॥ दानंदद्याद्द्विघटिकांमध्येग्राह्योरसोत्तमः ॥ रसात्संजायतेतापस्तदाशर्करयायुतं ॥ सत्वंगुडूच्यागृण्हीयाद्वंशरोचनयायुतं ॥ खर्जूरंदाडिमंद्राक्षामिक्षुखंडानिचारयेत् ॥ अरुचौनिस्तुषंधान्यंघृतभृष्टंसशर्करं ॥ दद्यात्तथाज्वरेधान्यंगुडूचीक्वाथमाहरेत् ॥ उशीरवासकक्वाथंदद्यात्समधुशर्करं ॥ रक्तपित्तेकफेश्वासेकासेचस्वरसंक्षये ॥ अग्निभृष्टजयाचूर्णमधुनानिशिदीयते ॥ निद्रानाशेतिसारेचग्रहण्यांमंदपावके ॥ सौवर्चलाभयाकृष्णाचूर्णमुष्णजलैःपिबेत् ॥ शूलेजीर्णेतथाकृष्णामधुयुक्ताज्वरेहिता ॥ प्लीहोदरेवातरक्तेच्छर्द्यांचैवगुदांकुरे ॥ नासिकादिपुरक्तेपुरसदाडिमपुष्पजं ॥ दूर्वायाःस्वरसंनस्येप्रदयाच्छर्करयायुतं ॥ कोलमज्जाकणाबर्हिपक्षभस्मसशर्करं ॥ मधुनालेहयेच्छर्दिहिक्काकोपस्यशांतये ॥ विधिरेषप्रयोज्यस्तुसर्वस्मिन्पोटलीरसे ॥ मृगांकेहेमगर्भेचमौक्तिकाख्येरसेपुच ॥ इत्ययंलोकनाथोक्तोरसःसर्वरुजोजयेत् ॥

अर्थ–शुद्ध होत्साता जो बुभुक्षित असा पारा दोन भाग व शुद्ध केलेला गंधक दोन भाग, या दोहोनां एकाजागीं खलोन कज्जली करून पान्याचे चौपट कवड्या घेऊन त्यांत ती कज्जली भरावी; नंतर टांकणखार एक भाग घेऊन गाईचे दुधांत खलोन त्या कवड्यांचे तोंडाला त्यांची मुद्रा द्यावी; नंतर शंखाचे तुकडे आठ भाग वजन घेऊन मातीचे दोन शराव आणून त्या एकांत चुना सारवून त्यांत शंखाचे तुकडे अर्धे खालीं घालून त्याजवर त्या कवड्या ठेऊन त्याजवर अर्धे तुकडे राहिले ते घालून. त्याजवर दुसरा शराव उपडा घालून कापडमाती करून एक हात खाडा खणून रान गोवऱ्यांचा गजपुट अग्नि द्यावा. मग थंड जाहाल्यावर बाहेर काढून त्या शरावसंपुटाचे आंत साऱ्यांचे भस्म होतें, ते एका जागीं खलून ठेवावें. याला लोकनाथरस असे ह्मणतात. हा लोकनाथरस साहा गुंजाप्रमाण एकुणतीस मिऱ्यांचें चूर्ण करून त्यांत मेळवून वायूचा रोग असतां तुपांत द्यावा; व पित्तरोग असतां लोण्यांत द्यावा, व कफरोग असतां मधांत द्यावा; व अतिसार, क्षय, आवटणें, संग्रहणी, कृशता, अग्निमांद्य, खोकला, श्वास, व गुल्म इतके रोग दूर होण्याविषयीं हा लोकनाथरस प्रशस्त आहे. याची मात्रा घेऊन त्याजनंतर तुपभाताचे तीन घांस घ्यावे; नंतर माच्यावर बिछाना न घालतां क्षणभर उ-

ताणें निजावें, आंबट पदार्थ वर्ज्य करून तुपाशीं भोजन करावें; व चांगलें मधुर गोड दहीं असल्यास तेंही भोजनाबरोबर घ्यावें; रानांतील हरिणादिकाचें मांस तुपांत तळून खावें. संध्याकाळीं भूक लागली असतां दुधभात खावा. व तोंडीं लावण्यास मुगांच्या वडया तुपांत तळून खाव्या. तीळ व आवळकाठी यांचा कल्क करून अंगास लावून स्नान करावें; अथवा तूप लावून करावें. स्नानाशिवाय अंगास लावणें तें तूपच लावावें. स्नानास पाणी कोमट कोमट घ्यावें; तेलाचा स्पर्श करूंनये. व बेलफळ, कारलें, वांगें, बारीक मासळी, चिंच, श्रमकरणें, मैथुन, मद्य, संधान, हिंग, सुंठ, उडीद, मसुर, कोहळें, राई, कांजी यांचा त्याग करावा, व रोष सोडावा. दिवसास निजूं नये काशाचें ताटांत भोजन करूं नये. ककार ज्यानां आदि आहे अशा भाज्या व फळें इत्यादिक पदार्थ वर्ज्य करावे. याप्रमाणें लोकनाथरसाचें पथ्य करावें. चांगला दिवस, चांगला वार, पूर्णा तिथी, शुक्लपक्ष व आपले चांगलें चंद्रबळ पाहून लोकनाथ रसाची पूजा करून नंतर कुमारीस्त्रीस भोजन द्यावें; नंतर कांहीं एक सुवर्णादि दान देऊन लोकनाथरस घ्यावा; नंतर दोन घटिकांनीं शरीराचा संताप जाहला असतां साकर, गुळवेलीचें सत्व व वंशलोचन तिन्हीं एकाजागीं करून घ्यावीं. तेणें करून संताप दूर होतो. खजूर, डाळिंब, द्राक्षें, उसाचे तुकडे हे पदार्थ थोडे थोडे खावे. तेणेंकरून संताप, आनढणें दूर होतें. व धने कुटून त्याचा कोंडा काढून तुपांत भाजून त्यांत साकर घालोन त्यांत लोकनाथरस घ्यावा. तेणेंकरून आनढणें दूर होतें. धनें व गुळवेल यांचा काढा करून त्यांत हा रस घ्यावा, तेणेंकरून ज्वर दूर होतो; वाळा व अडुळसा या दोहोंचा काढा करून मध साकर मेळवून त्यांत लोकनाथरस घ्यावा, तेणेंकरून रक्तपित्त व कफ, श्वास, कास, स्वरभंग हे रोग दूर होतात. भांग थोडी भाजून चूर्ण करून त्यांत हा रस घालोन मधांत रात्रीस घ्यावा, तेणेंकरून निद्रा येत नसली तर येते. अतिसार व संग्रहणी हे रोग दूर होतात. अग्नि प्रदीप्त होतो. पादेलोण, बाळहिरडे, पिंपळी या तीन औषधांचें चूर्ण करून त्यांत लोकनाथरस घालोन ऊष्ण पाण्यांत घ्यावा, तेणेंकरून शूळ व अजीर्ण हीं दूर होतात. मध व पिंपळीशीं लोकनाथरस घेतला असतां ज्वर दूर होतो. डाळिंबाच्या फळाचे रसांत घेतला असतां पोटांत डांवकडे कालू रोग होतो तो, वातरक्त, ओकारी, मुळव्याध, नाकावाटे रक्त पडते तें हे सारे रोग दूर होतात. दूर्वांचा रस काढून त्यांत साकर व लोकनाथरस घालोन नाकांत नस्य दिलें असतां नाकांतून रक्त पडते तें बंद होतें. बोराचे आंठोंतला गगज, पिंपळी, मोराचे पिसांचें भस्म हीं तीन औषधें एकाजागीं करून त्यांत साकर व मध मेळवून त्यांत लोकनाथरस घालोन घेतला असतां ओकारी व उचकी हीं दूर होतात. या प्रमाणें संपूर्ण जितके पोटलीरस आहेत त्यांचे ठायीं व मृगांक व हेमगर्भ व मौक्तिकारस्यरसायन यांचे ठायीं या प्रमाणेंच विधि करावा. याप्रकारें लोकनाथरस सांगितला. हा लोकनाथ संपूर्ण रोग दूर करितो. असें जाणावें.

लघुलोकनाथरस.

वराटभस्ममंडूरंचूर्णयित्वाघृतेपचेत् ॥ तत्सममरिचंचूर्णंनागवल्याविभावितं ॥ तच्चूर्णंमधुनालेह्यमथवानवनीतकैः॥ माषमात्रंक्षयंहंतियामेयामेचभक्षितं ॥ लोकनाथरसोह्येषमंडलाद्राजयक्ष्मनुत् ॥

अर्थ—कवड्यांचें भस्म एक भाग, मंडूर एक भाग, मिऱ्यें दोहोंचे समभाग, हीं तीन औषधें एकाजागीं करून तुपांत खलून तूप कोरडें जाहल्यावर विड्याचे पानाचे रसांत खलून मासा मासा प्रमाण गोळ्या बांधाव्या. याला लघुलोकनाथरस असें ह्मणतात. हा लोकनाथ मधांत अथवा लोण्यांत प्रहरा प्रहरानें घेतला असतां सामान्यक्षय दूर होतो याप्रमाणें एकमंडळ घेतला असतां राजयक्ष्मा ही दूर होतो.

मृगांकपोटलीरस.

भूर्जवत्तनुपत्राणिहेम्नःसूक्ष्माणिकारयेत् ॥ तुल्यानितानिसूतेनखल्वेक्षिप्त्वाविमर्दयेत् ॥ कांचनाररसेनैवज्वालामुख्यारसेनवा ॥ लांगल्यावारसैस्तावद्यावद्भवतिपिष्टिका ॥ ततोहेम्नश्चतुर्थांशंटंकणंतत्रनिःक्षिपेत् ॥ पिष्टमौक्तिकचूर्णंचहेमद्विगुणमावपेत् ॥ तेपुसर्वसमंगंधंक्षिप्त्वाचैकत्रमर्दयेत् ॥ तेषांकृत्वाततोगोलंवासोभिःपरिवेष्टयेत् ॥ पश्चान्मृदावेष्टयित्वाशोषयित्वाचधारयेत् ॥ शरावसंपुटस्यांतेतत्रमुद्राप्रदापयेत् ॥ लवणापूरितेभांडेधारयेत्तंचसंपुटं ॥ मुद्रांदत्वाशोषयित्वाबहुभिर्गोमयैःपुटेत् ॥ ततःशीतेसमाहृत्यगंधंमूतसमंक्षिपेत् ॥ घृष्ट्वाचपूर्ववत्खल्वेपुटेद्गजपुटेनच ॥ स्वांगशीतंततोनीत्वागुंजायुग्मंप्रकल्पयेत् ॥ अष्टभिर्मारिचैर्युक्तोकृष्णात्रययुतोथवा ॥ विलोक्यदेयोदोषादीनेकैकारसरक्तिका ॥ सर्पिपामधुनावापिदद्याद्दोषाद्यपेक्षया ॥ लोकनाथसमंपथ्यंकुर्यात्स्वस्थमनाःशुचिः ॥ श्लेष्माणंग्रहणींकासंश्वासंक्षयमरोचकं ॥ मृगांकोयंरसोहन्यात्कृशत्वंबलहानितां ॥

अर्थ—सोन्याचे भूर्जपत्रासारखे पातळ पत्रे करून त्याचे समभाग शुद्ध पारा घेऊन दोहोंचें एकाजागीं कंचनाचे रसांत अथवा भारजांभळीचे रसांत जों पर्यंत एकाजागीं मिळोन चांगलें पीठ होई तों पर्यंत खल करावा; नंतर सोन्याचे चतुर्थांश टांकणखार व सोन्याचे दुप्पट मोत्याचें खल केलेले चूर्ण व सोन्याचे बरावर गंधक घेऊन सारीं एकाजागीं खलोन एक गोळा करून त्याचे भोंवते कापडे गुंडाळून त्याजवर मातीचा

लेप करून वाळल्यावर मातीचे दोन शराव आणून त्या एकांत तो गोळा ठेऊन त्याजवर दुसरा शराव उपडा घालोन त्याला कापडमाती करून मातीचे मडक्यांत मीठ घालोन त्यांत तो शरावसंपुट ठेऊन त्याजवर दुसरें मीठ घालोन मडक्याचे तोंडावर दुसरें लाहानसर मडकें उपडें घालोन त्याचे संधीला कापडमाती करून गजपुटअग्नीपेक्षां कांहीं अधिक गाईचे शेणाच्या गोवऱ्या घेऊन अग्नि द्यावा. थंड जाहाल्यावर बाहेर काढून फिरून त्या पाऱ्याचे बरोबर गंधक घेऊन सार औषध खलांत घालोन पहिल्यानें ज्या वनस्पतीचे रसांत खल केला आहे, त्या वनस्पतीचे रसांत खल करून पहिल्या कृतिप्रमाणें कृति करून गजपुट अग्नि द्यावा. थंड जाहाल्यावर बाहेर काढून त्यांतील औषध काढून घ्यावें. याला मृगांक पोटलीरस असें ह्मणतात. हा पोटलीरस दोन गुंजा प्रमाण आठ मिऱ्यांशीं अथवा तीन पिंपळ्यांशीं द्यावा. व दोषांचें तारतम्य पाहून एक गुंज ही द्यावा. जशी दोषांची अपेक्षा असेल तसा तुपांत अथवा मधांत द्यावा. व अंतःकरण स्वच्छ करून शुचिर्भूत होऊन लोकनाथरसासारखें पथ्य करावें. या प्रमाणें आचरण केलें असतां; या रसायनापासून कफरोग, संग्रहणी, कास, श्वास, क्षयरोग, आवढणें, शरीराची कृशता व बलहानि हे रोग दूर होतात.

गोक्षुराद्यघृत.

दुरालभाश्वदंष्ट्राचचतस्रःपर्णिनीबला ॥ भागान्पलोन्मितान्कृत्वाप
र्पटकस्यच ॥ पचेद्दशगुणेतोयेदशभागावशेषितं ॥ रसेपूतेतुद्रव्या
णामेषांकल्कंसमावपेत् ॥ सठीपुष्करमूलानांपिप्पलीत्रायमाणयोः ॥
तामलक्याकिरातस्यतिक्तस्यकटुकस्यच ॥ पलानांसारिवायाश्चतत्पि
ष्टाकर्षसंमितान् ॥ तैःसाधयेद्घृतप्रस्थंक्षीरंद्विगुणितंभिषक् ॥ ज्वरंदा
हंतमःश्वासंकासंपार्श्वशिरोरुजं ॥ तृष्णाच्छर्दिमतीसारमेतत्पानंव्यपोहति ॥

अर्थ–गोखरु, धमासा, चारपर्णिनी, चिकणा, पित्तपापडा हीं चार चार तोळे, घेऊन त्यांचा दसपट पाण्यांत दशांश काढा करावा. तो गाळून घ्यावा; नंतर कचोरा' पोखरमूळ, पिंपळी, त्रायमाण, हरीतकी, किराइत, तेजबळ, कुटकी, श्वेत उपळसरी, हीं प्रत्येकी एकेक तोळा घेऊन त्यांचा कल्क व ६४ तोळे तूप, १२८ तोळे दूध घालून घृत सिद्ध करावें. ते ज्वर, दाह, तमकश्वास, पार्श्व व मस्तक यांतील शूल, ताहान, वांति व अतिसार यांचा नाश करितें.

जीवंत्यादिघृत.

जीवंतिकावत्सकयष्टिकानांसपौष्करंगोक्षुरकेबलेद्वे ॥ नीलोत्पलंता
मलकंयवासासत्रायमाणामगधाचकुष्ठं ॥ द्राक्षामलक्यारसमेकप्रस्थं

प्रस्थद्वयंछागलकंपयश्च ॥ प्रस्थंतथायोज्यदधिश्चधीमान्पचेत्घृतंवा मृदुवान्हिनातत् ॥ पानेप्रशस्तंहितमेतदेवनस्येचवस्तौविनियोजयेत्तु ॥ विनाशयत्याशुचराजयक्ष्माहलीमकंकामलपांडुरोगं ॥ मूर्छाभ्रमश्लेष्मशिरोर्तिशूलंमदाश्मरींवागुदकीलकुष्ठं ॥ शिरोगदंनाशमुपैतितस्यनस्यप्रदानेननियोजितेन ॥ पानेनपांडूमयराजयक्ष्मानाशंसमायातिहलीमकंच ॥ वस्तिप्रदानेनगुदोद्भवश्चरोगोविनाशंसमुपैतिपुंसां ॥ विसर्पविस्फोटकर्मृक्षणेननश्यंत्यनेनैवगदाःसमस्ताः ॥

अर्थ–गुळवेल, कुड्याची साल, ज्येष्ठीमध, पुष्करमूळ, गोखरु, चिकणा तांवडा व पांढरा, निळें कमळ, भुयआवळी, धमासा, त्रायमाण, पिंपळी, कोष्ठ, द्राक्षे व आवळे; यांचा रस ६४ तोळे, शेळीचें दूध १२८ तोळे, दहीं ६४ तोळे व तूप ६४ तोळे घालून मंदाग्नीनें पचन करावें. तें घृतपान, नस्यकर्म व बस्ति याविषयीं योजावें; ह्मणजे शीघ्र राजयक्ष्मा, हलीमक, कामला, पांडुरोग, यांचा व बस्तिकर्मानें गुदसंबंधी व्याधिचा अंगास लावल्याने विसर्प, विस्फोटक, यांचा आणि अनेक व्याधींचा नाश करितें.

वलाद्यघृत.

वलाश्वदंष्ट्राकलशीवृहतीधावनीस्थिरा ॥ निंबपर्पटकंमुस्तात्रायमाणंदुरालभा ॥ कृत्वाकषायंपेयार्थंदद्याचामलकीसठी ॥ द्राक्षापुष्करमूलंचमेदाह्यामलकानिच ॥ घृतंपयश्चतत्सिद्धंसर्पिर्ज्वरहरंपरं ॥ क्षयकासप्रशमनंशिरःपार्श्वरुजापहं ॥

अर्थ–चिकणा, गोखरु, पिठवण, रिंगणी, डोरली, सालवण, कडूलिंब, पित्तपापडा, नागरमोथा, त्रायमाण, धमासा, हरीतकी, कचोरा, द्राक्षे, पुष्करमूल, मेदा व आवळकाठी याचा काढा व दूध, तूप, घालून तूप तयार करावें. तें अत्यंत ज्वरनाशक आहे व क्षय, मस्तक व पार्श्व यातील शूल, यांचा नाश करितें.

कोलाद्यघृत.

कोललाक्षारसेतद्वत्क्षीराष्टगुणसाधितं ॥ कल्कैःषडंगदार्वीत्वग्द्राक्षाक्षोटफलान्वितं ॥ घृतंखर्जूरमृद्वीकामधूकैःसपरूपकैः ॥ सपिप्पलीकंवैस्वर्यकासश्वासरुजापहं ॥

अर्थ–बोरीच्या लाखेच्या काढ्यांत अष्टमांश दूध व गोखरु, दारुहळद, दालचिनी, द्राक्षे, अक्रोड, खजूर, गोस्तनी द्राक्षे, ज्येष्टीमध, फालसा व पिंपळी यांचा कल्क आणि तूप घालून तूप सिद्ध करावें. तें स्वरभंग, खोकला व दमा यांचा नाश करितें.

कणाद्यघृत,

कणापलंपंचगुडांभसश्चसज्यंघृतंवैविपचेत्समांशं ॥
पानेथवाभोजनकेप्रशस्तंक्षयेचराजक्षयनाशहेतु ॥

अर्थ–पिंपळी २० तोळे, गुळाचें पाणी २० तोळे, आणि तूप हे समभाग एकत्र करून घृत तयार करावें. तें पिण्यास, किंवा भोजनांत द्यावें; ह्मणजे क्षय व राजयक्ष्मा, यांचा नाश होतो.

पाराशरघृत

यष्टीबलागुडूचीचपंचमूलंसमांशकं ॥ क्वथिनसदशंधात्रीरसंचेक्षुरसंतथा ॥ विदार्यायारसंचैवघृतंचसमभागिकं ॥ क्षीरंदधिसमंचात्रनवनीतंतुतत्समं ॥ द्राक्षातालीससंयुक्तंपथ्यालाभेनयोजयेत् ॥ सिद्धंघृतंचपानीयेनस्येवस्तौप्रशापयेत् ॥ हरतेराजयक्ष्माणंपांडुरोगंचदारुणं ॥ हलीमकार्शसोनित्यंरक्तपित्तनिवारणं ॥ लेपनंदुष्टवीसर्पपित्तदग्धव्रणापहं ॥

अर्थ–ज्येष्टीमध, चिकणा, गुळवेल व पंचमुळें, ह्या समभागांचा काढा, तितकाच आवळ्यांचा रस, उसांचा रस, भुयकोहळीचा रस आणि तूप, दूध, दहीं, लोणी, द्राक्षे; व तालीसपत्र, हे यथालाभ पदार्थ घालोन तूप सिद्ध करावें. तें प्राशन, नस्य किंवा बस्ति यांविषयीं द्यावें; ह्मणजे क्षय, पांडुरोग, कावीळ, हलीमक, मुळव्याध, रक्तपित्त यांचा नाश करितें; व अंगास लाविलें असतां पित्त आणि दग्ध व्रण, यांचा नाश करितें.

जलाद्यघृत.

जलद्रोणेविपक्तव्यंयावत्पादावशेषितं ॥ पिप्पलीचंदनंलोध्रंह्रीबेरोशीरपर्पटं ॥ पाठाभूर्निंबयष्ट्याव्हात्रायंतीनीलमुत्पलं ॥ मुस्तकेंद्रयवाशुंठीकटुकंसदुरालभं ॥ त्वक्पत्रंवृषमूलंचकल्पैरर्धपलैर्भिपक् ॥ अजाक्षीरेणतूर्णेनघृतप्रस्थंविपाचयेत् ॥ हंतियक्ष्माणमत्युग्रंरक्तपित्तंत्रिदोषजं ॥ श्वासकासक्षतक्षीणदाहशोकरुजापहं ॥

अर्थ–१०२४ तोळे पाण्यांत पिंपळी, रक्तचंदन, लोध्र, वाळा, काळा वाळा, पित्तपापडा, पाहाडमूळ, किराइत, जेष्टीमध, मेंदी, काळें कमळ, नागरमोथे, इंद्रजव, सुंठ, कटुकी, धमासा, दालचिनी व अडुळशाचे मूळ हीं प्रत्येक २ तोळे घेऊन त्यांचा चतुर्थांश काढा आणि या सर्वांचे बरोबर शेळीचें दूध आणि ६४ तोळे तूप हें सर्व एकत्र कढवावें. हें तूप क्षयरोग, त्रिदोषापासून झालेलें रक्तपित्त, श्वास, कास, क्षीणता, दाह व शोक, यांचा नाश करील.

वासाद्यघृत.

वासामृतारिष्टनिदिग्धिकानांरसेश्वगंधेभवलार्जुनानां ॥
सिद्धंसपंचोषणपुष्कराणांकल्कैर्घृतंछागपयस्तुशोषे ॥

अर्थ—अडुळसा, गुळवेल, कडुलिंब, रिंगणी, आस्कंद, महाबला, अर्जुन, यांच्या काढ्यांत तूप, सुंठ, मिरें, पिंपळी, चवक, पिंपळमूळ, पोखरमूळ, यांच्या कल्का बरोबर शेळीचें दुध घालोन सिद्ध करावें. तें घृत क्षयनाशक आहे.

खर्जूरादि घृत.

घृतंखर्जूरमृद्वीकामधूकैःसपरूपकैः ॥
सपिप्पलीकैर्वैस्वर्यकासश्वासज्वरापहं ॥

अर्थ—खजूर, द्राक्षे, जेष्टीमध, फालसा व पिंपळी, इतक्यानीं सिद्ध केलेलें तूप. स्वरभंग, कास, श्वास, ज्वर, यांचें नाशक आहे.

पिपल्याद्यघृत.

पिप्पलीगुडसंयुक्तंछागमांसयुतंघृतं ॥
एतदग्निविवृध्यर्थंप्रदेयंक्षयकासिनां ॥

अर्थ—पिंपळी, गुळ व बोकडाचे मांस, यांणि सिद्ध केलेलें तूप क्षय व खोकला,यांवर द्यावें.

दुसरा प्रकार.

पिप्पलीपिप्पलीमूलचव्यचित्रकनागरैः ॥ सयावशूकैश्चक्षीरं
स्रोतसांशोधनंपरं ॥ कल्कोत्रपादिकःकार्यःक्षीरंवापिचतुर्गुणं ॥

अर्थ—पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, सुंठ, जवखार, यांणीं सिद्ध केलेलें तूप स्रोतःशुद्धि करणारें आहे. एथें औषधांचा कल्क १ भाग आणि तूप ४ भाग या प्रमाणें घेउन तूप सिद्ध करावें.

दशमूलाद्यघृत.

दशमूलीशृतात्क्षीरात्सर्पिर्यदुदियान्नवं ॥ सपिप्पलीकंसक्षौद्रंतत्परं
स्वरशोधनं ॥ शिरःपार्श्वांगशूलघ्नंकासंश्वासज्वरापहं ॥

अर्थ—दशमुळांचें वरोवर कढलेलें दुधापासून उत्पन्न केलेलें तूप,मध व पिंपळी यां बरोबर सेवन केले असतां स्वर नीट करणारें आणि मस्तक, कुशी, यांतला शूल, कास, श्वास, ज्वर, यांचें नाशक आहे.

तिळाचें तैल.

क्षीरेचतुर्गुणेतैलंप्रस्थद्वयतिलोद्भवं ॥ शतशःपावितंयष्टीपलकल्केन यत्नतः ॥ पाननस्यादिभिर्यक्ष्महरमामयपांडुजित् ॥ ऊर्ध्वजत्रुगरोन्मादरक्तपित्तविसर्पनुत् ॥

अर्थ—१२८ तोळे तिळांचे तेल, ५१२ तोळे दूध, ४ तोळे जेष्टिमधीचे चूर्ण, हें एकत्र पुष्कळवेळ कढवून गाळून घ्यावें; ह्मणजे राजयक्ष्मा, पांडु, खांद्यांचे वरचे भागीं, रोग,उन्माद, रक्तपित्त, विसर्प, यांचा नाश करील.

चंदनादितैल.

चंदनांबुनखैर्याम्यंयष्ट्याशैलेयपद्मकं ॥ मंजिष्ठासरलंदारुसैव्येलंपूतिकेसरं ॥ हरिद्रासारिवातिक्तालवंगागरुकुंकुमं ॥ त्वग्रेणुनलिकाचेति तैलंमस्तुचतुर्गुणं ॥ लाक्षारससमंसिध्धंग्रहघ्नंबलवर्धनं ॥ अपस्मारज्वरोन्मादकृत्यालक्ष्मीविनाशनं ॥ आयुःपुष्टिकरंचैववशीकरणमुत्तमं ॥ विशेषात्क्षयरोगघ्नंरक्तपित्तहरंपरं ॥

अर्थ—चंदन, वाळा, नखला, चंदन, ज्येष्टीमध, शिलाजित, पद्मकाष्ठ, मंजिष्ठा, सरल वृक्ष, देवदार, काळा वाळा, जवादें, हळद, उपलसरी, कुटकी, लवंगा, अगर, केशर, दालचिनी, रेणुकबीज व नलिका हीं समभाग; आणि यांचे चौपट तेल व दह्यावरील साय, आणि सर्वांचे बरोबर लाखेचा काढा घालून तैल सिद्ध करावें. तें ग्रहनाशक, बल वाढविणारें व फेपरें, ज्वर, उन्मादरोग, कृत्या व अलक्ष्मी, यांचा नाश करितें; आणि आयुष्य, पुष्टि व वशीकरण यांस करितें; व विशेषेकरून क्षयरोग, आणि रक्तपित्त यांचा नाश करितें.

लक्ष्मीविलासतैल.

एलाश्रीखंडरास्नाजतुनखशशितक्कोलकंचाथमुस्तावक्षत्वग्दारुकृष्णागरुतगरजटाकुष्ठमेतत्समांशं ॥ त्रैगुण्यंकालरालंमुद्दढडमरुकायंत्रसिद्धंतुतैलंगंधैःपुष्पैश्चभाव्यंपरिमललालितंनामतोगंधतैलं ॥ एतल्लक्ष्मीविलासंजनयतिजगतीनायकैःसंप्रयोगंयुक्तयारोगान्निखिलगदहरंवातसंघातहंतृ ॥ पीतंतांबूलवल्लीदलमिलितमलंजाठरंवन्हिसिद्धंकुर्याद्दुर्नामयक्ष्मक्षयमपिनितरामंगसंमर्दनेन ॥

अर्थ—एलची, चंदन, रासना, लाख, नखला, कापूर, कंकोळ, नागरमोथा, चिकणा,

दालचिनी, दारुहळद, पिंपळी, अगरु, तगर, जटामांसी, कोष्ट हे समभाग; आणि तिप्पट राळ हे सर्व पदार्थ डमरुयंत्रांत घालून तैल काढावें. त्याचें नाव लक्ष्मीविलास हे अत्यंत परिमलानीं युक्त याला गंधतैल ह्मणतात. हे स्त्रीपुरुषांची प्रीति उत्पन्न करितें. युक्तीने उपयोग केला असतां अनेक रोग व अनेक वातरोग यांचा नाश करितें; व विड्याच्या पानाशीं घेतला असतां; जठराग्नीला प्रदीप्त करितें; व अंगास लाविलें असतां मुळव्याध, क्षय, यांचा नाश करितें.

व्यवायजन्यशोष.

व्यवायशोकवार्धक्यव्यायामाध्वप्रशोषितान् ॥
व्रणोरःक्षतसंज्ञौतुशोषिणोलक्षणंशृणु ॥

अर्थ–व्यवायशोष, शोकशोष, वार्धक्यशोष, व्यायामशोष, अध्वशोष, व्रणशोष, उरःक्षतशोष, यांचीं लक्षणें सांगतों.

व्ययायशोषिलक्षण.

व्यवायशोषीशुक्रस्यक्षयलिंगैरुपद्रुतः ॥
पांडुदेहोयथापूर्वंक्षीयंतेचास्यधातवः ॥

अर्थ–अतिमैथुनानें क्षीण झालेल्या पुरुषाच्या शिश्नाला आणि वृषणाला वेदना, मैथुनाविषयीं अशक्तता, मैथुनकेलें तरीं चिरकालानें अल्पशुक्र किंवा रक्त यांचा स्राव, या सुश्रुतोक्तधातुक्षयचिन्हांनीं युक्त होतो; आणि देह पांढरा फटफटीत होतो; व त्याचे शुक्रापासून रसपर्यंत उलटे धातु क्षीण होतात.

व्यवायशोषचिकित्सा.

व्यवायशोषिणंक्षीररसमांसाज्यभोजनैः ॥
सकलैर्मधुरैर्हृद्यैर्जीवनीयैरुपाचरेत् ॥

अर्थ–व्यवायशोषिपुरुषाला दूध, मांस, तूप, यांणीं युक्त भोजनंकरावें; व संपूर्ण गोड, प्रिय, आयुष्यवर्धक, अशा औषधांनीं उपचार करावे.

शोकशोषिलक्षण.

प्रध्यानशीलःस्रस्तांगःशोकशोष्यपितादृशः ॥
विनाशुक्रक्षयकृतैर्विकारैरुपलक्षितः ॥

अर्थ–शोकशोषी हा चिंताकरणारा, हातपायगळालेला व शुक्रक्षयव्यतिरिक्त क्षयलक्षणानीं युक्त असतो.

शोकशोषचिकित्सा.

हर्षणाश्वासनैःक्षीरैःस्निग्धैर्मधुरशीतलैः ॥
दीपनैर्लघुभिश्चान्नैःशोकशोषमुपाचरेत् ॥

अर्थ—शोकजन्यक्षयावर—हर्षण. आश्वासन व क्षीर, स्निग्ध, मधुर, शीतल, दीपन आणि लघु, अशीं अन्नें, या पदार्थांनीं उपचार करावा.

जराशोषलक्षण.

जराशोषीकृशोमंदवीर्यबुद्धिबलेंद्रियः ॥ कंपनोरुचिमान्भिन्नकांस्य पात्रहतस्वरः ॥ ष्ठीवतिश्लेष्मणाहीनोगौरवारुचिपीडितः ॥ संप्रस्रुता स्यनासाक्षिःशुष्करूक्षमलच्छविः ॥

अर्थ—म्हातारपणामुळें क्षीण झालेला पुरुष कृश होतो; व त्याचीं वीर्य, बुध्दि, बल व इंद्रियें, हीं मंद होतात; आणि कंप व अरुचि होत्ये, त्याचा स्वर फुटक्या कांशाच्या भांड्यासारिखा होतो, कफावांचून थुंकतो; व जडता, अरुचि यांची पीडा होत्ये; आणि तोंड, नाक व नेत्र हे वाहातात; व खडा व रूक्ष असा मळ होतो.

अध्वशोषलक्षण.

अध्वप्रशोषीस्रस्तांगःसंभृष्टपरुपच्छविः ॥
प्रसुप्तगात्रावयवःशुष्कक्लोमगलाननः ॥

अर्थ—अतिमार्गगमनानें क्षय झाला असतां; आंग गळतें, शरीराचा वर्ण भाजल्या सारिखा खरखरीत होतो; सर्वांगाला मेहरी येते; व क्लोम (पिपासास्थान) गळा व तोंड हीं कोरडीं पडतात.

अध्वशोषचिकित्सा.

आस्यासुखैर्दिवास्वप्नैःशीतैर्मधुरबृंहणैः॥
अन्नमांसरसाहारैरध्वशोषमुपाचरेत् ॥

अर्थ—बसण्याचें सुख, दिवसा निद्रा व शीत, मधुर, पौष्टिक अशीं अन्नें, मांसाचे रस, यांचें सेवन या उपयानीं अध्वशोषावर चिकित्सा करावी.

व्यायामशोषलक्षण.

व्यायामशोषीभूयिष्ठमेभिरेवमुपद्रुतः ॥
लिंगैरुरःक्षतसमैःसंयुक्तश्चक्षतंविना ॥

अर्थ—फारश्रमानें क्षीण झालेला रोगी अध्वशोषोक्त जी स्रस्तांगतादि लक्षणें; त्याणीं युक्त असतो; आणि उरःक्षत नसतां उरःक्षतजनितक्षयलक्षणानीं युक्त असतो.

व्यायामशोषचिकित्सा.

व्यायामशोषिणंस्निग्धैःक्षतक्षयकरैर्हितैः ॥
उपाचरेज्जीवनीयैर्विधिनाश्लेष्मिकेणतु ॥

अर्थ—व्यायामशोषिरोग्याला स्निग्ध, क्षतक्षयावर हितकारक व शरीराला हितकारक, श्लेष्मल व जीवनीयगणोक्त असे उपचार करावे.

व्रणशोषलक्षण.

रक्तक्षयाद्वेदनाभिस्तथैवाहारयंत्रणात् ॥
व्रणिनश्चभवेच्छोषःसचासाध्यतमोमतः ॥

अर्थ—रक्तक्षयानें, व्रणांच्या वेदनानीं व आहार तुटल्यानें, जो व्रणयुक्त मनुष्याला क्षय होतो; तो फार असाध्य जाणावा.

व्रणशोष.

व्रणशोषंजयेत्स्निग्धैर्दीपनैःस्वादुशीतलैः ॥
ईषदम्लैरनम्लैर्वायूषमांसरसादिभिः ॥

अर्थ—स्निग्ध, दीपन, गोड, शीतल, किंचित् आंवट व गोड असे यूष, मांसरस, इत्यादिकानीं व्रणशोषाला जिंकावा.

रसवर्धन.

गुडूचीशृंगवेरंचयवानांक्वथितंजलं ॥ मरीचैःक्वथितंदुग्धंपाने
रात्रौप्रशस्यते ॥ रसस्यतेनवृध्दिःस्यात्क्षयंशीघ्रंविमुंचति ॥

अर्थ—गुळवेल, आलें व यव यांचा काढा किंवा मिरीं घालोन तापविलेलें दूध, हें प्राशन करावें; ह्मणजे रसधातूची वृद्धि होऊन शीघ्र रसक्षयाचा नाश होतो.

रक्तवर्धन.

गोधूमयवशालीनांजांगलानिविशेषतः ॥ घृतदुग्धसिताक्षौद्र
मरीचानिचपिप्पली ॥ पानंशस्तंमनुष्याणांरक्तवृध्दिकरंपरं ॥

अर्थ—गहूं, यव, साळी, जंगलांतील मांसें, तूप, दूध, साकर, मध, मिरीं, आणि पिंपळी, यांचें प्राशन मनुष्यांला रक्तवृद्धिकरण्याविषयीं उत्तम आहे.

मांसवर्धन.

अनूपानिचधान्यानिलशुनादीनिकल्पयेत् ॥
कुल्यासघृतदुग्धादीन्सेवयेन्मधुराणिच ॥

अर्थ–आनूप मांसें, आनूप धान्यें, लसुण, हरणदोडी, तूप, दूध, आणि मधुर पदार्थ हे भक्षण करावे.

मेदवर्धन.

तालिसाद्यंहितंचूर्णसेवनंमधुरांस्तथा ॥
रसांश्चजांगलान्दद्यात्सेवनार्थंभिषग्वरः ॥

अर्थ–तालीसादिकचूर्ण, मधुररस व जांगल मांसांचे रस हे पदार्थ भक्षणास द्यावे.

दुसरा प्रकार.

सीतोपलादिकंचूर्णमजाक्षीरंसकौलकं ॥
हितंपानंक्षयेचैवकल्पयेद्ज्ञातराशनैः ॥

अर्थ–सितोपलादि चूर्ण, शेळीचें दूध, रानडुकराचें मांस व हितकारक पान, हे पदार्थ क्षयनाश करून मेदवृद्धि करितात.

अस्थिवर्धन.

घृतपक्वानिशस्तानिक्षीराणिविविधानिच ॥ चंदनादीनिद्राक्षादि
चूर्णानिचभिषक्वरैः ॥ जांगलानिचसर्वाणिसेवनीयानिपुत्रक ॥
मधुराणितथान्नानिसर्वाणिसंप्रयोजयेत् ॥

अर्थ–घृतपक्व पदार्थ, दूध, चंदनादि, व द्राक्षादि चूर्ण, जंगलांतील मांसें, मधुर अन्नें व पानें, हीं सर्व योजावीं.

शुक्रवृद्धि.

शुक्रक्षयेम्लपक्वानिसराणिचविशेषतः ॥
नवनीतंतथाक्षीरंमधुराणिचसेवयेत् ॥

अर्थ–शुक्रक्षय झाला असतां; आम्लानें सिद्ध केलेले पदार्थ, विशेषेकरून सारक पदार्थ, लोणी, दूध आणि मधुर रस हे योजावे.

दुसरा प्रकार.

कर्कटीमूलपयसाविदारीकंदशाल्मली ॥
सिताढ्यंचहितंपानंशस्यतेमधुनासह ॥

अर्थ–कांकडीचें मूळ, दूध, भुयकोहळा व सांवरीचा कंद, हे साकर व मध घालून प्राशनार्थ द्यावें.

गरुडवेलीचा रस वांतिवर.

पिबेद्वांतिप्रशांत्यर्थंक्षौद्रंछिन्नरुहारसं ॥ मातुलुंगस्यमूलंवालाजाचूर्णससैंधवं ॥ पिप्पलीमधुसंयुक्तंखादेद्वांतिप्रशांतये ॥

अर्थ–क्षयामध्यें वांतिनाशार्थ गरुडवेलीचा रस, मध किंवा महाळुंगाचें मूळ, लाह्यांचें चूर्ण, सैंधव, पिंपळी व मध हीं एकत्र करून द्यावें.

दुसरा प्रकार.

रजनीपूगखंडंचनिष्कैकंवांतिनाशकं ॥ निष्कार्धंटंकणंवाथकाकमाचीद्रवैःपिबेत् ॥ सुगंधंवापिबेत्खादेत्सर्वंवांतिप्रशांतये ॥

अर्थ–हळद, सुपारी व साकर यांचें एक तोळा चूर्ण वांतीचा नाश करितें; किंवा अर्धतोळा कावळीच्या रसांत टाकणखाराची लाही द्यावी; अथवा सुगंधपदार्थांचें भक्षण किंवा प्राशन करावें; ह्मणजे सर्व वांतीची शांति होते.

रक्तवांतिवर.

आलक्तकरसैःक्षौद्रंरक्तवांतिहरंपरं ॥ पुष्यार्केकाकतुंड्यास्तुमूलंगोक्षीरमर्कटं ॥ रक्तवांतिहरंपेयंसदाहेनिष्कनिष्ककं ॥

अर्थ–लाखेचा रस व मध एकत्र करून द्यावा; किंवा कावळीचें मूळ पुष्यार्कयोगावर घेऊन गाईच्या दुधांत उगाळून द्यावें. तें दाहयुक्त रक्ताच्या वांतीचा नाश करितें.

उशीरादिचूर्ण.

उशीरंतगरंशुंठीकंकोलंचंदनद्वयं ॥ लवंगंपिप्पलीमूलंकृष्णैलानागकेसरं ॥ मुस्तामलककर्पूरंतवक्षीरंचपत्रकं ॥ कृष्णागरुसमंचूर्णंसितास्यादष्टमांशतः ॥ रक्तवांतिंचहृत्तापंनाशयेन्नात्रसंशयः ॥

अर्थ–वाळा, तगर, सुंठ, कंकोळ, चंदन, रक्तचंदन, लवंगा, पिंपळीमूळ पिंपळी, एलची, नागकेशर, नागरमोथा, आवळकाठी, कापूर, तवक्षीर, तमालपत्र, कृष्णागरु, हे समभाग व साकर अष्टमांश घालून चूर्ण तयार करावें. तें रक्तवांति व हृदयाचा संताप यांचा नाश करितें.

श्लेष्म्यावर.

विकारेश्लेष्मणोजातेभक्षयेत्कदलीफलं ॥
भृष्टंतन्मरिचैःसाज्यंहंतिश्लेष्माणमुल्वणं ॥

अर्थ–कफविकार झाला असतां केळें भाजून मध व मिरीं यांशीं द्यावें; ह्मणजे वाढलेल्या कफाचा नाश करितें.

कुस्तुंबर्यादिचूर्ण.

घृतंकुस्तुंबरीचूर्णपाययेच्छर्करायुतं ॥
एलाम्मरिचसंयुक्तंखादेदरुचिशांतये ॥

अर्थ—धने, एलची व मिरीं यांचें चूर्ण तूप व साखर यांशी द्यावें; ह्मणजे अरुचि नाश पावते.

अरुचीवर.

खादेदरुचिशांत्यर्थमार्द्रकंवासमाक्षिकं ॥

अर्थ—अरुचीच्या नाशार्थ आलें व मध द्यावा.

दाहावर.

कांचनारस्यत्वक्पिष्टंसजीरंतापनाशकं ॥
कर्पूरेणसमायुक्तंरसंतापिप्रयोजयेत् ॥

अर्थ—कांचनाराच्या सालीचा रस, जिऱ्याचें चूर्ण व कापूर घालून द्यावा; ह्मणजे संतापाचा नाश करितो.

शोपावर.

कोकिलाक्षस्यबीजैर्वाजीरकेणगुडेनवा ॥ वमनेचास्यशोपेवाफलंजातयाःप्रशस्यते ॥ मत्स्याक्षीपाटलामेघनादमूलंचशोपजित् ॥

अर्थ—कोलिस्त्याचें बी, जिरें व जायफळ यांचें चूर्ण गुळाशी द्यावें; किंवा मत्स्याक्षी, पाडळ व तांदुळजा, यांचे मूळ द्यावें, तें शोषनाशक आहे.

उरःक्षतक्षयनिदान.

धनुरायम्यतोत्यर्थंभारमुद्वहतोगुरुं ॥ युध्यमानस्यबलिभिःपततोविषमोच्चतः ॥ वृषंहयंवाधावंतंदम्यंचान्यंनिगृण्हतः ॥ शिलाकाष्ठाश्मनिर्घातान्क्षिपतोनिघ्नतःपराम् ॥ अधीयानस्यवात्युच्चैर्दूराद्वाव्रजतोभृशं ॥ महानदींचातरतोहयैर्वासहधावतः ॥ सहसोत्पततोदूरंतूर्णंवापिप्रनृत्यतः ॥ तथान्यैःकर्मभिःक्रूरैर्भृशमभ्याहतस्यच ॥ विक्ष्यतेवक्षसिव्याधिर्बलवान्समुदीर्यते ॥ स्त्रीषुचातिप्रसक्तस्यरूक्षाल्पप्रमिताशिनः ॥ उरोविरुज्यतेत्यर्थंभिद्यतेथविदह्यते ॥ प्रपीड्यतेतथापार्श्वेशुष्यत्यंगंप्रवेपते ॥ क्रमाद्वीर्यबलंवर्णोरुचिरग्निश्चहीयते ॥ ज्वरोव्यथामनोदैन्यंविड्भेदाग्निवधावपि ॥ दुष्टःश्यावःसदुर्गंधःपीतोविग्रथितोबहु ॥ कासमानस्यचाभीक्ष्णंकफस्रावःप्रवर्तते ॥ सक्षतोक्षीयतेत्यर्थंतथाशुक्रौजसःक्षयात् ॥

अर्थ—जो फार वेळ बळानें तिरंदाजी करितो, बळवंताशीं मल्लयुद्ध करितो, उंचनीचावरून पडतो; किंवा बैल, घोडा इत्यादिकांवरोबर धांवतो; किंवा बळानें धरतो; व मोठाले दगड व मोठें लाकुड हें दूर फेंकतो. मोठ्यानें अध्ययन करितो. दूरपावेतों धावतो. मोठे नदीचें पात्र पोहतो. लांबीची उडी मारतो. जलद नृत्य करितो; इत्यादि साहसकर्में, अथवा अभिघात इत्यादिकारणानीं ऊर फुटून त्यामध्यें मोठा व्याधि उत्पन्न होतो, त्याला उरःक्षय म्हणतात; किंवा अतिमैथुन करणारा, रोज कमीप्रमाणानें अन्न खाणारा त्याला उरःक्षत होतें, त्यानें उरांत फाटल्यासारिखें, किंवा टोंचल्यासारिख्या वेदना होतात. ऊर फुटतोसा वाटतो. जळती लागते. बरगड्या दुखतात. अंगसुकतें. कंप सुटतो; व क्रमानें वीर्य, बळ, कांति, रुचि, आणि अग्नि यांचा नाश होतो; आणि ज्वर मनोग्लानि, दीनपणा, पातळ रेच, अग्निनाश व खाकल्यावरोबर खराब, काळसर, दुर्गंध पिवळा, गांठाळ, आणि पुष्कळ कफ पडतो; याप्रमाणें उरःक्षती, शुक्रक्षयी, आणि ओजःक्षयी हे क्षीण होतात.

उरःक्षताचें पूर्वरूप.

अव्यक्तंलक्षणंतस्यपूर्वरूपमितिस्मृतं ॥

अर्थ—त्याचें अव्यक्त जें लक्षण तें पूर्वरूप जाणावें.

उरःक्षीणाचें असाध्यलक्षण.

उरोरुक्शोणितच्छर्दिःकासोवैशेषिकःक्षते ॥
क्षीणेसरक्तमूत्रत्वंपार्श्वपृष्ठकटिग्रहः ॥

अर्थ—उरःक्षताचे ठाईं उरांत पीडा, रुधिराचें वमन आणि उग्र कास पेक्षा विलक्षण कास हीं पूर्वरूपें होतात; व रक्तक्षयाचे ठायीं मूत्र आरक्तवर्ण होतें; व पार्श्व, पृष्ठ, कटी हीं ताठल्यासारिखीं होतात.

असाध्यलक्षण.

अल्पलिंगस्यदीप्ताग्नेःसाध्योबलवतोनवः ॥ परिसंवत्सरो
याप्यःसर्वलिंगंविवर्जयेत् ॥ परंदिनसहस्रंतुयदिजीवतिमा
नवः ॥ सुभिषग्भिरुपक्रांतस्तरुणःशोषपीडितः ॥

अर्थ—उरःक्षत आणि क्षय यांमध्यें अल्प लक्षणेंकरून युक्त असून ज्या रोग्याचा जठराग्नि प्रदीप्त आहे; व रोगी बलयुक्त आहे; तर साध्य जाणावा; व जो नूतन उत्पन्न क्षय, तोहि साध्य जाणावा; आणि जास्त एक संवत्सर अतिक्रांत झाला आहे, तो दुःसाध्य जाणावा; आणि सर्वलक्षणें करून युक्त जो क्षय तो असाध्य जाणावा हा क्षय, झाला असतां; परमावधी सहस्र दिवस पर्यंत तो रोगी वांचेल; परंतु जर तरुण आहे; आणि उत्तम वैद्याचा आश्रय केला आहे तर,

उरःक्षतक्षयचिकित्साक्रम.

यद्यच्चतर्पणंशीतमविदाहिहितंलघु ॥
अन्नपानंनिषेव्यंतत्क्षतक्षीणैःसुखार्थिभिः ॥

अर्थ:- जें तृप्तिकारक, शीत, विदाहि नव्हे, हितकारक, लघु, असें असेल, तेंतें अन्नोदकसेवन, उरःक्षतानें क्षीण झालेले, आणि सुखाची इच्छा करणारे, त्यांस योग्य आहे.

चिकित्साक्रम.

शोकंस्त्रियःक्रोधमसूयतांचत्यजेदुदारान्विषयान्भजेच्च ॥ तथाद्विजातीं
स्त्रिदशान्गुरूंश्चवाचश्चपुण्याःशृणुयाद्द्विजेभ्यः ॥

अर्थ:- उरःक्षतानें क्षीण झालेल्या मनुष्यानें शोक, स्त्री, दुसऱ्याच्या गुणावर दोषारोप करणें, हें सोडावें; व कथा. पुराण. इत्यादिक नित्य सेवन करावें. देव, ब्राह्मण व गुरु यांची सेवा करावी, ब्राह्मणांपासून पुण्यकारक वाणी श्रवण करावी.

दशमूलादि काढा.

दशमूलवलारास्नापुष्करामरदारुनागरैःक्वथितं ॥
पेयंपार्श्वांसशिरोरुक्क्षतकासादिशांतयेसलिलं ॥

अर्थ— दशमुळ, चिकणा, रास्ना, पोखरमूळ, देवदार, नागरमोथा याचा काढा प्यावा; ह्मणजे कुशी, खांदे, डोकें या ठिकाणचा शूल, उरःक्षत, खोकला, श्वास हे शांत होतील.

वलादिकाढा.

वलाविदारीश्रीपर्णीवहुपत्रीपुनर्नवा ॥ पयसानित्यमभ्यस्ताः
शमयंतिक्षतक्षयं ॥ शृतंपयोमधुयुतंसित्थार्थानांपिबेत्क्षयी ॥

अर्थ—चिकणा, भुईकोहळा, शिवण, कांटेशवती, घेटोळी, हीं वांटून दुध व मध याबरोबर प्यावी; ह्मणजे उरःक्षतक्षयाचा नाश करील.

एलादिगुटिका.

एलापत्रत्वचोद्राक्षापिप्पल्यर्धपलंपृथक् ॥ सितामधुकखर्जूरमृद्वीका
श्चपलोन्मिताः ॥ संचूर्ण्यमधुनायुक्तावटिकाःसंप्रकल्पयेत् ॥ अक्ष
मात्रास्ततश्चैवभक्षयेच्चदिनेदिने ॥ क्षतक्षयंज्वरंकासंश्वासंहिक्कांव
मिंभ्रमं ॥ मूर्छांमदंतृषांशोषंपार्श्वशूलमरोचकं ॥ प्लीहानमाढ्यवातं
चरक्तपित्तंज्वरंक्षयं ॥ एलादिगुटिकाहंतिवृष्यासंतर्पणीपरा ॥

अर्थ—वेलदोडे, तमालपत्र, दालचिनी, द्राक्षें, पिंपळी, हीं प्रत्येक २ तोळे. साकर,

जेष्टीमध, खजूर, द्राक्षें, हीं प्रत्येक चार तोळे. या प्रमाणें घेऊन त्यांत मध घालून खलून गोळ्या एक तोळा प्रमाणाच्या कराव्या. त्यांतून दररोज एकेक खावी; ह्मणजे उरःक्षत क्षय, ज्वर, कास, श्वास, हिक्का, वमि, भ्रम, मूर्छा, मद, तृषा, शोष, पार्श्वशूल, अरोचक, प्लीहा, आढ्यवात, रक्तपित्त, ज्वर व क्षय यांचा नाश करील; अशी ही एलादिगुटिका वृष्य व तृप्तिकारक आहे.

द्राक्षादिघृत.

द्राक्षायाःप्रस्थमेकंतुमधुकस्यपलाष्टकं ॥ पचेत्तोयाढकेशुद्धेपादशेषे गतेनतु ॥ पलिकेमधुकद्राक्षेपिष्टंकृष्णापलद्वयम् ॥ प्रदायसर्पिषः प्रस्थंपचेत्क्षीरेचतुर्गुणे ॥ सिद्धेशीतेपलान्यष्टौशर्करायाःप्रदापयेत् ॥ एतद्द्राक्षाघृतंसिद्धंक्षतक्षीणसुखावहं ॥ वातपित्तज्वरश्वासविस्फोट कहलीमकान् ॥ प्रदररक्तपित्तंचहन्यान्मांसबलप्रदं ॥

अर्थ—द्राक्षें ६४ तोळे, जेष्टीमध ३२ तोळे व पाणी २५६ तोळे. अशीं तिन्हीं एकत्र कढवून चतुर्थांश पाणी उरलें ह्मणजे गाळून घेऊन त्यांत जेष्टीमध आणि द्राक्षें यांचें चूर्ण ४ तोळे, पिंपळीचें चूर्ण ८ तोळे, तूप ६४ तोळे, आणि सर्वांचा चौपट दूध घालून शिजवून थंड झाल्यावर ३२ तोळे साकर घालून कालवावें; ह्मणजे हें द्राक्षाघृत सिद्ध होतें. उरःक्षतानें क्षीणमनुष्यास हितावह आहे; आणि वातपित्तज्वर, श्वास, विस्फोटक, हलीमक, प्रदर व रक्तपित्त यांचा नाश करील; व मांस बल यांतें देईल.

बलादि घृत.

घृतंबलानागबलार्जुनांबुसिद्धंसयष्टीमधुकल्कपादं ॥ हृद्रोगशूलक्षतरक्तपित्तंकासानिलार्शान्शमयत्युदीर्णान् ॥

अर्थ—चिकणा, मोठा चिकणा व सादडा यांचे काढ्यांत ज्येष्टीमधाचा कल्क घालून सिद्ध झालेलें तूप सेवन केलें असतां; हृद्रोग, शूल, उरःक्षत, रक्तपित्त, कास, वायु व मुळव्याध हे अति वाढलेले असले तरीं त्यांचा नाश करील.

पथ्यादि घृत.

पथ्याव्हनागबलयोःक्वाथेक्षीरसमेघृतं ॥ पयसापिप्पलीवासाकल्कासिद्धंक्षतेहितं ॥

अर्थ—हिरडा व चिकणाभेद यांच्या काढ्यांत बरोबरीनें दूध, पिंपळी व अडुळसा यांचे कल्क घालून त्यांत सिद्ध केलेलें तूप उरःक्षतक्षयाचे नाशक आहे.

गोक्षुराद्यघृत.

श्वदंष्ट्रोशीरमंजिष्ठावलाकाश्मर्यकट्तृणं ॥ दर्भमूलंपृष्टिपर्णीबला सर्षपकास्थिरा ॥ पलिकान्साधयेत्तेपांरसेक्षीरेचतुर्गुणे॥ कल्कैःस्वगुप्तर्षभकमेदाजीवंतिजीवकैः ॥ शतावर्यादिमृद्वीकाशर्कराश्रावणीवृषैः ॥ प्रस्थंसिद्धंघृतंवातपित्तहृद्रोगगुल्मनुत् ॥ मूत्रकृच्छ्रप्रमेहार्शकासशोपक्षयापहं ॥ धनुस्त्रिसंगभाराध्वखिन्नानांबलमांसदं ॥

अर्थ–गोखरू, वाळा, मांजिष्ठ, चिकणा, कट्तृण, दर्भमूळ, पिठवण, अतिबला, शिरस व सालवण हे चार चार तोळे घेऊन यांचा रस व चौपट दूध, आणि श्वेत लाजाळू, पांढरी वस, मेदा, जीवंती, जीवक, शतावरी, द्राक्षे, साकर, मुंडी व अडुळसा, यांचे कल्क, आणि १ शेर तूप इतकें घालून तूप सिद्ध करून घेतलें असतां; वात, पित्त, हृद्रोग, गुल्म, मूत्रकृच्छ्र, प्रमेह, अर्श, खोकला, शोप व क्षय यांचा नाश करितें.

अमृतप्राश्यावलेह.

क्षीरधात्रीविदारीक्षुक्षीरीणांचतथारसे ॥ पचेत्समेघृतप्रस्थेमधुकैरिक्षुणान्वितैः ॥ द्राक्षाद्विचंदनोशीरशर्करोत्पलपद्मकैः ॥ मधूककुसुमानंताकाश्मरीतृणसंज्ञकैः ॥ प्रस्थार्धमधुनःशीतोशर्करायास्तुलांतथा ॥ पलार्धकांश्चसंचूर्ण्यत्वगेलापद्मकेसरान्॥विनीयतस्यसंलिह्यान्मात्रांनित्यंसुयंत्रितः ॥ अमृतप्राश्यमित्येतन्निर्मितंत्रिपुरारिणा ॥ क्षीरमांसाशिनोहंतिरक्तपित्तक्षतक्षयान् ॥ तृष्णारुचिश्वासकासछर्दिहिक्काप्रमर्दनं ॥ मूत्रकृच्छ्रज्वरघ्नंचवल्यंस्त्रीरतिवर्द्धनं ॥

अर्थ–दूध, आवळयांचा रस, भुयकोहाळयाचा रस, उसांचा रस, क्षीरवृक्षांचा रस व एकशेर तूप हीं चांगली पचवून नंतर त्यांत ज्येष्ठीमध, ऊंस, द्राक्षे, चंदन, रक्तचंदन, वाळा, साकर, कोष्ठ, पद्मकाष्ठ, मोहाचीं फुलें, धमासा, शिवण व कट्तृण यांचीं चूर्णे घालून लेह सिद्ध करावा. थंड झाल्यावर ३२ तोळे मध, साकर ४०० तोळे व दालचिनी, तमालपत्र, नागकेशर, यांचें चूर्ण दोन तोळे घालून भरून ठेवावा. यांतून आमबिल पाहून द्यावा. दूध व मांस इत्यादिक पदार्थ पथ्याला द्यावे; ह्मणजे रक्तपित्त, क्षतक्षय, ताहान, अरुचि, दमा, खोकला, वांति, उचकी, मूत्रकृच्छ्र व ज्वर यांचा नाश करितो; आणि बल व स्त्रियांशीं रति यातें वाढवितो, याला अमृतप्राश्यावलेह असें नाव आहे.

रसराज.

मुक्ताप्रवालरसहेमशिताभ्रकांतवंगंमृतंसकलमेतदलंविभाव्य ॥ छि
न्नारसेनचवरीसलिलेनसप्तपश्चाद्ददेन्मधुहविर्मरिचेनसार्कं ॥ लि
ह्याद्उरःक्षतहरंरसराजकाख्यंमाषप्रमाणमतनूद्भवहेतुमेनं ॥

अर्थ—मोतीं, पोंवळी, पारा, सोनें, काळा अभ्रक, कांतलोह व कथील या सर्वांचीं समभाग भस्में घेऊन त्यास गुळवेल व शतावरीच्या मुळांचा रस, यांच्या प्रत्येकीं सात सात दिवस भावना द्याव्या; नंतर या रसराजांतून १ मासा घेऊन मध, तूप व मिरीं यांशीं द्यावा; ह्मणजे तो उरःक्षताचा नाश करितो; व कामाला प्रदीप्त करितो.

उरोमंथिक्षतीलाजान्पयसामधुसंयुतान् ॥ सद्यएवपिबेज्जीर्णेपयसा
द्यात्सशर्करं ॥ पार्श्वबस्तिरुजिस्वल्पपित्ताग्निस्तान्सुरायुतान् ॥

अर्थ—उरःक्षतक्षयरोग्यानें लाह्या, दूध व मध यांशीं भक्षण कराव्या, त्या जीरल्यावर-साखर घालून दूध प्यावें; व पार्श्व आणि बस्ति यां मध्यें शूल आणि अग्नि व पित्त हे मंद असतील तर त्याणे मद्याशीं लाह्या भक्षण कराव्या.

लाक्षाचूर्णंसुप्टुकृतंक्षौद्राज्येनान्वितंपयः ॥
शमयतिशोषोद्भूतंवमनंतस्यसिद्धमिव ॥

अर्थ—चांगलें बारीक लाखेचें चूर्ण, मध, तूप आणि दूध हे एकत्र करून घ्यावें. हें क्षयानें वांती होतये, त्यावर सिद्धऔषधासारिखा गुण करितें.

क्षयावर पथ्य.

दोषाधिकस्यबलिनोमृदुशुद्धिरग्रेगोधूममुद्गचणकावनशालयश्च ॥
छागानिमांसनवनीतपयोघृतानिक्रव्यादमांसमपिजांगलजारसाश्च ॥
मार्तंडचंद्रकिरणैःप्रतिशोषितानिलेह्यानिपक्कपलक्लानिसुचूर्णितानि ॥
रागाःसकांबलिकतर्वडवेसवाराभक्ष्याशशांककिरणैर्मधुरोरसश्च ॥
पक्कानिमोचपनसाम्रफलानिधात्रीखर्जूरपौष्करपरूपकनारिकेरं ॥ सौ
भांजनंबकुलकंनवतालसस्यद्राक्षाफलानिभिषजापिइमानिदद्यात् ॥
सिंहास्यपत्रमपिगोमहिषीघृतंचछागाश्रयश्चहितदंतकमूत्रलेपः ॥ म
त्स्यंडिकाशिखरिणीमदिरारसालाःकर्पूरकंमृगमदःशितिचंदनंच ॥
अभ्यंजनानिसुरभीण्यनुलेपनानिस्थानानिवेश्मरचनान्यवगाहनानि ॥

हर्म्यंस्रजःस्मरकथामृदुगंधवाहःशीतानिलास्यमपिचंद्ररुजोविपंची॥ संदर्शनंमृगदृशामपिहेमपूर्णमुक्तामणिप्रचुरभूषणधारणंच ॥ होमप्रदानममरद्विजपूजनानिदिव्यानुपानमपिपथ्यगणःक्षयार्ते ॥

अर्थ—जो दोषाधिक क्षयरोगी त्याची प्रथमतः मृदुरेचकादिकानीं शुद्धि करावी; व गहूं, मूग, चणे, देवभात, बकरीचे मांस, लोणी, दूध तूप, क्रव्यादपक्ष्याचें मांस, जंगलांतील मांसाचा रस, सूर्यकिरणांत तापवून आटलेले लेह्यपदार्थ, पक्क केलेलीं व बारीक केलेली मांसें, खांडवादिराग; आणि कांबलिक (मूळें व फळें यांचें काढ्यांत समभाग तिळपुष्पांची आंब घालतात तो) तर्पण, वेसवार, चांदणें, मधुर रस, पिकलेलीं केळीं, फणस, आंबे, आवळे, खजूर, पुष्करमूळ, चारोळ्या, नारळ, शेवगा, बकुळ, कोंवळेताडाचें फळ, ओलीं द्राक्षें, अडुळसा, गाई व म्हशी यांचे तूप, सर्वदा मेंढयांचा आश्रय, त्याच्या पायां खालचें मुतानें भिजलेल्या मातीचा आंगाला लेप, खडीसाकर, शिखरिणी, मद्य, रसाळा, कापूर, कस्तूरी, पांढरा चंदन, आंगाला सुगंधतेलाचें अभ्यंग, उत्तम, सुंदर व मनोरम अशीं स्थानें व गृहें, माळाधारण, गाणें, कथा व पुराण यांचें श्रवण, मृदु व शीत असा वारा, नाच, चांदणे, वीणा, स्त्रियांचें दर्शन व सुवर्ण, मोत्यें, रत्नें यांच्या अलंकाराचे धारण व होम, दान, देव व ब्राह्मण, यांची पूजा आणि उत्तम उत्तम अनुपानें, हा क्षयरोगावर पथ्यगण सांगितला.

क्षयावर अपथ्य.

विरेचनंवेगविधारणंचश्रमश्चगुस्वेदनमंजनंच ॥ प्रजागरंसाहसकर्मसेवारूक्षंचपानंविषमाशनंच ॥ तांबूलकालिंगकुलिंगमांसंरसोनवंशांकुररामठानि ॥ अम्लानितिक्तानिकषायकाणिकटूनिसर्वाणिचपत्रशाकं ॥ क्षारान्विरुद्धाध्यशनानिबिंबीकर्कोटकंचापिविदाहिसर्वं ॥ कुटिल्लकंकृष्णमपिक्षयेपुविवर्जयेत्संततनप्रमत्तः ॥

अर्थ—विरेचन, मलमूत्रादिवेगधारण, श्रम, स्वेदन, अंजन, जारण, साहसकर्म, रूक्षान्न, रूक्षपान, विषमाशन, विडा, कलिंगड, चिमणापक्षी याचें मांस, लसूण, वेळवाचे कोंब, हिंग व आंबट, तिखट, तुरट, कडु हे रस, पाल्याचा भाज्या, क्षार, विरुद्धाशन, अध्यशन, तोंडलें, कर्टोलें, आणि दाहकारक पदार्थ, रक्त व श्वेत पुनर्नवा हे पदार्थ क्षयरोग्यानें वर्ज्य करावे.

कासीं कर्मविपाक.

द्रव्याणिचाल्पसाराणांस्तेयंकृत्वान्यवेपत: ॥
चरेत्सांतपनंकृच्छ्रमित्येवंमनुरब्रवीत् ॥

अर्थ–दुर्बळलोकाचें द्रव्य चोरितो तो पुरुष कफरोगी होतो. त्याणें कृच्छ्र आणि सांतपन, अशीं प्रायश्चित्तें करावीं, असें मनूनें सांगीतलें आहे.

दुसरा प्रकार

त्रपुहारीचपुरुषोजायतेश्लेष्मल:सदा ॥
उपोष्यदिवसंसोपिदद्यात्पलशतंत्रपु ॥

अर्थ–कथील चोरणारा पुरुष कफरोगी होतो, त्याणें एक दिवस उपोषण करून पांचशें तोळे कथील दान करावें.

तिसरा प्रकार.

नित्यानुष्ठानविमुख:कफरोगीभवेन्नर: ॥ पराभवंसचाप्नोतीत्याहवै भगवान्यम: ॥ तच्छांतयेमासमेकंयावकंभक्षयेन्नर: ॥ सहस्रनाम पाठश्चहोमश्चाष्टोत्तरायुतं ॥ नाममंत्रेणकुर्वीतचर्वाज्यंचहविर्भवेत् ॥

अर्थ–जो नित्यकर्म संध्यादिक करीत नाहीं, तो कफरोगी होतो. त्याला कफापासून किंवा शत्रुंपासून पीडा होत्ये. असें यमानें सांगीतलें आहे, त्यांच्या शांत्यर्थ एक महिना पर्यंत यावकान्न खावें; आणि विष्णुसहस्रनामाचा पाठ व नाममंत्रानें चरु व आज्य ह्या द्रव्यानीं अष्टोत्तरशत होम याप्रमाणें विधि करावा.

ज्योति:शास्त्राभिप्राय.

सूर्येकुलीरजातेबुधेनदृष्टेविगतनेत्र: ॥
कफमारुतरोगार्त:परस्वहारीविलोलमतिचेष्ट: ॥

अर्थ–जन्मकाळीं कर्कराशिस्थ सूर्य असून बुधाची त्यावर दृष्टि आहे, तर नष्टदृष्टि होतो; किंवा कफवातरोगी होतो, किंवा चोरी व चंचळपणा हीं कर्में करितो.

कारण, संप्राप्ति, आणि निरुक्ति.

धूमोपघाताद्रजसस्तथैवव्यायामरूक्षान्ननिषेवणाच्च ॥ विमार्गगत्वा दपिभोजनस्यवेगावरोधात्क्षवथोस्तथैव ॥ प्राणोह्युदानानुगत:प्रदुष्ट:संभिन्नकांस्यस्वनतुल्यघोष: ॥ निरेतिवक्त्रात्सहसासदोषोमनीषिभि:कासइतिप्रदिष्ट: ॥

अर्थ–नाकांत व तोंडांत धूर किंवा धुरळा भरून गुदमुरल्यानें, श्रम व रूक्ष अन्न यांच्या सर्वकाळ सेवनानें, किंवा भोजन भलत्याच मार्गानें पोटांत गेल्यानें व मल, मूत्र, किंवा शिंका इत्यादिकांच्या वेगरोधानें, वायु दुष्ट होऊन कंठगतवायूशीं मिळून फुटक्या कांस्यपात्राच्या ध्वनीसारिखा शब्द करीत अकस्मात मुखावाटे कफयुक्त थुंका निघतो, त्याला ज्ञाते खोकला ह्मणतात.

संख्या, रूप, संप्राप्ति.

पंचकासाःस्मृतावातपित्तश्लेष्मक्षतक्षयैः ॥
क्षयायोपेक्षिताःसर्वेबलिनश्चोत्तरोत्तरं ॥

अर्थ–(कास) खोकला– पांच प्रकारचा. तो कफ, वात, पित्त, उरःक्षतज, आणि क्षयज असा आहे. यांतून कोणत्याविषयीं ही उपेक्षा केली असतां; क्षयाला उत्पन्न करितो. हे पांच ही एकाहून एक बलवान् आहेत.

पूर्वरूप.

पूर्वरूपंभवेत्तेषांशूकपूर्णगलास्यता ॥
कंठेकंडूश्चभोज्यानामवरोधश्चजायते ॥

अर्थ–खोकला– उत्पन्न होण्यापूर्वी तोंडांत बारीक कांटे येतात; व गळ्यांत खाजवते; आणि भोजनमार्गाचा अवरोध होतो.

वातिककासनिदान.

हृच्छंखमूर्द्धोदरपार्श्वशूलीक्षामाननःक्षीणबलस्वरौजाः ॥
प्रसक्तवेगस्तुसमीरणेनभिन्नस्वरःकास्यतिशुष्कमेव ॥

अर्थ–वातिक खोकला झाला असतां; हृदय, शंख, मस्तक, उदर, पार्श्व यांस शूल होतो, मुख म्लान होतें; बल, तेज व स्वर हीं क्षीण होतात. निरंतर खोकल्याचे वेग येतात; व स्वरभेद होऊन कोरडी ढांस उत्पन्न होत्ये.

कासचिकित्सापरिभाषा.

रूक्षस्यानिलजंकासमादौस्नेहैरुपाचरेत् ॥ सर्पिर्भिर्बस्तिभिःपेयाक्षीरयूषरसादिभिः ॥ ग्राम्यानूपोदकैःशालियवगोधूमषष्टिकैः ॥ रसैर्मांसात्मगुप्तानांयूषैर्वाभोजयेद्धितैः ॥

अर्थ–रूक्ष रोग्याच्या वातकासाला प्रथम स्नेहपानादि उपचार करावे; व घृतें, बस्तिकर्म इत्यादि करावीं; आणि पेया, क्षीर, यूष, रस, ग्राम्य व अनूप उदकें, साळी, यव, गहूं, साटकी, हीं धान्यें व मांस व कुहिरी यांचे रस किंवा यूष यांचे भोजन द्यावें.

रुद्रपर्पटी.

शुद्धसूतंद्विधागंधंसंमर्द्यपांद्रवैःपुनः ॥ वातारिराद्रकंशृंगीकाकमाच्या
दिकर्णिका ॥ दिनैकंमर्दयेत्खल्वेपाचयेत्पर्पटींनथा ॥ द्वयोःपादमृतंता
म्रंक्षिप्त्वामृद्वग्निनापचेत् ॥ रक्तवर्णभवेद्यावत्तावत्पाच्यंप्रचालयेत् ॥
प्रक्षिपेत्कदलीपत्रेस्थाप्यास्निग्धपुटेपुनः ॥ आच्छादयतेनयोगेनअधश्चो
र्ध्वंचगोमयं ॥ दग्धंविचूर्णयेत्पश्चाच्चूर्णपादंविषंक्षिपेत् ॥ रुद्रपर्पटिकाह्येषा
पादेयागुंजाद्वयंद्वयं ॥ चूर्णितंकटुनिर्गुंड्यामूलंनिष्कद्वयंपिबेत् ॥ भृंग
राजरसेनैवलिहेद्वामधुनासह ॥ वातकासंनिहंत्याशुसर्वथैवनसंशयः ॥

अर्थ–शुद्ध पारा १ भाग, गंधक २ भाग, यांची कज्जली करून ती एरंडमूळ, का. कडशिंगी, कावळी व ऐरण यांच्या रसांत एक दिवस खलून नंतर ती पचवून पर्पटी तयार करावी, तींत दोघांचे चतुर्थांश ताम्रभस्म घालोन मंदाग्नीवर पचन करावी, आ. रक्तवर्ण दिसूं लागली ह्मणजे केळीच्या पानावर ओतून त्यावर दुसरें केळीचें पान दडपून त्याच्या खालीं वर शेण घालावें, थंड झाल्यावर काढून चूर्ण करून त्यात चतुर्थांश बच-नाग मिळवावा. ही रुद्रपर्पटी दोन गुंजा अनुपानाशीं द्यावी; आणि मागून काळ्या निर्गुंडीच्या मुळाचें चूर्ण साहा मासे घ्यावें; किंवा माक्याचा रस व मध याशीं द्यावी; ह्मण जे सर्वप्रकारच्या वातकासाचा नाश करितें.

भूनांकुशरस.

शुद्धसूतस्यभागैकंद्विभागंशुद्धगंधकं ॥ भागत्रयंमृतंताम्रंमरीचंद
शभागिकं ॥ मृताभ्रस्यचतुर्भागंभागमेकंविषंक्षिपेत् ॥ भूनांकुश
स्यभागैकंसर्वमाम्लेनमर्दयेत् ॥ रसोभूनांकुशोनामपापिकोवा
तकासजित् ॥ अनुपानंलिहेत्क्षौद्रंविभीतकफलत्वचः ॥

अर्थ–शुद्ध पारा १ भाग, गंधक २ भाग, ताम्रभस्म ३ भाग, मिरें १० भाग, अभ्रकभस्म ४ भाग, बचनाग १ भाग, व नाकशिकणी १ यां सर्वांला एकत्र करून त्याचा लिंबाच्या रसांत खल करावा. हा भूनांकुश रस एक मासा घेऊन बेहेड्याचें चूर्ण व मध यांशीं द्यावा; ह्मणजे वातकासाचा नाश करितो.

सठ्यादिलेह.

सठीशृंगीकणाभार्गीगुडवारिदयासकैः ॥
सतैलैर्वातकासघ्नोलेहोयमपराजितः ॥

अर्थ—कचोरा, कांकडशिंगी, पिंपळी, भारंगमूळ, गुळ, नागरमोथे व धमासा यांचा लेह करून त्यांत तैल घालून सेवन केला असतां; निश्चयानें वातकासाचा नाश करितो

भार्ग्यादिलेह.

भार्ङ्गीद्राक्षासठीशृंगीपिप्पलीविश्वभेषजं ॥
गुडतैलयुतोलेहोहितोमारुतकासिनां ॥

अर्थ—भारंगमूळ, द्राक्षे, कचोरा, कांकडशृंगी, पिंपळी व सुंठ यांचा गुळाशीं लेह करून तैल घालून सेवन केला असतां; वातकासी रोग्याला हित होतें.

विश्वादिलेह.

विश्वाभार्ङ्गीकणासोमवल्कद्राक्षासठीसिताः ॥
लीढातैलेनवातोत्थंकासंजयतिदुस्तरं ॥

अर्थ—सुंठ, भारंगमूळ, पिंपळी, कायफळ, द्राक्षें व कचोरा, यांच्या तैलाशीं लेह करू- न त्यांत साकर घालून घेतला असतां; मोठा दुस्तर वातकास नाश पावतो.

दशमूलीघृत.

दशमूलीकषायेणभार्ङ्गीकल्कैर्घृतंपचेत् ॥
दशातित्तिरनिर्व्यूहैस्तत्परंवातकासनुत् ॥

अर्थ—दशमूळांचा काढा, भारंगमूळांचा कल्क व दहा तित्तिरपक्ष्यांचे मांसाचा काढा, यांत तूप तयार करावें, तें वातकासनाशाविषयीं उत्तम आहे-

कट्फलादिपेय वातकफकासावर.

कट्फलंकटृतृणंभार्ङ्गीमुस्तधान्यंवचाभया ॥ शुंठीपर्पटकं शृंगीसुराव्हंचजलेशृतं ॥ मधुहिंगुयुतंपेयंकासेवातकफा न्विते ॥ कंठरोगेमुखेशूलेहिक्काश्वासज्वरेपुच ॥

अर्थ—कायफळ, रोहिसगवत, भारंगमूळ, नागरमोथा, वेखंड, धने, हिरडा, सुंठ, पित्तपापडा, कांकडशिंगी, देवदार, यांचा काढा मध, हिंग, घालून प्यावा; ह्मणजे तो वात- कफयुक्तकास, कंठरोग, मुखरोग, शूळ, हिक्का, श्वास व ज्वर, यांच्यावर प्रशस्त आहे.

शुंठ्यादिचूर्ण.

शुंठीदुरालभेरंडमूलंकर्कटशृंगिका ॥ चचुंदरोदेवदारुश्चू र्णमेषांसमांशतः॥ उष्णेनवारिणाकिंवातैलेनालोडयभक्षि तं ॥ वातजंश्लेष्मजंकासंनाशयत्यातिवेगतः ॥

अर्थ–सुंठ, धमासा, एरंडमूळ, कांकडशिंगी, चचुंदर, देवदार, यांचे समभाग चूर्ण उनपाण्याशीं, किंवा तेलाशीं घेतलें असतां; वातोत्पन्न व कफोत्पन्न खोकल्याचा नाश करितें.

चित्रकादिलेह.

चित्रकंपिप्पलीमूलंव्योपंमुस्तादुरालभा ॥ शठीपुष्करमूलंचश्रेयसीसुरसावचा ॥भार्ङ्गीछिन्नरुहारास्नाकर्कटाख्याचकर्पिका ॥कल्कोग्निदग्धद्वितुलांकपायेपलविंशतिः ॥ मत्स्यंडिकायादशवासर्पिपःकुडवंपचेत् ॥सिद्धेसतिपृथक्क्षौद्रपिप्पलीकुडवान्वितं ॥चतुःपलंतुगाक्षीर्याश्चूर्णंतत्रप्रदापयेत् ॥ लेहयेत्कासहृद्रोगश्वासगुल्मनिवारणं ॥

अर्थ–चित्रकमूळ, पिंपळीमूळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, नागरमोथा, धमासा, कचोरा पुष्करमूळ, हरीतकी, तुळस, वेखंड, भारंगमूळ, गरुडवेल, रास्ना, कांकडशिंगी, यासमभाग, औषधांचा कल्क आणि राख ८० तोळे हीं त्या औषधांच्या ८०० तोळे काढयांत घालून त्यांत खडिसाकर ४० तोळे व तूप ६४ तोळे घालून तो काढा पचवावा; ह्मणजे लेह सिद्ध झाला; त्यांत मध, पिंपळी, व वंशलोचन हीं प्रत्येकीं १६ तोळे घालावीं; आणि त्यांतून देत जावा; ह्मणजे खोकला, हृद्रोग, दमा आणि गुल्म, यांचे निवारण करितो.

शुंठ्यादिलेह वातकासावर.

चूर्णिताविश्वदुःस्पर्शाशृंगीद्राक्षाशठीसिता ॥
लिहेत्तैलेनवाताढ्यंकासंजयतिदुस्तरं ॥

अर्थ–सुंठ, धमासा, कांकडशिंगी, द्राक्षे, कचोरा व साकर यांच्या तेलाशीं लेह करून द्यावा तो दुस्तर वाताधिक खोकल्याचा नाश करितो.

दशमूळांचा काढा.

दशमूलीशृताविश्वाकासहिक्कारुजापहा ॥
यवागूदीपनीवृष्यावातरोगविनाशनी ॥

अर्थ–दशमूळें व सुंठ, यांचा काढा कास व उचकी, यांचा नाशक आहे; आणि यवागू, साहापट पाणी घालून पातळ केलेला भात, दीपन, कामोद्दीपक व वातरोगांचा नाश करणारा आहे.

पंचमूळकाढा.

पंचमूलीकृतःक्काथःपिप्पलीचूर्णसंयुतः ॥
रसान्नमश्नतोनित्यंवातकासमुदस्यति ॥

अर्थ–शालिपर्णी, पृष्टिपर्णी, रिंगणी, डोर्ली व गोखरू यांचा काढा पिंपळीचें चूर्ण घालून घ्यावा; व रसयुक्त भोजन करावें; ह्मणजे वातकासाचा नाश करितो.

कर्कटकरस.

रसंकर्कटकानांवाघृतभृष्टंसनागरं ॥

वातकासप्रशमनंशृंगीमत्स्यस्यवापुनः ॥

अर्थ–खेकडयाचा रस घृतांत भाजून त्यांत सुंठ घालून खावा; किंवा शृंगीमत्स्याचा रस घृतांत भाजून सुंठ घालोन खावा; ह्मणजे वातकास शमतो.

शुंठयादिचूर्ण.

शुंठीदुरालभाद्राक्षाकर्चूरस्तवराजकं ॥

वातकासंनिहंत्याशुतैलभुक्तंहिचूर्णकं ॥

अर्थ–सुंठ, धमासा, द्राक्षें, कचोरा व यवासशर्करा यांचे चूर्ण तेलांतून खावें; ह्मणजे वातकासाचा नाश करितें.

पित्तकासनिदान.

उरोविदाहज्वरवक्त्रशोषैरभ्यर्दितस्तिक्तमुखस्तृषार्तः ॥

पित्तेनपीतानिवमेत्कटूनिकासेत्सपांडुःपरिदह्यमानः ॥

अर्थ–पित्ताधिक कास झाला असतां; उरांत दाह, ज्वर, तोंडास कोरड, तोंड कडु तृषा फार, पित्तमिश्रित व कटु असा थुंका सुटतो, रोगी पांडुवर्ण होतो; व सर्वांगाची आग होत्ये, असें जाणावें.

सिंहास्यादिकाढा.

सिंहास्यामृतसिंहीनांक्काथंमधुयुतंपिबेत् ॥

पिबेत्सपित्तकफजेकासेश्वासेज्वरेक्षये ॥

अर्थ–अडुळसा, गुळवेल व रिंगणी यांच्या काढयांत मध घालून घ्यावा, तो पित्तकफात्मक कास, दमा, ज्वर, आणि क्षय यांचा नाश करितो.

वलादिकाढा.

वलाद्विबृहतीद्राक्षावासाभिःक्वथितंजलं ॥

पित्तकासापहंपेयंशर्करामधुयोजितं ॥

अर्थ–चिकणामूळ, रिंगणी, डोर्ली, द्राक्षें व अडुळसा यांचा काढा साकर व मध घालोन घ्यावा, हा पित्तकासनाशक आहे.

सठ्यादिकाढा.

सठीह्रीबेरबृहतीशर्कराविश्वभेषजं ॥
पक्त्वारसंपिबेत्पूतंसघृतंपित्तकासनुत् ॥

अर्थ—कचोरा, वाळा, रिंगणी व सुंठ यांचा काढा गाळून आंत तूप व साकर घालोन घ्यावा; ह्मणजे तो पित्तकासाचा नाश करितो.

शरादिकाढा.

शरादिपंचमूलस्यपिप्पलीद्राक्षयोस्तथा ॥
कषायेण शृतंक्षीरंपिबेत्समधुशर्करं ॥

अर्थ—शर, इक्षु, दर्भ, कसई, साळीभात, यांच्या मुळांचा कषाय करून त्यांत दूध घालोन आटवून मध साकर घालोन द्यावा, तसाच पिंपळी व द्राक्षें यांचा काढा करून आंत दूध घालोन आटवून मध व साकर घालोन द्यावा; ह्मणजे तो पित्तकासाचा नाश करितो

सठ्यादिकाढा

सठीद्विपंचमूलस्यपिप्पलीद्राक्षयोस्तथा ॥
कषायेणशृतंक्षीरंपिबेत्समधुशर्करं ॥

अर्थ—कचोरा, दशमूळे, पिंपळी आणि द्राक्षें यांच्या काढ्यांत तापविलेलें दूध, मध, व साकर घालोन द्यावा, तो कासनाशक आहे.

त्वक्क्षीरलेह.

त्वक्क्षीरपिप्पलीलाजाद्राक्षाजलदशर्कराः ॥
सर्पिर्मध्वान्वलेहोयंपित्तकासविनाशनः ॥

अर्थ—तवखीर, पिंपळी, लाह्या, द्राक्षें, नागरमोथा व साकर यांचा लेह तूप व मध यांतून द्यावा, हा पित्तकासाचा नाश करितो.

कंटकार्यादिकाढा.

कंटकारीयुगंद्राक्षावासाकर्चूरवालकैः॥ नागरेणचपिप्पल्या
क्वथितंसलिलंपिबेत् ॥ शर्करामधुसंयुक्तंपित्तकासहरंपरं ॥

अर्थ—रिंगणी, डोरली, द्राक्षे, अडुळसा, कचोरा, वाळा, सुंठ आणि पिंपळी, यांचा काढा साकर व मध घालोन द्यावा, तो पित्तकासाचा नाश करण्याविषयीं उत्कृष्ट आहे.

पिप्पल्यादिचूर्ण.

पिप्पलीतवराजश्चतवक्षीरंत्रयंसमं ॥
मधुसर्पिर्युतंभुक्तंपित्तकासविनाशनं ॥

अर्थ-पिंपळी, गगातशर्करा व तवखीर हीं समभाग घेऊन त्याचें चूर्ण मध व तूप घालोन द्यावें; ह्मणजे पित्त कासाचें निवारण होतें.

मधुकादिचूर्ण.

मधुकंपिप्पलीमूलंदूर्वाद्राक्षाकणासमं ॥
घृतेनमधुनायुक्तंपित्तकासविनाशनं ॥

अर्थ-ज्येष्ठीमध, पिंपळीमूळ, दूर्वा, द्राक्षें, आणि पिंपळी, यांचें समभाग चूर्ण करून तें मधाशीं द्यावें; ह्मणजे पित्तकासाच निवारण होतें.

अर्धावर्तितकाढा.

अर्धावर्तितपानीयंसलाजंपिप्पलीमधु ॥
त्र्यंसर्पिर्युतंभुक्तंपित्तकासविनाशकृत् ॥

अर्थ-निमें आटलेलें पाणीं, लाह्या व पिंपळी यांचा काढा करून त्यांत मध व तूप घालोन घ्यावा; ह्मणजे पित्तकासाचें निवारण होतें.

मातुलिंगादिलेह.

मातुलिंगरसोहिंगुत्रिफलामधुशर्करा ॥
सर्पिर्मध्वावलेहोयंपित्तकासविनाशकृत् ॥

अर्थ-महाळुंगाचा रस, हिंग व त्रिफला यांचा काढा मध व साकर घालोन द्यावा; ह्मणजे पित्तकासाचें निवारण होतें.

खर्जूरादिलेह.

खर्जूरंपिप्पलीद्राक्षासितालाजाःसमांशकाः ॥
मधुसर्पिर्युतोलेहःपित्तकासहरःपरः ॥

अर्थ-खजूर, पिंपळी, द्राक्षे, साकर व लाह्या ह्या समभाग औषधांचा लेह मध व तूप घालोन सेवन केला असतां; पित्तकासाचा नाश करितो.

द्राक्षामलकादिलेह.

द्राक्षामलकखर्जूरंपिप्पलीमरिचान्वितं ॥
पित्तकासहरंह्येतल्लिह्यान्माक्षिकसर्पिषा ॥

अर्थ-द्राक्षें, आवळकाठी, खजूर, पिंपळी, मिरें हीं एकत्र खलून मध व तूप यांबरोबर खावीं, तीं पित्तकासनाशक आहेत.

क्षीरामलकघृत.

महिष्यजाविगोक्षीरधात्रीफलरसैःसमैः ॥

सर्पिःप्रस्थंपचेद्युक्त्यापित्तकासनिबर्हणं ॥

अर्थ—म्हैस, शेळी, मेंढी व गाय; यांची दूधें व आवळ्यांचा रस हीं समभाग घेऊन त्यांत ६४ तोळे तूप घालोन युक्तीनें पचन करावें; आणि घ्यावें; म्हणजे तें पित्तकासनाश करितें.

रस.

भस्मताम्राभ्रतीक्ष्णानांकासमर्दवरीरसैः ॥ मुनिजैर्वेतसाम्ले

नदिनंमद्येनुपीडितं ॥ निष्कार्धंपित्तकासार्तंभक्षयेन्नात्रसंशयः ॥

अर्थ—ताम्रभस्म, अभ्रकभस्म व कांतभस्म, एकत्र करून त्याला कासिवदा, शतावरी, हातगा, गलगला आणि मद्य यांत घोटून दोन मासे पित्तकासी रोग्याला द्यावा.

लोकेश्वररस.

रसोलोकेश्वरोप्यत्रपिप्पलीमधुनासह ॥

दातव्योविनिहंत्येवपित्तकासंसुदारुणं ॥

अर्थ—लोकेश्वररस व पिंपळी, मध यांतून द्यावा, तो दारुणपित्तनाशक आहे.

कफकासनिदान.

प्रलिप्यमानेनमुखेनसीदन्शिरोरुजार्तःकफपूर्णदेहः ॥

अभक्तरुग्गौरवकंडुयुक्तःकासेद्भृशंसांद्रकफःकफेन ॥

अर्थ—कफकास झाला असतां; सर्वकाळ कफाचे चिकटयानें तोंड सर्वदा लिप्त, अशक्तपणा, सर्वशरीर कफानें व्याप्त, मस्तकास शूल, अरोचक, जडत्व, घशांत कंडू, खोकतानां कफाचे गोळे पडतात, इत्यादि लक्षणें जाणावीं.

कफकाससामान्यचिकित्सा.

कफजेवमनंकार्यंकासेलंघनमेवच ॥

शस्तापवाताप्रकृतिर्यूषाश्चकटुतिक्तकाः ॥

अर्थ—कफजकासावर प्रथमतः वमन व लंघन हे उपचार व मुख्यत्वेंकरून वात रहित प्रकृति राखणें; आणि कडु, तिखट असे यूष देणें, इत्यादि उपचार करावे.

नवांगयूप.

मुद्गामलाभ्यांयवदाडिमाभ्यांकर्कंधुनामूलसशुष्ककेन ॥

शुंठीकणाभ्यांसकुलित्थकेनयूपोनवांगःकफकासहंता ॥

अर्थ—मूग, आवळकाठी, यव, डाळिंब, बोरें, सुके मुळे, सुंठ, पिंपळी, आणि कुळिथ यांचा यूष करावा; हा नवांगयूष कफकासाचा नाश करितो.

पिप्पल्यादिकाढा.

पिप्पलीकट्फलंशुंठीशृंगभिभांर्ङीतथोपर्णं ॥ कारकंकंटकारीचसिंधुवारीयवानिका ॥ चित्रकोवासकश्चैपांकषायंविधिवरकृतं ॥ कफकासविनाशायपिबेत्कृष्णारजोयुतं ॥

अर्थ—पिंपळी, कायफळ, सुंठ, कांकडशिंगी, भारंगमूळ, मिरें, ओंवा, रिंगणी, निर्गुंडी, अजमोद, चित्रक व अडुळसा यांचा काढा करून त्यांत पिंपळीचें चूर्ण घालून द्यावा; ह्मणजे कफकासाचें निवारण करितो.

पित्तश्लेष्मकास.

वासकःस्वरसःपेयोमधुयुक्तोहिताशिना ॥
पित्तश्लेष्मकृतेकासेतालीसाद्यंचयोजयेत् ॥

अर्थ—पित्तश्लेष्मकासावर अडुळशाचा रस मध घालून द्यावा, व पथ्य करावें; किंवा तालिसादिचूर्ण द्यावें.

अवलेह.

शठीसातिविषामुस्ताशृंगीकर्कटकस्यच ॥ अभयांशृंगवेरंचसमानंशुठ्यादिपेषयेत् ॥ हिंगुसैंधवसंयुक्तंतक्रोदकपरिप्लुतं ॥ श्लेष्मकासीलिहेदेवमवलेहंमुहुर्मुहुः ॥

अर्थ—कचोरा, अतिविष, नागरमोथा, कांकडशिंगी, कांकडाचे झाड, हरीतकी, आलें; आणि सुंठ, हीं समभाग घेऊन चूर्ण करून तें ताकाच्या निवळीशीं हिंग व सैंधव घालून वारंवार चाटावयास द्यावें; ह्मणजे कफकास नाश पावतो.

बिभीतकधारण.

बिभीतकंघृताभ्यक्तंगोशकृत्परिवेष्टितं ॥
स्विन्नमेतन्निहंत्याशुकासमास्यविधारितं ॥

अर्थ—बहेडेदळाचें चूर्ण तुपांत मळून त्याला पानें बांधून त्याच्या बाहेरून शेण थापून भाजून काढावें, तें मुखांत धरिलें असतां; कासाचा नाश करितें.

भद्रमुस्तादि चूर्ण.

भद्रमुस्ताकणाचूर्णंसमांशंमधुनासह ॥
निहंतिभक्षितंशीघ्रंश्लेष्मकासंनसंशयः ॥

अर्थ—नागरमोथा व पिंपळी, यांचे समभाग चूर्ण मधाशीं भक्षणार्थ द्यावें; ह्मणजे श्लेष्मकास नाश पावतो.

पथ्यादि चूर्ण.

पथ्याविश्वाकणामुस्तादेवदारुःसमांशकं ॥
एतच्चूर्णमधूपेतंश्लेष्मकासापनुत्तये ॥

अर्थ–हरीतकी, सुंठ, पिंपळी, नागरमोथा व देवदार यांचें समभाग चूर्ण एकत्रकरून मधाशीं द्यावें; ह्मणजे श्लेष्मकासाचा नाश करितें.

चित्रकादि चूर्ण.

चित्रकंपिप्पलीमूलंपिप्पलीगजपिप्पली ॥
एतच्चूर्णसमंयुक्तंमधुनाश्लेष्मकासनुत् ॥

अर्थ-चित्रकमूळ, पिंपळीमूळ, पिंपळी व गजपिंपळी यांचें चूर्ण समभाग एकत्र करावें; आणि मधाशीं द्यावें; ह्मणजे श्लेष्मकासाचा नाश करितें.

शिलादि लेह.

शिलाव्योषाभयाहिंगुविडंगसैंधवंसमं ॥
लेह्यंसाज्यमधुश्वासहिक्काकासेपुशस्यते ॥

अर्थ–मनशीळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, हरीतकी, हिंग, वावडिंग व सैंधव यांचें चूर्ण मध व तूप यांशीं द्यावें; तें श्वास, उचकी व कास यांवर उत्तम आहे.

व्योषादि घृत.

व्योषाजमोदचित्रकजीरकवड्ग्रंथिचव्यकल्कितंसर्पिः ॥
कफकासश्वासहरंवासकरससाधितंसमधु ॥

अर्थ–सुंठ, मिरीं, पिंपळी, अजमोद, चित्रक जिरें, वेखंड व चवक, या समभाग औषधांचा कल्क करून त्यांत तूप, अडुळशाचा रस व मध घालून सेवन केला असतां; तें कफसंबंधि कासश्वासांचा नाश करितें.

कटुत्रयादि चूर्ण.

कटुत्रयंपावकदेवदारुरास्नाविडंगत्रिफलामृतानां ॥
चूर्णसमांशंसितयासमेतंकासंजयेद्विष्णुगदेवदैत्यान् ॥

अर्थ–सुंठ, मिरीं, पिंपळी, चित्रक, देवदार, रास्ना, वावडिंग, हरडा, बेहडा व आवळकाठी, याचे चूर्ण साकर घालून द्यावें; ह्मणजे कासाचा नाश करितें.

बोलबद्धरस.

रसभस्मविषंतुल्यंबोलाद्याद्विगुणंमतं ॥ बोलतालकपाठाग्निकर्कोटीमाक्षिकंनिशा ॥ कंटकारीयवक्षारंलांगलीजीरसैंधवं ॥ मधूकसारसंचूर्णस

सप्ताहंचार्द्रकद्रवैः ॥ छायायांभावयेत्पश्चात्सप्ताहंचित्रकद्रवैः ॥ गुटिकाब दराकाराश्लेष्मकासापनुत्तये ॥भक्षयेद्बोलबद्धोयंरसःस्यात्श्वासपांडुजित् ॥

अर्थ–पारदभस्म व बचनाग हीं समानभाग, व बोळ, हरताळ, पाहाडमूळ, काकडाचे शाड, सुवर्णमाक्षिक, हळद, रिंगणी, जवखार, कळलावी, जिरें, सैंधव, ज्येष्ठीमध व जाई यांचे चूर्ण सातदिवस आल्याच्या रसांत खलावें; नंतर छायाशुष्क करून सातदिवस चित्रकाच्या रसाच्या भावना देऊन गोळी बोराएवढी करावी, ती कफरोग, श्वास व पांडुरोग यांतर द्यावी.

दंतीधूम.

दंतिमूलस्यधूमंवानिर्गुंडीचापियोजयेत् ॥
श्लेष्मकासंनसंदेहोधूमपानेनतत्क्षणात् ॥

अर्थ–दांतीच्या मुळांचा किंवा निर्गुंडीचा धूम घ्यावा; म्हणजे तो श्लेष्मकासाचे तत्क्षणीं निवारण करितो.

उरःक्षतकासनिदान.

अतिव्यवायभाराध्वयुद्धाश्वगजनिग्रहैः ॥
रूक्षस्योरःक्षतंवायुर्गृहीत्वाकासमावहेत् ॥

अर्थ–अतिमैथुन, अतिओझें घेणें, अतिमार्गगमन, मल्लयुद्ध, अश्व व गज, यानां मोठ्या श्रमानें आवरणें इत्यादिकारणानीं रूक्ष देहिपुरुषाचा कुपित वायु उराचे ठायीं क्षत करून कास उत्पन्न करितो.

क्षतकासलक्षण.

सपूर्वंकासतेशुष्कंततःष्ठीवतिशोणितं ॥ कंठेनरुजतात्यर्थंविभिन्नेनेव चोरसा ॥ सूचीभिरिवतीक्ष्णाभिस्तुद्यमानेनशूलिना ॥ दुःखस्पर्शेन शूलेनभेदपीडाभितापिना ॥ पर्वभेदज्वरश्वासतृष्णावैवर्ण्यपीडितः ॥
पारावतइवाकूजन्कासवेगात्क्षयोभवेत् ॥

अर्थ–उरःक्षतकासाचे ठायीं रोग्यास कोरडी ढास व तोंडांतून रक्तमिश्रित व कफयुक्त थुंका, कंठांत वेदना, खोकतां खोकतां उर फाटतो असा भास, त्यांत दाभण टोंचल्यासारिखा व हृदयस्फोटजनितपीडा व संताप ईहीं करून युक्त व दुस्पर्श असा शूल होतो, तेणेंकरून रोगी फार पीडा पावतो; व सांधे दुखून नंतर ज्वर, श्वास, तृष्णा व स्वरभेद यांही पीडित होतो; व क्षतोद्भवकासाच्या योगेंकरून पारव्यासारिखा घुमतो असें जाणावें.

क्षयकासनिदान.

विषमासात्म्यभोज्यातिव्यवायाद्वेगनिग्रहात् ॥ घृणिनांशोच

तांनृणांव्याप्यंतेग्नौत्रयोमलाः ॥ कुपिताक्षयजंकासंकुर्युर्देहक्षयप्रदं ॥

अर्थ—विषम व न सोसणारें अन्नाचें भोजन, अतिमैथुन, मलमूत्रादिकांच्या वेगाचें धारण, यांपासून किंवा अत्यंत दया व शोक यांला करणाऱ्या मनुष्यांच्या अग्नीला कफादिदोष मंद करितात; व ते कोपून क्षतक्षयनिमित्तक व देहक्षयकारक अशा खोकल्याला उत्पन्न करितात.

क्षयकासलक्षण.

सगात्रशूलज्वरदाहमोहात्प्राणक्षयंचोपलभेच्चकासी ॥ शुष्कंविनिष्ठीवतिदुर्बलस्तुप्रक्षीणमांसोरुधिरंसपूयं ॥ तंसर्वलिंगंभृशदुश्चिकित्स्यंचिकित्सितज्ञाःक्षयजंवदंति ॥ इत्येपक्षयजःकासोक्षीणानांदेहनाशनः ॥ साध्योवलवतांवास्याद्याप्यस्त्वेपंनवोत्थितः ॥

अर्थ—ज्या क्षयकासरोग्याचा सांध्याचे ठायीं शूल, ज्वर, दाह व मोह हे होतात, तो रोगी आणि जो क्षयकासरोगी दुर्बल होऊन पूयमिश्रित रुधिर तोंडावाटे थुंकतो, व ज्याचें सर्व मांस क्षीण झालें, त्या कासाला वैद्य त्रिदोषात्मक, परम दुश्चिकित्स्य, क्षयजन्यकास असें ह्मणतात. हा क्षयजकास क्षीण झाल्यापुरुषांचा देह नाश करितो; आणि बलवंत मनुष्याचा कदाचित् साध्य किंवा याप्य होतो.

साध्यासाध्यविचार.

नवैकदाचित्साध्येतामपिपादगुणान्वितौ ॥ स्थविराणांजराकासःसर्वोयाप्यःप्रकीर्तितः ॥ त्रीन्पूर्वान्साधयेत्साध्यान्पथ्यैर्याप्यांस्तुयापयेत् ॥

अर्थ—जेव्हां नवोत्पन्नक्षयकासरोगी, वैद्य, परिचारक व द्रव्य इत्यादिगुणेंकरून युक्त आहे, तेव्हां तो रोगी कदाचित् झाला तर साध्य होतो; व वृद्ध रोग्याचा जो जराकास, तो सर्व याप्य जाणावा; आणि वातादिजनित तीन प्रकारचे जे कास ते साध्य; ते औषधाने बरे करावे; व याप्यकास पथ्येंकरून कमी करावा.

चिकित्साप्रक्रिया.

कासेतुक्षतजेवल्यैपाचनैर्बृंहणैरपि ॥
शमनैःपित्तकासघ्नैरन्यैश्चमधुरौषधैः ॥

अर्थ—क्षयकासाला पाचन, पौष्टिक व शमन; आणि पित्तकासाला शमविणारीं औषधें व दुसरीं मधुर औषधें यांणीं शमवावा.

यवागुंवापिवेत्सिद्धांक्षतोरस्कःमुशीतलां ॥ इक्षुवालिकापद्ममृणालोत्पलचंदनैः ॥ शृतांपेयांमधुयुतांसंधानार्थंपिवेत्क्षती ॥

अर्थ—उरःक्षतकासीरोग्यानें ऊंस, कसईचें बीज, कमळाचीं बिसें, निळें कमळ, व चंदन यांणीं सिद्ध केलेली शीतळ यवागू क्षतसंधानार्थ प्राशन करावी.

इक्ष्वाद्यावलेह.

इक्षिक्षुवालिकापद्ममृणालोत्पलचंदनैः ॥ मधुकंपिप्पलीद्राक्षालाक्षा शृंगीशतावरी ॥ द्विगुणाचतुगाक्षीरीसितासर्वैश्चतुर्गुणा ॥ लिह्यात्तंम धुसर्पिर्भ्यांक्षतकासनिवृत्तये ॥

अर्थ—ऊंसाचा रस, लघु कसई, कमळाचीं बिसें, (देंठी) कमळ, पांढरा चंदन, ज्येष्ठीमध, पिंपळी, द्राक्षें, लाख, कांकडशिंगी व शतावरी हीं समभाग, २ भाग वंशलोचन व सर्वऔषधांच्या चौपट साकर घेऊन अवलेह सिद्ध करावा; व त्यांत मध व तूप घालून चाटीत जावा; म्हणजे क्षतकास जातो.

मंजिष्ठाद्यचूर्ण.

मंजिष्ठमूर्वानतवन्हिपाठाकृष्णाहरिद्राविदधीतचूर्णाः ॥ क्षौद्रेणकासेविलिहेत्क्षतोत्थेपिबेद्घृतंचेक्षुरसेविपक्वं ॥

अर्थ—मंजिष्ठ, मूर्वा, तगर, चित्रक, पाहाडमूळ, पिंपळी व हळद, यांचें चूर्ण मधाव-रोवर चाटावें; किंवा उसाचे रसांत तूप शिजवून प्यावें; हे दोन ही योग क्षतजकासावर प्रशस्त आहेत.

क्षुद्रावलेह.

समूलकंटकारीचचपलाचपलाजटा ॥ अपामार्गस्यबीजानिजीर्णसामुद्रकंतथा ॥ मधुनालेहयेत्सर्वंकासश्वासहरंपरं ॥ उरःक्षतक्षयेतेत्रिकफरक्तवमीपुच ॥

अर्थ—पंचांगरिंगणी, पिंपळी, पिंपळमूळ, आघाड्याचें बीं, जिरें, आणि सैंधव, यांचा लेह सिद्ध करून द्यावा, तो खोकला, दमा, उरःक्षत, आणि कफरक्तवांति यांचा नाश करितो

तारेश्वररस.

रसपादंमृतंतारंशिलाताप्यंचतुर्गुणं ॥ वासाचेक्षुरसाभ्यांचमर्दयेत्प्रहर द्वयं ॥ द्वियामंवालुकायंत्रेस्वेद्यमादायचूर्णयेत् ॥ गुंजाद्वयंनिहंत्याशु कासंक्षतभवंध्रुवं ॥ रसस्तारेश्वरोनामह्यनुपानंचकथ्यते ॥ दाडिमंत्रिफलाव्योषंत्रयाणांचसमंगुडं ॥ चूर्णितंभक्षयेत्कर्षंक्षतकासापनुत्तये ॥

अर्थ—पारा १भाग, रौप्यभस्म पाऱ्याच्या चतुर्थांश, मनशीळ व सुवर्णमाक्षिक, हीं चतुर्गुण घेऊन अडुळसा व उसांचा रस यांत दोन प्रहर मर्दन करावीं; आणि काचकुपींत भरून वालुकायंत्रांत दोन प्रहर पचवून काढून वाटून त्यांतून दोन गुंजा हा तारेश्वर रस डाळिंब,

त्रिफळा, सुंठ, मिरीं, पिंपळी व या सर्वांसमान गूळ घालोन यांच्या एक तोळा चूर्णाशीं द्यावा; ह्मणजे क्षतक्षयकासाचा नाश करितो.

सूर्यरस.

रसमेकंद्विधागंधंत्रितार्प्यंपंचतालकं ॥ सर्वंशुद्धंविचूर्ण्याथचतुर्भागमृताभ्रकं ॥ वचाकुष्ठहरिद्राग्निटंकणंसैंधवंविषं ॥ सपाठलांगलीव्योषंसर्वंप्रत्येककर्षकं ॥ भावितंभृंगिसारेणदिनैकंतंचभक्षयेत् ॥ माषःसूर्यरसोनामहिक्कावैस्वर्यकासजित् ॥ अष्टगुंजामितंभक्ष्यंविख्यातारसपर्पटी ॥ त्रिकंटमूलशुंठीचअजाक्षीरसमोदकं ॥ क्षीरावशिष्टंतंक्वाथंसकणंपाययेन्निशि ॥

अर्थ—पारा १, गंधक २, सुवर्णमाक्षिक ३, हरताळ ५ व अभ्रकभस्म ४ भाग आणि वेखंड, कोष्ठ, हळद, चित्रक, टांकणखार, सैंधव, बचनाग, पाहाडमूळ, कळलावी, सुंठ मिरीं व पिंपळी, हीं प्रत्येकीं एकेक तोळा घेऊन सर्व चूर्णें एकत्र करून माक्याच्या रसांत एक दिवस खल करावा. हा सूर्यरस एक मासा द्यावा; ह्मणजे उचकी, स्वरभंग व खोकला यांचा नाश करितो; किंवा ८ गुंजा रसपर्पटी घेऊन नंतर रात्रीं गोखरु, सुठ, शेळीचें दूध व दुधाबरोबर पाणी घालोन दूध शेष राही तों काढा करावा. त्यांत पिंपळीचे चूर्ण घालोन द्यावा.

पिप्पल्यादिलेह.

पिप्पलीपद्मकंलाक्षासुपक्वंबृहतीफलं ॥
घृतक्षौद्रयुतोलेहःक्षयकासनिवर्हणः ॥

अर्थ—पिंपळी, पद्मकाष्ठ, लाख व चांगलें पिकलेले रिंगणीचें फळ हीं समभाग घेऊन वाटून त्यांचा तूप व मध यांशीं लेह करून सेवन केला;ह्मणजे क्षयकासाचा नाश करितो.

कुलित्थगुड.

कुलित्थानांशतपलंदशमूलंतथाशतं ॥ शतंब्राह्मणयष्ट्याव्हाचतुर्गुणजलेशृतं ॥ पादावशेषतःपूतेगुडस्यार्धतुलांपचेत् ॥ पाकंज्ञात्वावतार्यैवंसुशीतेश्लक्ष्णचूर्णितं ॥ षट्पलंचतुगाक्षीर्यापिपल्याद्विपलंतथा ॥ कुडवंमधुनादद्यात्स्थापयेद्भाजनेशुभे ॥ खादेदग्निबलापेक्षीनाशयेदचिराद्गदान् ॥ यक्ष्माणंपित्तजंकासंश्वासंजीर्णमजीर्णकं ॥ जीर्णज्वरंपांडुरोगंहृद्रोगंश्लेष्ममारुतौ ॥ कुलित्थगुडइत्युक्तःसर्वोपद्रवनाशनः ॥

अर्थ—कुळीथ ४०० तोळे, दशमुळें ४०० तोळे, व भारंगमूळ ४०० तोळे घेऊन १६०० तोळे पाण्यांत काढा करून चतुर्थांश उतरून घ्यावा, त्यांत गुळ २०० तोळे घालून चांगला पाक करून उतरावा. निवाल्यावर २४ तोळे वंशलोचन ८ तोळे पिंपळी व १६ तोळे मध घालून चांगल्या भांड्यांत भरून ठेवावा. त्यांतून अग्नि व बल पाहून द्यावा; ह्मणजे क्षय, पित्तकास, श्वास, आंगांत जिरलेलें अजीर्ण, जीर्णज्वर, पांडुरोग, हृद्रोग, आणि कफवात, यांचा व संपूर्ण उपद्रवांचा हा कुलित्थगुड नाश करितो.

वासाकूष्मांडावलेह.

पंचाशतपलंस्विन्नंकूष्मांडंप्रस्थमाज्यतः ॥ पक्वंपलशतंखंडंवासाक्काथाढकेपचेत् ॥ शुभ्राधात्रीघनोभार्ङ्गीत्रिसुगंधिश्चकर्षकैः ॥ एलोषाविपधान्याकमरिचैश्चपलांशकैः ॥ पिप्पलीकुडवंचैवमधुमानंप्रदापयेत् ॥ कासंश्वासंक्षयंहिक्कांरक्तपित्तहलीमकान् ॥ हृद्रोगमम्लपित्तं चपीनसंचव्यपोहति ॥

अर्थ— २०० तोळे कोहळ्याचें तुकडे घेऊन ते ६४ तोळे तुपांत घालून पचन करावे. त्यांतून शंभर तोळे तुकडे घेऊन अडुळशाच्या २९६ तोळे काढ्यांत शिजवून त्यांत वंशलोचन, आवळकाठी, नागरमोथा, भारंगमूळ, तज, तमालपत्र व एलची हीं प्रत्येक तोळा तोळा; आणि एलची, अतिविष, धने व मिर्ये हीं प्रत्येकीं ४ तोळे; आणि पिंपळी १६ तोळे व मध ३२ तोळे, घालून भरून ठेवावा. त्यांतून हा वासकूष्मांडावलेह-अग्नि व बल पाहून द्यावा; ह्मणजे खोकला, श्वास, क्षय, उचकी, रक्तपित्त, हलीमक, हृद्रोग, अम्लपित्त आणि पडसें यांचा नाश करितो.

ककुभलेह.

चूर्णंककुभविपिष्टंवासकरसभावितंसुबहुवारान् ॥
मधुघृतसितोपलाभिर्लेह्यंक्षयकासपित्तहरं ॥

अर्थ—अर्जुनवृक्षाच्या सालीचे चूर्णांत अडुळशाचे रसाच्या पुष्कळ भावना देऊन मध, तूप व खडीसाखर यांच्या बरोबर चाटावें, तें क्षयकास व पित्त यांचे नाशक आहे.

पिप्पल्यादि घृत.

पिप्पलीगुडसंसिद्धंछागक्षीरयुतंघृतं ॥
एतदग्निविवृध्यर्थमुक्तंचक्षयकासिनां ॥

अर्थ—पिंपळी व गुळ यांणी सिद्ध केलेलें तूप शेळीच्या दुधाबरोबर प्यावें, तें क्षयकासी यांचा अग्नि प्रदीप्त करण्याविषयीं प्रशस्त आहे.

पिप्पल्यादिलेह.

पिप्पलीमधुकंपिष्टंकषायंससितोपलं ॥ प्रस्थैकंगव्यमाज्यंचक्षीरमिक्षुरसस्तथा ॥ यवगोधूममृद्वीकाचूर्णमामलकीरसं ॥ तैलंचप्रसृतांशानितत्सर्वंमृदुवन्हिना ॥ पचेल्लोहंघृतक्षौद्रयुक्तःसश्वासकासनुत् ॥ क्षयत्दृद्रोगकासघ्नोहितोवृद्धाल्परेतसाम् ॥

अर्थ–पिंपळी व जेष्टीमध कुटून त्यांच्या चूर्णांचा काढा साकर मिळविलेलें गाईचें दूध, तूप व उंसाचा रस हीं प्रत्येकीं ६४ तोळे, सातूचें पीठ, गव्हांचें पीठ, द्राक्षें आवळयाचा रस व शिरसाचे तेल हीं प्रत्येकीं ८ तोळे घेऊन एकत्र मृदुवन्हीनें पक्व करावीं; ह्मणजे हा लेह होतो. तो मध व तूप यां बरोबर चाटावा; ह्मणजे श्वास, कास, क्षय व त्दृद्रोग यांचा नाशक आणि वृद्ध व अल्पवीर्य पुरुष यांस हितकारक आहे.

स्वयमग्निरस.

शुद्धसूतंद्विधागंधंकुर्यात्खल्वेचकज्जलीं ॥ तयोःसमंतीक्ष्णचूर्णंमर्दयेत्कन्यकाद्रवैः ॥ द्वियामांतेकृतंगोलंताम्रपात्रेविनिःक्षिपेत् ॥ आच्छाद्यैरंडपत्रेणयामार्धेत्युष्णतांव्रजेत् ॥ धान्यराशौन्यसेत्पश्चाद्द्विदिनांतेसमुद्धरेत् ॥ संपेष्यगालयेद्वस्त्रेसत्यंवारितरंभवेत् ॥ त्रिकटुत्रिफलाचैलाजातीफललवंगकं ॥ एतेषांनवभागानांसमंपूर्वैरितंभवेत् ॥ संचूर्ण्यलोडयेत्क्षौद्रैर्भक्ष्यंनिष्कद्वयंद्वयं ॥ स्वयमग्निरसोनामक्षयकासनिकृंतकः ॥ इंद्रवारुणिकामूलंभृंगीकृष्णातिलैःसह ॥ भक्षयेत्क्षयकासार्तोनिष्कमात्रंप्रशांतये ॥

अर्थ–शुध पारा १ भाग व गंधक २ भाग घेऊन त्याची कज्जली करावी; आणि कज्जलीच्या समान तिख्याचें चूर्ण घालून तें कोरफडाच्या रसांत दोन प्रहर घोटून गोळा करावा, तो ताम्रसंपुटांत घालून त्यावर एरंडाचीं पानें दडपून चार घटका तसाच ठेवावा; ह्मणजे ऊष्ण होतो. नंतर साळीच्या राशींत दोन दिवस पुरून ठेवावा, तिसरे दिवशीं काढून घोटून वस्त्रावर गाळावा; ह्मणजे पाण्यावर तरणारा लोह होतो. तो लोह व सुंठ, मिरीं, पिंपळी, हरडा, वेहेडा, आवळकाठी, एलची, जायफळ व लवंगा या नऊ जिनसांचे चूर्णासमान लोह मिळवून तो मधाशीं आठमासे पर्यंत द्यावा. हा स्वयमग्निरस क्षयकासाचा नाश करितो; अथवा वृंदावनाचें मूळ, भांग, पिंपळी आणि तीळ यांशीं ४ मासे द्यावा; ह्मणजे क्षयकासाची शांति करितो.

सन्निपातकास.

सन्निपातभवोह्येषःक्षयकासःसुदारुणः ॥
सन्निपातहितंतस्मात्कार्यमत्रचिकित्सितं ॥

अर्थ—हा दारुणक्षयकास सन्निपातापासून होतो. या करितां जे सन्निपातावर हित कारक उपाय तेच उपाय यावर करावे.

अमृतादिकाढा.

अमृतानागरंफंजीव्याघ्रिपर्णीसुसाधितः ॥
क्काथःपिप्पलिचूर्णाढ्यःकासश्वासौजयत्यलं ॥

अर्थ—गुळवेल, सुंठ, फांज, रिंगणी व सालवण यांचा काढा पिंपळीचें चूर्ण घालून द्यावा; ह्मणजे खोकला आणि दमा यांचा शीघ्र नाश करितो.

भाङ्‌र्ग्यादिकाढा.

भार्ङीसनागरासिंहीकुलित्थंमूलकंतथा ॥
पिवेत्पिप्पलिचूर्णेनकासश्वासंव्यपोहति ॥

अर्थ—भारंगमूळ, सुंठ, रिंगणी, कुळीथ व मुळे यांचा काढा पिंपळीचें चूर्ण घालून घ्यावा; ह्मणजे खोकला आणि दमा यांचा नाश करितो.

स्वरसादियोग.

स्वरसंशृंगवेरस्यमाक्षिकेणसमन्वितं ॥
पाययेच्छ्वासकासघ्नंप्रतिश्यायकफापहं ॥

अर्थ—आल्याच्या रसांत मध घालून प्यावयास द्यावा; ह्मणजे श्वास, खोकला, पडसें, आणि कफ यांचा नाश करितो.

मरीच्यादिचूर्ण.

सेवितंमधुखंडाभ्यांचूर्णमरिचजंयदि ॥
किमर्थंक्रियतेचिंताकासश्वासपराजितैः ॥

अर्थ—मध व साकर यांशीं मिऱ्यांचें चूर्ण दिले असतां; खोकलेकरी व दमेकरी यांणी चिंता कशा करितां करावी.

कुलित्थादिकाढा.

कुलित्थंकंटकारींचतथाब्राह्मणयष्टिका ॥
शुंठीसुरभिसंयुक्तःकासश्वासज्वरापहः ॥

अर्थ—कुळिथ, रिंगणी, भारंगमूळ, सुंठ आणि राळ यांणी युक्त काढा करावा. तो खोकला, श्वास, आणि ज्वर यांचा नाश करितो.

पुष्करादिकाढा.

पौष्करंकट्फलंभार्ङीविश्वपिप्पलिसाधितं ॥

पिबेत्क्वाथंकफोद्रेकेकासेश्वासेचहृद्गदे ॥

अर्थ–पुष्करमूळ, कायफळ, भारंगमूळ, सुंठ, आणि पिंपळी यांचा काढा करून द्यावा, तो कफाधिक दमा, खोकला आणि हृद्रोग यांचा नाश करितो.

कुनटयादिलेह.

कुनटीसैंधवव्योपविडंगामरुहिंगुभिः ॥

लेहःसाज्यमधुःकासहिक्काश्वासनिवारणः ॥

अर्थ–मनशीळ, सैंधव, सुंठ, मिरीं, पिंपळी, वावडिंग, अमरु, आणि हिंग, यांचा लेह करून त्यांत तूप व मध घालोन द्यावा; तो खोकला, उचकी व श्वास यांचे निवारण करितो.

बर्हिपादादि व मरिचादिलेह.

श्वासकासहरावर्हिपादाचक्षौद्रसर्पिषा ॥

लिह्यान्मरिचचूर्णवासघृतंक्षौद्रशर्करं ॥

अर्थ–पिंवळया टेंटूचें चूर्ण मध व तूप घालोन द्यावें; किंवा मिऱ्यांचें चूर्ण तूप, साकर आणि मध यांतून द्यावें.

भार्ङ्यादिचूर्ण.

भार्ङ्गीशुंठिकणाचूर्णगुडेनश्वासकासनुत् ॥ संयुतोमधुसर्पिभ्यांचूर्णं त्रिकटुसंभवं ॥ निहंतितरसाकासंश्वासानिवसतांहरिः ॥

अर्थ–भारंगमूळ, सुंठ व पिंपळी यांचें चूर्ण गुळाशीं, किंवा सुंठ, मिरीं व पिंपळी यांचें चूर्ण मध व तूप यांतून द्यावें; ह्मणजे श्वासकासाचा नाश होतो.

घनादिगुटी.

घनविश्वशिवागुडजागुटिकात्रिदिनंवदनांबुजमध्यधृता ॥

हरतिश्वसनंकसनंललनेललनेवहिमंत्दृदयेनिहिता ॥

अर्थ–नागरमोथा, सुंठ व हरीतकी यांचें चूर्ण करून त्याची गुळांत कालवून गोळी करावी, ती तीन दिवस तोंडांत धरिली असतां; श्वास व कास यांचा नाश करित्ये.

निर्गुंड्यादिघृत

निर्गुंडीरसभागेकंरसाच्चतुर्गुणंघृतं ॥ पाच्यंघृतावशेपंचचव्यंवन्हिविडंगकं ॥ चतुर्जातंकटुःकुष्ठंसमंचूर्ण्यघृतेपचेत् ॥ अष्टमांशघृतंचूर्णंनिर्गुंड्याख्यंघृतंपिबेत् ॥ यवागूःकृष्णशाल्यस्तुतडुंलैःपरिपाचितैः ॥ निर्गुंडीघृतसंयुक्तंकासश्वासहरंपिबेत् ॥

अर्थ–निगडीचा रस १ भाग, व त्याच्या चौपट तूप घालोन तो तूप शेष राही तों पचवून त्यांत चवक, चित्रक, वावडिंग, दालचिनी, एलची, तमालपत्र, नाकेशर, मोहो ग्या व कोष्ठकोळिंजन यांचें चूर्ण घृताच्या अष्टमांश घालून घृताबरोबर पचन करावें; नंतर काळे साळीचा पेजबुडा भात घालोन पचन करावे, तें निर्गुंडीघृत खोकला व दमा यांच्या नाशनार्थ प्राशन करावें.

धूमपान

अपामार्गस्यपंचांगंसंपिष्टंनलिकारसैः ॥ तच्छित्रवस्त्रेवालिप्यता लकंचमनःशिला ॥ तंक्षिप्त्वाग्नौपिबेत्धूमंसप्ताहंश्वासकासजित् ॥

अर्थ–आघाड्याचें पंचांग घेऊन बारीक वाटून तें नलकाच्या रसांत खलोन त्यांत हरताळ व मनशीळ घोटून त्याचा वस्त्रास लेप करावा, सुकल्यावर अग्निसंयोगानें धूर प्यावा; ह्मणजे सातदिवसांत श्वास व कास याचा नाश होतो.

वारुणीपत्रधूम.

उत्तरावारुणीपत्रंशालितंडुलतालकं ॥ संपेष्यगुटिकाकार्या बदरांडप्रमाणकं ॥ मुखीतंडुलपिष्टेनकर्तव्याछिद्रसंयुता ॥ दीप्तांगारेवटींक्षिप्त्वामुखमाच्छादयेत्नतः ॥ धूममेरंडनालेन पिबेद्भुक्तोत्तरंशनैः ॥ तांबूलपूरितमुखंपथ्यंक्षीरोदनंहिते ॥ तत्क्षणान्नाशयेत्कासंसिद्धयोगउदाहृतः ॥

अर्थ–वृंदावनाचीं पानें, साळीचे तांदुळ व हरताळ हे एकत्र वाटून गोळी बोराच्या आंठीएवढी करून ती तांदळांच्या पिठांची चिलीम करून तींत ठेऊन वर अग्नि ठेऊन त्यावर झांकण ठेउन एरंडाच्या नळीनें भोजनोत्तर धूम प्राशन करावा. वर विडा खावा; आणि पथ्याला दूधभात खावा; ह्मणजे तत्क्षणीं खोकला नाश पावतो. हा सिद्ध योग सांगितला आहे.

हेमगर्भपोटली.

रसस्यभागाश्चत्वारस्तावंतःकनकस्यच ॥ तयोश्चपिष्टिकांकृत्वागंधो द्वादशभागिकः ॥ कुर्यात्कज्जलिकांतेषांमुक्ताभागाश्चषोडश ॥ चतु. विंशच्चशंखस्यभागेकंटंकणस्यच ॥ एकत्रमर्दयेत्सर्वंपक्वनिंबूकजैरसैः ॥ कृत्वातेषांततोगोलंमूषासंपुटकेन्यसेत् ॥ मुद्रांदत्वाततोहस्तमात्रेग र्तेचगोमयैः ॥ पुटेद्गजपुटेनैवस्वांगशीतंसमुद्धरेत् ॥ पिष्ट्वागुंजाचतु र्मानंदद्याद्व्याज्यसंयुतं ॥ एकोनत्रिंशदुन्मानमरिचैःसहदीयते ॥

राजतेमृन्मयेपात्रेकाचजेवावलेहयेत् ॥ लोकनाथसमंपथ्यंकुर्याच्छुचि तमानसः ॥ कासेश्वासेक्षयेवातेकफग्रहणिकागदे ॥ अतिसारेप्रयोक्त व्यापोटलीहेमगर्भिका ॥

अर्थ—पारा चार भाग व सोन्याचें बारीक चूर्ण चार भाग घेऊन दोन्हीं एकाजागीं चागलें पीठ होई तोंपर्यंत खलोन पाऱ्याचे बारा भाग गंधक घेऊन त्यांत खलोन तिहीं-चा खल करून कज्जली करावी; नंतर पाऱ्याचें सोळा भाग मोतीं, चोवीस भाग शंख व १ भाग टांकणखार घेऊन त्या औषधांत मेळवून पिकल्या निंबाचे रसांत खलोन त्या-चा गोळा करून मातीचे शरावसंपुटांत घालोन त्याला कापडमाती करून १ हात खाडा खणून त्यांत गाईचे शेणाच्या गोवऱ्या घालोन त्यांत तो शरावसंपुट ठेऊन गज-पुट अग्नि द्यावा. थंड जाल्यावर बाहेर काढून त्यांतील औषध घेऊन खलून ठेवावे. या-ला हेमगर्भपोटली असें ह्मणतात. हा हेमगर्भ ४ गुंजा प्रमाण २९ मिऱ्यांचे चूर्णाशीं रुप्याचे पात्रांत अथवा मातीचे अथवा कांचेचें प्याल्यांत गाईचें तूप घालोन घ्यावा; व अंतःकरण स्वस्थ करून लोकनाथरसासारखें पथ्य करावें. तेणेकरून श्वास, कास, क्षय रोग, वातविकार, कफ, संग्रहणी व अतिसार हे रोग दूर होतात.

कासविधूननरस.

रसभागोभवेदेकोगंधकोद्वौतथैवच ॥ यवक्षारंत्रिभागंस्याद्रुच कंचचतुर्गुणं ॥ मरीचंपंचभागंस्याच्छुध्दंरसविमर्दितं ॥ कासं पंचविधंहन्याच्छ्वासंपंचविधंहरेत् ॥

अर्थ—पारा १ भाग, गंधक २ भाग, जवखार ३ भाग, पादेलोण ४ भाग, मिरें ५ भाग, हीं शुद्ध घेऊन आल्याच्या रसांत खलोन द्यावें; ह्मणजे ५ प्राकाचे श्वास, ५ प्रकारचे खोकले यांचा नाश करील.

ताम्रपर्पटी.

मृतंताम्रंत्रिभागंचरसंगंधंचतत्समं ॥ भागमेकंवत्सनाभंकज्जलींखल्व मध्यगां ॥ गोघृतेनकृतंकल्कंलोहपात्रेविपाचयेत् ॥ ढालयेदर्कपत्रस्थ पर्पटीरससिद्धये ॥ गुंजाद्वयंत्रयंचैवपिप्पलीमधुसंयुतं ॥ त्रिःसप्तरात्रयो गेनरोगराजंचनाशयेत् ॥ आर्द्रकस्यरसेनैवसन्निपातंनियच्छति ॥ त्रिफ लाखंडसंयुक्तंसर्वंपांडुविनाशयेत् ॥ वातारितैलसंयुक्तंसर्वशूलनिवार णं ॥ कुमारीरसयोगेनवातपित्तोपशांतये ॥ वाकूचीरससंयुक्तंसर्वद द्रुविनाशनं ॥ त्रिफलामधुसंयुक्तंसर्वमेहनिवारणं ॥ खदिरक्काथपाने नकुष्ठाष्टादशनाशनं ॥ मंथानभैरवेणोक्तालोकानांहितकाम्यया ॥

अर्थ–ताम्रभस्म, पारा व गंधक हे प्रत्येकीं ३ भाग व बचनाग १ भाग यांची कज्जली करून गाईच्या तुपांत खलून लोखंडाचे पात्रांत पक्व करून रुईच्या पानावर ओतावी; ह्मणजे पर्पटीरस सिद्ध होतो. हा दोन किंवा तीन गुंजा मध व पिंपळी बरोबर २१ दिवस खावा; ह्मणजे राजयक्ष्मा, नाश पावेल. आल्याचे रसाबरोबर सेवन केला तर सन्निपाताचा नाश करील. त्रिफळा व खडीसाकर यांच्या अनुपानानें सर्व पांडुरोग, एरंडेल तेलाचे अनुपानानें शूल, कोरफडीचे रसाचे अनुपानानें वातपित्त, बांबचीचे रसाच्या अनुपानानें सर्व कुष्ठें, त्रिफळा व मध यांच्या अनुपानानें सर्व मेह, खैराचे काढयाच्या अनुपानानें अठरा कुष्ठें, याप्रमाणें अनुपानभेदानें ते ते रोग नाशील. हा मंथानभैरवानें लोकांचे हितार्थ पर्पटीरस सांगीतला आहे.

कंटकार्यादि चूर्ण.

कंटकार्याःकणायाश्चचूर्णंसमधुकासहृत् ॥

अर्थ–रिंगणी व पिंपळी यांचें चूर्ण मधाशीं खावें, तें खोकल्याचा नाश करितें.

लवंगादिचूर्ण.

लवंगजातीफलपिप्पलीनांभागाश्चकल्प्याक्षसमानपूर्वाः ॥ पलार्ध मानंमरिचंप्रदेयंपलानिचत्वारिमहौषधस्य ॥ सितासमस्तेनसमाप्य चूर्णंरोगानिमानाशुबलान्निहंति ॥ कासज्वरारोचकमेहगुल्मश्वासा ग्निमांद्यग्रहणीविकारान् ॥

अर्थ–लवंगा, जायफळ व पिंपळी हीं एक तोळा, बेहेडा ३ तोळे, मिरीं २ तोळे व सुंठ १६ तोळे, या सर्वचूर्णांबरोबर साकर घालून खावें; तें चूर्ण खोकला, ज्वर, अरुचि, मेह, गुल्म, श्वास, अग्निमांद्य, आणि संग्रहणी यांचा नाश करितें.

बिभीतकादि चूर्ण.

द्वौभागौचबिभीतक्याभागैकंपिप्पलीयुतं ॥
चूर्णंमधुयुतंलेह्यंकासरोगहरंपरं ॥

अर्थ– बेहेडा २ भाग व पिंपळी १ भाग यांचें चूर्ण एकत्र करून मधाशीं खावें. तें खोकल्याचा नाश करण्याविषयीं उत्कृष्ट आहे.

पंचकोलादिचूर्ण.

पिप्पलीपिप्पलीमूलंशुंठीचूर्णंबिभीतकं ॥
मधुनालेहयेच्चाशुहरेत्कासंत्रिदोषजं ॥

अर्थ–पिंपळी, पिंपळमूळ, सुंठ, आणि बेहेडे यांचें चूर्ण मधाशीं खावें, तें त्रिदोषज कासाचा नाश करितें.

वदरीकल्क.

वदरीपत्रकल्कंवाघृतभृष्टंससैंधवं ॥
ज्वरोपघातेश्वासेचलेहमेतंप्रयोजयेत् ॥

अर्थ–बोरीचे पानाचा कल्क करून त्यांत सैंधव घालून तुपावर तळावा, तो स्वरभंग व श्वास यांवर द्यावा.

कर्पूरादि चूर्ण.

कर्पूरवालकंकोलजातीफलदलंसमं ॥ लवंगनागमरिचंकृष्णा
शुंठीविवर्धिता ॥ चूर्णसितासमंग्राह्यंरोचनंक्षयकासजित् ॥
वैस्वर्यश्वासकासघ्नंछर्दितृष्णाक्षयापहं ॥

अर्थ–कापूर, वाळा, कंकोळ, जायफळ व जायपत्री हे समभाग; आणि लवंगा नाकेशर, मिरीं, पिंपळी आणि सुंठ हे एकोत्तर वृद्धीने घेऊन चूर्ण करावें, त्या सर्व चूर्णाबरोबर साकर घालावी; आणि द्यावें. ते रोचक आहे; आणि क्षयकास, स्वरभंग, श्वास, कास, ओकारी, यांचा नाश करितें.

त्रिकटुकादिचूर्ण.

कटुत्रिकंछिन्नलताकृशानुफलत्रिकंवेल्लभवंसरासना ॥
सशर्करंचूर्णमिदंतुसेव्यंकासाटवीदाहदवानलाख्यं ॥

अर्थ–सुंठ, मिरीं, पिपळी, गरुडवेल, चित्रकमूळ, हरडा, बेहेडा, आवळकाटी, मिरीं व रासना यांचें चूर्ण करावें, तें साकर घालून द्यावें; ह्मणजे कासरूप अरण्याला अग्नी सारिखें जाळून टाकितें.

देवदार्वादिचूर्ण.

देवदारुवलारास्नात्रिफलाव्योपपद्मकैः ॥
सविडंगैःसितातुल्यंतच्चूर्णसर्वकासनुत् ॥

अर्थ–देवदार, चिकणा, रास्ना, हरडा, बेहेडा, आवळकाठी, सुंठ, मिरीं, पिंपळी, पद्मकाष्ठ व वावडिंग, यांचे चूर्ण करून ते समान साकर घालून द्यावे; ह्मणजे सर्व कासांचा नाश करितें

द्विक्षारादि.

द्वौक्षारौपंचमूलानिपंचैवलवणानिच ॥ सठीनागरकोदीच्यकल्कंवा
वस्त्रगालितं ॥ पाययेच्चघृतोन्मिश्रंसर्वकासनिवर्हणं ॥

अर्थ–जवखार, साजेखार, पंचमुळें; व जवखार, पुष्कर, साजेखार, पळस व तिळ

नाळ यांचे क्षार; कचोरा, सुंठ व काळावाळा यांचा कल्क करून तो वस्त्रावर गाळावा; त्यांत तूप घालून द्यावा; ह्मणजे तो संपूर्ण कासांचा नाश करितो.

ग्रंथिकादि.

ग्रंथिकमागधिकाक्षमहौषधैरचितंचूर्णमिदंमधुनायुतं ॥
हरतिकासभवंदरमाततंविविधदोषहरंचनिषेवितं ॥

अर्थ–पिंपळीमूळ, पिंपळी, बेहेडा व सुंठ यांचें चूर्ण मधाशीं द्यावें; ह्मणजे तें खोकल्याची भीति व अनेक दोष यांचा नाश करितें.

कटुत्रिकादि.

कटुत्रिकंचचूर्णितंगुडेनसर्पिषायुतं ॥
निहंतिकासजंदरंनिषेवणंनिरंतरं ॥

अर्थ–सुंठ, मिरीं व पिंपळी यांचें चूर्ण गूळ व तूप यांशीं फार दिवस द्यावें; ह्मणजे खोकल्याच्या भयाचा नाश करितें.

हरीतक्यादिगुटी.

हरीतकीकणाशुंठीमरिचंगुडसंयुतं ॥
कासघ्नोमोदकःप्रोक्तोपरंचानलदीपनः ॥

अर्थ–हरीतकी, पिंपळी, सुंठ व मिरीं यांचें चूर्ण गुळांतून द्यावें; ह्मणजे कास नाश पावतो; व दीपन आणि पाचन आहे.

त्रिजातादि.

त्रिजातमर्धकर्षंचपिप्पल्यर्धपलंसिता ॥ द्राक्षामधुकखर्जूरंपलांशंश्लक्ष्णकल्कितं ॥ मधुनागुटिकाघ्नंतितावृष्याःपित्तशोणिते ॥ कासश्वासारुचिच्छर्दिमूर्छाहिध्मामदभ्रमान् ॥ क्षतक्षयेस्वरभ्रंशप्लीहशोषाढ्यमारुतान् ॥ रक्तनिष्ठीवहृत्पार्श्वरुक्पिपासाज्वरानपि ॥

अर्थ–दालचिनी, तमालपत्र व एलची हे अर्धतोळा, पिंपळी २ तोळे; व खडीसाकर, द्राक्षे, ज्येष्ठमध, खजूर, हीं प्रत्येकीं ४ तोळे घेऊन बारीक वाटून त्यांचा कल्क करावा. त्याचीं मधाशीं गोळी करून द्यावी, ती वृष्य आहे; व पित्तरक्त, दमा, खोकला, अरुचि, वांति, मूर्छा, उचकी, मद, भ्रम, क्षतक्षय, स्वरभ्रंश, प्लीहा, शोष, आढ्यवात, रक्ताची वांति, हृद्रोग, पार्श्वशूल, तहान, आणि ज्वर यांचा नाश करिते.

मरीच्यादिगुटी.

मरीचंकर्षमात्रंचपिप्पलीकर्षसंमिता ॥ अर्धकर्षोयवक्षारोकर्षयुग्मं

चदाडिमं ॥ एतच्चूर्णीकृतंयुंज्यादष्टकर्षगुडेनहि ॥ शाणप्रमाणगुटि काकृत्वावक्त्रेविधारयन् ॥ अस्याःप्रभावात्सर्वेपिकासायांत्येवसंक्षयं ॥

अर्थ–मिरीं १ तोळा, पिंपळी १ तोळा, यवक्षार अर्धातोळा व डाळिंबसाल २ तोळे या सर्वांचें चूर्ण करून त्यांत ८ तोळे गूळ घालोन ४ माश्यांच्या गोळी करून तोंडांत धारण करावी. ह्या गोळीच्या प्रभावानें संपूर्ण प्रकारचे खोकले नाश पावतात.

लवंगादिगुटी.

तुल्यालवंगमरिचाक्षफलत्वचस्युःसर्वैःसमोनिगदितःखदिरस्यसारः ॥ बब्बूलवल्कलकषाययुताविभाव्यात्कासान्निहंतिगुटिकाघटिकाष्टकांते ॥

अर्थ–लवंगा, मिरीं व बेहेडेदळ हीं तिन्हीं समभाग; व सर्वांच्या समान कात घालोन बाभळीच्या काढ्यांत घोंटून गोळी करावी, ती तोंडांत भरिली असतां; ८ घटीका मध्यें खोकल्याच्या नाश करित्ये.

धनंजयवटी.

धनंजयत्रिजातकंकणाजटाकटुत्रिकं ॥
रसार्द्रकेनभावितंजयेच्चकासमाततं ॥

अर्थ–अर्जुनसादडा, दालचिनी, तमालपत्र, एलची, पिंपळीमूळ, सुंठ, मिरीं, व पिंपळी यांचें चूर्ण आल्याच्या रसांत घोंटून द्यावें, तें खोकल्याचा नाश करितें.

खदिरादिगुटी.

खदिरंपौष्करंशृंगीकट्फलंद्विजयष्टिका ॥ हरीतकीलवंगंचव्योपंचा तिविषंतथा ॥ कारवीयासममृतावृहतीद्वयमक्षकं ॥ पृथक्कर्षद्वयंग्राह्यं सूक्ष्मचूर्णंतुकारयेत् ॥ सर्वैःसमंखादिरंचमेळयित्वाविभावयेत् ॥ दाडिमत्वक्तथाक्षुद्राखादिरांभोभिरार्द्रकैः ॥ बब्बूलत्वग्दलैःक्वाथैश्चाट रूषजलंतथा ॥ सप्तधाभावयेद्बध्वागुटिकाखादिराभिधा ॥ कासश्वा सौनिहंत्याशुदुस्तरौचिरजावपि ॥

अर्थ–कात, पुष्करमूळ, कांकडशिंगी, कायफळ, भारंगमूळ, हरीतकी, लवंग, सुंठ, मिरीं, पिंपळी, अतिविष, ओंवा, धमासा, गुळवेल, रिंगणी, डोरली व बेहेडेदळ हे प्रत्येक दोन तोळे घेऊन सूक्ष्म चूर्ण करून त्या सर्वचूर्णाबरोबर कात मिळवून डाळिंबा, ची साल, रिंगणी, खैराची साल, बाभळीची साल व पानें, अडुळसा, यांच्या काढ्यांत किंवा रसांत सातवेळ घोटावा. त्याची गोळी बांधावी, ती खादिरवटी खोकला व दमा हे फार दिवसांचे असले तरी त्यांचा नाश करित्ये.

व्योषादिगुटी.

व्योषाम्लवेतसंचव्यंतालीसंचित्रकंतथा ॥ जीरकंतिंत्रिडीकंचप्रत्येकं कर्षभागिकं ॥ त्रिसुगंधित्रिशाणंस्याद्गुडःस्यात्कर्षविंशतिः ॥ सर्वमेकत्रसंकुर्य्यगुटिकाकर्षसंमिता ॥ भक्षयेत्प्रातरुत्थायसर्वान्कासान्व्यपोहति ॥ पीनसंश्वासमरुचिंस्वरभेदंव्यपोहति ॥

अर्थ–सुंठ; मिरीं, पिंपळी, आम्लवेतस, चवक, तालीसपत्र, चित्रकमूळ, जिरें व चिंच हे प्रत्येकीं, एकैक तोळा आणि तज, तमालपत्र व एलची, हे चार चार मासे व गूळ २० तोळे, हे सर्व एकत्र कुटून माशयांची गोळी करावी. ती प्रातःकाळीं भक्षण करावी; ह्मणजे संपूर्ण खोकले, पडसें, श्वास, अरुचि, आणि स्वरभंग यांचा नाश करितें.

पिप्पल्यादिगुटी.

सपिप्पलीपुष्करमूलपथ्याशुंठीशठीमुस्तकसूक्ष्मचूर्णं ॥ गुडेनयुक्तागुटिकाप्रयोज्याश्वासेषुकासेषुविवर्धितेषु ॥

अर्थ–पिपळी, पुष्करमूळ, हरितकी, सुंठ, कचोरा व नागरमोथा यांचें बारीक चूर्ण करून त्याची गुळांत गोळी करावी, ती वाढलेल्या कासश्वासावर द्यावी.

क्षवथौगंधनाशेचधूमपानंप्रयोजयेत् ॥

अर्थ–शिंक व गंधनाश जाहाल्यास धूमपान योजावें.

अर्कमूलादिधूम.

अर्कमूलशिलैस्तुल्यंततोर्धेनकटुत्रिकं ॥ चूर्णितंवन्हिनिःक्षिप्तं पिबेद्धूमंतुयोगवित् ॥ भक्षयेदथतांबूलंपिबेद्दुग्धमथापिवा ॥ कासःपंचविधोयातिशांतिमाशुनसंशयः ॥

अर्थ–रुईचें मूळ व मनशिळ यांचे निमे सुंठ, मिरीं व पिंपळी यांचें चूर्ण अग्निवर टाकून त्याचा धूर घ्यावा; आणि वर विडा खावा किंवा दुध प्यावें; ह्मणजे पांच प्रकारचा खोकला शांत होतो, यांविषयीं संशय नाहीं.

मनःशिलादिधूम.

मनःशिलाभिर्मरिचमांसीमुस्तैंगुदीयुतं ॥ धूमंतस्यानुपचयं सुखोष्णंसगुडंपिबेत् ॥ एपकासान्पृथग्द्वंद्वसन्निपातसमुद्भवान् ॥ शतैरपिप्रयोगाणांसाधयेदप्रसाधितान् ॥

अर्थ–मनशिळ, मिरीं, जटामांसी, नागरमोथा व नेपती यांत गूळ मिश्र करून त्याचा सुखोष्ण धूर घ्यावा; ह्मणजे हा दोषज, द्वंद्वज, सान्निपातिक व शेंकडो औषधानीं बरे न होणारे खोकले शांत करितो.

दुसरा प्रकार.

मनःशिलालिप्तदलंबदर्यातपशोषितं ॥
सक्षीरंधूमपानंचमहाकासनिवर्हणं ॥

अर्थ—बोरीच्या पानांला मनशीळ लाऊन उन्हांत वाळवून त्यानां चिलमीत घालून गुडगुडीवर ठेऊन धूमपान करावें; ह्मणजे महाकासाचा नाश करितो.

धत्तूरादिधूम.

पिष्ट्वात्रिपुटधत्तूरमूलव्योषमनःशिलाः ॥ तेनप्रलिप्यवसनंधूम
वर्तिंप्रकल्पयेत् ॥ धूमंतस्याःपिबेद्यस्तुकासोनश्येद्दिनत्रयात् ॥

अर्थ—धोतऱ्याचें मूळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, आणि मनशीळ एकत्र वाटून त्याणें वस्त्राला लेप करावा; नंतर सुकवून त्याची वात करावी, तिचा धूर प्राशन केला असतां; तीन दिवसांत खोकला नाश पावतो.

जातिपत्रादिधूम.

जातिपत्रंशिलाराळैर्योजयेद्गुग्गुलुंसमं ॥
अजामूत्रेणपिष्टोयंधूमःकासहरःपरः ॥

अर्थ—जायपत्री, मनशीळ, राळ, आणि गुग्गूळ हे समभाग घेऊन त्यांचा शेळीच्या मुतांत खल करावा; नंतर सुकवून धूर द्यावा, तो खोकल्याचा नाश करितो.

जातिमूलादिधूम.

जातीजटाकिसलयैर्बदरीदलैश्चजातामसूरकफलैःसमनःशिलाभिः ॥
स्याद्धूमवर्तिरिहगुग्गुलुनासमेतैःकासेस्थितेवदरिकाग्निविदह्यमानैः ॥

अर्थ—जाईचें मूळ, जाईचा पाला, मसूरा, मनंशीळ, आणि गुग्गुळ, यांत घोटून बोरीच्या पाल्याला लेप करून सुकवावी, ती चिलमींत ठेऊन वर बोरीचा अग्नि ठेवावा; आणि धूमपान करावें; ह्मणजे खोकला नाश पावतो.

हरिद्राधूम.

रात्रिद्वयशिलाधूमपानात्कासश्रुतिःकुतः ॥
जलपानादपितथाक्षणेनक्षणदाक्षये ॥

अर्थ—हळद, दारुहळद व मनशीळ यांचा धूम पान करावा; किंवा उषःपान करावें; ह्मणजे कोणाचा खोकला शांत होणार नाही?

विभीतकावलेह.

अजस्यमूत्रस्यशतंपलानिशतंपलानांचकलिद्रुमस्य ॥
पक्वंसमध्वाशुनिहंतिकासंश्वासंचतद्वत्सबलंबलासं ॥

अर्थ—शेळीचें मूत ४०० तोळे व बेहेडेदळ ४०० तोळे एकत्र करून शिजवून अवलेह करावा; आणि तो अवलेह मधाशीं द्यावा; ह्मणजे खोकला, श्वास, आणि कफ, यांचा नाश करितो.

कंटकार्यवलेह.

कंटकारींतुलांनीरेद्रोणेपक्त्वाकषायकं ॥ पादशेषंगृहीत्वाचतस्मिन्चूर्णानिदापयेत् ॥ पृथक्पलांशान्येतानिगुडूचीचव्यचित्रकं ॥ मुस्तकर्कटशृंगीचव्यूषणंधन्वयासकं ॥ भार्ङीरास्नासठीचैवशर्करापलविंशतिः ॥ प्रत्येकंचपलान्यष्टौप्रदद्यात्घृतलोहयोः ॥पक्त्वालेहत्वजातेचशीतेमधुपलाष्टकं ॥ चतुःपलंतुगाक्षीरीपिप्पलीनांचतुःपलं ॥ क्षिप्त्वानिदध्यात्सुदृढेमृन्मयेभाजनेशुभे ॥ लेहोयंहंतिकासांस्तान्हिक्काश्वासानशेषतः॥

अर्थ—रिंगणी ४०० तोळे, पाणी २०४८ तोळे एकत्र करून चतुर्थांश काढा करून घ्यावा. त्यांत गुळवेल, चवक, चित्रक, नागरमोथा, काकडशिंगी, सुंठ, मिरीं, पिंपळी, धमासा, भारंगमूळ, रास्ना व कचोरा, ही प्रत्येकी चार चार तोळे; व साकर ८० तोळे व घृत ३२ तोळे व लोह ३२ तोळे अशीं एकत्र करून, शिजवावीं. लेहासारिखे झालें ह्मणजे थंड करून आंत: मध ३२ तोळे, वंशलोचन १६ तोळे, आणि पिंपळी १६ तोळे, घालोन हा लेह मातीच्या घट्टभांडयांत ठेवावा; आणि त्यांतून द्यावा. हा खोकला, उचकी, संपूर्ण श्वास यांचा नाश करितो.

अगस्तिहरीतक्यवलेह.

दशमूलीस्वयंगुप्ताशंखपुष्पीशठीबला ॥ हस्तिपिप्पल्यपामार्गपिप्पलीमूलचित्रकान् ॥ भार्ङीपुष्करमूलंचाद्विपलांशंयवाढकं ॥ हरीतकीशतंचैवजलेपंचाढकेपचेत् ॥ यवैःस्विन्नैःकषायेचपूतंतच्चाभयाशतं ॥ पचेद्गुडतुलांदत्वाकुडवंचपृथग्घृतं ॥ तैलात्पिप्पलिचूर्णाच्चसिद्धशीतेचमाक्षिकात् ॥ लिह्याद्विचाभयेनित्यमतःखादेद्रसायनं ॥ वलिंचपलितंहन्याद्वर्णायुर्बलवर्धनं ॥ पंचकासान्क्षयान्श्वासान्हिक्कांचविषमज्वरान् ॥ हन्यात्तथाग्रहण्यर्शोह्रद्रोगारुचिपीनसान् ॥ अगस्तिविहितंधन्यमिदंश्रेष्ठंरसायनं ॥

अर्थ—दशमुळें, कवासकुहिरी, शंखाहुली, कचोरा, चिकणा, गजपिंपळी, अघाडा, पिंपळीमूळ, चित्रक, भारंगमूळ, पुष्करमूळ हीं प्रत्येकीं ८ तोळे; यव १०२४ तोळे, हरीतकी ४०० तोळे व पाणी ५१२० तोळे घालोन पचन करावें. यव शिजून कषाय झाला, म्हणजे गाळून त्यांत ४०० तोळे हरीतकी घालोन शिजवावी; आणि गूळ ४०० तोळ, तूप १६ तोळे, तेल १६ तोळे व पिंपळीचें चूर्ण १६ तोळे घालोन सिद्ध करावा. खालीं उतरून थंड झाल्यावर मध १६ तोळे घालावा; आणि भरून ठेवावा. त्यांतून २ हरीतक्यानित्य खात जाव्या. हा हरीतक्यवलेह. वली, पलित, व ५ प्रकारचे कास, क्षय, श्वास, उचकी, विषमज्वर, संग्रहणी, मुळव्याध, अरुचि व पडसें यांचा नाश करितो; आणि वर्ण, आयुष्य व वल हीं वाढवितो. हा अगस्तिनें सांगितला, याला हरीतकीलेहरसायन म्हणतात.

व्याघ्र्यादिघृत.

व्याघ्रीस्वरसविपक्करास्नाकट्फलगोक्षुरव्योपैः ॥
सर्पिःस्वरोपघातंनिहंतिकासंचपंचविधं ॥

अर्थ—रिंगणीच्या स्वरसांत रास्ना, कायफळ, गोखरू, सुंठ, मिरीं, पिंपळी, आणि तूप घालून तें सिद्ध करावें; आणि द्यावें; म्हणजे स्वरभंग व पांच प्रकारचा खोकला यांचा नाश होतो.

गुडूच्यादिघृत.

सर्पिर्गुडूचीवृषकंटकारीक्काथेनकल्केनचसिद्धमेतत् ॥
पेयंपुराणज्वरकासशूलप्लीहाग्निमांद्यग्रहणीगदेषु ॥

अर्थ—गुळवेल, अडुळसा व रिंगणी यांचा काढा व कल्क यांत सिद्ध केलेलें घृत जीर्णज्वर, खोकला, शूल, प्लीहा, अग्निमांद्य, आणि संग्रहणी यांवर द्यावें.

त्र्यूषणादिघृत.

त्र्यूषणंत्रिफलाद्राक्षाकाश्मर्याटपरूषकं ॥ द्वेपाठेदेवदार्व्यब्दसगुप्तांचित्रकंसठी ॥ व्याघ्रीतामलकीमेदाकाकनासाशतावरी ॥ त्रिकंटकंविदारीचपिष्टाकर्पसमान्घृतात् ॥ प्रस्थंचतुर्गुणंक्षीरसिद्धंकासहरंपिबेत् ॥ ज्वरगुल्मारुचिप्लीहाशिरोहृत्पार्श्वशूलनुत् ॥ कामलार्शोनिलाष्ठीलाक्षतशोपक्षयापहं ॥ त्र्यूषणंनामविख्यातंघृतमेतन्महोत्तमं ॥

अर्थ—सुंठ, मिरीं, पिंपळी, हरडा, वेहेडा, आवळकाठी, द्राक्षें, शिवण, अडुळसा, पाहाडमूळ, वल्लीपाडळ, देवदारु, नागरमोथे, कवासकुहिरी, चित्रक, कचोरा, रिंगणी, भुयआवळी, मेदा, कावळी, शतावरी, गोखरूं व भुयकोहळी हीं सर्व एकेक तोळा, तूप

६४ तोळे व दूध २५६ तोळे घालून घृत सिद्ध करावें. तें खोकला, ज्वर, गुल्म, अरुचि प्लीहा व मस्तक, हृदय, पार्श्व, यांतील शूल; कावीळ, मुळव्याध, वाताष्ठीला, क्षतक्षय व क्षय यांचा नाश करितें. हें त्र्यूषणनामक घृत महाविख्यात आहे.

कंटकारीघृत.

समूलफलपत्रायाःकंटकार्यारसाढकं ॥ घृतप्रस्थंबलाव्योपविडंगंशाठि दाडिमं ॥ सौवर्चलंयवक्षारंविश्वामलकपौष्करैः ॥ वृश्चिवद्बृह तीपथ्यायवानींचित्रकादिभिः ॥ मृद्वीकाचव्यवर्षाभूदुरालंभाम्लवेत सैः ॥ शृंगीतामलकीभार्गीरास्नागोक्षुरकैःपचेत् ॥ कल्कैस्तुसर्वकासे पुश्वासहिध्मासुशस्यते ॥ कंटकारीघृतंसिद्धंपंचकासनिषूदनं ॥

अर्थ—रिंगणीच्या पंचांगाचा रस १०२४ तोळे, तूप ६४ तोळे व चिकणा, सुंठ, मिरीं, पिंपळी, वावडिंग, कचोरा, डाळिंब, पादेलोण, जवखार, सुंठ, आवळकाठी, पुष्करमूळ, रक्त, पुनर्नवा, रिंगणी, हरीतकी, ओंवा, चित्रकमूळ, द्राक्षें, चवक, श्वेतपुनर्नवा, दुरालभा, आम्लवेतस, कांकडशिंगी, भुयआंवळी, भारंगमूळ, रास्ना, गोखरु यांचा काढा व कल्क घालून तूप सिद्ध करावें; तें संपूर्ण प्रकारचा खोकला, श्वास व उचकी यांवर देण्यास प्रशस्त आहे. हें सिद्ध कंटकारीघृत पांच प्रकारच्या खोकल्याचा नाश करितें.

दुसरा प्रकार.

कंटकार्यातुलांक्षुण्णांकृत्वाद्रोणेंभसःपचेत् ॥ तेनाढकेनक्काथस्यघृतप्र स्थंपिचून्मितैः ॥ रास्नादुस्पर्शषड्ग्रंथिपिप्पलीद्वयचित्रकैः ॥ सौवर्चल यवक्षारकृष्णामलैश्वतज्जयेत् ॥ कासश्वासकफष्ठीवहिध्मारोचकपीनसान् ।

अर्थ—रिंगणी ४०० तोळे कुटून २०४८ तोळे पाण्यांत ती शिजी आटे तों काढा करून त्यांत तूप ६४ तोळे व रास्ना, धमासा, पिंपळीमूळ, पिंपळी, गजपिंपळी, चित्रक, पादेलोण, यवखार, पिंपळीमूळ हीं एकेक तोळा घालोन तें घृत सिद्ध करावें. तें कंटकारीघृत खोकला, दमा, कफाची वांति, उचकी, अरुचि, आणि पडसे यांचा नाश करितें.

भार्गोत्तरवटी.

रसगंधकणापथ्याकलिद्रुफलवासकः ॥ भार्गीचेतिक्रमाद्वृध्दमेतज्जं बीरजद्रवैः ॥ अष्टाविंशत्तमानेतान्कुर्यात्क्षौद्रेणगोलकान् ॥ कर्षप्र माणमेतस्यतमेकंप्रातरुत्थितः ॥ अद्यान्मासत्रयंक्षुद्राक्काथंदशकणायु तं ॥ पिबेत्तदनुकासाच्चश्वासाच्चपरिमुच्यते ॥

अर्थ—पारा, गंधक, पिंपळी, हरीतकी, बेहडा, अडुळसा व भारंगमूळ हीं क्रमवृद्धी

ने घेऊन त्याचें चूर्ण करून लिंबाच्या रसांत घोटून मधाशीं तोळयाची एक अशा अठ्ठावीस गोळया करून त्यांतून दररोज एक या प्रमाणे तीन महिने भक्षण कराव्या; आणि मागून दाहा पिंपळया वाटून घ्याव्या; ह्मणजे खोंकला आणि श्वास यां पासून मुक्त होतो.

पर्पटी.

भागौरसस्यद्वावेकौद्वावेकौलोहभस्मनः ॥ एतद्दृतेद्रवीभूतंमृद्वग्नौक दलीदले ॥ पातयेद्गोमयगतेतथैवोपरियोजयेत् ॥ ततःपिष्ट्वाद्रवैरेभि र्मर्दयेत्सप्तधापृथक् ॥ भार्ङीशुंठीमुनिवराजयानिर्गुंडिकाद्रवैः ॥ व्यो षवासककन्यार्द्रद्रवैःशुष्कैःपुटेल्लघु ॥ अगंधखर्परोनाम्नापर्पटीतिरसो भवेत् ॥ सर्वरोगहरःस्वैस्वैरनुपानैर्द्विमापतः ॥ तांबूलपत्रसहितःकास श्वासहरःपरः ॥ सकणःसुरसाक्वाथोनुपानेवासगोजलं ॥

अर्थ—पारा बारा भाग व लोहभस्म बारा भाग हे मंदाग्निवर पातळ करून केळीच्या पानोंवर ओतावें; नंतर भारंगमूळ, सुंठ, पुंडरीकवृक्ष, टाकळी, निर्गुंड, सुंठ, मिरीं, पिंपळी, अडुळसा, कोरफड व आलें यांच्या काढयांत किंवा रसांत घोटून लघु पुट द्यावें. तो अंगंधखर्परनामक रस होतो याला पर्पटी ह्मणतात. ही अनुपानाशीं २ गुंजा प्रमाणें दिली असतां; संपूर्णरोगांचें हरण करितें. हा विडयाशीं घ्यावा. मागून तुळशीच्या काढयांत पिंपळी घालोन घ्यावा; किंवा गोमूत्र घ्यावें; ह्मणजे कास व श्वास यांचा नाश होतो.

कासश्वासविधूननरस.

रसभागोभवेदेकोगंधकद्वौतथैवच ॥ यवक्षारास्त्रिभागःस्याद्रुचकं चचतुर्गुणं ॥ मरीचंपंचभागंस्याच्छुद्धंरसविमर्दितं ॥ कासंपं चविधंहन्याच्छ्वासंपंचविधंतथा ॥

अर्थ—पारा १ भाग, गंधक २ भाग, यवक्षार ३ भाग, पादेलोण ४ भाग व मिरीं ५ भाग, हे सर्व शुद्ध घेऊन पारदाशीं खलावें; आणि द्यावें; ह्मणजे ५ प्रकारचा खोकला व पांच प्रकारचा श्वास यांचा नाश करितात.

गुरुपंचमूलीकाढा.

अतःपरंकोमलवाणिकासश्वासप्रतीकारमुदीरयामि ॥ निहंतिकासंगुरुपंचमूलक्कतःकषायश्चपलासहायः ॥

अर्थ—हे कोमलवाणि चंद्रकले इतउपर कासश्वासप्रतीकार सांगतों. बृहत्पंचमुळांचा काढा करून त्यांत पिंपळीचें चूर्ण घालून द्यावा; ह्मणजे खोकल्याचा नाश होतो.

वासादिकाढा.

वासाहरिद्राधनिकागुडूचीभार्ङ्गीकणापौष्कररिंगणीनां ॥
काथेनमारीचरजोन्वितेनकासःक्षयंयातिनकस्यपुंसः ॥

अर्थ—अडुळसा, हळद, धने, गुळवेल, भारंगमूळ, पिंपळी, पुष्करमूळ व रिंगणी यांचा काढा मिऱ्यांचें चूर्ण घालून द्यावा; ह्मणजे कोणाचा खोकला नाश पावत नाहीं.

सिंहीकषाय.

अयिरत्नकलेनीलनलिनच्छदनेक्षणे ॥
सिंहीकषायःसकणःकासश्वासकरःक्षणात् ॥

अर्थ—हे कमलनेत्रे रत्नकले रिंगणीचा काढा पिंपळीचें चूर्ण घालून द्यावा; ह्मणजे [illegible] क्षणांत ग्रास करितो.

वृषादिकाढा.

पुलोमजावल्लभसूनुपत्नीतातात्मभूशेखरवाहनस्य ॥
सौंदर्यदूरीकृतरामरामेकषायकःकाससमीरसर्पः ॥

अर्थ—अडुळशाचा कषाय कासवायुला सर्पाप्रमाणें भक्षितो.

आर्द्रकावलेह.

आर्द्रादर्धतुलागुडादपितथार्धाभ्रंचकुस्तुंबरीदीप्यायोजरणा त्रिजातकटुकादेतत्पचेद्युक्तितः ॥ लेहोरत्नकलेतवैवकथितःप्राणप्रियायामयाकासार्शोज्वरपीनसश्वयथुरुग्गुल्मक्षयध्वंसनः ॥

अर्थ—आलें २०० तोळे, गूळ २०० तोळे. धने ४ तोळे व ओवा, लोह, जिरें, दालचिनी, तमालपत्र, एलची, कटुकी या प्रत्येकांचें चूर्ण ४ तोळे करून युक्तीनें पचन करून लेह करावा. हा खोकला, मुळव्याध, ज्वर, पडसे, सूज, गुल्म, आणि क्षय यांचा नाश करितो.

व्याघ्रीहरीतक्यवलेह.

समूलपुष्पच्छदकंटकार्यातुलाजलेद्रोणपरिप्लुताच ॥ हरीतकीनांच शतंनिदध्यादेतत्तुपक्त्वाचरणावशेषं ॥ गुडस्यदत्वाशतमेतदग्नौविपक्मुत्तार्यततःसुशीते ॥ कटुत्रिकंचत्रिपलप्रमाणंपलानिपट्पुष्वरसस्यचापि ॥ क्षिपेच्चतुर्जातपलंयथाग्निप्रयुज्यमानोविधिनावलेहः ॥ वातात्मकंपित्तकफोद्भवंचद्विदोषकासानपिसन्निपातान् ॥ क्षतोद्भवंका

सक्षयंचहन्यात्सपीनसश्वासमुरःक्षतंच ॥ यक्ष्माणमेकादशमुग्रभूयंभृ
गूपदिष्टंहिरसायनंस्यात् ॥

अर्थ–रिंगणीचें पंचांग ४०० तोळे व ४०० तोळे हरीतकी घेऊन तीचा २०४८ तोळे पाण्यात चतुर्थांश काढा करून त्यांत ४०० तोळे गुळ घालून चांगला लेह हो- ण्याजोगा पाक झाला ह्मणजे उतरून थंड झाल्यावर त्यांत सुंठ, मिरीं व पिंपळी हीं चार चार तोळे व मध २४ तोळे; व दालचिनी, तमालपत्र, एलची, नाकेशर हीं चार तोळे घालून त्यांतून सोसेल तसा खावा; ह्मणजे वात, पित्त, कफ, द्विदोष, सन्निपात यांपासू- न झालेले व क्षतकास, क्षयकास, पीनस, उरःक्षत, एकादशरूप क्षय यांचा नाश करितो. हें रसायन भृगूनें सांगीतलें आहे.

कासकंडनावलेह.

अजामूत्रंशतपलंमंदाग्नौगुडपाकवत् ॥ पक्त्वाविभीतकंचूर्णपलद्वय
मितंक्षिपेत् ॥ पलंपिप्पलिचूर्णंचपलमात्रंमृतायसं ॥ कंटकारीफल
रजोनिःक्षिपेच्चपलद्वयं ॥ ततोमाषद्वयंखादेट्टंककर्षमथापिवा ॥ क्षौ
द्ररंभांबुनावापिसर्वकासात्प्रमुच्यति ॥ असाध्यभिषजात्यक्ताचिरजा
पथ्यवर्जिताः ॥ येकासास्तेत्वनेनाशुप्रणश्यंतिनसंशयः ॥ कासकं
डननामायंयोगआत्रेयभाषितः ॥

अर्थ–शेळीचें मूत ४०० तोळे, मंदाग्नीवर गुडपाकासारिखें आटवून त्यांत वेहेडयाचें चूर्ण ८ तोळे, पिंपळीचें चूर्ण ४ तोळे, मृतलोह ४ तोळे, रिंगणीच्या फळाचें चूर्ण ८ तोळे घालून एकत्र करावें; ह्मणजे तो कासकंडन अवलेह झाला. त्यांतून दोन मासे, दाहा मासे, किंवा तोळा घेऊन तो मधाशीं किंवा केळीच्या उदकाशी खावा; ह्मणजे जे फार दिवसांचे वैद्यानीं सोडिले, आणि पथ्यहीन असे कासरोग शीघ्र नाश करितो. हा आत्रेयानीं सांगीतला.

हेमगर्भपोटली.

शुद्धसूतंत्रिभागंचतत्समंलोहभस्मच ॥ भागैकंगंधकंदद्याचदर्धंस्वर्ण
मेवच ॥ कज्जलींकारयेत्तत्तुखल्वकेसप्तवासरं ॥ अथनिर्गुंडिकाद्रा
वैर्मर्दयेद्दिनसप्तकं ॥ अथवाकनकद्रावैर्गुटिकांकारयेत्ततः ॥ किंचि
च्छलिसमायुक्तवस्त्रेगोलंनिधायच ॥ बध्नीयात्पोटलीमेवंततश्चत्रिपु
टंपचेत् ॥ दृढमृन्मयपात्रस्थेगंधंदत्वाधरोत्तरं ॥ तन्मध्येपोटलींन्य
स्यन्निर्वातभवनांतरं ॥ वितस्तिप्रमितांगर्तांतस्यांसंस्थाप्यमुद्रयेत् ॥

अंगुलीमुद्रिकाभिश्चज्वालयेदिंधनानिच ॥ यामेनसिद्धतांयातिहेमगर्भाख्यपोटली ॥ अनुपानानुसारेणसर्वरोगेषुयोजयेत् ॥

अर्थ शुद्ध पारा ३ भाग, लोहभस्म ३ भाग, गंधक १ भाग, व सुवर्ण अर्धा भाग, यांची खलांत कज्जली करून तिला निर्गुंडीच्या रसांत सात दिवस भावना द्यावी; आणि धोत-याच्या रसांत खलून गोळी करावी, ती विरळ वस्त्रांत बांधावी; आणि ती मातीच्या भाड्यांत गंधक घालून मध्यें गोळी ठेवून वर गंधक घालावा; आणि निर्वात जाग्यांत वीतभर खळी काढून तींत तें पात्र ठेवून त्यावर मुद्रा द्यावी. तीवर माती अंगुळभर घालून त्यावर एक प्रहर लांकडांचा अग्नी द्यावा; म्हणजे हेमगर्भपोटलीरस सिद्ध होतो, हा अनुपानाशीं सर्व रोगांवर द्यावा.

हेमगर्भ.

रसस्यभागाःश्चत्वारस्तदर्धंकनकस्यच ॥ तदर्धंताम्रकंचैवमौक्तिकंविद्रुमंसमं ॥ तत्समानेनवह्निनासर्वंखल्वेविमर्दयेत् ॥ कृत्वातुगोलकंपश्चात्पचेद्भूधरयंत्रके ॥ मृदुनावन्हिनाचैवस्वांगशीतंसमुद्धरेत् ॥ वह्निमेवचसम्यग्वैषड्गुणंजारयेत्सुधीः ॥ हेमगर्भरसोनामत्रिषुलोकेषुविश्रुतः ॥ कासश्वासेषुसर्वेषुशूलेषुचहितस्तथा ॥ तत्तद्रोगानुपानेनसर्वान्रोगान्जयेत्परं ॥

अर्थ–पारा ४ भाग, सुवर्ण २ भाग, ताम्रभस्म १ भाग, मौक्तिक ११ भाग, पोवळें १ भाग व गंधक १ भाग हे सर्व खलांत घालून काजळा सारखें खलून त्याचा गोळा करून तो भूधरयंत्रांत मंदाग्निनें पचन करावा. स्वांगशीत झाल्यावर काढून पुनः गंधकाशीं खलून पुनः पुट द्यावें; या प्रमाणे षड्गुण गंधक जारण करावा. हा हेमगर्भ रस तीन ही लोकांत कास, संपूर्ण श्वास, शूल, यांचा नाश कर्ता प्रसिद्ध आहे; आणि तो रोगोक्त अनुपानाशीं सर्वरोगांचा नाश करितो.

दुसरा प्रकार.

शुद्धसूतंपलंचैकंपादांशंशुद्धहेमकं ॥ शुद्धगंधस्यमाषैकंप्रतिकर्षेणयोजयेत् ॥ त्रयमेकत्रकुर्वीतश्लक्ष्णचूर्णंचकारयेत् ॥ सुदृढंबंधयेद्वस्त्रेबहिःसूतंसमंवह्निं ॥ वस्त्रंगृहीत्वागुटिकातदंतर्बंधयेत्पुनः ॥ शरावसंपुटेन्यस्यमुखेमुद्रांचकारयेत् ॥ भूमिसंपुटगंकृत्वाभूधराख्येपचेत्पुटे ॥ स्वांगशीतंसमुधृत्यत्यजेज्जीर्णंचगंधकं ॥ पुनःसंचूर्ण्यगुटिकामुदृढंबं

धर्येद्भिपक् ॥ तयावहिर्वलिंदत्वाभूधराख्येपुनःपचेत् ॥ एवंदत्वामु
निपुटंरसस्याद्धेमगर्भकः ॥ श्वासकासेपुसर्वेपुशूलेमुविहितस्तथा ॥

अर्थ—शुध पारा ४ तोळे, शुद्ध सोनें १ तोळा व शुद्ध गंधक १ मासा प्रतिकर्षा स, याप्रमाणें सर्व एकत्र करून त्यांचें बारीक चूर्ण करावें; आणि घट्ट वस्त्रांत बांधून त्या वस्त्राच्या बाहेरून पाऱ्या इतका गंधक घालून दुसरे वस्त्रानें चांगली गोळी बांधावी; नंतर शरावसंपुटांत ठेऊन तोंडावर मुद्रा द्यावी; आणि भूमीला खळगा काढून त्यांत संपुट ठेऊन वर माती लोटून त्यावर अग्नी देऊन पचन करावा. थंड झाल्यावर काढून जळका गंधक टाकून द्यावा. पुनः चूर्ण करून घट्ट गोळी बांधून पूर्ववत बाहेरून गंधक बांधून भूधरयंत्रांत पुनः पचन करावी. याप्रमाणें सात पुटें द्यावीं; म्हणजे हेमगर्भ होतो. हा खोकला, दमा, व शूल यांवर हितकारक व अनुपानाशीं सर्व रोगांचा नाश करितो.

कासकेसरी.

दरदंमरिचंमुस्तंटंकणंचविषंसमं ॥ जंबीराद्भिश्वसंमर्धकुर्यान्मु
द्गनिभांवटीं ॥ आर्द्रकस्वरसेनैवकासंश्वासंव्यपोहति ॥

अर्थ—हिंगुळ, मिरीं, नागरमोथा, टांकणखार व बचनाग, यांची जंबीररसांत खलोन मुगां एवढी गोळी करावी, ती आल्याच्या रसाशीं द्यावी; म्हणजे ती खोकला, आणि श्वास, यांचा नाश करिते.

रसेंद्रवटी.

कर्षशुद्धरसेंद्रस्यगंधकस्याभ्रकस्यच ॥ ताम्रस्यहरितालस्यलोहस्य
चविषस्यच ॥ मरिचस्यचसर्वेषांश्लक्ष्णचूर्णंपृथक्पृथक् ॥ मानोल्वौ
खंडकर्षंचनिर्गुंडीकाकमाचिका ॥ केशराजभृंगराजस्वरसेनसुभावितं ॥
कलायपरिमाणांनुगुटिकांकारयेद्भिपक् ॥ कृत्वादौशिवमभ्यर्च्यद्विजा
दीन्परितोपितान् ॥ जीर्णान्नोभोजयेत्पश्चात्क्षीरमांसरसाशनः ॥ अपिवै
द्यशतैस्त्यक्तमम्लपित्तंनियच्छति ॥ कासंपंचविधंहंतिश्वासंचैवसुदुर्जयं ॥

अर्थ—शुद्ध पारा, गंधक, अभ्रक, ताम्र, हरिताल, लोह, बचनाग, आणि मिरीं यांचें बारीक चूर्ण करून ते निर्गुंड, कावळी, निळामाका व माका यांच्या रसांत भावना देऊन वाटाण्या एवढी गोळी करून ती शिवाची पूजा करून, ब्राह्मणाला दानें देऊन गोळी घ्यावी; आणि अन्न जिरल्यावर पुनः भोजन करावें, ते क्षीर व मांसरस भक्षण करावें; म्हणजे शेंकडो वैद्यानां बरें नहोणारें असे अम्लपित्त, ५ प्रकारचा खोकला; आणि दुर्जय श्वास यांचा नाश करिते.

नीलकंठरस.

सूतकंगंधकंलोहंविपंचित्रकपत्रकं ॥ वरांगंरेणुकामुस्ताग्रंथिकंनाग
केसरं ॥ फलत्रिकंत्रिकटुकंशुल्बंतुल्यंतथैवच ॥ एतानिसममागानि
गुडोद्विगुणमुच्यते ॥ संमर्द्यगुटिकांकृत्वाभक्षयेच्चणमात्रकं ॥ कासे
श्वासेतथागुल्मेप्रमेहेविपमज्वरे ॥ मूत्रकृच्छ्रेमूढगर्भेवातरोगेचदारुणे ॥
नीलकंठरसोनामशंभुनानिर्मितःस्वयं ॥

अर्थ—पारा, गंधक, लोह, बचनाग, चित्रक, तमालपत्र, जाडी दालचिनी, पित्तपापडा नागरमोथा, पिंपळीमूळ, नाकेशर, हरडा, बेहेडा, आवळकाठी, सुंठ, मिरीं, पिंपळी व ताम्र हीं सर्व समभाग; व सर्वांच्या दुप्पट गूळ घालोन घोटून हरभऱ्या एवढी गोळी करून ती खोकला, दमा, गुल्म, प्रमेह, विषमज्वर, मूत्रकृच्छ्र, मूढगर्भ व वातरोग, यांवर भक्षण करावी. हा नीलकंठनामक रस शंभूनें स्वतः उत्पन्न केला.

लोनाथपोटली.

कृत्वाजंभरसेनगंधरसयोस्तत्तुल्यताम्रावृतंगोलंलावणयंत्रगर्भनिहितंरु
ध्वापचेत्तंशनैः ॥ यामानष्टकपर्दजेनसकलंतुल्येनतद्भस्मनायुक्तंचित्र
कवारिणालघुतरंपिष्ट्वापुटंदापयेत् ॥ संशुद्धामितिपोटलींसहविषंमारी
चचूर्णेनतांमृद्गीयादितिलोकनाथविधिनादौर्बल्यकाशादिषु॥ शोफामा
निलगुल्मशूलकसनश्वाससंग्रहण्यार्शसीप्रौढेयक्ष्मणिपांडुरोगसहितेसंता
पमांद्यारुचौ ॥

अर्थ—गंधक व पारा यांची कज्जली करून ती लिंबाच्या रसांत खलून त्या कज्जली इतका वजन तांब्याचा करंडा बेऊन त्यांत ती कज्जली भरून बंद करावा; आणि बोळक्यांत मीठ अर्धे भरून त्यांत तो करंडा मध्यें ठेऊन त्यावर तोंडापर्यंत मीठ घालोन तोंडावर पणती लाऊन मातकापड करून तें बोळकें आठ प्रहर अग्नीत पचन करावें. शीत झाल्यावर काढून त्या करंड्यामुद्धा वाटून त्यांत समभाग कवड्याचें भस्म घालोन चित्रकाच्या रसात घोटून पुट द्यावें; नंतर काढून त्यांत बचनाग व मिऱ्यांचे चूर्ण घालून घोटावी. ही लोकनाथपोटली लोकनाथरसाप्रमाणे द्यावी; म्हणजे दुर्बलता, कृशता, सूज, आमवात, गुल्म, शूल, खोकला, दमा, संग्रहणी अर्श, क्षयरोग, पांडुरोग, संताप अग्निमांद्य, आणि अरुचि, यांचा नाश करितें.

अमृतार्णवरस.

पारदंगंधकंशुद्धंमृतलोहंचटंकणं ॥ रास्नाविडंगत्रिफलादेवदारुकटु

त्रयं ॥ अमृतापद्मकंक्षौद्रंविषंतुल्यांशचूर्णितं ॥ त्रिगुंजंसर्वकासार्तसे त्रयेदमृतार्णवं ॥

अर्थ–पारा, गंधक, लोहभस्म, टाकणखार, रास्ना, वावडिंग, त्रिफळा, देवदार, त्रिकटु, गुळवेल, पद्मकाष्ठ, मध व बचनाग, हीं सर्व समभाग घेऊन चूर्ण करून तीन गुंजा सर्वकासानीं युक्त रोग्याला द्यावें, याला अमृतार्णव म्हणतात.

अग्निरस.

रसगंधकपिप्पल्योहरीतक्याक्षवासकः ॥ यष्ट्यांतरगुडंचूर्णंवब्बूलक्काथ भावितं ॥ एकविंशतिवारेणशोषयित्वाविचूर्णयेत् ॥ भक्षयेन्मधुनाहं तिकासमग्निरसोह्ययं ॥

अर्थ–पारा, गंधक, पिंपळी, हरीतकी, बेहडा, अडुळसा व ज्येष्ठीमध यांचे समभाग चूर्णास बाभळीच्या काढ्यांत एकवीस भावना द्याव्या; आणि वाळवून घोटून तें मधाशीं द्यावें; म्हणजे खोकल्याचा नाश करितें, याला अग्निरस म्हणतात.

कासकर्तरी.

वंगंकृष्णाभयाक्षाटरूषभार्ङ्यःक्रमोत्तराः ॥ तत्समंखादिरंक्षा रंवब्बूलक्काथभावितं ॥एकविंशतिवारंचमधुनाकासकर्तरी ॥ कासंश्वासंक्षयंहिक्कांहंत्येतन्नात्रसंशयः ॥

अर्थ–लवंग, पिंपळी, हरीतकी, बेहेडा, अडुळसा व भारंगमूळ हे क्रम वृद्धीनें घेऊन त्या सर्वांच्या समान खैराचा खार एकत्र करून बाभळीच्या काढ्यांत एकवीस वेळ भावना द्यावी. ती कासकर्तरीरस मधाशीं द्यावा; म्हणजे खोकला, दमा, क्षय व उचकी याचा नाश करितो, यांत संशय नाहीं.

कफाग्निवटी.

कर्पूरमर्धकर्षंमृगमदमपिदेवकुसुमयुगं ॥ मरिचंकणाक्षकुलिं जनमेकैकंशुक्तिपरिमाणं ॥ दाडिमफलवल्कलपलमखिल ममंखदिरसारमवचूर्ण्य ॥ वटिकामुद्गसमानाकृताधृतास्ये कफघ्नस्यात् ॥

अर्थ–कापूर व कस्तूरी एकेक तोळा, लवंगा २ तोळें व मिरीं, पिंपळी, बेहेडा, कोळिंजन हीं प्रत्येकीं अर्धा तोळा; व डाळिंबाचोसाल ४ तोळे हीं सर्व काताशीं घोटून त्याची मुगाएवढी गोळी करून तोंडांत धरावी; म्हणजे ती कफनाश करिते.

कासपथ्य.

शालिषष्टिकगोधूममाषमुद्गकुलित्थकाः ॥ छाग्याःपयोघृतंविंबीवा
र्ताकंवालमूलकं ॥ कासमर्दकजीवंतीवास्तुकंबीजपूरकं ॥ गोस्तनी
लशुनंलाजाव्योषमुष्णोदकंमधु ॥ पथ्यमेतद्यथादोषमुक्तंकासगदातुरे ॥

अर्थ–साळी साठकी, गहूं, उडीद, मूग, कुळीथ व शेळीचें दूध व तूप, तोंडलें, वांगें, कोंवळे मुळे, कासिवदा, जीवंती, वास्तुक, महाळुंग, गोस्तनीद्राक्षे, लसुण, लाह्या, सुंठ, मिरीं, पिंपळी, ऊन पाणी, आणि मध हे पदार्थ कासरोगावर पथ्य सांगीतले आहेत.

अपथ्य.

मैथुनंस्निग्धमधुरंदिवास्वापंपयोदधि ॥
पिष्टान्नंपायसादीनिकासीधूमंचवर्जयेत् ॥

अर्थ–मैथुन, स्निग्ध व मधुर पदार्थ, दिवा निद्रा, दूध, दहीं, पिष्टान्न, क्षीर, आणि धूम हे खोकलेकरीरोग्यानें सोडावे.

हिक्काकर्मविपाक.

योकृत्वाब्राह्मणोभुंक्तेस्नानहोमजपादिकं ॥ सहिक्कारोगसंयुक्तस्त
त्पापस्यापनुत्तये ॥ चांद्रायणत्रयंकुर्यात्त्रीन्कृछ्रांश्वसमाचरेत् ॥

अर्थ–जो ब्राह्मणस्नान, होम, जपादि नकरितां भोजनकरितो. तो (हिक्का उचकी, रोगी) होतो. त्याणें त्यापापापासून मुक्त होण्याकरितां तीन चांद्रायणे व तीन कृछ्र प्रायश्चित्त करावें.

हिक्कानिदान.

विदाहिगुरुविष्टंभिरूक्षाभिष्यंदिभोजनैः ॥ शीतपानाशनस्नानरजो
धूमातपानिलैः ॥ व्यायामकर्मभाराध्ववेगघातापतर्पणैः ॥ हिक्काश्वा
सश्वकासश्चनृणांसमुपजायते ॥

अर्थ–विदाहि (करीर, मद्य, मरीचकादिक) गुरु, विष्टंभि, रुक्ष, अभिष्यंदि, अशीं जीं अन्ने त्यांच्या भोजनें करून व शीतपान, शीताशन, शीतोदकस्नान, रज, धूम, उष्ण व वायु यांच्या संबंधानें व्यायाम, भार, अति मार्गगमन, मूत्रपुरीषादिवेगांचा अवरोध व अनशन इत्यादि कारणेंकरून मनुष्यांस उचकी, श्वास व खोकला हे उत्पन्न होतात.

संप्राप्ति.

मुहुर्मुहुर्वायुरुदेतिसस्वनोयकृत्प्लिहांत्राणिमुखादिवाक्षिपन् ॥
सघोषवानाशुहिनस्तियस्मात्ततस्तुहिक्केत्यभिधीयतेबुधैः ॥

अर्थ हृदयस्थ वायु कंठदेशस्थ वायुला मिळून यकृत् प्लीहा व आंतडी यांते आक्षित करीत वारंवार विलक्षण शब्दयुक्त मुखावाटे बाहेर निघतो; आणि हा वायु त्वरित प्राणनाश करितो, यास्तव या व्याधीला वैद्य हिक्का ह्मणजे उचकी असें ह्मणतात.

हिक्केचे भेद सांगतों.

अन्नजांयमलांक्षुद्रांगंभीरांमहतींतथा ॥
वायुःकफेनानुगतःपंचहिक्काःकरोतिच ॥

अर्थ–अन्नजा, यमला, क्षुद्रा, गंभीरा, आणि महती या नांवेंकरुन पांच प्रकारच्या उच्-क्या कफमिश्रित वायु उत्पन्न करितो, असें जाणावें.

पूर्वरूप.

कंठोरसोगुरुत्वंचवदनस्यकषायता ॥
हिक्कानांपूर्वरूपाणिकुक्षेराटोपएवच ॥

अर्थ–कंठ व ऊर यांस गुरुत्व येतें, तोंड तुरट होतें; व कुशी बांधिल्यासारिख्या होतात. इत्यादि उचक्यांची पूर्वरूपें जाणावीं.

सामान्यचिकित्सा.

यत्किंचित्कफवातघ्नमुष्णंवातानुलोमनं ॥
भेषजंपानमन्नंवाहिक्काश्वासेपुनर्हितं ॥

अर्थ–जे कांहीं कफवातघ्न, उष्ण, वायूला अनुलोमन करणारें असें औषध, पान, अन्न, हे उचकी व श्वास याविषयीं हितकारक होतें.

हिक्काश्वासातुरेपूर्वंतैलाक्तेस्वेदइष्यते ॥
ऊर्ध्वाधःशोधनंशक्तेदुर्बलेशमनंमतं ॥

अर्थ–उचकी व श्वास याणीं पीडित रोग्याला तैलाभ्यंग करुन घाम काढावा; व सशक्त असल्यास वांति व रेचन द्यावें; व रोगी असला तर शमन हितकारक होतें.

प्राणावरोधतर्जनविस्मापनशीतवारिपरिषेकैः ॥
चित्रैःकथाप्रयोगैःशमयेद्धिक्कांमनोभिघातैश्च ॥

अर्थ–श्वास कोंडणें, भिवविणें. किंवा आश्चर्यकारक गोष्टी सांगणें, थंड पाणी आंगावर शिंपणें, आणि नानाप्रकारच्या गोष्टी सांगणें, किंवा मन खट्टु करणें, या उपचारानीं उचकी शमवावी.

त्याज्यहिक्का.

वातेनहिक्काःप्रभवंतिपंचतासांमसाध्यत्वमुदाहरंति ॥
अक्षीणमांसस्यभवंतिसाध्याःप्रांतेचहिक्केपरिवर्जनीये ॥

अर्थ--वायूनें पांच प्रकारच्या उचक्या उत्पन्न होतात, त्या असाध्य आहेत; परंतु ज्या रोग्याचा मांसक्षय झाला नाहीं त्याच्या बऱ्या होतात; व शेवटच्या दोन हिक्का वैद्यानें सोडाव्या, त्याला औषध देऊं नये.

कासप्रकरणोक्तंचभिषगत्रनियोजयेत् ॥
क्षयोक्तंवातकासेचहिक्काश्वासेनियोजयेत् ॥

अर्थ--जे संपूर्ण कासावर प्रकार सांगितले, ते व क्षयावरील उपचार हे संपूर्ण वात कास, उचकी, आणि श्वास यांवर योजावे.

अन्नजाहिक्कानिदान.

पानान्नैरतिसंयुक्तैःसहसापीडितोनिलः ॥
हिक्कयत्यूर्ध्वगोभूत्वाविद्यात्तामन्नजांभिषक् ॥

अर्थ--पानें व अन्नें हीं फार सेवन केलींअसतां; त्याणीं वायु कुपित होऊन अकस्मात् ऊर्ध्वगतिक होतो; व उचकी उत्पन्न करितो. तिला अन्नज हिक्का ह्मणतात.

यूप.

कासमर्दकपत्राणांयूपःसौभांजनस्यच ॥
शुष्कमूलकमंडस्तुहिक्काश्वासनिवारणः ॥

अर्थ--कांशिद्याचे पानांचा, अथवा शेवग्याचे मुळांचा, किंवा वाळल्या मुळ्यांचा मंड हिक्का व श्वास यांचा निवारक आहे.

मदधिव्योपसर्पिष्कोयूपोवातार्कजोहितः ॥

अर्थ--गांग्याचा मंड, दहीं, सुंठ, मिरें, पिंपळी व तूप याणीं मिश्रीत करून प्यालें असतां; हिक्केवर हितकारक आहे.

कुलित्थादिकाढा.

कुलित्थानागरंव्याघ्रीवासाभिःक्कथितंजलं ॥
पीतंपुष्करसंयुक्तंहिक्काश्वासनिवारणं ॥

अर्थ--कुळिथ, सुंठ, रिंगणी व अडुळसा यांचा काढा पुष्करमुळांचें चूर्ण घालून घ्यावा. हा उचकी व दमा यांचें वारण करितो.

हरिद्रादिलेह.

हरिद्रामरिचंद्राक्षागुडंरास्नाकणाशठी ॥ लिह्यात्तैलेनविलि

हन्श्वासंप्राणहरामपि॥ हिक्कांहरतिप्रबलांश्वासातिप्रभूतंनिवारयति ॥

अर्थ—हळद, मिरीं, द्राक्षें, गूळ, रास्ना, पिंपळी व कचोरा यांचें चूर्णाचा तेलांतून लेह करुन द्यावा; तो श्वास, प्राणहारक उचकी व आते वाढलेला श्वास यांचा नाश करितो

अभयादिकल्क.

अभयानागरकल्कंपौष्करयावशूकमरिचकल्कंवा ॥

तोयेनोष्णेनपिवतःश्वासहिक्कांनियच्छति ॥

अर्थ—हरीतकी व सुंठ, यांचा किंवा पुष्करमूळ, यवांचें कूस व मिरीं यांचा कल्क करुन तो ऊन पाण्याशीं प्राशन केला असतां; दमा, आणि उचकी, हीं शांत होतात.

चंद्रसूरकाढा.

चंद्रसूरस्यबीजानिक्षिपेदष्टगुणेजले ॥ यदामृदूनिगृण्हीया

त्तनोवाससिगालयेत् ॥ हिक्कातिवेगकललस्तज्जलंपलमात्र

या ॥ पिबेत्पुनःपुनश्चापिहिक्काशीघ्रंप्रणश्यति ॥

अर्थ—नागरमोथ्याचें बीज घेऊन तें आठपट पाण्यांत भिजत घालावें. मऊ झालें ह्मणजे वस्त्रावर गाळून त्याचें पाणी चार तोळे वारंवार प्राशन करावें; ह्मणजे उचकीचा लवकर नाश होतो.

मधुनाकटुकाचूर्णंलीढंहिक्कानिवारणं ॥

अर्थ—कुटकीचें चूर्ण मधाशीं द्यावें. तें उचकी निवारण करितें.

यमलाहिक्कानिदान.

चिरेणयमलैर्वेगैर्याहिक्कासंप्रवर्तते ॥ कंपयंतीशिरो

ग्रीवंयमलांतांविनिर्दिशेत् ॥

अर्थ—चिरकाळें करुन दोन वेग एकदांच येऊन मस्तक व मान यातें कांपवून जी उचकी उत्पन्न होते; तिला यमला असें ह्मणतात.

दशमूला यवागू.

दशमूलीसठीरास्नापिप्पलीविश्वपौष्करैः ॥ शृंगीतामलकीभार्ङ्गीगु

डूचीनागरादिभिः ॥ यवागूंमधुनासिद्धांकषायंवापिबेन्नरः ॥ कास

हृद्ग्रहपार्श्वार्तिहिक्काश्वासप्रशांतये ॥

अर्थ–दशमुळें, कचोरा, रास्ना, पिंपळी, सुंठ, पोखरमूळ, कांकडशिंगी, भूयआवळी भारंगमूळ, गुळवेल, नागरमोथा, यांणीं सिद्ध केलेली यवागू मधाबरोबर खावी; अथवा यांचा काढा प्यावा; ह्मणजे कास, ह्द्रोग, कुशींतला वायु, श्वास, हिक्का यांची शांति होईल.

हिंगुसौवर्चलाजाजीविडपुष्पकचित्रकैः ॥
सिध्दाकर्कटशृंग्याचयवागूःश्वासहिक्किनां ॥

अर्थ–हिंग, पादेलोण, जिरें, विडलोण, पोखरमूळ, चित्रक व कांकडशिंगी इतक्यांची सिद्ध झालेली कांजी श्वास व हिक्का हीं ज्यांना आहेत, त्यांस प्रशस्त आहे.

क्षुद्राहिक्कानिदान.

विकृष्टकालैर्यावेगैर्मंदैःसमभिवर्तते ॥
क्षुद्रिकानामसाहिक्काजत्रूमूलात्प्रधावति ॥

अर्थ–जी हिक्का मंदवेग असून खांका, ऊर, आणि मान यांच्या संधिपासून प्रवृत्त होत्ये; तिला क्षुद्रहिक्का ह्मणतात.

दशमूलीकाढा.

दशमूलीजलयुतंहितंहिक्कासुयोजयेत् ॥
श्वासकासहरःसर्वोविधिरत्रापियुज्यते ॥

अर्थ–दशमुळांचे काढयाशीं उचकीवर जे हितपदार्थ ते योजावे; व संपूर्ण श्वास व कास यांची नाशक अशीं औषधें उचकीवर योजावीं.

कुलित्थादिकाढा.

कुलित्थयवकोलांबुदशमूलवलाजलम् ॥
पानार्थंकल्पयेत्कासहिक्काश्वासप्रशांतये ॥

अर्थ–कुळिथ, यव, बोरें, दशमूळें व चिकणा यांचा काढा. कास, उचकी व श्वास शांत होण्याकरितां प्यावयास द्यावा.

धात्र्यादिकाढा.

धात्रीचमागधीशुंठीक्काथश्चैषांसितायुतः ॥
हिनस्तित्द्दयोद्भूतांहिक्कांप्राणापनोदिनीं ॥

अर्थ–आवळकाठी, पिंपळी व सुंठ यांचा काढा साकर घालोन घेतला असतां; प्राणाचा नाश करणाऱ्या उचकीचा नाश करितो.

गंभीराहिक्कानिदान

नाभिप्रवृत्तायाहिक्काघोरागंभीरनादिनी ॥ शुष्कास्यकंठजिव्हास्या

च्छ्वासकासरुजाकरी ॥ अनेकोपद्रववतीगंभीरानामसास्मृता ॥

अर्थ–जी हिक्का नाभीपासून उत्पन्न होत्ये; व गंभीर शब्द होतो; आणि मुख, कंठ जिव्हा हीं शुष्क होतात; व श्वास, अनेक उपद्रव यातें करणारी, तिला गंभीरा ह्मणतात.

पाटल्यादियोग

पाटल्याफलतोयेनक्षौद्रेणचसमन्वितं ॥
हेमभस्मनिहंत्येवहिक्काःपंचातिदुस्तराः ॥

अर्थ–पाडळीच्या फळांचा रस व मध यांशी सुवर्णभस्म घेतलें असतां; अतिकठीण अशा ५ प्रकारच्या उचकीचा नाश करितें.

दशमूलीकाढा.

दशमूलीकषायेणमधुनाचसमन्वितं ॥
कांतायोभस्महिक्कानांपंचानांपंचतांनयेत् ॥

अर्थ–दशमुळांचा काढा व मध यांशीं कांतलोहाचें भस्म घेतलें असतां; पांच प्रकारच्या उचकीचा नाश करितें.

छागदुग्धयोग.

हिक्कार्तस्यपयश्छागंहंतिनागरसाधितं ॥
रसान्पचेत्फलाम्लांश्चलाजचूर्णससैंधवं ॥

अर्थ–उचकीवर सुंठ घालोन तापवलेले शेळीचें दूध, किंवा अम्लवेतसानें सिद्ध आम्ल रस; अथवा लाह्यांचें पीठ सैंधवयुक्त द्यावें.

मधुसौवर्चलयोग.

मधुसौवर्चलोपेतंमातुलिंगरसंपिबेत् ॥
हिक्कार्तोमधुनालिह्याच्छुंठीधात्रीकणान्वितं ॥

अर्थ–उचकीच्या रोग्यानें माहाळुंगाचा रस, मध व पादेलोण घालोन प्यावा; किंवा, माहाळुंगाच्या रसांत सुंठ, आवळकाठी व पिंपळी यांचें चूर्ण व मध घालोन चाटीतजावा..

शिखिलेह.

शिखिपिच्छभस्मकृष्णाचूर्णमधुमिश्रितंमुहुर्लीढं ॥
हिक्कांहरतिप्रबलांश्वासंचैवातिदुस्तरांछर्दिं ॥

अर्थ–मोरांचे पिसांची राख व पिंपळीचें चूर्ण हीं दोनी मधाशीं वारंवार चाटीत गेलें असतां; प्रबल उचकी, श्वास, फार कठीण ओकारी, यांचें शमन होतें.

पिप्पल्यादिलेह.

पिप्पलीमूलमधुकंगुडगोश्वशकृद्रसान् ॥
हिध्माभिष्पंदकासघ्नान्लिहेन्मधुघृतान्वितान् ॥

अर्थ—पिंपळीमूळ, ज्येष्ठमध, गुळ, आणि गाईंचें शेण व घोड्याची लीद यांचा दाट काढा करून मध व तूप घालोन वारंवार चाटला असतां; उचकी, अंगस्फुरण व खोकला, यांचा नाश करितो.

कपित्थस्वरसोवापिरसआमलकस्यच ॥
पिप्पलीक्षौद्रसंयुक्तोहिक्काश्वासनिवारणः ॥

अर्थ—कंवठाचा आंगरस, किंवा आवळ्याचा आंगरस, मध व पिंपळी या सहित घेतला असतां; तो हिक्का व श्वास यांचा निवारक आहे.

खर्जूरंपिप्पलीद्राक्षाशर्कराचेतितत्समं ॥
मधुसर्पिर्युतोलेहोहिक्काश्वासनिवारणः ॥

अर्थ—खजूर, पिंपळी, मनुका, साकर हीं समभाग घेऊन त्यांत मध व तूप घालोन लेह करावा, तो हिक्का व श्वास यांचा निवारक आहे.

कटुकादिभस्म.

कटुकागैरिकाभ्यांचमुक्ताभस्मतथैवच ॥
बीजपूरस्यतोयेनताम्रंनद्धत्समाक्षिकं ॥

अर्थ—कुटकी, सोनगेरु व मोत्यांचें भस्म हीं समभाग घेऊन माहाळुंगाचे रसांत घा. लोन त्यांत मध घालोन द्यावें; अथवा कुटकी, गेरू, माहाळुंगाचा रस व मध यांत ताम्र-भस्म घालोन प्राशन करावें; म्हणजे हिक्कानाश होतो.

कोलमज्जालेह.

कोलमज्जांजनंलाजास्तिक्ताकांचनगैरिकं ॥ कृष्णाधात्रीसिताशुंठीका सीसंदाधनामच ॥ पाटल्याःसफलंपुष्पंकृष्णाखर्जूरमुस्तकं ॥ पडेते पादिकालेहाहिक्काघ्नामधुसंयुताः ॥

अर्थ—बोराच्या आंठितला मगज, सुरमा व लाह्या हा एक; कुटकी, नागकेशर व सुवर्ण हा दुसरा; पिंपळी, आवळकाठी, साकर व सुंठ हा तिसरा; हिराकस व कवंठ हा चवथा; पाडळीचें फळ व पुष्प हा पांचवा; पिंपळी, खजूर व नागरमोथा हा साहावा हे चतुर्थांश पाणी घालून केलेले निरनिराळे हिक्कानाशक लेह जाणावे.

हेमसात्रा.

हेममुक्तार्ककांतानांभस्मवल्लमितंवरं ॥ बीजपूररसक्षौद्रसौवर्चलसमन्वितं ॥ हंतिहिक्काशतंसत्यमेकमात्राप्रयोगतः ॥ का कथापंचहिक्कानांहरणेपुनरुच्यते ॥

अर्थ–सुवर्ण, मोतीं, ताम्र, लोहकांत या तिहींचे भस्म दोन गुंजा, माहाळुंगाचा रस, मध व पादेलोण यांच्या बरोबर एक वेळा भक्षण केले असता; शंभर उचक्यांचा नाश करील. मग पांच उचक्याच्या नाशाविषयीं काय कथा?

पिप्पल्यादिलोह.

पिपल्यामलकीद्राक्षाकोलास्थिमधुशर्करैः ॥ विडंगपौष्करैर्युक्तोलोहोहंतिसुदुर्जयां ॥ छर्दिंहिक्कांतथातृष्णांत्रिरात्रेणनसंशयः ॥

अर्थ–पिंपळी, आवळकाठी, द्राक्षे, बोराची आंठी, मध, साकर, वावडिंग व पोखरमूळ यांचे चूर्णाबरोबर लोहभस्म सेवन केले असतां; तीन दिवसांत ओकारी, उचकी, व तृषा यांचा नाश करील.

शंखचूलरस

रसाभ्रहेमभस्मानिवैक्रांतंसर्वतुल्यकं ॥ सर्वैःपंचगुणंशंखचूर्णंशुष्कंविमर्दयेत् ॥ लेहयेन्मधुनामाषचतुष्कंसानुपानकं ॥ हिक्कांपंचविधांहंतिमुमूर्षोरपितत्क्षणात् ॥

अर्थ–पारा, अभ्रक व सुवर्ण, यां तिहींचीं भस्में समभाग, आणि या तिहींचे बरोबर वैक्रांताचें भस्म; आणि या चहोंचे पांचपट शंखभस्म अशीं एकत्र खलून त्यांतून चार मासे भस्म मधाबरोबर अनुपानासहित खावें; ह्मणजे मरणोन्मुख जरी असेल तथापि त्याचा पांचप्रकारच्या हिक्कांचा त्याच क्षणीं नाश करील.

मेघडंबररस.

तंडुलीयद्रवैःपिष्टंसूततुल्यंचगंधकं ॥ वज्रमूषागतंचैवभूधरेभस्मतांव्रजेत् ॥ दशमूलकषायेणभावयेत्प्रहरद्वयं ॥ गुंजाद्वयंहरत्येषहिक्काश्वासंज्वरंकिल ॥ अनुपानेनदातव्योरसोयंमेघडंबरः ॥

अर्थ–तांदुळजाच्या रसांत पारा व गंधक समभाग घेऊन घोटावे; नंतर वज्रमूषेत घालून भूधरयंत्रानें पचन करावे; ह्मणजे भस्म होते; नंतर दशमुळांच्या काढ्यांत दोन प्रहर घोटून त्यांतून दोन गुंजा हा मेघडंबर रस द्यावा; ह्मणजे हा उचकी, श्वास व ज्वर यांचा नाश करितो.

महाहिक्कानिदान.

मर्माण्युत्पीडयंतीवसततंयाप्रवर्तते ॥
महाहिक्केतिसाज्ञेयासर्वगात्रप्रकंपनी ॥

अर्थ—जी हिक्का शरीराच्या सर्वमर्मस्थानातें पीडा करित निरंतर सर्व शरीरास कंप देऊन उत्पन्न होत्ये; तिला महती ह्मणतात.

कटुत्रिकलेह.

कटुत्रिकयवासकट्फलककारवीपौष्करैःसशृंगिभिरतिद्रुतंमधुयुतोवलेहोजयेत् ॥ सहिध्मकसनःकफश्वसनमंभसासिंधुजंप्रदत्तमापिनानने झटितिसर्वहिक्काहरं ॥

अर्थ—सुंठ, मिरीं, पिंपळी, धमासा, कायफळ, ओंवा, पुष्करमूळ व कांकडाशिंगी यांचा मध घालून लेह करून द्यावा; तो उचकी, खोकला, कफ व श्वास यांचा नाश करितो; किंवा सैंधव व पाणी यांचें नस्य द्यावें; ह्मणजे तें संपूर्ण प्रकारच्या उचकीचा नाश करितें.

असाध्यहिक्कानिदानलक्षण.

आयम्यतेहिक्कतोयस्यदेहोदृष्टिश्चोर्ध्वंताम्यतेयस्यनित्यं ॥ क्षीणोन्नद्विट्क्षौतियश्चातिमात्रंतौद्वौचांत्यौवर्जयेद्धिक्कमानौ ॥ अतिसंचितदोषस्यभक्तच्छेदकृशस्यच ॥ व्याधिभिःक्षीणदेहस्यवृद्धस्यातिव्यवायिनः ॥ आयासायाससुत्पन्नाहिक्काहंत्याशुजीवितं ॥ यमिकाचप्रलापार्तिमोहतृष्णासमन्विता ॥

अर्थ—उचकी येत असतां; ज्या मनुष्याचा देह ताणल्या सारिखा होतो, दृष्टि उर्ध्व होऊन आकुंचित होत्ये, रोगी मोह पावतो, अन्नद्वेष होतो; व शिंका बहुत येतात. इत्यादि उपद्रवयुक्त ज्या हिक्का त्या व गभीरा आणि महती या तीन ही हिक्का असाध्य जाणाव्या; व जी शरीरांत बहुत काळ राहून रोग्यास अरोचक व कृशत्व उत्पन्न करित्ये, ती व व्याधीकरून ज्याचा देह क्षीण झाला आहे, जो वृद्ध व अतिव्यवायी त्याची ही हिक्का असाध्य जाणावी; व आयासेंकरून जी उत्पन्न होत्ये ती त्वरित प्राणनाश करित्ये; व प्रलाप, पीडा, मोह, तृष्णा ईहीं करून युक्त अशी यमिका हिक्का ही प्राणनाश करत्ये, असें जाणावें.

असाध्यलक्षण.

अक्षीणश्चाप्यदीनश्चस्थिरत्वादिंद्रियश्चयः ॥
तस्यसाधयितुंशक्यायमिकाहंत्यतोन्यथा ॥

अर्थ–जो मनुष्य क्षीण व ग्लान नाही; आणि ज्याची इंद्रियें यथास्थित आहेत. त्याची यमिकासंज्ञक हिक्का साध्य जाणावी; आणि पूर्वलक्षणेंकरून रहित ती असाध्य जाणावी.

यष्ट्यादिचूर्ण.

यष्ट्याह्वंवामाक्षिकेणावलीढंकृष्णाचूर्णंशर्करादयंचकिंवा ॥
सर्पिःकोष्णंक्षीरमुष्णंरसोवाहन्यादिक्षोःपानतःपंचहिक्काः ॥

अर्थ–जेठीमध व मध; अथवा पिंपळी व साकर, अथवा कोमट तूप; अथवा कढत दूध; अथवा उसाचा रस हे पांच प्रकारचे हिक्केचे नाश करितात.

विश्वादिचूर्ण.

विश्वाशिवाकणाचूर्णःससितःसमधुःस्मृतः ॥
गुडूचीनागरंनस्यंहिक्काविकारकारकं ॥

अर्थ–सुंठ, हरीतकी व पिंपळी यांचें चूर्ण मध व साकर यांशीं द्यावें; किंवा गुळवेल व सुंठ यांचें नस्य द्यावें; तें हिक्केचा नाश करितें.

रक्तचंदनयोग.

नारीपयःपिष्टमुरक्तचंदनंकृतंसुखोष्णंचसुसैंधवंच ॥
पिष्टंतथासैंधवमंवुनावानिहंतिहिक्कांननुनावनेन ॥

अर्थ–स्त्रीचे दुग्धांत रक्तचंदन उगाळून किंचित गरम करून त्यांत सैंधव घालून द्यावें; अथवा पाण्यांत मिळवून त्याचें नस्य द्यावें; ह्मणजे उचकी नाश पावत्ये.

कृष्णाचूर्ण.

कृष्णामलकशुंठीनांचूर्णंमधुसितायुतं ॥
मुहुर्मुहुःप्रयोक्तव्यंहिक्काश्वासनिवारणं ॥

अर्थ–पिंपळी, आवळकाठी, सुंठ यांचें चूर्ण मध व साकर यांशीं वारंवार सेवन केलें असतां; उचकी व श्वास यांचें निवारण होतें

शृंग्यादिचूर्ण.

शृंगिकटुत्रिकफलत्रयकंटकारीभार्ङीसपुष्करजटालवणानिचैषां ॥
चूर्णंपिवेदशिशिरेणजलेनहिक्कांश्वासोर्ध्ववातकसनारुचिपीनसेषु ॥

अर्थ–कांकडशिंगी, सुंठ, मिरीं, पिंपळी, हरडा, बेहेडा, आवळकाठी, रिंगणी, भारंगमूळ, पोखरमूळ व सैंधव, यांचें चूर्ण ऊनपाण्याशीं द्यावें; ह्मणजे उचकी, श्वास, ऊर्ध्ववात व खोकला, अरुचि व पडसें यांचें शमन होतें.

भार्ङ्यादिचूर्ण.

हिक्काश्वासीपिबेद्भार्ङीसविश्वामुष्णवारिणा ॥
नागरंवासिताभार्ङीसौवर्चलसमन्वितं ॥

अर्थ—उचकी व श्वास जाला आहे, त्याणी भारंगमूळ व सुंठ यांचें चूर्ण ऊन पाण्या बरोबर घ्यावें; अथवा सुंठ, साकर, भारंगमूळ व पादेलोण यांचें चूर्ण खावें.

हिक्कानस्य.

हरेणुकापिप्पलिकाकषायोहिंग्वन्वितोपोहतिपंचहिक्काः ॥
नस्यंतथालक्तकसंभवंचस्तन्येनवापोहतिमाक्षिकाविट् ॥

अर्थ—निर्गुंडी अथवा कपिला व पिंपळी यांचा काढा करून तो हिंग घालून पाजावा; ह्मणजे पांच प्रकारच्या उचक्या दूर होतात; किंवा अळित्याचें नस्य द्यावें, अथवा माशीची विष्ठा स्त्रीदुधांत कालवून त्याचें नस्य द्यावें.

मधुकनस्य.

मधुकंमधुसंयुक्तंपिप्पलीशर्करान्विता ॥
नागरंगुडसंयुक्तंहिक्काघ्नंनावनत्रयं ॥

अर्थ—ज्येष्ठीमध व मध, पिंपळी व साकर, सुंठ व गुळ, हीं तीन नस्यें हिक्कानाशक आहेत.

मक्षिकानस्य.

स्तन्येनमक्षिकाविष्ठानस्येवालक्तकांबुना ॥
योज्याहिक्काभिभूतेभ्यःस्तन्यंवाचंदनान्वितं ॥

अर्थ—मक्षिकांची विष्ठा स्त्रीदुग्धाशीं किंवा अळित्याच्या पाण्याशीं कालवून नस्य करावें; किंवा स्त्रीच्या दुधांत चंदन उगाळून नस्य करावें; ह्मणजे उचकी शमते.

शिलाजितधूम.

शिलामूलस्यपानंत्रानालिकायंत्रयोगतः ॥ नेपाल्यागोविषाणाद्वाकुष्ठसर्जरसस्यवा ॥ धूमंकुशस्यवासाज्यंपिबेद्धिक्कोपशांतये ॥

अर्थ—शिलाजित व मुळा; किंवा कस्तूरी व बाभूळ; किंवा कोष्ठकोळिंजन व सर्ज-रस; किंवा दर्भ याला घृताचा योग करून त्याचा गुरगुडीनें धूर प्राशन करावा. हा उचकीचा नाश करितो.

श्वासावरोधयोग.

श्वासावरोधतोहिक्काशमयत्यतिवेगतः ॥
चूलकैर्वाजलंपीतंधृत्वाश्वासंनिवर्तते ॥

अर्थ—श्वासाचा अवरोध केल्यानें, किंवा घुळकण्यानें पाणी पिऊन श्वास धरिला असतां; अतिवेगानें उचकीचा शम होतो.

माषादिधूम.

धूमोमाषनिशारजोयुतशणत्वक्संभवोहंत्यलं ॥
श्वासोर्ध्वानिलकासरुद्गलरुजोहिध्माःसमस्ताअपि ॥

र्थ—उडीद व हळद यांचें चूर्ण आणि ताग यांचा धूर प्राशन केला असतां, श्वास, ऊर्ध्ववात, खोकला, गळरोग, आणि सर्वप्रकारची उचकी यांचा नाश होतो.

हिंग्वादिधूम.

निर्धूमांगारसंक्षिप्तहिंगुमाषरजोद्भवं ॥
हिक्काःपंचापिहंत्याशुधूमःपीतोनसंशयः ॥

अर्थ—निर्धूम अंगारावर हिंग व उडीद यांचें चूर्ण घालोन त्याचा धूर प्राशन करावा; ह्मणजे तो पांच प्रकारच्या उचकीचा नाश करितो.

हिक्कापथ्य.

स्वेदनंवमनंनस्यंधूमपानंविरेचनं ॥ निद्रास्निग्धानिचान्नानिमृदूनि लवणानिच ॥ जीर्णाःकुलित्थागोधूमाःशालयःषष्टिकायवाः ॥ एण तित्तिरलावाद्याजांगलामृगपक्षिणः ॥ उष्णोदकंमातुलिंगंमाक्षिकंसु रभिजलं ॥ पक्वकपित्थंलशुनंपटोलंबालमूलकं ॥ पौष्करंकृष्णतुल सीमदिराललदंबुच ॥ अन्नपानानिसर्वाणिवातश्लेष्महराणिच ॥ शी ताम्बुनेकःसहसात्रासोविस्मापनंभयं ॥ क्रोधोहर्षःप्रियोद्वेगःप्राणायाम निषेवणं ॥ दग्धसिक्तमृदाघ्राणंकूर्चधाराजलार्पणं ॥ नाभ्यर्धपीडनं दाहोदीप्तदग्धहरिद्रया ॥ पादयोर्द्व्यंगुलान्नाभेरूर्ध्वंचेष्टातिहिक्किनां ॥

अर्थ—ताप, ओकारी, नस्य, धूम्रपान, रेचन, निद्रा, स्निग्ध व मृदु अशीं अन्नें, लवणें, आणि जुने कुळीथ, गहूं, साळी, साठवी, यव, हीं जुनीं धान्यें; व हरिण, तित्तिर, लावे, आणि जंगलांतील मृग व पक्षी, यांचीं मांसें; ऊन पाणी, म.हाळुंग, मध, गोडे पाणी, पिकलेलें कवठ, लसूण, पडवळ, कोंवळे मुळे, पुष्करमूळ, काळी तुळस, मद्य, हलणारें उदक, आणि वातकफनाशक अशीं अन्नें व पानें, अकस्मात् थंड पाण्याचें सेवन, त्रासकारक व आश्चर्यकारक पदार्थ किंवा गोष्टी, भीति, क्रोध, हर्ष, प्रिय व उद्वेग करणारे पदार्थ, प्राणायाम, भाजलेले मातीवर पाणी शिंपून तिचा वास, किंवा कूर्च अथवा धारा याणीं जलसेचन, आणि अर्धनाभीवर जळक्या हळदीनें डाग देणें, किंवा पायांपासून दोन आंगळांवर, अथवा बेंबीचे वर दोन अंगुळांवर डाग हे प्रकार उचकीच्या रोग्याला हितकारक आहेत.

हिक्का अपथ्य.

वातमूत्रोद्गारकासशकृद्वेगविधारणं ॥ रजोनिलातपायासान्विरुद्धा न्यशनानिच ॥ विष्टंभीनिविदाहीनिरूक्षाणिकफदानिच ॥ निष्पाव माषपिण्याकवारिजानूपमामिषं ॥ अविदुग्धंदंतकाष्ठंबस्तिमत्स्यांश्च सर्षपान् ॥ आम्लंतुंबीफलंकंदंतैलभृष्टमुपोदिकां ॥ गुरुशीतंचान्न पानंहिक्कारोगीविवर्जयेत् ॥

अर्थ—वायु, मूत्र, ढेंकर, खोकला व शौच यांच्या वेगाचें धारण व धूलि, वायु, निवर, आयास, विरुद्धान्न, विष्टंभकारक, विदाही, रूक्ष, कफकारक अशा पदार्थांचे सेवन व पावटे, उडीद, पिंड, उदकांतील व जलस्थलवासी प्राण्याचीं मांसे, शेळीचें दूध, दंतकाष्ठ, बस्तिकर्म, मासे, मोहऱ्या, आम्लरस, पांढरा भोंपळा, कंद, तेलांत तळलेले पदार्थ, मयाळ, आणि जड व थंड, अशीं अन्नें व पानें, असे सर्व पदार्थ उचकीच्या रोग्यानें वर्ज्य करावे.

श्वासकर्मविपाक.

कृतघ्नोजायतेमर्त्यःकफवान्श्वासकासवान् ॥ उष्णज्वरीचनित्यंहिपित्त रोगसमन्वितः ॥ चांद्रायणत्रयंकुर्यात्पंचाशद्विप्रभोजनं ॥ विष्णोर्ना मजपंकुर्यात्तथाचैवद्विजोत्तमान् ॥ पूजयेद्भोजयेद्दद्यात्तन्मनानान्यमानसः ॥

अर्थ—जो कृतघ्नपणा करितो, तो कफ, श्वास, खोकला, उष्णज्वर आणि पित्तरोग यांनीं पीडित होतो, त्याणें तीन चांद्रायण प्रायश्चित्तें करून ५० ब्राह्मण जेऊं घालावे. विष्णुच्या नामाचा जप करून ब्राह्मणाची पूजा करून त्याला भोजन घालावें व दान द्यावें.

दुसरा प्रकार.

कुरुक्षेत्रादिदेशेषुकालेषुग्रहणादिषु ॥ महादानानिगृण्हीयान्निषिद्धा न्यथवास्वयं ॥ अपात्रभूतोदातृभ्योनिषिद्धेभ्यश्चमानवः ॥ सपामा श्वासकासैश्चकुक्षिस्थकृमिभिस्तथा ॥ कंडूत्याचैवपीड्येततद्रोगस्यप्र शांतये ॥ महिषींयमदैवत्यांदद्याद्वित्तानुसारतः ॥ काम्यंयद्दीयते दानंतत्समग्रंसुखावहं ॥ असमग्रंतुदोषायभवतीहपरत्रच ॥ जपेन्ना रायणस्याथनाम्नांचैवसहस्रकं ॥ हिरण्यंरक्तवासांसिपंचाशद्विप्रभोज नं ॥ सहस्रकलशस्नानंप्रकुर्याद्रोगशांतये ॥

अर्थ—जो कोणी कुरुक्षेत्रादि पुण्यदेशामध्ये ग्रहणादि पुण्यकाळीं, निषिद्धपुरुषापासून आपण दान घेण्यास योग्य नसतां; व तें दान ही योग्य नसतां घेतो; तो खञ्ज, श्वास, कास, कुक्षिरोग, कृमि व कंडू यांणीं पीडित होतो. तच्छमनार्थ, यमदेवताक महिषीचें दान करावें. जें काम्यकर्म करावें ते संपूर्ण झालें असतां; सुख देतें; आणि अर्धे राहिलें तर दुःख होतें; व इहलोकीं आणि परलोकीं पातक लागतें. त्याणें विष्णुसहस्रनामाचा जप करावा; अथवा सुवर्ण, रक्तवस्त्रदान करावें; व ५० ब्राह्मण भोजन घालावें; किंवा सहस्र कलशांनीं स्नान करावें, तेणें करून रोग शांत होतो.

तिसरा प्रकार.

पिशुनोनरकस्यांतेजायतेश्वासकासवान् ॥
घृतंतेनप्रदातव्यंसहस्रपलसंख्यया ॥

अर्थ—पिशुन पुरुष नरकाचे अंतीं श्वासकासरोगी होतो, त्याणें चारशें तोळे घृतदान करावें.

श्वासनिदान.

महोर्ध्वच्छिन्नतमकक्षुद्रभेदैश्चपंचधा ॥
भिद्यतेसमहाव्याधिःश्वासएकोविशेषतः ॥

अर्थ—श्वास हा व्याधि मोठा कठीण असतां; तो महान्, ऊर्ध्व, छिन्न, तमक व क्षुद्र या भेदानीं पांच प्रकारचा होतो.

प्राग्रूप.

प्राग्रूपंतस्यहृत्पीडाशूलमाध्मानमेवच ॥
आनाहोवक्त्रवैरस्यंशंखनिस्तोदएवच ॥

अर्थ—हृदयांत पीडा, पोटांत शूल, पोटफुगणें व दोन्हीं कुशी बांधिल्या सारिख्या होणें, तोंडाची चव जाणें व शंखास व्यथा होणें इत्यादि श्वासाचीं पूर्वरूपें जाणावीं.

संप्राप्ति.

यदास्रोतांसिसंरुध्यमारुतःकफपूर्वकः ॥
विष्वग्व्रजतिसंक्रुद्धस्तदाश्वासंकरोतिच ॥

अर्थ—वायु कफाला साहाय्य होऊन सर्व शिरांना रोधून आपण ही कोंडल्या सारिखा होतो, तो नंतर आसमंताद्भागीं फिरत फिरत कुपित होऊन श्वास उत्पन्न करितो, असें जाणावें.

सामान्यचिकित्सा.

यत्किंचित्कफवातघ्नमुष्णंवातानुलोमनं ॥ भेषजंपानमन्नंवा

हिक्काश्वासेषुतद्धितं ॥ हिक्काश्वासातुरेपूर्वंतैलाक्तेस्वेदइष्य
ते ॥ ऊर्ध्वाधःशोधनंवन्हेर्दुर्बलेशमनंमतं ॥

अर्थ–जे काहीं कफवातघ्न, उष्ण, वायूला अनुलोमन करणारें असें औषध, पान व अन्न तें हिक्का व कास यांवर योजावें; किंवा उचकी व श्वास हे रोग जाला आहेत, त्याला पूर्वी अंगाला तैल लाऊन घाम काढावा; आणि वमन व अग्निदीपक क्रिया करावी.

दुसरा प्रकार.

स्नेहवस्तिमृतेकेचिदूर्ध्वंचाधश्चशोधनं ॥ मृदुप्राणवतांश्रेष्ठंश्वासि
नामादिशंतिहि ॥ सर्वेषुश्वासरोगेषुवातश्लेष्मनिवर्हणं ॥ विदधी
तविधिंविद्वानादौस्वेदंमृदुंतथा ॥

अर्थ–स्नेह व बस्तिकर्म, यांवाचून ऊर्ध्वाधःशोधन, वांति व रेच इत्यादिक; आणि वातश्लेष्मनाशक औषधें व मृदु स्वेद हीं श्वासरोग्याला चिकित्सा करावी.

महाश्वासलक्षण.

उद्धूयमानवातोयःशब्दवद्दुखितोनरः ॥ उच्चैःश्वसितिसंरुद्धमत्तर्ष
भइवानिशं ॥ प्रनष्टज्ञानविज्ञानस्तब्धोविभ्रांतलोचनः ॥ निवृत्ता
क्ष्याननोबद्धमूत्रवर्चाविशीर्णवाक् ॥ दीर्घप्रश्वसितंचास्यदूराद्विज्ञा
यतेभृशं ॥ महाश्वासोपसृष्टस्तुक्षिप्रमेवविपद्यते ॥

अर्थ–ज्याचा श्वास वर येऊन सशब्द, मोठ्या दुःखानें व मातलेल्या बैलासारिखा रात्रंदिवस उच्चस्वरानें सोडितो; आणि त्याचे ज्ञान व स्मृति हीं नष्ट होतात; व डोळे स्तब्ध असून फिरल्यासारिखे उघडलेले असे राहतात. तोंड वासतें; आणि मळ मूत्र बंद होतात; शब्द बोलवत नाहीं, बोलला तर कष्टानें हळू बोलतो; व त्याचा दीर्घ श्वास दूरुन ऐकूं येतो: अशा महाश्वासानें पीडितरोगी लौकर मरण पावतो.

शृंग्यादिचूर्ण.

शृंगीकटुत्रिकफलत्रयकंटकारीभार्गीपुष्करजटालवणानिपंच ॥
चूर्णंपिबेदशिशिरेणजलेनहिक्काश्वासोर्ध्ववातकसनारुचिपुप्रशस्तं ॥

अर्थ–कांकडशिंगी, सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, रिंगणी, भारंगमूळ, पोखरमूळ, जटामांसी, सैंधव, पादेलोण, बिडलोण, काचलोण व मीठ यांचे चूर्ण ऊन पाण्याबरोबर प्यावें; ह्मणजे तें हिक्का, श्वास, ऊर्ध्ववात, खोकला व अरुचि यांचा नाश करील.

शुंठ्यादिचूर्ण.

शुंठीकणामरिचनागदलंत्वगेलाचूर्णकृतंक्रमविवर्धितमूर्ध्वमंत्यात् ॥

खादेदिदंसमसितंगुदजाग्निमांद्यकासारुचिश्वसनकंठहृदामयेषु ॥

अर्थ–सुंठ ६, पिंपळी ५, मिरें ४, विड्याचीं पानें ३, दालचिनी २ व वेलदोडा १, याप्रमाणे घेऊन चूर्ण करून बरोबरीनें साकर घालून खाल्लें असतां; मुळव्याध, अग्निमांद्य, खोकला, अरुचि, श्वास, कंठरोग व हृद्रोग यांवर प्रशस्त आहे.

मर्कटीचूर्ण.

मर्कटीनांतुबीजानांचूर्णंमाक्षिकसर्पिषा ॥

प्रलिह्यात्प्रातरुत्थायश्वासार्तःस्वास्थ्यमाप्नुयात् ॥

अर्थ–कुइलीच्या बियांचें चूर्ण प्रातःकाळीं मध व तूप यां बरोबर चाटावें; ह्मणजे श्वासानें पीडित असेल तो स्वस्थ होईल.

शठ्यादिचूर्ण.

शठीभार्ङ्गीवचाव्योषपथ्यारुचककट्फलं ॥

नैजोव्हापौष्करंशृंगीसक्षौद्रंश्वासकासहृत् ॥

अर्थ–कचोरा, भारंगमूळ, वेखंड, सुंठ, मिरीं, पिंपळी, बाळहर्डी, पादेलोण, कायफळ, तेजबळ, पुष्करमूळ व काकडशृंगी यांचें चूर्ण मधाशीं घेतलें असतां; श्वासकासांचा नाश करितें.

गुडादिलेह.

गुडोपणानिशारास्नाद्राक्षामागधिकाःसमाः ॥

तैलेनचूर्णितालीढास्तीव्रश्वासनुदःस्मृताः ॥

अर्थ–गुळ, मिरीं, हळद, रास्ना, मनुका व पिंपळी यांचे समभाग चूर्ण तेलाशीं सेवन केलें, ह्मणजे तीव्र अशा श्वासाचा नाश करितें.

भार्ङ्यादिचूर्ण.

भार्ङ्गीनागरयोश्चूर्णंलीढमार्द्रकवारिणा ॥

श्वासंनिहंतिदुर्धर्षंपंचाननइवद्विपं ॥

अर्थ–भारंगमूळ व सुंठ यांचें चूर्ण आल्याच्या रसाशीं सेवन करावें; ह्मणजे मोठ्या कठीण ही श्वासाचा नाश करितें. जसा सिंह हत्तीचा नाश करितो तसा.

ऊर्ध्वश्वासनिदान.

ऊर्ध्वंश्वसितियोत्यर्थंनचप्रत्याहरत्यधः ॥ श्लेष्मावृतमुखस्रोताःक्रुद्ध गंधवहार्दितः ॥ ऊर्ध्वदृष्टिर्विपश्यंश्चविभ्रांताक्षइतस्ततः ॥ प्रमुह्यन्वेदनार्तश्चशुष्कास्योरतिपीडितः ॥

अर्थ–वायु कुपित होऊन त्याणें मुख व श्वास वाहक मार्ग कफानें बंद होतात, तेणेंकरून श्वास वर ओढतो, खालीं आणवत नाहीं; आणि चंचलदृष्टीनें ऊर्ध्वभागीं इकडे तिकडे पाहतो, मोह पावतो, तोंड सुकतें; व चैन पडत नाहीं. हीं ऊर्ध्वश्वासाचीं लक्षणें जाणावीं.

श्वास खाली न येण्याचें कारण.

ऊर्ध्वश्वासेप्रकुपितेह्यधःश्वासोनिरुध्यते ॥

मुह्यतस्ताम्यतश्चोर्ध्वश्वासस्तस्यैवहंत्यसून् ॥

अर्थ–ऊर्ध्वश्वास कोपला असतां; श्वास खालीं उतरत नाहीं कोंडून राहतो. त्या रोग्याला ग्लानि व मोह हे होतात, असा श्वास रोग्याचा प्राण घेतो.

दुल्हरीचूर्ण.

दुल्हरीसैंधवंमांसीलवणंचसुवर्चलं ॥ त्रिकटुब्रह्मदंडीचत्रि

फलैरंडमूलिका ॥ पीतमुष्णांभसाकासमूर्ध्वश्वासंनिवारये

त् ॥ बिडादिलवणंसर्वंमासंश्लक्ष्णंविचूर्णितं ॥

अर्थ–दुल्हरी, सैंधव, जटामांसी, मीठ, पादेलोण, सुंठ, मिरीं, पिंपळी, ब्रह्मदंडी, हरडा, बेहडा, आवळकाठी व एरंडमूळ यांचें चूर्ण किंवा बिडादिसंपूर्ण लवणें एक महिना पर्यंत बारीक घोटून तें चूर्ण ऊन पाण्याशीं द्यावें; ह्मणजे खोकला, आणि ऊर्ध्वश्वास यांचा नाश करितें

शुंठ्यादिचूर्ण.

शुंठीदारुकणाचूर्णंपीतमुष्णांभसासमं ॥

ऊर्ध्वश्वासहरंकिंवाशुंठीपिप्पलिचूर्णकं ॥

अर्थ–सुंठ, देवदार व पिंपळी यांचें किंवा सुंठ व पिंपळी यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं द्यावें; ह्मणजे ऊर्ध्वश्वासाचा नाश करितो.

शिलाद्यवलेह.

शिलाहिंगुविडंगंचमरिचंकुष्ठसैंधवं ॥

मध्वाज्याभ्यांलिहेत्कर्षंश्वासकासकफापहं ॥

अर्थ–शिलाजित, हिंग, वावडिंग, मिरीं, कोष्ट व सैंधव यांचें चूर्ण मध व तूप यांशीं एक कर्ष द्यावें; ह्मणजे श्वास, खोकला व कफ यांचा नाश करितें.

विडंगादिचूर्ण.

विडंगंपिप्पलीचैलात्वचंचप्रतिकर्षकं ॥ द्विकर्षमरिचंचूर्णंनागरंचच

तुःपलं ॥ सर्वैस्तुल्यासितायोज्याकर्षमात्रंचभक्षयेत् ॥ श्वासकासज्व

रप्लीहपांडुरोगज्वरापहं ॥

अर्थ—वावडिंग, पिंपळी, एला व दालचिनी, हीं प्रत्येकीं एकेक तोळा; मिरीं २ तोळे व सुंठ १६ तोळे या सर्वांच्या चूर्णासमान साकर घालोन तें १ तोळा भक्षण करावें; ह्मणजे श्वास, खोकला, ज्वर, प्लीहा व पांडुरोग यांचा नाश करितें.

दाडिमादिचूर्ण.

दाडिमंनागरंहिंगुकृष्णाचलवणंसमं ॥
आम्लवेतससंयुक्तंश्वासहृद्रोगजिद्भवेत् ॥

अर्थ—डाळिंबें, सुंठ, हिंग, पिंपळी, मीठ, आणि आम्लवेतस हे समभाग घेऊन त्यांचें चूर्ण करून द्यावें; ह्मणजे दमा, खोकला व हृद्रोग यांचा नाश करितें.

विडंगादिचूर्ण.

विडंगपिप्पलीहिंगुसाजिसैंधवनागरं ॥ रास्नयाचसमंचूर्णंकपमद्या द्भृतप्लुतं ॥ कफश्वासहरंख्यातंविडंगादिचनामकं ॥

अर्थ—वावडिंग, पिंपळी, हिंग, ओंवा, सैंधव, सुंठ आणि रास्ना यांचें समभाग चूर्ण करून तें एक तोळा चूर्ण तुपाशीं द्यावें; ह्मणजे कफ व श्वास यांचा नाश करितें. याला विडंगादिचूर्ण ह्मणतात.

आर्द्रकस्वरस.

एकएवार्द्रकरसःसमधुश्वासकासजित् ॥
रतिवल्लभचांपेयचापचारुकलेवरे ॥

अर्थ—हे स्त्रिये एकटा आल्याचा रस मध घालोन द्यावा; ह्मणजे श्वास व खोकला यांचा नाश करितो.

अक्षकवल.

रावणस्यसुतोहन्यान्मुखवारिजधारितः ॥
श्वसनंकसनंवापितमिवानलनंदनः ॥

अर्थ—बेहडा तोंडांत धरिला असतां; श्वास व खोकला यांचा नाश करितो.

आटरूपरस.

आटरूपरसोगव्यनवनीतेनपान्वितः ॥
तेनत्रिफलजंचूर्णंभक्षितंश्वासवारकं ॥

अर्थ—अडुळशाचा रस व गाईचें लोणी एकत्र कढवून त्यांतून त्रिफळयाचें चूर्ण द्यावें; तें श्वासाचे निवारण करितें.

छिन्नश्वासनिदान.

यस्तुश्वसितिविच्छिन्नंसर्वप्राणैर्निपीडितः ॥ नवाश्वसितिदुःखार्तोमर्म

भेदरुजार्दितः ॥ अनाहस्वेदमूर्छार्तोदह्यमानेनवस्तिना ॥ विप्लुताक्षः परिक्षीणःश्वसन्रक्तैकलोचनः ॥ विचेताःपरिशुष्कास्योविवर्णःप्रलपन्नरः ॥ छिन्नश्वासेनविच्छिन्नःसशीघ्रंविजहात्यसून् ॥

अर्थ–छिन्नश्वासाचे ठायीं राहून राहून अथवा मध्यें तुटलेला असा श्वास होतो, सर्व इंद्रियांस पीडा होत्ये, अथवा पंच प्राणास पीडा होत्ये, पोट फुगणें, स्वेद व मूर्छा इहीं-करून रोगी पीडित होतो; आणि बस्तींत आग जळत्ये. तेणेंकरून पीडित होतो. नेत्र उदकानें भरून येतात, अत्यंत क्षीण होतो, श्वासोश्वासेंकरून नेत्र आरक्त होतात, उदासपणा येतो, तोंड शुष्क होतं, निस्तेजपणा येतो; व रोगी प्रलाप करितो. याप्रकारें विछिन्नश्वासानें व्याप्त जो रोगी तो त्वरित प्राणातें सोडितो असें जाणावें.

तमकश्वासलक्षण.

प्रतिलोमंयदावायुःस्रोतांसिप्रतिपद्यते ॥ ग्रीवांशिरश्चसंगृह्यश्लेष्माणंसमुदीर्यच ॥ करोतिपीनसंतेनरुद्धोघुर्घुरकंतथा ॥ अतीवतीव्रवेगंचश्वासंप्राणप्रपीडकं ॥ प्रताम्यतिसवेगेनत्रस्यतेसन्निरुध्यते ॥ प्रमोहंकासमानश्चसगच्छतिमुहुर्मुहुः ॥ श्लेष्मणामुच्यमानेनभृशंभवतिदुःखितः ॥ तस्यैवचविमोक्षांतेमुहूर्तंलभतेसुखं ॥ तथास्योध्वंसतेकंठःकृच्छ्राच्छक्नोतिभाषितुं ॥ नचापिलभतेनिद्रांशयानःश्वासपीडितः ॥ पार्श्वेतस्यावगृण्हातिशयानस्यसमीरणः ॥ आसीनोलभतेसौख्यमुष्णंचैवाभिनंदति ॥ उच्छ्रिताक्षोललाटेनस्विद्यताभृशमार्तिमान् ॥ विशुष्कास्योवहुश्वासोमुहुश्चैवावधम्यते ॥ मेघांबुशीतप्राग्वातैःश्लेष्मलैश्चविवर्धते ॥ सयाप्यःस्तमकश्वासःसाध्योवास्यान्नवोत्थितः ॥

अर्थ–जाकाळीं वायु विपरितपणें करून शिरातें व्यापितो. त्याकाळीं ग्रीवा व मस्तक यांचें ग्रहण करून कफाला कोपवितो; नंतर त्या कफेंकरून तो रुद्ध होऊन पडसें उत्पन्न करितो, पुनः पडशाशीं व्याप्त होऊन कंठाचे ठाईं घुरघुर शब्द उत्पन्न करून तीव्र वेगयुक्त व प्राणस्थानातें पीडा देणारा जसा श्वास उत्पन्न करितो, त्या श्वासेंकरून रोगी मोह, श्वास व प्राणनिरोध यातें पावतो; आणि कदाचित मोठ्या दुःखानें कफ सुटून पडला असतां; क्षणभर रोगी सुख पावतो; आणि पुनः कफ संचित झाला असतां; कंठास कंडू उत्पन्न करितो. रोगी मोठ्या क्लेशेंकरून भाषण करितो. झोंप येत नाहीं. निजला असतां श्वासपीडा अधिक होत्ये. दोन्ही कुशी वायूनें ओढिल्यासारिख्या होतात, बसला असतां सुख होतें; व उष्ण उष्ण प्रिय वाटतें. याचें कारण या तमकाचे ठायीं

वातकफात्मक प्रकृति असते; यास्तव डोळ्यांचीं पोटें उचल्यासारिखीं होतात. कपाळाला घाम येतो; व पीडा फार. तोंड शुष्क होतें; आणि वारंवार आस्यावरला श्वास होतो. तेणेंकरून हनोवट व कवाडासारिखा वारंवार डोलतो; व मेघोदक, शीत, पूर्वदिशेचा वायु व कफकारक पदार्थ यांच्या संबंधानें हा तमक अधीक वाढतो. हा याप्य जाणावा. हा नवोत्पन्न असतां; कदाचित साध्य हि होतो असें जाणावें.

प्रतमकनिदान.

ज्वरमूर्छापरीतस्यविंद्यात्प्रतमकंतुतं ॥ उदावर्तरजोजीर्णक्लि
न्नकायनिरोधजः ॥ तमसावर्धतेत्यर्थंशीतैश्चाशुप्रताम्याति ॥
मज्जतस्तमसीवास्यविंद्यात्प्रतमकंनुतं ॥

अर्थ–तमकाला पित्त, मूर्छा, अथवा ज्वर यांचा संबंध असतां; त्याला प्रतमक ह्मणतात. हा प्रतमक उदावर्त धूळि. विदग्धाजीर्ण व मूत्रपुरीषादिवेगनिरोध यांहीं. करून उत्पन्न होतो, मानसिक तमोगुणायोगेंकरून वृद्ध होतो; आणि शीतपदार्थसंबंधेंकरून शांत होतो असे जाणावें. यामुळें रोग्याला अंधकारांत गेल्यासारिखें वाटतें.

सठ्यादि चूर्ण.

सठीपुष्करजीवंतीत्वङ्मुस्तंपुष्कराव्हयं ॥ सुरसातामलक्येला
पिप्पल्यागरुनागरं ॥ वालुकंचसमंचूर्णंकृत्वाद्विगुणशर्क
रं ॥ सर्वंवातमकश्वासेहिक्कायांचप्रयोजयेत् ॥

अर्थ–कचारा, कमळकांद, नाकडवेल, दालचिनी, नागरमोथा, पुष्करमूळ, तुळस, भुयआवळी, एलची, पिंपळी, कृष्णागरु, सुंठ व भिमसेनी कापूर हा समानभाग चूर्णें घेऊन सर्व चूर्णांच्या दुप्पट साकर घालावी. हे चूर्ण वहूत करून तमकश्वास व उचकी यांवर योजावें.

व्याघ्रीजीरकादिगुटिका.

व्याघ्रीजीरकधात्रीणांचूर्णंमधुयुतंलिहेत् ॥
ऊर्ध्ववातमहाश्वासतमकैर्मुच्यतेक्षणात् ॥

अर्थ–रिंगणी, जिरें व आवळकाठी या तीन औषधांचें चूर्ण करून मधांत घेतलें असतां; ऊर्ध्ववायु, महाश्वास व तमकश्वास हे रोग क्षणांत दूर होतात.

क्षुद्रावलेह.

व्याघ्रीशतंस्यादभयाशतंचद्रोणेजलस्यप्रपचेत्कपायं ॥ तुलाप्रमाणेन
गुडेनयुक्तंपक्त्वाभयानिःसृतताभिरत्र ॥ शीतेक्षिपेत्पणमधुनःपलानि
पलानिचत्रीणिकटुत्रयस्य ॥ त्वक्पत्रकैलाकरिकेसराणांचूर्णात्पलंचे

तिविदेहदृष्टः ॥ क्षुद्रावलेहःकफजान्विकारान्सश्वासशोपानपिपंचकासान् ॥ हिक्कामुरोरोगमपस्मृतिंचहत्वाविवृद्धिंकुरुतेनलस्य ॥

अर्थ–रिंगणी व हरीतकी हीं प्रत्येकीं १०० तोळे १०२४ तोळे पाण्यांत घालून काढा करून गाळून त्यांत ४०० तोळे गुळ घालून पुनः ते शिजलेले हिरडे त्यांत घालून पक्क करावें. तें थंड झाल्यावर त्यांत २४ तोळे मध, आणि सुंठ, मिरीं, पिंपळी हीं प्रत्येकीं ४ तोळे, दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, नागकेशर हीं प्रत्येकीं १ तोळा, याप्रमाणें घालून लेह करावा. याला क्षुद्रावलेह ह्मणतात. हा विदेहनामक कोणी होता त्याणे हा प्रथम पाहिला. हा कफविकार, श्वास, शोष, कास, हिक्का, उरोरोग व अपस्मार, यांचा नाशक आणि अग्निदीपक आहे.

कंटकार्यावलेह श्वासकासावर.

कंटकारीतुलांनीरद्रोणेपक्त्वाकषायकं ॥ पादशेषंगृहीत्वाचतस्मिंश्चूर्णानिदापयेत् ॥ पृथक्पलानिचैतानिगुडूचीचव्यचित्रकाः ॥ मुस्तंकर्कटशृंगीचत्र्यूषणंधन्वयासकः ॥ भार्ङीरास्नासठीचैवशर्करापलविंशतिः ॥ प्रत्येकंचपलान्यष्टौप्रदद्याद्घृततैलयोः ॥ पक्त्वालेहत्वमानीयशीतेमधु पलाष्टकं ॥ चतुःपलंतुगाक्षीर्याःपिप्पलीनांचतुःपलं ॥ क्षिप्त्वानिदध्याद्दृढेमृन्मयेभाजनेशुभे ॥ लेहोयंहंतिहिक्कार्तिश्वासकासानशेषतः ॥

अर्थ–रिंगणी एक तुळा प्रमाण वजन घेऊन थोडी कुटून त्यांत पाणी १ द्रोण प्रमाण घालून चवथाई पाणी राही तोंपर्यंत काढा करून गाळून घ्यावा; नंतर गुळवेल, चवक, चित्रक, नागरमोथे, काकडशिंगी, सुंठ, मिरीं, पिंपळी, धमासा, भारंगमूळ, रास्ना व कचोरा हीं बारा औषधें पळ पळ प्रमाण घेऊन चूर्ण करून त्या काढ्यांत घालावीं. साकर वीसपळें, तूप आठ पळें व शिरसेल तेल आठ पळें हीं सारीं काढ्यांत घालून शिजून कढवून लेह करून थंड झाल्यावर त्यांत मध आठ पळें घालून मग वंशलोचन ४ पळें व पिंपळी चार पळें यांचें चूर्ण त्या अवलेहांत मिळवून चांगलें बळकट मडकें घेऊन त्यांत तो अवलेह ठेवून मग तो अवलेह नित्य घेत जावा, तेणेकरून उचकी न सारे श्वास व कासरोग दूर होतात.

क्षुद्रश्वासनिदान.

रूक्षायासोद्भवःकोष्ठेक्षुद्रोवातमुदीरयेत् ॥ क्षुद्रश्वासेनयोत्यर्थदुःखेनांगप्रबाधकः ॥ हिनस्तिनसगात्राणिनचदुःखंयथेतरे ॥ नचभोजनपानानिनिरुणध्युचितांगतिं ॥ नेंद्रियाणांव्यथांवापिकांचिदापादये

ह्रुजं ॥ ससाध्यउक्तोबलिनःसर्वोवाव्यक्तलक्षणः ॥ क्षुद्रःसाध्यत मस्तेषांतमकःक्षुद्रउच्यते ॥

अर्थ–रुक्षान्न व आयास यांपासून उत्पन्न झालेला क्षुद्रश्वास कोठाचे ठायीं वायु उत्पन्न करितो. हा क्षुद्रश्वास फार दुःख देत नाहीं; व प्राणवियोग ही करीत नाहीं. जसे इतर दुःख देतात तसा हा देत नाहीं. अन्नपानादिकांचा निरोध करीत नाहीं. इंद्रियांस व्यथा देत नाहीं. हा क्षुद्रश्वास बलवंत पुरुषांचा साध्य जाणावा; आणि बलवंत पुरुषांचे सर्व श्वास अल्प लक्षण असतां;साध्य जाणावे. सर्वांमध्ये क्षुद्रश्वास पुरुषांचा सुसाध्य जाणावा.

असाध्यलक्षण.

त्रयःश्वासानसिध्यंतितमकोदुर्बलस्यच ॥ कामंप्राणहरारो गाश्चहवोनतुतेतथा ॥ यथाश्वासश्चहिक्काचहरतःप्राणमाशुच ॥

अर्थ–सर्वलक्षणेकरून युक्त जे महोर्ध्वादिक तीन श्वास ते असाध्य जाणावे; आणि दुर्बल रोग्याचा तमक हा असाध्य जाणावा; जसे श्वास व हिक्का हे त्वरित प्राणनाश करितात, तसे इतर संनिपातादिक त्वरित प्राणहरण करीत नाहींत.

सामान्य उपचार.

श्वासहिक्कातुरंप्रायःस्निग्धैःस्वेदैरुपाचरेत् ॥ युक्तैर्लवणतैला भ्यांतैरस्यग्रथितःकफः ॥ श्वासोविलयमायातिमारुतश्चोपशा म्यति ॥ स्निग्धंज्ञात्वाततश्चैनंभोजयेच्चरसौदनं ॥

अर्थ–श्वास व उचकी यांणी आतुर झालेल्या मनुष्यास सैंधव व तेल यांहीं स्निग्ध असा घाम काढण्याचा उपचार करावा. तेणेकरून त्या मनुष्याचा गोठलेला कफ पातळ होऊन श्वासाचा नाश होतो; आणि वायु शमतो; नंतर तो मनुष्य स्निग्ध झाला हे जाणून पातळ भात भोजनात घालावा.

शृंगवेररस.

स्वरसंशृंगवेरस्यमाक्षिकेणसमन्वितं ॥
पाययेच्छ्वासकासघ्नंप्रतिश्यायकफापहं ॥

अर्थ–आल्याचा रस मध घालोन प्राशन करावा; ह्मणजे श्वास, कास, पडसें व कफ, यांचा नाश होतो.

बिभीतकावलेह

प्रस्थंविभीतकानामास्थिविनामाथयेद्गोमूत्रे ॥
अयमेवलेहोर्लीढोमधुमाहितःश्वासकासघ्नः ॥

अर्थ—एकशेर बेहडेदळ शेळीच्या मुतांत पचन करावें; आणि त्याचें चूर्ण मधाशीं चाटीत गेले असतां; श्वास व कास हे नाश पावतात.

द्राक्षाद्यवलेह.

द्राक्षांहरीतकींमुस्तांकर्कटाख्यांदुरालभां ॥
सर्पिर्मधुभ्यांविलिहन्श्वासान्हंतिसुदारुणान् ॥

अर्थ—मनुका, हिरडा, नागरमोथा, कांकडशिंगी व धमासा यांचा लेह, मध व तूप घालोन करावा, तो खाल्ला असतां; मोठा भयंकर श्वास दूर करील.

दशमूलाद्यवागू.

दशमूलींसठींरास्नापिप्पलींविश्वपौष्करैः ॥ शृंगीतामलकी भार्ङ्गीगुडूचीनागराग्निभिः ॥ यवागूंविधिनासिद्धांकषायंवा पिबेन्नरः ॥ श्वासत्द्द्ग्रहपार्श्वार्तिहिक्काकासप्रशांतये ॥

अर्थ—दशमूळ, कचोरा, रास्ना, पिंपळी, सुंठ, एरंडमूळ, कांकडशिंगी, भूयआवळी, भारंगमूळ, गुळवेल, सुंठ व चित्रक या औषधांनीं सिद्ध केलेली कांजी,प्राशन करावीं; अथवा काढा करून प्याला,ह्मणजे श्वास, ह्रदयव्यथा, पार्श्वपीडा, उचकी व खोकला यांची शांति होये.

दशमूलकाढा.

दशमूलस्यवाक्काथःपौष्करेणावचूर्णितः ॥
श्वासकासप्रशमनःपार्श्वशूलविनाशनः ॥

अर्थ—दशमुळांचा काढा करून त्यात एरंडमुळांचें चूर्ण घालोन प्राशन केलें असतां; श्वास, कास व पार्श्वशूल हे नाश पावतात.

रंभादिकुसुमपान.

रंभाकुंदशिरीषाणांकुसुमंपिप्पलीयुतं ॥
पिष्ट्वातंदुलतोयेनपीत्वाश्वासमपोहति ॥

अर्थ—केळीचें फूल, कुंदाचें फूल व शिरसाचें फूल हीं तिन्हीं पुष्पें पिंपळी घालोन तांदुळांच्या धुवणाशीं वांटावीं; आणि प्राशन करावीं, ह्मणजे श्वास नाश पावतो.

कटुतैलेनसंयुक्तोगुडोयावन्नसेवितः ॥
तावन्नश्यतिकिंश्वासःपीयूषमधुराधरे ॥

अर्थ—शिरसाचें तेल, आणि गूळ जोंपर्यंत सेवन केला नाहीं तोंपर्यंत हे अमृत तुल्य मधुरओठे श्वास नष्ट होईल कीं काय?

शृंग्यादि चूर्ण.

शृंगीमहौषधकणाघनपुष्कराणांचूर्णंशठीमरिचयोश्वसिताविमिश्रं ॥
क्वाथेनपीतममृतावृषपंचमूल्याःश्वासंत्र्यहेणविनिहंतिहिघोररूपं ॥

अर्थ—काकडशिंगी, सुंठ, पिंपळी, नागरमोथा, एरंडमूळ, कचोरा व मिरीं यांचे चूर्ण समभाग करून गुळवेल, अडुळसा व पंचमूळ यांचा काढा करून त्या काढ्यांत चूर्ण व साकर घालून प्राशन केला असतां, मोठा घोररूप श्वास तीन दिवसांत नाहींसा होतो.

शुंठ्यादि काढा.

अयिप्राणप्रियेजातिफललोहितलोचने ॥
शुंठीभार्ङ्गीकृतःक्वाथःश्वासनाशायपाययेत् ॥

अर्थ—हे प्राणप्रिये श्वास जाण्याकरितां सुंठ व भारंगमूळ यांचा काढा पाजावा.

पंचमूलीयोग.

पंचमूलीतुसामान्यापित्तेयोज्याकनीयसी ॥
महतीमारुतेदेयासेवदेयाकफाधिके ॥

अर्थ—सामान्यतः लघुपंचमूळ पित्तश्वासावर द्यावें; आणि बृहत्पंचमूळ वातश्वास व कफश्वास यांवर द्यावें.

कूष्मांडशिफाचूर्ण.

कूष्मांडकशिफाचूर्णंपीतंकोष्णेनवारिणा ॥
शीघ्रंशमयतिश्वासंकासंचापिसुदारुणं ॥

अर्थ—कोहळ्याच्या मुळाचें चूर्ण कोमट पाण्याशीं प्राशन केलें असतां; दारुण ही श्वास व कास शीघ्र शमतात.

हरिद्राद्यवलेह.

हरिद्रामरिचंद्राक्षांकणांरास्नांशठींगुडं ॥
कटुतैलेनलिहन्हन्याच्छ्वासान्प्राणहरानपि ॥

अर्थ—हळद, मिरें, द्राक्षें, पिंपळी, रास्ना, सुंठ व गूळ यांचें चूर्ण मोहऱ्यांच्या तेलाशीं चाटिलें असतां; प्राणाचा नाशकारक जरी श्वास असला तरी त्याचा नाश होतो.

भार्ङ्गीगुड.

शतंसंगृह्यभार्ङ्ग्यास्तुदशमूल्यास्तथाशतं ॥ शतंहरीतकीनांचपचेत्तोये चतुर्गुणे ॥ पादावशेषेतस्मिंस्तुरसेवस्त्रनिपीडिते ॥ आलोड्यचतुलां

पूतांगुडस्याप्यभयांततः ॥ पुनःपचेत्तुमृद्वग्नौयावल्लेहत्वमेतितत् ॥ शीतेचमधुनस्तत्रपट्पलानिविनिःक्षिपेत् ॥ त्रिकटुत्रिसुगंधंचपलमात्रंपृथक्पृथक् ॥ यवक्षारंकर्षयुग्मंसंचूर्ण्यप्रक्षिपेत्ततः ॥ भक्षयेदभयामेकांलेहस्यार्धपलंतथा ॥ श्वासंसुदारुणंहंतिकासंपंचविधंतथा ॥ अर्शांस्यरोचकंगुल्मंशकृद्भेदंक्षयंतथा ॥ स्वरवर्णप्रदोद्दीपनजठराग्नेःप्रदीपनः ॥ नाम्नाभार्ङ्गीगुडःख्यातोभिषग्भिःसकलैर्मतः ॥

अर्थ-भारंगमूळ, दशमुळें व हरीतकी, हीं प्रत्येकीं १०० तोळे घेऊन १२०० तोळे पाण्यांत टाकून कढवावीं. चतुर्थांश काढा उरला ह्मणजे गाळून घेऊन त्यांत ४०० तोळे गूळ व ते शिजलेले हिरडे टाकून पुनः मंदाग्नीवर जोंपर्यंत दाट होई तोंपर्यंत शिजवावें. थंड झाल्यावर त्यांत २४ तोळे मध आणि सुंठ, मिरें, पिंपळी, दालचिनी, वेलदोडे व तमालपत्र हीं प्रत्येकी ४ तोळे व जवखाराचें चूर्ण २ तोळे, याप्रमाणे टाकून ढवळावें; ह्मणजे लेह सिद्ध झाला, यांतून दोन तोळे लेह, आणि त्यांतला एक हरडा नित्य प्रातःकाळीं खावा; ह्मणजे मोठा भयंकर श्वास, पांच प्रकारचा खोकला, मुळव्याध, अरुचि, गुल्म, अतिसार व क्षय यांचा नाश करील; आणि स्वर व वर्ण निट करणारा, व अग्निदीपक असा आहे. ह्याला भार्ङ्गीगुड असें ह्मणतात. हा सर्व वैद्यांस मान्य आहे.

द्राक्षादिकाढा.

द्राक्षामृतानागरमुष्णतोयंकृष्णाविपाकंबहुरोगनिघ्नं ॥
श्वासंचशूलंकसनंचमांद्यंजीर्णज्वरंचैवजयेच्चतृष्णां ॥

अर्थ-द्राक्षें, गुळवेल व सुंठ यांच्या काढ्यांत पिंपळीचें चूर्ण घालोन द्यावा; ह्मणजे श्वास शूळ, खोकला, अग्निमांद्य, जीर्णज्वर; आणि ताहान यांचा नाश करितो.

कुलित्थादिकाढा.

कुलित्थनागरव्याघ्रीवासाभिःक्वथितंजलं ॥
पीतंपौष्करसंयुक्तंश्वासकासनिवारणं ॥

अर्थ-कुळिथ, सुंठ, रिंगणी, अडुळसा, आणि पुष्करमूळ यांचा काढा प्राशन केला असतां; श्वास व कास यांचें निवारण करितो.

देवदार्व्यादिकाढा.

देवदारुवचाव्याघ्रीविश्वकट्फलपौष्करैः ॥
कृतःक्वाथोजयत्याशुश्वासकासावशेषतः ॥

अर्थ-देवदार, वेखंड, रिंगणी, सुंठ, कायफळ आणि पुष्करमूळ यांचा काढा द्यावा; ह्मणजे दमा व खोकला यांचें शीघ्र निवारण करितो.

सिंव्ह्यादिकाढा.

सिंव्ह्योनिशासिंहमुखीगुडूचीविश्वोपकुल्याभृगुजाघनानां ॥
कृष्णामरीचैर्मिलितःकषायःश्वासाटवीदाहपयोदएषः ॥

अर्थ–रिंगणी, हळद, अडुळसा, गुळवेल, सुंठ, पिंपळी, भारंगमूळ व नागरमोथे यांचा काढा करून त्यांत पिंपळी व मिऱ्ये यांचे चूर्ण घालून द्यावा; हा श्वासरूप अरण्याग्नीला मेघासारिखा शांत करितो.

वासादिकाढा.

वासाहरिद्रामगधागुडूचीभार्ङ्गीघनानागररिंगणीनां ॥
क्वाथेनमारिच्यकणान्वितेनश्वासःशमंयातिनकस्यपुंसः ॥

अर्थ–अडुळसा, हळद, पिंपळी, गुळवेल, भारंगमूळ, नागरमोथे, सुंठ व रिंगणी यांचा काढा मिऱ्यांचें चूर्ण घालून द्यावा; ह्मणजे कोणत्या पुरुषाचा श्वास शांत होणार नाही.

भार्ङ्यादिलेह.

प्रलिह्यान्मधुसर्पिर्भ्यांभार्ङ्गीमधुकसंयुतां ॥
पथ्यांतिक्ताकणाव्योपयुक्तांवाश्वासनाशनीं ॥

अर्थ–भारंगमूळ, ज्येष्ठीमध, हरीतकी, पिंपळी, कुटकी, सुंठ, मिरीं व पिंपळी यांचें चूर्ण मध व तूप यांतून द्यावें; ह्मणजे श्वासाचा नाश करितें.

गुडाद्यवलेह.

गुडदाडिममृद्वीकापिप्पलीविश्वभेषजैः ॥
मातुलिंगरसक्षौद्रंलीढंश्वासनिवर्हणं ॥

अर्थ–गूळ, डाळिंब, द्राक्षें, पिंपळी व सुंठ यांचें चूर्ण माहळुंगाच्या रसांतून द्यावें; ह्मणजे श्वासाचा नाश करितें.

वासाद्यवलेह.

वासातुलामष्टगुणेचनीरेविपाच्यतांपादजलेनसार्कं ॥ क्षुण्णाढकंतद्विप चेच्छिवानांखंडाप्रयोज्यासकलस्यतुल्या ॥ ततःसमुत्तार्यपलानिचाष्टौ क्षौद्रस्यचद्वेकिलवंशजायाः ॥ क्षिपेत्तथामागधिकापलार्धंपलंचतुर्जात भवंप्रयोज्यं ॥ योज्यंपलार्धंश्वसनेचकासेक्षयेस्रपित्तेकफपीनसेच ॥ हृद्रोगकार्श्येकिलविद्रधौचउरःक्षतेशोणितवांतिकोपे ॥

अर्थ–अडुळसा ४०० तोळे व ३२०० तोळे पाणी घेऊन त्यांत चतुर्थांश काढा

करून त्यांत हरीतकीचूर्ण २५६ तोळे घालून पुनः पचन करावा. दाट झाला ह्मणजे उतरून शीत झाल्यावर मध ३२ तोळे, वंशलोचन ८ तोळे, पिंपळी २ तोळे व चातुर्जात ४ तोळे घालून त्यांतून दोन तोळे घेत जावा; ह्मणजे श्वास, कास, क्षय, रक्तपित्त, कफ, पडसे, हृद्रोग, कृशता, विद्रधी, उरःक्षत, आणि रक्ताची वांति यांचा नाश करितो.

सितादिचूर्ण.

सिताद्राक्षाकणाचूर्णसमांशंतैलपाचितं ॥
भक्षितंदारुणंश्वासंनिवर्तयतिवेगतः ॥

अर्थ—साखर, द्राक्षें व पिंपळी यांचे समभाग चूर्ण तैलांत पचन करावें. ते भक्षण केलें असतां; अतिदारुणश्वासाचा वेगानें नाश होतो.

शिलाद्यवलेह.

शिलाव्योपभयाहिंगुमणिमंथविडंगकैः ॥
लेहःसाज्यमधुःकासहिक्काश्वासेपुशस्यते ॥

अर्थ—मनशीळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, हरीतकी, हिंग, सैंधव, आणि वावडिंग यांचा लेह मध व तूप यांतून द्यावा, हा श्वास व खोकला यांवर प्रशस्त आहे.

राजिकादिगुटी.

राजिकाक्षीरिकंदश्चचपलाचरसोनकं ॥ ऊपणातिविषादेवकुसुमंचविचूर्णितं ॥ मार्कवार्ककुमारीभिर्निर्गुंडीमुंडिचित्रकैः ॥
भावयित्वापृथक्सर्वैःश्वासकासनिकृंतनं ॥

अर्थ—मोहऱ्या, पांढरा भुयकोहळा, पिंपळी, लसूण, मिरीं, अतिविष व लवंग यांचे चूर्ण एकत्र करून त्याला माक्याचा रस, रुईचा चीक, कोरफड, निर्गुंड, मुंडी व चित्रक यांच्या प्रत्येकाच्या भावना द्याव्या, ह्या गोळ्या श्वास व खोकला यांचा नाश करितात.

सूर्यावर्तरस.

सूतार्धंवलिमेकयाममभितःकृत्वारसेमर्दयेत्तत्द्वंद्वेनसमंतुशुल्वजलदंलिप्त्वाघटीयंत्रकैः ॥ पक्त्वैकाहमथाहरेन्निगदितोवह्नोन्मितःश्वासजित्सूर्यावर्तरसोथगंधमरिचैःसाज्यःकफश्वासजित् ॥

अर्थ—पारा १ भाग व गंधक ॥ भाग हीं एक प्रहर घोटून त्यांच्या समान ताम्र घालून नागरमोथ्याने लिंपून घटीयंत्राने एक दिवस पचऊन काढून एक वाल गंधक, मिरीं व तूप यांजबरोबर द्यावा; ह्मणजे कफश्वास नाश पावतो.

अमृतार्णवरस.

पारदंगंधकंशुद्धंमृतंलोहंचटंकणं ॥ रास्नाविडंगत्रिफलादेव दारुकटुत्रयं ॥ अमृतापद्मकंक्षौद्रंविषंतुल्यंसचूर्णितं ॥ त्रिगुंजंश्वासकासार्तंसेवयेदमृतार्णवं ॥

अर्थ—पारा, गंधक, लोहभस्म, टाकणखार, रास्ना, वावडिंग, हरडा, बेहडा, आवळकाठी, देवदार, सुंठ, मिरीं, पिंपळी, गुळवेल, पद्मकाष्ठ, मध व बचनाग या सर्वांचें चूर्ण एकत्र करून तें तीन गुंजा श्वास व खोकला यांणीं पीडित मनुष्याला द्यावें, ह्याला अमृतार्णवरस ह्मणतात.

श्वासहेमाद्रिरस.

आच्छादितांशिलांताम्रेद्विगुणंवालुकाव्हये ॥ पक्त्वासंचूर्ण्यं गंधेशौदिनार्धंतांपुनःपचेत् ॥ श्वासहेमाद्रिनामायंमहाश्वासविनाशनः ॥ वर्णवृद्धिकरोह्येषसौवर्ण्यश्चनसंशयः ॥

अर्थ—मनशीळ तांब्याच्या करंड्यांत भरून वालुकायंत्रांत पचवावा; नंतर करंड्यासुद्धा चूर्ण करून त्यांत पारद व गंधक यांची कज्जली देऊन पुनः अर्धादिवस पचन करावा, हा श्वासहेमाद्रिनामा रस, माहाश्वासाचा नाश करितो.

उदयभास्कर.

धान्याभ्रंसूतकंगंधंश्वेतापामार्गजद्रवैः ॥ तुल्यांशंमर्दयेच्चायःपात्रेपाचनकंपचेत् ॥ ऊर्ध्वलग्नंततोग्राह्यंरसोह्युदयभास्करः ॥ श्वासंपंचविधंहंतिगुंजाद्वयानुपानतः ॥ निष्कैकंलेहयेच्चानुक्षौद्रेणकटुरोहिणीं ॥

अर्थ—धान्याभ्रक घेऊन त्यांत गंधक व पारा अभ्रकाच्या समान घालोन पांढऱ्या आघाड्याच्या रसांत त्याचा खल करावा; नंतर डमरूयंत्रांत घालोन अग्नि द्यावा; ह्मणजे वरचे भांड्यात लागलेला पारा काढून घ्यावा, ह्याला उदयभास्कर ह्मणतात. हा २ गुंजा अनुपानाशीं द्यावा. वर मध व कुटकीचें चूर्ण द्यावें; ह्मणजे ५ प्रकारच्या श्वासाचा नाश होतो

श्वासकालेश्वर.

मृतंवंगंमृतंलोहंमृतार्कंमृतमभ्रकं ॥ शुद्धसूतंतथागंधंमाक्षिकंहिंगुलंविषं ॥ जातीफलंलवंगंचत्वगेलानागकेसरं ॥ उन्मत्तकस्यबीजानिजैपालंरात्रिदुर्लभं ॥ एतानिसमभागानिमरिचंहरनेत्रयोः ॥ सर्वंतद्याक्षिपेत्खल्वेलोहदंडेनमर्दयेत् ॥ तावच्चूर्णीकृतंधीमान्यावत्सूतानेदृश्यते॥शक्रासनस्यस्वरसेर्भावनाएकविंशतिः ॥ द्विगुंजाउत्तमामा

त्राआर्द्रकस्वरसैर्युता॥तदर्धंवालवृद्धेषुपथ्यंदेयंतदुच्यते॥ पंचश्वासान्क्षयंकासंराजयक्ष्मनिवारणं॥श्वासकालेश्वरोनामलोकानामपिदुर्लभः॥

अर्थ–लोहभस्म, ताम्रभस्म, अभ्रकभस्म, शुद्ध पारा, शुद्ध गंधक, सुवर्णमाक्षिक, हिंगुळ, बचनाग, जायफळ, लवंगा, दालचिनी, एलची, नाकेशर, धोतऱ्याचें बी, जेपाळ, हळद व कचोरा हीं समभाग; व मिरीं ३ भाग या प्रमाणें सर्व खलांत घालोन लोखंडाच्या बत्यानें पारा मिळून जाईपर्यंत घोटून कुडयाच्या स्वरसांत २१ भावना द्याव्या. त्यांतून २ गुंजा आल्याच्या रसाशीं सशक्ताला द्यावा; आणि बाल व वृद्ध यानां १ गुंज द्यावा; आणि पथ्य करावें; ह्मणजे ५ प्रकारचे श्वास, क्षय, खोकला, राजयक्ष्मा, यांचा नाश करितो. हा श्वासकालेश्वरनामक रस देवानां ही दुर्लभ आहे.

पारदादिगुटी.

पारदंगंधकंनागंताम्रंव्योपानलैःसमं॥ सर्जरसेनसंचूर्ण्यप्रदेयाभावनादश॥ पुनःपत्ररसेसम्यक्ऋचार्द्रकस्यरसैस्तथा॥ मिरिप्रमाणाकफजित्कार्यासागुटिकोत्तमा॥ मंदाग्निकफरोगेषु श्वासकासेविशेषतः॥आध्मानप्रतिपन्नार्तप्रदेयासुखकारिणी॥

अर्थ–पारद, गंधक, नाग, ताम्र, सुंठ, मिरीं, पिंपळी, चित्रक, आणि सर्जरस यांचें समभाग चूर्ण करून पानवेलीच्या रसांत त्यास १० भावना द्याव्या; व आल्याच्या रसाच्या १० भावना द्याव्या; आणि मिऱ्यां प्रमाणें गोळ्या कराव्या. ती मंदाग्नि, कफरोग, श्वास, कास, आणि पोटाची फुगवटी यावर द्यावी; ह्मणजे सुखदायक होत्ये.

लवंगादिगुटी.

लवंगमरिचेतुल्येत्रिफलारसभाविते॥
वब्बूलत्वक्कषायाकार्यागुटीश्वासकफापहा॥

अर्थ–लवंग, मिरीं व त्रिफला यांचें चूर्ण समभाग एकत्र करून त्याची बाभळीच्या सालीच्या काढयांत गोळी करावी. ती श्वास व कफ यांचा नाश करित्ये.

दुसरा प्रकार.

लवंगत्रिकटूनागभृंगीक्षुद्राविभीतकैः॥
कन्यारसेनगुटिकाकार्याश्वासनिवारिणी॥

अर्थ–लवंगा, सुंठ, मिरीं, पिंपळी, बचनाग, काका, रिंगणी व बेहेडा यांचे समभाग चूर्ण एकत्र करून कोरफडाच्या रसांत घोटून गोळ्या कराव्या. त्यांतून एकेक द्यावी; ह्मणजे श्वासाचा नाश करित्ये.

त्रिकटुवटी.

त्रिकटुटंकणंनागपत्रेणक्रियतेवटी ॥
मिरीप्रमाणाकफजिन्नाम्नात्रिपुरभैरवी ॥

अर्थ–हरडा, बेहेडा, आवळकाठी व टाकणखार यांचें चूर्ण समभाग घेऊन एकत्र करून त्याला विड्याच्या पानाच्या रसांत घोटून गोळी मिऱ्या एवढी करावी. ती त्रिपुरभैरवी कफाचा नाश करिते.

फलत्रयगुटी.

फलत्रयंनागरदारुकृष्णाविषानपावेल्लसुवर्णबीजैः ॥
दिनत्रयंभृंगरसैर्विमर्चकार्यागुटीश्वासकफापहारिणी ॥

अर्थ–हरडा, बेहेडा, आवळकाठी, सुंठ, देवदार, पिंपळी, बचनाग, वाळा, मिरीं व धोत्र्याचें बीं हीं माक्याच्या रसांत घोटून गोळी करावी. ही श्वास, कफ यांचानाश करिते.

स्नुहीदुग्धयोग.

वल्लयुग्मंस्नुहीदुग्धंगुडयुक्तंनिषेवणात् ॥
कासःश्वासःक्षयरोगोत्हृद्रोगश्चप्रणश्यति ॥

अर्थ–दोन वाल निवडुंगाचें दूध घेऊन गुळाशीं खावें; ह्मणजे खोकला, श्वास, क्षय, आणि त्हृद्रोग हे नाश पावतात.

श्वासकुठार.

रसोगंधोविषंचापिटंकणंचमनःशिला ॥ एतानिकर्षमात्राणिमरिचं चाष्टकर्षकं ॥ कटुत्रयंकर्षयुग्मंपृथगत्रविनिःक्षिपेत् ॥ रसःश्वासकुठारोयंसर्वश्वासनिवारणः ॥

अर्थ–पारा, गंधक, बचनाग, टाकणखार व मनशीळ हीं एकेक तोळा, मिरीं ८ तोळे, सुंठ, मिरीं व पिंपळी हीं २ तोळे यांचें चूर्ण एकत्र करून खल करावा; ह्मणजे हा श्वासकुठार संपूर्ण श्वासरोगांचा नाश करितो,

दुसरा प्रकार.

रसंगंधंविषंचैवटंकणंचमनःशिला ॥ एतानिटंकमात्राणिमरिचंचाष्ट टंककं ॥ एकैकंमरिचंदत्वाखल्वेसूक्ष्मंविमर्दयेत् ॥ त्रिकटुटंकषट्कं चदत्वापश्चाद्विचूर्णयेत् ॥ सर्वमेकत्रसंयोज्यकाचकूप्यांविनिःक्षिपेत् ॥ श्वासेकासेचमंदाग्नौवातश्लेष्मामयेषुच ॥ गुंजामात्रंप्रदातव्यंपर्णखं

डेनधीमता ॥ सन्निपातेचमूर्छायामपस्मारेतथापुनः ॥ अतिमोहत्व
मापन्नेनस्यंदद्याद्विचक्षणः ॥ रसःश्वासकुठारोयंसर्वश्वासगदप्रणुत् ॥

अर्थ–पारा, गंधक, बचनाग, टाकणखार व मनशीळ हीं एकेक तोळा, मिऱ्यें ८ तोळे, सुंठ, मिरीं व पिंपळी, हीं प्रत्येकीं दोन तोळे घेऊन त्यांचीं वस्त्रगाळ बारीक चूर्णें करून एकत्र खल करून काचकुपींत भरून ठेवावा; आणि श्वास, कास, मंदाग्नि, वातश्लेष्मसंबंधी रोग, यांवर विड्याचे पानाशीं एक गुंज द्यावा; व संन्निपात, मूर्छा,अपस्मार व अतिमोह पावलेल्या रोग्यांस याचें नस्य द्यावें. हा श्वासकुठार संपूर्ण श्वासरोगाचा नाश करितो.

मरीच्यादिगुटिका कासादिकावर.

मरिचंकर्षमात्रंस्यात्पिप्पलीकर्षसंमिता ॥ अर्धकर्षोयवक्षारःकर्षयु
ग्मंचदाडिमं ॥ एतच्चूर्णीकृतंयुंज्यादष्टकर्षगुडेनहि ॥ शाणप्रमाणां
गुटिकांकृत्वावक्त्रेविधारयेत् ॥अस्याःप्रभावात्सर्वेपिकासायांत्येवसंक्षयं॥

अर्थ–मिऱ्यें एक कर्ष, पिंपळी एक कर्ष, जवखार अर्धा कर्ष, डाळिंबसाल २ कर्ष, यां चार औषधांचें चूर्ण करून आठ कर्ष गूळ घेऊन त्यांत तें टाकून गोळ्या शाणप्रमाण कराव्या; आणि गोळी मुखांत धरावी. तेणेंकरून सारे कास दूर होतात, या विषयीं संशय नाहीं.

श्वासेपथ्य.

विरेचनंस्वेदनधूम्रपानप्रच्छर्दनानिस्वपनंदिवाच ॥ पुरातनाःषष्टिक
रक्तशालिकुलित्थगोधूमयवाःप्रशस्ताः ॥ शशाहिभुक्तित्तिरिलाव
दक्षःशुकादयोधन्वमृगाद्विजाश्च ॥ पुरातनंसर्पिरजाप्रभूतंपयोघृतंवा
पिसुरामधूनि ॥ पटोलवार्ताकरसानिबींजिवींरतिंदूलीयवास्तुकंच ॥
द्राक्षात्रुटिःपौष्करमुष्णवारिकटुत्रयंगोजनितंचमूत्रं ॥ अन्नानिपाना
निचभेषजानिश्लेष्मानिलघ्नानिचपथ्यवर्गः ॥

अर्थ–विरेचन, स्वेदन, धूम्रपान, वांति, दिवानिद्रा व जुन्या साठकी साळी, कुळिथ, गहूं, यव, आणि ससा, मोर, तित्तिर, लावा, चाष, शुक, धन्वदेशांतील मृग, पक्षी, आणि शेळीचें जुनें तूप, दूध, मद्य, मध, आणि पडवळ, वांगें, लसुण, तोंडली, जांबीर, तांदुळजा, चारोळी, द्राक्षें, बारीक वेला, पुष्करमूळ, उष्णोदक, त्रिकटु, गोमूत्र, आणि कफवातनाशक अन्न,पान व औषध,असा हा श्वासरोग्याला पथ्यवर्ग सांगितला.

अपथ्य.

रक्तस्रावंपूर्ववातान्नपानंमेषींसर्पिर्दुग्धमंमोपिदुष्टं ॥ मत्स्याःकंदाःस

पंपाश्चान्नपानंरूक्षंशीतंगुर्वपिश्वासिवर्ज्यं ॥ मूत्रोद्गारच्छर्दितृट्श्वास रोधोनस्यंवस्तिर्दंतकाष्ठंश्रमंच ॥

अर्थ–रक्त काढणें, पूर्वेचा वायु, पूर्वेचें अन्न, पान व शेळीचें दूध, तूप व विघडलेलें पाणी, मांसें, कंद, मोहऱ्या, रुक्ष व जड अन्न व पान हे पदार्थ श्वासरोग्यानें वर्ज्य करावे.

दंभ.

कक्षप्रदेशादपिपार्श्वयुग्मेकरस्ययोर्मध्यमयोर्धयोश्च ॥
प्रदीप्तलोहेनचकंठकूपेदाहोपिचश्वासिनिदंभउक्तः ॥

अर्थ–काखेपासून खाली समूर बाहूचे अर्धप्रदेशाचे समाराने दोहों बाजूस विरखुडी वर लोह तापवून डाग द्यावा; किंवा गळयाच्या खळगींत डाग द्यावा.

अथ स्वरभेदनिदान.

अत्युच्चभाषणविषाध्ययनाभिघातसंदूषणैःप्रकुपिताःपवनादयस्तु ॥
स्रोतःस्सुतेस्वरवहेषुगताःप्रतिष्ठांहन्युःस्वरंभवतिचापिहिषड्विधःसः ॥

अर्थ–अत्युच्चभाषण, विष, अत्युच्चस्वरें करून अध्ययन व कंठाच्या ठायीं लाकुडादि कांचा अभिघात इत्यादि कारणांनीं वातादि दोष कुपित होऊन स्वरवाहिनीशिरांप्रत जाउन त्यानां दुष्ट करितात; आणि स्वराचा नाश करतात तो स्वरभेद साहा प्रकारचा. ते प्रकार वात, पित्त, कफ, सन्निपात, क्षय, मेद, यांणीं होतात असे जाणावे.

चिकित्साप्रक्रिया.

वातेसलवणंतैलंपित्तेसर्पिःसमाक्षिकं ॥
कफेसक्षारकटुकंक्षौद्रंक्रैवलमिष्यते ॥

अर्थ–वातस्वरभेदावर क्षार व तेल; आणि पित्तस्वरभेदावर तूप व मध; आणि कफ स्वरभेदावर क्षार व त्रिकट रस व मध असे उपचार योजावे.

गलेतालुनिजिव्हायांदंतमूलेषुचाश्रितः ॥
तेननिष्क्रमतेश्लेष्मास्वरश्चाशुप्रसीदति ॥

अर्थ–कफ, गळा, टाळू, जिभ, दंतमूल, यांचा आश्रय करून राहातो. तो वरल्या औषधांनीं निघून गेला असतां; स्वर स्वच्छ होतो.

स्वरभेदसामान्यचिकित्सा.

वातादिजनितश्वासकासघ्नायेप्रकीर्तिताः ॥
योगास्तानत्रयुंजीतयथादोषंचिकित्सकः ॥

अर्थ–वातादिक दोषांपासून झालेल्या स्वरभेदावर वातादिजनित श्वासकासांवरचे उपचार योजावे.

स्वरोपघातेमेदोजेकफवद्विधिरिष्यते ॥
क्षयजेसर्वजेवापिप्रत्याख्यायचरेत्क्रियां ॥

अर्थ मेदापासून झालेल्या स्वरभेदावर कफजनितस्वरभेदावरचे उपचार करावे; आणि क्षयज व त्रिदोषज स्वरभेद असाध्य समजून; नतर त्यांवर योग्य क्रिया करावी.

वातिकस्वरभेदनिदान.

वातेनकृष्णनयनाननमूत्रवर्चोभिन्नंशनैर्वदतिगर्दभवत्स्वरंच ॥

अर्थ–वातेंकरून स्वरभेद झाला असतां; रोग्याचे नेत्र, मुख, पुरीष व मूत्र हीं कृष्णवर्ण होतात; आणि गर्दभाचे स्वरासारिखा स्वर सावकाशीनें कंठांतून काढितो.

मरीचघृतपान.

स्वरोपघातेनिलजेभुक्त्वोपरिघृतंपिबेत् ॥
मरीचचूर्णसहितंमरुत्स्वरहतिप्रणुत् ॥

अर्थ–वायुपासून झालेल्या स्वरभेदावर जेवण झाल्यावर तूप व मिरपुड खावी; ह्मणजे वातस्वरभेद दूर होईल.

घृतगुडौदन.

आद्येकोष्णजलंपेयंजग्ध्वाघृतगुडौदनं ॥
पीतंघृतंहंत्यनिलंसिद्धंमार्कवजेरसे ॥

अर्थ–तूपभातांत गूळ घालोन खावा, वर ऊन पाणी प्यावें; ह्मणजे वातापासून झालेला स्वरभेद नीट होतो. तसेंच माक्याचा रस व तूप एकत्र करून रस आटवून तें तूप प्यावें; ह्मणजे वातानें बिघडलेला स्वर नीट होतो.

कासमर्दादिघृत.

कासमर्दरसंदत्वाभार्ङ्गीकल्कंशनैःशनैः ॥
सिद्धंसर्पिर्हितंपीतंस्वरभेदंमरुद्भवम् ॥

अर्थ–कासविंद्याचा रस, आणि भारंगमुळाचे चूर्ण, यांणी मंदाग्नीवर सिद्ध केलेले तूप प्यालें असतां; वातोत्पन्न स्वरभेदावर प्रशस्त आहे.

व्याघ्रीघृत.

व्याघ्रीस्वरसविपक्कैरास्नावाट्यालगोक्षुरैःसिद्धं ॥
सर्पिःस्वरोपघातंहन्यात्कासंचपंचविधं ॥

अर्थ—रिंगणीचा स्वरस, रास्ना, चिकणा व गोखरू यांचा कल्क; किंवा काढा यांत सिद्ध केलेलें तूप स्वरभंग व ५ प्रकारचा खोकला यांचा नाश करितो.

पैत्तिकस्वरभेदनिदान.

पित्तेनपीतनयनाननमूत्रवर्चोब्रूयाद्गलेनसचदाहसमन्वितेन ॥

अर्थ—पैत्तिक स्वरभेदामध्यें नेत्र, मुख, मूत्र व विष्ठा इत्यादि पीत वर्ण होतात; आणि बोलत्येवेळीं गळा दाहयुक्त होतो.

सामान्यचिकित्सा.

पैत्तिकेतुविरेकःस्यात्पयश्चमधुरैःशृतं ॥
लिह्यान्मधुरवस्तूनांचूर्णंमधुसमन्वितं ॥

अर्थ—पैत्तिकस्वरभेदावर रेचन द्यावें, साकर किंवा दुसरे मधुर पदार्थ घालून तापलेले दूध अथवा गोडपदार्थांचे चूर्ण मधाबरोबर सेवनार्थ द्यावें.

ज्येष्ठीमधकाढा.

अश्नीयाच्चससर्पिष्कंयष्टीमधुकषायकं ॥

अर्थ—पैत्तिकस्वरभेदावर जेष्ठीमधाचा काढा तूप घालून प्यावा.

पयःपान.

शर्करामधुमिश्राणिशृतानिमधुरैःसह ॥
पिबेत्पयांसियस्योच्चैर्वदतोपिहतःस्वरः ॥

अर्थ—मोठ्यानें बोलोन ज्याचा स्वरभेद झाला त्यानें साकर, मध यांणीं मिश्रित, आणि कांहीं गोड पदार्थ घालोन तापलेलीं अशीं दुधें प्यावीं.

शतावरीचूर्ण.

शतावरीचूर्णयोगंबलाचूर्णमथापिवा ॥
लाजाशतावरीचूर्णंलिह्यान्मधुसितायुतं ॥

अर्थ—शतावरी व चिकणा यांचें चूर्ण अथवा लाह्या व शतावरी यांचें चूर्ण मध साकर यांचे बरोबर खावें; ह्मणजे पित्तस्वरभेद स्वच्छ होतो.

शुंठीघृत

शुंठीत्वचोदुग्धवतांद्रुमाणांसंपिष्यदुग्धेविपचेत्तुतेन ॥
कल्केनयष्टीमधुकस्यसर्पिःसशर्करंपित्तरुजामयघ्नं ॥

अर्थ—सुंठ व दालचीनी, यांचें चूर्ण, वड इत्यादिक जे क्षीरीवृक्ष यांचे दुधांत शिजवून तूपसाखरेबरोबर खावें; अथवा जेष्ठीमधाचे चूर्ण तूपसाखरेबरोबर खावें; तें पित्तापासून झालेल्या स्वरभेदाचें नाशक आहे.

पित्तस्वरभेद.

कासमर्दकवार्ताकमार्कवैःस्वरसैर्युतं ॥
क्षीरानुपानंपैत्तेपुपिबेत्सर्पिरतंद्रितः ॥

अर्थ—कासविंदा, वांगें व माका यांचा अंगरस तूप घालोन प्यावा, वर दूध प्यावें; ह्मणजे पित्तापासून झालेला स्वरभेद नीट होतो.

कफस्वरभेदनिदान.

ब्रूयात्स्वनेनसततंकफरुद्धकंठःस्वल्पंशनैर्वदतिचापिदिवाविशेषात् ॥

अर्थ—कफजनितस्वरभेदामध्यें निरंतर कफानें गळा रोधलेला असतो, या करितां हळू व सावकाश भाषण करितो; परंतु कफ दिवसास मंद असतो, या करितां दिवसास भाषणानें सुख होतें; व रात्री फार क्लेश होतात.

पिप्पलीयोग.

पिप्पलीपिप्पलीमूलंमरिचंविश्वभेषजं ॥
पिबेन्मूत्रेणमतिमान्कफजेस्वरसंक्षये ॥

अर्थ—पिंपळी, पिंपळमूळ, मिरें व सुंठ, यांचें चूर्ण गोमूत्रांत घालून प्यावें; ह्मणजे कफापासून बिघडलेला स्वर नीट होतो.

आम्लवेतसादिचूर्ण.

चव्याम्लवेतसकटुत्रयतिंतिडीकंतालीसजीरकतुगादहनैःसमांशैः ॥
चूर्णंगुडप्रमुदितंत्रिसुगंधियुक्तंवैस्वर्यपीनसकफारुचिषुप्रशस्तं ॥

अर्थ—चवक, आम्लवेतस, सुंठ, मिरें, पिंपळी, आंबसोल, तालीसपत्र, जिरें, वंशलोचन, चित्रक, दालचिनी, तमालपत्र व वेलदोडे यांचें चूर्ण गुळाबरोबर खावें; ह्मणजे स्वरभेद, पीनस, कफ व अरुचि यांवर प्रशस्त आहे.

गंडूष.

आर्द्रकस्वरसेपितंसैंधवंचकटुत्रिकैः ॥
बीजपूररसैःसार्धंगंडूपःकफकेसरी ॥

अर्थ—आल्याचा रस, सैंधव, त्रिकटु, माहाळुंगाचा रस यांचा गंडूष ह्मणजे चुळ भरून टांकणे हें कफगजाला सिंव्हासारिखें नाश करणारें आहे.

कटुकादिकाढा.

कटुकातिविपापाठादारुमुस्तकालिंगकाः ॥
गोमूत्रक्कथिताःपेयाःकंठरोगविनाशनाः ॥

अर्थ—कटुकी, अतिविष, पाहाडमूळ, दारुहळद, नागरमोथे व इंद्रजव हीं गोमूत्रांत कढवून प्यावीं; ह्मणजे तीं कंठरोगनाशक आहेत.

सन्निपातस्वरभेदनिदान.

सर्वात्मकेभवतिसर्वविकारसंपत्तंचाप्यसाध्यमृपयःस्वरभेदमाहुः ॥

अर्थ—सन्निपातस्वरभेद पूर्वोक्त सर्व लक्षणेंकरून युक्त असतो, त्यालाच ऋषि असाध्य ह्मणतात

अजमोदादिचूर्ण.

अजमोदांनिशांधात्रींक्षारंवन्हिंविचूर्णयेत् ॥
मधुसर्पिर्युतंलीढ्वात्रिदोषस्वरभंगनुत् ॥

अर्थ—अजमोदा, हळद, आवळकाठी, जवखार व चित्रक यांचें चूर्ण मध व तूप यांचे बरोबर चाटावें; तें त्रिदोषापासून झालेल्या स्वरभेदाचा नाश करील.

फलत्रिकचूर्ण.

फलत्रिकत्र्यूपणयावशूकचूर्णानिहन्युःस्वरभंगमाशु ॥
किंवाकुलित्थंवदनांतरस्थंस्वरामयंहंत्यथपौष्करंवा ॥

अर्थ—त्रिफळा, त्रिकटु व जवखार यांचें चूर्ण अथवा कुळिथ, अथवा पोखरमूळ हीं स्वरभेदाचीं नाशक आहेत.

निदिग्धिकावलेह.

निदिग्धिकातुलाग्राह्यातदर्धंग्रंथिकस्यतु ॥ तदर्धंचित्रकस्यापिदशमूलंचतत्समं ॥ जलद्रोणद्वयेक्काथ्यंगृण्हीयादाढकंततः ॥ पूतेक्षिपेत्तदर्धंतुपुराणस्यगुडस्यच ॥ सर्वमेकत्रकृत्वानुलेहवत्साधुसाधयेत् ॥ अष्टौपलानिपिप्पल्यास्त्रिजातकपलंतथा ॥ मरिचस्यपलंचैकंसर्वमेक

त्रचूर्णितं ॥ मधुनःकुडवंदत्वातदश्नीयाद्यथानलं ॥ निदिग्धिकावलें ह्योयंमिपग्भिर्मुनिभिर्मतः ॥ स्वरभेदहरोमुख्यःप्रतिश्यायहरस्तथा ॥ कासश्वासाग्निमांद्यादीन्गुल्ममेहगलामयान् ॥ अनाहंमूत्रकृच्छ्राणिह न्याद्ग्रंथ्यर्बुदानिच ॥

अर्थ–रिंगणी ४०० तोळे, पिंपळमूळ २०० तोळे, चित्रक १०० तोळे व दशमुळें १०० तोळे, याप्रमाणे घेऊन २०२८ तोळे पाण्यांत कढवून २९६ तोळे पाणी उरलें ह्मणजे गाळून घेऊन त्यांत १२८तोळे जुना गुळ घालावा; आणि पुनः मंदाग्नीवर ढवळून दाट लेहाप्रमाणे करावें; नंतर ३२ तोळे पिंपळी, आणि दालचिनी, वेलदोडें, तमालपत्र, मिळून ४ तोळे; मिरें ४ तोळे, इतके टाकून नंतर १६ तोळे मध घालावा; आणि कालवून यथाशक्ति खावें. ह्याला निदिग्धिकावलेह असे ह्मणतात. वैद्य व ऋषि यांस मान्य आहे. मुख्यत्वेंकरून स्वरभेदनाशक आणि पडसें यांचा नाशक आहे. कास, श्वास, अग्निमांद्य, गुल्म, मेह, कंठरोग, आनाह, मूत्रकृच्छ्र, ग्रंथि व अर्बुद इतक्यांचा हा नाशक आहे.

क्षयकृतस्वरभेद व मेदजस्वरभेद निदान.

धूम्येतवाक्क्षयकृतेक्षयमाप्नुयाच्चसर्वेषुचापिहतवाक्परिवर्जनीयः ॥ अंतर्गतस्वरमलक्ष्यपदंचिरेणमेदःक्षयाद्वदतिदिग्धगलस्तृषालुः ॥

अर्थ–धातुक्षयकृतस्वरभेदाचे ठाईं बोलत्येवेळीं वाणींतून धूर निघाल्या सारिखें भासतें; आणि शब्दाचा क्षय होतो. या धातुक्षयकृतस्वरभेदांमध्ये हतवाक् रोगी सोडावा; व मेदक्षयजन्यस्वरभेदाचा ठायीं मेदानें किंवा कफानें कंठ लिप्त होतो. त्यामुळें वाक्य समजूं येत नाहीं असें सावकाशीनें बोलतो; व रोग्याचा कंठ शुष्क होतो; आणि तृषा लागत्ये.

असाध्यलक्षण.

क्षीणस्यवृद्धस्यकृशस्यचापिचिरोत्थितोयःसहजोपिजातः ॥ मेदस्विनः सर्वसमुद्भवश्चस्वरामयोनापिहिसिद्धिमेति ॥

अर्थ–क्षीण, वृद्ध, कृश, यांचा व बहुत दिवसांचा व जन्मकाळीं देहाबरावर झालेला मेदक्षयजनित व संन्निपातिक, हे सर्व स्वरभेद असाध्य जाणावे.

क्षयज व मेदजस्वरभंग चिकित्सा.

क्षयजेस्वरभेदेतुतत्रोक्तविधिमाचरेत् ॥
कटुतिक्तकषायाद्यैर्मेदःस्वरहातिंजयेत् ॥

अर्थ–क्षयापासून झालेल्या स्वरभेदावर क्षयावरचा उपचार करावा; आणि मेदजस्वरभेदावर तिखट, कडू व तुरट इत्यादि औषधानीं उपचार करावा.

जातीफलावलेह.

जातीफलैलामधुमातुलिंगैःपत्रैश्चलाजैर्युतपिप्पलीकैः ॥
कृतोवलेहःकुरुतेनराणांकंठेध्वनिंकिंनरनादतुल्यं ॥

अर्थ—जायफळ, वेलदोडे, मध, महाळुंग, तमालपत्र, लाह्या व पिंपळी यांचा लेह किंनराचे स्वराप्रमाणे मनुष्यकंठाचा स्वर करितो.

काकजंघादिधार्य.

काकजंघावचाकुष्ठंपिप्पलीमधुसंयुतं ॥
सप्तरात्रंमुखेधार्यंकिंनरैःसहगीयते ॥

अर्थ—लघुकावळी, वेखंड, कोष्ठ, पिंपळी व मध यांची गोळी मुखांत सात दिवस धरली तर, किंनराचे बरोबर गाईल.

जातीदलादिलेह.

जातीदलैलापिप्पलिलामज्जकमधुमातुलिंगदललेहः ॥
सतताभ्यासात्कुरुतेकिन्नरमधुरस्वरंरुचिरं ॥

अर्थ—जाईचीं पानें, वेलदोडे, पिंपळी, पिवळें गवत, मध, माहाळुंग व तमालपत्र, यांचा लेह संतत सेवन केला असतां; किंनरासारखा मधुर व सुंदर स्वर होतो.

गुडूच्यादिलेह.

गुडूच्यपामार्गविडंगशंखिनीवचातथाशुंठिशतावरीसमं ॥
घृतेनलीढंप्रकरोतिमानवंत्रिभिर्दिनैःश्लोकसहस्रधारिणं ॥

अर्थ—गुळवेल, आघाडा, वावडिंग, यवतिक्ता, वेखंड, सुंठ व शतावरी, यांचें चूर्ण तुपाबरोबर चाटलें असतां; मनुष्याला तीनदिवसांत नित्य सहस्रश्लोकधारण करण्याची शक्ति येते.

बदरीकल्क.

बदरीपत्रकल्कंवाघृतभृष्टंससैंधवं ॥
स्वरोपघातेकासेचलेहमेनंप्रयोजयेत् ॥

अर्थ—बोरीचे पानाचा कल्क सैंधवासहवर्तमान तळावा, तो लेह स्वरोपघात, कास यांवर द्यावा.

आरनालचूर्ण.

विहितमसृणचूर्णान्यारनालेनसार्धं ॥
कलितरुफलकृष्णासैंधवानिप्रलिह्यात् ॥

अर्थ—बेहडा, पिंपळी व सैंधव यांचें चूर्ण बारीक करून कांजीत घालून प्यावें; ह्मणजे स्वरभेदाचा नाश होतो.

अभिलपतिविजेतुंयःस्वरस्यप्रणाशं ॥
सपिबतिसहदुग्धेनामलक्याःफलंवा ॥

अर्थ—स्वरभेद जिंकण्याची जो इच्छा करील, त्याणें दुधांत आवळकाठीची पूड टाकून प्यावें

खदिरधार्य.

तैलाक्तंस्वरभेदेवाखादिरंधारयेन्मुखे ॥
पथ्यापिप्पलियुक्तंवासंयुक्तंनागरेणवा ॥

अर्थ—खिरसाचे तेलांत भिजवून कात तोंडांत धरावा; अथवा हिरडा व पिंपळी यांचे बरोबर अथवा सुंठीचे बरोबर तोंडांत धरिला असतां; नीट स्वर होतो.

गोरक्षवटी.

रसभस्मार्कलोहस्यभावितस्यत्रिसप्तधा ॥ क्षुद्राफलरसैर्मुद्गतु
ल्याकार्यावटीशुभा ॥ मुखस्थाहरतेसर्वस्वरभंगमसंशयं ॥
गोरक्षनाथेर्गदितास्वरामथिकपालुभिः ॥

अर्थ—पारदभस्म, ताम्रभस्म व लोहभस्म या तिघांस एकत्र करून रिंगणीच्या फळाचे रसाच्या २१ भावना देऊन मुगाप्रमाणें गोळया कराव्या. त्यांतील गोळी तोंडात धरली असतां; निःसंशय स्वरभेदहरण करील. गोरक्षनाथ ह्मणून कोणी होते त्याणी कृपाळु होऊन ही स्वरभेदावर गुटिका सांगितली आहे.

ब्राह्म्यादिचूर्ण.

ब्राह्मीमुंडीवचाशुंठीपिप्पलीमधुसंयुता ॥
सेवितासप्तरात्रेणजायतेकिंकिणिध्वनिः ॥

अर्थ—कारिवणा, मुंडी, वेखंड, सुंठ व पिंपळी यांचें चूर्ण मधाशीं द्यावें; ह्मणजे कोकिळेसारिखा स्वर होतो.

वचादिचूर्ण.

ब्राह्मीवचोभयावासापिप्पलीमधुसंयुता ॥
अस्यप्रयोगात्सहसाकिंनरैःसहगीयते ॥

अर्थ—ब्राह्मी, वेखंड, हरीतकी, अडुळसा व पिंपळी यांचें चूर्ण मधाशीं घ्यावें; ह्मणजे किन्नरासारिखा स्वर होतो.

दुग्धामलकपान.

दुग्धंप्रयुक्तामलकंनराणांनष्टस्वराणांसुखमातनोति ॥
यक्षामृगाक्षीसुरकिंनराणांकंदर्पदर्पप्रतिपीडनंच ॥

अर्थ—आवळकाठीचें चूर्ण दुधांत घालून घ्यावें; ह्मणजे स्वरभंगीरोग्याला सुख होतें.

पथ्य.

स्वेदोवस्तिर्धूमपानंविरेकःकवलग्रहः ॥ नस्यंभालशिरावेधोयवा लोहितशालयः ॥ हंसाटवीताम्रचूडकेकिमांसरसाःसुराः ॥ गोकंट कःकाकमाचीजीवंतीबालमूलकं ॥ द्राक्षापथ्यामातुलिंगंलशुनंलव णार्द्रकं ॥ तांबूलंमरिचंसर्पिःपथ्यानिस्वरभेदिनां ॥

अर्थ—घामकाढणें, बस्तिकर्म, धूमपान, रेच, मुखांत औषध धरणें, नस्य, गालाच्या शिरांचा वेध, यव, तांबडे भात, आणि हंस, रानकोंबडा व मोर यांच्या मांसाचे रस; मद्य, गोखरू व कावळी, जीवंती, कोवळे मुळे, द्राक्षे, हरीतकी, महाळुंग, लसूण, मीठ, आलें, विडा, मिरीं व तूप, हें पदार्थ स्वरभेदरोग्याला हितकारक आहेत.

स्वरभेदावर अपथ्य.

आम्रःकपित्थंवकुलंशालूकंजांववानिच ॥ तिंदुकानिकषाया णिवमिस्वमंप्रजल्पतां ॥ अन्नपानंविरुद्धंचस्वरभेदेविवर्जयेत् ॥

अर्थ—आंबा, कवठ, वकुल, शाळें, जांबूळ, चारोळी, तुरट पदार्थ, वांति, झोंप, बड बड, आणि विरुद्ध असें अन्न व पान हीं स्वरभेदरोग्यानें वर्ज्य करावीं.

अरुचीचा कर्मविपाक.

श्रद्धाहीनोधनीअदातादानरतिर्वातामसगुणान्वितोयः ॥ सोरुचिमान् शूलीवाजायते ॥ तस्यप्रायश्चितं ॥ कृछ्रमतिकृछ्रंचांद्रायणंव्यस्तंसम स्तंवाव्याधितारतम्येनकुर्यात् ॥ अत्राशक्तौधनीचनित्यंपंचाशद्ब्राह्मणभोज नंप्रतिदिनंमिष्टान्नेनकारयेत् ॥ अत्राप्यशक्तौ ॥ जपंहोमंतथातीर्थस्न नंवापिसमाचरेत्॥ तीव्रवैराग्यसंयुक्तःकुर्याद्ब्राह्मणभोजनं ॥

अर्थ—जो मनुष्य धनाढ्य असून श्रद्धाहीन, अदाता; किंवा दान केलें तत्रापि ताम सदान करितो, त्याला अरुचि किंवा शूल होतो, त्याचें प्रायश्चित्त सांगतो. त्याणे कृच्छ्र, अतिकृच्छ्र, चांद्रायण, हीं संपूर्ण किंवा यांतून ऐखादें व्याधीच्या तारतम्यानें प्रायश्चित्त करावें. हीं प्रायश्चित्तें करण्याविषयीं अशक्त असून धनिक आहे तर; त्याणें प्रतिदिवशीं पन्नास ब्राह्मणाला मिष्टान्न भोजन द्यावें, हें हि न होई तर जप,होम व तीर्थस्नानें, हीं करावीं, तीव्रवैराग्यधारण व ब्राह्मणभोजन करावें; ह्मणजे रोगापासून मुक्त होतो.

ज्योतिःशास्त्राभिप्राय. तत्प्रतीकार.

अतिपरिभूतक्षपणःसहजर्युतोमानवोभवति ॥ जीवेमंदाग्निविजितो दुश्चित्तकोपापकर्माच ॥ दुश्चिकित्स्यस्थानस्थितगुरोःप्रागुक्तजपहोमस्नानादिकंविदध्यात् ॥

अर्थ—ज्याच्या जन्मकाळीं सहजस्थानीं क्रूर ग्रह आहेत; किंवा गुरु सहजस्थानीं क्रूर ग्रहयुक्त आहे; तर तो मंदाग्नि, पापकर्ता, शत्रूनीं जित व दुश्चित्त असा उत्पन्न होतो, त्याणे दुश्चिकित्स्यस्थानस्थितगुरुदोष जाण्याकरितां पूर्वीं सांगीतलेले जपहोमादि करावे.

अरोचकनिदान.

परीक्ष्यसंमुखेचान्नंजंतोर्नस्वादतेमुहुः ॥ अरोचकःसविज्ञेयोभक्तद्वेषमथोशृणु ॥ चिंतयत्यथमनसादृष्ट्वादृष्ट्वातुभोजनं ॥ द्वेषमायातियोजंतुर्भक्तद्वेषःसउच्यते ॥ यस्यान्नेनभवेच्छ्रद्धासभक्तच्छंदउच्यते ॥ कुपितस्य भयार्तस्यज्वरितस्यविरोधकः ॥

अर्थ—वारंवार मुखामध्यें अन्न घातलें असतां; मनुष्यास स्वाद लागत नाहीं, त्या विकाराला अरोचक ह्मणतात; आणि अन्नाचें श्रवण, स्मरण, दर्शन, स्पर्शन यांणीं जे मन कंटाळतें त्या विकाराला भक्तद्वेष ह्मणतात; व ज्या विकारेंकरून अन्नावर वासनाच होत नाहीं, त्याला भक्तच्छंद ह्मणतात. तो कुपित,भयार्त व ज्वरित अशा रोग्याचा असाध्य जाणावा.

अरोचककारणें.

वातादिभिःशोकभयातिलोभक्रोधैर्मनोघ्नाशनरूपगंधैः ॥ अरोचकाःस्युःपरिहृष्टदंतःकषायवक्त्रश्चनरोनिलेन ॥

अर्थ—वात, पित्त, कफ, संनिपात, शोक, भय, अतिलोभ व क्रोध याहींकरून ८ प्रकार अरोचक आहेत, ते मनाला किळस येणारें अन्न, रूप व गंध या कारणानीं उत्पन्न होतात व वायूच्या अरोचकामध्ये दांत आंबतात; आणि तोंड तुरट होतें.

सामान्यशास्त्रार्थ.

वस्तिःसमीरणेपित्तेविरेकोवमनंकफे ॥
सर्वजेसर्वकामार्थहर्षणंस्यादरोचके ॥

अर्थ—वातापासून अरुचि असेल तर वस्ति द्यावा, पित्तापासून असेल तर रेच द्यावा, कफापासून असेल तर वमन द्यावें, त्रिदोषापासून असेल तर त्रिदोषशामक व मनास हर्ष-करणारें असें औषध द्यावें.

अरुचौकवलग्राहोधूमोसुमुखधावनं ॥
मनोज्ञमन्नपानंवाहर्षणाश्वासनानिच ॥

अर्थ—अरुचीवर सामान्यतः कवलग्रह (मुखांत औषधांची गोळी धरणें.) धूर पिणें, औषधांचे पाण्याणें चूळ भरून तोंड खुळखुळावून टाकणें, चांगलें स्वच्छ अन्न व उदक, अंतःकरणास कोणत्याहि हरउपायानीं हर्ष उत्पन्न करणें व आश्वासन देणें, हे उपचार करावे.

सात्म्यान्स्वदेशरचितान्विविधांश्चभक्ष्यान्पानानिमूलफलखांड
वरागलेहान् ॥ सेवेद्रसांश्चविविधान्विविधप्रयोगैर्भुंजीतचा
पिलघुरूक्षमनःसुखानि ॥

अर्थ—प्रकृतीस मानलेलें, आपले देशाच्या चालिचे असे नानाप्रकारचे भक्ष्य पदार्थ ह्मणजे लाडू व पोळ्या इत्यादि पक्वान्नें, आंवटी, सांभारीं, भाज्या, कोशिंबिरी, चटण्या, लोणचीं, पंचामृत, गुळांबें, मुरांबे, श्रीखंड, रायतीं, पन्हीं इत्यादि पदार्थ, लघु, रूक्ष, अंतःकरणास सुख करणारे असे पदार्थ सेवन करावे; ह्मणजे तोंडाला रुचि येईल.

वचादिस्नेहपान.

वांतोवचाद्भिरनिलेविधिवत्पिबेत्तुस्नेहोम्लतोयमदिरान्यतमेनचूर्णं ॥
कृष्णाविडंगयवभस्महरेणुभार्ङ्गीरास्नैलहिंगुलवणोत्तमनागराणां ॥ पि
त्तेगुडांबुमधुकैर्वमनंप्रशस्तंलेहःससैंधवसितामधुसर्पिरिष्टः ॥ निंबांबु
नाकृतवमेःकफजेनुपानंराजद्रुमांबुमधुनासहदीप्यकाढ्यं ॥ चूर्णंतदु
क्तमथवानिलजेतदेवसर्वैस्तुसर्वकृतमेनमुपक्रमेत ॥

अर्थ—वातापासून अरोचक होतें त्यावर वेखंडाचे काढ्याची वांति देऊन ओकवून नंतर स्नेह, आंवट रस किंवा मद्य यांतून एकाबरोबर पिंपळी, वावडिंग, जवखार, रेणुकाबीज, भारंगमूळ, राला, वेलदोडे, हिंग, सैंधव व सुंठ यांचें चूर्ण खावें. पित्तारुचीवर गुळ, उदक व ज्येष्ठीमध यांचें वमन द्यावें; आणि सैंधव, साकर, मध व तूप, यांचा लेह द्यावा.

कफारुचीवर कडुलिंबाच्या रसाचें वमन देऊन नंतर बाहाव्याच्या काढयांत मध आणि ओं व्याचें चूर्ण घालोन पाजावें; अथवा वातारुचीवर जें चूर्ण सांगितलें तें द्यावें; आणि सर्वदोषांपासून झालेल्या अरुचीवर पुर्वीचे सर्व उपचार करावे.

सामान्यचिकित्सा.

इच्छाविनाशभयजेषुचबाधकेषुभावान्भवायवितरेत्खलुसाध्यरूपान् ॥
अर्थेषुचातिपतितेषुपुनर्भवायपौराणिकैःश्रुतिपथैरनुमानयेत्तं ॥

अर्थ—इच्छानाश, किंवा भय यांपासून झालेल्या अरुचीवर सुख होण्याकरितां इच्छित पदार्थ मिळण्यासारखे असतील ते द्यावे, भयनिवारण करावें; आणि द्रव्यनाशापासून झालेल्या अरुचीवर पुराणवाक्यांनीं व श्रुतिवाक्यांनीं ज्ञान उत्पन्न करावें.

पित्तजन्यअरोचकनिदान.

कट्वाम्लमुष्णंविरसंचपूतिपित्तेनविंद्याछवणंचवक्त्रं ॥

अर्थ—पित्तजन्यअरोचकाचे ठायीं कटु, आम्ल, उष्ण, विरस, दुर्गंधयुक्त व खारट असें तोंड होतें.

कफजन्यअरोचकनिदान.

माधुर्यपैच्छिल्यगुरुत्वशैत्यविवद्धसंवद्धयुतंकफेन ॥

अर्थ—कफजन्य अरोचकाचे ठायीं तोंड गोडिळ, बुळबुळित, जड व गार असें होतें; व आंतून कफानें लिप्त झालेलें असतें.

अरोचकेशोकभयातिलोभक्रोधाद्यहृद्याशुचिगंधजेस्यात् ॥ स्वाभाविकंचास्यमथारुचिश्चत्रिदोषजेनैकरसंभवेत्तु ॥ हृच्छूलपीडनयुतंप वनेनपित्ततृड्दाहचोषबहुलंसकफप्रसेकं ॥ श्लेष्मात्मकंबहुरुजंब हुभिश्चविद्याद्वैगुण्यमोहजडताभिरथापरंच ॥

अर्थ—शोक, भय, अतिलोभ, क्रोध व बिभत्स इत्यादि मनाला न आवडणारा, अमंगळ इत्यादि गंध यांच्या संबंधेंकरून अरोचक होतें. त्याचा ठायीं मुखमाधुर्यादि पूर्वोक्त गुणेंकरून युक्त स्वभावतः असतें; आणि तोंडाची चव जात्ये; व त्रिदोषसंबंध असतां; मुख खारट, तुरट व कडु असें अनेकरस युक्त असतें. वायुच्या योगेंकरून जें अरोचक होतें, तें हृदयशूल व पीडा यांहीं युक्त असतें, पित्तसंबंधानें जें अरोचक तें तृष्णा, दाह व शोष यांहीं युक्त असतें; आणि कफसंबंधेंकरून कफप्रसेकयुक्त असतें; व त्रिदोषसंबंधेंकरून असतां नाना वेदना, मोह, जडता, वैगुण्य ह्मणजे मनाची व्याकुळता हे उपद्रव होतात.

गंडूष.

किंचिल्लवणसंयुक्तमारनालंविपाचयेत् ॥
तेनगंडूषमात्रेणआस्यवैरस्यमृच्छति ॥

अर्थ—थोडेसें मीठ घालोन कांजी करून चूळभरून टाकावे; ह्मणजे मुखाचा विरसपणा जातो.

कवलग्राह.

सिताव्योषकपित्थानांचूर्णंक्षौद्रेणतद्वटी ॥
सर्वारोचकशांत्यर्थंधारयेद्वदनांबुजे ॥

अर्थ—साकर, सुंठ, मिरें, पिंपळी, कंवठ यांचे चूर्णाची मधांत गोळी करून तों-डांत धरावी; ह्मणजे अरुचि शांत होते.

विडंगचूर्ण.

विडंगचूर्णकर्षैकंक्षौद्रैश्चतुर्गुणैर्युतं ॥
असाध्यमपिसंहन्यादरुचिंवक्त्रधारणात् ॥

अर्थ—वावडिंगाचें चूर्ण १ तोळा, मध ४ तोळे, यांची गोळी तोंडांत धरावी; ह्म-णजे असाध्य जरी अरुचि असली, तरी तिचा नाश करील.

अम्लिकाकवल.

अम्लिकागुडतोयंचत्वगेलामरिचान्वितं ॥
अभक्तच्छंदरोगेषुशस्तंकवलधारणं ॥

अर्थ—अन्नावर अरुचि जास्त होते, त्याणें चिंचेचे सरवत, गूळ, पाणी, दालचिनी, वेलदोडे मिरें घालोन करावें; आणि त्याचे बरोबर जेवावें.

कुष्ठादिकवल.

कुष्ठसौवर्चलाजाजीशर्करामरिचंविडं ॥ धान्यैलापद्मकोशीरपिप्पल्यश्चंदनोत्पलं ॥ लोध्रतेजोवतीपथ्यात्र्यूषणंसयवाग्रजं ॥ आर्द्रदाडिमनिर्यासःसाजाजीशर्करायुतं ॥ सतैलमाक्षिकाह्येतेचत्वारःकवलग्रहाः ॥ चतुरोरोचकान्घ्नंतिवाताद्येकजसर्वजान् ॥

अर्थ—कोष्ठ कोळिंजन, पादेलोण, जिरें, साकर, मिरें व बिडलोण, यांचें चूर्ण; धने, वेलदोडे, पद्मकाष्ठ, वाळा, पिंपळी, चंदन व कमळ यांचें चूर्ण; लोध्र, मालकांगुणी, हिरडा सुंठ, मिरें, पिंपळी, जवखार यांचें चूर्ण; आलें डाळिंब यांचा रस जिरें साकरयुक्त हे चार योग शिरसाचें तेल व मध यांचे बरोबर योजिले असतां; कवळ ह्मणजे घांस याचें ग्रा हक होतात; आणि वात, पित्त, कफ, व सन्निपात यांपासून झालेली ४ प्रकारची अरुचि तीचा नाश करितात.

लिंबाचें पन्हें.

भागैकंनिंबुजंतोयंषड्भागंशर्करोदकं ॥ लवंगमरिचोन्मिश्रंपानकंपा नकोत्तमं ॥ निंबूरसभवंपानमत्यम्लंवातनाशनं ॥ वन्हिदीप्तिकरं रुच्यंसमस्ताहारपाचकं ॥

अर्थ–लिंबाचा रस १ भाग व साकरेचें पाणी ६ भाग घेऊन त्यांत लवंगाची व मिऱ्याची पूड टाकून पन्हें करावें, हें सर्वपन्ह्यांत उत्तम आहे, हें लिंबाचे रसाचें पन्हें अति आंबट, वातनाशक, अग्निप्रदीप्तकरणारें, रुचिकारक व सर्वआहाराचें पाचक असें आहे.

मुखधावन.

अजाजीमरिचंकुष्ठंविडंसौवर्चलंतथा ॥
मधुकंशर्करातैलंवातिकेमुखधावनं ॥

अर्थ–जिरें, मिरें, कोष्ठकोळिंजन, बिडलोण, पादेलोण, जेष्ठीमध, साकर, शिरसाचें तेल, हीं एकत्र करून याणें तोंड धुवावें; ह्मणजे वाताची अरुचि जाते.

दुसरा प्रकार.

कारंजंदंतकाष्ठंचविधेयमरुचौसदा ॥ किंचिल्लवणसंयुक्तमार नालंविपाचयेत् ॥ तेनगंडूपकंकुर्यादास्यवैरस्यशांतये ॥

अर्थ–तोंडाची रुचि गेली असतां; करंजाचें काष्ठानें दांत घासावे; आणि थोडें मीठ घालून कांजी करून त्याचा चूळ टाकावा.

तिसरा प्रकार.

त्रिच्यूपणानित्रिफलारजनीद्वयंचचूर्णीकृतानियवशूकविमिश्रितानि ॥
क्षौद्रान्वितानिवितरेन्मुखधावनार्थमन्यानितिक्तकटुकानिचभेषजानि ॥

अर्थ–दालचिनी, वेलदोडे, तमालपत्र, सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, हळद, दारुहळद, सातूचीं कुसें यांचें चूर्ण मधाशीं मिश्र करून तोंड धुण्यास द्यावें, आणखी हीं कडु व तिखट औषधें द्यावीं; ह्मणजे अरुचीचा नाश होतो.

शर्करादिभक्ष.

शर्करादाडिमंचाथद्राक्षाखर्जूरमेवच ॥ केसरंमातुलिंगस्यासिं धुनामधुनापिवा ॥ आस्यवैरस्यशमनंभक्षयेत्कर्षसंमितं ॥

अर्थ–साकर, डाळिंब, मनुका, खजूर, महाळुंगाचे केसर, सैंधवाशीं किंवा मधाशीं युक्त, यांतून कोणतें एक सुमारें तोळाभर भक्षिलें असतां; तोंडास रुचि येते.

पक्काम्लिकासिताशीतवारिणावस्त्रगालितं ॥ एलालवंगकर्पूरमरीचैरवधूलितं ॥ पानकस्यास्यगंडूषंधारयित्वामुखेतुरः ॥ अरुचिंनाशयत्येवपित्तंप्रशमयेद्यथा ॥

अर्थ–पिकलेली चिंच कुंवळून त्यांत साकर, थंडपाणी, एलची, लवंग, कापूर व मिरीं यांचें चूर्ण घालून पन्हें करावें. त्याचें तोंडांत धारण केलें असतां; अरुचीचा नाश होतो; व पित्त शमतें.

तालीसादि चूर्ण.

तालीसंमरिचंशुंठींपिप्पलींवंशरोचना ॥ एकद्वित्रिचतुःपंचकर्षैर्भागान्प्रकल्पयेत् ॥ एलात्वचोस्तुकर्षार्धंप्रत्येकंभागमावहेत् ॥ मृतवंगंमृतताम्रंसमभागानिकारयेत् ॥ द्वात्रिंशत्कर्षतुलितांप्रदेयाशर्कराबुधैः॥ तालीसाद्यमिदंचूर्णंरोचनंपाचनंस्मृतं ॥ कासश्वासज्वरहरंछर्द्यतीसारनाशनं ॥ शोषाध्मानहरंप्लीहाग्रहणीपांडुरोगजित् ॥

अर्थ–तालीसपत्र एक कर्ष, मिऱ्ये २ कर्ष, सुंठ ३ कर्ष, पिंपळी ४ कर्ष, वंशलोचन ५ कर्ष, विलायची व दालचिनी अर्धा अर्धा कर्ष, वंगभस्म व ताम्रभस्म हीं दोन्ही आठ आठ कर्ष व साकर ३२ कर्ष घ्यावी. मग सारीं औषधें कुटून चूर्ण करून त्यांत ती साकर मेळवून घेतले असतां; तोंडास रुचि येते; व अन्न पचन होतें; व कास, श्वास, ज्वर ओकारी, अतिसार, शोष, पोटफुगी, कवळू, संग्रहणी व पांडुरोग हें दूर होतात.

खांडवचूर्ण

तुल्यंतालीसचव्योपणलवणगजाह्वैःकणाग्रंथ्यजाजीवृक्षाम्लाग्नित्वचंत्रिर्घनवदरधनैलाजमोदाम्लविश्वम् ॥ सार्धश्वेतोंघ्रिसारोतिसृतिक्रमिवमीखांडवोरुच्यजीर्णगुल्माध्मानानलास्योदरगलगुदत्दृन्मृद्गदश्वासकासे ॥

अर्थ–१ तालीसपत्र, १ चविक, १ मिरे, १ सैंधव, १ नाकेशर, २ पिंपळी, २ पिंपळमूळ, २ जिरें, २ चिंच, २ चित्रक, २ दालचिनी, ३ नागरमोथे, ३ बोर वाळलेलें, ३ धनें, ३ एलची, ३ अजमोदा, ३ अम्लवेतस, ३ सुंठ, आणि साकर १९ तोळे, व ९॥ तोळे दाडिमसाल, ह्या सर्व औषधांचे बारीक चूर्ण करून अनुपानपरत्वें अतिसार, कृमि, वांति, अरुचि, अजीर्ण, गुल्म, पोटफुगणें, अग्निमांद्य, मुखरोग, उदररोग, गलरोग, मुळव्याध, त्दृद्रोग, मृत्तिकाजन्यरोग, श्वास; आणि खोकला यांवर योजावें.

यवानीखांडवचूर्ण अरोचकादिकांवर.

यवानीदाडिमंशुंठीतिंतिडीकाम्लवेतसौ ॥ बदराम्लंचकुर्वीतचतुः

शाणमितानिच ॥सार्धद्विशाणंमरिचंपिप्पलीदशशाणिका ॥ त्वक्सौ

वर्चलधान्याकंजीरकंद्विद्विशाणकं ॥ चतुःषष्टिमितैःशाणैःशर्करामत्र

योजयेत् ॥ चूर्णितंसर्वमेकत्रयवानीखांडवाभिधं ॥चूर्णंजयेत्पांडुरोगं

हृद्रोगंग्रहणीज्वरं ॥ छर्दिशोषातिसारांश्चप्लीहानाहविबंधतां ॥ अ

रुचिशूलमंदाग्निमर्शोजिव्हागलामयान् ॥

अर्थ—अजमोदा, डाळिंबसाल, सुंठ, चिंचेची साल, आम्लवेतस, आंबट बोर ही चार औषधें चार चार शाण घ्यावी; अडीच शाण मिरें व पिंपळी १० शाण, घ्यावीं. दालचिनी, संचळखार, धनें, जिरें, हीं चार औषधें दोन दोन शाण घ्यावीं, साकर ६४ शाण घ्यावी. मग सारीं औषधें कुटून चूर्ण करावें. या चूर्णाला यवानीखांडवचूर्ण असें म्हणतात. हें चूर्ण घेतलें असतां; पांडुरोग, हृद्रोग, संग्रहणी, ज्वर, ओकारी, शोष, अतिसार, पोटांत डाव्याकडे कवळूरोग, कंठरोग हे सारे रोग दूर होतात.

कारव्यादिगुटिका.

कारव्यजाजीमरिचंद्राक्षावृक्षाम्लदाडिमं ॥ सौवर्चलंगुडःक्षौद्रमेषां

कार्यावटीशुभा ॥ बदरास्थिमितासास्येधार्यारोचकनाशिनी ॥

अर्थ—बडिशेप, जिरें, मिरें, द्राक्षें, आमसोल, डाळिंब, पादेलोण, गूळ व मध, हीं सर्व एकत्र खलोन बोराचे आंठीप्रमाणें गोळी करून तोंडांत धरावी, ती अरुचिनाशक आहे.

खंडार्द्रकयोग.

आर्द्रकस्यसितायाश्चद्विगुणाष्टपलानिच ॥ निष्कद्वादशकंतीक्ष्णमष्टनि

ष्काचमागधी ॥ अष्टनिष्कंचतन्मूलंपंचनिष्कंचनागरं ॥ जातीफलैला

दहनवंशाख्याःपंचनिष्ककाः ॥सर्वाण्येतानिशुष्काणिचूर्णंकृत्वापृथक्पृ

थक् ॥ आर्द्रकंखंडशःकृत्वागोघृतेष्टपलेपचेत् ॥ शर्करापूर्णचूर्णंचआर्द्र

कंसहमेलयेत् ॥ मंडलंसेवयेन्नित्यंमहापित्तविनाशनं ॥ आम्लपित्तंनि

हंत्याशुसर्वपित्तविकाराजित् ॥ सर्वारुचिवातरोगंमंदाग्निंचनियच्छति ॥

अर्थ—आलें ६४ तोळे, साकर ६४ तोळे, मिरें ४ तोळे, पिंपळी ३ तोळे, पिंपळमूळ ३ तोळे, सुंठ १॥ तोळा, जायफळ, वेलदोडे, चित्रक, वंशलोचन हीं प्रत्येकीं १॥ दीड तोळा, हीं सर्व औषधें वाळवून निरनिराळें चूर्ण करून नंतर आल्याचे तुकडे बा-

ढीक करून ३२ तोळे तुपांत घालून तळावें; मग साकर आणि तें चूर्ण सर्व आल्यांत मिळवून दररोज चाळीस दिवसपर्यंत तो लेह सेवन करावा. हा खंडार्द्रकयोग महापित्तनाशक, आम्लपित्त, सर्व पित्तविकार, सर्व अरुचि, वातरोग व मंदाग्नि यांचा नाशक आहे.

राजिकादिशिखरिणी.

राजिकाजीरकोकुष्ठोभृष्टहिंगुचनागरं ॥ सैंधवंदधिगोःसर्वं वस्त्रपूतंप्रकल्पयेत् ॥ तावन्मात्रंक्षिपेत्तत्रयथास्याद्रुचिरुत्तमा ॥ तक्रमेतद्भवेत्सद्योरोचनंवन्हिदीपनं ॥

अर्थ–मोहऱ्या, जिरें, कोष्ट, भाजलेला हिंग, सुंठ, सैंधव व गाईचें दहीं हे सर्व पदार्थ यथायोग्य एकत्र करून वस्त्रावर गाळून घ्यावें, तें ताक अरुचीचा नाश करितें; व अग्नीला प्रदीप्त करितें

आर्द्रकयोग.

धौतंखंडितमार्द्रकंचसलिलैःक्षिप्तंसुतप्तेघृतेसिंधूत्थंमरिचंमुजीरयुगुलं चूर्णीकृतंप्रक्षिपेत् ॥ चूर्णभृष्टयवोद्भवंचवितुपंहिंग्वाज्यधूमेदहेदित्थं दोषविहीनमार्द्रकवरंसुस्वादुसंजायते ॥

अर्थ–आलें पाण्यानें स्वच्छ धुवून तुकडे करून तूप कढवून त्यांत टाकावें; नंतर पक्क करून सैंधव, मिरें, जिरें व शाहाजिरें यांचें चूर्ण त्यांत टाकून किंचित तापवावें; नंतर सातु भाजून त्यांचें चाळलेलें पीठ तुपांत हिंग घालून पर्तावें; आणि त्यांत मिळवावें. या प्रमाणें केलेलें आलें दोषहीन, स्वादिष्ट व अरुचिनाशक असें होतें.

ताम्राशिखरिणी.

गव्यमावर्तितंदुग्धंनिबद्धंदधिमाहिषं ॥ एकीकृत्यपटेघृष्टंशुभ्रशर्करयाशुभं ॥ एलालवंगकर्पूरमरिचैश्चसमन्विता ॥ ताम्राशिखरिणीकुर्याद्रुचिंसकलवल्लभा ॥

अर्थ–गाईचें दूध व म्हशीचें दहीं एकत्र करून तें वस्त्रावर साकरेशीं घांसून गाळून घ्यावें. त्यांत एलची, लवंगा, कापूर व मिरीं हे पदार्थ यथायोग्य घालून त्याची शिखरिणी तयार करावी. तिचें नाव ताम्राशिखरिणी ही रुचीला उत्पन्न करित्ये; व सर्व लोकांस प्रिय आहे.

आमलकादि चूर्ण.

आमलंचित्रकःपथ्यापिप्पलीसैंधवंतथा ॥ चूर्णितोयंगणोज्ञेयःसर्वज्वरविनाशनः ॥ भेदीरुचिकरःश्लेष्मजेतादीपनपाचनः ॥

अर्थ—आवळकाठी १ चित्रक २ बाळहिरडे ३ पिंपळी ४ सैंधव ५ हीं पांच औषधें समसमान घेऊन चूर्ण करून घेतलें असतां; सारे ज्वर दूर होतात; व मलादिकांचा भेद होतो; व रुचि येते, व कफ दूर होतो व अग्नि प्रदीप्त होतो, आणि अन्नाचें पचन होतें.

कर्पूरादिचूर्ण.

कर्पूरत्वोचकंकोलजातीफलदलैःसमैः ॥ लवंगनागमरिचंकृष्णाशुंठी विवर्धिताः ॥ चूर्णंसितासमंग्राह्यंरोचनंक्षयकासजित् ॥ वैस्वर्यश्वास गुल्मार्शश्छर्दिकंठामयापहं ॥ प्रयुक्तंचान्नपानेषुभिषजारोगिणांहितं ॥

अर्थ—कापूर, दालचिनी, कंकोळ, जायफळ व तमालपत्र हीं सर्व प्रत्येक एकेक तोळा, लवंगा २ तोळे, नागकेसर ३ तोळे, मिरीं ४ तोळे, पिंपळी ५ तोळे व सुंठ ६ तोळे, या प्रमाणे घेऊन चूर्ण करून साखरेबरोबर घ्यावें. हें रुचिकारक, कास जिंकणारें व स्वरभेद, श्वास, गुल्म, अर्श, छर्दि, कंठरोग, यांचें नाशक आहे; आणि हें भाताबरोबर किंवा पाण्याबरोबर द्यावें; ह्मणजे रोग्याला हितकारक होतें.

चव्यादिचूर्ण.

चव्याम्लवेतसकटुत्रयतिंत्रिडीकतालीसजीरकतुगादहनैःसमांशैः ॥ चूर्णंगुडप्रमुदितंत्रिसुगंधियुक्तंवैस्वर्यपीनसकफारुचिषुप्रशस्तं ॥

अर्थ—चवक, आम्लवेतस, सुंठ, मिरें, पिंपळी, आंबसोल, तालीसपत्र, जिरें, वंशलोचन, चित्रक, दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, याचें चूर्ण गुळाबरोबर खावें; ह्मणजे स्वरभेद, पीनस, कफ, अरुचि यांवर प्रशस्त आहे.

आर्द्रकमातुलुंगावलेह.

आर्द्रकस्वरसंप्रस्थंतदर्धांशंगुडंक्षिपेत् ॥ कुडवंबीजपूराम्लंगालयित्वाविचक्षणः ॥ सर्वंमंदाग्निनापक्त्वातत्रेमानिविनिःक्षिपेत् ॥ त्रिजातकंत्रिकटुकंत्रिफलायासमेवच ॥ चित्रकंग्रंथिकंधान्यंजीरकद्वयमेवच ॥ कर्षांशंश्लक्ष्णचूर्णंतुमेलयित्वातुभक्षयेत् ॥ अरोचकक्षयहरमग्निदीप्तिकरंपरं ॥ कामलापांडुशोफघ्नंकासश्वासहरंपरं ॥ आध्मानोदरगुल्मांश्चप्लीहंशूलंचनाशयेत् ॥

अर्थ—६४ तोळे आल्याचा रस, ३२ तोळे गूळ, १६ तोळे माहाळुंगाचा रस, हीं सर्व मंदाग्नीनें पक्व करून त्यांत दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, सुंठ, मिरें, पिंपळी, हरडा, बेहेडा आवळकाठी, धमासा, चित्रक, पिंपळमूळ, धने, जिरे व शाहाजिरें, यां प्रत्येकाचें चूर्ण तोळा तोळा घालून कालवून खावें; ह्मणजे अरुचि, क्षय, अग्निमांद्य, कामला, पांडु, शोथ, कास, श्वास, आध्मान, उदर, गुल्म, प्लीहा व शूळ, यांचा नाश करील.

जीरकादिघृत.

पिष्ट्वाजाजींसधान्याकंघृतप्रस्थंविपाचयेत् ॥
कफपित्तारुचिहरंमंदानलवमिंजयेत् ॥

अर्थ–जिरें व धनें यांचा कल्क ६४ तोळे तुपांत घालून घृत पक्क करावें. तें घृत कफपित्त यांपासून झालेल्या अरुचीचा नाश करितें; आणि मंदाग्नि व ओकारी यांचा नाश करितें.

सूतादिगुटिका.

सूतंगंधाभ्रमगधाम्लीकामगधसैंधवैः ॥
गुटिकारोचकहरीजिव्हावदनशुध्दिकृत् ॥

अर्थ–पारा, गंधक, अभ्रकभस्म, पिंपळी, चिंच, पिंपळमूळ व सैंधव यांची गोळी अरुचिनाशक, जिव्हा व मुख यांची शुद्धि करणारी अशी आहे.

लघुचुक्रसंधान.

गुडक्षौद्रारनालानिसमस्तानियथोत्तरं ॥ शंसंतिद्विगुणान्भागान्सम्य कुसूक्तस्यसिद्धये ॥ यन्मस्त्वादिशुचौभांडेसक्षौद्रंगुडकांजिकं ॥ त्रिरा त्रंधान्यराशिस्थंमूक्तंचुक्रंतदुच्यते ॥

अर्थ–गुळ १ भाग, मध २ भाग व कांजी ४ भाग, याप्रमाणे घेऊन रावलेल्या मड क्यांत भरून धान्यराशींत तीन दिवस ठेवावें, ह्याला शुक्तचक्र असें ह्मणतात.

केसरादिलेह.

केसरंमातुलुंगस्यसैंधवंमधुनापिवा ॥
आस्यवैरस्यशमनंभक्षयेत्कर्षसंमितं ॥

अर्थ–माहाळुंगाचें केसर सैंधव अथवा मध, यांचें बरोबर तोळाभर खावें; ह्मणजे तोंडाची विरसता शमवील.

शमयतिकेसरमरुचिंसलवणघृतमाशुमातुलिंगस्य ॥
दाडिमचर्वणमथवाचरको रुचिकारिसूचयामास ॥

अर्थ–माहाळुंगाचे केसर, सैंधव, तूपसहीत अरुचिनाशक आहे; अथवा डाळिंबाचें चर्वण ह्मणजे खाणें रुचिकारक आहे, असें चरकानें सुचविलें आहे.

आर्द्रकदाडिमयोग.

जिव्हाकंठविशोधनंतदनुचस्याच्छृंगवेरान्वितंसिंधूत्थंहितमत्रचाथम

धुनाशस्तोरसोदाडिमः ॥ अग्न्युद्बोधकराण्यजीर्णशमनान्याहुस्तथा भेषजान्यन्नारोचकरद्दत्प्रयोगमसकृत्तत्प्रदेयानिच ॥

अर्थ–पूर्वी जिव्हा व कंठ यांची शुद्धिकरणारें असें औषध घेऊन नंतर आलें आणि सैंधव खावें; अथवा डाळिंब आणि मध खावा; आणि अग्निप्रदीप्त करणारी व अजीर्ण नाशक औषधें सेवन केल्यानें अरुचि दूर होते.

दाडिमचूर्ण.

द्वेपलेदाडिमादष्टौखंडाद्योपात्पलत्रयं ॥ त्रिसुगंधिपलंचैकंचूर्ण मेकत्रकारयेत् ॥ दीपनंरोचनंहृद्यंपीनसश्वासकासजित् ॥

अर्थ–डाळिंब ८ तोळे, साकर ३२ तोळे, सुंठ, मिरीं, पिंपळी हीं ४ तोळे, दालचिनी, एलची व तमालपत्र हीं ४ तोळे. या सर्वांचें एकत्र चूर्ण करावें. तें दीपन, रोचन व हृद्य आहे; व पीनस, श्वास व खोकला यांचा नाश करितें.

पिप्पल्यादिचूर्ण.

पिप्पलीपिप्पलीमूलंचव्यचित्रकनागरैः ॥ मरिचंदीप्यकंचैववृक्षाम्लं साम्लवेतसं ॥ एलालवंगशालूकदधित्थंचेतिकार्षिकं ॥ प्रदेयंचाति शुद्धायाःशर्करायाश्चतुःपलं ॥ चूर्णमग्निप्रसादःस्यात्परमंरुचिवर्धनं ॥ प्लीहकार्श्यमथार्शांसिश्वासंशूलंज्वरंवमिं ॥ निहंतिदीपयत्यग्निंवलव र्णरुचिप्रदं ॥ वातानुलोमनंहृद्यंजिव्हाकंठविशोधनं ॥

अर्थ–पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, सुंठ, मिरीं, ओंवा, आमसोल, आम्लवेतस, एलची, लवंग, जायफळ व कंवठ हे एकेक तोळा, शुद्ध साकर १६ तोळे यांचे चूर्ण करावें. तें अग्निप्रदीप्त करणारें, रुचि देणारें व प्लीहा, कार्श्य, अर्श, श्वास, शूल, ज्वर व वांति यांचा नाश करितें; व वायूचें अनुलोमन करितें; आणि हृदय, जीभ व गळा यांची शुद्धि करितें.

छत्रादिचूर्ण.

छत्रावीजंतिंत्तिडीकंद्राक्षादाडिमजीरकं ॥
सौवर्चलंगुडंक्षौद्रंसर्वारोचकनाशनं ॥

अर्थ–आवळकाठी, चिंच, द्राक्षें, डाळिंब, जिरें, पादेलोण, गूळ व मध हे सर्व पदार्थ अरुचीचा नाश करितात.

अम्लिकादिपेय.

सौवर्चलगुडंक्षौद्रंसर्वारोचकनाशनं ॥

अर्थ–पादेलोण, गुळ व मध हे खावे; ते अरुचिचा नाश करितात.

शुंठ्यादिचूर्ण.

त्रुटित्वक्केसरपुष्पंवह्निजंसकणौषधं ॥ समखंडभागवृद्धंचूर्णं तंभक्षयेद्वदी ॥ श्वासकासप्रसेकेषुहृत्पार्श्वारुचिजेगदे ॥ गलामयेप्रशस्तंचमुखपाकविषेहितं ॥

अर्थ–बारकी एलची, दालचिनी, नाकेशर, लवंगा, मिरी, पिंपळी व सुंठ हे पदार्थ एकोत्तर वृद्धीने घ्यावे; व सर्वचूर्णासमान साकर घालून तयार करावे. ते दमा, खोकला, तोंडाला पाणी सुटते ते व हृदय, पार्श्व, अरुचि, गलरोग आणि मुखपाक यांवर प्रशस्त आहे.

त्र्यूषणादिवटी.

त्र्यूषणकपित्थशर्करारोचकेनचसाधयेद्वटी ॥ सेविताचसाजायतेजरोर्भीमसेनवद्भक्षयेज्झालसः ॥

अर्थ–सुंठ, मिरी, पिंपळी, कवठ, साकर व पादेलोण यांची गोळी करून खावी; म्हणजे जरा दूर होत्ये; व भीमसेनासारिखी क्षुधा लागत्ये.

अमृतप्रभावटी.

मरिचंपिप्पलीमूलंलवंगंचहरीतकी ॥ यवानीतित्तिडीकंचदाडिमंलवणत्रयं ॥ एतानिपलमात्राणिमागधीक्षारचित्रकं ॥ द्विजाजीनागरंधान्यंएलाधात्रीफलंसमं ॥ एतान्द्विपलिकान्भागान्भावयेद्विजपूरकैः ॥ भावनात्रितयंदत्वागुटिकांकारयेद्बुधः ॥ छायाशुष्कांप्रकुर्वीतअजीर्णस्यप्रशांतये ॥ अग्निंचकुरुतेघोरंगुटिकाचामृतप्रभा ॥

अर्थ–मिरी, पिंपळमूळ, लवंगा, हरीतकी, ओवा, चिंच, डाळिंब, बिडलोण, काचलोण हीं प्रत्येकीं ४ तोळे, पिंपळी, जवखार, चित्रकमूळ, जिरें, सुंठ, धने, एलची, आवळकाठी हीं प्रत्येकीं ८ तोळे या सर्वांचें चूर्ण एकत्र करून त्यास महाळुंगाच्या रसांच्या तीन भावना देऊन गोळी करावी, ती छायेंत वाळवून खावी; ह्मणजे अजीर्णाचा नाश करित्ये; व अग्नीला वाढवित्ये, हिला अमृतप्रभा गुटिका ह्मणतात.

आकल्लकादिचूर्ण.

आकल्लकंसैंधववन्हिशुंठीधान्यूषणंदीप्यसमांशपथ्या ॥ रसेनभाव्यंफलपूरकेणमंदानलत्वेह्यमृतप्रमेयं ॥ कासेगलामयेश्वासेप्रतिश्याये चपीनसे ॥ अपस्मारेतथोन्मादेसन्निपातेसदाहिता ॥

अर्थ—अकलकरा, सैंधव, चित्रक व सुंठ, आवळकाठी, सुंठ, मिरीं, पिंपळी, ओंवा व हरीतकी, यांचें समभाग चूर्ण एकत्र करून त्याची महाळुंगाच्या रसांत गोळी करावी. तिचें नांव अमृतप्रभा. ही मंदाग्नि, अरुचि, खोकला, गलरोग, दमा, पडसें, पीनस, फेंपरें उन्माद व सन्निपात, यांवर हितकारक आहे.

लवणार्द्रकयोग.

भोजनाद्रौसदापथ्यंलवणार्द्रकभक्षणं ॥
रोचनंदीपनंवन्हेर्जिव्हाकंठविशोधनं ॥

अर्थ—भोजनाच्या पूर्वी मीठ व आलें यांचें भक्षण करावें. तें रोचक, अग्निदीपक, व कंठ, आणि जिव्हा, यांची शुद्धि करणारें आहे.

शृंगवेरादिलेह.

शृंगवेररसंवापिमधुनासहयोजयेत् ॥
अरुचिश्वासकासघ्नंप्रतिश्यायकफापहं ॥

अर्थ आल्याच्या रसांत मध घालोन द्यावा. तो अरुचि, दमा, खोकला, पडसें, आणि कफ यांचा नाश करितो.

त्वङ्मुस्तादिचूर्ण.

त्वङ्मुस्तमेलाधान्यानिमुस्तामामलकत्वचा ॥ त्वक्‌चदार्वी यवान्याश्चपिप्पलीतिजवत्यपि ॥ यवानीतिंतिडीकंचपंचैतेमु खशोधनाः ॥ श्लोकपादैरभिहिताःसर्वारोचकनाशनाः ॥

अर्थ—दालचिनी, नागरमोथा, एलची, धनें, किंवा नागरमोथा, आवळकाठी, दालचिनी, दारुहळद, ओंवा; अथवा पिंपळी व जळपिंपळी; अथवा ओंवा आणि चिंच हे पांच योग. मुखाची शुद्धि व अरुचीचा नाश यातें करितात.

दाडिमरस.

विडंगचूर्णसंयुक्तोरसोदाडिमसंभवः ॥
असाध्यामपिसंहन्यादरुचिंवक्त्रधारितः ॥

अर्थ—डाळिंबाच्या रसांत वावडिंगाचें चूर्ण घालून तो रस तोंडांत धरायास द्यावा. तो असाध्य अशा अरुचीचा नाश् करितो.

जीरकादिचूर्ण.

अजाजिनिष्कमात्रंचकर्षैकंसितशर्करा ॥
पलंक्षौद्रेणसंयुक्तंपीतंरुचिकरंमुखे ॥

अर्थ—जिरें ॥- तोळा, साकर १ तोळा, मध ४ तोळे एकत्र करुन तोंडांत धरण्या करितां द्यावें. तें रुचि उत्पन्न करितें.

कपित्थादिचूर्ण.

कपित्थमज्जात्रिकटुचूर्णक्षौद्रसितायुतं ॥
अरोचकेषुसर्वेषुप्रशस्तंधारयेन्मुखे ॥

अर्थ—कवठाचा गीर, सुंठ, मिरीं व पिंपळी यांचें चूर्ण मध, साकर यांशीं तोंडांत धरावें, तें सर्व अरोचकांवर प्रशस्त आहे.

शुंठ्यादिगुटी.

शुंठ्येकभागाद्द्विगुणाचकृष्णा निशोत्रपथ्यात्रिगुणातथाच ॥ सार्ध्यैकभागामलकीचतीक्ष्णंचतुर्गुणंसैंधवमम्लमर्द्यं ॥ शाणैकमात्रागुटिकानिषेव्यानिहंतिमंदानलजंप्रकोपं ॥

अर्थ—सुंठ १, पिंपळी २, निशोत्तर ३, हरीतकी ३, आवळकाठी १॥, मिरीं ४, व सैंधव ४ भाग, या सर्वांचें चूर्ण करुन निंबाच्या रसांत खलावें, त्याची ४ माशांची गोळी करावी: ती अग्निमांद्याचा नाश करित्ये.

अरुचीवर पथ्य.

वस्तिर्विरेकोवमनंयथाबलंधूमोपसेवाकवलग्रहस्तथा ॥ तिक्तानिकाष्ठानिचदंतघर्षणेचित्रान्नपानानिहितैःकृतान्यपि ॥ गोधूममुद्राढकिशालिषष्टिकामांसंवराहालिशशैणसंभवं ॥ वेगोझपांडंमधुरालिकेलिशःप्रोष्ठीखलेशःकवचीचरोहितः॥कर्कारुवेत्राग्रनवीनमूलकंवार्ताकसौभांजनमोचदाडिमं ॥ भव्यंपटोलंरुचकंपयोघृतंबालानितालानिरसोनसूरणं ॥द्राक्षारसालंलवलंवुकांजिकमघंरसालांदधितक्रमार्द्रकं ॥ कंकोलखर्जूरप्रियालतिंदुकंपक्कंकपित्थंबदरंविकंकतं ॥ तालादिमज्जाहिमवालुकासितापथ्यायवानीमरिचानिरामठं ॥ स्वाद्वम्लतिक्तानिचदेहमार्जनंवर्गोयमुक्तोरुचिरोगिणांहितः ॥

अर्थ—रोग्याचें बळ पाहून त्याला बस्तिकर्म, रेचन व वमन द्यावें; आणि धूम्रपान, मुखांत औषधांचा कवल व कडुकाष्ठानें दांत घांसणें व नानातऱ्हेचीं हितकारक अन्नें व पानें, गहूं, मूग, तुरी, साळी, साठकीभात; आणि डुकर, कीट, ससा व हरण यांचें मांस व माशांचीं आंडीं, साळोंखी: केलिश, प्रोष्ठी, खलेश, कवची व रोहित ह्याप्रकारचे मासे; व तांबडा भोंपळा, कांकडी, वेताचे कोंब, कोंवळे मुळे, वांगे, शेवगा, केळें, डा

ळिंब, निंब, पडवळ, सैंधव, दूध, तूप, कोवळी ताडाची फळें, लसूण, सुरण, द्राक्षें, आंबा, वाहणारें पाणी, कांजी, मद्य, शिकरण, दहीं, ताक, आलें, कंकोल, खजूर, चारोळी, घेंडशीची भाजी, पिकें कवठ, बोर, बेहेकळ, ताडाचें खोबरें, थंड वाळवंठ, साकर, हरीतकी, ओंवा, मिरें, हिंग, आणि गोड, आंबट, कडु, हे रस व स्नान हा अरुचीच्या रोग्याला पथ्यवर्ग सांगितला.

अरुचीवर अपथ्य.

तृष्णोद्गारक्षुधानेत्रवारिवेगविधारणं ॥ अहृद्यान्नमसृङ्मोक्षं क्रोधंलोभंभयंशुचं ॥ दुर्गंधारूपसेवांचनकुर्यादरुचौनरः ॥

अर्थ—ताहान, ढेंकर, क्षुधा व रोदन यांच्या वेगाचें धारण, अप्रिय अन्न, रक्तमोक्ष, क्रोध, लोभ, भय, शोक, दुर्गंध, आणि विद्रूपपदार्थदर्शन, अरुचि रोग्यानें सेवन करूं नये.

छर्दिरोग कर्मविपाक.

योब्राह्मणायकेशकीटकाकसारमेयाद्युपहतमन्नंजानन्नेवप्रमादात्प्रयच्छतिसच्छर्दिमानन्यजन्मनि ॥

अर्थ—जो कोणी ब्राह्मणाला केंश, कीट, कावळे व कुतरे यांणीं विटाळलेलें अन्न उन्मत्तपणानें जाणून देतो, तो दुसरे जन्मीं वांतीनें पीडित होतो.

विश्वासघातकीच्छर्दियुक्तोभवतितदुपशांतये ॥ पंचाशद्ब्राह्मणभोजनंकारयेत् ॥ अन्नदानंचयथाशक्त्याआज्ययुक्तंचकुर्यात् ॥ तेनोपशांतिर्भवति ॥

अर्थ—जो विश्वासघात करितो, तो वांतिरोगानें पीडित होतो. त्याणें त्या दोषाच्या शमनार्थ पन्नास ब्राह्मणाला भोजन द्यावें; व घृतयुक्तअन्नाचें दान करावें; त्याणें शांति होईल

ज्योतिषशास्त्राभिप्राय.

रिपुस्थानेयदास्यातांचंद्रशुक्रौततोभवेत् ॥ छर्दिमान्मनुजस्तृष्णापक्षंवाइवलोकिते ॥ क्षीणचंद्रावलोकीतुषष्टस्थानस्थितोबुधः ॥ शुक्रबाधोपशांतयेबुधस्यपूर्वोक्तमेवसकलंजपादिविदध्यात् ॥

अर्थ—जन्मकाळीं षष्ठस्थानीं चंद्र व शुक्र हे ग्रह असले किंवा त्यांची दृष्टि असेल तर तो वांतिरोगी; किंवा तृष्णारोगी होतो; किंवा बुध षष्ठस्थानीं असून त्याची क्षीणचंद्रावर दृष्टि असेल तर तो वांति; किंवा तृष्णारोगी होतो. त्याणें शुक्र व बुध यांच्या करितां पूर्वोक्त जपादिक संपूर्ण करावें.

छर्दिनिदान, संप्राप्ति व लक्षण.

दुष्टैर्दोषैःपृथक्सर्वैर्बीभत्सालोकनादिभिः ॥ छर्दयःपंचविज्ञेयोस्तासां लक्षणमुच्यते ॥ अतिद्रवैरतिस्निग्धैरहृद्यैर्लवणैरपि ॥ अकालेचाति मात्रैश्चतथासात्म्यैश्चभोजनैः ॥ श्रमाद्भयात्तथोद्वेगादजीर्णात्क्रिमिदोष तः ॥ नार्याश्चापन्नसत्वायास्तथातिद्रुतमश्नतः ॥ बीभत्सैर्हेतुभिश्चान्यै र्द्रुतमुत्क्लेशितोबलात् ॥ छादयन्नाननंवेगैरर्दयन्नंगभंजनैः ॥ निरु च्यतेछर्दिरितिदोषोवक्त्रंप्रधावति ॥

अर्थ—पृथक् वातकफादिदोष, सन्निपात व बीभत्सपदार्थांचें अवलोकन यांहीं करुन छर्दि पांच प्रकारची ती अतिद्रव, अतिस्निग्ध, अंतःकरणास कंटाळा देणारें व क्षार, यांच्या सेवनेंकरून किंवा अकाळीं अतिरिक्त भोजन व न सोसणारें असें अन्न; आणि श्रम, भय, उद्वेग, अजीर्ण, आणि जंतांची विकृति या कारणानीं; व गरोदरपणामुळें, अतित्वरितभोजनानें, कंटाळवाण्यापदार्थांच्या दर्शनानें; आणि इतर दुसऱ्या कारणानीं, कोष्ठगत दोष जोरानें वर येतो, त्याकाळीं आंगाला मोडल्यासारिखी पीडाकरीत व आ पल्या वेगानें तोंडाला पूर्ण करीत मुखवाटे दोष बाहेर निघतो. त्या व्याधीला छर्दि (वांति किंवा ओकारी) असें ह्मणतात.

पूर्वरूप.

हृल्लासोद्गारसंरोधैःप्रसेकोलवणस्तनुः ॥
द्वेषोन्नपानेचंभृशंवमीनांपूर्वलक्षणं ॥

अर्थ—उल्लासे येतात, ढेंकरांचा प्रतिबंध होतो, तोंडाला खारट पाणी सुटतें, अन्न व पान यां विषईं द्वेष होतो, हें ओकारीचें पूर्वरूप जाणावें.

वातछर्दिलक्षण.

हृत्पार्श्वपीडामुखशोषशीर्षनाभ्यर्तिकासस्वरभेदतोदैः ॥ उद्गारश ब्दप्रबलंसफेनंविभिन्नकृष्णंतनुकंकषायं ॥ कृच्छ्रेणचाल्पंमहताचवेगे नार्तोनिलाच्छर्दयतीहदुःखं ॥

अर्थ—वातछर्दीमध्यें ऊर, बरगड्या, मस्तक व बेंबी यांत शूल; तोंडाला कोरड, खोकला, स्वरभंग व सुया टोचल्यासारिखी पिडा यां सहवर्तमान मोठ्या वेगानें व मोठ्या कष्टानें व मोठ्या उद्गारशब्दानें काळें, तुडकळ, सफेत, तुरट व पातळ असें थोडें ओकतो.

सैंधवयोग.

सैंधवंसर्पिषापीतंवातच्छर्दिनिवारणं ॥

अर्थ—सैंधव व तूप एकत्र करून प्यावें, ह्मणजे वातच्छर्दि निवारण होतें.

लवणत्रययोग.

लवणत्रयसंयुक्तंसंयुक्तंलवणेनवा ॥
हन्यात्क्षीरोदकंपीतंछर्दिंपवनसंभवां ॥

अर्थ—सैंधव, बिडलोण व काचलोण, यांचे बरोबर अथवा मिठाबरोबर दूध व पाणी एकत्र करून प्यालें असतां; वायुपासून झालेली ओकारी व उमासे यांचा नाश होतो.

धान्याकयूष.

धान्याकविश्वदशमूलकषायसिध्धान्यूपान्रसान्पवनवम्यरुचिप्रशांत्यै ॥
पीत्वासुखानिलभतेमधुमिश्रितंवाशंखाव्हयास्वरसमूपणचूर्णयुक्तं ॥

अर्थ—धने, सुंठ व दशमूळें, यांचे काढे, मंड किंवा रस हे वातछर्दि व वातारुचि यांचे शांतिसाठीं प्यावें; ह्मणजे सुख होतें; अथवा शंखाहुलीचे रसांत मध व मिऱ्यांचे चूर्ण घालून प्यावा; ह्मणजे सुख होतें.

पित्तच्छर्दिलक्षण.

मूर्छापिपासामुखशोपमूर्धताल्वक्षिसंतापतमोभ्रमार्तः ॥
पीतंभृशोष्णंहरितंसतिक्तंधूम्रंसपित्तेनवमेत्सदाहं ॥

अर्थ—पाणी पिण्याची इच्छा, तोंडाची कोरड व मस्तक, तालु व नेत्र, यांस संताप, अंधारी, भ्रम, इंहीकरून रोगी पीडा पावतो; आणि पीतवर्ण, उष्ण, कडु, हरिद्वर्ण, किंवा धूम्रवर्ण, व दाहयुक्त असें पित्तछर्दिमध्यें ओकतो.

तंडुलजलपान.

पित्तछर्दिंजयेद्दूर्वातंडुलोदकपानतः ॥
धात्रीरसेनवापीताःसिताःलाजाश्चघ्नंतितां ॥

अर्थ—दूर्वांचा रस तांदुळांचे धुणाबरोबर प्यावा; अथवा आवळ्याचा रस साकर व लाह्या एकत्र करून खाव्या; ह्मणजे पित्तच्छर्दि निवारण होतें.

लाजादियूष.

लाजामसूरयवमुद्गकृतायवागूश्छर्द्यांहितामधुयुताबहुपित्तजायां ॥
यूपाःसुगंधिमधुतिक्तरसाःप्रयुक्तामृद्भृष्टलोष्ठभवमंबुहितंतृषायां ॥

अर्थ—लाह्या, मसुर, सातु व मूग यांची आंबील मध घालून प्यावी, ती अतिपित्तापासून छर्दि होते तीवर प्रशस्त आहे; अथवा सुगंध पदार्थ, मध व कडुरस, यांचाशीं युक्त जो मंड तोहि प्रशस्त आहे; आणि मातीचें ढेकूळ तापवून पाण्यांत विझवावें तें पाणी तृषेवर हितकारक आहे.

पर्पटादिकाढा.

क्काथःपर्पटजःपीतःसक्षौद्रःशिशिरीकृतः ॥
पित्तच्छर्दिशिरस्तापचक्षुर्दाहानपोहति ॥

अर्थ—पित्तपापडयाचा काढा थंड करून मध घालून घ्यावा. तो पित्तच्छर्दि, मस्तकाचा ताप, डोळ्याचा दाह यांचा नाश करील.

मक्षिकाविडवलेह.

सिताचंदनमध्वाढ्यंविलिहेन्माक्षिकाशकृत् ॥
सोपद्रवापित्तभवाच्छर्दिरेतेनशाम्यति ॥

अर्थ—साकर, चंदन व मध यांचे बरोबर माशीची विष्ठा चाटली असतां; उपद्रव सहित पित्तछर्दि शांत होत्ये.

गुडूच्यादि काढा.

गुडूचीत्रिफलारिष्टपटोलैःक्वथितंजलं ॥
क्षौद्रयुक्तंनिहंत्याशुच्छर्दिंपित्तसमुद्भवां ॥

अर्थ—गुळवेल, त्रिफळा, कडुलिंब व कडुपडवळ, यांचा काढा मध घालून प्याला असतां; तो पित्तच्छर्दिनाश करील.

लाजसक्तुपान.

सर्पिःक्षौद्रसितोपेतान्लाजसक्तून्लिहेत्ततः ॥
पित्तच्छर्दिश्चतेनाशुप्रशाम्यतिसुदुस्तरा ॥

अर्थ—लाह्यांचें पीठ, तूप, साकर व मध, एकत्र करून चाटावें; ह्मणजे दुस्तर पित्त छर्दि शांत होईल.

कफच्छर्दिलक्षण.

तंद्रास्यमाधुर्यकफप्रसेकसंतोषनिद्रारुचिगौरवार्तः ॥
स्निग्धंघनंस्वादुकफाद्विशुध्दंसलोमहर्षोल्परुजंवमेत्तु ॥

अर्थ—कफछर्दीचे ठायीं झांपड, तोंडाला गोडी, कफप्रसेक, क्षुधेविषयीं संतोष, निद्रा, अरुचि, जडपणा. यांसहवर्तमान चिकट, दाट, गोड व पांढरें असें ओकतो; व रोग्याच्या शरीरावर रोमांच येतो, व अल्प पीडा होत्ये.

सामान्यचिकित्सा.

छर्यांकफोद्भवायांतुवमनंकारयेद्भिषक्॥नीयैःसर्पपसिं

भूत्थराठनिंवकणायुतैः ॥ शस्यंतेशालिगोधूमयव
मुद्गमकुष्ठकाः ॥ षष्टिकातत्रयूपश्चपटोल्याद्याश्चभोजनं ॥

अर्थ–कफापासून झालेल्या ओकारीवर शिरस, सैंधव, गेळफळ, कडुलिंब व पिंपळी यांचें काढयानें वमन द्यावें; आणि साळि, गहूं सातु, मूग, मठ, साटक्यासाळी यांचे पदार्थ, व मंड, पडवळ, इत्यादि भोजनांत द्यावें.

शालिभक्त.

आरक्तशालिभक्तंगोदधिशर्करविमिश्रंच ॥
कुर्याद्भोजनमेतत्कफच्छर्दिच्छिदंजंतोः ॥

अर्थ–तांबडे साळींचा भात, गाईचें दहीं व साकर यांचें भोजन करावें; ह्मणजे कफच्छर्दीचा नाश होतो.

विडंगादि चूर्ण.

विडंगत्रिफलाव्योपचूर्णंमधुयुतंलिहेत् ॥
शाम्यत्यनेनकफजाछर्दिःसोपद्रवानृणां ॥

अर्थ–वावडिंग, त्रिफळा व त्रिकटु यांचें चूर्ण मधाबरोबर चाटावें, तेणेंकरून सोपद्रव कफच्छर्दि शांत होते.

जांववादियोग.

सजांववंवादरचूर्णमम्लंमुस्तायुतंकर्कटकंसशृंगी ॥
दुरालभावामधुनाचयुक्तालिह्यात्कफच्छर्दिविनिग्रहार्थं ॥

अर्थ–जांभूळ, बोर, माहाळुंग व नागरमोथा यांचें चूर्ण ऊंसाच्या रसाबरोबर घ्यावें; अथवा कांकडशिंगी व धमासा यांचें चूर्ण मधाबरोबर चाटावें; ह्मणजे कफछर्दीला बंद करील.

सन्निपातच्छर्दिलक्षण.

शूलाविपाकारुचिदाहतृष्णाश्वासप्रमोहप्रवलाप्रसक्तं ॥
छर्दिस्त्रिदोषाछवणाम्लनीलंसांद्रोष्णरक्तंवमतांनृणांस्यात् ॥

अर्थ–त्रिदोषज वांतीमध्यें शूळ, अजीर्ण, अरुचि, दाह, तृष्णा, श्वास, मोह, यांणीं युक्त मोठ्या वेगानें, खारट, आंबट, नीलवर्ण, दाट व रक्तमिश्रित, असें ओकतो.

विल्वादिकाढा.

विल्वत्वचोगुडूच्यावाक्वाथःक्षौद्रेणसंयुतः ॥
जयेत्त्रिदोषजांछर्दिंपर्पटःपित्तजांतथा ॥

अर्थ–वेळाचे सालीचा अथवा गुळवेलीचा काढा मध घालून प्यावा, तो त्रिदोष छर्दिनाशक आहे; आणि पित्तपापड्याचा काढा पित्तच्छर्दिनाशक आहे.

कोलाद्यवलेह.

कोलामलकमज्जानौमक्षिकाविट्सितामधु ॥
सकृष्णातंदुलोलेहच्छर्दिमाशुव्यपोहति ॥

अर्थ–बोर व आवळा यांची मज्जा, माशीची विष्ठा, साकर, मध, पिंपळी, तांदुळांचे धुवण यांचा लेह छर्दिनाशक आहे.

सुरसापान.

सुरसास्वरसैर्युक्तंतृटिकामर्दिताभृशं ॥
वांतिंशमयतिक्षिप्रंवातपित्तककोद्भवां ॥

अर्थ–तुळसीच्या स्वरसांत बारवेया वेलचीचें चूर्ण घालून द्यावें; म्हणजे त्रिदोषवांती-चा नाश होतो.

मनःशिलादियोग.

मनःशिलामागधिकोपणानांचूर्णकपित्थाम्लरसेनयुक्तं ॥
लाजैःसमांशैर्मधुनावलीढंछर्दिंप्रसक्तामसकृन्निहंति ॥

अर्थ–मनशीळ, पिंपळी व मिरें, हीं समभाग; आणि यांचे बरोबर ३ भाग लाह्या यांचें चूर्ण एकत्र करून कंवठांचे व माहाळुंगाचे रसांत मध आणि तें चूर्ण घालून चाटयावें.

अश्वत्थवल्कलादियोग.

अश्वत्थवल्कलंशुष्कंदग्धंनिर्वापितंजले ॥
तज्जलंपानमात्रेणछर्दिंजयतिदुर्जयां ॥

अर्थ–पिंपळाची साल जाळून पाण्यांत विझवून तें पाणी पितांक्षणींच दुर्जय छर्दीचा जय करील.

लाजादियोगत्रय.

लाजाकपित्थमधुमागधिकोपणानांक्षौद्राभयात्रिकटुधान्यकजीरकाणां ॥
पथ्यामृतामरिचमाक्षिकपिप्पलीनांलेहास्त्रयःसकलवम्यरुचिप्रशांत्यै ॥

अर्थ–लाह्या, कंवठ, मध, पिंपळी व मिरें यांचा लेह, तसाच मध, हरीतकी, त्रिकटु, धने व जिरे यांचा लेह, तसाच हिरडा, गुळवेल, मिरें, मध व पिंपळी यांचा लेह, हे सर्वप्रकारची ओकारी व अरुचि यांची शांति करणारे आहेत.

धात्रीफलपान.

पिष्ट्वाधात्रीफलंद्राक्षांशर्करांचपलोन्मितां ॥ दत्वामधुपलंचैवकुडवंस
लिलस्यच ॥ वाससागालितंपीतंहंतिछर्दिंत्रिदोषजां ॥

अर्थ–आवळकाठी, द्राक्षे, साकर व मध हीं प्रत्येकीं ४ चार तोळे प्रमाणे घेऊन ६४ तोळे पाण्यांत घालून कुसकुरून पाणी वस्त्रांत गाळून प्यावें, तें त्रिदोषोत्पन्नछर्दीचें नाशक आहे.

मसूरसक्तु.

मसूरसक्तवःक्षौद्रंमर्दितादाडिमांभसा ॥
पीतानिवारयत्याशुच्छर्दिंदोषत्रयोद्भवां ॥

अर्थ-मसूरा, सांतूचें पीठ व मध हें डाळिंबाचे रसाबरोबर खलून प्यावें. तें त्रिदोष छर्दिनिवारक आहे.

एलाद्यचूर्ण.

एलालवंगगजकेसरकोलमज्जालाजाप्रियंगुघनचंदनपिप्पलीनां ॥
चूर्णंसितामधुयुतंमनुजोविलिह्यछादनिहंतिकफमारुतपित्तजातां ॥

अर्थ–वेलदोडे, लवंगा, नागकेसर, बोराची मज्जा, लाह्या, कांग, नागरमोथे, चंदन, पिंपळी यांचें चूर्ण मध साकरेबरोबर चाटलें असतां; त्रिदोषोत्पन्न छर्दीचा नाश करील.

पद्मकादिघृत.

पद्मकामृतनिंबानांधान्यचंदनयोःपचेत् ॥
कल्केक्काथेचहविषःप्रस्थंछर्दिनिवारणं ॥

अर्थ–पद्मकाष्ठ, मठ, कडुलिंब, धने व चंदन यांचें काढ्यांत किंवा कल्कांत ६४ तोळे सिद्ध केलेलें तूप छर्दिनिवारक आहे.

चंदनादिपान.

चंदनंचमृणालंचवालकंनागरंवृषम् ॥
सतंडुलोदकक्षौद्रैःपीतःकल्कोवमिंजयेत् ॥

अर्थ–चंदन, कमळाचा देठ, वाळा, नागरमोथा, अडुळसा. हीं तांदुळाचे धुणांत वांटून मध घालून तें प्यावें; ह्मणजे ओकारीला जिंकील.

उदीच्यजल.

सोदीच्यगैरिकंदेयंसेव्यंवातंडुलांबुना ॥ जातीपत्ररसंकृष्णामरि
चेशर्करान्वितं ॥ एतानिमधुयुक्तानिघ्नंतिछर्दिंचिरोद्भवाम् ॥

अर्थ—वाळा, गेरु तांदुळांचे धुणांत वांटून मध घालून प्यावे, अथवा जाईचे पानाचे रसांत पिंपळी, मिरें, यांचें चूर्ण मध व साकर घालून प्यावें; ह्मणजे फार दिवसांची ओकारी बंद होईल.

चंदनपान.

चंदनेह्यक्षमात्रेचसंयोज्यामलकीरसं ॥
पिबेन्माक्षिकसंयुक्तंछर्दिस्तेनानिवार्यते ॥

अर्थ—तोळाभर चंदन घेऊन चूर्ण करुन त्यांत आवळ्याचा रस मधमिश्र करुन प्यावा; तेणेंकरुन ओकारीचें निवारण होतें.

मुद्गकाढा.

कषायोभृष्टमुद्गानांसलाजमधुशर्करः ॥
छर्द्यतीसारदाहघ्नोज्वरघ्नःसंप्रकाशितः ॥

अर्थ—भाजलेल्या मुगांचा काढा लाह्या, मध व साकर यांणीं युक्त ओकारी, अतिसार, दाह व ज्वर यांचा नाशक आहे.

कोलमज्जा.

कोलमज्जाकणाबर्हिपक्षभस्मसशर्करं ॥
मधुनालेहयेच्छर्दिहिक्काकोपस्यशांतये ॥

अर्थ—बोराचे आंठीचा मगज, पिंपळी, मोराचे पंखाची राख, साकर, मध हीं एकत्र चाटली असतां; ओकारी व उचकी यांचा कोप शांत होतो.

बीजपूरादिपुटपाक.

बीजपुराम्रजंबूनांपल्लवानिजटाःपृथक् ॥ विपचेत्पुटपाकेनक्षौद्रयुक्तश्चतद्रसः ॥ छर्दिनिवारयेत्सद्यःसर्वदोषसमुद्भवाम् ॥

अर्थ—महाळुंग, आंबा, जांवूळ यांचे पल्लव अथवा मुळें पुटपाकानें पक्व करुन त्यांचा रस मधयुक्त सर्वदोषांपासून जरी ओकारी असली, तरी तिचें शीघ्र निवारण करतो.

हरीतकीचूर्ण.

हरीतकीनांचूर्णंतुलिह्यान्माक्षिकसंयुतं ॥
अधोभागीकृतेदोषेछर्दिस्तेननिवार्यते ॥

अर्थ—हिरड्याचे चूर्ण मधाबरोबर खावें. तेणेंकरुन दोष अधोभागीं गेले ह्मणजे छर्दीचें निवारण होतें.

मृद्भृष्टलोष्टप्रभवंसुशीतंसलिलंपिबेत् ॥

अर्थ—मातीचें ढेकूळ तापवून पाण्यांत विझवावें. तें पाणी थंड झाल्यावर प्यावें; ह्मणजे छर्दिनिवारण होतें.

जंव्वाम्रपल्लवरस.

जंव्वाम्रपल्लवोशीरवटशृंगावरोहजः ॥ क्वाथःक्षौद्रयुतःशीतःपीतोवा
विनियच्छति ॥ छर्दिज्वरमतीसारंमूर्छांतृष्णांचदुर्जयाम् ॥

अर्थ—जांबूळ, आंबा यांचे पल्लव, वाळा, वडाच्या पारंब्या अथवा पल्लव यांचा काढा थंड करून मधासहित घ्यावा; ह्मणजे ओकारी, ज्वर, अतिसार, मूर्छा व तृष्णा, ही दुर्जय असलीं तरी त्यांचा नाश होतो.

हिंग्वादिपान.

हिंगुनासारिवामूलंसर्ववांतिहरंपरं ॥
जातीफलंवमीशोपेजागरेविप्रयोजयेत् ॥

अर्थ—हिंगासहित लघु उपळसरीचें मूळ सर्वप्रकारचे ओकारीचें नाशक आहे; व जायफळ ओकारी, शोष व जागरण यांच्यावर प्रशस्त आहे,

उग्रगंधादियोग.

उग्रगंधारनालेनपीताछर्दिंनिवारयेत् ॥

अर्थ—वेखंड कांजीबरोबर प्यालें असतां; छर्दिनिवारण होईल.

सामान्यचिकित्सा.

आमाशयोत्क्लेशभवाहिसर्वाःस्युश्छर्दयोलंघनमेवतस्मात् ॥
प्रकारयेन्मारुतजांविनातुसंशोधनंवाकफपित्तहारि ॥

अर्थ—आमाशयाचा उत्क्लेश यापासून संपूर्ण वांति उत्पन्न होतात. याकरितां लंघन करावें; परंतु वातजवांतिवांचून. किंवा शोधन द्यावें. तें कफ व पित्त यांचा नाश करितें

हितंनलंघनंपुरावमिपुमारुताभिधे ॥
अथापिवामयेदमुंविरेचयेद्यथार्हतः ॥

अर्थ—वातजवांतीवर पूर्वी लंघन करूं नये. त्याला योग्य असे वामक; किंवा रेचक द्यावें.

जातीपत्रचूर्ण.

जातीपत्ररसंकृष्णामरिचंशर्करान्वितं ॥
एतानिमधुयुक्तानिघ्नंतिछर्दिंचिरोद्भवां ॥

अर्थ–जायीचे पाल्याच्या रस, पिंपळी, गिरी, साकर, आणि मध हीं एकत्र करून द्यावीं. ह्मणजे चिरकालजवांतीचा नाश होतो.

असाध्यच्छर्दिलक्षण.

विट्स्वेदमूत्रांबुवहानिवायुःस्रोतांसिसंरुध्ययदोर्ध्वमेति ॥ उत्प न्नदोषस्यसमाचितंतंदोषंसमुत्थूयनरस्यकोष्ठात् ॥ विण्मूत्रयो स्तत्समगंधवर्णंतृट्श्वासकासार्तियुतंप्रसक्तं ॥ प्रच्छर्दयेद्दुष्टमिहा तिवेगात्तयार्दितश्चाशुविनाशमेति ॥

अर्थ–जाकाळीं वायु विष्ठा, घाम, मूत्र, आणि उदक यांला वाहणाऱ्या मार्गाला रोधून वर येतो; त्याकाळीं कोष्ठांतून वर आलेल्या दोषासहवर्तमान मोठ्यावेगानें विष्ठा व मूत्र यांच्या गंधानें व वर्णानें युक्त असे दोष अतिशय ओकतो. त्याकाळीं तृषा, दमा व खोक-ला याणी रोगी पीडित होतो, तो रोगी शीघ्र मरतो.

आगंतुकच्छर्दिलक्षण.

बीभत्सजादौहृदजामजाचअसात्म्यतोवाक्रिमिजाचयाहि ॥ सापंच मीताश्चविभावयेत्तुदोषोच्छ्रयेणैवयथोक्तमादौ ॥ शूलहृल्लासबहुला कृमिजाचविशेषतः ॥ कृमिहृद्रोगतुल्येनलक्षणेनचलक्षिता ॥

अर्थ–बीभत्सपदार्थांच्या अवलोकनानें व डोहळे लागल्यामुळे होत्ये. ती व अजीर्णानें झालेली व नसोसणाऱ्या पदार्थानें व जंतांच्याउपद्रवानें होत्ये ती ह्या सर्व छर्दि वातादि कांच्या लक्षणानीं जाणाव्या; परंतु कृमिजाछर्दिचे ठायीं हृच्छूल, लालास्राव, हे विशे षेकरून होतात; आणि कृमिरोग व हृद्रोग यांचे लक्षणासारिखीं लक्षणें होतात.

क्षीणस्ययाच्छर्दिरतिप्रसक्तासोपद्रवाशोणितपूययुक्ता ॥
सचंद्रिकांतांप्रवदेदसाध्यांसाध्यांचिकित्सेदनुपद्रवांच ॥

अर्थ–क्षीणमनुष्याची अतिबळकट वाढलेली, उपद्रवानें युक्त व रक्त, पू याणीं यु क्त, आणि जींत चंद्रिका दिसत्ये ती छर्दि असाध्य जाणावी; व कास, श्वासादि उपद्रव नसतां औषधादिकेंकरून साध्य जाणावी.

उपद्रव.

कासश्वासोज्वरोहिक्कातृष्णावैचित्यमेवच ॥
हृद्रोगस्तमकश्चैवज्ञेयाश्छर्देरुपद्रवाः ॥

अर्थ–कास, श्वास, ज्वर, उचकी, तृष्णा; चिंता, हृद्रोग, तमक व श्वास, हे छर्दि-चे उपद्रव जाणावे.

सामान्यचिकित्सा.

बीभत्सजांमबीभत्सैर्हेतुभिःसंहरेद्वमिं ॥
दौर्हृदोत्थांवमिंत्द्वैःकांक्षितैर्वस्तुभिर्जयेत् ॥

अर्थ–घाणेच्या व वाईट अशा पदार्थांच्या पाहाण्यानें किंवा गंधानें जी ओकारी होत्ये. ती चांगले स्वच्छतेचे कारणानीं दूर करावी; आणि जी डोहोळयापासून होत्ये, ती चांगलें सुंदर अंतःकरणास प्रिय अशा पदार्थांनीं जिंकावी.

लंघनैर्वमनैर्वापिसात्म्यैर्वासात्म्यसंभवां ॥
कृमिहृद्रोगवच्चापिसाधयेत्कृमिजांवमिं ॥

अर्थ–आपल्यास मानत नाहीं अशा वस्तूपासून झालेली ओकारी ती लंघन, वमन व आपल्या प्रकृतीस मानलेले पदार्थ अशानें घालवावी; आणि कृमिपासून जी होत्ये, ती कृमि व हृद्रोग, यांवर जे उपचार सांगितले त्या उपचारानीं बंद करावी.

यथादोषंचविचरेच्छस्तंविधिमनंतरं ॥
पवनघ्नीचिरोत्थासुप्रयोज्याछर्दिप्रक्रिया ॥

अर्थ–सांगितलेले उपचार जसा जसा दोष, असेल, तसा तसा विचार करून मग ते करावे; आणि पुष्कळ दिवसाची जी ओकारी आहे, तीवर वातनाशक उपचार करावे.

आम्रास्थिकाढा.

आम्रास्थिबिल्वनिर्यूहःपीतःसमधुशर्करः ॥
निहंतिच्छर्द्यतीसारंवैश्वानरइवाहुतिं ॥

अर्थ–आंब्याची कोय व बेल यांचा काढा मध व साकर घालून प्यावा; ह्मणजे तो छर्दि व अतिसार, यांचा नाश करतो. जसा अग्नि आहुतीचा नाश करतो.

जंबूपल्लवादि काढा.

जंब्वाम्रपल्लवशतंक्षौद्रंदत्वासुशीतलंतोयं ॥
लाजैरवचूर्ण्यपिबेच्छर्द्यतिसारेपरंसिद्धं ॥

अर्थ–जांभळीची आणि आंब्याची मिळून शंभर पानें कोंवळीं घेऊन त्यांचा काढा करून त्यांत लाह्यांचें चूर्ण आणि मध घालून प्यावा; तो ओकारी व अतिसार यांवर हितकारक आहे.

मयूरपक्षभस्मावलेह.

मयूरपक्षेंनिर्दग्ध्वातद्भस्ममधुमिश्रितं ॥
लीढंनिवारयत्याशुच्छर्दिंसोपद्रवामपि ॥

अर्थ—मोराचीं पिसें जाळून भस्म करून तें भस्म मधाबरोबर चाटावें. तें उपद्रवांसहित छर्दि निवारण करील.

गोण्याद्यभस्मयोग.

पुराणगोणिभस्मांभोमधुयुक्तंनिपीयतु ॥
छर्दिंछनात्तिमनुजस्तृणान्येवहुताशनः ॥

अर्थ—पुराणगोणीचें भस्म पाण्यांत घालून गाळून त्यांत मध घालून प्यावें, तें छर्दिनाश करितें, जसा अग्नि तृणाचा नाश करतो.

पटोलाद्यघृत.

पटोलशुंठ्योःकल्काभ्यांकेवलंकुलकेनवा ॥
घृतप्रस्थंविपक्तव्यंकफपित्तवमिंहरेत् ॥

अर्थ—पडवळ व सुंठ, यांचे कल्काबरोबर, अथवा केवळ पडवळाचे कल्काबरोबर ६४ तोळे तूप कढवून ते तूप प्यावें; ह्मणजे कफपित्तापासून झालेली ओकारी बंद होईल.

रंभाकंदयोग.

रंभाकंदरसोवापिमधुनाच्छर्दिनाशकृत् ॥

अर्थ—केळीचे कांद्याचा रस मधाबरोबर प्यावा, हा योग छर्दिनाशक आहे.

दधित्थरसादिलेह.

दधित्थरससंयुक्तंपिप्पलीमाक्षिकंतथा ॥
मुहुर्मुहुर्नरोलिह्याच्छर्दिभ्यःप्रतिमुच्यते ॥

अर्थ—कंवठाच्या रसांत मध, पिंपळी घालून वारंवार चाटावी; ह्मणजे छर्दिपासून मुक्त होईल.

करंजादिलेह.

कोमलकरंजपत्रंसलवणमम्लेनसंयुक्तं ॥
यःखादतिदीनवदनोच्छर्दिकफौतस्यकुत्रेह ॥

अर्थ—करंजाची कोवळीं पानें, महाळुंग व सैंधव यांचा कल्क खावा; ह्मणजे ओकून दीनवदन जरी असेल, तरी त्याला छर्दि व कफ राहाणार नाहींत.

करंजबीजादि योग.

ईषत्भृष्टंकरंजस्यबीजंखंडीकृतंपुनः ॥
मुहुर्मुहुर्नरोभुक्त्वाछर्दिंजयतिदुस्तरां ॥

अर्थ—करंजाची बी किंचित भाजून तुकडे करून वारंवार खावी, ती दुस्तरछर्दीचें निवारण करील.

शंखपुष्पीरसादिपान.

शंखपुष्पीरसंटंकद्वयंसमरिचंमुहुः ॥
सक्षौद्रंमनुजःपीत्वाछर्दिभ्यःकिलमुच्यते ॥

अर्थ– शंखाहुलीचा रस दोन तोळे मध व मिरपूड घालून प्यावा; ह्मणजे छर्दिपासून निश्चयें करून मुक्त होईल.

जीरकादिधूप.

जीरान्वितंपट्टवस्त्रंवर्तिंकृत्वाथधूपयेत् ॥
आघ्राणाद्विलयंयांतिसर्वाश्छर्द्यश्चिरोद्भवाः ॥

अर्थ–पितांबराचे फडक्यांत जिरे घालून विडी करून पेटवून नाकानें ओढावी, तेणें करून फारदिवसांची छर्दि नाश पावेल.

वांतिल्हृद्रस.

अयःशंखबलीसूतःखल्वेतुल्यंविमर्दयेत् ॥ कन्याकनकचांगेरीरसै गोलंविधायच ॥ तप्तमृत्कर्पटैर्लिप्त्वापुटितोवांतिल्हृद्रसः ॥ द्विव ल्लःकृमिरोगेपिसाजमोदःसवेल्लकः ॥ वांतिहारेणमुनिनाप्रोक्तोयंम धुनायुतः ॥ पिप्पलक्षारपानीयंपाययेद्वांतिल्हृद्भिषक् ॥

अर्थ–लोखंडाचें चूर्ण, शंखाचें चूर्ण, गंधक व पारा हीं सर्व समभाग खलांत घालून कोरफड, धोत्रा व चुका यांचे रसांत पृथक् खलून गोळा करून त्या गोळ्या भोंवतीं तात मातकपडे करून गजपुट द्यावें; ह्मणजे हा वांतिल्हृद्रस होतो, हा दोन वाल प्रमाणें अजमोदा व वावडिंग यांच्या बरोबर कृमीवर आणि मधाबरोबर वांतीवर द्यावा; व पिंपळाच्या खाराचे पाणी पाजावें, तें वांतिनाशक आहे. हा रस वांतिहार या नावाचा ऋषि होता त्याणें सांगितला आहे.

जातीरसपान.

जात्यारसःकपित्थस्यपिप्पलीमरिचान्वितः ॥
क्षौद्रेणयुक्तःशमयेल्लेहोयंछर्दिमुल्बणां ॥

अर्थ–जाईचा रस, कंवठाचा रस, पिंपळी व मिरीं, यांचा लेह आंत मध घालून द्यावा, हा फारउग्रवांतिचा नाश करितो.

यष्ट्यादिपान.

यष्ट्याव्हाचंदनोपेतंसम्यक्क्षीरेणपेषितं ॥
तेनैवालोड्यपातव्यंरुधिरच्छर्दिनाशनं ॥

अर्थ–ज्येष्ठीमध व चंदन, हे दुधांत उगाळून व दुधांत कालऊन प्यावें; ह्मणजे रक्ताच्या वांतीचा नाश करितात.

गुडूच्यादिहिम.

गुडूच्यारचितंहंतिहिमंमधुसमन्वितं ॥
दुर्निवारामपिच्छर्दिंत्रिदोषजनितांवलात् ॥

अर्थ–गुळवेलीचा हिम करून त्यांत मध घालून द्यावा; ह्मणजे दुर्निवार वांतीचा ही नाश करितो.

पारदादिचूर्ण.

रसवलिघनसारकोलमज्जामरकुसुमांवुधरप्रियंगुलाजाः ॥
मलयजमगधात्वगेलपत्रंदलितमिदंपरिभाव्यचंदनाद्भिः ॥
मधुमरिचयुतंरजोस्यमाषंजयतिवमिंप्रवलांविलिह्यमर्त्यः ॥

अर्थ–पारा, गंधक, कापूर, बोराचा मगज, लवंगा, नागरमोथे, कांग, लाह्या, कृष्णागरु, पिंपळी, दालचिनी, वेलदोडा व तमालपत्र यांचें चूर्ण चंदनाचे काढयाच्या भावना देऊन तें मध व मिरपुड यांचे बरोबर एक मासा खावें; ह्मणजे मोठी प्रबल ओकारी नाश पावत्ये.

जीरकादिरस.

अजाजीधान्यपथ्याभिःसक्षौद्रैःसकटुत्रिकैः ॥
एतैःसार्धंसूतभस्मसद्योवांतिंविनाशयेत् ॥

अर्थ–जिरें, धने, हिरडे व त्रिकटु यांचें चूर्ण व मध, यांच्या सहवर्तमान पाऱ्याचे भस्म सेवन केलें असतां; तात्काळ वांतिनाश करील.

वमनामृतयोग.

गंधकःकमलाक्षश्चयष्टीमधुशिलाजतु ॥ रुद्राक्षोटंकणश्चैवसारंगस्यचशृंगकं ॥ चंदनंचतवक्षीरीगोरोचनमिदंसमं ॥ विल्वमूलकषायेण मर्दयेद्याममात्रकं ॥ मात्रांचैवप्रकुर्वीतवल्लस्यैवप्रमाणतः ॥ नानाविधानुपानेनच्छर्दिंहंतित्रिदोषजां ॥ वमनामृतयोगोयंकमलाकरभाषितः ॥

अर्थ–गंधक, कमलाक्ष, जेष्ठीमध, शिलाजित, रुद्राक्ष, टांकणखार, हरणाचें शिंग, चंदन, तवखीर व गोरोचन हीं सर्व समभाग घेऊन चूर्ण करून बेलाच्या मुळांचे काढयांत प्रहरभर खलवें; नंतर एकवालभारप्रमाणाची मात्रा नानाप्रकारचे अनुपानाबरोबर सेवन केली असतां; त्रिदोषाची छर्दि नाश पावेल. ह्याला वमनामृतयोग ह्मणतात. हा योग कमलाकर ह्मणून कोणी एक होता, त्याणे सांगितला आहे.

छर्दिपथ्य.

विरेचनंछर्दनलंघनानिस्नानंजपोलाजकृतश्चमंडः ॥ पुरातनाःशालिक
षष्टिमुद्गाकलायगोधूमयवामधूनि ॥ शशाहिभुक्तित्तिरिलावकाद्यामृग
द्विजाजांगलसंज्ञिताश्च ॥ मनोज्ञनानारसगंधरूपारसाश्चयूपाअपिखां
डवाश्च ॥ गवांजलंकांवलिकाःसुराचवेत्राग्रकुस्तुंवरिनारिकेरं ॥ जं
वीरधात्रीसहकारकोलद्राक्षाकपित्थानिपचेलिमानि ॥ हरीतकीदाडि
मबीजपूरंजातीफलंवालकनिंबवासा ॥ सिताशताव्हाकरिकेसराणिभ
क्ष्यामनःप्रीतिकराहिताश्च ॥ भुक्तस्यवक्त्रेशिशिरांबुसेकःकस्तूरिकाचंदन
मिंदुपादाः ॥ मनोज्ञगंधान्यनुलेपनानिपानानिपुष्पाणिफलानिचापि ॥
रूपाणिशब्दाश्चरसाश्चगंधाःस्पर्शाश्चयोज्याःस्वमनोनुकूलाः ॥ दाहश्च
नाभेस्त्रिकपार्श्वपृष्ठेशस्तंहिपथ्यंवमनातुरस्य ॥

अर्थ–रेचक, वमन, लंघन, स्नान, जप, लाह्यांचा मंड, आणि जुने साटकीचे तांदू-
ळ, साठेमूग, वाटाणे, गहुं. यव, मधें; व ससा, मोर, तित्तिर, लावे इत्यादि जंगलांतील
मृग व पक्षी यांचीं मांसें, व चांगले अनेकप्रकारचे रस व सुवास रस, यूष, रागखांडव
गोमूत्र, आणि (कांवलिक ह्मणून मुळे व फळें यांचे कढण काढून त्यांत समभाग तिळ पु
ष्पाची आंव घालावी तो), मद्य, वेंशांकुर, धने, नारळ, जांबीर, आवळे, आंबे, बोरें, द्राक्षें,
कंवठ, उडीद, हरीतकी, डाळिंब, महाळुंग, जायफळ, वाळा, कडुनिंब, अडुळसा, सा-
कर, वडीशेप, नागकेशर व मनाला प्रीतिकरणारे, आणि हितकारक पदार्थ, भोजनोत्तर
मुखांत थंड पाणी शिंपणें, कस्तुरी, चंदन, चांदणें, उत्तम गंध व मनाला अनुलोमन
करणारीं पानें व फळें, फुलें, मनाला प्रिय असे शब्द, स्पर्श, रूप, रस, आणि गंध, हे
योजावे; आणि तिडें, बेंबी, पार्श्व, आणि पाठ, यांचे ठिकाणी डाग द्यावा, हें वांतिरो
ग्याला पथ्य सांगितलें.

अपथ्य.

नस्यंवस्तिस्वेदनंस्नेहपानंरक्तस्रावंदंतकाष्ठंद्रवान्नं ॥ विपत्प्रेक्षांभी
तिमुद्वेगमुष्णंस्निग्धासात्म्यंत्हृद्यवैरोचकान्नं ॥ लंवाविंवीकोपवं
त्यौमधूकंचित्रामलीसर्पपादेवदाली ॥ व्यायामंवासात्म्यदुष्टान्नपा
नंछर्दीसयोवर्जयेदप्रमत्तः ॥

अर्थ–नस्य, बस्तिकर्म, घाम, स्नेहपान, रक्तस्राव, दंतकाष्ठ, पातळ अन्न, आकाशाचें अवलोकन, भय, उद्वेग, ऊन, स्निग्ध, असात्म्य, अप्रिय, अरुचिकारक असें अन्न, दुधभोंपळा, तोंडलीं, दोडकीं, ज्येष्ठमध, मोगरी, शिरस, देवडांगरी, व्यायाम, असात्म्य व खराब असें अन्न व पाणी, हे पदार्थ वांतिरोग्यानें सावध पणानें वर्जावे.

तृष्णाकर्मविपाक.

पथिचाध्वपरिश्रांतंब्राह्मणंगामथापिवा ॥
नपाययेज्जलंयस्तुसतृष्णामूर्छितोभवेत् ॥

अर्थ–जो मनुष्य ब्राह्मण किंवा गाई मार्गामध्यें श्रांत होऊन ताहानेनें पीडित झालों त्यांला पाणी पाजीत नाहीं त्याला तृष्णारोग उत्पन्न होतो.

पानीयंपायसंभुक्त्वाशर्कराघृतसंयुता ॥
इदमावश्यतोदेयंमूर्छातृष्णोपशांतये ॥

अर्थ–पाणी, दूध किंवा तूपसाखर हे पदार्थ ब्राह्मणाला अवश्य द्यावे व भक्षावे; म्हणजे तृष्णाजनित मूर्छेचा नाश होतो.

तृष्णानिदान.

भयश्रमाभ्यांबलसंक्षयाद्वाऊर्ध्वंचितंपित्तविवर्धनैश्च ॥
पित्तंसवातंकुपितंनराणांतालुप्रपन्नांजनयेत्पिपासां ॥

अर्थ–भय, श्रम व बलक्षय यांणीं वायु कुपित होतो, तो पित्त वाढवणारे पदार्थांच्यासंबंधेंकरून पित्त स्थानीं म्हणजे हृदयाचे ठायीं संचित होऊन नंतर ऊर्ध्वगतिक होऊन वातासहवर्तमान मनुष्याचें तालुमूल व पिपासास्थान यांप्रत जाऊन तृष्णा उत्पन्न करितें, तालुमूल म्हणजे गळा.

तृष्णार्दिताचें स्वरूप.

सततंयःपिबेत्तोयंनतृप्तिमधिगच्छति ॥
पुनःकांक्षतितोयंचतंतृष्णार्दितमादिशेत् ॥

अर्थ–जोमनुष्य वारंवार पाणी पिऊन तृप्त होत नाहीं; व पुनःपुनः जलप्राशनाची इच्छा करितो, त्याला तृष्णारोगी म्हणावा.

तृष्णासंप्राप्ति.

अ.तःस्वपांवाहिषुदूषितेषुदोषैश्चतृट्संभवतीहजंतोः ॥
तिस्रःस्मृताःसाक्षतजाचतुर्थीक्षयात्तथाह्यामसमुद्भवाच ॥
भक्तोद्भवासप्तमिकेतितासांनिबोधलिंगान्यनुपूर्वशश्च ॥

अर्थ-वातादि दोषांनीं उदक वाहिनी शिरा दूषित झाल्या; असतां मनुष्याला तहान उत्पन्न होत्ये, ती वातादि दोषांनीं तीन प्रकारची, क्षतापासून चवथी, क्षयापासून पांचवी, आमापासून सहावी, आणि अन्नापासून सातवी, त्यांची अनुक्रमाने लक्षणें सांगतों.

वातजतृष्णानिदान.

क्षामास्यतामारुतसंभवायांतोदस्तथाशंखशिरस्सुचापि ॥ स्रोतोनिरोधोविरसंचवक्त्रंशीताभिरद्भिश्चविवृद्धिमेति ॥ ताल्वोष्ठकंठस्यच तोददाहसंतापमोहभ्रमविप्रलापाः ॥ पूर्वाणिरूपाणिभवंतितासामुत्पत्तिकालेषुविशेषतोहि ॥

अर्थ-वातसंभवतृष्णेचे ठायीं मुख म्लान होतें, शंख व मस्तक यांस पीडा होत्ये, रसवाहिनीशिरांचा निरोध होउन तोंड विरस होतें; आणि ही तृष्णा शीतोदकप्राशनेंकरून फार वाढत्ये; व तालु, ओष्ठ व कंठ यांस शूल व दाह होतो; आणि संताप, मोह, भ्रम व प्रलाप इत्यादिक वाततृष्णेचीं लक्षणें जाणावीं.

वाततृष्णाजयप्रकार.

वातघ्नमन्नपानमिष्टंलघुशीतंचवाततृष्णायां ॥
स्याज्जीवनीयसिद्धंक्षीरघृतंवातजेतर्षे ॥

अर्थ-वातनाशक, लघु व शीतळ असे अन्न, पान आणि जीवनीयगणाने सिद्ध केलेलें दूध व तूप हें वाततृष्णेवर प्रशस्त आहे.

दुसरा प्रकार.

वातोद्भवायांतृष्णायांपानान्नंवातनुत्प्रशस्तं ॥
स्वर्णरूप्यैरग्नितप्तैर्लोष्टैःसोष्टाजलंतथा ॥

अर्थ-वातोत्पन्न तृष्णेवर वातनाशक पान, अन्न, अथवा सुवर्णाच्या, लोष्टाच्या किंवा रुप्याच्या योगानें अग्नीवर तापलेलें पाणी द्यावें.

तेल.

देयंसुगंधितैलंशिरसिचगात्रेषुसर्वेषु ॥

अर्थ- मस्तकावर आणि सर्वांगास सुगंधि तेल लावावें.

पाणी.

सुवर्णरौप्यादिभिरग्नितप्तैर्लोष्टैःकृतंवांसिकतोत्करैर्वा ॥
जलंसुखोष्णंशमयेत्तुतृष्णांसशर्करंसक्षौद्रयुतंजलंवा ॥

अर्थ–सोनें, रुपें, मातीचें ढेकूळ व वाळू यांतून एकादें तापऊन पाण्यांत विझवून तें पाणी किंचित् उष्ण प्यावें; अथवा पाण्यांत मध व साकर घालून ते पाणी प्यावें; ह्मणजे तृषा शांत होइल.

पित्ततृष्णानिदान.

मूर्छान्नविद्वेषविलापदाहरक्तेक्षणत्वंप्रततश्चशोषः ॥
शीताभिनंदामुखतिक्तताचपित्तात्मिकायांमुखधूपनंच ॥

अर्थ–मूर्छा, अन्नविद्वेष, विलाप, दाह, नेत्रांस आरक्तता, अत्युत्कृष्ट तृष्णा, शीतप दार्थाची प्रीति, मुखाला कडुपणा, मुखांतून धूर निघाल्यासारिखा भास व विट्, मूत्र व नयन आदिकरून यांस पीतवर्णता हीं पित्ततृष्णेचीं पूर्वरूपें जाणावीं.

पित्ततृष्णाचिकित्सा.

पित्तजायांसितायुक्तःपक्वोदुंबरजोरसः ॥

अर्थ पित्तापासून तृषा असली तर, पिकलेले उंबराचा रस साखरेसहित प्यावा.

स्वादुतिक्तंद्रवंशीतंपित्ततृष्णापहंपरं ॥
आतपात्संशृतंपथ्यमुदकंलाजसक्तुभिः ॥

अर्थ–स्वादु, कडु, पातळ व थंड अशा जा वस्तु त्या तृष्णाहारक आहेत; आणि उन्हांत तापलेल्या पाण्यांत लाह्यांचें पीठ घालून तें पाणी हितकारक आहे.

तंदुलोदकपान.

जीर्णेभुक्तेपिवेद्वापिसक्षौद्रंतंदुलोदकं ॥

अर्थ–भोजन जिरल्यावर तृषा लागली तर, तांदुळाचे धुवणांत मध घालून तें प्यावें.

मधूकादिफांट.

मधूकपुष्पंगंभारीचंदनोशीरधान्यकैः ॥ द्राक्षयाचकृतःफांटःशीतः शर्करयापुनः ॥ तृष्णापित्तहरःप्रोक्तोदाहमूर्छाभ्रमान्जयेत् ॥

अर्थ–मोहाचीं फुलें, थोर शिवण, चंदन, वाळा, धने व मनुका यांचा फांट थंड करून साकर घालून प्यावा, तो तृष्णा, पित्त, दाह, मूर्छा व भ्रम यांचा नाशक आहे.

कफतृष्णानिदान.

वाष्पावरोधात्कफसंवृतेग्नौतृष्णाबलासेनभवेत्तथातु ॥

निद्रागुरुत्वंमधुरास्यताचतृष्णार्दितःशुष्यतिचातिमात्रं ॥

अर्थ–कांहीं एक कारणेकरून नयनोदकाचा अवरोध झाला असतां; कफानें जठराग्नि व्याप्त होऊन तृष्णा उत्पन्न होत्ये, त्या तृष्णेमध्यें निद्रा, मस्तकास जडपणा, तोंड गोडील, हीं लक्षणें व तो रोगी तृष्णेकरून पीडित होऊनाता फार कृश होतो, असे जाणावें.

कफतृष्णासामान्यचिकित्सा.

तिक्तद्रवंकटुष्णंचकफतृष्णानिवारणं ॥
अन्नपानौषधंसर्वंप्रदद्यात्कफतृड्युते ॥

अर्थ–कडु, पातळ, किंचित्उष्ण, कफ व तृष्णानिवारक असें अन्न, पान व औषध कफतृष्णेवर द्यावें.

बिल्वादिकाढा

बिल्वाढकीधातकिपंचकोलदर्भैपुसिध्धंकफजांनिहंति ॥
हितंभवेच्छर्दनमेवचात्रतप्तेननिंबप्रसवोदकेन ॥

अर्थ–बेलफळ, तुरी, धायटीची फुलें, सुंठ, मिरें, पिंपळी, चवक, चित्रक, दर्भमूळ व तिळकांडें, यांचा काढा द्यावा; आणि कडुलिंबाच्या पाल्याच्या काढ्याचें वमन द्यावें; ह्मणजे कफवांतीचा नाश होऊन हित होईल.

कफतृष्णाप्रयोग.

यथोक्तंकफतृष्णायांछर्दीतथैवकार्यस्यात् ॥ स्तंभारुच्यविपाकालस्यच्छर्दिषुकफानुगांतृष्णां ॥ज्ञात्वामधुदधितर्पणलवणेनजलैर्वमनमश्लक्ष्णं ॥ दाडिममम्लफलंवान्यासकषायमवलेहं॥ पयोथवाप्रदद्याद्रजनीमधुशर्करायुक्तं ॥

अर्थ–जसें कफतृष्णेचे ठायीं औषध सांगितलें असेल, तसेंच छर्दीचें ठायीं करावें; व स्तंभ, अरुचि, अजीर्ण, आलस्य व छर्दि यांच्या ठिकाणीं जी तृष्णा असत्ये ती, कफसबंधाची असत्ये; ह्मणून मधु व दहीं अशा तृप्तिकारक वस्तु द्याव्या; व मीठ, पाणी, इत्यादिकांनीं वमन द्यावें; आणि डाळिंब, कोकंब, किंवा आणखी दुसरें कांहीं तुरट पदार्थ चाटावयाला द्यावे; अथवा हळद व साकर, घालून दूध द्यावें.

क्षतजतृष्णानिदान.

क्षतस्यरुक्शोणितनिर्गमाभ्यांतृष्णाचतुर्थीक्षतजामतातु ॥

अर्थ–क्षतसंबंधीं वेदना व रक्तस्राव यां पासून जी होत्ये, ती चवथी क्षतज तृष्णा जाणावी.

क्षतजतृष्णाचिकित्सा.

क्षतोद्भवांसृग्विनिवारणेनजयेद्रसानामसृजश्चपानैः ॥

अर्थ-क्षतापासून तृषा होत्ये, तीचें क्षतनिवारणानें निवारण करावें; आणि औषधीरसाच्या पानानें रक्ताचें निवारण करावें.

क्षयजतृष्णानिदान.

१८क्षयाद्धाक्षयसंभवासातथाभिभूतस्तुनिशादिनेषु ॥

पेपीयतेंभःसमुखंनयातितांसन्निपातादितिकेचिदाहुः ॥

रसक्षयोक्तानिचलक्षणानितस्यामशेषेणभिषक्चिकित्सेत् ॥

अर्थ-रसादिधातूंच्या क्षयेंकरून तृष्णा उत्पन्न होत्ये, ती क्षयजा जाणावी. तिणें व्याप्त मनुष्य रात्रंदिवस उदकपान करीत असतांही तृप्ति पावत नाहीं, हिला कोणी वैद्य संनिपातजन्या ह्मणतात, हिचे ठायीं रसक्षयसंबंधी सर्व लक्षणें असतात, असें जाणावें.

क्षयजतृष्णा.

क्षयोत्थितांक्षीरजलंनिहन्यान्मांसोदकंवामधुकोदकंवा ॥

अर्थ-क्षयापासून जी तृषा होत्ये, ती दुधाच्या काढ्यानें, किंवा मांसरसानें, किंवा जेष्टीमधीचे काढ्यानें शांत करावी.

आमजतृष्णानिदान.

त्रिदोषलिंगाममसमुद्भवाचहृच्छूलनिष्ठीवनसादकर्त्री ॥

अर्थ-आमजातृष्णेचे ठाईं वात, पित्त, कफ या तिघांचीं लक्षणें असतात; व ही तृष्णा हृच्छूल, कृशत्व, वमन, याहीं करून युक्त असत्ये, असें जाणावें.

आमजतृष्णा.

आमोद्भवांबिल्ववचायुतानांजयेत्कषायैरपिदीपनानां ॥

उल्लेखनैर्गुर्वशनप्रजातांजयेत्क्षतोत्थांतुविनापिपासां ॥

अर्थ-आमांशापासून जी तृषा होत्ये, ती बेलफळ व वेखंड, याणी युक्त जे दीपन काढे, त्याणीं जिंकावी; आणि गुरुपदार्थभक्षणानें जी होत्ये, ती लंघनपदार्थांनीं जिंकावी; परंतु ती क्षतापासून नसली तर.

अन्नजातृष्णानिदान.

स्निग्धंतथाम्लंलवणंचभुक्तंगुर्वन्नमेवाशुतृषांकरोति ॥

अर्थ-स्निग्ध, आम्ल, गुरु यांच्या भक्षणेंकरून तृष्णा उत्पन्न होत्ये, तिला अन्नजा ह्मणतात.

अन्नजाचिकित्सा.

स्निग्धान्नेभुक्तेयातृष्णास्यात्तांगुडांबुनाशमयेत् ॥
अतिरूक्षकदुर्बलानांतृषांशमयेन्नृणामिहांबुपयः ॥

अर्थ–स्निग्ध अन्नाच्या भक्षणानें जी तृषा होते, ती गुळाचे पाण्यानें शांत करावी; आणि अतिरूक्ष व दुर्बल अशा मनुष्यांची तृषा वाळयाच्या काढ्यानें शांत करावी.

उपद्रव व असाध्यलक्षण तृष्णा.

दीनस्वरःप्रताम्यंदीनाननसंशुष्कहृदयगलतालु ॥ भवतिखलुसोपसर्गातृष्णासाशोषिणीकष्टा ॥ ज्वरमोहक्षयकासश्वासाद्युपसृष्टदेहानां ॥ सर्वास्त्वतिप्रसक्तारोगकृशानांवमिप्रसक्तानां ॥ घोरोपद्रवयुक्तातृष्णामरणायविज्ञेया ॥

अर्थ–उपसर्गजतृष्णेचे ठायीं, म्लान भाषण, मोह, मुखग्लानि व गळा, तालु व हृदय यांना शोष, इत्यादि उपद्रव होतात. अशी ही शोष व कष्टकरणारी तृष्णा जाणावी. व ज्वर, मोह, क्षय, श्वास व कास यांहीकरून युक्त ती असाध्य जाणावी. तशाच सर्व तृष्णा अति वाढल्या असतां व रोगी कृश झाला असतां व ओकारीनें व्याप्त झाला असतां त्याला तृष्णा मारिते, असें जाणावें.

जलपाननियम.

सात्म्यान्नपानभैषज्यैस्तृष्णार्तस्यजयेत्तृषां ॥ तस्यांजितायामन्योपिव्याधिःशक्यश्चिकित्सितुं ॥ तृषितोमोहमायातिमोहात्प्राणान्विमुंचति ॥ तस्मात्सर्वास्ववस्थासुनक्वचिद्वारिवार्यते ॥ अन्नेनापिविनाजंतुःप्राणान्संधारयेत्क्वचित् ॥ तोयाभावेपिपासार्तःक्षणात्प्राणैर्विमुच्यते ॥

अर्थ–प्रकृतीस मानलेलें जे अन्न, पान व औषध याणीं तृषार्त मनुष्याची तृषा जिंकावी. ती जिंकली असतां दुसरा व्याधि जिंकण्यास शक्य होतो; नाहींतर तृषित मनुष्य मोह पावतो; आणि मोहापासून प्राण सोडतो, यास्तव सर्व अवस्थांचा ठाईं कधींही उदक बंद करूं नये. अन्नावांचून ही एकादा प्राण धारण करील; परंतु तृषार्त मनुष्य पाण्यावांचून क्षणमात्र प्राण धारण करणार नाहीं.

गंडूष.

पटोलीमूलिकासार्द्रातुवरीमधुयष्टिका ॥ क्रमुकंचिक्कणंकंदःश्छल्लीच खदिरान्विता ॥ कटुकीरवराजोत्थक्वाथोमीषांसुशीतलः ॥ गंडूषधारणात्धंतिगलशोषंसुदारुणं ॥

अर्थ—कडूपडवळीचें ओलें मूळ, तुरी, ज्येष्ठीमध, चिकणी सुपारी, ताहानवेलीचा, कंद, खदिर व गठोना यांचा काढा करून तो थंड झाल्यावर तोंडांत धरण्यास द्यावा; ह्मणजे दारुण गलशोषाचा नाश करितो.

गंडूप.

श्रीखंडंपद्मकंमुस्तधान्यकंनिंबवल्कलं ॥ कूष्मांडंखदिरोदूर्वामूलं कितवराजकं ॥ अष्टावशेषितोमीषांक्वाथःशीतलतांगतः ॥ गंडूपकरणात्घंतिरोगिणःशोकमुल्बणं ॥

अर्थ—चंदन, पद्मकाष्ठ, नागरमोथे, धने, निंबाची साल, कोंहळा, खेरसाल, दूर्वा व पांढरा धोतरा, यांचा अष्टमांश काढा करून थंड झाल्यावर गंडूषधारणार्थ द्यावा; ह्मणजे तो रोग्याचा वाढलेल्या शोषाचा नाश करितो.

लेप.

जलंमलयजंरक्तचंदनंपद्मकेसरं ॥
उशीरेणांचितैर्लेपोमस्तकेतृड्निवारणः ॥

अर्थ—वाळा, मलयागर, रक्तचंदन, पद्मकेशर व काळा वाळा यांचा मस्तकावर लेप करावा; ह्मणजे तो तृष्णेचें निवारण करितो.

चूर्ण.

कणाजीरंसितानागकेसरंदाडिमीफलं ॥
मधुनाभक्षणादेषांरोगोगच्छतिरोगिणः ॥

अर्थ—पिंपळी, जिरें, साकर, नागकेसर व डाळिंब, यांचें चूर्ण मधाशीं द्यावें; ह्मणजे तृष्णानिवारण करितो.

कुष्ठादिचूर्ण.

कुष्ठंकासोद्भवंमूलंमधुकंपिष्टमंजसा ॥
भक्षितंतद्ध्रुतंहंतिपिपासांचिरकालजां ॥

अर्थ—कोष्ठकोळिंजन, काशिवद्याचें मूळ व ज्येष्ठीमध ही पाण्यांत वांटून द्यावीं; ह्मणजे फार दिवसांची तृषा शांत होते.

चूर्ण.

कुशःकुष्टजतुर्यष्टीलाजातप्तेनवारिणा ॥
पीतोचूर्णस्तृषांहंतिशोकसंतापसंभवां ॥

अर्थ—कुशमूळ, कोष्ठ, लाखें, ज्येष्ठीमध व लाह्या यांचें, चूर्ण करून पाण्यांशीं द्यावें; ह्मणजे शोक व संताप यां पासून झालेल्या तृषेची शांति करितें.

वटाद्यवलेह.

वटबालाशिवाकृष्णामधुकंमधुनासह ॥

अवलेहःकृतोमीषांतृषारोगोविनश्यति ॥

अर्थ—वडाचे पारंबे, हरीतकी, पिंपळी व ज्येष्ठीमध यांचा लेह मधाशीं द्यावा; ह्मणजे तृषारोग नाश पावतो.

दुसरा प्रकार.

वटशृंगासितालोध्रंदाडिमंमधुकंमधु ॥

पिबेत्तंदुलतोयेनतृष्णाच्छर्दिनिवारणं ॥

अर्थ—वडाचे पारंबे, साकर, लोध्र, दाळिंब व मधुकाष्ठ यांचा कल्क मध घालून तांदुळांच्या धुवणांत प्राशनार्थ द्यावा; ह्मणजे ताहान व ओकारी यांचा नाश होतो.

अवलेह.

अर्धावर्तितपानीयंसलाजैःशीतलंमधु ॥

तवराजयुताद्राक्षामुखेक्षिप्तातृषांजयेत् ॥

अर्थ—पाण्यांत लाह्या घालून निमें आटें तोंपर्यंत कढवून थंड झाल्यावर त्यांत मध घालून द्यावा; किंवा द्राक्षें व साकर यांची गोळी तोंडांत धरण्याकरितां द्यावी; ह्मणजे तृषा नाश पावत्ये.

ताम्रादिरस.

ताम्रंचक्रिकयावत्थंसूतंतालंसतुत्थकं ॥

वटांकुररसैर्मर्द्यंतृष्णानुल्लवमात्रया ॥

अर्थ—ताम्रभस्म, पारा, हरताळ, आणि मोरचूत हे वटांकुराच्या रसांत खलून त्याची चक्रिका बांधून पुट द्यावें, त्यांतून लवमात्र द्यावें; ह्मणजे ताहानेचा नाश होतो.

श्रीखंडयोग.

अर्धाढकंरुचिरपर्युषितस्यदध्नःखंडस्यषोडशपलानिशशिप्रभस्य॥ सर्पिःपलंमधुपलंमरिचंद्विकर्षंशुंठ्यापलार्धमपिचार्धपलंतृटेश्च ॥ श्लक्ष्णे पटेललनयामृदुपाणिघृष्टेकर्पूरधूलिसुरभीकृतचारुभांडे ॥ एषावृकोदरकृतासुरसारसालासुस्वादिताभगवतामधुसूदनेन ॥

अर्थ—पूर्वदिवसीं सुंदर विरजलेलें चक्का दहीं दोन शेर, पांढरी शुभ्र खडीसाकर १ शेर,

तूप ४ तोळे, मध ४ तोळे, मिरें २ तोळे, सुंठ २ तोळे व वेळाचे दाणे २ तोळे इत-के पदार्थ बारीक महुमदी फडक्यांत घालून कापराच्या चूर्णानें सुगंधित अशा पात्रामध्यें स्त्रीचे मृदु हस्तानें मर्दवावें. याला श्रीखंड ह्मणतात, हें सेवन केलें असतां; मनुष्याची तृषा शांत होत्ये, यास कोणी (रसाळा किंवा शिखरिणी) असें ही ह्मणतात, याप्रमाणेंच श्रीखंड पूर्वी भीमसेनानें केलें होतें, तें श्रीकृष्णानें मोठ्या आवडीनें भक्षण केलें.

आमलक्यादिगुटिका तृष्णादिकांवर.

आमलकमलंकुष्ठंलाजाश्चवटरोहकं ॥ एतच्चूर्णस्यमधुनागुटि

कांधारयेन्मुखे ॥ तृष्णांप्रवृद्धांहंत्येषामुखशोषंचदारुणं ॥

अर्थ—आवळकाठी, कमळ, कोष्ठ, साळीच्या लाह्या, वडाच्या कोंवळ्या पारंब्याच्या डिऱ्या या पांच औषधांचें चूर्ण मधांत मेळवून गोळी करून तोंडांत धरली असतां; तहान फार लागते ती व तोंडास कोरड फार पडते ती हीं दोन्हीं दूर होतात.

वटी.

उत्पलंमधुलाजाश्चवटरोहोगदस्तथा ॥

एतैःकृतावटीनित्यंतृष्णांनाशयतिक्षणात् ॥

अर्थ—निळें कमळ, मध, लाह्या, वटांकुर व कोष्ठ, यांची वटी मखांत धरावी, ती त त्क्षणीं तृषेचा नाशक करित्ये.

गुटी.

खर्जूरमृद्वीकमधुःसखंडंपृथक्पलंमागधिकात्रिगंधे ॥

तयार्धबिल्वेमधुनागुटीयंतृण्मोहपित्तास्रजयेतिशस्ता ॥

अर्थ—खजूर, द्राक्षें, ज्येष्ठीमध, खडीसाकर, हीं प्रत्येकीं ४ चार तोळे; पिंपळी, दालचिनी, तमालपत्र, एलची, हीं २ दोन तोळे यांची मधाशीं गोळी करून खावी, ती तृषा, मोह व रक्तपित्त, यांचा नाश करित्ये.

काश्मर्यादिकाढा.

काश्मर्यशर्करायुक्तंचंदनोशिरपद्मकं ॥

द्राक्षामधुकसंयुक्तंपित्ततृष्णोजलंपिबेत् ॥

अर्थ—लघुशिवणीचें फळ, साकर, चंदन, वाळा, पद्मकाष्ठ, मनुका व ज्येष्टीमध, यांचा काढा पित्तापासून तृषा लागते त्यावर प्रशस्त आहे.

जीरकादि चूर्ण.

सजीरधान्यार्द्रक शृंगवेरसौवर्चलान्यर्धपरिप्लुतानि ॥

मद्यानिदद्यान्निचगंधवंतिपीतानिसद्यःशमयंतितृष्णां ॥

अर्थ—जिरें, धने, वेळू, आलें, पादेलोण याचें चूर्ण अर्ध पडें भिजेल इतकें मद्य, चांगलें सुगंधियुक्त प्यालें असतां तृष्णा शमेल.

आम्रादिकाढा.

आम्रजंबूकषायंवापिबेन्माक्षिकसंयुतम् ॥

छर्दिंसर्वांप्रणुदतितृष्णांचैवापकर्षति ॥

अर्थ—आंबा व जांबूळ यांचे सालीचा काढा मध घालून प्याला असतां; ओकारी, तृषा यांचा नाशक आहे.

द्राक्षादि नस्य.

गोस्तनीक्षुरसक्षीरयष्टिमधुमधूत्पलैः ॥

नियतंनस्यतोपीतैस्तृष्णाशाम्यतितत्क्षणात् ॥

अर्थ—काळीं द्राक्षें, ऊंस, दूध, जेष्टीमध, मध व कमळ यांचें नस्य केलें असतां; नेमानें त्याच क्षणीं तृष्णा शांत होत्ये.

जीरकादियोग.

जीरकुस्तुंबरीद्राक्षाचंदनोत्पलशीतलं ॥

शीतलेनसमंदद्यात्तृष्णांहंत्यतिशीतलं ॥

अर्थ—जिरें, धने, मनुका, चंदन, कापूर, हीं सर्व वाटून थंड पाण्याबरोबर प्यावीं. म्हणजे तृष्णानाश होईल.

कोष्ठादियोग.

स्फुग्लाजाब्दवटप्ररोहमधुकैर्मध्वन्वितैःकल्पितान्युग्रामा

शुतृपांभृशंप्रशमयेदास्यांतरस्थागुटी ॥

अर्थ—कोष्ठकोळिंजन, लाह्या, नागरमोथा, वडाचे अंकूर, जेष्टीमध, मध हीं एकत्र वाटून गोळी करून तोंडांत धरावी; म्हणजे अतितृष्णा जरी असली तरी लौकर शांत होईल.

तप्तलोष्टादियोग.

निर्वापितंतप्तलोष्टकपालसिकतादिभिः ॥

तृष्णायांवमनोत्थायांसगुडंदधिशस्यते ॥

अर्थ—ढेंकूळ, खापरी व वाळू यांतून काहीं एक तापवून दह्यांत विझवून तें दहीं गूळ घालून प्यावें; म्हणजे वांतीपासून झालेली तृषा बंद होईल.

मंथादियोग.

आतपात्ससितंमंथंयवकोलजसक्तुभिः ॥
सर्वाण्यंगानिविलिंपेत्तिलपिण्याककांजिकैः ॥

अर्थ–उनापासून तृषा असली तर मठ्ठयांत साकर, सातु व बोरें यांचें पीठ घालोन प्यावा; आणि सर्वांगाला तिळांची पेंड व कांजी यांचा लेप करावा.

रोगोपसर्गजातायांधान्यांवुससितामधु ॥ वटप्ररोहयष्ट्याव्ह
कणामधुकृतावटी ॥ मुखस्थाचिरकालोत्थांतृष्णांहन्यात्सुदुस्तरां ॥

अर्थ–रोगाचे संबंधानें तृषा असली तर; धन्यांचें पाणी, मध, साकर घालून प्यावें; आणि फार वेळ तृषा लागून दुःसाध्य असली तर वडाचे पल्लव अथवा कोंवळ्या पारंब्या, जेष्टीमध, पिंपळी व मध यांची गोळी मुखांत धरावी.

रसादिगुटी.

रसरजतगुटींपटीयसींयोवदनसरोरुहमध्यगांदधाति ॥
सजयतितृषितस्तृषांमनुष्योभृशमघमिवत्रिमार्गगांभः ॥

अर्थ–पारा व रुपें, यांची खलुन घट्ट गोळी करून मुखकमलांत धरली असतां; तृषित मनुष्य आपल्ये तृषेचा जय करील, जसें तीन मार्गानीं जाणारें उदक ह्मणजे गंगा पातकाचा नाश करित्ये.

रसादिचूर्ण.

रसगंधककर्पूरैःशैलोशीरमरीचिकैः ॥ रसितैःक्रमवृद्धैश्चसूक्ष्मंकृत्वा
त्वहर्मुखे ॥ त्रिगुंजाप्रमितंखादेत्पिवेत्पर्युषितांबुच ॥ भृशंतृष्णांनि
हंत्येवमश्विभ्यांचप्रकाशितं ॥

अर्थ–पारा १, गंधक २, कापूर ३, शिलाजित ४, वाळा ५, मिरें ६ व साकर ७ याप्रमाणें भाग घेऊन वारीक करून तीन गुंजा प्रमाणें प्रातःकाळीं खावें; नंतर शिळें पाणी प्यावें; ह्मणजे अत्यंत तृष्णा नाश पावत्ये, हें अश्विनीकुमारानीं प्रगट केलें आहे.

लेप.

अरुणचंदनचंदनवालकैर्नलदपद्मकतुल्यकृतांशकैः ॥
शिरसिलेपनमाचरतांनृणांतृडपयात्युपशांतिमसंशयं ॥

अर्थ–रक्तचंदन, चंदन, वाळा, काळा वाळा व कमळ, हीं समभाग घेऊन वाटून त्यांचा मस्तकावर लेप करावा; ह्मणजे निश्चयेंकरून तृषा शांत होत्ये.

गुटी.

नीलांबुजाब्दमधुलाजवटावरोहैःश्लक्ष्णीकृतैर्विरचितागुटि
कामुखस्था ॥ तृष्णांनिवारयतितत्क्षणमेवतीव्रांमृत्योःस्पृहा
मिवयतेःपरमार्थचिंता ॥

अर्थ–काळें कमळ, नागरमोथा, मध, लाह्या व वडाच्या पारंब्या, हीं वाटून गोळी करून तोंडांत धरावी; ह्मणजे तत्क्षणींच तृषानिवारण करत्ये, जशी संन्याशाची परमार्थाविषयीं चिंता मृत्यूचे इच्छेचें निवारण करत्ये तशी.

उपसर्गतृष्णा सामान्यविधि.

तृष्णातिवृद्धावुदरेचपूर्णेसंछर्दयेन्मागधिकोदकेन ॥
विलोमसंचारहितंविधेयंस्याद्दाडिमाम्रातकमातुलिंगैः ॥

अर्थ–तृष्णा अतिवाढली आणि पाणी पिऊन पोट फार भरलें असतां; पिंपळीचे काढ्याचें वमन द्यावें; आणि वायूचा अनुलोम संचार होईल, असें हितकारक डाळिंब, आंबाडा व माहाळुंग, यांचें औषध करून द्यावें.

मधुरैःसंजीवनीयैःशीतैश्चसतिक्तकंशृतं ॥
क्षीरंपानाभ्यंजनसेकेत्विष्टंमधुशर्करायुक्तं ॥

अर्थ–मधुर, जीवनीयगण, शीत पदार्थ, कुटकी, यांणीं तयार केलेलें दूध, मध व साकर घालून त्याचें अभ्यंजन व सेक, यांविषयीं उत्तम आहे.

कसेर्वादिकाढा.

कसेरुशृंगाटकपद्मबीजबिसेक्षुसिद्धंससितंचवारि ॥
तृष्णांक्षतोत्थामपिपित्तजातांनिहंतिपीतंशिशिरीकृतंच ॥

अर्थ–कचोरा, शिंगाडे, कमळाक्ष, कमळाची देंठी व ऊंस यांचा शीत झालेला काढा साकर घालून घ्यावा; ह्मणजे क्षतापासून किंवा पित्तापासून झालेली तृष्णा नाश पावत्ये.

मधुयुक्तंजलंशीतंपिबेदाकंठमातुरः ॥
पश्चाद्वमेदशेषंतत्तृष्णातेनप्रशाम्यति ॥

अर्थ–मध व पाणी एकत्र करून कंठमर्यादा होसतो पर्यंत प्यावें; नंतर सर्व पाणी ओकून टाकावें, तेणेंकरून तृषा शांत होईल.

क्षौद्रादिगंडूष.

सक्षौद्रमाम्रजंबूत्थंपिबेत्क्वाथंसुपाचितम् ॥

सतृष्णोमधुनाकुर्याद्गंडूषान्शिशिरस्थितं ॥

अर्थ–आंवा व जांबूल यांचा काढा मध घालून थंड करून प्यावा; आणि मध व पाणी एकत्र करून त्याची चूळ भरावी; ह्मणजे तृषा शांत होत्ये.

क्षीरेक्षुरसमृद्वीकाक्षौद्रसिंधुगुडोदकैः ॥

सहवृक्षाम्लगंडूपस्तालुशोपतृडंतकृत् ॥

अर्थ–दूध, उसाचा रस, मनुका, मध, सैंधव, गूळ व उदक हीं एकत्र करून चूळ भरून टाकावी; ह्मणजे तालुशोष व तृषा यांचा नाश होतो.

लेप.

दाडिमदधिकपित्थलोध्रैःसविदारीबीजपूरकैःशिरसः ॥

लेपोगौरामलकैःशृतारनालयुतैःसहितैः ॥

अर्थ–डाळिंब, दहीं, कंवठ, लोध्र, भुईकोहोळा, माहाळुंग, कमळाचें केसर व आवळे हीं सर्व वाटून आंबिलींत कालवून मस्तकास लेप करावा; ह्मणजे पिपासा शांत होत्ये.

दुसरा प्रकार.

दाडिमंबदरंलोध्रंकपित्थंबीजपूरकं ॥

पिष्ट्वालेपःशिरस्येषांपिपासादाहनाशनः ॥

अर्थ–डाळिंब, बोर, लोध्र, कंवठ व माहाळुंग हीं वाटून त्यांचा मस्तकास लेप करावा; ह्मणजे पिपासा व दाह, हे शांत होतात.

पानात्ययजतृष्णा.

छागमांसरससाज्यशीतंसमधुशर्करं ॥

पीत्वाजयतिदुर्दाहमूर्छाच्छर्दिमदात्ययान् ॥

अर्थ–बोकडाचे मांसाचा रस, तूप, साकर व मध घालून प्यावा; तो दुस्तर दाह, मूर्छा, छर्दि व मदात्यय यांतें जिंकील.

तृष्णारोगपथ्य.

शोधनंवमनंनिद्रास्नानंकवलधारणं ॥ कोद्रवाःशालयःपेयविलेपीलाजसक्तवः ॥ अन्नमंडोधन्वरसःशर्करारागखांडवैः ॥ मृष्टमुद्गैर्मसूरैर्वाचणकैर्वाकृतोरसः ॥ रंभापुष्पंतक्रकूर्चद्राक्षापर्पटवल्कलं ॥ कपित्थंमालिकाकोलंकूष्मांडकमुपोदिका ॥ खर्जूरंदाडिमंधात्रीकर्कटीलल्लदंबुच ॥ जंबीरंकरमर्दश्चबीजपूरोगवांपयः ॥ मधूकपुष्पंन्ही

बेरंतिक्तानिमधुराणिच ॥ नालतालांबुसीतांबुपय:पेयंप्रपानकं ॥ माक्षिकंसरसीतोयंशताव्हानागकेसरं ॥ एलाजातीफलंपथ्याकुस्तुंबरिकुचंदनं ॥ घनसारोगंधसार:कौमुदीशिशिरोनिल: ॥ चंदनार्द्रप्रियाश्लेषोमुक्ताभरणधारणं ॥ गाहनंलेपनंचास्यपथ्यमेतत्तृषातुरे ॥

अर्थ—रेचन, वमन, निद्रा, स्नान, कवलधारण, हरीक, साळी, पेया, विलेपी, लाह्या व सातु, चवदापट पाणी घालून तादळांच्या शितांवांचून भात, निर्जलदेशांतील पशूंच्या मांसाचा रस, साकर व मध व मधुर दहीं एकत्र करून गाळावा तो रागखांडव; व मुगांचा, मसुरेचा, किंवा चण्याचा रस, केळफुलें, ताक, कूर्च, द्राक्षे, पित्तपापडा, वाल, कंवट, बोर, माला, कोहळा, मयाळ, खजूर, डाळिंब, आवळें, कांकडी, वाहतें पाणी, जांबीर, करवंद, महाळुंग, गाईचें दूध, मोहाचीं फुलें, वाळा, कडुरस, गोड, वाळ्याचें पाणी, ताडाचें पाणी, थंडपाणी, दूध, पनें, मध, तळ्याचें पाणी, शतावरी, नागकेशर, एलची, जायफळ, हरीतकी, धने, रक्तचंदन, कापूर, कापूरकाचरी,चांदणें,थंडवारा, चंदन लावलेल्या स्त्रिया, मोत्यांचे दागिने, नदींत स्नान करणें व लेपन हे तृषेनें आतुररोग्याला पथ्यास द्यावें.

तृष्णारोगअपथ्य.

स्नेहांजनंस्वेदनधूमपानंव्यायामनस्यातपदंतकाष्ठं ॥
गुर्वन्नमम्लंलवणंकषायंकटुत्रिकंदुष्टजलानितीक्ष्णं ॥
एतानिसर्वाणिहिताभिलाषीतृष्णातुरोनैवभजेत्कदाचित् ॥

अर्थ—आंगास तैलादिक लावणें, अंजन, घामकाढणें, धूमपान,व्यायाम, नस्य, निवर, दंतकाष्ठ, जडान्न, आंबट, खारट, तुरट हे रस, सुंठ, मिरीं, पिंपळी, खराब पाणी व तिखट हीं सर्व जा तृष्णातुररोग्याला हिताची इच्छा आहे, त्याणें कधीं सेवन करूं नयेत.

मूर्छाभ्रमनिद्रासंन्यासनिदान.

क्षीणस्यबहुदोषस्यविरुद्धाहारसेविन: ॥ वेगाघाताद्भीघाताद्धीनसत्वस्यवापुन: ॥ करणायतनेषूग्रावाह्येष्वाभ्यंतरेषुच ॥ निवसंते यदादोषास्तदामूर्छंतिमानवा: ॥

अर्थ—जो क्षीण झाला, ज्याचे वातादिक दोष वाढले व देश, काल; आणि प्रकृति यांला विरुद्ध आहार करणारा, मलमूत्रादिकांच्या वेगांला बंद करणारा, काष्ठादिकांचा आघात, ज्याचा सत्वगुण नष्ट झाला त्याच्या कर्मेंद्रियावर व ज्ञानेंद्रियावर दोष वाढतात, त्या कारणानें मूर्छा, ह्मणजे मोह उत्पन्न होतो.

संप्राप्ति.

संज्ञावहासुनाडीषुपिहितास्वनिलादिभिः ॥ तमोभ्युपैतिसहसासु
खदुःखव्यपोहकृत् ॥ सुखदुःखव्यपोहाच्चनरःपततिकाष्ठवत् ॥
मोहोमूर्छेतितामाहुःषड्विधासाप्रकीर्तिता ॥ वातादिभिःशोणिते
नमद्येनचविषेणच ॥ षट्स्वप्येतासुपित्तंतुप्रभुत्वेनावतिष्ठति ॥

अर्थ—ज्ञान वाहाणाऱ्या नाडी वातादिकांनीं आच्छादित झाल्या असतां; अकस्मात् सुखदुःखनाशक असा तमो गुण वाढतो, त्याणें संज्ञा नष्ट होऊन प्राणी काष्ठासारिखा निश्चेष्ट पडतो. त्याला मोह किंवा मूर्छा ह्मणतात. ती मूर्छा साहाप्रकारची. वातादि तीन दोषापासून ३ प्रकारची, व रक्त, मद्य, आणि विष, या तिघांपासून तीन प्रकारची, या साहा मूर्छांमध्यें वायु प्रधान असतो.

पूर्वरूप.

हृत्पीडाजृंभणंग्लानिःसंज्ञानाशोबलस्यच ॥
सर्वासांपूर्वरूपाणियथास्वंतंविभावयेत् ॥

अर्थ—हृदयांत पीडा, जांभया, ग्लानि, ज्ञानाचा नाश, आणि बलाचा नाश, हीं संपूर्ण मूर्छांची पूर्वरूपें जाणावी; आणि त्या वातादिमूर्छा जशा असतील तशा जाणाव्या.

वातादिमूर्छालक्षण.

नीलंवायदिवाकृष्णमाकाशमथवारुणं ॥ पश्यंस्तमःप्रविशतिशीघ्रं
चप्रतिबुध्यते ॥ वेपथुश्चांगमर्दश्चप्रपीडाहृदयस्यच ॥ कार्श्यंश्या
वारुणाछायामूर्छायेवातसंभवे ॥

अर्थ—वातजमूर्छेमध्ये निळें, काळें, किंवा अरुणवर्ण आकाश पाहून तमोगुणांत जातो. कांहीं जाणत नाहीं; आणि ही लौकर सोडितें; व कंप, आंगमोडे, हृदयशूल, कृशपणा व शरीराचा काळसर किंवा अरुण वर्ण, हीं लक्षणें होतात.

पित्तमूर्छानिदान.

रक्तंहरितवर्णंचवियत्पीतमथापिवा ॥ पश्यंस्तमःप्रविशतिसस्वेदश्च
प्रबुध्यते ॥ सपिपासःससंतापोरक्तपीताकुलेक्षणः ॥ जातमात्रेप्रपत
तिशीघ्रंचप्रतिबुध्यते ॥ सभिन्नवर्चाःपीताभोमूर्छायेपित्तसंभवे ॥

अर्थ—पित्तमूर्छेमध्यें, आकाश रक्तवर्ण अथवा हरित व पीतवर्ण असें पाहून मूर्छित होतो; घाम येऊन सावध होतो; व पिपासा, संताप, व नेत्रानां रक्त मिश्रित पीतवर्ण होतो,

ही मूर्छा होतांच पडतो, पुनः त्वरित सावध होतो; रोग्याचा मळ पातळ होतो; व शरीर पीतवर्ण होतें, असें जाणावें.

कफमूर्छा.

मेघसंकाशमाकाशमावृतंवातमोघनैः ॥ पश्यंस्तमःप्रविशतिचिराच्चप्रतिबुध्यते ॥ गुरुभिःप्रावृतंरंगैर्यथावार्द्रेणचर्मणा ॥ सप्रसेकःसहृल्लासोमूर्छागेकफसंभवे ॥

अर्थ—कफमूर्छेचा ठायीं मेघासारिखें, मोठ्या अंधकारानें युक्त, किंवा मेघानीं भरलेलें आकाश पाहातो; आणि मूर्छित होतो; व फार वेळानें सावध होतो; आणि ह्या रोग्याचें अंग पांघरुणानीं किंवा ओल्याचर्मानीं वेष्टिल्यासारिखें जड होतें, तोंडाला पाणी सुटतें, उमासे येतात, असें जाणावें.

संनिपातमूर्छानिदान.

सर्वाकृतिःसंनिपातादपस्मारइवापरः ॥
सजंतुंपातयत्याशुविनावीभत्सचेष्टितैः ॥

अर्थ—संनिपातमूर्छेचा ठायीं, पूर्वोक्तवातादिकांचीं लक्षणें होऊन अपस्मारासारिखी मूर्छा येऊन मनुष्याला त्वरित निश्चेष्ट पाडिते; परंतु अपस्मारांची जीं लक्षणें ह्मणजे तोंडास फेंस येणें, जीभ बाहेर काढणं, डोळे फिरवणें इत्यादिक लक्षणें हिचा ठायीं नाहींत.

रक्तमूर्छानिदान.

पृथिव्यापस्तमोरूपंरक्तगंधश्चतन्मयः ॥
तस्माद्रक्तस्यगंधेनमूर्छंतिभुविमानवाः ॥
द्रव्यस्वभावइत्येकेदृष्ट्वायदिचमूर्छंति ॥

अर्थ-पृथ्वी व उदक हीं तमोगुणाचीं रूपें आहेत; आणि रक्तगंध ही पृथ्वी व उदक रूप आहे; यास्तव रक्तगंध व दर्शन यांहीं करून मूर्छा उत्पन्न होते, कोणी आचार्य ह्मणतात; कीं वस्तुस्वभावच असा कीं ज्याचे दर्शनेंकरून मूर्छा येते.

विषमद्यमूर्छानिदान.

गुणास्तीव्रतरत्वेनस्थितास्तुविषमद्ययोः ॥
तएवतस्मादाभ्यांतुमोहौस्यातांयथेरितौ ॥

अर्थ—लघु, रुक्ष व तीक्ष्ण इत्यादि दाहा गुण तैलादिकांचा ठायीं असतात, तेच गुण विष व मद्य यांचा ठायीं तीव्रतर असतात, यास्तव विष व मद्य यांणीं मनुष्य मूर्छित होतात, तैलादिकेंकरून होत नाहींत, ती मूर्छा मद्यादिक जशी असतील तशी न्यूनाधिक होते, असें जाणावें.

रक्तादिमूर्छांचीं लक्षणें.

स्तब्धांगदृष्टिस्त्वसृजागूढोच्छ्वासश्चमूर्छितः ॥ मद्येनविलपन्शेतेनष्टविभ्रांतमानसः ॥ गात्राणिविक्षिपन्भूमौजरांयावन्नयातितत् ॥ वेपथुःस्वमतृष्णाःस्युस्तमश्चविषमूर्छिते ॥ वेदितव्यंतीव्रतरैर्यथास्वंविषलक्षणैः ॥

अर्थ—रक्तसंबंधी मूर्छेचा ठायीं मनुष्याची दृष्टि व अंग हीं स्तब्ध होतात, श्वास खोल जाऊन मूर्छित पडतो, मद्यसंबंधी मूर्छेचा ठायीं मनुष्य बडबड करितो, निजून राहातो, त्याचें अंतःकरण नष्ट होतें; अथवा भ्रांत होतो, हात व पाय अस्ताव्यस्त भूमीवर आपटितो; जों पर्यंत मद्य जीर्णावस्थेप्रत जाई तों पर्यंत असेंच करितो; विषमूर्छेचा ठायीं आंगास कंप सुटतो, निद्रा, तृष्णा, डोळयांपुढें अंधेरया ही येतात; व ही मूर्छा मूल, पत्र, फल, कंद, क्षीर. इत्यादि विषामधून जाविषाचें संबंधाची असेल, तशी तीव्र मंद व न्यून अशी जाणावी; आणि विष आपल्या आपण पक्व होऊन शांत होत नाहीं, यास्तव हिचा ठायीं मूर्छित पडून राहातो.

मूर्छाभेद कारणविशेषेंकरून सांगतो.

मूर्छापित्ततमःप्रायारजःपित्तानिलाद्भ्रमः ॥ तमोवातकफात्तंद्रानिद्राश्लेष्मतमोभवा ॥ इंद्रियार्थेष्वसंवृत्तिर्गौरवंजृंभणंक्लमः ॥ निद्रार्तस्यैवयस्यैतेतस्यतंद्राविनिर्दिशेत् ॥ योनायासश्रमोदेहेप्रवृद्धश्वासवर्जितः ॥ क्लमःसइतिविज्ञेयइंद्रियार्थप्रबोधकः ॥

अर्थ—पित्त व तमोगुण यांहीं मूर्छा येत्ये; व रजोगुण पित्त व वायु यांणीं भ्रम होतो; व तमोगुण, वायु व कफ यांणीं तंद्रा होत्ये, कफ व तमोगुण यांणीं निद्रा होत्ये, निद्रेचा ठायीं विषयांचें अज्ञान होतें, गौरव, जांभया व क्लम. हे होतात, तंद्रेचा ठायीं हीं सर्व असून अर्धोन्मीलित नेत्रत्वादि, व चेष्टा असत्ये, इतुका निद्रेचा व तंद्रेचा भेद जाणावा; व शरीराच्या आयासावाचून देहाला श्रम होतो;आणि इतर आयासांमध्ये जो मोठा श्वास असतो; तो नसतो; व सर्वविषयांचे ठायीं इंद्रियांची प्रवृत्ति होत नाहीं, अशा अवस्थेला क्लम ह्मणतात.

संन्यास सांगतात.

दोषेषुमदमूर्छायागतवेगेषुदेहिनाम् ॥
स्वयमेवोपशाम्यंतिसंन्यासोनौषधैर्विना ॥

अर्थ—मद व मूर्छा यानां उत्पन्न करणाऱ्या दोषाचा वेग शांत झाला असतां; त्या औषधावांचून स्वतः शांत होतात; आणि संन्यास औषधावांचून शांत होत नाही.

संन्यासलक्षण.

वाग्देहमनसांचेष्टाआक्षिप्यातिबलामलाः ॥ संन्यस्यंत्यबलंजंतुंप्रा
णायतनमाश्रिताः ॥ सनासंन्याससंन्यस्तःकाष्ठीभूतोमृतोपमः ॥
प्राणैर्विमुच्यतेशीघ्रंमुक्त्वासद्यःफलांक्रियां ॥

अर्थ—अति वाढलेले वातादि दोष, आणि देह, आणि मन यांच्या क्रिया बंद करून हृदयांत राहून निर्बळरोग्याला निचेष्ट पाडितात, तो संन्यासग्रस्तरोगी मेल्यासारिखा काठवत् पडतो, त्याला सद्यःफल देणाऱ्या दंभादिक्रिया न केल्या तर तत्काळ मरतो.

मूर्छा.

मूर्छामोहोद्विधास्यात्प्रभवतिसहजागंतुभेदेनभिन्नस्तत्रागंतुस्त्रिधास्या
द्रुधिरविषसुराजन्मभेदाद्विभिन्ना ॥ प्रत्येकंदोषभेदाद्भवतिचसहजासा
त्रिधाषट्सुपित्तंप्राधान्येनेहतिष्ठेदभिदधतिचतांद्वंद्वजांसन्निपातात् ॥

अर्थ—मूर्छासंबंधी मोह, सहज व आगंतुक या भेदानें दोन प्रकारचा त्यामध्यें आगंतुक, रक्त, विष व मद्य यांकारणानीं तीन प्रकारचा आणि सहजमूर्छेमध्यें पित्त प्रधान असतें; व ही द्वंद्वज आणि सन्निपात यांपासून हि होत्ये.

चिकित्साक्रम.

सेकावगाहामणयःसहाराःशीताःप्रदेहाव्यजनानिलाश्च ॥
शीतानिपानानिचगंधवंतिसर्वासुमूर्छास्वनिवारितानि ॥

अर्थ—आंगावर पाणी शिंपणें, स्नान करणें, रत्नें, रत्नांचे हार व थंड लेप यांचें धारण विंजण्याचा वारा, सुगंध व शीत असें पाणी, हे उपचार सर्व मूर्छांवर अबाध आहेत.

दुरालभादिकाढा.

दुरालभाकषायस्यघृतयुक्तस्यसेवनात् ॥
भ्रमःशाम्यतिगोविंदचरणस्मरणादिव ॥

अर्थ—धमासाचा काढा करून तूप घालून द्यावा; म्हणजे भ्रमाची शांति होत्ये; जसें गोविंदचरणस्मरणानें पातकाचा नाश होतो तसें.

पंचमूलादिकाढा.

पंचमूलकषायंत्मधुनासितयापिबेत् ॥
ज्वरघ्नांस्तुकषायांश्चतान्यथास्वंप्रयोजयेत् ॥

अर्थ—मूर्छेवर पंचमूलांचा काढा, मध व साकर घालून द्यावा; आणि जे ज्वरनाशक कषाय तेही दोष पाहून द्यावे.

क्षुद्रादिकाढा.

क्षुद्रामृताग्रंथिकनागराणांमूर्छांजयेद्दारुणकाकषायः ॥

अर्थ–रिंगणी, गुळवेल, पिंपळमूळ, सुंठ, आणि नायवर्णा यांचा काढा मूर्छेचा नाश करितो.

द्राक्षादिकाढे.

द्राक्षासितादाडिमलाजवंतिकल्हारनीलोत्पलपद्मवंति ॥

पिबेत्कषायाणिचशीतलानिपित्तज्वरंयानिचयापयंति ॥

अर्थ–द्राक्षे, साकर, डाळिंब, लाजाळू, तांबडें कमळ, निळें कमळ व कमळ यांचे काढे द्यावे; किंवा जे पित्तज्वरावर काढे देतात, ते काढे द्यावे.

रक्तजादिमूर्छावर शास्त्रार्थ.

रक्तजायांचमूर्छायांहितःशीतक्रियाविधिः ॥ मद्यजायांवमेन्मद्यंनिद्रां सेवेद्यथासुखम् ॥ विषजायांविषघ्नानिभेषजानिप्रदापयेत् ॥

अर्थ–रक्तापासून मूर्छा असली तर, थंड औषध हितकारक आहे, मद्यापासून मूर्छा असली तर मद्य ओकून टाकावें; आणि निद्रा करावी, विषापासून मूर्छा असली तर विषनाशक औषधें द्यावीं.

कोलादियोग.

कोलमज्जाकणोशीरकेसरंशीतवारिणा ॥

पीतंमूर्छांजयेल्लीढांकृष्णांवामधुसंयुतां ॥

अर्थ–बोराचे आंठीचा मगज, पिंपळी, वाळा, नागकेशर हीं पाण्यांत वाटून प्यावीं; अथवा मधाबरोबर पिंपळी खावी; म्हणजे जाईल.

त्रिफलादियोग.

मधुनाहंत्युपयुक्तात्रिफलारात्रौगुडार्द्रकंप्रातः ॥

सप्ताहात्पथ्यभुजोमदमूर्छाकासकामलामोहान् ॥

अर्थ–रात्रीस मधाबरोबर हिरडा, बेहडा, आवळकाठी यांची पूड खावी; आणि गूळ आलें एकत्र करून प्रातःकाळीं खावें; पथ्य करावें, या प्रमाणें सात दिवस केलें असतां; मद, मूर्छा, कामला व मोह यांचा नाश होईल.

महौषधामृताद्राक्षापौष्करग्रंथिकोद्भवम् ॥

पिबेत्कणायुतंक्वाथंमूर्छायांचमदेषुच ॥

अर्थ–सुंठ, गुळवेल, मनुका, पोखरमूळ व पिंपळमूळ यांचा काढा पिंपळीच्या सहीत मूर्छा व मद यांचे ठायीं प्रशस्त आहे.

दुरालभादि काढा.

पिबेद्दुरालभाक्काथंसघृतंभ्रमशांतये ॥
अंजनान्यपिपीडाश्चधूमाःप्रधमनानिच ॥

अर्थ–धमाशाचा काढा तूप घालून प्यावा, अथवा अंजन घालावें; व्यथा करावी; कांहीं ओढायाला द्यावें; ह्मणजे मूर्छा शांत होते.

सामान्य.

सुचीभिस्तोदनंशस्तंदाहपीडानखांतरे ॥
लुंचनंनखलोम्नांचदंतैर्दंशनमेवच ॥

अर्थ–सुया टोंचाव्या, पाय वगैरे, ओरपावे, नखें दाबावीं व ओढावीं; केश ओढावे, तोडावे व उपटावे, दांतानीं डसावें.

आत्मगुप्तादियोग.

आत्मगुप्तावघर्षश्चहितस्तस्यावबोधने ॥

अर्थ–कुहिली अंगास चोळानी ह्मणजे शुद्धि येते.

नारिकेलादियोग.

नारिकेलांवुनापीताःसक्तवःसमशर्कराः ॥
पित्तहृत्कफतृण्मूर्छाभ्रमादीन्हंतिदारुणान् ॥

अर्थ–नारळाच्या पाण्यांत सातुंचें पीठ आणि साकर घालून प्यावें; ह्मणजे हृदयांतला कफ, तृष्णा मूर्छा, भ्रम हे भयंकर जरीं असले, तरीं त्याचा नाश करील.

अंडयोर्घर्षणंचापिहितमेतैर्विबाधनं ॥ नासावदनरोधेननस्यैर्मरिचानिमितैः ॥ नरंजागरयेद्भूमौमूर्छितंमंदमारुतैः ॥

अर्थ–आंडाचे ठायीं कुहिली इत्यादिकानें घर्षण करणें हे मूर्छेवर हितकारक आहे. मूर्छा येऊन भूमीवर पडलेल्या मनुष्यास मिऱ्यांचे नस्य देऊन तोंड व नाक दाबून धरावें; ह्मणजे मूर्छा जाऊन जागृत होतो.

मृणालाद्यवलेह.

शीतेनतोयेनभृशंमृणालंकृष्णाचपथ्यामधुनावलिह्यात् ॥
कुर्याच्चनासावदनावरोधंक्षीरंपिबेद्वाप्यथमानुषीणां ॥

अर्थ–थंड पाण्याशीं बिसें, पिंपळी व हरीतकी हीं वाटून त्यांत मध घालून त्याचें चाटण करून द्यावें; किंवा तोंड, आणि नाक यांतील वायूचा किंचित् प्रतिबंध करावा; किंवा मनुष्याचें दूध द्यावें.

अंजन.

शिरीषबीजंगोमूत्रंकृष्णामरिचसैंधवैः ॥
अंजनंस्यात्प्रबोधायसरसोनशिलावचैः ॥

अर्थ—शिरीषवृक्षाचें बीं, पिंपळी, मिरीं व सैंधव हीं गोमूत्रांत उगाळून त्याचें; किंवा लसूण, मनशीळ व वेखंड यांचें अंजन बोधनार्थ नेत्रांत घालावें.

दुसरा प्रकार.

अंजनंसम्यगारब्धंमधुसिंधुशिलोपणैः ॥
प्रमोहद्रोहिभवतिभाषितंभिषजांवरैः ॥

अर्थ—मध, सैंधव, मनशीळ आणि मिरीं यांचें अंजन घालावें; म्हणजे तें मोहाचा नाश करितें, असे वैद्यानीं सांगितलें आहे.

सामान्य उपचार, अंजन.

धूमांजनप्रधमनान्यवपीडनानिनिस्तोदवाहकचलोमविलुंठनानि ॥
संदंशितानिदशनैःकपिकच्छुघर्षैश्चैतद्धितंसकलमोहविनाशनाय ॥

अर्थ—धूम व अंजन नाकांत व कानांत फुंकणें, पीडा करणें, दुखिवणें, डाग देणें, केश, लोम उपटणें, दांतानीं चावणें, कुयले, खाजकोलती, हे आंगास चोळणें इत्यादि सर्व उपचार मोहनाशाविषयीं हितकारक आहेत.

स्विन्नामलकादिलेह.

स्विन्नमामलकंपिष्ट्वाद्राक्षयासहसंसृजेत् ॥ विश्वभेषजसंयुक्तंमधुना सहलेहयेत् ॥ तेनास्यशाम्यतेमूर्छाकासश्वासस्तथैवच ॥

अर्थ—ऊब देऊन मऊ झालेला आवळा वाटून द्राक्षें व सुंठ आणि मध त्यांत मिळवून चाटावा, तेणेंकरून मूर्छा, कास, श्वास, हे शांत होतात.

पथ्यादिघृत मदज मूर्छेवर.

पथ्याक्वाथेनसंसिद्धंघृतंधात्रीरसेनवा ॥
सर्पिःकल्याणकंवापिमदमूर्छापहंपिबेत् ॥

अर्थ—हिरडयाच्या काढयानें अथवा आंवळ्याच्या रसानें सिद्ध केलेलें तूप अथवा कल्याणघृत प्यावें, तें मद व मूर्छा यांचा नाश करील.

रस.

कणामधुयुतंसूतंमूर्छायामनुशीलयेत् ॥
शीतसेकावगाहादिसर्वंवापीडनंहितं ॥

अर्थ–पिंपळी, मध व पारा एकत्र खलून सेवन करणें तसेंच थंड पाणी अंगावर शिंपडणें व डोळ्यावर ओतणें, इत्यादि पीडाहितकारक आहे.

ताम्रादिचूर्ण.

ताम्रचूर्णसमोशीरंकेसरंशीतवारिणा ॥
पीतंमूर्छांद्रुतंहन्याद्वृक्षमिंद्राशनिर्यथा ॥

अर्थ–रक्तचंदन, वाळा व नागकेशर यांचें चूर्ण थंड पाण्याशीं घ्यावें; म्हणजे शीघ्र मूर्छेचा नाश करितें, जसें वज्र वृक्षांचा नाश करितें तसें.

शुंठ्यादिगुटी.

शुंठीकणाशताव्हानांसाभयानांपलंपलं ॥
गुडस्यपट्पलान्येषांगुटिकाभ्रमनाशिनी ॥

अर्थ–सुंठ, पिंपळी, शतावरी, आणि हरीतकी या प्रत्येकांचें चार चार तोळे चूर्ण; आणि गूळ २४ तोळे यांच्या गोळ्या करून खाव्या, त्या भ्रमाचें निवारण करितात.

मूर्छापथ्य.

धूमोंजनंनावनरक्तमोक्षोदाहश्चसूचीपरितोदनानि ॥ रोम्णांकचानां परिलुंचनानिनखांतपीडादशनोपदंशः ॥ नासामुखद्वारमरुन्निरोधो विरेचनंछर्दनलंघनानि ॥ क्रोधोभयंदुःखकरीचशय्याकथाविचित्रासु मनोहराश्च ॥ छायानभोंभःशतधौतसर्पिर्मृदुश्चतिक्तानिचलाजमंडः ॥ जीर्णायवालोहितशालयश्चक्षौंभंहविर्मुद्गसतीनयूषाः ॥ धन्वोद्भवामां सरसाश्चरागाःसखांडवागव्यपयःसिताच ॥ पुराणकूष्मांडपटोलमोचह रीतकीदाडिमनारिकेरं ॥ मधूकपुष्पाणिचतंदुलीयतुषोदकान्नानिलघू निचापि ॥ निरंतरंचंदनचर्चनंचकर्पूरनीलंहिमवालुकाच ॥ अत्युच्चश ब्दोद्भुतदर्शनानिगीतानिवाद्यानिचचोत्कटानि ॥ श्रमस्मृतिश्चिंतनमा त्मबोधोधैर्यंचमूर्छास्वितिपथ्ययोगः ॥

अर्थ–धूम, अंजन, नस्य, रक्तमोक्ष, डाग, सुयानीं टोंचणें, लोम व केश उपटणें, नखानीं चिमकुरे घेणें किंवा ओरबाडणें, दातानीं चावणें, नाक व तोंड यांतील वायूचा अवरोध करणें, रेचन, वांति, लंघन, क्रोध, भय, दुःखकारक बिछाना, विचित्र व कर्णप्रिय अशा गोष्टी, छाया, पर्जन्य, शतधौतघृत, मृदु, कडु रस, लाह्यांचा मंड, जुनेयव, तांबड्या साळी, घागरींतलें तूप, मूग व वाटाणे यांचे यूष, धन्वदेशांतील मांसाचे रस;

रागखांडव, गाईचें दूध, साकर, जुनां कोहळा, पडवळ, केळें, हरीतकी, डाळिंब, नारळ, मोहाचीं फुलें, तांदुळजा, तुपोदक, लघु अशीं अन्नें, वारंवार चंदनाचें उटणें, कापूर, वारा, थंड वाळवंट, मोठ्यानीं भाषण, अद्भुत पदार्थांचें दर्शन, उत्तम गीतें, उत्तम वाद्यें, श्रम न करणें, आत्मबोधाचें चिंतन, आणि धैर्य इत्यादि मूर्छारोग्याला पथ्य पदार्थांचा वर्ग सांगितला.

मूर्छा अपथ्य,

तांबूलंपत्रशाकानिदंतघर्षणमातपं ॥ विरुध्धान्यन्नपानानि

व्यवायंस्वेदनंकटु ॥ विण्मूत्रवेगरोधंचतक्रंमूर्छामयीत्यजेत् ॥

अर्थ–तांबूल, पालेभाजा, दांत घांसणें, ऊन घेणें, विरुद्ध भक्षण, प्राशन, मैथुन, घाम काढणें, तिखटपदार्थसेवन, मलमूत्राचा रोध व तक्र इतकीं मूर्छेचा ठायीं वर्ज करावीं

पानात्यय परमद पानाजीर्ण पानविभ्रम निदान-

येविषस्यगुणाःप्रोक्तास्तेपिमद्येप्रतिष्ठिताः ॥

तेनमिथ्योपयुक्तेनभ्रमत्युग्रोमदात्ययः ॥

अर्थ–जे विषाचें दाहा गुण सांगीतले, ते मद्याचा ठायीं राहातात, यास्तव मद्य, अविधीनें प्राशन केलें असतां; महान उग्र असा मदात्यय होतो.

किंतुमद्यंस्वभावेनयथैवान्नंतथास्मृतं ॥

अयुक्तियुक्तंरोगाययुक्तियुक्तंतथामृतं ॥

अर्थ- मद्य स्वभावेंकरून अन्नासारिखें आहे; परंतु अविधीनें प्राशन केलें असतां; रोगाचें कारण होतें; आणि विधिपूर्वक प्राशिलें असतां; अन्नासारिखें अमृत होतें. यांविषयीं दृष्टांत.

प्राणाःप्राणभृतामन्नंतदयुक्तंतुहंत्यसून् ॥

विषंप्राणहरंयत्तुयुक्तियुक्तंरसायनं ॥

अर्थ–मनुष्यादि सर्वजीवांचे प्राण अन्नाच्या आश्रयेंकरून राहातात. यास्तव (प्राणाः अन्नं) ह्मणजे प्राणच अन्न जाणावें; परंतु तें अन्न अपरिमित सेवन केलें असतां; प्राण नाश करितें. विष वस्तुतः प्राणनाशक; परंतु यथाशास्त्र घेतलें असतां; रसायन होतें; ह्मणजे शरीराला धारण करितें.

मद्याचा सेवनप्रकार सांगतो.

विधिनामात्रयाकालेहितैरन्नैर्यथाबलं ॥ प्रत्दृष्टोयःपिवेन्मद्यंतस्यस्या
दमृतोपमं ॥ स्निग्धैःसदन्नैर्मांसैश्चभक्ष्यैश्चसहसेवितं ॥ भवेदायुःप्र
कर्षायबलायोपचयायच ॥

अर्थ–यथाशास्त्र, यथाकाळीं, परिमित व स्वप्रकृतीला मानणारें तितुकें व स्निग्ध गोधूम पिष्टादिक, मांस व भक्ष्य, यां सहवर्तमान स्वस्थांतःकरणेंकरून सेविलें असतां; अमृता सारखें शरीरास हितकारक होतें; आणि आयुष्याची व शरीराची वृध्दि करितें, बळ देतें.

काम्यतामनसस्तुष्टिस्तेजोविक्रमएवच ॥
विधिवत्सेव्यमानेतुमद्येसन्निहितागुणाः ॥

अर्थ–मद्य विधिपूर्वक सेविलें असतां सुंदरपणा, अंतःकरणास संतोष, बल व पराक्रम, हे होतात, हे गुण विधिपूर्वक सेविलेल्या मद्यामध्यें सर्वकाळ राहातात.

शुद्धकायःपिवेत्प्रातःसोमदंशंपलद्वयं ॥ मध्यान्हेद्विगुणंतच्चस्नि
ग्धाहारेणपाययेत् ॥ प्रदोषेष्टपलंतद्वन्मात्रामद्यरसायने ॥

अर्थ–प्रातःकाळीं दंतधावनादि शरीरशुध्दीचीं कर्में करून आठ तोळे मद्य प्राशन करावें, मध्यान्हीं स्निग्धपदार्थासहवर्तमान द्विगुणित प्राशन करावें, रात्रीचे प्रारंभवेळेस चतुर्गुण प्राशन करावें, याप्रमाणें सेवन केलें असतां; रसायण होतें.

त्रिविधमदाचें लक्षण.

वुद्धिःस्मृतिप्रीतिकरःसुखश्चपानान्ननिद्रारतिवर्धनश्च ॥
संपाठगीतस्वरवर्धनश्चप्रोक्तोतिरम्योप्रथमोमदोहि॥

अर्थ–प्रथम मदाचे ठायीं बुध्दि, स्मृति, सुख, प्रीति, निद्रा, अन्न व पान, यांविषयीं रति, यांचे वर्धन होतें; व पठणशक्ति, गति; व स्वर यांची वृध्दि होत्ये. याप्रमाणें प्रथम मद ह्मणजे ८ तोळे, रम्य जाणावा.

मध्यममदलक्षण.

अव्यक्तवुध्दिस्मृतिवाग्विचेष्टःसोन्मत्तलीलाकृतिरप्रशांतः ॥
आलस्यनिद्राभिहतोमुहुश्चमध्येनमत्तःपुरुषोमदेन ॥

अर्थ–मदाचा दुसऱ्या मानानें ह्मणजे १६ तोळे याणीं बुध्दि, स्मृति, वाग्विसर्ग हे अस्पष्ट होतात; व त्याची चेष्टा व आकृति, उन्मत्तासारिखी होत्ये, उन्मत्ता सारखी क्रीडा करितो, चंचळ चित्त होतें; आणि आळस व निद्रा, याणीं वारंवार व्याप्त होतो, असें जाणावें.

तृतीयमदलक्षण.

गच्छेदगम्यांश्चगुरूंन्नमन्येत्खादेदभक्ष्याणिचनष्टसंज्ञः ॥
ब्रूयाच्चगुह्यानिहृदिस्थितानिमदेतृतीयेपुरुषोस्वतंत्रः ॥

अर्थ–तृतीयमदेंकरून उन्मत्त झाला असतां; तो पुरुष अगम्य जा गुरुदारादिक त्यां प्रत गमन करितो; व गुरु, आदिकरून लोकाला मानीत नाहीं, अभक्ष्य पदार्थ भक्षितो, ज्ञानशून्य होतो; व मनांतील गुह्यगोष्ट, बोलून दाखवितो; व त्याचें शरीर त्याचे स्वाधी न नाहीं असें होतें. तृतीय मद ३९ तोळे जाणावा.

चतुर्थमदलक्षण.

चतुर्थेतुमदेमूढोभग्नदारुविनिःक्रियः॥ कार्याकार्यविभागाज्ञोमृतादथप
रोमृतः ॥ कोमदंतादृशंगच्छदुन्मदमिवचामरं॥ वहुदोपमिवारूढकां
तारंस्ववशःकृती ॥

अर्थ–चतुर्थमदानें ह्मणजे ३९ तोळ्यांहून जास्ती प्राशन केलें असतां; ज्ञानशून्य होऊ न काष्ठासारिखा निश्चेष्ट पडतो; व कार्याकार्यविभाग रहित होऊन मेल्यापेक्षां मेला होतो; याकरितां असल्या उन्मदासारिख्या मदाला विवेकी मनुष्य कोणता तरी जाईल काय ? कोणी ही जाणार नाहीं. याविषईं दृष्टांत दुर्मार्गांप्रत व नाना कंटकादिउपद्रवादिदो षयुक्त अरण्यांत जसा कोणीच जात नाहीं.

अविधीनें सेवित मद्य जें त्याचें अन्य विकार सांगतो.

निर्भुक्तमेकांततएवमद्यंनिषेव्यमाणंमनुजेननित्यं ॥
आपादयेत्कष्टतमान्विकारानापादयेच्चापिशरीरभेदं ॥

अर्थ–आहारावांचून निरंतर मद्यपान केलें असतां; नाना प्रकारचे विकार उत्पन्न करितें; व शरीरनाश ही करितें.

अन्नासह मद्यपानकेल्यानें विकार.

क्रुद्धेनभीतेनपिपासितेनशोकाभितप्तेनबुभुक्षितेन ॥ व्याया
मभाराध्वपरिक्षतेनवेगावरोधाभिहतेनचापि॥ अत्यन्नभक्ष्या
च्चततोदरेणसाजीर्णभुक्तेनतथावलेन ॥ उष्णाभितप्तेनचसेव्य
मानंकरोतिमद्यंविविधान्विकारान् ॥

अर्थ–क्रोध, भय, पिपासा, शोक, क्षुधा, व्यायाम, भार, मार्गश्रम व मलमूत्रादि वे गावरोध याणीं युक्त; व फारभोजन केल्यावर, अजीर्ण, झालें असतां;व जो अशक्त; उष्णेंक- रून तप्त, अशा पुरुषानीं मद्यपान केलें असतां; तें नानाप्रकारचे विकार उत्पन्न करितें.

पानात्ययंपरमदंपानाजीर्णमथापिवा ॥
पानविभ्रममुग्रंचतेषांवक्ष्यामिलक्षणं ॥
अर्थ–पानात्यय, परमद, पानाजीर्ण व पानविभ्रम यांचीं लक्षणें सांगतों.

वातादिसंबधं मदात्ययलक्षणं.

हिक्काश्वासःशिरःकंपपार्श्वशूलप्रजागरैः ॥
विद्यात्बहुप्रलापस्यवातप्रायमदात्ययं ॥
अर्थ–हिक्का, श्वास, शिरःकंप, पार्श्वशूल, निद्रानाश व प्रलाप हिं लक्षणें वातजन्य मदात्ययाचा ठायीं होतात.

पित्तजन्यमदात्ययनिदान.

तृष्णादाहज्वरःस्वेदमोहातीसारविभ्रमैः ॥
विद्यात्धरितवर्णस्यपित्तप्रायंमदात्ययं ।
अर्थ–तृष्णा, ताप, दाह, ज्वर, स्वेद, मोह, अतीसार, विभ्रम व मनुष्याची कांति पीतवर्ण; हीं लक्षणें पित्तजन्य मदात्य याचा ठायीं जाणावीं.

कफजमदात्ययनिदान.

छर्दरोचकल्हल्लासतंद्रास्तैमित्यगौरवैः ॥
विंद्याच्छीतपरीतस्यकफप्रायंमदात्ययं ॥
अर्थ–ओकारी, अरोचक, लालास्राव, तंद्रा, स्तैमित्य, गौरव व आंग थंड कालासारिखें होणें हीं चिन्हें कफात्मक मदात्ययाचा ठायीं होतात.

त्रिदोषजमदात्ययनिदान.

ज्ञेयस्त्रिदोषजश्चापिसर्वैर्लिंगैर्मदात्ययः ॥
अर्थ–त्रिदोषज मदात्यय याचा ठायीं वातादिदोषांचीं सर्व लक्षणें होतात.

परमदलक्षण.

श्लेष्मोछ्रयोंगगुरुताविरसास्यताचविण्मूत्रसक्तिरथतंद्रिररोचकश्च ॥
लिंगंपरस्यतुमदस्यवदंतितज्ज्ञास्तृष्णारुजाशिरसिसंधिपुचापिभेदः ॥
अर्थ-कफाला अधिकपणा, अंगाला गुरुपणा, तोंड पचपचीत, मल व मूत्र यांची क्षणोक्षणीं प्रवृत्ति अथवा अत्यंत अप्रवृत्ति, तंद्रा, अरोचक, तृष्णा, शिरोरुक् व संधिभेद, हीं परमदाचीं लक्षणें जाणावीं.

वातमदात्ययीं सौवर्चलादि.

मद्यंसौवर्चलव्योपयुक्तंकिंचिज्जलान्वितं ॥

जीर्णमद्यायदातव्यंवातपानात्ययापहं ॥

अर्थ—मद्य, पादेलोण व त्रिकटूचूर्ण, असें एकत्र करून थोडेसें, पाणी घालून ज्याचें म द्य पिऊन जिरलें असेल त्यास द्यावें; ह्मणजे वातपानात्ययाचा नाश होतो.

सूक्तशृंग्यादि.

सूक्तंसौवर्चलंशृंगीत्र्यूपणार्द्रकदीपकैः ॥

मद्यंपीत्वाजयत्युग्रंपवनोत्थंमदात्ययं ॥

अर्थ—कांजी, पादेलोण, कांकडशिंगी, त्रिकटु, आलें व चित्रक यांच्या बरोबर मद्य प्यावें, तें वातपानात्ययाचा नाश करील.

आम्लस्निग्धादि.

आम्लंस्निग्धोष्णलवणंरसाजांगलजाहिताः ॥

पानकानिचमद्यानिहन्युर्वातमदात्ययं ॥

अर्थ—आंबट, स्निग्ध, उष्ण व जंगलांतील मांसाचे रस, पन्हीं, आणि मद्य, हे पदार्थ वातमदात्ययाचा नाश करितात.

पित्तमदात्यय.

पित्तपानात्ययेपेयंवटशृंगंहिमांबुना ॥

सशर्करंपुनर्मद्यंपिबेत्किंचिज्जलान्वितं ॥

अर्थ—वडाच्या पारंब्या थंडपाण्यांत वाटून प्याव्या; नंतर थोडेसें पाणी घालून मद्य प्यावें, तें पित्तपानात्ययनाशक आहे.

क्षुद्रामलकादिपान.

क्षुद्रामलकखर्जूरपरूपकहिमंपिबेत् ॥

सिताविमिश्रितंपीतंपानात्ययविकारनुत् ॥

अर्थ—लघु आंवळा, खजूर, फालसा, कापूर व साकर एकत्र मिश्र करून प्यावें, तें पानात्ययाचा विकार दूर करील.

सामान्य.

पित्तोत्थेतुहितंमद्यंमधुरौपधिसाधितं ॥

उक्षिखेदथवामद्यंपीत्वेक्षुरससंयुतं ॥

अर्थ—पित्तजन्यमदावर मधुरऔषधांपासून काढलेलें मद्य, किंवा उसांच्या रसाशीं मिश्र केलेलें मद्य द्यावें.

कफमदात्ययसामान्य.

पानात्ययेकफोत्थेतुतत्पीव्वोल्लेखनंचरेत् ॥
यथाबलंलंघनंचदीपनीयौषधानिच ॥

अर्थ--कफापासून पानात्यय होतो, त्यावर वमन द्यावें, यथाशक्ति लंघन करावें; व अ-ग्निदीपक औषधें द्यावीं.

अष्टांगलवण.

सौवर्चलमजाजीचवृक्षाम्लंसाम्लवेतसं ॥ त्वगेलामरिचार्धांशं
शर्कराभागयोजितं ॥ एतल्लवणमष्टांगमग्निसंदीपनंपरं ॥ मदात्य
येकफोत्थेतुदद्यात्स्रोतोविशोधनं ॥

अर्थ– पादेलोण, जिरें, आमसोल, अम्लवेतस, दालचिनी, वेलदोडे, मिरें आणि यां सर्वांच्या दुप्पट साकर, घेऊन एकत्र करावें, याला अष्टांग लवण, असे ह्मणतात. हे अग्निदीपक आणि कफमदात्ययावर स्रोतः शुद्धिकरणारें प्रशस्त आहे.

सुपारीच्या मदावर.

पूगान्मदःप्रशमयत्यचिरेणजंतोराघ्रायशंखरजसःप्रबलस्यगंधं ॥
पानेनवाशिशिरपुष्करणीजलस्यसंसेवितैरतिहितैर्व्यजनानिलैश्च ॥

अर्थ–सुपारीच्या भक्षणानें झालेला मद नखल्याच्या चूर्णाच्या वासानें; अथवा थंडगार पु-ष्करणीच्या जलपानानें, अथवा अत्यंत हितकारक विंझण्याचे वाऱ्यानें, लवकर शांत होतो.

दुसरा प्रकार.

अवघ्राणेनधूमस्यसितालवणभक्षणात् ॥ शर्कराकेवलाहंतिदुःसहांपूगजांरुजं ॥

अर्थ–सुपारीच्या मदावर नासिकेवाटे धूर घ्यावा; अथवा साकर किंवा मीठ द्यावें; अथवा साकर तोंडांत धरण्यास द्यावी; ह्मणजे तो नाश पावतो.

कोद्रवधत्तूर.

कूष्मांडरसःसगुडःशमयतिमदमाशुकोद्रवजः ॥
धत्तूरजंचदुग्धंसशर्करंपानयोगेन ॥

अर्थ–कोहाळ्याचा रस गुळ घालून प्यावा; ह्मणजे कोद्रूचे मदाचा नाश होतो; व धो-त्र्याचें मदावर दूध साकर घालून प्यावें; तें मद लवकर शांत करितें.

जायफळाच्या मदावर.

जातीफलेपुनवनीतसिताप्रयुक्तपर्नीतथामसृणचंदनशर्करांवा ॥
रंभाजलेनमदिरांविपमुष्टिगव्यंहन्यान्मदंसकलशीघ्रमिदंप्रयुक्तं ॥

अर्थ—जायफळाच्या उन्मादावर लोणी, साकर व जायपत्री द्यावी; किंवा लोणी, चंदन व साकर द्यावी; व मद्यावर केळीचें पाणी द्यावें; व कुचल्याचा मदावर गाईच्या दुधाचें तूप द्यावें; ह्मणजे वृद्धिगत ही मदाचा लौकर नाश होतो.

दुसरा प्रकार.

जातीफलमदंशीघ्रंहंतिपथ्यानिषेविता ॥
शीततोयावगाहश्चशर्करादधियोजिता ॥

अर्थ—जायफळाच्या मदावर हरीतकी द्यावी; किंवा थंड पाण्यांत स्नान करावें; अथवा दह्यांशीं साकर द्यावी, ती त्याचा नाश करित्ये.

कज्जलीरस.

धात्रीस्वरसनिपीतारसगंधककज्जलीसितासहिता ॥
हरतिमदात्ययरोगान्गरुत्मानिवोरगान्सहसा ॥

अर्थ—आवळयाच्या रसांत पारा व गंधक, यांची कज्जली करून घालावी; आणि साकरेसहित प्यावी, ती मदात्यय रोगाचा नाश करित्ये. जसा गरुड सर्पाचा नाश करितो.

सामान्य.

सर्वजेसर्वमेवेदंप्रयोक्तव्यंचिकित्सितं ॥
आभिःक्रियाभिःसिद्धाभिःशांतिंयातिमदात्ययः ॥

अर्थ—त्रिदोषजमदात्ययावर हें पूर्वोक्त सर्व योजावें; आणि ह्या सर्व क्रिया सिद्ध झाल्या असतां; मदात्यय शांत होतो.

पानाजीर्णलक्षण.

आध्मानमुग्रमथवोद्गिरणंविदाहःपानेत्वजीर्णमुपगच्छतिलक्षणानि ॥
ज्ञेयानितत्रभिषजासुविनिश्चितानिपित्तप्रकोपजनितानिचकारणानि ॥

अर्थ—पोट फुगणें, अत्युग्र वमन, ढेकर व विदाह हीं पानाजीर्णाचा ठायीं लक्षणें होतात, याचें कारण पित्तप्रकोप आहे, असें वैद्यांनीं निश्चयेंकरून जाणावें.

पानविभ्रमलक्षण.

हृद्गात्रतोदकफसंस्रवकंठधूममूर्छावमिज्वरशिरोरुजनप्रदाहाः ॥
द्वेषःसुरान्नविकृतेष्वपितेषुतेपुतंपानविभ्रममुशंत्यखिलेनधीराः ॥

अर्थ—हृदय व गात्रें यांस पीडा होत्ये, कफस्राव होतो, कंठातून धूर निघतो, मूर्छा, वमन, ज्वर, शिरोरुक् व तोंडाला कफाचा चिकटा इत्यादि लक्षणें जा मद्य विकाराचे ठायीं राहातात त्याला पानविभ्रम ह्मणतात.

असाध्य लक्षण.

हीनोत्तरोष्ठमतिशीतममंददाहंतैलप्रभास्यमतिपानहतंत्यजेत्तु ॥
जिव्होष्ठदंतमसितंत्वथवापिनीलंपीतेचयस्यनयनेरुधिरप्रभेवा ॥

अर्थ–वरला ओंठ, यत्किंचित् न्यून होऊन हालत नाहींसा होतो, शरीरबाह्यदेश शीत होतो, अभ्यंतरीं दाह होतो, तोंडावर तेल लाविल्यासारखी तुकतुकी येते, या प्रकारें जो मद्यपी व्याकुळ जाला, त्याला वैद्य सोडितात; व जिव्हा, ओंठ व दंत यांला कृष्णवर्ण, किंवा नीलवर्ण, नेत्र पीतवर्ण अथवा रक्तवर्ण झाले, ह्मणजे त्यातें वैद्य सोडितात.

पानोपद्रव.

हिक्काज्वरौवमथुवेपथुपार्श्वशूलाःकासभ्रमावपिचपानहतंत्यजेत्तं ॥

अर्थ–उचकी, ज्वर, वमथु, कंप, पार्श्वशूल, खोकला व भ्रम इत्यादि उपद्रव पानेंकरून ग्लान जाहालेल्या रोग्याला मारितात.

मथिततैल.

मथितंगोदधिसंहितंतैलंकर्पूरसंमिश्रं ॥
आस्वाद्यपीतमाशुक्षपयतिपानात्ययंरोगं ॥

अर्थ–गाईचें दहीं आणि तेल एकत्र करून घुसळून कापूर मिश्रित करून हुंगून प्यावें, तें पानात्ययरोगाचा लवकर नाश करील.

मद्योपशम.

मद्यंपीत्वायदिवातत्क्षणमेवलेह्याशर्करासघृता ॥
मदयतिनजातुमद्यंमनागपिप्रथितवीर्यमपि ॥

अर्थ–मद्य पिऊन नंतर तूपसाकर चाटावी; ह्मणजे उंची जरी दारु असेल तथापि किंचित् देखील मद आणणार नाहीं.

कृष्णादि पनें.

कृष्णाधान्यपरूपकामरतृटीजीरैःसनागोपगैःसपन्नेससितंमधूकसहितंयुक्तंदधित्थद्रवैः ॥ कर्पूरेणसुवासितंमदगदान्पीतंजयेत्पानकंहृद्यंरोचनमग्निदीपनमिदंपूर्वैर्भिषग्भिःस्मृतं ॥

अर्थ–पिंपळी, धने, फालसा, देवदार, एलची, जिरें, नागकेशर, मिरीं, साकर, ज्येष्टीमध व कवठाचा रस यांचे पनें करून त्याला कापुराचा वास लावावा; आणि द्यावें. हें पनें हृदयाला प्रिय, रोचक, दीपक, आणि मदनाशक आहे, असें प्राचीन वद्यांनीं सांगितलें आहे.

सर्वजमदात्ययीं त्रिफलादिपान.

मधुनाहंत्युपयुक्तात्रिफलारात्रौगुडार्द्रकंप्रातः ॥
सप्ताहात्पथ्यभुजोमदमूर्छाकामलोन्मादान् ॥

अर्थ–त्रिफळ्याचें चूर्ण मद्याबरोबर रात्रीस खावें; आणि आलें गूळ प्रातःकाळीं खावें, त्या प्रमाणें सात दिवस खाऊन पथ्य भोजन केले असतां; तें मद, मूर्छा व कामला यातें जिंकतें.

दुःस्पर्शादियोग.

दुःस्पर्शेनसमुस्तेनमस्तपर्पटकेनवा॥जलंमुस्तैःशृतंवापिदद्या द्दोषविपाचनं ॥ एतदेवचपानीयंसर्वत्रापिमदात्यये ॥ नि रंतरंपीयमानंपिपासाज्वरनाशनं ॥

अर्थ–धमासा व नागरमोथा याचा; अथवा नागरमोथा व पित्तपापडा यांचा; अथवा केवळ नागरमोथ्याचा काढा दोषविपाचनार्थ द्यावा; आणि पाण्याचें ऐवजीं हाच काढा मदात्ययावर द्यावा. हा निरंतर प्याला ह्मणजे तो पिपासा व ज्वर यांचा नाश करितो.

चव्यादिचूर्ण.

चव्यंसौवर्चलंहिंगुपूरकंविश्वभेषजं ॥
चूर्णंमद्येनपातव्यंपानात्ययरुजापहं ॥

अर्थ–चवक, पादेलोण, हिंग, महाळुंग व सुंठ यांचें चूर्ण मद्याबरोबर घ्यावें, तें पानात्ययव्याधीचा नाश करितें.

शतावरी, पुनर्नवा घृत.

शतावरीरसक्षीरयष्टीकल्कैःशृतंघृतं ॥
पुनर्नवाक्वाथपयोपानात्ययमपोहति ॥

अर्थ–शतावरीचा काढा, दूध व जेष्टीमधीचें चूर्ण, यांचे बरोबर सिद्ध केलेलं तूप; अथवा पुनर्नव्याच्या काढ्याबरोबर कढलेलें दूध पानात्ययनाशक आहे.

माषघृत.

कट्फलमुस्तगुडूचीमाषैःक्रमवर्धितैश्चतत्सर्वैः ॥
घृतमर्दितैर्माषघृतंहन्याद्गंधंसुराभवंसपदि ॥

अर्थ–कायफळ १, नागरमोथे २, गुळवेल ३, व उडीद ४, याप्रमाणें भाग घेऊन तुपांत खलावें; ह्मणजे त्यास माषघृत असें ह्मणतात, तें सुरागंध दूर करणारें आहे.

सामान्यशास्त्रार्थ.

अहानिसप्तचाष्टौवानृणांपानात्ययःस्मृतः ॥ पानंहिमज्जसेजीर्णमतऊ
र्ध्वंविमार्गगं ॥ पानाजीर्णविनाशायकुर्यात्कफहरंविधिं ॥

अर्थ—मनुष्यांस पानात्यय, सात दिवस किंवा आठ दिवस होतो, आठांदिवसांचे पलिक-डे पान जीर्ण होऊन आगांत मुरून भलते मार्गानें गति करितें, त्याला पानाजीर्ण ह्मणतात, त्याचे नाशार्थ कफहारक विधि करावा.

खर्जूरादिमंथ

मंथःखर्जूरमृद्वीकावृक्षाम्लाम्लीकदाडिमैः ॥
परूपकैःसामलकैर्युक्तोमद्यविकारनुत् ॥

अर्थ—खजूर, द्राक्षें, आगसोल, जलवेतस, डाळिंब, फालसा व आवळे यांणीं केलेला मंथ सरबताप्रमाणें होतो, तो मद्यविकारनाशक आहे.

मदात्ययपथ्य.

संशोधनंसंयमनंस्वपनंलंघनंश्रमः ॥ संवत्सरसमुत्पन्नाशाल्यःषष्टि
कायवाः ॥ मुद्गाश्चमाषगोधूमालावतित्तिरकादयः ॥ वेसवारोविचि
त्रान्नंत्द्धद्यंमद्यंपयःसिता ॥ तंदुलीयंपटोलंचमातुलिंगंपरूपकं ॥ खर्जू
रंदाडिमंधात्रीनारिकेरंचगोस्तनी ॥ सर्पिःपुराणंकर्पूरंप्रतीरंशिशिरो
निलः ॥ धाराग्रहंचंद्रपादामणयोमित्रसंगमः ॥ क्षौमांवरंप्रियाश्लेषो
गीतंवादित्रमुद्धतं ॥ शीतांवुचंदनंस्नानंसेव्यमेतन्मदात्यये ॥

अर्थ—मदात्यय झाला असतां; त्याणें रेचन, वेगनियमन, निद्रा, लंघन, श्रम, एकवर्षाचे जुनें भातं, साठवया, यव, मूग, उडीद, गहूं व लावे, तित्तिर, यांचें मांस, वेसवार, खिचडी, प्रियमद्य, दूध, साकर, तांदळजा, पडवळ, माहाळुंग, फालसा, खजूर, डाळिंब, आवळे, नारळ, द्राक्षे, जुनें तूप, कापूर, वाळवंट, थंड वारा, जलमंदिर, चांदणें, मित्राचा समागम, उंचें वस्त्र, स्त्रीचें आलिंगन, गीत, वाद्य, थंड पाणी, चंदन, आणि स्नान, हे उपचार करावे, ते मदात्ययनाशक आहेत.

मदात्ययीं अपथ्य.

स्वेदोंजनंधूमपानंनावनंदंतघर्षणं ॥
तांवूलंचाप्यपथ्यंस्यान्मदात्ययविकारिणां ॥

अर्थ—घामकाढणें, अंजन, धूमपान, नस्य, दांत घासणें, विडा, हे मदात्ययानर अपथ्य जाणावें.

दाहरोगकर्मविपाक.

पुनरग्नौष्ठीवतितंकपिलनामग्रहोगृण्हाति ॥ तत्क्षणाज्ज्वरशूलसर्वांगदाहपीतनयनश्चभवति ॥ बलिंचनिशिचतुष्पथेपिष्टलाजापिण्याकरुधिरतिलाश्वगंधपुष्पैर्मिश्रेणदद्यात् ॥ गृण्हीष्वचबलिंचेमंकपिलाख्यमहाग्रह ॥ आतुरस्यसुखंसिद्धिप्रयच्छत्वंमहाबल ॥

अर्थ—जो अग्नीत थुंकतो त्याला कपिलनामक ग्रह पीडा करीतो; व तत्क्षणीं ज्वर; शूल, सर्वांगदाह व नेत्रांनां पीतता हे उपद्रव होतात. त्यांच्या शमनार्थ चवाठ्यावर पीठ, लाह्या, पेंड रक्त, तिल, अश्वगंध, आणि फुलें यांणीं युक्तकरून (गृण्हीष्वचबलिंचेमं) यामंत्रानें बलि द्यावा.

ज्योतिःशास्त्राभिप्राय.

तनौभवतिभूपुत्रोरंध्रेभवतिभास्करः ॥
जन्मकालेयदायस्यसदाहज्वरवान्भवेत् ॥

अर्थ—ज्याच्या जन्मलग्नीं मंगळ, आणि अष्टमस्थानीं सूर्य आहे, तो दाह व ज्वर यांणीं युक्त होतो-

दाहनिदान.

त्वचंप्राप्तःसमानोष्मापित्तरक्ताभिमूर्छितः ॥
दाहंप्रकुरुतेघोरंपित्तवत्तत्रभेषजं ॥

अर्थ—मद्यपानसंबंधि ऊष्मा, पित्त व रक्त यांणीं वृद्धि पाऊन त्वचेमध्यें जातो; आणि उग्रदाह उत्पन्न करितो, त्यावर पित्तशामक औषधें योजावीं.

सामान्यचिकित्सा.

उत्तुंगकुचसंसर्गवीणानांहरिणीदृशाम् ॥ गायनंसुकुमारीणांदाहमुत्सादयेद्द्रुतम् ॥ रसौषधसमुद्भूततापेपिसकलेहितं ॥

अर्थ—तरतरीत उभ्या कुच्यांचा संबंध ज्या वीणेस आहे अशी वीणाघेऊन सुस्वर गायन करणाऱ्या तरुण सुकुमारस्त्रीचा गायनानें रस व औषधानीं जाहलेले सर्वताप शांत होतात.

कोलामलकयुक्तैर्वाधान्याम्लैरपिबुद्धिमान् ॥ छादयेत्तस्यसर्वांगमारनालार्द्रवाससा ॥ लामज्जकेनयुक्तेनचंदनेनानुलेपयेत् ॥ चंदनांबुकणस्यंदितालवृंतोपवीजनं ॥

अर्थ—बोरें, आंवळे, यांणी युक्त आंबील आंगास चोळावी; अथवा वस्त्रास लाऊन तें व

स्त्र पांघरावें; अथवा लघु रोहिस गवत व चंदन, यांचा लेप आंगास करावा; व चंदनाचें पाणी शिंपून ताडाच्या विझुंण्याचा वारा घालावा.

दुसराप्रकार.

स्वप्याद्दाहार्दितोंभोजकदलीदलसंस्तरे॥ परिषेकावगाहौचव्यजनानांचसेवनं ॥ शस्यतेशिशिरंतोयंदाहतृष्णोपशांतये ॥

अर्थ—दाहपीडित मनुष्यानें कमळें, केळीचीं पानें इत्यादिकांची शय्या करून निजावें, आंगावर पाणी शिंपावें, पाण्यांत बुडी मारावी, पंख्याचा वारा घ्यावा; व गारपाणी प्यावें; ह्मणजे दाह व तृषा शांत होत्ये.

रक्तजदाहलक्षण.

कृत्स्नदेहानुगंरक्तमुद्रिक्तंदहतिध्रुवं ॥ संचूष्यतेतृष्यतेचाताम्राभस्ताम्रलोचनः ॥ लोहगंधांगनयनोवन्हिनेवावकीर्यते ॥ पित्तज्वरसमःपित्तात्सचाप्यस्यविधिःस्मृतः ॥

अर्थ—रक्तजदाहामध्यें सर्वशरीरांतील रक्त कुपित होऊन दाह उत्पन्न करितें, तणेकरून मनुष्य अग्नीप्रमाणें तप्त व तृषित होतो. त्याचे शरीराची कांति; व नेत्र हे आरक्त होतात; आणि तोंडाला व आंगाला रक्ताचीगंधी येत्ये, आंगावर अग्नि टाकिल्याप्रमाणे दाह होतो; आणि पित्तज दाहामध्यें पित्तज्वराची लक्षणें होतात; व त्यावर चिकित्सा ही पित्तज्वरा वरील करावी.

रसादिगुटी.

रसवलिघनसारचंदनानांसनलदसेव्यपयोदजीवनानां ॥ अपहरतिगुटीमुखस्थितेयंसकलसमुत्थितदाहमाश्रयेत्तां ॥

अर्थ—पारा, गंधक, कापुर, चंदन, काळावाळा, नागरमोथे, व तूप यांची गोळी तोंडात धरली असतां; ती त्रिदोषदाहाचा नाश करील, यास्तव ही मुखात धरावी.

चंद्रकलारस.

गगनदरदयुक्तंशुल्वसूतंचगंधंप्रहरमधुसुपिष्टंवल्लयुग्मंनरोयात् ॥ ज्वरहरगदसिंहोशृंगवेरोदकेनप्रथमजनितदाहंतक्रभक्तंचभोज्यं ॥

अर्थ—अभ्रकभस्म, हिंगूळ, पारा व गंधक एकत्र मधांत प्रहरभर खलावें; नंतर दोन वालभार आल्याचे रसाबरोबर चाटावें. हें वाताचे कोपापासून झालेला दाह शांत करील. ह्याला ताकभाताचें पथ्य करावें, हा ज्वरनाशक ही आहे. ह्याला गदसिंह असें ह्मणतात.

तृष्णानिरोधजदाहलक्षण.

तृष्णानिरोधादव्धातौक्षीणेतेजःसमुत्थतं ॥ सबाह्याभ्यंतरंदेहंप्रदहेन्मं
दचेतसः ॥ संशुष्कगलताल्वोष्ठोजिव्हांनिष्कृष्यवेपते ॥

अर्थ–तृषेचे निरोधेंकरून रस क्षीण झाला असतां; पित्तोष्मा वृद्ध होऊन मनुष्यास बाहेर आंत असा दाह उत्पन्न करितो, त्याणे रोगी बेशुध्द होतो; व कंठ, तालु, ओष्ठ, जिव्हां, हीं शुष्क होतात; आणि जीभ बाहेर काढून कांपवितो.

तृष्णानिरोधजदाह.

सशर्करंसंदुशैलंशीतमंभःपिबेन्नरः ॥
तृष्णानिरोधजंदाहंहंतितोयमिवानिलं ॥

अर्थ–साकर, कापूर, शिलाजित यांचें चूर्ण थंडपाण्यांत घालून तें पाणी प्यावें; ह्मणजे तृषेचा निरोधानें झालेल्यादाहाचा नाश करितें; जसें पाणी अग्नीचा नाश करितें तसें.

यवादिमंथ.

पाचितैःशीतनीरेणसघृतैर्यवसक्तुभिः ॥
नातिसांद्रद्रवैर्मंथस्तृपादाहार्तिपित्तहा ॥

अर्थ–भाजलेल्या सातूंचें पीठ, तूप व थंडपाणी हीं एकत्र करून जो फार पातळ नव्हे असा जो रस करतात त्यास मंथ ह्मणतात. तो तृष्णा, दाहपीडा व पित्त यांचा नाशक आहे.

मृतसंजीवनीगुटी.

यष्टीमधुलवंगंचाशिलाकल्कंत्रुटिस्तथा ॥ सहस्रभावनाकार्यानवतं
दुलवारिणा ॥ याममात्रंदृढंमर्द्यवटीकोलसमास्मृता ॥ कृष्णकार्पा
सनीरेणतृष्णादाहज्वराञ्जयेत् ॥ मूर्च्छाद्यमुग्ररोगंचवातंपित्तंचना
शयेत् ॥ मृतसंजीवनीप्रोक्तापूज्यपादैरुदीरिता ॥

अर्थ - जेष्ठीमध, लवंग, शिलाजित व वेलदोडे यांचे चूर्णास नव्या तांदुळांच्या धुवणाच्या सहस्रभावना द्याव्या; नंतर एक प्रहर चांगलें खलून बोराप्रमाणें गोळी करून काळे कापशीचें रसांत कालवून द्यावी; ती तृष्णा, दाह, ज्वर, मूर्छादि उग्ररोग व वातपित्त यांचा नाश करील. हीला मृतसंजीवनी असें ह्मणतात. श्रेष्ठ पुरुषानीं सांगितली आहे.

रक्तपूर्णकोष्ठजदाह.

असृजःपूर्णकोष्ठस्यदाहोन्यःस्यात्सुदुस्तरः ॥

अर्थ–शस्त्रादिकांचा प्रहार होऊन रक्तानें कोष्ट भरतो, त्या पासून दाह होतो, तो फार असाध्य आहे. कोष्ठशब्दानें आमादिकांचीं स्थानें घ्यावीं.

रक्तपूर्णकोष्टजदाह.

धान्याकधात्रीवासानांद्राक्षापर्पटयोर्हिमः ॥
रक्तपित्तंज्वरंदाहंतृष्णांशोषंचनाशयेत् ॥

अर्थ—धने, आवळकाठी, आडुळसा, द्राक्षे, पित्तपापडा यांचा हिम रक्तपित्त, ज्वर, दाह, तृषा व शोष यांचा नाशक आहे.

दुसराप्रकार.

पीत्वावेणुत्वचःक्वाथंसक्षौद्रंशिशिरंनरः ॥
रक्तसंपूर्णकोष्ठोत्थदाहंजयतिदुस्तरम् ॥

अर्थ- वेळुच्या सालीचा काढा थंड करून मध घालून प्यावा; ह्मणजे रक्तपूर्णकोष्ठांतला दाह दुस्तर जरी असेल तथापि त्यास जिंकील.

दशसारचूर्ण.

यष्टीधात्रीफलद्राक्षाएलाचंदनवालकम् ॥ मधूकपुष्पंख
र्जूरंदाडिमंपेषयेत्समं ॥ सर्वतुल्यासितायोज्यापलार्धंभक्षये
त्सदा ॥ दशसारमिदंख्यातंसर्वपित्तविकारनुत् ॥

अर्थ—जेष्टीमध, आवळकाठी, मनुका, वेलदोडे, चंदन, वाळा, मोहाचें फूल, खजूर व डाळिंब यांचें समभाग चूर्ण करून त्याचे बरोबर साकर घालून कालवून २ तोळे प्रमाणे सेवन करावें, ह्याला दशसार चूर्ण ह्मणतात, हें सर्व पित्तविकार दूर करणारें आहे.

धातुक्षयजन्यदाह.

धातुक्षयोत्थोयोदाहस्तेनमूर्छातृषान्वितः ॥
क्षामस्वरःक्रियाहीनःसर्सीदेद्भृशपीडितः ॥

अर्थ—रसादिधातूच्या क्षयापासून जो दाह होतो, त्याणें मूर्छा येते, ताहान लागते, स्वर खोल जातो, निश्चेष्ट पडतो; व अत्यंत दुःखित होऊन मरतो.

खर्जूरादि चूर्ण.

खर्जूरामलबीजानिपिप्पलीचशिलाजतु ॥ एलामधुकपाषाणचंदनैर्वा
रुर्वाजकं ॥ धान्यकंशर्करायुक्तंपातव्यंज्येष्टिवारिणा ॥ अंगदाहंलिं
गदाहंगुदजंक्षीणशुक्रजं ॥ शर्कराश्मरिशूलघ्नंवृष्यंवलकरंपरं ॥ नाश
येन्मूत्ररोगांश्चतथाशुक्रभवानपि ॥

अर्थ—खजूर, आवळे, पिंपळी, शिलाजित, वेलदोडे, ज्येष्ठमध, पाषाणभेद, चंदन, कांक-

डीचें बीं, धनें व साकर याचें चूर्ण जेष्ठमधाच्या काढयाबरोबर घ्यावें. तेणेंकरून अंग दाह, लिंगदाह, गुददाह, क्षीणशुक्रजदाह, शर्करा, अश्मरी व शूल यांचा नाश होईल; व हे वृष्य व बलदेणारें आहे; आणि मूत्ररोग, शुक्रापासून झालेले रोग, यांचा नाश करील.

धातुक्षयजदाह.

धातुक्षयोत्थंदाहंतुजयेदिष्टार्थसाधनैः ॥
क्षीरमांसरसाहारैर्विधिनोक्तेनतत्रच ॥

अर्थ—धातुक्षयामध्यें दाह होतो, तो इष्टसाधनानीं किंवा क्षीर, मांसरस यांचा आहार, इत्यादि विधीनीं जिंकावा.

पित्तदाह.

पित्तज्वरहरःसर्वोपित्तदाहेविधिर्मतः ॥

अर्थ—पित्तदाहावर संपूर्णपित्तज्वरनाशक विधि करावा.

औदुंबरस्यनिर्यासःसितयादाहनाशनः ॥

अर्थ—उंबराचा चिक साखर घालून द्यावा, तो दाहनाश करितो.

छिन्नासारःसितायुक्तःपित्तज्वरनिषूदनः ॥

अर्थ—गरुडवेलीचें सत्व साकरेशीं द्यावें, तें पित्तज्वरनाश करितें.

क्षतजदाह.

क्षतजेनाश्नतश्चान्यःशोचतोवाप्यनेकधा ॥
तेनांतर्दह्यतेत्यर्थंतृष्णामूर्छाप्रलापकं॥

अर्थ—क्षत, उपोषण, आणि शोक यांपासून दाह होतो. त्यामध्यें अभ्यंतरीं अत्यंत दाह, ताहान, मूर्छा, आणि बडबड हीं लक्षणें होतात.

चंदनादिचूर्ण.

चंदनोशिरकुष्ठाब्दधात्रीचोरकमुत्पलं ॥ मधुकंमधुपुष्पंचद्राक्षाखर्जूरकंतथा ॥ चूर्णंकृत्वासमसितंप्रातःशीतांबुनापिबेत् ॥ रक्तपित्तंतथाश्वासंपैत्तं गुल्मंसमुद्धरेत् ॥ अंगदाहंशिरोदाहंशिरोविभ्रममेवच ॥ कामलां चप्रमेहांश्चपैत्तज्वरविनाशनं ॥ चंदनाद्यमिदंचूर्णंपूज्यपादेनभाषितम् ॥

अर्थ—चंदन, वाळा, कोष्ठकोळिंजन, नागरमोथा, आवळा, गठोणा, कमळ जेष्ठमध, मोहाचें फूल, द्राक्षें व खजूर यांचें चूर्ण करून त्या चूर्णाबरोबर साकर घालून प्रातःकाळीं थंड पाण्याबरोबर खावें. तेणेंकरून रक्तपित्त, श्वास, पित्तगुल्म, अंगदाह, शिरो-

दाह, मस्तकांतील भ्रम, कामला, प्रमेह, पित्तज्वर यांचा नाश होईल. याला चंदनाद्यचूर्ण असें ह्मणतात; हें मोठ्या श्रेष्ठपुरुषानीं सांगितलें आहे.

रक्तजदाहावर.

शाखाश्रयांयथान्यायंरोहिणींव्यधयेच्छिरां ॥
रक्तजातस्ततोदाहःप्रशाम्यतिनसंशयः ॥

अर्थ—हाताची रोहिणी या नावाची शीर आहे, ती शस्त्रानीं टोंचून रक्त काढावें; ह्मणजे रक्तापासून झालेला दाह शांत होतो यांत संशय नाहीं.

चंदनादि काढा.

चंदनंपर्पटोशीरीनीरनीरदनीरजैः ॥ मृणालमिसिधान्याक पद्मकामलकैःकृतः ॥ अर्धशिष्टःसितासीतःपीतःक्षौद्रसम न्वितः ॥ क्काथोविपोथयेद्दाहंतत्क्षणंपरमोल्वणं ॥

अर्थ—चंदन, पित्तपापडा, थोरदर्भाचें मूळ, वाळा, नागरमोथा, कमल, बिसें, बडीशेप धन, पद्मकाष्ट व आवळकाठी, यांचा काढा द्वितीयांश करून त्यांत साकर व थंड झाल्या वर मध घालून द्यावा; ह्मणजे तत्क्षणीं मोठ्या वाढलेल्या दाहाचा नाश करितो.

योग.

रसौषधिसमुद्भूतेतापेपिसकलेहितं ॥ पानीयामलकीद्राक्षा नारिकेलेक्षुशर्कराः ॥ सेवनायहितातापेकोमलंमूत्रलंफलं ॥

अर्थ—मात्रा किंवा औषधि यापासून दाह झाला असतां; तच्छमनार्थ पाणी, आवळे, द्राक्षें, नारिकेल, ऊंस, साकर; किंवा कांकडी हे पदार्थ द्यावे. ते हितकारक होतात.

लाजादि काढा.

लाजाव्हचंदनोशीरक्काथोंतःशर्करान्वितः ॥
शीतःपीतोनिहंत्याशुदाहंपित्तज्वरंनृणां ॥

अर्थ—काळा वाळा, रक्तचंदन व वाळा यांचा काढा साकर घालून थंड करून द्यावा. तो दाह व पित्तज्वर यांचा नाश करितो.

शीतांबुचंदनसुगंधिकषाययुक्तमाश्लिष्यचार्द्रवसनोपस्ततांबुपूर्णाः ॥
तैलैर्मधूककुसुमारुकचंदनाद्यैर्द्रोणींप्रपूर्यशिशिरैरवगाहयेच्च ॥

अर्थ—दाह झालेल्या रोग्याला. थंडपाणी, चंदन व सुगंध पदार्थांचे कषाय यांत, भिजविलेलें वस्त्र आंगावर द्यावें; व पाण्यांत; किंवा मोहाचीं फुलें, आरुक व चंदन इत्यादिकांचे थंडकाढे; व तैलें याणीं टांके भरून त्यांत स्नान करवावें.

कमलादि पान.

पाययेत्कमलस्यांभःशर्करांभःपयोपिवा ॥
क्षीरमिक्षुरसंवापिकारयेत्पित्तवृद्धिभिः ॥

अर्थ–जांला पित्त वाढलें असें वाटतें त्याणीं कमळांच्या सुगंधाचें पाणी, किंवा साकर पाणी, किंवा दूध, अथवा उंसाचा रस हे पदार्थ भक्षण करावें.

कोष्ठपूर्णरक्तदाह.

धृत्वापात्रेकांस्यजेताम्रजेवानाभौपुंसांदाहरोगातुरस्य ॥
धारापातैःशीतलंतत्रतोयंनिक्षेप्तव्यंकोष्ठदाहोपशांत्यै ॥

अर्थ–रोग्याच्या कोठाचा दाह होऊं लागल्यास त्याच्या नाभीवर तांब्याचें किंवा कांशाचें पात्र ठेवून त्यांत थंड पाण्याची धार धरावी; ह्मणजे दाह शांत होतो.

दाहरोगतैल.

कुशादिशालिपर्णीचजीवकर्षभसाधितं ॥
तैलंघृतंवादाहघ्नंवातपित्तविनाशनं ॥

अर्थ–कुशादिगण, सालवण, जीवक आणि ऋषभक याच्या कल्काने व काढ्यानें सिद्ध केलेलें तेल किंवा तूप, दाह, वायु, आणि पित्त यांचा नाश करितें.

तिलतैल.

तिलतैलंभवेत्प्रस्थंतत्षोडशगुहाशनैः ॥
कांजिकेविपचेत्तस्माद्दाहज्वरहरंपरं ॥

अर्थ–तिळांचें तेल ६४ तोळे घेऊन त्याच्या सोळापट कांजी घालून सिद्ध करावें, तें दाह व ज्वर यांचा नाश करितें.

पुनर्नवादि तैल.

श्वेतंपुनर्नवामूलंपलंशतमितंशुभं ॥ कृष्णाज्यदुग्धमध्येचपेषयेदाढकं भिषक् ॥ तत्समंतिलतैलंचपृथग्द्रव्याणियोजयेत् ॥ धूपंपोडशभागंचम रीचाष्टवरालकं ॥ कचोरमुशिरंश्वेतंकृष्णोशीरस्तथैवच ॥ मंजिष्ठंरं गचूर्णंचश्रीगंधंरक्तचंदनं॥ कृष्णागरुंचरुद्राक्षान्पलमेकंप्रयोजयेत् ॥ तच्चूर्णंतैलमध्येचनिक्षिपेत्पाचयेत्सुधीः ॥ मेहारिकाष्ठयुक्तेनपाचये त्कोमलाग्निना ॥ सुपक्कंतैलमुधृत्यरात्रौवंगंचमर्दयेत् ॥ अंगशूल मंगदाहान्नेत्ररोगान्सपीनसान् ॥ पांडुकामलमुष्णानिसूतिकासन्नि

पातजित् ॥ करदाहान्पाददाहान्तंद्रांकटिसमीरजान् ॥ क्षयकुष्ठा दिकंडूंश्वगजकर्णादिकंतथा ॥ शिरोरोगान्भ्रमान्पित्तंनेत्राणांदृष्टिगो चरं ॥ अमृतंमात्रतश्चैवज्वराणांजीर्णिनामपि ॥ अस्थिगतंज्वरंचैव मेहज्वरप्रशांतये ॥ सर्वांगेमर्दनंचैवमंगलस्नानमाचरेत् ॥ शिवोदि तमिदंतैलमश्विभ्यांगोचरीकृतं ॥ सर्वरोगहरंचैवदुर्लभंभिषजैर्भुवि ॥ साधयेद्गुरुमुखेनैवसिद्धिर्भवतिनान्यथा ॥

अर्थ—श्वेतपुनर्नव्याचे मूळ ४०० तोळे, घेऊन तें काळयागाईच्या २५६ तोळे तुपां त व दुधांत वाटावें; व ४०० तोळे तिळांचें तेल व धूप १६, मिरीं व राळ ८ भाग, कचोरा, वाळा, काळा वाळा, मंजिष्ठ, काथ, चंदन, रक्तचंदन, कृष्णागर व रुद्राक्ष, हे प्रत्येकीं ४ तोळे, यांचें चूर्ण त्या तेलांत घालून तें मेहारीच्या काष्टाच्या योगानें मंदा ग्नीवर सिध्द करून उतरावें; आणि त्या तेलानें रात्रीं अंगमर्दन करावें; ह्मणजे अंगशूल, अंगदाह, नेत्ररोग, पडसें, पांडुरोग, कावीळ, उष्णता, बाळंतरोग, सन्निपात, हातपायां-च्या दाह, झांपड, कटिवात, क्षय, कृच्छ्र, कंडू, गजकर्ण, मस्तकरोग, भ्रम, पित्त, नेत्र-रोग, दृष्टिरोग, जीर्णज्वर, अस्थिज्वर व मेहज्वर यांवर हें सर्वांगाला मर्दन करून मंगळ स्नान करावें, हें तैल पूर्वी शिवानी सांगितलें; आणि आश्विनीकुमारानीं प्रसिद्ध केलें. हें संपूर्ण रोगनाशक आहे, हें वैद्यानां पृथ्वीवर दुर्लभ, हें सिद्ध केलें असतां; सर्व सिद्ध होतें, यांत संशय नाहीं.

तंदूलीयादिपान.

तंदुलीयकमूलानिधान्यजीरकजंपयः ॥
तुलसीस्वरसंटंकंतापेपिपिवतोहितं ॥

अर्थ—तांदुळजाच्या मुळया व जिरें यांचें पाणी व तुळशीचा रस हीं सर्वमिळून एक तो ळा एकत्र करून घ्यावें, ते दाहावर आणि संतापावर ही हितकारक आहे.

फलिनीलोध्रसेव्यांबुहेमपत्रंकुटंनटं ॥
कालीयकरसोपेतंदाहेशस्तंप्रलेपनं ॥

अर्थ—मेंदी, लोध, काळा वाळा, वाळा, धोत्र्याचीं पानें, लाहान नागरमोथा व पीत चंदन यांचा लेप दाहशांत करतो.

ऱ्हीविरपद्मकोशीरचंदनक्षोदवारिणा ॥
संपूर्णामवगाहेतद्रोणींदाहार्दितोनरः ॥

अर्थ—वाळा, कमळ, काळा वाळा व चंदन यांचे चूर्ण पाण्यांत टाकून त्या पाण्या ने भरलेलें पिंप वगैरे त्यांत बुडी मारावी.

बदरीपल्लवोत्थेनफेनेनारिष्टकस्यवा ॥
सुरामंडावुदध्यम्लंमातुलिंगरसोमधु ॥

अर्थ–बोरीचे पाल्याचा फेस, लिंबाचे पाल्याचा फेस, मद्यावरलें पाणी दह्यांची निवळ व महाळुंगाचा गोड रस इतके दाहशामक आहेत.

वाप्यःकमलहासिन्योजलयंत्रगृहाःशुभाः ॥
नार्यश्चंदनदिग्धांग्योदाहदैन्यहरामताः ॥

अर्थ–कमळानीं शोभणाऱ्या मोठ्या विहिरी, जळमंदीर, चंदनाचा लेप केलेल्या स्त्रिया, दाहापासून दैन्य झालेलें दूर करतात.

प्रातःपर्युषितंधान्यंकुलितंसितयायुतं ॥
अंतर्दाहंहरेत्पीतंदुःखंमृत्युंजयोयथा ॥

अर्थ– रात्रीं धने पाण्यांत भिजत घालून प्रातःकाळीं कुसकरून तें पाणी साकर घालून प्यावें; ह्मणजे अंतर्दाह शांत करील जसें. दुःखाचें शमन सांब करितो तसें.

सहस्रधौतेनघृतेनदिग्धदेहस्यदाहःक्षशतांविभर्ति ॥
अन्यांगनासंगमसादरस्यस्वीयेपुदारेपुयथाभिलापः ॥

अर्थ–सहस्र वेळा धुतलेलें तूप अंगास चोळलें असतां; दाह कमी होतो. जसा परस्त्रीशीं संसक्त पुरुषाचा मनोरथ स्वस्त्रीचे ठायीं कमी होतो तसा.

तृड्दाहमोहाःप्रशमंप्रयांतिनिंबप्रवालोत्थितफेनलेपात् ॥
यथानराणांधनिनांवनांनिसमागमाद्वारविलासिनीनां ॥

अर्थ–कडुलिंबाचीं पानें आणि पोंवळें यांचा फेस अंगास चोळावा; ह्मणजे तृषा, दाह, मोह, हे शांत होतात. जसें धनिकलोकांचें धन वेश्यासमागमाच्या योगानें नष्ट होतें.

दाहेतिशिशिरंतोयंक्रियाकार्यासुशीतला ॥

अर्थ–अति थंड पाणी प्यावें; आणि शीत उपचार करावे; ह्मणजे दाह शांत होतो.

सर्वांगेचंदनालेपश्चंद्रकस्तूरिकायुतः ॥
सितनीरजलेपोवाधारागारनिवेशनं ॥

अर्थ–कापूर व कस्तूरीयुक्तचंदनाचा सर्वांगास लेप करावा; अथवा पांढरे कमळाचा लेप करावा आणि तळघरांत वसावें; ह्मणजे दाह शांत होतो.

सहजस्नेहसोत्साहमुग्धमंजुललापिनां ॥
बालकानांसमाश्लेषस्तापंनिर्वापयेज्जवात् ॥

अर्थ–स्वाभावीक स्नेहयुक्त आणि उत्साहानें लाडकें मंजूळ असें बोलणाऱ्या मुलाच्या आलिंगनानें ताप शांत होतो.

उशीरागारशयनंतालवृंतानुवर्तनं ॥
साहित्यसरसावाणीकवीनांतापत्दत्रयं ॥

अर्थ—वाळयाचे गृहांत शयन, पंख्याचा वारा, कवींचें साहित्यशास्त्रयुक्त सुरस भाषण हीं तीन तापशामक आहेत.

पानीयामलकीद्राक्षानारिकेलंसुशर्करं ॥
गायनंसुकुमारीणांदाहमूर्च्छांहरेद्द्रुतं ॥

अर्थ— आवळा व द्राक्षें यांचा रस प्यावा, नारळाचे पाणी साकरेसहित प्यावें; सुकुमारीस्त्रियांचें गायन ऐकावें; ह्मणजे ताप आणि मूर्च्छा यांचें हरण होईल.

सेवनायहितंतापेकोमलंमूत्रलंफलं ॥

अर्थ—दाह झाला असतां; मूत्रकरणारें कोंवळें फळ सेवन करावें.

दुसरा चंद्रकलारस.

प्रत्येकंतोलमादायसूतंताम्रंतथाभ्रकं ॥ द्विगुणंगंधकंचैवकृत्वाकज्जलिकांशुभां ॥ मुस्तादाडिमदूर्वोत्थैःकेतकीस्तनजद्रवैः ॥ सहदेव्याः कुमार्याश्चपर्पटस्यापिवारिणा ॥ रामशीतलिकातोयैःशतावर्यारसेन च ॥ भावयित्वाप्रयत्नेनदिवसेदिवसेपृथक् ॥ तिक्तागुडूचिकासत्वं पर्पटोशीरमाधवी ॥ श्रीगंधंसारिवाचैषांसमानंसूक्ष्मचूर्णितं ॥ द्राक्षादिककषायेणसप्तधापरिभावयेत् ॥ ततोधान्याश्रयंकृत्वावटचःकार्यश्चिणोपमाः ॥ अयंचंद्रकलानाम्नारसेंद्रःपरिकीर्तितः ॥ सर्वपित्तगदध्वंसीवातपित्तगदापहः ॥ अंतर्बाह्यमहादाहविध्वंसनमहाघनः ॥ ग्रीष्मकालेशरत्कालेविशेषेणप्रशस्यते ॥ कुरुतेनाग्निमांद्यंचमहातापज्वरंहरेत् ॥ भ्रमंमूर्च्छांहरत्याशुस्त्रीणांरक्तंमहास्रुतिं ॥ ऊर्ध्वाधोरक्तपित्तंचरक्तवांतिंविशेषतः ॥ मूत्रकृच्छ्राणिसर्वाणिनाशयेन्नात्रसंशयः ॥

अर्थ—पारा, ताम्रभस्म व अभ्रकभस्म हीं प्रत्येक एकतोळा, गंधक २ तोळे, यांची बारीक कज्जली करून, त्यास नागरमोथे, डाळिंब, दूर्वा, केतकीचे पारंबे, सहदेवी, कोरफड, पित्तपापडा, आरामशीतलिका व शतावरी इतक्यांच्या रसाची एक एक दिवस निराळी भावना द्यावी; नंतर कटुकी, पित्तपापडा, वाळा, मधुमालती, चंदन, उपळसरी यांची चूर्णे आणि गुळवेलीचें सत्व, हीं सर्व समभाग घेऊन भावना दिलेल्या औषधांत मिळवून पुनः द्राक्षादिककाढयाच्या भावना सात द्याव्या; नंतर धान्यांत ठेऊन

काहि दिवसांनी काढून चण्याप्रमाणे गोळ्या कराव्या, हा चंद्रकला या नामेंकरून रसेंद्र असा कथित आहे. हा सर्व पित्तरोग, वातपित्तरोग, अंतर्बाह्य दाह शमविण्याविषईं ज सा मेघ, हा ग्रीष्मकाळीं व शरत्काळीं विशेषेंकरून प्रशस्त आहे. हा अग्निमांद्य न करतां मोठा संताप, ज्वर, भ्रम, मूर्छा, स्त्रियांचा रक्तस्राव, उर्ध्वरक्तपित्त अधोरक्तपित्त, रक्तवांति, सर्वमूत्रकृछ्र यांचा नाश करील यांत संशय नाहीं.

मर्माभिघातजदाह.

मर्माभिघातजोप्यस्तिसोसाध्यःसप्तमोमतः ॥

अर्थ—मर्माचे ठायीं अभिघात झाला असतां; दाह होतो, तो असाध्य हा सातवा दाह आहे.

असाध्यलक्षण.

सर्वएवविवर्ज्याःस्युःशीतगात्रस्यदेहिनः ॥

अर्थ—अंग थंड झालें असतां सर्व दाह असाध्य होतात, ते सर्व सोडावे.

पथ्य.

शालयःषष्टिकामुद्गामसूराश्चणकायवाः ॥ धन्वमांसरसालाजमंडंवैस क्तुवासिता ॥ शतधौतंघृतंदुग्धंनवनीतंपयोभवं ॥ कूष्मांडंकर्कटीमो चापनसस्वादुदाडिमं ॥ पटोलपर्पटीद्राक्षाधात्रीफलपरूपकं ॥ विंबी तुंबीपयःपेठीखर्जूरंधान्यकंमिशी ॥ वालतालंप्रियालंचशृंगाटंचकसे रुकं ॥ मधूकपुष्पंह्रीवेरंपथ्यातिक्तानिसर्वशः ॥ शीताप्रदेहाभूवेश्मसे कोभ्यंगोवगाहनं॥ फुल्लोत्पलदलक्षौमशय्याशीतलकाननं॥ कथाविचि त्रागीतानिवाद्यंमंजुलभाषणं ॥ उशीरचंदनोलेपःशीतांशुःशिशिरोनि लः ॥ धाराग्रहंप्रियास्पर्शोप्रतीरंहिमवालुकं ॥ सुधांशुरश्मयःस्नानं मणयोमधुरोरसः ॥ पुरोयानिविधेयानिपित्तहारीणितानिच ॥ इतिदा हवतांनृणांपथ्यवर्गउदाहृतः ॥

अर्थ—साठक्यासाळी, मूग, मसूरा, चणे, यव, धन्वदेशांतील मांसाचे रस, लाजमंड, सक्तु, साकर, शतधौतघृत, दूध, दुधाचें लोणीं, कोहळा, काकडी, केळें, फणस, गोडदाळिंब, पडवळ, पित्तपापडा, द्राक्षें, आवळकाठी, फालसा, तोंडलें, पांढरा भोंपळा, आलें खजूर, धने, बडीशेप, कोवळें ताडफळ, चारोळ्या, शिंगाडे, कचरा, मोहाचीं फुलें, वाळा, हरीतकी, कडुपदार्थ, साकर, पेंड बांधणें, भुयार, सेचन, अभ्यंग, स्नान, फुललेल्या कमळांची शय्या, थंड बगीचा, कथा, गायन, मंजुल भाषण, वाळा व चंदन यांचा ले-

चांदणें, थंड वारा, जळघर, स्त्रियांचें आलिंगन, वाळवंट, चंद्रकिरण, स्नान, रत्नधारण, मधुररस, आणि पूर्वी जे पित्तनाशक योग सांगितले ते इत्यादि सर्व दाहवान् रोग्याला पथ्यवर्ग सांगितला.

अपथ्य.

विरुध्दान्यन्नपानानिक्रोधोवेगविधारणं ॥ श्रमंव्यवायमाध्मानंक्षार पित्तकराणिच ॥ व्यायाममातपंतक्रंतांबूलंमधुरामठं ॥ व्यवायंकटुतिक्तोष्णंदाहवान्परिवर्जयेत् ॥

अर्थ—क्षीरमत्स्यादि विरुध्दान्न, विरुध्दपानें, क्रोध, मलमूत्रांदिकांचा वेगरोध, श्रम, स्त्रीगमन, पोटफुगणें, क्षार, पित्तकर वस्तु, व्यायाम, ऊन, ताक, विडा, मध हिंग, कडु, तिखट, उष्ण, हे पदार्थ दाहरोग्यानें वर्ज करावे.

उन्मादरोग, कर्मविपाक.

मोहयित्वापरान्यस्तुभुंक्तेवस्तुविगर्हितं ॥ सोन्मादवातयुक्तःस्यात्कृछ्रंचांद्रायणंतथा ॥ कुर्यात्सारस्वतंनामजपेद्ब्राह्मणतर्पणं ॥

अर्थ—जो कोणी दुसऱ्याला मोह घालून निंद्य वस्तु भक्षण करितो, तो उन्माद, व वायु, यांणीं पीडित होतो, त्याणें चांद्रायण व कृछ्र असे प्रायश्चित, किंवा सरस्वताख्या नामाचा जप करावा; ब्राह्मणभोजन करावें,

उन्माद व भूतोन्मादनिदान.

मदयंत्युद्गतादोषायस्मादुन्मार्गगामिनः ॥
मानसोयंमतोव्याधिरुन्मादइतिकीर्तितः ॥

अर्थ—वातादिदोष आपला मार्ग सोडून अन्यमनोवाहिनीधमनीप्रत जाऊन चित्तविभ्रम करितात, यास्तव या रोगाला मनोव्याधि उन्माद असें ह्मणतात.

उन्मादभेद व निदान सांगतात.

एकैकशःसर्वशश्चदोषैरत्यर्थमूर्छितैः ॥ मानसेनचदुःखेनसपंचविधउच्यते ॥ विषाद्भवतिषष्ठश्चयथास्वंतत्रभेषजं ॥ सचाप्रवृद्धस्तरुणोमदसंज्ञांबिभर्तिच ॥ विरुद्धदुष्टाशुचिभोजनानिप्रधर्षणंदेवगुरुद्विजानां ॥ उन्मादहेतुर्भयहर्षपूर्वोमनोभिघातोविषमाश्चचेष्टाः ॥

अर्थ—वातादिदोषांनीं पृथक् तीन प्रकारचा सन्निपातज उन्माद, मानस दुःखजन्य,

आणि विषोत्थ, याप्रकारें सहा प्रकारचा उन्माद जाणावा. याविषयीं औषध ज्या संबंधाचा जो असेल त्याचें शामक द्यावें. उदाहरण वातसंबंधाचे उन्मादाला वातावरचीं औषधें द्यावीं. हा विकार जोंपर्यंत वाढतो आहे व तरुण आहे तोंपर्यंत मद अशी संज्ञा पावतो. मद होण्याचीं सामान्य कारणें सांगतो, विरुद्ध म्हणजे क्षीर मत्स्यादिक, विषमंत्रादिकानीं दुष्ट, चांडाळादिकानीं स्पृष्ट अशा प्रकारच्या अन्नाचें सेवन, देव व ब्राह्मण यांची निंदा, भय, हर्ष, कांहीं कारणानीं अंतःकरणाचा पराभव होतो त्याणे व नाना प्रकारच्या शरीर चेष्टा हीं सर्व उन्मादांचीं कारणें होत.

संप्राप्ति सांगतो.

तैरल्पसत्वस्यमलाःप्रदुष्टाबुद्धेर्निवासंहृदयंप्रदुष्य ॥
स्रोतांस्यधिष्ठायमनोवहानिप्रमोहयंत्याशुनरस्यचेतः ॥

अर्थ—जा मनुष्याचा सत्वगुण अल्प आहे, त्या मनुष्याचे वातादिदोष पूर्वोक्त कारणें करून दुष्ट होऊन जें बुद्धीचें निवासस्थान (हृदय) त्यातें दूषित करून मनोवहस्रोतसांतें आक्षिप्त करून मनुष्याचे चित्ताला त्वरित मोहित करितात.

पूर्वरूप.

धीविभ्रमःसत्वपरिप्लवश्चपर्याकुलादृष्टिरधीरताच ॥
अबद्धवाक्यंहृदयंचशून्यंसामान्यमुन्मादगदस्यलिंगं ॥

अर्थ—बुद्धीस भ्रांति पडत्ये, चित्त चंचळ होतें, दृष्टि व्याकुळ होत्ये, अधिरपणा येतो, अबद्ध भाषण करितो; व अंतःकरण निर्विषय होतें हीं सामान्य उन्मादाचीं पूर्वरूपें जाणावीं.

वातोन्मादलक्षण.

रूक्षाल्पशीतान्नविरेकधातुक्षयोपवासैरनिलोतिवृद्धः ॥ चिंतादिदुष्टं हृदयंप्रदुष्यबुद्धिंस्मृतिंचाप्युपहंतिशीघ्रं ॥ अस्थानहासस्मितनृत्य गीतवागंगविक्षेपणरोदनानि ॥ पारुष्यकार्श्यारुणवर्णताचजीर्णेबलं चानिलजस्यरूपं ॥

अर्थ— रूक्ष, अल्प व शीत असें अन्न, विरेच व वांति यांची प्रवृत्ति, रसादिधातुक्षय व उपवास यांणी वायु कुपित होऊन चिंतादिकानीं दुष्ट जालें जें मन त्याप्रत प्रवेश करून बुद्धि व स्मृति यांतें त्वरित नाहींशा करितो; नंतर तो मनुष्य कारणावांचून गालांतल्यागालांत थोडथोडें हसणें, हास्य, नृत्य, गीत, वाग्विक्षेप, अंगविक्षेप व रोदन यांतें करतो;-आणि त्याचें शरीर रूक्ष, अरुण वर्ण असें होतें, व आहार जीर्ण झाला असतां; व्याधीचें दक्कार होतें. हीं वातोन्मादाचीं रूपें जाणावीं.

पित्तोन्मादनिदान.

अजीर्णकट्वम्लविदाहिशीतैर्भोज्यैश्चितंपित्तमुदीर्णवेगं ॥ उन्मादम
त्युग्रमनात्मकस्यत्द्दिस्थितंपूर्ववदाशुकुर्यात् ॥ अमर्षसंरंभविनग्नभा
वाःसंतर्जनाभिद्रवणौष्ण्यदोषाः ॥ प्रच्छायशीतान्नजलाभिलाषाःपी
तास्यतापित्तकृतस्यलिंगं ॥

अर्थ— अजीर्ण, तिखट, आंबट, विदाही, उष्ण, अशा आहारानीं पित्त संचय होऊन तें चितादिकांनीं दुष्ट झालेल्या अंतःकरणाला व बुद्धीला भ्रमिष्ट करून अत्युग्र उन्माद उत्पन्न करितें; तेणें करून असहिष्णुता, क्रोध, गर्व, वस्त्रत्याग, निंदाकरणें, पलायनकरणें, ओष्ठविकार, (ओठचावणेंवगैरे) दाह हीं लक्षणें होतात. छाया, शीत, अन्न व जल यांची इच्छा होत्ये; व शरीराची कांति पीतवर्ण होत्ये. हीं पित्तजउन्मादाचीं लक्षणें जाणावीं.

कफोन्माद.

संपूर्णैर्मंदविचेष्टितस्यसोष्माकफोमर्माणिसंप्रवृद्धः ॥ बुद्धिंस्मृतिंचाप्यु
पहंतिचित्तंप्रमोहयन्संजनयेद्विकारं ॥ वाक्चेष्टितंमंदमरोचकश्चना
रीविविक्तप्रियतातिनिद्रा ॥ छर्दिश्चलालाचबलंचभुंक्तेनखादिशौ
क्ल्यंचकफात्मकेस्यात ॥

अर्थ—नानाप्रकारच्या अपरिमितभोजनानीं, निरुद्योगीपणामुळें कफ, पित्तासहवर्तमान मर्मस्थानाप्रत जाऊन वृद्ध होऊन बुद्धि व स्मृति यांतें नष्ट करून चित्तातें मोहित करीत उन्मादाला उत्पन्न करितो. त्यामुळें वाग्व्यापार मंद होतो, व अरोचक, स्त्रीविषईं प्रीति अतिशय, निद्रा, लालाप्रसेक इत्यादि होतात; तो मनुष्य नखें खातो; आणि नख व नेत्र पांढरे होतात. हीं कफोन्मादाचीं लक्षणें जाणावीं.

सन्निपातजउन्मादनिदान.

यःसन्निपातप्रभवोतिघोरःसर्वैःसमस्तैरपिहेतुभिःस्यात् ॥
सर्वाणिरूपाणिबिभर्तिताद्दग्विरुद्धभैषज्यविधिर्विवर्ज्यः ॥

अर्थ—त्रिदोषजउन्माद पूर्वोक्त सर्वकारणेंकरून उत्पन्न होतो, तो अत्यंत प्रबल व उग्र असतो; आणि सर्वउन्मादाचीं लक्षणें धरितो. ह्या त्रिदोषजउन्मादाविषयीं वातादिकांचे उपचार परस्पर विरुद्ध होतील ते करावे.

दुःखोन्मादलक्षण.

चोरैर्नरेंद्रपुरुषैररिभिस्तथान्यैर्वित्रासितस्यधनबांधवसंक्षयाद्वा ॥
गाढंक्षतेमनसिचप्रिययारिरंसोर्जायेतचोत्कटतमोमनसोविकारः ॥

चित्रंब्रवीतिचमनोनुगतंविसंज्ञोगायत्यथोहसतिरोदितिचापिमूढः ॥

अर्थ—चोर, राजाचे दूत, शत्रु, किंवा आणखी दुसऱ्या कारणाने द्रव्य व प्रियबंधु यांचा क्षय झाल्यामुळे अंतःकरणाला फार दुःख झाले, किंवा एकादी स्त्री भोगण्याची इच्छा होउन ती नमिळाली इत्यादि अनेक कारणानीं मनाला मोठा विकार होतो. त्याणें बेफाम होऊन भलतेंच किंवा मनातील गोष्ट बडबडतो, गातो, हंसतो आणि मूर्खासारिखा रडतो.

विषजउन्मादलक्षण.

रक्तेक्षणोहतबलेंद्रियभाःसुदीनःश्यावाननोविषकृतेनभवेद्विसंज्ञः ॥

अर्थ—विषानें झालेल्या उन्मादामध्ये डोळे रक्तवर्ण होतात, इंद्रियें व कांति हीं नष्ट हो तात, अत्यंत दीन होतो, तोंड काळसर होतें; आणि संज्ञेचा नाश होतो. हीं लक्षणें होतात.

असाध्य लक्षण.

अवाङ्मुखस्तून्मुखोवाक्षीणमांसबलोनरः ॥
जागरूकोत्यसंदेहमुन्मादेनविनश्यति ॥

अर्थ—जो उन्मादरोगी तोंडवर किंवा खाली धरुन राहतो; व ज्याचे बल आणि मांसक्षीणझालें, सर्वकाळ जागा राहतो, असा उन्माद रोगी निःसंशय मरतो.

उन्मादशास्त्रार्थ.

कामशोकभयक्रोधहर्षेर्ष्यालोभसंभवान् ॥
परस्परप्रतिद्वंद्वैरेभिरेवशमंनयेत् ॥

अर्थ—काम, शोक, भय, क्रोध, हर्ष, अक्षमा व लोभ यांपासून उत्पन्न झाले रोग ते त्याचे प्रतिद्वंद्वी जें कामशांत्यादिक याणीं निवारण करावे; ह्मणजे कामापासून उत्पन्न झाला जो कामज्वर तो कामशांति झाली ह्मणजे जातो, तसें.

सामान्यउपचार.

वातिकेस्नेहपानंप्राग्विरेकःपित्तसंभवे ॥
कफजेवमनंकार्यंपरोवस्त्यादिकःक्रमः ॥

अर्थ—वातोन्मादावर स्नेहपान, पित्तोन्मादावर विरेचन व कफोन्मादावर वमन याप्रमाणे उपचार करावे; दुसरे ही बस्तिक्रिया इत्यादिक योग करावे.

सामान्यचिकित्सा.

यच्चोपदिश्यतेकिंचिदपस्मारेचिकित्सितं ॥
उन्मादेतच्चकर्तव्यंसामान्याद्दोषदूष्ययोः ॥

अर्थ—जी काय चिकित्सा अपस्मारावर सांगितली असेल ती सर्व उन्मादावर करावी, कारण दोन ही रोगांत दोष आणि दूष्य हीं एकच आहेत, ह्मणोन.

सामान्यउपचार.

स्नेहादिनाक्रमेणादावुन्मादिंसमुपाचरेत् ॥
वस्तिभिःस्नेहकल्कैश्चनिरूहैःस्वेदनांजनैः ॥

अर्थ—स्नेहपानादि क्रमेकरून, बस्ति, स्नेह व कल्क, निरूहबस्ति, घाम काढणें व अंजन इत्यादि उपचार उन्मादावर करावे.

शास्त्रार्थ.

अश्वासयेत्सुहृद्वाक्यैर्ब्रूयादिष्टविनाशनं ॥
दर्शयेदद्भुतंकर्मताडयेच्चकशादिभिः ॥

अर्थ—ज्याला उन्माद झाला, त्याला उत्तम गोष्टींनीं अश्वासन द्यावें; इष्ट वस्तूंचा नाश झाला म्हणून सांगावें; किंवा अद्भुत चेष्टा व कोरडयाचा मार इत्यादि उपचार करावे.

सुवद्ध्वंविजनेगेहेत्रासयेदहिभिर्धिया ॥
वद्ध्वंसर्पपतैलाक्तंन्यसेदुत्तानमातपे ॥

अर्थ—उन्मादरोग्याला एकांतस्थानीं बांधून त्रास द्यावा, सर्प दाखउन भिववावा; व आंगाला सर्षपाचें तेल लाउन उन्हांत उताणा बांधोन ठेवावा.

कपिकच्छाथवातप्तलोहतैलजलैःस्पृशेत् ॥
वक्त्राभिधानेकूपेवासततंचनिवेशयेत् ॥

अर्थ—उन्मादरोग्याला कुहिली, किंवा तापविलेलें लोखंड, तेल, किंवा उदक यांणीं स्पर्श करावा; किंवा तोंडांत तापलें लोहादि घालण्याचें भय दाखवावें.

सततंधूपयेच्चैनंगोमांसैश्चसपूतिभिः ॥
कामशोकभयक्रोधहर्षेर्ष्यालक्षसंभवात् ॥

अर्थ—उन्मादरोग्याला कुसक्या मांसाची धुरी द्यावी; व काम, शोक, भय, क्रोध, हर्ष व ईर्षा इत्यादि मनोविकार उत्पन्न करावे.

परस्परंप्रतिद्वंद्वैरेभिरेवशमंनयेत् ॥ जलाग्निद्रुमशैलेभ्यो
विपमेभ्यश्चतंसदा ॥ रक्षेदुन्मादिनंचैवसद्यःप्राणहरंहितत् ॥

अर्थ—वर सांगीतल्याप्रमाणें परस्पर विरुद्ध चेष्टांनीं त्याला स्वाधीन करून घ्यावा; आणि जल, अग्नि, वृक्ष, पर्वत व कठीण जागा यांपासून त्याचें संरक्षण करावें, तीं त्यानें सद्यः प्राणहारक आहेत.

लशुनादिघृत.

लशुनस्याविनष्टस्यतुलार्धंनिस्तुषीकृतं ॥ तदर्धंदशमूल्यास्तुचाढकेवा विपाचयेत् ॥ पादशेषेघृतप्रस्थंलशुनस्यरसंतथा ॥ कोलामलकवृक्षाम्लमातुलिंगार्द्रकैरसैः ॥ दाडिमांबुसुरामस्तुकांजिकाम्लैस्तदर्धकैः ॥ साधयेत्रिफलादारुलवणव्योषदीप्यकैः ॥ यवानीचव्यहिंग्वाम्लवेतसैश्चपलार्धकैः ॥ सिध्दमेतत्पिबेच्छूलगुल्मार्शोजठरापहं ॥ व्रणपांड्वामयप्लीहयोनिदोषकृमिज्वरान् ॥ वातश्लेष्मामयंचान्यमुन्मादंचापकर्षति ॥

अर्थ—चांगली उत्तम लसूण सोललेली २०० तोळे व दशमुळें १०० तोळे एकत्र करून त्यांचा १०२४ तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करून त्यांत तूप व लसणीचा रस ६४ तोळे व बोरें, आवळे, आंमसोल, महाळुंग, आले व डाळिंब यांचे रस प्रत्येकीं ३२ तोळे व त्रिफला, देवदार, मीठ, मिरीं, ओंवा, अजवान, चवक, हिंग व आम्लवेतस, या प्रत्येकांचे दोन दोन तोळे, कल्क घालून तूप सिध्द करावें, तें प्राशन केले असतां; शूल, गुल्म, अर्श, उदर, व्रण, पांडुरोग, प्लीहा, योनिदोष, कृमि, ज्वर, आणि वायु व कफ यांचे व्याधि; आणि उन्माद यांचा नाश करितें.

चंदनादि तैल.

चंदनांबुनखंयाव्यंयष्टीशैलेयपद्मकं ॥ मंजिष्ठासरलंदारुषड्वलापूतिकेसरं ॥ पत्रंतैलंमुरामांसीकंकोलंवनितांबुदं ॥ हरिद्रेसारिवातिक्ताल वंगागरुकुंकुमं ॥ त्वग्रेणुनलिकाश्चेतितैलान्मस्तुचतुर्गुणं ॥ लाक्षारसं समंसिध्दंग्रहघ्नंपरमंमतं ॥ अपस्मारहरोन्मादकृत्यालक्ष्मीविनाशनं ॥ आयुःपुष्टिकरंचैववशीकरणमुत्तमं ॥

अर्थ—चंदन, वाळा, नखला, जवखार, ज्येष्टमध, शिलाजित, पद्मकाष्ट, मंजिष्ठा, सरल देवदार, षड्वला, जवादें, नाकेशर, तमालपत्र, लोध्र, सुरा, जटामांसी, कंकोळ, गहुंला, नागरमोथा, हळद, दारुहळद, उपळसरी, कुटकी, लवंगा, अगर, केशर, दालचिनी, पित्तपापडा, नलिका व तेल, आणि तेलाच्या चौपट ताकाचो निवळी, आणि लाखेचा रस यांशीं तैल सिध्द करावें, तें ग्रह अपस्मार, उन्माद, कृत्या, अलक्ष्मी, यांचा नाश करितें; आणि आयुष्य, पुष्टि व लोकवशता यांतें करितें.

अंजन.

त्र्यूषणंहिंगुलवणवचाकटुकरोहिणी ॥ शिरीषनक्तमालानां

बीजंश्वेताश्चसर्षपाः ॥ गोमूत्रपिष्टैरेतैस्तुवर्तिर्नेत्रांजनेहिता ॥
चातुर्थिकमपस्मारमुन्मादंचनियच्छति ॥

अर्थ-सुंठ, मिरें, पिंपळी, हिंग, सैंदेलोण, वेखंड, कुटकी, शिरीस, करंजाचें बीं व पांढरे शिरीस हीं सर्व गोमूत्रांत वाटून त्यांत वात भिजवून त्या वातीनें नेत्रांस अंजन करावें; ह्मणजे चातुर्थिक ज्वर, अपस्मार व उन्माद यांचा प्रतिबंध करील.

शिरिषादिनस्य.

शिरीषंलशुनंहिंगुनागरंमधुकंवचा ॥
कुष्टंचबस्तमूत्रेणपिष्टंस्यान्नावनांजनं ॥

अर्थ-शिरस, लसूण, हिंग, सुंठ, जेष्टीमध, वेखंड व कोष्टकोळिंजन, हीं बोकडाच्या मुतांत वाटून त्याचें नस्य व अंजन करावें; ह्मणजे उन्माद जाईल.

व्योषाद्यंजन.

तद्वद्व्योषंहरिद्रेद्वेमंजिष्ठागौरसर्षपाः ॥
शिरीषबीजमुन्मादग्रहापस्मारनाशनं ॥

अर्थ -तसेंच त्रिकटु, दारुहळद, हळद, मंजिष्ठ, पांढरें शिरस व काळें शिरस यांचे अंजन व नस्य उन्माद, ग्रह व अपस्मार, यांचे नाशक आहे.

धूप.

कर्पासास्थिमयूरपिच्छबृहतीनिर्माल्यपिंडीतकत्वङ्मांसीवृषदं
शविट्तुषवचाकेशाहिनिर्मोचनैः ॥ नागेंद्रद्विजशृंगहिंगुमरिचै
स्तुल्यैस्तुधूपःकृतःस्कंदोन्मादपिशाचराक्षससुरावेशज्वरघ्नःस्मृतः ॥

अर्थ-कापसाच्या सरकया, मोरपीस, रिंगणी, निर्माल्य, गेळफळ, दालचिनी, जटामांसी, मांजराची विष्ठा, तुस, वेखंड, केस मनुष्याचे, सर्पाची मेंग, हस्तिदंत, सांबरशिंग, हिंग व मिरें हीं समांश घेऊन धूप करावा. तो घेतला असतां; स्कंदोन्माद, अपस्मार, उन्माद, पिशाच, राक्षस, देवसंचार व ज्वर यांचा नाश करितो.

पर्पटीरस.

कृष्णाधत्तूरजैर्बीजैःपंचभिःपर्पटीरसः ॥
साज्येयोज्यःप्रशांत्यर्थमुन्मादस्यशुभानने ॥

अर्थ-पिंपळी,धोतऱ्याच्या पांच बिया व पर्पटीरस तुपातून द्यावा;ह्मणजे उन्माद नाश पावतो.

शिरीषाद्यंजन.

सिद्धार्थकवचाहिंगुकरंजोदेवदारुच ॥ मंजिष्ठात्रिफलाश्वेताकटभी

त्वक्कटुत्रिकाः ॥ समांशंचप्रियंगुश्चशिरीषोरजनीद्वयं ॥ वस्तमूत्रेणपिष्टेदमगदंपानमंजनं ॥ नस्यमालेपनंचैवस्नानमुद्वर्तनंतथा ॥ अपस्मारविषोन्मादकृत्यालक्ष्मीज्वरापहं ॥ भूतेभ्यश्चभयंहंतिराजद्वारेचशस्यते ॥ सर्पिरेतेनसिद्धंवासगोमूत्रंतदर्थकृत् ॥

अर्थ–पांढरे शिरस, वेखंड, हिंग, करंजाची बी, देवदार, मंजिष्ट, हरडा, बेहडा, आवळकाठी, तुरटी, लघु कांगोणी, दालचिनी, सुंठ, मिरे, पिंपळी, राळे, शिरीष, व दारुहळद हीं बोकडाचे मुतांत वाटून प्यावीं; व अंजन, नस्य, लेप व स्नान करावें; व अंगाला चोळावें; ह्मणजे अपस्मार, विष, उन्माद, कृत्या, दुर्दशा, ज्वर व भूतबाधा यांचें नाशक आहे; आणि राजाकडे जाणें असल्यास ही योग करावा, याप्रमाणेंच या औषधानीं सिध्द केलेलें तूप गोमूत्रसहीत सेवन केलें असतां गुण करणारें आहे.

ब्राह्म्यादिरस.

ब्राह्मीकूष्मांडविलपट्यंथाशंखपुष्पिकास्वरसाः ॥
दृष्टाउन्मादहराःपृथगेतेकुष्ठमधुमिश्राः ॥

अर्थ–ब्राह्मी, कोहाळा, वेखंड व शंखाहुली यांचे पृयक् पृथक रस कोष्ठ व मध यांणीं मिश्रित करून घेतलें असतां; उन्मादनाशक आहेत.

ब्राह्म्यादिकल्क.

ब्राह्मीरसःस्यात्सवचःसकुष्ठःसशंखपुष्पःससुवर्णचूर्णः ॥
उन्मादिनामुन्मदमानसानामपस्मृतोभूतहतात्मनांहि ॥
नस्येंजनेपानविधौचशस्तोब्राह्मीरसोयंसवचादिचूर्णः ॥

अर्थ–ब्राह्मीचा रस, वेखंड, कोष्ठकोळिंजन, शंखाहुली व नागकेशर यांच्या चूर्णानीं युक्त करून त्याचें नस्य, अंजन, किंवा पिणे इतक्यांत योजला असतां; उन्माद, अपस्मार, भूतोन्माद, हे रोग जातील.

सितकुसुमवलादियोग.

सितकुसुमवलायाःसार्धकर्षत्रयंयःशिखरिचरणकेनक्षीरपाकेनपक्कं ॥
पिवतितदनुनित्यंप्रातरुत्थायशीतंजयतिझटितिघोरंव्याधिमुन्मादसंज्ञं ॥

अर्थ–श्वेतफुलांचा चिकणा ३॥ तोळे चूर्ण करून दूधांत घालून ते दूध आघाड्याच्या मुळासहित कढवून थंड करून नित्य प्रातःकाळीं प्यावें; ह्मणजे उन्मादरोगाचा लवकर पराजय करील.

दशमूलादियोग.

दशमूलांवुसघृतंयुक्तंमांसरसेनवा ॥

ससिद्धार्थकचूर्णवाकेवलंनावनंघृतं ॥

अर्थ—दशमुळांचा काढा घृतयुक्त अथवा मांसरसाशींयुक्त उन्मादावर हितकारक आहे; अथवा पांढऱ्यामोहऱ्यांचें चूर्ण तुपाशीं युक्त करून नस्य केलें असतां; तें हितकारक आहे.

उन्मादशांतयेपेयोरसोवाकालशाकजः ॥

प्रयोज्यंसार्षपंतैलंनस्याभ्यंजनयोःसदा ॥

अर्थ—उन्मादरोगशांतिसाठीं शंखपुष्पीचा रस प्यावा; अथवा शिरसाच्या तेलाचें नस्य व अभ्यंजन करावें.

भूतोन्मादलक्षण.

अमर्त्यवाग्विक्रमवीर्यचेष्टाज्ञानादिविज्ञानबलादिभिर्यः ॥

उन्मादकालोनियतश्चयस्यभूतोत्थमुन्मादमुदाहरंति ॥

अर्थ—भूतोन्माद झाला असतां; मनुष्याची वाणी, पराक्रम, शक्ति व शरीरचेष्टा ह्या अलौकिक होतात, याचा उन्मादकाल नियमित असतो, इत्यादि लक्षणें होतात. हें सर्व भूतोन्मादाचें सामान्य लक्षण आहे.

देवजुष्टउन्मादलक्षण.

संतुष्टःशुचिरतिदिव्यमाल्यगंधोनिस्तंद्रिरवितथसंस्कृतप्रभाषी ॥

तेजस्वीस्थिरनयनोवरप्रदाताब्रह्मण्योभवतिनरःसदेवजुष्टः ॥

अर्थ—सर्वकाळसंतोषी, अतिपवित्र, उत्तमफुलें व गंध यांची प्रीति करणारा, जागृत, खरें व संस्कृत बोलणारा, तेजस्वी, डोळे वटारलेला, मनासयेतील तसे वर देणारा व ब्राह्मणभक्त असा देवग्रहानें धरलेला रोगी होतो.

असुरउन्माद.

संस्वेदीद्विजगुरुदेवदोषवक्ताजिह्माक्षोविगतभयोविमार्गदृष्टिः ॥

संतुष्टोनभवतिचान्नपानजातैर्दुष्टात्माभवतिचदेवशत्रुजुष्टः॥

अर्थ—राक्षसानीं धरलेला मनुष्य, घामयेणारा व ब्राह्मण, गुरु, देव यांचे दोष बोलणारा, वक्रदृष्टि, निर्भय, वेदविरुद्धमार्गावर लक्ष ठेवणारा व कोणतें ही अन्न आणि पान याणीं संतुष्ट न होणारा, आणि दुष्टबुद्धि असा होतो.

गंधर्वजुष्टउन्माद.

हृष्टात्मापुलिनवनांतरोपसेवीस्वाचारःप्रियपरिगीतगंधमाल्यः ॥

नृत्यन्वैप्रहसतिचारुचाल्पशब्दंगंधर्वग्रहपरिपीडितोमनुष्यः ॥

अर्थ—गंधर्वग्रहानें ग्रस्त मनुष्य, हर्षयुक्त, नदीतीर, बाग, बगीचे यांत राहणारा, स

दाचारयुक्त, गीत, माला व अनेकतऱ्हेचे गंध यांते सेवनकरणारा, नृत्यकरणारा, हसणारा, गोड व अल्प भाषणकरणारा असा होतो.

यक्षग्रस्तउन्मादलक्षण.

ताम्राक्षः प्रियतनुरक्तवस्त्रधारीगंभीरोद्रुतगतिरल्पवाक्सहिष्णुः ॥
तेजस्वीवदतिचकिंददामिकस्मैयोयक्षग्रहपरिपीडितोमनुष्यः ॥

अर्थ–यक्षग्रहग्रस्त मनुष्याच्या नेत्रांना लाली व चांगलें, बारीक, रक्तवर्ण असें वस्त्र धारण करणारा, खोलबुद्धीचा, जलद चालणारा, थोडें बोलणारा, सहनशील, तेजस्वी आणि काय पाहिजे तें पाहिजे त्यास देतों ह्मणणारा असा होतो.

पितृग्रहग्रस्तउन्मादलक्षण.

प्रेतानांदिशतिससंस्तरेषुपिंडान्भ्रांतात्माजलमपिचापसव्यवस्त्रः॥
मांसेप्सुस्तिलगुडपायसान्नकामस्तद्भक्तोभवतिपितृग्रहाभिजुष्टः ॥

अर्थ–पितरानीं धरलेला मनुष्य दर्भावर प्रेतानां पिंड देणारा, भ्रांतिमान्, आणि अपसव्य वस्त्र धारण करून तर्पण करणारा व मांस, तिळ, गुळ व क्षीर यांची इच्छा करणारा, आणि पितृभक्त असा होतो.

सर्पग्रहग्रस्तउन्मादलक्षण.

यस्तूर्व्यांप्रसरतिसर्पवत्कदाचित्सृक्किण्यौविलिहतिजिव्हयातथैव ॥
क्रोधालुर्गुडमधुदुग्धपायसेप्सुर्विज्ञेयोभवतिभुजंगमेनजुष्टः ॥

अर्थ–सर्पग्रहोन्मादरोगी पृथ्वीवर सापासारिखा लोळतो वारंवार जिभोळ्या चाटतो, क्रोधिष्ट व गूळ, मध, दूध, आणि खीर यांची वारंवार इच्छा करणारा असा होतो.

राक्षसजुष्टउन्मादलक्षण.

मांसासृग्विविधसुराविकारलिप्सुर्निर्लज्जोभृशमतिनिष्ठुरोतिशूरः॥
क्रोधांधोविपुलबलोनिशाविहारीशौचद्विड्भवतिचराक्षसैर्गृहीतः ॥

अर्थ–राक्षसग्रहानें धरलेला मनुष्य मांस व रक्त यांचे पदार्थ, अनेक तऱ्हेचीं मद्यें यांचा भक्षणाविषयीं इच्छा करणारा, निर्लज्ज, अत्यंत क्रूर व शूर, सर्वकाळ क्रोधी, बलवान्, रात्रीं फिरणारा, आणि अमंगळ असा होतो.

ब्रह्मराक्षसउन्मादलक्षण.

देवविप्रगुरुद्वेषीवेदवेदांगनिंदकः ॥
आत्मपीडाकरोहासीब्रह्मराक्षससेवित. ॥

अर्थ–ब्रह्मराक्षस लागलेला मनुष्य देव, ब्राह्मण व गुरु यांचा द्वेष करणारा, देव, वेद व वेदांगें यांची निंदा करणारा, आपल्या देहाला पीडा करणारा, आणि हंसणारा असा होतो.

पिशाचजन्यउन्माद.

उद्धस्तःकृशपुरुषोचिरप्रलापीदुर्गंधोभृशमशुचिस्तथातिलोलः ॥
वव्हाशीविजनवनांतरोपसेवीव्याचेष्टन्भ्रमतिरुदन्पिशाचजुष्टः ॥

अर्थ—पिशाच लागलेला मनुष्य हात वर करून धरणारा, कृश, फारवेळ बडबड करणारा. दुर्गंधयुक्त, अत्यंत अमंगळाची आवड करणारा, फार चंचळ, फार खाणारा, निर्जनस्थळीं राहणारा, आणि चेष्टा करीत व रडत फिरणारा असा होतो.

असाध्यलक्षण.

स्थूलाक्षोद्रुतमटनःसफेनलेहीनिद्रालुःपततिचकंपतेचयोति ॥
यश्चाद्रिद्विरदनगादिविच्युतःस्यात्सोसाध्योभवतिचतथात्रयोदशाब्दे ॥

अर्थ—सामान्यतःभूतोन्माद रोगी डोळे वटारून धरणारा, जलद फिरणारा, वारंवार ओंठावरची लाळ चाटणारा, सार्वकाळ झोंप घेणारा, वारंवार पडणारा, अति कांपणारा, व जो पर्वत, हत्ती, टेकाड यांवरून पडलेला, आणि तेरा वर्षे लोटलेला असा असाध्य होतो.

देवतादिसंबंधीउन्मादांचा ग्रहणकाळ.

देवग्रहाःपौर्णिमास्यामसुराःसंध्ययोरपि ॥
गंधर्वाःप्रायशोष्टम्यांयक्षाश्चप्रतिपद्दिने ॥

अर्थ—देवग्रह पौर्णिमेस, असुर दोन संधीमध्यें, गंधर्व अष्टमीस, यक्ष प्रतिपदेस असें मनुष्यास ग्रहण करितात.

पितृग्रहास्तथादर्शपंचम्यामपिचोरगाः ॥
रक्षांसिरात्रौपैशाचाश्चतुर्दश्यांविशंतिहि ॥

अर्थ—पितृग्रह दर्शाचेठायीं, सर्प पंचमीस, राक्षस रात्रीस व पिशाच चतुर्दशीस, मनुष्याचे शरीरांत प्रवेश करितात, यांच्या शांत्यर्थ त्याच्या तिथीचाठायीं बलिदान करावें.

दर्पणादीन्यथाछायाशीतोष्णंप्राणिनोयथा ॥ स्वमणौभास्करांशुश्चयथा देहंचदेहधृक् ॥ विशतिचनदृश्यंतेग्रहास्तद्वच्छरीरिणां ॥

अर्थ—जसें आर्शांत प्रतिबिंब, शरीरांत शीतोष्ण, सूर्य मणींमध्यें सूर्य किरण व शरीरांत आत्मा हे सर्व प्रवेश करीत होत्साते दिसून येत नाहींत. त्या प्रकारें देवतादिक शरीरांत प्रवेश करितात; परंतु दिसून येत नाहींत.

निशादिघृत.

निशायुक्त्रिफलाश्यामावचासिद्धार्थहिंगुभिः ॥ शिरीषकटभिश्वेतामंजिष्ठाव्योषदारुभिः ॥ समैःकृतंघृतंमूत्रेसिद्धमुन्मादनाशनं ॥

अर्थ–दारुहळद, हळद, त्रिफळा, उपळसरी, वेखंड, पांढऱ्या मोहोऱ्या, हिंग, शिरस, मालकांगोणी, श्वेत कांचन, मंजिष्ठ, त्रिकटु व देवदार हीं समभाग घेऊन गोमूत्रांत घालून त्यांच्या बरोबर सिद्ध केलेलें तूप उन्मादनाशक आहे.

कल्याणकघृत.

विशालात्रिफलाकौंतीदेवदार्व्यैलवालुकं ॥ स्थिरानंताहरिद्रेद्वेसारिवेद्वेप्रियंगुका ॥ नीलोत्पलैलामंजिष्ठादंतीदाडिमवल्कलं ॥ विडंगपृश्निपर्णीचकुष्ठचंदनपद्मकैः ॥ तालीसंवृहतीपत्रंमालत्याःकुसुमंनवं ॥ एतैःकर्षसमैःकल्कैर्विंशत्यष्टाभिरेवच ॥ चतुर्गुणंजलंदत्वा घृतप्रस्थंविपाचयेत् ॥ अपस्मारेज्वरेशोषेकासेमंदानलेक्षये ॥ वातरक्तेप्रतिश्यायेतृतीयकचतुर्थके ॥ वातार्शेमूत्रकृच्छ्रेचविसर्पोपहतेषु ॥ कंडुपांड्वामयोन्मादविषमेहगदेषुच ॥ भूतोपहतचित्तानांगंडदानामचेतसां ॥ शस्तंस्त्रीणांचवंध्यानांधन्यआयुर्बलप्रदं ॥ अलक्ष्मीपापरक्षोघ्नंसर्वग्रहनिवारणं ॥ कल्याणकमिदंसर्पिःश्रेष्ठंपुंस्त्वप्रदंनृणां ॥

अर्थ–कंवडळ, त्रिफळा, रेणुकाबीज, देवदार, शेंदाड, साल्वण, धमासा, दारुहळद, हळद, श्वेतऊपळसरी, उपळसरी, धायटी, काळें कमळ, वेलदोडे, मंजिष्ठा, दांतीमूळ, डाळिंबाची साल, वावडिंग, पिठवण, कोष्ठकोळिंजन, चंदन, पद्मकाष्ठ, तालीसपत्र, रिंगणी, तमालपत्र, व जाईचीं ताजीं फुलें; हीं प्रत्येकीं तोळा तोळा प्रमाणे घेऊन त्यांचा कल्क करून, त्याच्या चौपट पाणी घालून त्यांत ६४ तोळे तूप कढवावें, तें अपस्मार, ज्वर, शोष, कास, मंदाग्नि, क्षय, वातरक्त, पडसें, तृतीयक, चातुर्थक, ज्वर, वातार्श, मूत्रकृच्छ्र, विसर्प, कंडू, पांडुरोग, उन्माद, विष, मेह, भूतोन्माद, इत्यादि रोगाचे नाशक. आणि वंध्यास्त्रीला अपत्य देणारें, आयुष्य व बल, यांतें देणारें, व दारिद्र्य, पाप व राक्षसादि सर्वग्रह, याचे निवारक आहे, याला कल्याण घृत ह्मणतात, हें मोठें श्रेष्ठ, पुरुषांस पौरुष देणारे असें आहे.

हिंग्वादिघृत.

हिंगुसौवर्चलव्योषद्विपलांशैर्घृतंशृतं ॥
चतुर्गुणेगवांक्षीरेसिद्धमुन्मादनाशनं ॥

अर्थ–हिंग, पादेलोण व त्रिकटु हीं सर्व मिळोन ८ तोळे आणि तूप व तुपाच्या चौपट गाईचें दूध, हीं सर्व एकत्र पक्क करावीं; ह्मणजे हें सिद्ध झालेलें तूप उन्मादनाश करतें.

सारस्वतघृत.

त्रिफलालक्ष्मणानंतासमंगासारिवावचा ॥ ब्राह्मीपाठाबृहतिकाद्विः स्थिराद्विःपुनर्नवा ॥ सहदेवीसूर्यवल्लीवयस्थागिरिकर्णिका ॥ तोयकुं भेपचेदेतत्पलांशंपादशेषिते ॥ नतंकौंतिवचाकुष्ठंकृष्णासैंधवसर्पिपं ॥ नीरुकूसवर्णवत्सयाःसंसिद्धंपयसाचगोः ॥ पुष्ययोगेघृतप्रस्थंसुस्नेह कलशेस्थितं ॥ पानाभ्यंजनतोमेधास्मृत्यायुःपुष्टिवर्धनं ॥ रक्षोघ्नंचवि षघ्नंचसारस्वतमिदंघृतं ॥

अर्थ—त्रिफळा, श्वेतरिंगणी, धमासा, मंजिष्ठ, उपळसरी, वेखंड, ब्राह्मी, पाडळमूळ, रिंगणी, रानमूग, रानउडीद, रक्त पुनर्नवा, श्वेत पुनर्नवा, सहदेवी, सूर्यफूलवल्ली, आवळी व श्वेत गोकर्णी, हीं प्रत्येकीं चार चार तोळे प्रमाणें घेऊन पाण्यांत घालून चतुर्थांश पाणी राही तोपर्यंत कढवून गाळून घेऊन त्यांत तगर, रेणुकाबीज, वेखंड, कोष्ठ, पिंपळी, सैंधव, आणि निरोगी असून तीचा व वांसराचा एक वर्ण अशा गाईचें दूध घालून त्यांत ६४ तोळे तूप पुष्यनक्षत्र असेल तेदिवशीं सिद्ध करून राखलेल्या मडक्यांत ठेवावें; नंतर पिणें किंवा अभ्यंजन करणें याणीं बुद्धि, स्मृति, आयुष्य व पुष्टि याचें वर्धन करतें; आणि राक्षसबाधा व विषबाधा, यांचा नाश करतें, याला सारस्वत घृत असे ह्मणतात.

उन्मादगजकेसरी रस.

सूतगंधशिलातुल्यंस्वर्णवीजंविचूर्ण्यच ॥ भावयेदुग्रगंधायाःक्काथेमु निदिनंपृथक् ॥ रास्नाक्काथेनसप्तैवभावयित्वाविचूर्णयेत् ॥ रसःसं जायतेनूनमुन्मादगजकेसरी ॥ अस्यमाषःससर्पिष्कोलीढोहंतिहठाद्ददं ॥ उन्मादाख्यमपस्मारंभूतोन्मादमपिज्वरं ॥

अर्थ—पारा, गंधक, मनशीळ, आणि या सर्वांच्या बरोबर धोत्र्याचें बीं हीं सर्व एक त्र खलून वेखंड व रास्ना, यांचे पृथक् काढे करून त्याच्या सात सात भावना द्याव्या; नंतर चूर्ण करावें; ह्मणजे उन्मादगजकेसरी रस होतो. हा तुपाबरोबर एक मासा भार चाटावा; ह्मणजे मोठ्या जलदीनें उन्माद, अपस्मार भूतोन्माद व ज्वर यांचा नाश करील.

उन्मादेपर्पटींदद्यात्साचाविपयसान्वितां ॥
अपस्मारेपितत्प्रोक्तमेतत्पाराशरेणच ॥

अर्थ—उन्मादरोगावर पर्पटीरस शेळीच्या दुधांतून द्यावा, तो फेंपरें व उन्माद यांचा नाश करितो.

विगतोन्मादलक्षण.

प्रसादश्चेंद्रियार्थानांबुध्यात्ममनसामपि ॥ धातूनांप्रकृतिस्छत्वंविग
तोन्मादलक्षणं ॥ यच्चोपदेशतःकिंचिदपस्मारेचिकित्सितं ॥ उन्मा
देतच्चकर्तव्यंदोषसामान्यदूष्ययोः ॥

अर्थ–ज्याचा उन्माद शांत झाला; त्याची मन, बुद्धि, इंद्रियें, धातु, आणि प्रकृति हीं सर्व स्वच्छ होतात. अपस्मार व उन्माद यांचे दोष व दूष्य एकसारिखेच आहेत, याकरितां अपस्मारावरील सर्व उपचार उन्मादावर करावे.

भूतोन्मादीं अंजन व नावन.

शिरीषपुष्पंलशुनंशुंठीसिद्धार्थकंवचा ॥ मंजिष्ठरजनीकृष्णा
वस्तमूत्रेणपेपयेत् ॥ वटीछायासुशुष्कायासहितानावनांजने ॥

अर्थ–शिरसाचें फूल, लसुण, सुंठ, पांढऱ्या मोहोऱ्या वेखंड, मंजिष्ठ, हळद. व पिंपळी, हीं सर्व बोकडाच्या मूतांत वाटून गोळी करून सावलींत वाळवून ती नस्य किंवा अंजन याविषईं योजावी, ही हितकारक आहे.

भूतभैरवरस.

रसःसतालःसशिलःसलोहःस्रोतोंजनंसार्कमिदंहिगंधं ॥ पिष्ट्वाजमूत्रेण
समंसमस्तादियोद्विभागोथवलिःपचेच्च ॥ लोहेक्षणंहंतिघृतेनमापोपस्मा
रमस्योन्मदमानसत्वं ॥ पिबेदनुत्र्यूपणहिंगुयुक्तंसर्पिर्नृमूत्रंरुचकेनसार्द्धं ॥
भूतोन्मादेषुसर्वेषुरसोयंभूतभैरवः ॥ स्वर्णजैःपंचभिर्वाजैर्देयःसर्पिर्विमिश्रितः ॥

अर्थ–पारा, हरताळ, मनशीळ, लोहभस्म, सुरमा, ताम्रभस्म व गंधक, हे सर्व समभाग बोकडाच्या मुतांत खलून सर्वांच्या दुप्पट गंधक लोहपात्रांत घालून हें त्यांत पचवावें; नंतर एक मासाभार घेऊन तूपाबरोबर खावें, तेणेकरून अपस्मार व उन्माद यांचा नाश करील, हें औषध सेवन केल्यावर त्रिकटु व हिंग, यांचे चूर्ण घृताबरोबर खावें; अथवा मनुष्याचे मुतांत पादेलोण घालून ते प्यावें; हा सर्व भूतोन्मादावर भूतभैरव रस धोत्र्याच्या पांच बियां आणि तूप याचे बरोबर द्यावा.

भूतरावघृत.

फलत्रिकव्योपकलिंगजोग्रानिशाद्वयैलाचविकासुराव्हा ॥ तुत्थंप्रियं
ग्वामपकालमेपीमनःशिलापद्मककंटकार्याः ॥ यवाव्हयष्टीकटुकुंकमां
भोरिष्टाव्हसिद्धार्थपुगच्छदानि ॥ रसांजनंग्रंथिमधूकसारंवलारसोनाव्ह

नतानिचूर्णात् ॥ एपांमजामूत्रदधिप्रयुक्तात्संजातमाज्यंननुभूतरावं ॥ लोकेपुनाम्नाविदितंसमस्तैर्वैद्यैःसमुक्तंजगतांहिताय ॥ पानेननस्येन चमर्दनेनानेकोग्रभूतग्रहजातिपीडां ॥ निहंतिरक्षांसिचडाकिनीनांमं त्रायथातारकनामधेयं ॥

अर्थ—हरडा, बेहेडा, आवळकाठी, सुंठ, मिरीं, पिंपळी, इंद्रजव, वेखंड, हळद, दारुहळद, एलचीं, चवक, देवदार, मोरचूत, कुटकी, कोष्ठ, मंजिष्ठ, मनशीळ, पद्मकाष्ठ, रिंगणी, धमासा, ज्येष्ठमध, कडुपडवळ, केशर, वाळा, रिठे, मोहऱ्या, आपटा, रसांजन, पिंपळमूळ, मोहाचीं फुलें, काथ, चिकणा, लसूण व तगर यांचें चूर्ण व शेळीचें मूत व दहीं एकत्र करून त्यांत तूप घालून सिद्ध करावें. हें प्राशन, नस्य, मर्दन यांविषयीं योजावें, ह्मणजे भूत, ग्रहजाति, राक्षस व डाकिनी यांच्या पीडेचा नाश करितें, हें वैद्यांनीं जगताच्या हिताकरितां प्रसिद्ध केलें; व लोकांनां अनुभव ही आहेत.

धूप.

ऋक्षजंबुकरोमाणिशल्ककीलंसमंतथा ॥ हिंगूमूत्रंचबस्तस्यधूपमस्यप्र योजयेत् ॥ धूपेनशाम्यतिक्षिप्रंवलवानपियोग्रहः ॥

अर्थ—आस्वल व कोल्हा यांचे केस, साळइचे पीस, हिंग व बोकडाचें मूत यांचें धूपानें लवकर बलवान देखील ग्रह शांत होतो.

येचस्युर्भुविगुह्यकाश्चप्रमथास्तेषांसमाराधनं ॥
देवब्राह्मणपूजनंचशमयेदुन्मादमागंतुकं ॥

अर्थ—जे कोणी गुह्यक, प्रमथ, इत्यादिकांचें आराधन व देव, ब्राह्मण यांचें पूजन करितील तर, त्यांच्या आगंतुक उन्मादाची शांति लवकर होईल.

शिरीपनक्तमालानांवीजानिमधुसर्पिषा ॥
भक्ष्याश्चसर्वेसर्वेपांसामान्योविधिरुच्यते ॥

अर्थ—शिरस, करंजाचें वीं, मध व तूप यांबरोबर खावें; आणि भक्ष्य पदार्थ सर्व सर्वांस योग्य आहेत, हा सामान्यविधि सांगितला.

भूतोन्मादचिकित्साशास्त्रार्थ.

वुध्वादोषंवयःसात्म्यंदेशंकालंवलावलं ॥
चिकित्सितमिदंकुर्यादुन्मादेभूतदोषजे ॥

अर्थ—दोष, वय व प्रकृतीस मानेल तें, देश, काल, बल, किंवा अशक्तपणा, हें सर्व जाणून भूतोन्मादावर चिकित्सा करावी.

देवर्षिपितृगंधर्वैरुन्मत्तेपुचवुध्दिमान् ॥ त्यजेन्नस्यांजनादीनि

तीक्ष्णानिक्रूरकर्मच ॥ सर्पिःपानंसूर्यजपहोममंत्रादिरिष्यते ॥

अर्थ–देव, ऋषि, पितर व गंधर्व, यांचे बाधेनें उन्मत्त झालेल्या मनुष्यास नस्य व अंजन, इत्यादि क्रूरकर्म करूं नये; तर घृतपान, सूर्याचा जप, होम, मंत्र,इत्यादि करावीं.

पूजाबल्युपहारशांतिविपयोहोमेष्टिमंत्रक्रियादानंस्वस्त्ययनं

व्रतादिनियमःसम्यग्जपोमंगलं ॥ प्रायश्चित्तविधानमंजलि·

र्थोररत्नौपधीधारणंभूतानामधिपस्यविष्टरपतेर्गौरीपतेरर्चनं ॥

अर्थ–पूजा, बळि, नैवेद्य, शांतिनिमित्त होम, मंत्र, दान, पुण्याहवाचन, व्रतनियम, जप, मंगल, प्रायश्चित, नमस्कार, मणि व औषधि यांचें धारण, विष्णु व सांब, यांचें पूजन इत्यादि भूतोन्मादावर उपचार करावे.

महापैशाचिकघृत.

जटिलापूतनाकेशीचारटीमर्कटीवचा ॥ त्रायमाणाजयावीराचोर

कंकटुरोहिणी ॥ कायस्थासूकरीछत्रासातिपत्रापलंकपा ॥ महापुरू

पदंताचवयस्थानाकुलीद्वयं ॥ कटंभरावृश्चिकालीस्थिराचैतैर्घृतंपचे

त् ॥ तत्तुचातुर्थिकोन्मादग्रहापस्मारनाशनं ॥ महापैशाचिकंनाम

घृतमेतद्यथामृतं ॥ वुध्दिमेधास्मृतिकरंवालानांचांगवर्धनं ॥

अर्थ–जटामांसी, सुगंध जटामांसी, लघुनीळी, कुहिली, वेखंड, त्रायमाण, शेवंती, भुयआवळी, गठोणा, कुटकी, हर्तकी, डुकरकंद, वडिशेप, साग, गोखरू, महाशतावरी, ब्राह्मी, दोन प्रकारची नाकुली, कुटकी, थोर आग्या, आणि उंदीरकानी. यांच्या कल्कांत तूप घालून सिद्ध करावें. तें चातुर्थिक ज्वर, उन्माद, ग्रहबाधा व अपस्मार यांचा नाश करितें. हें महापैशाचिक घृत, अमृतासारिखें आहे. हें बुद्धि, मति व स्मृति यांला उत्पन्न करितें; आणि बाळकांला पुष्टि देतें.

कल्याणकघृत.

कल्याणकंप्रयुंजीतमहद्वाचैत्तमंघृतं ॥

तैलंनारायणंवापिवृहन्नारायणंतथा ॥

अर्थ–कल्याणघृत, अथवा नारायणतेल, अथवा बृहन्नारायणतेल, हीं उन्मादावर योजावीं.

उन्मादपथ्य.

गोधूममुद्रारुणशाल्यश्चधारोष्णदुग्धंशतधौतसर्पिः ॥ घृतंनवीनंचपु

रातनंचकूर्मामिषंधन्वरसारसाला ॥ पुराणकूष्मांडफलंपटोलंब्राह्मीद

लंवास्तुकंतंदुलीयं ॥ द्राक्षाकपित्थंपनसंचवैद्यैर्विधेयमुन्मादगदेषुपथ्यं ॥

अर्थ—गहूं, मूग, तांबड्या साळी, धारोष्ण दूध, नवे किंवा जुने शंभर वेळां धुतलेले तूप, कांसवाचें मांस, साकर, जुना कोंहोळा, पडवळ, ब्राह्मी, चाकवत, तांदुळजा, द्राक्षें, कवठ, फणस इतके पदार्थ उन्मादरोगावर पथ्यास वैद्यांनी योजावे.

उन्माद अपथ्य.

मद्यंविरुद्धाशनमुष्णभोजनंनिद्राक्षुधातृट्क्षुतवेगधारणं ॥

तिक्तानितीक्ष्णानिभिषक्समादिशेदुन्मादरोगोपहतोहिगर्हितं ॥

अर्थ—मद्य, विरुध्धाशन, उष्ण पदार्थांचें भक्षण, निद्रा, क्षुधा, तृषा, शिंक, यांच्या वेगाचें धारण, कडु, व तीक्ष्ण इतके उन्मादरोगावर निंद्य आहेत, असे वैद्यानें सांगावें.

अपस्मार.

कर्मविपाक.

गुरौस्वामिनिवस्तेयःप्रतिकूलंसमाचरेत् ॥

सोपस्मारीभवेत्तत्रकुर्याच्चांद्रायणंनरः ॥

अर्थ—जो गुरु किंवा स्वामी यांजवळ राहून त्यांचे प्रतिकूळ वागतो, त्याला अपस्मार व्याधि होतो, त्याणे चांद्रायण प्रायश्चित्त करावें.

ब्राह्मणश्वासरोधेनह्यपस्मारीभवेन्नरः ॥

वक्ष्येतस्यप्रतीकारंदानहोमक्रियाविधिः ॥

अर्थ—ब्राह्मणाच्या श्वासाचा रोध करणारा अपस्मारी होतो, त्याविषयीं दान व होम इत्यादिकांनीं प्रतीकार सांगतो.

ज्योतिःशास्त्राभिप्राय.

शनिभूसुतदिननाथानिधनस्थायस्यजन्मकालेस्युः ॥ नानाव्याधिव

धाद्यैःपीडांचापस्मारसंभवांतस्य ॥ अष्टमस्थानस्थशनिमंगलसूर्यजनि

तापस्मारशांतयेग्रहप्रीतयेपूर्वोक्तमेवसकलंजपादिकुर्यात् ॥

अर्थ—ज्याच्या जन्मकाळीं शनि, मंगळ आणि सूर्य हे अष्टमस्थानीं आले; तर त्याला ना

नाप्रकारच्या व्याधि, किंवा अपस्मार, यांपासून पीडा उत्पन्न होत्ये, त्याणे अष्टमस्थानस्थ, शनि, मंगळ व सूर्य यांपासून झालेल्या अपस्माराच्या शांत्यर्थ व ग्रहतुष्टयर्थ पूर्वोक्त जपादि सर्व उपचार करावे.

अपस्मारनिदान.

तमःप्रवेशसंरंभोदोषोद्रेकहतस्मृतिः ॥
अपस्मारइतिज्ञेयोगदोघोरश्चतुर्विधः ॥

अर्थ—अंधकारांत प्रवेश केल्या सारिखें वाटणें, डोळे विकारयुक्त होणें, हस्तपाद विक्षेप होणे व वातादिकांच्या प्रकोपामुळें स्मृत्यात्मक ज्ञान नष्ट होणें, या व्याधीला अपस्मार ह्मणतात; तो वात, पित्त, कफ, सन्निपात, या भेदेंकरून चार प्रकारचा जाणावा, याला फेंपरें किंवा घुरें ह्मणतात.

पूर्वरूप.

हृत्कंपःशून्यतास्वेदोध्यानंमूर्च्छाप्रमूढता ॥
निद्रानाशश्चतस्मिंश्चअपस्मारेभविष्यति ॥

अर्थ—हृदयास कंप व शून्यपणा, घाम, मनाला व इंद्रियांना मोह, निद्रानाश, हीं अपस्माराचीं पूर्वरूपें जाणावीं.

वातजन्य अपस्मार.

कंपतेप्रदशेद्दंतान्फेनोद्वामीश्वसत्यपि ॥
परुपारुणकृष्णानिपश्येद्रूपाणिचानिलात् ॥

अर्थ—वातिक अपस्माराचा ठायीं आंगास कंप सुटतो, रोगी दांत चावतो, तोंडाला फेंस येतो, श्वासोश्वास मोठ्यानें टाकितो; व आरक्त व कृष्णवर्ण अशीं रूपें पाहतो.

पैत्तिक अपस्मार.

पीतफेनांगवक्त्राक्षःपीतासृग्रूपदर्शनः ॥
सतृष्णोष्मानिलव्याप्तलोकदर्शीचपैत्तिकः ॥

अर्थ—पित्तापस्माराचा ठायीं तोंडाला पिवळा फेण येतो; व हात, पांय, तोंड व डोळे हे पिवळे होतात; व त्याच्या डोळ्यांपुढें तांबडें पिवळें, असें रूप दिसतें; आणि तृष्णा उष्ण, वायु, पाणी अथवा तृष्णासंबंधीं उष्ण, श्वास व सर्व जगत् अग्नीनें व्याप्त झालें, असें पाहातो.

कफापस्मार.

शुक्लफेनांगवक्त्राक्षःशीतहृष्टांगजोगुरुः ॥

पश्येच्छुक्लानिरूपाणिश्लैष्मिकोमुच्यतेचिरात् ॥

अर्थ—कफजन्य अपस्माराचा ठायीं तोंडाला पांढरा फेंस येतो, हात, पाय, तोंड व डोळे हे पांढरे होतात; रोग्याचें शरीर फार थंड होतें, रोमांच उभे राहातात, आंगाला जड पणा येतो; पांढरीं रूपें पाहातो. हा फार वेळानें रोग्याला सोडितो.

संनिपातापस्मारनिदान.

सर्वैरेभिःसमस्तैश्चलिंगैर्ज्ञेयस्त्रिदोषजः ॥

अपस्मारःसचासाध्योक्षीणश्चानश्नतश्चयः ॥

अर्थ—वातादि तीन ही दोषांचीं लक्षणें झालीं असतां; तो सन्निपातात्मक अपस्मार जाणावा. तो असाध्य आहे; आणि जोक्षीण व भजिन न करणारा अशा ही पुरुषाचा अपस्मार असाध्य जाणावा.

असाध्यलक्षण.

प्रस्फुरंतंचबहुशःक्षीणंप्रचलितभ्रुवं ॥

नेत्राभ्यांचाविकुर्वाणमपस्मारोविनाशयेत् ॥

अर्थ—जा अपस्मारामध्यें मनुष्य फार कांपतो, क्षीण होतो, ज्याची भिवई चंचल हो, त्ये,नेत्र फिरतात, त्याचा अपस्मार असाध्य जाणावा.

अपस्माराचा काळ नियम सागतो.

पक्षाद्वाद्वादशाहाद्वामासाद्वाकुपितामलाः ॥ अपस्मारायकुर्वंतिकिंचिद्विगमथांतरं ॥ देवेवर्षत्यपियथाभूमौबीजानिकानिचित् ॥ शरदि प्रतिरोहंतितथाव्याधिसमुछ्रयः ॥

अर्थ—वातादिदोष पक्षानंतर अथवा बारादिवसानंतर, किंवा मासानंतर कुपित होऊन अपस्माररोग निर्माण करितात, अन्यदिवशीं सूक्ष्मरूपेंकरून असतात, याविषईं दृष्टांत कांहीं बीजें पर्जन्य काळीं पर्जन्य पडला असतां; भूमिगत असतात; परंतु उगवत नाहींत, तींच बीजें शरत्कालीं आपल्या आपण उगवतात, याप्रमाणें व्याधीचा उद्भव स्वस्वकाळीं होतो असें जाणावें.

मधुकघृत.

मधूकाद्विपलेकल्केद्रोणेचामलकीरसे ॥

तस्मिन्सिध्धंघृतप्रस्थंपित्तापस्मारभेषजं ॥

अर्थ—८ तोळे जेष्ठमधाचें चूर्ण व १०२४ तोळे आवळ्यांचा रस, यांचे बरोबर सिद्ध केलेलें ६४ तोळे घृत अपस्मारावर औषध आहे.

काशघृत.

काशक्षीरेक्षुरसयोःकाश्मर्यष्टगुणेरसे ॥ कार्षिकैर्जीवनीयैश्चसर्पिः
प्रस्थंविपाचयेत् ॥ वातपित्तोद्भवंक्षिप्रमपस्मारंनियच्छति ॥

अर्थ—काशसंज्ञक तृणाचा काढा, आणि उंसाचा रस यांचे आठपट शिवणीचा रस त्यांत जीवनीय गणोक्त प्रत्येक औषधांचें चूर्ण, तोळा तोळा प्रमाण घालून त्यांत ६४ तोळे तूप कढवून सिद्ध करावें, तें वातपित्तापासून झालेला अपस्मार लवकर नाशितें.

कफअपस्मारीं वचाद्यघृत.

वचाशम्याककैडर्यवयस्थाहिंगुचौरकैः ॥
सिद्धंपलंकषायुक्तंवातश्लेष्मात्मिकंघृतं ॥

अर्थ—वेखंड, बाहावा, घाणेरा करंज, आवळकाठी, हिंग, गठोणा व लघुगोखरु यांच्या कल्कावरोबर सिद्ध केकेलें तूप, अपस्मारनाशक आहे.

मधुवचायोग.

यःखादेत्क्षीरभक्ताशीमांक्षिकेनवचारजः ॥
अपस्मारंमहाघोरंसुचिरोत्थंजयेद्ध्रुवं ॥

अर्थ—जो दुधभात जेवणारा मनुष्य वेखंडाचें चूर्ण मधावरोबर खाईल तो फार दिवसांचा घोर अशा अपस्माराचा निश्चयें करून पराजय करील.

मुस्तकमूलयोग.

उत्तरदिग्गतमुस्तकमूलंबुध्यासमुध्दृतंपेष्य ॥
पीतंपयसाहन्यादपस्मृतिंगोःसवर्णवत्सायाः ॥

अर्थ—नागरमोथ्याचें उत्तरेकडील मूळ, वासराचा आणि जीचा एकवर्ण अशा गाईच्या दूधांत वाटून जो पिईल; तो अपस्माराचा नाश करील .

कूष्मांडकादियोग,

कूष्मांडकगिरोत्थेनरसेनपरिपेपितं ॥
अपस्मारविनाशाययष्ट्याव्हंसपिवेत्र्यहं ॥

अर्थ—कोंहळयाच्या गिराच्या रसांत जेष्ठीमध उगाळून प्यावी; ह्मणजे तीन दिवसांत अपस्माराचा नाश होईल.

भैरवरसायन.

वचामृताव्योपमधूकसाररुद्राक्षसिंधूद्भववाह्नितानि ॥ फलंसमुद्रस्यर

सोनकल्कंध्मातंहिनासापुटमध्यदेशे ॥ अपस्मृतिश्लेष्ममरुच्छिरोरु
क्प्रलापतंद्राभ्रमजाड्यमोहान् ॥ ससंनिपातश्रुतिकाक्षिभंगान्सपी
नसंहंतिहलीमकंच ॥ रसायनंभैरवनामधेयंज्ञातंविचारात्कविविठ्ठलेन ॥

अर्थ—वेखंड, गुळवेल, सुंठ, मिरें, पिंपळी, मोहाचा डीक, रुद्राक्ष, सेंधव, रिंगणीचें फळ, समुद्रफळ व लसूण हीं सर्व एकत्र वाटून नाकांत ओढावें; ह्मणजे अपस्मार वायु, कफ, मस्तकपीडा, बडबड, तंद्रा, भ्रम, जाड्य, मोह, सन्निपात, कर्णरोग, अक्षिभंग, पिनस, हलीमक, इतक्यांचा नाश करील. याला भैरव रसायन असें ह्मणतात. विठ्ठल पंडिताला विचारानें हें समजलें आहे.

स्मृतिसागर रस.

रसगंधकतालानांसशिलाताम्रभस्मनां ॥ शुध्धानांमूर्छितानांचचूर्णंभाव्यं
वचामृतैः ॥ एकविंशतिधापश्चाद्ब्राह्मीवारातथैवच ॥ कटभीबीजतैलेन
भावयेदेकवारकं ॥ स्मृतिसागरनामायंरसोपस्मारनाशनः ॥ सर्पिषा
मापमात्रोयंभुक्तोहन्यादपस्मृतिं ॥

अर्थ—पारा, गंधक, हरताळ, मनशीळ व ताम्रभस्म हीं शुध्द मूर्च्छित करून त्यांच्या चूर्णास वेखंड आणि ब्राह्मी यांच्या प्रत्येकीं एकवीस भावना देऊन ज्योतीष्मतीच्या तेलाची एक भावना द्यावी; ह्मणजे हा स्मृतिसागरनामक रस अपस्मारनाशक होतो, हा तूपाबरोबर मासाभार खावा.

पानीयकल्याणघृत आपस्मारादिकांवर.

त्रिफलाद्वेनिशेकौंतीसारिवेद्वेप्रियंगुका ॥ शालिपर्णीपृष्ठपर्णीदेव
दार्व्येलवालुकं ॥ नतंविशालादंतीचदाडिमंनागकेशरं ॥ नीलो
त्पलैलामंजिष्ठाविडंगंकुष्ठपद्मकं ॥ जातीपुष्पंचंदनंचतालीसंबृहती
तथा ॥ एतैःकर्पसमैःकल्कैर्जलंदत्वाचतुर्गुणं ॥ घृतप्रस्थंपचेद्धीमान
पस्मारेज्वरेक्षये ॥ उन्मादेवातरक्तेचकासेमंदानलेतथा ॥ प्रतिश्या
यकटीशूलेतृतीयकचतुर्थके ॥ मूत्रकृच्छ्रेविसर्पेचकंडूपांड्वामयेतथा ॥
विषद्वयेप्रमेहेपुसर्वथैवोपयुज्यते ॥ वंध्यानांपुत्रदंभूतयक्षरक्षोहरंस्मृतं ॥

अर्थ—हिरडा, बेहेडा, आवळकठी, हळद, दारुहळद, रेणुकबीज, काळी उपलसरी, पांढरी उपलसरी, याघांटीचें मूळ, अथवा राळे, रानगांजा, रानभाल, देवदार, एलवालुक, तगर, कंवडळमूळ, डाळिंबाची साल, दांतीमूळ, नागकेशर, निळें कमळ, विलायची, मं-

जिष्ठ, वावडिंग, कोष्ट, पद्मकाष्ट, जाईचीं फुलें, चंदन, तालीसपत्र व रिंगणी हीं अठ्ठावीस औषधें कर्ष प्रमाण घेऊन कल्क करून त्याच्या चौपट पाणी घेऊन त्यांत तें कल्क व तूप शेष राहीं तों पर्यंत पाक करून नंतर तें तूप गाळून पोटांत घ्यावें. तेणें करून फेंपरें, ज्वर, क्षयरोग, उन्मादरोग, वातरक्त, खोकला, अग्निमांद्य, पडसें, कंबरेचा शूल, तृतीयकज्वर, चातुर्थिकज्वर, मूत्रकृच्छ्र, इसव पायाना होतो तो, पांडुरोग, सर्पादिकांचे विषविकार, बचनागादिक विषविकार व परमा हे रोग दूर होतात; व हें तूप वांझोटया बायकांस पुत्र देतें; व या तुपापासून भूतबाधा दूर होते.

शंखपुष्पीघृत.

शंखपुष्पीवचाकुष्टैःसिध्धंब्राह्मीरसैघृतं ॥
पुराणंहंत्यपस्मारंमेध्यमुन्मादनाशनम् ॥

अर्थ—शंखाहुली, वेखंड, कोष्टकोळिंजन यांचें चूर्ण तूप व ब्राह्मीचा रस एकत्र शिजवून रस आटला ह्मणजे तूप सिध्ध झालें, तें फार दिवसांचा अपस्मार व हृद्रोग यांचें नाशक आहे.

सैंधवादिघृत.

घृतसैंधवहिंगुभ्योकर्षैर्वतिश्चतुर्गुणैः ॥
मूत्रैःसिध्धमपस्मारंहृद्ग्राहग्रामनाशनं ॥

अर्थ—तूप, सैंधव व हिंग हीं एक एक तोळा आणि बारा तोळे गोमूत्र घेऊन एकत्र शिजवावें, मूत्र आटलें ह्मणजे तूप सिद्ध झालें, तें तूप अपस्मार व हृद्रोग यांचे नाशक आहे.

ब्राह्मीघृत.

ब्राह्मीरसैवचाकुष्टशंखपुष्पीभिरेवच ॥
पक्वंपुरातनंसर्पिरपस्मारहरंघृतं ॥

अर्थ— ब्राह्मीच्या रसांत वेखंड, कोष्ट, शंखपुष्पी, जुनें तूप घालून सिद्ध करावें, तें अपस्माराचा नाश करितें.

कूष्मांडघृत.

कूष्मांडकरसेसर्पिरष्टादशंगुणेपचेत् ॥
यष्टयाव्हकल्कैस्तत्पानादपस्मारविनाशनं ॥

अर्थ -एक भाग तूप, आणि अठरा भाग कोहोळ्याचा रस, याप्रमाणे घेऊन पक्क करून जेष्टीमधाच्या चूर्णाबरोबर खावे; तें अपस्मारनाशक आहे.

पंचगव्यघृत.

गोशकृद्रसदध्यम्लक्षीरमूत्रैःसमंघृतं ॥

सिद्धंचातुर्थिकोन्मादग्रहापस्मारनाशनं ॥

अर्थ–गाईच्या शेणाचे पाणी, दहीं, महाळुंग, दूध, व गोमूत्र, यांच्या बरोबर सिद्ध केलेले तूप, चातुर्थिकज्वर, उन्माद, ग्रह व अपस्मार यांचें नाशक आहे.

अपस्मार नस्य.

अरण्यत्रपुसीचूर्णनस्येनापस्मृतिंजयेत् ॥

अर्थ–लघुराळे, कंवडळ यांचें चूर्णाचें नस्य अपस्मारनाशक आहे.

निर्गुंडीभवअक्रूरंनावनांजनयोगतः ॥
उपैतिसहसानाशमपस्मारोनसंशयः ॥

अर्थ–निगुडीच्या रसांत अक्रोड उगाळून नस्य, किंवा अंजन केलें असतां; तात्काळ अपस्माराचा नाश करील यांत संशय नाहि.

श्वशृगालविडालानांकपिलानांगवामपि ॥
पित्तानिनस्यतोहन्युरपस्मारंपृथक्पृथक् ॥

अर्थ–कुत्रें, कोल्हा, मांजर, कपिला गाय, या प्रत्येकांच्या पित्ताचें नस्य केलें असतां; अपस्मार नाश पावतो.

अंजन.

पुष्योत्धृतंशुनःपित्तमपस्मारघ्नमंजनम् ॥
तदेवसर्पिषायुक्तंधूपनंपरमंहितम् ॥

अर्थ–पुष्यनक्षत्राचे ठायीं कुत्र्याचें पित्त काढून अंजन करावें; अथवा मिश्र करून धूप करावा; ह्मणजे अपस्माराचा नाश करितें.

मनोह्वाताक्ष्र्यकंचैवशकृत्पारावतस्यच ॥
अंजनंहंत्यपस्मारमुन्मादंचविशेषतः

अर्थ–मनशीळ, रसांजन व पारव्याची विष्ठा यांचें अंजन अपस्मार व उन्माद यांचा नाश करितें.

यष्टिहिंगुवचावज्रीशिरीषलशुनामयैः ॥
साजमूत्रैरपस्मारेसोन्मादेनावनांजने ॥

अर्थ–जेष्ठीमध हिंग, वेखंड, निवडुंगाचा चीक, शिरीस, लसूण व कोष्ठकोळिंजन यांचें अंजन आणि नस्य, बोकडाचें मुता बरोबर केलें असतां; अपस्मार व उन्माद हे रोग जातात.

करंजदारुसित्धार्थकठभीरामठंवचा ॥ समंगात्रिफलाव्योषप्रि यंगुश्वसमांशकः ॥ बस्तमूत्रेणसंपिष्टानस्यपानांजनादिषु ॥

योज्योयोगोयमुन्मादेपस्मारेभूतरोगिषु ॥

अर्थ—करंज, देवदार, पांढऱ्या मोहोऱ्या, मालकांगोणी, हिंग, वेखंड, मंजिष्ट, त्रिफळा, त्रिकटु व राळे हीं सर्व समभाग घेऊन बोकडाच्या मुतांत वाटून प्यावें; व अंजन करावें. हा योग अपस्मार, उन्माद व भूतोन्माद, याचे ठिकाणीं योजावा.

नकुलोलूकमार्जारगृध्रकीटाहिकाकजैः ॥
तुंडैःपक्षैःपुरीषैश्चधूपनंकारयेद्भिषक् ॥

अर्थ—मुंगूस, घुबड, मांजर, गिधाड, किडे, सर्प व कावळा इतक्यांची, तोंडें, पक्ष व विष्ठा यांचा धूप अपस्मारनाशक आहे.

दुश्चिकित्स्योह्यपस्मारश्चिरकारीमहागदः ॥ तस्माद्रसायनैरेतैःप्राय
शःसमुपाचरेत् ॥ हृत्कंपोक्षिरुजायस्यस्वेदोहस्तादिशीतता ॥ दश
मूलीजलंतस्यकल्याणाज्यंचयोजयेत् ॥

अर्थ—अपस्माररोग कष्टसाध्य, फारदिवस राहाणारा, असा आहे, यास्तव अपस्मार प्रकरणीं जीं रसायनें सांगीतली आहेत, त्याणीं बहुतकरून उपचार करावा; आणि हृदयास कंप, डोळयांस पीडा, अंगास घाम, हातापायांस गारपणा, असें ज्यास असेल त्याला दशमुळांचा काढा आणि कल्याणघृत योजावें.

त्रिकत्रयलेह.

त्रिकत्रयसमायुक्तंजीवनीययुतंतथा ॥
हंत्यपस्मारमुन्मादंवातव्याधिंसुदुस्तरं ॥

अर्थ—हरडा, बेहेडा, आवळकाठी, सुंठ, मिरीं, पिंपळीं, दालचिनी, एलचीं, तमाल, पत्र, आणि जीवनीयगण या सर्वांचा लेह करावा. तो अपस्मार, उन्माद, आणि दुस्तर वातरोग याचा नाश करितो.

कल्याणचूर्ण.

पंचकोलंसमरिचंत्रिफलाबिडसैंधवं ॥ कृष्णाविडंगपूतीकयवानीधा
न्यजीरकं ॥ पीतमुष्णांबुनाचूर्णंवातश्लेष्मामयापहं ॥ अपस्मारेत
थोन्मादेदुर्नामग्रहणीगदे ॥ एतत्कल्याणकंचूर्णंनष्टस्याग्नेश्चदीपनं ॥

अर्थ—सुंठ, मिरें, पिंपळी, चवक, चित्रक, मिरें, त्रिफला, बिडलोण, सैंधव, पिंपळी, वावडिंग, करंज, ओंवा, धनें व जिरें यांचें चूर्ण ऊन पाण्या बरोबर प्यालें असतां; वातश्लेष्मरोग, अपस्मार, उन्माद, दुर्नाम, संग्रहणी, यांचें नाशक व अग्निदीपन होतें. याला कल्याणक चूर्ण ह्मणतात,

लेप व डाग.

गोमूत्रयुक्तैःसिद्धार्थैःप्रलेपोद्वर्तनंहितं ॥

धूमस्तीक्ष्णानिनस्यानिदाहःसूच्याकपोलयोः ॥

अर्थ—अपस्मारीरोग्याला मोहऱ्या गोमूत्रांत वाटून त्यांचा आंगाला लेप, किंवा उटणें, किंवा धूम, तिखट नस्ये व गालावर सुईचे डाग, हे उपचार करावे.

द्वौकीटमेपौविधिवदानीयरविवासरे ॥

कंठेभुजेवासंधार्यजयेदुग्रामपस्मृतिं ॥

अर्थ—दोन वाळूंतील भोवर किडे रविवारी आणून कंठ, किंवा भुजे, यांत धारण करावे. ते उग्र अपस्माराचा नाश करितात.

चंदनादिअवलेह.

चंदनंतगरंकुष्ठंत्रिसुगंधीचवास्तुकं ॥ मंजिष्ठाभीरुमृद्वीकापाठाऽभ्या माप्रियंगुभिः ॥ स्वयंगुप्तापीलुपर्णीविपरास्नागवादनी ॥ कंकोली जीवकोमेदपुष्करंघनवालकं ॥ शाल्मलीतस्यनिर्यासस्तुगाकालीय कंतथा ॥ तिंत्तिडीकंचवृक्षाम्लंत्रिफलाकाश्मरीफलं ॥ जातीफलंतु गोक्षीरीकृष्णागरुचनागरं ॥ खर्जूरंचसमांशानिसूक्ष्मचूर्णानिकारयेत् ॥ भावितंवीजपूरस्यस्वरसेनचसप्तधा ॥ समशर्करयायुक्तामाटरूपर सेनतु ॥ भावितंसप्तधातत्तुनात्रकार्याविचारणा ॥ एषलेहःसदाश स्तोह्यपस्मारेसुदारुणे ॥ उन्मादेकामलारोगेपांडुरोगेहलीमके ॥ रक्तपित्तेराजरोगेपित्तातीसारपीडिते ॥ रक्तातिसारशोथेचशिरोरो गेसदाज्वरे ॥ तमकेस्तन्यरोगेचच्छर्दौदाहेमदात्यये ॥ अष्टादशसु मेहेपुकासेश्वासेसर्पनिसे ॥ बालानांचहितंतच्चशृणुमात्रामतःपरं ॥ उत्तमाकर्पमात्रातुपादहीनातुमध्यमा ॥ बलवीर्यकरीप्रोक्तासद्यःस र्वगुणाभवेत् ॥ नरकुंजरवाहानांचोपयुक्तोहितोमतः ॥ चंदनाद्यो महायोगःकृष्णात्रेयेणपूजितः ॥

अर्थ—चंदन, तगर, कोष्ठ, दालचिनी, एलची, तमालपत्र, चाकवत, मंजिष्ठ, शतावरी, द्राक्षे, पाहाडमूळ, हरीतकी, राळे, कुहिली, गोरवेल, अतिविष, रास्ना, वृंदावन, कंकोळ, जीवक, मेदा, पोखरमूल, नागरमोथे, वाळा, सांवरीचा चीक, वंशलोचन, दा-

दारुहळद, चित्रक, आमसोल, हरडा, बेहडा, आवळकाठी, शिवणीचीं फळें, जायफळ, तवकीर, कृष्णागरु, सुंठ, आणि मिरीं, हीं समभाग घेऊन चूर्ण करून एकत्र करावीं. त्या सर्व चूर्णासमान साखर घालून त्याला महाळुंगाचा रस व अडुळशाचा रस, यांच्या सात सात भावना द्याव्या. हा लेह दारुण अपस्मार, उन्माद, कामीळ, पांडुरोग, हलीमक, रक्तपित्त, राजयक्ष्मा, पित्तातिसार, रक्तातिसार, शूल, मस्तकरोग, सततज्वर, तमक, स्तन्यरोग, वांति, दाह, मदात्यय, अष्टादश कुष्ठें, मेह, खोकला, दमा व पीनस, यांवर द्यावा; व हा बालांना हितकारक आहे. याचें १० मासांचें उत्तम मान, ७॥ मासांचें मध्यम. हा घेतला असतां; बल व वीर्य यांचें करितो; व हा मनुष्य, हत्ती, घोडे, या सर्वांना उपयोगी व हितकारक आहे. हा चंदनादि अवलेह कृष्ण आत्रेयानें सांगितला.

द्राक्षाद्यवलेह.

द्राक्षादारुनिशायुतंसमधुकंकृष्णाविशालात्रिवृत्पृथ्वीकात्रिफलात्रिटं
गकटुकंश्रीचंदनंवालकं ॥ चातुर्जातकनिंबकांचनतुगातालीसपत्रंघ
नंमेदाद्वैसुरदारुकुष्टकमलंधात्रीसमंगाबला ॥ भार्ङ्गीकोलकदाडिमा
म्लसहितंकाश्मर्यशृंगाटकंकाचाव्हामलवंटिकालघुनराक्षुद्राचरास्ना
युतं ॥ चूर्णंशर्करयासमंमधुघृतंखर्जूरकैःसंयुतंलिह्यात्कर्षमिदंसमस्त
बलवान्हन्यादपस्मारकं ॥ उन्मादंचगुदाकुरंक्षयमथोगुल्मंसपांडुं
तथाकासश्वासमसृक्प्रवाहमुदरंस्त्रीणांहितंशस्यते ॥

अर्थ–द्राक्षें, दारुहळद, ज्येष्ठीमध, पिंपळी, कंनटळ, तेज, एलची, हरडा, बेहेडा, आवळकाठी, वावडिंग, कुटकी, चंदन, वाळा, दालचिनी, तमालपत्र, एलची, नागकेशर, वडुलिंब, कांचनार, वंशलोचन, तालीसपत्र, नागरमोथा, मेदा, महामेदा, देवदार, कोष्ट, कमळ, आवळकाठी, मंजिष्ठ, चिकणा, भारंगमूळ, बोर, डाळिंब, शिवण, शिंगाडे, हळ-द, कापूर, थोर ताग, लहान ताग, रिंगणी व रास्ना हे सर्व समभाग घेऊन यांच्या सर्व चूर्णासमान साखर, मध, तूप व खारीक घालून तो लेहासारखा करून ठेवावा. त्यांतून दोहा मासे द्यावा; म्हणजे बलवान् अपस्मार, उन्माद, क्षय, गुल्म, पांडुरोग, खोकला, दमा, प्रदर, उदर, वाळंतरोग यानां शमवितो.

शास्त्रार्थ.

पूर्वंयुंज्यादपस्मारेबुद्धिमान्छर्दनादिकं ॥ वातिकंबस्तिभिःप्रायः
पैत्तिकंयंविरेचनैः ॥ कफजंवमनप्रायैरपस्मारमुपाचरेत् ॥

अर्थ-अपस्माराच्याठायीं पूर्वी बुद्धिमंत वैद्यानें वांति इत्यादिक द्यावी. वातिक अपस्मार प्रायः बस्तिकर्मानीं जिंकावा; व पैत्तिकाला विरेचन द्यावें; आणि कफज अपस्मारावर वमन द्यावें.

पलंकपातैल.

पलंकपावचापथ्यावृश्चिकाल्यर्कसर्षपैः ॥ जटिलापूतनाकेशीला-
ङ्गलीहिंगुरोचकैः ॥ लशुनातिरसोचित्रोकुष्ठैरेभिश्चपक्षिणां ॥ मांसा
शिनांयथालाभंवस्तमूत्रेचतुर्गुणे ॥ सिद्धमभ्यंजनंतैलमपस्मारविनाशनं ॥

अर्थ–रास्ना, वेखंड, हरीतकी, थोर आग्या, रुई, शिरस, जटामांसी, सुगंध जटामांसी, कळलावी, हिंग, पादेलोण, लसुण, मोरवेल, चित्रक, कोष्ठ, यांचे काढे व वल्क आणि मांस खाणाऱ्या पक्ष्याचे मांसरस व शेळीचें मूत्र सर्वांच्या चौपट एकत्र करून त्यांत तेल घालून सिद्ध करावें, तें अपस्माराचा नाश करितें.

कटभ्यादितैल.

कटभीनिंबकट्वंगमधुशिग्रुत्वचारसे ॥
सिद्धंमूत्रयुतंतैलमभ्यंगार्थंप्रशस्यते ॥

अर्थ–मालकांगोणी, कडुलिंब, गोडा शेवगा व दालचिनी यांचा काढा, व गोमूत्र यांचे बरोबर सिद्ध केलेले तेल अपस्मारावर अभ्यंगाविषई प्रशस्त आहे.

शिग्रुतैल.

शिग्रुकुष्ठवचाजाजिलशुनव्योपहिंगुभिः ॥
बस्तमूत्रेशृतंतैलंनावनंस्यादपस्मृतौ ॥

अर्थ–शेवगा, कोष्ठ, वेखंड, जिरें, लसूण, त्रिकटु व हिंग, हीं सर्व समभाग बोकडाच्या मूत्रांत घालून त्यांत तेल कढवावें, तें नस्याचे योगानें अपस्मारनाशक आहे.

तैलप्रस्थंघृतप्रस्थंजीवनीयैःप्रलेपनैः ॥
क्षीरद्रोणेपचेसिद्धमपस्मारविमोक्षणं ॥

अर्थ–तेल अथवा तूप, ६४ तोळे घेऊन जीवनीयगणोक्त औषधांचे चूर्णावरोबर १०२४ तोळे दुधांत कढवून सिद्ध करावें, तें अपस्मारनाशक आहे.

अभ्यंगेसार्षपंतैलंवस्तमूत्रेचतुर्गुणे ॥
सिद्धंस्याद्गोशकृन्मूत्रेस्नानाच्छादनमेवच ॥

अर्थ–शिरसाचें तेल, बोकडाचे मुतांत, अथवा गाईचे शेणाचें पाणी व गोमूत्र यांत सिद्ध करून अभ्यंग करावें, तें अपस्मारनाशक आहे.

अपस्मारपथ्य.

लोहिताःशालयोमुद्गागोधूमाःप्रततंहविः ॥ कूर्मामिषंधन्वरसोदुग्धं
ब्राह्मीजलंवचा ॥ पटोलंवृत्धकूष्मांडंवास्तुकंस्वादुदाडिमं ॥ सौभांजनं

पयःपेटीद्राक्षाधात्रीपरूपकं ॥ अपस्मारगदेनृणांपथ्यमेतदुदीरितं ॥

अर्थ—तांबड्या साळी, मूग, गंहु, जुनें तूप, कांसवाचे मांस, धमाशाचें पाणी, दूध, ब्राह्मी, वाळा, वेखंड, पडवळ, जुना कोहोळा, चाकवत, गोड डाळिंब, शेवगा, पय:पेटी, द्राक्षें, आवळा व फालसा, हीं अपस्मारावर पथ्यकारक आहेत.

अपस्मार अपथ्य.

चिंताशोकभयक्रोधमद्भुतंदर्शनानिच ॥ मद्यमत्स्यविरुद्धान्नंतीक्ष्णोष्ण गुरुभोजनं ॥ अतिव्यवायमायासंपूज्यपूजाव्यतिक्रमं ॥ पत्रशाकानि सर्वाणिबिंबीमापाढकंफलं ॥ तृषानिद्राक्षुधावेगानपस्मारीनरस्त्यजेत् ॥

अर्थ—चिंता, शोक, भय, क्रोध, अद्भुत पदार्थांचें दर्शन, मद्य, मासे, विरुद्धान्न, तिखट, ऊष्ण, जड असें भोजन, अतिस्त्रीगमन, आयास, पूज्य व पूजक यांचा बदल, संपूर्ण पत्रशाका, तोंडलें, उडीद, तुरी, ताहान, निद्रा, क्षुधा, यांच्या वेगाचें धारण हा वर्ग अपस्माररोग्यानें सोडावा.

वातव्याधि कर्मविपाक.

देवानांब्राह्मणानांवाधनापहरणात्तथा ॥
स्वामिद्रोहाद्वातरोगीभवेदस्यापिनिष्कृतिः ॥

अर्थ—देव किंवा ब्राह्मण याच्या धनाचा अपहार, किंवा धनाचा द्वेष केला असतां; वातरोग होतो, त्याची निष्कृति करावी.

वातरोगहर.

गुरुप्रत्यर्थितांयातोवातरोगीभवेन्नरः ॥
नाममंत्रेणकुर्वीतजपंहोमंचशांतये ॥

अर्थ—जो गुरुशीं द्वेष करितो, तो वात रोगी होतो; त्याणें त्या वातरोगाच्या शांत्य. ॥ पुढे सांगावयाचे जे अच्युत, अनंत व गोविंद इत्यादि नाममंत्र त्याणीं जप व होम करावा.

धनुर्वातहर.

अनिच्छंत्यक्षतांयस्तुउपभुंक्तेपरस्त्रियं ॥ बलादाक्रम्यसनरःसर्वसंधिषु वेदनां ॥ तांप्रामाप्नोत्यरुचिमान्धनुर्वातयुतोभवेत् ॥ ज्वरीतदुपशांत्यर्थंमहिषीदानमाचरेत् ॥ कृच्छ्रातिकृच्छ्रौकुर्वीतचांद्रायणमथापरं ॥

सूर्यनामजपंचैवशक्त्याब्राह्मणतर्पणं ॥ नामत्रयंजपेन्मर्त्योरोगशांत्यर्थ
मात्मनः ॥ सहस्रनामकंचापिस्तोत्रंसम्यग्विधानतः ॥ अच्युतानंत
गोविंदेत्येतन्नामत्रयंद्विजः ॥ अयुतत्रितयावृत्याजपेद्रोगस्यशांतये ॥

अर्थ—इच्छा न करणारी व अक्षतयोनि अशा परस्त्रीचा बलात्कारानें जो उपभोग करितो, त्याच्या सर्व संधीत तीव्रकळा व अरुचि, धनुर्वायु आणि ज्वर, हे रोग होतात. त्याणें तच्छांत्यर्थ महिषीदान, कृछ्र, अतिकृछ्र व चांद्रायण हीं प्रायश्चित्तें व सूर्यनामाचा जप, ब्राह्मणभोजन,नाममंत्राचा जप, सहस्रनामाचा जप, हें विधानपूर्वक करावें. नाममंत्र अच्युत, अनंत, गोविंद, ह्या तीन नामांचा ३० हजार जप करावा; ह्मणजे रोगापासून मुक्त होतो.

पक्षवातहर.

सभायांपक्षपातीचजायतेपक्षघातवान् ॥ निष्कत्रयमितंहेमसदद्याच्च
द्विजातये ॥ श्राद्धंचवैष्णवंकुर्यादात्मनोहितमिच्छता ॥ सप्तधा
न्यानिदद्याच्चगोदानंतत्रकारयेत् ॥

अर्थ—सभेमध्यें पक्षपात करणाराला पक्षघात वायु होतो, तच्छमनार्थ त्याणें तीन निष्क हेम ब्राह्मणाला द्यावें; व विष्णुश्राद्ध व सप्तधान्याचें दान आणि गोदान करावें.

रक्तवातहर.

रक्तवस्त्रप्रवालानांहारीस्याद्रक्तवातवान् ॥
सवस्त्रांमहिषींदद्यात्पद्मरागसमन्वितां ॥

अर्थ—जो तांबडीं वस्त्रें व पोंवळीं इत्यादिक चोरतो, तो वातरक्ती होतो. त्याणें पद्मरागसहवर्तमान सवस्त्र ह्मैस दान करावी.

रक्तवातपित्तहर.

सवर्णागमनेवातरक्तवान्जायतेनरः ॥ सवर्णागमनेवातपित्तवा
नपिजायते ॥ लक्ष्मीनारायणंरूपंसुवर्णेनप्रकल्पयेत् ॥ पलेनवात
दर्धेनतदर्धेनाथवापुनः ॥ लक्ष्मीनारायणंरूपंसर्वदासर्वकामिकं ॥

अर्थ—सवर्णस्त्रीशीं गमन करणारा वातरक्तवान् किंवा वातपित्तवान् होतो, त्याणें चार दोन अथवा एक तोळा सुवर्णाची लक्ष्मीनारायणमूर्ति करून ती दान द्यावी. ही लक्ष्मीनारायणमूर्ति सर्वकाळीं सर्व कामनांविषयीं दान करावी.

वातपित्तहर.

लशुनंगृंजनंतालफलंवाश्नातियोद्विजः ॥
सवातपित्तरोगीचभवेच्चांद्रायणंचरेत् ॥

अर्थ–लसूण, गाजर, किंवा तालफळें जो ब्राह्मण असून भक्षण करितो, तो वातपित्तरोगी होतो; त्याणें चांद्रायण प्रायश्चित्त करावें.

ज्योतिःशास्त्राभिप्रायेण वातव्याधिनिदान.

अतिमारुतरोगार्तोपरस्वहारीविलोलमतिचेष्टः ॥
कर्कटसंस्थेभानौस्वपुत्रदृष्टेपुमान्पिशुनः ॥

अर्थ–जन्मकाळीं कर्कराशीला सूर्य असून शनिदृष्ट असेल तर तो पिशुन, वातरोगी, चोर व चंचळमतीचा असा पुरुष होतो.

वातपित्तोद्भवापीडाहीनजैरुग्रविग्रहः ॥
विदेशगमनंचापिसौरीमध्येयदाशिखी ॥

अर्थ–जन्मकाळीं शनि, किंवा केतु आले तर वातपित्त होतें; व हीनजातीपासून बंधन होतें, अथवा विदेशगमन होतें.

वायुरायुर्बलंवायुर्वायुर्धाताशरीरिणां ॥ वायुर्विश्वमिदंसर्वंप्रभुर्वायुः प्रकीर्तितः ॥ अशीतिवातजारोगाजायंतेतत्प्रकोपतः ॥ सामान्यंभेषजंतेषांस्नेहनंस्वेदनंतथा ॥ विशेषेणतुयद्दृष्टमुच्यतेत्रसमासतः ॥

अर्थ–वायु जिवाचें आयुष्य, बल, आधार, पोषक, सर्व विश्वाचा आत्मा व प्रभु असा आहे. त्याच्या प्रकोपानें ८० प्रकारचे वातरोग होतात. त्याविषयीं सामान्य औषधें, स्वेदन व स्नेहन, हीं आहेत; परंतु मीं विशेष पाहिला तो संक्षेपेंकरून सांगतो.

वातव्याधिनिदान.

रूक्षशीताल्पलघ्वन्नव्यायामातिप्रजागरैः ॥ विषमादुपचाराच्चदोषासृक्स्रवणादपि ॥ लंघनप्लवनात्यध्वव्यायामातिविचेष्टनैः ॥ धातूनांसंक्षयाच्चिंताशोकरोगातिकर्षणात् ॥ वेगसंधारणादामादभिघातादभोजनात् ॥ मर्मबाधाद्गजोष्ट्राश्वशीघ्रयानादिसेवनात् ॥ देहेस्रोतांसिरिक्तानिपूरयित्वानिलोबली ॥ करोतिविविधान्व्याधीन्सर्वांगैकांगसंश्रयान् ॥

अर्थ–रूक्ष, थंड, थोडें व लघु असें अन्न, श्रम, जागरण, नमानतील ते उपचार; व मल, मूत्र, कफ, पित्त, इत्यादिदोष; आणि रक्त, यांचें अतिगमन, खाडा इत्यादिकांपासून उडीमारणें, पाण्यांत बुडणें, अतिमार्गगमन, मेहेनत, अयासकारक चेष्टा, रसादिधातूंचा क्षय, चिंता, शोक, दीर्घरोगानें कृशपणा, मलमूत्रादिवेगधारण, आमांश, लांकडादिकांचा मोठा धक्का, उपवास, मर्माला पीडा, हत्ती, उंट, अश्व यांवरून जलद गमन. याकारणांनीं वायु देहामध्यें रिक्त झालेले नाडीमार्ग पूर्ण करून आपण बलवान् होऊन एकांगाला किंवा सर्वांगाला होणाऱ्या अशा अनेक वातरोगांला उत्पन्न करितो.

वायूचें पूर्वरूप.

अव्यक्तंलक्षणंतेषांपूर्वरूपमितिस्मृतं ॥

अर्थ—त्या वातव्याधीचें जें अव्यक्त लक्षण त्यालाच पूर्वरूप समजावें.

रूप सांगतो.

आत्मरूपंतुतद्व्यक्तमपायोलघुतापुनः ॥ संकोचःपर्वणांस्तंभोभंगोस्थ्नांप र्वणामपि ॥ लोमहर्षःप्रलापश्चपार्श्वपृष्ठशिरोग्रहः ॥ खांजपांगुल्यकुब्जत्वंशोथोंगानामनिद्रता ॥ गर्भशुक्ररजोनाशःस्पंदनंगात्रसुप्तता ॥ शिरोनासाक्षिजत्रूणांग्रीवायाश्चापिहुंडनं ॥ भेदस्तोदार्तिराक्षेपोमोहश्चायासएवच ॥ एवंविधानिरूपाणिकरोतिकुपितोनिलः ॥ हेतुस्थानविशेषाच्चभवेद्रोगविशेषकृत् ॥

अर्थ—वातरोगांचें जें व्यक्त लक्षण तें त्याचें रूप. तें असें; अंगनाश, शरीराला हलकेपणा, संधींचा संकोच, हाडें व सांधे, यांचा स्तंभ आणि भंग, रोमांच, वडवड व बरगड्या, पाठ आणि मस्तक, हे जखडून राहणें व लंगडेपणा, पांगळेपणा, कुबडेपणा, कोणतेही भागाला सूज, निद्रानाश, व गर्भ, शुक्र व रज यांचा नाश, कंप, आंगाला मेहरी व मस्तक, नासिका, नेत्र आणि मान हीं आंत जाणें किंवा वांकडी होणें, टोंच त्या सारिखी पीडा, शूळ, ठणका, आक्षेपक, मोह व आयास इत्यादि रूपें कुपित वायु करितो. तसाच हेतुविशेष व स्थानविशेष या कारणांनीं विशिष्ट रोग उत्पन्न करितो.

वातचिकित्सोपक्रम.

अभ्यंगंस्वेदनंवस्तिर्नस्यंलेहोविरेचनं ॥ स्निग्धाम्ललवणस्वादुवृष्यंवातामयापहं ॥ स्वाद्वम्ललवणैःस्निग्धैराहारैर्वातरोगिणः ॥ अभ्यंगस्नेहवस्त्याद्यैःसर्वानेवोपपादयेत् ॥ पित्तेसावरणेवातरोगेशीतोष्णभेषजं ॥ कफसावरणेवायौरूक्षोष्णंभक्ष्यभेषजं ॥ केवलेपवनव्याधौस्निग्धोष्णं भक्ष्यभेषजं ॥ स्निग्धोष्णरूक्षशीताद्यैर्वातजोयोनशाम्यति ॥ विकारास्तत्रविज्ञेयादुष्टशोणितसंभवाः ॥

अर्थ—अंगाला तेलादिक लावणें, घाम, बस्तिकर्म, नस्य, लेह, रेचक, हे व स्निग्ध, आंबट, खारट व गोड हे रस, वृष्यपदार्थ व वातनाशक पदार्थ, गोड, आंबट, खारट, स्निग्ध, असे आहार व आंगास तेलादिक लावणें, स्नेहन व बस्ति इत्यादि उपचार करावे; आणि पित्तयुक्त वायु असतां; शीतोष्ण औषध द्यावें, तोच कफाधिक असला तर रूक्ष व उष्ण असें औषध व आहार द्यावा, केवल वातविकारावर स्निग्ध व उष्ण असें

अन्न व औषध द्यावें. जो वातव्याधि स्निग्ध, उष्ण, रूक्ष, शीत इत्यादि उपचारानीं शांत होत नाहीं, तर तो दुष्ट रक्ताश्रित विकार जाणावा.

दुसरा प्रकार.

मधुरलवणमम्लंस्निग्धमस्योष्णनिद्रागुरुर्विकरवस्तिस्वेदसंतर्पणानि ॥
दहनदलंविशेषाभ्यंतसंमर्दनानिप्रकुपितपवमानंशांतमेतानिकुर्युः ॥

अर्थ–गोड, खारट, आंबट, स्निग्ध, ऊष्ण, निद्रा, ऊन, बस्ति, घाम, तर्पण, अग्नि, ऊनपाणी, अभ्यंग, आणि अंगमर्दन हे उपचार कोपलेल्या वायूच्या शांत्यर्थ करावे.

तिसरा प्रकार.

वातरोगस्त्वसाध्योयंदैवयोगात्सुसिध्यति ॥
अनुमानेनकुर्वंतिवैद्यकंतत्प्रतिज्ञया ॥

अर्थ–वातरोग असाध्य आहे, हा दैववशेंकरून बरा होतो; आणि वैद्य ही औषध अनुमानानें देतात, कोणी प्रतिज्ञा करून देत नाहींत.

कोष्ठगतवातलक्षण.

वातेकोष्ठाश्रितेदुष्टेनिग्रहोमूत्रवर्चसोः ॥
वर्ध्मत्हृद्रोगगुल्मार्शःपार्श्वशूलंचजायते ॥

अर्थ–कोष्टाश्रित वायु दुष्ट झाला असतां; मल व मूत्र हीं बंद होतात; आणि अंडवृद्धि, हृद्रोग, गुल्म, अर्श व पार्श्वशूल, हे विकार होतात.

कोष्ठलक्षण.

स्थानान्यामाग्निपक्वानांमूत्रस्यरुधिरस्यच ॥
हृदुंदुकःफुप्फुसश्चकोष्ठइत्यभिधीयते ॥

अर्थ–अमाशय, पक्वाशय, अग्न्याशय, मूत्राशय, रुधिराशय, हृदय, उंदुक, (पोट) व फुप्फुस यांना कोष्ट संज्ञा आहे.

अमाशयोक्त.

अत्रद्वितीयंदिनमारभ्यषड्दिनपर्यंतमामाशयोक्तषट्चरणयोगोदेयः ॥

अर्थ–दुसऱ्या दिवसापासून या व्याधीवर आमाशयावर सांगितलेला षट्चरण योग द्यावा.

कोष्ठवातचिकित्साक्रम.

विशेषतस्तुकोष्ठस्यवातेक्षारंपिवेन्नरः ॥ व्योषसौवर्चलाजाजीपथ्या लवणपंचकं ॥ सारिवावृहतीपाठाकलिंगाग्नियवाग्रजं ॥ चूर्णीकृतंद

विसुरातन्मंडोष्णांबुकांजिकैः ॥ पिबेदग्निविवृध्यर्थंकोष्ठवातहरंपरं ॥

अर्थ–कोष्ठगत वातविकार झाला असतां; विशेषें करून दुग्ध प्राशन करावें; आणि सुंठ, मिरीं, पिंपळी, पादेलोण, जिरें, हरीतकी, लवण, टांकणखार, सैंधव, बिडलोण, संचळ, उपलसरी, रिंगणी, पाहाडमूळ, इंद्रजव, चित्रक व यवखार यांचें चूर्ण दहीं, मद्य, ताकाची निवळी, गरम पाणी व कांजी यांतून एकाशीं द्यावें, तें अग्नि वृध्दि करितें; आणि कोष्ठवायूचा नाश करितें.

चिकित्सा.

पाचनीयैरसैर्युक्तैरन्यैर्वापाचयेन्मलान् ॥

विशेषतःपिबेत्क्षीरंनरःकोष्ठगतेनिले ॥

अर्थ–पचन करणाऱ्या रसाशीं कोणतेंही पाचक औषध देऊन मल पचन करावें; परंतु कोष्ठाश्रित वातविकार असतां; विशेषेंकरून दूध प्यावें.

आमाशयगतवातलक्षण.

ह्दत्पार्श्वोदरनाभीरुक्तृष्णोद्गारविषूचिकाः ॥

कासःकंठास्यशोषश्चश्वासश्चामाशयेनिले ॥

अर्थ–आमाशयगत वातविकार झाला असतां; ह्रदय, पार्श्वभाग व बेंबी यांमध्यें तिडका, ताहान, ढेंकर, रेंच, खोकला, गळा व तोंड यांला शोष आणि श्वास हे विकार होतात.

आमाशयलक्षण.

नाभिस्तनांतरंजंतोराहुरामाशयंबुधाः ॥

अर्थ–नाभि व स्तन यां मध्यें आमाशय आहे, असें पंडित सांगतात.

आमाशयगतवातचिकित्सा.

आमाशयस्थेत्वनिलेप्रशस्तंप्राग्भोजनंदीपनपाचनंच ॥

प्रच्छर्दनंतीक्ष्णविरेचनंचमुद्गायवाःशालियुताःपुराणाः ॥

अर्थ–आमाशयगत वायूवर भोजनाच्या पूर्वीं दीपन व पाचन द्यावें; आणि वांति व तीक्ष्ण रेचक द्यावें; व जुने मुग, यव व साळी हे पदार्थ त्याला द्यावे.

आमाशयगतवात.

आमाशयगतेवातेछर्दिःस्वापोयथाक्रमं ॥

देयःषट्चरणोयोगःसप्तरात्रमथांबुना ॥

अर्थ–आमाशयाश्रित वायु झाला असतां; वांति व निद्रा हे उपचार करावे; किंवा षट्चरणयोग सातदिवस पाण्याशीं द्यावा.

षट्चरणयोग.

चित्रकेंद्रयवापाठाकटुकातिविषाभया ॥
महाव्याधिप्रशमनोयोगःषट्चरणःस्मृतः ॥

अर्थ—चित्रक, इंद्रजव, पाहाडमूळ, कुटकी, अतिविष आणि हरीतकी हा षट्चरण योग महान्व्याधीचे शमन करितो

तीन काढे.

भूतीकपथ्याशठिपुष्कराणिबिल्वामृतादारुकनागराणि ॥
उग्राविषामागधिकाविडानिक्काथाख्रयःमामसमीरणघ्नाः ॥

अर्थ— ओंवा, हरीतकी, कचोरा व पुष्करमूळ यांचा; किंवा बेलफळ, गुळवेल, देवदार व सुंठ यांचा; अथवा वेखंड, अतिविष, पिंपळी व बिडलोण यांचा काढा द्यावा. हे तीनही काढे आमवातनाशक आहेत.

प्रातःपिबेदुष्णजलेनयत्नाच्छिन्नामरीचंत्त्वदयानिलघ्नं ॥
गुडेनवानागरदारुचूर्णंत्वहृतपीडापरिपीडितस्तु ॥

अर्थ—गुळवेल व मिरीं, यांचे चूर्ण प्रातःकाळीं ऊनपाण्याशीं घ्यावें, किंवा सुंठ, देवदार, यांचें चूर्ण गुळाशीं द्यावें; ह्मणजे हृदयवायुची पीडा नाश पावते.

पक्वाशयस्थवायु.

पक्वाशयस्थोंत्रकूजंशूलाटोपौकरोतिच ॥
मूत्रकृच्छ्रपुरीपत्वमानाहत्रिकवेदना ॥

अर्थ—पक्वाशयगत वायूचा कोप झाला असतां; आंतड्यांत कुरकुरशब्द, शूळ, पोटांत गुडगुडशब्द, मूत्रकृच्छ्र, मलमूत्रस्तंभ. पोट फुगणें, आणि तिड्यांत ठणका हे विकार करितो.

चिकित्सा.

वन्हेःसंवर्धनंकार्यकर्मोंदावर्तिकंतथा ॥
देयःस्नेहविरेकश्चपक्वाशयगतेनिले ॥

अर्थ—पक्वाशयगत वायु कुपित झाला असतां; अग्नि प्रदीप्त करून उदावर्तावरचा उपचार करावा; आणि स्निग्ध विरेचन द्यावें

वातेजठरगेदयात्क्षारचूर्णदिदीपनं ॥
शुंठीकुटजबीजाग्निचूर्णंकोष्णांबुकुक्षिगे ॥

अर्थ—उदरांतला वायु कुपित झाला असतां; क्षारचूर्णादि दीपन औषध द्यावें; व कुक्षिगतवायु कुपित झाल्यावर सुंठ, इंद्रजव व चित्रक यांचें चूर्ण ऊन पाण्याबरोबर घ्यावें.

पक्वाशयगतेवातेहितंस्नेहैर्विरेचनं ॥
वस्तयःशोधनीयाश्चप्राशाश्चलवणोत्तराः ॥

अर्थ—पक्वाशयगत वायु दुष्ट झाला असतां; स्निग्ध, विरेचन, शोधन करणारे बस्ति व लवण यांशीं युक्त प्राशनार्थ औषधें द्यावीं.

हृदयवात.

हृदयानिलनाशायगुडूचीमरिचान्वितां ॥
पिबेत्प्रातःप्रयत्नेनसुखतप्ताम्भसासह ॥

अर्थ—हृदयांतला वायु नाश पावण्याकरितां गुळवेल, मिरें, हीं ऊनपाण्यांत वाटून प्रातःकाळीं पाजावीं.

पिबेदुष्णांभसापिष्टंसाश्वगंधंविभीतकं ॥
गुडयुक्तंप्रयत्नेनहृदयानिलनाशनं ॥

अर्थ—आस्कंद, बेहेडा व गूळ, हें ऊनपाण्यांत वाटून प्यावें; ह्मणजे हृदयांतील वायु नाश पावतो.

देवदारुसमायुक्तंनागरंपरिपेषितं ॥
हृद्वातवेदनायुक्तःपीत्वासुखमवाप्नुयात् ॥

अर्थ—देवदार, सुंठ, यांचें चूर्ण ऊनपाण्याबरोबर प्यावें; ह्मणजे हृदयांतले वायूच्या वेदना दूर होऊन सुख पावेल.

सर्वांगवातलक्षण.

सर्वांगपवनेक्रुधेगात्रस्फुरणभंजनं ॥
वेदनाभिःपरीतास्यस्फुटंतीवास्यसंधयः ॥

अर्थ—सर्वांगाचा ठायीं वायु कुपित झाला असतां; गात्राचें स्फुरण होतें; व गात्रें मोडल्या सारिखीं होतात; आणि आंग वेदनायुक्त असून सधींत फूट लागते.

चिकित्सा.

सर्वांगगतमेकांगगतंवास्यसमीरणं ॥
तैलावगाहनंहंतितोयवेगमिवाचलः ॥

अर्थ—दुष्ट वायु सर्वांगात असो किंवा एकांगात असो, त्यावर आंगाला तेल लाऊन ऊन पाण्यानें स्नान करावें; ह्मणजे तो नाश पावतो, जसा पर्वत उदकवेगाला बंद करितो.

अवशिष्टवात.

प्रलपेभीरुतापेचप्रसुप्तौचित्त कृते ।

स्वेदनाशेबलक्षीण्येकौशिकःसघृतोहितः ॥

अर्थ–प्रलाप, भीरुताप, प्रसुप्ति, चित्तवैकृत, स्वेदनाश व बळक्षीणता, इतक्याचे ठायीं घृतयुक्त गुग्गुळ प्रशस्त आहे.

शब्दाज्ञतामयेचापिलेहःकल्याणकोहितः ॥ शीततारोमहर्षेचशि
रापूरणमेवच ॥ कटुतिक्तैर्जयेद्द्रव्यैःस्नेहस्वेदनमर्दनैः ॥

अर्थ–शब्दाची अज्ञता या रोगावर कल्याणलेह हितकारक आहे; आणि शीतता, रोमहर्ष, शिरापूरण यांवर कडु स्निग्ध व स्वेदन इत्यादि औषधें व मर्दन हे उपचार योग्य आहेत.

वाताप्रवृत्तिरुद्गारमंत्रकूजनमेवच ॥
निरूहवस्तिनाथांगकाठिन्यंस्नेहगाहनात् ॥

अर्थ–वारा नसरणें, ढेंकरा देणें व आंतडी वाजणें यांवर निरूहबस्ति द्यावा; आणि शरीराचा कठिणपणा, स्निग्ध पदार्थांनीं स्नान करून घालवावा.

कुरंटकादिकाढा.

सहचरामरदारुसनागरंक्वथितमंभसितैलविमिश्रितं ॥
पवनपीडितदेहगतिःपिबन्द्रुतविलंबितगोभवतीच्छया ॥

अर्थ–पिंवळा कोरांटा, देवदार व सुंठ यांचा काढा एरंडेल मिश्र करून प्यावा; म्हणजे ज्याचें शरीर वायुने जखडलें असेल तरी नीट होऊन तो शीघ्र व मंद जसा पाहिजे तसा चालेल.

महारास्नादि.

रास्नैरंडामृतोग्रासहचरनविकारामसेनाब्दभार्ङीदीप्यानंतायवानीवृ
किमुरकमिजिच्छृंगिशुंठीवलाभिः ॥ मूर्वातिक्तासमंगाद्विविषश
ठिवरापिप्पलीयावशूकैरक्तश्रीखंडकारग्वधकटुकफलैर्वत्सवृश्चीकयु
क्तैः॥ सर्वैरेतैर्दशांघ्रिप्रयुतसमलवैःसाधितोष्टावशेषःक्काथोरास्नादि
रादौमहदुपपदवान्कौशिकोक्तोनिहंति॥सर्वांगैकांगवातान्श्वसनक
सनत्हृत्स्वेदशैत्यातितंद्राशूलंतूनींप्रतूनींगलगदनिखिलांगव्यथाकंप
खल्लीः ॥ विश्वाचीश्लीपदामानिलनिखिलमहासूतिकारोगसुप्ति
जिव्हास्तंभापतानंस्फुटनविमथनःक्लीवताक्षेपकौब्जं ॥ शोभाटोपा
पतंत्रार्दितखुडनहनुगृध्रसीपादशूलंवायुंश्लेष्मोत्थरोगानपिगिरितन
यावल्लभेनोपदिष्टः ॥

अर्थ–रास्ना, एरंडमूळ, गुळवेल, वेखंड, पीतकोरांटा, चवक, कवचबीज, नागरमोथा, भारंगमूळ, ओंवा, किरमाणी ओंवा, पाहाडमूळ, देवदार, वावडिंग, कांकडशिंगी, सुंठ, चिकणामूळ, मोरवेल, कुटकी, मंजिष्ठ, काळें व पांढरें अतिविष, कचोरा, हरडा, वेहेडा, आवळकाठी, पिंपळी, जवखार, रक्तचंदन, बाहव्याचा मगज, कायफळ, कुटज, रक्त घेंटोळी व दशमूळें हीं सर्व समभाग घेऊन त्यांचा अष्टमांश काढा करावा. हा महारास्नादि काढा कौशिकानें सांगीतला. हा सर्वांगवात, एकांगवात, श्वास, कास, घाम, शैत्य, अतितंद्रा, शूल, तूनी, प्रतूनी, गलरोग, सर्वांगांतला ठणका, कंप, वात, खल्लीवात, विश्वाची, श्लीपद, आमवात, संपूर्ण गळंत रोग, सुप्तिवात, जिव्हास्तंभ, अपतान, ठणका, दुखणें, क्षीबवात, आक्षेपक, कुब्जवात, सूज, आटोप, अपतंत्र, अर्दित, खुडवात, हनुग्रह, गृध्रसी, पादशूल; आणि वातश्लेष्मव्याधि हीं नाश करितो, असें शिवानीं सांगीतलें आहे.

दुसरा प्रकार.

रास्नाद्विगुणभागास्यादेकभागास्तथापरे ॥ धन्वयासबलैरंडदेवदारुशठीवचा ॥ वालकोनागरंपथ्याचव्यमुस्तापुनर्नवा ॥ गुडूचीवृत्धदारुश्चशतपुष्पाचगोक्षुरः ॥ अश्वगंधाप्रतिविपाकृतमालःशतावरी ॥ कृष्णासहचरश्चैवधान्यकंवृहतीद्वयं ॥ एभिःकृतंपिवेत्काथंशुंठीचूर्णेनसंयुतं ॥ कृष्णाचूर्णेनवायोगराजगुग्गुलुनाथवा ॥ अजमोदादिनावापितैलेनैरंडजेनवा ॥ सर्वांगकंपेकुब्जत्वेपक्षाघातेववाहुके ॥ गृध्रस्यामामवातेचश्लीपदेचापतानके ॥ अंत्रवृद्धौतथाध्मानेजंघाजानुगदेर्दिते ॥ शुक्रामयेमेंढ्रवातेंवध्यायोन्यामयेपुच ॥ महारास्नादिराख्यातोब्रह्मणागर्भधारणे ॥

अर्थ– रास्ना २ भाग, १ धमासा, चिकणा, एरंडमूळ, देवदार, कचोरा, वेखंड, अडुळसा, सुंठ, हरीतकी, चवक, नागरमोथा, पुनर्नवा, गुळवेल, वृध्ददारु, शोप, गोखरु, अश्वगंध, अतिविष, ब्राह्मा, शतावरी, पिंपळी, कोरांटा, धने, रिंगणी व डोरली, हीं सर्व समभाग व रास्ना मात्र दोन भाग घालून अष्टमांश काढा उतरून आंत सुंठीचें चूर्ण, किंवा पिंपळीचें चूर्ण, अथवा योगराज गुग्गुल, अजमोदिक; किंवा एरंडतैल घालून घ्यावा; ह्मणजे सर्वांगकंप, कुब्जवात, पक्षाघात, अवबाहुक, गृध्रसी, आमवात, श्लीपद, अपतान, अंत्रवृद्धि, आध्मान, जंघावात, जानुवात, अर्दित, शुक्रदोष, मेंढ्रवात, वंध्येचे योनिरोग, इतक्यांवर हा महारास्नादिकाढा सांगीतला आहे. हा गर्भधारक आहे, असें ब्रह्मदेवानें सांगीतलें.

महाबलादि काढा.

महाबलामूलमहौषधाभ्यांक्वाथंपिबेन्मिश्रितपिप्पलीकं ॥
शीतंसकंपंपरिदाहयुक्तंविनाशयेत्द्वित्रिदिनप्रयुक्तः ॥

अर्थ– मोठयाचिकण्याचें मूळ व सुंठ यांचा काढा पिंपळीचें चूर्ण घालून घ्यावा; ह्मणजे शीतवात, कंपवात व दाह यांचा दोन तीन दिवसांत नाश करितो.

पंचमूलादियोग.

पंचमूलीकृतःक्वाथोदशमूलीकृतोथवा ॥
रूक्षस्वेदस्तथानस्यंमन्यास्तंभेप्रशस्यते ॥

अर्थ– पंचमुळांचा काढा, किंवा दशमुळांचा काढा, रूक्षस्वेद व नस्य हे मानेच्या स्तंभावर उपचार करावे.

वाजिगंधादि काढा.

वाजिगंधावलास्तिस्रोदशमूलीमहौषधं ॥
गृध्रनख्यौचरास्नाचगणोमारुतनाशनः ॥

अर्थ– आस्कंद, चिकणा, मोठा चिकणा, लघुचिकणा, दशमुळें, सुंठ, शेर, लघुबोर, रास्ना यांचा काढा वातनाशक आहे.

समीरदावानल.

भल्लातकानांशकलानिकृत्वात्रिकोलमानंपरिगृह्यवैद्यः ॥ चतुःपलंतोयसमन्वितोयंक्वाथोचतुर्थांशामितंप्रगृह्य ॥ सिताहविर्गोपयमिश्रितंचकोलंपलार्धपलमेकयुक्तं ॥क्रमेणपीतोखलुहंतिवातान्समीरदावानलनामधेयः॥

अर्थ– बिब्याचे तुकडे १॥ तोळा व पाणी ४ तोळें यांचा काढा चतुर्थांश शेष पाणी उरलें ह्मणजे काढून घ्यावा. त्यांत साकर ॥ तोळा, तूप २ तोळे, गाईचें दूध ४ तोळे घालून पुनः कढवून ताकाबरोबर प्यावा, तो सर्ववातनाशक आहे. ह्याला समीर दावानल असें ह्मणतात.

गुदस्थितवायुकार्य.

ग्रहोविण्मूत्रवातानांशूलाध्मानाश्मशर्कराः ॥
जंघोरुत्रिकहृत्पृष्ठरोगशोफोगुदेस्थिते ॥

अर्थ–गुदस्थानीं वायूचा कोप झाला असतां; मळ, मूत्र व अपानवायु यांचा प्रतिबंध, शूळ, पोट फुगणें, मुतखडा, शर्करा व मांड्या, पोटऱ्या, तिडें, पाठ यांत शूल आणि सूज हे रोग करितो.

चिकित्सा.

वातेगुदाश्रितेदुष्टेकर्मौदावर्तिकंहितं ॥

अर्थ–गुदाश्रित वात दुष्ट झाल्यास त्यावर, उदावर्तावरचे उपचार करावे.

चिकित्साक्रम.

दशमूलीकषायेणमातुलुंगरसेनवा ॥
पिबेदेरंडतैलंवाबस्तिकुक्षिगुदेश्रिते ॥

अर्थ–बस्ति, कुक्षि व गुद, या ठिकाणांचा वात कुपित झाल्यावर दशमुळांचे काढ्या बरोबर, अथवा महाळुंगाचे रसाबरोबर एरंड तेल प्यावें.

श्रोत्रादिगतलक्षण.

श्रोत्रादिष्विंद्रियवधंकुर्यात्क्रुद्धःसमीरणः ॥

अर्थ–कर्णादि इंद्रियांचे ठायीं क्रुद्ध झालेला वायु इंद्रियांचा नाश करील.

चिकित्सा.

श्रोत्रादिष्वनिलेदुष्टेकार्योवातहरःक्रमः ॥
स्नेहाभ्यंगोपनाहाश्चमर्दनालेपनानिच ॥

अर्थ–कर्णादि इंद्रियांचे ठायीं दुष्ट झालेल्या वायूवर वातनाशक उपचार करावे. ते स्नेहपान, अभ्यंग, उपनाह, मर्दन व लेप, इत्यादि जाणावे.

जृंभा.

पीत्वैकंश्वासमलिनःपुनस्त्यजतिवेगवान् ॥
आलस्यनिद्रायुक्तश्चसजृंभइतिकथ्यते ॥

अर्थ–एक श्वास पिऊन शांत न जाहला तों दुसरा येऊन कोंडलासा होऊन जोराने टाकितो; व आलस्य निद्रा यांणीं युक्त असतों, त्याला जृंभ असें ह्मणतात.

चिकित्सा.

शुंठीपिप्पल्यूपणंदीप्यकश्चसिंधूद्भूतंचेतिसर्वंपृथग्वा ॥
तद्रूपंवासूक्ष्मचूर्णीकृतंवाजृंभाभंगस्तत्कृतस्याचदैव ॥

अर्थ–सुंठ, पिंपळी, मिरें, ओंवा, सैंधव हीं सर्व किंवा एका एकाचें चूर्ण करून, किंवा नुस्तींच सेवन केलीं तर तत्काळ जृंभेच्या वेगाचा नाश होईल.

जृंभावेगेसमुत्पन्नेशोभनेशयनेनरं ॥
स्वापयेत्तेननियमाज्जृंभावेगःप्रशाम्यति ॥

अर्थ—जृंभावेग उत्पन्न झाल्यावर चांगली शय्या करून निजावें; ह्मणजे नियमेंकरून जृंभावेग शांत होतो.

जृंभाचिकित्सा.

जृंभावेगःक्षयंयातिकटुतैलेनमर्दनात् ॥
भोजनात्स्वादुभोज्यानांतथातांबूलभक्षणात् ॥

अर्थ—जांभईचा वेग शिरसाचें तेल चोळल्यानें, गोडपदार्थांच्या भोजनानें, किंवा तांबूल भक्षणानें नाश पावतो.

प्रलापक.

स्वहेतुकुपिताद्वातादसंबद्धंनिरर्थकं ॥
वचनंयन्नरोब्रूतेसप्रलापःप्रकीर्तितः ॥

अर्थ—आपल्या कारणानें कुपित झालेल्या वायुपासून ज्यांत संबंध नाहीं व अर्थ नाहीं असें भाषण बोलतो; त्याला प्रलापक ह्मणतात.

चिकित्सा.

सतगरवरतिक्तारेवतांभोदतिक्तानलदतुरगगंधाभारतीहारहूराः ॥
मलयजदशमूलाशंखपुष्प्यःसुपक्वाःप्रलपनमतिहन्युःपानतोनातिदूरात् ॥

अर्थ—तगर, पित्तपापडा, वाहावा, नागरमोथा, कटुकी, वाळा, आस्कंद, ब्राह्मी, काळीं द्राक्षें, चंदन, दशमुळें व शंखाहुली यांचा काढा घ्यावा, तो लवकर प्रलापकाचा नाश करील.

रसाज्ञाननिदान.

भुंजानस्यनरस्यान्नंमधुरप्रभृतीन्रसान् ॥
रसनायन्नजानातिरसाज्ञानंतदुच्यते ॥

अर्थ -अन्न व मधुर इत्यादि रस, खाणाऱ्या मनुष्याची जिव्हा मधुर किंवा आंबट इत्यादि जाणत नाहीं, त्याला रसाज्ञान ह्मणतात.

चिकित्सा.

घर्षेज्जिव्हांजडांसिंधुत्र्यूषणैःसाम्लवेतसैः ॥ आम्लवेतसकाभावेचुक्रं दातव्यमीरितं ॥ किराततिक्तकःकट्वीकुटकस्यफलंत्वचा ॥ ब्राह्मीफलंचपालाशंराजिकांकृष्णजीरकं ॥ पिप्पलीपिप्पलीमूलंचित्रंनागरमूषणं ॥ एषांकल्कैर्मुहुर्घर्षेज्जिव्हिकामार्द्रिकारसैः ॥ तेनसम्यग्विजानातिरसनासकलान्रसान् ॥

अर्थ—जिव्हा जड झालेली सैंधव, त्रिकटु व फालता यांच्या चूर्णानें घांसावी. आम्लवेतस न मिळेतर आमसोल घ्यावें; अथवा काडेकिराईत, कटुकी, इंद्रजव, कुडयाची साल, ब्राह्मी, पऋसपापडी, मोहोऱ्या, शहाजिरें, पिंपळी, पिंपळमूळ, चित्रक, सुंठ व मिरें यांचें चूर्णानें किंवा त्यांचा आल्याचे रसाशीं कल्क करून त्यानें वारंवार जीभ घांसावी, तेणेंकरून जिव्हा सर्व रस जाणते.

किरातादिकल्क.

कल्कःकिराततिक्तादिर्जिव्हायाःशून्यतांहरेत् ॥

अर्थ—किराततिक्तादि कल्क वर सांगितला आहे; तो जिव्हेची शून्यता हरण करील.

त्वक्शून्यतानिदान.

स्पृश्यमानात्वचायातुशीतोष्णंमृदुकर्कशं ॥
नजानातिवुधैस्त्वक्साशून्येतिपरिकीर्त्यते ॥

अर्थ—त्वचेला स्पर्श केला असतां; शीत, उष्ण, मृदु व कठीण हे जाणत नाहीं; त्याला त्वक्शून्यता ह्मणतात.

चिकित्सा.

सुप्तवातेत्वसृङ्मोक्षंकारयेद्बहुशोभिषक् ॥
दिह्याच्चलवणागारधूमैस्तैलसमन्वितैः ॥

अर्थ—सुप्तवातावर वारंवार रक्तमोक्ष करावा; आणि सैंधव, घेरोसा व तेल एकत्र करून त्याचा लेप करावा.

रसगतवायूचें लक्षण.

त्वग्रूक्षास्फुटितासुप्ताकृशाकृष्णाचतुद्यते ॥
आतन्यतेसरागाचमर्मरुक्त्वग्गतेनिले ॥

अर्थ—त्वचेमध्यें वात कोपला असतां; त्वचा रूक्ष, फुटिल, मेहेरलेली, पातळ, काळी व तींत टोंचल्या प्रमाणें पीडा, लाल होऊन ओढल्या सारखी, मर्मस्थानीं पीडा इत्यादि उपद्रव करितो.

रक्तगतवायूचें लक्षण.

रुजस्तीव्राःससंतापविवर्ण्यकृशताऽरुचिः ॥
गात्रेचारूंषिभुक्तस्यस्तंभश्चासृग्गतेनिले ॥

अर्थ—रक्तगतवातकोप झाला असतां; अत्यंत पीडा, संताप, विवर्णता, कृशपणा, अरुचि, आंगावर व्रण व भोजनोत्तर आंगाचा स्तंभ हे विकार करितो.

मांसगत वायु.

गुर्वंगंतुद्यतेस्तब्धंदंडमुष्टिहतंयथा ॥

सरुक्स्तिमितमत्यर्थंवातेमांससमाश्रिते ॥

अर्थ–वायु मांसाश्रित झाला असतां; आंग जड होतें, दुखतें, ताठतें, दांड्यानें किंवा मुष्टीने चेंचल्या सारिखें दुखतें; व अत्यंत निश्चळ होतें.

मेदाश्रितवातलक्षण.

तथामेदाश्रितःकुर्याद्ग्रंथीन्मंदरुजोव्रणान् ॥

अर्थ–मेदाश्रित वायु झाला असतां; अंगावर गांठी किंवा थोडे दुखणारे व्रण यानां उत्पन्न करितो.

अस्थिवातक्षण.

भेदोस्थिपर्वणांसंधिशूलंमांसबलक्षयः ॥

अस्वप्नःसंततारुक्चवातेदुष्टेस्थिसंश्रिते ॥

अर्थ–वायु दुष्ट होऊन आस्यमध्यें राहिला असतां; हाडें व पेरें, यांचा ठायीं ठणका, आंगाच्या संधीचा ठायीं शूल, मांस व बल यांचा क्षय, निद्रानाश, आणि अंगांत निरंतर ठणका हे विकार होतात.

मज्जागतवातलक्षण.

वातेमज्जागतेपीडानकदाचित्प्रशाम्यति ॥

अर्थ–दुष्ट वायू मज्जाश्रित झाला असतां; अंगांतील ठणका केव्हांही शांत होत नाहीं.

शुक्रगतवातलक्षण.

क्षिप्रंमुंचतिवध्नातिशुक्रंगर्भमथापिवा ॥

विकृतिंजनयेच्चापिशुक्रस्थःकुपितोऽनिलः ॥

अर्थ–शुक्रगत वायु कुपित झाला असतां; गर्भाला किंवा शुक्राला बांधतो; किंवा विवर्णादि करितो; किंवा सोडतो; अथवा गर्भ आणि शुक्र यांला विकृति उत्पन्न करितो.

सप्तधातुगतवातचिकित्सा.

वायौत्वगाश्रितेस्नेहोभ्यंगःस्वेदश्चकारयेत् ॥

रक्तस्थेशीतलाल्लेपान्विरेकंरक्तमोक्षणं ॥

अर्थ–त्वगगत वायु दुष्ट झाला असतां; स्नेहपानें, अभ्यंग व घाम काढणें हे उपचार करावे; रक्तगत झाला असतां; शीतल लेप, विरेचन व रक्तमोक्ष हे उपचार करावे.

मांसमेदोगत.

मांसमेदोगतेवातेसविरेकंनिरूहणं ॥

अर्थ–मांसगत व मेदोगत वायु कुपित झाला असतां; विरेक, निरुहबस्ति हे उपचार करावे.

अस्थिमज्जागत.

अस्थिमज्जागतेस्नेहंबहिरंतश्चयोजयेत् ॥

अर्थ—अस्थिगत व मज्जागत वायु कुपित झाला असतां; स्नेहपान व स्नेहानें मर्दन हे उपचार करावे.

केतकादि तैल.

केतकनागवलातिवलानांयद्बहुलेनरसेनविपक्कं ॥

तैलमनल्पतुषोदकसित्थंमारुतमस्थिगतंविनिहंति ॥

अर्थ—केवडा, चिकणा व मोठा चिकणा यांचा पुष्कळ रस आणि तुसाचें पुष्कळ पाणी घेऊन त्यांत सिद्ध केलेलें तेल, अस्थिगत वायुचा नाश करील.

शुक्रगत.

हर्षोन्निपानंशुक्रस्थेबलशुक्रकरंहितं ॥

अर्थ—शुक्रगत वायु कोपला असतां; हर्षोत्पादन आणि बल व धातु यांना वाढविणारें असें अन्न व पान द्यावें, तें हितकारक आहे.

शिरागतवायु.

कुर्याच्छिरागतःशूलंशिराकुंचनपूरणं ॥

सबाह्याभ्यंतरायामंखल्लींकुब्जत्वमेवच ॥

अर्थ—शिरागतवायूचा कोप झाला असतां; शूल, शिरा आंखडणें, शिरा स्थूल होणें, बाह्यायाम, अंतरायाम, खल्लीवात; किंवा कुब्जवात, इत्यादि विकार करितो.

चिकित्सा.

स्नेहाभ्यंगोपनाहांश्चमर्दनालेपनानिच ॥

वातेशिरागतेकुर्यात्तथाचासृग्विमोक्षणं ॥

अर्थ—शिरागत वायूवर स्नेहपान, अंगाला तेलमर्दन, पेंड, मर्दन, लेप आणि रक्त काढणें, हे उपचार करावे.

स्नायुगतवातलक्षण.

शूलमाक्षेपकःकंपःस्तंभःस्नाय्वनिलेभवेत् ॥

अर्थ—स्नायुगत वातामध्यें शूल, वातरोग, कंप व स्तंभ हीं लक्षणें होतात.

सर्वांगैकांगरोगांश्चकुर्यात्स्नायुगतोनिलः ॥

अर्थ—स्नायुगतवात कुपित झाला असतां;सर्वांगरोग किंवा एकांग रोग यानां उत्पन्न करितो.

चिकित्सा.

स्वेदोपनाहाग्निकर्मबंधनोन्मर्दनानिच ॥
कुर्यात्स्नायुगतेवातेकारयेत्कुशलोभिषक् ॥

अर्थ—स्नायुगतवातावर घाम काढणें, पेंड बांधणें, डाग देणें, बांधणें व मर्दन करणें हे उपचार कुशल वैद्यानीं करावे.

संधिगतवातनिदान.

हंतिसंधिगतःसंधीन्शूलशोथौकरोतिच ॥

अर्थ—संधिगतवायूचा कोप झाला असतां; संधीचा नाश, शूल व सूज हे विकार करितो.

सामान्य चिकित्सा.

कुर्यात्संधिगतेवातेदाहस्वेदोपनाहनं ॥

अर्थ—संधिगतवायूवर चोंचे, घामकाढणें व पेंड बांधणें इत्यादि उपचार करावे.

इंद्रवारुणी चूर्ण.

इंद्रवारुणिकामूलंमागधीगुडसंयुतं ॥
भक्षयेत्कर्षमात्रंतत्संधिवातंव्यपोहति ॥

अर्थ—कडुवृंदावनाचें मूळ, पिंपळी, आणि गूळ हीं एकत्र करून तें एक तोळाभर भक्षण करावें; ह्मणजे संधिवात नाश पावतो.

पित्तकफाश्रित प्राण.

प्राणेपित्तावृतेछर्दिर्दाहश्चैवोपजायते ॥
दौर्बल्यंसदनंतंद्रावैरस्यंकफकावृते ॥

अर्थ—प्राणवायु पित्तयुक्त दुष्ट झाला; असतां; वांति, आणि दाह उत्पन्न करितो; व तोच कफयुक्त कोपला असतां; दुर्बलपणा, आंग गळणें, झापड व तोंड बेचव होणें हे विकार करितो.

पित्तकफाश्रित उदान.

उदानेपित्तयुक्तेतुदाहोमूर्छाभ्रमःक्लमः ॥
अस्वेदहर्षौमंदाग्निःशीतताचकफावृते ॥

अर्थ—पित्तयुक्त उदानवायु दुष्ट झाला असतां; दाह, मूर्छा, भ्रम व अनायास श्रम, हे विकार करितो; व तोच उदानवायु कफयुक्त दुष्ट झाला असतां; घाम येत नाहीं, रोमांच उभारतात, अग्निमंद होतो; आणि थंडी वाजते.

पित्तकफाश्रित समान.

स्वेददाहौष्ण्यमूर्छाःस्युःसमानेपित्तसंयुते ॥

कफेनसंगोविण्मूत्रेगात्रहर्षश्चजायते ॥

अर्थ–पित्तयुक्त समानवायु कोपला; असतां घाम, दाह, उष्णता व मूर्छा हे विकार करितो, तोच कफयुक्त कोपला असतां; मळमूत्राचा अवरोध; आणि रोमांच उभारणे हे विकार करितो.

पित्तकफाश्रित अपान.

अपानेपित्तयुक्तेतुदाहौष्ण्यंरक्तमूत्रता ॥

अधःकायेगुरुत्वंचशीतताचकफावृते ॥

अर्थ–पित्तयुक्त अपानवात कोपला असतां; दाह,उष्णता,आणि लघ्वी रक्तासारखी हे विकार करितो, तोच कफयुक्त कोपला असतां; कमरेखालीं शरीर जड व थंडी हे विकार करितो.

पित्तकफाश्रित व्यान.

व्यानेपित्तावृतेदाहोगात्रविक्षेपणंक्लमः ॥

स्तंभनोदंडकश्चापिशोथशूलौकफावृते ॥

अर्थ–व्यानवायु पित्ताश्रित झाला असतां; दाह, आंग गळणें व श्रम हीं लक्षणें होतात; व कफाश्रित जाहाला तर; आंग ताठणे, सूज व शूल हीं लक्षणें होतात.

चिकित्सा.

वातेसपित्तेकुर्वीतवातपित्तहरींक्रियां ॥

सकफेतत्रकुर्वीतवातश्लेष्महरींक्रियां ॥

अर्थ–पित्तयुक्त वायूचा कोप झाला असतां; वातपित्तहारक क्रिया करावी, तोच वायु कफाश्रित दुष्ट झाला असतां; वातश्लेष्मनाशक चिकित्सा करावी.

आक्षेपकाचे सामान्यलक्षण.

यदातुधमनीःसर्वाःकुपितोभ्येतिमारुतः ॥ तदाक्षिपत्याशु

मुहुर्मुहुर्देहंमुहुश्चरः ॥ मुहुर्मुहुस्तदाक्षेपादाक्षेपकइतिस्मृतः ॥

अर्थ–जाकाळीं सर्व धमनींमध्यें वायूचा कोप होतो, त्याकाळीं वारंवार, होणाऱ्या वायूच्या वेगाने हत्तीवर बसल्या प्रमाणे देहाला, व सर्व गात्रांला, चाळवितो; आणि वारंवार शरीर उचलून टाकिल्या प्रमाणे करितो, त्याला आक्षेपक ह्मणतात.

आक्षेपकाचे चार भेद.

पित्तश्लेष्माचितोवायुर्वायुरेवचकेवलः ॥

कुर्यादाक्षेपकंचान्यश्चतुर्थमभिघातजः ॥

अर्थ–पित्तवात, श्लेष्मवात व केवळवात यांपासून तीन आणि चवथा अभिघातापासून असे चार प्रकारचे आक्षेप जाणावे.

केवलवातजाक्षेप.

पाणिपादशिरःपृष्ठश्रोणीस्तभ्नातिमारुतः ॥

दंडवत्स्तब्धगात्रस्यदंडकःसोनुपक्रमः ॥

अर्थ–हात, पाय, मस्तक, पाठ, मान, यानां वायु स्तब्ध करितो; व दंडासारिखा आंगाला ताठवितो, तो दंडक हा चिकित्सा करण्यास योग्य नाहीं.

सामान्यचिकित्सा.

आक्षेपकेशिरांविध्येत्कुर्याद्वातहरींक्रियां ॥

तीक्ष्णैःप्रधमनैर्नस्यैस्तथासंज्ञांसविंदति ॥

अर्थ–आक्षेपक वायूवर शिरावेध आणि वातहारक व तीक्ष्ण अशीं औषधें नाकांत फुंकणें व त्याचें नस्य देणें इत्यादि उपचार करावे.

आक्षेपकचिकित्सा.

वलामूलकषायस्यदशमूलीशतस्यच ॥ यवकोलकुलित्थानांक्काथस्यपयसस्तथा ॥ अष्टावष्टौस्मृताभागास्तैलादेकस्तदेकतः ॥ पचेदावाप्यमधुरंगणंसैंधवसंयुतं ॥ तथागुरुंसर्जरसंसरलंदेवदारुच ॥ मंजिष्ठांपद्मकंकुष्ठमेलांकालांचसारिवां ॥ मांसींशैलेयकंपत्रंतगरंसारिवांवचां ॥ शतावरीमश्वगंधांशतपुष्पांपुनर्नवां ॥ तत्साधुसिद्धंसौवर्णेराजतेमृन्मयेपिवा ॥ प्रक्षिप्यकलशेसम्यक्स्वनुगुप्तंनिधापयेत् ॥ एतन्महावलतैलंप्रयुक्तमविलंवितं ॥ सर्वानाक्षेपकादींस्तुवातव्याधीन्व्यपोहति ॥ हिक्कांश्वासमधीमंथंगुल्मंकासंसुदुस्तरं ॥ षण्मासादुपयुक्तंतदंत्रवृद्धिंचनाशयेत् ॥ यथावलमलंमात्रांसूतिकायैप्रदापयेत् ॥ याचगर्भार्थिनीनारीक्षीणशुक्रश्चयःपुमान् ॥ वातक्षीणेमर्महतेमथितेभिहतेतथा ॥ भग्नेश्रमाभिपन्नेचसर्वथैतत्प्रयुज्यते ॥ एतद्धिराज्ञाकर्तव्यंकर्तव्यंराजपूजितैः ॥ सुखिभिःसकुमारैश्चधनिभिर्मानवैःसदा ॥

अर्थ–चिकण्याच्या मुळांचा काढा, दशमुळांचा काढा, यव, बोरें व कुळीथ, यांचे काढे; आणि दूध, हीं आठ आठ भाग, तेल १ भाग, मधुरगण, सैंधव, अगरु, राळ, सुरु, देवदार, मंजिष्ठा, पद्मकाष्ट, कोष्टकोळिंजन, इलाची, नागवला, उपळसरी, जटामांसी,

शिलाजित, तमालपत्र, तगर, लघुउपळसरी, वेखंड, शतावरी, अश्वगंध, शोप व पुनर्नवा हीं एकेक तोळा घेऊन त्यांचा काढा करून घालावा; आणि तेल पचन करून सिध झाले ह्मणजे सुवर्णाच्या, रुप्याच्या किंवा मातीच्या भांड्यांत ठेवावें. हें महाबलातेल घेतलें ह्मणजे जलद संपूर्ण आक्षेपक वायु व वातव्याधि यांचा नाश करितें; व उचकी, श्वास, अधिमंथ, गुल्म व खोकला यांचा नाश करितें; व साहामहिने लाविलें असतां, अंडवृद्धीचा नाश करितें; आणि बाळंतिणीला बळ व काळ पाहून द्यावें; व जीला गर्भाची इच्छा असेल व क्षीणधातु पुरुषाला, किंवा वायूनें क्षीण झालेल्याला मर्माचा ठाईं ताडण झालेल्याला, मोडलेल्याला, व श्रमलेल्याला, द्यावें. हें तेल राजानीं किंवा राजमान्यपुरुषानीं व सुखी, सुकुमार व धनिक मनुष्यानीं करून घ्यावें.

आक्षेपकाचा भेद अपतंत्रक.

क्रुद्धःस्वैःकोपनैर्वायुःस्थानादूर्ध्वंप्रवर्तते ॥ पीडयन्हृदयंगत्वाशिरःशंखौचपीडयेत् ॥ धनुर्वन्नामयेत्गात्राण्याक्षिपेन्मोहयेत्तथा ॥ सकृच्छ्रादुच्छ्वसेच्चापिस्तब्धाक्षोथनिमीलकः॥ कपातइवकूजेच्चनिःसंज्ञःसोपतंत्रकः॥

अर्थ—आपआपल्या कोप होणाऱ्या कारणानीं कुपित वायु स्थानापासून उर्ध्वगत होतो; आणि हृदयांत जाऊन पीडा करून मस्तक व आंख यांत शूल उत्पन्न करितो, शरीराला धनुष्या सारिखा वांकवून गात्रें कांपवितो, मोह करितो, कष्टानें श्वासोश्वास सोडितो; व डोळे ताठतात; किंवा मिटून राहतात; आणि कपोतासारिखा कुंथतो; व निःसंज्ञ पाडतो, त्याला अपतंत्रक ह्मणावा.

चिकित्सा.

अथापतंत्रकेनार्तमातुरंनापतर्पयेत्॥ निरूहवस्तिवमनंसेवयेन्नकदाचन॥ श्वसनाःकफवाताभ्यांरुद्धास्तस्यविमोक्षयेत् ॥ तीक्ष्णैःप्रधमनैःसंज्ञांतासुमुक्तासुविंदति ॥

अर्थ—अपतंत्रकानें पीडित झालेल्या मनुष्यास रेचन, निरूहवस्ति, वमन हें कधीहीं देऊं नये; कफवायुनें कोंडलेल्या श्वासवाहि मार्गाला तीक्ष्णनस्यानीं मोकळा करावा, तो मोकळा झाल्यावर शुद्धीवर येतो.

हरीतक्यादिलेह.

हरीतकीवचारास्नासैंधवंसाम्लवेतसं ॥ घृतमार्द्रकसंयुक्तमपतंत्रकनाशनं ॥ अम्लवेतसकाभावेचुक्रंदातव्यमीरितं ॥

अर्थ—हरीतकी, वेखंड, रास्ना, सैंधव, आम्लवेतस, तूप व आलें यांचा लेह अपतंत्रकाचा नाशक आहे, आम्लवेतस नमिळेतर आमसोल घ्यावें.

मरीचादिचूर्ण.

मरिचंशिग्रुबीजानिविडंगंचफणिज्जकं ॥
एतानिसूक्ष्मचूर्णानिदद्याच्छीर्षविरेचनं ॥

अर्थ–मिरीं, शेवग्याचें बीं, वावडिंग व फांगळा यांचें चूर्ण मस्तकरेचनार्थ द्यावें.

दंडापतानक.

कफान्वितोयदावायुर्धमनीष्वेवतिष्ठति ॥
सदंडवत्स्तंभयतिकृच्छ्रोदंडापतानकः ॥

अर्थ–ज्याकाळीं वायू कफयुक्त होउन धमनींत राहतो; आणि दंडाप्रमाणें अंगाला स्तंभन करितो, तो दंडापतानक, हा कष्टसाध्य आहे.

अपतानक.

दृष्टिंसंस्तभ्यसंज्ञांचहत्वाकंठेनकूजति ॥ त्त्द्दिमुक्तेनरःस्वास्थ्यंयाति मोहंवृतेपुनः ॥ वायुनादारुणंप्राहुरेकेतमपतानकं ॥

अर्थ–डोळे ताठतात, संज्ञानाश होतो, पारव्यासारिखा घुमतो, वायूचा वेग कमी झाला ह्मणजे रोगी स्वस्थ होतो, पुनः वायूचा वेग चढला ह्मणजे रोगी, मोह पावतो. या रोगाला ही अपतानवायु असें कोणी ह्मणतात.

असाध्यत्व सांगतो.

गर्भपातनिमित्तश्चशोणितातिस्रवाच्चयः ॥
अभिघातनिमित्तश्चनसिध्यत्यपतानकः ॥

अर्थ–गर्भपातानें, अतिरक्त गेल्यानें, अभिघातनिमित्तक असे झालेले तीन अपतानकवायू बरे होत नाहींत.

चिकित्सा.

अथापतानकेनार्तमस्रस्ताक्षमवेपनं ॥
अखट्वापातिनंचैवत्वरयासमुपाचरेत् ॥

अर्थ–जो रोगी अपतानवायूनें व्याप्त व ज्याचे डोळे निचळ, कंपरहित, केवळ खाटल्यावर नपडणारा अशाला त्वरेनें उपचार करावे.

अपतानकिनेशस्तंदशमूलीशृतंजलं ॥
पिप्पलीचूर्णसंयुक्तंजीर्णेमांसरसौदनं ॥

अर्थ–अपतान रोगावर दशमूलाचा काढा पिंपळीचें चूर्ण घालून द्यावा, जिरल्यावर मांसरस द्यावा.

चिकित्साप्रक्रिया.

तैलेनमर्दनंस्वेदस्तथातीक्ष्णेननावनं ॥
स्रोतोविशोधनंपश्चात्सर्पिःपानंहितंस्मृतं ॥

अर्थ–अपतानरोग्याला तेलाने मर्दन करावें, स्वेद काढावा, तीक्ष्ण औषधानीं नस्य द्यावें, शिरा काढाव्या; नंतर घृतपान करवावें.

हंत्यभुक्तवतापीतमम्लंदध्यपतानकं ॥
मरीचेनसमायुक्तंस्नेहवस्तिरथापिच ॥

अर्थ–जेवणाच्या पूर्वी आंबट दहीं मिरपूड घालून प्राशन करावें; किंवा स्नेहबस्ति करावा; ह्मणजे अपतान नाश पावतो.

धनुस्तंभलक्षण.

धनुस्तुल्योनमेद्यस्तुसधनुस्तंभसंज्ञितः॥ विवर्णवत्धवदनःस्रस्तांगो नष्टचेतनः ॥ प्रस्विद्यंश्चधनुस्तंभीदशरात्रंनजीवति ॥

अर्थ–धनुष्याप्रमाणे जो वांकतो त्याला धनुस्तंभ असें ह्मणतात; आणि त्या मध्यें वर्ण बदलतो, दांतखिळी बसते, गात्रें शिथिल होतात, बेशुद्ध पडतो व खेद पावतो; हा धनुस्तंभरोगी दाहा दिवस वाचत नाहीं; व यांत अंतरायाम बाह्यायाम यांचीं लक्षणें नसतात, हा यांत व त्यांत भेद आहे.

दुसरा प्रकार.

कंठावरोधोधनुराकृतिःस्यात्धृदिव्यथादंतनिबंधनंच ॥
मुखस्यशोपःशिशिरस्यकांक्षायस्मिन्धनुर्वायुरुदाहृतःसः ॥

अर्थ–गळ्याचा अवरोध, धनुष्यासारिखें वांकिवणें, हृदयांत शूळ, दांतखिळी बसणे, मुखशोष व थंडीची इच्छा हीं ज्यामध्यें लक्षणें होतात, त्याला धनुर्वात ह्मणतात.

कुब्जलक्षण.

हृदयंयदिवापृष्ठमुन्नतंक्रमशःसरुक् ॥
क्रुद्धोवायुर्यदाकुर्यात्तदातंकुब्जमादिशेत् ॥

अर्थ–कुपित झालेला वायु जेव्हां हृदय, किंवा पाठ, यांला वेदनासहित उंच करतो, तेव्हां त्याला कुब्ज असें ह्मणतात.

वातघ्नैर्दशमूल्याद्यैनवंकुब्जमुपाचरेत् ॥
स्नेहैर्मांसरसैश्चापिप्रवृद्धंतंविवर्जयेत् ॥

अर्थ—वातनाशक औषधें, दशमुळांचा काढा, स्नेहपान व मांस रस इत्यादि उपचार करावे; परंतु तो अत्यंत वाढलेला असला तर करूं नये.

अंतरायामलक्षण.

अंगुलीगुल्फजठरहृद्वक्षोगलसंश्रितः ॥ स्नायुप्रतानमनिलोयदाक्षिपतिवेगवान् ॥ विष्टब्धाक्षस्तब्धहनुर्भग्नपार्श्वःकफंवमन् ॥ अभ्यंतरंधनुरिवयदानमतिमानवः ॥ तदासोभ्यंतरायामंकुरुतेमारुतोबली ॥

अर्थ—कोपलेला वायु बोटांच्या अंगळ्या, गुल्फ, पोट, हृदय, वक्षस्थळ, आणि गळा यांच्या आश्रयेंकरून सर्वस्नायुजालाला खेचतो; त्याकाळीं डोळे व हनवटी हीं स्तब्ध होतात; व पार्श्वभाग मोडतो, कफाची वांति होते; आणि आंतल्या बाजूस धनुष्यासारिखा देहाला नमवितो. त्याकाळीं त्याला अंतरायाम ह्मणतात.

बाह्यायामलक्षण.

महाहेतुर्बलीवायुःशिराःसस्नायुकंडराः ॥ मन्यापृष्ठाश्रिताबाह्याःसंशोष्यानामयेद्बहिः ॥ यत्रतंबहिरायामंप्रवदंतिभिषग्वराः ॥ तमसाध्यंबुधाःप्राहुर्वक्षःकट्यूरुभंजनं ॥

अर्थ—महान् हेतूनीं कुपित वायु मान व पाठ यांच्या बाहेरील स्नायु व कंडरा यांना शोषून मागें नमवितो; ह्मणूनें वैद्य ह्या वायूला बहिरायाम ह्मणतात, हा ऊर, कंबर व मांड्या मोडितो. हा असाध्य होय.

सामान्य.

बाह्यायामेंतरायामेविधेयार्दितवत्क्रिया ॥

अर्थ—बाह्यायाम व अंतरायाम वायूवर, अर्दितवायूवर सांगीतलेली क्रिया करावी.

दुसरा प्रकार.

बाह्यायामांतरायामपार्श्वशूलकटिग्रहान् ॥
खल्लीदंडापतानौचस्नेहस्वेदपुरैर्जयेत् ॥

अर्थ—बाह्यायाम, अंतरायाम, पार्श्वशूल, कटिशूल, खल्लीवात, आणि दंडापतानक हे स्नेहन व घाम या उपायांनीं जिंकावे.

चिकित्सा.

बाह्यायामेंतरायामेधनुस्तंभेचकुब्जके ॥ योज्यंप्रसारिणीतैलंतेनतेषांशमोभवेत् ॥ वातव्याधिपुसामान्यायाःक्रियाःकथिताःपुरा ॥ कर्तव्याएवताःसर्वास्तैलमेतद्विशेषतः ॥

अर्थ—बाह्यायाम, अंतरायाम, धनुस्तंभ व कुब्जक यांचा ठाईं चांदवेलिच्या काढ्यानें सिद्ध केलेलें तेल योजावें, तेणेंकरून त्याची शांति होईल. वातव्याधीवर सामान्य उपचार सांगीतले आहेत ते करावे; परंतु हें तेल विशेषेकरून प्रशस्त आहे.

सर्जतैल.

धनुर्वायुःशमंयातिसर्जतैलस्यमर्दनात् ॥
दशमूलीकषायोवापानेनस्येचशस्यते ॥

अर्थ—धनुर्वाताला सर्जतैलाचें मर्दन करावें; किंवा दशमुळांचा काढा प्राशनार्थ द्यावा; अथवा त्याचेंच नस्य द्यावें; ह्मणजे शमन पावतो.

एरंडादिकाढा.

एरंडबिल्वंबृहतीद्वयंचसौवर्चलंव्योपविरामठंच ॥
समातुलुंगीलवणोत्तमंचक्वाथंधनुर्वातहरंप्रशस्तं ॥

अर्थ—एरंडमूळ, बेलमूळ, रिंगणी, डोर्ली, पादेलोण, मिरीं, सुंठ, पिंपळी, हिंग, महाळुंगाचें मूळ व सैंधव यांचा काढा धनुर्वातनाशनाविषयीं प्रशस्त आहे.

पक्षवध.

गृहीत्वार्धंतनोर्वायुःशिराःस्नायूर्विशोष्यच ॥ पक्षमन्यतरंहंतिसंधिबंधान्विमोक्षयन् ॥ कृत्स्नोर्धकायस्तस्यस्यादकर्मण्योविचेतनः ॥ एकांगरोगंतंकेचिदन्येपक्षवधंविदुः ॥

अर्थ—जो वायु देहाचा अर्धाभाग ग्रहण करून शिरा व स्नायु यांच्या जाळाला शोषून व संधींच्या बंधनाला शिथिल करून कोणचाही एका अंगाचा नाश करितो. त्याणे मनुष्याचा अर्धा देह ह्मणजे नृसिंहासारिखा किंवा अर्धनारीश्वराप्रमाणें एक अंग चेतना व कर्म यां विरहित करतो; त्याला कोणी एकांगरोग किंवा कोणी पक्षवध असें ह्मणतात.

सर्वांगरोगलक्षण.

सर्वांगरोगंतंकेचित्सर्वकायस्थितेनिले ॥

अर्थ—संपूर्ण अंगांत वायूचा कोप होऊन शिरा व स्नायु इत्यादिकांला शोषून सर्व शरीरास निरुपयुक्त करितो. त्याला कोणी सर्वांगरोग ह्मणतात.

दाहसंतापमूर्छाःस्युर्वायौपित्तसमन्विते ॥ शैत्यशोथगुरुत्वानितस्मिन्नेवकफान्विते ॥ शुद्धवातहतंपक्षंकृच्छ्रसाध्यतमंविदुः ॥ साध्यमन्येनसंसृष्टमसाध्यंक्षयहेतुकं ॥ गर्भिणीसूतिकाबालवृद्धक्षीणेष्वसृक्स्रुतो ॥ पक्षाघातंपरिहरेद्वेदनारहितोयदि ॥

अर्थ—वायु पित्तयुक्त असला तर; दाह, संताप आणि मूर्छा हे विकार होतात; व तोच कफयुक्त असतां; शैत्य, सूज व जडता हे विकार होतात. केवळ वायूच्या विकारानें झालेला पक्षवध अत्यंत कष्टसाध्य जाणावा; व दुसऱ्याच्या दोषाच्या संयोगानें झालेला पक्षवध साध्य आहे; आणि जो क्षयापासून झालेला तो असाध्य व गर्भिणी, बाळंत, बाळक, वृद्ध व क्षीण यांचा व रक्तस्त्रावापासून झालेला पक्षघात वेदनारहित असला तरी तो वैद्यानें सोडून द्यावा.

माषादि काढा.

माषात्मगुप्तावातारिवाट्यालकजलश्रितं ॥ हिंगुसैंधवसंयुक्तं पक्षाघातंविनाशयेत् ॥ माषकेहिंगुसिंधूत्थेजरणाद्यास्तुशाणिकाः ॥

अर्थ—उडीद, कुहिली, एरंडमूळ व लघुचिकणामूळ यांचा काढा करून त्यांत हिंग व सैंधव घालून घ्यावा; ह्मणजे पक्षाघाताचा नाश करितो. यामध्यें हिंग व सैंधव हीं एकेक मासा व जिरें आदिकरून तीन मासे घालावीं.

ग्रंथिकादितैल.

ग्रंथिकाग्निकणाशुंठीरास्नासैंधवकल्कितं ॥
माषक्वाथाश्रितंतैलंपक्षाघातंव्यपोहति ॥

अर्थ—पिंपळीमूळ, चित्रक, पिंपळी, सुंठ, रास्ना व सैंधव यांचा कल्क करून उडदाच्या काढ्यांत व पूर्वकल्कांत तैल सिद्ध करून अंगाला लावावें; ह्मणजे पक्षाघातवायूचा नाश करितें.

माषादितैल.

माषात्मगुप्तातिविषाक्षवूकरास्नाशताव्हालवणैःसुपिष्टैः ॥
चतुर्गुणेमाषवलाकषायेतैलंशृतंहंतिहिपक्षघातं ॥

अर्थ-उडीद, कुहिली, अतिविष, एरंडमूळ, केळ, शतावरी, सैंधव, उडीद व चिकणा यांच्या काढ्यांत चतुर्थांश तैल घालून सिद्ध केलें ह्मणजे तें पक्षघाताचा नाश करितें.

माषादिसप्तक.

माषवलाशूकविंबीकट्तृणरास्नाश्वगंधोरूवूकाणां ॥ क्वाथःप्रातःपीतोरामठलवणान्वितःकोष्णः ॥ अपनयतिपक्षघातंमन्यास्तंभंसकर्णनादरुजं ॥ दुर्जयमर्दितवातंसप्ताहाज्जयतिचावश्यं ॥

अर्थ—उडीद, चिकणा, कुहिली, सुगंधिगवत, रास्ना, आसकंद व एरंड, यांचा काढा हिंग व सैंधव, घालून प्रातःकाळीं प्यावा. तो पक्षघात, मन्यास्तंभ, कर्णनाद व अर्दितवायु, यांचा सात दिवसांत पराजय करितो.

माषतैल.

ग्रंथिकाग्निकणारास्नाकुष्ठंनागरसैंधवं ॥
माषंक्काथेनतत्तैलंपक्षाघातविनाशनं ॥

अर्थ–पिंपळमूळ, चित्रक, पिंपळी, रास्ना, कोष्ठकोळिंजन, नागरमोथे, सैंधव व उडीद, यांच्या काढ्याबरोबर सिद्ध केलेलें तैल पक्षघातनाशक आहे.

कपिकछ्वादिकाढा.

कपिकच्छूबलैरंडमाषनागरसाधितं॥ससैंधवंपिबेत्क्काथंनासारंध्रेणमानवः ॥पक्षाघातंनिहंत्याशुशिरोरोगंहनुग्रहं॥अर्दितंसंधिवातंचमन्यास्तंभंसुदारुणं ॥

अर्थ–कुयलीच्या बिया, चिकणामूळ, एरंडमूळ, उडीद व सुंठ यांचा काढा सैंधव घालून नाकानें प्राशन करावा; ह्मणजे पक्षाघात, मस्तकरोग, हनुग्रह, अर्दित, संधिवात व मन्यास्तंभ यांचा नाश करितो.

गुग्गुळ पक्षाघातावर.

कृष्णाजटानागरचव्यवन्हिपाठाविडंगेंद्रयवैःसमांशैः ॥ हिंगूग्रगंधाद्विजयष्टिकौंतीमातंगकृष्णातिविषान्वितश्च॥ससर्षपाजाजियुगाजमोदान्वितैःसमस्तैस्त्रिफलाद्विभागा॥ एभिःसमोगुग्गुलुराजमिश्रोभुक्तोहरेत्पक्षभवानिलार्तिं ॥

अर्थ–पिंपळीमूळ, सुंठ, चवक, चित्रक, पाहाडमूळ, वावडिंग, इंद्रजव, हिंग, वेखंड, भारंगमूळ, रेणुकबीज, गजपिंपळी, अतिविष, शिरस, जिरें, शाहाजिरें व अजमोदा हे समभाग. या सर्वांच्या दुप्पट त्रिफला व सर्वांच्या समान गुग्गुल, घालून त्यांतून अग्नि व बल पाहून खावा; ह्मणजे तो पक्षावातवायुचा नाश करितो.

राळतैल.

समुद्धरेत्सर्जतैलंयंत्रेचनलिकाभिधे ॥
विमर्दनंतेनतनौपक्षाघातंविनाशयेत् ॥

अर्थ–राळीचें चूर्ण करुन त्याचें नलिकायंत्रानें तेल काढावें; आणि आंगाला मर्दन करावें; ह्मणजे तें पक्षाघातवायुचा नाश करितें.

पक्षाभिघातकटुतुंबिबीजतैलंतथानिंबफलोद्भवंच ॥
गोमायुपारावतकुक्कुटानांपित्तैःप्रलेपःप्रशमायवायोः ॥

अर्थ–पक्षाघातवायूवर कडव्या पांढऱ्या भोंपळ्याचें बीज वाटून त्याचा, किंवा निंबोळ्याच्या तेलाचा अथवा कोन्हा, पारवा व कोंवडे यांच्या पित्ताचा लेप करावा; ह्मणजे वायु शांत होतो.

शुंठीचूर्ण.

लघुशुंठीकृतंचूर्णंपलसप्तमितंबुधैः ॥ तत्समंगोघृतंदत्वाभर्जयित्वाततोबुधः ॥ शुंठीसमंरसोनंचपिष्टातत्रविनिःक्षिपेत् ॥ पक्षाघातंहनुस्तंभंकटिभंगंतथैवच ॥ बाहुपीडांजयेत्तीव्रांवात रोगंचनाशयेत् ॥

अर्थ–सुंठीचें चूर्ण २८ तोळे, गाईचें तूप २८ तोळे घालून ती सुंठ तुपांत भर्जित करावी; नंतर लसूण सोलून वाटून २८ तोळे त्यांत घालावी; आणि अग्निबळ पाहून खावी; ह्मणजे ती सुंठ पक्षाघात, हनुस्तंभ, कटिभंग, बाहुपीडा, आणि वातरोग यांचा नाश करिते.

अर्दितनिदान.

उच्चैर्व्याहरतोत्यर्थंखादतःकठिनानिच ॥ हसतोजृंभतोभाराद्विषमाच्छयनासनात् ॥ शिरोनासौष्ठचिबुकललाटेक्षणसंधिगः ॥ अर्दयत्यनिलोवक्त्रमर्दितंजनयेत्ततः ॥ वक्रीभवतिवक्त्रार्धंग्रीवाचाप्यपवर्तते ॥ शिरश्चलतिवाक्संगोनेत्रादीनांचवैकृतं ॥ ग्रीवाचिबुकदंतानां तस्मिन्पार्श्वेचवेदना ॥ तमर्दितमितिप्राहुर्व्याधिविशारदाः ॥ वातात्पित्तात्कफाच्चस्यात्त्रिविधंतंसमासतः ॥

अर्थ–मोठ्याने पुष्कळ बोलणें, कठिण पदार्थ खाणें, जांभई देणें, भार सहन करणें, वेडे वांकड्या जाग्यावर निजणें किंवा बसणें, या कारणानीं मस्तक, नाक, ओंठ, तोंड, कपाळ, डोळे, यांचा संधिगत वायु कुपित होऊन पीडा करतो; आणि तोंड वांकडें करतो, अर्धे तोंड वांकडे होऊन मान देखील फिरत्ये, मस्तक कांपतें, शब्द उमटत नाहीं, नेत्रादिकांस विकार होतो मान, तोंड व दांत जा बाजूला फिरतात त्या बाजूस वेदना होतात, असें जा रोगांत होतें. त्याला अर्दितवायु ह्मणतात, हा वातव्याधीमध्यें श्रेष्ठ आहे. याचे वात, पित्त व कफ या दोषभेदेकरून तीन प्रकार संक्षेपेंकरून सांगितले आहेत.

वातार्दित.

लालास्रावोव्यथाकंपःस्फुरणंहनुवाग्ग्रहः ॥
ओष्ठयोःश्वयथुस्थूलश्चार्दितेवातजेभवेत् ॥

अर्थ—लाळ गळणें, वेदना होणें, कंप, फुरफुरणें, हनुग्रह आणि भाषण यांचा प्रतिबंध व ओंठाला फार सूज इतकीं लक्षणें वातार्दिताची जाणावीं.

पित्ताश्रित व कफाश्रित अर्दितलक्षण.

पीतमास्यंज्वरस्तृष्णापित्तजेमोहधूपनें ॥
गंडेशिरसिमन्यायांशोथःस्तंभःकफात्मके ॥

अर्थ—पित्ताधिक अर्दितवायुमध्यें मुखाला पिंवळेपणा, ज्वर, तहान, मोह, आणि कंप हे विकार होतात; व कफात्मक अर्दितामध्यें गाल, मस्तक व मान यांवर सूज, आणि स्तंभ हे विकार होतात.

चिकित्सा.

स्नेहपानानिनस्यंचभोज्यान्यनिलहंतिच ॥
उपनाहाश्वशस्यंतेस्वेदनंचतथार्दिते ॥

अर्थ—स्नेहपान, नस्य, वातनाशक भक्ष्यपदार्थ व स्वेद काढणें इत्यादि उपचार अर्दितवायुवर प्रशस्त आहेत.

दशमूलीकषायेणमातुलुंगरसेनवा ॥
वलायाःपंचमूल्यावाक्षीरंवातात्मकेहितं ॥

अर्थ—दशमुळांच्या काढ्याबरोबर, किंवा महाळुंगांच्या रसाबरोबर, अथवा चिकण्याच्या काढ्याबरोबर, अथवा पंचमुळांच्या काढ्याबरोबर दूध प्यावें, तें वातात्मक अर्दितवायुवर प्रशस्त आहे.

पिष्टंमाषकृतंजग्ध्वानवनीतेनसोर्दितीं ॥
क्षीरंमांसरसैर्भुक्त्वादशमूलीरसंपिवेत् ॥

अर्थ—उडदांचें पीठ लोण्याबरोबर खाऊन अथवा मांसरसाबरोबर दूध पिऊन, दशमुळांचा काढा प्यावा. तो अर्दितावर प्रशस्त आहे.

पित्तार्दित.

अर्दितेपित्तजेशीतान्स्नेहोत्थांश्चैवनिर्दिशेत् ॥
घृतवस्तिप्रसेकंचरक्तस्रावंतथैवच ॥

अर्थ—पित्तज अर्दितवायुवर, स्निग्धपदार्थांपासून झालेले शीत उपचार करावे; आणि घृतानें बस्ति व सिंचन किंवा रक्तस्राव करावा.

जिह्मीभूताननोमूकोदाहवान्योर्दितभिवेत् ॥

कुर्यात्प्रतिक्रियांतस्यवातपित्तविनाशिनीं ॥

अर्थ—अर्दितवायुनें ज्याचे तोंड वांकडें झालें, आणि मुकेपणा व दाह हे उपद्रव झाले तर; त्यावर वातपित्तनाशक उपचार करावे.

कफार्दित.

श्लेष्मभागेक्षयंनीतेबृंहणैःसमुपाचरेत् ॥
अर्दितेशोथसंयुक्तेवमनंचप्रशस्यते॥

अर्थ—अर्दितवायुनें कफ क्षीण झाला असतां; बृंहण उपचार करावे; आणि शोथयुक्त अर्दितवायुवर वमन प्रशस्त आहे.

रसोनकल्कंतिलतैलमिश्रंखादेन्नरोयोर्दितरोगयुक्तः ॥
तस्यार्दितंनाशमुपैतिशीघ्रंवृंदंघनानामिवनायुवेगात् ॥

अर्थ—लसुणाचा कल्क, तिळांचे तेल मिसळून खावा; ह्मणजे अर्दित वायु नाश पावतो. जसा मेघांचा समुदाय वायुवेगापासून नाश पावतो, तसा.

फलत्रिकंनिंबफलोरसश्चवासापटोलीक्कथितंतुसर्वं ॥
सकौशिकंरात्र्यवसानकालेपीतंभवेदर्दितवातहारि ॥

अर्थ—हरडा, वेहेडा, आवळकाठी, निंबोळ्यांचा रस, अडुळसा व कडुपडवळ यांचा काढा करून त्यांत गुगुळ घालून प्रातःकाळीं द्यावा; ह्मणजे अर्दितवायूचा नाश होतो.

अर्दितसाध्यासाध्य.

क्षीणस्यानिमिषाक्षस्यप्रसक्ताव्यक्तभाषिणः ॥
नसिध्यत्यर्दितंगाढंत्रिवर्षंवेपनस्यच ॥

अर्थ—क्षीणाचा, डोळे मिटत नाहीं त्याचा; आणि अव्यक्त भाषण करणाराचा, तीन वर्षांचा जुना व कंपयुक्त असा अर्दित वायु बरा होत नाहीं.

गतेवेगेभवेत्स्वास्थ्यंसर्वेष्वाक्षेपकादिषु ॥

अर्थ—सर्व आक्षेपकवायुमध्यें वातवेग कमी झाला असतां; रोगी स्वस्थ होतो.

दुसरा प्रकार.

नवनीतेनसंयुक्तांखादेन्माषेंडरींनरः ॥
दुर्वारमर्दितंहंतिसप्तरात्रान्नसंशयः ॥

अर्थ—लोण्याबरोबर उडदांचे वडे करून खावे, ते दुर्निवार अशा अर्दितवायूचा सात दिवसांत नाश करितील.

लशुनविधि.

पलमर्धपलंवापिरसोनस्यसुकुट्टितं ॥ हिंगुजीरकसिंधूत्थसौवर्चलकटु त्रिकैः ॥ चूर्णितैर्माषकोन्मानैरवचूर्ण्यविलोडितं ॥ यथाग्निभक्षितंप्राता रुबुक्वाथानुपानतः ॥ दिनेदिनेप्रयोक्तव्यंमासमेकंनिरंतरं ॥ वातामयं निहंत्येवमर्दितंचापतंत्रकं ॥ एकांगरोगिणांरोगंतथासर्वांगरोगिणां ॥ ऊरुस्तंभंगृध्रसींचशूलंद्वंद्वंकृमीनपि ॥ कटिपृष्ठामयंहन्याज्जाठरंचसमीरणं ॥

अर्थ—चार तोळे किंवा दोन तोळे लसुणीच्या रसांत हिंग, जिरें, सैंधव सौवर्चल म्हणजे पादेलोण व त्रिकटु हीं प्रत्येक मासा प्रमाण घेऊन चूर्ण करून घालावीं; नंतर यथाशक्ति भक्षण करावें, याला अनुपान एरंडमुळांचा काढा, हा प्रातःकाळीं दररोज एकमहिनापर्यंत सेवन केला असतां; सामान्य वातरोग, अर्दित, अपतंत्रक, एकांगवात, सर्वांगवात, ऊरुस्तंभ, गृध्रसी, शूल, द्वंद्वरोग, कृमि, कटिरोग, पृष्ठरोग व पोटांतला वायु इतक्यांचा नाश करील.

हनुग्रहनिदान.

जिव्हानिर्लेखनाच्छुष्कभक्षणादभिघाततः ॥ कुपितोहनुमूलस्थःस्रंसयित्वानिलोहनुं ॥ करोतिविवृतास्यत्वमथवासंवृतास्यताम् ॥ हनुग्रहःसतेनस्यात्कृच्छ्राच्चर्वणभाषणं ॥

अर्थ—जिव्हा फार घांसल्यानें, शुष्क पदार्थ भक्षणानें; किंवा अभिघातामुळें हनुवटीच्या मूलस्थानीं कुपित झालेला वायु हनुवटी शिथिल करून तोंडाला उघडून किंवा मिटून धरतो, त्याला हनुग्रह ह्मणतात. तो झाल्यामुळें पदार्थ चावणें किंवा भाषण हे संकटानें होतें.

हनुग्रहेहनुस्तंभेमन्यास्तंभेर्दितेपिबेत् ॥
दशमूल्यासमाकृष्णाअश्वत्थस्वरसेनच ॥

अर्थ—हनुग्रह, हनुस्तंभ, मानेचा स्तंभ; आणि अर्दित वायु यांवर दशमुळें व पिंपळी यांचा काढा द्यावा; किंवा पिंपळाच्या रसांत पिंपळी घालून द्यावी.

चिकित्सा.

संवृतंचुबुकंस्निग्धंस्विन्नमुन्नमयेद्भिषक् ॥
विवृतंनमयित्वानुकुर्यात्प्राप्तामिहक्रियां ॥

अर्थ मिटून धरलेलें तोंड स्निग्ध पदार्थ चोळून वाफारा देऊन उघडावें; आणि वासलेलें असेल तर त्यावर सांगितलेले उपचार करून दाबून मिटावें.

पिप्पलीचार्द्रकंचापिसंचर्व्यचमुहुर्मुहुः ॥
निष्ठीवेत्पतोयेनशोधयेद्वदनांतरं ॥

अर्थ–पिंपळी व आलें वारंवार चांऊन थुंकावें; व ऊन पाण्यानें तोंड धुवावें.

हनुग्रहचिकित्सा.

निष्कुष्यलशुनंसम्यक्संक्षुचतिलतैलवत् ॥
सैंधवेनान्वितंखादेत्धनुस्तंभार्दितोनरः ॥

अर्थ–लसूण सोलून तिळांच्या तेलांत वाटून सैंधव घालून खावी. ती हनुस्तंभावर प्रशस्त आहे.

रसोनवटक.

रसोनगुटिकांमापविदलंपरिपेच्यच ॥ योजयेत्पिष्टिकांकांतां
सैंधवार्द्रकहिंगुभिः ॥ततस्तुवटकान्कृत्वातिलतैलेपचेच्छनैः ॥
भक्षयेत्तान्यथावन्हिहनुस्तंभंमुखीभवेत् ॥

अर्थ–लसुणीचा गोळा, आणि उडदांची वाटलेली डाळ एकत्र करून त्यांत सैंधव, हिंग व आलें घालून त्याचे वडे तेलांत तळून शक्तिप्रमाणें खावें, तें हनुस्तंभाचा नाश करितील.

अभ्यंजन.

अभ्यज्यपक्वतैलेनस्वेदयेन्मृदुनाग्निना ॥
बस्तिंविधारयेन्मूर्ध्नितैलेनपरिपूरयेत् ॥

अर्थ–कढलेल्या तेलानें अभ्यंग करून मंद शेक द्यावा; व तेलाचा शिरोबस्ति द्यावा.

प्रसारणीतेल वातकफजन्य वायुवर.

प्रसारणीपलशतंजलद्रोणेनपाचयेत् ॥ पादशिष्टोशृतोग्राह्यस्तैलंद
धिचतत्समं ॥ कांजिकंचसमंतैलात्क्षीरंतैलाच्चतुर्गुणं ॥ तैलाच्चथाष्ट
मांशेनसर्वकल्कानियोजयेत् ॥ मधुकंपिप्पलीमूलंचित्रकःसैंधवंव
चा ॥ प्रसारणीदेवदारूरास्नाचगजपिप्पली ॥ भल्लातःशतपुष्पाच
मांसीचैभिर्विपाचयेत् ॥ एतत्तैलंवरंपक्वंवातश्लेष्मामयान्जयेत् ॥
कौब्जत्वंखंजपंगुत्वंगृध्रसीमर्दितंतथा ॥ हनुपृष्ठशिरोग्रीवाकटिस्तं
भंचनाशयेत् ॥ अन्यांश्चविषमान्वातान्सर्वानाशुव्यपोहति ॥

अर्थ–चांदवेल शंभर पळें वजन घेऊन त्यांत पाणी एक द्रोण प्रमाण घालून चवथाई पाणी राही तोंपर्यंत काढा करून गाळून घ्यावा. त्यांत तेल दहीं व कांजी काढ्याचे समभा-

ग घालून त्यांत तेलाचे चौपट गाईचें दूध घालावें; व त्यांत कल्क करून घालावयाचीं औषधें येणेप्रमाणें. ज्येष्ठमध, पिंपळमूळ, चित्रक, सैंधव, वेखंड, चांदवेल, देवदार, रास्ना, गजपिंपळी, भिलावे, बडीशोप व जटामांसी हीं बारा औषधें तेलाचे अष्टमांश घेऊन कल्क करून तेलांत घालून तेल शेष राही तोंपर्यंत पाक करून नंतर तेल गाळून अंगास लावावें. तेणेंकरून वातश्लेष्मजन्य विकार व मनुष्य जेणेंकरून कुबडा होतो तो वायु, खंजवायु, व जेणेंकरून पांगळा होतो तो वायु, गृध्रसी वायु, अर्दितवायु, हनु, पृष्ठ, शिर, ग्रीवा, कटि यांचा स्तंभ करितो तो वायु; हे सर्ववायु दूर होतात; व याशिवाय दुसरे विषमवायु, लाहान मोठे जे असतील तेही या तेलानें दूर होतात.

मन्यास्तंभ.

दिवास्वप्नाशनस्नानविकृतोर्ध्वनिरीक्षणैः ॥
मन्यास्तंभंप्रकुरुतेसएवश्लेष्मणायुतः ॥

अर्थ—दिवसास निद्रा, विकृत अन्न, विकारकारक जलांत स्नान व भलत्याच रितीनें फार वेळ वर पाहणें इत्यादि कारणांनीं वायु कुपित होऊन तो कफाशीं युक्त होतो; तेव्हां मानेच्या शिरा ताठून मानेचा स्तंभ करितो. त्याला मन्यास्तंभ ह्मणतात.

चिकित्सा.

दशमूलीकृतंकाथंपंचमूल्यापिकल्पितं ॥
रूक्षंस्वेदंतथानस्यंमन्यास्तंभेप्रयोजयेत् ॥

अर्थ—दशमुळांचा किंवा पंचमुळांचा कल्क द्यावा, रूक्षपदार्थांनीं स्वेद काढावा, नस्य द्यावें. हे उपाय मन्यास्तंभावर करावे.

तैलेनाज्येनवाग्रीवामभ्यज्यार्कदलैरथ ॥
एरंडपत्रैर्वाच्छाद्यस्वेदयेद्बहुशोभिषक् ॥

अर्थ—मानेला तेल किंवा तूप लाऊन रुईच्या किंवा एरंडच्या पानांनीं शेकून पुष्कळ वेळ घाम काढावा.

कुक्कुटांडद्रवैश्चूर्णैःसैंधवाज्यसमन्वितैः ॥
ग्रीवांसंमर्दयेत्तेनमन्यास्तंभःप्रशाम्यति ॥

अर्थ—कोंबड्याच्या आंड्यातील रस, सैंधव व तूप, घालून ऊन करून मानेला मर्दन करावा. तेणेंकरून मन्यास्तंभ शांत होतो.

जिव्हास्तंभ.

वाग्वाहिनीशिरासंस्थोजिव्हांस्तंभयतेनिलः ॥
जिव्हास्तंभःसतेनान्नपानवाक्येष्वनीशता ॥

अर्थ–वाग्वाही शिरागतवायु जिव्हेचें स्तंभन करून अन्नपाण्याचें सेवन व भाषण यांविषयीं असमर्थ करतो त्याला जिव्हास्तंभ ह्मणतात.

चिकित्सा.

जिव्हास्तंभेयथावस्थंवातव्याधिचिकित्सितं ॥
सामान्योक्ताक्रियाश्चात्रार्दितस्यापिहितामता ॥

अर्थ–जिव्हास्तंभावर जसे दोष असतील तसे पाहून वातव्याधिवरची चिकित्सा करावी; आणि वातव्याधिवर व अर्दितवातावर जा सामान्य क्रिया सांगितल्या त्या हितकारक आहेत.

दुसरा प्रकार.

जिव्हास्तंभेक्रियाश्रेष्ठासामान्योक्तातुयार्दिते ॥

अर्थ–जी अर्दित वायूवर सामान्य क्रिया सांगीतली, ती जिव्हास्तंभावर श्रेष्ठ आहे.

कल्याणकावलेह.

सहरिद्रावचाकुष्ठंपिप्पलीविश्वभेषजं ॥ अजाजीचाजमोदाचयष्टी मधुयुतंघृतं ॥ एकविंशतिरात्रेणभवेच्छ्रुतधरोनरः ॥ मेघदुंदुभिनिर्घोषोमत्तकोकिलनिःस्वनः ॥ जडवागादिमूकत्वंलेहोकल्याणकोजयेत् ॥

अर्थ–हळद, वेखंड, कोष्ठकोळिंजन, पिंपळी, सुंठ, जिरें, अजमोदा, जेष्टीमध व तूप यांचा लेह एकवीस दिवस सेवन केला असतां; बहिरेपणा, तोत्रेपणा व मुकेपणा, यांचा नाश करून चांगला मेघासारखा किंवा नौबतीसारखा, गंभीर किंवा कोकिळेसारखा मंजुळ शब्द करतो.

शिरोग्रह.

रक्तमाश्रित्यपवनःकुर्यान्मूर्धधराःशिराः ॥
रूक्षाःसवेदनाःकृष्णाःसोसाध्यःस्याच्छिरोग्रहः ॥

अर्थ–जो कुपितवायु रक्ताचा आश्रय करून मस्तकाला धारण करणाऱ्या शिरांला रूक्ष, वेदनायुक्त व काळ्या अशा करितो. तो शिरोग्रह वायु असाध्य जाणावा.

चिकित्सा.

शिरोग्रहेतुकर्तव्याशिरागतमरुत्क्रिया ॥ दशमूलीकषायेणमातुलुंगरसेनच ॥ शतेनतैलेनाभ्यंगःशिरोबस्तिश्चयुज्यते ॥

अर्थ–शिरोग्रहवायूवर शिरागतवायूचा उपचार करावा; आणि दशमुळांचा काढा व महाळुंगाचा रस, यांच्या बरोबर तेल कढवून त्याणें अभ्यंग किंवा शिरोबस्ति करावा.

गृध्रसीलक्षण.

स्फिक्पूर्वा कटीपृष्ठजानुजंघापदं क्रमात् ॥ गृध्रसीस्तंभरुक्तोदैर्गृ
ण्हातिस्पंदतेमुहुः ॥ वाताद्वातकफाभ्यांसाविज्ञेयाद्विविधापुनः ॥

अर्थ—कुले, गुदद्वार, मांड्या, कंबर, पाठ, गुडघे, पोटऱ्या, पाय, इतक्याठिकाणीं, क्रमेंकरून स्तंभ, ठणका, टोंचल्याप्रमाणें होणें, हे उपद्रवांसहित जो आंखडून धरतो; आणि चलन पावतो, त्याला गृध्रसी असें ह्मणतात. तो वायु दोनप्रकारचा वातानें किंवा वातकफानें होतो.

वातजगृध्रसीनिदान.

वातजायांभवेत्तोदोदेहस्यातीववक्रता ॥
जानुजंघोरुसंधीनांस्फुरणंस्तंभताभृशं ॥

अर्थ—वातजगृध्रसीमध्यें ठणका, देहाला वक्रता, मांडी व मांडीची पोटरी व ऊरु यांचें संधीचें स्फुरण व अत्यंत स्तब्धता होत्ये.

वातश्लेष्मजगृध्रसीनिदान.

वातश्लेष्मोद्भवायांतुगौरवंवन्हिमार्दवं ॥
तंद्रामुखप्रसेकश्चभक्तद्वेषस्तथैवच ॥

अर्थ—वातकफोत्पन्न गृध्रसीमध्यें जडता, अग्निमांद्य, झांपड, लालास्राव व भक्तद्वेष इत्यादि लक्षणें होतात.

गृध्रसीचिकित्सा.

गृध्रस्यांतुनरंसम्यग्रेकेणवमनेनवा ॥
ज्ञात्वानिरामंदीप्ताग्निंवस्तिभिःसमुपाचरेत् ॥

अर्थ—गृध्रसीच्या रोग्याला रेचन व वमन देऊन दीप्ताग्नि झाला असें जाणून मग बस्त्यादिक उपचार करावे.

नादौवस्तिविधिःकुर्याद्यावदूर्ध्वंनशुध्यति ॥
स्नेहोनिरर्थकःसस्यात्भस्मन्येवहुतंतथा ॥

अर्थ—गृध्रसीमध्यें जोंपर्यंत ऊर्ध्व शुद्धि झाली नाहीं तोंपर्यंत बस्तिविधि करूं नये, केला असतां; स्नेह बस्ति निरर्थक होतो. जसें भस्मामध्यें हवन केलेलें व्यर्थ जातें तसें.

एरंडतैलयोग.

तैलमैरंडजंप्रातर्गोमूत्रेणपिबेन्नरः॥
मासमेकंप्रयोगोयंगृध्रस्यूरुग्रहापहः ॥

अर्थ—एरंडतेल गोमूत्रांत घालून एक महिना पर्यंत नित्य सेवन करावें. तें . ऊरुस्तंभ यांचा नाश करील.

तैलंघृतंसार्द्रकमातुलुंगरसंसचुक्रंमगुडंपिवेद्वा ॥
कटयूरुपृष्ठत्रिकशूलगुल्मगृध्रस्युदावर्तहरःप्रयोगः॥

अर्थ—तेल किंवा तूप यांतून कोणा एकाशीं आलें व महाळुंग यांचा रस; स व गुळ हीं एकत्र करून प्यावा; ह्मणजे कंबर, मांड्या, पाठ व माकडहाड यां णचा शूल, गुल्म, उदावर्त व गृध्रसीवायु यांचा नाश करील.

निष्कुष्यैरंडबीजानिपिष्ट्वाक्षीरेविपाचयेत् ॥
तत्पायसंकटीशूलेगृध्रस्यांपरमौषधं ॥

अर्थ—एरंड्या सोलून कुटून त्यांची दुधांत शिजवून लापशी करावी. ती कंबरेच शूल व गृध्रसी यांवर उत्कृष्ट औषध आहे.

गृध्रसीहरतैल.

द्वेपलेसैंधवात्पंचशुंठ्याग्रंथिकचित्रकात् ॥ द्वेपलेभल्लकास्थीनिविंशतिर्द्वेतथाढके ॥ आरनालेपचेत्प्रस्थंतैलस्यैतैरपत्यदं ॥ गृध्रस्यूरुग्रहाशींतःसर्ववातविकारनुत् ॥

अर्थ—सैंधव ८ तोळे, सुंठ, पिंपळमूळ व चित्रक हीं प्रत्येकीं २० तोळे, बिब्याच मगज८तोळे, कांजी८८तोळे व तेल६४तोळे, सर्व एकत्र पक्व करून शक्तिप्रमाणे प्यावें तें अपत्य देणारें व गृध्रसी, ऊरुस्तंभ, मुळव्याध व सर्ववातविकार यांचें नाशक आहे.

शिरावेध गृध्रसीवर.

विध्येच्छिरांमेढ्रबस्तेरधस्ताच्चतुरंगुले ॥
यदिनोपशमंगच्छेद्दहेत्पादकनिष्ठिकां ॥

अर्थ—लिंगबस्तीचे खालीं चार आंगळांवर शिरावेध करावा; ह्मणजे गृध्रसी शम पावे. जर शम न पावली तर पायांची कनिष्ठिका डागावी.

निंबकल्क.

महानिंबजटाकल्कोगृध्रसीनाशनःस्मृतः ॥

अर्थ—बकाणलिंबाच्या पाळांचा कल्क गृध्रसीनाशक आहे.

पिप्पलीपिप्पलीमूलंभल्लातकफलानिच ॥
एतत्कल्कश्चसक्षौद्रऊरुस्तंभनिवारणः ॥

अर्थ—पिंपळी, पिंपळमूळ व बिब्बे यांचा कल्क, मधाशीं सेवन केला असतां; ऊरुस्तंभाचें निवारण करील.

पंचमूलीकषायंतुसुखोष्णंत्रिवृतायुतं ॥
गृध्रसींगुल्ममूलंचसद्यःपीतोनियच्छति ॥

अर्थ—पंचमुळांचा काढा, तेडाचें चूर्ण घालून प्यावा. तो गृध्रसी व गुल्म यांचा तत्काळ नाश करील.

गृध्रसीचिकित्सा.

एरंडमूलंबिल्वंचबृहतीकंटकारिका ॥ कषायोरुचकोपेतःपीतोवृषण बस्तिजं ॥ गृध्रसीजंहरेच्छूलंचिरकालानुबंधिच ॥

अर्थ—एरंडमूळ, बेलमूळ, रिंगणी व डोरली, यांचा काढा पादेलोण घालून प्यावा. तो वृषण, बस्ति, गृध्रसीवात यांचे ठायीं झालेला फार दिवसांचा शूल नाश करितो.

गोमूत्रैरंडतैलाभ्यांकृष्णाचूर्णंपिबेन्नरः ॥
दीर्घकालस्थितांहंतिगृध्रसींकफवातजां ॥

अर्थ—गोमूत्र, एरंडतेल व पिपळींचें चूर्ण, एकत्र करून प्यावें. तें फार दिवसांचा कफवातजगृध्रसीचा नाश करील.

सिंहास्यदंतीकृतमालकानांपिबेत्कषायंकृतुतैलमिश्रं ॥ योगृध्रसीन ष्टगतिःप्रसुप्तःसशीघ्रगःस्यात्थिकिमत्रचित्रं ॥

अर्थ—आडुळसा, दांतीमूळ व बाहवा यांचा काढा एरंडतेल मिश्र करून प्यावा; ह्मणजे जाणें चालणें बंद झालें, स्पर्श कळत नाहीं, अशा गृध्रसीवायूचा रोगी शीघ्र गमन करणारा होईल, यांत आश्चर्य नाहीं.

बृहन्निंबतरोःसारोवारिणापरिपेषितः ॥
सपीतोनाशयेत्क्षिप्रमसाध्यामपिगृध्रसीं ॥

अर्थ—बकाणलिंबाचा सार पाण्यांत उगाळून प्यावा, तो असाध्य गृध्रसीचा नाश करील.

शेफालिकादलैःक्काथोमृद्वग्निपरिपाचितः ॥
दुर्वारंगृध्रसीरोगंपीतमात्रःप्रणाशयेत् ॥

अर्थ—मंदाग्नीवर केलेला काळे निर्गुंडीच्या पानांचा काढा प्राशन केल्याबरोबर दुर्वार गृध्रसीरोगाचा नाश करील.

रास्नागुग्गुलु.

रास्नायास्तुपलंचैकंपंचकर्षाणिगुग्गुलोः ॥

सर्पिषावटिकांकृत्वाभक्षयेद्गृध्रसीहरीं ॥

अर्थ–रास्ना ४ तोळे व गुग्गुळ ९ तोळे, तुपांत खलून गोळी करून शक्तिप्रमाणे खावी, ती गृध्रसीनाशक आहे

रास्नाकाढा.

रास्नामृतारग्वधदेवदारुत्रिकंटकैरंडपुनर्नवानां ॥

क्वाथंपिबेन्नागरचूर्णमिश्रंजंघोरुपृष्ठत्रिकपार्श्वशूली ॥

अर्थ–रास्ना, गुळवेल, बाहवा, देवदार, गोखरूं, एरंडमूळ व पुनर्नवा यांचा काढा सुंटीचें चूर्ण मिश्र करून प्यावा; ह्मणजे पोटऱ्या, पाठ, माकडहाड, कशी या ठिकाणचा शूल नाश पावतो.

पथ्यागुग्गुलु.

पथ्याविभीतामलकीफलानांशतंक्रमेणद्विगुणाभिवृत्धं ॥ प्रस्थेनयुक्तं चपलंकपाणांद्रोणेजलेसंस्थितमेकरात्रं ॥ अर्धावशेषंक्वथितंकषायंभां ढेपचेत्तत्पुनरेवलौहे ॥ अमूनिवन्हेरवतार्यदद्याद्द्रव्याणिसंचूर्ण्यप लार्धकानि ॥ विडंगदंतीत्रिफलागुडूचीकृष्णात्रिवृन्नागरकोपणा नि ॥ यथेष्टचेष्टस्यनरस्यशीघ्रंहिमांबुपानानिचभोजनानि ॥ निषे व्यमाणोविनिहंतिरोगान्सगृध्रसींनूतनखंजतांच ॥ प्लीहानमुग्रंजठरा णिपंगुपांडुत्वकंडूवमिवातरक्तं ॥ पथ्यादिकोगुग्गुलुरेषनाम्नाख्या तःक्षितावप्रतिमप्रभावः ॥ वलेननागेंद्रसमंमनुष्यंजवेनकुर्यात्तुरगेन तुल्यं ॥ आयुःप्रकर्षंविदधातिचक्षुर्वलंतथापुष्टिकरोविपन्नः ॥ क्षत स्यसंधानकरोविशेषाद्रोगेपुशस्तःसकलेपुतज्ज्ञैः ॥

अर्थ–हिरडे १००, वेहेडे २००, आवळे ४०० व कणगुग्गुळ ६४ तोळे हे १०२४ तोळे पाण्यांत रात्रिस भिजत घालून प्रातःकाळीं कढवून अर्धे शेष उरलें ह्मणजे गाळून घेऊन पुनः लोखंडाचे पात्रांत कढवावें; आणि उतरल्यावर त्यांत वावडिंग, दांतीमूळ, त्रिफळा, गुळवेल, पिंपळी, निशोत्तर, सुंठ व मिरें या प्रत्येकाचें चूर्ण दोन तोळे प्रमाणे टाकावें; ह्मणजे हा गुग्गुळ तयार होतो. हा यथेष्ट आचरण व यथेष्ट भोजन करणाऱ्या मनुष्यानें ही सेवन केला असतां; रोगनाश करील. हा गृध्रसी, नूतन खंजता, प्लीहा, उग्र जठर, पंगुता, पांडुत्व, कंडू, वमि व वातरक्त यांचा नाश करणारा आहे. पथ्यादि गुग्गुळ पृथ्वीवर अप्रतिम सामर्थ्यवान् असा प्रसिध्द आहे; आणि वळेंकरून हत्तीसारि-

खें, वेगेंकरून घोड्यासारखें मनुष्यास करतो; व आयुष्य, चक्षुर्बल व पुष्टि यांतें करतो; व विषनाशक, क्षत बरें करणारा असा व सर्व रोगांचा ठायीं वैद्यांनीं योजला आहे.

तुरंगगंधासितखंडयुक्ताघृतेनभुक्ताकटिपृष्ठहंत्री ॥

अर्थ—अश्वगंध व खडीसाकर यांचें चूर्ण तुपाशीं खावें. तें कटिशूलनाशक आहे.

एरंडतैलयोग.

वाजिगंधाबलाविश्वादशमूलंविसाधितं ॥
गृध्रस्यांतैलमैरंडंवस्तौपानेचशस्यते ॥

अर्थ—अश्वगंध, चिकणा, सुंठ आणि दशमुळें यांच्या काढ्यांत व कल्कांत एरंडतेल घालून सिध्द करावें; तें गृध्रसीवायुवर बस्तीविषयीं किंवा प्राशन करण्यास उत्तम आहे.

विश्वाचीलक्षण.

तलंप्रत्यंगुलीनांयाःकंडरावाहुपृष्ठतः ॥
वाव्होःकर्मक्षयकरीविश्वाचीतिहसोच्यते ॥

अर्थ—बाहूच्या पृष्ठभागापासून हाताच्या बोटांचे वरले भागापर्यंत प्रत्येक बोटांच्या ज्या कंडरा ह्मणजे मोठ्या शिरा आंखडून हाताचा व्यापार बंद करतो. त्याला विश्वाची असें ह्मणतात.

चिकित्सा.

दशमूलीबलामापक्काथंतैलाज्यमिश्रितं ॥
सायंभुक्त्वाचरेन्नस्यंविश्वाच्यामववाहुके ॥

अर्थ—दशमुळें, चिकणा व उडीद यांचा काढा तेल किंवा तूप मिश्र करून संध्याकाळीं भोजन झाल्यावर त्याचें नस्य करावें; ह्मणजे विश्वाची व अवबाहुक यांचा नाश करील.

माषतैल.

मापसिंधुबलारास्नादशमूलकहिंगुभिः ॥ वचाशतजटाख्याभिःसिध्दंतैलंसनागरं ॥ ऊर्ध्वभक्ताशनाद्धन्याद्बाहुशोषाववाहुकौ ॥ विश्वाचींमुद्धतांचापिपक्षाघातंतथार्दितं ॥

अर्थ—उडीद, सैंधव, चिकणा, रास्ना, दशमुळें, हिंग, वेखंड व शतावरी यांच्या काढ्याबरोबर सिद्ध केलेलें तेल, सुंठीशीं युक्त भोजनोत्तर सेवन करावें. तें बाहुशोष, अवबाहुक, विश्वाची, पक्षाघात व अर्दित, यांचा नाश करील.

क्रोष्टुशीर्षलक्षण.

वातशोणितजःशोथोजानुमध्येमहारुजः ॥
ज्ञेयःक्रोष्टुकशीर्षस्तुस्थूलःक्रोष्टुकशीर्षवत् ॥

अर्थ—वात आणि रक्त यां पासून जो गुडघ्यामध्यें शोथ उत्पन्न होतो; आणि कोल्ह्याचे डोक्याप्रमाणें मोठा गुडघा होतो त्याला क्रोष्टुशीर्षक असें ह्मणतात.

चिकित्सा.

गुग्गुलुंक्रोष्टुशीर्षेतुगुडूचींत्रिफलांभसा ॥
क्षीरेणैरंडतैलंवापिबेद्वावृत्वदारुकं ॥

अर्थ—क्रोष्टुशीर्षावर गुळवेल व त्रिफळा ३, यांचे काढ्यांत गुग्गुळ १ घालून प्यावा; अथवा ४ तोळे दुधाबरोबर १ तोळा एरंडतेल अथवा वरधारेचे चूर्ण सेवन करावें.

सामान्यचिकित्सा.

रसैस्तित्तिरिमांसस्यपीनैर्गुग्गुलुसंस्थितैः ॥
वातरक्तक्रियाभिश्चजयेज्जंबुकमस्तकं ॥

अर्थ—तित्तिरिपक्ष्यांच्या मांसरसांत गुग्गुळ घालून प्यावा; आणि वातरक्तावरचे उपाय करावे; ह्मणजे क्रोष्टुशीर्षक नाश पावेल.

खंज व पंगूचें लक्षण.

वायुःकट्याश्रितःसक्थ्नःकंडरामाक्षिपेद्यदा ॥
खंजस्तदाभवेज्जंतुःपंगुःसक्थ्नोर्द्वयोर्वधात् ॥

अर्थ—वायु कमरेचा आश्रय करून मांडीची मोठी शीर निर्जीव करतो. त्याला खंज ह्मणतात. याप्रमाणें दोन्ही मांड्याच्या शिरा त्याला पंगु ह्मणतात.

चिकित्सा.

उपाचरेदभिनवंखंजंपंगुमथापिवा ॥
विरेकस्थापनस्वेदगुग्गुलुस्नेहवस्तिभिः ॥

अर्थ—खंज, किंवा पंगु नूतन असेल तर विरेचन, स्नान करविणें, घाम काढणें, गुग्गुळ, स्नेहपान व बस्ति इत्यादि उपचार करावे.

कलायखंजलक्षण.

कंपतेगमनारंभेखंजन्निवचलक्ष्यते ॥
कलायखंजंतंविद्यान्मुक्तसंधिप्रबंधनं ॥

अर्थ—गमनाचे आरंभी कांपतो; आणि लंगड्याप्रमाणें भासतो, त्याच्या सर्व संधि शिथिल होतात. त्याला कलायखंज ह्मणतात.

चिकित्सा.

क्रमःकलायखंजस्यखंजपंग्वोरिवस्मृतः ॥

विशेषात्स्नेहनंकर्मकार्यमत्रविचक्षणैः ॥

अर्थ—कलायखंजावर खंज व पंगु या प्रमाणेच उपचार सांगितले आहेत. विचक्षण वैद्यांनीं विशेषें करून स्निग्ध उपचार करावे.

चिकित्साक्रम.

जयेत्कलायखंजंतुहेतुत्यागरसोनतः ॥

अर्थ—कलायखंजवायूला निदानपरिवर्जन व लसुणभक्षण यांणीं जिंकावा.

वातकंटकनिदान.

रुक्पादेविषमेन्यस्तेश्रमाद्वाजायतेयदा ॥
वातेनगुल्फमाश्रित्यतमाहुर्वातकंटकं ॥

अर्थ—पाय वेडावांकडा टाकला किंवा श्रम झाले या कारणानें घोंटयाला ठणका होतो, त्याला वातकंटक असें ह्मणतात

चिकित्सा.

रक्तावसेचनंकुर्यादभीक्ष्णंवातकंटके ॥
पिबेदेरंडतैलंवादहेत्सूचीभिरेवच ॥

अर्थ—वातकंटकावर वारंवार रक्तमोक्ष करावा; एरंडेल प्यावें; सुयानीं डाग द्यावा.

पाददाहलक्षण.

पादयोःकुरुतेदाहंपित्तासृक्सहितोनिलः ॥
विशेषजश्चंक्रमणात्पाददाहंतमादिशेत् ॥

अर्थ—वायु, रक्त आणि पित्त यांच्याशीं युक्त होऊन पायांचे ठायीं दाह करतो, चाल पडल्यावर विशेषेंकरून दाह करतो, त्याला पाददाह असें ह्मणतात.

चिकित्सा.

वातरक्तक्रमंकुर्यात्पाददाहेविशेषतः ॥ मसूरविदलैःपिष्टैःशृतशीतेनवारिणा ॥ चरणौलेपयेत्सम्यक्पाददाहप्रशांतये ॥ नवनीतेनसंलिप्तौवन्हिनापरितापितौ ॥ मुच्येतेचरणौक्षिप्रंपरितापात्सुदारुणात् ॥

अर्थ—पाददाहावर विशेषेंकरून वातरक्तावरचा क्रम करावा; आणि मसुरांची डाळ तापवून निवालेल्या पाण्यांत वाटून पायांला लेप करावा; अथवा लोणी चोळून पाय तापवावे; ह्मणजे क्षणमात्रेंकरून पाददाह शांत होतो.

पाददाहावर लेप.

गुडूच्यैरंडबीजानिदध्नापिष्ट्वाप्रलेपयेत् ॥

पाददाहेहितंप्रोक्तंमहानिंबफलानिच ॥

अर्थ–गुळवेल व एरंड्यांचे गोळे दह्यांत वाटून त्याचा; किंवा कडुनिंब व चिकणामूळ वाटून त्यांचा पायांना लेप करावा; ह्मणजे पाददाहावर हित होतें.

पादहर्षलक्षण.

हृष्येतेचरणौयस्यभवतश्चप्रसुप्तकौ ॥

पादहर्षःसविज्ञेयःकफवातप्रकोपजः ॥

अर्थ–पांयांस मेहेरी येऊन स्पर्श कळेनासा होतो; त्याला पादहर्ष ह्मणतात. तो कफवाताच्या कोपापासून होतो.

चिकित्सा.

पादहर्षेतुकर्तव्यःकफवातहरोविधिः ॥

अर्थ–पाद हर्षावर कफवातनाशक उपचार करावे.

बाहुशोषनिदान.

अंसदेशस्थितोवायुःशोषयेदंसबंधनं ॥

अंसबंधनशोषःस्याद्बाहुशोषःसवेदनः ॥

अर्थ–वायु स्कंधप्रदेशीं राहून खांद्याचें बंधन व शोषण करितो. त्याला अंसबंधन शोष ह्मणतात; व तो वेदनायुक्त असतां; बाहुशोष ह्मणतात.

चिकित्सा.

बाहुशोषेपिबेद्भुक्त्वासर्पिःकल्याणकंमहत् ॥ बलामूलशृतंतोयं सैंधवेनसमन्वितं ॥ बाहुशोषकरेवातेमन्यास्तंभेचशस्यते ॥

अर्थ–बाहुशोष झाला असतां; भोजन करून नंतर (बृहत्कल्याणक घृत) प्राशन करावें; किंवा चिकण्याच्या मुळांचा काढा करून सैंधव मिसळून घ्यावा; हा बाहुशोष व मन्यास्तंभवात यांवर प्रशस्त आहे.

रसोनकल्क.

क्षीरेणतैलेनघृतेनवापिमांसेनसार्धंलशुनानिखादेत् ॥ शाल्योदनेनापिचषष्टिकेनपलार्धवृध्यादिवसानिसप्त ॥ वातोत्थरोगान्विषमज्वरांश्चशूलान्सगुल्मान्दहनस्यमांद्यं ॥ प्लीहानमुग्रंभुजपार्श्वशूलंशिरोव्यथांक्षंततिशुक्रदोषान् ॥

अर्थ–दूध, तेल, तूप किंवा मांस याजबरोबर अथवा साठके भाताबरोबर दोन दोन तोळे लसूण चढती या प्रमाणें सात दिवस भक्षण केली असतां; वातापासून झालेले

व्याधि, विषमज्वर, शूल, गुल्म, अग्निमांद्य, प्लीहा; व भुज, पार्श्व, आणि मस्तक यांचा शूळ व शुक्रदोष यांचा नाश करितो.

बाहुशोषचिकित्सा.

बलामूलभवःक्वाथःसैंधवेनसमन्वितः ॥
बाहुशोषगदंनस्यात्धन्यान्माषरसोथवा ॥

अर्थ—चिकण्याच्या मुळांचा काढा करून त्यांत सैंधव घालून द्यावा; किंवा उडदांचे काढे काढून त्याचें नस्य द्यावें; ह्मणजे बाहुशोषवात नाश पावतो.

अवबाहुकलक्षण.

शिराःसंकोच्यबाहुस्थःसकुर्यादवबाहुकः ॥

अर्थ—बाहुचा आश्रय करुन जो शिरांचा संकोच करतो, त्याला अवबाहुक असें ह्मणतात.

चिकित्सा.

परमौषधमवबाहुकमन्यास्तंभोर्ध्वजत्रुगतरोगे ॥
शीतलजलेननस्यंतदुपशमेंजिंगिनीचपुरः ॥

अर्थ—अवबाहुक, मन्यास्तंभ व खांद्याच्या वरील भागाचे रोग, यांवर मंजिष्ठ आणि गुग्गुळ, थंड पाण्यांत उगाळून त्याचें नस्य करावें. हें उत्तम औषध आहे.

मूलंबलायास्त्वथपारिभद्राचथात्मगुप्तास्वरसंपिबेद्वा ॥ युंजी
तयोमाषरसेननस्यंभवेदसौवज्रसमानबाहुः ॥

अर्थ—चिकणामूळ व कडुलिंबाचें मूळ, यांचा काढा अथवा कुहिलीचा रस, प्यावा; अथवा उडदांच्या काढ्याचें नस्य करावें; ह्मणजे वज्राप्रमाणे बाहु होतात.

माषतैल.

माषातसीयवकुरंटककंटकारीगोकंटटुंटुकजटाकपिकच्छुतो
यैः ॥ कार्पासकास्थिशणबीजकुलत्थकोलक्काथेनवस्तपिशि
तस्यरसेनचापि ॥ शुंठ्यासमागधिकयाशतपुष्पयाचसैरंडमू
लकपुनर्नवयाहरण्या ॥ रास्नाबलामृतलताकटुकैर्विपक्कंमा
षाख्यमेतदवबाहुहरंहितैलं ॥

अर्थ—उडीद, जवस, सातु, पिवळा कोरांटा, रिंगणी, गोखरूं, टेंटू, जटामांसी, कुहिली, वाळा, कापसाच्या बिया, तागाचें बीं, कुळित्थ व बोर यांचा काढा, बोकडाच्या मांसाचा रस, सुंठ, पिंपळी, बडिशेप, एरंडमूळ, पुनर्नवा, हरणवल्ली, रास्ना, चिकणा,

गुळवेल व कटुकी यांचें चूर्ण एकत्र करुन यांचे बरोबर कढवलेलें तेल अवबाहुकाचें नाशक आहे. याला माषाख्यतेल ह्मणतात.

अतसीखलिविश्वरजोगुडेनसंमर्द्यमोदकोभुक्तः ॥
अपहरत्यवश्यमववाहुकतकौतुकंनात्रसंदेहः ॥

अर्थ—अळशी, देवदार व सुंठ, यांचें चूर्ण गुळाशीं मर्दन करुन त्याची गोळी द्यावी; ह्मणजे अवश्य अवबाहुकवायूचा नाश करित्ये. हें कौतुक आहे, यांत संदेह नाहीं.

माषतैलादि मर्दन.

माषतैलरसोनाभ्यांवाहोश्चपरिमर्दनात् ॥
दशांघ्रिमाषक्काथेनजयेद्वैयोववाहुकं ॥

अर्थ—माषतेल आणि लसूण एकत्र करून बाहूंचें मर्दन करावें; अथवा दशमुळें व उडीद यांचा काढा प्यावा; ह्मणजे अववाहुकाचा नाश होतो.

मूक, मिम्मिण व गद्गद निदान.

आवृत्यवायुःसकफोधमनीःशब्दवाहिनीः ॥
नरान्करोत्यवचनान्मूकमिम्मिणगद्गदान् ॥

अर्थ—वायु कफाशीं युक्त होऊन शब्दवाहिनी शिरा आंखडून धरून मनुष्यास तोत्रेपणा मुकेपणा, गेंगाणेपणा व गळा दाटून बोलणें असे विकार उत्पन्न करतो.

सारस्वत घृत.

प्रस्थंघृतस्यपलिकैःशिग्रुवचालवणधातकीलोध्रैः ॥ आजेपयसिविपक्कंसिद्धंसारस्वतंनाम्ना ॥ विधिवदुपयुज्यमानंजडगद्गदमूकतां क्षणाज्जित्वा ॥ स्मृतिमतिमेधाप्रतिमाःकुर्यात्सस्पष्टवाग्भवति ॥

अर्थ—तूप ६४ तोळे व शेवगा, वेखंड, सैंधव, धायटीचीं फलें, आणि लोध्र, हीं प्रत्येक ४ तोळे, या प्रमाणें घेऊन शेळीच्या दुधांत पक्व करावीं; ह्मणजे हें सारस्वतघृत सिद्ध होतें. तें यथाविधि सेवन केलें असतां; सर्व वाणीचे दोष दूर करून बुद्धि, स्फूर्ति, व स्पष्ट भाषण यांतें देतें.

दशमूलस्यनिर्यूहोहिंगुपुष्करचूर्णितः ॥
शमयेत्परिपीतस्तुवाणींमिम्मिणसंज्ञितां ॥

अर्थ—दशमुळांचा काढा हिंग व पोखरमूळ यांचें चूर्ण घालून प्यावा; तो वाणीचा मिम्मिणतादोष दूर करतो.

तूनीलक्षण.

अधोयावेदनायातिवर्चोमूत्राशयोत्थिता ॥
भिंदतीवगुदोपस्थंसातूनीनामतोमता ॥

अर्थ–गुद व शिश्न यांच्या ठिकाणीं भेदल्यासारिखी वेदना होऊन अधोभागीं जात्ये तिला तूनी ह्मणतात.

प्रतूनीलक्षण.

गुदोपस्थोत्थिताचैवप्रतिलोमंविधाविता ॥
वेगैःपक्वाशयंयातिप्रतूनीचेहसोच्यते ॥

अर्थ–जी वेदना गुद व शिश्न यांचा ठायीं होऊन वर पोटाकडे चढून पक्वाशयाप्रत येत्ये, तिला प्रतूनी ह्मणतात.

त्यांवर चिकित्सा.

तून्यांचप्रतितून्यांचप्रशस्तास्नेहबस्तयः ॥ पिबेद्वास्नेहलव
णंपिप्पल्यादिमथांबुना ॥ उष्णेनरामठक्षारप्रगाढमथवाघृतं ॥

अर्थ–तूनी व प्रतूनी यांवर स्नेहबस्ति करावे; किंवा लवण व तूप हें प्राशन करावें; अथवा पिंपळीचें चूर्ण पाण्याबरोबर घ्यावें; किंवा ऊन पाण्याबरोबर हिंग व सैंधव घ्यावें; अथवा घृत प्राशन करावें.

आध्मानलक्षण.

साटोपमत्युग्ररुजमाध्मातमुदरंभृशं ॥
आध्मानमितिजानीयाद्घोरंवातनिरोधजं ॥

अर्थ–पोटांमध्यें गुडगुड शब्द होउन शूल होतो; व पोट फुगतें त्याला आध्मान जाणावें. हें महाभयकारक आहे. हें वातनिरोधानें उत्पन्न होतें.

चिकित्सा.

आध्मानेलंघनंपूर्वंदीपनंपाचनंततः ॥
फलवर्तिक्रियांकुर्याद्वस्तिकर्मचशोधनं ॥

अर्थ–आध्मानाचा ठायीं पूर्वी लंघन करावें; नंतर दीपन व पाचन करावें; आणि फलवर्ती, बस्तिकर्म व रेचक, हे उपाय करावे.

नाराचचूर्ण.

कर्षमात्राभवेत्कृष्णात्रिवृतास्यात्पलोन्मिता ॥ खंडाद्दपिपलं
ग्राह्यंचूर्णमेकत्रकारयेत् ॥ मधुनाक्षमितंलिह्याच्चूर्णमाध्माननाशनं ॥

अर्थ–एक तोळा पिंपळी, तेड ४ तोळे, खडीसाखर ४ तोळे, या प्रमाणें चूर्ण एकत्र करून तीन मासे मधाशीं सेवन केलें असतां; पोटाची फुगवटी दूर होत्ये.

दारुषट्कलेप.

दारुहैमवतीकुष्ठशताव्हाहिंगुसैंधवैः ॥
लिंपेत्कोष्णैरम्लपिष्टैःशूलाध्मानयुतोदरं ॥

अर्थ–देवदारु, वेखंड, कोष्ठकोळिंजन, शतावरी, हिंग व सैंधव हे पदार्थ लिंबाच्या रसांत वाटून ऊन करून उदराला लेप केला असतां; शूल व पोटाची फुगवटी यांचा नाश होतो.

महानाराचरस.

अभयारग्वधोधात्रीदंतीतिक्तास्नुहीत्रिवृत् ॥ मुस्ताप्रत्येकमेतानिग्राह्याणिपलमात्रया ॥ तानिसंक्षुद्यसर्वाणिजलाढकयुगेपचेत् ॥ तत्रतोयेष्टमंभागंकषायमवशेषयेत् ॥ निस्त्वग्जैपालबीजानिनवानिपलमात्रया ॥ तनुवस्त्रधृतान्येवतस्मिन्क्वाथेशनैःपचेत् ॥ ज्वालयेदनलंमंदंयावत्क्काथोघनोभवेत् ॥ ततःखल्वेक्षिपेद्भागानष्टौजैपालबीजतः ॥ भागांस्त्रीन्नागराद्द्वौचमरिचाद्द्वौचपारदात् ॥ गंधकाद्द्वौचतानीहयावद्यामंविमर्द्दयेत् ॥ रसोनाराचनामायंभक्षितोरक्तिकामितः ॥ जलेनशीतलेनैवरोगानेतान्विनाशयेत् ॥ आध्मानंशूलमानाहंप्रत्याध्मानंतथैवच ॥ उदावर्तं तथागुल्ममुदराणिहरत्यसौ ॥ वेगेशांतेचभुंजीतशर्करासहितंदधि ॥ ततस्तत्सैंधवेनापिततोदध्योदनंमनाक् ॥

अर्थ–हरीतकी, बाहव्याचा मगज, आवळकठी, जेपाळ, कुटकी, निवडुंग, तेड व नागरमोथा हीं प्रत्येकीं चार तोळे घेऊन कुटून ५१२ तोळे पाण्यांत अष्टमांश काढा करून गाळून घ्यावा; आणि त्या काढ्यांत जेपाळाच्या सोललेल्या बिया ४ तोळे वस्त्रांत पोटलीं बांधून मंदाग्नीवर शिजवाव्या. जोपर्यंत काढा घट्ट होई तोंपर्यंत आटवून नंतर खलामध्यें त्या जेपाळबीजाचे ८ भाग, सुंठ ३ भाग, मिरीं, पारा व गंधक हीं दोन दोन भाग सर्व एकत्र करून त्यांचा एक प्रहर खल करावा. हा नाराचरस थंड पाण्याशीं एक गुंज घ्यावा; ह्मणजे आध्मान, शूल, वायूचा अवरोध, प्रत्याध्मान, उदावर्त, गुल्म व सर्व उदरें यांचा नाश करितो. रेचांचा वेग शांत झाल्यावर साकर व दहींभात भक्षण करावें; किंवा दहींभात व सैंधव हें पथ्याला थोडें द्यावें.

प्रत्याध्माननिदान.

विमुक्तपार्श्वहृदयंतदेवामाशयोत्थितं ॥

प्रत्याध्मानंविजानीयात्कफव्याकुलितानिलं ॥

अर्थ—कफानें वायूचा रोध होऊन पार्श्वशूल व ऊर यां वांचून आमाशयाचा ठायींच फुगवटी येत्ये, त्याला प्रत्याध्मान ह्मणावें.

चिकित्सा.

प्रत्याध्मानेसमुत्पन्नेकुर्याद्वमनलंघने ॥
दीपनादीनिप्रयुंजीतपूर्ववद्बस्तिकर्मच ॥

अर्थ—प्रत्याध्मान उत्पन्न झाला ह्मणजे वमन आणि लंघन करावें; नंतर दीपनादिक उपचार व बस्ति इत्यादि उपचार करावे.

वाताष्ठीलानिदान.

नाभेरधस्तात्संजातःसंचारीयदिवाचलः॥ अष्ठीलावद्घनोग्रंथिरूर्ध्वमायतमुन्नतः॥वाताष्ठीलांविजानीयाद्बहिर्मार्गावरोधिनीं ॥

अर्थ—बेंबीच्या खालीं आठलेतारिखा लांब व उंच फिरणारा किंवा अचल असा जो ग्रंथि होतो; आणि मल व मूत्र या मार्गांचा रोध करितो; त्याला वाताष्ठीला ह्मणतात.

प्रत्यष्ठीला.

एतामेवरुजोयुक्तांवातविण्मूत्ररोधिनीं ॥
प्रत्यष्ठीलामितिवदेज्जठरेतिर्यगुत्थितां ॥

अर्थ—वरच्या प्रमाणेंच बेंबीखालीं पोटाकडे तिर्कस ग्रंथि होऊन फार दुखतो; आणि मल व मूत्र या मार्गांचा रोध करितो, त्याला प्रत्यष्ठीला ह्मणतात.

हिंग्वादि चूर्ण.

हिंगुग्रंथिकधान्यजीरकवचाचव्याग्निपाठाशठीवृक्षाम्लंलवणत्रयंत्रिकटुकंक्षारद्वयंदाडिमं ॥ पथ्यापौष्करवेतसाम्लहपुषाजाज्यस्तदेभिःकृतं चूर्णंभावितमेतदार्द्रकरसैःस्याद्बीजपूरद्रवैः ॥

अर्थ—हिंग भाजलेला, पिंपळमूळ, धनें, जिरें, वेखंड, चवक, चित्रक, पाडळ, कचोरा, चिंच, सैंधव, बिडलोण, मीठ, सुंठ, मिरीं, पिंपळी, यवक्षार, टांकणखार, डाळिंब, हरीतकी, पोखरमूळ, आम्लवेतस, थोरशेरणी व शेतजिरें यांचें चूर्ण करुन त्यास आल्याचा रसाच्या व माहाळुंगाच्या रसाच्या भावना द्याव्या; आणि योग्य अनुपानाशीं अष्ठीलेवर योजावें.

प्रत्यष्ठीलादिचिकित्सा.

प्रत्यष्ठीलाष्ठीलकयोर्गुल्मेभ्यंतरविद्रधौ ॥

क्रियाहिंग्वादिचूर्णंचशस्यतेत्रविशेषतः ॥

अर्थ—प्रत्यष्ठीला, अष्ठीला, गुल्म व अंतरविद्रधि यांवर हिंग्वादि चूर्ण द्यावें; व विशेषेंकरून हीच क्रिया प्रशस्त आहे.

दुसरा प्रकार.

हिंग्वाम्लत्रिकटूग्रपटूकटुशठीवृक्षाम्लदीप्यालकापाठाजाज्यजगंध
मूलहेपुपाद्विक्षारसाराभया ॥ हिध्माध्मानविबंधवर्धमकसनश्वासा
ग्निमादारुचिप्लीहार्शोखिलशूलगुल्मगदहृद्रोगाश्मपांडुप्रणुत् ॥

अर्थ—हिंग, अम्लवेतस, सुंठ, मिरीं, पिंपळीं, वेखंड, सुंठ, मिरीं, पिंपळी, चवक, चित्रक, पिंपळमूळ, कचोरा, आमसोल, ओंवा, कंकोळ, पाडळ, जिरें, आस्कंध, पोखरमूळ, मोठी शेरणी, जवखार, टांकणखार, चारोळी व हरीतकी, यांचें समभाग चूर्ण करून घ्यावें; म्हणजे उचकी, पोटाची फुगवटी, मलबंधता, अंडवृद्धि, कास, श्वास, अग्निमांद्य, अरुचि, प्लीहा, अर्श, सर्व शूल, गुल्म, हृद्रोग, अश्मरी व पांडु यांचा नाश करितें.

हिंग्वादियोग.

हिंगूग्रगंधाविडशुंठ्यजाजीहरीतकीचित्रकमूलकुष्टं॥
भागोत्तरंचूर्णितमेतदिष्टंगुल्मोदराष्ठीलविषूचिकासु ॥

अर्थ—हिंग, वेखंड, बिडलोण, सुंठ, जिरे, हरीतकी, चित्रकमूळ व कोष्टकोळिंजन हे पदार्थ भागोत्तरवृद्धीनें घेऊन चूर्ण एकत्र करावें. तें गुल्म, उदर, अष्ठीला व तरळ यांवर प्रशस्त आहे.

नादेयादिकाढा.

नादेयीकुटजार्कशिग्रुवृहतीस्नुग्बिल्वभल्लातकव्याघ्रीकिंशुकपारि
भद्रकरजोपामार्गनीपाग्निकान् ॥ वासामुस्तकपाटलासलवणान्
जग्ध्वारसंपाचितंहिंग्वादिप्रतिवापमेतदुचितंगुल्मोदराष्ठीलिषु ॥

अर्थ—भुयजांबूळ, कुड्याची साल, रुई, शेवगा, रिंगणी, सोटे निवडुंग, बेल, बिबवा, डोर्ली, पळस, कडुनिंब, पित्तपापडा, आघाडा, कळंब, चित्रक, अडुळसा, नागरमोथा, पाडळ, यांचा काढा करून आंत सैंधव व हिंग घालून प्यावा. हा गुल्म, उदर व अष्ठीला यांवर योग्य आहे.

विडंगासव.

विडंगंपिप्पलीमूलंपाठाधान्येलवालुकं॥ कुटजत्वक्फलंरास्नाभार्ङी
पंचपलोन्मितान् ॥ अष्टद्रोणेंभसःपक्त्वाद्रोणशेषंतुकारयेत् ॥ पूतेशी

तेक्षिपेत्तस्मिन्माक्षिकस्यशतत्रयं ॥ धातक्याविंशतिपलंचूर्णंकृत्वानु दापयेत् ॥ व्योपस्यचतुलान्वाष्टौत्रिजातंद्विपलंतथा ॥ फलिनीहेम तोयानांसलोध्राणांपलंपलं ॥ घृतभांडेसमाधायमासमेकंविधारयेत् ॥ एषयोगोहरत्येवप्रत्यष्ठीलाभगंदरान् ॥ ऊरुस्तंभाश्मरीमेहगंडमा लांसविद्रधिं ॥ आढ्यवातंहनुस्तंभंविडंगाख्योमहासवः ॥

अर्थ—वावडिंग, पिंपळीमूळ, पाडळ, आवळकाठी, वाळा, कुडयाची साल, इंद्रजव, रास्ना व भारंगमूळ हीं प्रत्येक वीस वीस तोळे, घेऊन १४ मण १२ शेर पाणी घालून बाकी ३६ शेर १६ तोळे राहीं तों पर्यंत आटवून गाळून घ्यावा; आणि त्यांत ३०० तोळे मध, धायटीफूल ८० तोळे, सुंठ, मिरीं व पिंपळी हीं ३२०० तोळे व दालचिनी, विलाची, तमालपत्र हीं प्रत्येक ८ तोळे; आणि राळे, धोतऱ्याचें बीज, वाळा व लोध्र हीं प्रत्येक ४ तोळे घालून तुपानें रावळेल्या मडक्यांत भरून एक महिना बंद करून ठेवावें. हा योग प्रत्यष्ठीला, भगंदर, ऊरुस्तंभ, अश्मरी, मेह, गंडमाला, विद्रधि, आढ्यवात व हनुस्तंभ यांचा नाश करितो. ह्याला विडंगासव ह्मणावें.

वस्तिवातलक्षण.

मारुतेनुगुणेवस्तौमूत्रंसम्यक्प्रवर्तते ॥
विकाराविविधाश्चापिप्रतिलोमेभवंतिहि ॥

अर्थ—वस्तीच्या ठायीं वायु राहिला असतां; मूत्रप्रवृत्ति चांगली होत्ये; आणि विकृत होऊन राहात असतां; नानाप्रकारचे मूत्रकृच्छ्रादि विकार होतात.

चिकित्सा.

बलामूलत्वचश्चूर्णंससितंकर्षसंमितं ॥
पिबेत्कुडवदुग्धेनमुहुर्मूत्रणशांतये ॥

अर्थ—चिकण्याच्या मुळांच्या सालीचें चूर्ण एक तोळा व साकर एक तोळा, हीं सोळ तोळे दुधांत घालून प्यावीं; ह्मणजे वारंवार मुतण्याची शांति होत्ये.

हरितक्यादिचूर्ण.

पथ्याविभीतधात्रीणांचूर्णंचूर्णंमृतायसः ॥
मधुनासहसंलीढंमुहुर्मूत्रणशांतिकृत् ॥

अर्थ—हरीतकी, बेहेडे, आवळकाठी यांचे चूर्ण व लोहभस्म एकत्र करून मधाशीं घेतलें असतां; वारंवार मुतण्याची शांति करितें.

यवक्षारचूर्ण.

यवक्षारस्यचूर्णंतुसंयोज्यसितयासह ॥
भक्षयेन्नियतंतस्यप्रशाम्येन्मूत्रनिग्रहः ॥

अर्थ—यवक्षाराचें चूर्ण, साकरेशीं घेत गेलें असतां; मूत्रग्रह शांत होतो.

कूष्मांडबीजयोग.

कूष्मांडस्यतुबीजानिबीजानित्रपुसस्यच ॥
बस्तौसंधारयेत्तेनप्रशाम्येन्मूत्रनिग्रहः ॥

अर्थ—कोहाळ्याचें बीज व कांकडीचे बीज, हीं दोन्हीं एकत्र वाटून बस्तीवर धारण केली असतां; मूत्रनिग्रह शांत होतो.

आमलक्यादियोग.

आमलक्याश्चकल्केनबस्तिमार्गंप्रलेपयेत् ॥
तेनप्रशाम्यतिक्षिप्रंनियमान्मूत्रनिग्रहः ॥

अर्थ-आवळकाठीचा कल्क बस्तिभागावर घातला ह्मणजे नियमेंकरून मूत्रनिग्रह शांत होतो.

चंदनादिवर्ति.

मेहनस्याथवायोनेर्मुखस्याभ्यंतरेशनैः ॥
घनसारयुतांवर्तिंधारयेन्मूत्रनिग्रहे ॥

अर्थ—मूत्रनिग्रहनाशनार्थ लिंगामध्यें किंवा योनिमुखांत, चंदनानें भिजवून वात धारण करावी.

बस्तिगतवायुचिकित्साक्रम.

अथबस्तिगतेवातेकार्योबस्तिविशोधनः ॥

अर्थ—बस्तिगत वात कुपित झाला असतां; बस्तिशोधनविधि करावा.

कंपवायु.

सर्वांगकंपःशिरसोवायुर्वेपथुसंज्ञकः ॥

अर्थ—सर्वांगाचा व विशेषेकरून मस्तकाचा कंप होतो, त्याला कंपवात ह्मणतात.

खल्लीलक्षण.

खल्लीतुपादजंघोरुकरमूलावमोटनी ॥

अर्थ—जो वायु पाय, मांड्या, गुडघे, बाहु,यानां आंवळून धरितो, त्याला खल्लीवात असें ह्मणतात.

चिकित्सा.

कुष्ठसैंधवयोःकल्कश्चुक्रतैलसमन्वितः ॥
सुखोष्णोमर्दनेयोज्यःखल्लीशूलनिवारणः ॥

अर्थ–कोष्ठकोळिंजन व सैंधव यांचा कल्क चुक्रतैल (या निदानांत सांगितलें आहे) त्याशीं मिळवून गरम करून गरम गरम असें मर्दन करावें; ह्मणजे खल्लीवात व शूल यांचें निवारण करितो.

स्थाननामलक्षणवातव्याधिनिदान.

स्थाननामानुरूपैश्चलिंगैःशेषान्विनिर्दिशेत् ॥ सर्वेष्वेतेषुसंसर्गंपित्ताद्यैरुपलक्षयेत् ॥ प्रथमंन्हस्वकेशत्वंततोवाचालतापिच ॥ आटोपःपार्श्वशूलंचपुरीषस्यातिगाढता ॥ तथामलाप्रवृत्तिश्चकंपस्तंभश्चरूक्षता ॥ कार्श्यंकार्ष्ण्यंचशैत्यंचलोमहर्षोव्यथातथा ॥ तोदोभेदःशिरास्फूर्तिरंगमर्दोंगशुष्कता ॥ संकोचश्चांगविभ्रंशोमोहश्चंचलचित्तता ॥ निद्रानाशःस्वेदनाशोवलहानिश्चभीरुता ॥ शुक्रक्षयोरजोनाशोगर्भनाशःपरिश्रमः ॥ एवंविधानिरूपाणिकरोतिकुपितोनिलः ॥ हेतुस्थानविशेषेणभवेद्रोगविशेषकृत् ॥

अर्थ– बाकी राहिलेले वायूंचा त्या त्या स्थानानुरूप नाम निर्देश करावा; आणि या सर्व वायूमध्ये पित्तादिकांचा संसर्ग जाणावा. ते वातभेद सांगतो. न्हस्व केशत्व, वाचाळपणा, गुडगुड शब्द, पार्श्वशूल, शौचाला घट्ट धरतो, मलस्तब्धता, कंप, स्तब्धता, रूक्षता, कृशता, कृष्णता, शैत्य, रोमहर्ष, ठणका, शूळ, भेद, शिरांचें स्फुरण, अंगमर्द, अंगशुष्कता, अंगसंकोच, अंगभ्रंश, मोह, चित्ताला चंचळपणा, निद्रानाश, स्वेदनाश, बलहानि, भ्याडपणा, शुक्रक्षय, रजःक्षय, गर्भनाश व श्रम या प्रमाणें वायु कुपित झाला असतां; हेतु व स्थान यांच्या योगानें नानाव्याधि उत्पन्न करितो.

चिकित्सा.

सामान्यवातरोगाणांयाचिकित्साप्रवर्तते ॥
एषांसैवविधातव्याततस्तेयांतिसंक्षयं ॥

अर्थ–सामान्यवातरोगावर जी चिकित्सा सांगीतली आहे, ती यांवर करावी; ह्मणजे नाश पावतील.

लशुनसेवन.

अन्नप्रकारैःपललप्रकारैर्गोधूमकैर्वायवसक्तुभिर्वा ॥

दुग्धेनतैलेनघृतेनचापियुक्तानिशीतेलशुनानिखादेत् ॥

अर्थ–भक्ष्यपदार्थांशीं किंवा मांसाच्या प्रकाराशीं; किंवा गोधूम, यव, सातु, दूध, तेल व तूप यांबरोबर शीतनाशार्थ लसूण भक्षण करावी.

शुंठ्यादिकाढा.

विश्वैरंडशिफादारुगुडूचीसहचरास्तथा ॥

एतत्क्काथोस्तिसंधिस्थवातंहंतिनिषेवितः ॥

अर्थ–सुंठ, एरंडमूळ, देवदार, गुळवेल व कोरांटा यांचा काढा घेतला असतां; अस्थिगत व संधिगत वायूचा नाश करितो.

दशमूलादिकाढा.

दशमूलीकषायेणपिबेद्वानागरांभसा ॥

कटिशूलेषुसर्वेषुतैलमैरंडसंभवं ॥

अर्थ–दशमुळांच्या काढ्याशीं, किंवा सुंठीच्या काढ्याशीं एरंडाचें तेल द्यावें.

कटिवातावर लाडू.

आलिवंखाखसखसखारिकखर्जूरमेथिकातिलाः॥ मिशिद्वयंचभल्लास्थिवाता मंवब्बुलंतथा ॥ सारंचैवपलंग्राह्यंगुडोद्विकुडवस्तथा ॥ घृतंद्विकुडवं चैवलड्डुकान्कारयेद्भिषक् ॥ द्विकर्षभक्षयेत्प्रातःकटिवातविनाशनं ॥ धातुस्तंभंधातुवृद्धिंकुरुतेनात्रसंशयः ॥

अर्थ–अहाळीव, खसखस, खारीक, मेथ्या, तिळ, शोप, बाळंतशोप, बिबव्याचे गोळे, बदाम, गोंद व चारोळ्या हीं प्रत्येक ४ तोळे; गूळ व तूप हीं प्रत्येक ३२ तोळे घेऊन यांचे दोन तोळ्याचे लाडू करावे. त्यांतून प्रातःकाळीं एक भक्षण करावा. तो कटिवायूचा नाश करितो; व धातूचें स्तंभन व धातूची वृद्धि करितो, यांत संशय नाहीं.

ऊरुस्तंभावर सामान्यविशेषचिकित्सा.

ऊरुस्तंभंजयेद्रुक्षस्वेदमर्दनकौशिकैः ॥ पिप्पलीपिप्पलीमूलं भल्लातकफलानिच ॥ एतत्कल्कश्चसक्षौद्रऊरुस्तंभनिवारणः॥

अर्थ–ऊरुस्तंभव्याधि–रूक्षस्वेद, मर्दन व गुग्गुळ या उपचारांनीं शमवावा; व पिंपळी, पिंपळमूळ व बिबवे यांचा कल्क मधासीं द्यावा. तो ऊरुस्तंभाचा नाश करितो.

सामान्यसंज्ञा.

वामनत्वांगसंकोचभंगभेदग्रहव्यथाः ॥ मर्दनैर्बस्तिभिःक्काथैःस्वेदनैश्च

भिषक्जयेत् ॥ अपतानव्रणायामौसस्नेहैर्व्रणचिकित्सितैः ॥ अंगरौक्ष्य
स्तंभकंपकार्श्यकार्ष्णशतोदनैः ॥ दौर्बल्यस्फुरणेभ्रंशेस्नेहैर्मर्दनमिष्यते ॥
शुक्रकार्श्यशुक्रनाशेशुक्रस्यातिप्रवर्तने ॥ विड्ग्रहेबद्धविट्केचस्ने
हपानंहितंमतं ॥

अर्थ–कुब्ज, अंगाचा संकोच, ठणका व आंग धरणें इत्यादिकांला मर्दन, बस्ति, काढे इत्यादि देणें, घाम काढणें याणीं जिकावें; आणि अपतान व व्रणायाम यांला स्नेह व व्रणचिकित्सा करावी; व आंगाची रुक्षता, अंगस्तंभ, कंप, कृशता, काळेपणा, ठणका, दुर्वळता, अंगस्फुरण व अंगभ्रंश यांवर स्नेहादिकानीं मर्दन करावें; आणि धातुक्षीण, धातुनाश, धातु फार जाऊं लागली तर, विड्ग्रह व बद्धविट्क यांला स्नेहपान हितकारक व मान्य आहे.

ऊर्ध्ववातलक्षण.

अधःप्रतिहतोवायुःश्लेष्मणामारुतेनच ॥
करोत्युद्गारबाहुल्यमूर्ध्ववातःसउच्यते ॥

अर्थ–श्लेष्मवातानें अधोभागीं कोंडलेला वायु फार ढेंकरा उत्पन्न करितो, त्याला ऊर्ध्ववात ह्मणतात.

शुंठ्यादिचूर्ण.

भागादशविश्वायास्तत्तुल्यावृध्दारुकस्यापि ॥ पथ्यात्रपंच
भागाचतुरंशांहिंगुसंभृष्टं ॥ एकःसैंधवभागस्तत्तुल्यंचित्रकं
चात्र ॥ संवृत्थमूर्ध्ववातंहंत्येतच्चूर्णितंभुक्तं ॥

अर्थ–सुंठ व वृद्धदारु १० तोळे, हरीतकी ५ तोळे, भाजलेला हिंग चारतोळे, सैंधव व चित्रक, एक एक तोळा या सर्वांचे चूर्ण तयार करून घ्यावें; ह्मणजे फार वाढलेल्या ऊर्ध्ववाताचा नाश करितें.

श्यामामूलंक्षीरपिष्टंनिपीतंवासायुक्तंनाशयेदूर्ध्ववातं ॥

अर्थ–पिंपळीचें मूळ दुधांत वाटून त्यांत अडुळशाचा रस घालून घावें; ह्मणजे ऊर्ध्ववात नाश पावतो.

त्रिकशूललक्षण.

स्फिक्सक्थ्नोःपृष्ठवंशास्थ्नोर्यःसंधिस्तत्त्रिकंस्मृतं ॥
तत्रवातेनयापीडात्रिकशूलंतदुच्यते ॥

अर्थ–माजेजवळच्या व कटिच्या त्रिकामध्यें जो वायूनें शूळ होतो, त्याला त्रिकशूळ ह्मणतात.

चिकित्सा.

कारयेद्वालुकास्वेदंत्रिकशूलीप्रयत्नतः ॥
खट्वाधस्तत्करीषाग्निंधारयेत्सततंनरः ॥

अर्थ—त्रिकशूलीरोग्याने वाळवेचा शेक घ्यावा; आणि मंचकाखालीं निरंतर गोवऱ्यांचा अग्नि ठेवून शेक घ्यावा.

अभादित्रयोदशांगगुग्गुलु.

आभाश्वगंधाहपुषागुडूचीशतावरीगोक्षुरकश्चरास्ना ॥ श्यामाशताव्हाचशठीयवानीसनागराचेतिसमंविचूर्ण्य ॥ सर्वैःसमंगुग्गुलुमत्र दद्यात्क्षिपेदिहाज्यंचतदर्धभागं ॥ तद्भक्षयेदर्धपिचुप्रमाणंप्रभातकालेसुरयाथयूषैः ॥ मद्येनवाकोष्णजलेनवाथक्षीरेणवामांसरसेनवापि॥ त्रिकग्रहेजानुहनुग्रहेचवातेभुजस्थेचरणस्थितेच॥संधिस्थितेचास्थिगतेचतस्मिन्मज्जास्थितेस्नायुगतेचकोष्ठे॥रोगान्हरेद्वातकफानुविद्धान्वानेरितान्हृद्ग्रहयोनिदोषान् ॥ भग्नास्थिविद्धेषुचखंजतायांसगृध्रसीकेखलुपक्षवाते॥ महौषधंगुग्गुलुमेतमाहुस्त्रयोदशांगंभिषजःपुराणाः॥

अर्थ—बभळीचें बीं, अस्तगंध, शेरणी, गुळवेल, शतावरी, गोखरू, रास्ना, पिंपळी वडिशोप, कचोरा, ओंवा व सुंठ या सर्वांचीं समभाग चूर्णें घेऊन सर्वांबरोबर शुद्ध केलेला गुग्गुलु व गुग्गुलूच्या निमें तूप घालावें; म्हणजे सिद्ध झाला. हा एककर्ष प्रातःकाळीं सुरेबरोबर, किंवा यूषाबरोबर अथवा मद्य, कोमट पाणी, दूध किंवा मांसरस, यां बरोबर घ्यावा; म्हणजे त्रिकांतील ग्रह, जानुग्रह, भुजस्थवात, चरणस्थित, स्नायुगत, कोष्ठवात व वातकफापासून झालेला व्याधि, वातापासून झालेला हृदयशूल, योनिदोष, भग्नास्थि, फुटलेलें हाड, खंजवात, गृध्रसी, पक्षवात, यांचा नाश करितो. हा त्रयोदशांग गुग्गुलु, मोठें औषध आहे, असें पूर्वीचे वैद्य सांगत आले.

रसोनाष्टक.

रसोनपक्वकंदस्यगुलिकानिस्तुषीकृताः ॥ पाटयित्वाचमध्यस्थंदूरीकुर्याच्चदंकुरं ॥ निश्युग्रगंधनाशायदध्नासंनीयरक्षयेत् ॥ ततःप्रक्षाल्य संशोष्यशिलायांपरिपेषयेत् ॥ कल्कस्यपंचमंभागंचूर्णमेषांविनिःक्षिपेत् ॥ सौवर्चलंयवानींचभर्जितंहिंगुसैंधवं ॥ कटुत्रिकंजीरकंचसमभागंविचूर्णयेत् ॥ तिलतैलंचकल्कस्यतुर्यांशंतत्रमिश्रयेत् ॥ खादेत्कर्षमि

तंप्रातःकिंवादोषाद्यपेक्षया ॥ . अनुपानंप्रकुर्वीतवातारिशृतमन्वहं ॥
सर्वांगैकांगजंवातमर्दितंचापतंत्रकं ॥ अपस्मारंतथोन्मादमूरुस्तंभंच
गृध्रसीं ॥ उरःपृष्ठकटीपार्श्वकुक्षिपीडांकृमीन्हरेत् ॥ मद्यंमांसंतथाम्लं
चरसंसेवेतनित्यशः ॥ व्यायाममातपंरोषमतिनीरंगुडंस्त्रियं ॥ रसोन
मश्नन्पुरुषस्त्यजेदेतन्निरंतरं ॥ वर्जयेच्चदतीसारिप्रमेहीपांडुरोगवान् ॥
अरोचकीगर्भिणीचमूर्छार्शोरोगसंयुतः ॥ रक्तपित्तीचशोषीचयक्ष्मीछर्द
र्दितोनरः ॥ पित्तेतुपथ्ययाकुर्यात्प्रयोगेतेविरेचनं ॥ अन्यथातस्यजा
यंतेकुष्ठपांड्वामयादयः ॥ स्त्रीस्तन्यांतरितंदद्याद्बालानामप्यनिच्छतां ॥
तथापिलभतेसिद्धिंमहावीर्याद्रसोनतः ॥

अर्थ—जून लसुणीच्या पाकळया सोलून फोडून आंतिल कोंब काढून घाण जाण्याकरि-तां रात्रीं दह्यांत घालून ठेवाव्या. प्रातःकाळीं धुवून स्वच्छ पुसून घ्याव्या; नंतर त्यांचा वाटून कल्क करावा, त्या कल्कांत संचळ, ओंवा, भाजलेला हिंग, सैंधव, सुंठ, मिरीं, पिंपळी व जिरें ह्यांचें समभाग चूर्ण करून कल्काचे पंचमांश घालावें; व तिळांचें तेल कल्काचे चतुर्थांश घालून सर्व एकत्र करून प्रातःकाळीं एक तोळा भक्षण करावें; किंवा दोष व बल पाहून घ्यावें. याला अनुपान एरंडमुळांचा काढा घ्यावा; ह्मणजे सर्वांग व एकांगगतवात, अर्दित, अपतंत्रक, अपस्मार, उन्माद, ऊरुस्तंभ, गृध्रसी, उर, पाठ, कंबर, पार्श्व व कुक्षि याची पीडा व कृमि, यांचा नाश करितो. हें औषध घेतलें असतां; मद्य, मांस, अम्लरस हे नेहेमीं सेवन करावे; आणि व्यायाम, ऊन, रोप, फार पाणी, गूळ, स्त्रीसेवन, हीं लसूण भक्षण करणाऱ्या पुरुषानें नेहेमीं सोडावीं. हें औषध अतीसारी, मेही, पांडुरोगी, अरोचकी, गार्भिणी, मूर्छावान्, अर्शरोगी, रक्तपित्तवान्, क्षयी, शोषी, ओकारीचा रोगी, यांणीं घेऊं नये. पित्त झालें असतां; बाळहरडीचें ढाळक घ्यावें. रेचक न घेतलें असतां; कुष्ठ व पांडु इत्यादि रोग होतात. स्त्रीच्या दुग्धाशीं बालानां इच्छा नसली तरी द्यावें दिलें असतां; ह्या लसुणीच्या औषधानें रोग शांति होत्ये.

व्रणायाम सांगतो.

मर्माश्रितंव्रणंप्राप्यवायुर्यःसर्वदेहगः ॥
वेगैरानामयेद्देहंव्रणायामंतुतंत्यजेत् ॥

अर्थ—सर्वशरीरगत वायु मर्मस्थानींच्या व्रणाप्रत जाऊन आपल्या वेगें करून देहाला नम्र करितो. त्याला व्रणायाम ह्मणतात. तो असाध्य जाणावा.

हृदयंयदिवापृष्ठमुन्नतंक्रमितःसह ॥

क्रुद्धोवायुर्यदाकुर्यात्तदातंकुब्जमादिशेत् ॥

अर्थ—हृदय अथवा पृष्ठ हीं वायु क्रुद्ध होऊन उंच होतात, त्याला कुब्ज ह्मणतात.

कृच्छ्रसाध्यत्व.

हनुस्तंभार्दिताक्षेपपक्षाघातापतानकाः ॥ कालेनमहतावातायत्ना

त्सिद्ध्यंतिवानवा ॥ नवान्बलवतस्त्वेतान्साधयेन्निरुपद्रवान् ॥

अर्थ—हनुस्तंभ, अर्दित, आक्षेपक, पक्षघात व अपतानक हे वातरोग मोठ्या यत्नें करून हेमंत व शिशिरऋतूंत सिद्ध होतात; आणि नूतन असून उपद्रवरहित असतां; व रोगी क्षीण झाला नसतां; औषधादिकें करून साध्य होतात.

वातरोगाचें असाध्यत्व.

विसर्पदाहरुक्संगमूर्छारुच्यग्निमार्दवैः ॥ क्षीणमांसबलंवातात्घ्नंति

पक्षवधादयः ॥ शूनंसुप्तत्वचंभग्नंकंपाध्माननिपीडितं ॥ रुजार्तिमंतंच

नरंवातव्याधिर्विनाशयेत् ॥ अव्याहतगतिर्यस्यस्थानस्थःप्रकृतिस्थि

तः ॥ वायुःस्यात्सोधिकंजीवेद्वीतरोगःसमाःशतं ॥

अर्थ—विसर्प, दाह इत्यादि नानाप्रकारची पीडा व मूत्र, पुरीष, अपानवायु यांचा अव रोध, मूर्छा, अरुचि व अग्निमांद्य इत्यादि उपद्रवें करून ज्याचें मांस व बळ क्षीण झालें, आणि सूज व जाचा सत्वचा बधिर व भग्न जाल्या आहेत; व कफ आणि पोट फुगणें यांहीं करून पीडित होऊन ज्यास ठणका होतो अशा मनुष्याचा वातरोग नाश करितो; व ज्या मनुष्याचा वायु अव्याहतगति असून आपलें स्थान व प्रकृति सोडित नाहीं, तो मनुष्य निरोगी असून शत वर्षांपेक्षां अधिक वांचतो.

बत्तिसी काढा

रास्नागुडूचीह्रीबेरंडदेवाव्हाचाभयासठी॥ वचोग्रगंधापाठाचशतपुष्पा

पुनर्नवा ॥ पंचमूलीविषामुंडीसौर्यकश्चदुरालभा ॥ यवानीपौष्करं

मूलमश्वगंधाप्रसारिणी ॥ गोक्षुरंचाटरूषंचवपुषावृद्धदारुकं ॥ श

तावरीतथाब्राह्मीगुग्गुलीक्षीरकंचुका ॥ समभागैरिमैःसर्वैःकषायमुप

कल्पयेत् ॥ कृष्णाचूर्णेनवायोगराजगुग्गुलुनाथवा ॥ अजमोदादि

नावापितैलैनैरंडजेनवा ॥ वातरोगेषुसर्वेषुकफशोपेप्रतानके॥ मन्या

स्तंभेतथाशोषेपक्षाघातेसुदारुणे॥ अर्दिताक्षेपकुब्जेचहनुग्रहस्वरग्रहे॥

आढ्यवातेतथामूकेखंजेचैवावबाहुके ॥ गृध्रस्यांजानुभेदेचगुल्मेशू

ल्केकटिग्रहे ॥ सामेचैवनिरामेचसप्तधातुगतेनिले ॥ आवृतेचैवानावृ
तेचवातरक्तेविशेषतः ॥ एषद्वात्रिंशकःक्वाथःकृष्णात्रेयेणभाषितः ॥

अर्थ–रास्ना, गुळवेल, एरंडमूळ, देवदार, हरीतकी, कचोरा, चिकणामूळ, वेखंड, पाहाडमूळ, शेपा, पुनर्नवा, पंचमुळें, अतिविष, मुंडी, विबळा, धमासा, ओंवा, पुष्करमूळ, अश्वगंध, लाजाळू, गोखरू, अडुळसा, कांटेखिरणी, वृद्धदारू, शतावरी, ब्राह्मी, गुग्गुळ; आणि क्षीरकंचुका हे पदार्थ समभाग घेऊन त्यांचा काढा करावा; आणि त्यांत पिंपळीचें चूर्ण, योगराजगुग्गुल, अजमोदादिचूर्ण किंवा एरंडतेल, यांतून कोणतेंही एक घालून संपूर्ण वातरोग, कफशोष, प्रतान, मन्यास्तंभ, शोष, पक्षघात, अर्दित, आक्षेपक, कुब्ज, हनुग्रह, स्वरभंग, आढ्यवात, मूकवात, खंजवात, अवबाहुक, गृध्रसी, जानुभेद, गुल्म, शूल, कटिग्रह, आमवात, निरामवात, सप्तधातुगत वात, आवृत, अनावृत, आणि वातरक्त यांवर द्यावा. हा द्वात्रिंशाग काढा अत्रिगोत्रोत्पन्न कृष्णनामक पुरुषानें सांगितला आहे.

लघुरास्नादि काढा.

रास्नागुडूचीवातारिदेवदारुमहौषधैः ॥
पिबेत्सर्वांगिकेवातेसमज्जास्थिसमांसगे ॥

अर्थ–रास्ना, गुळवेल, एरंडमूळ, देवदार व सुंठ यांचा काढा सर्वांगवात, मज्जागत, अस्थिगतवात; आणि मांसगतवात यांवर प्यावा.

दुसरा प्रकार.

रास्नैरंडशिफादारुवचाशुंठीदुरालभा ॥ अभयातिविषामुस्ताशतमू
लीवृषातथा ॥ अमीषांक्वाथपानेनकासामश्लेष्मसांधिगः ॥ मज्जा
स्थिस्नायुसर्वांगवायुर्नश्यतिनिश्चितं ॥

अर्थ–रास्ना, एरंडमूळ, देवदार, वेखंड, सुंठ, धमासा, हरीतकी, अतिविष, नागरमोथा, शतावरी व अडुळसा यांचा काढा प्राशानार्थ द्यावा; ह्मणजे खोकला, आमवात, श्लेष्मवात, संधिवात व मज्जा, अस्थि व स्नायू यांतील वायु आणि सर्वांगवायु हे निश्चयानें नाश पावतात.

रास्नादिचूर्ण.

रास्नाकुष्ठनतद्रुपट्कटुशठीपाठावचासारिवाभूनिंबत्रिफलादशजटा
निर्गुंडिकैरंडकं ॥ हिंग्वाम्लार्द्रकबस्तगंधकबरीक्षारौपटूनांत्रयंचूर्णंपु
ष्करतैलयुक्तमखिलान्वातानशीतीर्जयेत् ॥

अर्थ–रास्ना, कोष्ठ, तगर, सुंठ, मिरीं, पिंपळी, चवक, चित्रक, पिंपळमूळ, कचोरा पाहाडमूळ, वेखंड, उपळसरी, काडेचिराईत, त्रिफळा, चिकणा, दशमूळें, निर्गूंड, एरं-

डमूळ, हिंग, आम्लवेतस, आले, रानतुळस, बाभूळ, जवखार, टांकणखार, सैंधव, बिडलोण व पादेलोण, यांचें चूर्ण पोखरमुळाचे काढ्याबरोबर सिद्ध केलेलें तेल, यांशी सेवन केलें असतां; ऐशीं प्रकारच्या वायूचा नाश होतो.

आभादिचूर्ण.

आभारास्नागुडूचीचशतावर्योमहौषधं ॥ शतपुष्पाश्वगंधाचहपुषा वृत्वदारुकं ॥ यवानीचाजमोदाचसमभागानिकारयेत् ॥ सूक्ष्मचूर्णमिदंकृत्वाविडालपदकंपिबेत् ॥ मद्यैर्मांसरसैर्यूषैस्तक्रैरुष्णोदकेनवा ॥ सर्पिषावापिबेचस्तुदधिमंडेनवापुनः॥अस्थिसंधिगतंवायुंस्नायुमज्जाश्रितंचयत् ॥ कटिग्रहंगृध्रसींचमन्यास्तंभंहनुग्रहं ॥ येचकोष्ठगतारोगास्तांश्चसर्वान्विनाशयेत् ॥ आभाद्योनामचूर्णोयंसर्वव्याधिनिबर्हणः ॥

अर्थ—बाभळीचें बीं, रास्ना, गुळवेल, शतावरी, महाशतावरी, सुंठ, बडिशेप, अस्कंध, शेरणी, वरधारा, ओवा, अजमोदा. हीं सर्व समभाग घेऊन त्यांचें चूर्ण करून मद्य, मांसरस, यूष, तक्र, ऊनपाणी, घृप व दह्यांचा मंड त्यांतून एका अनुपानाशीं २ दोन तोळे प्रमाणें खावें; ह्मणजे अस्थि, संधि, स्नायु, मज्जा व कंबर या ठिकाणचा वायु, गृध्रसी, मन्यास्तंभ, हनुग्रह व कोष्ठगतरोग या सर्वांचा नाश करील. याला आभादिचूर्ण ह्मणतात. हें सर्व व्याधिनाशक आहे.

रास्नादि चूर्ण.

रास्नाशतावरीदारुकंकोलंलांगलीकणा ॥ रक्तचंदनमंजिष्ठाकृत्विसैंधवपद्मकः ॥ अश्वगंधामृतापाठामुस्तैलाशालिपर्णिका ॥ शतपुष्पाजमोदाचशुंठीकुष्ठंसमांशतः ॥ संघृष्टंचूर्णमेतेषांभक्षितंतप्तवारिणा ॥ त्वगास्थिस्नायुसंभूतंमारुतंहंतिवेगतः ॥

अर्थ—रास्ना, शतावरी, देवदार, कंकोल, कळलावी, पिंपळी, रक्तचंदन, मंजिष्ठा, दृतीच, सैंधव, पद्मकाष्ठ, अश्वगंध, गुळवेळ, पाहाडमूळ, नागरमोथा, एलची, शालिपर्णी, शतपुष्पा, अजमोद, सुंठ व कोष्ट हीं समभाग घेऊन एकत्र करावें; आणि तें गरमपाण्याशीं खावें; ह्मणजे त्वचा, अस्थि व स्नायु यांतील वातव्याधीचा वेगानें नाश करितें.

शिग्रुमूलादिचूर्ण.

शिग्रुमूलकणारास्नाशुंठीगोक्षुरसैंधवं ॥ वन्हिश्चैरंडमुलंचअमीषांचूर्णसंभवा ॥ गुटिकाप्रत्यहंतासामेकैकामदतिध्रुवं ॥ सर्वांगकुपितोवायुःशमंयात्यतिवेगतः ॥

अर्थ–शेवग्याचें मूळ, पिंपळी, रास्ना, सुंठ, गोखरू, सैंधव, चित्रक व एरंडमूळ यांचें चूर्ण करुन त्याची गोळी करावी. ती दररोज एकेक भक्षण करावी; ह्मणजे सर्वांगामध्यें कोपलेला वायु अतिवेगानें शमन पावतो.

अजमोदादि चूर्ण.

अजमोदाकणारास्नागुडूचीविश्वभेषजं ॥ शतपुष्पाश्वगंधाचशतमूली समांशतः ॥ सुश्लक्ष्णंचूर्णमेतेषांभक्षितंसर्पिषासह ॥ हृत्कुक्षिकोष्ठकंठस्थंमारुतंहंतिवेगतः ॥

अर्थ–अजमोदा, पिंपळी, रास्ना, गुळवेल, सुंठ, शोपा, अश्वगंध व शतावरी यांचें समभाग चूर्ण करून तें तुपाशीं भक्षण करावें; ह्मणजे हृदय, कुशी, कोष्ठ व कंठ यांतील वातविकारांचा अतिवेगानें नाश करितें.

कुष्ठादि चूर्ण.

कुष्ठकेंद्रयवापाठापावकोतिविषानिशा ॥
एतेषांचूर्णमुष्णांबुपीतंहंत्यनिलान्बहून् ॥

अर्थ–कोठ, इंद्रजव, पाहाडमूळ, चित्रक, अतिविष आणि हळद यांचें चूर्ण ऊनपाण्याशीं प्राशनार्थ द्यावें, तें अनेकवातविकारांचा नाश करितें.

शुंठ्यादि चूर्ण.

शुंठीमरिचदारूणांचूर्णंक्वाथस्यपानतः ॥
सर्वेवाताविनश्यंतिदेहोपद्रवकारिणः ॥

अर्थ–सुंठ, मिरीं व देवदार यांचें चूर्ण त्यांच्याच काढ्याशीं द्यावें; ह्मणजे देहाला उपद्रव करणारे सर्व वातविकार नाश पावतात.

रास्नादि चूर्ण.

रास्नापुनर्नवाशुंठीगुडूच्येरंडजंशृतं ॥
सप्तधातुगतेवातेवातेसर्वांगगेपिबेत् ॥

अर्थ–रास्ना, पुनर्नवा, सुंठ, गुळवेल व एरंडमूळ यांचा काढा सप्तधातुगत वात, आमवात आणि सर्वांगवात यांवर द्यावा.

द्वात्रिंशकगुग्गुलु.

त्रिकटुत्रिफलामुस्तंविडंगंचव्यचित्रकौ ॥ वचैलापिप्पलीमूलंहपुषासुरदारुच ॥ तुंबरुंपौष्करंकुष्ठंविषाचरजनीद्वयं ॥ बाष्पिकाजीरकंशुंठीशतपत्रावुरालभा ॥ सौवर्चलंविडंगंचक्षारौद्विरदपिप्पली ॥

सैंधवंचसमानेनतुल्यंदत्वाचगुग्गुलुं ॥ साधयित्वाविधानेनकोलमात्रांवटींचरेत् ॥ घृतेनमधुनावापिभक्षयेत्तामहर्मुखे ॥ आमंहन्यादुदावर्तमंत्रवृद्धिंगुदकृमीन्॥महाज्वरोपसृष्टानांभूतोपहतचेतसां ॥ आनाहोन्मादकुष्टानिपार्श्वशूलहृदामयान् ॥ गृध्रसींचहनुस्तंभंपक्षाघातापतानकान् ॥ शोफप्लीहानमत्युग्रंकामलामपचींतथा ॥ नाम्नाद्वात्रिंशकोह्येपगुग्गुलुःकथितोमहान् ॥ धन्वंतरिकृतोयोगःसर्वरोगनिकृंतनः॥

अर्थ—त्रिकटु, त्रिफळा, नागरमोथा, वावडिंग, चवक, चित्रक, दालचिनी, वेलदोडे, पिंपळमूळ, शेरणी, देवदार, चिरफळ, पोखरमूळ, कोष्ठकोळिंजन, आतविष, दारुहळद, हळद, वाभळो, जिरें, सुंठ, विशेष, धमासा, पादेलोण, वावडिंग, जवखार, टांकणखार, गजपिंपळी व सैंधव हीं एक एकभाग या सर्वांच्या बरोबर गुग्गुळ घेऊन रीतिप्रमाणें सिद्ध करून बोराप्रमाणे गोळी करून मधाबरोबर किंवा तुपाबरोबर प्रातःकाळीं भक्षण करावी; ह्मणजे आम, उदावर्त, अंत्रवृद्धि, गुदकृमि यांचा नाश करील; व महाज्वरानें पीडित, भूतबाधा झालेला, आनाह, उन्माद, कुष्ठ, पार्श्वशूल, हृद्रोग, गृध्रसी, हनुस्तंभ, पक्षाघात, अपतानक, शोफ, प्लीहा, कामला व अपची हे रोग झालेल्या मनुष्यांस हितकारक आहे. याला द्वात्रिंशनामा गुग्गुळ असे ह्मणतात. हा मोठा धन्वंतरिकृत योग सर्व रोगांचा नाश करणारा आहे.

योगराजगुग्गुळ वातादिरोगांवर.

नागरंपिप्पलीचव्यंपिप्पलीमूलचित्रकैः ॥ भृष्टंहिंग्वजमोदंचसर्षपाजीरकद्वयं ॥ रेणुकेंद्रयवाःपाठाविडंगंगजपिप्पली ॥ कटुकातिविषाभार्ङ्गीवचामूर्वेतिभागतः ॥ प्रत्येकंशाणिकानिस्युर्द्रव्याणीमानिविंशतिः ॥ द्रव्येभ्यःसकलेभ्यश्चत्रिफलाद्विगुणाभवेत् ॥ एभिश्चूर्णीकृतैःसर्वैःसमोदेयस्तुगुग्गुलुः ॥ वंगंरौप्यंचनागंचलोहसारंतथाभ्रकं ॥ मंडूरंरससिंदूरंप्रत्येकंपलसंमितं ॥ गुडपाकसमंकृत्वाइमंदद्याद्यथोचितं ॥ एकपिंडंततःकृत्वाधारयेत्घृतभाजने ॥ गुटिकाःशाणमात्रास्तुकृत्वाग्राह्यायथोचिताः ॥ गुग्गुलुर्योगराजोयंत्रिदोषघ्नोरसायनः ॥ मैथुनाहारपानानांत्यागोनैवात्रविद्यते ॥ सर्वान्वातामयान्कुष्ठानर्शांसिग्रहणीगदं ॥ प्रमेहंवातरक्तंचनाभिशूलंभगंदरं ॥ उदावर्तंक्षयंगुल्ममपस्मारमुरोग्रहं ॥ मंदाग्निंश्वासकासांश्चनाशयेदरुचिंतथा ॥ रेतोदोप

हरःपुंसांरजोदोषहरःस्त्रियां ॥ पुंसामपत्यजनकोवंध्यानांगर्भदस्तथा ॥ रास्नादिक्काथसंयुक्तोविविधंहंतिमारुतं ॥ काकोल्यादिशृतात्पित्तंक फमारग्वधादिना ॥ दार्वीशृतेनमेहांश्चगोमूत्रेणैवपांडुतां ॥ मेदोवृद्धिं चमधुनाकुष्ठंनिंबशृतेनवा ॥ छिन्नाक्काथेनवातास्रंशोथंशूलंकणाशृ तात् ॥ पाटलाक्काथसहितोविषंशूषकजंजयेत् ॥ त्रिफलाक्काथसहि तोनेत्रार्तिंहंतिदारुणां ॥ पुनर्नवादेःक्काथेनहन्यात्सर्वोदराण्यपि ॥

अर्थ–सुंठ, पिंपळी, चवक, पिंपळमूळ, चित्रक, भाजलेला हिंग, अजमोदा, शिरस, जिरे, शहाजिरें, रेणुकबीज, इंद्रजव, पाहाडमूळ, वावडिंग, गजपिंपळी, कटुकी, अतिविष, भारंगमूळ, वेखंड, गोरवेल हीं वीस औषधें शाण शाण प्रमाण घ्यावी; व या औषधाचे दुप्पट त्रिफळा घ्यावी, मग हीं सारीं औषधें कुटून चूर्ण करून त्याचे समभाग शुद्ध केले ला गुग्गुळ घेऊन बारीक वाटून गुळाच्या पाकासारिखा पातळ करून त्यांत हें चूर्ण घा लावें. मग वंगभस्म, रौप्यभस्म, नागभस्म, लोहभस्म, अभ्रकभस्म, मंडूरभस्म व रससिंदूर हीं सात भस्में पळ पळ प्रमाण त्या गुग्गुळांत घालून सर्वांचा एक पिंड करून त्याच्या गोळ्या शाण शाण प्रमाण बांधून तुपाचे रावल्या मडक्यांत ठेवाव्या. याला योगराज गुग्गु ळ असे म्हणतात. हा गुग्गुळ घेतला असतां; त्रिदोष दूर करितो; व हे रसायन आहे, याला मैथुन व खाणें, पिणें यांचा निषेध नाहीं. पथ्य केल्यावांचून गुण होतो, यापासून सारे वायूचे रोग, कुष्ठें, मूळव्याध, संग्रहणी, परमा, वातरक्त, नाभीचा शूळ, भगंदर, उदावर्तवायु, क्षयरोग, गुल्म, फेंफरें, उरोग्रहरोग, अग्निमांद्य, कास, श्वास व आवटणें हे रोग दूर होतात. हा योगराज गुग्गुळ पुरुषाचे वायूचा विकार दूर करितो, स्त्रियांच्या विटाळाचा दोष दूर करितो, पुरुषाची धातु वाढवून पुत्र देणारा होतो, वांझोट्या स्त्रि- यांना गर्भ देतो, रास्नादिकाढ्यांत घेतला असतां; नानाप्रकारचे वायु दूर होतात, काकोल्यादि काढ्यांत घेतला असतां; पित्तरोग दूर होतो, आरग्वधादि काढ्यांत घेतला असतां; पांडुरोग जातो, शरीरांत मेद दुष्ट होऊन शरीर वाढलें असतां; मधांत घ्यावा, कु ष्ठरोगास कडुनिंबाचे काढ्यांत घ्यावा, रक्तवायूवर गुळवेलीचे काढ्यांत, शूळ व सूज यांजवर पिंपळीचे काढ्यांत उंदिराचे विषावर पाडळीचे काढ्यांत, डोळ्याचे रोगांवर त्रिफळेचे काढ्यांत, पुनर्नवादिकांचे काढ्यांत सर्व्या उदर रोगांवर घ्यावा. याप्रमाणे अनुपानें जाणावीं.

षडशीतिगुग्गुळ.

सैंधवयासविषादारुव्याघ्रीयुक्चविकादृपः ॥ कृष्णाब्दोयावनाभीरुवा दृशालामिशिवल्लरी ॥ पथ्याशुंठीछिन्नरुहाशठ्यारग्वधगोक्षुरं ॥ वि शालागोदवीतिक्तग्रंथिभांर्गीविदारिका ॥ अलंबुषाहस्तिकर्णीपरंतगं

धाविषाणिका ॥ शिवाक्षमुसलीकौंतीकाकोलीदीप्ययुग्मकं ॥ त्रिवृ द्दंतीशिखीशृंगीकोकिलाक्षोदुरालभा ॥ पंचमूलंमहद्वीरतरुःकुष्टंचजों गकं ॥ जातिपत्रीफलैलंचकेसरंत्वक्किरातकं ॥ कुंकुमंदेवकुसुमंवि शालानिशिसैंधवं ॥ मंदारमूलंकृमिजिद्भेमदुग्धारविप्रिया ॥ गज पिप्पल्यपामार्गवानरीनक्तमूलकं ॥ एतैःसमारसाचाभाद्विगुणातैः पुरःसमः ॥ सूतगंधकहिंगुलंटंकणंलोहमभ्रकं ॥ शुल्वंवंगंसूतभस्मनागं ताप्यमयोरजः ॥ मीलितंपुरपादंचसर्वमेकत्रकारयेत् ॥ पचेच्चतुर्गुणे क्वाथेपुरंपट्कटुजेपुरा ॥ तुर्यांशशोपितेक्वाथेपूतेचात्रविनिक्षिपेत् ॥ चूर्णानिपुरमुख्यानिपाचयेन्मृदुवन्हिना ॥ यावद्घनतरंतावद्वटिकाःका रयेत्ततः ॥ स्वर्णप्रमाणासेव्यास्तामधुसर्पिःसमन्विताः ॥ सप्तधातुगता न्वातान्शिरास्नाय्वस्थिसंधिगान् ॥ सामान्निरामान्संसृष्टान्श्लेष्मजान् हंतिकेवलान् ॥ यक्ष्माणमग्निमांद्यंचज्वरंधातुगतंतथा ॥ गुल्मजानूरु कट्यूरोदरहृत्कुक्षिकक्षगान् ॥ अंसमन्याहनुश्रोत्रभ्रूललाटाक्षिशंख गान् ॥ प्रमेहंमूत्रकृच्छ्रंचशूलमाध्मानमश्मरीं ॥ किंपुनर्भेदकान्वाता न्प्रत्यंगस्थान्जयत्यलं ॥ गुग्गुलुःषडशीतिर्वैनाम्नाभोजेनकीर्तितः ॥ क्षीयमाणेनशिष्येणप्रार्थितेनपुनःपुनः ॥ सएपराजयोगोयंनदेयोयस्य कस्यचित् ॥ वत्सरेणास्ययोगेनपंढोपिप्रमदाप्रियः ॥ वाजीकरणम न्यच्चपरंनास्माद्विशेषनः ॥ गुणोस्यसेवनान्नित्यंयोस्यात्सोस्याद्रवीमिकिं ॥

अर्थ—श्वेत कोरांटा, धमासा, अतिविष, देवदार, रिंगणी, डोरली, चवक, अडुळसा, पिंपळी, नागरमोथा, वेखंड, धने, शतावरी, लघुचिकणा, बडिशेप, देवदारु, हरीतकी, सुंठ, गुळवेल, कचोरा, बाहव्याचा मगज, गोखरु, पुनर्नवा, मोगरी, कुटकी, पिंपळीमूळ, भारंगमूळ, भुयकोहळा, मुंडी, कांसाळु, अजमोदा, कांकडशिंगी, आवळकाठी, मुसळी, रेणुकबीज, कांकोली, ओवा, खुरासनी ओंवा, निशोत्तर, दांती, चित्रक, कांकडशिंगी, तालीमखाना, रक्त धमासा, बृहत्पंचमूल, वेलतूर, कोष्ठकोळिंजन, कृष्णागरु, जातीपत्री, जायफळ, एला, नाकेसर, दालचिनी, किराईत, केशर, लंवग, थोर कवंडळ, हळद, सैंधव, मांदारमूळ, वावडिंग, सोलाभेद, सूर्यफूळ, गजपिंपळी, अघाडामूळ, कचचबीज, करंजमूळ, यां सर्वांबरोबर रास्ना, वाभळीचे बीज सर्वांचे दुप्पट, यां सर्वांबरोबर गुग्गुळ, पारा, गंधक, हिंगूळ, टांकणखार, लोहभस्म, अभ्रकभस्म, ताम्र, वंग, रससिंदूर, शिसें,

सुवर्णमाक्षीक, मंडूर, हीं सर्व गुग्गुळाचे चतुर्थांश अशीं सर्व एकत्र करून षट्कटूच्या काढ्यामध्यें गुग्गुळ शोधून तो काढा चतुर्थांश राही तोंपर्यंत आटवून गाळून घ्यावा. त्यांत हीं वरची सर्व चूर्णे टाकून मंद अग्नीनें पचन करावा. घट्ट झाला ह्मणजे गोळ्या. बांधून ठेवाव्या; आणि सामर्थ्य पाहून मध व तूप याशीं द्यावा. तो सप्तधातुगत वात, शिरा, स्नायू, अस्थि व संधि यांतील वायु, सामवात, निरामवात, सन्निपातिकवात, केवल श्लेष्मवात, क्षय, अग्निमांद्य, धातुगत ज्वर, गुल्म, जानु, ऊरु, कटी, ऊर, हृदय, कुस, खाक, बाहुमूल, मान, हनवटी, कान, भ्रूकुटि, ललाट, नेत्र, नेत्रांजनळचे आंख यातले वायु, प्रमेह, मूत्रकृच्छ्र, शूल, आध्मान व अश्मरी यांचा नाश करितो; व हा वरकड अमांतील वायु जिंकील यात संशय नाही. हा षडशीतिनामक गुग्गुलु भोजानें आपल्या क्षीण झालेल्या शिष्यानें प्रार्थना केली ह्मणून सांगीतला. हा राजयोग यःकश्चिताला देऊं नये. हा योग एक संवत्सर सेवन केल्यानें षंढ पुरुष ही स्त्रियानां प्रिय होईल विशेषें करून याहून दुसरें वाजीकरण नाहीं. याच्या सेवनानें जे गुण होतात ते अनुभवावरून समजावे. मी फार काय सांगू.

विश्वाद्यगुग्गुलु.

विश्वैरंडशिफाशुंठीदारुकुष्ठससैंधवं ॥ रास्नामृतोद्भवंचूर्णंगुग्गुलुर्द्विगुणस्तथा ॥ एकैकागुटिकातस्यप्रत्यहंभक्षितासती ॥ पथ्याशिनोतिवेगेनहंतिविभ्रममारुतं ॥

अर्थ–शतावरी, एरंडमूळ, सुंठ, दारुहळद, कोष्ठ, सैंधव, रास्ना, गुळवेल, आणि या सर्व चूर्णांच्या दुप्पट गुग्गुळ असे एकत्र करून त्याची एकेक गोळी द्यावी; आणि पथ्य करावें; ह्मणजे भ्रमवात नाश पावतो.

दुसरा प्रकार.

शुंठीकणाकणामूलेविडंगंदारुसैंधवं ॥ रास्नाचन्हिर्यवानीचमरिचोग्रभयासमं ॥ द्विगुणंगुग्गुलोश्चूर्णमाज्ययुक्तंनिहंतितान् ॥ वातंविपूचिकांगुल्मंशूलंकंपंचगृध्रसीं ॥

अर्थ–सुंठ, पिंपळीमूळ, वावडिंग, देवदार, सैंधव, रास्ना, चित्रक, ओंवा, मिरीं, कोष्ठ, आणि हरीतकी हीं समभाग; व दुप्पट गुग्गुळ असे एकत्र करून तुपाशीं द्यावा; ह्मणजे वायु, मोडशी, गुल्म, शूल, कंप आणि गृध्रसी यांचा नाश करितो.

रास्नादिगुग्गुलु.

रास्नामृतैरंडसुराव्हविश्वंतुल्येनगाढंपुरुणाविमर्द्य ॥ खादेत्समीरीसशिरोगदीचनाडीव्रणीचापिभगंदरीच ॥

अर्थ—रास्ना, गुळवेलीचें सत्त्व, एरंडमूळ, देवदार, सुंठ हीं एकेक भाग; आणि या सर्वांबरोबर गुग्गुळ घेऊन एकत्र करून खाणें; म्हणजे वायु, शिरोरोग, नाडीव्रण, भगंदर यांचा नाश होतो.

दुसरी योगराजगुटी.

नागरंपिप्पलीमूलंचव्यमूषणचित्रकं ॥ भृष्टहिंग्वाजमोदाचसर्षपा
जीरकद्वयं ॥ रेणुकेंद्रयवापाठाविडंगंगजपिप्पली ॥ कटुकातिवि
षाभार्ङीवचामूर्वाचपत्रकं ॥ देवदारुवचाकुष्ठंरास्नामुस्ताचसैंधवं ॥
एलात्रिकंटकःपथ्याधान्यकंचविभीतकं ॥ धात्रीचत्वगुशीरंचयवक्षा
रस्तिलान्यपि ॥ एतानिसमभागानिसूक्ष्मचूर्णानिकारयेत् ॥ यावंत्ये
तानिसर्वाणितावद्देयोत्रगुग्गुलुः ॥ संमर्द्यसर्पिषापश्चात्सर्वंसंमिश्रये
च्चतत् ॥ एकपिंडंततःकृत्वाधारयेद्घृतभाजने ॥ गुटिकाष्टंकमात्रा
स्तुखादेच्चाश्वयथोचिताः ॥ गुग्गुलुर्योगराजोयंमहान्दुक्थोरसायनं ॥
मैथुनाहारपानानांनियमोनात्रविद्यते ॥ सर्वान्वातामयान्हन्यादाम
वातमपस्मृतिं ॥ वातरक्तंतथाकुष्ठंतथादुष्टव्रणानपि ॥ अर्शांसिग्रहणी
रोगंप्लीहगुल्मोदराण्यपि ॥ आनाहमग्निमांद्यंचश्वासंकासमरोचकं ॥
प्रमेहंनाभिशूलंचकृमिंक्षयमुरोग्रहं ॥ शुक्रदोषमुदावर्तंभगंदरविनाश
नः ॥ आदौशाणोन्मितंखादेत्ततःकर्षार्धमात्रकं ॥ ततःकर्षमितंखादे
द्गुग्गुलुंक्रमतोनरः ॥ दिनानांसप्तकंपूर्वंगुग्गुलुःशाणमात्रकः ॥ द्वि
तीयेकर्षमर्धंतुपूर्णकर्षंततःपरं ॥ रास्नादिक्वाथसंयुक्तोरावंवातामयान्
हरेत् ॥ काकोल्यादिशृतात्पित्तंकफमारग्वधादिना ॥ दार्वीशृतेनमे
हांश्चगोमूत्रेणचपांडुतां ॥ मधुनामेदसोवृद्धिंकुष्ठंनिंबशृतेनच ॥ छि
न्नाक्वाथेनवातास्रंशूलंमूलकजंगृतं ॥ पाटलाक्वाथसहितोविषंमूषक
संभवं ॥ त्रिफलाक्वाथसंयुक्तोदारुणानेत्रवेदना ॥ पुनर्नवादिक्वाथेन
हंतिसर्वोदराण्यपि ॥

अर्थ—सुंठ, पिपळीमूळ, चवक, मिरीं, चित्रक, भाजलेला हिंग, अजमोदा, शिरस, जिरें, शाहाजिरें, रेणुकबीज, इंद्रजव, पाहाडमूळ, वावडिंग, गजपिंपळी, कुटकी, अति विष, भारंगमूळ, वेखंड, मोरवेल, तमालपत्र, देवदार, पिंपळी, कोष्ठ, रास्ना, नागरमो-

था, सैंधव, एलची, गोखरू, हरीतकी, धने, बेहेडा, आवळकाठी, दालचिनी, वाळा, यवक्षार, तीळ या प्रत्येकाची समभाग चूर्णे, आणि सर्व चूर्णासमान गुग्गुळ घालून तुपाशीं मर्दन करावा, सर्व एकवट झाल्यावर गोळा करून तुपाच्या भांड्यांत भरून ठेवावा, त्यांतून अर्धतोळा मात्रा भक्षण करावी. हा योगराजगुग्गुलु मुख्यत्वानें जरा व व्याधि यांचा नाश करितो. हा घेतला असतां मैथुन, भोजन व पान यांचा कांहीं नियम नको. हा संपूर्ण वातरोग, आमवात, अपस्मार, वातरक्त, कुष्ठ, दुष्टव्रण, अर्शरोग, प्लीहा, गुल्म, उदर, आनाह, अग्निमांद्य, श्वास, कास, अरुचि, प्रमेह, नाभिशूल, कृमि, क्षय, हृद्रोग, शुक्रदोष, उदावर्त, आणि भगंदर यांचा नाश करितो. हा तीन मासां पासून सात सात दिवसांनी तोळ्यापर्यंत वाढवावा. हा सर्व वातरोगांवर रास्न्याच्या काढ्याशीं, मेहावर दारुहळदीच्या काढ्याशीं, पांडुरोगावर गोमूत्राशीं, मेदवृध्दीवर मधाशीं, कोडावर लिंबाच्या काढ्याशीं, वातरक्तावर गुळवेलीच्या काढ्याशीं, शूळावर मुळ्याच्या काढ्याशीं, उंदरांच्या विषावर पाहाडमुळांच्या काढ्याशीं, उग्रनेत्ररोगावर त्रिफळ्याच्या काढ्याशीं आणि संपूर्ण उदरांवर पुनर्नव्यादिकाढ्याशीं द्यावा.

रसोनसंधान.

रसोनस्यतुतत्क्षुण्णंतदर्धलुंचितास्तिलाः ॥ पादेतुतक्रेगव्यस्यपृष्टेद्रव्यैस्तुसंक्षिपेत् ॥ त्रिकटुधान्यकंचव्यंचित्रकोहस्तिपिप्पली ॥ त्वगेलाग्रंथिकंपत्रंतालीसंचपलांशकं ॥ शर्करायापलान्यष्टौ पंचाजाज्याःपलानिच ॥ कृष्णाजाज्याश्चचत्वारिमधूकस्यगुडस्यवा ॥ आर्द्रकस्यचचत्वारिसर्पिषाष्टौप्रकल्पयेत् ॥ तिलतैलस्यतावंतोसूक्तस्यापिचविंशतिः ॥ सिध्दार्थकस्यचत्वारिराजिकायास्तथैवच ॥ कर्षप्रमाणंदातव्यंरामठंलवणानिच ॥ एकीकृत्यदृढेभांडेधान्यराशौविनिःक्षिपेत् ॥ द्वादशाहंसमुध्दृत्यततःखादेद्यथाबलं ॥ सुरासौवीरकंचैवमधुरंचपिबेदनु ॥ जीर्णेयथोप्सितंभोज्यंदधिपिष्टाविवर्जितं ॥ एकमासप्रयोगेणसर्वेवातान्व्यपोहति ॥ अशीतिर्वातजान्रोगान्चत्वारिंशच्चपैत्तिकान् ॥ विंशतिश्लेष्मजांश्चैवप्रमेहाणांचविंशतिं ॥ श्वयथौयोनिशूलेचसर्वान्वातान्व्यपोहति ॥ च्युतसंधेश्चभग्नस्यसंधानकरणंभवेत् ॥ बलवर्णकरंह्येतद्वृष्यंबीजविवर्धनं ॥

अर्थ—लसूण सोलून वाटलेली घेऊन तिच्या निमें स्वच्छ तिळ मिळवून त्याच्या चतुर्थांश गाईचें ताक घालून त्यांत सुंठ, मिरीं, पिंपळी, धने, चवक, चित्रकमूळ,

गजपिंपळी, दालचिनी, एलची, पिंपळीमूळ, तमालपत्र व तालीसपत्र हीं प्रत्येकीं ४ तोळे; आणि साकर ३२ तोळे, जिरें २० तोळे; व काळें जिरें, ज्येष्ठमध, गूळ व आलें हीं प्रत्येकीं १६ तोळे, तूप ३२ तोळे, तिळांचें तेल ३२ तोळे, कांजी ४० तोळे, मोहऱ्या १६ तोळे, शिरस १६ तोळे, हिंग १ तोळा व संपूर्ण लवणें एकेक तोळा घालून सर्व एकत्र करून बंद करून तें भाताच्या राशींत बारा दिवस पुरून ठेवावें; नंतर काढून अग्निबळ पाहून भक्षणार्थ द्यावें; नंतर वर मद्य किंवा कांजी अथवा मधुर रस प्राशन करावे; जिरल्यावर दहीं व पीठ यांवांचून पथ्य द्यावें. याप्रमाणें एक महिना सेवन केलें असतां; संपूर्ण वातरोग नाश पावतात; व ऐशीं प्रकारचे वातरोग, चाळीस प्रकारचे पित्तरोग; आणि वीस प्रकारचे कफरोग, वीस प्रकारचे मेह, सूज, योनिशूळ, आणि संपूर्ण वात, यांचा नाश होतो; आणि सुटलेल्या संधि, मोडलेलें अस्थ्यादिक, यानां बरें करितें. बल व वर्ण यानां उत्पन्न करितें; व हितकारक आहे व हें धातूला वाढवितें; आणि वृष्य ही आहे.

भुजंगी गुटिका.

एपाकर्षमितावटीमुवटिताजीर्णेगुडेयुक्तितोद्विघ्नंदीप्यतुर्यपल
द्वयमितंशुंठीतथातेजनी ॥ भक्षयेकानिलरोगिणावृतयुतापथ्या
शिनातत्वतोवातव्रातविनाशिनीमुमतिभिःख्याताभुजंगीवटी ॥

अर्थ–ओंव्याचे फूल १६ तोळे व सुंठ आणि स्वर्ण तेजबळ ८ तोळे यांचें चूर्ण करून त्याची जुन्या गुळांत युक्तीनें १० माशांची गोळी बांधावी. ती वातरोग्यानें तुपाशीं भक्षण करावीं; आणि पथ्य करावें. ही वातसमुदायाचा नाश करितें. हिला ज्ञाते भुजंगी वटी ह्मणतात.

दुसरा प्रकार.

तेजोव्हाप्रस्थमेकंपयसिगजगुणंपाकयुक्त्याविपाच्यव्योषंपथ्याशताव्हा
क्रिमिरिपुमनलंग्रंथिकंचाजमोदां ॥ उग्राकुष्टाश्वगंधासुरतरुममृतंपालि
कानिप्रदद्यात्सर्वान्यातान्वटीयंघृतमधुसहितानास्तिभावान्करोति ॥

अर्थ–तेजबळ ६४ तोळे व दूध ५१२ तोळे घेऊन त्यांचा पाकासारिखा खवा करून त्यांत सुंठ, मिरीं, पिंपळी, हरीतकी, शतावरी, वावडिंग, चित्रक, पिंपळीमूळ, अजमोदा, वेखंड, कोष्ट कोळिंजन, अश्वगंध, देवदार, आणि तूप हीं प्रत्येकीं चार चार तोळे घालून त्याची गोळी करावी; आणि ती मध व तूप यांशीं बल पाहून द्यावी; ह्मणजे सर्व वातव्याधींचा नाश करितें.

निर्गुंड्यादिवटी.

निर्गुंडीदीप्यकंवन्हिहरिद्राविश्वभेषजं ॥
तक्रकांजिकसंपक्कंवातघ्नंवन्हिवर्धनं ॥

अर्थ–निर्गुंडी, ओंवा, चित्रक, हळद व सुंठ यांचें चूर्ण ताक व कांजी यांत पचन करावें; तें वातनाशक आणि अग्नि वाढविणारें आहे.

कणादिगुटी.

कणामूलंकणादारुविडंगंवन्हिसैंधवं ॥ सपुष्पाह्यजमोदाचमरिचंसम चूर्णकं ॥ गुडाचितस्यतस्याथगुटिकाएकविंशतिः ॥ भक्षितास्ताश्चिस प्ताहंमारुतंघ्नंतिसर्वतः ॥

अर्थ–पिंपळीमूळ, पिंपळी, देवदार, वावडिंग, चित्रक, सैंधव, ओंव्याचें फूल, अजमोदा व मिरीं, यांचें समान भाग चूर्ण करून त्याच्या गुळाशीं एकवीस गोळया कराव्या; आणि दररोज एक भक्षण करावी; ह्मणजे सर्व वातव्याधीचा नाश करित्ये.

अमरसुंदरवटी.

त्रिकटुत्रिफलाचैवग्रंथिकारेणुकानलं ॥ मृतलोहंचतुर्जातंपारदंगंधकं विषं ॥ विडंगाकल्लकंमुस्तासर्वेभ्योद्विगुणोगुडः ॥ चणकप्रमाणगुटि कानाम्नाअमरसुंदरी ॥ अपस्मारेसन्निपातेश्वासेकासेगुदामये ॥ अ शीतिवातरोगेषुउन्मादेषुविशेषतः ॥

अर्थ–सुंठ, मिरीं, पिंपळी, हरडा, बेहेडा, आवळकाठी, पिंपळमूळ, रेणुकाबीज, चित्रक, लोहभस्म, दालचिनी, तमालपत्र, एलची, नाकेशर, पारा, गंधक, बचनाग, वावडिंग, अकलकरा व मोथा हीं सर्व समभाग व सर्वांच्या दुप्पट गूळ घालून चण्या एवढी गोळी करावी. हिचें नाव अमरसुंदरी. ही अपस्मार, सन्निपात, दमा, खोकला, मुळव्याध, ऐशीं प्रकारचे वातरोग आणि उन्माद याचा नाश करित्ये.

अजमोदादि वटी.

अजमोदाकणावेल्लंशतपुष्पासनागरं ॥ मारिचंसैंधवादेवभागैकंच पृथक्पृथक् ॥ पंचभागाहरीतक्याःशुंठीचदशभागिका ॥ वृध्ददा रुर्दशांशःस्यात्षट्त्रिंशद्गुडभागिकाः ॥ गुडपाकैर्वटींकृत्वामात्राकर्ष प्रमाणतः ॥ संधिवातेप्रदेयंतदामवातेसुदारुणे ॥ उष्णोदकानुपानेन सर्ववातान्नियच्छति ॥ आढ्यवातेहनुस्तंभेशिरोवातापतानके ॥ भ्रूशंखकर्णनासाक्षिजिव्हास्तंभेचदारुणे॥ कलायखंजतापंगुसर्वांगै कांगमारुते ॥ अर्दितेपादहर्षेचपक्षाघातेप्रशस्यते ॥

अर्थ–ओंवा, पिंपळी, वावडिंग, बडीशेप, नागरमोथा, मिरीं व सैंधव हीं प्रत्येक ए

क एक भाग, हरीतकी ९ भाग, सुंठ १० भाग, वृध्ददार १० भाग व भारंगमूळ ३६ भाग यां प्रमाणें औषधांचीं चूर्णें घेऊन गुळाच्या पाकांत वटी करावी. ती गरम पाण्याशीं द्यावी; ह्मणजे संधिवात, आमवात, संपूर्णवात, आढ्यवात, हनुस्तंभ, शिरोवात, अपतानकवात व भ्रुकुटी, आंख, कान, नाक, डोळे व जीभ यांचा स्तंभ, कलायखंज, पंगुवात, सर्वांगवात एकांगवात, अर्दित, पाददर्प, आणि पक्षघात यांच्या नाशनाविषयीं प्रशस्त आहे.

लघुराजमृगांक.

घृततीक्ष्णयुतःसुरसास्वरसोलघुराजमृगांकइतिप्रथितः ॥

अपहंत्यनिलान्सवलान्वहलान्निजभक्तमलानिवचक्रधरः ॥

अर्थ–मिऱ्याचें चूर्ण, तूप आणि तुळशीचा रस याला लघुराजमृगांक ह्मणतात. हा संपूर्ण वातरोगांचा नाश करितो. जसा भगवान् अपल्या भक्ताचें पातक दूर करितो तसा.

चूर्णाःकषायागुटिकाघृतानितैलानिभाग्येनवियोजितानां ॥

विलासिनांवातविनाशनायविलासिनीनांपरिरंभणानि ॥

अर्थ–चूर्णें, काढे, गोळ्या, घृतें व तैलें यांची योजना केली असतां; ही विलासी पुरुषाच्या वातव्याधिनाशनार्थ स्त्रियांचें आलिंगन युक्त आहे.

दुसरा एरंडपाक.

निस्तुषंबीजमेरंडंपयस्यष्टगुणेपचेत् ॥ तस्मिन्पयसिसंशोष्यतद्वीजं परिपेषयेत् ॥ पश्चाद्घृतेनसंयुक्तंसंपचेन्मृदुवन्हिना ॥ कटुत्रिकंलवंगंचएलात्वक्पत्रकेसरं ॥ अश्वगंधाशिफारास्नापड्गंधारेणुकावरी ॥ लोहंपुनर्नवाश्यामाउशीरंजातिपत्रकं ॥ जातीफलमभ्रकंचसूक्ष्मचूर्णंतुकारयेत् ॥ शीतीभूतेवलेहोयंतस्मिन्खंडसमोदयं ॥ वातारिपाकनामायंप्रातरुत्थायभक्षयेत् ॥ अशीतिवातरोगांश्चचत्वारिंशाच्चपैत्तिकान् ॥ उदराणितथाचाष्टौस्वयंरोगान्निहंतिच ॥ विंशतिर्मेहजान् रोगान्पष्टिनाडीव्रणानिच ॥ हंत्यष्टादशकुष्ठानिक्षयरोगांश्चसप्तच ॥ पंचैवपांडुरोगांश्चपंचश्वासान्प्रणाशयेत् ॥ चतुरोग्रहणीरोगान्दृष्टिरोगंगलग्रहं ॥अनेकवातरोगांश्चतान्सर्वांश्चविनाशयेत् ॥ शुक्लपाकमिदंख्यातंसर्वरोगनिवारकं ॥

अर्थ–एरंडाचे सोललेले गोळे घेऊन ते आठपट दुधांत पचन करावे; नंतर सुकवून, बारीक वाटून तुपांत मंदाग्नीवर पचन करावें; आणि त्यांत सुंठ, मिरीं, पिंपळी, लवंग, एलची, दालचिनी, तमालपत्र, नाकेशर, अश्वगंध, रास्ना, पड्गंधा, रेणुकबीज, शताव

री, लोहभस्म, पुनर्नवा, हरीतकी, वाळा, जायपत्री, जायफळ, आणि अभ्रकभस्म यांची समभाग चूर्णे व पूर्व दुधाचा खवा इतकीं त्यांत घालून साकरेच्या पाकांत मिसळून तयार करावा; हा वातारिनामक पाक प्रातःकाळीं उठून भक्षण करावा; ह्मणजे ऐंशी प्रकारचे वातरोग व चाळीस प्रकारचे पित्तरोग, आठप्रकारचीं उदरें, वीस प्रकारचे मेह, साहा प्रकारचे नाडीव्रण, अठरा प्रकारचीं कोडें, सात प्रकारचे क्षय, पांच प्रकारचे पांडुरोग, पांच प्रकारचे श्वास, चार प्रकारची संग्रहणी, हृद्रोग, गलग्रह, आणि अनेक प्रकारचे वायु यांचा नाश करितो. याला शुक्रपाक रसायण ह्मणतात. हें सर्व रोगनाशक आहे.

एरंडपाक.

वातारिबीजंप्रस्थंतुसुपक्कंनिस्तुषीकृतं ॥ क्षीरद्रोणार्धसंयुक्तंमिपङ्मंदाग्निनापचेत् ॥ घृतप्रस्थार्धयुक्पक्कंखंडप्रस्थद्वयंक्षिपेत् ॥ त्र्यूषणंसचतुर्जातंग्रंथिकंवन्हिचव्यकं ॥ शताभिशिशठीबिल्वदीप्यौजीरेनिशायुगं ॥ अश्वगंधाबलापाठाहपुषावेल्लपुष्करं ॥ श्वदंष्ट्राग्वरादारुवेल्लर्यावालुकावरी ॥ एतानिपिचुमात्राणिचूर्णितानिविनिःक्षिपेत् ॥ वातव्याधिंचशूलंचशोफंवृद्धिंतथोदरं ॥ आनाहंबस्तिरुग्गुल्ममामवातंकटिग्रहं ॥ ऊरुग्रहंहनुस्तंभंनाशयेदपियोगतः ॥

अर्थ—६४ तोळे एरंडयांचे गोळे, ५१२ तोळे दुधांत मंदाग्नीवर पक्क करावे; नंतर त्यांत ३२ तोळे तूप, १२८ तोळे खडीसाकर, त्रिकटु, दालचिनी, वेलदोडे, तमालपत्र, नाकेशर, पिंपळमूळ, चित्रक, चवक, वडिशेप, बाळंतशेप, कचोरा, बेल, ओंवा, जिरे, शाहाजिरें, दारुहळद, हळद, अश्वगंध, चिकणा, पाहाडमूळ, शेरणी, वावडिंग, पोखरमूळ, गोखरू, कोष्ठ, त्रिफला, देवदार, वरधारा, बाभळीचें बीं, अळु व शतावरी यांची प्रत्येक तोळा तोळा चूर्णे करून त्यांत टाकून एकत्र करून पुनः पक्क करावा. हा पाक वातव्याधि, शूळ, शोफ, उदर, आनाह, बस्तिवात, गुल्म, आमवात, कटिग्रह, ऊरुस्तंभ व हनुस्तंभ यांचा नाश करणारा आहे.

रसोनपाक.

तेपूग्रगंधनाशायरात्रौतक्रेविनिःक्षिपेत् ॥ प्रातर्निष्कास्यतत्पिष्ट्वाततोदुग्धेविपाचयेत् ॥ निस्तुषंलशुनंप्रस्थंक्षीरंप्रस्थचतुष्टयं ॥ विपाच्यसांद्रीभूतेस्मिन्सर्पिषःकुडवंक्षिपेन् ॥ रास्नावटीवृषाछिन्नाशठीविश्वासुरद्रुमं ॥ वृत्धदारुकदीप्याग्निशताव्हासपुनर्नवा ॥ फलत्रयंपिप्पलीचक्रमिघ्नःकर्षसंमितं ॥ विचूर्ण्यशीतेमधुनःकुडवंतत्रयोजयेत् ॥

सितयाभक्षयेन्मात्रामाढ्यवातेहनुग्रहे ॥ आक्षेपकादिभग्नेचकटयूरु स्तंभरद्दद्ग्रहे ॥ सर्वांगेसंधिभंगेचवातजाशीतिरोगिणः ॥ पथ्योल शुनपाकोयंवर्णायुःपुष्टिकारकः ॥

अर्थ—लसुणीची घाण जाण्या करितां रात्रीं ताकांत भिजत घालून प्रातःकाळीं काढून वाटून गाईच्या दुधांत शिजवावी, ती अशी जर लसूण ६४ तोळे तर दूध २५६ तोळे तें दाट झाल्यावर १६ तोळे तूप, आणि रास्ना, शतावरी, अडुळसा, गुळवेल, कचोरा, सुंठ, देवदार, वृध्दार, ओंवा, चित्रक, शेपा, पुनर्नवा, हरडा, बेहेडा, आवळकाठी, पिंपळी, वावडिंग, ह्यां प्रत्येकाचें तोळा तोळा चूर्ण टाकून शीत झाल्यावर १६ तोळे मध घालून त्यांतून साकरेशीं थोडा खावा. तो आढ्यवात, हनुग्रह, आक्षेपक, भग्नवात, कटिवात, ऊरुस्तंभ, त्द्रोग, सर्वांगवात, संधिभंगवात आणि ऐशीं प्रकारचे वात यांचा नाश करितो. हा पथ्य लशुनपाक वर्ण, आयुष्य, आणि पुष्टि यानां देतो.

कुबेरपाक.

कुबेरंप्रस्थनीरेचक्षिप्त्वारात्रौचतुर्गुणं ॥ क्षीरेप्रातःपचेत्सम्यग्घृतेनमृदु वन्हिना ॥ शीतंकृत्वासुनिष्पन्नंमध्येमधुनियोजयेत् ॥ चातुर्जातंत्रिक टुकंजातिपत्रफलंतथा ॥ देवपुष्पंविडंगंचामिशीजिरंघनंवला ॥ निशा द्वयंतथालोहंशुल्बंवंगंपलार्धकं ॥ प्रत्येकंचूर्णितंक्षिप्त्वाभक्षयेच्चपलंबुधः ॥ सर्वान्वातमयान्हंतिअग्निमांद्यंबलक्षयं ॥ प्रमेहंमूत्रकृच्छ्रंचअश्मरीगुल्म पांडुनुत् ॥ पीनसंग्रहणीदोपमतीसारमरोचकं ॥ मधुपक्वःकुबेरोयंभक्ष येन्नितरांबुधः ॥ कामवृध्दिकरस्तस्यधातुवृत्धश्चजायते ॥ कांतिपुष्टि करोबलयःकुबेराख्योरसोत्तमः ॥

अर्थ—सागरगोटे रात्रीं पाण्यांत भिजत घालून फोडून त्यांतील गोळ्याच्या चौपट दुधांत तूप घालून मंदाग्नीवर पचन करावें; नंतर शीत झाल्यावर त्यांत मध, दालचिनी, तमालपत्र, एलची, नाकेशर, सुंठ, मिरीं, पिंपळी, जायपत्री, जायफळ, लवंगा, वावडिंग, बडीशोप, जिरें, नागरमोथा, चिकणामूळ, हळद, दारुहळद, लोहभस्म, ताम्रभस्म व वंगभस्म हीं प्रत्येक दोन दोन तोळे घालून पाक तयार करावा. त्यांतून चार तोळे दर रोज भक्षण करावा; ह्मणजे संपूर्ण वायु, अग्निमांद्य, बलक्षय, प्रमेह, मूत्रकृच्छ्र, अश्मरी, गुल्म, पांडुरोग, पीनस, संग्रहणी, अतिसार व अरुचि यांचा नाश करितो. हा मधुपक्व कुबेरास भक्षण केला असतां; कामवृध्दि, धातुवृध्दि, कांति, पुष्टि व बळ यांना देतो.

लशुनपाक.

निस्तुषंलशुनंप्रस्थंक्षीरकुंभेपचेत्सुधीः ॥ घृतंपलचतुष्कंचपचेच्चमृदुव

न्हिना ॥ सुनिष्पन्नोमधुनिभोखंडंप्रस्थद्वयंक्षिपेत् ॥ त्र्यूषणंचचतुर्जा तंग्रंथिकंचव्यचित्रकं ॥ विडंगंरजनीयुग्मंहपुषावृत्धदारुकं ॥ पौष्क रंदीप्यपुष्पंचसुरदारुपुनर्नवा ॥ श्वदंष्ट्रानिंबरास्नाचशतपुष्पावरी सठी ॥ अश्वगंधात्मगुप्ताचद्रव्याणिपिचुमात्रया ॥ शुक्रेयथावलंसे व्यंरसोनाख्यंरसायनं ॥ सर्वान्वातामयान्शूलमपस्मारमुरःक्षतं ॥ गुल्मोदरवमिप्लीहवध्मवृद्धिक्रमीन्जयेत्॥ विबंधानाहशोफांश्चवन्हि मांद्यंबलक्षयं ॥ हिक्कांश्वासंचकासांश्चअपतंत्रकमेवच ॥ धनुर्वातंत थायामंपक्षघातापतानकं ॥ अर्दिताक्षेपकंकुब्जंहनुग्रहशिरोग्रहं ॥ विश्वाचीगृध्रसीखल्लीपंगुवातंचसंधिजं ॥ बाधिर्यंसर्वशूलंचनाशयेद तिवेगतः ॥ वातव्याधिगजेंद्रस्यकेसरीवकृतःशुभः ॥ कफव्याधिप्र शमनोबलपुष्टिकरःस्मृतः ॥

अर्थ—लसूण चांगली सोलून ती ६४ तोळे घेऊन १०२४ तोळे दुधांत १६ तोळे तूप घालोन शिजवावी; तिचा चांगला पाक होऊन मधुवर्ण झाली ह्मणजे त्यांत १२८ तोळे साकर, सुंठ, मिरीं, पिंपळी, दालचिनी, एलची, तमालपत्र, नाकेशर, पिंपळीमूळ, चवक, चित्रकमूळ, वावडिंग, हळद, दारुहळद, शेरणी, वृद्धदार. पुष्करमूळ, ओंवा, लवंगा, देवदार, पुनर्नवा, गोखरू, कडुनिंब, रास्ना, शोप, शतावरी, कचोरा, अश्वगंध, व कुहिलीचें बीज यांचीं प्रत्येकीं एकेक तोळा चूर्ण घालून तयार करावा. हा रसोनाख्य पाक अग्नि व बल पाहून सेवन करावा; ह्मणजे संपूर्ण वातरोग, शूल, अपस्मार, उरःक्षत, गुल्म, उदर, वांति, प्लीहा, अंडवृद्धि, कृमि, मळबंध, अनाहवात, सूज, अग्निमांद्य, बलक्षय, उचकी, दमा, खोकला, अपतंत्रकवात, धनुर्वात, अंतरायाम, पक्षघात, अपतानवायु, अर्दितवायु, आक्षेपकवात, कुब्जवात, हनुग्रह, शिरोग्रह, विश्वाची, गृध्रसी, खल्लीवात, पंगुवात, संधिवात, बधिरपणा, आणि संपूर्णशूल, यांचा अति जलद नाश करितो. हा लशुनपाक वातव्याधिरूप हत्तीचा सिंहासारिखा नाश करितो; आणि कफव्याधीला शांत करून बल व पुष्टि यानां करितो.

लेप.

प्रच्छित्वाचक्षुरेणांगंकेवलानिलपीडितः ॥ तत्रप्रदेहंदद्याच्च पिष्ट्वागुंजाफलैःकृतं ॥ तेनाववाहुजापीडाविश्वाचीगृध्रसी तथा ॥ अन्यापिवातजाःपीडाःप्रशमंयांतिवेगतः ॥

अर्थ—ज्या जागीं वायूचा उपद्रव होतो त्या जाग्यावर वस्त्र्यानें फासण्या टाकून त्यावर गुंजा वाटून त्यांचा पेंड बांधावा; ह्मणजे त्याणें अवबाहु, विश्वाची, गृध्रसी आणि अन्यवातसंबंधिपीडा त्वरित शांत होतात.

मर्दन व नस्य.

यवानीचूर्णसंमिश्रःशृंगवेररसस्तनौ ॥
मर्दनान्नस्यतोहंतिकुपितंमारुतंद्रुतं ॥

अर्थ—अल्याच्या रसांत ओंव्याचें चूर्ण घालून त्याणें अंगमर्दन करावें; आणि त्याचेंच नस्य द्यावें; ह्मणजे वातकोपाची शांति होऽये.

स्वेदविधि.

कार्पासास्थिकुलत्थकातिलयवैश्चैरंडमाषातसीवर्षाभूशणबीज
कांजिकयुतैरेकीकृतैर्वापृथक् ॥ स्वेदःस्यादतिकूर्परोदरहनुस्फि
क्पाणिपादांगुलीगुल्फस्तंभकटीरुजोविजयतेसामाःसमीरोद्भवाः ॥

अर्थ—सरक्या, कुळीथ, तिळ, यव, एरंड, उडीद, अळसी, पुनर्नवा व तागाचें बीं यांच्या कांजीनें किंवा पृथक् योगानें घाम काढावा. तो कोंपर, उदर, हनवटी, नितंब, हात व पाय यांच्या अंगुली व गुडघ्यांचा स्तंभ, कटिशूल, आणि आमाश्रितवायु यांचा नाश करितो.

पेंडबांधणें.

रास्नाशताह्वासुरदारुकुष्ठंमाषार्द्रकंतैलवचाकुलत्थाः ॥
एतैःप्रदेहोनिलरोगिणांहितस्नेहैश्चतुर्भिर्दशमूलयुक्तैः ॥

अर्थ—रास्ना, शतावरी, देवदार, कोष्ठ, उडीद, तेल, वेखंड, कुळीथ, आणि दशमुळें यांचा पेंड वातरोग्याला हितकारक होतो.

स्वेद व लेप.

उष्णोष्णमत्स्यादिकवेसवारैःस्वेदस्तथावातविनाशनःस्यात् ॥
फाणिज्जकोत्थेनरसेनवातंग्रस्तंप्रदेशंपरिलेपयेत्तु ॥

अर्थ—ऊष्ण ऊष्ण असे मासे व वेसवार याणीं शेकून घाम काढावा. तो वातनाश करितो; किंवा फांगळ्याच्या रसानें वातयुक्त प्रदेशावर लेप करावा.

लेप व स्वेद.

सारंनवंसैंधवकृष्णबोलंविपंसमुद्रस्यफलानिकुष्ठं ॥
जेपालमज्जात्वहिजोवलाचजंवीरनीरेणविमर्दनीयं ॥
संस्वेद्यतल्लेपनमात्रकेणअशीतिवातान्सहजान्निहंति ॥

अर्थ—नवसागर, सैंधव, काळा गोळ, बचनाग, समुद्रफळ, कोष्ठ, जेपाळाचे गोळे, अ-फू आणि चिकणामूळ यांचें चूर्ण लिंबाच्या रसांत खलून गरम करून त्याचा लेप करा-वा. तो ऐशीप्रकारच्या वायूचा सहज नाश करितो.

शतपुष्पादिलेप.

शतपुष्पसुरद्रुदिनेशपयोगदरामठसिंधुभवंहरति ॥
अपिलेपनतोस्थिगतंमरुतंकटिसंधिभवंत्रिदिनात्सततं ॥

अर्थ—शोपा, देवदार, कोष्ठ व सैंधव यांचें चूर्ण रुईच्या चिकांत भिजवून त्याणें लेप करावा; ह्मणजे अस्थिवात, कटिवात व संधिवात यांचा तीन दिवसांत नाश करितो.

लेप.

सुरतरुरामठशुंठीशतपुष्पासैंधववचार्कपयसा ॥
अस्थिगतानपिवातान्निहंतिचैकेनलेपेन ॥

अर्थ—देवदार, हिंग, सुंठ, बडिशेप, सैंधव व वेखंड यांचें चूर्ण रुईच्या चिकांत खलून लेप करावा, त्याणें अस्थिगतवातनाश पावतो.

वातहा पोटली.

पुन्नागैरंडनिंबैर्बकुलधवनटंनारिकलैःकरंजैःकार्पासैःशिग्रुडोलाफल सुनिषण्णकैःसर्षपाकोलबीजैः ॥ रास्नाकुष्ठैःकुलित्थैस्तिलल्लशुनवचा हिंगुसिद्धार्थविश्वैःसर्वैःस्नेहैःकृतंतत्सकलपटुयुतैःपोटलीवातभंजी ॥

अर्थ-उंडीण, एरंड, निंब, बकूल, धावडा व अशोक यांच्या साली, नारळ, करंज बीज, सरक्या, शेवग्याची साल, दोलाफळ, कुरडू, शिरस, अंकोलफळ, रास्ना, कुष्ठ, कुळिथ, तिळ, लसुण, वेखंड, हिंग, मोहऱ्या व सुंठ यां सर्वांची चूर्णे करून त्यांत मीठ घालून तुपांत किंवा तेलांत परतून त्याची पोटली बांधून द्यावी. ती वातनाशक आहे.

महाशाल्वण योग.

कुलित्थमाषगोधूमैरतसीतिलसर्षपैः ॥ शतपुष्पादेवदारुशेफालीस्थूलजीरकैः ॥ एरंडबिल्वमूलैश्चरास्नामूलैश्चशिग्रुभिः ॥ मिशीकृष्णा कुठेरैस्तुलवणैरम्लसंयुतैः ॥ प्रसारण्यश्वगंधाभ्यांबलामिर्दशमूलकैः॥ गुडूचीवानरीबीजैर्यथालाभंसमाहृतैः ॥ क्षुण्णैःस्विन्नैश्चवस्त्रेणवद्धैः संस्वेदयेन्नरं ॥ महाशाल्वणसंज्ञोयंयोगःसर्वानिलार्तिजित् ॥

अर्थ—कुळिथ, उडीद, गहूं, जवस, तिळ, शिरस, बडिशोप, देवदार, निर्गुंडी, कलोंजी जिरें, एरंडमूळ, बेलाचें मूळ, रास्नामूळ, शेवगा, जटामांसी, पिंपळी, नांदुरकी,

सैंधव, मीठ, पादेलोण, बिडलोण, अम्लवेतस, चांदवेल, आस्कंद, चिकणा, मोठा चिकणा, लघुचिकणा, दशमुळें, गुळवेल व कवचबीज हीं जितकीं मिळतील तितकीं आणून कुटून शिजवून पोचंडीत घालोन शेक द्यावा. याला महाशाल्वण योग ह्मणतात. हा संपूर्ण वातपीडानाशक आहे.

कढी.

प्रियंगुपिप्पलीमूलंचंदनंचव्यदीपकं ॥ वरालंचंपकंकुष्टंमंजि
ष्ठामिशिसर्षपाः ॥ निर्गुंडीदीप्यकंवन्हिहरिद्राविश्वभेषजं ॥
तक्रकांजिकसंपक्कंवातघ्नंवन्हिवर्धनं ॥

अर्थ—राळे, पिंपळीमूळ, चंदन, चवक, चित्रक, लवंग, चांपा, कोष्टकोळिंजन, मंजिष्ठा, बडीशेप, शिरस, निर्गुंडी, ओंवा, लिंबू, हळद, सुंठ, ताक व कांजी, यांमध्ये वरच्या पदार्थांची चूर्णे घालून कढवावें. ती कढी वातनाशक व वन्हिदीपक होत्ये.

स्वेदलेपविधि.

एरंडार्ककरंजमोरटवलातर्कारिसोमस्नुहीनिर्गुंडीतलपोटशिग्रुलव
णास्फोताश्वगंधादिजैः ॥ पत्रैःकांजिकमूत्रचुक्रसहितैःस्विन्नैर्घटस्थैः
कृतःस्वेदःक्रुध्धसमीरणार्तवपुषांसद्यःसुखोत्पादकः ॥

अर्थ—एरंड, रुई, करंज, मोरवेल, चिकणा, टाकळी, रक्तचंदन, निवडुंग, निर्गुंड, ताड, लहान देवनळ, शेवगा, चुका, श्वेत गोकर्ण व अस्कंध या औषधींची पानें घेऊन कांजी, गोमूत्र, आमसोल, हीं एकत्र वाटून त्याचा पानास लेप करून ती मडक्यांत भरून बांधून त्या पानानीं शेकावें; ह्मणजे वातकोप शांत होऊन रोग्याला तात्काळ सुख होतें.

लेप.

निर्गुंडयाचोपनाहंचसकरंजैःसंपित्तलैः ॥
भेषजैःसेकलेपादिअभिषेकादिकंचरेत् ॥

अर्थ—निर्गुंडीचा पेंड बांधावा; व करंज आणि पित्तकर औषधें यांणीं सेचन, लेप व अभिषेक इत्यादि उपचार करावे.

दुसरा रसोनकल्क वातरोगावर.

पक्ककंदरसोनस्यलिकानिस्तुषीकृता ॥ पाठयित्वाचमध्यस्थंदूरीकुर्या
त्तदंकुरं ॥ तदुग्रगंधनाशायरात्रौतक्रेविनिःक्षिपेत् ॥ अपनीयचतन्म
ध्याच्छिलायांपेषयेत्ततः ॥ तन्मध्येपंचमांशेनचूर्णमेषांविनिःक्षिपेत् ॥
सौवर्चलंयवानीचभर्जितंहिंगुसैंधवम् ॥ कटुत्रिकंजीरकंचसमभागानि

चूर्णयेत् ॥ एकीकृत्यततःसर्वकल्कंकर्षप्रमाणतः ॥ खादेदग्निबलापे क्षीऋतुदोपाद्यपेक्षया ॥ अनुपानंततःकुर्यादेरंडसृतमन्वहं ॥ सर्वांगै कांगजंवातमर्दितंचापतंत्रकं ॥ अपस्मारगदोन्मादमूरुस्तंभंचगृध्रसीम् ॥ उरःपृष्ठकटीपार्श्वकुक्षिपीडांकृमीन्जेयत् ॥ अजीर्णमातपंरोपमतिनीरंपयोगुडं ॥ रसोनमश्नन्पुरुपस्त्यजेदेतन्निरंतरम् ॥ मद्यंमांसंतथाम्लंचरसंसेवेतनित्यशः ॥

अर्थ—चांगली पक्की लसूण घेऊन वरची सालपटें काढून त्या वियांतील अंकूर काढून मग त्या लसुणीचा वास येतो ह्मणोन रात्रीस ताकांत भिजत घालून प्रातःकाळीं ती लसूण काढून पाट्यावर बारीक वाटून तिचा कल्क करावा; मग पादेलोण, अजमोदा, भाजला हिंग, सैंधव,सुंठ, मिऱ्यें,पिंपळी, जिरें या आठ औषधाचें चूर्ण त्या लसुणीचे कल्का च्या पांचवा हिस्सा घेऊन त्या कल्कांत मेळवून एकत्र करून मग एरंड्याचे मुळयांचा काढा करून त्यांत तो कल्क एक कर्ष प्रमाण टाकून प्यावा; व आपली शक्ति व ऋतु कोण आहे, हें पाहून जसा सोसेल तसा घ्यावा; तेणेंकरून सर्वांग वायु व एकांग वायु व तोंड वांकडें होतें जणें करून तो अर्दित वायु व धनुर्वायु, फेंपरें व उन्माद रोग व मांड्यांचा स्तंभ करितो तो उरुस्तंभवायु व गृध्रसी वायु व उर पाठ, कंबर व कुशी यांचा शूळ व अंतर्विकार हे दूर होतात.

रसोनकल्क वायु व विषमज्वर यांजवर.

शुद्धकल्कोरसोनस्यतिलतैलेनमिश्रितः ॥
वातरोगान्जयेत्तीव्रान्विपमज्वरनाशनः ॥

अर्थ—लसुणीचा कल्क करून त्यांत तिळाचें तेल मेळऊन प्यावा, तेणेंकरून दारुण वायूचें रोग व विषमज्वर हे दूर होतात.

चवथा लसूणकल्क.

पिष्ट्वातुसूक्ष्मंलशुनंघृतेनविलिह्यहन्यात्पवनोत्थरोगान् ॥
तथेंद्रबीजाग्निमहौषधानांचूर्णंहरेद्वातभवान्विकारान् ॥

अर्थ—लसुण वाटून तुपाशीं खावी; किंवा इंद्रजव, चित्रक व सुंठ यांचें चूर्ण तुपाशीं खावें. तें संपूर्ण वातविकारांचा नाश करितें.

स्वच्छंदभैरव रस.

शुद्धसूतंमृतंलोहंताप्यंगंधकतालकं ॥ पथ्याग्निमंथनिर्गुंडीत्र्यूषणंटंकणं विपं ॥ तुल्यांशंमर्दयेत्खल्वेदिनंनिर्गुंडिकाद्रवैः ॥ मुंडीद्रावैर्दिनैकं

तुह्विगुंजंवटकीकृतं ॥ भक्षयेद्वातरोगार्तोनाम्नास्वच्छंदभैरवः ॥ रास्ना मृतादेवदारुशुंठीवातारिजंसृतं॥सगुग्गुलुंपिबेत्कोष्णमनुपानंसुखावहं ॥

अर्थ—शुद्ध पारा, लोहभस्म, स्वर्णमाक्षीकभस्म, गंधक, हरताळ, बाळहिरडे, एरंड, निरगुडी, सुठ, मिरे, पिंपळी, टाकणखाराची लाही, बचनाग शुद्ध केलेला, हीं तेरा औषधे समभाग घेऊन त्यांचा निरगुडीच्या रसात एक दिवस खल करावा; नंतर गुळवेलीचे रसात एक दिवस खलून दोन दोन गुंजा प्रमाण गोळ्या बांधाव्या. याला स्वच्छंदभैरव रस असे ह्मणतात तो खरस रास्ना, गुळवेल, देवदार, सुठ, एरंडमूळ या पांच औषधांचा काढा करून त्यात गुग्गुळ मेळवून घ्यावा. तेणेंकरून वायूचा रोग दूर होतो.

समीरपन्नग.

अभ्रगंधविषव्योषरसटंकान्समांशकान् ॥ भावयेत्सप्तधाभृंगरसेन स्यात्समीरहा ॥ आर्द्रद्रवेणवल्लोवाखंडव्योषेणयोजितः ॥ महावा तान्जयत्याशुनासाध्मातंसुसंज्ञकृत् ॥

अर्थ—अभ्रकभस्म, गंधक, बचनाग, सुठ, मिरे, पिंपळी, पारा व टाकणखार हीं समांश घेऊन खलून त्यास माक्याच्या रसाच्या सात भावना द्याव्या; ह्मणजे हा वात नाशक रस होतो. आल्याचे रसाबरोबर किंवा खडिसाखर आणि त्रिकटूचूर्ण याच्या बरोबर एक वालभर द्यावा; ह्मणजे मोठ्याही वायूला क्षणात जिंकील. नाकात ओढला असता; शुद्धि आणणारा आहे.

वातविध्वंसन.

रसंगंधकंनागवंगंचलोहंतथाताम्रजंव्योमनिश्चंद्रिकंच ॥ कणाटंकणंत्र्यूषणंनागरंवैपृथक्भागमेकंविमर्द्यैकयामं ॥ ततोवत्सनाभंचतुःमार्धभागं दढंमर्दयेद्भावनाव्योषजात्रिः ॥ वरात्रिवकैर्मार्कवैःकुष्ठजात्रिस्त्रिभिर्भावयेन्निर्गुडीभानुदुग्धैः ॥ महाधात्रिजैश्चार्द्रकैर्निंबुनीरैःसमंभावयेद्वात विध्वंसनोयं ॥ समीरेचशूलेमहाश्लेष्मरोगेग्रहण्यातयासन्निपातेचमांद्ये ॥ स्त्रियःसूतिकावातरोगेपुदद्यान्निपिबेतगुंजाद्वयंमूतमेनं ॥

अर्थ—पारा, गंधक, शिसें, कथील, लोखंड व तांबे यांची भस्मे, अभ्रकभस्म, पिंपळी, टाकणखार, त्रिकटु व सुंठ. हीं प्रत्येक एकेक भाग घेऊन प्रहरभर खलून नंतर त्यांत बचनाग ४॥ भाग घालून पुनः पुष्कळ खलावें; नंतर त्यास त्रिकटु, त्रिफळा, चित्रक, माका व कोष्टकोळिंजन या प्रत्येकाच्या तीन तीन भावना द्याव्या; व निर्गुडीचे रसाच्या तीन, रुईचे चिकाच्या तीन, थोर आवळी, आलें व लिंबू. यांचे रसाच्या निरनिराळ्या

भावना द्याव्या; ह्मणजे हा वातविध्वंस रस होतो. हा दोन गुंजा प्रमाणें. वायु, शूल, कफरोग, संग्रहणी, सन्निपात, मौढ्य, प्रसूतिवात, इतक्यांवर योजावा.

वातराक्षस.

मृतंसूतंतथागंधंकांतंचाभ्रकमेवच ॥ ताम्रभस्मकृतंसम्यङ्मर्दयित्वा समांशकं ॥ पुनर्नवागुडूच्यग्निसुरसात्र्यूषणंतथा ॥ एतेपांस्वरसेनैव भावयेत्रिदिनंपृथक् ॥ दत्वालघुपुटंसम्यक्स्वांगशीतंसमुद्धरेत् ॥ वातराक्षसनामायंवातरोगेप्रयोजयेत् ॥ तत्तद्रोगानुपानेनाद्विगुंजामात्र सेवनात् ॥ ऊरुस्तंभंवातरक्तंगात्रभंगंतथैवच ॥ आमवातंधनुर्वातंवेदनावातमेवच ॥ पक्षाघातंकंपवातंसर्वसंधिगतंतथा ॥ सुप्तवातंवात शूलमुन्मादंचविनाशयेत् ॥ तत्तद्रोगानुपानेनवाताशीतिविनाशनः ॥

अर्थ—पारदभस्म, गंधक, कांतभस्म, अभ्रकभस्म व ताम्रभस्म, हीं समभाग एकत्र खलून पुनर्नवा, गुळवेल, चित्रक, तुळस व त्रिकटु यांचे स्वरसाशीं निराळें तीन तीन दिवस खलून भावना द्याव्या; नंतर लघुपुट देऊन थंड झाल्यावर काढावा. याला वात राक्षसरस ह्मणतात, हा वातरोगावर योजावा. त्या त्या रोगाच्या अनुपानाशीं दोन गुंजा सेवन केला असतां; ऊरुस्तंभ, वातरक्त, गात्रभंग, आमवात, धनुर्वात, वेदनावात, पक्षघात, कंपवात, सर्वसंधिगतवात, सुप्तवात, वातशूल व उन्माद यांचा नाश करील. त्या त्या अनुपानाशीं योजला तर ऐंशीं वायूंचा नाश करील.

वातारिरस.

रसोगंधोवरावन्हिगुग्गुलुःक्रमवर्धितः ॥ तत्रैकभागःसूतःस्याद्गंधको द्विगुणस्ततः ॥ त्रिभागात्रिफलायोज्याचतुर्भागस्तुचित्रकः ॥ गुग्गुलुः पंचभागःस्याद्रुबुतैलेनमर्दितः ॥ क्षिप्त्वातत्रोदितंचूर्णंतेनतैलेनमर्दयेत् ॥ गुटिकांकर्षमात्रांतुभक्षयेत्प्रातरेवहि ॥ नागरैरंडमूलानांकषायंप्रपिबेदनु ॥ अभ्यज्यैरंडतैलेनस्वेदयेत्पृष्ठदेशकं ॥ विरेकपरिणामेनु स्निग्धमुष्णंचभोजयेत् ॥ वातारिसंज्ञकोह्येषरसोनिर्वातसेवितः ॥ मांसेनमरुतोरोगान्हरेत्सुरतवर्जितः ॥

अर्थ—पारा एक, गंधक दोन, त्रिफळा तीन, चित्रक चार, गुग्गुळ पांच, या प्रमाणें भाग घेऊन चूर्ण करून तें एरंडेलांत खलून एक तोळाभार गोळी प्रातःकाळीं भक्षण करावी; नंतर सुंठ व एरंडमूळ यांचा काढा प्यावा; व पाठीला एरंडेल चोळून शेकावी.

टाळ पुरेसे झाले ह्मणजे स्निग्ध व उष्ण असें भोजन करावें; व वारा घेऊं नये, मैथुन करूं नये; एक महिन्याने वातरोग सर्व हरण करील. ह्याला वातारिरस असें ह्मणतात.

समीरगजकेसरी.

नवाहिफेनंकुचिलंनवानिमरिचानिच ॥ समभागानिसर्वाणिरक्तिकाप्रमितानिच ॥ देयात्समीरेचैतानिपुनस्तांबूलचर्वणं ॥ कुब्जेचखंजवातेचसर्वजेगृध्रसीग्रहे ॥ अववाहौप्रयोक्तव्यःशोफेकंपेप्रतानके ॥ विषूच्यामरुचौदेयमपस्मारेविशेषतः ॥

अर्थ–नवी अफू, कुचल्याचें बीज व नवीं मिऱ्यें यांचें समभाग चूर्ण एकत्र करावें; आणि त्यांतून एक गुंज द्यावें. वर तांबूल भक्षण करावें; ह्मणजे कुब्जवात, खंजवात, सर्वजवात, गृध्रसी, अववाहुक, सूज, कंप, प्रतानकवायु, मोडशी, अरुचि, आणि अपस्मार यांचा नाश करितें.

मृत संजीवनी रस.

म्लेंछस्यभागाश्चत्वारोतदर्धंविषसंयुतं ॥ टंकणंदंतिबीजंचआर्द्रकस्यरसेनवै ॥ एतत्सर्वंक्षिपेत्स्वल्वेमर्दयामद्वयंभिषक् ॥ भानुदुग्धैर्महोदर्योद्विगुंजंभक्षयेत्सदा ॥ वातव्याधिमुरुस्तंभमामवातंविशेषतः ॥ ग्रहण्यर्शोविकारेषुज्वरमष्टविधंतथा ॥ निहंतितत्क्षणादेवतमःसूर्योदयोयथा ॥ मृतसंजीवनोनामप्रख्यातोरससागरः ॥

अर्थ–हिंगूळ ३ भाग, वचनाग २ भाग, टांकणखार व जेपाळ एकेक भाग, या प्रमाणें एकत्र करून त्यांत आल्याच्या रसाशीं दोन प्रहर खल करावा; नंतर रुईचा चीक व शतावरीचा रस यांच्या त्यास भावना द्याव्या. हा दोन गुंजा प्रमाणें दिला असतां; वातरोग, ऊरुस्तंभ, आमवात, संग्रहणी, अर्श व आठ प्रकारचा ज्वर यांचा नाश करितो. याला मृतसंजीवन किंवा रससागर ह्मणतात.

वातारि रस.

सूतहाटकवज्राणिताम्रंलोहंचमाक्षिकं ॥ तालंनीलांजनंतुत्थमहिफेनंसमांशकं ॥ पंचानांलवणानांचभागमेकंविमर्दयेत् ॥ वज्रक्षीरैर्दिनैकंतुरुध्वातंभूधरेपचेत् ॥ माषैकमार्द्रकद्रावैर्लेहयेद्वातनाशनं ॥ पिप्पलीमूलजंकाथंसकृष्णमनुपानकं ॥ सर्ववातविकारांस्तुनिहन्यात्क्षेपकादिकान् ॥ रसःसर्वत्रविख्यातोनाम्नावातारिचस्मृतः ॥

अर्थ—पारा, सोनें, हिरा, ताम्र, लोह, स्वर्णमाक्षिक, हरताळ, सुरमा, मोरचूत व अफीण हीं सर्व समभाग; व पांच लवणें मिळून एक भाग, याप्रमाणें सर्व एकत्र करून त्याला निवडुंगाच्या चिकांत एक दिवस खलून नंतर संपुटांत घालून मातकापड करून भूधरयंत्रांत पचन करावा. हा वातारिरस एक मासाभर आल्याच्या रसाशीं द्यावा; आणि पिंपळमुळाच्या काढ्यांत पिंपळीचें चूर्ण घालून मागून प्यावा; ह्मणजे सर्व आक्षेपकादिक वातविकारांचा नाश करितो. हा वातारि सर्वत्र प्रसिद्ध आहे.

वातगजांकुश.

मृतंसूतंमृतंलोहंगंधताल्कमाक्षिकं ॥ पथ्याशृंगीविषंत्र्यूपमग्निमंथंच टंकणं ॥ तुल्यंखल्वेदिनंमर्द्यंमुंडीनिर्गुंडिजैर्द्रवैः ॥ द्विगुंजांवटिकां खादेत्सर्ववातप्रशांतये ॥ साध्यासाध्यंनिहंत्याशुरसोवातगजांकुशः ॥

अर्थ—पारदभस्म, लोहभस्म, गंधक, हरताळ, स्वर्णमाक्षिकभस्म, हरीतकी, कांकडशिंगी, बचनाग, सुंठ, मिरीं, पिंपळी, थोर ऐरण व टांकणखार हे समभाग घेऊन त्याचा एक दिवस मुंडी व निर्गुंडी यांच्या रसांत खल करावा. तो दोन गुंजा द्यावा; ह्मणजे साध्य व असाध्य अशा सर्व वातविकारांचा नाश करितो.

व्याधिगजकेसरी.

पारदंगंधकंतालंविषंत्र्यूषणकंसमं ॥ त्रिफलाटंकणक्षारंप्रत्येकंशाण मात्रकं ॥ दंतिबीजंत्त्रटंकैकंसूक्ष्मचूर्णानिकारयेत् ॥ भृंगराजरसेनैव मर्दयेद्दिनसप्तकं ॥ काकमाचीरसेनैवनिर्गुंडीरसकंतथा ॥ मरिचाभा वटीकार्यादोषमापेक्ष्यदापयेत् ॥ क्षीरेणसहदातव्याचाष्टज्वरनिवृत्त ये ॥ अशीतिर्वातजान्हंतिनिर्गुंडीवस्तुकेनवा ॥ गुडेनसहदातव्याच त्वारिंशच्चपैत्तिकान् ॥ अनुपानेनसंयुक्तस्तत्तद्रोगहरःस्मृतः ॥

अर्थ—पारा, गंधक, हरताळ, बचनाग, सुंठ, पिंपळी, हरडा, बेहेडा, आवळकाठी व टांकणखार हीं प्रत्येक अर्धा तोळा; व जेपाळबीज १ तोळा घेऊन सर्वांचें सूक्ष्म चूर्ण करून त्यास माका, कावळी व निर्गुंड यांच्या रसाच्या सात भावना द्याव्या; आणि त्याच्या मिऱ्या एवढ्या गोळ्या कराव्या; आणि दोष पाहून द्याव्या; अशा कीं आठ प्रकारच्या ज्वरांवर दुधाशीं, ऐंशी प्रकारच्या वायूवर निर्गुंडी व नागरमोथा यांच्या काढ्याशीं, चाळीस प्रकारच्या पित्तव्याधींवर गुळाशीं; आणि सर्व व्याधींवर योग्य अनुपानाशीं दिली असतां; त्या त्या व्याधीचा नाश करितें.

सूर्यप्रभागुटी.

चित्रकंत्रिफलानिंबपटोलंमधुयष्टिका ॥ वरांगंकेसरंचैवयवानीचाम्लवेतसं ॥ भूनिंबकंचदार्व्येलामुस्तापर्पटकंतथा ॥ तुल्यकंकटुकाभार्ङ्गीच व्यपद्मकदीप्यकैः ॥ पिप्पलीमरिचंदंतीशठीशुंठीसपुष्करं ॥ विडंगंपिप्पलीमूलंजीरकंदेवदारुच ॥ पत्रकंकुटजंरास्नादुरालंभामृतात्रिवृत् ॥ लतारुष्करतालीसंवृक्षाम्लंलवणत्रयं ॥ धान्यकंचाजमोदाचकारवीधातुमाक्षिकं ॥ जातीफलंतुगाक्षीरीवाजिगंधासदाडिमं ॥ कंकोलकमुशीरंचद्विक्षारंमरिचंतथा ॥ एतानिपलमात्राणिसूक्ष्मचूर्णानिकारयेत् ॥ गिरिजस्यपलान्यष्टौद्वेपलेचैवगुग्गुलोः ॥ प्रस्थमेकंसितायाश्चघृतस्यकुडवंतथा ॥ गिरिजस्यसमंलोहंप्रस्थार्धंमाक्षिकस्यच ॥ सर्वमेकत्रसंमिश्र्य स्निग्धभांडेनिधापयेत् ॥ वातव्याधिमुरुस्तंभमर्दितंगृध्रसींतथा ॥ विद्रधिश्लीपदंगुल्मंपांडुरोगंहलीमकं ॥ कासंपंचविधंघोरंमूत्रकृच्छ्रंगलग्रहं ॥ आनाहमश्मरीवर्ध्मग्रहणीमववाहुकं ॥ अरोचकंपार्श्वशूलमुदरंसभगंदरं ॥ हृद्रोगंशूलमुत्कंपविषमज्वरनाशनं ॥ उरःक्षतेचयेदोपा मुखरोगेचदारुणे ॥ प्राशयेद्गुटिकाचापिचूर्णपाणितलोन्मितं ॥ विविधान्नानिभुंजीतयथेष्टंचयथासुखं ॥ गुटिकाभास्करीनाम्नासृष्टादेवेनशंभुना ॥ प्रमेहंरक्तपित्तंचपांडुरोगंसकामलं ॥ अग्निसंदीपनंत्वद्यंदीर्घायुःपुष्टिदोभवेत् ॥ येवातप्रभवारोगायेचपित्तसमुद्भवाः ॥ कफरोगाश्चयेकेचित्द्वंद्वजाःसान्निपातिकाः ॥ तेसर्वेप्रशमंयांतिभास्करेणतमोयथा ॥ रोगविद्राविणीकार्यागुटिकासूर्यवत्प्रभा ॥

अर्थ—चित्रक, हरडा, बेहेडा, आवळकाठी, कडुनिंब, पडवळ, ज्येष्ठीमध, जाडी दालचिनी, नाकेशर, ओंवा, आम्लवेतस, किराईत, दारुहळद, एलची, नागरमोथा, पित्तपापडा, रसांजन, कुटकी, भारंगमूळ, चवक, पद्मकाष्ठ, खुरासनीओंवा, पिंपळी, मिरीं, जेपाळ, कचोरा, सुंठ, पुष्करमूळ, वावडिंग, पिंपळमूळ, जिरें, देवदार, तमालपत्र, कुड्याची साल, रास्ना, धमासा, गुळवेल, तेड, कुचलिचें बीज, तालीसपत्र, आमसोल, सैंधव, बिडलोण, काचलोण, धने, अजमोदा, शोप, स्वर्णमाक्षीक, जायफळ, वंशलोचन, अश्वगंध, दाडिमसाल, कंकोळ, वाळा, यवक्षार, साजेखार, आणि मिरीं, हीं प्रत्येकीं चार तोळे व शिलाजित ३२ तोळे, गुग्गुळ ८ तोळे, लोहभस्म ३२ तोळे, माक्षिकभस्म ८

तोळे, या सर्वांचें चूर्ण एकत्र मिळवून तुपानें रावलेल्या भांड्यांत भरून ठेवावें; त्यांतून १ तोळा किंवा कमी अग्निबल पाहून देत जावें; ह्मणजे वातव्याधि, ऊरुस्तंभ, अर्दित, गृध्रसी, विद्रधि, श्लीपद, गुल्म, पांडुरोग, हलीमक, पांच प्रकारचा खोकला, मूत्रकृच्छ्र, गलरोग, आनाह, अश्मरी, अंडवृद्धि, संग्रहणी, अवबाहुक, अरुचि, पार्श्वशूल, उदर, भगंदर, हृद्रोग, शूल, ऊर्ध्वकंप, विषमज्वर, उरःक्षत, मुखरोग, प्रमेह, रक्तपित्त, पांडुरोग, कामला व वातोत्पन्न, कफोत्पन्न, द्वंद्वज, संनिपातिक इत्यादिरोग, या गुटिकेच्या प्रभावानें जातात. लोकहितार्थ ही घेतली असतां; खाण्यापिण्याचा नियम नाहीं. ही भास्करी गुटिका महादेवानें लोकहितार्थ निर्माण केली.

लघु वातविध्वंसमात्रा.

पारदष्टंकणोगंधपाषाणभिद्रसनागोवराटस्तथातालकश्च ॥ त्र्यूषणंहेम नीरेणतन्मर्दयेद्रक्तिकाभावटीवातविध्वंसकः ॥ सन्निपातकेमारुतेकफे शीतमांद्यकेश्वाससंभवे॥ संग्रहाभिधेशूलजेगदेकाससंसृतौयोजयेत्सदा ॥

अर्थ–पारा, टांकणखार, गंधक, पाषाणभेद, बचनाग, कवड्यांचें भस्म, हरताळ, सुंठ, मिरीं व पिंपळी हां समभाग व शुद्ध असीं एकत्र करून त्यांचा धोत्र्याच्या रसाशीं खल करावा; आणि गुंजे एवढी गोळी करावी. तिला वातविध्वंस ह्मणतात. हा सन्निपात, कफ, वायु, शीत, अग्निमांद्य, श्वास, संग्रहणी, शूल, आणि खोकला यांवर योजावा.

वन्हिकुमार.

टंकणःपारदोगंधशंखौकपर्दःसमोवत्सनाभस्त्रिभागस्तथा ॥ वह्निजं अष्टभागंवन्हिपूर्वःकुमारःस्मृतोभृंगनीरेणसंमर्दितः ॥ वातरोगेषुसर्वे पुश्वसनेवन्हिमांद्यके ॥ कफामयेप्लीहकासेशूलेत्वग्निकुमारकः ॥

अर्थ–टांकणखाराची लाही, पारा, गंधक शंखभस्म व कवडीचें भस्म, हीं समभाग, व बचनाग ३ भाग व मिरीं ८ भाग एकत्र करून त्यांचा माक्याच्या रसांत खल करावा. याला वन्हिकुमार ह्मणतात. हा संपूर्ण वातरोग, श्वास, अग्निमांद्य, कफ, प्लीहा, खोकला; आणि शूल, यांवर द्यावा.

वातविध्वंस.

रसंगंधंविपंचैवताम्रंलोहंसमाक्षिकं ॥ एतत्सर्वसमंयोज्यंविपंचद्विगु णंभवेत् ॥ जेपालंतालकंचैवरसेनसहयोजयेत् ॥ त्र्यूषणंचसमंयोज्यं सर्वमेकत्रकारयेत् ॥ निर्गुंडीसूरणद्रावैर्भानोश्चपयसस्तथा ॥ तर्कारी भृंगराजश्चनतोन्मत्तरसस्यच ॥ भावनाखल्वदातव्यासप्तसप्तक्रमादि

तः ॥ द्विगुंजंभक्षयेत्प्रातर्मरिचैश्चसमन्वितं ॥ जानुजंघाकटिस्थूण पादगुल्फौष्ठशीर्षकं ॥ मन्यास्तंभंहनुस्तंभंत्रिकस्तंभंचशुष्ककं ॥ जिव्हास्तंभंबाहुभवंत्रिकस्तंभंचपादजं ॥ अधोभागेचयेवाताःसर्वांगेविचरंतिये ॥ सर्वान्वातान्जयेदाशुदैन्यंनारायणोयथा ॥

अर्थ–पारा १, गंधक १, वचनाग २, ताम्रभस्म १, लोहभस्म १, माक्षीकभस्म १, जेपाल १, हरताळ १, सुंठ, मिरीं व पिंपळी मिळून १ भाग, हीं सर्व एकत्र करून त्याला निर्गुंड, सुरण, रुई, टांकळी, माका, आणि धोतरा, या प्रत्येकांच्या सात सात भावना द्याव्या. हा वातविध्वंस दोन गुंजा मिऱ्याच्या चूर्णाशीं द्यावा; ह्मणजे मांड्या, गुडघे, कंबर, पोटऱ्या, पाठीचा कणा, पाय, घोंटे, ओंठ, मस्तक, आणि मान यांचा स्तंभ, हनुस्तंभ, त्रिकस्तंभ, शुष्कवात, जिव्हास्तंभ, बाहुस्तंभ, पादस्तंभ व अधोभागीं होणारे वायु; आणि सर्वांगांत संचार करणारे वायु, अशा सर्व वात रोगांचा नाश करितो. जसा भगवान् भक्ताचें दैन्य नाश करितो.

दुसरा समीरपन्नग.

सूतंतालकमाक्षिकायसरजोगंधंसमांशंकृतंपथ्याव्यूपणवन्हिमंथसुरसाशृंगीविषंटंकणं ॥ क्षिप्त्वाखल्वतलेचवारिसुरसामुंडीरसेमर्दितंमात्रावल्लमितासवसैंधवयुताशुंठीतथाचित्रकैः ॥

अर्थ–पारा, हरताळ, स्वर्णमाक्षिक भस्म, लोहभस्म, गंधक, हरीतकी, सुंठ, मिरीं, पिंपळी, थोर ऐरण, रास्ना, कांकडशिंगी, वचनाग व टांकणखार हीं समभाग घेऊन तुळस व मुंडी यांच्या रसांत खलून त्याची वालप्रमाण गोळी करावी. ती सैंधव, सुंठ आणि चित्रक यांच्या रसाशीं वायूवर द्यावी.

वातारि रस.

रसभस्मचभागैकंगंधकोद्विगुणोभवेत् ॥ त्रिगुणंचविषंग्राह्यंकणाचैवचतुर्गुणा ॥ वृंताकत्रयंतथाप्रोक्तंसर्वमेकत्रकारयेत् ॥ गुंजामात्राप्रदातव्यासर्ववातविकारिणां ॥

अर्थ–पारदभस्म १ भाग, गंधक २ भाग, वचनाग ३ भाग, पिंपळी ४ भाग व रेणुकबीज ३ भाग, हे पदार्थ एकत्र करावे; आणि संपूर्ण वातविकारांवर १ गुंज प्रमाण द्यावें.

दुसरा प्रकार.

भागैकंचविषंचैवद्विभागंटंकणंतथा ॥ चतुर्भागंचमरिचंसहैकत्रप्रयोजयेत् ॥ आर्द्रकस्यरसैर्मर्द्यंवल्लमेकंप्रमाणतः ॥ मरिचैश्चसमायुक्तंसर्ववातनिकृंतनं ॥

अर्थ–बचनाग एकभाग, टांकणखार दोनभाग व मिरीं चारभाग, हे एकत्र करून त्यांचा आल्याच्या रसाशीं खल करून त्याची एकवाल मात्रा मिऱ्यांच्या चूर्णाशीं द्यावी. ती सर्व वायूंचा नाश करित्ये.

रसेंद्रचिंतामणि.

सूतात्पंचार्कतश्चैकंकृत्वापिष्टंसगंधकं ॥ सूतांशंनागवल्याश्चद्रवैःपि
ष्ट्वाप्रलेपयेत् ॥ ताम्रपृष्ठेप्रलिप्यैतांरुध्वागजपुटेपचेत् ॥ द्विगुंजंत्र्यू
षणेनार्धवपुवातंसकंपकं ॥ निहंतिदाहसंतापमूर्छापित्तसमन्विताः ॥

अर्थ–पारा ५ भाग, तांबे १ भाग व गंधक ५ भाग, यांची कज्जली करून नागवेलीच्या रसांत घालून त्याणें तांब्याचे पत्रे लिंपून पणतींत ठेऊन गजपुट द्यावें, तें भस्म दोन गुंजा सुंठ, मिरीं व पिंपळी यांचा चूर्णाशीं द्यावें. ह्मणजे अर्धांगवात, कंपवात, दाह, संताप, मूर्छा; आणि पित्त यांचा नाश करितें.

कालकंटकरस.

वज्रसूताभ्रहेमार्कतीक्ष्णमंडंक्रमोत्तरं ॥ मारितंमर्दयेदम्लवर्गेणदिवस
त्रयं ॥ त्रिक्षारंपंचलवणंमर्दितस्यसमंसमं ॥ दत्वानिर्गुंडिकाद्रावैर्म
र्दयेद्दिवसत्रयं ॥ शुष्कमेतद्विचूर्ण्याथविषंचास्याष्टमांशतः ॥ टंकणं
विषतुल्यांशंदत्वाजंबीरजैर्द्रवैः॥भावयेद्दिनमेकंतुरसोयंकालकंटकः॥
दातव्यःसर्वरोगेषुसन्निपातेविशेषतः ॥ द्विगुंजमार्द्रकद्रावैर्घृतैर्वावा
तरोगिणां ॥ निर्गुंडीमूलचूर्णंतुमाहिषाख्यंचगुग्गुलुं ॥ समांशंमर्दये
दाज्येतद्वटीकर्षसंमिता ॥ अनुयोज्याघृतैर्नित्यंस्निग्धमुष्णंचभोजनं ॥
मंडलान्नाशयेत्सर्वान्वातरोगान्नसंशयः ॥ सन्निपातेपिवेच्चानुरवि
मूलकषायकं ॥

अर्थ–हिरा, पारा, अभ्रक, सुवर्ण, ताम्र, तिखें व मुंडलोह यांचीं भस्में एकोत्तरवृद्धीनें घेऊन त्यांला तीन दिवस अम्लवर्गाची भावना द्यावी; नंतर त्रिक्षार व पंचलवणें हीं त्याच्या समान घालून नंतर निर्गुंडीच्या रसांत त्याचा तीन दिवस खल करावा; शुष्क झाल्यावर अष्टमांश बचनाग व टांकणखार घालून लिंबाच्या रसांत १ दिवस खलावा. याला कालकंटकरस ह्मणतात. हा संपूर्ण रोगावर द्यावा; परंतु विशेषेकरून सन्निपातावर द्यावा. आल्याच्या रसाशीं किंवा तुपाशीं दोन गुंजा वातरोगावर द्यावा; निर्गुंडीच्या मूळाचें चूर्ण व ह्मशागुग्गुळ हे समान घेऊन तुपाशीं खलून एक तोळ्याची गोळी शीं द्यावा; आणि स्निग्ध व उष्ण असे भोजन करावें; ह्मणजे तें चाळीस दिवसांत

संपूर्ण वातरोगांचा नाश करील; आणि हा रस घेऊन वर रुईच्या मुळांचा काढा प्राशन केला असतां; संनिपातास हटवील.

त्रिगुणाख्यरस.

गंधकाष्टगुणंसूतंशुध्धंमृद्वग्निनाक्षणं ॥ पक्त्वावतार्यसंचूर्ण्यचूर्णतुल्यभयायुतं ॥ सप्तगुंजमिदंखादेद्वर्धयेच्चदिनेदिने ॥ गुंजैकैकंक्रमेणैवयावंत्स्यादेकविंशति ॥ क्षीराज्यशर्करामिश्रंशाल्यन्नंपथ्यमाचरेत् ॥ कफवातप्रशांत्यर्थंनिर्वातेनिवसेत्सदा ॥ त्रिगुणाख्योरसोनामत्रिपक्षात्कफवातनुत् ॥

अर्थ—गंधक आठ भाग घेऊन तो मंदाग्नीवर पातळ करून त्यांत पारा १ भाग मेळवावा, क्षणभर अग्नीवर ठेऊन त्याच्या समान हरीतकीचें चूर्ण मिसळून तें प्रथम दिवशीं सात गुंजा द्यावें; आणि एकवीस गुंजा होत तों दररोज एक गुंज वाढवीत जावें; आणि दूध, तूप, साकर व भात हें पथ्य करावें; व निवाऱ्यास राहावें; ह्मणजे हा त्रिगुणाख्य रस तीन पक्षांमध्यें कफवायूचा नाश करितो.

अर्केश्वर.

रसस्यगंधंद्विगुणंविमर्द्यताम्रस्यचक्रेणसुतापितेन ॥आच्छादयित्वाचततःप्रयत्नाच्चक्रेविलग्नंचततःप्रगृह्य ॥ संचूर्ण्यचद्वादशधार्कदुग्धैःपुटेतवन्हित्रिफलाजलेन ॥ संभावितार्केश्वरएषसूतोगुंजाद्वयंचास्यफलत्रयेण ॥ ददेतमानत्रितयेनसुप्तिवाताद्विमुक्तोहिभवेत्स्थिताशी ॥ क्षारंसुतीक्ष्णंदधिमांसमाषंवृंताकमध्वादिविवर्जनीयं ॥

अर्थ—पारा १ भाग व गंधक २ भाग एकत्र करून तांब्याचें भांडें तापवून त्यांणें घोंटावा; आणि आच्छादन करावा. जो तांब्याच्या चक्राला लागेल तो काढून घ्यावा; नंतर खलांत घालोन त्याला रुईच्या चिकाच्या आणि चित्रक व त्रिफळा यांच्या काढ्याचा बारा भावना द्याव्या. याला अर्केश्वर ह्मणतात. हा दोन गुंजा त्रिफळ्याशीं द्यावा; आणि पथ्याला हितकारक अन्न द्यावें; व खारट, तिखट, दहीं, मांस, उडीद, वांगे व मध हे पदार्थ वर्ज करावे; ह्मणजे सुप्तिवायूपासून मुक्त होतो.

एकांगवीर.

शुद्धगंधंमृतंसूतंकांतंवंगंचनागकं ॥ ताम्रंचाभ्रंमृतंतीक्ष्णंनागरंमरिचंकणा ॥ सर्वमेकत्रसंचूर्ण्यभावयेच्चपृथक्त्रयं ॥ वराव्योपकनिर्गुंडीवन्हिमार्द्रकजैर्द्रवैः ॥ शिग्रुकुष्ठद्रवेणापिततोधात्र्याद्रवेणच ॥ विषमु

ष्टयार्कहाटैश्चआर्द्रकस्यरसैस्तथा ॥ रसश्चैकांगवीरोसोसुसिद्धोरसरा ड्भवेत् ॥ पक्षघातंचार्दितंचधनुर्वातंतथैवच ॥ अर्धांगंगृध्रसींवापिवि श्वाचीमववाहुकं ॥ सर्वान्वातामयान्हंतिसत्यंसत्यंनसंशयः ॥

अर्थ—शुध्द गंधक, पारदभस्म, लोहकांत, वंगभस्म, नागभस्म, ताम्रभस्म, अभ्रकभस्म, तिख्याचें भस्म, सुंठ, मिरीं व पिंपळी या सर्वांचें एकत्र चूर्ण करून त्याला त्रिफळ्याचा काढा, त्रिकटूचा काढा, निर्गुंडी, आलें, चित्रक, शेवगा, कोष्ठ, आंवळे, कुचला, रुई, कांडवेल; आणि आलें या प्रत्येकाच्या तीन तीन भावना द्याव्या; ह्मणजे हा एकांगवीर रस सिध्द होतो. हा पक्षघात, धनुर्वात, अर्धांगवात, गृध्रसी, विश्वाची, अववाहुक, आणि सर्वप्रकारचे वातरोग यांचा नाश करितो. या विषयीं संशय नाहीं.

वातरक्तावर रस.

पारदंचक्रियाशुद्धंतत्तुल्यंशुद्धगंधकम् ॥ अभ्रकंतुद्वयोस्तुल्यंत्रिभिस्तुल्यंतु गुग्गुलुम् ॥ सर्वांशममृतासत्वंभावयेदौषधैःपृथक् ॥ निर्गुंडीगोक्षुराच्छि न्नाकोकिलाख्यांघ्रिजैरसैः ॥ सप्तवारंततोयुंज्याद्वातरक्तेत्रिवल्लकं ॥ को किलाख्यस्यमूलानांपानीयमनुपाययेत् ॥

अर्थ—पारा, शुद्धगंधक समभाग दोघांचे बरोबर अभ्रकभस्म, तिघांचे बरोबर गुग्गुळ, सर्वांचे बरोबर गुळवेलीचें सत्व, हीं एकत्र करून निर्गुंडी, गोखरू, गुळवेल, कांकोलीचें काढ्याच्या ७ भावना द्याव्या; नंतर वातरक्तरोगावर तीन वाल प्रमाणें खावा. वर कांकोलीच्या मुळांचा काढा प्यावा.

तालकभस्म.

तालंरसंतुवरिकांनयनेंदुबाणभागैर्विशुद्धवसुजातरसेविमर्द्य ॥ दत्वाश रावयुगुलेप्रविधायमुद्रांदद्याद्गजाव्हपुटमस्यभवेत्सुभस्म ॥ दृष्ट्वाकृतिं प्रकृतिमप्यखिलामवस्थांदृष्ट्वापुनश्चवहुधावहुधाविचार्य ॥ दद्याच्चतं दुलमिताहरितालमात्रांविद्यामयायतिवरादियमापयत्नात् ॥

अर्थ—तालभस्म ॥, हरताळ २, पारा १ व तुरटी ९ हीं एकत्र करून पांढऱ्या घें टुळीच्या रसांत खल करावा; आणि सुकल्यानंतर त्याची वडी करून खापराच्या तवलींत घालून त्यावर दुसरें खापर पालथें घालावें; आणि संधिलेप करून गजपुट द्यावें; ह्मणजे सुंदर भस्म होतें. ही हरताळमात्रा ज्या रोग्यास देणें असेल त्याची आकृति, प्रकृति, आणि रोगाची सर्व अवस्था पाहून वारंवार विचार करून तांदळा इतकी द्यावी. ही विद्या म्या एका महान् सन्याशापासून प्रयत्नानें मिळविली आहे.

गंधक रसायन.

शुद्धोबलिर्गोपयसाविभाव्यततश्चतुर्जातगुडूचिकाभिः॥पथ्याक्षधात्र्यौषधभृंगराजैर्भाव्योष्टवारंपृथगार्द्रकेण ॥ सिद्धेसितांयोजयतुल्यभागांरसायनंगंधकपूर्वकंस्यात्॥कर्षोन्मितंसेवितमेतिमर्त्योवीर्यंचपुष्टिंदृढदेहवन्हि ॥ कुष्ठंसकंडूंविषदोषमुग्रंमासद्वयंयोजयतीचयोगः॥घोरातिसारंग्रहणीगदंचसवातरक्तंसहशूलयुक्तं ॥ जीर्णज्वरंमेहगणंचतीव्रंवातामयानांग्रहणेसमर्थः ॥ प्रज्ञाकरंकेशमतीवकृष्णंससोमरोगंसहमुष्कवृद्धिं ॥ हरतिसकलरोगान्गंधकाख्योतियोगोमृतसदृशनराणांप्राणदोदीर्घमायुः ॥ तदनुविहितयोगंभस्मसूतंसहेमरमयतित्रिदशानांदीप्तिरूपंसुखंच ॥

अर्थ—शुद्ध गंधक घेऊन त्याला गाईचें दूध, दालचिनी, एलची. तमालपत्र, नाकेशर, गुळवेल, हरीतकी, बेहेडा अवळकाठी, सुंठ, माका, व आलें यांच्या प्रत्येकीं आठ आठ भावना देऊन सिद्ध झाला ह्मणजे त्यांत समान साकर मिसळावी. याला गंधक रसायन ह्मणतात. हें दाहा मासे सेवन केलें असतां; वीर्य, पुष्टि, देहाला दृढता, अग्निदीप्ति, यांना करितें; व कुष्ठ, कंडू, विषदोष, घोर अतिसार, संग्रहणी, वातरक्त, शूल, जीर्णज्वर, संपूर्ण मेह, तीव्र वातव्याधि, अंडवृद्धि, सोमरोग, आणि संपूर्ण रोग यांचा नाश करितें; व बुध्दि, आयुष्य, केशांला काळेपणा आणि सर्व रोग यांचा नाश करितें. हे मनुष्यांला प्राण व आयुष्य, देण्याविषयीं समर्थ आहे; आणि यांत पारदभस्माचा योग केला असतां; कांति करितें; आणि अनेक स्त्रिया भोगण्याचें सामर्थ्य देतें.

लघु विषगर्भतैल.

तैलाढकंसमतुषांवुहयारिहेमनिर्गुंडिभास्करशिफासृतयातुसिद्धं ॥ धत्तूरकुष्ठफलिनीविषहेमदुग्धारास्नाहयारिकटभीमरिचोपचित्रा॥मांसीवचादहनसर्षपदेवदारुदार्वीनिशाक्रवुजतुत्रिफलासमंगा ॥ पिष्ट्वाक्षिपेत्पलमितांविषगर्भमेतत्तैलंसमस्तपवनामयनाशनंस्यात् ॥

अर्थ—२५६ तोळे तेलांत, त्याचे बरोबर तुसाचें पाणी व कणेर, धोत्रा, निर्गुंडी, आणि रुईचें मूळ यांचा काढा घालून सिद्ध करावें, नंतर धोत्र्याच्या बिया, कोष्ठकोळिंजन, काळलावी, वचनाग, उंबर रास्ना, कणेर, मालकांगोणी, मिरें, बृहद्दंती, जटामांसी, वेखंड, चित्रक, शिरस, देवदार, दारुहळद, हळद, एरंडमूळ, लाख, त्रिफळा, मंजिष्ठ, हीं प्रत्येकी ४ तोळे घेऊन चूर्ण करून तें त्या तेलांत टाकावें; ह्मणजे ह्याला विषगर्भ तेल ह्मणतात. हें सर्व वातरोगनाशक आहे.

दुसरा प्रकार.

धत्तूरस्यरसस्यपंचकुडवंतैलंतथाकांजिकंप्रस्थानांचचतुष्टयंगदवचा चित्रात्परंशाणकाः ॥ त्वद्धात्रीमरिचात्पृथङ्नवविषात्पट्स्वर्णबीजा त्पटोःस्युःसप्ताधिकविंशतिःपरिमितंतीव्रानिलध्वंसनं ॥ पक्षाघातंहनु स्तंभंमन्यास्तंभंकटिग्रहं ॥ पृष्ठत्रिकशिरःकंपंसर्वांगग्रहणंतथा ॥

अर्थ–धोतऱ्याचा रस ८० तोळे, तेल ८० तोळे, कांजी ६४ तोळे, कोटकोळिंज- न, वेखंड, चित्रक हीं एकेक तोळा, हिंतवल्ली, मिरें, दोन्ही नऊ नऊ तोळे, बचनाग ६ तोळे, धोत्र्याचें बीं २७ तोळे व सैंधव २७ तोळे हीं सर्व एकत्र करून तैल सिध्द क- रावें. तें तीव्रवायु, पक्षघात, हनुस्तंभ, मानेचा स्तंभ, कटिग्रह, पाठ, तिडे व मस्तक यां- चा कंप, आणि सर्वांगग्रहवात यांचा नाश करितें.

महाविषगर्भतैल.

कनकंतुचनिर्गुंडीतुंबिनीचपुनर्नवा ॥ वातारिश्चाश्वगंधाचप्रपुन्नाटंस चित्रकं ॥ सौभांजनंकाकमाचीकलिकारीचनिंबकं ॥ महानिंबेश्वरी चैवदशमूलंशतावरी ॥ कारवल्लीसारिवाचश्रावणीचविदारिका ॥ वज्रयर्कौमेषशृंगीचकरवीरद्वयंवचा ॥ काकजंघात्वपामार्गवलाचाति वलाद्वयं ॥ व्याघ्रीमहावलावासासोमवल्लीप्रसारिणी ॥ पलोन्मितानि चैतानिद्रोणेंभसिविनिःक्षिपेत् ॥ पचेत्पादावशेषेस्मिन्कल्कस्यकुडवं क्षिपेत् ॥ त्रिकटुंविषतिंदुंचरास्नाकुष्ठंविषघनं ॥ देवदारुर्वत्सनाभो द्वौक्षारौलवणानिच ॥ तुत्थकंकटूफलंपाठाभार्ङ्गीचनवसागरं ॥ त्रा यंतीधन्वयासंचजीरकंचेंद्रवारुणी ॥ तैलप्रस्थंसमादायपाचयेन्मृदु वन्हिना ॥ विषगर्भमिदंनाम्नासर्वान्वातान्व्यपोहति ॥ वक्षोरुकटि जंघानांसंधानंश्रेष्ठमेवच ॥ गृध्रसींचमहावातान्सर्वांगग्रहणंतथा ॥ दंडापतानकंचैवकर्णनादंचशून्यतां ॥ वनमध्येयथासिंहात्पलायंतेय थामृगाः ॥ तथाश्वगजभग्नानांनराणांचचतुष्पदां ॥ नाशयेन्नात्रसं देहोविषगर्भप्रलेपनात् ॥

अर्थ–धोत्रा, निर्गुंडी, श्वेत भोपळा, पुनर्नवा, एरंड, अश्वगंध, टाकळा, चित्रक, शेवगा, कावळी, बेहेडा. कडुनिंब, निंबारा, बांझकर्टोली, दशमुळें, शतावरी, लघुकार-

ळी, श्वेत उपळसरी, मुंडी, भुयकोहाळी, निवडुंग, रुई, मेषशृंगी, तांबडी व पांढरी कण्हेर, वेखंड, कावळी, आघाडा, चिकणा, अतिबला, नागबला, रिंगणी, महाबला, अडुळसा, सोमवेल व चांदवेल हीं प्रत्येकीं ४ च्यार तोळे घेऊन १०२४ तोळे पाण्यांत कढवून चतुर्थांश पाणी उरलें ह्मणजे त्यांत त्रिकटु, कुचला, रास्ना, कोष्टकोळिंजन, अतिविष, नागरमोथा, देवदार, बचनाग, जवखार, टांकणखार, सैंधव, बिडलोण, पादेलोण, मीठ, मोरचूत, कायफळ, पाहाडमूळ, नवसागर, मेंदी, धमासा, जिरें व कंवडळ यांचें चूर्ण १६ तोळे घालून त्यांत ६४ तोळे तेल मंदाग्निवर पक्व करावें. ह्याला विष गर्भतैल ह्मणतात. हें सर्व वातरोगांस नाशितें; आणि ऊर, मांड्या, कंबर, जंघा व संधि या ठिकाणचा वायु, आढ्यवात, गृध्रसी, महावात, सर्वांगवात, दंडापतानक, कर्णनाद व शून्यता, यांचा नाश करील; आणि अरण्यांत सिंव्हापासून जसे मृग भिऊन पळतात, या प्रमाणे अश्व व गज, यां वरून पडून भग्न झालेले नर अथवा पशु यांच्या व्याधीचा नाश करील यांत संशय नकोच

प्रसारिणीतैल.

समूलपत्रांपुष्पाढ्यांजातसारांप्रसारिणीं ॥ कुट्टयित्वापलशतंकटाहे समधिश्रयेत् ॥ दध्नस्तत्राढकंदद्यात्द्विगुणंचाम्लकांजिकं ॥ भेषजानि तुपेष्यानितत्रेमानिसमावपेत् ॥ शुंठीपलानिपंचैवरास्नायाश्चपलद्वयं ॥ प्रसारिणीपलेद्वेचद्वेपलेमधुकस्यच ॥ एतत्सर्वसमालोड्यशनैर्मृद्वग्निनापचेत् ॥ एतत्प्रभंजनेश्रेष्ठंनस्यकर्मणिशस्यते ॥ एकांगग्रहणंवापिसर्वांग्रहणंतथा ॥ अपस्मारंतथोन्मादंविद्रधिंमंदवन्हितां ॥ त्वग्गताश्चापियेवाताशिरासंधिगताश्चये ॥ अस्थिसंधिगतायेचयेच शुक्रार्तवेस्थिताः ॥ सर्वान्वातामयान्नूनंनाशयत्येवसर्वथा ॥ हयंन रंगजंवापिवातजर्जरितंभृशं ॥ सद्यःप्रशमयेत्तैलमेतन्नात्रविचारणा ॥ इंद्रियस्यप्रजननंवंध्यानांचप्रजाकरं ॥ वृद्धानांवालकानांचस्त्रीणांराज्ञांहितंपरं ॥ पंगुर्वापीठसर्पिर्वापीत्वैतत्संप्रधावति ॥

अर्थ—मुळें, पानें व फुलेंसुद्धां, व ज्यांत सत्व झालें आहे अशी चांदवेल ४०० तोळे कुटून एका कढईंत शिजवावी. त्यांत २५६तोळे दहीं ५१२ तोळे आंबट कांजीघालून नंतर सुंठ २०तोळे, रास्ना ८ तोळे, चांदवेल ८ तोळे, जेष्टीमध ८तोळे, याप्रमाणें त्यांत टाकून ढवळून मंदाग्निवर पक्व करावें. हें वायूवर नस्य करण्यास प्रशस्त आहे. एकांगग्रहण, सर्वांगग्रहण, अपस्मार, उन्माद, विद्रधि, अग्निमांद्य, त्वचा, मस्तक, शिरा, अस्थि, शुक्र,

आर्तव, इतक्या ठिकाणचे वात. सर्व वातरोग यांचा निश्चयेंकरून नाश करील; व घोडा, मनुष्य, हस्ति यांतून कोणीजरी वायूनें जर्जर झाला असला तरी तात्काळ हें तेल आरोग्य करील, यांत संशय नाहीं. इंद्रियजनक, वंध्यास्त्रीला प्रजा करणारें, वृद्ध, बालक, स्त्रिया, व राजे यानां हितकारक आहे. व पांगळा किंवा काखेंत कुबड्या धरून चालणारा असा मनुष्य हें तेल पिऊन धावूं लागेल.

नारायणतैल.

बिल्वोग्निमंथःस्योनाकपाटलापारिभद्रकाः ॥ प्रसारिण्यश्वगंधाचबृहतीकंटकारिका ॥ बलाचातिबलाचैवश्वदंष्ट्रासपुनर्नवा ॥ एषांदशपलान्भागान्चतुर्द्रोणांभसापचेत् ॥ पादशेषंपरिस्राव्यतैलपात्रेप्रदापयेत् ॥ शतपुष्पादेवदारुमांसीशैलेयकंवचा ॥ चंदनंतगरंकुष्ठमेलापर्णीचतुष्टयं ॥ रास्नातुरगगंधाचसैंधवंसपुनर्नवं ॥ एषांद्विपलिकान्भागान्पेषयित्वाविनिःक्षिपेत् ॥ शतावरीरसंचैवतैलतुल्यंप्रदापयेत् ॥ आजंवायदिवागव्यंक्षीरंदत्वाचतुर्गुणं ॥ पानेबस्तौतथाभ्यंगेभोज्येनस्येप्रयोजयेत् ॥ अश्वोवावातभग्नोवागजोवायदिवानरः ॥ पंगुर्वाभग्नहस्तोवाभग्नपादोथवानरः ॥ अधोभागेचयेवाताःशिरामध्यगताश्चये ॥ दंतशूलेहनुस्तंभेमन्यास्तंभेपतंत्रके ॥ एकांगग्रहणेवापिसर्वांगग्रहणेतथा ॥ क्षीणेंद्रियानष्टशुक्राज्वरक्षीणाश्चयेनराः ॥ लालजिव्हाश्चवधिराविस्वरामंदमेधसः ॥ मंदप्रजाचयानारीयाचगर्भनविंदति ॥ वातार्तौवृषणौयेषामंत्रवृध्दिश्चदारुणा ॥ एततैलंवरंतेषांनाम्नानारायणंस्मृतं ॥

अर्थ—बेल, ऐरण, टेंटु, पाडळ, कडुलिंब, चांदवेल, आस्कंद, रिंगणी, डोरली, चिकणा, मोठा चिकणा, गोखरु, पुनर्नवा हीं प्रत्येकीं ४० तोळे प्रमाणें घेऊन ४०९६ तोळे पाण्यांत शिजवून चतुर्थांश पाणी शेष उरलें ह्मणजे गाळून घेऊन तेलाचे पात्रांत टाकावें; नंतर त्यांत बडिशेप, देवदार, जटामांसी, शिलाजित, वेखंड, चंदन, तगर, कोष्ठकोळिंजन, वेलदोडे, साल्वण, दालचिनी, वेलदोडे, तमालपत्र, नागकेसर, रास्ना, आस्कंद, सैंधव, श्वेत पुनर्नवा या प्रत्येकाचें ८ तोळे चूर्ण घालावें; व तेलाचे बरोबरीनें शतावरीचा रस घालावा. शेळीचें किंवा गाईचे दूध तेलाचे चौपट घालावें. याप्रमाणे घालून सिद्ध झालेले तेल पान, बस्ति, अभ्यंग, भोज्यपदार्थांशीं सेवन व नस्य यांविषईं योजिलें असतां अश्व, हस्ति, नर, पांगळा; किंवा हातापायांत मोडलेला वरा होतो; आणि अधोभागींचे वात, शिरामध्यगत, दंतशूळ, हनुस्तंभ, मन्यास्तंभ, अपतंत्रक, एकांगग्रहण, सर्वांगग्रहण,

क्षीणेंद्रिय, नष्टशुक्र, ज्वरक्षीण, लालजिव्ह, बहिरे, निसार, अल्पबुद्धि, अल्पप्रजा स्त्री, वंध्या, वृषणवात, अंत्रवृद्धि इतक्यांवर, हें नारायण तेल अतिप्रशस्त आहे.

दुसरा प्रकार.

अश्वगंधाबलाबिल्वंपाटलाबृहतीद्वयं ॥ श्वदंष्ट्रातिबलानिंबस्योनाकं चपुनर्नवा ॥ प्रसारिणीमग्निमंथःकुर्याद्दशपलंपृथक् ॥ चतुर्द्रोणेजले पक्त्वापादशेषंसृतंनयेत् ॥ तैलाढकेनसंयोज्यशतावर्यारसाढकं ॥ क्षिपेत्तत्रचगोक्षीरंतैलात्तस्माच्चतुर्गुणं ॥ शनैर्विपाचयेदेभिःकल्कैर्द्विपलिकैःपृथक् ॥ कुष्ठैलाचंदनंमूर्वावचामांसीससैंधवैः ॥ अश्वगंधाबला रास्नाशतपुष्पेंद्रदारुभिः ॥ पर्णीचतुष्टयेनैवतगरेणैवसाधयेत् ॥ तत्तैलंनावनेभ्यंगेपानेबस्तौचयोजयेत् ॥ पक्षघातंहनुस्तंभंमन्यास्तभं गलग्रहं ॥ खञ्जत्वंबधिरत्वंचगतिभंगंगलग्रहं ॥ गात्रशोषेंद्रियध्वंसेअसृक्शुक्रेज्वरेक्षये ॥ अंडवृद्धिकुरंडंचदंतरोगंशिरोग्रहं ॥ पार्श्वशूलंचपांगुल्यंबुद्धिहानिंचगृध्रसीं ॥ अन्यांश्चविषमान्वातान्जयेत्सर्वांगसंश्रयान् ॥ अस्यप्रभावाद्वंध्यापिनारीपुत्रंप्रसूयते ॥ मर्त्योगजोवा तुरगस्तैलाभ्यंगात्सुखीभवेत् ॥ यथानारायणोदेवोदुष्टदैत्यविनाशनः ॥ तथैवंवातरोगाणांनाशनंतैलमुत्तमं ॥

अर्थ—आसंध, चिकणामूळ, बेलमूळ, पाहाडमूळ, रिंगणी, मोतरिंगणी, गोखरूं, अतिबला, कडुनिंब, टेंटू, पुनर्नवा, चांदवेल, ऐरण हीं तेरा औषधें दहा दहा पळें घेऊन थोडीं कुटून त्यांत पाणी चार द्रोण प्रमाण घालून चवथाई पाणी राही तों पर्यंत काढा करून गाळून घ्यावा. त्यांत तिळांचें तेल एक एक आढक घालावें; व शतावरीचा अंगरस एक आढक व गाईचें दूध चार आढक प्रमाण तेलांत घालून नंतर त्यांत कल्क करून टाकावा. याचीं औषधें येणेंप्रमाणें कोष्ठ, विलायची, पांढरा चंदन, येखंड, जटामांसी, सैंधव, आसंध, चिकणामूळ, रास्ना, बडिशोप, देवदार, रानगांजा, रानभाल, रानमूंगी, रानउडदी, तगर हीं सत्रा औषधें दोन दोन पळ प्रमाण घेऊन कल्क करून त्या तेलांत घालून हलक्या अग्नीनें तेल शेष राही तों पर्यंत पाक करून तें तेल गाळून घ्यावें. याला नारायण तेल ह्मणतात. हें तेल नाकांत घालण्याविषयीं व अंगास लावण्याविषयीं व प्यावयाविषयीं व बस्तिकर्माविषयीं योजावें. यापासून पक्षघात ह्मणजे अर्धांगवायु, हनुस्तंभ, मन्यास्तंभ व गलग्रहवायु, मांड्या, पोटऱ्या, पाय इत्यादिकांचे ठायीं खल्ली या नांवेंकरून वायु होतो तो, व ज्या वायूनें बहिरेपणा येतो तो वायु, गतिभंगवायु, कटि

ग्रह, हस्तपादादि गात्रांचें शोषण करणारा वायु, चक्षुरादिक इंद्रियांचा नाश करणारा वायु, रक्तविकार, धातुक्षयरोग, अंत्रवृद्धि, करंड ह्मणजे ज्येणेंकरून वृषण मोठा होतो तो वायु, दंतरोग, मस्तकाचा वायु व पार्श्वशूळ व ज्येणेंकरून, पांगुळपणा येतो तो वायु, बुद्धिभ्रंश व कंबरेपासून पायांपर्यंत गृध्रसी या नामेंकरून वायु होतो, तो हे सारे वायु दूर होतात. यां शिवाय दुसरे विषमवायु, लहान मोठे सर्वांगाचे ठायीं अथवा अर्धांगाचे ठायीं जे वात असतील तेही दूर होतात; व या तेलाचे प्रभावेंकरून वांझोट्या स्त्रियेला मुलें होतात; व हें तेल अंगास लावलें असतां; मनुष्यास सुख होतें. हत्तीचे व घोड्याचे अंगास लाविलें असतां; त्यानांही सुख होतें; या विषयीं दृष्टांत जसा नारायण देव दुष्ट दैत्याचा नाश करितो, तसें हें तेल सर्व वायूचा नाश करितें.

शतावरीतैल.

शतावरीबलायुग्मंपर्ण्यौगंधर्वहस्तकः ॥ अश्वगंधाश्वदंष्ट्राचबिल्वःकाशःकुरंटकः ॥ एषान्सार्धपलान्भागान्कल्पयेच्चविपाचयेत् ॥ चतुर्गुणेननीरेणपादशेषंसृतंनयेत् ॥ नियोज्यतैलप्रस्थेचक्षीरप्रस्थंविनिःक्षिपेत् ॥ शतावरीरसप्रस्थंजलप्रस्थंचयोजयेत् ॥ शतावरीदेवदारूमांसीतगरचंदनं ॥ शतपुष्पाबलाकुष्ठमेलाशैलेयमुत्पलं ॥ ऋद्धिर्मेदाचमधुकंकाकोलीजीवकस्तथा ॥ एषांकर्षसमैःकल्कैस्तैलगोमयवन्हिना ॥ पचेत्तेनैवतैलेनस्त्रीषुनित्यंवृषायते ॥ नारीचलभतेपुत्रंयोनिशूलंचनश्यति ॥ अंगशूलंशिरःशूलंकामलांपांडुतांगरं ॥ गृध्रसींह्रीहशोषांश्चमेहान्दंडापतानकं ॥ सदाहंवातरक्तंचवातपित्तगदार्दितं॥ असृक्दरंतथाश्मानंरक्तपित्तंचनश्यति॥शतावरीतैलमिदंकृष्णात्रेयेणभाषितं ॥

अर्थ–शतावरी, चिकणामूळ, चक्रभेंडीचें मूळ, रानगांजा, रानभाल, एरंडमूळ, आसंध, गोखरूं, बेलमूळ, कसई ह्मणजे कसाड व कोन्हांटा, हीं अकरा औषधें दीड दीड पळ प्रमाण घेऊन त्यांत पाणी चौपट घालून चवथाई पाणी राही तोंपर्यंत काढा करून गाळून तिळांचें तेल एक प्रस्थ प्रमाण घालावें; व गाईचें दूध एक प्रस्थप्रमाण व शतावरीचा रस एक प्रस्थ व पाणी हीं त्या तेलांत घालून त्यांत कल्क करून टाकावयाचीं औषधें तीं येणेंप्रमाणें. शतावरी, देवदार, जटामांसी, तगर, पांढरा चंदन, बडिशोप, चिकणामूळ, कोष्ठ, विलायची, पत्तरफूल, कमळ, ऋद्धीचे आभावीं वाराहीकंद, मेदाचे आभावीं ज्येष्ठमध, मोहाची साल, कांकोलीचे आभावीं आसंध, व जिवक यांचे तोळा तोळा कल्क करून त्याचें चौपट एरंडेल तेल घेऊन त्यांत तो कल्क टाकून व पाक होण्याविषयीं कल्काचे चौपट पाणी त्या तेलांत घालून तेल शेष राही तोंपर्यंत पाक करून नंतर

तेल गाळून घ्यावें. हें तेल ज्या मनुष्यास वातरक्त आहे त्या मनुष्यांनीं अंगास लावावें. तेणेंकरून वातरक्त दूर होतें.

मापतैल.

मापप्रस्थंसमादाय्यपचेत्सम्यग्जलाढके ॥ पादशेषेरसेतस्मिन्क्षीरंदद्याच्चतुर्गुणं ॥ प्रस्थंचतिलतैलस्यकल्कंदत्वाक्षसंमितं ॥ जीवनीयानियान्यष्टौशतपुष्पासैंधवं ॥ रास्नात्मगुप्तामधुकंबलाव्योपंत्रिकंटकं ॥ पक्षघातार्दितेवातेकर्णशूलेचदारुणे ॥ मंदश्रुतौचश्रवणेतिमिरेचविदोपजे ॥ हस्तकंपेशिरःकंपेबाहुशोपेववाहुके ॥ शस्तंकलायखंजेचपानाभ्यंजनवस्तिभिः ॥ मापतैलमिदंश्रेष्ठमूर्ध्वजत्रुगदापहं ॥

अर्थ—उडीद ६४ तोळे घेऊन ते २५६ तोळे पाण्यांत पचन करावे, चतुर्थांश शेष राहिला ह्मणजे त्यांत चौपट दूध व तिळाचें तेल ६४ तोळे व जीवनीय गणाचीं आठ औषधें, बडिशेप, सैंधव, रास्ना, कुहिलीच्या बिया, ज्येष्ठमध, चिकणा, सुंठ, मिरीं, पिंपळी, गोखरूं, हीं प्रत्येकीं तोळा घेऊन त्यांचें कल्क घालून तैल सिद्ध करावें. तें पक्षघात, अर्दितवायु, कर्णशूल, बधिरपणा, तिमिररोग, सन्निपातजरोग, हस्तकंप, शिरःकंप, बाहुशोप, अपबाहुक व कलायखंज यांवर पोटांत घेणें किंवा अंगास लावणें, बस्तिकर्म, यांविषयीं योजावें. हें मापतैल ऊर्ध्वजत्रुगतरोगनाशनाविषयीं श्रेष्ठ आहे.

चौथें विषगर्भतैल.

तैलंकृष्णतिलोद्भूतंसर्पपैरंडसंभवं ॥ उभावपिचतुल्यांशंसर्वद्रोणमितंपचेत् ॥ वक्ष्यमाणौषधीभिस्तुलोहपात्रेक्रमाग्निना ॥ पश्चान्मानद्रवंक्वाथेवस्त्रपूतंविधायच ॥ गर्भेविषंप्रदातव्यंतस्मात्तद्विषगर्भकात् ॥ धत्तूरकरवीरार्कलांगल्यंकोष्णवज्रकं ॥ महानिंबत्रिवृद्दंतीदेवदालीप्रसारिणी ॥ ज्योतिष्मतीशिग्रुमूलंकेतकीचपुनर्नवा ॥ कुलित्थमापकार्पासबीजंभृंगरसान्वितं ॥ लाक्षारसंछागमांसंशणबीजंसमंपृथक् ॥ व्याघ्रवाराहजंबूकवसाप्रस्थद्वयंद्वयं ॥ विषमष्टपलंज्ञेयमन्यत्सर्वंपलद्वयं ॥ प्रत्येकमौषधंग्राह्यंमंजिष्ठायाद्विप्रस्थकं ॥ त्रिकटुत्रिफलाकुष्ठरास्नामांसीसठीवचा ॥ चित्रकंदेवदारुश्चवाकुचींद्रयवामृता ॥ विडंगरेणुकामुस्तंपंचकोलंयवानिका ॥ शम्याकंखदिरंसारंमधूकद्रुमबीजयोः ॥ अजमोदाचतगरंसैंधवंरक्तचंदनं ॥ हरिद्राद्वयसिक्थंचचतुर्जा

तंसचंदनं ॥ लोहभस्माभ्रकंवंगंपाकंकौसीसमेवच ॥ मनःशिलालेदर
दकृष्णागरुनखांडिकं ॥ सिल्हारंरसगोधूमंकुंकुमेदमृगांडजं ॥ सर्वमेत
त्सुगंधार्थंसिध्दतैलेविनिःक्षिपेत् ॥ अशीतिर्वातजान्रोगानामवाता
न्सुदुस्तरान् ॥ वातश्लेष्मसमुद्भूतान्कटिजानूरुजंघजान् ॥ गृध्रसीं
चहनुस्तंभंमन्यास्तंभंप्रकंपनं ॥ पक्षघातंपंगुतांचनाशयेदववाहुकं ॥

अर्थ–कांळ्यातिळांचे तेल, शिरसेल व एरंडेल, हीं सर्व मिळून १०२४ तोळे घेऊन तें लोहपात्रांत घालून त्यांत धोतरा, कणेर, रुई, कळलावी, कोष्ठ, निवडुंग, वकाणनिंब, तेंड, जेपाळ, देवडांगरी, चांदवेल, मालकांगोणी, शेवग्याचा कंद, केतक, पुनर्नवा, कुळीथ, उडीद, कापसाच्या सरक्या हीं प्रत्येक ८ आठ तोळे घेऊन त्याचे काढे; व माक्याचा रस, लाखेचेशिरें, बकऱ्याचें मांस व तागाचें बीं, ही सर्व प्रत्येक १२८ तोळे व व्याघ्र, डुकर; आणि कोल्हा, या प्रत्येकांची चर्बी १२८ तोळे; आणि वचनाग ८ तोळे, मांजिष्ठ १२८ तोळे आणि सुंठ, मिरीं, पिंपळी, हरडा, वेहेडा, आवळकटी, कोष्ठ, रास्ना, जटामांसी, कचोरा, वेखंड, चित्रक, देवदार, बावची, इंद्रजव, गुळवेळ, वावडिंग, रेणुकबीज, नागरमोथा, पिंपळी, पिंपळीमूळ, चवक, चित्रक, सुंठ, ओंवा, बाहव्याचा मगज, खदिरसार, मोहाट्या, मोहाची साल, अजमोदा, तगर, सैंधव, रक्त चंदन, हळद, दारुहळद, मेण, दालचिनी, एलची, तमालपत्र, नाकेशर, पांढरा चंदन, हीं प्रत्येक ८ तोळे घेऊन त्यांचें काढे घालून तेल सिद्ध करावें. त्यांत लोहभस्म, वंग, भस्म, सैंधव, हिराकस, मनशीळ, हिंगळूक, कृष्णागर, नखला, जवादे, शिलारस, गव्हला, केशर व कस्तूरी हे पदार्थ सुगंधार्थ, सिद्धतेलांत घालावे. हें तेल, ऐंशीप्रकारचे वायु, आमवात, वातकफ, कंबर, गांड्या व ढोंपर यांतील वायु, गृध्रसी, हनुस्तंभ, मन्यास्तंभ, कंप, पक्षघात, पांगळेपणा, आणि अववाहुक यांचा नाश करितें.

लघु नारायणतैल.

एलावलानतकुचंदनदारुसौम्याशैलेयकुष्ठकुटिलावरुणश्रितेन ॥ तै
लंसदुग्धमितिसिध्दमभीरुकंदतोयेनतेनलुलितेनसमीरणघ्नं ॥

अर्थ–इलाची, चिकणा, तगर, रक्तचंदन, दारुहळद, वृंदावन, दगडफूल, कोष्ठ कोळिंजन, मोरवेल व वायवर्णा यांच्या काढ्याशीं तिळतैल, दूध, मिसळून कढवून सिद्ध झालें; म्हणजे शतावरीचे कांद्यांचा रस घालून उपयोग केला असतां; वातनाश करितो.

शतावरी नारायणतैल.

शतावरीचांशुमतीपृश्निपर्णीसठीबला ॥ एरंडस्यचमूलानिबृहत्यौपूति
कस्यच ॥ गवेधुकस्यमूलानितथासहचरस्यच ॥ एतान्दशपलान्भा

गान्जलद्रोणेपचेद्बुधः ॥ पादावशेषेपूतेचगर्भैचैतान्समावपेत् ॥ पुनर्नवावचादारुशताव्हाचंदनागरुः ॥ शैलेयंतगरंकुष्ठंत्रुटीमांसीस्थिराबला ॥ आश्वाव्हासैंधवंरास्नामंजिष्ठाघनचोरकं ॥ कौंतीप्रियंगुस्थौणेयं पलार्धंकल्पयेत्पृथक् ॥ गव्याजपयसोःप्रस्थौद्वौद्वावत्रप्रयोजयेत् ॥ शतावरीरसप्रस्थंतैलप्रस्थंभिषक्पचेत् ॥ लवंगनखकंकोलवेल्लकंजीरकंभिषक् ॥ त्वक्कटूकंचकर्पूरंतुरुष्कश्रीनिवासकं ॥ स्पृक्काकुंकुमकस्तूरीं दद्यादत्रावतारिते ॥ अश्वतैलस्यसिद्धस्यशृणुवीर्यमतःपरं ॥ अश्वानांवातरुग्णानांकुंजराणांतथानृणां ॥ तैलमेतत्प्रयोक्तव्यंसर्ववातविकारनुत् ॥ आयुष्मांश्चनरःपीत्वानिश्चयेनदृढोभवेत् ॥ गर्भमश्वतरीं विंद्यात्किंपुनर्मानुषीतथा ॥ हृच्छूलंपार्श्वशूलंचतथैवार्धावभेदकं ॥ अपचींगंडमालांचवातरक्तंहनुग्रहं ॥ कामलामश्मरींपांडुमुन्मादंचनियच्छति ॥ नारायणेनगदितंतैलमेतत्कृपालुना ॥ नारायणमितिख्यातंनाम्नातस्मादिदंभुवि ॥

अर्थ—शतावरी, सालवण, पिठवण, कचोरा, चिकणा, एरंडमूळ, रिंगणी, डोरली, करंज, कसईचें मूळ, पीतकोरांटामूळ, हीं प्रत्येक १० तोळे, पाणी ५०२४ घेऊन त्यांत घालून चतुर्थांश काढा घालून घ्यावा; आणि त्यांत पुनर्नवा, वेखंड, दारुहळद, शतावरी, चंदन, कृष्णागर, शिलाजित, तगर, कुष्ठकोळिंजन, सूक्ष्मएला, जटामांसी, तुळस, चिकणा, असगंध, सैंधव, रास्ना, मंजिष्ठा, नागरमोथा, गठोना, रेणुकबीज, गहुला, ग्रंथिपर्णीचा भेद हीं प्रत्येक ५ तोळे घेऊन यांचे कल्क, गाई व शेळी यांचे दूध प्रत्येक २ शेर, शतावरीरस १ शेर व तेल १ शेर हीं एकत्र करून तेल सिद्ध करून उतरल्यावर लवंग, नखला, कंकोल, वावडिंग, जिरें, दालचिनी, कुटकी, कापूर, शिलारस, करडु, श्वेत पाच, केशर, कस्तूरी हीं औषधें तेल उतरल्यावर आंत टाकावीं; ह्मणजे तैल सिद्ध झालें. हें वायूने पीडित घोडे, हत्ती, आणि मनुष्य, यानां दिलें असतां; सर्व वातविकार नाश पावतात; हे जो पुरुष प्राशन करील तो दीर्घायु होऊन बळकट होतो. ह्या तेलानें घोडीला गर्भ राहील मग मनुष्याची काय कथा? हें तेल, हृदयशूल, पार्श्वशूल, अर्धशिशी, अपची, गंडमाला वातरक्त, हनुग्रह, कामला, अश्मरी, पांडु, उन्माद यांचा नाश करितें. हें तेल कृपाळु नारायणानें सांगीतलें ह्मणून याला हें नारायण तेल ह्मणतात.

दुसरें शतावरीतैल.

रुग्दारुद्रविडीप्रियंगुतगरंत्वक्पत्रकौंतीनखैर्मत्सीसर्जरसांबुचंदनव

चाशैलेयलामज्जकैः ॥ मंजिष्ठासरलागुरुद्विपबलारास्नाश्वगंधावरी वर्षाभूमिसिसिंधुभिश्चसकलैरेभिःपचेत्कल्कितैः ॥ तुल्यंगोपयसावरीरससमंतैलंविपक्वंमृदुस्याद्वातघ्नमिदंनृणामितिवरीतैलंभिषक्पूजितं ॥

अर्थ—कोष्टकोळिंजन, दारुहळद, इलाची, राळे, तगर, दालचिनी, तमालपत्र, रेणुकबीज, नखला, जटामांसी, सर्जरस, वाळा, चंदन, वेखंड, शिलाजित, पिवळें गवत, मंजिष्ठ, देवदार, अगरु, नागबला, रास्ना, अश्वगंध, शतावरी, पुनर्नवा, शोप व सैंधव यांचा कल्क करून त्यांत शतावरीचा रस व तितकेंच गाईचें दूध घालून पचन करावें, तें मनुष्याला उत्तम वातनाशक आहे, हें वैद्यांनीं पूजित आहे.

दशमूलादितैल.

दशमूलकषायविपक्वमथोपयसाचसमेनवलाब्दनलैः॥ त्रुटिचंदनदारुलतानलदैररुणाजतुकुष्ठवचाकुटिलैः ॥ इतिपक्वमिदंतिलजंजयति प्रसभंपवनामयमाशुनृणां ॥ वलशुक्रविभारुचिवन्हिकरंनृपवृद्धशिशुप्रमदासुहितं ॥

अर्थ—दशमूळांचा काढा व दूध, हीं समभाग, वला, नागरमोथा, तालीसपत्र, इलाची, चंदन, दारुहळद, माळकांगोणी, वाळा, मंजिष्ठ, लाख, कोष्टकोळिंजन, वेखंड, व तगर यांचा कल्क, तिळांचें तेल, हीं सर्व एकत्र करून पचन करावीं; म्हणजे तेल सिद्ध झालें, तें तेल आपल्या बलानें संपूर्ण वातरोगांला जिंकितें; आणि बल, धातु, कांति, रुचि, अग्नि यांना वाढवितें; व राजे, वृद्ध, बाल, व स्त्रिया, यांना हितकारक आहे.

तिसरें प्रसारिणीतैल.

समूलदलशाखायाःप्रसारण्याःशतत्रयं ॥ शतमेकंशतावर्याअश्वगंधाशतंतथा ॥ केतकीनांशतंचैकंदशमूलंशतंशतं ॥ वाट्यालकस्यापिशतंशतंसहचरस्तथा ॥ जलद्रोणेशतंदत्वाशतंभागावशेषतः ॥ ततस्तेनकषायेणकषायद्विगुणेनच ॥ सुव्यक्तेनारनालेनदधिमंडाढकेनतु ॥ क्षीरशुक्तेक्षुनिर्यासच्छागमांसरसाढकैः ॥ तैलद्रोणसमायुक्तंदृढेपात्रेनिधापयेत् ॥ द्रव्याणियानिक्षेप्याणितानिवक्ष्याम्यतःपरं ॥ भल्लातकंनतंशुंठीपिप्पलीचित्रकंसठी ॥ वचास्पृक्काप्रसारिण्यापिप्पलीमूलमेव च ॥ देवदारुशताव्हाचसूक्ष्मैलात्वचफालकं ॥ कुंकुमंमदमंजिष्ठा

रुष्करंनखिकागुरु ॥ कर्पूरंकुंदरुनिशालवंगंध्यामचंदनं ॥ कंकोलं नलिकामुस्ताकालियोत्पलपत्रकं ॥ सठीहरेणुशैलेयंश्रीवासंचसकें तकं ॥ त्रिफलाकच्छुराभीरुसरलंपद्मकेसरं ॥ प्रियंगूशीरवलदंजीव काद्यंपुनर्नवा ॥ दशमूलानिगंधंचनागपुष्पंरसांजनं ॥ कटुकाजाति पुन्नागोफलानिसछकीरसं ॥ भागांस्त्रिपलिकान्दत्वाशनैर्मृद्वग्निनाप चेत् ॥ विस्तीर्णेसुदृढेपात्रेपाच्यैपातुप्रसारिणी ॥ प्रयोगःषड्विधश्चा त्ररोगार्तानांप्रशस्यते ॥ अभ्यंगात्त्वग्गतंहंतिपानात्कोष्ठगतंतथा ॥ भोजनात्सूक्ष्मनाडीस्थान्नस्याद्ध्र्वगतांस्तथा ॥ पक्षाश्रयगतेवस्तिर्नि रूहःसार्वकायिके ॥ एतद्धिवटुकार्तानांकिशोराणांयथामृतं ॥ एतदे वमनुष्याणांकुंजराणांगवामपि ॥ अनेनैवचतैलेनशुष्यमानामहाद्रु माः ॥ सिक्ताःपुनःप्ररोहंतिभवंतिफलशालिनः ॥ वृद्धोप्यनेनतैलेन पुनश्चतरुणायते ॥ नप्रसूयेतयानारीपाययित्वाप्रसूयते ॥ अप्रजःपुरु षोयस्तुपीत्वाशुलभतेसुतं ॥ अशीतिर्वातजान्रोगान्पैत्तिकान्श्लैष्मि कानपि ॥ सन्निपातसमुत्थांश्चनाशयेत्क्षिप्रमेवच ॥ एतेनांधकवृ ष्णीनांकृतंपुंसवनंमहत् ॥ कृत्वाविष्णोर्वलिंचापितैलमेतत्प्रयोजयेत् ॥

अर्थ—लाजाळूचें पंचांग २०० तोळे, शतावरी ४०० तोळे, अश्वगंध ४०० तोळे, केतकें ४०० तोळे, दशमूळें प्रत्येक ४०० तोळे, चिकणामूळ ४०० तोळे, कोरांटा ४०० तोळे, आणि पाणी ४ खंडी १९ शेर, हे शतांश आटवून १०२४ तोळे बाकी राहिलें ह्मणजे त्या काढयांत काढयाच्या दुप्पट कांजी, दह्यांचें पाणी १०२४. दूध, पांढ ऱ्या उसांचा रस, आणि बकऱ्याच्या मांसाचा रस, हे प्रत्येकीं १०२४ तोळे आणि ति ळांचें तेल १०२४ तोळे, घालून नंतर त्यांत विवळा, तगर, सुंठ, पिंपळी, चित्रक, क चोरा, वेखंड, मोरवेल, लाजाळू, पिंपळीमूळ, देवदार, शतावरी, एलची, दालचिनी, वाळा, केशर, कस्तूरी, मंजिष्ठ, विवळा, नखला, अगरु, कापूर, कुंदागवत, हळद, लवंगा, रो हिषगवत, चंदन, कंकोल, उतरणी, नागरमोथे, दारुहळद, कोठ, तमालपत्र, कचोरा, रेणुकबीज, शिलारस, कृष्णागरु, केतक, हरडा, बेहेडा, आवळकाठी, कापूरकचरी, शतावरी सरलदेवदार, कमळाचे केसर, राळे, वाळा, जीवक, ऋषभक, मेदा, महामेदा, कांकोली, क्षीरकांकोली, रानमूग, रानउडीद, सफेत मुसळी, काळी मुसळी, पुनर्नवा, दशमुळें, रक्तया- बोळ, नाकेशर, रसांजन, कुटकी, जाई, उंडिणीचीं फळें, सालयीचा रस, हीं प्रत्येकीं १२ बारा, तोळे घेऊन त्यांचा कल्क करून घालावा; आणि मंदाग्नीवर मोठया भांड्यांतें

तेल सिद्ध करावें. तें अभ्यंगानें त्वचागत, प्राशनानें कोष्ठगत, भोजनांतून सूक्ष्मनाडीगत, नस्यानें ऊर्ध्वगत, वस्तीनें पक्षाश्रित व निरूहवस्तीनें सर्वांतर्गत याप्रमाणें साहा प्रकारांनीं उपयोगीं पडतें; व लेंकरें, रोगी व बालक यांनां अमृतासारिखें आहे; व हें हत्ती, घोडे, गाई यांनांही द्यावें; व सुकणाऱ्या वृक्षांला याणें शिंपिलें असतां; पुनः उत्तम प्रकारानीं वाढतात; व फलपुष्पयुक्त होतात. वृद्धही या तैलानें तरुण होतो. जी बाळंत होत नसेल तिला दिलें असतां; प्रसूत होत्ये. ज्याला पुत्र होत नाहींत त्याणें घेतलें असतां; पुत्र होतील. हें वात, पित्त, कफ आणि सन्निपात संबंधी व्याधींला जलद नाश करितें. याच तैलानें अंधक, वृष्णी इत्यादि यादवानां पुत्रोत्पत्ति झाली; व हें तेल विष्णुबलीकरून तयार करावें.

चवथें प्रसारिणीतैल.

प्रसारिणीक्काथपयोंबुतक्रंमस्त्वारनालंदधिभिस्तुतैलं ॥ कल्कीकृतं विश्वघनांबुकुष्ठमांसीशताव्हामरदारुसेव्यैः ॥ शैलेनरास्नागुडसारिवाभिःसिंधूत्थबिल्वानिलमंथमोचैः ॥ सामृगलतांसोजपुनर्नवाख्यस्योनाकयष्ट्याव्हकुटंनटैश्च ॥ छिन्नोद्भवादार्व्यभयाकरंजमेदानिशाद्विसफलत्रयैश्च ॥ एरंडमेकंकटुजीविताश्चतत्साधितंहंत्यनिलोत्थरोगान् ॥ सर्वांश्चदीप्तानपिपक्षघातान्वाताश्रितानाहहनुग्रहादीन् ॥ सगृध्रसीविश्वविवाहुशोषंत्हन्मूर्धसंस्थांश्चगदांश्चतांस्तान् ॥ संशुष्कभग्नंप्रवलांगयष्टिंयोसाध्यतामुल्बणमारुतेन ॥ नीतःपुमांस्तस्यभवेदवश्यंप्रसारिणीतैलमिदंहिताय ॥

अर्थ—लागाळूचा काढा, दूध, ताक, दह्यांची निवळी, कांजी, दहीं व तेल असें एकत्र करावें; व सुंठ, नागरमोथा, वाळा, कोष्ठ, जटामांसी, शतावरी, देवदारु, काळा वाळा, शिलाजित, रास्ना, गूळ, उपळसरी, सैंधव, बेलफळ, एरंडमूळ, मोचरस, रानमूग, पुनर्नवा, रुद्राक्ष, वाहव्याचा मगज, जेठमध, टेंटु, गुळवेल, दारुहळद, हरीतकी, करंज, मेदा, हळद, दारुहळद, हरडा, बेहेडा, आवळकाठी, एरंड्या व चित्रक यांचा कल्क घालून तेल सिद्ध करावें. तें वातरोग, संपूर्ण पक्षवात, वातसंबंधी व्याधि, आनाह, हनुग्रह, गृध्रसी, विश्वाची, अवबाहुक, शोष व हृदय मस्तक यांतील रोग, शुष्कवात, आंगमोडे; आणि उल्बण वातरोग यांवर हितकारक होतें.

पंचम प्रसारिणीतैल.

चतुःप्रस्थंप्रसारिण्यापचेत्तोयार्मणेशुभे ॥ पादेशिष्टेसमंतैलंदधिदद्यात्सकांजिकं ॥ द्विगुणंचपयोदद्यादन्येपांकल्ककारंतथा ॥ चित्रकंपिप्पली

मूलंमधुकंसैंधवंवचा ॥ शतपुष्पादेवदारुरास्नावारणपिप्पली ॥ प्रसारण्याश्चमूलानिमांसीभल्लातकानिच ॥ पचेन्मृद्वग्निनातैलंवातश्लेष्मामयान्जयेत् ॥ अशीतिर्नरनार्युत्थान्वातरोगान्व्यपोहति ॥ कुब्जंस्तिमितपंगुंचगृध्रसींखंडकार्दितं ॥ हनुपृष्ठशिरोग्रीवास्तंभंचापिनियच्छति ॥

अर्थ—लाजाळू २५६ तोळे घेऊन त्याचा १०२४ तोळे पाण्यांत काढा करावा. चतुर्थांश राहिला ह्मणजे त्याचे समभाग तेल, दहीं, कांजी घालून दूध काढयाच्या दुप्पट घालावें; आणि चित्रक, पिंपळीमूळ, जेष्टमध, सैंधव, वेखंड, शोपा, देवदार, राला, गजपिंपळी, लाजाळूचीं मुळें, जटामांसी व बिबवे यांचा कल्क घालून तेल सिद्ध करावें. ते वात कफरोग स्त्रियांचे व पुरुषांचे वातरोग यांचा नाश करितें.

पांचवें विषगर्भतैल.

विषंचपुष्करंकुष्ठंवचाभार्ङ्गीशतावरी ॥ शुंठीहरिद्रालशुनंविडंगंदेवदारुच ॥ अश्वगंधाजमोदाचमरिचंग्रंथिकंवला ॥ रास्नाप्रसारिणीशिग्रुगुडूचीहपुषाभया ॥ दशमूलानिनिर्गुंडीमिशिपाठाचवानरी ॥ निशालाशतपुष्पाचप्रत्येकंपलिकानिमान् ॥ चतुर्गुणेजलेपक्त्वापादशेषंसमुद्धरेत् ॥ पलमेकंविषंचात्रसूक्ष्मंकृत्वाविनिक्षिपेत् ॥ सर्वेषुवातरोगेषुसदाभ्यंगोविधीयते ॥ संधिवातेसन्निपातेत्रिकपृष्ठकटिग्रहे ॥ पक्षाघातेतथार्धांगेगात्रकंपेतिदारुणे ॥ कुब्जकेचधनुर्वातेगृध्रस्यांचापतानके ॥ विषगर्भमिदंतैलंयोजनीयंसदाबुधैः ॥

अर्थ—वचनाग, पुष्करमूळ, कोष्ठ ,वेखंड, भारंगमूळ, शतावरी, सुंठ, हळद, लसूण, वावडिंग, देवदार, अश्वगंध, अजमोदा, मिरीं, पिंपळीमूळ, चिकणा, राला, लाजाळू, शेवग्याची साल, गुळवेल, हंसपादी, हरीतकी, दशमूळें, निर्गुंडी, बडीशेप,-पाहाडमूळ, कुहिलीचें बीं, वृंदावन, व शोपा हीं प्रत्येकीं चार चार तोळे घेऊन त्याचे चौपट पाण्यात काढा करावा. चतुर्थांश राहिला ह्मणजे ओतून घेवून त्यांत बचनाग४ तोळे बारीक चूर्ण करून टाकावें; आणि तेल घालुन सिध्द करावें. त्याचें संपूर्ण वातरोगांवर अभ्यंग करावें; ह्मणजे संधिवात, संन्निपात, त्रिकग्रह, पृष्ठग्रह, कटिग्रह, पक्षाघात, अर्धांग, कंपकुब्जक, धनुर्वात, गृध्रसी व अपतान यांचा नाश करितें, याला विषगर्भ तैल ह्मणतात.

साहवें विषगर्भ तैल.

निर्गुंडिकारसप्रस्थंप्रस्थमार्कवजाद्रसात् ॥ रसोधत्तूरजःप्रस्थोगोमूत्रंप्रस्थसंमितं ॥ वचाकुष्ठंहेमबीजंतेजोह्वाकट्फलंतथा ॥ पलार्धं

शानिसर्वेस्तुवत्सनागःसमोमतः ॥ तैलंप्रस्थंपचेद्युक्त्यावातरोगेपुश स्यते ॥ हेमंतेहरिणाक्षीणांगाढमालिंगनंतथा ॥

अर्थ–निर्गुंडीचा रस, माक्याचा रस, धोतऱ्याच्या रस, गोमूत्र हीं प्रत्येकीं ६४ तोळे आणि वेखंड, कोष्ठ, धोतऱ्याचें बीज, कांगोणी व कायफळ हीं प्रत्येक औषधें दोन दोन तोळे; व बचनाग सर्वांच्या समभाग यांचा काढ्यांत व कल्कांत तिळाचें तेल ६४ तोळे घालून युक्तीनें पचन करावें. तें वातव्याधीवर प्रशस्त आहे.

दार्व्यादितैल.

दारुकुष्ठंकणारास्नाविश्वाग्निबृहतीपुरं ॥ भागोत्तरमिदंसर्वैर्
भानिर्यासपाचितं ॥ संक्काथ्यदुग्धतैलाभ्यांपक्कस्याभ्यंगतोध्रुवं ॥
सर्वेवाताविनश्यंतिप्रत्यंगभंगकारिणः ॥

अर्थ–देवदार, कोष्ठ, पिंपळी, रास्ना, सुंठ, चित्रक, रिंगणी, आणि गुग्गुळ हे भाग वृद्धीनें घेऊन त्यांचा काढा, केळीचा रस, दूध, आणि तैल एकत्र करून सिद्ध करावें. त्याचा अभ्यंग केला असतां; सर्व वातरोग नाश पावतात.

दशमूलतैल.

श्रीपर्णीवन्हिमंथश्चबिल्वःस्योनाकपाटला ॥ गोक्षुरःशालिप
र्णीचबृहतीकंटकारिका ॥ पृष्ठिपर्णीचएतेषांदशमूलानितद्युतं ॥
तैलंपक्कंप्रलेपेनहंतिवातानेनकधा ॥

अर्थ–शिवण, टाकळी, बेलमूळ, टेंटु, पाहाडमूळ, गोखरु, सालवण, रिंगणी, डोर्ली, व पिठवण हीं दशमूळें घेऊन त्यांच्या काढ्यांत किंवा कल्कांत तैल सिद्ध करावें. तें आंगाला लाविलें असतां; अनेक प्रकारच्या वायूंचा नाश करितें.

चरणेरंडवातारिमुंडिशिग्रुशतावरी ॥ कांडवेलीबृहत्यौद्वेना
गकर्णीशिफादश ॥ एषांतैलप्रलेपेनत्वगस्थिस्नायुसंभवं ॥
सर्वांगकुपितोवायुर्विनश्यतिहिवेगतः ॥

अर्थ–एरंडमूळ, निर्गुंडीरस, मुंडी, शेवग्याचें मूळ, शतावरी, कांडवेल, रिंगणी, डोर्ली, व रक्तैरंडमूळ हीं प्रत्येक दाहा तोळे घेऊन त्यांच्या काढ्यांत तिळाचें तेल सिद्ध करावें. तें अभ्यंगानें त्वचा हाडें, स्नायु, आणि सर्वांगामध्यें कोपलेल्या वायूचा नाश करितें.

ज्योतिष्मतीचंद्रसूराकलाजाजीयवानिका ॥ मेथीतिलांश्चसंपिष्ययंत्रेतै
लंसमुद्धरेत् ॥ अभ्यंगान्मारुतव्याधिंसमस्तंसंप्रणाशयेत् ॥

अर्थ—मालकांगोणी, रानमेथी, शाहाजिरें, ओंवा, मेथ्या आ..ण तिळ यांचें चूर्ण करून त्याचें यंत्रांत तेल काढावें; आणि आंगास लावावें; ह्मणजे सर्व वातव्याधींचा नाश करितें.

लघुमाषादि तैल.

माषसिंधुवलारास्नादशमूलकहिंगुभिः ॥
वचाशतजटाख्याभिःसिद्धंतैलंसनागरं ॥

अर्थ—उडीद, सैंधव, चिकणामुळ, दशमूळें, हिंग, वेखंड, शतावरी, आणि सुंठ हे पदार्थ घेऊन तैल सिद्ध करावें, तें सर्ववातनाशक होतें.

विजयभैरवतैल.

रसंगंधंशिलांतालंसर्वंकुर्यात्समांशकं ॥ चूर्णयित्वाततःश्लक्ष्णमारनाले नपेषयेत् ॥ तेनकल्केनसंलिप्यसूक्ष्मवस्त्रंततःपरं ॥ तैलाक्तांकारयेद्वर्तिं मूर्ध्वभागेचवापयेत् ॥ वर्त्यधःस्थापयेत्पात्रंतैलंपततिशोभनं ॥ ले पयेत्तेनगात्राणिभक्षणायचदापयेत् ॥ नाशयेत्तत्सुखंतैलंवातरोगान शेषतः ॥ वाहुकंपंशिरःकंपंजंघाकंपंततःपरं ॥ एकांगंचतथावातंहं तिलेपान्नसंशयः ॥ रोगशांत्यैप्रदातव्यंतैलंविजयभैरवं ॥ द्रव्यत स्तिलजंतैलंदातव्यंचचतुर्गुणं ॥

अर्थ—पारा, गंधक, मनशीळ व हरताळ हे सर्व समान भाग घेऊन त्यांचें बारीक चूर्ण करावें; आणि कांजींत वाटून त्या कल्कानें बारीक वस्त्रास लेप करून त्याची वात करावी. ती पारदादिद्रव्यांच्या चौपट तिळांचे तेलांत बुडवून उंचावर लोंबती ठेऊन तीचे खालीं पात्र ठेऊन ती वात पेटवावी. तीपासून तैल खालचे पात्रांत पडेल, तें आंगास लावावें; किंवा भक्षणार्थ द्यावें; ह्मणजे अनेक वातव्याधि, वाहुकंप, शिरःकंप, जंघाकंप व एकांग वात यांचा नाश करितें, याला विजयगर्भ तैल ह्मणतात.

दुसरें प्रसारिणीतैल.

समूलपत्रामुत्पाट्यशरत्कालेप्रसारिणीं ॥ शतंवाप्यालकांतंद्वेशता वर्याःशतंतथा ॥ वलाश्वगंधात्मगुप्ताचकेतकीनांशतंशतं ॥ चतुर्द्रो णेनतोयेनद्रव्यैस्तैलाढकंपचेत् ॥ मस्तुमांसरसैर्युक्तंदधिदुग्धंतथाढकं एतैःसर्वैःसमायुक्तंपाचयेन्मृदुनाग्निना ॥ द्रव्याणांचप्रदातव्यामात्रा चार्धपलोन्मिता ॥ तगरंमदनंकुष्टंकेसरंमुस्तकंवचा ॥ रास्नासैंधवं पिप्पल्योमांसीमंजिष्ठयष्टिका ॥ जीवकर्षभकौमेदामहामेदातथानंतं

शतपुष्पाव्याघ्रनखंशुंठीदेवाव्हमेवच ॥ कांकोलीक्षीरकांकोलीवला भल्लातकंतथा ॥ पेपयित्वासमंचैतान्साधनीयाप्रसारिणी ॥ नातिसिद्धंनातिपक्कंसिद्धंपूतंनिधापयेत् ॥ यत्रयत्रप्रदातव्यंतन्मेनिगदतःशृणु कुब्जानामथपंगूनामवतानांतथैवच ॥ यस्यशुष्यतिचैकांगंयेचभग्नास्थिसंधिजाः ॥ वातशोणितदुष्टानांवातोपहतचेतसां ॥ स्त्रीभिश्चक्षीणशुक्राणांवाजीकरणमुत्तमं॥पानेवस्तौतथाभ्यंगेभोज्येचैवप्रदापयेत्॥ प्रयुक्तंशमयत्याशुवातजान्विविधान्गदान् ॥

अर्थ—शरदृतुमध्यें पंचांगासहवर्तमान लाजाळूं ४०० तोळे घ्यावे; व महावला ४०० तोळे, शतावरी ८०० तोळे व चिकणामूळ, अश्वगंध, कुहिली व केतकी हीं प्रत्येक चारशें तोळे, घेऊन त्यांचा ९०९६ तोळे पाणी घालून काढा करून त्यांत २५६ तोळे, तेल व दह्यांची निवळी, गांसरस, दहीं व दूध हीं प्रत्येक २५३ तोळे; आणि तगर, गेळ, कोष्ठ, नाकेशर, मोथा, वेखंड, रास्ना, सैंधव, पिंपळी, जटामांसी, मंजिष्ठ, जेष्टमध, जीवक, ऋषभक, मेदा, महामेदा, तगर, शोपा, निवडुंग, सुंठ, देवदार, कांकोली, क्षीर कांकोली, चिकणा व बिबवे ह्या प्रत्येकांचे दोन दोन तोळे, कल्क घालून मध्यम प्रकारानें तेल सिद्ध करावें. तें कुब्जवात, पंगुवात, धनुर्वात, शुष्कांगवात, संधिभग्नवात, वातरक्त व वायु यांचा नाश करितें; व क्षीण शुक्रानां स्त्रीप्रसंगीं उत्तम वाजीकरण आहे. हें प्राशन, वस्ति, अभ्यंग, आणि भोजन यांविषयीं योजावें. हें सेवन केलें असतां; अनेक वातव्याधि नाश पावतात.

व्याघ्रतैल.

व्याघ्रंशिरःसमादायकुट्टयित्वाजलेवहु ॥ क्वाथ्यपादावशेषंतुरसंनीत्वासुगालितं ॥ तैलमर्धजलंदत्वाछागगव्यपयोन्वितं ॥ मदिरामस्तुधान्याम्लंतैलमानेनदापयेत् ॥ दत्वाकटाहेसुदृढेपचेत्पाकविधानतः द्रव्याण्येतानिमतिमान्पादमानेनदापयेत् ॥ देवदारुवचाकुष्ठंतगरंचंदनंघनं ॥ मंजिष्ठापौष्करंरास्नाचतुर्जातंचसैंधवं ॥ पिप्पलीमरिचंशुंठीमांसीसहचरंजलं ॥ अश्वगंधात्मगुप्ताचचित्रकंवंशजंवरी ॥ श्वदंष्ट्राकेतकीमूर्वायष्टीमधुगिरेर्मृदा ॥ जातीफलंचसुमनःपत्रिकंकटुरोहिणी ॥ ग्रंथिकंशुक्लकंदाचशतपुष्पापुनर्नवा ॥ जीवनीयोगणश्चैवरालंवोलंसकेसरं ॥ नखंचकृष्णसारंचवत्सनागंसुचूर्णितं ॥ अस्यतैल

स्यपक्वस्यशृणुवीर्यमतःपरं॥ अशीतिवातजान्रोगान्हन्यादाशुजराम
पि ॥ अश्वानांवातभग्नानांगजानांशुष्यतामपि ॥ वृष्यंतुष्टिप्रदंपुष्टिमे
धाग्निबलवर्धनं ॥ श्रुतिभ्रंशेखंजवातेक्रोष्टुशीर्षेकटिग्रहे ॥ मन्यास्तं
भेहनुस्तंभेवातेमेदस्तथांतरे ॥ वंध्यानांपुत्रजननंपंढानांकामवर्धनं ॥
अश्विभ्यांनिर्मितंचैतत्प्रजानांहितकाम्यया ॥ अनेनैवविधानेनमृता
र्क्षविपचेद्भिपक् ॥

अर्थ—वाघाचें मस्तक घेऊन तें पाण्याशीं खूब ठेचावें; नंतर त्याचा चतुर्थांश रस गाळून घेऊन त्यांत त्या पाण्याच्या निमें तेल, शेळी व गाय यांचें दूध, मद्य, दह्यांची निवळ, कांजी, हे सर्व तेलाचे समान घालावें; नंतर कढईंत ठेऊन त्यांत देवदार, बेलंड, कोष्ठ, तगर, चंदन, नागरमोथा, मंजिष्ठ, पुष्करमूळ, रास्ना, दालचिनी, एलची, तमाल-पत्र, नाकेशर, सैंधव, पिंपळी, मिरीं, सुंठ, जटामांसी, कोरांटा, वाळा, अश्वगंध, कुहिली, चित्रक, वंशलोचन, शतावरी, गोखरू, केतकी, गोरखेल, जेठमध, गेरू, जाय फळ, लवंग, पत्री, कुटकी, पिंपळमूळ, श्वेत अतिविष, शोपा, पुनर्नवा, जीवनीयगणाचीं सर्व औषधें, राळ, बोळ, नाकेशर, नखला, कृष्णागरु व वचनाग यांचें कल्क तेलाच्या चतुर्थांश घालोन मंदाग्नीवर पचन करून सिद्ध करावें. तें ऐशीं प्रकारचे वायु व हातार पणा यांचा नाश करितें; व वायूनें धरलेले घोडे, रोडके हत्ती, यानांही द्यावें; व तें वृष्य, तुष्टि, पुष्टि बुद्धि व अग्निबल यांतें वाढवितें; आणि हें श्रुतिभ्रंश, खंजवात, गुडघे, कटि ग्रह, मान धरणारा वायु, हनुस्तंभ व मेदवात यांचा नाश करितें; व वंध्यानां पुत्र देतें, षंढानां काम वृद्धि करितें. हे व्याघ्रतेल लोकहितार्थ अश्विनीकुमारानीं उत्पन्न केलें. याप्रमाणें अस्वलाचे ही तेल काढावें.

महाबलातैल.

बलामूलकषायस्यदशमूलीशृतस्यच ॥ यवकोलकुलित्थानांक्वाथस्य
पयसस्तथा ॥ अष्टावष्टौशुभान्भागान्तैलादन्यंतदेकतः ॥ पचेदावा
प्यमधुरंगणंसैंधवसंयुतं ॥ तथागरुंसर्जरसंसरलंदेवदारुच ॥ मंजि
ष्ठाचंदनंकोष्ठमेलाकोलांजनंवरा ॥ मांसीशैलेयकंपत्रंतगरंसारिवाव
चा ॥ शतावरीमश्वगंधंशतपुष्पापुनर्नवा ॥ तत्साधुसिद्धंसौवर्णेराज
तेवाथमृन्मये ॥ प्रक्षिप्यसकलंसम्यक्सुगुप्तंस्थापयेद्बुधः ॥ बलातैल
मिदंख्यातंसर्ववातविकारनुत् ॥ यथाबलंमिपढ्मात्रांसूतिकायैप्रदा
पयेत् ॥ याचगर्भार्थिनीनारीक्षीणशुक्रश्चयःपुमान् ॥ क्षीणेवातेमर्मह

तेमथितेपीडितेतथा ॥ भग्नेस्थिन्यभिपन्नेचसर्वथैवप्रयोजयेत् ॥ सर्वा नाक्षेपकादींश्चवातव्याधीन्व्यपोहति ॥ प्रत्युग्रधातुपुरुषोभवेच्चस्थिर यौवनः ॥ राज्ञामेतद्धिकर्तव्यंराजमान्यैस्तथानरैः ॥

अर्थ—चिकण्याच्या मुळांचा काढा व दशमुळें यांचा काढा व यव, बोरें व कुळिथ यांचा काढा; आणि दूध या प्रत्येकांचे आठ आठ भाग तेल १, मधुरगण आणि सैंधव हे घालून नंतर अगर, राळ, सरळधूप, देवदार, मंजिष्ठा, चंदन, कोष्ठ, एलची, बोर, काळा शेवगा, हरडा, आवळकाठी, जटामांसी, शिलारस, तमालपत्र, तगर, उपरसाली, गेखंड, शतावरी, अश्वगंध, शेपा व पुनर्नवा यांचे कल्क घालावे; आणि पचन करून तैल सिद्ध करावें. तें फार जतनेनें उत्तम भांड्यांत ठेवावें. हें बलातैल संपूर्ण वातविकारांचा नाश करितें. याची बाळंतिणीला बल पाहून मात्रा द्यावी; आणि वंध्यास्त्री व धातुक्षीण पुरुष, क्षयी, वांति दिलेला मर्मताडित, हत, ठेंचलेला, पीडायुक्त, हाड मोडलेला अशा रोगांनीं पीडित मनुष्यास द्यावें. हें संपूर्ण आक्षेपादि वायूंचा नाश करितें; व याचें सेवन करणारा धातुपुष्ट व तरुण होतो. हें तैल राजांनीं किंवा राजमान्य पुरुषांनीच करावें.

दुसरें शतावरी तैल.

बव्हंघ्रिकामूलरसोथतैलंदुग्धंपलंप्रस्थयुतंक्रमेण ॥ सश्वेतपुष्पानवदेव दारुशैलेयमांसीभिलितंसमांशं ॥ तैलावशेषंकथितंसमस्तंनारायणंतै लमिदंवदंति ॥ नानानिलापीडितमानुषाणामभ्यंगयोगाद्धितमेतदेव ॥

अर्थ—शतावरीच्या मुळांचा रस, तेल व दूध हीं प्रत्येक ६४ तोळे व वावंरणा, टेंटू, देवदार, शिलाजित व जटामांसी हीं प्रत्येक चार तोळे घेऊन कल्क घालून तैल सिद्ध करावें. त्याला नारायणतैल ह्मणतात. हें अनेकप्रकारच्या वातव्याधींवर अभ्यंगार्थ योजिलें असतां; तें हितकारक होतें.

तिसरा प्रकार.

दुग्धंप्रस्थद्वयंतैलमेकप्रस्थंतथारसं ॥ शतावरीवचाकुष्ठंचंदनंदेवदारुच ॥ काकोलीधिंटुलारास्नामंजिष्ठैलारुदंतिका ॥ शैलेयमश्वगंधाचमांसीचिकणिकाखिलं ॥ अर्धार्धपलमानंस्यात्पक्वंमृद्वग्निनाशनैः ॥ एकांगयुग्मभग्नास्थिभग्नसंधितृषांतथा ॥ कुब्जवामनपंगूनां पामादभ्यंगतस्तथा ॥ वातान्नानाविधान्हंतितैलमेतन्नसंशयः ॥ शतावरीतैलमिदंप्रोक्तंबुधिविशारदैः ॥

अर्थ–दूध १२८ तोळे तेल ६४ तोळे व शतावरीचा रस ६४ तोळे व वेखंड, कोष्ट, चंदन, देवदार, कावळी, घेंटूली, रास्ना, मंजिष्ठा, एला, रुदंती, शिलाजित, अश्वगंध, जटामांसी व चिकणा हीं प्रत्येक दोन तोळे घेऊन त्यांचे काढे किंवा कल्क दोन दोन तोळे घालून मंदाग्नीवर पचन करावें. तें एकांगवात, सर्वांगवात, भग्नास्थि, संधिभग्न, तृषा, कुब्जवात, वामनत्व व पंगुवात याचा पानानें व अभ्यंगानें नाश करितें. हें शतावरीतैल अनेकप्रकारच्या वायूंचा नाश करितें.

चवथा प्रकार.

शतावरीजातरसंगृण्हीयाद्यंत्रपीडितं ॥ प्रभूतंतद्रसंलीढ्वातैलस्याढकमेवच ॥ दधिक्षीरेणाविपचेत्द्रव्याण्येतानिदापयेत्॥ शतपुष्पावचाकुष्ठमांसीशैलेयचंदनैः ॥ प्रियंगुपद्मकंमुस्तंह्रीबेरोशीरकट्फलं॥ सैंधवंमधुकंलोध्रंव्रणेयककुचंदनं ॥ चंडाएलामुरास्पृक्कानालिकंपद्मकेशरं ॥ श्रीवेष्टकंसर्जरसंजीवकर्षभकौसठी ॥ पतंगरेणुकादार्वीकर्चूरंसारिवातथा ॥ मंजिष्ठामधुकंचैवद्रव्यैरेतैःपलोन्मितैः ॥ मध्यपादंविजानीयाचत्रतदवतारयेत् ॥ पथ्येपानेतथाभ्यंगेनस्येभोज्येचदापयेत् ॥ पीडयमानेतथावायौपक्षाघाताधिमंथके ॥ अर्दितेकर्णशूलेचऊरुस्तंभेकटिग्रहे ॥ पवनेचशिरःकंपेसूतिकायांप्रदापयेत् ॥ मन्यास्तंभेधनुःकंपेअस्थिभंगेचदारुणे ॥ तथासर्वांगगेवायौशुष्यमाणेपुधातुषु ॥ अनार्तक्षीणरेतस्सुवंध्यायांगर्भिणीषुच ॥ वृष्यंपुनर्नवकरंवल्यमारोग्यदंमहत् ॥ शतावरीतैलमिदंसर्ववातविकारनुत् ॥

अर्थ–शतावरीच्या मुळांचा यंत्रांत काढलेला रस.पुष्कळ घेऊन त्यांत तेल २५६ तोळे, दहीं, दूध व शेपा, वेखंड, कोष्ठ, जटामांसी, शिलाजीत, चंदन, राळे, पद्मकाष्ठ, नागरमोथा, वाळा, काळा वाळा, कायफळ, सैंधव, ज्येष्ठमध, लोध्र, कळलावी, रक्तचंदन, उंदिरकानी, एलची, एकांगीमुरा, लाजाळू, विसें, कमळकेसर, विशेषधूप, राळ, जीवक, ऋषभक, कचोरा, पतंग, रेणुकबीज, दारुहळद, कचोरा, उपरसळी, मंजिष्ठ, ज्येष्ठिमध, हीं प्रत्येक ४ तोळे घेऊन त्यांचे कल्क व काढे घालून मध्यमानानें तैल सिद्ध करावें. तें वायुची पीडा, पक्षवात, अधिमंथ, अर्दित, कर्णशूळ, ऊरुस्तंभ, कटिग्रह, कंपवायू, वाळंतरोग, मन्यास्तंभ, धनुर्वात, कंपवात, अस्थिभंग, सर्वांगवात, धातुशुष्क होणारा वायुरोगी, धातुक्षीणत्व व वंध्यात्व यांवर पथ्यांत प्राशनास, आंगाला अभ्यंग करण्यास, नस्य, आणि भोजन यांमध्यें द्यावें; आणि हें शतावरीतेल वृष्य, वयःस्थापक बल व आरोग्य यानां देतें व गर्भिणीला ही हितावह होतें.

चंदनादि तैल.

चंदनंपद्मकंकुष्ठमुशीरंदेवदारुच ॥ नागकेसरपत्रैलात्वङ्मांसीतगरं
जलं ॥ जातीफलंघोटफलंकुंकुमंजातिपत्रिका ॥ नखंकुंदरुकस्तुरी
चंडाशैलेयमार्द्रकं ॥ पतंगंपुष्करंमुस्तारक्तचंदनसारिवा ॥ सठीक
र्पूरमंजिष्ठालाक्षायष्टिप्रियंगुभिः ॥ शतपुष्पावरीमूर्वाअश्वगंधामही
षधं ॥ पद्मकेसरश्रीवेष्टरसागरुहरेणुभिः ॥ स्पृक्कालवंगकंकोलद्र
व्यैरेभिर्द्विकार्षिकैः ॥ दशमूलकषायस्यषड्भागाःपयसस्तथा ॥ यव
कोलकुलित्थानांवलामूलस्यचैकतः ॥ निक्काथ्यक्काथेभागश्चतैलस्यच
चतुर्दश ॥ ततःपक्कंविजानीयात्क्षिप्रंतदवतारयेत् ॥ शुभेपात्रेविनि
क्षिप्यंमौषधैःससुगंधिभिः ॥ प्रतिवासंततःकार्यमेषांसंयोजनेविधिः ॥
प्रायोयंसकुमाराणामीश्वराणांसुखात्मनां ॥ स्त्रीणांस्त्रीवृंदगर्भाणामल
क्ष्मीकलिनाशनं ॥ अशीतिर्वातजान्रोगान्वातरक्तंविशेषतः ॥ सूति
कावालमर्मास्थिहतक्षीणेषुपूजितं ॥ जीर्णज्वरंसदाहंवाशीतंवाविष
मज्वरं ॥ शोषापस्मारकुष्ठघ्नंवंध्यायांचसुखप्रदं ॥ व्याधितानांहिता
र्थाययेतुकंडूतिपीडिताः ॥ विशेषाद्रुक्षदेहानांश्वित्रिणांचविशेषतः ॥ स
र्वकालप्रयोगेणकांतिलावण्यपुष्टिदं ॥ विनिर्मितमिदंतैलमात्रेयेणम
हर्षिणा ॥ नचास्मात्सहसारोगोप्रभवत्यूर्ध्वजत्रुजः ॥ अस्यप्रयोगा
त्तैलस्यजरानलभतेनरं ॥ चंदनाद्यमिदंतैलंलोकानांचहितंमतं ॥

अर्थ—चंदन, पद्मकाष्ठ, कोष्ठ, वाळा, देवदार, नाकेशर, तमालपत्र, एलची, दालचिनी, जटामांसी, तगर, वाळा, जायफळ, घोटफल, केशर, जायपत्री, नखला, गुगुळ, कस्तूरी, आंवा, दगडफूल, आल्याचा रस, पतंग, पुष्करमूळ, नागरमोथा, रक्तचंदन, उपलसरी, कचोरा, कापूर, मंजिष्ठ, लाख, जेष्ठमध, कुटकी, बडीशेप, शतावरी, मोरवेल, अश्वगंध, सुंठ, कमळकेसर, विशेषधूप, पाहाडमूळ, कृष्णागरु, रेणुकबीज, श्वेतलाजाळु, लवंग, आणि कंकोळ. हीं प्रत्येक दोन तोळे घेऊन त्यांच्या काढ्यांत दशमुळांचा काढा साहा भाग, दूध ६ भाग, व यव, बोरें, कुळीथ आणि चिकणामूळ हे एक भाग आणि काढ्याचा चवदावा भाग तेल याप्रमाणें एकत्र मिळवून पचन करावें, तैल सिद्ध झालें ह्मणजे उतरून चांगल्या भांड्यांला धूपादि वास देऊन त्यांत भरून ठेवावें. प्राय: हें चंदनादि तेल सुकुमार, धनिक व सुखी, अशा लोकानां, स्त्रियां व स्त्रियांचें

गर्भ याविषयीं उत्तम आहे. हें अशीति वातरोग, वातरक्त, बाळंतीण, बालक, मर्म-हत, अस्थि मोडलेला आणि क्षीण यानां हितकारक आहे; व जीर्णज्वर, दाहज्वर, शीत-ज्वर, विषमज्वर, शोष, फेंपरें व कुष्ठ यांचा नाश करितें; व वांझस्त्रियानां हितकारक होतें. व्याधि कंडू, देहाची रुक्षता व कोड यांला विशेषें करून हितकारक होतें. याचा सर्वकाल उपयोग केल्याने लावण्य आणि पुष्टि यांला देतें. हें आत्रेयऋषीनीं निर्माण केलें. या तेलाच्या सेवनानें मनेच्या उर्ध्व भागाचे रोग व जरा हीं कधीं प्राप्त होणार नाहींत, हें लोकांनां फार हितकारक आहे.

मापादितैल.

मापस्याद्धाढकंदेयंतुलार्द्धंदशमूलतः॥ पलानिछागमांसस्यत्रिंशद्द्रोणेंभसःपचेत्॥ चतुर्भागावशेषंतंकषायमवतारयेत्॥ प्रस्थेद्वेतिलतैलस्यपयोदद्याच्चतुर्गुणं॥ जीवनीयानिमंजिष्ठचव्यचित्रककट्फलं॥ सव्योपंपिप्पलीमूलंरास्नामलकगोक्षुरं॥ आत्मगुप्तातथैरंडःशताव्हा लवणत्रयं॥ देवदार्वमृताकुष्ठमश्वगंधावचाशठी॥ एतैरक्षमितैःकल्कैःपाचयेन्मृदुनाग्निना॥ पक्षाघातार्दितेपुंसिहनुस्तंभेतथार्दिते॥ कर्णशूलेशिरःशूलेतिमिरेचत्रिदोषजे॥ पाणिपादशिरोग्रीवाश्रवणे मंदएवच॥ कलायखंजेपंगौचगृध्रस्यामववाहुके॥ पानेवस्तौतथाभ्यंगेनस्येकर्णादिपूरणे॥ तैलमेतत्प्रशंसंतिसर्ववातविकारनुत्॥ महामापादिनामेदंभाषितंमुनिभिःपुरा॥

अर्थ—उडीद १२८ तोळे, दशमुळें ५१२ तोळे; मेंढयाचें मांस १२० तोळे यांचा १०२४ पाण्यांत काढा करून चतुर्थांश उतरून त्यांत तिळांचें तेल १२८ तोळे, दूध २५६ तोळे, जीवनीयगणांची औषधें, मंजिष्ठ, चवक, चित्रक, कायफळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, पिंपळीमूळ, रास्ना, आवळकाठी, गोखरूं, कुहिली, एरंडमूळ, शतावरी, सैंधव, बीड, काच, देवदारू, गुळवेल, कोष्ठकोळिंजन, असगंध, वेखंड व कचोरा हीं प्रत्येक एकेक तोळा घेऊन त्यांचे कल्क करून त्या तेलांत घालावे; आणि तें मृदुअग्नीवर सिद्ध करावें; तें पक्षघातानें पीडित रोग्याला हितकर आहे; व हनुस्तंभ, अर्दित, कर्णशूल, मस्तकशूल, त्रिदोषजतिमिर, हात, पाय, मस्तक, मान, कान यांचा बधिरपणा, कलायखंज, पंगुवात, गृध्रसी आणि अववाहुक यांवर हें प्रशस्त आहे; व हें प्राशनार्थ किंवा बस्तिकर्म, अभ्यंग, नस्य व कानांत घालण्याविषयीं या तेलाची फार प्रशंसा करितात. हें संपूर्णवातविकारनाशक आहे. हें महामाषादिनामक तेल पूर्वी मुनींनीं सांगीतलें.

महानारायणतैल.

तिलतैलंसमादायचतुराढकसंमितं ॥ पंचपल्लवकल्केनशोधयेद्दोप शांतये ॥ तत्राजंदुग्धमथवागव्यंतैलसमंपचेत् ॥ शतावरीरसंचापितै लतुल्यंपचेद्भिषक् ॥ दशमूलीबलारास्नाशिग्रुत्पलपुनर्नवाः ॥ शेफा लिकानागवलातिवलेचप्रसारिणी ॥ अश्वगंधासहचरोदर्भमूलंकरंज कः ॥ खदिरश्चंदनोलोध्रंवचाशनपलाशकं ॥ ककुभैरंडवरुणशालयुग्म कटंभराः ॥ शिरीपःशिखरीवासाहिंस्राजंवूविभीतकं ॥ कांचनारःक पित्थश्चपारिभद्रःप्रियालकं ॥ पापाणभेदसंपाकदुग्धिकादाडिमीफलं ॥ उदुंवरःसप्तलाचकन्यकामालतीत्वचा ॥ माधवीनरमूलंचयवकोल कुलत्थकं ॥ आत्मगुप्तार्ककार्पासवीजंवत्सादनीस्नुही ॥ केतकीमूल धत्तूरलांगलीगर्दभांडकं ॥ चित्रकंचमहानिंवंपंचवल्कलमेवच ॥ मुं डीटंकारिमुसलीहंसपादीविशल्यकं ॥ एषांदशपलान्भागान्वारिण्य ष्टगुणेपचेत् ॥ पादशेषंपरिस्राव्यतत्रतैलंपुनःपचेत् ॥ छागोमेपश्चह रिणएणश्चवहुशृंगकः ॥ शशःशल्यःशिवागोधासिंहोव्याघ्रश्चभल्लुकः ॥ वन्योवराहःखड्गीचमहिपोघोटकस्तथा ॥ कपिर्वभ्रुर्विडालश्चमू पकश्चोरुदर्दुरः ॥ वर्तीकस्तित्तिरिर्लावःखंजरीटश्चकोरकः ॥ उलूको नीलकंठश्चवनकुक्कुटएवच ॥ गृध्रश्चगरुडोहंसश्चक्रःकारंडवोपिच ॥ कपोतःसारसःक्रौंचोवन्यःपारावतस्तथा ॥ रोहितोमद्गुरश्चापिशिलीं ध्रःशृंगकस्तथा ॥ इल्लिसोगर्गरोवर्मिःक्वथिकाकचिकापिच ॥ महाम त्स्यःकच्छपश्चशिशुमारश्चसांकुचिः ॥ मकरोघंटिकाकारस्तदलाभे तुगोधिका ॥ यथालाभममीपांचक्काथंतैलसमंपचेत् ॥ रास्नाश्वगं धामिशिदारुकुष्ठपर्णीचतुष्कागुरुकेशराणि ॥ सिंधूत्थमांसीरजनीद्वयं चशैलेयकंपुष्करचंदनंच ॥ एलासयष्टीतगराब्दपत्रंभृंगोष्टवर्गस्तुव चापलाशी ॥ स्थौणेयवृश्चीवकचोरकाख्यंमूर्वात्वचंकट्फलपद्मकं च ॥ मृणालजातीफलकेतकाख्यंसनागपुष्पंसरलंमुराच ॥ जीवंति काशीरवरास्तथैवदुरालभावानरिकानखश्च ॥ कैवर्तमुस्तार्जुनतिक

कंचवातामखर्जूरकतुंबराश्च ॥ सधातकीग्रंथिकपर्पटाश्चपटोलहेमाव्ह
जयंतिकाच ॥ त्रायंतिकालंबुषशक्रबीजरसांजनाभात्रिवृतारुणाश्च ॥
द्राक्षाकणाद्रोणपुनर्नवाश्चकौंतीकृमिघ्नोंहयमारकश्च ॥ नीलोत्पलंपद्म
ककारवीभ्यांरंभानलोगोक्षुरकःक्षुरश्च ॥ कंकोलकालीयकुसुंभपुष्पंतु
रुष्ककाश्मीरकसिक्थकंच ॥ लवंगकर्पूरसपालकांडकस्तूरिकावाल
कमंबरंच ॥ कल्कानमीपांविपचेत्सुवैद्यःपृथक्पृथक्कर्षयुगोन्मितानां ॥
शुभेचनक्षत्रमुहूर्तलग्नेसंतोष्यविप्रांश्चभिषग्वरांश्च ॥ संपूज्यनारायण
नामधेयंदेवंत्रिनेत्रंजगतामधीशं ॥ पात्रेतुहेम्नःखलुराजतेवाताम्रेथ
वालोहमयेपिरक्षेत् ॥ अभ्यंजनेंजनेनस्येनिरूहेचावगाहने ॥ पानेचै
तद्यथाव्याधिप्रयुंजीतचिकित्सकः ॥ बहुनात्रकिमुक्तेनतैलमेतत्प्रयो
जितं ॥ अवश्यंवातजान्व्याधीनशितीनपिनाशयेत् ॥ एतस्याभ्या
सतोजंतोर्जराजातुनजायते ॥ पतंतिवलयोनांगेपलितंनैवजायते ॥
नेत्रेतेजश्चनितरांगरुडस्येवजायते ॥ नोच्चैःश्रुतिर्नबाधिर्यंकर्णनादो
नजायते ॥ पाणिकंपःशिरःकंपःप्रलापश्चनजायते ॥ बुद्धिभ्रंशोनजा
येततस्यस्यात्कर्मपाटवं ॥ यथाजलेनसिक्तस्यशाखिनःपल्लवादयः ॥
वर्धंतेधातवस्तद्वद्देहिनोनेननित्यशः ॥ आमगर्भंत्यजेद्यातुसूतिकासृ
कूसुताचया ॥ याबहुप्रसवक्षीणाताभ्यएतद्धितंपरं ॥ वंध्याचलभते
पुत्रंगर्भपातोनजायते ॥ योनिरोगाःप्रणश्यंतिप्रदरश्चप्रशाम्यति ॥
अस्मात्तैलवरादन्यत्कुत्रचिन्नास्तिभेषजं ॥ बल्यंवृष्यंबृंहणंचरसायन
मिदंमहत् ॥ पुरादेवासुरेयुद्धेदैत्यैरभिहतान्सुरान् ॥ भिन्नान्भग्नास्थि
कान्विद्धान्पिच्चितान्व्यथयार्दितान् ॥ दृष्ट्वाहितायदेवानांनराणांचा
ब्रवीदिदं ॥ तैलंनारायणोदेवोमहानारायणाभिधं ॥

अर्थ—तिळांचें तेल १०२४ तोळे, घेऊन तें वड, पिंपळ, आंबा, जांबूळ व पायरी यांच्या कल्कानें शुद्ध करावें. त्या तेलांत गाईचें किंवा शेळीचें दूध व शतावरीरस तेलाबरोबर; दशमुळें, चिकणा, रास्ना, शेवगा, कमळ, पुनर्नवा, निर्गुंड, मोठा चिकणा, लघु चिकणा, चिकणा, चांदवेल, आस्कंध, पीत कोरांटा, दर्भमूळ, करंज, खदिर, चंदन, लोध, वेखंड, आसाणा, पळस, अर्जुन, एरंड, वायवर्णा, लघु राळवृक्ष, थोर राळवृ

क्ष, कुटकी, शिरस, आघाडा, अडुळसा, जटामांसी, जांबूळ, बेहेडा, कांचन, कंवठ, कडुनिंब, चारोळी, लकडी पाषाणभेद, बाहवा, दुधी, डाळिंब, उंबर, साल्विण, कोरफड, जाई, दालचिनी, मधुमालती, सादडामूळ, सातु, बोर, कुळीथ, कुहिली, रुई, कार्पासबीज, (सरक्या,) गुळवेल, निवडुंग, केतकीमुळ, धोतऱ्याचें बीज, खडचा नाग, पारोसा पिंपळ, चित्रक, वकाणा निंब, पिंपळ, वड, पायरी, नांदरुखी, जांबूळ, गोरखमुंडी, टंकारी, मुसली, रक्तलाजाळू, बेहेकळ, हीं प्रत्येकीं १० तोळे घेऊन त्यांचा पट पाण्यांत काढा करून चतुर्यांश उरवून गाळून घ्यावा; आणि त्यांत तें तेल घालून त्यांत बोकड, मेंढा, हरीण, काळविट, सांबर, ससा, साळसिंदर, कोल्हा, घोरपड, सिंह, व्याघ्र, आस्वल, रानडुकर, गेंडा, टोणगा, घोडा, वानर, मुंगुस, मांजर, उंदीर, मोठा बेडूक, टिटवी, तित्तिरी, लावा, चाप, चकोर, घुबड, मोर, रानकोंबडा, गिधाडा, गरुड, हंस, चक्रवाक, कारंडव, कवडा, सारस, करटोकपक्षी, पारवा, तांबडा मासा, मद्गुर, शिलींध, शिंगाचा मासा, इल्लीस, गर्गर, वर्मी, कथिका, कविका, महामत्स्य, कांसव, सुसर, सांकुची, मकर, घंटिकाकार, यांच्या अभावीं घोरपड घ्यावी; आतां यांतून जे मिळतील ते घ्यावे; आणि यांच्या रसांत तेल पचन करावें; आणि त्यांत रास्ना, अश्वगंध, बडिशोप, दारुहळद, कोष्ठकोळिंजन, शालिपर्णी, पृश्निपर्णी, मुद्गपर्णी, माषपर्णी, कृष्णागर, उंडिण फळें, सैंधव, जटामांसी, हळद, दारुहळद, शिलाजित पोखरमूळ, चंदन, इलाची, जेष्ठमध, तगर, नागरमोथा, तमालपत्र, माका, जीवक, ऋषभक, मेद, महामेद, ऋद्धि, वृद्धि, कांकोली, क्षीरकांकोली, वेखंड, कचोरा, गाठीवन, पुनर्नवा, कचारा, मोरवेल, दालचिनी, कायफळ, पद्मकाष्ठ, कमळाचीं बिसें, जायफळ, केतक, नागदवणी, सुरु, एकांगी मुरा, गुळवेल, वाळा, त्रिफळा, धमासा, कुहिली, नला, बकाणलिंब, नागरमोथा सादडा, किराईत, बदाम, खजूर, चिरफळ, धायटीचें फूल, पिंपळीमूळ, पित्तपापडा, कडुपडवळ, कल्हार कमळ, हळद, त्रायमाण, लाजाळू, इंद्रजव, रसांजन, बाभळीचें बीं, सेड, मायवर्णा, द्राक्षें, पिंपळी, द्रोणीचें मीठ, पुनर्नवा, रेणुकबीज, वावडिंग, कण्हेर, निळें कमळ, पद्मकाष्ठ, मेथी, केळीचा कंद, चित्रक, गोखरू, विखरा, कंकोळ, दारुहळद, कुसुंब, शिलारस, केशर, मेण, लवंग, कापूर, पाळकांदे, कस्तूरी, वाळा, अंबर, हीं प्रत्येक औषधें दोन दोन तोळे घेऊन त्यांचा कल्क दोन दोन तोळे घालून तेल सिद्ध करावें. मग चांगला दिवस पाहून देव, ब्राह्मण व वैद्य यांची पूजा करून व श्रीनारायण व माहादेव यांची पूजा करून हें तेल सोन्याचे, रुप्याचे, तांब्याचे किंवा लोखंडाचे भांड्यांत रक्षण करून ठेवावें. हें आंगाला लावणें, अंजन, नस्य, निरुहबस्ति, स्नान, प्राशन याविषयीं जशी व्याधि असेल तसें द्यावें. फारकरून ह्या तेलांच्या प्रयोगानें अवश्य ऐंशी प्रकारचे वात व्याधींचा नाश होतो. या तेलाचें नेहमी सेवन केलें असतां; सातारपण कधींही येणार नाहीं; व आंगाला वळ्या आणि

केश पांढरे होणार नाहींत; नेत्रामध्यें गरुडनेत्राच्या तेजासारिखें तेज येतें, मोठ्यानें बोलल्यावांचून लवकर आइकतो, बहिरा होत नाहीं, कर्णामध्यें नाद होत नाहीं, हात व मस्तक कांपत नाहींत; व रोगी बडबडत नाहीं, बुद्धिभ्रंश नहोतां कर्मकुशल होतो. जसें वृक्षाला उदकानें शिंपिला असतां; त्याची पालवी वाढत्ये तसें हें देहाचें तेज वाढवितें. जा स्त्रीचा गर्भपात होतो; व जा बाळंतिणीचें फार रक्त गेलें; व जी फारदा बाळंत होऊन क्षीण झाली, अशा स्त्रियांनां हें फार उत्कृष्ट हितकारक आहे. या तैलानें वंध्येला पुत्र होतो, गर्भपात होत नाहीं, योनिरोग नाश पावतात, प्रदर शांत होतो, या तैलाहून दुसरें औषध कोठे ही नाहीं. वल्य, वृष्य, बृंहण व रसायण असें हें तेल आहे. पूर्वी देव व असुर यांच्या युद्धामध्यें दैत्यानीं ताडण केलेले देव मोडले, चेंचले, ठेंचले व पीडित झाले असें पाहून हें तेल नारायणानें देवांला सांगीतलें, हें महानारायण तैल आहे.

दुसरा प्रकार.

वलाश्वगंधावृहतीश्वदंष्ट्रास्योनाकवाटयालकपारिभद्रा ॥ क्षुद्राकठिल्लातिवलाग्निमंथरास्नारणीकःकणिकच्छुराश्च ॥ निर्गुंडिकैरंडकुरंटकानांमूलानिवर्पासरणीयुतानि ॥ मूलंविदध्याद्दशपाटलानांसंकुटयपादांशवतोद्धृतानां ॥ द्रोणैरपामष्टभिरेवपक्त्वापादावशेषेणरसेनतेन ॥ तैलाढकाभ्यांसमदुग्धमत्रगव्यानिदद्यादथवाज्यदुग्धं ॥ दद्याद्रसंचैवं शतावरीणांतैलंचतुल्यंपुनरेवतत्र ॥ पक्त्वादिनैकंकृतवस्त्रपूतंकल्कानिचैषांहिसमावपेच्च ॥ रास्नाश्वगंधामिशिदारुकुष्ठपर्णीतुरुष्कागरुकेसराणि ॥ सिंधूत्थमांसीरजनीद्वयंचशैलेयकंपुष्करचंदनानि ॥ एलासयष्टीतगरांवुपत्रंभृंगाष्टवर्ग्यंचजयापलाशं ॥ वृश्चीवऐलेयकचोरकाख्यंमूर्वात्वचापुष्करपद्मकंच ॥ मृणालजातीफलकेतकीचसनागपुष्पंसरलंसुराच ॥ जीवंतिकाचंदनकंबुशीरंदुरालभावान्नरिकानखंच ॥ कैवर्तकंतालशिरःसतिकंखर्जूरिमुस्तंसमभागमेषां ॥ एतैःसमैः सार्धपलप्रमाणैर्भागानताष्टौकिलकाल्मेष्यः ॥ एणःकुरंगोहरिणोमयूरोगोधाशशःशल्लकचक्रवाकौ ॥ वर्तीरलावौवरतित्तिरीचसत्सारचक्रौंचकंकुवर्णः ॥ आनूपकूर्माइहमांसपुष्टाःक्रमात्क्षिपेच्चात्रयथैवलाभं ॥ रोहीतकोथोशववेत्रनामाकसाढवौमुद्गरशृंगिकेच ॥ पाठीनिकालीयकतोडिकाचसरोखरायेकुरुदादयश्च ॥ येचापितोयेशिशुमारमु

ख्यालभ्याश्चयेश्वभ्रमताभुजंगाः ॥ अन्येपियेभूचरखेचराश्च पूर्णाअमी
पांक्रमशोत्रयोज्याः ॥ सुताम्रपात्रेप्यथमृत्तिकाचकर्पूरकाश्मीरमृगां
डजंवा ॥ दद्यात्सुगंधायवदंतिकेचित्प्रक्लेददौर्गंध्यविनाशनाय ॥ व
दंतिकेचिद्द्विपदःसमेतंशुभेनिधायाथमुहूर्तलग्ने ॥ संतोष्यविप्रान्भि
पजोर्थिनश्चसुभोजनेयज्ञघृतंतथैव ॥ पानेचनस्येचनिरूहणेचभोज्यंप्र
देयंततएवनूनं ॥ अभ्यंगमादौचसदाप्रशस्तंनिर्वाप्यतेकर्मसुकेपुचि
न्हं ॥ उन्मादशोपक्षतरक्तपित्तश्वासाभ्रमूर्च्छादिपुमूर्च्छितेपु ॥ का
साग्निवाताहनुमूलदंतकर्माष्ठग्रुन्नीहिसतोददाहान् ॥ सतालुमूलं
श्रवणाक्षिशूलंवाधिर्यमुच्चज्वरपीडितंच ॥ मंदेंद्रियत्वंचतथाग्निमां
द्यंनष्टप्रशुक्रत्वमथांगकंडूः ॥ निहंतिसत्वंनगुणप्रभावात्कटिग्रहाप
स्मृतिगृध्रसींच ॥ पक्षाभिघातंचरणाभिघातंहस्ताभिघातंचशिरोग्रहं
च ॥ प्रक्षीणमुग्रंसकलप्रमेहान्नासाक्षिकर्णप्रभवान्विकारान् ॥ वा
तादिजातान्किलभूतजातान्कृत्यादिजातान्ग्रथितान्विकारान् ॥ रो
गःसनास्त्येवनरस्यदेहेनानेनशांतिसमुपैतिमोहः ॥ सद्योव्रणानस्थि
विचूर्णितंवानाडीव्रणान्वापिचयोजयित्वा ॥ सुवर्णवर्णंवितनोतिरू
पंनारायणाख्योखिलतैलराजः ॥ वंध्यःपुमान्वापिवरांगनावासुपुत्र
मामोतिविलेपतोस्य ॥ सिध्यत्यनेनैवानियोजितेननिदाघदग्धःप्रहतो
पिवृक्षः ॥ अन्यस्यकाकाभणितिर्निरस्यरोगस्यजंतोरपरस्यचापि ॥
नारायणोक्तंतदिदंतुतैलंनारायणंनामततःप्रसिद्धं ॥

अर्थ—चिकणामूळ, अश्वगंध, डोरली, गोखरूं, दिंडा, तुपकडचा, निंब, रिंगणी, कांटिल, अतिबला, ऐरण, रास्ना, टाकळा, कुयली, निर्गुड, एरंडमूळ, कोरांटा, शाहाजिरें, चांदवेल, दशमुळें व पाडळ यांचीं मुळें, कुटून ८१९२ तोळे पाण्यांत त्यांचा काढा करून चतुर्थांश गाळून घ्यावा. त्यांत तेल ५१२ तोळे व तितकेंच गाईचें व शेळीचें दूध घालून कढवून पुनः तेल ५१२ तोळे घालून एक दिवस शिजऊन वस्त्रगाळ करून त्यांत रास्ना, अश्वगंध, बडिशोप, दारुहळद, कोष्ठ, शालिपर्णी, शिलारस, कृष्णागरु, नाकेशर, सैंधव, जटामांसी, हळद, दारुहळद, दगडफूल, पोखरमूळ, चंदन, एलची, जेष्ठमध, तगर, वाळा, तमालपत्र, माका, जीवक, ऋषभक, मेदा, महामेदा, ऋद्धि, वृद्धि, काकोली, क्षीरकाकोली, शमी, पळस, पुनर्नवा, एलावालुक, कचरा, मोरवेल,

दालचिनी, कमळकंद, पद्मकाष्ठ, कमलविसें, जायफळें, केतक नागदवणी, देवदार सरल, तांदळांचें मद्य, जीवशाक, हरिचंदन, पीत वाळा, धमासा, कुयलीबीज, नखला, बकाण निंब, ताडाचा मस्तकाचा गाभा, किराईत, खजूर, भद्रमोथा, हीं प्रत्येक साहा साहा तोळे; व तगर आठ तोळे, मंजिष्ठ आठ तोळे, इतक्यांचें कल्क व हरण, कुरंग, काळ विट, मोर, घोरपाड, ससा, शक्र, चक्रवाक, वर्तिकपक्षी, लावा, टिटाटवली, सारस, करढोंक, बगळा, पाणयळजीव, कांसव, यांचा व रोहित, शवनेत्र, कस, आढव, मुद्गर, शृंगिका, पाठीन, कालीयक, तोंडिका इत्यादि सरोवरांतील मत्स्य व उखर जाग्याचे मत्स्य कुरुदादिक व जे सुसरादिकरून जे मिळतील ते जलचर, बिळांत राहाणारे सर्पादिक व जे आकाशीं फिरणारे पक्षी व भुयीवरील जीव जे मिळतील त्यांचें मांसरस घालून तेल सिद्ध करावें; नंतर गाळून तांब्याच्या भांड्यांत किंवा मातीच्या भांड्यांत भरून त्यांत सुगंधाकरितां व दुर्गंध जाण्याकरितां कापुर, केशर व कस्तूरी हे पदार्थ घालून शुभ मुहूर्त पाहून ब्राह्मण, वैद्य, देव व याचक यांची पूजा करून नंतर तें तेल पान नस्य व निरूहबस्ति यांचा ठायीं योजावें. हें अंगास प्रशस्त आहे; आणि उन्माद, शोष, क्षत, रक्तपित्त, श्वास, भ्रम, मूर्छा, कास, अग्निवात, हनुमूल, दंतमूल, कृमि, इंद्रियघ्नी, ठणका, दाह, तालुशूळ, कर्णशूळ, नेत्रशूल, बहिरेपणा, ज्वरवृद्धिगत, मंदेंद्रियपणा, धातुक्षय, कंडू, कटिग्रह, अपस्मार, गृध्रसी, अर्धांग वायु, हस्ताभिघात, पादाभिघात, मस्तकशूल, कृशत्व, सर्वमेह, नाक, कान व डोळे यांचो व्याधि, सर्व वातव्याधि, भूतोन्माद, कृत्योन्माद, ग्रंथिविकार, सद्योव्रण, अस्थिभंग व नाडिव्रण, इत्यादिकांचा नाश करितें. या तेलानें न जाणारा असा व्याधीच नाहीं; व हें सुवर्णासारिखी कांति करितें; आणि पुरुष व स्त्रियांचें वंध्यात्व घालवितें. किंबहुना उष्णानें जळालेला वृक्षही शिंपून जिवा होईल. मग अन्य कोणतेही रोग नाश करील हें सांगायाला नको. हें तेल नारायणानें स्वमुखानें सांगितलें. यास्तव यास नारायण तेल नाम प्रसिद्ध जाहालें.

जंबूकाद्यतैल.

वृद्धंशृगालमादायपादोक्तोदरमध्यगा ॥ त्यक्त्वाशेषंचसंगृह्यदत्वा वारिचतुर्गुणं ॥ चतुर्भागावशेषंचग्राह्यंतैलसमंपचेत् ॥ अजश्चर्म विनिर्मुक्तोत्यक्त्वाशृंगशिरादिकं ॥चरणायुधमांसंचजलेद्रोणद्वयेपचेत् ॥ तेनपादावशेषंचपाचयेच्चपृथक्पृथक् ॥ शतावरीणांचरसंतैलतुल्यंप्रदापयेत् ॥ छागंगव्यंपयःशुल्कंमस्तुवारुणिचोत्तमं ॥ पात्रमात्रेणसंग्राह्यंततोनंतरमौषधं ॥ शालिपर्णीपृष्ठपर्णीबलाचबहुपुत्रिका॥ एरंडस्यचमूलानिवृहत्याःपूतिकस्यच ॥ गवेधुकस्यमूलानितथासहचर

स्यच ॥ प्रसारिण्याश्वगंधाचतालमूलीपुनर्नवा ॥ रास्नागोक्षुरकंपा ठापाटलापारिभद्रकं ॥ अर्कमूलंवृहद्दंतीकटभीकांचनारिका ॥ चक्रम र्दमपामार्गमंकोटंबैल्वमूलकं॥स्योनाकनकमालाव्दवासानंतापटोल कं ॥ मेगुडीमुंडिकातुंवीलांगलीशिग्रुपीलुका ॥ खर्जूरीकासमर्दचगुं जामूलंविधारकं ॥ अमृताशंखपुष्पीचभृंगराजककुंदरैः ॥ वटश्चकु टजोद्दीच्यमदनंवान्नरीस्नुही ॥ महानिंबोविशालाचशिरीषोकर वीरका ॥ पलंपलंचसंगृह्यकषायंसाधयेत्सुधीः ॥ चतुर्भागावशेषंतुतै लतुल्यंचदापयेत्॥चंदनंदेवकाष्ठंचकुष्ठंमांसीपुनर्नवा॥पूतीकरास्ना त्रिवृतारेणुकाशिग्रुगुग्गुलुः ॥ चातुर्जातकमंजिष्ठाहरिद्रेद्वेचपुस्तकं ॥ धातकीपुष्पपतंगंतथाक्षारद्वयंवचा ॥ एलाशैलेयकंव्योषंलवणानिच पंचकं ॥ एभिर्द्रव्यैःपलार्द्धस्याच्छनैर्मृद्वग्निनापचेत् ॥ सौगंधार्थंच दातव्यंलवंगंजातिकाफलं ॥ कस्तूरीघनसारंचसिल्हारंनखवालकं ॥ कृष्णागरुनतंचैवपत्रकंजातिपत्रिका ॥ यथालाभंचसंगृह्ययोजयेत्तत्रत द्भुवः ॥ तैलेनानेननश्यंतिसर्वरोगासमीरणा ॥ अशीतिर्वातजा रोगाःशोफशूलकटिग्रहाः ॥ कुब्जानामक्षपंगूनांवामनानांतथैवच ॥ अधोभागेचयेवाताःशिरोमध्यगताश्चये ॥ मन्यास्तंभेहनुस्तंभेवातरो गेगलग्रहे ॥ यस्यशुष्यंतिचैकांगंयेचभग्नास्थिसंधयः ॥ पक्षाघातेपु सर्वेपुअर्दितेचहनुग्रहे ॥ मंदश्रुतौचश्रवणेतिमिरेचत्रिदोषजे ॥ हृद च्छूलेपार्श्वशूलेचवाधिर्येमूकमिम्मिणे ॥ कामलापांडुरोगेचखञ्जीशू लकटिग्रहे ॥ हस्तकंपेशिरःकंपेगात्रकंपेशिरोग्रहे ॥ कलायखंजगृ भ्रस्यामववाहुंचनाशयेत् ॥ वाधिर्येकर्णनादेचसर्ववातविकारनुत् ॥ दंडापतानकश्चैवमन्यास्तंभेविशेषतः ॥ हनुस्तंभेप्रशस्तंस्यात्सूतिका वातनाशनं ॥ वाल्येमांसप्रदंचैवशुक्राग्निवलवर्धनं ॥ अंत्रवृध्दिभंड वृध्दिमपचींनाशयेत्ततः ॥ योनिशूलमसृग्दोषमाध्मानंविनिहंतिच ॥ वातशोणितदुष्टानांवातोपहतचेतसां ॥ अश्वानांवातभग्नानांकुंजराणां नृणांतथा ॥ तैलमेतत्प्रयोक्तव्यंसर्ववातविकारनुत् ॥ अस्थिमेदोगता

वाताक्षीणाश्चार्शोभगंदराः ॥ भूतग्रहपिशाचाश्चतथादुष्टग्रहानपि ॥ दद्रूविचर्चिकापामाकुष्ठकंडूव्रणापहं ॥ शृगालाद्यमिदंख्यातंवहुपीडांचनाशयेत् ॥ एतत्तैलेननश्यंतिरोगाःसर्वेविशेषतः ॥

अर्थ–मारलेला कोल्हा घेऊन त्याचे पाय व पोटांतील आंतडी काढून टाकून त्याचे मांसाचे बारीक तुकडे करुन मांसाच्या चौपट पाणी घालून चतुर्थांश रस गाळून घ्यावा. त्यांत त्या रसाइतकें तेल. घालून पचवावें: व बोकडाचें चांबडें, मस्तक व पाय हे काढून त्याच्या काढ्यांत; आणि कोंबड्याचे मांसाच्या रसांत निरनिराळें पचन करावें; नंतर शतावरीचा रस तैलासमान व शेळीचें दूध, ताकाची पांढरी निवळी. उत्तम मद्य, हीं प्रत्येक तैलाइतकीं घालून त्यांत सालवण, पिठवण, चिकणा, लघु शतावरी, एरंड मूळ, रिंगणी, करंज, कसईचें मूळ, कोरांटामूळ, लाजाळूकंद, अश्वगंध, काळी मुसळी, पुनर्नवा, रास्ना, गोखरु, पाहाडमूळ, पाडळीचें मूळ, निंब, रुईचें मूळ, थोर दांती, किन्ही, नागकेशर, टाकळा, आवाडा, अक्रोड व वेल यांचीं मुळें, वाहावा, करंज, नागरमोथा, अडुळसा, धमासा, कडुपडवळ, निर्गुंडी, मुंडी, कडुभोपळा, क़ळलावी, शेवगा, पीतवर्ण तुरटी, खारीक, कासिवदा, गुंजेचें मूळ, विधारा, गुळवेल, शंखाहुली, माका, कुंद, वड, कुडा, वाळा, गेळा, कुहिली, सोटे निवडुंग, वकाणनिंब, वृंदावन, शिरसवृक्ष, व मनशीळ, हे प्रत्येक चार चार तोळे घेऊन यांचा चतुर्थांश काढा तैलासमान घालावा; नंतर चंदन, देवदार, कोष्ठ, जटामांसी, पुनर्नवा, करंज, रास्ना, तेड, रेणुकबीज, शेवगा, गुग्गुळ, दालचिनी, एलची, तमालपत्र, नाकेशर, मंजिष्ठ, हळद, दारुहळद, नागरमोथा, धायटीचीं फुलें, पतंग, यवखार, टांकणखार, वेखंड, एलची, शिलारस, सुंठ, मिरीं, पिंपळी; आणि पंच लवणें हीं दोन दोन तोळे घ्यावीं; आणि त्यांचा कल्क करून त्या तैलांत मिसळून मंदाग्नीवर सिद्ध करावें; आणि त्यांत सुगंध येण्याकरितां लवंगा, जायफळ, कस्तुरी, कापूर, शिलारस, नखला, वाळा, कृष्णागर, तगर, तमालपत्र व जायपत्री, यांतून जे मिळतील ते घेऊन त्यांत घालावें; हें तेल संपूर्ण रोग, ऐशीं प्रकारचे वायु, सूज, शूल, कमर धरते ती, कुबडे, पांगळे, खुजे, अधोभागगत वातरोग, मस्तकांतील वातरोग, मन्यास्तंभ, हनुस्तंभ, वातरोग, गलग्रह, एकांगवात, अस्थिभंग, संधिभंग, पक्षघात, अर्दित, हनुग्रह, वैहरेपणा, मूकवात, मिंमिणवात, कावीळ, पांडुरोग, खल्लीवात, शूल, कटिग्रह, हस्तकंप, शिरःकंप, गात्रकंप, मस्तकशूल, कलायखंजवात, गृध्रसी, आणि अवबाहुक यांचा नाश करितें; आणि बहिरेपणा, कर्णनाद, संपूर्णवात, दंडापतानक, मन्यास्तंभ, हनुस्तंभ, बाळंतरोग, हे नाश पावतात. बालपणामध्यें देहाला मांसल करणारें, बल व शुक्र यानां वाढविणारें, अंडवृद्धि, अंत्रवृद्धि, अपची, योनिशूल, रक्तदोष, आध्मान, वातरक्त, वातरोग, वायूनें विघडलेले हत्ती, घोडे व गाई, यांच्या वातविकारांचा नाश करितें; व अस्थिगत, मेदगतवायु, क्षय, अर्श, भगंदर, भूतबाधा, ग्रहबाधा,

पिशाचबाधा, दुष्टग्रह, दद्रुपामा, विचर्चिका, कुष्ट, कंडू व व्रण, यांचा हें शृगादि तेल नाश करितें. या तेलाच्या सेवनानें विशेषेंकरून संपूर्ण रोग नाश पावतात.

तिसरें माषतैल.

माषक्काथेवलाक्काथेरास्नायादशमूलजे ॥ यवकोलकुलित्थानांछाग मांसरसेपृथक् ॥ प्रस्थेतैलस्यचप्रस्थंक्षीरंदद्याच्चतुर्गुणं ॥ रास्नात्मगु प्तासिंधूत्थशताव्हैरंडमुस्तकैः ॥ जीवनीयवलाव्योषपचेदक्षमितैःपृ थक् ॥ हस्तकंपेशिरःकंपेबाहुकंपेववाहुके ॥ वस्त्यभ्यंजनपानेपुना वनेचप्रयोजयेत् ॥ माषतैलमिदंश्रेष्ठमूर्ध्वजत्रुगदापहं ॥

अर्थ—उडीद, चिकणा, रास्ना, दशमुळें, सातु, बोर व कुळिथ यांचा पृथक् पृथक् ६४ तोळे काढा, मांसरस ६४ तोळे, इतक्यांत ६४ तोळे तेल निर निराळें पक्व करून पुनः तेलाचे चौपट दूध घालून रास्ना, कुहिली, सैंधव, शतावरी, एरंड, नागरमोथे, जीवनीयगण, चिकणा व त्रिकटु यांचें प्रत्येक तोळा प्रमाणें चूर्ण करून टाकावीं; नंतर पक्व करून ठेवावें. याला माषतैल असें ह्मणतात. हें हस्तकंप, शिरःकंप, बाहुकंप, अव बाहुक, या रोगांवर बस्ति, अभ्यंजन, नस्य व पान याचे ठायीं योजावें. हें खांद्यांच्या वरच्या भागाच्या रोगांचें नाशक आहे.

रास्नापूतीकतैल.

दशमूलवलादारुअश्वगंधाशतावरी ॥ वरुणैरंडनिर्गुंडीतर्कारीशिग्रु मोरटं ॥ सहचरंचित्रमूलंकरंजांकोलमूलकं ॥ पुनर्नवंचभूपीलुअ र्कपुंखीदुरालभा ॥ जीवंतीविपतिंदुश्चवातारिहिंस्राशिग्रुकं ॥ अल र्कयवकोलंचकुलित्थानांकपायकं ॥ एतेपांचसमंरास्नापूतीकंचत योःसमं ॥ अष्टभागावशेषंतुकपायमवतारयेत् ॥ तत्पादंतिलतैलं चअजाक्षीरंचतत्समं ॥ गुग्गुलंतगरंमांसीत्रिकटुत्रिफलानिच ॥ चा तुर्जातंकचोरंचविडंगामरदारुच ॥ हिंगुरास्नावचातिक्तापाठायष्टि कचित्रकं ॥ प्रियंगुपिप्पलीमूलंचंदनंचव्यदीपकं ॥ वरालंचंपकंकु ष्ठंमंजिष्ठामिशिसर्षपाः ॥ जातीफलंसुगंधंचपाठोशीरंसमांशकं ॥ ए तत्तैलस्यषष्टांशंकल्कद्रव्याणिदापयेत् ॥ सुमुहूर्तेसुनक्षत्रेनववस्त्रेण पीडयेत् ॥ पानलेपननस्याद्यैःशिरोवस्तिषुयोजितं ॥ धनुर्वातांतरा यामंगृध्रसीमववाहुकं ॥ आक्षेपकेव्रगायामेविश्वाच्यामपतंत्रके ॥ आ

ढ्यवातेहनुस्तंभेशिरावातापतानके ॥ भ्रूशंखकर्णनासाक्षिजिव्हास्तं भेचदारुके ॥ कलायखंजतापंगुसर्वांगैकांगमारुते ॥ अर्दितेपादहर्षे चपक्षाघातेप्रशस्यते ॥ ऊरुस्तंभसुप्तवातंनाशयेन्नात्रसंशयः ॥ रास्नापूतीकनामैतत्तैलमात्रेयनिर्मितं ॥

अर्थ— दशमुळें, चिकणा, दारुहळद, आस्कंद, शतावरी, वायवर्णा, एरंड, निर्गुंडी, थोर ऐरण, शेवगा, उसांचे मूळ, पीतकोरांटा, चित्रक, करंज, आकोल, मुळा, पुनर्नवा, भूपीलु, अर्कपुंखी, धमासा, जटामांसी, कुचला, रक्त एरंड, रक्त रुई, सातु, बोर व कुलित्थ ह्या औषधांच्या बरोबर रास्ना आणि सर्वांचे बरोबर करंज, याप्रमाणें घेऊन त्यांचा अष्टमांश काढा उतरला ह्मणजे त्याचे चतुर्थांश तेल आणि तितकेंच शेळीचें दूध आणि गुग्गुळ, तगर, जटामांसी, त्रिकटु, त्रिफळा, दालचिनी, वेलदोडे, तमालपत्र, नागकेशर, कचोरा, वावडिंग, देवदार, हिंग, रास्ना, वेखंड, कटुकी, पाहाडमूळ, जेष्ठीमध, चित्रक, गहुला, पिंपळमूळ, चंदन, चवक, ओंवा, लवंग, चांपा, कोष्ठकोळिंजन, मंजिष्ठ, वडिशेप, शिरस, जायफळ, रोहिगवत, पाहाडमूळ, वाळा ह्या सर्व औषधांचें चूर्ण तेलाचे षष्ठांश त्यांत टाकून सर्व एकत्र मंदाग्नीवर कढवून चांगला दिवस पाहून गाळून ठेवावें; आणि पिंण, लेपन, शिरोबस्ति यांचे ठिकाणीं योजलें असतां; धनुर्वात, अंतरायाम, गृध्रसी, अववाहुक, आक्षेपक, व्रणायाम, विश्वाची, अपतंत्रक, आढ्यवात, हनुस्तंभ, शिरावात, अपतानक, भ्रू, शंख, कर्ण, नासा, अक्षि व जिव्हा यांचा स्तंभ, दारुक, कलायखंजता, पंगुता, सर्वांगवात, एकांगवात, अर्दित, पादहर्ष, पक्षाघात, ऊरुस्तंभ व सुप्तवात इतक्यांचा नाश करील, यांत संशय नाहीं. त्याला रास्नापूतिक नामक तेल ह्मणतात. हें आत्रेयनिर्मित आहे.

बलातैल वातादिकांवर.

वलामूलकषायेणदशमूलशृतेनच ॥ कुलित्थयवकोलानांक्वाथेनपयसस्तथा ॥ अष्टाष्टभागयुक्तेनभागमेकंचतैलकं ॥ गणेनजीवनीयेनशतावर्यैंद्रदारुणा ॥ मंजिष्ठाकुष्ठशैलेयतगरागुरुसैंधवैः ॥ वचापुनर्नवामांसीसारिवाहयपत्रकैः ॥ शतपुष्पाश्वगंधाभ्यामेलयाचविपाचयेत् ॥ गर्भार्थिनीनांनारीणांपुंसांचक्षीणरेतसां ॥ व्यायामक्षीणगात्राणांसूतिकानांचयुज्यते ॥ राजयोग्यमिदंतैलंसुखिनांचविशेषतः ॥ बलातैलमितिख्यातंसर्ववातामयापहं ॥

अर्थ—चिकणामूळ आठ प्रस्थ घेऊन त्यांत पाणी बत्तीस प्रस्थ घालून चवथाई पाणी राहीं तोंपर्यंत काढा करून गाळून घ्यावा. दशमुळें आठ प्रस्थ घेऊन त्यांत पा-

णी बत्तीस प्रस्थ घालून चवथाई पाणी राही तोंपर्यंत काढा करून गाळून घ्यावा. कुळिथ, जव, बोराच्या आंठ्यांतील बीज, हीं तीन औषधें वेगळीं वेगळीं आठ प्रस्थ घेऊन त्या एकेकांत पाणी बत्तीस बत्तीस प्रस्थ घालून चवथाई पाणी राही तोंपर्यंत काढे करून वेगळे वेगळे गाळावे. मग ते पांचही काढे एकाजागीं करून त्यांत गाईचें दूध आठप्रस्थ घालून व तिळांचें तेल एक प्रस्थ घालावें. त्यांत चूर्ण टाकावयाचीं तीं औषधें येणें प्रमाणे. जीवनीयगणाचीं औषधें, शतावरी, मंजिष्ठ, देवदार, कोष्ठ, पत्थरफूल, तगर, अगरू, सैंधव, वेखंड, पुनर्नवा, जटामांसी, पांढरी उपळसरी, काळी उपळसरी, तमालपत्र, बडिशेप, आसंध व विलायची, हीं चोवीस औषधें तेलाचे चतुर्थांश घेऊन कल्क करून त्या तेलांत घालून तेल शेष राही तोंपर्यंत पाक करून नंतर तेल गाळून घ्यावें. याला बलातैल ह्मणतात. हें तेल ज्या स्त्रियांस गर्भाची इच्छा आहे त्यांचे आंगास लावावें. ज्या पुरुषांची धातुक्षीण आहे त्यांस व दूर जाणें, येण्याजाण्याच्या परिश्रमेंकरून क्षीण आहेत गात्रें ज्या पुरुषाचीं त्यांस व बाळंत स्त्रियांस योजावें; व हें तेल विशेषेंकरून राजांस व सुखीमनुष्यांस योग्य आहे. यापासून सारे वायूचे विकार दूर होतात.

माषादितैल ग्रीवास्तंभादिकांवर.

माषायवातसिक्षुद्रामर्कटीचकुरंटकः ॥ गोकंटटुंटुकश्चैषांकुर्यात्सप्तपलंपृथक् ॥ चतुर्गुणांबुनापक्त्वापादशेषंसृतंनयेत् ॥ कार्पासास्थीनिबदरंशणबीजंकुलित्थकं ॥ पृथक्चतुर्दशपलंचतुर्गुणजलेपचेत् ॥ चतुर्थांशावशिष्टंचगृण्हीयात्क्काथमुत्तमं ॥ प्रस्थैकंछागमांसस्यचतुःषष्टिपलेजले ॥ निःक्षिप्यपाचयेद्धीमान्पादशेषंरसेनयेत् ॥ तैलप्रस्थंततःक्काथान्सर्वानेतान्विनिःक्षिपेत् ॥ कल्कैरेभिश्चविपचेदमृताकुष्ठनागरैः ॥ रास्नापुनर्नवैरंडैःपिप्पल्याशतपुष्पया ॥ बलाप्रसरणीभ्यांचमांसीकटुकयातथा ॥ पृथगर्धपलैरेतैःसाधयेन्मृदुवन्हिना ॥ हन्यात्तैलमिदंशीघ्रंग्रीवास्तंभापबाहुकौ ॥ अर्धांगशोषमाक्षेपमूरुस्तंभापतानकौ ॥ शाखाकंपंशिरःकंपंविश्वाचीमर्दितंतथा ॥ माषादिकमिदंतैलंसर्वंचातविकारनुत् ॥

अर्थ—उडीद, जव, आळशीचें बीज, रिंगणी, कवचबीज, कोन्हांटा, गोखरूं, टेंटू हीं आठ औषधें सात सात पळें घेऊन त्यांत पाणी साऱ्या औषधांचे चौपट घालून चवथाई पाणी राही तोंपर्यंत काढा करून गाळून घ्यावा; व कापसाच्या सरक्या, बोरांच्या आंठ्या, तागाचें बीज व कुळिथ हीं चार औषधें चवदा चवदा पळें घेऊन त्यांत पाणी चौपट घालून चवथाई पाणी राही तोंपर्यंत काढा करून गाळून घ्यावा. तोकडाचें मांस एक

प्रस्थप्रमाण घेऊन त्यांत पाणी चंवसष्ट पळें घालून चवथाई पाणी राही तोंपर्यंत काढा करून गाळावा. मग तिळांचें तेल एक प्रस्थप्रमाण घेऊन त्यांत ते सारे काढे मिळवावे. त्यांत कल्क टाकावयाचीं औषधें तीं येणेंप्रमाणें. गुळवेल, कोष्ठ, सुंठ, रास्ना, पुनर्नवा, एरंडमूळ, पिंपळी, वडिशोप, चिकणांमूळ, चांदवेल, जटामांसी, कटुकी हीं बारा औषधे अर्धें अर्धें पळ घेऊन कल्क करून तेलांत घालून. हलक्या अग्नीनें तेल शेष राही तों पर्यंत पाक करून नंतर तेल गाळून घ्यावें. याला माषादि तैल ह्मणतात. हें तेल अंगास लावलें असतां; ग्रीवास्तंभ वायु, अपबाहुक वायु, अर्धांग वायु, आक्षेपक वायु, ऊरुस्तंभवायु, अपतानक वायु, हस्तपादादिक शाखा कांपवितो तो वायु, मस्तक कांपवितो तो, विश्वाची वायु व अर्दितवायु हे सारे वायु दूर होतात.

सुगंधतैल.

तगरागरुकुंकुमकुंदुरुभिःसलवंगवरांगकुरंगमदैः ॥ सरलामरदारुद लद्रविडीनखकेशररुङ्नलिनीनलदैः ॥ सतुरुष्कहरेणुवलाक्कथनैरि तितैलमिदंपयसाविपचेत् ॥ नृपतिप्रमदाशिशुभिःस्थविरैरुपयोज्य मिदंपवनामयजित् ॥

अर्थ—तगर, अगरु, केतक, कुंदागवत, लवंग, नाडी दालचिनी, कस्तुरी, सुरु, देवदार, वेलचीदाणे, नखला, नाकेशर, कोष्ठकोळिंजन, कमळिणी, वाळा, शिलारस, मेंदी व चिकणा यांचा काढा व दूध एकत्र करून तैल सिद्ध करावें. ते राजाच्या स्त्रिया पुत्र व ह्मातारे याणीं याचें सेवन करावें. हे वातविकाराचा नाश करितें.

एलादि तैल.

एलामुरासरलशैलजदारुकौंतीचंडाशठीनलदचंपकहेमपुष्पं ॥ स्थौणेयगंधरसपूतिदलंमृणालश्रीवासकुंदुरुनखांवुलवंगकुष्ठं॥ कालीयकंजलदकर्कटचंदनश्रीजात्याःफलंसविकसंसहकुंकुमेन ॥ स्पृक्कातुरुष्कलघुलयंतथाविनीयतैलंबलाक्कथनदुग्धदधिप्रपक्वं ॥ मंदानलेनहितमेतदुदाहरंतिवातामयेपुवलवर्णहुताशकारी ॥

अर्थ—वेलदोडे, एकांगी मुरा, सुरु, दगडफूल, देवदार, रेणुक बीज, गठोणा, कचोरा व सोनचांपा, थोर नाहावा, गांठिवन, रक्याबोळ, पीत लोध्र, कमळाची देंठी, विशेष धूप, साळईचा डीक, नखला, वाळा, लवंग, कोष्ठकोळिंजन, दारुहळद, नागरमोथा, ऊंस, चंदन, वेलफळ, जायफळ, रक्त पुनर्नवा, केशर, मोरवेल, शिलारस व पीतवर्ण वाळा यांचीं चूर्णें घालून चिकण्याचा काढा दुग्ध व दहीं यांचाशीं युक्त मंदाग्नीने पक्व केलेलें तेल, वातरोगावर हितकारक व बल वर्ण आणि अग्नि यांतें देणारें असें आहे.

महालक्ष्मीनारायणतैल.

दशशतांघ्रिशिवेतरमल्लिकादहननागबलाऋबुवाण्पिका ॥ कितवलां
गलकीवनमल्लिकाकुटजहेंदुवृकीखरशृंगिका ॥ मधुकबीजकचंपक
मालतीस्नुहिवलाकमिहाप्रपुंनाटकाः ॥ शतदलाश्ववराहकवासनीं
ऋबुकधन्वनपिप्पलिरक्तिका ॥ अतिवलाद्विविषाशकदाडिमीशिख
रिशाल्मलिसिंधुकतुंडिका ॥ सुपिरफंगुलकाशसुमर्कटीवरककुंभनि
कुंभजयंतिका ॥ कुसरिपिच्छलिकाकरमर्दिकाकसनमर्दककेवणिरू
षिका ॥ अतसिवत्सकगृध्रमहीरुहोविदुलकुंजलिकाद्वितयोच्चटा ॥
दधिफलस्नुववृक्षमृगादनीमधुरसामगधाजलपत्रिका ॥ रुदंतिकापृथ
गेभ्यजटासुधीसमनुगृह्यदशांघ्रिकं ॥ मुनितरुमलयतपनापामार्गवी
जनक्तमालशृंगाटी ॥ प्रपुंनाटोहेमदुग्धाकल्लेरुहाणांतुबीजानि ॥ धा
त्रीशिग्रुकरंजवब्बुलमधुष्ठीलिंगुदीनेपतीनीपारग्वधरक्तसारवदरीवि
स्फूर्जनोकांचनः ॥ चिंचोदुंवरतापसीद्रुमयुगांकोलद्वयंसल्लकीगायत्री
कलिवृक्षभंडिकदराश्वत्थाभयापादपाः ॥ भल्लीकिंशुकमेषशृंगिकिहि
नीभूतांकुशःशल्यकःकोशाम्राजुंनपारिभद्रकमहावृक्षाःकुमार्यासनैः ॥
कुंभीरक्तधनंजयोनियमनोवातारिमोखाव्हयाएतेषांपरिगृह्यवल्कलम
थोरंभाविदारीवरी ॥ आलूकेक्षिरकंदवाजिसुवहाकर्कोटिकागृष्टिका
खर्जूरीसुरसूरणप्रभृतिकान्कंदांश्चसाधूनपि ॥ छिन्नाटरूषकाशिवाप्रिय
मापपर्णीज्योतिष्मतीयुगुलपर्पटमेषवल्ली ॥ भूपर्णिकासजटिकामृगरा
जमुंडीयुक्तर्तरीकुन्लकयुग्मफलार्कभक्ता ॥ भूनिंबवन्हिदमनोगिरिक
र्णिकायुक्चिल्हारकाखदिरकाविजयाकुमार्यः ॥ गंगावतीयुगकवैष्ण
विकासुगंधालंबासुपर्णलतिकासहदेविकाच ॥ गोपीयुगंमृगखुरीसर
णीचकंगुमोर्थश्चनागदमनीमधुपुष्पिकाच ॥ एतानिगृह्यनिखिलानि
तथाब्दयुग्मंचूतास्थितोतरुरुहोवटसंप्ररोहान् ॥ भूशर्करामदकराकुसु
मंचपीलुबर्हिःशिखाकनकोतकिसंप्ररोहान् ॥ व्याघ्राटिकांघ्रिकरकं

तिनिरोत्थसारंकंडूकापित्थभवलोहजटागृहीत्वा ॥ मुष्टिप्रमाणंविधिनो द्धृतानिद्रोणैर्जलानांतिसृभिर्विपक्त्वा ॥ पादावशेषंपरिगृह्यपोतंप्रस्थत्र यंतत्रतिलोत्थतैलं ॥ हिंस्रारक्तावरिष्टासुररजनियुगंसैंहलंगंधसारंशृंगा रंनागपुष्पंपलितकटुफलंरक्तकाष्ठंनतंच ॥ षड्ग्रंथाजोंगकाश्वारुचकक रुहंरोचनारक्तसारंकोरंजीपालंकाव्हंकमिरिपुमधुकंसिंधुजंस्निग्धदा रु ॥ तालीसंजातिसस्यंमलयजममृतंपद्मकंजातिपत्रीसेव्यंपद्मंयवानी कतकुनुरवतीकेशरंपद्मकस्य ॥ पाठीनोराजपुत्रीजलधरचविकासो मवल्कोमधूकंपाक्यःस्वर्जी।शताव्हावनजमगधजामत्स्यपित्ताशठी च ॥ कारुचीपुत्रजीवास्तपनकनकजंवीजभृंगाररेचीवृक्षाम्लंदेवधूपो जरणरसरसाकल्कराकुष्टिमंच ॥ मृद्वीकासाकुरंडंनियमनधनिकाथ न्वयासंचत्राह्मीविश्वंकैरातकेक्षुरकरिकणामोदकंवस्तमोदा ॥ शक्रा व्हातिल्वलाख्यश्छुरपुरसुपवीमेथिकाशृंगिकाचप्रत्येकंसंगृहीत्वापि चुदलतुलितामुंचचासकृत्प्रपिष्टा ॥ तानिःक्षिप्याशुपात्रेशुचिजनवि स्दतंनिर्मलंवैद्यवर्योगव्यंवादुग्धमाजंयुगपरिगणितंपूर्वमुक्ताच्चतैलात् ॥ नारायण्यस्वरसकमयोरंगमातारसंचतैलोन्मानंविपचरविजेभाजनंप्र त्यहंवा ॥ तस्मिन्पाकंगतवतियथाविध्यनुप्रक्षिपेच्चसौगंधार्थेशिशिर किरणंकुंकुमंवेधमुख्यं ॥ गोधूमाख्यंसुसुरभियुतंगंधकर्चूरकंचजाती पुष्पंशतदलसमंमल्लिकंचंपकंच ॥ लोवानेनत्वतिसुरभितेकाचभांडे निधायतैलंचैतन्नृपतिसदनेधारयेद्वैद्यवर्यः॥ पानेवस्तौविहितमशनेना वनाभ्यंजनेचमातंगेवामनुजघनयोर्वातरोगाभिभूते ॥ वाताष्टीलांग लहनुशिरोगृध्रसीपादशूलंपक्षाघातंश्रवणनयनभ्रूललाटेपुशूलं॥ ऊरू स्तंभार्दितवधिरतैकांगरोगापतानंमन्यास्तंभंत्रिकहृदयरुङ्मूकताक्षेप खांज्यं ॥ जिव्हास्तंभंगतिविकलतांकुब्जतांदंतशूलंस्तन्योगुल्मद्वयंवा गुदकटिचरणभ्रंशगुल्फौचसुप्तिं ॥ विश्वाचींवावृषणपवनंधातुवाताप तानंमूकंकंपंजयतिसकलान्वातरोगाननुक्तान् ॥ रेतोवृद्धिंजनयति नवयौवनंपौंस्त्ववृद्धिंवुद्धिंप्राणंवितरतितथापुष्टिमायुष्यकारी ॥ वं

ध्यायाःपुत्रदंस्यात्ज्वरविहिततनौशोषदौर्भाग्यहंतृतैलंभूपोपयाग्यं विनिगदितमिदंनाममनारायणंच ॥

अर्थ–शतावरी, बोर, मोगरा, मोठा चिकणा, एरंड, वाफळी, धोतरा, खड्यानाग, रानमोगरा, कुंडा, हेदी, पाहाडमूळ, खरनांबळ, जेष्टमध, माहाळुंग, चांपा, जाई, निवडुंग, चिकणा, वावडिंग, टांकळा, वडिशेप, अस्कंध, वाराहीकंद, वासनवेल, रक्त एरंड, धामण, नांदरुखी, पतंग, फार मोठा चिकणा, काळी व शुभ्र वाघांटी, घेटूळ, डाळिंब, आघाडा, कांटे शेवरी, निर्गुंडी, कडु तोंडली, देवनळ, पांगली, फास दर्भभेद, काचकुहिली, भार्ङीमूळ, तेड, दंती, टाकळी, कुसरी, गोंधणी, करंद, काशिवदा, केवणी, अर्क, जवस, काळा कुडा, बोर, वेत, साल, पृथु साल, श्वेत गुंजा, कवठ, घोटी, वृंदावन, मोरवेल, पिंपळी, कमळिणी, रुदंती, दशमुळें, या सर्वांचीं मूळे घ्यावीं. अगस्त्या, चंदन, विवया, आघाडा, करंज, शिंगाडा, टाकळा, कारेळी, सागरगोटी यांचीं बीजें घ्यावीं. आवळी, शेवगा, करंज, बाभूळ, मोहाचा वृक्ष, हिंगणबेट, करंडकांगोणी, नेपी, कळंब, वाहवा, सिसवा, बोर, टेंभुर्णी, कांचनार, चिंच, उंबर, अगस्त्याद्वय, (तांबडा पांढरा) अंकोल, पोटचा अंकोल, रायआवळे, खैर, बेहेडा, भेंडी, श्वेत खैर, अश्वत्थ व हरीतकी यांचीं पंचांगें घ्यावीं. निवरा, पळस, मेढशिंगी, किन्हई, नाकशिकणी, मेळीचे झाड, कोकंब, सादडा, कडुनिंब, निवडुंग, कोरफड, द्रोणपुष्पी, आसाणी, कुंभा, रक्त सादडा, वायवर्णा, वावळा व खुळखुळा, यांच्या, साली घ्याव्या. केळ, वेदरी, शतावरी, आलुकंद, क्षीरकंद, अश्वगंधा, मुंगुसवेल, गंधाकटोली, विर्वोळी, मुसलीकंद, अमरकंद व सुरण यांचे कंद घ्यावे. गुळवेल, अडुळसा, बेल, रानउडीद, कांगोणी, मालकांगोणी, पित्तपापडा, मेढवेल, वासनवेल, गुंजा, माका, मुंडी, निर्गुंडी, कातरी निर्गुंडी, कडु पडवळ, गोड पडवळ, उतरणी, आदित्या, यांचीं पंचांगे घ्यावीं. चिराईत, चित्रक, दवणा, काळी व पांढरी गोकर्णी, लाजाळू, खैर, भांग, कोरफड, गंगावतीद्वय, वृध्दारु, तेरडा, कडु भोपळा, कांडवेल, महाबला, उपरसळी, लहान व मोठी हरणखुरी, हरणवेल, कांग, मोरवेल, नाय व मोहाचे झाड, यांचीं पंचांगें मूळ घ्यावीं. नागरमोथा, भद्रमोथा, आंब्याची कोय, वादांगूळ, वडाचे पारांबे साकरकंद, भायटीफूल, अक्रोड, मोरशिखा, सोनकेवड्याचे पारांबे, वाघाटी, दाळिंब, कुहिलीचीं पाळे, कवटीचे मूळ, लोखंडीमूळ, हीं चार चार तोळे घ्यावीं; आणि त्यात ३०७२ तोळे पाणी घेऊन त्यांत घालून चतुर्थांश काढा गाळून घ्यावा. त्यांत १९२ तोळे तिळांचें तेल घालावें; आणि जटामांसी, मंजिष्ठ, काळा वाळा, देवदार, हळद, दारुहळद, दालचिनी, चंदन, लवंग; नागकेशर, गुग्गुल, कायफळ, पतंग, तगर, वेखंड, कृष्णागरु, अस्कंध, पादेलोण, नखला, गोरोचन, रक्तचंदन, तुरटी, कोष्टकोळिंजन, वावडिंग, ज्येष्ठीमध, सैंधव, तेल्यादेवदार, तालीसपत्र, जायफळ, धने, मलयागर, बचनाग, कमलाक्ष, जायपत्री, वाळा, कुमळ, ओवा, निवळीचें बीं, तुरटी, कमळकिंजल्क, चित्रक, रेणुका, भद्रमोथे, चवक,

बावंची, ज्येष्ठमध, जवखार, सर्जीखार, वडिशोप, चिरफळ, पिंपळी, कुटकी, कचोरा, वाफळी, पुत्रजीवफल, विबवा, धोतऱ्याचें बीं, माका, निशोत्तर, चिंच, गुग्गुळ, जिरे, राळ, रास्ना, अकलकरा, डाळिंबाची साल, द्राक्षें, अक्रोड, निंब, धनें, धमासा, कारिवणा, सुंठ, किराइत, तालिमखाना,. गजपिंपळी, ओंवा, अजमोद, इंद्रावण, लोध्र, कुहिलीचें मूळ, गुग्गुळु, लघु कारली, मेथी, कांकडशिंगी, गाईचें किंवा शेळीचें दूध तेलाचे दुप्पट; आणि तेलाचे दुप्पट शतावरीचा रस व तितकाच लाखेचा काढा हीं सर्व एकत्र करून तांब्याच्या भांड्यांत पचन करावीं; आणि त्यांत सुगंधा करितां कापूर, केशर, कचोरा, गहुला, कापूरकचरी, जाई, शेवंती, मोगरी व चापा यांचीं फुलें घालून नंतर उदानें काचेचे भांडें उदऊन त्यांत भरून ठेवावें. तें प्राशनार्थ, बस्ति, खाण्यास, नस्य, आंगास लावणें, हत्ती किंवा मनुष्य, यांनां वातरोग झाला असतां; आणि वाताष्टीला, गलग्रह, हनुग्रह, शिरोग्रह, गृध्रसी, पादशूल, पक्षाघात, कान, नाक, भोंवया व ललाट यांचा शूल, ऊरुस्तंभ, अर्दित, बधिरता, एकांगरोग, अपतानक, मन्यास्तंभ, तिर्डवें, ऊर यांतील शूल मुकेपणा, आक्षेपक, खंज, जिव्हास्तंभ, लंगडेपणा, कुबडा, दंतशूल, स्तनरोग, गुल्म, गुद, कंबर व पाय यांचा भ्रंश, खल्ली, सुप्ति, विश्वाची, वृषणवात, धातुवात, अपतानक, मुकेपणा, कंप व संपूर्ण उक्तानुक्त वातरोगांनां जिंकितें, वीर्य वाढवितें, यौवन देतें, पुंस्त्ववृद्धि करतें, प्राण, बळ, पुष्टि व आयुष्य यांतें देणारें, वंध्येला पुत्र देणारे, ज्वर, क्षय व दुर्भगता याचें नाशक आहे. हें तेल राजांनां योग्य याला महालक्ष्मीनारायण तेल ह्मणावें.

रास्नाद्यघृत.

रास्नापौष्करशिग्रुमूलदहनंसिंधूत्थगोक्षूरकंपिष्टापिप्पलिसंयुतंचलगदेपेयंसदासर्पिषा ॥ संपाच्याथचतुर्गुणेनपयसावावाजिगंधायुतंसर्पिः पेयमसाध्यवातगदजेशुक्रक्षयेदारुणे ॥

अर्थ—रास्ना, पुष्करमूळ, शेवग्याचें मूळ, चित्रक, सैंधव, गोखरू आणि पिंपळी यांचें कल्क, घृत व चौपट दूध घालून घृत सिद्ध करावें; आणि अश्वगंधाच्या चूर्णावरावर असाध्य वायु आणि शुक्रक्षय यावर प्राशनार्थ द्यावें.

पंचतिक्तघृत.

निंबामृतावृषपटोलनिदिग्धिकानांभागान्पृथग्दशपलानिपचेद्धटेपां ॥
अष्टावशेषितरसेनपुनश्चतेनप्रस्थंघृतस्यविपचेत्पिचुतुल्यकल्कैः ॥
रास्नाविडंगसुरदारुगजोपकुल्याद्विक्षारनागरनिशामिशिचव्यकुष्ठैः॥

तेजोवतीमरिचवत्सकदीप्यकाग्निरोहिण्यपुष्करवचाकणमूलयुक्तैः ॥
मंजिष्ठयातुविषयात्रिवृतायवान्यासंशुद्धगुग्गुलुपलैरपिपंचसंख्यैः ॥
तत्सेवितंघृतमतिप्रबलंसमीरसंध्यस्थिमज्जगतमप्यथकुष्ठमीदृक् ॥
नाडीव्रणार्बुदभगंदरगंडमालाजत्रूर्ध्ववातगदगुल्मगुदोत्थमेहान् ॥
यक्ष्मारुजश्वसनपीनसकासशोफहृत्पांडुरोगमयविद्रधिवातरक्तं ॥

अर्थ—कडु निंब, गुळवेल, अडुळसा, पटोल व रिंगणी हीं प्रत्येक ४० तोळे घेऊन १०२४ तोळे पाणी घालून अष्टमांश उतरून गाळून घ्यावा; आणि त्यांत तूप ६४ तोळे घालून त्यांत रास्ना, वावडिंग, देवदार, गजपिंपळी, यवक्षार, टांकणखार, सुंठ, हळद, बडिशेप, चवक, कोष्ठकोळिंजन, मालकांगोणी, मिरें, कुड्याची साल, ओंवा, चित्रक, कुटकी, पोखरमूळ, वेखंड, पिंपळीमूळ, मांजिष्ठ, अतिविष, निशोत्तर व किरमाणी ओंवा हीं प्रत्येक एक एक तोळा घेऊन त्यांचा कल्क करून त्या तुपांत घालावा; व त्यांत गुग्गुळ पांच तोळे घालून घृत सिद्ध करावें. तें सेवन केलें असतां; अति वाढलेला वायु, संधि, अस्थि व मज्जा यांतील वायु, कुष्ठ, नाडीव्रण, अर्बुद, भगंदर, गंडमाला, जत्रूच्या वरील भागाचे वायुरोग, गुल्म, अर्श, मेह, क्षय, श्वास, कास, पीनस, सूज, पांडु, विद्रधी व वातरक्त या व्याधींचा नाश करितें.

वातरोगीं पथ्यापथ्य.

कुलित्थामापगोधूमारक्ताभाःशालयोहिताः॥पटोलंशिग्रुवार्ताकंदाडिंमंचपरूपकं ॥ ॥ मत्स्यंडिकाघृतंदुग्धंकिलाटंदधिकूर्चिका ॥ बदरं लशुनंद्राक्षातांबूलंलवणंतथा ॥ चटकःकुक्कुटोबर्हिस्तित्तिरश्चेतिजांगलाः ॥ शिलींध्रःपर्वतोनक्रोगर्गरःखुडिशोझषः ॥ यथाश्रमंयथावश्यंयथाचरणमेवहि ॥ वातव्याधौसमुत्पन्नेपथ्यमेतन्नृणांभवेत् ॥

अर्थ—कुलित्थ, उडीद, गहूं, राते तांदूळ, पडवळ, शेवगा, वांगीं, डाळिंब, फालसा, खडिसाकर, घृत, दूध व दहीं समान एकत्र शिजवून केलेला खरवस, कीलाट, बोर, लसूण, द्राक्षें, विडा, मीठ, चिमणी, कोंबडा, मोर, तित्तिर, अरण्यपशु, भूच्छत्र, किंराइत, सुसर, गर्गर, खुडिश, झष हे मत्स्य, इतके पदार्थ जसे श्रम, जशी आवश्यकता, जसें आचरण असेल तसें पाहून वातव्याधि उत्पन्न झाला असतां; पथ्यास योजावें.

अपथ्य.

चिंताप्रजागरणवेगविधारणानिछर्दिःश्रमोनशनताचणकाकलायाः॥

श्यामाकजूर्णकुरविंदुनिवारकंगुमुस्तास्तडागतटिनीसा॰
क्षौद्रंकपायकटुतिक्तरसाव्यवायोहस्त्यश्वयानमपिचंक्र ।७
आध्मानिनोर्दितवतोपिपुनर्विशेषात्स्नानंप्रदुष्टसलिलैर्द्वि॰
निःशेपतंत्रपरिकीर्तितएपवर्गोनृणांसमीरणगदेपमुदंनदत्ते
गस्त्वसाध्योयंदैवयोगात्सुसिध्यति ॥ अनुमानेनकुर्वंतिवैयकं

अर्थ–चिंता, जागरण, वेगधारण, ओकारीचें औषध, श्रम, उपोषण, ह
सांव्याचे पीठ, गुरु साळी, वऱ्या, नाचण्या, कांग, नागरमोथा, तळें व
पाणी, वेळूचे कोंब, मद्य, तुरट, तिखट, कडु, इतके रस, मैथुन, हत्ती व
बसणें, फार फिरणें, वाजेवर निजणें हीं वातव्याधीवर अपथ्य आहेत; आणि आध्म॰
हे जास्त आहेत त्याणी विशेषेंकरून दुष्ट पाण्याचें स्नान, दांत घासणें, हे हि व
ऱे सर्व ग्रंथ अवलोकन करून अपथ्य निवडून काढले आहे. वातरोग तर अस॰
परंतु दैवयोगानें सुसाध्य होतो. याकारणास्तव वैद्यानीं अनुमानेंकरून चिकित्सा
प्रतिज्ञेने करूं नये.

वातरोगीं पथ्य.

अभ्यंगोमर्दनंवस्तिःस्नेहंस्वेदोवगाहनं ॥ संवाहनंसंशमनप्रवृत्ति
र्वातवर्जनं ॥ अग्निकर्मोपनाहश्चभूशय्यास्नानमासनं ॥ तैलद्रोणी
शिरोवस्तिःशमनंनस्यमातपः ॥ संतर्पणंवृहणंचकीलाटदधिकूर्चि
काः ॥ सर्पिस्तैलंवसामज्जास्वाद्वम्ललवणारसाः ॥ नवीनास्तिल
गोधूममापाःसंवत्सरोपिताः ॥ शाल्यःपष्टिकाश्चापिकुलित्थानांरसाः
पुरः ॥ ग्राम्यानूपखरोष्ट्राश्वरासभच्छागलादयः ॥ आरूपाःकोल
महिपन्यंकुखड्गिगजादयः ॥ औदकाहंसकादंवचक्रमर्दवकादयः ॥
विलेशयाभेकगोधानकुलश्वाद्विजादयः ॥ चटकःकुक्कुटोवर्हिस्तित्तिर
श्चेतिजांगलाः ॥ शिलींध्रःपर्वतोनक्रोगर्गरःकवयीलिशाः ॥ एरंडचु
लकीकर्मशिशुमारस्तिमिंगिलः ॥ रोहितोमद्गुरोशृंगीवर्मीचखुडि
शोझपः ॥ पटोलंशिग्रुवार्ताकंलशुनंदाडिमद्वयं ॥ पक्वंतालंरसालं
चलदंवुपरूपकं ॥ जंवीरंवदरंद्राक्षानागरंगोमधूकजं ॥ प्रसारि
णीगोक्षुरकःशुक्लाक्षीपारिभद्रकः ॥ पयांसिचपयःपेटीस्वुतैलंगवांज

लं ॥ मत्स्यंडिकाचतांबूलंधान्याम्लंतिंतिडीफलं ॥ स्निग्धोष्णानि चभोज्यानिस्निग्धोष्णंचानुलेपनं ॥ विशेषाद्दमनार्तानामामाशयमुपागते ॥ पक्काशयस्थेमांसस्थेतथास्निग्धंविरेचनं ॥ प्रत्याध्मानाध्मानयोर्वावर्तिलंघनदीपनं ॥ अष्ठिलाख्येमूत्रविधिःशुक्रस्थेक्षयजित्क्रिया ॥ त्वङ्मांसासृक्शिराप्राप्तेहितंशोणितमोक्षणं ॥ यथाश्रमंयथावस्थंयथाचरणमेवहि ॥ वातव्याधौसमुत्पन्नेपथ्यमेतन्नृणांभवेत् ॥

अर्थ—अभ्यंग, मर्दन, बस्ति, स्नेह, घाम, स्नान, आंगासलावणें, वातशामक, वायूची अधोभागानें प्रवृत्ती, धारा बंदकरणें, डाग, पेंड, भूमीवरशयन, स्नान, आसन, तेलाच्या द्रोणीत बसणे, मस्तकबस्ति, शमन, ऊन, संतर्पण, बृंहण, ताकाची निवळ, तूप, तेल, वसा, मज्जा, गोड, आंबट, खारट, हे रस व ताजे तांदूळ व गहूं उडीद, साटक्यासाळी, व कुळीथ यांचे रस, गुग्गुळ, ग्राम्य, आनूपमांसे व गाढव उंट, बोकड, बिबटे, डुकर, रेंडा, सांबर, गेंडा व हत्ती यांची; व हंस कलहंस, चक्रवाक, बगळा, हे उदकसमीप राहणारे; व बेडूक, घोरपड, मुंगुस, हे बिळांत राहणारे व ओढ्यांत राहणारे चिमणी, कोंवडा, मोर व तित्तिर, हे; व साळशति पर्वत, नक्र, गर्गर, कंव, इलिश, एरंड, गंडुषविधी, सुसवर, तिमिंगिल, रोहित, मद्गुर, शृंगी, वर्मी, खुडिश, हे मासे व पडवळ शेगवा, वांगे, लसूण, खाटें व गोडें डाळिंब, पिकें ताडफळ, आंबा, वाहातें पाणी, फालसा, जांबीर, बोर, द्राक्षें, नारिंग, मधुकाष्ठ, लाजाळू, गोखरू, धावडा, निंब, दुग्धें, पयःपेटी, एरंडेल, गोमूत्र, खडीसाकर, तांबूल, कांजी, चिंच व स्निग्ध आणि ऊष्ण अशीं भोजनें व अनुलेपनें व विशेषें करून वांतिनें पीडित, आमाश्रित दोष, पक्काशयाश्रित व मांसाश्रित, दोषांनां स्निग्ध औषधानीं रेच, आणि प्रत्याध्मान व आध्मान वायु याला गुदवर्ति, लंघन व दीपन औषध, अष्टीला वायूला मूत्रल औषधें व शुक्रगतवायूवर क्षयनाशक औषध, आणि त्वचा, मांस, रक्त, आणि शिरा यांमध्यें वातविकार असतां रक्त काढणें. याप्रमाणें जसे श्रम व अवस्था असेल तसें आचरण करावें. हें वातव्याधिष्ठ मनुष्याला पथ्य सांगितलें.

अपथ्य.

चिंताप्रजागरणवेगविधारणानिछर्दिःश्रमोनशनताचणकाःकलायाः ॥ नीवारकंगुशरवैणवकोरदूषश्यामाकचूर्णकुरुविंदमुखानियानि ॥ धान्यानितालतृणजातिचराजमाषामुद्गागुडांगतटिनीसलिलंकरीरं ॥ जंबूकसेरुनलकंक्रमुकंमृणालंलिक्षारवीजमपितालफलास्थिमज्जा ॥ शा

लूकतिंदूककटिल्लकादीन्रसालशिंबीचवेत्रवरशारदमुद्गरंच ॥ शीतांबुरासभपयोपिविरुद्धमन्नंक्षारोपिशुष्कपललंक्षतजस्रुतिश्च ॥ क्षौद्रंकषायकटुतिक्तरसाव्यवायोहस्त्यश्वयानमपिचंक्रमणंचखट्वा ॥ आध्मानिनोदिनवतोपिपुनर्विशेषात्स्नानंप्रदुष्टसलिलेद्विजघर्षणंच ॥ निःशेषतंत्रपरिकीर्तितएषवर्गोनृणांसमीरणगदेपुमुदंनदत्ते ॥

अर्थ–चिंता, जागरण, मलमूत्रादिकांच्या वेगाचें धारण, वांति, श्रम, उपवास, हरभरे, वाटाणे, देवभात, कांग, शरजातितृण, वेळवाचे कोंम, हरीक, साव्याचें पीठ, व व्रीहिशाळी, हीं धान्यें तालफळ, तृणधान्यें, चवळ्या, मुग, गूळ, नदीचें पाणी, वंशांकुर, जांबूळ, कलिंगड, पंचक्षार, सुपारी, बिसें, लिक्षारबीज, ताडगोळे, कमळकंद, घेवडा, काटले, आंबा, खरसंबळ, वेत्राग्र, हिरवे मूग, तुरटी, थंडपाणी, गाढवाचें दूध, विरुध्धान्न, क्षार, सुकलेलेंमांस, रक्तस्राव, मध, तुरट रस, तिखट व कडू हे रस, स्त्रीसंग, हत्ती व घोडा यांवर बसणें, हवाखात फिरणें, खाटलें व पोट फुगलें असतां पुनः भोजन, खराबपाण्यानें स्नान, दात घांसणें, हें संपूर्ण वैद्यकतंत्रांमध्ये वातरोग्याला अपथ्य वर्ग सांगितला.